# मानस गूढार्थ चंद्रिका
# बालकाण्ड (मराठी)

## प्रथम-खंड

लेखक

श्री. प. पू. प्रज्ञानानंद सरस्वती



प्रथम आवृत्ती : १९९७

© श्रीरामचरितमानस प्रेमी मंडळ, डोंबिवली.


*प्रकाशक :*

**श्रीरामचरितमानस प्रेमी मंडळ,**
४, श्री गणेश अनंतराज सोसायटी, नेहरू रोड,
जलाराम मंदिर जवळ, डोंबिवली (पू.) ४२१ २०१

मुद्रक :

**ओमेगा ऑफसेट**
२, ३, एमरॉल्ड कॉर्नर,
मराठा कॉलनी, टिळकवाडी,
बेळगाव - ५९० ००६.
फोन : ४२४१२४

मूल्य : रु. २५०/- फक्त



श्री प. पू. प्रज्ञानानंद सरस्वती स्वामी

॥ श्रीसद्गुरु प्रसन्न ॥

॥ राम ॥

# प्रकाशकाचे निवेदन

प्रिय बंधु भगिनीनो,

आज श्रीपरमपूज्य स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती यांनी लिहिलेल्या 'मानस गूढार्थ चंद्रिका' या बृहत् टीकेपैकी बालकांड मंगलाचरणापासून ते दोहा ३२ अखेरपर्यंतची ही टीका (खंड १) आपल्या हाती देताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. आतापर्यंत बालकांडापैकी 'रामनामवंदना' या प्रकरणावरील टीका वै. पूज्य डोंगरे महाराज यांच्या प्रेरणेने प्रकाशित झाली होती. तसेच आतां जी टीका प्रकाशित होत आहे तीही पूर्वी 'मानस संघ' रामवन (सतना) तर्फे वै. पू. शारदाप्रसादजी यांनी २ खंडात १९६३ मध्ये (हिंदीत) प्रकाशित केलेली होती. या टीकेचा दोन्ही मिळून १ खंड आम्ही प्रकाशित करीत आहोत. प्रथम ४३ दोह्यांवरील टीकेपर्यंतच्या टीकेचा पहिला खंड करावा असा विचार होता पण पृष्ठ संख्या फारच वाढू लागली म्हणून ३२ दोह्यापर्यंतच प्रथम खंड काढावयाचा निर्णय घ्यावा लागला. बालकांडावरील एकूण टीका पू. स्वामीजींच्या हस्ताक्षरांतील आखीव तावांची एकूण कमीत कमी २१०० पृष्ठे होतील एवढी आहे. त्यामुळे ती आमच्या सोयीनुसार ५ किंवा ६ खंडात प्रसिद्ध केली जाईल. कदाचित् एखादा खंड वाढेलही. या भागावर पू. स्वामीजींनी लिहिलेल्या मराठी टीकेपेक्षा हिंदी टीकेत मूळांतच बरीच भर पडली आहे. शिवाय मानस पीयूष मधील हवाला देऊन बऱ्याच ठिकाणी तेथील भावांचे खंडण मंडण करण्यात आल्यानेही टीका वाढली आहे. हे सर्व केवळ कर्तव्यबुद्धीने केले असल्याचा स्पष्ट उल्लेख पू. स्वामीजींनी केला आहे. यात पांडित्य प्रदर्शन वा दुसऱ्याचा पाणउतारा करण्याचा हेतू जराही नाही. असे त्यांनी म्हटले आहे.

श्रीरामचरितमानसातील बालकांड सर्वात मोठे म्हणजे ग्रंथाच्या - सुमारे $^1/_3$ आहे असे म्हटले तरी चालेल. यात दोहे ३६१ असून काव्यपंक्ति सुमारे ४०१९ आहेत. संस्कृत मंगलाचरण ७ श्लोकात असून ते श्लोक वैशिष्ट्यपूर्ण आहेत. उदाहरणार्थ पहिला श्लोक 'वर्णानामर्थ – संघानां' याचा साधा अर्थ घेतला तर ग्रंथारंभी शारदा व गणपति यांना वंदन केले आहे असे वाटते पण गूढार्थ लक्षात घेतला तर हे वंदन 'जगत् पितरौ सीतारामचंद्रौ' यांना आहे. हे पू. स्वामींनी

दाखवून दिले आहे. तसेच गोस्वामींनी ग्रंथारंभ 'व' या अमृत बीजाने केला असून उपसंहारही मानवाः मधील 'व' या अमृत बीजानेच केला आहे. तसेच ग्रंथाचाच नव्हे तर प्रत्येक कांडाचा आरंभ 'म' गणाने केला आहे. म-गण मंगलश्रीकारक आहे असे छंदशास्त्र सांगते. शिवाय पहिला श्लोक 'अनुष्टुभ' छंदात आहे. अनुष्टुभ या शब्दाचा एक अर्थ शारदा-'सरस्वती'-वाणी हा आहे. सरस्वतीच्या वंदनास 'सरस्वती' अर्थाचा छंद वापरला यापेक्षा आणखी सबब हेतु कोणता असू शकेल? शिवाय या श्लोकात वस्तुनिर्देशात्मक मंगल असून आशीर्वादात्मक मंगल पुढे हिंदी मंगलाचरणात कसे आहे हे ही पू. स्वामीनी दाखवून दिले आहे.

बालकांडात 'मंगल' शब्द शंभरवेळा तरी आहे. अयोध्याकांडात ६७ वेळा, किष्किंधाकांडात एक वेळा, सुंदरकांडात तीनदा, उत्तरकांडात सहा वेळा आहे. अरण्य व लंकाकांडात 'मंगल' शब्द नावाला सुद्धा नाही. अयोध्या, किष्किंधा, सुंदर व उत्तरकांडातही जेथे आला आहे त्यात बऱ्याच ठिकाणी बालकांडातील 'मंगलांची' पुनरावृत्तीच आहे. बालकांडातही 'मंगल' शब्दाचा संबंध प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे राम किंवा सीतेशींच कसा आला आहे याचे नमूनेही पू. स्वामींनी टीकेत दिले आहेत. रामचंद्र हे 'मंगलायतनं हरिः' आहेतच. संस्कृत मंगलाचरणातील प्रत्येक श्लोक क्रमशः एकेका कांडाचा प्रतिनिधि कसा आहे हे पू. स्वामीनी उत्तम प्रकारे दाखवून दिले आहे.

प्रत्येक ठिकाणी उपक्रमोपसंहारादि व विषय, अधिकारी संबंध व प्रयोजन या अनुबन्ध चतुष्टयाचा वापर गोस्वामींनी कसा केला आहे हे पू. स्वामींनी दाखवून दिले आहे. इतर कुठल्याही टीकाकारांनी या महत्त्वाच्या गोष्टीकडे लक्षच दिलेले नाही. तसेच प्रत्येक ठिकाणी मागील श्लोक वा चौपाई इत्यादिची पुढील श्लोक व चौपाईशी संगति या टीकेत स्पष्ट केली गेली आहे. हे या टीकेचे खास वैशिष्ट्य म्हणावे लागेल. मंगलाचरणाच्या प्रत्येक श्लोकावरील टीका अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असून हृदयस्थ ईश्वराचे दर्शन=साक्षात्कार हे ग्रंथ प्रयोजन नवविधा भक्तीने प्राप्त करून घेऊन नंतर प्रेमभक्तीने रामचंद्रांचा सगुण साक्षात्कार हा तुलसीदासांचा अभिप्रेत सिद्धान्त कसा आहे हे फार उत्तम तऱ्हेने दाखवून दिले आहे. वैराग्याचे बीज सात्विक श्रद्धा असून अशा श्रद्धेने युक्त धर्माचरण केले तरच वैराग्याची प्राप्ती होते. श्रद्धा आणि विश्वास हे समानार्थी शब्द वाटतात पण त्यांच्या अर्थात फरक आहे श्रद्धा म्हणजे आदर, पूज्यबुद्धी आणि विश्वास म्हणजे आस्तिक्य बुद्धी. त्यांना तुलसीदासांनी भवानी शंकर म्हटले आहे.

सीता शब्द स्, इ, ई, त्, अ, आ, हे सहा वर्ण मिळून झालेला आहे. त्यांचा क्रमशः अर्थ स्=सर्वकारण, सार्ववर्णिक, इ-पुष्टिद, अक्षोभकर; ई-वाक्प्रसादकर, निर्मल,=सी. त्-धनधान्यादिसंपत्प्रद+अ-मृत्युंजय, सर्वव्यापक+आ,-आकर्षणात्मक, सर्वगत=ता=सीता. एकूण 'सीता'चा अर्थ-सर्वकारण, सर्ववर्णात्मक, पुष्टिदायक, क्षोभ नष्ट करणारी, वाक्प्रसाद देणारी, मृत्युपासून सोडविणारी, सर्वव्यापक, सर्वत्र असलेली आणि शरणागताला आश्रय देणारी, जवळ ओढून घेणारी अशी जी ती सीता याप्रमाणे 'अक्षमालोपनिषदांतून सर्व वर्णाचे अर्थ घेऊन ती 'सर्व श्रेयस्करी' कशी आहे हे दाखवून दिले आहे.

सद्गुरू ज्ञानदाते असले तरी सीता - ब्रह्मविद्या आणि राम परमात्मा', सगुण साकार रघुनाथ यांची कृपा झाल्याशिवाय ज्ञान होऊ शकत नाही. म्हणून पाचव्या व सहाव्या श्लोकात मिळून सीतारामभक्ति साधनरूपाने सुचविली आहे. ज्ञान झाले तरी प्रेमभक्तीनेच स्वान्तसुख प्राप्ती होते. व अशी स्वान्तःसुखदायक प्रेमभक्ति मिळविण्याचे सोपे साधन म्हणजे श्रीरामचरित्र होय. असे फार उत्तम तऱ्हेने पटवून दिले आहे.

'नाना-पुराण....' या सातव्या श्लोकात 'रामायणे निगदितं' या पदाचे टीकाकारांनी वेगवेगळे अर्थ काढले आहेत. पण मानसातील वचनांच्या आधारे हे रामायण म्हणजे 'रामचरित मानस मुनिभावन। विरचित शंभु सुशोभन पावन। (१।३५।९) असा उपक्रमात व 'यत्पूर्वं प्रभुणाकृतं सुकविना श्रीशम्भुना दुर्गमं।.... वगैरे उत्तरकांडांत ग्रंथाच्या उपसंहारात ज्याबद्दल म्हटले आहे तेच श्रीशंभुनी पूर्वी रचलेले (संस्कृत) रामायण तुलसीदासांनी हिंदी भाषेत निबद्ध केले असा निष्कर्ष पू. स्वामीजींनी काढला आहे.

संस्कृत मंगलाचरणानंतर पुढे पाच सोरठ्यात हिंदीत मंगलाचरण असून त्यात गणेशादिकांना बाह्यार्थाने नमन आहे आणि अवतार घेणाऱ्या राम, नारायण, आणि विष्णु यांना गूढार्थाने कसे वंदन केले आहे हे सविस्तार स्पष्ट केले आहे. तसेच शंकर श्रीरामचरितमानसाचे मूळ जनक आणि गोस्वामींचे गुरु मातापिता इत्यादी असल्याने त्यांची स्तुती आहे आणि गोस्वामींच्या नराकार गुरूंना (नररूप हर) यांना वंदन आहे. "शिव एव गुरुः साक्षात् गुरुदेव शिवः स्वयम्" हे दाखविले आहे.

पाचव्या सोरठ्यापासून दोहा २/१ पर्यंत गुरुवंदनाच्या निमित्ताने सद्गुरु महिमा आणि सद्गुरु दर्शन झाल्यापासून सद्गुरु कृपाप्राप्तिपर्यंतचा गुरुसेवा-ध्यानादिकांचा

क्रम आणि त्याचे फळ परम मनोहर काव्यात न्यायघटित पद्धतीने गोस्वामींनी कसे वर्णिले आहे ते या टीकेत दाखवून दिले आहे.

पुढे विप्र, संत, खल इत्यादिकांच्या वंदनात त्याचे महात्म्य, लक्षणे, गुण, अवगुण इत्यादिंचे वर्णन मनोहर सुभाषितमय काव्यात गोस्वामींनी केले आहे. या सर्व टीकेपैकी 'मूक होइ बाचाल पंगु चढइ गिरिवर गहन' ह्यात 'मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरिम' यात 'लंघयते' ऐवजी 'चढइ' शब्द घालून गोस्वामींनी मूळापेक्षा सरसता कशी आणली आहे हे बघण्यासारखे आहे. 'साधुचरित सुभ चरित कपासू । निरस बिसद गुनमय फल जासू' हे गोस्वामीनी केलेले रूपक स्पष्ट करताना दोन्हीतील साम्य ३५ विविध मुद्दे देऊन स्वामीजीनी जी तुलना केली आहे ती मूळ या टीकेतूनच वाचण्यासारखी आहे. तसेच संतसमाज हा जंगम तीर्थराजच होय ह्या रुपकावरील टीकाही फार सुंदर झाली आहे. प्रयागांत सरस्वतीचा प्रवाह उघड दिसत नाही, तसेच साधुसमाजात ब्रह्मविचाराचा प्रचार-निरुपण ही सरस्वतीही प्रगट नसते. म्हणजे भक्तिच्या अंगभूत ज्ञानाचे वर्णन केलेले असते. योगशास्त्रात सुद्धा 'इडा भागिरथी गंगा । पिंगला यमुना नदी । इडापिंगलयोंमध्ये सुषुम्नाच सरस्वती' (महायोगविज्ञान) म्हणजे शरिरात सुद्धा सुषुम्ना सरस्वती गुप्तच आहे हे दाखवून दिले आहे. संत आपसात चर्चा करतात तेव्हा ज्ञानश्रवणास एखादा विरागी आला तरी ते ज्ञानश्रवणही कर्मभक्तिशी समन्वित असते. कर्माचा किंवा भक्तीचा उच्छेद करणारी केवळ वेदान्तशास्त्रचर्चा तेथे चालत नाही असे अनेक उदाहरणे देऊन पटवून दिले आहे.

वाल्मीकि, नारद, घटयोनि, कुंभज, गजानन वगैरे ज्यांचे ज्यांचे संदर्भ मूळ काव्यात आले आहेत. तेथे त्या व्यक्तींच्या विषयी सविस्तर माहिती या टीकेत दिली गेली असल्याने टीकेला ज्ञानकोशाचे स्वरूप आले आहे. एवढेच नव्हे तर 'मूक' शब्द येताच 'मूकां'चे विविध प्रकारही वर्णन केले आहेत ते वाचण्यासारखे आहेत. खल वर्णनांतही ज्यांचा ज्यांचा उल्लेख आहे ते राहू, सहस्त्रबाहू, महिषासुर, शेष, पृथुराजा यांच्या कथा देण्यात आल्या आहेत. तसेच 'संतत सुरानीक हित जेही' यात देवाचे सैन्य इन्द्राला सदा हितकर वाटते हा बाह्यार्थ असला तरी 'सुरानीक'चे दोन अर्थ होतात - आणि खलांना सुरा+अनीक म्हणजे मद्य हितकर वाटले तरी संतत वाटणार नाही. म्हणून 'सुरा' - 'सु राति इति सुरा' रा दाने, सु=पीडा कृच्छ्र, संकट म्हणजे पीडादायक=सुरा आणि पीडा देणारी व तिचें सैन्य म्हणजेच कामक्रोधादि समस्त मायाजनित विकार व माया. म्हणजे या अर्धालीचा अर्थ खलाला मायेचे सैन्य संतत प्रिय वाटते असा केला आहे तो अत्यंत संयुक्तिक वाटतो.

'वायस पलिअहिं अति अनुरागा । होहिं निरामिष कबहुँ किकागा।।' यात द्विरुक्ति नसून 'वय गतौ वायस' शब्द गतिदर्शक आहे व 'कै शब्दे काक' विशिष्ट आवाज, ध्वनि करणारा असा अर्थ आहे. खलासाठी हे दोन्ही शब्द वापरून दाखविले की की त्याची चालरीत, मानसिक ठेवण आणि त्यांचा कर्कश कठोर आवाज म्हणजेच वाणी, मन व मांस खाणे याने कर्म यात बदल होणार नाही.

संत असंत दोघेही दुःखद असतात असे म्हणून गोस्वामींनी दोघांच्याही पायाला एकदम वंदन केले आहे. तेथे पुढे ते म्हणतात 'बिछुरत एक प्रान हरि लेहीं । मिलत एक दुख दारुन देहीं' येथे 'बिछुरत एक प्रान हरि लेहीं' येथे मुख्यार्थ निश्चित करण्यासाठी "ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः । मनः षष्ठानींद्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति" तसेच 'गृहीत्वैतानि संयाति वायुर्गंधानिवाशयात्" (भ. गीता १५/७-८) यावरून संत म्हणजे जीव 'संत=सनातन) जो सद्रूप, नित्य आहे असा अर्थ पू. स्वामी प्रज्ञानानंदजीनी काढला आहे. 'जीवो नित्यः' तसेच 'जीव अनेक' आहेत म्हणून गोस्वामींनी अनेक वचन 'लेहीं' वापरले. सन्त हे 'सत्'चे प्रथमेचे बहुवचन आहे. जीव शरीरांस सोडून जाताना प्राण, मन, इंद्रियादिकांना बलात्काराने ओढून घेऊन जातात हे सत्य आहे. असंत म्हणजे शरीर, शरीरें यांची प्राप्ती झाली ही मिळाली (मिलत) की तत्काळ दारुण दुःख देण्यास प्रारंभ करतात. 'असत्'चे बहुवचन 'असन्त'; असत् म्हणजे नश्वर हा अर्थ बरोबर लागतो, हे वरील विवरण वाचल्यावर कुणालाही पटेल.

बालकांड दोह १६ पासून १८ पर्यंत अयोध्या, शरयू इत्यादि श्रीराम परिवारादिकांच्या वंदनात त्यांचा प्रत्येकाचा प्रभाव वर्णिला असून संपूर्ण रामायण कथासूत्र काव्यमुक्ताफळात फारच कौशल्याने गोस्वामींनी ओवले आहे. 'सियनिंदक अघ ओघ नसाए' यावरून सीता त्याग, सीतेचे दिव्य वगैरे कथाभाग तसेच 'लोक बिसोक बनाइ बसाए' यांनी प्रजेसहित निजधाम गमन इत्यादि कथाभाग कसा सूचित झाला आहे हे पहाण्यासारखे आहे. येथील वंदनात ज्यांचा ज्यांचा उल्लेख आला आहे त्यांची उदा. विदेह, शुकाचार्य, सनकादि सविस्तर माहिती टीकेत वाचावयास मिळते. तसेच 'जानकी' शब्दाचा मंत्रशास्त्र दृष्टीने अर्थ जानकी=ज+आ,+न,अ+क+ई. जकार-कृत्यादि नाशकर दुर्धर्ष; आकार - आकर्षणात्मक सर्वगत; नकार भुक्तिमुक्ति प्रद शान्त; अकार-मृत्युंजय सर्वव्यापक; ककार-सर्वविषहर कल्याणद, ईकार-वाक्प्रसादकर, निर्मल हे सर्व जिच्याजवळ आहे ती जानकी. तसेच जानकी शब्दाचा आणखी एक अर्थ - 'जायते इति जनः; जनश्च असौ कः आनन्दःच जनकः म्हणजे जायमान - उत्पन्न होणारा आनन्द. तस्य अपत्यं स्त्री,

त्याची सुता=जानकी म्हणजे आनन्दाकार वृत्ती. हिलाच चिदानंदलहरी असे श्रीमदाचार्यांनी सौंदर्यलहरी ग्रंथात म्हटले आहे. 'जानकी'चा हा अर्थ जगद्गुरु भारतीकृष्णतीर्थ, मठ पुरी यांनी केलेला आहे. या आदिशक्तीलाच चिदानंदलहरी म्हटले आहे असे स्वामी म्हणतात.

गिराअर्थ, आणि जल वीचि यांची उपमा सीतारामांना दृष्टांतात देऊन प्रकृती पुरुष ऐक्य दाखविले असून कोणी मुख्य कोणी गौण नाही दोन्ही एकच आहे हे दाखवून दिले असून गोस्वामींच्या सर्वमतसंग्रहाचे हे एक ठळक व महत्त्वाचे उदाहरण कसे आहे हे सविस्तर टीकेत दाखविले आहे.

येथून पुढे 'रामनामवंदना' हे प्रकरण सुरू होते. गोस्वामीसारखे नामनिरूपण कोणत्याही संतकवींच्या ग्रंथात नाही. यावरील टीका तर अप्रतिम झाली आहे. 'रघुवर' शब्दाची मंत्रशास्त्रदृष्ट्या चिकित्सा, तसेच 'राम' शब्द 'महावाक्य' कसा आहे याबद्दलचे विवरण 'हेतु कृसानु भानु हिमकर के' या ओळीचे स्पष्टीकरण 'राम' नाम वेदप्राण कसे आहे, महामंत्र=श्रेष्ठ मंत्र त्यास म्हटले आहे तसेच काशीत याचाच उपदेश शिव का करतात वगैरे सर्व टीकाभाग वाचताना थक्क व्हावयास होते. गणेश, पार्वती यांना आलेला 'राम' नामाचा अनुभव सविस्तर वाचावा.

रघुपति भक्ति वर्षाऋतु व रा आणि म श्रावण भाद्रपद कसे, 'रा' 'म' ही अक्षरे कशी मधुर मनोहर आहेत, तुलसीदासांना राम-लक्ष्मणासारखी कशी प्रिय आहेत व 'ब्रह्म जीव इव सहज सँघाती' कशी आहेत यावरील टीका अप्रतिम झाली आहे. उपनिषदातील 'द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषस्वजाते' याप्रमाणे ही दोन अक्षरे कशी आहेत हे दाखवून दिले आहे. रामनामवंदना प्रकरणात उलटया नामाचा म्हणजे 'मरा'चा प्रभावही गोस्वामींनी कसा वर्णिला आहे हे मानसातील अनेक उदाहरणे देऊन पू. प्रज्ञानानंद स्वामींनी दाखवून दिले आहे. या प्रकरणात दहा उपमांचा उपयोग केला असून १ विलोचन, २ रामलक्ष्मण; ३ ब्रह्मजीव या 'राम' मंत्राला लागू आहेत. ४ नरनारायण, ६ विधुभूषण, ७ स्वाद तोष या केवळ 'मरा' या मंत्राला लागू आहेत व ५ कर्णविभूषण ८ कमठशेष, ९ मधुकर आणि १० हरिहलधर या दोघांना म्हणजे 'राम' आणि 'मरा' या दोन्ही मंत्राना कशा लागू आहेत हे दाखविले असून शेवटी सर्व वर्णाच्या डोक्यावर रफार व म् कार कसे शोभतात याचेही सुरेख वर्णन केले आहे.

नंतर ब्रह्म व राम यांच्यापेक्षा रामनाम कसे श्रेष्ठ आहे हे तुलना करून सिद्ध केले आहे. नामाने रुपाची प्राप्ती सहज होते आणि मुखाने नाम जपल्यानेच आर्त,

जिज्ञासु, अर्थार्थी, (मुमुक्षु) ज्ञानी यास आपापले साध्य सहज प्राप्त करता येते हे सोदाहरण सांगितले आहे. शेवटी 'नाम घेत भवसिंदुच सुकतो' असे म्हटले असून विसाव्या दोह्यांत भरतचरित्र सोडून संपूर्ण रामकथा संक्षेपाने ओवली आहे.

'रामनाम मणि दीप धरि जीह देहली द्वार' यात आतील प्रकाश म्हणजे 'आतम अनुभव सुख सुप्रकासा' म्हणजेच आत्मसाक्षात्कार 'अहं ब्रह्मास्मि'ची अनुभूती म्हणजेच (व्यतिरेक ज्ञान) तर बाहेरील प्रकाश म्हणजे 'सर्व खलु इदं ब्रह्म' ही अनुभूती होय असे पू. स्वामींनी दाखवून दिले आहे. (म्हणजेच अन्वय ज्ञान).

राम हे नामाचे अनुगामी आहेत म्हणून प्रथम नामाचे माहात्म्य सांगून प्रसिद्ध नामजापकांची उदाहरणे दिली आहेत. त्यात भक्तिशिरोमणी प्रल्हार, ध्रुव, हनुमान यांची तसेच अजामिल गजेंद्र, जीवन्ती गणिका वेश्या यांची उदाहरणे दिली आहेत. त्या सर्वांची माहिती तसेच ते कुठल्या प्रकारचे भक्त आहेत आर्त, अर्थार्थी की जिज्ञासु वगैरेचीही मीमांसा केली असून इतर युगांपेक्षा कलियुगात नामाचे महत्व कसे अधिक आहे व कलियुगात नाम समर्थ हनुमंताप्रमाणे कलिकालनेमीपासून कसे वाचवतो हे दिले आहे. तसेच 'कलिजुग करमन भगति बिबेकु । राम नाम अवलंबन एकु' (२७/७) याचा चुकीचा अर्थ कसा लावला जातो हे स्वामीजींनी दाखवून दिले आहे. बरेच टीकाकार म्हणतात त्याप्रमाणे कलियुगात फक्त नाम हेच साधन आहे, इतर साधने साफ निरुपयोगी आहेत असे गोस्वामींना सांगावयाचे 'नाम राम को अंक है सब साधन है सून । अंक गएँ कछु हाथ नहिं अंक रहे दसगून' रामाचे नाम हा अंक आहे (१, २, ३ उदा. इत्यादी) व बाकीची साधने शून्य (०) आहेत. अंक नसेल तर सर्वसाधनांची किंमत शून्य, अंक असून जेवढी शून्ये वर घाल तितकी दसपट किमत वाढेल. याचा अर्थ नामाच्या पायावर कर्म, उपासना, वैराग्य, योग, ज्ञान, विज्ञान व प्रेमभक्ती ही सात मजली भव्य दिव्य इमारत बांधून तीवर स्वान्त, सुखाचा कळस या कराल अशा कलिकाळातही चढवू शकाल. इतर युगांएवढे प्रयास पडणार नाहीत तेव्हा रामनाम हा पाया आहे. भक्कम पाया आहे. पण नुसता पाया घालून भागत नाही. वर इमारत व्हायला इतर गोष्टींचीही आवश्यकता आहे हेच यावरून दिसून येते.

'वेद-पुराण-संत मत एहू । सकल सुकृत फल राम-सनेहू॥' यावरील टीका वाचण्यासारखी आहे. तसेच तुलसीदास आपला अनुभव सांगतात की 'नाम राम को कलपतु कलि कल्यान निवासु । जो सुमिरत भयो भाँग ते तुलसी तुलसीदासु ॥२६ हे लक्षणीय आहे. 'भायँ कुभायँ अनख आलसहूँ । नाम जपत मंगल दिसि दसहूँ ।'

यावरील टीकाही अप्रतिम झाली आहे. उदाहरणे देऊन हे वचन सिद्ध केले असून 'भाव' म्हणजे फक्त सद्भाव एवढाच अर्थ नसून 'विशिष्ट भावाने नामाशी आप्तसंबंध स्थापित करणे हा अर्थ देताना पू. स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती सांगतात की ते स्वतःस 'तुलसी- (गोस्वामी तुलसीदास) तनय समजतात. रामकथा ही तुलसीकन्या असून तिचा विवाह रामप्रतापाशी झाला आहे व 'राम-नाम' हे तिच्या गळ्यातील सौभाग्यसूक-मंगळसूत्र आहे. तसेच संत गुलाबराव महाराज स्वतःस ज्ञानेश्वर-कन्याका समजत; व श्रीकृष्ण आपला पती आहे या भावनेने माधुर्यभक्ती करीत हे उदाहरणही दिले आहे. अशा रीतिने साधकाने कोणते तरी नाते नामाशी जोडून त्या भावनेने प्रेमाने उच्चार करणे याचे नाव भावाने जप करणे. हे सिद्ध करण्यासाठी अनेक अवतरणे दिली आहेत. किती म्हणून सांगावी!

अशा नामाने स्मरण करून गोस्वामींनी रामकथा सांगावयास घेतली दोहा २८/१ पासून आत्म-कार्पण आणि रामगुण वर्णन या प्रकरणास सुरुवात होते. एकदा नाम-कृपा झाली की रामांना कृपा करावीच लागते. राम हे प्रणत कृपाल असून एकदा कृपा केली की मग ते कधी क्रोध करीत नाही हे राम स्वभावाचे वैशिष्ट्य सांगितले. राम सुधनी असून आपण कुसेवक आहोत असे गोस्वामींनी वारंवार म्हटले आहे. चांगले स्वामी सेवकांच्या गुणदोषाकडे बघत नाहीत, त्याचे आपल्यावर प्रेम आहे की नाही इतकेच ते पहातात. सेवकाने केलेल्या विनंती, प्रार्थनेवरून खरे प्रेम आहे की दिखाऊ - स्वार्थी प्रेम आहे इत्यादी ते ओळखतात. 'रामहि केवल पेमु पियारा' 'प्रेमचि केवळ रामा प्यारें' हा मानसाचा सिद्धांत आहे. दोहा २८ रा य म यात शरणागतीची लक्षणे 'अनुकूलस्य संकल्पः प्रतिकूलस्य वर्जनम् । रक्षिस्यतीति विश्वासो गोप्तृत्व वरणं तथा आत्मनिक्षेप कार्पण्ये षड्विधा (षड्विधा) शरणागतिः' कशी दिसून येतात हे फार सुंदररीतिने दाखवून दिले आहे. आपला कार्पण्यभाव गोस्वामींच्या इतका क्वचित्च कुणाच्या काव्यात प्रगट झाला असेल! आपला कार्पण्यभाव आणि प्रभूची दासवत्सलता आणि अक्रोधता वारंवार वर्णन करून गोस्वामींनी प्रभू स्वतःच्या ब्रीदाकडे पाहून माझी रामचरित गान करण्याची उच्च आकांक्षा रुचि नक्कीच पूर्ण करतील अशी खात्री असल्याचे सांगितले आहे! नियमपत्रिकेतील पदे १५८, १५९, २५८ पहाण्यासारखी आहेत! गोस्वामींचे कार्पण्य, लीनता पाहून थक्क व्हावयास होतं. 'रहति न प्रभु चित चूक किए की । करत सुरति सय बार हिए की' अशा रामप्रभूंच्या स्वभावास तोड नाही हेच खरे! गोस्वामींनी अनेक उदाहरणे देऊन हे सिद्ध केले आहे यावरील टीका सुद्धा अत्यंत हृदयस्पर्शी झाली आहे.

पू. स्वामीजी म्हणतात की येथे साधकास उपदेश ग्रहण करण्यासारखा आहे, कृतीत उतरविण्यासारखा आहे की एकाच देवावर पूर्ण निष्ठा ठेवा. कितीही संकटे आली तरी आपल्या उपास्य देवाशिवाय इतर कोणाजवळ तोंड वेंगाडू नका. आपला देव सर्व समर्थ, परम कृपालु, दीनवत्सल आहे हे वारंवार आठवा. साधनात मनोनिग्रह इंद्रियजय करण्यास आपण स्वतः असमर्थ आहोत पण तोच आपल्या कृपेने सर्व पुरें करील. न जाणतां किंवा जाणून होणाऱ्या आपल्या चुकांकडे तो बघणार नाही; पण त्याच्यावर अंतःकरणात निष्कपट प्रेम पाहिजे व हृदयात आणि वाणीत परम लीनता पाहिजे. परम दीनता, कार्पण्य हृदयात पाहिजे. बाह्यावडंबराची किंमत प्रभूला नाही; तो अंतःकरणाकडे बघतो.

यानंतर मानसाची परंपरा गोस्वामींनी वर्णन केली आहे. "जागबलिक जो कथा सुहाई । भरद्वाज मुनिबरहि सुनाई ॥" तीच कथा मी आता विस्तार करून सांगतो असे ते म्हणतात. 'संभु कीन्ह यह चरित सुहावा । बहुरि कृपा करि उमहि सुनावा ॥ सोइ सिव कागभुसुंडिहि दीन्हा । राम भगत अधिकारी चीन्हा ॥ तेहि सन जागबलिक पुनि पावा ॥ तिन्ह पुनि भरद्वाजप्रति गावा ॥' याप्रमाणे शिव - पार्वती व शिवांनीच लोमश ऋषींच्या माध्यमातून काकभुशुंडीची परीक्षा घेऊन तो रामभक्त अधिकारी हे जाणून लोमशांच्या द्वारा ती काकभुशुंडीस दिली. त्यांच्यापासून ती याज्ञवल्क्यांना मिळाली व त्यांनी ती भरद्वाजांस सांगितली याप्रमाणे परंपरा सांगितली आहे. हे सर्व श्रोते व वक्ते शीलानें सारखे असून सर्वदर्शी (सर्वज्ञ) आणि हरिलीलांना जाणणारे असून त्रिकालज्ञानी आहेत व त्यांना आत्मज्ञान करतलावरील-आवळ्यासारखे (साक्षात) आहे असे त्यांच्या अधिकाराचे वर्णन केले. इतर बरेच श्रोते वक्ते सुजाण हरिभक्त होते ते ही कथा नानाप्रकारे ऐकत व सांगत असतात. तीच कथा गोस्वामींच्या गुरुंच्या माध्यमांतून शंकरांनीच गोस्वामींना दिली. सूकर क्षेत्रात ही कथा गुरुंनी सांगितली तेव्हा तुलसीदास अजाण होते. म्हणून त्यांना नीट समजली नाही. म्हणून गुरुंनी ती वारंवार सांगितली; व आतां तीच कथा त्यांना जशी समजली तशी ते विस्तारपूर्वक जशी प्रभू प्रेरणा देतील तशी सांगणार आहेत.

यानंतर या शिवचरित रामकथेचे माहात्म्य दोहा ३१/४ पासून दोहा ३२ अखेर गोस्वामींनी वर्णिले आहे. या सर्व चौपायांची रचना फारच अद्भुत आहे. यात १) रामगुणग्रामांचे वर्णन, २) कांडक्रमानुसार संपूर्ण रामायण कथा, ३) श्रद्धेपासून राम हृदयनिवासी होईपर्यंतचा सर्व साधनक्रम आणि ४) पुढे बालकाण्डापासून उत्तरकाण्ड दोहा ५१ पर्यंत आलेल्या २८ स्तुतींची क्रमशः फलश्रुति या चार

विषयांचे वर्णन क्रम अविछिन्न ठेवून केले आहे. या चौपायांत सांगितलेले फलश्रुतींचे साम्य त्या त्या स्तुतींत अगदी सहज दिसते. 'राम' नाम हा शारदीय पौर्णिमेचा पूर्ण चंद्र असून या २८ स्तुति म्हणजे २८ नक्षत्रे आहेत. ज्योतिषशास्त्र, व खगोलशास्त्र दृष्ट्याही या नक्षत्रमंडलांतील २८ स्तुतीचे २८ नक्षत्रांशी पूर्ण साम्य टीकेत त्या त्या स्थळी दाखविण्यात आले आहेत. ही सर्व रचनाच अत्यंत अद्भूत मानवी शक्तीच्या बाहेरची असून आपण ह्या नक्षत्रमंडळाचे दर्शन घेताना थक्क होऊन जातो. याप्रमाणे येथील १ खंड मधील टीकेचा संक्षिप्त परिचय देण्याचा प्रयत्न यथामति केला गेला आहे. वाचकांनी न्यून पूर्ण करून घ्यावे.

डॉ. कमल वैद्य

दि. २९-११९७

श्रीरामचरितमानस प्रेमी मंडळ

डोंबिवली

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | अध्याय पहिला | १ |
| २. | अध्याय दुसरा | १५८ |
| ३. | अध्याय तिसरा | २४३ |
| ४. | अध्याय चौथा | ३४५ |
| ५. | अध्याय पाचवा | ३९१ |

# श्री रामचरितमानस गूढार्थ चंद्रिका
# बालकांड (प्रथम सोपान)

## अध्याय पहिला
## अनुवादक-कृत मंगलाचरण

**श्रीरामनाम-महवित् पूज्याग्र्यो विघ्ननाशको देवः ।**
**तं गणनाथं वन्दे हंसारूढां च शारदां रसदाम् ॥१॥**

**अर्थ** – श्रीरामनामाचा प्रभाव (मह) जाणणारे, प्रथम पूज्य असलेले व विघ्नांचा नाश करणारे जे देव गणनाथ (गणपति) त्यांना व रस देणाऱ्या (रस-दां) हंसारूढ शारदेला मी वन्दन करतो.

**टीका** – (१) **श्री** = सीता व राम, त्यांचे नाम, त्यांचा व नामाचा प्रभाव जाणणारा = अनुभवणारा पूज्य व अग्र्य (श्रेष्ठ) होतो. तो जन्म मरणरूपी विघ्नांचा – संकटाचा विनाश करतो; तो देव = द्युतिमान -प्रकाशसंपन्न -ज्ञानसंपन्न होतो. तो इन्द्रियादि गणांचा नाथ - अधिपति होतो. इंद्रिये त्याला वश होतात; हे येथे सुचविले. यात ग्रंथाचा विषय व प्रयोजन सुचविले.

(२) **हंसारूढां** = हंसावर बसलेली; हंसः या मंत्राचा आश्रय केलेली शारदा = महामाया-आदिशक्ति-कुंडलिनी. ती ज्ञानांतील रस म्हणजे प्रेम - लक्षणाभक्ति, पराभक्ति तिचे दान करते. रसदा शब्दाने भक्ति सुचविली. प्रयोजनाचे फळ सुचविले. मुख्य साधन श्रीराम व रामनाम यांचा प्रभाव आहे हे सुचविले.

हनुमंताच्या कृपेशिवाय रामभक्ति मिळत नाहीं म्हणून पुढील श्लोकात हनुमंताला नमन केले आहे.

**श्रीरामभक्तवंद्यं रघुपतिभक्तार्तिनाशनं धीरम् ।**
**वंदे रघुवीरनुतं शरणागतरक्षकं महावीरम् ॥२॥**

**अर्थ** – श्रीरामभक्तांना वंद्य, जो रघुपतीच्या भक्तांची संकटे (आर्ति) नाहीशी करतो, जो धीर आहे, श्री रघुवीराने (स्वतः) ज्याची स्तुति केली व जो शरण आलेल्यांचे रक्षण करतो त्या महावीराला (हनुमंताला) मी वंदन करतो.

**टीका** – श्रीराम व रामनाम यांचा महिमा किती हें हनुमंताच्या उदाहरणाने दाखविले.

'रामभक्त' शब्दाने निर्गुणाचे ग्रहण करणे शक्य आहे म्हणून दशरथनंदन-सूचक रघुपति शब्द वापरला.

(क) रघुवीर-नुतं – रघुवीराने हनुमंताची प्रशंसा केल्याचे वर्णन सुं. ३२ मध्ये आहे. हनुमान, शंकरासारख्या भक्तांमुळे देवाला सगुण-साकाररूप घ्यावे लागते. सगळ्यांत मोठी आर्ति= संकट जन्ममरणरूपी संसृतीचे, श्रीरामचंद्र हनुमंताचे ऋणी आहेत; त्यामुळे हनुमंतांनी कृपा केली की रामाला कृपा करणे भाग पडते. स्वतःवर प्रेम करणारापेक्षा आपल्या प्रिय बालकावर प्रेम करणारा बालकाच्या मातापितरांस अधिक प्रिय होतो; तसेच हे.

**शरदंबराभनीलं शरत्सरोरुह सुरम्यमुखकंजम्।**
**रामं विधिशिववंद्यं वंदे वाल्मीकिविमल वागीड्यम् ॥३॥**

(या श्लोकात रामचंद्राचे रूप व ऐश्वर्य यांचे संक्षिप्त वर्णन आहे.

अर्थ – (१) शरदंबराभनीलं शरद्+अंबर+आभ+नील = शरद् ऋतूंतील आकाशाप्रमाणें नील (श्याम) वर्णाचे.

(२) शरत्+सरोरुह+सुरम्य+मुख-कं-ज सरोरुह = तलावांत वाढणारे = कमल. त्याच्यासारखे सुरम्य = अति रमणीय आहे मुख रूपी कंज = कमल ज्यांचे शरदऋतूंमधील कमलासारखे अति रमणीय मुखकमल ज्यांचे आहे ते राम.

(३) विधिशिववंद्य – विधि = ब्रह्मदेव, शिव = शंकर, महादेव यांना वंद्य असलेले, ज्यांना ब्रह्मदेव व शंकर सुद्धा वंदन करतात.

(४) वाल्मीकि+विमल+वाग्+ईड्यम् = वाल्मीकीच्या विमल वाणीने स्तुति करण्यास योग्य असलेले जे राम त्यांना मी वंदन करतो.

टीका – (१) शरदातील आकाश चित्ताला फार आल्हाददायक तेजस्वी व निरभ्र = निर्मळ असते; तसेच रामचंद्रांचे रूप आहे. त्यांच्या दर्शनाने परमाल्हाद होतो. त्यांत मायारूपी मोह वगैरे ढग-मल नाही म्हणून त्यांच्या दर्शनाने जीव माया = अविद्या मोह इत्यादीपासून मुक्त होतो. नील = श्याम, श्यामल.

(२) शरत्सरोरुह – शरदांतील कमल फार प्रसन्नतादायक, अधिक कोमल व चित्ताकर्षक असते; तसेच मुख आहे.

(क) कंज, कं=सुख, कंज = सुखाचे जन्मस्थान आहे हे सुचविले.

(३) राम – नित्यानंदस्वरूप असून ज्यात योगी रममाण होतात ते – आनंदनिधान.

(४) विधिशिववंद्यं – यांत विष्णूचा अंतर्भाव केलेला नाही; कारण कधीं कधी वैकुंठाधिपति विष्णु रामावतार घेतात; कधी क्षीरसागरनिवासी नारायण घेतात व कधी परमात्मा स्वतः घेतात, या विशेषणाने श्रीरघुनाथाचा महिमा सुचविला व अशा रघुपतीची वंदनादिभक्ति न करणारांना सुख कसे होईल हा प्रश्न सुचविला.

(६) वाल्मीकि विमलवागीड्य मूळ रामायणाची रचना आदि कवि वाल्मीकींनी केली म्हणून येथे त्यांचा उल्लेख केला.

(क) 'विमल' ने सुचविले की त्यांत पुरुषबुद्धिजन्य दोष नाहीत. ते वेदांसारखे अपौरुषेय, पवित्र, अनुसरणीय व पठन पाठन करण्यास योग्य आहे.
'वेदः प्राचेतसादासीत् साक्षाद्रामायणात्मना' (वा.रा.प्र) वेद
प्राचेतसाच्या = वाल्मीकींच्या मुखातून रामायण रूपाने प्रगट झाले.
(ख) वाल्मीकी व तुलसीदास यांचा संबंध पुढील श्लोकात सांगितला आहे.

**आद्यकवेरवतारं भवतारक - रामचरित - विस्तारम् ।**
**कामारिप्रियभक्तं तुलसीदासं नमामि साष्टांगम् ॥४॥**

**अर्थ —** आद्यकवीचे अवतार असलेले, संसारांतुन तारणाऱ्या (श्रीरामचरिताचा विस्तार करणारे, कामारि - शंकरांचे प्रिय भक्त (किंवा) जे शंकरांना प्रिय होते, त्या तुलसीदासांना (मी) साष्टांग नमस्कार करतो.

**टीका —** (१) आद्यकवेः अवतारम्, आद्य कवि = वाल्मीकी यांना संस्कृत भाषेतील आद्य - पहिले कवि मानतात. यांचाच अवतार तुलसीदास. प्रस्तावनेत तुलसीदासांचे संक्षिप्त चरित्र दिले आहे. "श्री वाल्मीकिच झाला श्रीतुलसीदास रामयश गाया। तरिच प्रेमरसाची खाणी वाणी तशीच वश गा या" (मोरोपंत).

पंचवटीतील श्रीकाळथारामाचे मंदिरात मोरोपंतांनी तुलसीकृत रामायण दहा वर्षांत सांगितल्याचा उल्लेख मानसांकांत आहे. १०८ रामायणें लिहिणारे मोरोपंतच हे होत; कारण त्यांनी दोहा रामायण लिहिलेलें आहे.

(२) **भवतारक —** सुचविले की श्रीरामचरितमानसाच्या साह्याने जीवाला मुक्त होता येते.

(क) **रामचरितविस्तारम् —** भाव हा की तुलसीदासांनी शिवविरचित श्रीरामचरित-मानसाचाच स्वभाषेत विस्तार केला हे पुढे स्पष्ट झाले आहे.

(३) **कामारिप्रियभक्त —** कामाचे — मदनाचे अरि — शत्रु=कामारि शंकर. कामारिप्रिय आहेत ज्याला ते कामारिप्रिय असे जे भक्त ते किंवा कामारिला प्रिय असलेले भक्त. हे दोन्ही अर्थ तुलसीदासांना लागू आहेत. शंकरभजनाशिवाय रामभक्ती मिळत नाही हे सुचविले.

(क) कामारिश्च प्रियभक्तश्च, कामाचे शत्रू असे (राम) भक्त असा अर्थ ही होतो. तुलसीदासचरित्रांत 'नामाचा भरवसा' शीर्षकांत पाहावे.

**यस्याशीर्वादघनो मानसगूढार्थवृष्टिना हृदयम् ।**
**सततं प्लावयतीदं गंगादासं नमामि भक्त्या तम् ॥५॥**

**अर्थ —** यस्य - ज्याचा आशीर्वादरूपी मेघ (आशीर्वाद-घनः) मानसाच्या गूढार्थरूपी जलाच्या वृष्टीने (मानस-गूढार्थ-वृष्टिना) या (इदं) हृदयास (हृदयं) सतत भिजवीत आहे (प्लावयति) त्या बाबा गंगादासांना प्रेमाने नमस्कार करतो.

टीका – (१) यस्याशीर्वादघनः – तु. मानसाचा अनुवाद, मानसपीयूष या हिंदी टीकेसाठी हिंदीभाषा येत नसता हिंदीत टीका लिहिणे व ही मानसगूढार्थचंद्रिका लिहिणे या अशक्य गोष्टी प्रत्यक्ष सृष्टीत दिसण्याची कल्पनासुद्धा स्वप्नी नसता त्या घडल्या याचे मुख्य कारण बाबा श्री गंगादासांचा अमोघ आशीर्वादच होय.
(क) श्री बाबांचे अल्पचरित्र प्रस्तावनेत पाहावे.
(२) गूढार्थ – गूढ अर्थ; जो सहज लक्षात येत नाही व लपलेला असतो. यालाच भाव म्हटले आहे. हे गूढभाव म्हणजे काव्यकंजातील मकरंद-मध; हा ग्रहण करण्याची शक्ति मधुकरांना-मधुपानाच असते हें मधुपत्व श्री गुरु-हरि-कृपेशिवाय मानवी बुद्धीस मिळत नाही. –
(३) नमामि – अशा संतांच्या अनंत उपकारांची फेड करता येणे शक्य नसल्याने वारंवार वंदन करणेच उपकृतानी करण्यासारखे असते. गरुडाने भुशुंडीला सांगितले की,
'मज करवे ना प्रत्युपकारां । पाया पडतो वारंवारा' (उ. १२५/४)
(क) पुढील श्लोकांत मोक्षगुरूंस वंदन आहे.

व. ति. यत्पादपंकज पराग पवित्र मौलि भूयो न पश्यति नरो जठरं जनन्याः।
तं वासुदेवमजमीशमनन्तबोधं श्रीमद्गुरुं शरणदं प्रणतोऽस्मि नित्यम् ॥६॥

अर्थ – ज्यांच्या (यत्) पाय (पाद) रूपी कमळाच्या (पंकज) परागांनी (पराग=फुलांतील रज, केसर) पावन (पवित्र) झाले आहे मस्तक (मौलि) ज्याचे असा नर पुन्हा (भूयो=भूयः) जननीचे उदर (जनन्याः जठर-गर्भवास) पाहत नाही, जे अज – जन्मरहित, ईश्वर (ईशम्) स्वरूप असुन ज्यांचे ज्ञान (बोध) अंतरहित (अनंत) आहे; त्या शरणागताला आश्रय देणाऱ्या श्रीमान् सद्गुरु वासुदेवानंद सरस्वती महाराजांना (श्रीमद् गुरुं वासुदेवं) मी नित्य प्रणाम करतो.
टीका – (१) बाबा गंगादासानंतर श्रींना वंदन करण्याचे कारण त्यांच्या नंतर यांचे दर्शन झाले व कृपा झाली. श्रींची कृपा होण्यास दुसऱ्या अनेक संताचे आशीर्वाद कारण झाले आहेत.
(क) ही श्रीमानस टीका आहे. मानसातील रहस्यज्ञान बाबांच्या कृपेने झाले; होत आहे व होईल म्हणून त्यास प्रथम वंदन.
(ग) उपक्रमात रामभक्तवंदन प्रथम केले तसेच येथे उपसंहारात. हेही पूर्वाश्रमात रामदासी सांप्रदायाचेच होते.
(२) 'न पश्यति जठरं जनन्याः' याने सुचविले की सद्गुरुवाचून भवतरणोपाय नाही. मानससिद्धान्तहि हाच आहे.
(३) 'वासुदेव' – हे वासुदेवानंद म्हणजे श्रीटेंब्येस्वामी नव्हेत. पूर्वाश्रमीचे पोटे. प्रस्तावनेत चरित्र पाहावे.

(क) श्रींच्या कृपादृष्टीनेच पूर्ण समाधान झाले व श्रींची कृपा झाल्यावरच खरी अनावर काव्यस्फूर्ति झाली.

(४) अजम् – जन्म मरण रहित, ब्रह्म स्वरूप झालेले = ब्रह्मनिष्ठ. सद्गुरू लक्षण सुचविले.

(५) ईशम् – ईश्वर, शंकरस्वरूप गुरु = सद्गुरु हे शिवाचे प्रगट रूपच हा श्रीमदाचार्यांचा व मानसाचा सिद्धान्त सुचविला. पुढील मं. च. श्लोक ३ टीका पाहावी.

(६) अनंतबोध – याने प्रबोधशक्ती, अखंडैकरस विमलज्ञान व शास्त्रज्ञान सुचविले. 'श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम्' हे लक्षण सुचविले.

(७) शरणद – शरणागतवत्सलता, दीनवत्सलता सुचविली.

(८) प्रणतोऽस्मि – सुचविले की शिष्याने गुरूशी विशेष नम्रतेने वागून पादसेवन, अर्चन, वन्दन, दास्य, भक्ति सद्गुरूंची करावी.

संगति – येथे अनुवाद-कृत मंगलाचरण समाप्त झाले. पुढील श्लोकांत श्रीतुलसीमानसमहिमा व अनुवादलेखनाचे कारण सारांश रूपाने सुचविले आहे.

तुलसीमंजरी शुद्धा रामभ्रमरभूषिता ।
रामाज्ञया स्वभाषायां प्रज्ञानेनाऽनुवाद्यते ॥७॥

अर्थ – रामचंद्र-रघुपति - रूपी भ्रमराने भूषित झालेल्या शुद्ध तुलसीमंजरीचा अनुवाद, रामचंद्राच्या आज्ञेने प्रज्ञानानंदाकडून - स्वभाषेत मातृभाषेत (मराठीत) केला जात आहे ॥७॥

टीका – (१) तुलसीमंजरी – तुलसीदासांचे श्रीरामचरितमानस (रामायण)

(क) असे म्हणण्याचे कारण – अद्वैतसिद्धि व भक्ति रसायन ग्रंथकर्ते श्रीमदाचार्य मधुसूदन सरस्वती, यांनी या ग्रंथाला 'तुलसीमंजरी' म्हटले आहे.

"आनन्दकानने काश्यां जंगमस्तुलसीतरुः ॥ कवितामंजरी यस्य रामभ्रमरभूषिता" हा श्लोक त्यांनी अभिप्राय म्हणून लिहून काशींतील पंडितांस तो ग्रंथ परत दिला. तुलसीदास चरित्र पहा. भावार्थ हा की तुलसीदास हे एक जंगम तुलसीचे झाड आहे. रामचरितमानस त्या तुलसीची मंजरी असून श्रीराम भ्रमर तिच्यावर लुब्ध होऊन बसला आहे. 'मंजरिची बहु आवड देवा' तुलसीमंजरी प्रभूच्या मस्तकावर वाहतात. तशी ही तुलसीमंजरी प्रभु रघुनाथास फारच प्रिय आहे. हिचे सौंदर्य, सुगंध, पराग व मकरंद यावर भगवान आसक्त झाले आहेत. मग हे रामचरितमानस इतरांनी डोक्यावर घेऊन नाचण्यासारखे परमप्रिय, आदरणीय व वंद्य होईल यांत काय नवल!

(२) शुद्धा – स्थावर तुलसीच्या मंजरीत अनेक दोष असू शकतात पण हिच्यांत कोणताच दोष, मल इत्यादि नाही.

(क) जेथे कोठे शब्दगत, वाक्यगत, अर्थगत किंवा रसगत दोष साहित्यिकांस दिसतील तेथे त्यांनी नक्की समजावे की तो दोष नसून दोषाभास आहे. असे आभास हेतुपूर्वक निर्माण करण्यातील हेतु श्री गुरु-कृपेने शोधून काढण्याचा कसून प्रयत्न केल्यास तो सापडतोच सापडतो व अनुपम आनंद मिळतो. हा अनुभव या लेखकास पदोपदी आला, येत आहे व येईल. या विषयीं प्रस्तावनेत विस्तार केला आहे. नमुन्यासाठी मानसमणि हिंदी मासिकांतील नव्हेंबर १९५२ व नव्हेंबर १९५३ च्या अंकातील लेख पाहावेत.

(३) रामाज्ञया -- केवल श्री रघुनाथाच्या आज्ञेनेच पहिला अनुवाद लिहिण्याचे धाष्टर्य करावे लागले. 'लेखकाचे हृद्गत' या कवितेत छापील अनुवादांत विशेष खुलासा पाहावा.

सूचना १ -- दुसरा अनुवाद का लिहिला या विषयी प्रस्तावनेत सविस्तार लिहिले आहे.

सूचना २ -- पुढील टीका वाचण्यापूर्वी प्रस्तावनेतील महापुरुषचरित्रे व गूढार्थचंद्रिका टीका या मुख्य प्रकरणातील तेरा प्रकरणे व लेखकाचे अल्पनिवेदन इतके तरी मननपूर्वक अवलोकन करावे.

# श्री रघुपतये नमः

# मूळ-मंगलाचरण

अनु. वर्णनामर्थ संघानां रसानां छंदसामपि।
मंगलानां च कर्तारौ वन्दे वाणीविनायकौ ॥१॥

अर्थ — वर्ण - (अपासून क्ष पर्यंतची अक्षरे) अर्थांचे समुदाय छंद, रस व सर्वप्रकारचे मंगल करणाऱ्या वाणी व विनायक (शारदा व गणपति) यांना मी वंदन करतो.

टीका — (१) या श्लोकाचा वरील अर्थ घेतला म्हणजे गणेशसरस्वती यांना निर्विघ्नग्रंथसिद्धीसाठी वंदन केले आहे असे दिसते.

(क) ग्रंथारंभी गणेश सरस्वतीवंदन करण्याची सर्वसाधारण रीत आहे; म्हणून कविकुलमर्यादापालन केले आहे.

(ख) ग्रंथारंभ 'वर्णानां' यातील 'व' या अमृतबीजाने केला व या श्लोकाच्या अंती व, वा. वि नीं त्रिवार अमृतबीजच वापरले आहे. ग्रंथाचा उपसंहार 'मानवाः' शब्दांतील 'व' या अमृत बीजानेच केला आहे. हा श्लोक व ग्रंथ या प्रमाणे अमृतबीज संपुटित आहे.

(ग) ग्रंथारंभ 'वर्णानां' या 'म' गणाने केला आहे. प्रत्येक काण्डाचा आरंभही असाच म गणाने केला आहे. 'म' गण मंगलश्रीकारक आहे असे छंदशास्त्र म्हणते.

(२) हा श्लोक अनुष्टुभ छंदाचा आहे. ग्रंथारंभी अनुष्टुभ छंदच का वापरला या विषयी विविध मते-मतांतरे मा. पी. पा. 'अनुष्टुभ' या शब्दाचा एक अर्थ शारदा-सरस्वती वाणी हा आहे. सरस्वतीच्या वंदनास 'सरस्वती' अर्थाचा छंद वापरला या पेक्षा आणखी सबल हेतु कोणता पाहिजे. मानसांतील सर्वच (१२) संस्कृतभाषेतील छंद सहेतुक सापेक्ष वापरले आहेत. लेखमाला उत्तरकाण्डपरिशिष्टात पाहा; किंवा मानसमणि मासिकांत (हिंदीत) पहा लेखानुक्रमणिका प्र. खं. पहा.

(३) सुकवि मंगलाचरणातच आपल्या ग्रंथाचा विषय सुचवून ठेवतात. त्यास वस्तुनिर्देशात्मक मंगल असे म्हणतात. वरील वाच्यार्थ घेतल्यास या श्लोकांत वस्तुनिर्देश नाही असेच ठरेल. मंगलाचा आणखी एक प्रकार आहे त्यास आशीर्वादात्मक मंगल म्हणतात. मानसातही हा प्रकार आहेच. पण या संस्कृत श्लोकांत नसून पुढे हिंदीतील चौपायादिकांत आहे. प्रस्तावनेत 'महाकाव्यलक्षणे' प्रकरणामध्ये पाहावे. आशीर्वादात्मक मंगलाचा प्रकार ग्रंथारंभी ऋषिप्रणीत श्रीभागवतादि ग्रंथात आढळतो.

(क) 'मी कवि नाही' असे तुलसीदास म्हणतात. तथापि महेशाने त्यांस 'मानस कवि तुलसी' केले आहे व कुकवि म्हणून घेण्यास ते तयार नाहीत. तरीपण जो कोणी सहृदय वाचक सावधानपणे परिशीलन करील तो त्यांस 'सुकवि'च नव्हे तर 'महाकविकुल गुरु शिरोमणि' म्हणेल. अशा महाकवींने ग्रंथारंभी वस्तुनिर्देशमंगल केले नसेल हे शक्य कसे होईल!

(ख) ते रामभक्त असून प्रथम गणेशशारदा वंदन त्यांनी कसे केले हे म्हणणे सांप्रदायिक कूपमंडूकांस शोभेल! विनय पत्रिकेत प्रारंभी अगदी स्पष्टपणे गणपतीलाच वंदन आहे. असे असले तरी या प्रथम श्लोकांतच सीतारामचंद्रांना अभिन्न रूपाने वंदन केले असून याच श्लोकांत ग्रंथाचा व बालकाण्डाचा विषयसुद्धा ध्वनित केला आहे. हे गूढ शके १८७० मध्ये सहज उकलले व जो अपार आनंद झाला तो हृदयात मावेना. या बरोबरच अनुबंधचतुष्ट्यातील शेष तीन, अगदी पूर्ण शास्त्रीय पद्धतीने उपक्रमोपसंहारादि सहा तत्त्वनिर्णायक लिंगांच्या उपयोगासह या सात श्लोकांतच निदर्शित केल्याचे सिद्ध झाले. त्याचेच शब्दचित्र पुढील पृष्ठांत दाखविण्याचा यथामति प्रयत्न केला आहे. इतर सहा काण्डांतील मंगलाचरण-श्लोकांत त्या त्या काण्डाचा विषय जसा सुचविला आहे तसा येथे कां नाही या शंकेतून पुढील अनेक शोध बाहेर पडले.

(क) वाणी = सरस्वती व विनायक = गजानन असा अर्थ घेतल्यास व दोघांचे मिळून सर्व कर्तृत्व वर्णन केल्यास वाणी ही विनायकाची पत्नी-शक्ति ठरते. दोघांपैकी कोणा ही एकाला कार्य करता येत नाही; शक्ति व शक्तिमान मिळून कर्तृत्व उत्पन्न होत असते. 'न घटत उद्भवः प्रकृतिपूरुषयोरजयोरुभययुजा भवन्त्यसुभृतो..' (भाग - १०/८७/३१). वाणी-सरस्वती ही गणपतीची पत्नी-शक्ति नसून ती ब्रह्मदेवाची पत्नी आहे. 'कर्तारौ' हा एकशेषद्वंद्व समास असल्यामुळे 'जगतःपितरौ वन्दे पार्वती परमेश्वरौ' यांत पितरौ = माताच पिताच हा अर्थ आणि एक शेषद्वंद्वसमास आहे, तसाच वर्णानां - छंदसां कर्तारौ वाणीविनायकौ वन्दे यात घेणे भाग आहे. प्राकृत पतिपत्नींना सुद्धा एकेकट्याने स्वतंत्रपणे धर्मकार्य करता येत नाही. वाणीविनायकौ हा द्वंद्वसमास व्याकरणाने चूक नाही पण ज्या प्रमाणे जगतः कर्तारौ वन्दे पार्वतीरामचंद्रौ' असे म्हणणे औचित्यास सोडून होईल त्या प्रमाणे पहिला अर्थ घेतल्यास त्याने औचित्यभंगदोष ग्रंथारंभी मंगलाचरणात होतो; कारण की वाणी गजाननाची शक्ति नाही.

(५) सरस्वती व गणपती वर्णादि व मंगलांचे करणारे असल्याचा उल्लेख मानसात कुठेच नाही; पण सीतारामचंद्राबद्दल असे उल्लेख सर्वत्र आहेत.

(क) हिंदी मंगलाचरणांत सो. १ मध्ये गणपतीला वंदन असून त्यांत सिद्धि व 'बुद्धि' यांचा उल्लेख आहे; वाणीचा नाही. सिद्धिबुद्धी या गजाननाच्या पत्नी आहेत. (गणेशचरित्र पाहा)

(ख) ब्रह्मदेवाची पत्नी सरस्वती असल्याबद्दल आधारही मिळाला.

'त्रयीविद्या कामधेनुः सा स्त्री भाषाक्षरा स्वरा ब्रह्मणे प्रददौ पत्नीं महालक्ष्मी नृपत्रयीम् (सप्त शती प्राधानिक रहस्य)

(त्रयीविद्या भाषा अक्षर स्वरूप जी स्वरा = सरस्वती ती महालक्ष्मीने ब्रह्मदेवाला पत्नी म्हणून दिली.) स्वरया सह संभूत्य विरिंचोऽण्डमजीजनत्' सरस्वतीच्या साह्याने विरिंचीने -ब्रह्मदेवाने ब्रह्माण्ड निर्माण केले. (श्रीमदाचार्यविरचित सौंदर्य लहरीत सरस्वतीला ब्रह्मदेवाची प्रेयसी= प्रिय पत्नी म्हटले आहे.) 'विरञ्चिप्रेयस्यास्तरुणतर शृंगार लहरी'

(६) आता वाणी = सीता हे साधार सिद्ध करणे राहिले; तेच पाहा -

1 'दारुनारिसम वाणी, स्वामी-। राम सूत्रधर अंतर्यामी ॥' (१/१०५/५)

2 'तदपि यथाश्रुत वर्णिन मुनिवर ! स्मरुनि गिरेशा प्रभुस धनुर्धर॥' (१/१०५-४) धनुर्धर प्रभु म्हणजे राम हे सर्वमान्य आहे. तेच गिरेश, गिरा+ईश=गिरापती= वाणीपति आहेत' असे म्हटले यावरून वाणी= सीता हे ठरले.

3 'व्यापी ब्रह्म विरज वागीश्वर । माया मोह -पार परमेश्वर' (७/५८/७) असे वागीश्वर = वाणीश्वर रामांनाच म्हटले आहे. मूळात 'वागीसा' आहे.

(क) विनय पत्रिकेत तीन ठिकाणी रामांनाच वागीश म्हटले आहे -

4 'ब्रह्म वरदेश वागीश व्यापक' (प. ५४) (पद ५५)

5 'वेदविख्यात वामन विरज विमल वागीश वैकुण्ठवासी' (पद ५५) 'वरद वनदाभ

6 वागीश विश्वात्मा विरज वैकुण्ठ मंदिर विहारी॥' (पद ५६)

7 (ख) 'कविं पुराणं वागीशं रामं दशरथात्मजम् ।' (रा. स्त. २७)

या प्रमाणे राम सीतापति हेच वाणीपति आहेत हे अनेक प्रमाणानी सिद्ध झाले.

(ग) आता विनायक = रामचंद्र कसे ते पाहा - ज्याला कोणी नायक नाही तो विनायक किंवा विशेष नायक = विनायक.

'स्वामी तु ईश्वरः पतिः ईशिता। अधिभू : नायको नेता प्रभुः परिवृढोऽधिपः' (अमरे)

(घ) 'महा स्वतंत्र न कोणि शिरावरि' (१/१३७/१)

असे नारद मुनींनी क्रोधाने भगवंतालाच म्हटले आहे. ज्याच्या शिरावर म्हणजे ज्याच्या पेक्षा श्रेष्ठ कोणी नाही तो परमेश्वरच; नायक म्हणजे ईश्वर असा अर्थ अमरकोषांत दिलाच आहे. या प्रमाणे या श्लोकात वाणीविनायकौ याचा तुलसीदासांचा भाव सीतारामचंद्री असा आहे हे सिद्ध झाले. या श्लोकांत जगाचे जननीजनक म्हणून अभिन्न रूपाने दोघांना वंदन आहे.

(७) कोणी म्हणतील की विघ्नविनाशासाठी व मंगलासाठी विघ्नविनाशक गणपतीचे स्मरण आवश्यक आहे. तर तुलसीदासांनी म्हटले आहे की,

'त्या न सकलही विघ्ने व्यापिति । सुकृपें राम जयास विलोकिति॥' (१/३९/५)

रामचंद्रांनी कृपा केल्याचे वर्णन अनेक ठिकाणी आहे.

'सर्व सुधारिल तो मम दोषू करत कृपा तत्कृपे न तोषू' (१/२८/३)

'परिसुनि बघुनि विचारुनि चित्ते। प्रभु वानिति मम बुद्धि-भक्तिते॥' १/२९/३)

(८) महाराष्ट्रांत 'मंगलमूर्ति' हे पद गणपतिनिदर्शक आहे; पण मानसात मंगलमूर्ति रामचंद्रास म्हटले आहे.

'मंगलमूर्तिस नेत्रीं निरखित।' (२/१२५/५) 'मंगल मूर्ति नेत्र भरभरुनी' (२/२४९/४)

रामचंद्रच मंगलकर्ते आहेत हे पुढे सविस्तर दाखविले आहे.

(९) सरस्वतीच्या कृपेसाठी तिचे मंगल करणे जरूर आहे असे म्हटल्यास, सीता = सरस्वती हे मागे सिद्ध केलेच आहे. श्रेय = मंगल - कल्याण, 'कल्याणं मंगलं शुभम्' 'सर्वश्रेयस्करी' असे ५व्या श्लोकात सीतेला म्हटले आहे. शिवाय

'ज्या जन जाणुनि कृपाधार दे। नाचवि कवि उर अजिरि शारदे॥' (१/१०५/६)

'दारुनारि सम वाणी, स्वामी-। राम सूत्रधर अंतर्यामी॥' (१/१०५/५)

ज्याच्यावर कृपा करतात त्याच्या हृदयरूपी अंगणात काष्ठपुतळी प्रमाणे शारदेला नाचविणारे सूत्रचालक स्वामी रामच आहेत. मग ब्रह्मदेवाच्या अर्धांगीला प्रार्थना कशासाठी? ती तर सीतेचा अंश आहे.

'जिचे अंश उपजति गुणखाणी। अगणित उमा रमा ब्रह्माणी' (ब्रह्माणी= वाणी=शारदा)

(१०) हे स्पष्टपणे न लिहिण्याचे कारण की तुलसीदास मर्यादापुरुषोत्तम श्रीरघुनाथाचे भक्त असल्याने मर्यादा पालनासाठी बाह्यतः वाणीविनायकांना वंदन केले आहे व ज्ञानदृष्टीने पाहणारासाठी अभिप्रेत अर्थ लावण्यास लागणारे आधार याच ग्रंथात अत्रतत्र पसरून ठेवले आहेत. ही अद्भुत भावनिदर्शन कला फक्त तुलसीमानसातच पाहावयास सापडते.

(११) आता या अर्थानुसार प्रथम श्लोकांतील बाकीच्या पदांचा अर्थ लावणे जरूर आहे.

(क) वर्णानां कर्तारौ – वर्ण - तेज, विवर्ण = निस्तेज, तेज (रूप) हे पंचभूतांपैकी एक आहे. याने पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश ही पंचभूते व तेज = रूप, म्हणून शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हे त्यांचे गुण, यांना निर्माण करणारे असे सिद्ध झाले.

(ख) 'अर्थ-संघानां' अर्थ-पदार्थ, त्यांचा संघ म्हणजे समुदाय व असे अनेक समुदाय. पंचभूतांच्या मिश्रणाने विविध प्रकारच्या भूतभौतिक पदार्थास उत्पन्न करणारे.

(ग) 'रसानां कर्तारौ' – त्या निर्माण केलेल्या पदार्थांच्या ठिकाणी रस म्हणजे आवड उत्पन्न करणारे, शिवाय नवरस, षड्रस, भक्तिरस उत्पन्न करणारे. आवड,

रूचि आसक्ति या अर्थी रस शब्दाचा प्रयोग 'विषया विनिवर्तन्ते निराहारस्य देहिनः। रसवर्जं रसोऽप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते' (भ. गी. २/५९)
या श्लोकात केला आहे. (गीताभाष्य पहा) (घ) 'छंदसां कर्तारौ' - वेदांचे उत्पत्तिस्थान. वेदविहित मार्गांचे अवलंबन केल्यानेच विषयांच्या आसक्तीतून सुटणे शक्य आहे; यथा -

'वर्णाश्रम निज निज धर्म-निरत वेदपथिं लोक ।
वर्तति, पावति सदा सुख नहिं भय रोग न शोक' (७/२०)

'श्वास सहज ज्यांचा श्रुति चारी' (१/२०४/५) बृहदारण्यक २/४/१० पाहा.
(ङ) मंगलानां कर्तारौ – बालकाण्डाचा विषय या श्लोकात कसा आहे, हे दाखविण्यासाठी याचे स्पष्टीकरण पुढे केले आहे, ते पहावे.
(च) 'च' ने 'अमंगलानां हर्तारौ' - अमंगलांचा संहार करणारे रघुनाथ सीतापति असा गूढार्थ होतो.

'मंगलभवन अमंगलहारी । तो द्रवुं दशरथ - अजिर विहारी ॥' (१/११२/४)
म्हणूनच अरण्यकाण्डात मंगल शब्दाचा प्रयोग एकदा सुद्धा नाही. कारण की राम पंचवटीत राहिले होते व त्या वनांत अमंगलाचे मूळ शूर्पणखा खर दूषणादि राक्षस होते; त्यांचा विनाश केल्याशिवाय मंगल झाले-केले असे म्हणणे म्हणजे वदतो व्याघातच. त्यांचा संहार केल्यानंतर लगेच मंगलकर्त्री सीता चोरीस गेल्याने स्वतः रघुनाथ रामच विरहव्याकुळ झाले आहेत.
(१) किष्किंधा काण्डात वाली वध होईपर्यंत 'मंगल' नाही'. लंका काण्डांत 'मंगल' नाही. विस्तार प्रस्तावनेत पाहावा.
सार – वरील सर्व अर्थांचे सार हेच की सीता जगज्जननी आहे व रघुपति जगत्पिता आहेत. हे वर्णन मानसात अनेक ठिकाणी आहे.

'विश्वपिता रघुपतीस जाणुनि घ्या डोळेभर रूप न्यहाळुनि ॥' (१/२४६/३)
'ऐका शिक्षा परम पुनीता । जाणा जिविं जगदंबा सीता ॥' ८१/२४९/२) आता
'जगतः पितरौ वन्दे पार्वतीपरमेश्वरौ'
या वचनाशी तुलना करून वरील विवेचनाची सयुक्तिकता वाचकांनी ठरवावी.
आणखी आधार 'वेदे व्याकरणेचैव ये च वर्णाः स्मृताः स्वताः।
रामनाम्नैव ते सर्वे जाता नैवात्र संशयः' (म. रा. मा. पी.)
बा. कां. दो. १९/२ च्या टीकेत या महारामायणाच्या विधानास उपनिषदांतील आधार दाखविला आहे.
(क) नाम आणि नामी (भगवान) यांत अभेद असल्याने रामापासूनच सर्व जग वर्णाक्षरादिकांसह झाले हे ओघानेच ठरले.
ल. ठे. वरील अर्थ करण्यात 'वर्णाना' वगैरे सर्व पदे श्लोकांतील अनुक्रमानेच परस्परांशी संबंधित राहतात तशीं पहिल्या वाच्यार्थाने रहात नाहीत. वर्णांचा व

अर्थसंघांचा आणि रसांचा व छंदाचा काही संबंध रहात नाही. वर्णांचा म्हणजे अक्षरांचा व छंदाचा म्हणजे वृत्तांचा संबंध आहे. म्हणून अर्थ करताना तोच क्रम राहिला.

**विषय - प्रतिपादन**

(१) या श्लोकात ग्रंथविषय कसा सुचित केला आहे ते पाहू.

'मंगलानांच कर्तारौ वाणीविनायकौ सीतारामचंद्रौ'

कर्तृत्व - करणी–चरित्र; सीताराम चरित्र म्हणजे राम-चरित्र हा विषय सुचविला. कर्तारौ हा एक शेष द्वंद्वसमास असल्याने रामचरित्र सुचित होते.

**'करि मंगला हरि कलिमला रघुनाथ गाथा परम ही'** (१/१०/छं).

यात 'मंगलानां च कर्तारौ' या अर्थच स्पष्ट केला आहे. व त्या कर्तृत्यालाच 'रामकथा रघुनाथगाथा' असे म्हटले.

'तुलसी रघुनाथगाथाभाषानिबन्धमतिमंजुल मातनोति ।' (मं. श्लो. ७)

यांत उपसंहार रूपाने विषयकथन स्पष्ट केले आहे.

(क) 'यत्पादप्लव' याने सगुणसाकाराची कथा सुचविली व 'यन्मायावशवर्ति' या श्लोकांत उपपत्ति दाखविली.

(ख) 'सीताराम गुणग्राम पुण्यारण्य' याने विषयाचा अभ्यास (पुन्हां कथन) दाखविला.

(ग) 'यत्पादप्लवः एकः एव' याने अपूर्वता दाखविली तशीच 'यन्मायावशवर्ति - भ्रमः यानेही दाखविली.

(घ) 'नाना पुराण निगंमागम संमत' (श्लो ७) याने अर्थवाद विषयाचे महत्व सुचविले.

(ङ) 'स्वान्तः सुखाय' याने फळ सुचविले या प्रमाणे

'उपक्रमोपसंहारौ, अभ्यासो ऽ पूर्वता फलं । अर्थवादोपपत्तीच'

या सहा लिंगांनी मंगलचरणाच्या श्लोकांतच ग्रंथाचा विषय सिद्ध झाला.

(२) यांत 'च' ने अमंगलहारी चा अंतर्भाव होतो, तो बाजूस ठेवला म्हणजे 'मंगलांनां कर्तारौ' ने मंगलकारकचरित्र हा बालकाण्डाचा विषय सुचित होतो.

(क) या काण्डाच्या उपसंहाराकडे पाहिले म्हणजे दिसते की तेथे हाच विषय सुचविला आहे. **'सीतारामयश मंगलदायक'** (३६१/७) 'मंगलायतन रामयश' (३६१) मुळांत 'मंगलखानि' आहे.

(ख) बालकाण्डात 'मंगल' शब्द शंभर वेळा तरी आहे. अयोध्या काण्डात ६७ वेळां असला तरी त्यांत बऱ्याच ठिकाणी बालकांडातील विषयांचीच पुनरावृत्ति आहे. किष्किंधा कांडात एक वेळा, सुंदर काण्डांत तीनदा व उत्तरकाण्डांत सहा वेळा आहे. अरण्य व लंका कांडात 'मंगल' नावाला सुद्धा नाही. यांतही बालकांडातील मंगलांची बरीच पुनरावृत्ति आहे.

**बालकांडांत मंगल शब्दांचा संबंध प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे राम वा सीतेशींच आहे.** कांही नमुने पाहा -

(१) राम – 'मंगलभवन अमंगलहारी'
(२) राम नाम – 'मंगलभवन अमंगलहारी'
(३) रामकथा – 'करि मंगला हरि कलिमला'
(४) रामगुण – 'जगमंगल रामाचे गुणगण'
(५) अयोध्यापुरी – 'सकल सिद्धिदा सुमंगलाकार' (३५/५)
(६) शरयू – 'शरयूनाम सुमंगलमूला.' (३९/१२)
(७) रामसुयश – 'मधुर मनोहर मंगलकारी' (३६/४)
(८) संतसभा – 'सकलसुमंगलमूळि'
(९) 'रामविवाह – 'मंगलमय ऋतुराजा' (४२।३)
(१०) लग्नवेला – 'सकलसुमंगलमूल' (३१२)
(११) सीता – 'सुमंगलअंग' (३१८/३)
(१२) लग्नदिन – 'मंगलमूल'
(१३) मुनि-आशीर्वाद – 'ध्वनि मंगलमूल.'
(१४) शकुन – 'मंगलमूल'
(१५) गीते – 'मंगलगान'
(१६) वरवधू – 'मंगलनिधि.' इतका विस्तार पुरे.

ल. ठे. दुसऱ्या कोणत्याही काण्डाच्या उपक्रमांत व उपसंहारात 'मंगल' शब्द नाही. 'मंगलायतन हरिः' हे प्रसिद्धच आहे. रघुनाथ राम हरि आहेत हे ६ व्या श्लोकांत स्पष्टच सांगितले आहे.

(३) या श्लोकांत अभिन्न रूपाने सीतारामास वंदन आहे व त्याचा उपसंहार दो. १८ 'गिरा अर्थ जलवीचिसम... वन्दे सीतारामपद' यांत केला आहे.

(४) भिन्नरूपाने सीतेला वंदन श्लोक ५ मध्ये 'सीतां नतोऽहम्' असे केले आहे व याचा उपसंहार 'जनकसुता-जगजननि जानकी' (१८/७- ८) यांत केला आहे.

(५) भिन्नरूपाने रघुनाथास वंदन श्लो ६ मध्ये आहे.

'वन्देऽहं तमशेषकारणपरं रामाख्यमीशं हरिम्'

याचा उपसंहार 'रघुनायकचरणकमलवन्दे' (१८/९) यात केला आहे.

**उपसंहार** – या प्रमाणे मंगलाचरणाच्या **या श्लोकांत ग्रंथाचा विषय व बालकाण्डाचा विषय सांगून 'वस्तुनिर्देशमंगल' केले आहे.** वन्दनात्मक मंगल प्रगट आहे. पुढील श्लोकांत अयोध्या काण्डाचा विषय आणि ग्रंथाचा अधिकारी व प्रयोजन यांचा निर्देश केलेला आहे. विषय, अधिकारी, संबंध व प्रयोजन यांचे कथन ग्रंथारंभी असावे असे शास्त्रज्ञ म्हणतात.

'अधिकारी च विषयः संबंधश्च प्रयोजनं।
शास्त्रारंभफलं प्राहुरनुबन्धचतुष्टयम्'

(स. वे. सि. सा. सं) यांना अनुबन्धचतुष्टय म्हणतात.

संगति – बालकाण्डात वर्णन केलेल्या निर्गुण वा सगुणरूपाची वस्ती हृदयात अनुभविल्याशिवाय सुख शान्ती समाधान नाही; म्हणून या प्रथमश्लोकांत सुचविलेल्या चरित्राने ते साधण्यास अधिकारी कोण हे दुसऱ्या श्लोकात खुबीने वर्णिले आहे.

अनु. **भवानिशंकरौ वन्दे श्रद्धा विश्वासरूपिणौ।**

**याभ्यां विना न पश्यन्ति सिद्धः स्वान्तस्थमीश्वरम्** ॥२॥

अर्थ – ज्यांच्या शिवाय सिद्धांना सुद्धा स्वान्तस्थ (स्व+अन्तस्थ) हृदयांत असलेल्या ईश्वराचे दर्शन करता घेता येत नाहीं त्या श्रद्धाविश्वासरूपी भवानी शंकरांना मी वंदन करतो ॥२॥

टीका – (१) भवानी + शंकर = भवानीशंकरौ, द्वंद्वसमास, भवाची पत्नी = शक्ति ती भवानी. भव = शंकर, उत्पत्तिकरणारा. त्याची उत्पादकशक्ति भवानी, मृडानी (पालकशक्ति) आणि शर्वाणी (प्रलय शक्ति). सती दक्षकन्या भवानीच आणि पार्वती गिरिजा पण भवानीच.

(क) शं कल्याणं करोति इति शंकरः; अयोध्या काण्डाच्या पहिल्या श्लोकात शंकरांनाच वंदन आहे.

(२) श्रद्धा व विश्वास हे दोन शब्द बहुधा समानार्थकच वापरतात. येथे दोन्ही वापरले असल्याने काही अर्थभेद असलाच पाहिजे. शास्त्रीपंडितास विचारता कोणी काही सांगू शकले नाहीत. पण श्रीमद्‌भागवताच्या श्रीधरी टीकेत मर्म सापडले ते- श्रद्धा=आदर, आणि विश्वास = आस्तिक्यबुद्धि.

(क) आधी शंकर – भव आणि मग त्यांची पत्नी भवानी असा स्वाभाविक संबंध आहे. आधीं विश्वास असला तर कदाचित श्रद्धेची प्राप्ती होणार. शंकर हे शक्तिमान आणि भवानी त्यांची शक्ति. दोघे मिळून सर्व कार्य करतात. मनुष्याला सुद्धा स्वतःच्या शक्तीचा अंदाज कळल्याशिवाय कोणतेही कार्य करण्याचा दृढविश्वास येत नाही.

बा. कां हा दूसरा श्लोक, दुसरे कांड अयोध्या, त्यांत पहिल्या 'यस्यांके च विभाति भूधरसुता' या श्लोकांत आधी शंकर व मग त्यांच्या मांडीवर भूधरसुता पार्वती भवानी म्हणजेच विश्वासाच्या मांडीवर श्रद्धा आहे.

(३) सिद्धः – सिद्ध, ज्यांनी अणिमादि महासिद्धी व इतर गौण, क्षुद्रसिद्धि मिळविलेल्या आहेत असे लोक. येथे 'अपि' पद अध्याहृत आहे. 'सिद्धा अपि, सिद्धि' मिळाल्याने ऐहिक ऐश्वर्य, सुख, कीर्ति, मानमान्यता, शिष्यसंग्रह इत्यादि सर्व सहज मिळेल; पण कामक्रोधादिकांच्या माऱ्यातून असमाधानातून सुटका होणार नाही. जन्ममरणरूपी दुःखांच्या पर्वताखाली कण्हत कुंथत राहणे चुकणार नाही.

(४) 'स्वान्तस्थम्' – स्वतःच्या अंतःकरणात, हृदयांत निवास करीत असणारा 'ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति'। (भ. गी.)

(क) ईश्वरम् – ईश्वराला, यालाच कोणी ब्रह्म, परमात्मा, भगवान इत्यादि म्हणतात. ईश्वराची चार स्वरूपे समर्थांनी वर्णिली आहेत.

(१) निर्गुण निराकर = ब्रह्म.

(२) सगुणनिराकार - जगदुत्पत्तिस्थितिसंहार कर्ता-कारण ब्रह्म त्यालाच कोणी विष्णु, राम, नारायण, हरि, देवी, शिव, वगैरे रुचि-वैचित्र्याने म्हणतात. तो परमेश्वर.

(३) या ईश्वराची अवताररूपे = सगुणसाकार ब्रह्म, रघुनाथ, यशोदानंदन, वामन, भार्गव इत्यादि.

(४) मूर्ति - त्या त्या अवतारांच्या मूर्ति - प्रतिमा वगैरे. यांना जडसाकार असे म्हणावे वाटल्यास.

(५) 'न पश्यन्ति' – अनुभवू किंवा पाहू शकत नाहीत. 'पश्यन्ति' पदाने केवल सगुण साकाराचाच बोध होतो हे म्हणणे सांप्रदायिक हट्टाचे आहे.

'ध्यानेनात्मनि पश्यंन्तिकेचिदात्मानमात्मना' (भ.गी)

'मनसा एव अनुद्रष्टव्यः' (श्रुति)

'दृश्यते बग्रया बुध्दया सूक्ष्मया सूक्ष्मदर्शिभिः' (श्रुति)

इत्यादि स्मृति श्रुति वचनांत निर्गुण ब्रह्माच्या साक्षात्कारालाच पश्यन्ति वगैरे म्हटले आहे. 'निर्गुणरूप सुलभ अति' (७/७३) रूप शब्द आला की पश्यन्ति – पाहतात म्हणणे योग्यच ठरते. निर्गुण शब्द मानसात अनेक ठिकाणी (१५ वेळा) वापरला आहे.

(६) जर सिद्धांना सुद्धा विश्वासाश्रित श्रद्धेशिवाय निर्गुण किंवा सगुण स्वरूपाचा अनुभव घेता येत नाही तर मग इतर पामरांविषयी, बद्धजीवा विषयां बोलाययासच नको.

(क) विश्वास – ईश्वर, वेद, शास्त्रे, ही सत्य आहेत; वेदपुराणादिकांत सांगितल्या प्रमाणे आचरण केले असता जीव सर्व दुःखातून सुटून, नित्य शाश्वत, शुद्ध सुखाची प्राप्ती ईश्वराच्या व गुरुंच्या कृपेने करू शकतो. अशी जी आस्तिक्य बुद्धि तो विश्वास. हा विश्वासरूपी शं-कर प्रथम पाहिजेच. तरच तो श्रद्धेच्या मदतीने शं-कर कल्याण करणारा होईल. येथे नमन विश्वास व श्रद्धा यांनाच मुख्यतः आहे.

(ख) श्रद्धा – आदर, पूज्यबुद्धि, उत्पन्न झाल्याशिवाय कोणीही कोणतेच कार्य करण्यास प्रवृत्त होत नाही. ही आदरबुद्धि म्हणजे विशिष्ट संस्कारांचा गट्ठा आहे. पुरुष म्हणजे विशिष्ट संस्कारांचा समूह; ते ज्या प्रकारचे असतील तशा क्रिया घडतील. श्रवण, दर्शन, संगति, अनुकरण यांच्या योगाने संस्कार जमत जातात.

'श्रद्धामयोऽयं पुरुषो यो यच्छ्रद्धःस एव सः' (भ.गी)

'श्रद्धेविना धर्म कधि न घडे'

ज्या गोष्टीवर विश्वास नसेल त्या गोष्टीबद्दल, आदर वाटणारच नाही. त्या गोष्टीचे श्रवण, दर्शन, संगति, अनुकरण करण्याची इच्छाच होणार नाही. हिंदुसंस्कृतीवर पूर्ण विश्वास असलेला मनुष्य जुम्मा मशिदीत नमाज पढण्यास सहसा जाणार नाही; किंवा कुराणाविषयी त्यास आदर वाटणार नाही. आदराचा अभाव म्हणजे तिरस्कार, द्वेष, नव्हे. येथे तो उदासीन असतो. या दृष्टान्ताने विश्वास व श्रद्धा यांचा संबंध ध्यानी येईल. येथे श्रद्धा सात्विक समजणे जरूर आहे.

'श्रद्धा सात्विक धेनु शोभना' (७/११७/९) येथ पासूनच 'ज्ञानदीप' साधनाचा प्रारंभ होतो. राजस श्रद्धेने फार तर सिद्धी किंवा स्वर्गादिभोगसुख मिळेल.

**अधिकारी व प्रयोजन**

वरील विवेचनावरून निष्कर्ष निघतो की जो विश्वासाश्रित सात्विक श्रद्धावान असेल तोच या ग्रंथाचा अधिकारी होय. हे दाम्पत्य असले म्हणजे क्रमशः तो जीव पुढे सांगितल्या प्रमाणे या ग्रंथाच्या अभ्यासाने हृदयस्थ परमात्म्याचे दर्शन करू शकेल; म्हणून ठरले कीं हृदयस्थ ईश्वराचे दर्शन साक्षात्कार हे याचे प्रयोजन आहे. 'श्रद्धावान्लभते ज्ञानम्' (भ. गी.) 'कवणहि सिद्धि कि विश्वासाविण' तुलसीदासांचा अभिप्रेत सिद्धान्त नवविधाभक्तीने ज्ञानप्राप्ती व नंतर प्रेमभक्तीने रामचंद्रांचा सगुणसाक्षात्कार हा असल्याने मंगलाचरणातील पुढील श्लोकांत ते प्राप्त करून घेण्याची साधन परंपरा सांगितली आहे. वैराग्य व ज्ञानाशिवाय प्रेम भक्तिलाभ होऊ शकत नाही हा गोस्वामींचा व महाराष्ट्रातील ज्ञानेश्वरादि समर्थ रामदासांपर्यंतच्या सर्व प्रसिद्ध संतांचा ठाम सिद्धान्त आहे; म्हणून दुसऱ्या (अयोध्या) काण्डात वैराग्य हेच मुख्य प्राप्तव्य दाखविले आहे. त्या काण्डाच्या उपसंहारात 'होई नक्कि भवरसविरति' हे शेवटचे वाक्य आहे.

**वैराग्याचे बीज सात्विक श्रद्धेत कसे असते पाहा.**
**'श्रद्धेवीण धर्म कधि न घडे'।** (७/९०/४)

**धर्म** – 'जप तप योग नियम निज-धर्म–हि । श्रुतिसंभव नाना शुभ कर्महि॥
ज्ञान दया दम तीर्थी मज्जन । वदति धर्म जितके श्रुतिसज्जन ॥'
या सर्व गोष्टींना वसिष्ठांनी धर्म असे म्हटले व श्रुतिसंत हेच सांगतात. 'विरति स धर्म योग दे ज्ञाना' । (३/१६/१) धर्माचरणाचे फळ अपर वैराग्य प्राप्ती; वैराग्याच्या आधारे योग व योगाने ज्ञान होते. अशी ही साधन परंपरा आहे. (क) सत्य, अहिंसा, परहित, भूतदया यांनाहि परमधर्म म्हटले आहे.
'धर्म न दुसरा जगीं सत्या सम ।' (२/९५/५)
'परम धर्म वेदोक्त, अहिंसा' (७/१२१/२२) 'धर्म कि दयासदृश हरियाना' (७/११२/१०) 'बंधु धर्म परहितसा नाही' (७/४१/१)

सूचना – अयोध्या कांडात मुख्य मुख्य विविध मानव धर्मांचे उदाहरणांनीच दिग्दर्शन केले आहे. त्याचा विस्तार अयोध्या मंगलाचरण-टीकेत पाहावा. विश्वासाश्रित सात्विक श्रद्धेच्या साह्याने धर्माचरणाने वैराग्यप्राप्ती करणे हा अयोध्या काण्डाचा मुख्य विषय येथे दुसऱ्या श्लोकांत सुचविला आहे म्हणून हा श्लोक त्या कांडाचा प्रतिनिधी आहे. जसा पहिला श्लोक बालकांडाचा प्रतिनिधी.

धर्माचरणाने वैराग्यरूपी फळाची प्राप्ती विश्वासश्रद्धेच्या जोरावर होण्यास स्वतःची बुद्धि अपुरी पडते. धर्माचरणांतील मर्म नीट ध्यानी येत नाही म्हणून कोणा तरी स्वानुभवी निःस्पृह, शास्त्रज्ञ, निर्दंभ मार्गदर्शकाची जरूर असते; म्हणून संगति - पुढील तिसऱ्या श्लोकात सद्‌गुरूवंदनाने हा विषय सुचवितात व त्यांतच अनुबंध चतुष्टयांतील राहिलेले अंग 'संबंध' 'आश्रित' शब्दाने सुचवितात, असे हे साती श्लोक क्रमाने परस्परसंबद्ध आहेत.

अनु. **वन्दे बोधमयं नित्यं गुरुं शंकर रूपिणम् ।**
**यमाश्रितो हि वक्रोऽपि चन्द्रः सर्वत्र वन्द्यते ॥३॥**

**अर्थ** – ज्यांचा आश्रित झाल्याने वक्र (वाकडा, द्वितियेचा) चंद्र सुद्धा सर्वत्र वन्द्य झाला त्या शंकररूपी ज्ञानमय (ज्ञानस्वरूप बोधमय) गुरुमहाराजांना मी नित्य वन्दन करतो ॥३॥ ('नित्यं' शब्द अविनाशी या अर्थाने गुरुकडेहि घेता येतो)

**टीका** – (१) या श्लोकांत गुरुवंदनाच्या निमित्ताने तुलसीदासांनी शंकरास वंदन केले. पूर्वश्लोकांत श्रद्धाविश्वासाच्या साक्षात्मूर्तीच या भावनेने भवानी शंकरांस वंदिले. दोन्ही ठिकाणी शं - (कल्याण, सुख) कर च शब्द वापरला आहे.

(क) हा तिसरा श्लोक तिसऱ्या म्हणजे अरण्यकाण्डाचा विषय थोडक्यात सांगणारा त्याचा प्रतिनिधी आहे.

(ख) अरण्यकाण्ड मंगलाचरणात प्रथम शंकरासच वंदन केले असून 'शंकर' शब्दच वापरला आहे हे विशेष ध्यानात ठेवावे.

(२) **'बोधमयं'** – ज्ञानस्वरूप, केवल ज्ञानमूर्तीच;

'ब्रह्मानन्दं परमसुखदं केवलं ज्ञान मूर्तिम्' (गु. गी)

या गुरुध्यानाच्या श्लोकाचे सारच येथे 'बोधमयं नित्यं गुरुं' या शब्दांनी सुचविले.

(क) 'बोधमय' शब्दाने सुचविले की गुरूचा देहसुद्धा ब्रह्मरूप, ज्ञानरूप पाहण्याचा अभ्यास शिष्याने केला पाहिजे.

(ख) गुरु ब्रह्मरूप झालेले – ब्रह्मनिष्ठ असले पाहिजेत. 'ब्रह्मविद् ब्रह्म एव भवति' (श्रुति) ब्रह्म जाणणारा ब्रह्मच होतो. 'तुम्हिंच होत तो तुम्हां जाणतां' (२/१२७/३) हा वरील श्रुतीचाच अनुवाद दिसतो. विश्वासमय श्रद्धामय असले पाहिजेत हे मागील श्लोकांत सुचविले आहे.

(३) नित्यम्-नित्य – अविनाशी. 'नित्यानन्दं परमसुखदं' असा पाठ गुरु गीतेत आहे.

(क) 'नित्यं' हे 'वन्दे' बरोबर क्रिया विशेषण घेता येण्यासारखे आहे.

(ख) 'नित्यं गुरुं' असे घेतल्यास एका शंकेला जागा राहते की गुरुदेह तर अनित्य असतो; पण तामस श्रद्धावंतच अशी शंका घेतील. समर्थ म्हणतात,

'माझी काया गेली हे तो खरें । परी मी असे जगदंतरे'

'ब्रह्मरूप काया होतसे कीर्तनी' (तुका.)

सद्गुरूदेह ज्याला ब्रह्मरूप वाटू लागेल तोच सतताभ्यासाने 'विश्वब्रह्मरूप' पाहू शकेल.

'ब्रह्मसमान सकल जगिं पाही' (३/१५/७)

(४) 'गुरूं' – अज्ञानरूपी अंधकाराचा नाश करून ज्ञानरूपी प्रकाश देणारा तो गुरु!

'गुकारस्त्वंधकारःस्यात्, रूकारस्तान्निवारकः।

अंधःकार निवारित्वात् गुरुरित्यभिधीयते' (गु. गी)

(५) 'शंकररूपिणम्' – सुचविले की गुरु शंकराचेच रूप असतात. मं. सो. मध्ये गुरु 'नररूपहर' म्हटले आहे व येथे शंकर रूप गुरु म्हटले. या दोन्ही वाक्यांनी श्रीमदाचार्यांच्या एका श्लोकाचा अर्थ सांगितला.

'शिव एव गुरुः साक्षात् गुरुरेव शिवः स्वयम् ।

उभयोरन्तरं किंचिन्न द्रष्टव्यं मुमुक्षुभिः' (स. वे. सि. सा. सं)

(क) 'शं-करं' ने सांगितले की शिष्याचे कल्याण करण्याचे सामर्थ्य गुरूच्या ठिकाणी पाहिजे. ते सामर्थ्य धर्म, विवेक, वैराग्य, योग, ज्ञान, विज्ञान, प्रबोध शक्ति (ज्ञानदानशक्ति) वगैरेनीच येते; म्हणून हे सर्व पाहिजे. विस्तार अरण्यमंगलाचरण १ च्या टीकेंत पाहावा.

'विरति विवेक विनय विज्ञानी । बोध यथार्थहि वेद पुराणी' (३/४६/५)

'अमितबोध अनीह मितभोगी । सत्यसार कवि कोविद योगी' (३/४५/८)

ही गुरु लक्षणे अरण्यकांडातच सुचविली आहेत. (टी. प.)

(६) 'यमाश्रितो हि' – ज्याचा आश्रय केल्यानेच 'हि' ने सुचविले की गुरूचा आश्रित झाल्याशिवाय तरणोपाय नाही. हाच सिद्धान्त उपसंहाररूपाने उत्तरकांडात स्पष्ट सांगितला आहे ... 'गुरुविण नोहे ज्ञान, ज्ञान कि होइ विराग विण' (७/८९ रा).

'गुरुविण भवनिधि कोणि न तरती । जरि विरिंचि शंकरसम असती ॥' (७/९३/५) आचार्यांच्या एका वचनाशी तुलना करावी –

'यमाश्रित्याश्रमेणैव परं पारं गतोबुधाः' (स. वे. सि. सा. सं.)

'यम् आश्रित्य अश्रमेण एव परं पारं गताः बुधाः'

यांतील 'यमाश्रित्य एव' आणि वरील 'यमाश्रितो हि' हे तंतोतंत साम्य पाहून वाचकांनीच अनुमान करावे.

(क) 'यमाश्रितो - या पदाने अनुबंध चतुष्टयांतील 'संबंध' सुचविला. 'आश्रय - आश्रित' संबंध. जे कोणी विश्वास श्रद्धावंत मानव गुरूचा आश्रय करून त्यास शरण जाऊन, त्यांच्या आज्ञेप्रमाणे धर्मसाधन करतील व त्यांच्या मुखाने रामचरितमानस श्रवण करतील त्यांना ज्ञानप्राप्ति होऊन ते रामभक्तीचे अधिकारी बनतील.

'विण सत्संग न हरिकथा त्यांविण मोह न जात ।

मोहनाशविण रामपदिं दृढ अनुराग न तात ॥' (७।६१)

'महामोहतमपुंज यद्वचने रविकर निकर' (मं. सो ५)

(ख) 'शंकर भजन विना नर भक्ति न मम लभतात' (७/४५) हे श्रीरामवचन आहे. 'भजन' = आश्रय करणे असाही अर्थ आहेच.

'नारि अभागिनि भजति पुरुष पर' (७/९९/४)

(७) 'वक्रोऽपिचंद्रःसर्वत्र वंद्यते' – हा दृष्टान्त आहे. दाखविले की वाकडा (वक्र) असलेला चंद्रसुद्धा सर्वास सर्वत्र वंद्य झाला; तसा विश्वास श्रद्धासंपन्न जीव स्वतः जरि वक्र, वाकडा, कुटिल, दोषी असला तरि तो वंदन करण्यास योग्य होतो.

(क) वक्रचंद्र व वंद्यते' यांनी बिजेचा चंद्र सुचविला. अमावास्येनंतर उगवणाऱ्या द्वितीयेचा चंद्रास 'जाणुनि वक्र करिति सब नमना। राहु न करि वक्रेंदु-ग्रहणा' (१/२८१/६)

'वक्रचंद्रमा' पद मूळात आहे. 'अवगुण बहुतुजमाजी चंद्रा' (१/२३८/२) 'वक्रचंद्राने अवगुणी सुचविला. हा वाच्यार्थ झाला.

(ख) 'चंद्र = आनन्द, चन्द्रमा = आनन्द निर्मिमीते इति' अशी व्याख्या (अ. व्या. सु.) आहे. म्हणून चंद्र म्हणजे आनंद, आल्हाद, जीव तत्वतः आनन्दस्वरूप असून अविद्येला वश झाल्यामुळे वक्र झाला आहे. दुःखी अवगुणी झाला आहे. तो वंद्य होतो म्हणजेच स्वस्वरूपाची प्राप्ती करून घेतो. 'गुणाः पूजास्थानं' तो सद्गुणी-संतगुणांनी युक्त होतो.

'अपिचेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक्

साधु रेव स मन्तव्यः' (भ. गी.)

'परं पारं गताः' याने जे सुचविले तेच 'वक्रोऽपिचन्द्रः वन्द्यते' याने सांगितले. येथे अपूर्वता व अर्थवाद सुचविला.

(ग) शुक्ल द्वितीयेच्या चंद्रास वन्दन करतात कारण तो हळुहळु वाढत जाऊन पूर्ण होतो; तसा मायाविवश जीव सद्गुरूचा आश्रित झाल्याने क्रमशः पूर्णतेस जातो हे सुचविले. कोणी टीकाकार असा निष्कर्ष काढतात की तुलसीदासांस वंद्य होण्याची इच्छा होती. (मा. पी. प!) सूर्य अंधारात राहतो असे घुबडाने म्हणावे

किंवा चंद्र पिवळा आहे असे कावीळ झालेल्याने म्हणावे तसे हे म्हणणे आहे. तुलसीदासांच्या इतकी नम्रता व दीनता अन्य कवींच्या कृतीत सापडेल की नाही याची शंका असता पंडित असे म्हणतात. गूढार्थ न उमगल्याचा हा परिणाम आहे.
(८) सद्‌गुरु आपल्या निग्रहानुग्रह शक्तीने अधिकारी शिष्यास क्रमशः साधन संपन्न करून आपल्या कृपेने ज्ञानसंपन्न करतात; म्हणूनच तिसऱ्या कांडात (अरण्य) अवघे ४६ दोहे असून १६ वेळा उपदेश आहे. प्रत्येकात मायामुक्त करणे हाच हेतु आहे. विस्तार अरण्यकाण्डाचे वैशिष्ट्य (मा. मणि मे १९५३) मध्ये व अरण्य काण्ड टीकेत पाहावा.
(९) ज्ञानोत्तर प्रेमभक्ति हा मानससिद्धान्त आहे. ज्ञानी भक्त भगवंतास विशेष प्रिय असतो. 'तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते' (भ. गी.) हाच सिद्धान्त
'ज्ञानी (भक्त) प्रभूस विशेषें प्रिय अति' (१/२२/७)
मानसात आहे. सद्‌गुरुकृपेने (सेवेनंतर) ज्ञान प्राप्त झाले तरि प्रभूच्या नामाच्या ठिकाणी आवड उत्पन्न झाल्याशिवाय प्रेमभक्ति - पराभक्ति - प्राप्त होत नाही; म्हणून पुढील श्लोकांत (४ था) उलट्या (मरा) म्हणजे विलोम आणि सुलट्या म्हणजे अनुलोम (राम) राम नामाने ज्यांना पराभक्ति प्राप्त झाली अशा दोघा प्रसिद्ध रामायणनिर्मात्यांस आणि रामप्रिय विज्ञानसंपन्न महापुरुषांस वंदन करतात. पुढील श्लोक ४ था चवथ्या काण्डाचा (किष्किंधा) प्रतिनिधी आहे, म्हणून तो या श्लोकानंतर आलेला आहे.

**(किष्किंधाकांड प्रतिनिधी)**

अनु. सीताराम-गुण-ग्राम-पुण्यारण्य - विहारिणौ।
वन्दे विशुद्ध विज्ञानौ कवीश्वर - कपीश्वरौ ॥४॥

अर्थ – सीतारामांच्या गुणग्राम 'गुणसमूह' रूपी पुण्य (पवित्र-पावन) अरण्यात विहार करण्याचा स्वभाव असलेल्या, विशुद्ध (विमल) विज्ञानसंपन्न कवीश्वर वाल्मीकि व कपीश्वर हनुमान या दोघांना मी वंदन करतो.
टीका – (१) 'सीतारामगुणग्राम' – सीतारामचंद्रांचे चरित्र, रामायण.
(क) येथे ग्रंथ विषयाचा पुन्हा उल्लेख केला. उपक्रमोपसंहारादि सहा पैकीं येथे अभ्यास आहे.
(ख) वाल्मीकी हे आदिकवी म्हणून प्रसिद्ध आहेत.
'आदिकविही तत्प्रताप (नामाचा) जाणे । उलटा जपुनी विशुद्धि बाणे॥'
येथे विशुद्ध शब्द आहेच. 'राम' मंत्र उलटा 'मरा' जपून ते शुद्ध झाले.
(ग) हनुमान रामभक्तांत अग्रगण्य आहेत. 'रघुपति प्रियभक्तं' 'तूं प्रिय मजला लक्ष्मणदूणें' (४/३/७) हनुमंतांनी सुद्धा 'हनुमद्रामायण' ग्रंथाची रचना केली आहे. (आ. रा. म. कां. पहा) वाल्मीकींनी तर शतकोटि श्लोकात्मक रामायणाची रचना

केली. 'राम' मंत्र जपूनच हनुमंताने श्रीरामास वश केले.
'स्मरुनि पवनसुत पावन नामा । ठेवी करुनी निज वश रामा' (१/२६/६)
रामनामाचे व रामचरित्राचे महत्व गाणाऱ्यांत हे दोघे प्रमुख म्हणून यांचे वर्णन व यांना वंदन केले.
(घ) 'गुणग्राम' शब्दाने सगुणाचे चरित्र सुचविले.
(२) **'पुण्यारण्यविहारिणौ'** – पुण्य - पावन पवित्र, अरण्य शब्दाने गहनता गूढपणा अपारता सुचविली. पुण्य अरण्ये कोणती वगैरे अनावश्यक विस्तार मा. पी. पृ. २१ वर पाहावा.
(क) **'विहारिणौ'** – विहार करणे हा ज्यांचा स्वभाव आहे असे. विहार म्हणजे निर्भयपणे उत्साहाने फिरणे, अत्यंत धैर्यसंपन्न व पूर्णनिर्भय व बलवान वीर असेल तोच अरण्यात एकटा विहार करू शकेल. अरण्याचे स्मरण होताच धीरांनासुद्धा कापर भरते. **'डरती धीर वना स्मरता मनि'** (२/६३/४) रामचरित्रात विहार तोच करू शकेल की जो पूर्णनिर्भय, धृतिसंपन्न व वीर असेल. जोपर्यंत द्वैत आहे तोपर्यंत भय असते; म्हणून ठरले की रामचरित्रात सुखाने व उत्साहाने विहार करण्याचे सामर्थ्य अपरोक्ष साक्षात्कार होऊन 'सर्वब्रह्म' भाव जेव्हा पूर्ण ठसेल तेव्हाच येईल. अन्यथा पदोपदी शंका उत्पन्न होईल, हे जणूं काय 'विशुद्धविज्ञानौ' पदाने सुचविले आहे.
(३) **'विशुद्धविज्ञानौ'** – वासना व कामक्रोधादिक समस्त मानस रोग हेच ज्ञान-विज्ञानातील मल आहेत. हे या दोघांच्या ठिकाणी मुळीच नाहीत हे 'विशुद्ध' विशेष शुद्ध पदाने सांगितले. ज्ञान विज्ञान सतत विशुद्ध राहण्यास पराभक्ति पाहिजेच.
(क) 'प्रेमभक्तिजलविण रघुवर तो। अभ्यंतर मल कधीं न जातो' (७/४९/६) वसिष्ठ वचन म्हणून हेहि सुचविले की हे दोघे प्रेमभक्तिसंपन्न होते आहेत.
ल. ठे. - मानसात विवेक, विज्ञान या शब्दांचा उपयोग निरनिराळ्या अर्थांनी केला आहे. कोठे विवेक = ज्ञान -व्यतिरेक ज्ञान, तर कोठे विवेक -नित्यानित्य विवेक, सदसत् विवेक, सारासार विवेक या अर्थांनी वापरला आहे. कोठे ज्ञान -मन, बुद्धि, शास्त्रज्ञान हे अर्थ आहेत. तर कोठे ज्ञान = व्यतिरेक ज्ञान (अहंब्रह्म अस्मि), कोठे ज्ञान = विज्ञान म्हणजे 'सर्व खलु इदं ब्रह्म' ही दृढानुभूति असा अर्थ आहे. तर कोठे विज्ञान म्हणजे परोक्ष ज्ञान हा अर्थ आहे. 'ब्रह्मलीन दुर्लभ विज्ञानी' (७/५४/६) हा अर्थ येथे आहे. या दशेलाच रामगीतेत (३/१५/७)
'ज्ञान जिथे मानादिक नाही । ब्रह्म समान सकल जगि पाही।'
यांत ज्ञान म्हटले आहे. 'ज्ञानिनामग्रगण्यम्' (५मं-३) हनुमान आहेत. वाल्मीकीच्या मुखांतून वेदच रामायण रूपाने प्रगट झाले, तेव्हा त्यांच्या विशुद्धविज्ञानीपणाबद्दल काय सांगावे!
'वेदः प्राचेतसादासीत्साक्षाद्रामायणात्मना'
सूचना – हा चौथा श्लोक चौथ्या काण्डाचा (कि. कां.) प्रतिनिधी आहे हे तेथील

मंगलाचरण श्लोकांच्या टीकेत सप्रमाण सिद्ध केले आहे. विशुद्धविज्ञानी व गुणग्राम विहारिणी यांचा संबंध जोडला की उपपत्ति दिसते.

**संगति** – वरील चार श्लोकांनी दाखविल्याप्रमाणे अज्ञानी, विषयी जीव विश्वास श्रद्धावंत होऊन सद्गुरूंस शरण गेला, धर्माचरणाने वैराग्यसंपन्न झाला, तरी ज्ञानविज्ञान संपन्न होऊन सीतारामगुणग्रामारण्यांत विहार करू लागण्यास आदिशक्ति - विद्यामाया जी सीता तिची कृपा व्हावी लागते, म्हणून पुढील श्लोकांत सीतेला वंदन केले आहे.

अनु. **उद्भवस्थिति - संहार - कारिणीं क्लेशहारिणीम् ।**
**सर्वश्रेयस्करीं सीतां नतोऽहं रामवल्लभाम् ॥५॥**

**अर्थ** – उद्भव - जगाची उत्पत्ति स्थिती - त्यांचे पालन व संहार, त्याचा प्रलय करणारी, क्लेशांचा विनाश करणारी आणि सर्व प्रकारचे श्रेय मंगल कल्याण करणारी व रामास फार प्रिय असणारी -रामवल्लभा -जी सीता तिला मी (अहं) नमतो. (नतोऽस्मि).

**टीका** – (१) हा श्लोक श्रीरामतापिनी उपनिषदातील वचनाशीं अगदी मिळता आहे.
'श्रीरामसान्निध्यवशात् जगदानन्ददायिनी।
उद्भवस्थितिसंहारकारिणी सर्वदेहिनाम् ॥
सा सीता भवति ज्ञेया मूलप्रकृतिसंज्ञिता।
प्रणवत्वात् प्रकृतिरिति वदन्ति ब्रह्मवादिनः' (अ१/३-४)

जगदानंददायिनी = सर्वश्रेयस्करी, श्रीरामसान्निध्यवशात् = रामवल्लभा, उद्भवास्थिति संहार कारिणी हे पद श्रुतीतलेच आहे. सीता दोहोंत आहेच. सीता = मूलप्रकृति हे ठरले.

'वामभागिं शोभे अनुकूला, । आदिशक्ति छविनिधि जगमूला ॥
जिचे अंश उपजति गुणखाणी। अगणित उमा रमा ब्रह्माणी॥
भृकुटिविलासि जिचे जग होतीं । राम वामदिशी सीता हो ! ती ॥' (१/१४८/४)

हे वर्णन रामावतारापूर्वी मनुशतरूपांना दर्शन दिले त्यावेळचे आहे.

आदिशक्ती म्हणजेच मूलमाया मूलप्रकृती. 'आदिशक्तिजी निर्मि जगा या । ती ही मम अवतरेल माया ॥' (१-१५२/४)

हे भगवत्वचन आहे. यावरून हे ठरले की सीता नित्य, शाश्वत आहे व अवतार घेण्यापूर्वी सुद्धा तिचे नांव सीताच असते.

(ख) तुलसीदास व औरसंतांनी मायेत दोन प्रकार मानीत असल्याने ही कोणती माया हे ठरले पाहिजे.

'ऐक तिचे सांगू भेदानां । विद्या अपर अविद्या जाणा ॥४॥
एक दुष्ट जी सुदुःख रूपी । जी वश जीव पडे भवकूपी ॥५॥

एक रथी जग गुणवश जीतें । प्रभू प्रेरिता स्वबल न तीतें ॥' (३/१५/६)
वाल्मीकी म्हणतात, 'श्रुति सेतु पालक राम तुम्हिं जगदीश, माया जानकी'
जग निर्मि जी पाळी हरी करुणानिधी - कल बघुन की ॥' (२) २६/६)

यावरून ठरले की सीता आदि शक्ति, आदिमाया, मूळमाया = विद्यामाया ही प्रभूच्या प्रेरणेने विश्वाची उत्पत्ती वगैरे करते; तिला एकटीला स्वतंत्र कर्तृत्व नाही; पण प्रभूला सुद्धा तिच्या साह्याशिवाय काही करता येत नाही. हे प्रथम श्लोकाच्या टीकेत दाखविले आहे.

(ख) कोणी टीकाकार सीता म्हणजे विद्या व अविद्या मायाहून निराळी ल्हादिनी शक्ति मानतात. यास मानसात मुळीच आधार नाही व उलट दोनच मायांचा उल्लेख श्रीरामचंद्रानी केलेला दाखविलाच आहे.

(ग) उपनिषदात 'रामसान्निध्यवशात्' म्हणजे रामाच्या सान्निध्याच्या बळावरच सर्व करते असे म्हटले आहे; म्हणजेच स्वतंत्रपणे काही करू शकत नाही. 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' हे आदिमायेलासुद्धा लागू आहे! येथे 'रामवल्लभा'ने उपनिषदाचे सार सांगितले आहे.

(२) **रामवल्लभा** — रामाला फार प्रिय असलेली; किंवा राम जिला फार प्रिय आहेत ती. 'रामप्राणप्रिय' या शब्दांने मानसात हे दोन्ही अर्थच सर्वत्र आहेत. रामवल्लभा = जानकी = प्रेमभक्ति.

'प्रिय रघुवीराभक्तिच भारी' 'सानुकूल भक्तिस रघुराया' (७/११६/४- ५)

(३) **सर्वश्रेयस्करी** — सर्वांचे श्रेय करणारी हा अर्थ 'सर्वदेहिनां' या श्रुतिवचनाने निघतोच. पण सर्व प्रकारचे म्हणजे ऐहिक, पारलौकिक व पारमार्थिक श्रेय असा ही अर्थ तुलसीदासांनी सुचविला आहे.

(क) **श्रेय** — मंगल, कल्याण किंवा मोक्ष असा त्रिविध आहे. 'निःश्रेयसं तु कल्याणमोक्षयोः' (अ. व्या. सु.) ज्याला येथे निःश्रेयस् म्हटले त्यालाच श्रुतीने 'श्रेयस' म्हटले आहे.

'श्रेयश्च प्रेयश्च मनुष्यमेतः' (क. उ. २/२).

'श्वः श्रेयसं शिवं भद्रं कल्याणं मंगलं शुभम्' (अमर)

सीता ऐहिक कल्याणमंगल ऐश्वर्यादि देते.

'इच्छिति कृपा कटाक्ष सुर परि न बघे ढुंकून' (७/२४)

'लोकप होति विलोकनिं तव नर' (२/१०३/६)

पारलौकिक ऐश्वर्य देणारी हे पण ठरले

(ख) 'रामपदाब्जी ती रती करी स्वभाव तजून।'

याने दुसरा अर्थ सिद्ध झाला.

'जनकसुता जगजननि जानकी । कृपानिधाना प्रिय अतिशय कीं ॥' (१/१८/७)

याने पहिला अर्थ सिद्ध झाला. प्रिय अतिशय' आहे म्हणूनच वर फार प्रिय असा अर्थ केला आहे.

(ग) सर्व ब्रह्म असाही अर्थ आहे (गी. भाष्य) म्हणून सर्वश्रेयस्करी = ब्रह्मप्राप्तिरूपी श्रेय करणारी हा भाव निघतो.

'ब्रह्म रामचिन्मय अविनाशी' (१/१२०/६) 'जय सगुण निर्गुण रूप' (७/१३/१)
'जय राम अनुपम रूप निर्गुण सगुण' (३/३२/छं१)
निर्गुण व सगुण अशी ब्रह्माची दोन रूपे आहेत; म्हणून सर्वश्रेयस्करी म्हणजे निर्गुण अथवा सगुण ब्रह्माचे दर्शन साक्षात्कार करवून देणारी व परम कल्याण करणारी सीता जानकी आहे हा निष्कर्ष.

(४) क्लेशहारिणी – हे पद घालून तुलसीदासांनी मुळांतील 'आनन्ददायिनी'चा अर्थ अधिक स्पष्ट केला.

'अविद्याऽस्मिता रागद्वेषाभिनिवेशाः पञ्चक्लेशाः (पा. यो.)
अविद्या = अज्ञान, मोह, भ्रम, संशय; अस्मिता = अहंकार; राग - विषयप्रीति, आसक्ति; द्वेष – शत्रुत्व, द्रोह, वैर, विरोध इत्यादि; आणि अभिनिवेश - मरणभीति, हे पांच क्लेश होत. हे क्लेश नष्ट झाल्याशिवाय दुःखरहित आनन्द, सुख-शान्ति, निर्वाण - मोक्ष, भक्ति, यांची प्राप्ती होऊच शकत नाही.
विद्याऽविद्यां निहन्त्येव तेजस्तिमिरसंघवत्' (आ. बो.)
श्रीरामासही पंचक्लेशहारक व संसृति तारक म्हटले आहे.
'दारुण अविद्या पंच जनित विकार श्री रघुवर हरी' (७/१३०/छं)
यावरून ठरले की दोन्ही मिळूनच क्लेशहरण व सर्वश्रेय करतात. दो १८ मध्ये दोघांचा हा संबंध दाखविला आहे.
'गिरा-अर्थ जल - वीचिसम म्हणती भिन्न न भिन्न'

(ख) सीता ब्रह्मविद्येचा अवतार असल्याचा पुरावा स्कंद पुराणात ही सापडला. हा भिन्नाभिन्नपणा सीतेला नमन करून 'रामवल्लभा' शब्दाने कवींनी मोठ्या खुबीने सुचविला आहे.

(ग) सीतेच्या कृपेने रामकृपा होते याचे सुंदर उदाहरण सुंदर कांडातच आहे. हा श्लोक सुंदर कांडाचा प्रतिनिधी आहे. सुंदर काण्डाच्या आरंभीच मं. श्लो. १ मध्ये 'निर्वाण-शान्तिप्रदं' व 'चूडामणि' यांनी या पाचव्या श्लोकाचा व सीतेचा संबंध सुचविला आहे. (टी. प.) हनुमानाला प्रथम सीतेनेच आशीर्वाद दिला व सुंदर कांडातच.

**'रामप्रिय जाणुनि आशिस दे । होशि तात बलशीलनिधि बदे' ॥२॥**
**'अजर अमर गुणनिधि सुत होशील ।**
**बहुत कृपा रघुनायक करतिल ॥' (३/१७/२-३)**

या प्रमाणे आशीर्वाद मिळाल्यावर हनुमान म्हणाले
'मी माते कृतकृत्यचि आतां। आशिस तव अमोघ विख्याता॥' (३/१७/६)
सीतेने - विद्यामायेने अशी कृपा करून 'सुत' (पुत्र) म्हटल्यानंतरच पुढे ३२/३३ मध्ये श्रीरघुपतीने रामदूतावर कृपा केली आहे. हे उदाहरण पांचव्या सुंदर कांडांतच आहे; हे पाहिले म्हणजे रामाच्या आधी सीतेला नमन का केले याबद्दल तर्ककुतर्क करण्याची जरूर नाही.

(घ) याच कारणास्तव सीताराम, राधाकृष्ण, उमामहेश, पार्वतीपरमेश्वर, लक्ष्मीनारायण इत्यादि पदांत शक्तीच्या नावाचा उल्लेख प्रथम करून मग शक्तिमंतांचा उल्लेख केला जातो; म्हणूनच आईबाप, मातापिता असे म्हणतात. बापआई म्हणत नाहीत. भारतीयांच्या नित्याच्या भाषेतसुद्धा तात्विक सिद्धांत कसे ग्रथित केले आहेत हे याने दिसते आणि आश्चर्य वाटते. मायेच्या साह्याशिवाय ब्रह्म निष्क्रिय आहे; ब्रह्माच्या आधिष्ठानाशिवाय मायेला काही करता येत नाही. दांपत्यात असाच संबंध असला पाहिजे असे भारतीय संस्कृति सांगते. प्रभा-प्रभाकर, चंद्रिका-चंद्र यांचा जो संबंध तोच सीतारामाचा असाच स्त्री-पुरुषाचा असला पाहिजे. या हेतूनेच सुंदरकाण्डात सीतेला स्वतंत्रपणे नमन नाही व रामालाच वंदन केले असून येथील साहव्या श्लोकांतील बऱ्याच शब्दांची पुनरावृत्ति केली आहे. सुं. कां. मं.१ मधील बरीच विशेषणे वगैरे लंका मं. श्लोक १ मध्ये घालून हे सुचविले आहे की हा पांचवा श्लोक व पुढील श्लोक मिळून सुंदर व लंका कांडाचे प्रतिनिधी आहेत. विस्तारपूर्वक तुलना सुंदरकांड टीकारंभी केली आहे.

उद्भव-स्थिती - संहारकारिणी — (क) अज्ञान मोहादि क्लेशांचा – रावण कुंभकर्ण इंद्रजित आदि राक्षसांचा संहार करून वैराग्य ज्ञानादि दैवीसंपत्तीचा शरणागताच्या हृदयात उद्भव करून त्यांचे रक्षण व वृद्धि करणारी हा पारमार्थिक गूढार्थ आहे. रावणादि राक्षसांचा विनाश करून जगांत सुखशान्तीचा उद्भव व पालन करणारी हा आधिभौतिक अर्थही आहेच.

(ख) दोन्ही भिन्न-अभिन्न असल्याने रामालाही उद्भव स्थितिसंहार करणारे म्हटले आहे. 'भृकुटिविलासि' सृष्टिलय होती.' जिथे जिथे लंकाकांडात रघुवीराने संहाराचे कार्य केले आहे तेथे मायेची मदत घेतली आहे, व ती तुलसीदासांनी प्रभूचे हसणे; विहसणे, स्मित करणे या शब्दांनी सुचिविली आहे; 'माया हास बाहु दिक्पाल' (६/१५/५)

(ग) अध्यात्म रामायणांत सीता स्पष्टच सांगते हनुमंतास की जगाची उत्पत्तिस्थितील्यादि कार्ये व विश्वामित्रयज्ञ रक्षणापासून रावणवध रामराज्याभिषेकादि कार्ये मीच केली असून अज्ञलोक त्यांचे कर्तृत्व रामावर लादतात. (अ. रा. बा. कां. १/३२-४२)
'मां विद्धि मूलप्रकृतिं सर्गस्थित्यन्तकारिणीम् ।
तत्सांनिध्यान्मया' सृष्टं तस्मिनारोप्यतेऽबुधैः॥' ३४/३५॥

'एवमादीनि कर्माणि मयैवाचरितान्यपि ।
आरोपयन्ती रामेऽस्मिन्निर्विकारे अखिलात्मनि' ॥४२॥

(६) सीता नांगराने पडलेल्या 'सीतां'त सापडली म्हणून सीता नाव पडले असे जनक (वा. रा.) म्हणाले आहेत.

'अथ मे कृषतः क्षेत्रं लांगलादुत्थिता ततः ॥१३॥
क्षेत्रं शोधयतो लब्धा नाम्नासीतेति विश्रुता' (वा. रा. १/६६/१३- १४)

(क) सीता = शीता 'शीता नभः सरिति लांगलपद्धती च ।
शीता [illegible] : सहधर्मिणीच ॥ इति धरणी)

सीता – शीता शीतलता देणारी; म्हणूनच ती जवळ नव्हती तेव्हा रघुनाथास चंद्र सूर्यासारखा तापदायक झाला.

(ख) सीता – 'षिञ् बन्धते', निर्विकार निर्गुण निराकार ब्रह्माला तिच्यामुळे सगुणत्व येते व अवतार कार्ये करावी लागतात.

(ग) स्यति भुवम् षोडनाकर्मणि, अंत कर्मकरणारी - संहार करणारी.

(अ) सीता शब्द खालील सहा वर्ण मिळून झाला आहे. स्. इ. ई. त्. अ. आ. यांचा क्रमशः अर्थ - स् = सर्वकारण/ सार्ववर्णिक, इ- पुष्टिद, अक्षोभकर, ई- वाक्प्रसादकर, निर्मल; = सी. त् - धनधान्यादिसंपदाद+अ-मृत्युंजय, सर्वव्यापक + आ -आकर्षणात्मक, सर्वगत = ता = सीता. एकुण 'सीता' या अर्थ सर्वकारण, सर्ववर्णात्मक, पुष्टिदायक, क्षोभ नष्ट करणारी, वाक्प्रसाद देणारी, निर्मलत्व देणारी, धनधान्यादि संपत्ति ऐश्वर्य देणारी, मृत्युपासुन सोडविणारी, सर्वव्यापक, सर्वत्र असलेली व शरणागताला आश्रय देणारी- जवळ ओढून घेणारी अशी जी ती सीता.

(आ) श्रेयस्करी – यांत श्र्+ई = श्री हे सीताबीज, लक्ष्मीबीज आहे. नतोऽस्मि ने 'नमः सुचविले व 'सीता' शब्दाने नमःच्या संबंधाने 'सीतायै' हे चतुर्थीचे रूप सुचविले. अशा रीतीने 'श्री सीतायै' नमः हा षडक्षर सीतामंत्र सुचविला आहे. श्री हे महालक्ष्मी बीज पण आहे. राम र. उ. 'श्रीं सीतायै स्वाहा' हा सीतामंत्र दिला आहे. मंत्राचे प्रथमाक्षर स्वबीज किंवा वाक्, माया, रंभा, तारा व मन्मथ बीजांपैकी कार्यानुसार बदलतां येते व नमः, स्वाहा, स्वधा, वषट्, वौषट्, हुंफट् या सहांपैकी विनियोगानुसार शेवटी घालता येतात. षडक्षरत्वादि शिल्लक ठेवून हेतू प्रमाणे विनियोग मंत्रशास्त्रविशारद गुरु करू करवू शकतात.

सूचना १ – 'सीता' शब्दांतील सहा वर्णांचे अर्थ 'अक्षमालोपनिषदांतून घेतले आहेत.' षडक्षरादिमंत्रांच्या आद्यन्तांत बदल करण्याविषयींचे विवेचन अगस्त्यसंहिता व श्री रामरहस्योपनिषद यांच्या आधारे लिहिले आहे.

सूचना २ – मानसपीयूषात दिलेले परस्पर खंडित अर्थ अकारादि क्षकारांत वर्णाचा अर्थ न सापडल्यामुळे टीकाकारांनी दिले आहेत. वरील अर्थ लिहिण्याची स्फूर्ति ९/ ११/५३ रोजी टीका लिहितानाच झाली. १९५० साली मंगलाचरण श्लोकांचा अर्थ

लिहिला गेला तेव्हा 'सीता' शब्दाचा वरील अर्थ लिहिला गेला नव्हता. 'प्रेरक हृदि रघुवंशविभूषण' हेच खरे.

या श्लोकाचे विवरण अपेक्षेबाहेर लांबले व शास्त्रीय चर्चा आल्यामुळे काही वाचकांस कंटाळवाणे वाटण्याचा संभव आहे.

संगति – पुढील श्लोकांत श्री रामचंद्रास वंदन आहे; व त्यातहि मायेचा संबंध आणलेला आहेच. तो ६ वा श्लोक लंकाकाण्डाचा प्रतिनिधी आहे; पण पाचवा व साहवा मिळून पाचव्या व साहव्या काण्डांचे संयुक्त प्रतिनिधी आहेत हे गूढ पूर्वीच सांगितले आहे.

शा.वि. यन्माया - वशवर्ति विश्वमखिलं ब्रह्मादि - देवाऽसुरा ।
यत्सत्वादमृषेव भाति सकलं रज्जौ यथाऽहेर्भ्रमः ॥
यत्पादप्लवः एकः एव हि भवाम्भोधेस्तितीर्षावताम् ।
वन्देऽहं तमशेष - कारण परं रामख्यमीशं हरिम् ॥६॥

अन्वनय – अखिलं विश्व यत्+माया+वश+ वर्ति (अस्ति, तथा) ब्रह्मा+ आदि+देवा+असुराः (यन्मायावशवर्तिनः सन्ति) यत् सत्वात् सकलं अमृषा इव भाति, यथा रज्जौ अहेः भ्रमः (तथाच) भव+अम्भः+उदधेः तितीर्षावतां यत्+पाद+प्लवः एकः एव हि (अस्ति) तं अशेष+कारण+परं राम+आरव्यम्, ईशम्, हरिम् अहं वन्दे.

अर्थ – सगळे विश्व आणि ब्रह्मदेवादिक सर्व देव व असुरसुद्धा ज्यांच्या मायेला वश होऊन वर्ततात - वागतात. ज्यांच्या सत्तेवर- अधिष्ठानावर, दोरीवर सर्प भासावा तसे हे सगळे खरे असल्यासारखे वाटते-भासते आणि संसार रूपीसागर तरून जाण्याची इच्छा असणारांस ज्यांचे पायरूपी एकच एक तराफा - जहाज- आहे त्या सर्वकारणातीत असलेल्या ईशाला, राम नावाच्या हरीला मी वन्दन करतो ॥६॥

सूचना – पाठभेद – कल्याण मासिकाच्या मानसांकांत व रामायणात 'अमृषैव' व 'पादप्लवमेकमेव' असे पाठ आहेत; हे पाठ बरोबर नाहीत असे खात्रीने वाटत होते, पण प्रथमावृत्तीच्या वेळी सबळ पुरावा मिळाला नव्हता म्हणून पाठबदल केला नाही. पण मानसपीयूषमध्ये हे पाठ मिळाल्यामुळे दुसऱ्या आवृत्तीत 'अमृषेव' आणि पादप्लवः एकः एव' हे पाठ घेतले आहेत.

टीका – १ चरण पहिला – यात हे सुचविले की हे सर्व विश्व म्हणजे स्थावर जंगम चेतन-अचेतन सर्वजीव, मग ते ब्रह्मदेवासारखे सृष्टीकर्ते असोत किंवा हिरण्यकशिपु, रावण, यांच्यासारखे विश्वविजयी विश्वदुःखदायक असुर, राक्षस असोत, सर्व भगवंताच्या मायेच्या तंत्राने नाचणारे आहेत; ती नाचवील तसे नाचत असतात, वागतात.

(क) येथे माया शब्दाने विद्या व अविद्या या दोघींचे ग्रहण केले पाहिजे. ब्रह्मदेव - सतीसारखे ज्ञानी व नारद, गरुड, भुशुंडीसारखे ज्ञानीभक्त जेव्हा मोहित होतात तेव्हा त्यास विद्यामाया, हरिमाया नाचविते व त्यांचे कल्याण करते. रावणादि असुरांचे अत्याचार व इतर सर्व जीवांची कर्मे अविद्यामायेला वश होऊन घडत असतात व संसारदुःख क्लेश भोगतात. सीताहरणादि कार्य विद्यामायेने प्रभूच्या प्रेरणेने करविले आहे. या विषयांचे विस्तृत विवेचन 'श्रीरामचरितमानसाचा पाया' या स्वतंत्र लेखांत साधार केले आहे. तो लेख मानसमणि मासिकांत (हिंदीत) छापला आहे. टीकेत ठिकठिकाणीं स्पष्ट केले आहे.

(ख) या चरणांत 'मायाविवशजीव अभिमानी' व 'जीव अनेक एक माकान्त' हा सिद्धान्त स्पष्टपणे सुचविला आहे.

(ग) 'अखिल' शब्दाने जीवमात्र अपवादरहित हे सुचविले.

२ चरण दुसरा – यात, दिसणारे जग कशाप्रकारचे आहे व ते कां दिसते हा तात्विक दार्शनिक सिद्धान्त स्पष्ट केला आहे.

(क) सांप्रदायभेदाने याचे विविध अर्थ केले गेले आहेत व गोस्वामींचे मानसातील ध्येय सार्वमतसंग्राहक असल्याने ते विविध अर्थ खोटे म्हणता येत नाहीत. नरजीवांमधे निरनिराळ्या दार्शनिक भूमिकांवरील जीव असतात व त्यांनी क्रमशः उन्नत होत जाण्यास, माध्वांच्या द्वैतापासून गौडपादांच्या अजातवादापर्यंतच्या विविध पायऱ्या पाहिजेतच, व्यास शिष्य जैमिनींनी पूर्व मीमांसेंत कर्मकाण्डाला प्राधान्य देऊन स्वर्गप्राप्ती म्हणजेच मोक्ष असा व्यासमताविरुद्ध सिद्धांत मांडण्यात तरि हाच हेतु आहे. जैमिनी गुरुविरोधी होते असे कोण म्हणेल.

(ख) 'यत्सत्वात्' – ज्याच्या सत्तेने ज्याच्या अस्तित्वामुळे. येथे रामाची सत्ता, अस्तित्व त्रिकालाबाधित आहे हे सुचविले. सत्ता तीन प्रकारची आहे. श्री टेंब्ये स्वामींनी आपल्या 'मनन' ग्रंथांत चारप्रकारची वर्णिली आहे.

(१) पारमार्थिक सत्ता – त्रिकाळी अस्तित्व. त्रिविध परिच्छेद रहित, त्रिविध भेदरहित असे केवळ ब्रह्मच (रामच) आहे. 'ब्रह्म राम चिन्मय अविनाशी' आकाशाच्या ठिकाणचे जडत्व, शून्यत्व व शब्दगुण नसेल तर त्याची पारमार्थिक सत्ता ठरेल.

(२) प्रातिभासिक सत्ता – जसे स्वप्नांतील विषय व व्यवहार, दोरीवरील सर्प, मृगजल वगैरे रज्जुसर्पदृष्टान्ताने येथे जगाची प्रातिभासिक सत्ताच सुचविली आहे व अजात वादही सुचविला आहे, कारण कीं कोणत्याही अवस्थेत दोरी सर्प झालेली नसतेच. ज्या वेळी सर्प दिसतो त्यावेळी दोरीच असते सर्प नसतोच. प्रकाश आणून दोरी दिसू लागताच, सर्प दिसत नाहीसा होतो तेव्हा दोरीच असते व सर्प दिसू लागण्यापूर्वी दोरीच असते. येथे विवर्तवाद सुचविला. हाच सिद्धान्त ठसविण्यासाठी पुढे बहुतेक सर्व काण्डांत प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीत्या जगाचे मिथ्यत्व, चिज्जडग्रंथीचे मृषात्व, कुठे स्वप्न, कुठे मृगजळ, कुठे रज्जु सर्प तर कुठे शुक्तिका रजत

दृष्टान्ताने सांगितले आहे.

(ग) **जगत्सत्यत्व भ्रम** – रामरज्जूवर भासणाऱ्या जगरूपी सर्पाची सत्यता - रामदोरीचे दर्शन झाल्याशिवाय जाणार नाही हे या दृष्टान्ताने सुचविले. अति दुष्ट दु:खद अशी जी अविद्या माया म्हणजेच हा भ्रम. दोरीचे ज्ञान झाले नाही की मंद प्रकाशांत सर्पभ्रम होतो. प्रस्तावनेत 'जग' प्रकरण पाहावे.

(घ) भ्रम निरासानंतर सुद्धा जगाला व्यावहारिक सत्ता असतेच. मिथ्या वस्तूने सुद्धा व्यवहार घडू शकतात.

(ङ) **चौथीसत्ता** हिला दृष्टांत आकाशकुसुम, वंध्यापुत्र हे आहेत. हे दृष्टान्त वरील कोणत्याही सत्तेत बसत नाहीत. म्हणून ही सत्ता निर्विकल्प असंप्रज्ञात समाधिस्थ योग्याच्या बाबतील जगाची आहे असे म्हणता येईल.

(च) **अमृषा इव** – मृषा, असत्य, अमृषा - खरे; **अमृषा इव** म्हणजे खऱ्यासारखे म्हणजे खरे नव्हे पण असत्यही म्हणता येत नाही; कारण की व्यवहार घडतात. दोरीच्या सापाने सुद्धा भीति, कंप, घाम सुटतोच, म्हणून अमृषाइव म्हटले. यालाच केवलाद्वैती मिथ्या म्हणतात. जे सत्यनाही, असत्य नाही किंवा सत्यासत्य नाही ते मिथ्या. तुलसीदासांनी अगदी हेच शब्द जगाच्या सत्तेस लावले आहेत. प्रस्तावनेत पाहा. ज्ञानाशिवाय अज्ञानाचा नाश नाही म्हणून तिसऱ्या चरणात मुख्य उपाय सांगतात.

(३) **'यत्पादप्लवः'** – ज्यांचे पायरूपी तराफा - 'प्लव' चा अर्थ होडी असा करतात 'उडुपंतु प्लवःकोलः' (अमरे) तृणादिनिर्मित तरणसाधनस्य (अ. व्या. सु.) हे तराफ्याचेच वर्णन आहे. होडी- जहाज-तारू असा अर्थ घेतल्यास ही रामपादरूपी होडी वगैरे अति विलक्षण आहेत असा भाव घेता येईल. होडी -तराफा या अर्थी प्लव शब्द पुल्लिंग आहे. अन्य लिंगी प्लवचा अर्थ होडी, तराफा, असा कोषामध्ये नाही.

(क) **'एकः एव'** – याने अन्य साधनांचा निरास केला. इतर कोणत्या ही साधनाने भव-संसार -सागर तरून जाता येणार नाही हे सुचविले. 'हि' ने निश्चय दाखविला. भक्तीचा आश्रय न करता केवळ ज्ञानासाठी श्रम करणारांना काय म्हटले आहे पाहा. 'अशी भक्तिजाणुनि परिहरती । ज्ञाना केवळ जे श्रम करिती॥

ते जड गृहि सुरधेनू त्यजती । दुधासाठी अर्कास धुंडती॥

श्रुणु खगेश हरिभक्ती त्यागिती । अन्य साधनी सुख जे इच्छिति ॥

ते शठ महासिंधु विण तरणी। तरुनि पार कांक्षिति जड करणी ॥' (७/११५/१-४)

'भक्तिविण पशु कशासि जन्मला' (एकनाथ)

'श्रेयःस्मृति भक्ति मुदस्य ते विभो क्लिश्यंन्ति ये केवलबोधलब्धये ।

तेषामसौ क्लेशल एव शिष्यते नान्यथथा स्थूल तुषावघातिनाम् ॥ (भाग १/१४/४)
'मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते' (भ.गी.)

(ख) 'पाद' – शब्दाने सगुणसाकारत्व सुचविले कोणाची भक्ति हे पुढील चरणात सुचविलात.

(४) पाद शब्दांने पादसेवन भक्ति सुचवून या चरणांत 'वन्दे' याने वन्दन भक्ति सुचविली.

(क) 'अशेषकारणपरं' – सर्वकारणांहून पलीकडे असलेले जे ब्रह्मादिस्थावरांत सृष्टीचे मूळकारण असून ज्यांना काही कारण नाही, म्हणजेच जे कोणाचे कार्य नाहीत असे स्वयं सिद्ध.

(ख) कार्याला उत्पत्तिविनाश असतो व त्याचा नाश त्याच्या कारणांतच होतो. ते उत्पत्तिविनाशादि सर्वविकार रहित असतात हे सुचविले.

'विषय इन्द्रिये सुर जीवांसी । एके चेतनता दुसऱ्यासी ॥
सर्वां परमप्रकाशकजें । राम अनादि अयोध्यापति ते ॥
जगा प्रकाश्या प्रकाशि रामहि । मायापति, ज्ञानगुण - धामहि ॥
यत्सत्यत्वे जड जी माया । गमे सत्यशी मोहसहायां ॥
रजतशुक्तिमधिं भासते यथा भानुकरि वारि ।
मृषा त्रिकालिंहि तरी कुणी शक्त न जो भ्रमवारि ॥ (१/११७)
ज्याची कृपा असा भ्रम हरते । गिरिजे कृपालु रघुनायक ते'
(१/११८/३)
'स्वप्नीं जर शिर कोणि कापले । जागृति विण कधिं दुःख हरपलें।
(१/४८२)

वरील अवतरणे या श्लोकाचे निरूपणच आहे असे म्हटले तरि चालेल फक्त 'अयोध्यापति' शब्द या श्लोकात नाही तो अतिव्याप्ति दोष टाळण्यासाठी पुढील श्लोकात 'रघुनाथ' घातला आहे.

(ग) 'रामाख्यम्' – राम ज्याची आख्या नाव आहे तो. परशुराम बलराम पण रामाख्यच असले तरी मागील श्लोकांतील 'सीता रामवल्लभा' या पदानी त्यांचे ग्रहण करता येत नाही. महावैकुण्ठस्थित सगुणसाकार राम असे म्हणण्यास जागा आहे ती पुढील श्लोकातील रघुनाथ शब्दाने काढून टाकली आहे.

(घ) ईश – सर्वांचे शासक, प्रेरक, नियामक, रामाख्य ईश म्हटल्याने ईश शब्दाचा सामान्यार्थ जो शिव-शम्भु तो घेता येत नाही. या 'ईश'चा अर्थ सहाव्या (लंका) काण्डाचा प्रतिनिधी आहे.

(ङ) 'हरिम्' – कोणाचा अवतार हे या शब्दाने सुचविले हरि - वैकुण्ठाधिपति विष्णु, हरि - शेषशायीनारायण, आणि हरि-ब्रह्म असे तीन अर्थ होऊ शकतात.

येथे कोणता घ्यावयाचा? ज्या कल्पाची कथा सुचविली असेल त्याप्रमाणे अर्थ घेता याया या हेतूने हरि शब्दांने समन्वय करून वादविवादाला जागा ठेविली नाही. मानसांत हरि शब्द या समन्वय दृष्टीनेच वापरला आहे. कारण मानसात या तिघांच्या रामावतारकथांचे मधुर मिश्रण आहे हे पुढे यथासमय स्पष्ट दिसेल.

ल. ठे. – या श्लोकांत हे दाखविले की श्रवणादि नवविधाभक्तीवाचून ज्ञानप्राप्ती होणार नाही. 'भक्ति ज्ञानाची माउली' असे मराठी संत म्हणतातच, पण ही साधन भक्ति होय. 'सगुणी भजतां पाविजे निर्गुणा' (समर्थ) ज्ञानलक्षणात 'भक्तिरव्यभिचारिणी'(भ. गी.) आहेच.

(क) सद्गुरु ज्ञानदाते असले तरि सीता - ब्रह्मविद्या व राम परमात्मा, सगुण साकार रघुनाथ, यांची कृपा झाल्यशिवाय ज्ञान होऊ शकत नाही; म्हणून सीतारामभक्ति या व मागील श्लोकात मिळून साधनरूपाने सुचविली.

(ख) ज्ञान प्राप्त झाल्यावर प्रेमभक्तीने स्वान्तःसुखप्राप्ती हा विषय पुढील श्लोकांत सांगतात.

'रघुपति भक्ति विना सुख नाही' 'भजनहीन सुख कवणे काजा'

अशीं विपुल वचने मानसात आहेत.

(ग) या श्लोकात 'जन्माद्यस्ययतो' या भागवत मंगलाचरण श्लोकांतील चारी चरणांचे भाव असून शिवाय सगुणभक्ति सूचक 'पादप्लव' शब्द विशेष आहे. मानस पी. मध्ये तुलना आहे म्हणून येथे नको. या श्लोकाचा अर्थ व गूढभाव समजण्यास त्या तुलनेची जरूर नाही.'

स्वान्तःसुखदायक प्रेमभक्ति मिळण्याचे सोपे साधन म्हणजेच श्रीरामचरित्र, याचाच उल्लेख पुढील श्लोकात करून प्रयोजनाचे फल सुचविले आहे.

(उत्तर काण्डाचा प्रतिनिधी आहे)

व. ति. नाना पुराण निगमागम संमतं यद् ।
रामायणे निगदितं क्वचिदन्यतोऽपि ॥
स्वान्तःसुखाय तुलसी रघुनाथ गाथा -।
भाषानिबन्धमतिमञ्जुलमातनोति ॥७॥

अन्वय – यत् नाना पुराण - निगम - आगम संमतं रामायणे निगदितं (अस्तितद् गृहीत्वा तथा) क्वचित् अन्यतः अपि (गृहीत्वा) तुलसी (तुलसीदास) स्वान्तःसुखाय रघुनाथ गाथा -भाषा निबंधम् अति मंजुलम् आतनोति ॥७॥

सूचना – या श्लोकाचे विविध अर्थ व त्या प्रमाणे अन्वयहि शास्त्रीपंडितांनी केले आहेत. ते मा. पी. त पहावे. तो बृहत्कोष आहे.

अर्थ – नाना पुराणे निगम (वेद) व आगम (तंत्र व षड्दर्शनादि) यांना मान्य असलेले जे रामायणात वर्णन केले आहे ते घेऊन व क्वचित दुसऱ्या ठिकाणचे

घेऊन तुलसीदास स्वतःच्या अंतःकरणाच्या सुखासाठी अति सुंदर रघुनाथ कथा निबंधाची अतिसुंदर रचना करीत आहे. ॥७॥

**टीका – १ नाना पुराण –** मुख्य पुराणे १८ आहेत व उपपुराणेहि १८ आहेत. १८ मुख्य पुराणे मिळून एक ग्रंथ आहे. त्यांत सात्विक राजस तामस प्रत्येकी ६/६ आहेत. पुराणांतील वर्णनांत एक कल्प हा एक कालखंड घेऊन त्या कालखंडात घडलेल्या महत्वाच्या गोष्टी जशा घडल्या तशा दिल्या आहेत. अनेक कल्पांचा इतिहास असल्याने एकच गोष्ट थोड्याफार फरकाने अनेक वेळा वर्णलेली सापडेल. पुराणांतील कथा जरी इतिहास असला तरी परोक्ष रीतीने अनेक अध्यात्मसिद्धान्त त्यांत ग्रथित आहेत. धर्मार्थकाममोक्षाना इतिहासाच्या कोंदणांत बसविले आहेत. अठरा पुराणांची नावे एका श्लोकांत ग्रथित केलेली आहेत.

> **मद्वयं भद्वयं शैवं वत्रयं ब्रत्रयं तथा ।**
> **अनापलिंगकूस्कानि पुराणानि पृथक् पृथक् ।**

मकाराची दोन मत्स्य व मार्कंडेय; भकाराची दोन भागवत व भविष्य, वकाराची तीन विष्णु, वराह व वामन; ब्रकाराची तीन ब्रह्म, ब्रह्मांड व ब्रह्मवैवर्त; अ = अग्नि; ना = नारद; प- पद्म; लिंग- लिंगपुराण; ग- गरुडपुराण; कू- कूर्मपुराण; स्क- स्कंदपुराण, शैव- शिवपुराण

(क) या पुराणांतील श्लोकसंख्या अनुक्रमे मत्स्य - १४ हजार, मार्कंडेय- ९, भागवत १८, भविष्य १४ ह ४ शे. विष्णु २३, वराह २४, वामन १०, ब्रह्म १०, ब्रह्मांड १२, ब्रह्मवैवर्त १८, अग्नि १५ ह. ४ शे. नारद २५, पद्म ५५, लिंग ११, गरूड १५, कूर्म ७०, स्कंद ८१ ह. १ शे. व शैव २४ हजार आहे मा. पी. त ही संख्या दिलेली नाही.

(ख) **निगम –** वेद व तदंगभूत शास्त्रांची माहिती, मा. पि. पृ. ४०/४१ पहावी. मानसात अनेक ठिकाणी आगम-निगम पुराणमत असावा या अर्थाचा उल्लेख सापडेल.

> **शेषशारदा शिव विधि आगम निगम पुराण (१/१२)**
> **यत्कीर्ति वेदपुराण आगम नेति नेति हि वानती (१/६१ छं)**
> **'विश्रुत आगमनिगम पुराण (१/१०३/८)**
> **वानिति वेद पुराणे आगम ८५२/९५/५)**

इत्यादि विपुल उदाहरणे आहेत.

(ग) **सम्मतं –** सम्यक् मतम् उचित वाटणारे पूर्णमान्य असलेले. भाव हा की या ग्रंथात वेदशास्त्रविरुद्ध, स्वकपोलकल्पित असे काही सुद्धा नाही.

(२) 'रामायणे निगदितं' – यांतील रामायण शब्दाने कोणी वा. रा. कोणी अध्यात्म रामायण वगैरे मानतात, पण हा अदूरदर्शीपणा व भ्रम आहे. मानसातील वचनांचाच आधार घेतला की मतभेदास जागाच राहत नाही. ग्रंथाच्या उपसंहारांतच पाहा.

'यत्पूर्वं प्रभुणा कृतं सुकविना श्रीशम्भुना दुर्गमं ।
श्रीमद्रामपदाब्ज भक्तिमनिशं प्राप्त्यैतु रामायणं ।
मत्वा तद्रघुनाथ नामनिरतं स्वान्तस्तमः शान्तये।
भाषाबद्धमिदं चकार तुलसीदासस्तथा मानसम्'
(उ. कां. उ. सं. श्लो १)

चालू श्लोकातील रामायण, रघुनाथ, भाषाबद्ध, स्वातः सुख (शान्ति) व तुलसी हे शब्द वरील उपसंहारश्लोकांत आहेत. श्रीशम्भुने जे पूर्वी केले होते तेच रामायण हिंदीभाषेत निबद्ध केले असे सांगून, या श्लोकांत केलेली प्रतिज्ञा पूर्ण केली गेल्याचे स्पष्ट सांगितले आहे. यावरून ठरले की शिवविरचित रामायणाचाच विस्तार केला. पण शिवविरचित शिवरामायण व अध्यात्मरामायण पण आहे. तेव्हा या शिवकृत रामायणाचे नाव सापडले की प्रश्न निःसंशयपणे सुटेल. हा आधार या ग्रंथाच्या उपक्रमातच आहे.

'रामचरितमानस मुनि भावन । विरचित शंभु सुशोभन पावन' ॥१/३५/९॥

येथे शंभु शब्दच आहे. उपसंहारांत तोच आहे.

'शंभु चरित हे सुंदर रचिती । पुढे कृपेने उमेसि कथिती ।'
'ते शिव काकभुशुंडीस अर्पिती। रामभक्त अधिकारि परीक्षिति ॥'
तेथुनि लाभ याज्ञवल्क्याला । त्यांनी कथित भरद्वाजाला॥
गुरु वदले मज ती कथा सूकरखेति सुजाण ॥१/३० रा॥

ती करतो मी भाषाबद्धहि (३१/२)
या वरून निश्चित ठरले की शंभूंनी जे रामायण केले त्यांचे नाव 'रामचरितमानस'. त्यांनी रचून ते आपल्या मानसातच (मनात) ठेवले होते
'रचुनी महेश मानसि राखति । सुसमय मिळता शिवेस भाषति' ॥३५/११॥
'रामचरित मानस' वर । हर्षि हेरुनि दे नाम हर्षि हर ॥' ते आपल्या मानसात ठेवले होते म्हणून 'रामचरितमानस' हे सुंदर नाव हरानेच ठेवले. तेच मुख परंपरेने श्री नरहऱ्यानंदांच्या मुखाने श्री तुलसीदासांनी अनेक वेळां श्रवण केले व तेच त्यांनी आपल्या (हिंदी) भाषेत निबद्ध केले. मानसात इतके भरभक्कम आधार असता टीकाकार 'तर्क करुनि किती फोडिति फाटे।' पण लक्षांत कोण घेतो? हे संस्कृत

रामायण छापलेले किंवा हस्तलिखित कोणाजवळच नव्हते हेहि अगदी स्पष्ट झाले. असे असले तरी तुलसी रामायणांत शेकडो संस्कृत ग्रंथांतील वचनांशी समानार्थक वचने मिळतात व प्रत्येकांत तुलसीदासांनी आपले वैशिष्ट्य भरलेले दिसते. या वचनांच्या साम्यावरून तुलसीदासांनी ती त्या त्या ग्रंथातूनच घेतली असे म्हणता येणार नाही. गुरुमुखाने श्रवण केलेल्या रामायणात - रामचरितमानसातच ती नसतील असे नक्की कोण व कसे सांगणार?

(३) क्वचिदन्यतोऽपि – कांही भाग इतर ठिकाणांतून, ग्रंथांतून घेतला असे कवीच म्हणतात. पुराण वेद शास्त्र, तंत्र यांशिवाय दुसरे काय राहिले? अशी शंका घेतली जाते पण ती निराधार आहे. श्लोकांत असे म्हटले नाही की पुराणादिकांतील सर्वभाग शंभु विरचित रामायणात होता; किंवा तो सर्व घेतला आहे.

(क) प्रसन्न राघव, हनुमद्रामायण, हनुमन्नाटक व अनेक रामायणे व संहिता यांतील समानार्थक वचनांवरून दिसते की अशा प्रकारच्या ग्रंथाचा आधार घेतला असावा. टीकेत दिलेल्या अवतरणांतून हे कळेल.

(४) स्वान्तःसुखाय – स्वतःच्या हृदयाच्या, अंतरात्म्याच्या सुखासाठी. स्वतःच्या असे जरी म्हटले असले तरि भाव हा की हा ग्रंथ श्रद्धाविश्वासवान व्यक्तीला सतत श्रवणाने स्वान्तःसुख देऊ शकेल. ही फलश्रुति पुढे अनेक वेळा सांगितली असून उपसंहारातही म्हणतात की,

'श्रीमद्रामचरित्रमानसमिदंभक्त्यावगाहन्ति ये । ते संसार पतंग घोरकिरणे दह्यन्ती नो मानवाः' हे जो कोणी करील त्यास शुद्ध स्वान्तःसुख मिळेल.

(क) ग्रंथ वाचल्यानंतर खात्री होते की श्रद्धाविश्वासयुक्तांना परमसुखदायक होईलच पण काव्यरसज्ञानासुद्धा यांत इतर कोणत्याही काव्यापेक्षा अधिक रस, ध्वनी, अलंकारसौंदर्य, ओज, माधुर्य, प्रसाद अदिकांच्या निर्दोष प्रभावाने अधिक आनंद मिळेल.

(ख) तुलसी – तुलसीदास. कोणी शंका घेतात की स्वतःच्या नावाचा उच्चार स्वतःच कसा केला? मा. पी. विविध समाधान केले आहे. ही शंकाच मुळी अतिशंका आहे. नाक्षत्र नामाचा जन्मनक्षत्रचरणावरून ठेवलेल्या नांवाचा उच्चार करू नये असा नियम आहे. व्यावहारिक नांवाचा उच्चार करू नये असे वाटणे हा भ्रम आहे. किष्किंधाकाण्डात रघुवीराने हनुमन्तास, सुंदरकाण्डात हनुमंताने बिभीषणास, उत्तर काण्डांत भरताला व सर्व राजांनी धनुर्मख मंडपात परशुरामाला आपापली नांवे सांगितली आहेत. तेथे हे शंकेखोर शंका घेत नाहीत. नाक्षत्रनाम, व्यावहारिक नाम, देवतानाम व मासनाम अशी चार प्रकारची नांवे नामकरणात ठेवावी लागतात. ज्ञानेश्वर तुकारामादि प्रसिद्ध संत कवींनी आपल्या प्रत्येक अभंगात आपले नाव गोवले आहे.

(५) 'रघुनाथगाथा भाषानिबंधम्' – (क) रघुनाथ शब्दाने रघुवंशात अवतरलेले दशरथ नंदन राम म्हणजे नरावतार सुचविला. रघुवंशात अवतरलेले नरावतार

रामचंद्र.

(ख) गाथा – कथा. भाषा म्हणजे प्राकृतभाषा - कवीची मातृभाषा- हिंदीभाषा, मानसात भाषा शब्द याच अर्थाने वापरला आहे.

(ग) निबंध – स्वतंत्रपणे लिहिलेला ग्रंथ नव्हे. कोणत्या तरी एक वा अनेक ग्रंथांच्या आधारे एखाद्या विषयावर लिहिलेला ग्रंथ; (येथे काव्यग्रंथ) धर्मसिंधु, निर्णयसिंधु हे निबंधग्रंथ आहेत.

(६) अतिमंजुलम् – अतिमनोहर, अतिसुंदर, दो १४ मध्ये वा. रा. स मंजु-मंजुल म्हटले आहे; व येथे या रामचरिताला अतिमंजुल म्हटले. हे वैषम्य टाळण्यासाठी एक हिंदी टीकाकार भाषानिबंध मतिमंजुलम् असा पदच्छेद करतात! ज्यांना योग्य वाटेल त्यांनी हा अर्थ घ्यावा; पण हा अर्थ भ्रमात्मक आहे. अतिमंजुल म्हणणेच आवश्यक व वस्तुस्थितिनिदर्शक आहे. खरोखरच वाल्मीकी रामायणापेक्षा अधिक सुंदर म्हणजे चित्ताला अधिक द्रव फोडणारे व अधिक आदरणीय आहे. लांबलचक सृष्टिसौंदर्य वर्णने, ऋतूंची रुक्ष वर्णनें, कंटाळवाणे प्रदीर्घ युद्धवर्णन, तेच तेंच युद्धाचे वर्णन, वृक्षादिकांच्या नांवाची जंत्री, वंशावळी, वगैरे गोष्टी महाकाव्य, इतिहास वगैरे दृष्टींनी आवश्यक असल्या तरी वाचताना रसानुभवप्रवाह सतत वाहत राहण्यास त्याने अडथळा होतो.

(क) तुलसीमानस नाट्यमहाकाव्य आहे. नाट्य व महाकाव्य यांचा प्रीतिसंगम जगातील कोणत्याही इतर भाषेतील ग्रंथांत नाही. हिंदीतही फक्त याच ग्रंथात हा संगम आहे. याचे मूळ कारण त्रिभुवनगुरु, परमश्रेष्ठ अनन्यरामभक्त महेश्वराने रचिलेले रामायण हे आहे. अधिक विस्तार प्रस्तावनेत पाहावा.

(७) आतनोति – आ-ईषत् थोडेसे तनोति विस्तार करून सांगतो. मूळ रामायणाचा थोडासा विस्तार करून सांगतो असे म्हटले. तुलसीदास हा कर्ता आहे. 'मी किंवा आम्ही सांगतो असे म्हटलें नाही. स्वतःबद्दल तृतीय पुरुष वापरून हे दाखविले की 'मी' असे ज्याच्याविषयी म्हणतात त्याहून तुलसीदास भिन्न आहे. तो तुलसीदास नाही व तो कांही करीत नाही.

यात स्वान्तःसुखप्राप्ती हे अंतस्थ ईश्वरदर्शनरूपी प्रयोजनाचे - फळांचे फळ किंवा फळांतील रस समजावा. 'प्रेमभक्तिजल आहे' (७/४९/६) जल = रस, 'रामभक्ति रस' (२/२०८) 'रघुपती भक्ति विना सुख नाही.'

'शम यम नियमचि फुले ज्ञान फल । हरिपदरति रस' (१/३७/१४)

उपसंहार – १ या प्रमाणे मंगलाचरणाच्या या सात श्लोकांत

(१) अनुबंध चतुष्ट्याचा उल्लेख केला आहे व प्रयोजनाचे फल रस इत्यादिकांचे फारच सुंदर निदर्शन केले आहे.

(२) हे सात श्लोक क्रमाने बालकांडादि सात कांडांचे विषय सुचवितात.

(३) विश्वासश्रद्धेपासुन प्रारंभ करून स्वान्तःसुखप्राप्ती होई पर्यंतची साधन परंपरा क्रमशः दाखविली आहे.

(४) हा निबंध ग्रंथ आहे.

(५) हा अति मंजुल आहेच. याचे लेखक तुलसीदास आहेत.

(६) यांत वस्तुनिर्देशमंगल व वंदनात्मक स्तुत्यात्मक मंगलही आहे.

(७) पहिले पांच श्लोक अनुष्टुभ छंदात असून त्यांचा उपयोग सहेतुक व सार्थ केला आहे. तसेच पुढील शार्दुलविक्रीडित व वसंततिलका वृत्तेसुद्धा सहेतुक व सापेक्षतेने वापरली आहेत. परिशिष्टात उत्तरकांडाच्या शेवटी स्वतंत्र लेख आहे.

(२) ग्रंथाच्या उपसंहारातहि 'स्वान्तस्तमःशान्ति' (स्वातःसुखलाभ) हेच मुख्य प्राप्तव्य सांगितले आहे व ते या ग्रंथाच्या विधिपूर्वक श्रवणादिकांनी मिळून जन्ममरणाच्या तापांची व त्रितापांची पूर्ण शान्ती या रामचरितमानसरूपी मानस सरोवरच्या जलात पडल्याने होईल हे शेवटी संस्कृतश्लोकांतच सांगितले आहे. अशा रीतीने उपक्रमोपसंहारादि तत्वनिर्णायक सर्व अंगांनी अनुबंध चतुष्टय वर स्पष्ट केले आहे.

संगति – हा ग्रंथ संस्कृतभाषेत लिहावयाचा नसून हिंदीत लिहावयाचा असला तरी संस्कृत ही देवभाषा असून थोडक्यात पुष्कळ अर्थ भरून ठेवण्यास उपयोगी पडणारी असल्याने पूर्वकवींच्या प्रणालीकेस अनुसरून व तिचा मान राखण्यासाठी तुलसीदासांनी ग्रंथारंभीचे मंगलाचरण संस्कृतभाषेतच केले आहे असे वाटते. पुढील काण्डांचे मंगलाचरण संस्कृतात असले तरी त्यांत पूर्ण कविस्यातंत्र्य वापरले आहे असे क्वचित दिसते, तसे या श्लोकांत नाही. गोस्वामींनी संस्कृतातच रामायण लेखनाचा प्रारंभ केला होता; पण त्यांस हिंदीत लिहावे लागले हे त्यांच्या चरित्रांत स्पष्ट केले आहे. त्यातील प्रथम लिहिलेले मंगलाचरण श्लोकच येथे लिहिले नसतील असे म्हणवत नाही.

ग्रंथ ज्या भाषेत लिहावयाचा त्याभाषेतच आता मंगलाचरण करतात; पण त्यांचे विवरण लिहिण्यापूर्वी बालकाण्डाचे वैशिष्ट्य दाखविणे चांगले.

## बाल कांडाचे वैशिष्ट्य

(१) श्री रामचरितमानसातील बालकांड सर्वांत मोठे म्हणजे सर्व ग्रंथाच्या सुमारे तृतीयांश आहे असे म्हटले तरी चालेल. यांत दोहे ३६१ असून काव्यपंक्तिसुमारे ४०१९ आहेत. मंगलाचरणाच्या सात श्लोकांतील वैशिष्ट्य वर दाखविलेच.

(२) पुढे पाच सोरठ्यांत हिंदीत मंगलाचरण असून त्यांत गणेशादिकांना बाह्यार्थाने नमन आहे आणि अवतार घेणाऱ्या राम, नारायण व विष्णु यांना गूढार्थाने वंदन आहे. शंकर श्रीरामचरितमानसाचे मूळ जनक आणि गोस्वामींचे गुरुपितामाता इत्यादि असल्याने त्यांची स्तुति आहे, आणि गोस्वामींच्या नराकार (नर रूप हर) गुरुंना वंदन आहे.

(३) पाचव्या सोरठ्यापासून २/१ पर्यंत गुरुवंदनाच्या निमित्ताने सद्गुरुमहिमा व सद्गुरु दर्शन झाल्यापासून सद्गुरुकृपाप्राप्तीपर्यंतच्या गुरुसेवा ध्यानादिकांचा क्रम व त्यांचे फल परम मनोहर काव्यांत न्यायघटित पद्धतीने सांगितले आहे.

(४) पुढे विप्र, संत, खल इत्यादिकांच्या वंदनात त्यांचे माहात्म्य, लक्षणे, गुण

अवगुण इत्यादींचे वर्णन मनोहर, सुभाषितमय काव्यांत केले आहे.

(५) पुढे अयोध्या, शरयू इत्यादि श्रीरामपरिवारादिकांच्या वंदनात त्यांचा प्रभाव वर्णिला असून संपूर्ण रामायण कथासूत्र काव्य मुक्ताफळांत फारच कौशल्याने ओवले आहे.

(६) दोहा १८ नंतर श्रीरामनाम वंदन प्रकरण आहे. याच्या सारखे नामनिरूपण कोणत्याही संत कवींच्या ग्रंथांत नाही असे गू. चं. वाचल्यावर कोणीहि म्हणेल. (क) ब्रह्म व राम यांच्यापेक्षा राम नाम श्रेष्ठ आहे हे सांगून तुलना करून सिद्ध केले आहे. नामाने रूपाची प्राप्ती सहज होते. आणि मुखाने नाम जपल्यानेच आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी, (मुमुक्षु) ज्ञानी यांस आपापले साध्य सहज प्राप्त करता येते हे सांगितले आहे. 'नाम घेत भवसिंधुच सुकतो'. विसाव्या दोह्यांत गूढरीत्या आणि पुढे प्रगटपणे भरतचरित्राशिवाय संपूर्ण रामकथा संक्षेपाने ओंवली आहे.

(७) दोहा ३२ मधील चौपायांची रचना तर फारच अद्‌भुत आहे.

(१) रामगुणग्रामांचे वर्णन.

(२) काण्डक्रमानुसार संपूर्ण रामायण कथा

(३) श्रद्धेपासून रामहृदयनिवासी होईपर्यंतचा सर्व साधन क्रम.

(४) आणि पुढे बालकाण्डापासून उत्तरकांडपर्यंत असलेल्या २८ स्तुतींची क्रमशः फलश्रुति, या चार विषयांचे वर्णन क्रम अविच्छिन्न ठेवून केले आहे. या चौपायांत सांगितलेले फलश्रुतीचे साम्य त्या त्या स्तुतीत अगदी सहज दिसते.

(८) दो ३६/१ पासून मानसरूपक व तदंगभूत शरयूरूपक आहे. याच्या एवढे विस्तीर्ण सांग-परंपरित सर्वांग सुंदर व पूर्णनिर्दोषरूपक कोणत्याही ग्रंथांत असेल असे वाटत नाही. यात सर्व मानसाचे सारसर्वस्व साठविले आहे.

(९) चार कल्पांतील रामकथांचे मिश्रण व चार संवादांचा उपक्रम दोहा ४३ म पासून होतो. येथपर्यंत ग्रंथकर्त्याने २२ वेळा कथाप्रतिज्ञा केल्या असून त्यांचा संबंध २२ प्रश्न व त्यांच्या कथा यांच्याशी आहे. १२+६+४=२२ प्रश्नांच्या उत्तरांच्या रूपाने समग्र मानसकथा आहे. प्रस्तावनेत लेख पाहावा.

(१०) सतीमोह, दक्षयज्ञविध्वंसन, पार्वतीजन्म, पार्वती विवाह, नारद मोह, मनुशतरूपा, तपश्चर्या व भानुप्रताप (प्रतापभानु) आख्यान या सर्वच कथा मोठ्या रोमांचकारी आणि सर्वसाधारण वाचकांस आश्चर्यचकित करणाऱ्या आहेत.

(११) सती मोह कथा व नारदमोहकथा या सुंदर नाट्यकथा असून नारदमोह तर फारच मधुर व रमणीय असे प्रहसन आहे असे म्हणणे अनुचित ठरणार नाही. सती मोह कथेत विविध रस विविध भागांत असून हास्यरससुद्धा कमी नाही पण अद्‌भुत जास्त आहे.

(१२) पार्वती तपश्चर्या व मनुशतरूपा तपश्चर्या यांचे वर्णन अशा खुबीने लिहिले आहे की कुंडलिनी योगाचे म्हणजेच योगशिखा उपनिषदांत वर्णिलेल्या महायोगाचे

वर्णन यातून सहज निघू शकते.

(१३) भानुप्रतापाख्यान हा एकच भाग समग्र रामायणात असा आहे की ज्यात भक्तिरसाचा ओलावा कुठेच दिसत नाही, किंवा ज्ञानरूपी फळाचा सुगंध येत नाही. या काण्डातच नव्हे तर संपूर्ण रामायणात हा एकच भाग जरा कंटाळवाणा वाटतो. कारण की धर्म आणि अधर्म यांच्या भेटीत कपटी, दांभिक, महत्वाकांक्षी, दुरभिमानी, भ्याड, कुटिलकारस्थानी, अधर्मी भक्तिहिन राजा वेदधर्माचा जणूं विश्वास घाताने संहारच करतो असे वाटते. तथापि भक्तिविहीन धर्माचरणाचा परिणाम या चरित्रात फारच उठावदार व अत्यंत भीषण दिसतो.

(१४) प्रतापभानु वगैरे रावणकुंभकरर्णादि होतात ती कथा आणि रावणाचे अल्प चरित्र दो १८३ अखेरपर्यंत आहे. येथे बालकाण्ड पूर्वार्ध संपतो.

(१५) दो १८४-१९१ पर्यंत रामावताराची पूर्वतयारी व १९७ पर्यंत रामजन्म व नामकरण वर्णन आहे. यात अनेक अद्‌भुत गोष्टी आहेत. नामकरणात शत्रुघ्नाचे नामकरण लक्ष्मणाच्या आधी केले आहे ते वेदतत्त्वदृष्टीने केले आहे.

(१६) दो १९९ रचना अद्‌भुत असून त्यांतील १२ चौपायाच (सतपंच ७+५) 'पाच सात चौपाया मनोहर' (उ. १३०/छं२) यांत विवक्षित असलेल्या आहेत. या बारा चौपायांत नामकरणानंतरचे एकवर्षातील बालकांचे विविध संस्कार व विधि अत्यंत गूढ ध्वनीने वर्णिले आहेत.

(१७) पुढे दोहा २०३ अखेर पर्यंत अतिसरल बाललीलांचे वर्णन असून त्यातच कौसल्येला दाखविलेल्या विश्वरूपाचे वैशिष्ट्ययुक्त सुंदर वर्णन आहे.

(१८) दो २०६ मध्ये विश्वामित्रागमन प्रकरणाचा प्रारंभ होतो. अहल्योद्धारप्रकरणात श्रीरामास विश्वामित्र रघुवीर ही पदवी देतात व तेथून ते रघुवीर म्हणून उत्तरोत्तर अधिक प्रसिद्ध होतात.

(१९) या विश्वामित्र प्रकरणात तपस्वी ब्राह्मणाने क्षत्रियाजवळ याचना करण्याचा दुष्परिणाम, मानभंग कसा होतो हे केवल २/४ शब्दांतील भेदाने फारच उठावदारपणे ध्वनीने दाखविले आहे. महामुनि यामुळे शेवटी अविचारी विप्र ठरविले गेले.

(२०) जनकपुरी बाहेरच्या आमराईत विश्वामित्राबरोबर उतरल्यावर, जनकराजा महामुनीच्या दर्शनास आले असता तेथे रामलक्ष्मणांचा प्रवेश व जनकादिकांनी ताडकन उठणे वगैरे पुढील भागात फारच सुंदर नाट्य आहे. या एका अचानक प्रवेशाने कितीतरी गूढ हेतू साधले आहेत.

(२१) पुढे नगरदर्शन. नगरवधूंचे राम प्रेम व आपसांतील चर्चा, नगरबालकांचे अद्‌भुत प्रेम इत्यादि भाग सुंदर नाट्य असून त्यांत स्वभावोक्ति व स्वभावचित्रण रम्य आहे.

(२२) पुष्पवाटिका प्रकरण अप्रतिम नाट्य काव्य असून सात्विक शृंगाररसाचे पवित्र साम्राज्य यांत पसरले आहे. त्यातच वीर व भक्तिरसांचे मिश्रण फारच मधुर

मनोहर आहे. त्यानंतरचे चंद्रोदय वर्णन बहारीचे नाट्य आहे.

(२३) धनुर्मखमंडपात प्रवेश केल्यापासून धनुर्भंग हे सुंदर नाट्य त्यात रामरूप भावना भेदाने एकाच वेळी अनेक रसात्मक दिसल्याचे फार रुचिर व तत्वग्राही वर्णन आहे त्यातच परशुराम प्रवेश प्रेक्षकांच्या हृदयांतील भावनांत एकाएकी दक्षिणोत्तर ध्रुवासारखे स्थित्यंतर करणारा व परस्पर विरूद्ध भावनांचा उद्‌भव करणारा आहे.

(२४) दो. २६८/१ पासून २८५ पर्यंत असलेले भार्गवदर्पविमर्दन प्रकरण-तर अत्यंत रोमांचकारी आहे. त्यात प्रेक्षकांच्या व श्रोत्यांच्या हृदयांतील भावनांचा लंबक क्षणोक्षणी निरनिराळ्या दिशांस भराभर नेला जातो. वाग्युद्धाचा व वक्तृत्वकलेचा एक फारच सुंदर नमुना आहे. रामसेवामूर्ति लक्ष्मण सर्वांच्या भावनांचे व नेत्रांचे केंद्र बनतो. रघुपति कीर्ति विमल पताकेला लक्ष्मण यश दंडा प्रमाणे बनण्यास येथूनच प्रारंभ झाला. रामसेवक लक्ष्मण व रघुवंशी स्वाभिमानी निर्भय महावीर येथे आपल्या अद्‌भुत दिव्य तेजाने प्रथम प्रकाशमान होतो. ब्राह्मणाच्या ठिकाणी ब्राह्मण्य आणण्यास आवश्यक अशा 'शमोदमस्तपः शौचं क्षांतिरार्जवमेवच' इत्यादि नऊ गुणांचे व ब्राह्मणाच्या स्वभावगुणांचे व क्षात्रधर्माचे वर्णन येथे फारच मार्मिकतेने सुचविले आहे. परशुरामकृत स्तुतीत नऊ वेळा जय शब्दाचा उपयोग सहेतुक आहे. परशुरामकृत स्तुतीने परशुरामावतार समाप्ति व राम 'अवतार' असल्याची प्रसिद्धि सहज झाली आहे. परशुरामप्रताप भास्कर एकाबाजूने अस्तास गेला व रामप्रताप दिवाकराच्या तेजाने व अलौकिक गुणांनी सर्वांचे डोळे दिपले.

(२५) पुष्पवाटिका प्रकरणापासून परशुरामावतार समाप्तिपर्यंतच्या वर्णनात स्त्री व पुरुष स्वभावांतील ठळक भेद सीता व राम यांच्या चरित्रात स्पष्ट दिसतो.

(२६) या प्रकरणात लक्ष्मणाच्या स्वभावातील अलौकिक इन्द्रियनिग्रहशक्तीचे अद्‌भुत दर्शन होते. भडकलेल्या ज्वालामुखी सारखा क्रुद्ध झालेला लक्ष्मण श्रीरघुवीराच्या नुसत्या डोळ्याच्या खुणेने हिमालयासारखा शांत व स्तब्ध होतो!

(२७) पुढे श्रीरघुवीर विवाह प्रकरण काण्डसमाप्तिपर्यंत आहे. मानसातील रामविवाहासारखे यथाविधि परम रमणीय भक्तिरस परिलुप्त विवाह वर्णन कोणत्याही प्रचलित रामायणांत नाही.

(२८) विश्वामित्राबरोबर निघाल्यापासून विवाह समाप्तीपर्यंतच्या वर्णनात शिष्यधर्माचा सक्रिय आदर्श रामचरित्रात दाखविला आहे. गुरुसेवेचा आदर्श त्यातच दिसतो.

(२९) भारतीय साम्यवादाचे सक्रिय चित्रण जनकविदेहींच्या चरित्रात दिसते.

(३०) अयोध्याप्रयाणाच्या तयारीपासून करुणाविरह दांपत्य विदेहनगरीत प्रवेश करतात व धृतिज्ञान यांना हळुहळु पळ काढावा लागतो. कुठेच थारा नाही असे पाहून मोठ्या आशेने विदेहीजनकांस आपला अभेद्य बालेकिल्ला समजून धृतिबोध त्यात प्रवेश करतात; पण करुणाविरह एका क्षणात तो बालेकिल्ला सर करतात,

आणि शेवटी रघुवीराशिवाय त्यांस जनकपुरीत कोणी थारा देत नाहीत. विदेहपुरी करुणाविरहांच्या पुरी ताब्यांत जाते. रघुवीर विवाह प्रकरणांत अनेक अद्भुत रमणीय विभाग आहेत.

(३१) जनकपुरीचे वर्णन अशा अद्भुत काव्य कलेने रंगविले आहे की जनकपुरीचे सौंदर्य, तेथील स्त्रियांचे सौंदर्य, तेथील ऐश्वर्य इत्यादि सर्व अयोध्येतील त्या त्या गोष्टी पेक्षा श्रेष्ठ व मनोहर वाटतात. मोठमोठे टीकाकार सुद्धा या वर्णन प्रवाहात वाहयले आहेत. पण जे वाटते तो केवळ आभास आहे. सूक्ष्म दृष्टीने तुलना करून पाहिल्यास वस्तुस्थिती अगदी उलट आहे हे ठरते.

(३२) हे काण्ड शृंगारादि नवरसांचा व भक्तीचा महासागर आहे. पहिल्या ४३ दोह्यांत अनेक तात्विक सिद्धान्त रमणीय काव्यांत ग्रथित केले गेले असल्याने त्या भागात मोठमोठ्या विद्वानांची व पदवीधरांची मति गुंग होते; म्हणूनच कोणीहि टीकाकार (२०/२२) त्या विभागांत श्लोकसंगति दाखविण्याच्या बाजूस वळलेच नाहीत. पण कुठेही लेशमात्र विसंगति नाही हे मानसगूढार्थ चंद्रिकेच्या शीतल प्रकाशात पुढे दिसेलच.

(३३) यांत ब्रह्मस्तुति, कौसल्यास्तुति, अहल्यास्तुति, परशुरामस्तुति, सीताजननी सुनयना स्तुति व सीताजनक विदेहस्तुति या सहाजणांनी केलेल्या स्तुति आहेत. रामलक्ष्मण या उभयतांची स्तुति परशुरामस्तुतीतच फक्त या काण्डात आहे. या सहा स्तुति म्हणजे स्तुतिनक्षत्रमंडळांतील अश्विनी, भरणी, कृतिका, रोहिणी, मृगशीर्ष आणि आर्द्रा ही सहा नक्षत्रे आहेत.

(३४) बालकाण्ड सप्तमोक्षपुरीपैकी शिरोभूत असलेली अयोध्यापुरी आहे. शरयूचा महिमा अति अमित असून तिच्या स्नानानेच रामसामीप्यमुक्ति मिळते व अयोध्येत मरणारास पुन्हा जन्म घ्यावा लागत नाही.

याप्रमाणे या काण्डाचे वैशिष्ट्य जसे स्मरणात राहिले आहे तसे यथामति प्रदर्शिले. न्यून पूर्ण करतील वाचक.

# हिंदीतील मंगलाचरण (पांच सोरठे आहेत)

हिं.- जो सुमिरत सिधि होइ गननायक करिबर बदन ।
करउ अनुग्रह सोई बुद्धिरासि सुभ गुन सदन ।।मं १।।

म.- स्मरत सिद्धि दे तूर्ण गणनायक करिवरवदन ।
करो कृपा तो पूर्ण बुद्धिराशि शुभगुणसदन ।।मं१।।

**अर्थ** – (ज्यांचे) स्मरण करताच तावडतोब (तूर्ण) कार्यसिद्धि होते वा सिद्धिप्राप्त होते, जे गणांचे नायक आहेत, व ज्यांचे मुख सुंदर हत्तीच्या मुखासारखे आहे, ते बुद्धिची राशि व शुभगुणांचे माहेरघर माझ्यावर पूर्ण कृपा करोत ॥१॥

**सूचना** – मूळात एकवचन आहे तरी आदरार्थी बहुवचन अर्थ लिहिण्यात सर्वत्रच वापरले आहे. हिंदीत तूर्ण शब्द नाही व तेथील 'जो' 'तो' ने सुचित केला जातोच. 'तूर्ण' शब्द हिंदीत नसला तरी भावार्थ प्रगट करण्यासाठी घातला आहे, म्हणून तूर्ण आला.

**टीका** – (१) ग्रंथारंभी गणपतीचे स्मरण करण्यासाठी हा सोरठा आहे हे 'करिवरवदन' गजानन या शब्दाने स्पष्ट होते.

(क) हा सोरठा कोणी गणपतीपर तर कोणी रामपर लावला आहे. रघुनाथपर लावण्यात अर्थाची ओढाताण करावी लागली आहे. पण सिद्धी व बुद्धि या दोन शब्दांच्या 'करीवरवदन' शी साहचर्याने हा विघ्नेश, विघ्नहर, गजाननपर घेणेच इष्ट आहे. कारण सिद्धिबुद्धि या गणपतीच्याच स्त्रिया आहेत. हे पुढे दिलेल्या गणेशचरित्रात दिसेलच. यांचा उल्लेख संस्कृत पहिल्या श्लोकात नाही हे ध्यानी ठेवणे जरूर आहे.

(२) गणपति हे प्रणवाचे प्रतीक म्हणून ज्ञानेश्वर समर्थादिकांनी केलेले वर्णन पहावे (ज्ञानेश्वरी, दासबोध).

(क) प्रणव परमात्म-वाचक असल्याने व रघुनाथ परमात्माच असल्याने त्यांच्याकडे हा लावता येईल; आणि मग 'करि वर वदन' याचा अर्थ वदन वाणी, वर - श्रेष्ठ, करि करतो असा अर्थ घेता येईल.

बाकीच्या पदांचे अर्थहि त्या अनुरोधाने पुढे दिले आहेत. 'तस्य वाचकः प्रणवः' (पा. यो.)

(३) स्मरत (सुमिरत) – स्मरताच, स्मरण केल्याबरोबर, भाव हा की स्मरणानेच कार्य होते, कार्यातील विघ्ने दूर होतात, इतर सायास करावे लागत नाहीत.

(४) सिद्धि दे तूर्ण – मूळांत 'सिधि होइ' असे एकवचन असून टीकाकारांनी येथे अष्टमहासिद्धी व इतर सिद्धी असा अर्थ घेऊन त्यांची माहिती दिली आहे ती अस्थानी आहे. फार तर एक सिद्धी असा अर्थ घेता येईल पण तोहि गौणच आहे.

तूर्ण लवकर, वेळ न लावता दे-देतो-देतात. याच अर्थाने हे शब्द रामाकडे सहज लागतात.

(क) गणनायक गणांचा शिवगणांचा नायक; नायक – ईश्वर, मुख्य नेता, स्वामी इत्यादि अर्थ आहेत. कोणाचे गण हे स्पष्ट न सांगितल्याने 'करिवरवदन' शब्दामुळे 'शिवगण' अर्थ होतो.

(ख) रामपर अर्थ घेतल्यास नायक = ईश्वर, परमात्मा. पहिल्या श्लोकात **'विनायक'** शब्द ज्या अर्थाने घेतला आहे तोच अर्थ गणनायक - ब्रह्मादिदेवगणांचा स्वामी.

**'तुम्हि विधि आदि जगाचे स्वामी । ब्रह्म सकल हृदयांतर्यामी ।'**

असे रामास म्हटलेच आहे.

**'आनंद कंदाय विशुद्ध-बुद्धये शुद्धाय हंसाय परावराय'**
**नमोऽस्तु तस्मै गणनायकाय श्रीवासुदेवाय महाप्रभाय'**
(प.पु.भू.खं ९८/१३)

या आधाराने हि, गणनायक = वासुदेव, राम हा अर्थ होईल.

(ग) शिवगण पुष्कळ वेळा कार्यांत नाना विघ्ने करीत असतात, व गणपति त्यांचे स्वामी आहेत. म्हणून त्यांनी कृपा केली की कार्यसिद्धि होते.

जयजय सुरनायक' (१/१८६/१) **'मायातीतं सुरेशं खलवधनिरतं'** (लं. मं. १) असे रामास म्हटले आहे. शिवगणांचे वर्णन १/९३ मध्ये पाहावे.

(५) **'करो कृपा पूर्ण'** – सुचविले की ईश्वराची पूर्ण कृपा झाल्याशिवाय रामायणासारखा अप्रतिम ग्रंथ शेवटास जाणार नाही व संसारग्रंथाचा शेवट होणार नाही. तुलसीदासांना दोन्हींची जरूरी आहे हे

**'मज इच्छा रघुपति गुण गानी । चरित अगाध नि मम मति सानी'** (लहान, अल्प ॥

**'मनमतिरंक मनोरथ राया'** इत्यादि वचनांनी (१/८/४) सांगितले आहे.

(क) **'वर्णनामर्थसंघानां'** च्या टीकेत अवतरणांनी दाखविले आहे की विघ्नहर्ते व हृदयांगणांत शारदेला नाचविणारे रामच आहेत. 'स्वान्तसुखाय' ने संसारसागर तरण सुचविले आहेच.

(ख) **'बुद्धिराशि'** – अपार अगाध बुद्धि ज्यांची आहे असे. 'राशि' शब्द मानसांत याच अर्थाने अनेक समासांत वापरला आहे, गुणराशि, सुखराशि इ. इ. गणपतीची पत्नी शक्तीच बुद्धि आहे.

(ग) गोस्वामींनी सुमतीची याचना मात्र जनकसुता जानकी जवळ केली आहे व ती त्यांना मिळाली हे पुढे सुचविले आहे. **'जनकसुता जगजननि जानकी'**

कृपानिधाना प्रिय अतिशय की॥ तिचें विनवितो युग पदकमलां। जिचे कृपे मति पावु निर्मला ॥१/१८/७-८)
सीताराम अभिन्न आहेत व बुद्धिदायक सीतेचे ते पति आहेत. म्हणून 'बुद्धिराशि' पद रामाकडेहि लागतेच.
'श्रुणु सर्वज्ञ सकल - हृद्वासी । **मति बल धर्म तेज गुण राशी**' (६/१७/३) असे मतिराशि - बुद्धिराशी रघुवीरासच म्हटले आहे. 'ब्रह्मदेवाने सुबुद्धि मागितली ती रघुनाथजवळच.'
**'तरि दीन दयाल दया करणे । मति माझी विभेदकरी हरणे'** (६/१११ छं१०).
(घ) **शुभगुणसदन** — हे विशेषण कोणत्याही सात्विक देवाला लागू पडते तसे ते गणपतीला लागेलच. मानसांत हे रघुपतीला अनेक ठिकाणी लावले आहे.

**'गुणसागर नागर नाथ विभो'**
**'अवतार उदार अपारगुणा'**
**'गुणबोधनिधान अमान अजे'**

रामनामाला सुद्धा 'अगुण अनूपम गुणनिधान' (१/१८/२) म्हटले आहे.
(६) या प्रमाणे या सोरठ्यातील सर्व पदे गणपतिपर व रामपरही सहज लागली.
**(क)** या युक्तीने तुलसीदासांनी मर्यादापालन केले व आपली रामानन्यता पण राखली.
**(ख)** 'गणनायकने **नाम**, 'करिवरवदन' ने रूप, 'स्मरत सिद्धि दे तूर्ण व बुद्धिराशी' यानी ऐश्वर्य **लीला** व 'शुभगणसदन' ने **धाम** या चार गोष्टी सुचविल्या.
**(ग)** मानसातील रामचरितात या चार गोष्टींचाच प्रामुख्याने विचार केला आहे. कोणत्याहि चरित्रात या चार गोष्टींचे विवरण करावे लागते. अशा रीतीने या पहिल्या सोरठ्यातही ग्रंथ विषय सुचवून ठेवला आहे.
**वि. सू.** — या व पुढील चार सोरठ्यांत पंचायतन देवतांचे मंगलाचरण आहे असे काही टीकाकार म्हणतात. (मा. पी) पण त्यासाठी केलेली शब्दांची कसरत व क्लिष्ट अर्थ पाहून हसू येते. गणेश, सूर्य, विष्णु, शिव आणि देवी या पंचायतन देवता होत.
**(क)** या लेखकांच्या अल्प मतीस दिसते की प्रणवाचे लक्ष्य ब्रह्म-राम यांचे प्रथम सोरठ्यांत, दुसऱ्यांत वैकुण्ठाधीश विष्णूचे, तिसऱ्यांत शेषशायी नारायणाचे, चौथ्यांत शंकरांचे व पांचव्यांत सद्गुरूचे स्मरण वंदनादि आहे. असे कां हे त्या त्या सोरठ्याच्या टीकेत स्पष्ट केले आहे.
**(ख)** हे मंगलाचरण सोरठा छंदातच कां? अशी शंका काढून विविध प्रकारे समाधान करण्याचा प्रयत्न टीकाकारांनी केला आहे. पण कांही उत्तरे हास्यास्पद आहेत तर कांही थातुर-मातुर आहेत. सोरठा वृत्त येथेच वापरले असे नसून पुढे ग्रंथातहि निदान शंभर वेळा तरी वापरले आहे.

मा. पी. दिलेली कारणे त्यापैकी शेकडा पन्नास ठिकाणी लागू झाली तरी ती मान्य करता येतील छंद, सोरठा, दोहा कां व कुठे वापरली आहेत या विषयी 'छंदसोरठा दोहा मंजुल' (१/३७/५) या टीकेत सविस्तर लिहिले आहे व ते सिद्धान्त निरपवाद असल्याची प्रतीति काव्य रसज्ञ घेऊ शकतील. येथे हे वृत्त का वापरले? हा प्रश्न कोणतेहि वृत्त वापरले असते तरी करता आला असताच!

(ग) या सोरठ्यात साती कांडांचे सार भरले आहे असे म्हणून ते दाखविण्याचा हिंदी टीकाकारांनी केलेला प्रयत्न 'क्लिष्ट कल्पना आहेत' असा शेरा मा. पि. च्या संपादकांनीच मारला आहे. (पृ. ६०)

## श्रीगणेश चरित्र

पुराणांत एक कल्प हा एक कालखंड मानून त्यातील महत्याचा इतिहास साररूपाने व वाचन परोक्ष-रूपाने वर्णन केलेला आहे. या नियमांतून गणेशही सुटले नाहीत. प्रत्येक कल्पात देवतांच्या चरित्रांत थोडा फरक पडलेला दिसतो. हा सिद्धान्त मानसात रामावताराविषयी उदाहरणांसह स्पष्ट करून चार कल्पांमध्ये राम, रावण, दशरथ, कौसल्यादि कोण झाले हे सांगितले आहे. (१/१२०/१८३) गणपति - गजानन चरित्रसुद्धा कल्प भेदानुसार भिन्न भिन्न आहे.

(१) ब्रह्मवैवर्त पुराणांत (गणेशखंड अ. ७) कथा आहे ती -पूर्वाध्यायांत पार्वतीने पुत्रप्राप्तीसाठी यज्ञ करविला त्यावेळी सर्व देव महर्षि आदि जमले होते. महादेवाने प्रार्थना केल्यावर काही व्रतादि करण्याचा उपदेश विष्णूने केला. व्रताराधनेने संतुष्ट होऊन कृष्णरूपाने प्रगट होऊन पार्वतीला वर दिला व पुढे तिला पुत्र झाला तो गणेश गजवदन होण्याचे कारण घडले ते - पुत्रोत्सवसमयी विष्णु आदि सर्व देव सभेत बसले असता शनिमहाराजांची स्वारी तेथे आली. ब्रह्मादि देवांना वंदन करून गणेशाचे दर्शन घेण्यासाठी परवानगी घेऊन शनि पार्वतीच्या महालात गेला. त्याने (शनैश्चराने) मान खाली घातली आहे असे पाहून पार्वतीने कारण विचारले व आमच्या पुत्राकडे का पाहत नाही असे म्हणाली. शनीने सांगितले की माझी दृष्टि ज्याच्यावर पडेल त्याचा नाश होईल असा मला बायकोचा शाप आहे पुष्कळ समजावूनसुद्धा पार्वती आग्रह सोडीना; तेव्हा नाईलाजाने किलकिल्या दृष्टीने प्रेमाने त्या बालकाकडे पाहिले मात्र तोच बालकाचे मस्तक गळून पडले व ते कृष्णाच्या मुखात शिरले. पार्वती शोकाने मूर्छित पडली. कैलास पर्वतावर हाहाकार उडाला. कोणास कांही सुचेना तेव्हा गरुडवाहनाने जाऊन एका गजाचे मस्तक सुदर्शन चक्राने कापून आणून ते गणेशाच्या धडावर बसविले व त्यास जिवंत केला.

(२) **शिवपुराण रुद्रसंहितेत** — उटणे लावून पार्वती स्नान करीत असता आंग चोळताना जो मळ निघाला त्याची तिने एक पुरुषाकृति निर्माण केली तोच एक सुंदर विशाल देही बलवान पराक्रमी पुरुष तयार झाला. पार्वतीने त्यास आपला

पुत्र मानले. त्याने विचारल्यावरून पार्वतीने त्यास आपल्या द्वारपालाचे काम दिले; व सांगितले की माझे स्नान उरकेपर्यंत कोणाहि पुरुषाला आंत येऊ देऊ नकोस. कर्मधर्मसंयोगाने शंकरास यांतील काहीच माहित नसल्याने. ते आत जाण्यासाठी द्वाराशी आले. ते कोण हे गणेशाला पण माहित नसल्याने तो त्यास आत जाऊ देईना. शंकरांनी आपल्या गणांस आज्ञा दिली की हा लड्डंभारती कोण आहे हे जरा पाहा तर खरे! दोन्ही बाजू स्वामीची आज्ञा पालन करण्यात तत्पर; त्यामुळे खूप वादविवाद बाचाबाची झाली. शंकरांनी युद्धाची आज्ञा दिली. एकट्या गणेशाने सर्वांस पळता भुई थोडी केली. शिवाच्या बाजूने गणेशाची समजूत घालण्यास चतुरानन आले तेव्हा त्यांच्या दाढीमिशा उपटल्या गेल्या. तेव्हा ब्रह्मा, विष्णु, सर्व देव व कार्तिकेय लढण्यास आले. गणेशाचा पराभव होत नाही असे पाहून महेशाने आपल्या त्रिशूलाने त्याचे मस्तक उडविले. पुत्र व सेवक मारला गेला असे पाहून पार्वतीने एक लक्ष शक्ति निर्माण करून सर्व देवांस खाऊन टाकण्याचा हुकूम दिला. हे सुरु होताच हाहाकार उडाला; तेव्हा नारदास पुढे करून पार्वतीला प्रसन्न करण्याचा प्रयत्न केला गेला. उत्तर मिळाले की पुत्रास उठविल्या शिवाय काहीच करता येत नाही. तेव्हा शंकरांनी गणांस आज्ञा दिली की उत्तर दिशेला जा व जो प्रथम भेटेल त्याचे शिर कापून आणा. गणांना एकदन्त गज दिसला व त्याचे शिर कापून आणून ते गणेशाच्या धडावर ठेवले. नंतर जल अभिमंत्रित करून शिंपडल्यावर गणेश गजानन होऊन जिवंत झाला त्याचे गजानन नाव पडले. शंकरांनी त्यास पुष्कळ आशीर्वाद देऊन आपल्या सर्व गणांचे नायकत्व दिले म्हणून गणनायक झाले.

(क) सिद्धिबुद्धिंशी विवाह कसा झाला पहा. - वडील मुलगा कार्तिकेय व धाकटा गजानन हे दोघेही वयांत आल्यावर घरांत विवाहाचा विचार सुरू झाला. दोघांनीही आग्रह धरला की आपलाच विवाह प्रथम झाला पाहिजे. शेवटी असे ठरले की जो पृथ्वीप्रदक्षिणा करून आधी येईल त्याचा आधी विवाह करावयाचा. कार्तिकेय प्रदक्षिणेस गेला. गजाननाने मातापितरांस सिंहासनावर बसवून अनन्यभावाने त्यांची पूजा करून त्यांस सात प्रदक्षिणा घातल्या व हात जोडून प्रार्थना केली की आता माझा विवाह लवकर उरका. त्यांनी म्हटले की पृथ्वी प्रदक्षिणा करून आधी ये तर आधी करु. गणेश म्हणाला की मी एक नव्हे सात पृथ्वी प्रदक्षिणा केल्या व मगच प्रार्थना केली आहे. मातापित्यांचे पूजन करून जो पुत्र त्यास प्रदक्षिणा घालतो त्यास पृथ्वी प्रदक्षिणा घडते; व जो त्यांस घरी ठेवून यात्रेला जातो त्यास मातृपितृहत्या घडते; तेव्हा माझे लग्न आधी करा नाहीतर वेदपुराणादि असत्य ठरवा. इतक्यात विश्वरूप प्रजापति आपल्या दोन मुलींना घेऊन तेथे आला व त्याने त्या गजाननाला दिल्या. त्यांची नांवे सिद्धि व बुद्धि. कार्तिकेय यात्रा करून परत आला व ही हकीगत ऐकताच रागाने निघून गेला व त्याने विवाह केलाच नाही.

(३) पद्म पुराण सृष्टिखंडात -शिवपुराणाप्रमाणेच पण अगदी थोड्या फरकाने कथा आहे. गणेशादि पुराणांतूनहि गणेश-गजानन कथा आहेत.

सार — वरील सर्व कथांत हे दिसते की गणेश प्रथम पार्वतीपुत्र वा शिवपार्वतीपुत्र बनून मग कांही तरी विलक्षण कारणाने त्यास गजाननत्व प्राप्त झाले.

(क) शिवलिंग हे निर्गुण ब्रह्माचे प्रतीक आहे हे लिंगपुराण व शिवपुराणांतील वर्णनावरून ठरते. लिंगाच्या भोवती योनि - साळुंकी असते ती मायेचे मूलप्रकृतीचे प्रतीक आहे.

'मम योनिर्महत्ब्रह्म तस्मिन् गर्भं दधाम्यहम् । संभवः सर्वभूतानां ततो भवति भारत' (भ. गी.) या दोहोंपासून प्रणव झाला तोच गणपति गजानन प्रणवाचे प्रतिक आहे. हे रूपक ज्ञानेश्वरीत फारच चांगले वर्णिले आहे. अनुष्ठानाने व निदिध्यासनाने आत्मबुद्धी व मोक्ष मुक्तिसिद्धी प्राप्त होते (गुरुकृपेने). याच गजाननाच्या दोन स्त्रिया! प्रणवापासूनच सर्व विश्वाची उत्पत्ती होते. माण्डूकोपनिषद पहावे. सर्व वेदान्तज्ञान - बुद्धी प्रणवांतच आहे. तीन साडेतीन मात्रांपासून चौसष्ट मात्रांपर्यंत प्रणवाचे वर्णन उपनिषदांत सांपडते. युगायुगाचे ठायीं कल्पभेदानुसार गणपतीच्या शरीराचा वर्ण चार प्रकारचा भिन्न भिन्न वर्णन केलेला आढळतो. निर्गुणब्रह्म, प्रणव, माया, इत्यादि सर्व अनादि आहेत. म्हणूनच शिवपार्वती विवाहात गणेश पूजन! हे सुद्धा अध्यात्मपर रूपक आहे. शिव पार्वतीविवाह-टीकेत त्याचा परिस्फोट केला आहे.

बि. सू. — मानसात चार संवाद आहेत व त्यात चार कल्पांतील रामकथांचे मधुर मिश्रण आहे.

(१) एका कल्पांत साकेत वैकुंठ निवासी ब्रह्मरूप रामावताराची कथा आहे; ती शंकर पार्वतीस सांगतात व तिच्यांत काकभुशुंडी संवाद कथा मिसळतात. म्हणून या पहिल्या सोरठ्यात वाच्यार्थाने गणेशमंगल असले तरी लक्ष्यार्थाने रामाचे स्मरण केले.

(२) शंकरांनी जी कथा पार्वतीस सांगितली ती याज्ञवल्क्यांनी भरद्वाजास सांगताना त्या कल्पातील रामावतार कथेचे वैशिष्ट्य भरीस घातले व त्या कल्पात रामावतार क्षीर-सागरनिवासी नारायणाचा होता; म्हणून त्या नारायणाचे स्मरण तिसऱ्या सोरठ्यात केले आहे.

(३) याज्ञवल्क्यांनी जी कथा भरद्वाजांस सांगितली तीत तुलसीदास या कल्पातील कथेची भर घालून सांगणार आहेत म्हणून दुसऱ्या श्लोकात वैकुंठाधिपति विष्णूचे स्मरण केले आहे; कारण तो रामावतार विष्णूचा आहे.

(४) काकभुशुंडीने गरूडास जी कथा सांगितली तीत शेषशायी नारायणावतारच राम असल्याने पुन्हा नारायणाचे स्मरण न करता, क्रम बदलून नारायण वर्णनाचा श्लोक शंकर वर्णनपर श्लोकाच्या आधी घातला. कारण की काकभुशुंडीगरूड संवाद कथा शिवकृपेनेच भुशुंडीस प्राप्त झालेली आहे.

(५) सर्वांचे मूळ व विष्णू नारायणाचे सुद्धा ईश म्हणून रामस्मरण प्रथम केले.
(६) विष्णूच शेषशायी नारायण झालेले असल्याने नारायणाच्या आधी विष्णूचे स्मरण केले.
(७) चौथ्या सोरठ्यात शंकरांचे स्मरण करण्याचे कारण - शंकर त्रिभुवन गुरु आहेत. शंकरच मूळ रामचरितमानसाचे निर्माते आहेत. शंकराचाच अवतार हनुमान, शंकरभजनाशिवाय रामभक्ति मिळत नाही म्हणून 'वन्दे बोधमयं नित्यं गुरुं शंकररूपिणम्' असे पूर्वी गुरुभावनेने त्यास नमन केले तसेच येथे स्मरण केले आहे.
(८) पांचव्या सोरठ्यात प्रत्यक्ष देहधारी गुरुला वंदन आहे. संस्कृत श्लोकांत त्यास वंदन केले नाही म्हणून येथे प्रथम वन्दन आहे. हे शेवटी घेण्याचे आणखी कारण म्हणजे यातूनच रामचरित मानसाची कथा सुरू करावयाची आहे व त्याच्या मुखाने जी कथा श्रवण केली तीच तुलसीमानसाचा प्रत्यक्ष मुख्य आधार आहे.

हिं.- मूक होइ बाचाल पंगु चढइ गिरिबर गहन ।
जासु कृपाँ सो दयाल द्रवउ सकल कलिमल दहन ॥मं २॥
म.- मूक होई वाचाल पंगु चढे गिरिवरि गहन।
कृपया यस्य दयाल द्रवुतो सब कलि-मल-दहन ॥मं २॥

**अर्थ** – ज्यांच्या कृपेने (यस्य कृपया) मुका (मूक) वाचाल होतो व पंगु (सुद्धा) दुर्गम अशा (गहन) महापर्वतावर चढू शकतो (चढे चढइ) तो सकल कलिमलांचे दहन करणारा दयालु (माधव विष्णु) माझ्यावर द्रवो (द्रवु-द्रवउ) माझी दया त्याला येवो ॥२॥
**टीका** – (१) मूकं करोति वाचालं पंगु लंघयते गिरिम् । यत्कृपा तमहं वन्दे परमानन्दमाधवम्' या सुप्रसिद्ध श्लोकाचा कायाकल्प केलेला हा अनुवाद आहे हे स्पष्ट दिसते, म्हणून यात माधव-विष्णु अध्याहृत ठेवला आहे. कायाकल्प कसा केला आहे हे 'मूळाहुनी सरस मानस अति' या प्रकरणात प्रस्तावनेत पाहावे.
(२) तुलसीदासांना रामचरितनिबंध लिहावयाचा आहे.

**'मज निजमतिबल निश्चिति नाहीं । म्हणुन विनवतो सर्वानांही'** (१/८/४)

असे ते म्हणतात. असा निबंध काव्यात लिहिण्यास वाणीची स्फूर्ति शुद्धबुद्धि, शास्त्रज्ञान, काव्यशास्त्र, छंदःशास्त्र इत्यादि अनेक प्रकारचे बल लागते ते बल ज्यांच्या कृपेने मिळते ते राम विष्णूचे अवतार होत. राम विष्णु वाक्पति आहेत असे विष्णुसहस्रनामांत म्हटले आहे. 'व्यापी ब्रह्म विरज वागीश्वर' (७/५८/७) असे रामासही म्हटले आहे. ती शक्ति देण्याची दया त्यांना यावी म्हणून विनविले. येथे सुचविले की काव्यनिर्मिति करण्यात मी मूक आहे, मुका आहे. सुंदर काव्य करण्याची शक्ति मला द्या. (क) मूक अनेक प्रकारचे असतात.

१. वाचामूक – बोलताच येत नाही ते.

२. ज्ञानमूक – जडभरता सारखे.

३. अज्ञान मूक – वाचा असून अज्ञानामुळे एकाद्या विषयाविषयी बोलण्याचे सामर्थ्य नसते.

४. सभामूक – बोलण्याचे सामर्थ्य असून सभेत बोलण्यास न धजणारे. तुलसीदास स्वतःस अज्ञानमूक समजतात.

३. बाचाल – वाचाळ बडबड्या असा रूढार्थ आहे. 'स्याज्जल्पकस्तु वाचलो वाचाटो बहुगर्ह्यवाक्' (अमर) पुष्कळ व गर्ह्यभाषण करणारा असा अर्थ आहे; पण येथे उत्तम वक्ता असा अर्थ आहे.

(४) 'पंगु चढे गिरिवरि गहन' – पंगु लंगडा, पांगळा, चालण्याची शक्ति नसलेला. रामचरितमानसरचना करणे म्हणजे पांगळ्याने हिमालयाच्या शिखरावर चढण्यासारखे तु. दासांस वाटते. ही शक्ति मिळावी म्हणून प्रार्थना करीत आहेत.

(क) गिरिवरी गिरिश्रेष्ठावर, गिरिवर - महापर्वत. लंगड्याने जिना चढणेसुद्धा फार कठीण, तो पर्वतावर चढणे शक्य नाही. ही काव्यरचना महापर्वतशिखरासारखी म्हणून अत्यंत दुर्गम हे सुचविले.

(ख) चढण्याचे कार्य पायांचे आहे. पायांची देवता वामन म्हणजे विष्णुच आहे. वामन विष्णुचाच अवतार. भागवतात हरि (विष्णु) पायांची देवता सांगितली आहे. 'पादौच निरभिद्येतां गतिस्ताभ्यां ततो हरिः' (भाग ३/२६/५८) पाय फुटले, त्यांत गति आली व तीत विष्णु स्थित झाले; म्हणून विष्णूला प्रार्थना सयुक्तिक आहे.

(५) कलिमलदहन – तुलसीदासांचा अवतार कलियुगांत झाला; व

'कलि केवल मलमूल मलीनहि । पापपयोनिधि जनमनमीनहि' ॥१/२७/४॥

दहन – अग्नि, जाळणारा याने सुचविले की कलियुगातील पापे, हे एक अरण्य आहे. 'पापनाशन' विष्णूचे नांव आहेच.

(६) द्रवु तो – त्याला द्रव फुटो, दया येवो हे परम दुष्कर व दुर्गम कार्य करण्यास लागणारी शक्ति तो मला देवो. प्रेमभक्ति देवोत हे सुचविले.

(क) तो दयाल द्रवु. तो दयालु आहे अणि मी मूक पंगु म्हणजे अति दीन आहे हे, सांगून दयाल - दीनदयाल हे सुचविले.

'मज सम दीन व दीनहित तुम्हांसम किं रघुवीर' (७/१३०रा)

या दोह्याने दीनतेचा स्पष्टपणे उपसंहार केला आहे व येथे उपक्रम सुचविला आहे. दीनबंधु दयाल 'जो सहज कृपालू दीनदयालू करो अनुग्रह कांही' (१/१८६/१) यांत विष्णुविषयीच म्हटले आहे.

(ख) प्रभु केव्हा व कशाने द्रवतात पहा.

'वेगे ज़िने द्रवे मी भाई । ती ममभक्ति भक्तसुखदाई' (३/१६/२) हे रामवचन आहे.

'भक्ती जीने करा प्रभु दया' (३/१४/८) लक्ष्मणवचन आहे.

(ग) भाव हा की मी 'कलिमलग्रसित विमूढ' (१/३० म) आहे. या सर्व पापांतून मुक्त करण्याची दया मजवर करा, मी दीन आहे पण आपले चरित्र गाण्याची फार लालसा आहे, परंतु ते फार दुष्कर व दुर्गम आहे, म्हणून मला जरूर ती शक्ति देऊन मजकडून आपल्या दयेने ते करवून घ्या.

ल. टे. – 'मूकं करोति वाचालं' या श्लोकात लंघयते म्हणजे पर्वताच्या पलीकडल्या बाजूस नेवविते असा अर्थ आहे. यात पर्वतशिखरावर चढणे नाही, पराधीनता आहे. वन्दन कशासाठी ते सुचविलेले नाही.

(क) हा सोरठा कोणी रामपर तर कोणी सूर्यपर घेतात. कोणी विष्णुपर घेतला आहे. सूर्यपर रामपर लावण्यास दिलेली कारणे व पुरावे सबल व सयुक्तिक वाटत नाहीत (मा. पी.)

संगति – पुढील सोरठा शेषशायी नारायणपर का याची मीमांसा मागील टीकेत पाहावी.

हीं.- नील सरोरुह स्याम तरुन अरुन बारिज नयन ।
करउ सो मम उर धाम सदा छीर सागर सयन ।।मं ३।।

म.- नील सरोरूह शाम तरुण अरुण वारिज नयन ।
करो हृदयी मम धाम, सदा क्षीर-सागर शयन ।।मं. ३।।

अर्थ – जे नील कमलासारख्या श्याम वर्णाचे आहेत. ज्यांचे नेत्र नवीन फुललेल्या (तरुण) लाल (अरुण) कमला (बारिज) सारखे आहेत व जे सदा क्षीरसागरात शयन करतात ते प्रभु सदा माझ्या हृदयात घर करोत (राहोत).

टीका – (१) नील सरोरुह शाम – सरोरुह (सरः+रूह) तलावात वाढणारे' उगवणारे कमल. नील कमल सुंदर व कोमल असते. तसे जे शरीराने सुंदर व कोमल असून चित्ताने ही कोमल आहेत. नवीन फुललेल्या कमळात सौंदर्य, कोमलता, प्रसन्नता, सुगंध, मधुरता, सरसता, तेजस्विता आणि अलिप्तता या आठ गुणांचे अस्तित्व असते हे मानसातील उदाहरणांनी दाखवून हे गुण प्रभूच्या ठिकाणी असल्याचे मानसवचनांनी (१/१४६ च्या) टीकेत सिद्ध केले आहे. 'सरोरुह' ने सहज प्रगट होणे सुचविले आहे; म्हणून सरोज शब्द वापरला नाही.

(क) श्यामवर्ण शृंगाररसाचा व शुद्ध सत्वगुणाचा द्योतक आहे. श्वेत सत्वगुण, पीतरक्त रजोगुण व कृष्ण - काळा तमोगुण द्योतक आहे.

(२) तरुण अरुण बारिजनयन – नवीन पूर्ण फुललेल्या कमलात वर दाखविलेले आठ गुण पूर्णत्वाने असतात ते जसे जुने होत जाईल तसे दिवसेंदिवस हे गुण

कमी होत जातात. म्हणून येथे तरुण शब्दांने गुणांची शाश्वतता सुचविली. नेत्रांच्या ठिकाणी मुख्यतः येथे प्रसन्नता, कोमलता, व सरसता (प्रेम-रस) हे गुण अपेक्षित आहेत. हृदयांत येऊन राहण्याची कृपा केली पाहिजे, कृपा करण्यास हृदय कोमल पाहिजे, हृदयांत राहिल्यावर प्रेमरस पाझरण्यास सरसता पाहिजे.

(३) सदा क्षीरसागर शयन यांतील सदा शब्द मागल्या चरणाबरोबर ही घेणे जरूर आहे. सदा राहोत. 'क्षीरसागर शयन' ने शेषशायी नारायण सुचविले व यांचा रामावतार सुचविला.

(क) नारायण जसे सदा क्षीरसागरांत शयन करतात तसे त्यांचे अवतार राम सदा माझ्या हृदयात राहोत हा भाव ध्वनित आहे. हा अर्थ घेतल्याने शंकेला जागा राहत नाही. कोणी शंका घेतात की तुलसीदास द्विभुज-रामाचे उपासक असून त्यांनी चतुर्भुज शंखचक्र गदापद्मधारी, पद्मनाभ, महालक्ष्मीसेवित नारायणाला हृदयात बसविण्याचा प्रयत्न का केला.

(५) 'सदा करो हृदयी मम धाम' – अदृश्य सगुणनिराकार रूपाने भगवान सर्व जीवांच्या हृदयांत राहतातच. तरी देखील सर्वजीव दुःखी कष्टी, मानसरोगी असतातच.

'असुनि असा प्रभु हृदिं अविकारी । दुःख दैन्यजगजीवां भारी ॥' १/२३/७)

जोपर्यंत सगुण साकार रूपाने प्रगट होऊन हृदयनिवासी होत नाहीत तो पर्यंत दुःख, दैन्य, ताप-संताप इत्यादिचा अंत होत नाही.

हृदयिं वसति खल नाना तोंवर । लोभ मोह मद दंभ नि मत्सर ॥
जो हृदयीं न वसति रघुनायक । तूण कटी, धृत कार्मुक सायक ॥
ममता तरुण तमी अंधारी । द्वेष राग घुबडां सुखकारी ॥
तोंवर जीवांचे मनि राही । प्रभुचा प्रताप रवि जो नाही ।५/४७।१- ४)

मागल्या सोरठ्यांत हे मागणे मागता आले नाही म्हणून येथे मागितले. दया करा असे पूर्वी विनविले व ती दया कशा प्रकारची हे येथे स्पष्ट केले. वरील अवतरणात 'तरुण शब्द तमी-रात्रीचे विशेषण आहे; तोच येथे 'तरुण अरुणवारिज यांत आहे. प्रकाशसूचक रवि वरील अवतरणांत आहे तर येथे 'धाम' प्रकाश हा शब्द आहेच. धामन् आणि धाम हे दोन्ही शब्द संस्कृतच आहेत. (अ.व्या.सु.प.) धाम - प्रकाश घर, स्थान असे अर्थ आहेत. भगवान स्वयंप्रकाशरूप आहेत ते हृदयांत येऊन राहिले की विज्ञान रूपी निर्मल स्वच्छ प्रकाश 'आत्म अनुभव सुख प्रकाशहि' आणि 'रामभक्तिरस' हृदयात पसरणारच.

संगति – राम भक्तीलाच वश होऊन

'हृदय कमलिं त्यांचे सदा करतो मी विश्राम' (३/१६) असे म्हणतात व

'शंकरभजन विना नर भक्ति न मम लभतात' (७/४५)
'कृपा पुरारि न करिति जयासी ।
भक्तिलाभ मम मुनि ! न तयासी (१/१३८/७)

असेहि म्हणतात, म्हणून पुढील सोरठ्यात शंकराची कृपा भाकतात -

हिं.- कुंद इंदु सम देह उमारमण करुनाअयन ।
जाहि दीन पर नेह करउ कृपा मर्दन मदन ॥मं ४॥
म.- कुंद इंदु सम देह उमारमण करुणायतन ।
जो करि दीनी स्नेह करो कृपा मर्दन मदन ॥मं ४॥

अर्थ — कुंदाचे फूल व चंद्र यांच्यासारखे (गौरवर्णाचे) ज्यांचे शरीर आहे जे उमापति (उमेच्या ठिकाणी रममाण होणारे) व करुणेचे निवासस्थान आहेत (करुणा+अयन=आयतन) जे दीनांवर स्नेह करतात व जे मदनाचा विनाश (मर्दन) करणारे आहेत ते माझ्यावर कृपा करोत ॥४॥
सूचना — या सोरठ्याचेहि विविध अर्थ केले गेले आहेत. या पाच सोरठ्यांत पंचायतन देवतांचे स्मरण केले आहे असा पूर्व ग्रह ज्यांनी करून घेतला, त्यांना देवी विषयक आधार कुठे सापडेना, तो 'उमा' शब्दाने यांत मिळाला व मग तर्क, शंका, समाधान शब्दांची कसरत इत्यादि गोष्टी सुरू झाल्या. मूळ सापडले नाही म्हणजे खूळ लागते व कोणत्या तरि शब्दाची काल्पनिक अर्थाशी जूळ घालून धूळफेक केली जाते. येथील उमारमण व मदन मर्दन आणि कुन्द इंदुसम देह' यांच्या साहचर्याने हा सोरठा शंकराविषयी आहे यांत संशय राहत नाही.
(क) 'गुरुविण नोहे ज्ञान' (७/८९)
'सकल फलहि हरिभक्ति सुशोभन । संतकृपेविण कुणाही लाभ न' (७/१२०/१८) आणि मागे 'संगति' यात दिलेली अवतरणे हेच सांगतात की शंकररूपी गुरूनाच येथे प्रार्थना केली आहे. पूर्वी वन्दे बोधमयंनित्यं गुरुं शंकररूपिणम् यात, वंदन केले आहे. त्या श्लोकाचाच हा विस्तार आहे.
(ख) असे न मानल्यास हिंदी मंगलाचरणांत शिवरूपी गुरूंचे स्मरण नाही असे ठरेल. कोणी म्हणतात की संस्कृतांत केले आहे व द्विरुक्ति टाळली; तर मग कांही श्लोक रामपर लावण्याचा व्यर्थ खटाटोप कां केला शंकेखोरांनी?
टीका — १ कुन्द इन्दु सम — कुन्दाचे फूल श्वेतवर्णाचे, कोमल व सुगंधी असते; कमलांतील तीन गुण प्रसन्नता, कोमलता व सुगंध यांत असतात. परंतु विशालता सौंदर्य व अलिप्तपणा नसतात.
(क) इन्दु ने शीतलता, तापनिवारकत्व, सौम्यप्रकाशमयता, सुधामयतादि गुण सुचविले.

'कुन्द इन्दु दर गौरसुन्दरं अंबिकापतिमभीष्ट सिद्धिदं ।
कारुणिक कलकञ्जलोचनं नौमि शंकरमनंगमोचनम ।। (म.श्लो. ३ उ.कां.)

या श्लोकांत वरील सोरठयाचाच अर्थ उपसंहार कांडात विस्तारला आहे. त्या श्लोकांत शक्तीला नमन आहे असे टीकाकार म्हणत नाहीत.

(ख) येथे काठिण्य गुणाची जरूरी नसल्याने काठिण्य - गंभीरता सूचक दर - शंख येथे नाही.

(ग) वरील दोन उपमांतील गुणांनी गुरूंच्या कांही गुणांची सूचना दिली आहे. श्वेतवर्ण सत्वगुण प्रसन्नता, कुन्द - कोमलहृदय इन्दु ने हृदयाची विशालता, औदार्य, शीतलता = अक्रोधता, व त्रितापनिवारणशक्ति; प्रकाशाने ज्ञानपूर्णता, सुधामयतेने पराभक्ति सुचविली. पुढील शब्दांनी आणखी कांही गुण सुचवितात.

(२) उमारमण – उमा - ब्रह्मविद्या (के.उ.प) ओः महेशस्य मा - लक्ष्मी = ऐश्वर्य = उमा; महेशाचे जे ऐश्वर्य ती उमा, म्हणून उमारमण म्हणजे ब्रह्मविद्येत सदा रममाण असणारे = बोधमय (मं. श्लो. ३) आत्मरत, आत्मक्रीडः आत्ममिथुनः (श्रुति) येथे ब्रह्मनिष्ठता व श्रोत्रीयता सुचविली.

(क) करुणायतन – करुणेचे आयतन - निवासस्थान. 'अयन' चा कोषोक्त अर्थ वर्त्म, मार्ग, गमन असा आहे पण हिंदीत स्थान गृह, आयतन या अर्थाने वापरला आहे. 'ऐन' असे ही त्याचे लेखन करतात व मदन-मैन होतो.

(ख) गुरु करुणाशील, कृपाळू स्वभावाचे पाहिजेत, पण ही कृपा पात्र पाहून केली पाहिजे हे पुढे सुचवितात.

(३) जो करि दीनी स्नेह – दीन शब्दाने सुचविले की शिष्य अनन्यगतिक, कर्तृत्वादि अहंकार रहित व साधनाहंकारादिकांपासून दूर राहणारा विनम्र असावा. (स्नेह-नेह). तुलसीदास दीन आहेत हे पूर्वीच दाखविले आहे.

(क) मर्दनमदन – मदन मर्दन; मदन = काम, सुचविले की गुरु निष्काम, जितकाम असले पाहिजेत व अधिकारी शिष्याच्या ठिकाणचे कामादिक वासनांचे मर्दन करण्याची शक्ति पाहिजे.

(ख) या विशेषणाने शंकराचे ऐश्वर्य सुचविले, कुन्द इन्दुसम याने रूप, उमारमणाने नाव, करुणायतन ने गुण, दीनी स्नेह ने स्वभाव व मदनमर्दन ने लीला सुचविली. यांत बालकाण्डातील उमाचरित्र व शंकर चरित्र सुचविले.

वि.सू. – १ मानसांत गुरुलक्षणे स्वतंत्रपणे कोठेहि सांगितलेली नाहीत. येथे उपक्रमरूपाने सुचविली. पुढील सोरठा व दोहा एकच्या चौपायांत विस्तार केला, अरण्य काण्ड मंगलाचरण श्लोक १ मध्ये अभ्यासरूपाने सुचविली आहेत आणि संतलक्षणांत व उत्तर काण्डात इतस्ततः उपसंहार रूपाने सुचविली आहेत.

(२) वरील चार सोरठ्यांत वंदन-नमन सूचक शब्द नाही; कोणाचे वर्णन आहे त्याचे नाव स्पष्ट नाही व प्रथम सोरठ्यांत स्मरण आहे.

शंका – उमारमण व मदनमर्दन हे शब्द परस्पर विरोधी आहेत.
समाधान – मदनाचा देह जाळला, मदनाला नाही जाळला.
'रति तव नाथा येथुनी होइल नाम अनंग। व्यापिल वपुविण विश्वतो...' (१/८७)
असा वर मदनमर्दनानेच दिला आहे हे शंकेखोर विसरले.
संगति – शंकर त्रैलोक्य गुरु असले तरि त्यांचा प्रत्यक्ष उपदेश मिळण्याचे भाग्य अवतारी पुरुषांनासुद्धा फार क्वचित लाभते. पण तेच देहधारी गुरुरूपाने भेटून शिष्याच्या अधिकाराप्रमाणे त्यास परमार्थ मार्ग दाखवून उपदेश करतात. म्हणून ज्यांच्या कृपेने गोस्वामीस राममंत्रानुग्रह व रामचरितमानसादि उपदेश मिळाला त्या नररूप हराला पुढील सोरठ्यात वंदन करतात.
(क) वर सुचविलेल्या गुरुलक्षणांनी संपन्न गुरुरूपाने शंकरच केव्हा भेटतात या बद्दलचा भरभक्कम आधार आधी देऊन पुढील सोरठा टीका लिहिली जाईल. श्रीमदाद्यशंकराचार्य सर्ववेदान्तसिद्धान्त-सार-संग्रहात म्हणतात,

'जन्मानेकशतैः सदादरयुजा भक्त्या समाराधितो ।
भक्तैर्वैदिकलक्षणेन विधिना संतुष्ट ईशः स्वयम् ।
साक्षाच्छ्री गुरुरूपमेत्य कृपया दृग्गोचरःसन् प्रभुः ।
तत्त्वं साधु विबोध्य तारयति तान् संसारदुःखार्णवात् '॥२६४॥

शेकडो जन्मांत सात्त्विक श्रद्धायुक्त, वैदिक, पद्धतीने व विधिपूर्वक जेव्हा भक्त ईशाची उत्तम आराधना करतात तेव्हा (एखाद्या जन्मात) ते प्रभु-ईश म्हणजे शंकर संतुष्ट होऊन साक्षात गुरुरूपाने दृग्गोचर होतात- भेटतात. मग ते उत्तम प्रकारे तत्त्वबोध देऊन संसाररूपी दुःखसागरातून त्या शिष्यजीवाचा उद्धार करतात. याच ग्रंथात आणखी सांगितले की,

'शिव एव गुरुः साक्षात् गुरुरेव शिवः स्वयम् ।
उभयोरन्तरं किञ्चिन्न द्रष्टव्यं मुमुक्षुभिः॥

हे दोन श्लोक चांगले ध्यानांत असावे म्हणजे पुढील सोरठ्यांत 'हर' पाठ का घेतला हे चटकन ध्यानात येईल.

हिं- बंदउँ गुरुपदकंज कृपासिंधु नर रूप हर .... ।
महा मोह तम पुंज जासु बचन रबि कर निकर ॥मं ५॥
म.- वंदे गुरुपद-कंज कृपासिंधु नर रूपहर ।
महामोह तमपुंज यद्वचने रविकर निकर ॥मं ५॥

अर्थ – जे नररूपाने साक्षात हर (शंकर) आहेत व जे कृपासिंधु आहेत त्या गुरूंच्या पदकमलांना (कंज) मी वन्दन करतो (वंदे-बंदउँ) त्यांची वचने महामोह

रूपी अंधकारराशीला सूर्यकिरणांच्या समूहा सारखी आहेत. (येथे वचनेंचा अर्थ रामचरितमानस कथन असा आहे. टी.प.) ॥५॥

ल. ठे. **पाठभेद** – प्रथमावृत्तीत मानसांकानुसार 'हरि' पाठ घेतला आहे. नंतर विचार करताना 'हर' पाठ असावा असे वाटले पुढे मानसावरील विवेचनात्मक हिंदी ग्रंथ वाचताना त्यात 'हर' पाठ आढळला; पण त्यावेळी आधार टिपून ठेवणे झाले नाही. तथापि या आवृत्तीत 'हर' पाठच घातला. पण रुखरुख होतीच की निराधार पाठ कोण मानणार! दृढ विश्वास मात्र वाटत होता की कुठे तरि सापडेल. १०-११-५३ रोजी मा. पी. वाचताना या सोरठ्याच्या टीकांतील शेवटच्या पृष्ठापर्यंत तो कुठे आढळेना; पण परम कृपालु रघुनाथ, निराशा करून लिहिलेले खोडावयास कसे लावणार? शेवटी पृ ७८ व नोट ७ मध्ये आधार सापडला 'हर' पाठभेद सापडला.

## 'हर' पाठच का घेतला?

(१) 'शिवः एव गुरुः साक्षात् गुरुरेव शिवः स्वयम्'

या सिद्धान्तानुसार संस्कृत मंगलाचरणात 'गुरुं शंकर रूपिणम्' ला वंदन केले व येथे 'नर गुरुरूप हर' ला केले.

(२) सोरठावृत्ताच्या दुसऱ्या व चौथ्या चरणांत यमक पाहिजेच असा नियम नसताहि मागील चार सोरठ्यांत अंत्ययमके आहेत. वदन सदन, गहन दहन, नयन शयन; अयन मयन, अशी यमके हर कर यांत सहज साधतात. ज्या हेतूने मंगलाचरणाच्या चार सोरठ्यांत अंत्ययमके वापरली व सौंदर्यवृद्धि व नाद सौष्ठव वाढविले तो हेतु 'हरि' 'कर' यांनी साधत नाही.

(३) पुढील चौपायांत गुरुदेहाला शंभुतनु म्हटले आहे.

(४) 'ज्ञानं महेश्वरादिच्छेत्'; या सोरठ्यातच अज्ञान तमोनाश हा विषय आहेच.

(५) संस्कृत श्लोकांत शिवालाच गुरु म्हटले आहे.

(६) अरण्यकांड मंगलात गुरुरूपानेच शंकरांस वंदन आहे.. (टी. प.)

(७) रामचरितमानस परंपरा शिवापासूनच आहे.

(८) उत्तरकांडात ग्रंथोपसंहाराच्या श्लोकात इतर कोणाचा उल्लेख नसून शंकराचाच मानसपरंपरेचे आद्यगुरु असल्याने उल्लेख आहे.

(९) 'हर' पाठाची परंपरा पण अस्तित्वात आहे.

(२) हा पाठभेद ('हर' चा 'हरि') का झाला

(१) गोस्वामींच्या गुरूंचे नांव नरहरि आनंद होते म्हणून त्यांच्या भक्तांस वाटले की 'नर रूप हरि' नरहरिच असावे आणि हर चुकून पडले असावे, म्हणून कोणी तरी मानसलेखकाने 'हर' चा 'हरि' केला असावा.

(२) तुलसीदासांच्या हातची पोथी कुठेच उपलब्ध नाही त्यामुळे अनेक महत्वाच्या ठिकाणी पाठभेद झाले आहेत. काही लेखकांच्या प्रमादाने झाले आहेत. काही पदच्छेद न समजल्याने, तर काही पूर्वापार संदर्भ व भावार्थ लक्षात न आल्याने. मराठी प्रथमावृत्तीत सुद्धा मुद्रणे तपासणारांस अर्थ न समजल्याने 'कन्दावदातं' चे 'कुन्दावदातं' 'विबुधीं' चे 'विबुधा' केले गेले आहे.

**टीका** – १ या सोरठ्यापासून दो २/२ पर्यंतच्या १४ ओळींत उपक्रमोपसंहारादि सहा लक्षणांसह अनुबंध चतुष्टय सांगून गुरुवंदनाच्या निमित्ताने गुरुभेटीपासून पुढील गुरुउपासनेचा विधि व त्याचे फळ क्रमशः फारच गंभीर, मनोहर रीतीने सांगितले आहे, हे पाहिले म्हणजे कवीच्या अन्य प्रतिभेचे व काव्य कलेचे कौतुक करावेसे वाटते व कोणासही वाटेल, पण भावरसग्रहणशीलता मिळेल तेव्हाच हे घडेल. त्यासाठी मधुप झाले पाहिजे किंवा मधुकरांनी संग्रहीत मधाचे मोहोळ मिळाले पाहिजे. 'मधुनि लिल्युरशेषरूपा.' (भाग.) ग्रंथात सर्वरसांचे मिश्रण असते.

(क) **वन्दे गुरुपदकंज** – (१) याने गुरु उपासना हा विषय सांगितला

(२) तिसऱ्या चौपाईतील 'सुकृति-सुकृती'ने अधिकारी सांगितला,

(३) 'यद्वचने रविकरनिकर' याने श्रोतावक्ता - आश्रित-आश्रय संबंध सांगितला,

(४) 'शमन सकलभवरुज परिवारू' ने मोह नाश व ज्ञानप्राप्ति हे प्रयोजन सांगितले.

(५) 'वर्णिन रामचरित भवमोचन', याने रामभक्तिरस सुचविला आहे. पुढे यथास्थान साधार विवेचन आहे.

(२) **वन्दे** – मी वंदन करतो. मागील चार सोरठ्यात वंदन वगैरे नाही, येथे या पदाने प्रकरण भेद सुचविला.

(क) मानसातील नमनप्रकरण फार मोठे आहे. आतापर्यंत रामचंद्रादि देवांना वंदन केले. हे देव सर्वांहून श्रेष्ठ व नित्यलोकनिवासी म्हणून त्यांना प्रथम वंदन केले. त्यानंतर मृत्यूलोकात निवास करणारांचे त्यांच्या अधिकार क्रमाने वंदनादि करतात.

(ख) गुरू हे सर्व देवमय, सर्वतीर्थमय, वेदस्वरूप व सर्वांत श्रेष्ठ असल्याने प्रथम त्यांना वंदन करतात. 'सर्वदेवमयोगुरुः'

> **'तीर्थानि दक्षिणे पादे वेदास्तन्मुखमाश्रिता.'**
> **'गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वर.'** (गु.गी.)

(ग) वन्दे या पदानें गुरुभक्ति, नम्रता व शरणागति सुचविली. अद्याप पायाला स्पर्श करण्याचा शिष्याचा अधिकार नाही म्हणून नुसते दुरून वंदन - साष्टांग प्रणाम सांगितला.

(३) **गुरुपदकंज** – (क) अज्ञान मोह - भ्रम-संशयादींचा संहार करून ज्ञानरूपी प्रकाश देणारे ते गुरु (गु.गी.)

(ख) पद-पद्यते, गम्यते इति पदम्, पाय, आत्मपद, निर्वाण पद देणारे.

(ग) कंज – कमल, जलांत जन्मलेले. कं. जलं कं सुखं, येथे दोन्ही अर्थ आहेत. या भवसागरजलातच ते जन्मले असले तरि कमलाप्रमाणे त्यापासून अलिप्त असतात हा भाव. कं सुख जेथून जन्मते ते. सुखाचे जन्मस्थान ते सच्चिदानंद स्वरूप. ते स्वतः मायामोहातून सुटलेले असल्याने व सुखाचे घरच असल्याने ते नित्यसुख देऊ शकतात. 'ब्रह्मानन्दं परमसुखदं'

(४) कृपासिंधु – कृपेचे सागर. कृपासिंधु - विशेषण मानसात गुरु, शंकर, राम व लक्ष्मण यानाच लावले आहे व त्याने त्यांच्यात अभेद सुचविला आहे. कृपासिंधु शब्द गुरु भावनेने, राम भक्तिभावनेनेच वापरला आहे.

'कृपासिंधु मुनि दर्शनि तुझे । चारी पदार्थ करतलिं माझें' (१।१६४।७) ज्याला हे म्हटले तो कपटमुनि प्रतापभानूचा गुरु आहे.

(५) नररूप हर – हर - शंकर, हर - हरण करणारे. काय हरण करतात हे पुढील अर्धांत सांगितले आहे. गुरु शंकराचे प्रत्यक्ष स्वरूप आहे हे सुचविले. 'गुरुः एव शिवः साक्षात्' हे येथे दाखविले

(क) महामोहतम पुंज – महा-अतिशय, मोह-अज्ञान, भ्रम, संशयादि. तम-अंधार. तमस् आणि तम हे दोन्ही शुद्ध संस्कृत शब्द आहेत. (अ.व्य.सु.) पुंज-रास, ढीग, अज्ञानरूपी घनदाट काळोख-अंधार. हा जीवाच्या हृदयाला दाट व्यापून असतो. त्याचा नाश करण्यास प्रकाश-सूर्यप्रकाश किरण पाहिजेत. (मं.सो.५)

(६) यद्वचने रविकर निकर – यद्वचने (जासु वचन, ज्याची वचने) येथे हिंदीत वचन शब्द असल्याने व कोणता किंवा कोणते वचन हे स्पष्ट सांगितले नसल्याने आणि मोह विनाशाचा संबंध असल्याने महावाक्योपदेशरूपी वचने असा अर्थ घेतात. हा सोरठा हे एक कमल आहे.

'छंद सोरठा दोहा मंजुल । शोभे बहुरंगी अंबुजकुल'

हे कमल कोणत्या तरि कमलिनीचें फूल असणारच. ती कमलिनी चौपाई सापडली की तुलसीदासांचा भावार्थ सापडेल व टीकाकारांनी केलेले अर्थ योग्य की अयोग्य हे ठरेल.

(क) 'महामोह महिषेश विशालहि । रामकथा कालिका करालहि ॥' (१।४७।६) महामोहरूपी विशालमहिषासुराला मारणारी कराल कालिका म्हणजेच रामकथा.

'विण सत्संग न हरिकथा त्याविण मोह न जाता' (७।६१)

यांत- गुरुमुखाने हरिकथा श्रवण हेच मोहनाशाचे साधन सांगितले आहे.

'रामकथा सुंदर करटाळी ।' संशयविहगां दूर पिटाळी॥' (१।११४।१)

ही दोन्ही तिन्हीं वचने ज्यांची आहेत त्यांनी रामकथा सांगूनच मोह, महामोह, इत्यादींचा संहार केला आहे. पहिले वचन याज्ञवल्क्यांचे व दुसरे व तिसरे शंकरांची

आहेत. याज्ञवल्क्यानीं भरद्वाजाचा व महेशांनी पार्वतीचा मोह घालविला आहे. 'रामकथा सुंदर करटाळी।' इत्यादि उपक्रम करून महेशच म्हणतात की

'श्रुणु गिरिराजकुमारि! भ्रमतम रवि कर वचन मम॥' (१।११५)

येथे पण 'मोहतम' व 'रविकरवचन' आहेतच.

'भ्रमसंदेहमोह निज हरणी। करूं कथा भवसरिता तरणी॥' (१।३१।४).
'तदा सकल संदेहां भंग। जैं बहुकाळ करिति सत्संग ॥'
'तिथें रुचिर हरिकथा ऐकणें । ज्या वर्णित बहुपरीं मुनिगणे॥'
'श्रवणें जाति शीघ्र संदेह । रामचरणिं अतिउपजे स्नेह ॥'
(७।६१।४,५,८)

हे शंकरांनी महामोहग्रस्त गरुडाला सांगितलें आहे. यावरून ठरले की यद्वचने म्हणजे ज्यांच्या मुखानें कथित रामचरित्र. संत=सद्गुरू मुखाने राम कथा श्रवण केल्या शिवाय मोह, महामोह, जात नाही हा मानस सिद्धांत आहे.

ल.ठे. – या सोरठ्यात तमपुंज शब्द आहेत म्हणून रविकर निकर म्हटले. दो २१५ मध्ये 'भ्रम (मोह) तम' आहे, पुंज नाही, म्हणून तेथे रविकरच आहे निकर-पुंज-समूह नाही. उपमा-दृष्टान्त आदि देताना इतका सूक्ष्मभेद अथपासून इतिपर्यंत रक्षण करण्याची दक्षता तुलसी मानसातच दिसते. 'उपमादिकांतील ससंबद्धता' हे प्रकरण प्रस्तावनेत पहावे.

(क) पुंज शब्द येथे घालून सुचविले की पार्वतीचा मोह इतका अपार नव्हता म्हणून एका किरणाने - थोड्याशा कथनाने मोह नष्ट होण्यासारखा होता. घडलेही असेच. दोहा ११९व्या नंतरच पार्वतीने कबुली दिली आहे. की,

'फिटे मोहशरदातप अतितर' (१/१२०/१ अवघ्या चार दोह्यांनीच मोहनाश झाला, पण तुलसीदासांना

'बारंवार परी गुरु सांगती' (१।३१।१) अनेक वेळा गुरुमुखाने -नररूपहर मुखाने- रामचरित श्रवण केले तेव्हा काही समजले असे तेच म्हणाले आहेत. सद्गुरू रवि बिंबांतून पसरणाऱ्या रामचरितमानस कथा वचने रूपी किरणांनी महामोहांधकाराचा ढीग नष्ट होतो हे निश्चित ठरले.

येथील महामोह शब्दाचा अर्थ ईश्वरचरित्र-लीलाविषयी मोह असा टीकाकार घेतात पण तो वस्तुस्थितीशी विसंगत आहे. भरद्वाज, सती व गरूड यांना ईश्वराविषयी मोह झाला होता हे खरे; पण तुलसीदास व लोमशांकडे गेलेला विप्र यांना ईश्वराविषयी मोह झाला नव्हता.......

हिं.- 'बंदउ गुरूपद पदुम परागा । सुरुचि सुबास सरस अनुरागा' ॥१॥
म.- 'वंदे गुरू-पद-पद्मपरागा । सुरुचि-सुवास सरस-अनुरागा' ॥१॥

अर्थ – मी गुरूच्या चरणरूपी कमलांतील (पद्म-पदुम) परागांना वंदन करतो. त्यात सुरुचिरूपी सुवास-सुगंध असून ते अनुराग रसाने युक्त आहेत. (स-सह,रस)
टीका – या चौपाईचे (मा.पी.) नऊ निरनिराळे अर्थ दिले आहेत; पण त्यातील पृ ७९ वरील 'अर्थ२' तेवढा साधारण बरा वाटतो. त्या लेखकांना या चौपाईच्या अर्थाची किल्ली दुसऱ्या एका चौपाईरूपी पेटीत ठेवलेली सापडली नाही.
(१) मागील सोरठ्यात गुरुचरणाचे रूपक कमलाशी केलेलेच येथे चालू ठेवले आहे. असे असून पुढील चरणातील चार शब्द कोणी वेगवेगळे घेतले आहेत, तर कोणी सुरुचि, सुवास व अनुरागरूपी रस असे तीन घेतले आहेत, कोणी एकानीच सुरुचि सुवास व अनुरागरूपी सुंदर वा सम्यक प्रकारचा रस अर्थ केला; म्हणून त्यास 'साधारण बरा' असे वर म्हटले. ज्या चौपाईने निःसंशयपणे अर्थ निश्चय होतो ती पहा.
(२) कमळात, पाकळ्या वगैरे सोडून, तीनच पदार्थ असतात, पराग, रस-मकरंद आणि सुवास. तुलसीदासांनीही तीनच वर्णिले आहेत.

**'छंदसोरठा दोहा मंजुल । शोभे बहुरंगी अंबुज कुल ॥**
**अनुपम अर्थ सुभाव सुभाषा । गणुं पराग मकरंद सुवासा॥'** (१।३७।५-६).

चालू चौपाईत परागांचा उल्लेख प्रथम चरणात आहे; म्हणून शेष राहिले मकरंद व सुवास हे दोनच. त्याचेच रूपक अनुराग व सुरुचि यावर केले आहे. यावर कोणी अशी शंका घेतात की असे अर्थ घेण्यास चालू चौपाईत दुसरे क्रियापद नाही; पण मूळातील (३७।६)

**'अरथ अनूप सुभाउ सुभासा । सोई पराग मकरंद सुवासा'**

यात क्रियापद मुळीच नाही व पुढल्या दोन चौपायात ही नाही. समजा, माना, गणा किंवा आहेत हे क्रियापद अध्याहृत घ्यावेच लागते. वरील आक्षेप 'द्राक्षे आंबट' म्हणण्यासारखा आहे. सुरुचि हाच सुवास व अनुराग हाच रस-मकरंद हे मानसाधारे ठरले.

**'पदकमलपरागा रस-अनुरागा मम मन मधुप करी पाना'** (१।२११।३)

पदरूपी कमलातील परागात असलेला रस म्हणजे अनुराग हे अगदी स्पष्ट झाले.
(क) सु-रुचि-उत्तम रुचि-चांगली रुचि=सद्वासना, व अनुराग=रामपदप्रेम, 'हरिपदरति-रस वेद वदे कल' (१।३७।१४). कोणी सुरुचि आदींचा संबंध शिष्याकडे घेतात तो हास्यास्पद आहे, हे मानस अवतरणांनीच स्पष्ट कळते.
(३) कमल परागातील सुगंध इतर सर्व जीवांना लांबून मिळू शकतो. जो परागांना स्पर्शकरील त्याच्या अंगास ते लागतात; पण मकरंद मधुपानांच पिता येतो; मधुकर

तो घेऊन संग्रह करतात व दुसरे कोणीतरी त्या मधुचे ग्रहण करतात. सार हे की कमलातील हे तीन पदार्थ दुसऱ्यासाठी परंतु कमलातच असतात. शिष्य गुरूसंगतीत राहू लागला म्हणजे पदपरागास स्पर्श करण्यापूर्वीच त्याला सद्वासनारूपी सुगंध मिळतो. पायावर मस्तक ठेवले म्हणजे हातांना व मस्तकाला पदरजांचा-परागांचा लाभ होतो; व शेवटी तो मधुप बनला म्हणजे त्या परागातील हरिपदरति रस मिळतो व तो तृप्त होतो, म्हणजेच कृतकृत्य होतो. ज्ञानाच्या सप्तभूमिकांपैकी सद्वासना ही पहिली भूमिका आहे. सुविचारणा, तनुमानसा, सत्वापत्ति, असंसक्ति, पदार्थाभाविनी व तुरीया या पुढील उत्तरोत्तर श्रेष्ठ सहा भूमिका आहेत. हरिपदानुराग ही भूमिकातीत स्थिती आहे.

संगति — या चौपाईत पहिली आणि भूमिकातीत स्थिति गुरुपादसेवनानेच मिळतात हा सिद्धांत सांगून पूर्वी सांगितलेल्या प्रयोजनाचा व त्यातील रसाचा अभ्यास—पुन्हा उल्लेख, केला.

(क) रामप्रेमामृताची प्राप्ति होण्यापूर्वी अज्ञानादिकांचा नाश होऊन विमलज्ञानाची-विज्ञानाची-प्राप्ति व्हावी लागते. अज्ञान मोहादिक भवरोग व त्यांचा परिवार आहे. रोगनाशास औषध लागते. तेच पुढील चौपाईत सांगतात.

हिं.- **अमिय मूरिमय-चूरन-चारू । समन सकल भव रूज परिवारू ॥२॥**
म.- **अमृत-मुळीमय चूर्ण सुचारू । शमन सकल भवरुज परिवारू ॥२॥**

अर्थ — (श्री गुरूमहाराजांच्या पायांची धूळ ही धूळ नसून) अमृत (अमिय) मुळीमय (भूरिमय) फार सुंदर चूर्ण आहे; व ते भवरोग व त्याचा सर्व परिवार याचे शमन-विनाश-करते. (किंवा भवरोगाच्या सर्व परिवाराचे शमन करते). ॥२॥

टीका — (१) अमृतमुळीमयचूर्ण - अमृताचा धर्म मेलेल्यास सुद्धा जिवंत करणे हा आहे. 'अमृत जीयवी विष करि घाता.' हे चूर्ण अमृत मुळीचेच आहे. अमृतमुळी अमृताने भरलेली असते. तसे हे रज, हे पराग अमृत-मोक्षरूपी मुळीचेच जणू चूर्ण आहे. औषधांत चूर्ण, काढे, मात्रा, रस, गोळ्या, अंजन इत्यादि अनेक प्रकार असतात, त्यातील चूर्णाचा उल्लेख येथे केला.

(क) औषधी अमृतमुळीच्या चूर्णाने शरीरातील स्थूल देहातील एकाद दुसरा रोग फार तर बरा होतो. हिचे तसे नाही. हे चूर्ण भवरोगाचाच विनाश करते हा त्यांतील विशेष आहे. उपमानापेक्षा उपमेयाचे अलौकिकत्व दाखविले ही अपूर्वता दाखविली. अमृत स्वर्गात असते असे म्हणतात; व अमृतमुळी ग्रंथात वर्णिली असली तरी सुषेण वैद्यासारख्यासच ती माहीत असते, हनुमानास सुद्धा ओळखता आली नाही! गुरुपदरज सर्वत्र सुलभ आहे.

**'सकल सुलभ सबदिन सबदेशा । सादर सेवत शमवी क्लेशां'**
(११२।१२)

(ख) सुचारु – फार सुंदर, भाव हा की अमृतमुळी-चूर्णाची चव त्यास प्रतिकूल असतील पण याचे तसे नाही.
(ग) अमृतमुळी-संजीवनिमुळी 'रघुपतिभक्ति मुळी संजीवानि' (७।१२२।७)
रामकथा: 'संजिवनिमुळि भवरोगा ती – । रामकथा श्रुति सूरी गाती' (७।१२९।१)
'रामनामामृतम्' भवभेषज रघुनाथ यश।' या अवतरणावरून भाव निघतो कीं
(२) सद्गुरु पायावर मस्तक ठेऊन, त्यांना शरण जाऊन शिष्याने गुरुमुखाने रघुपति चरित्र श्रवण करून, रामयश, गुण, नाम इत्यादिचें मननरूपी चर्वण केलें पाहिजे. मुळीचे चूर्ण मुखात चर्वण करून खावयाचे असते. हे चूर्ण कर्णरूपी ओठांनी ग्रहण करावयाचे असते. हेच श्रवण, हे औषध अंगी जिरणे म्हणजेच मननाचा निदिध्यास. इतके केले म्हणजे काय होते ते पुढील चरणात सांगतात.
(३) **'शमन सकल भवरुज परिवारू'** – भवरोग सपरिवार नष्ट होतो. भवरोगाच्या परिवाराचे मूळ आहे मोह; त्याच्यापासूनच काम वात, कफलोभ, क्रोध पित्त हे त्रिदोष उत्पन्न होतात. यापासून अनेक शूळ, ममता गजकर्ण, ईर्षाखरूज, परोत्कर्ष सहन न होणे हा क्षय, अहंकार-अर्बुद (कॅन्सर) - तृष्णा जलोदर, मत्सर-अविवेकादि घोरज्वर उत्पन्न होतात. याचे वर्णन उ.कां. मानस रोग विवरणात पाहावे. यानाच रिपु, मायेचा परिवार, कटक, खळ इत्यादि नावे प्रसंगानुसार दिली आहेत. रोगनष्ट झाल्याशिवाय निरोगता, प्रसन्नता, कार्यक्षमता इत्यादि प्राप्त होत नाहीत.

(क) **'सद्गुरू वैद्यवचनि विश्वासहि । संयम हा किं विषय आशा नहि ॥'**
**'रघुपति भक्ति मुळी संजीवनि । अनुपाना श्रद्धा अति पावनि ॥'**
**'सुखे याचपरिं रोग नाशती । ना तर कोटि उपायि न जाती ॥'**
(७।१२२।६-८)

(ख) या चौपाईत मुख्यतः गुरूपादसेवन भक्ति सांगितली. ती कशी करावी हे पाहणे असल्यास श्रीदासबोधात नवविधाभक्ति-दशकांत पाहावे.
(४) येथे कोणी शंका घेतात की चूर्ण स्थूल असते व भवरोग सूक्ष्म असतो तेव्हा हे कसे घडावे? जप तपादि स्थूल असून त्यानी सूक्ष्म देहाची शुद्धि होते, तसेच हे चूर्ण स्थूल असून सुद्धा अदृश्य अशा भवरोगाचे शमन करण्याची अलौकिक शक्ति यात असते.
**संगति** – पुढील दोन चौपायात याच चरणधूलीचे स्मरण सांगून या धूलीने कल्याण कोणाचे होऊ शकेल, म्हणजे गुरुसेवेचा अधिकारी कोण व ती कोणाला मिळू शकते हे सांगतात -

**हिं.- सुकृति संभु तन बिमल बिभूती । मंजुल मंगल मोद प्रसूती ॥३॥**
**म.- सुकृति शंभुतनु विमल विभूती । मंजुल मुद मंगला प्रसूती ॥३॥**

**अर्थ** – (शरीराला लागणारी ही गुरुपद धूलि) सुकृती रूपी साक्षात शिवाच्या अंगावरील विमल विभूति आहे व सुंदर मंगलाची व आनंदाची जननी (प्रसवणारी) आहे ॥३॥

**टीका** – यातील प्रथम चरणाचा अर्थ कितीतरी प्रकारांनी केला गेला आहे व काही ठिकाणी 'सुकृत' पाठ आहे, परंतु सुकृति=सुकृति पाठच योग्य वाटतो.

(क) सुकृति-सुकृती. सत्कर्मकरणारा, धर्मशील–गुरुविप्र धेनु सुरसेवी' (१।२९४।४)

**'तशि न मागता सुख संपत्ती । सहज धर्मशीलासी जमती ॥'**
**'जगी तुम्हांसम सुकृती काही। भूत न, नाही, होणे नाही ॥'**

**पुण्य तुम्हाधिक** – ॥ पावा तुम्ही सतत कल्याणा (१।२९४।३-८) एकेरी रेखांकित शब्द पर्याय आहेत. सुखसंपति मिळेल व कल्याण होईल, असे वसिष्ठ दशरथांस म्हणाले आहेत. त्याच अर्थाचे येथे मुद-मोद, मंगल (कल्याण) प्राप्ति, व गुरुपदरज सेवन हे शब्द आहेत. या अवतरणांची टीका पहावी

(क) सुकृती शब्दाने सुचविले की शिष्य धर्मशील, गुरुविप्रधेनुसुरसेवक असला तरच त्यास गुरुपादरज स्पर्शाने लाभ होईल. भाव हा की चिताभस्म शंकरांच्या अंगावर लागले म्हणजे ते इतरांचेही कल्याण करण्यास समर्थ होते. त्या प्रमाणे गुरुपदधूलि सुकृति शिष्याच्या अंगास लागली म्हणजे आनंदमंगल करते; इतरांच्या लागून असे होणार नाही. येथे तत्वतः गुरुशिष्य अभेदभाव दर्शविला; व दोघांनी पिता पुत्रवत वागावे हे सूचित केले. **शिष्य, सद्ग्रंथनिर्मिति, आराम, जलाशय, पोषित, पुत्र आणि दौहित्र हे सात पुत्र होत.**

(२) **विमल विभुती** – पदांचे दोन अर्थ होऊ शकतात, व दोन्ही घेणे जरूर आहे. विभूती-भस्म व ऐश्वर्य. 'विभूतिर्भूतिरैश्वर्यमणिमादिकमष्टधा (अमर) विमल विशेषण दोन्ही कडे लागते. याने शिव-अंगविभूतिपेक्षा गुरुपदरजरूपी भस्म अधिक पावन असते हे दाखविले

(क) **विमल विभूति** – दैवीसंपत्ती. कारण की अणिमादि ऐश्वर्याने ज्ञानी सुद्धा आरूढपतित होऊ शकतात, तसे दैवीसंपत्तीने होत नाही. 'दैवीसंपद् विमोक्षाय' (भ.गी.) दैवी संपत्तीत

**'स्थिती ज्ञानयोगी, निर्भयता, सत्वशुद्धि नी अवक्रता ।**
**यज्ञ दान दम आणिक तप ही वेदाध्ययनी बहु निष्ठा ॥**
**सत्य अहिंसा क्रोधाभावहि, अपैशून्य नी शान्ति तथा ।**
**भूतदया मृदुला निस्पृहता लज्जा आणि अचंचलता ॥**
**परद्रोह न च साभिमानता, क्षमा धारणा तेज अशी ॥**

(सं.स.गी. १६।१-३) यांचा अंतर्भाव होतो. या विमल विभुतीने पुढील चरणात सांगितलेल्या दोन गोष्टी सहज मिळतात.

(ख) या तीन चौपायात वाङ्मसेवा, शरीराने सेवा, पादसेवनभक्ति सांगून सुकृती हा अधिकारी सांगितला. येथे सुविचारणा व तनुमानसा या दोन भूमिका सुचविल्या. पुढील चौपाईत सत्वापत्ति ही चौथी भूमिका दर्शविली आहे व स्मरणभक्ति सुचविली आहे.

हिं.- जनमन मंजु मुकुर मल हरनी ।। किएं तिलक गुन गन बस करनी ।।४।।
म.- जन-मन-मंजु-मुकुर-मल-हरणी । करत तिलक गुणगणवश करणी ।।४।।

अर्थ – (गुरुपदधूलि-विमलविभूति) सेवकाच्या मनरूपी सुंदर आरशावरील मळ दूर करणारी असून तिचा (कपाळावर) टिळा लावला असता ती गुणसमूहांस वश करणारी आहे ।।४।।

टीका – (१) जनमन-मंजु-मुकुर-मल हरणी – (क) जनमन-जन-दास- सेवक, त्याचे मन. येथे पुन्हा संबंध (सेव्य-सेवक) सुचवून त्याचा अभ्यास केला.

(ख) मंजु-मुकुर – सुंदर आरसा. आरशाचे सौंदर्य त्याच्या निर्मलपणात व यथार्थरित्या बिंबग्रहणक्षमतेत असते. रूपाचे बिंब जसे असेल तसे उमटले पाहिजे तरच तो आरसा मंजु-मंजुल-सुंदर. 'ईश्वर अंश जीव अविनाशी । चेतन अमल सहज सुखराशी' ।।७।११७।२) असा तो मूळात होता व त्यामुळे त्यावेळी त्याचे मन-हृदय अगदी निर्मल होते म्हणून मंजु-मुकुर म्हटले.

(ग) आरशाच्या पृष्ठभागावर मळ नसला म्हणजे त्यात प्रतिबिंब उत्तम यथार्थ दिसतेच असे नाही. कित्येक आरशात विरूप, जाड, लांबट इत्यादि प्रकारचे दिसते. हा अंतर्गत मलाचा परिणाम असतो. म्हणून स्थूल व सूक्ष्म मळ नसले तरच बिंबाचे यथायोग्य रूप त्यात प्रतिबिंबित दिसेल.

(घ) मल हरणी – हृदय-मनरूपी दर्पण जरि स्वभावतः पूर्णनिर्मळ होता तरि त्यात सूक्ष्म स्थूल मळ शिरले तेव्हाच प्रभुवियोग होऊन त्यास जन्म मरण चक्रावर चढावे लागल. निसर्गाची प्रवृत्ति मूळाशी तादात्म्य पावण्याकडे असते, पृथ्वीवरील जल सागरात जाऊन मिळण्याचा प्रयत्न करीत असते. अशी ही सहज गती सर्व विश्वालाच आहे, म्हणूनच त्यास जगत्=गतिशील म्हणतात. या गतीला अडथळे केले गेले म्हणजे दिशा बदलते व मग हे मळ वाढतात जसे 'महियर पडता पाणि गढुळले । मायेने जणु, जीव वेष्टले (४।१४।६). आकाशातून पडणारे जल-पानीय असते, पिण्यासारखे असते, पण त्याला जमिनीचा संपर्क होताच ते बिघडते व गढूळ होते. तसेच जीवाचे. हृदय मायामलांनी गढूळ होते. हृदयाच्या मालिन्यामुळे, मनोमलांमुळे जीवाला दुःखद परिणाम भोगावे लागतात. तो माया-अविद्यावश झाला हाच मोठा अंतर्मल. हा मल काढून टाकण्याचे सामर्थ्य गुरुपदरज विमल विभूतींत असते.

(ङ) आरशावरील मळ काढण्यास धूळच वापरावी लागते. सद्गुरुपायाचे तीर्थ ग्रहण करीत राहिल्याने ही पद धूलि हृदयात प्रवेश करते व बाह्यमळाचे थर, स्थूल मल

नाहीसा होतो, पण सूक्ष्मातिसूक्ष्म मल एवढ्यानेच जात नाही. मनाने सद्गुरू चरणाचे ध्यान करावे लागते म्हणून येथे गुरूपदगुणादिकांचे चिंतन सुचविले. निर्मळाचे ध्यान केले की निर्मळ होणे हा चित्ताचा सहज धर्म आहे. 'यच्चित्तः तन्मयोभवति' (श्रुति)

(२) भगवत्साक्षात्कार निर्गुण किंवा सगुण रूपाने होऊ शकतो. सगुण साक्षात्काराचे मुख्य स्थान हृदय रूपी आरसा. तो मलिन झालेला असतो. निर्गुण साक्षात्काराला दृष्टीची-ज्ञानदृष्टीची अपेक्षा असते. पण जीवाची ही दोन्ही साधने निरुपयोगी झालेली असतात.

**'मुकुर-मलीना नयन विहीना । रामरूप कसं दिसेल दिनां** (१।११५।४) हे **शिववचन** आहे.

**'प्रेमभक्तिजळविण रघुवर तो । अभ्यंतर-मल कधी न जातो ॥'** (७।४९।६) सुचविले की प्रेमयुक्त होऊन गुरुपद कमल परागांचे ध्यान चिंतन केले तरच अभ्यंतर मल जाईल. विषयासक्ति, विषयी जन संगति, काल कर्मस्वभावगुण यांना वश होऊन मोठ मोठ्या मुनींचे मनसुद्धा मलीन होते. नारदमोह प्रकरण पाहावे **'विषय कुपथ्य मिळत धडफुडे। मुनि हृदयिहिनर किति बापुडे'** (७।१२२।४) हे मानस रोगाबद्दल म्हटले आहे.

नारदमोह उदाहरण आणि प्रतापभानुचरित्र यावरून स्पष्ट होते की ज्ञानी असोत वा अज्ञानी धर्मशील असोत मन मायामलांनी केव्हा मलीन होईल याचा नेम नाही; म्हणून बद्ध मुमुक्षु, साधक, सिद्ध, ज्ञानी, भक्त या सर्वांनीच अंतकाळापर्यंत गुरुभक्ति केली पाहिजे.

'यावज्जीवं त्रयः वन्द्याः वेदान्तः गुरुः ईश्वरः (श्रुति)

(३) **करत तिलक गुणगण-वशकरणी** — दैवीसंपत्तीचे गुण मिळतात असे पूर्वी सांगितले. दैवीसंपत्ती भाग्याने मिळते; पण तिला टिकविणे फार कठिण असते. तिला पळण्यास अनेक वाटा आहेत; म्हणून येथे 'वश-करणी' वश करणारी या विशेषणाने सुचविले की, गुरु भक्ती सतत केली तर ती संपत्ति, दैवीगुण हाकलले तरी जाणार नाहीत. गुरुभक्तावर लुब्ध होऊन राहतील. पण असें होण्यास गुरुपदरजाचा टिळा मस्तकास कपाळावर प्रेमाने लावला पाहिजे. ती धूळ हृदय, नेत्र, मस्तकास लावली पाहिजे. 'महत्पादरजोऽभिषेका' शिवाय चित्तमल जाणार नाही असे रहूगण राजाला जडभरताने सांगितले आहे. (भाग. ५।१२।१२)

**'मुनिस महीश दण्डवत करती । घडिघडि पदरज निज शिरि धरती'** (१।३०८१) वगैरे अनेक उदाहरणे मानसात आहेत.

(४) या चार चौपायात गुरुपदधूलीला पराग पुल्लिंगी, विभूती स्त्रीलिंगी व रज नपुंसक लिंगी शब्द वापरला. सुचविले की, 'पुरुष नपूंसक नारि वा अगजग थोर कि सान सर्वभावि भजतो छल न प्रिय अति तो मज जाण' (७।८७ रा).

(क) यात प्रसुती, वश करणी व मलहरणी ही तीन विशेषणे देऊन 'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः' हे सुचविले. प्रसुती ब्रह्मदेवाचे उत्पादन कार्य; वशकरणी- शासन-पालन विष्णुकार्य व मलहरणी- मलसंहार. हे हराचे कार्य आहे.

(ख) उद्‌भवस्थितिसंहार-कारिणी क्लेशहारिणी सर्वश्रेयस्करी सीता रामवल्लभाच जणू धुळीचे रूप घेऊन गुरुपादसेवारत झाली आहे हा सुंदर भाव ही यातून निघतो. हा सीता वन्दन श्लोक या चौपाईपासून फार दूर नाही. १।३०८।१ ची टीका पाहावी म्हणजे या पुढील चौपायात वर्णन केलेले लाभ गुरुपदरजप्रतापाने कसे प्राप्त झाले आहेत हे कळेल.

'जे गुरुचरणरेणुशिरिं धरिती। ते जणु सकल विभव वश करती ॥५॥
मज सम हे अनुभवति न दूजे। प्राप्त सकल पावनरज-पूजे' ॥६॥
(२।३।४-६).

एका वचनालाठिक ठिकाणी आधार भरून ठेवण्याची ही अतुल-सी तुलसी कला आहे' या गुरुपदरजप्रतापाने सीता दशरथांची सुनच झाली!

संगति – रजयुक्त गुरुपदांचे ध्यान शिष्य करू लागला म्हणजे रज व पायांची नखे जवळ जवळ असल्याने त्या नखांच्या ध्यानाचा प्रभाव पुढील चौपाईत वर्णितात. पहिल्या चार चौपायात हृदय निर्मल करण्याचा अभ्यास व ध्येय-प्राप्तव्य सांगितले. पुढील चार चौपायांत दृष्टि निर्मल करण्याचा विधि सांगतात. दोन्ही पाहिजेत.

'ज्ञानाविण जी भक्ति लवणाविण अन्न तेविं समजावी।
ज्ञानाला भक्तिविण केवळ लवणान्न योग्य ही पदवी॥' (प्रज्ञा)

हिं.- श्रीगुरु पदनख मनि गन जोती । सुमिरत दिव्य दृष्टि हियँ होती ॥५॥
म.- श्रीगुरु-पद-नख-मणि-गण-जोती । स्मरतां दिव्यदृष्टि हृदिं होती ॥५॥

अर्थ – श्रीगुरुमहाराजांच्या चरणनखरूपी मणिसमूहाच्या ज्योतीचे- प्रकाशाचे स्मरण करताच, स्मरण-ध्यान-करणारे हृदयात दिव्यदृष्टियुक्त होतात. म्हणजेच हृदयाला दिव्यदृष्टि प्राप्त होते. 'दिव्यं ददामि ते चक्षुःपश्य मे योगमैश्वरम्' (भ.गी.)

टीका – श्रीगुरुपदनख – या वेळेपर्यंत गुरुवर्णनात 'श्री' सकल ऐश्वर्यसूचक पद वापरता आले नाही ते येथे वापरले.

(क) पायाचे ध्यान करता करता त्या चरणात चैतन्य प्रगट होते व नखे ज्योतिर्मय- तेजोमय-दिसू लागतात. जो पर्यंत ही अवस्था आली नाही तो पर्यंत ध्यानात न्यूनता आहे असे समजावे. विवेक दृष्टीत मोहतम भरलेला असल्याने व महामोहरूपी निशेत घोरत पडून 'मी मम' आदि स्वप्नात रंगला असल्याने त्याची ती दृष्टिच अंध झालेली असते.

**'मुकुर-मलीनां नयनविहीनां । रामरूप कसं दिसेल दीना ॥' (१।११५।४)**

(ख) येथे नखांचे स्मरण सांगितले नसून त्याच्या ज्योतीचे स्मरण-ध्यान सांगितले आहे. स्थूलातून चैतन्यमय अतिसूक्ष्मात प्रवेश करता आला असे ठरले. तनुमानसेच्या पुढील **सत्त्वापत्ति भूमिका प्राप्त झाली**

'सर्वद्वारेषु देहेस्मिन् प्रकाश उपजायते । ज्ञानं यदा तदा विद्या द्विवृद्धं सत्वमित्यपि' (भ.गी.)

**'प्रकाशंच प्रवृत्तिंच मोहमेवच पाण्डव'** (भ.गी.)

ही तीन क्रमशः सत्व, रज, तमोगुणाची मुख्य लक्षणे आहेत. प्रकाश हे सत्त्वगुणाचे द्योतक लक्षण आहे. या अवस्थेतच ज्ञानलाभ होतो. तो पुढील चरणातच सांगतात. **सद्वासना, सुविचारणा व तनुमानसा या तीन भूमिका अज्ञानमयच असतात. सत्त्वापत्तीपासून पुढील चार ज्ञानावस्था आहेत.**

(२) **दिव्यदृष्टि हृदि होती** — दिव्य प्रकाशमय - प्रकाशमय स्वरूप- साक्षात्कार होण्यास अंतर्दृष्टी पण प्रकाशमय व्हावी लागते; म्हणूनच भगवंताचे प्रकाशमय विराटरूप साध्या दृष्टिने अर्जुनास सुद्धा दिसेना. तेव्हा त्यास दिव्यचक्षु, दिव्यदृष्टि दिली आहे. येथे प्रकाश=ज्ञान

**'यज्ञानार्के भवनिशि नासे । वचन किरणि मुनिकमल विकासे ।'** (२।२७७।१)

ज्ञान हाच सूर्य, सोरठा ५ मध्ये महामोहतम पुंज विनाश रविकरनिकरानेच सांगितला आहे. भाव हा की या दशेत **आत्मस्वरूप व परमात्मस्वरूप याचे ज्ञान होते.**

(क) **'हृदि'** म्हणण्यात हेतु हा की बाह्य दिव्यदृष्टीची जरूर नाही. हाच शंकर-तृतीय नेत्र. यानेच काम-वासनादिकांचा संहार होतो; व सगुण साक्षात्कार ही हृदयात होतो. शंकराचा हा नेत्र अग्निमय आहे. व 'ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात्, कुरुते' (भ.गी).

(३) **मणिगणजोती** — म्हणण्याचे कारण हेच की दीपज्योति - प्रकाश- विझण्याचा संभव असतो व तो प्रकाश साधनसापेक्ष असतो 'यावत्तैलं तावदाख्यानं'. विषय झंझावाताने, अष्टसिद्धिलोभाने, क्रोधादिक पतंगामुळे तो विझला जाणे शक्य असते. झळमळ करतो, काजळी धरते. मणिज्योतींना यातील कसलीच भीति नाही. **'ज्ञानदीप व भक्तिचिंतामणि'** प्रकरणे उ.कां. पहा. त्या **प्रकरणाचे बीज येथे पेरले आहे.**

(क) मणिगण म्हणण्याचे कारण नखे दहा असतात; तशी नवविधा साधनभक्ति व कृपासाध्य प्रेमभक्ति हे दहा मणि आहेत. **साधनभक्ति मणि व प्रेमभक्ति**

चिंतामणि येथे गुरुभक्तिनेच ज्ञानप्राप्ति सुचविली, ज्ञानमार्गाने किंवा योगमार्गाने नव्हे. ज्ञानदीप ७।११७-११९ प.

(ख) कोणी टीकाकार येथे पदनखांना वंदन आहे असे म्हणतात व कोणी त्याचे खंडन करतात तर पुन्हा कोणी वंदनाचे मंडण करतात; संगतिकडे कोणीच बघत नाहीत. मूळात वंदन कोणालाच नाही. विषय नखज्योतीचा चालला आहे. उपक्रम पादरजवंदनाने करून उपसंहार (२।१) पदरजप्रभाव वर्णनानेच केला आहे. अभ्यास, उपपत्ति, अपूर्वता आदि पादरजाचीच दाखविली आहेत. या पाचव्या चौपाईत अपूर्वताच आहे. चौथीत उपपत्ति-कारण कार्यसंबंध आहे. पहिलीत व पुढेही महती (अर्थवाद) आहे. फल रजाविषयीचेच सांगितले आहे. (१।१ व २।१ चौ.) म्हणून नखवंदन गृहीत धरण्याचे कारण नाही, व कोणी ते मानले तरी आमचे काय बिघडले!

(ग) संगति – पुढील चौपाईत दाखवितात की या भक्तिजनित ज्ञानाने अज्ञान मोहादिकांचा नाश होतो -

हिं.- दलन मोह तम सो सु-प्रकासू । बडे भाग उर आवइ जासू ॥६॥
म.- दलन मोहतम सुप्रकाश तो । महाभाग्य ज्या हृदयी पडतो ॥६॥

अर्थ – तो सुंदर प्रकाश (सु-प्रकासु-प्रकाश) मोहरूपी अंधाराचा संहार करतो. तो ज्याच्या (जासु) हृदयात पडेल (आवइ-येतो) त्याचे भाग्य मोठे! (तो महा भाग्यवंताच्याच हृदयात प्रकट होतो-पडतो.)

(१) तो सु-प्रकाश – श्रीगुरुपदनख मणिगणजोतीचा प्रकाश सुंदर असतो तो (सो) ने मागील चौपाईतील ज्योतीचा संबंध दाखविला. मागील चौपाईत मणिगणज्योति हाच विषय आहे म्हणून 'सोसु (सूर्य) प्रकाश' हा पाठ त्याज्य आहे. शिवाय सूर्यप्रकाश रात्री नसतो; तो कमी, अधिक होतो व तापदायकही ठरतो पुष्कळ वेळा.

(क) सुप्रकाश एवढ्याच मुळे की तो प्रेमरसद्रव उत्पन्न करणारा, शीतल, सदा एकरस असतो. इतर वैशिष्ट्य दीपाच्या तुलनेत पूर्वी दाखविले आहे.

(ख) दलन मोहतम – प्रकाश पडला की अंधार सहजच नष्ट होतो, कुठे जातो ते कळत सुद्धा नाही. 'अज्ञानेनावृतं ज्ञानं येषां नाशितमात्मनः (भ.गी.)

(ग) हृदयगुहेतील अज्ञानांधकार नष्ट करण्यास मणिप्रकाश- दिव्यमणिप्रकाश पुरेसा असतो. स्यमंतकाचा प्रकाश भास्करा सारखा होता व जांबवंताची गुहा त्या प्रकाशाने झगमगत होती. (भाग.). इतरत्र ज्ञानाला सूर्य म्हटले असले तरी ते येथे अयुक्त आहे. ती उपमा 'योग - ज्ञानामार्गाने होणाऱ्या ज्ञानाला ठीक आहे. गोस्वामी भक्तिपुत्र ज्ञानाला अधिक महत्त्व देतात.

(२) ज्या हृदयी पडतो – पाडतात, आणतात, लावतात असे न म्हणता पडतो (येतो) म्हणण्यात भाव हा की हा साधकाच्या प्रयत्नांनी प्रगट होण्यासारखा नाही

हा कृपासाध्य आहे. सद्गुरू कृपेनेच हा पडू शकतो. सद्गुरूप्रसाद मुख्य आहे, साधन गौण आहे, तो केव्हा पडेल हेहि अनिश्चित असते. म्हणूनच म्हणतात की, (क) महाभाग्य ज्या — ज्याचे महाभाग्य असेल त्याच्याच हृदयात तो पडेल-पडतो. स्यमंतकासारखे दिव्यमणि व चिंतामणि अपूर्व भाग्यानेच मिळतात; तसेच हे.
(३) येथे अशी शंका घेतात की महामोहतमपुंज गुरुवचन रविकिरणांनी नष्ट होतो असे (सो.५) सांगितल्यावर पुन्हा मोहनाशाचा उल्लेख का? जे उपक्रमोपसंहारादि व संगति यांचा विचार करीत नाहीत, त्यांनाच ही शंका येईल. त्या सोरठ्यात विषयाचा उपक्रम केला इतकेच. आतापर्यंतच्या विवेचनाने अशा शंकेला जागाच उरली नाही. पण मर्म ध्यानी न आल्याने मोह, महामोह इत्यादि भेदांचा कीस काढून कागदांच्या फुलांच्या सुगंधाने समाधान मानतात! (मा.पी.पृ ९२) महामोहाचा नाश झाल्यावर मोह कुठे राहील? मोहनाश आधी सांगून नंतर महामोहनाश सांगितला असता तर काहीतरी विचारार्ह ठरले असते. शंभर रुपयांत पन्नास रुपये असतातच.
संगति — पुढील चौपाईत, भवरजनीचे परिणाम नष्ट होतात हे सांगून उपक्रमित विषयाचे फळ सांगून उपसंहाराकडे वळतात.

हिं.- 'उघरहि विमल विलोचन ही के । मिटहि दोष दुख भव रजनी के ॥७॥'
म.- 'हृदय.विलोचन विमल उघडती । दुःख दोष भवशार्वर झडती ॥७॥'

अर्थ — हृदयाचे निर्मळ डोळे उघडतात व संस्कृति-भव-रूपी रात्रीतील (भव+शार्वर, शर्वरी रात्र, तिचे) दुःखे व दोष नष्ट होतात. (हे निर्मळ डोळे म्हणजे ज्ञान व वैराग्य.)
टीका — (१) येथे कोणी अशी शंका घेतात की दिव्य दृष्टि प्राप्त झाली असे सांगितल्यावर आता डोळे उघडतात असे म्हणण्यात स्वारस्य काय? समाधान- जो पर्यंत रात्र आहे तो पर्यंत डोळे उघडले तरी अंधारच दिसणार, म्हणून प्रथम अज्ञान, शून्य यांचा निरास सांगून मग डोळे उघडल्याचे सांगितले.
(क) दृष्टि असून सुद्धा जोपर्यंत जागृति आली नाही तो पर्यंत डोळे उघडत नाहीत; म्हणून येथे जागृति सुचविली - जागृति म्हणजेच परम वैराग्य.

'जाणा तैचि जीव जगि जागा। पावे विषयविलासि विरागा ॥'
'ज्ञान होइ मोहभ्रम भंगहि । तै रघुनाथ चरणि अनुराग हि ॥'
(२।९३।४-५)।

येथे ज्याला मोहभ्रम म्हटले त्यालाच मागल्या चौपाईत मोहतम म्हटले. वरील अवतरणात सुद्धा आधी वैराग्यरूपी जागृति सांगितली व नंतर ज्ञान होणे सागितले.

(ख) 'ज्ञान विराग नयन उरगारी' (७।१२०।१५). विषय वैतृष्ण्यरूपी अपर वैराग्य म्हणजे जागृति, त्यानंतर ज्ञान होते व व्यतिरेक ज्ञानानेच परम वैराग्य प्राप्त होते म्हणून येथे ज्ञान म्हणजे विज्ञान व परमविराग हेच नेत्र होत. (१५।७-८ पहा). ज्ञानाने अज्ञानाचा नाश झाला म्हणजे मगच केवल ज्ञान जे सहज असते तेच उदयास येते.

'अरुणेनेव बोधेन (ज्ञानाने) पूर्वसंतमसे हृते।तत आविर्भवेदात्मा मेघापायेंऽशुमानिव' (आ.बो.)

'ज्ञानेन तु तदज्ञानं येषां नाशित मात्मनः। तेषामादित्यवत्ज्ञानं प्रकाशयति तत्परम्' (भ.गी.)

(२) भवशार्वर दुःख दोष- भव-संसार हीच अंधारी रात्र. रात्रीत अनेक दुःखे, भय, दोष, शोक, वियोग इत्यादि असतात; म्हणूनच रात्रीला 'दोषा हे नाव आहे. शार्वर-शर्वरीत उत्पन्न होणारे=रजनीचे.

(क) 'मोहमानमदमत्सर तस्कर' (७।३१।६) 'संशय-सर्पाशन उरगाद.' (३।११।९). 'सर्वहि मोहनिशे निजणारे' (२।९३।२) यावरून ठरले की माया, अज्ञान व अज्ञानाचेच सर्व कार्य म्हणजेच भवरजनीचे दोष व दुःखे, हे नाहीसे होणे म्हणजेच उजाडणे. अज्ञानांधकार गेला म्हणजेच ज्ञानदिवस उगवतो.

**संगति** – या प्रमाणे येथे ज्ञानाच्या शेवटच्या भूमिकेवर आणून पोचविले. विज्ञान प्राप्ती नंतरच प्रेमभक्ति मिळते. येथे महामोह- मोह-नाश या विषयाचा व त्याच्या फळाचा (दुःखनाश हे फळ) उपसंहार केला. राम-चरितरहस्य जाणून रामभक्तिची व रामचरित्र काव्यरचनेची शक्ति कशी येते हे पुढील तीन ओळीत सांगतात.

हिं.- **सूझहि रामचरित मनि मानिक। गुपुत प्रगट जहँ जो जेहि खानिक ॥८॥**
दो.- **जथा सुअंजन अंजि दृग साधक सिद्ध सुजान।**
**कौतुक देखत सैल बन भूतल भूरि निधान ॥१॥**
म.- **रामचरितमणि-माणिक दिसती। प्रगट गुप्त जिथं जे खनि असती ॥८॥**
दो.- **नेत्रि सु-अंजन घालिता साधक सिद्ध सुजाण।**
**वनि पर्वति कौतुकि बघतो भूतळि भूरि निधान ॥१॥**

**अर्थ** – मग त्यास रामचरित्ररूपी मणिमाणके जिथे खाणीत गुप्त या प्रगट असतील ती दिसू लागतात. डोळ्यांत सिद्धांजन (सु+अंजन) घातले म्हणजे जसा साधक सिद्ध व सुजाण होतो व त्यास सहज लीलेने (कौतुकि) वनात, पर्वतात किंवा जमिनीत असलेले धनाचे गुप्त ठेवे दिसतात (दो.१)

**टीका** – (चौ.८) – १. प्रगटगुप्त – हे दोन्ही मणि व माणके यांच्याकडे घेणे जरूर आहे. 'रामरहस्य ललित विधनाना प्रगट गुप्त इतिहास पुराणा' 'कळे श्रमाविण सर्व तुम्हा हो' (७।११४।२-३) हे लोमश ऋषींचे वचन 'व्हा ज्ञानविराग

निधान' असा आशिर्वाद दिल्यानंतरचे आहे. तोच अर्थ येथें ग्रंथारंभी त्याच क्रमाने सिद्धान्तरूपाने सांगितला आहे. लोमश काकभुशुंडीचे गुरूच होत.

(क) रामचरितास मणिमाणिक म्हटले म्हणून खाणींचा संबंध आणावा लागला. या खाणी कुठे असतील हे नक्की कळणे कठीण म्हणून दोह्यात सांगतात -

दो.१ – (१) सुअंजन – सिद्धांजन. तंत्रशास्त्रात नेत्रात घालण्याची व इतर अनेक प्रकारची अंजने वर्णिली आहेत. काहींनी भूतभविष्य वर्तमान कालाचे ज्ञान होते. व विचारलेल्या प्रश्नांची बिनचुक उत्तरे देता येतात. काहींनी अदृश्य होता येते. काहीं निधानस्थान निश्चित करण्यासाठी उपयोगी पडतात. विस्तार मंत्रमहार्णव ग्रंथात 'निधि ग्रहणाञ्जनतंत्रे पंचम तरंग' पृ.६४९ पासून पहावा. येथे सिद्ध नेत्रांजन अपेक्षित आहे.

(क) गुरुपदरज, या सिद्धनेत्रांजनासारखे आहे. त्या अंजनाने ज्ञानवैराग्यनेत्र उघडले व अंतरी दिव्यदृष्टि प्राप्त झाली असली म्हणजे त्या शिष्याला रामभक्ति चिंतामणि ज्या खाणित गुप्त असतो, किंवा प्रगट असतो त्या खाणि सहज दिसू लागतात व त्यात रामभक्ति चिंतामणिरूपी निधान श्रमावाचून दिसू लागते.

(२) सिद्धांजनाने जशी बाह्य दृष्टि मिळते तशी गुरुपदरजाने गुरुकृपालेशाने साधक सुजाण-ज्ञान-विरागसंपन्न होतो व रामचरित मणिमाणके पाहण्याची सिद्धि गुरुकृपेने त्यास मिळते. काकभुशुंडीचे उदाहरण आहेच.

(क) 'वेदपुराणे पर्वत पावन । रामकथा रुचिराकर पार न'। 'मर्मी सज्जन सुमति पहारी । ज्ञान विराग नयन उरगारी ॥'

'शोधिल जो प्राणी सद्भावे । सबसुखदानि भक्तिमणि पावे' (७/१२०/१३-१५) यात रामकथास रुचिर आकर म्हटले व येथे मणिमाणिक म्हटले इतकाच फरक. या अवतरणाने पर्वत कोणते तें ठरले. 'रहस्य ललित विधनाना । गुप्त प्रगट इतिहास पुराणां ॥'

यात पुराणांचा उल्लेख आहे पण ते पर्वत आहेत. इतिहास राहिला तेच वन.

(ख) भूशुंडीने गरुडास सांगितलेले ज्ञानविराग नयन येथे आधीच उघडले आहेत. सद्गुरु रूपी मर्मी - मर्मज्ञ - संतांची कृपा झाली आहे. गुरुसेवेने व अमृतमुळीचूर्ण घेण्याने भव रोग नष्ट झाल्यामुळे सुमति रूपी पहार, कुदळ मिळाली आहे.

(३) 'बनिं पर्वतिं भूतळिं भूरि निधान बघती – वन - इतिहास, पर्वत - वेदपुराणें, म्हणजेच 'नानापुराण निगमागम व क्वचिदन्यत्र - निधान नेहमी जमिनीतच सापडते, मग ते पर्वतात असो वनात असो नाहीतर घरात, भिंतीत, तुळयात असो. त्याप्रमाणे रामभक्ति चिंतामणि रामचरित्रातच सांपडावयाचा. अनेक मणिमाणके पाहिली - सापडली की त्यात एखादाच चिंतामणि परम भाग्याने मिळावयाचा आणि हाच सर्वांत परम मूल्यवान निधि आहे. सर्वात मोठे निधान आहे. भूरि पुष्कळ, महान, मोठे.

(क) येणे प्रमाणे पूर्णभवरोगनिवृत्ति व भक्तिचिंतामणिलाभाने परमसुखप्राप्ति गुरुसेवेने होईल-होते हे पाचव्या सोरठ्या पासून या दोह्या पर्यंत म्हणजे बारा ओळीत सांगोपांग, सशास्त्रीय, साधार विवेचन, सुंदर काव्यात गोस्वामीनी करून ठेवले. येथे गुरूवंदन प्रकरणातील मुख्य भाग संपला. पुढील दोन चौपाया गुरुसंबंधी असल्या तरी ह्या दोन प्रकरणांचा सांधा जुळणाऱ्या आहेत; म्हणून गुरुवंदन प्रकरण येथेच पूर्ण झाले असे या अल्प मतीस वाटते.

**संगति** – तुलसीदासांना शंभुविरचित रामायणावर भाषाकाव्यनिबंध लिहावयाचा आहे. असा निबंध लिहिणाराने तत्पूर्वी कोणता अधिकार मिळविला पाहिजे हे सुचविण्यासाठी ते आपलेच उदाहरण घेऊन सांगतात.

हिं .- **गुरु-पद रज मृदु मंजुल अंजन । नयन अमिअ दृग दोष बिभंजन ॥१॥**
**तेहिं करि बिमल बिबेक बिलोचन । बरनउँ रामचरित भव मोचन ॥२॥**

म.- **गुरु-पद-रज-मृदु-मंजुल-अंजन । नयनामृत दृग्-दोष-विभंजन ॥१॥**
**तत्कृत विमल विवेक-विलोचन । वर्णिन रामचरित भवमोचन ॥२॥**

**अर्थ** – श्रीगुरुमहाराजांचे पदरज हे मृदु व मंजल नयनामृत (नावाचे) अंजन आहे, त्याने सर्व दृष्टि (दृग्) दोषांचे भंजन होते ॥१॥ त्याने मी आपल्या ज्ञान नयनाला निर्मल केल्यावर आता भव-संसृति-पाशांतून सोडविणारे श्रीराम चरित्र वर्णन करीन ॥२॥

**टीका** – चौ-१ (१) या चौपाईशीं समानार्थक एक प्रसिद्ध श्लोक -
'अज्ञानतिमिरांधस्य ज्ञानांजन-शलाकया । चक्षुरुन्मीलितं येन तस्मै श्रीगुरवे नमः ।.'

(क) येथे पुन्हा गुरुचरणरजाचें वर्णन का केले हे वर 'संगति' मध्ये दाखविलेच आहे. (भा.पी.प!)

(ख) **मृदु मंजुल अंजन** – भाव हा की इतर नेत्रांजने कोमल नसतात, थोडीतरी झोंबतात, खुपतात, चुरचुरते, डोळ्यांतून पाणी गळते, काही वेळ डोळे मिटून ठेवावे लागतात; इत्यादि अनेक दोष त्यांच्यात असतात म्हणून ती कोमल व मनोहर नाहीत. हे अंजन जो जो घालावे तो तो मनाला व दृष्टीला प्रसन्नता-उल्हास, मोद वाटतो, मन भगवत्स्वरूपात व रामचरितात रंगू लागते, हे दिव्य अप्राकृत अंजन आहे.

(२) **नयनामृत** – हे एका अंजनाचे नाव आहे. प्रत्येक अंजनाला नाव असतेच. वैद्यक शास्त्रांत नयनामृत नावाचे एक अंजन आहे. ते पांढऱ्या पळसाच्या भूमीतील सजीव मुळीतील रसाचे केलेले असते. (भा.पी. मध्ये एक निराळा प्रकार दिला आहे). याने सर्व नेत्ररोग बरे होतात असे म्हणतात.

(क) **दृग्-दोष विभंजन** – दृग् - दृष्टि, नेत्र, दोष-विकार, रोग, पीडा, यांचे विशेष भंजन म्हणजे विनाश करणारे शारीरनेत्रांजन असते. सारा, खुपऱ्या, मोतीबिंदु,

वडस, फुले, भूर, लाली, पू येणें, रांजणवाड्या, पिवळे दिसणे, दोन वस्तु दिसणे दूरचे न दिसणे, जवळचे न दिसणे इत्यादि अनेक नेत्रविकार आहेत. अज्ञानदृष्टीच्या ठिकाणी ममता, परोत्कर्षासहिष्णुता, मदांधता, शोक, क्रोध, द्वैतदर्शन, भेददर्शन, सांप्रदायाभिमान, संकुचित विचार, परदोष दर्शन, परनिंदा, भ्रम, ईर्षा इत्यादि अनंत रोग अंतर्दृष्टीला झालेले असतात. ज्ञानवैराग्यप्राप्तीनंतर सुद्धा ज्ञानाहंकार, त्यागाहंकार, मुक्ताहंकार, मानप्रतिष्ठालोभ इत्यादि महारोग होतात. या सर्वांचा विनाश 'गुरुपदारज' नयनामृताने होतो.

**'काल कर्म नी स्वभाव दडपणिं । भले प्रकृतिवश चुकति भलेपणिं।।**
**ती घे हरिजन चूक सुधारून । देइ सुयश दुख दोष निवारुन'** (१/७/३)

(ख) हे नयनामृत अमर करणारे, निर्दोष ज्ञानदृष्टि देऊन अमृतत्व- मोक्ष देणारे आहे. ज्ञानदृष्टि मिळाली नाही, तोपर्यंत जन्ममरणरूपी भवरोग चुकत नाही. ज्ञानदृष्टि मिळाल्याशिवाय रामरहस्य कळत नाही.

ही दृष्टि नसताच रामचरित्र वर्णन करू लागल्यास ते नानापुराणनिगमागम संमत होणार नाही व लोकांत भ्रम, मोह, कुतर्क, पाखंड, नास्तिकता वाढविणारे होईल व साधारण समाजाचा बुद्धिभेद करून त्यांना विनाशकारक होईल. एवढ्याचसाठी पुढील चौपाईत वाचकांस सुचवितात की असे अनिष्ट या ग्रंथापासून होणार नाही, मात्र वाचक, श्रोता, अधिकारी पाहिजे. अधिकारी कोण हे 'भवानी शंकरौवन्दे' या श्लोकात व 'सुकृती' शब्दाने मागील प्रकरणात सांगितले आहे.

ल. ठे. या चौपाईची रचना माधुर्य व ओज मिश्रित आहे. 'गुरुपद' पासून 'नयन अमृत' पर्यंत मृदु मृदु गोड गोड वर्णरचना आहे व त्याचा परिणाम सांगताना 'दृग दोष विभंजन' यात ओज वाढत गेले आहे. इतके मृदु पण प्रताप एवढा! हे नुसते उच्चारण्याच्या ध्वनीनेसुद्धा कानास कळते!

**चौ. २ – (१) तत्कृत विमल विवेक विलोचन** – तत्+कृत त्याने केला आहे, विवेक विलोचन विमल ज्याने तो मी तुलसीदास. विलोचन - विशेष लोचन - नयन - दृष्टि. विवेक - ज्ञान, विमल विवेक = विमलज्ञान - विज्ञान,

**'ज्ञान विमलजलिं करी स्नान जैं। रामभक्ति उरिं करी स्थान तैं'** (७/१२२/११).

भाव हाकी आता रामभक्तिरस प्राप्तीनंतर स्वान्तःसुखासाठी रामचरित वर्णन करीन. **ही दुसरी प्रतिज्ञा आहे, पहिली 'रघुनाथ गाथाभाषानिबंधमतिमञ्जुलमातनोति' मं. श्लो. ७ मध्ये आहे.**

(२) **भवमोचन** – जन्ममरणरूपी संसृति परंपरेतून सोडविणारे. येथे पुन्हा ग्रंथाचे फळ सांगितले. याचा अर्थ असा नव्हे की ऐहिक सुखसंपदादि प्राप्ती साधन यात

नाही, ते पण ठिकठिकाणी सांगितले आहे. व मानसाचे सकाम - अनुष्ठान अनेकांना फलदायी होत असल्याचे अनुभव (मा.मणि व कल्याण यात) प्रसिद्ध होत आहेत, म्हणून सकाम, आर्त अर्थार्थी भक्तांनी निराश होण्याचे कारण नाही.
**संगति** — पृथ्वीतलावरील साक्षात देव, सद्गुरूचे वंदन करून व ग्रंथ- चरित्र-सांगतो अशी प्रतिज्ञा करून, गुरूच्या खालोखाल वंद्य असणाऱ्या भूदेवांना व क्रमशः सर्वांना वंदन-प्रार्थनादि- करून मग कथारंभ करतील.

हिं.- **बंदउँ प्रथम महीसुर चरना । मोहजनित संसय सब हरना ॥३॥**
**सुजन समाज सकल गुन खानी । करउँ प्रनाम सप्रेम सुबानी ॥४॥**
म.- **वंदे प्रथम महीसुर - चरणां । मोहजनित सब संशय-हरणां ॥३॥**
**सुजन समाज सकल गुण-खाणी । करतो प्रेमें प्रणति सुवाणीं ॥४॥**

**अर्थ** — मोहाने जन्म दिलेल्या सर्व संशयांचा संहार करणाऱ्या, महीसुरांच्या (ब्राह्मणांच्या) चरणांना मी प्रथम वंदन करतो ॥३॥ सकल गुणांची खाण असणाऱ्या सज्जनांच्या समूहाला मी प्रेमाने व सुंदर (नम्र, गोड) वाणीने प्रणाम करीत आहे ॥४॥
**टीका — चौ. ३ (१) वंदे प्रथम** — येथे प्रथम म्हणण्याचे कारण की गुरूच्या नंतर या पृथ्वीतलावरील वंद्य व्यक्तींत ते प्रथम आहेत; कारण ते महीसुर, या पृथ्वीवरील सुर-देव, महीदेव, आहेत.
(क) मर्यादेचे पालन नामनिर्देश करतांना केलेले आढळते. एक उदाहरण पाहा.

**'बोलाविति रघुनाथ एकदा । गुरु आले द्विज नजरजन तदा ॥१॥**
**गुरु मुनि बसले ब्राह्मण सज्जन'** (७/४३)

यात वंद्यता क्रमानुसार वर्णन आहे. ब्राह्मणानंतर सज्जनांचा उल्लेख या अवतरणात आहे, तसेच येथे ब्राह्मणांनंतर सुजन-सज्जन-यांना वंदन आहे.
(ख) नररूपाने अवतरलेले भगवानसुद्धा विप्रांना वंदन करतात, म्हणून ते प्रथम वंद्य आहेत. कोणत्याही धर्मकार्यात, पूजादिविधीत प्रथम ब्राह्मणास वंदन करण्याची प्रथा आहेच. भगवान ब्रह्मण्यदेव आहेत, मग ब्राह्मण प्रथम - संतांपूर्वीहि - वंदनीय असले तर नवल नाही. पूज्यपूजाव्यतिक्रमामुळे नऊ . प्रकारचे ग्रहोन्माद-रोग माणसास होतात, असे माधव निदान - उन्माद प्रकरणात सांगितले आहे. 'हर्षविषादां ग्रहां विपुलता' (७/१२१/३३) च्या टीकेत विस्तार पाहावा. आणखी आधार १/३०८,३२०, २/६/८.३१९/४, ३/२६, ७/४६,१२८, इत्यादि पाहावे. या चरणाने ब्राह्मणवंदन पूजादिकांचे फल सांगून प्रभाव सुचविला.
(ग) 'वर्णानां ब्राह्मणो गुरु.' या शास्त्रवचना प्रमाणे सर्वविद्या, धनुर्विद्या, शास्त्रे, कला यांचे अध्यापक तेच असल्यामुळे हि वंद्य आहेत.
'पुण्य एक जगिं, समान आन ना। मनकृतिवचनिं "विप्रपद पूजन' (७/४५/७). हे श्रीरामवचन आहे.

'पुण्यपुंजविण भेट न संतां । सत्संगति करि संसृति अंता ।।

व मोहनाश झाल्याशिवाय संसृतीचा अंत होत नाही. जो अनन्य भावाने ब्राह्मणांची सेवा करतो त्यास राम, ब्रह्मदेवादि सर्व देव वश होतात. (अर. ३३प.) या प्रमाणे प्रत्यक्ष वा परंपरेने ब्राह्मण मोहाचा संहार करणारे आहेत. केवळ प्रत्यक्ष मोह विनाशक आहेत असे म्हटल्यास अतिव्याप्ति दोष होतो, कारण त्रेता व द्वापर युगात सुद्धा सर्वच ब्राह्मण श्रोत्रिय व ब्रह्मनिष्ठ होते असे नाही. कृतयुगात सर्व श्रोत्रिय होते हे मात्र खरे. हे वंदन सप्रेम व सुवाणीने केले पाहिजे हे पुढील चौपाईने सुचविले आहे.

**ब्राह्मणांना महीसुर पदवी केव्हा व कशी मिळाली** – एकदा समुद्राने देवांच्या हितासाठी ब्राह्मणांशी कपट केले ते जाणून ब्राह्मणांनी शाप दिला की 'तू अस्पृश्य होशील' शापदुःखाने समुद्र सुकत चालला हे पाहून ब्रह्मदेवाने येऊन ब्राह्मणांची समजूत घातली; ब्राह्मणांनी ब्रह्मदेवाचे म्हणणे मान्य केले. तेव्हा ब्राह्मणांचा शाप टिकविणे व सागराचे रक्षण करणे या दोन्ही गोष्टी साधण्यासाठी जणू काय तह झाला की पर्वकाल, नदीसंगम व सेतुबंधाच्या ठिकाणी त्यास स्पर्श, स्नान करणारास पुष्कळ पुण्य लाभेल; अन्य समयीं मात्र सागर अस्पृश्य राहील. ब्राह्मणास ब्रह्मदेवाने वर दिला की तुम्ही आज पासून 'भूदेव' नामाने प्रसिद्ध व्हाल. पर्वादिकाळी समुद्रस्नान करणे ते आधी इतरत्र स्नान करून करावयाचे असते व त्यासमयी समुद्रस्नानानंतर शुद्धोदक स्नान वर्ज आहे. इतर वेळी व इतर ठिकाणी अस्पृश्य असल्याने समुद्र स्पर्श वा स्नान केल्यास नंतर शुद्धोदकाने स्नान केले पाहिजे. (स्कं. पु. प्रभास खंड)

चौ. ४ – (१) सुजनसमाज – यानंतर साधुचरित, व संत समाज हे शब्द घालून सज्जन, साधु व संत पर्याय असल्याचे सुचविले आहे. (३/४५/६-४६/८ पहा) तेथे उपक्रम संत शब्दाने करून उपसंहार साधु शब्दाने केलेला आहे. 'पर्याय निदर्शन व महत्व' हे प्रकरण प्रस्तावनेत (८/१४५) पहा. तथापि येथे व इतर काही ठिकाणी सुजन व संतसाधु यात काही भेद दर्शविला आहे.

(क) गुणखाणी – सुचविले की त्यांच्यातून इतरांस प्रयत्नांनी गुण मिळविता येतात. पण साधु-संत आपण होऊन परदुःखहरण, परोपकार करतात इतकाच फरक. मात्र हा भेद सर्वत्र आहे असे नाही.

(ख) सकल गुण – सर्व सद्‌गुण उदा. जाड्यं धियो हरति सिञ्चति वाचि सत्यं । मानोन्नतिं दिशति पापमपाकरोति ।। चेतः प्रसादयति दिक्षु तनोति कीर्तिं । सत्संगतिः कथय किंनेव करोति पुंसाम् ।। (नी. श.)

संताचे ठिकाणी कोणते गुण मुख्यतः असतात हे एका गूढ विशाल पण क्षुद्र वाटणाऱ्या रूपकाने पुढे वर्णिले आहे. 'संतप्रशंसा व खलनिंदा' हे ६/९ प्रकरण प्रस्तावनेत पाहावे.

(ग) विप्रवंदन-सेवा-रूपी परमपुण्य संचयाने प्रथम सज्जनांची भेट होऊन त्यांच्या संगतीने शील संपन्नता येते व विश्वास श्रद्धा वगैरे अधिकार मिळतो म्हणून ब्राह्मणवंदनानंतर सज्जन वंदन केले.

(२) **करतो प्रेमे प्रणति सुवाणी** – प्रणति – साष्टांग नमस्कार, प्रकर्षेण नमन, नम्रतायुक्त शुद्ध भावनेने ईश्वररूप समजून नमन.

(क) **प्रेमें (सप्रेम)** – प्रेमाने बुडत्यास बाहेर काढल्यावर तो काढणाऱ्यास जसे प्रेमाने नमन करील, ज्या भावनेने करील तसे.

(ख) **सुवाणीं** – सु - उत्तम, वाणीने, गोड, मृदु, प्रिय सत्य, नम्र भाषण करून, वडिलांचे नाव आपले नाव, गाव जात वगैरे सांगून. नीचही नमन करतात व वाणी गोडही असेल पण त्यात बाकीची लक्षणे नसतात.

**संगति** – सुजन-समाज सेवेनेच संतांची भेट होते म्हणून पुढे त्यास नमन करून एका रूपकाने गुण सुचविले आहेत. त्या एका रूपकाचा विस्तार ज्याला जेवढा करता येईल तेवढा होऊ शकेल व त्या एका उपमेवर एक बारीकसा ग्रंथ निर्माण करता येईल. अगाध-अपार अर्थ सुचविण्यास लहानसे एक साधे रूपक व उपमा वापरण्यात दिसणारी तुलसी काव्य प्रतिभा अप्रतिम आहे. अशी रूपकें कोणती ते प्रस्तावनेत पाहावे.

हिं.- **।साधु चरित सुभचरित कपासू । निरस बिसद गुनमय फल जासू ॥५॥**
**सोल सहि दुख परछिद्र दुरावा । बंदनीय जेहिं जग जसु पावा ॥६॥**

म.- **साधु-चरित शुभ चरित कपासी । निरस विशद गुणमय फल ज्यासी ॥५॥**
**दुःख सहुनि परछिद्रां झांकति । जेणे जगति वंद्य यश पावति ॥६॥**

**अर्थ** – ज्याचे फळ निरस, उज्ज्वल व गुणमय असते अशा कापसाच्या-कपासीच्या चरित्रासारखे साधूंचे चरित्र शुभ असते ॥५॥ (ते) स्वतः दुःखे सहन करून दुसऱ्यांची छिद्रें झाकतात व तेणेंकरून जगात वंद्य होतात व वन्दनीय यश पावतात. ॥६॥

**टीका** – (१) या दोन ओळींत, साधूंच्या सहज स्वभावाची यथार्थ कल्पना देण्यासाठी साधूंच्या चरित्राला कापसाच्या चरित्राची उपमा दिली आहे. त्यामुळे यातील निरस, विशद, गुणमय, परछिद्र हे शब्द श्लिष्ट म्हणजे दुहेरी अर्थाने वापरले आहेत. एक अर्थ साधु चरित्राकडे व दुसरा कापूसचरित्राकडे लागतो. या क्रमाने ते खाली दिले आहेत.

१ (क) **निरस** – आसक्तिरहित. 'रसवर्जं । रसोऽप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते (भ.गी.) रस-वासना-विषयवासना. विषयवासनारहित, म्हणजे पूर्ण विरागी व जीवन्मुक्त.

(ख) **निरस** – रस नसलेले, रस- ओलेपणा, आर्द्रताः कापसातून रस निघत नाही.

२ (क) **विशद** – शुभ्र, निर्मल, उज्ज्वल. प्रसन्नतायुक्त, त्यांच्यात माया ममता मल नसतो. तो त्यास लागू शकत नाही.

'संतहृदयसम निर्मलवारी'' (३/३९/७), 'बिगत काम', विषयिं अलंपट'
'संत मन अ-मद-मोह ते', 'ममता मळहि जळून'
(ख) — कापूस शुभ्र, पांढरा स्वच्छ असतो, पण तो मलीन होऊ शकतो, रंग चढू शकतात.
३ (क) गुणमय — गुणांनी भरलेलें, 'सकल गुणखाणी' ३/४५/६-४६/८ व ७/३७/६-३८ प.
(ख) कापूस तंतुमय असतो गुण-तंतु, धागा, दोरा.
(४) (क) परछिद्र — दुसऱ्यांचे दोष, दुःख, संत परदोष झाकतात, लपवून ठेवतात. प्रगट करीत नाहीत व अशा रीतीने दुसऱ्यांची शत्रूंची (पर-शत्रु) सुद्धा अब्रू राखतात. छिद्र - संकट, भय कारण, दुःख. परसंकट, परदुःख निवारण करतात. परोपकार हा संतांचा सहज स्वभाव असतो.
'परउपकार वचन मन काया । प्रकृति सहज संतां खगराया' (७/१२१/१४)
(ख) जेव्हा कापसाच्या गुणांचे कापड बनते तेव्हा त्यापासून दुसऱ्यांच्या अंगावरील छिद्रे- रोमरंध्रे झाकून त्यांचे थंडी, वारा, ऊन इत्यादिपासून रक्षण होते, तसेच छिद्रगुप्तः दुसऱ्यांचे गुह्यभाग झाकून लज्जा रक्षण करतात.
५ जगतिं वंद्य — होतात. या मृत्युलोकांत नव्हे तर स्वर्गादि वैकुण्ठलोकापर्यंतच्या सर्व लोकांत संत-साधु (ज्ञानीभक्त) वंद्य, पूज्य होतात. फारच गुप्त राहणारे असले तर या जगात कदाचित वंद्य नसतील, पण परलोकात वंद्य होतातच. त्रिपाद वि. म. ना. उ. आणि स्कंदपुराण का. खं. शिवशर्माकथा पहावी. संतांचे वंदनीय यश त्यांच्या मागे सुद्धा राहते.
कापूस व संत परहितासाठी दुःख कष्ट कसे सोसतात हे त्यांच्या चरित्रांच्या खाली केलेल्या, तुलनेवरून दिसेल.

| अनुक्रम | कापूस चरित्र | संत चरित्र |
|---|---|---|
| १. | योग्य भूमि, पाऊस इ. व उत्तम बीज. | धर्मशील पिता व पतिव्रता माता. |
| २. | योग्य पाऊस व निगा. | जन्मानंतर स्वधर्माचरणाचे संस्कार व स्वधर्माचरण. |
| ३. | खुरपणी, बेणणी | यम नियमादिकांचे पालन |
| ४. | खत | विप्रसेवा, पूर्वसुकृत |
| ५. | फळ - बोंड | वैराग्य व गुरुपदेश |
| ६. | तीन टरफलें, तीन कापसाचे गड्डे व त्यात बिया | तीन देह, तीन अवस्था व त्रिगुण |
| ७. | बोंडे-बिया काढणे | तीन अवस्थांचा व त्रिगुणांचा त्याग. अवस्थांसह देहसुद्धा निरस्त होतातच. |

| | | |
|---|---|---|
| ८. | कापूस पिंजणे | तुरीयावस्था प्राप्ति 'तूल तुरीया पिंजुनी' (७/११७चं) |
| ९. | सूत काळणे | अखंड सोऽहं वृत्ति, किंवा श्रीराम-गुरु-चिंतन. |
| १०. | सूत काढताना त्याला थाफेचा ओलावा द्यावा लागतो | अखंड तैलधारावत् स्नेहयुक्त चिंतन. |
| ११. | तो ओलावा नष्ट होतो | भक्तीचा-प्रेमाचा-ओलावा वाढतो. |
| १२. | ताणा लावणें. | अनेक वृत्तीनां एकत्रित करून, एकतानता. |
| १३. | विणणे-ताणा व वाणा दिसत नाहीसे होतात. | ध्याता व ध्येय यातील भेद कमी करीत ध्येयाशीं तदाकार होणे. |
| १४. | कापड तयार झाले | सगुण वा निर्गुण साक्षात्कार हृदयांत झाला |

१५. येथपर्यंत पहिल्या सहा भूमिकातून जाताना त्या कापसाला निरनिराळ्या सहा यंत्रांतुन जावे लागते व अपार कष्ट सहन करावे लागतात. तसेच साधकास सहाचक्र रूपी यंत्रांतुन जावे लागते. खळ देताना त्या कापडाला तप्त चक्रावरून जावे लागते. आज्ञा चक्रातुन जाताना किती कष्ट होतात ते ज्याचे त्याला माहीत! कितीक तर येथेच हार खातात; पण हरिगुरुकृपांकित दृढ प्रयत्नाने जाऊ शकतात.

१६. दोघानांही आपल्या जन्म भूमीतून व माय बापांपासुन बहुधा दूर जावे लागते.

| | | |
|---|---|---|
| १७. | कापड दूरवर प्रवास करते | संत पायी तीर्थयात्रा करतात; ज्ञानेश्वर, नामदेव, समर्थ, तुलसीदास चरित्रे पहा. |
| १८. | कापड कापले जाते | दुर्जन छळ करतात. |
| १९. | जो कापतो त्यालाही लाभदायक | अपकाऱ्यांवर उपकार करतात. |
| २०. | शिवताना सुईने छिद्रें पाडली जातात. | दुर्जन, अज्ञानी, निंदा करतात. सहन करतात व त्यांचे कल्याण चिंतितात. |
| २१. | एवढे झाले की वंद्य होतात, कपडे. | वंद्य होतात संत. |
| २२. | कपडा ईश्वरार्पण केला जातो. | योगक्षेमादि ईशेच्छेवर सोडतात. |
| २३. | त्या कपड्याची-वस्त्राची-कुंकू वगैरे लावून जशी पूजा होते, | तसेच हेहि पूजले जातात. |
| २४. | त्या पूजेबद्दल आनंद कपड्याला नाही. | तसाच पूजेबद्दल संतांना आनंद वाटत नाही. |

| | | |
|---|---|---|
| २५. | ज्यांची छिद्रें झाकावयाची त्यांच्या संसर्गाने वस्त्र मलीन होते व पुन्हा निर्मळ होण्यासाठी भट्टीत पडून नंतर दगडावर तडाके सोसावे लागतात. | संत संगतीच्या मळाने मलीन होत नाहीत, कारण त्यांचे रक्षण भगवान स्वतः करतात. 'त्यांस सदा मी रक्षीं ताता। जशी बालका जपते माता' (३/४३/५) केवळ ज्ञानी पुन्हा मलीन होण्याचा संभव असतो. मलीन न होणाऱ्यांना सुद्धा परहितार्थ कष्ट सोसावे लागतात. |
| २६. | अशा रीतीने वस्त्रे जीर्ण होतात. | संतांचे देह जीर्ण होतात, वृद्ध होतात. |
| २७. | फाटलेल्यांच्या चिंध्या उपयोगी पडतात. हात न पोळण्यास, स्वच्छतेस. | वृद्ध झाले तरि ग्रंथ, काव्य, उपदेश यांनी लोकांस सुख देतात. |
| २८. | माती झाली, राख झाली, कागद केले तरि परोपकारच करतात. | देह गेला तरि समाधि हृदयपात्रे स्वच्छ करण्यास उपयोगी येते. तसेच ग्रंथ. |
| २९. | एक वस्त्र एकाचेच हित करते. | संत अनेकांचे हित करतात. |
| ३०. | जीर्ण झाल्यावर अपमान अनादर केला जातो. कोणी विचारीत नाही. | प्रभूच आई बनते व काळजी घेतली जाते. कीर्ति वाढत जाते. |
| ३१. | कीर्ति व नाम नश्वर. | कीर्ति व नाम शाश्वत, चिरकाल टिकतात. |
| ३२. | यांच्या बियांनी पुन्हा चरित्र सुरू. | यांच्या जन्ममरणाला मरण येते. |
| ३३. | कापूस सर्व देशांत होत नाही. | 'सकल सुलभ सब दिन सब देशां |
| ३४. | दरिद्र्यांवर प्रेम करीत नाहीत. | दीनांवर विशेष प्रेम करतात, गरीब श्रीमंत भेद यांच्याजवळ नसतो. |
| ३५. | यांच्या मदतीने दंभ वाढू शकतो 'साधुवेषिं जगवंचक' (१/७/५) | हे दंभाला मदत करीत नाहीत. |

---

**सूचना** — ही तुलना वाचक आणखी वाढवू शकतील व न्यूनता राहिली असेल ती आपल्या मनात पूर्ण करतील.

**संगति** — पुढील चौपाईत साधुसमाज प्रयाग या रूपकाचा उपक्रम करतील व ते दोह्यापर्यंत पूर्ण केले जाईल. ते सांगरूपक आहे.

**हिं. मुद - मंगलमय संत समाजू । जो जग जंगम तीरथ राजू ॥७॥**

**म. मुद-मंगलमय संत-समाजहि । जो जगिं जंगम तीर्थराजही ॥७॥**

अर्थ – संत समाज मुदमंगलमय आहे कारण की तो (या) जगातील जंगम तीर्थराजच आहे.

टीका – (१) मुदमंगलमय – मुद - मोद - आनंद, मंगल-कल्याण, शुभ.

'श्वःश्रेयसं शिवं भद्रं कल्याणं मंगलं शुभम्' (अमर).

'मंगलमय कल्याणमय अभिमत फल दातार' (१/३०३)

यात मंगल व कल्याण दोन्ही शब्द आहेत; व अभिमत फल देणारे हे तिसरे विशेषण आहे, म्हणून येथे कल्याण व शुभ हे दोन्ही अर्थ अभिप्रेत आहेत.

(क) तुलसीदासांनी मुदमंगल ही जोडी बहुधा एकत्र वापरलेली आहे. कारण की जे आनंददायक वाटते ते कल्याणकारक ठरतेच असे नाही. जे कल्याणकारक व शुभ असेल ते आनंद देणारे असतेच असे नाही. कडु औषध परिणामी कल्याणकारक असले तरी घेताना आनंददायक नसते. जे शुभकार्य असे वाटेल ते आनंद व मंगल नेहमी करतेच असे नाही. संतसमाज मात्र आनंद, मंगल व शुभ या तिहींनी युक्त असतो, यांचाच बनलेला असतो. गुरुपदरजाला मंजुल मंगलमोदाची जननी म्हटलेच आहे.

(२) जंगम तीर्थराजही – मागील चरणांतील 'हि'चा अर्थ 'कारण' व या' 'हीं'चा अर्थ 'निश्चित' असा आहे. हि-ही ही यमकविषमता विषमतादर्शक आहे. कारण

(क) जंगम – गमन करू शकणारा, वाटेल तेथे जाणारा, प्रयागचा तीर्थराज स्थावर आहे. त्यात स्नानादि करण्यास इतर गावातील लोकांस तेथे गेले पाहिजे. तसे साधुसमाज तीर्थराजाचे - प्रयागाचे नाही. हा इकडून तिकडे जाऊ शकतो.

'जणू सुलभ सिंहलजनां भाग्यें प्रयागराज' (२/२२३).

यात भाव हा आहे की सिंहल द्वीपांतील - सिलोन मधील - लोकांस प्रयागराज फार दुर्लभ आहे. 'सकल सुलभ सबदिन सब देशां' चौ१२ पाहा.

(ख) तीर्थराज – प्रयाग. तीर्थराजः प्रयागः' सर्व तीर्थांचा राजा आहे. संतसाधु तीर्थे आहेत व एकत्र फिरणारे साधु तीर्थराज प्रयाग आहे हे सुचविले.

'भवद्विधा भगवतो तीर्थीभूताः स्वयं विभो' (भाग. १/१३/१०) 'विदुराबद्दल म्हटले आहे. आईबाप यांना तीर्थरूप म्हणण्याची महाराष्ट्रातील पद्धती योग्यच आहे. संतांच्या भक्तांच्या चरणस्पर्शाने तीर्थे पावन होतात.

'तीर्थीकुर्वन्तितीर्थानि स्वान्तःस्थेन गदाभृता' (भाग. १/१३/१०)

या तीर्थराजाचे राज्यात सत्य, दया, दम आदि मुख्यतीर्थे असतातच. शिवाय त्यांच्या शरीरातच विविध तीर्थे जागृत असतात.

(ग) शरीरस्थ विविध तीर्थांत व इडा, पिंगला सुषुम्ना रूपी गंगा, यमुना सरस्वती संगम असणाऱ्या प्रयागराजात स्नान करणे सर्वांसच सुलभ नसते, पण साधुसमाज प्रयागात स्नान करणे मानवांच्या स्वाधीन आहे, सुलभ आहे. प्रारब्ध, दैव यात आड येत नाही. शरीरस्थ तीर्थांचे वर्णन 'महायोगविज्ञान' या हिंदी ग्रंथात पहावे (पृ. २९- ३५)

संगति — पुढील दोह्यापर्यंत प्रयागाचे सांगरूपक आहे.

हिं.- **रामभगति जहँ सुरसरि धारा । सरसइ ब्रह्म बिचार प्रचारा ॥८॥**
**बिधिनिषेधमय कलिमल हरनी । करमकथा रबिनन्दनि बरनी ॥९॥**
**हरिहरकथा बिराजति बेनी । सुनत सकल मुद मंगल देनी ॥१०॥**
**बटु बिस्वास अचल निज धरमा । तीरथराज समाज सुकरमा ॥११॥**

म. **रामभक्ति जिथ धार भागिरथि । ब्रह्मविचार प्रचार सरस्वति ॥८॥**
**बिधिनिषेधमय कलिमलहरणी । कर्मकथा ती भानुनन्दनी ॥९॥**
**वेणी हरिहर-कथा विराजे । श्रवत सकल मुद-मंगलदा जे ॥१०॥**
**वट विश्वास अचल निज धर्मा । गणा तीर्थपति साज सुकर्मा ॥११॥**

**अर्थ** — जिथें (साधुसमाज प्रयागात) रामभक्ति ही भागीरथीची धार- प्रवाह-आहे, व ब्रह्मविचाराचा प्रचार (प्रवचन-निरूपण) ही सरस्वती आहे. ॥८॥ विधि निषेधानी युक्त व कलिपापांचा संहार करणारी कर्मकाण्डाची कथा ही सूर्यकन्या यमुना आहे ॥९॥ हरिहरकथा ही त्रिवेणी विराजत असून श्रवण घडताच जी (जे) मोद मंगलदायक आहे ॥१०॥ निजधर्माच्या ठिकाणी अचल विश्वास हा अक्षय (अचल) वट आहे असे मानावे व सत्कर्मांस तीर्थराजाचा सर्व साज सरंजाम गणावे ॥११॥

**टीका** — चौ. ८ (१) जिथ — जिथे साधुसमाज - प्रयागात. भाव हा की तीर्थ राजप्रयागात भागीरथी आहे, पण रामभक्तिभागीरथी तिथे नसून ती साधुसमाज प्रयागातच मिळावयाची. 'महापुरुष संश्रयादेव' (ना.भ.सु) असे म्हटलेच आहे. 'संतकृपेविण कुणाहि लाभ न' (७/१२०/१८).

**'हे समजुनि जो करि सत्संगा । रामभक्ति त्या सुलभ विहंगा ॥'** (७/१२०/१९).

(क) धार — प्रवाह. भागीरथीचा प्रवाह अखंड, विशाल असतो. तिच्यात स्नान करणे सोपे असते, तसाच रामभक्तीचा अखंड प्रवाह विशाल रूपाने साधुसमाजात वहात असतो, कोणीही निर्भयपणे त्यात स्नान करू शकेल.

**'हरणि पाप त्रिविध ताप स्मरता सुरसरित**
**बिलससि महिं कल्पवेलि मुदमनोरथ फलित'** (वि.प. १९ अनु.)

रामभक्ति अशीच आहे.

**'गंगा सब मुदमंगल मूला । सब सुख करणि हरणि सब शूलां'** (२/८७/४).

हे सर्व रामभक्तीने सहज घडते.

(ख) प्रयागात गंगेला गुप्तरूपाने सरस्वती मिळते व यमुना मिळते, पण गंगेत मिळणाऱ्या सर्व नद्यांस जसे गंगेचेच रूप येते त्याप्रमाणेच साधुसमाज प्रयागात जरी सरस्वती व यमुना मिळत असल्या तरी त्यांना रामभक्तीच्या धारेत जोराच्या

प्रवाहातच मिसळावे लागते. मात्र यांच्यामुळे भक्तीचा प्रवाह-पात्र अधिक विशाल व भव्य दिसते- होते. मुख्य प्राप्तव्य प्रेमभक्ति असल्याने साधुसमाजात तिचा मान मुख्य आहे.

'भक्तिहीन नर शोभे कैसा । दिसे वारिविण वारिद जैसा' (३/१५/६)

हे रामवचन आहे.

(ग) गंगेची उत्पत्ति जशी भगवच्चरणापासून तशीच भक्तीची उत्पत्ति भगवद्चरणकमलचिंतनादिकाने.

(घ) गंगा, रामभक्ती व साधुसमाज सदा सर्वत्र समबुद्धयः.' असतात. भक्तिभागीरथी वाटेल त्याला पावन करणारी आहे. गंगेत किती हि मल पडला तरी तिचे जल दूषित होत नाही हे आधुनिकांनी पाश्चात्यांनी प्रयोगांनी सिद्ध केले आहे. (हिं. सं. अंक पाहा).

(२) **ब्रह्मविचार प्रचार सरस्वति** – या चरणात सरस्वतीचे वर्णन का असा प्रश्न केला जातो, त्याचे उत्तर हेच की भक्तीचा व ज्ञानाचा जेवढा निकट संबंध आहे तेवढा भक्तीचा व कर्माचा नाही. शिवाय प्रयागला गंगा यमुनांच्या मध्ये सरस्वती गुप्तरूपाने मिळाली आहे हा सिद्धान्त दाखविण्यासाठी भक्तिभागीरथी व कर्मयमुना यांच्यामध्ये ज्ञानसरस्वती आणली आहे.

(क) प्रयागात सरस्वतीचा प्रवाह उघड दिसत नाही. साधुसमाजात ब्रह्मविचाराचा प्रचार-निरूपण ही सरस्वती तशीच प्रगट नसते, ती गुप्तरूपानेच गंगेत मिळालेली असते. भाव हा की भक्तिमध्येच ब्रह्मविद्येचा प्रचार असतो. मानसातहि हे दिसतेच. भक्तीच्या अंगभूत ज्ञानाचे वर्णन केलेले आहे. योगशास्त्रात सुद्धा गंगा यमुनांच्या मध्येच सरस्वती आहे.

'इडा भागीरथी गंगा, पिंगला यमुनानदी। इडापिंगलयोर्मध्ये सुषुम्नाच सरस्वती' (म.यो.वि) शरिरात सुद्धा सुषुम्ना सरस्वती गुप्तच आहे. साधु समाजात संत आपसातच चर्चा करतात, कोणी उत्तम विरागी भेटला तर त्यालाही श्रवण करण्यास सवड असते; तरिपण ते ज्ञानश्रवणहि कर्म भक्तिशीं समन्वित असते. कर्माचा व भक्तीचा उच्छेद करणारे किंवा केवळ वेदान्त शास्त्रचर्चा तेथे चालत नाही. श्रीमद्भागवतांतील वेदस्तुतिरूप संवाद सनकादिक ब्रह्मनिष्ठांचा असून त्यात भक्ति व ज्ञान यांचा समन्वयच केलेला आहे. (भाग१०/८७) यावर श्रीधरी टीका तिच्यावर पाध्यांची टीका फारच सुंदर आहेत. शिवाय श्रीएकनाथाचा शिष्य कृष्ण दयार्णवांच्या हरिवरदा ग्रंथात त्या अध्यायावर १५शे ओव्या आहेत. वेदस्तुति कीर्तन भास्कर प्रज्ञानानंद विरचित हस्तलिखित आहे. या सर्वांमध्ये गोस्वामी म्हणतात तसेच निरूपण आहे. नुसती पंचदशी, शारीरभाष्य, अद्वैतसिद्धि इत्यादींचे प्रवचन म्हणजे येथे सांगितलेली सरस्वती नव्हे. म्हणूनच पंत म्हणतात की नुसत्या पंचदशीच्या कोरड्या चर्चेने 'न तुटे पट प्रपंच-दशी'

(ख) सरस्वती म्हणजेच ब्रह्मविद्यारूपी सीता-भगवंताची आदिशक्ति (मं. श्लो १ टी. प.) सरस्वती ब्रह्मदेवाची कन्या असल्याचा उल्लेख, मानसात, तुलसी ग्रंथात, कोठेच नाही. वाणीपतिप्रभु धनुर्धर-राम असल्याचे पूर्वी साधार दाखविले आहे.

चौ. ९ – (१) **विधिनिषेधमय कर्मकथा** – (क) **विधि** – अमुक गोष्ट अमक्याने करावी व अशा प्रकारे करावी अशी जी शास्त्राज्ञा-धर्माज्ञा. तो विधि यालाच विधान हा पर्याय आहे. 'सत्यं वद' हा विधि आहे, 'स्वाध्यायात् मा प्रमदः' हा निषेध आहे. धर्मशास्त्र म्हणजे मुख्यतः स्मृति श्रुति, व तदुपजीवी निबंध ग्रंथ. मोठमोठ्या यज्ञादिकांविषयी विधि-निषेध व विधान निरनिराळ्या वेदांच्या संहितांतून सुद्धा आहे. धर्मसिंधु, निर्णयसिंधु, प्रायश्चितेंदुशेखर, श्राध्दमंजरी, श्राद्धमयुख, संस्कार कौस्तुभ, इत्यादि आचारधर्माचे ग्रंथ, मनु याज्ञवल्क्य इत्यादि स्मृति, दानचंद्रिका इत्यादि दानविषयक ग्रंथ, आणि बहुतेक सर्व पुराणे यात विधिनिषेधमय कर्मकाण्डाचे वर्णन आहे. हे सर्वग्रंथ वेदानुसारी असल्याने मानसात शास्त्रविधि न म्हणता पुष्कळ ठिकाणी वेद-विधि व कुठे विधि म्हटले आहे. 'सजिति वेदविधिवत वेदीतें (१/१००/२) 'श्रुति विवाह विधि वर्णिति जेवी' (१/१०१/१) 'वेदविहित नृपतनुला स्नपविति' (२/१७०/१) 'क्रिया दाह अशी सविधि उरकली' (२/१७०/५) 'ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि' (भ.गी.) येथे विधि- विधान हा शब्दच आहे.

(क) **निषेध** – अमुक करू नये, अशाप्रकारे करू नये अशा ज्या शास्त्राज्ञा त्यास निषेध म्हणतात. विधिंचे पालन व निषेधांचा त्याग म्हणजेच धर्माचरण. कर्मशास्त्र मुख्यतः या दोन गोष्टीनींच भरले आहे म्हणून 'मय' हा प्रत्यय प्राचुर्य दर्शक जोडला.

(ख) **कर्मकथा** – म्हणजे कर्म कटकट नव्हे. तर कर्म मार्गाची चर्चा. यात नीतिधर्म, वर्णधर्म, आश्रमधर्म, राजधर्म, स्त्रीधर्म, इत्यादि जितकी विविध कर्तव्ये व कर्मे करावी लागतात ती करणारांचे सर्वांचे, व्यक्तींचे, समाजाचे हित व परमहित, म्हणजेच ऐहिक हित व पारमार्थिक हित साधण्याच्या दृष्टीने उत्पन्न झालेले जे शास्त्र तेच धर्मशास्त्र: यालाच कर्मकाण्ड, कर्ममार्ग इत्यादि नावे आहेत.

(ग) धर्मशास्त्रात आयुर्वेद, आरोग्यशास्त्र, समाजशास्त्र, योगशास्त्र, वेदान्त शास्त्र, ज्योतिषशास्त्र इत्यादि अनेक शास्त्रांचा मधुर समन्वय आहे. या कर्मकाण्डाचे म्हणजेच वेदपुराणोक्त धर्मशास्त्राचे प्रत्येकाने यथाविधि पालन केले तर सर्वांनाच सुख होते. द्वेष मत्सरादिकांचे हुन्नर चालत नाही.

**'वर्णाश्रम निज निज धर्म-निरत वेदपथिं लोक ।**

**वर्तति, पावति सदासुख नहिं भय रोग न शोक'** (७/२०).

आज वर्णाश्रमादि धर्मांची अवनति होत असल्याने दुःख भय रोग शोकादि वाढत आहेत हे प्रत्यक्ष दिसत असता अद्याप डोळे उघडत नाहीत हे हिंदुसमाजाचे दुर्भाग्य!

२ 'कलिमल हरणी – कलिमल - कलियुगातील पापें. पिबति-भक्षयति कर्तारम् म्हणून पाप, करणाऱ्याला गिळते, खाते म्हणजेच त्याचा नाश अध:पात करते, दुःख भय, शोक वियोगरोगांनी छळते ते पाप. पुत्र न होणे, कन्याच होणे, मुलें न जगणें, क्षय, अपस्मार कुष्टादि सर्व रोग, भूत, प्रेत, यक्षगंधर्व देव नाग इत्यादिकांनी झपाटणे, बालोन्माद, ग्रहोत्थ उन्माद वगैरे सर्व पूर्वकृत व इथे केलेल्या पापांचे फळ होय. विधिंचे पालन न करणे व निषेधांचा त्याग न करणे म्हणजे पाप. अधर्म.

'भुञ्जते ते पापा ये पचन्त्यात्मकारणात्' (भ.गी.)

पंचमहायज्ञादि न करता जेवणे म्हणजे पाप भक्षण आहे. असे पाप भक्षण करणाऱ्यांना होणारी प्रजा पुण्यशील कशी होईल? ती आईबापांचा अपमान, अवहेलना वगैरे करणारी नाही झाली तरच नवल? पापांचा विनाश तदर्थ केलेल्या पुण्य कर्माने - प्रायाश्चित्तादि तपश्चर्येने होतो. म्हणून कर्मकथेला कलिमल हरणी म्हटले.

(३) भानुनन्दनी – सूर्यकन्या यमुना.

'पुन्हा नमन यमुनेला करती । रवितनयेची वर्णिति महती' (२/११२/१-२).

यमुना फार खोल, तसा कर्ममार्ग गूढ-गहन आहे. कर्म मार्ग मुख्यतः सूर्यावर अवलंबून असतो; कालमापनाचे मुख्य साधन रवि. 'त्वम् एव प्रत्यक्षं कर्म कर्तासि' (सू.उ.) सर्व प्राणिमात्रांचे जीवन कर्मावरच अवलंबून असते. आणि कर्माचा आधार सूर्य म्हणून कर्मकथेला सूर्यकन्या यमुना म्हटले. यमुनेचा वर्ण काळा, पाणी काळे दिसते, तसेच विधिनिषेधमय कर्मशास्त्राचे पालन न केल्याने पाप लागते. पापपुरुषाचा वर्ण काळाच वर्णिला आहे. पापपुरुष दहन विधि गायत्री पुरश्चरणपद्धतीत पाहावा. नित्य नैमित्तिक कर्मे दुरित- पाप- क्षयासाठीच करावयाची असतात. उपासना मार्गात व ज्ञानमार्गात कर्म नाही असे नाही. त्यातही विधिनिषेध आहेतच.

(क) भानुनन्दनी – रविनन्दनि - नें हा भावही निघतो की यथाविधि कर्माचरणाने सूर्याला आनंद होतो. 'सूर्यः आत्मा जगतः तस्थुषश्च' (सू.उ.) या वचनाने सिद्ध होते की यमुनेचा सुद्धा परमात्म्याशी अगदी निकट संबंध आहे. यमुना -सूर्यकन्या आहे व सूर्यनारायण, भगवान, आत्मा आहे. या तिन्ही नद्यांचा उगम प्रभुपासूनच आहे. म्हणून या जिथे संगम करतात तो प्रयागराज तीर्थराज झाला, तसाच भक्ति ज्ञान व कर्म यांचा जेथे संगम होतो तो साधुसमाज प्रयाग इतर सर्व तीर्थात श्रेष्ठ आहे. थोडी यमुनेची कथा देऊन मग पुढील चौपाई.

रविनन्दिनी – यमुना - यमुना नदी हिमालयात जम्नोत्री (यमुनोत्तरी) जवळ उगम पावते व प्रयागात गंगेला मिळते. पुराणांनुसार ही यमाची बहीण आहे. यमी हे तिचे नाव होते. सूर्याला संज्ञा नावाच्या पत्नीपासून झालेली ही दोन मुले. छाया व मार्तंड यांचा पुत्र शनि. सूर्याने दिलेल्या शापामुळे यमीं नदी रूप झाली. यमाने कार्तिकशुद्ध २ ला आपल्या बहिणीकडे जाऊन भोजन केले व प्रसाद म्हणून तिला

वर दिला की, कार्तिक शुक्ल द्वितीयेला जे कोणी तुझ्या जलात स्नान करतील ते यम दंडातून मुक्त होतील, त्यांना यमलोकात यातना दिल्या जाणार नाहीत. तेव्हापासून हा दिवस भाऊबीज म्हणून प्रसिद्ध झाला (हिं. भाई बीज). भाऊबीजेला यमुना तीरी विशेष यात्रा भरत असतात. यमुनेत स्नान करणे हे पुण्य कर्म अनेक घोर पापांचे क्षालन करते 'यमुना कलिमलहरणी सुशोभन'.

चौ. १० (१) वेणी हरि हरकथा विराजे – (क) वेणी – त्रिवेणी, तिघींच्या संगमाचे स्थान. त्रिवेणी किंवा त्रिवेणी संगम असेहि म्हणतात. साधुसमाज प्रयागात भक्तिगंगेत जेथे ज्ञान सरस्वती व कर्म यमुना मिळतात ते स्थान म्हणजे हरि-हर-कथा.

(ख) येथे अशी शंका घेतात की त्रिवेणीत तीन वस्तूंचा उल्लेख पाहिजे तो का नाही? प्रयागराजात प्रत्यक्ष दिसतो संगम दोघींचाच तसा तेथे हरि-राम-विष्णुकथा व हर-शिव-शंकर कथा यांचाच दिसतो. यात सरस्वती ब्रह्मनिरूपण गुप्त असतेच. हरि हे सेव्य सूचक पद आहे व हर सेवक सूचक आहे. शंकरांसारखा दुसरा रामभक्त कोणी नाही. 'प्रिय शिवसम मजला नहिं कोणी (१/१३८/६) हे प्रभुवचनच आहे, आणि भगवान व त्यांचे भक्त यात अभेद असतो 'तस्मिंस्तज्जने भेदाऽभावात्' (ना.भ.सू.) म्हणून भगवान आणि त्यांचे भक्त यांच्या कथा हा गूढार्थ आहे.

(ग) विराजे – विशेष शोभते. भाव हा की इतर देवदेवतांच्या, सिद्ध, साधक, आर्त व अर्थार्थी भक्तांच्या कथा पण तेथे शोभतात. ध्रुव, उपमन्यु, मृकंडुनंदन हे आर्त होते. या कथांत भक्ति-ज्ञान-कर्म यांचा सुंदर संगम असतो.

(२) श्रवत सकल मुद-मंगलदा जे -- जे-जी, श्रवत - ऐकताच; त्या त्रिवेणीचे स्नान किंवा स्मरण करावे; या त्रिवेणीचे श्रवण करताच ही मोदमंगलदायक होते.

'स्मरतां सकल सुमंगलदा अति । मोदें स्नान -' (२/१०६/५-६ प.)

दोन्ही त्रिवेणी मुदमंगलदायक आहेत पण प्रयागच्या त्रिवेणीत स्नान केले तरच मोद होतो, स्मरणाने मंगल होते. येथे श्रवणानेच दोन्हींचा लाभ होतो.

'कल्याणकार्यि विवाहमंगलि सर्वदा सुख पावती' (शिवकथा - १/१०३).

'उपवीत लग्नोत्सव सुमंगल गाति सादर ऐकती ।
वैदेहिराम अनुग्रहें ते सर्वदा सुख पावती' (१/३६१)

(३) शंकर – हर हे सद्गुरूचे रूप आहे.

'गुरुविण भवनिधि कोणि न तरती' गुरुविण नोहे ज्ञान'.

म्हणून 'हर' नें ज्ञान सुचविले. हरि=राम, 'रामाख्यमीशं हरिम्' (मं. श्लो. ६) सुचविले की भक्ति व ज्ञान यांची प्राप्ती या श्रवणाने होते. कर्माचा संबंध हरिशींच आहे; कारण ते हरीला समर्पण करावे लागते. भाव हा की कर्म रामार्पण न केल्यास ज्ञानभक्ति मिळत नाहीत.

चौ. ११ – (१) 'वट विश्वास अचल निज धर्मा' – प्रयागला अक्षयवट आहे. तसा या जंगम प्रयागात अक्षयवट कोणता हे सांगितले.

(क) निज – धर्मा – आपापल्या वर्णाश्रमधर्माच्या ठिकाणी. धर्मा हे सप्तमीचे रूप आहे, व कर्मा - कर्मास हे चतुर्थीचे - स्वधर्माच्या ठायीं अचल-अटल विश्वास असल्याशिवाय मात्र मुदमंगल होणार नाही.

'धैर्य धर्म सन्मित्र नि नारी । आपत्कालिं परीक्षित चारी ॥'

म्हणून अचल शब्दाने सुचविले की आपत्काळी सुद्धा स्वधर्माचरणाचा त्याग न करणे हाच अक्षयवट आहे.

(ख) प्रलयकाली फक्त अक्षयवट हा एकच आधार राहतो. त्याचप्रमाणे देहप्रलय झाल्यावर जीवाला एकमात्र आधार यथाविधि केलेल्या स्वधर्माचरणाचाच असतो.

'धर्म एक हतो हन्ति धर्मो रक्षति रक्षितः'

'धर्मेण हि सहायेन तमस्तरति दुस्तरम्'

'धर्मस्तमनुगच्छति' बाकी सर्व येथेच राहते. धर्माच्या योगाने दुस्तरतम - भवसागर - तरता येतो.

(ग) अक्षयवटाच्या पत्रावर-पानावर-बालमुकुंद-भगवान दिसतात व ते प्रलयभयापासून सोडवितात; तसेच अचल विश्वासाने केलेल्या धर्माचरणानेच शेवटी भगवान कृपा करतात व भवभय उरत नाही. (मार्कंडेय कथा पाहावी)

'विघ्न कोटिने नीतिला सोडि संत मन काय' (६/३४)' 'स्वधर्मेनिधनं श्रेयःपरधर्मो भयावहः'

'श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात्' (भ.गी.)

'स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः' (भ.गी.)

(घ) स्वधर्माच्या ठायीं दृढ विश्वास हा कर्म, उपासना, ज्ञान, भक्ति या सर्वांचाच पाया असल्याने तो सर्वांच्या शेवटी खाली, आधारासारखा - येथे आला; भक्ति हा कळस प्रथम दिसला. उ. कां. दो. ९० मध्ये सर्व वर्णन संपल्यावरच शेवटी विश्वासाचा उल्लेख केला आहे.

(ङ) मानसात आणखी एके ठिकाणी अक्षय वटरूपक आहे.

'सीतास्नेह दिसे वट वाढत । रामप्रेम बाल वर शोभत ॥६॥

मुनि चिरजीवी ज्ञान विकलजणुं । पावे बुडत बाल-अवलंबनु' ॥७॥ (२/२८६).

तसाच अचलधर्मनिष्ठा हा वट होय, त्यावर रामप्रेमभक्तिरूपी बालक असते; चिरजीवी = जीव, त्या जीव रूपी मार्कंडेयास त्या बालाचा आश्रय मिळतो; व ज्ञानाला विव्हळण्याची पाळी येत नाही.

'यत्र चैकार्णवे शेते नष्टे स्थावरजंगमे । सर्वत्र जलसंपूर्णे वटे बालवपुर्हरिः'

याचाच पारमार्थिक अर्थ वर दिला आहे.

'वर्णाश्रमाचारवता पुरुषेण परः पुमान् । विष्णुराराध्यते पन्था नान्यस्तत्तोषकारणम्।' (प.पु.प्रयाग माहात्म्य)

'न चलति निजवर्ण धर्मतो यः । सममतिरात्मसुहृद्विपक्षपक्षे ।
न हरति न हन्ति किंचिदुच्चैः । सित (शुद्ध) मनसं तमवेहि विष्णुभक्तम्' (वि.पु.)

(२) गणा तीर्थपति-साज सुकर्मा – गणा-गणावा, समजा, म्हणा. हा शब्द मूळात नाही, वृत्ताच्या सोईसाठी घालावा लागला. तीर्थपति- तीर्थराज, येथे साधुसमाज रूपी तीर्थपति.

(क) साज – समाज - सरंजाम.

'त्रिवेणि माधवं सोमं भरद्वाजंच वासुकिं । वन्देऽक्षयवटं शेषं प्रयागं तीर्थनायकम्' यातील त्रिवेणी, अक्षयवट व प्रयाग यांचे वर्णन मागे झाले. बाकी राहिले तेच तीर्थराजाचा साज-सरंजाम. परिवार. जंगम तीर्थराजांत सत्कर्मे, शुभकर्मे, हाच परिवार. दया, परोपकार, अहिंसा, परदुःखदुःखिता, परोत्कर्षानंद, पूजा, भजन, एकादशी, रामनवमी आदि जयंत्योत्सव, व्रतें इत्यादिंचा समावेश यात होतो.

संगति – पुढील दोन चौपायात या तीर्थराजाचे विशेष माहात्म्य सांगतात.

हिं.- **सबहि सुलभ सब दिन सब देसा । सेवत सादर समन कलेसा ॥१२॥**
**अकथ अलौकिक तीरथ राऊ । देइ सद्य फल प्रगट प्रभाऊ ॥१३॥**

म.- **सकल सुलभ सब दिन सब देशा । सादर सेवत शमवी क्लेशा ॥१२॥**
**अकथ अलौकिक तीर्थराज हा । उघडा महिमा सद्य फलद हा ॥१३॥**

अर्थ – हा (साधुसमाज रूपी) तीर्थराज सर्व देशात, सर्वकाळी, सर्वांनाच सुलभ आहे. व त्याचे आदराने सेवन केले असता तो सर्व क्लेशांना शमवितो ॥१२॥ हा तीर्थराज - अलौकिक व अवर्णनीय (अकथ) आहे व याचा प्रभाव अगदी उघड-प्रगट-दिसतो आणि हा सद्य (ताबडतोब, रोख) फलदायी आहे ॥१३॥

टीका – (१) दुसऱ्या ओळींत 'हा' शब्द हिंदीत नाही, पण अर्थ स्पष्ट करण्यासाठी घातला व त्याने सुचविले की तो तीर्थराज असा नाही. या प्रयागराजाचे माहात्म्य प्रभाव-स्थावर प्रयागराजापेक्षा अधिक श्रेष्ठ आहे हे आता सांगतात.

(क) सादर – विश्वासश्रद्धायुक्त, मनमतिचित्त लावून. श्रवण 'कथाश्रवण कसे करावे' हे प्रस्तावनेतील प्रकरण पाहावे. या साधुसमाजाबद्दल पूज्यभावना, नम्रता, निरहंकारवृत्ति पाहिजेतच; तरच आदर वाटेल.

(ख) सेवत – तेथे चालणारी हरिहरकथा श्रवण करणे, साधूंची सेवा, वंदनादि करणे.

(ग) शमवी क्लेशां – अविद्यादि पंच क्लेशांचा विनाश करतात. 'क्लेशहारिणी' ची टीका (मं.श्लो. ५ प.)

## स्थावर - जंगम - प्रयाग तुलना

| क्रम. | जंगम प्रयाग - साधुसमाज | स्थावर प्रयाग, प्रयागराज. |
|---|---|---|
| १. | हा जंगम आहे. | स्थावर आहे. |
| २. | सर्व देशांत आहे. | एकाच ठिकाणी आहे. |
| ३. | याचे माहात्म्य सर्व दिवशी सर्वकाळी समान. | माघमकरगत रवींत विशेष. |
| ४. | अलौकिक, दिव्य आहे. | लौकिक आहे. |
| ५. | गरीब श्रीमंत, स्त्रीपुरुष बालक, इत्यादि सर्वांना सुलभ आहे; कारण सर्व देशात संतसमागम मिळू शकतो. | वृद्ध, बाल, रोगी, निर्धन इत्यादिकांना व प्रापंचिकांना दुर्लभ. |
| ६. | प्रभाव, गुण, स्वभावादिकांचे परिपूर्ण वर्णन करता येणे कोणालाही अशक्य. 'विधिहरिहर' - ३/११ची टीका पहा. | याचा महिमा मानवांना वर्णन करता आला नाही तरि तो वाचातीत आहे असे श्रुति म्हणत नाहीत. |
| ७. | याच्या सारखा हाच, संतसमाजसेवक (अधिकारी) संतच बनतात. | दुसरे प्रयाग आहेत, व ते याहून श्रेष्ठ आहेत. ते -पंचप्रयाग-, देवप्रयाग, रुद्रप्रयाग, नंदप्रयाग, कर्णप्रयाग व विष्णुप्रयाग. |
| ८. | तत्क्षणी-तत्काळ फळ देणारा आहे. 'दर्शनादेव साधवःपुनन्ति' (भाग.). | पुष्कळ काळाने देहपातानंतर याचा अनुभव येतो. तीर्थ, देव, 'पुनन्ति उरुकालेन' |
| ९. | पापं तापंच दैन्यंच हन्ति साधु समागमः. | फक्त पापच नष्ट करतात. |
| १०. | अर्थ, धर्म, काम, मोक्ष हे चारी पुरुषार्थ व मुक्तीवरील भक्ति याच देही प्राप्त होऊ शकते. जिवंत असताच मोक्ष मिळतो. | याने चारी पुरुषार्थ भक्ति मिळू शकते पण उधारीने, प्रयागात त्रिवेणीत देहत्यागाने मोक्ष मिळतो. |
| ११. | याच देहि गुण स्वभाव-शील सुधारतात. | हे याने याच देही होत नाही. |
| १२. | यात बुडी मारावी लागतेच प्रेमाने. | यातही तसेच करावे लागते. |
| १३. | यात जाऊन स्नानादि करण्यास खर्च व कष्ट नाहीत. | खर्च व कष्ट करावे लागतात. |

ल. टे. मागील ६-१३ या आठ चौपायांशी समानार्थक श्लोक मा. पी. (पृ.११५) दिला आहे तो.

'यत्र श्रीरामभक्तिर्लसति सुरसरिद्भारती-ब्रह्मज्ञानम् । कालिन्दी कर्मगाथा हरिहरचरितं राजते यत्रवेणी ॥ विश्वासः स्वीय धर्मेऽचल इव सुवटो यत्र शेते मुकुन्दः। सेव्यः सर्वैः नदासौ सपदि सुफलदः सत्समाजःप्रयागः॥'

पं. रामकुमारजींच्या टाचणांत सापडला असे संपादक म्हणतात, पण कोठला हे त्यात सापडत नाही. तुलसीकलेप्रमाणेच चौपाया या श्लोकापेक्षा पुष्कळच सरस आहेत हे खरे, पण 'ब्रह्मज्ञानम्' हे श्लोकातील पद व 'गाथा' शब्द सांगतात की हा पुराणादिकांतला नाही; रामकुमारजींनीच रचला असावा. 'ब्रह्मज्ञानम्'चे जागी 'ब्रह्मविद्या' शब्द घातला की वृत्तदोष उरत नाही. असे अनेक श्लोक मा.पी. मध्ये ठिकठिकाणी आहेत व काहींना खोटाच आधार दिलेला आहे.

(क) संगति -- सद्य फल कोणते मिळते ते दोह्यांत सांगतात,

हिं.दो. सुनि समुझहि जन मुदित मन मज्जहिं अति अनुराग।
लहहिं चारि फल अछत तनु साधु समाज प्रयाग ॥२॥

शब्दार्थ — अनुराग – अनुरागात, अछत – असता, प्रयाग - प्रयागात.

दो.म. परिसुनि समजति मुदित मन मज्जति अति अनुरागिं ॥
लाभचारि फल या तनूं साधुसमाज-प्रयागिं ॥२॥

अर्थ -- साधुसमाजरूपी प्रयागात जे कोणी सेवक (जन) मुदित मनाने, आनंदाने श्रवण करून समजतील व अनुरागात मग्न होतील ते (त्रिवेणीत मज्जन करणारे) याच तनूत (तनू) अर्थ धर्म काम मोक्ष ही चारी फळे प्राप्त करतील. त्यास मिळतील ॥२॥

टीका. — वि. सू. (१) वर दिलेला अर्थ कोणीही टीकाकारांनी दिलेला नाही. काहींनी तो भाव यथातथा दिला आहे. हा लेखक पण १५/११/५३ ला टीका लिहिपर्यंत हा अर्थ जाणत नव्हता; पण ही टीका यथार्थयुक्त व्हावी अशी त्या दयाघनाचीच इच्छा! त्यामुळे प्रयागात त्रिवेणी स्नानाचा विचार येताच अनुराग व प्रयाग ही सप्तमीची रूपे घेतली पाहिजेत असे निःसंशय ठरले; व रूपक योग्य प्रकारे जमले. प्रयागात श्रद्धेने, आनंदाने, स्नान केले तर चारी पुरुषार्थांची प्राप्ती होते; या देहीं नाही इतकाच फरक. येथे साधुसमाज प्रयाग आहे, या प्रयागात हरिहरकथा त्रिवेणी आहेत. या त्रिवेणीत स्नान करावयाचे आहे. प्रयागला त्रिवेणी स्नानाचाच महिमा आहे.

(२) तुलसीदासांनी पुष्कळ ठिकाणी प्रत्ययहीन-शब्दांची मूळ रूपेच, तृतीया सप्तमी विभक्तीची वापरली आहेत; किंवा या विभक्तीचा प्रत्यय सानुनासिक अनुस्वारांचे (घरीं, वनीं, यांच्या सारखे) चिन्ह, छापलेले नाही असे म्हणावे. उदा. 'विधिवस, सुजन कुसंगत परहीं' कुसंगतँ-कुसंगतीत (१/३/१) 'जो जग जंगम तीरथराजू' मागली ७वी चौपाईच. 'वंदनीय जेहिं जग जसु पावा' (चौ.६) मब देसा (चौ.१२) येथल्यासारख्या सज्जनाचा विषयच असलेले उदाहरण 'मज्जहिं सज्जन वृंद बहु पावन सरजू नीर' (दो.३४) यांच्या टीकेत अर्थ करताना टीकाकारांनीसुद्धा 'नीर' हे सप्तमीचेच रूप घेतले आहे! बुडी जलातच मारावयाची असते. येथे सप्तमीचाच विचार कर्तव्य असल्यामुळे तृतीयेची उदाहरणे नकोत. 'जग' व 'कुसंगत' शब्द असलेल्या वरील उदाहरणात संदर्भाने अर्थ सहज समजतो तसे या दोह्यात होत नाही, म्हणूनच टीकाकार व हा लेखक आजपर्यंत चुकले. ऐकून समजणे म्हणजे बुडी मारणे असा अर्थ कोणी केला आहे, पण तो चुकीचा आहे हे पुढे मानसातील आधारांनीच स्पष्ट होत आहे.

टीका — १. **साधुसमाज प्रयाग** — हे प्रथमा विभक्तीचे रूप मानल्यास - (जसे सर्वांनी, या लेखकासह आजपर्यंत मानले) तर श्रवण (परिसुनि) शब्दाने सुचविलेली कथा हे कर्म व साधुसमाज हा कर्ता ठरेल. याच भीतीने 'साधुसमाज प्रयागाचे वर वर्णन केलेले माहात्म्य श्रवण केल्याने' असा अर्थ एका टीकाकारांनी केला आहे. पण एवढ्यानेच चारी पुरुषार्थ देही कसे मिळणार? पुष्कळ काल सत्संगतीत हरिकथा श्रवण करावे तेव्हा पुरुषार्थ व भक्ति प्राप्त होतात हा मानससिद्धान्त (७/६१/५-८ व दो.) विसरून भागणार नाही.

(क) बुडी त्रिवेणीत मारतात, येथे 'वेणी हरिहरकथा विराजे' ही साधुसमाज प्रयागात असते. म्हणून प्रयागात असा अर्थ घेणे सयुक्तिक, आवश्यक आहे.

२. जन — सेवक - मानसात नुसता जन शब्द सेवक, दास (भक्त) याच अर्थाने वापरला आहे. नारदभक्ति सूत्रात 'तस्मिन् तज्जने भेदाभावात्' याच अर्थाने जन शब्द आहे. पुरजन, नगरजन इत्यादीत लोक, निवासी, प्रजा या अर्थाने आहे.

(३) **मुदित मन परिसुनि** — जर प्रसन्न मनाने श्रवण केले नाही तर मन त्यात रमणार नाही व अर्थ, भाव, गूढार्थ लक्षात येणार नाही व मग स्नान घडणार नाही.

(४) **अति अनुरागिं मज्जति** — अनुराग - प्रेम, प्रीति, स्नेह, मज्जति - बुडी - बुड्या मारतात. बुडी जलातच मारावयाची असते. त्रिवेणीच्या जलात बुड्या मारतात. '**पदकमल परागांरस - अनुरागा**' (१/२११छ. ४) '**रस किं जलाविण कधी खगपते**' (७/९०/५).

(क) पाण्यात बुडी मारली म्हणजे पाण्याशिवाय इतर काही दिसत नाही. पाण्यातील वस्तू कदाचित दिसतील; ऐकू येत नाही, बोलता येत नाही; श्वास चालत नाही; पाणी थंड असेल तर रोमांच येतात. अशा प्रकारची दशा श्रवण करताना होणे

व ती शोकरसाने न होणे, याचेच नाव प्रेमरसात - अनुरागात - बुडी मारणे, डोळ्यांतून शीतल अश्रु गळत राहून वस्त्रे व शरीर भिजणे हे बुडी मारल्याचे मुख्य लक्षण आहे. अश्रू उष्ण, गरम असतील तर ते शोक, भय इत्यादि राजस विकारांपासून आहेत असे समजावे 'स्नेहजल' (बा. ३७)

'श्रवणी कथनि' हर्षति पुलकती । ते सुकृती मनमुदित मज्जती' (१/४१/६)

ही हरिकथा श्रवणात मज्जन करण्याची व्याख्या मानसातच आहे. श्रवणास अधिकारी सुकृती असला तरच हे घडणार. चालू दोह्यात अति अनुरागाचा उल्लेख आहे म्हणून वरील लक्षणे आणि अश्रुप्रवाह, आनंद, कंठावरोध, गद्गदकंठ, देहादि स्तब्ध होणे ही सर्व लक्षणे पाहिजेत.

'मम गुण गातां तनू पुलकते । गद्गदगिरा नयनि जल गळतें' (३/१६/१२) हेच प्रेमभक्तीचे लक्षण आहे.

(ख) संगति — देह असताच' यावरून फलप्राप्तीचा काळ ६०/७० वर्षे किंवा अधिकही असू शकेल हा अर्थ निघू नये म्हणून पुढील चौपाईत दृष्टांतानी ही भीति दूर करतात.

हिं.- मज्जन फल पेखिअ ततकाला । काक होहिं पिक बकउ मराला ॥१॥
सुनि आचरज करै जनि कोई । सतसंगति महिमा नहिं गोई ॥२॥

म.- मज्जन फल तत्काल पहावे । बकें हंस पिक काकें व्हावे ॥१॥
ऐकुनि कुणि विस्मय ना माना । गुप्त संतसंगति महिमा ना ॥२॥

अर्थ — मज्जन केल्याचे फल तत्काल अनुभवास येते. (कसे ते) पहा - बगळा हंस होतो व कावळा कोकिळ होतो. ॥१॥ हे ऐकून कोणी आश्चर्य मानू नका, कारण सतसंगतीचा महिमा (काही) गुप्त नसतो (अगदी प्रगट असतो.) ॥२॥

टीका. चौ.१ — (१) हरिकथा श्रवणात प्रेमजळात बुडया मारल्याचे फळ तत्काळ कसे मिळते हे अन्योक्तीने सांगतात. काहींना काही तरी चांगला बदल स्वभावात झालेला दिसेल हे सांगण्याचा हेतु आहे.

(क) पिक काकें व्हावे — (होहि - होतात).

कावळा व कोकिळ दिसण्यात अगदी सारखे असतात, पण कोकिळेचा आवाज मधुर असतो कावळ्याचा कठोर कर्कश असतो. भाव हा की कावळ्यासारखे कठोर कटु कर्कश भाषण करणारे बोलणारेसुद्धा जर संतसंगतीत प्रेमरसात बुडया मारतील तर त्यांचा दुर्गुण गेलेला दिसेल. येथे दृष्टान्त न समजता अन्योक्ति एवढ्याचसाठी की काकाचे निमित्त करून खल सुधारतात हे सांगावयाचे आहे. 'सत्संगात्भवतिहि साधुता खलानाम्' (सु.र) काक भुशुंडीचा देह कावळ्याचा असून काकस्वभावधर्म त्यांच्यात मुळीच नाहीत.

(१) बकें हंस व्हावे – (बकउ - बकसुद्धा, मराल-हंस) बगळा दंभाचे प्रतीक आहे. पाण्यात एका पायावर उभा राहून एकाग्र, अर्धोन्मीलित नेत्र, तटस्थ उभा असा जणू तपस्वीच! पण मासा समोर येण्याची खोटी की पकडून स्वाहा. संतांच्या संगतीने दांभिक लोक दंभ सोडतात हा भाव. कपटाशिवाय दंभ होऊ शकत नाही, म्हणून कपटनाश सुचविला.

'काकः कृष्णः पिक कृष्णः को भेदः पिककाकयोः। वसन्ते पुनरायाते काकः काकः पिकः पिकः (सु. र.)

याने हे ठरले की काक व कोकिळ यात फक्त स्वरभेदच आहे. हंस शब्दाने सुचविले की खलांच्या ठिकाणी विवेक उत्पन्न होईल. या दोघांच्या निमित्ताने सुचविले की आसुरी संपत्तीचे दंभ व पारुष्य हे दोन दुर्गुण जातील.

'दंभो दर्पोऽभिमानश्च क्रोधः पारुषमेवच। अज्ञानं' (भ-गी-१६)

ही आसुरी संपत्तीची मुख्य लक्षणे आहेत.

(क) काकपिक या उदाहरणाने वाचाशुद्धि व 'बकहंस' ने मानसिक शुद्धि सुचविली. म्हणजेच संतसमागमात हरिकथा प्रेमजलात बुड्या मारणारे हळुहळु सुधारत असलेले दिसतील.

(ख) हे फरक कोणात केवळ दर्शनाने, स्पर्शाने, भाषणाने, श्रवणाने, किंवा दीर्घकाळ संतसमागम करून होतील. कोणास साधन करावे लागेल. येथे श्रद्धा, विश्वास व प्रेम मुख्य भांडवल पाहिजे. हे ज्या प्रमाणात असेल त्या प्रमाणात कमी अधिक काळ लागेल, पण सुधारणेचे अनुभव तत्काळ येऊ लागतील हे मात्र खरे. स्थावर प्रयागात सर्व लाभ उधारीचे. 'श्रवति सादर' (१/३८/२) 'करतां मज्जन पाना सादर' (१/४३/६) 'सादर सब मज्जती त्रिवेणी' (१/४४/४) सर्वत्र सादर श्रवण सांगितले आहे.

चौ. २ – काक पिक होतो व बक हंस होतो हे ऐकून आश्चर्य वाटेल; पण तसे वाटण्याचे कारण नाही; कारण की संतसंगतीचा महिमा अगदी प्रकट आहे. साधुसमाज प्रयाग याविषयाचे वर्णन मागील चौपाईत संपले. आता संतमहिमा वर्णन सुरू होत आहे. या चौपाईत मागील व पुढील विषयाचा सांधा किती बेमालूम जोडला आहे.

संगति – आता संतमहिमा निदर्शक उदाहरणे देतात.

**हिं.- बालमीक नारद घटजोनी । निज निज मुखनि कही निज होनी ॥३॥**

**म.- वाल्मीकी नारद घटजानीं । निज होणे कथिले स्वमुखानी ॥३॥**

अर्थ – वाल्मीकी ऋषि, नारद (देवर्षि) व घटज - (घटजोनी - घटयोनि) - अगस्त्य ऋषि यांनी आपापल्या मुखाने आपली हकीगत (कसे होतो व संतसंगतीने कसे झाले ही कथा) सांगितली आहे ॥३॥

टीका – ही तीन उदाहरणे देण्याचे कारण इतकेच की ही नावे आजही बऱ्याच लोकांस माहीत आहेत व त्यांचे पूर्वचरित्रही साधारणपणे विहित आहे. पुष्कळवेळा माहित असलेल्या गोष्टींचा - कार्यकारण संबंध व मर्म समजलेले नसते. नवीन ज्ञानाची प्राप्ती संचित ज्ञानाच्या साह्यानेच होत असते, म्हणून परिचित दृष्टान्त दिल्याने सिद्धांत समजतो व ठसतो.

१ **वाल्मीकी** – हे आदिकवि, ऋषि झाले. ते देवर्षि नारदांच्या अल्पसंगतीने व उपदेशाने. ही कथा प्रसिद्ध आहे म्हणून विस्तार नको. पण त्यांनी आपल्या मुखाने सांगितली ती अध्यात्म रामायणात. (अयो. सर्ग ८/६४-८८) त्यांनी आपला पूर्व वृत्तांत रामचंद्रास सांगितला त्याचे सार 'मी विप्रपुत्र होतो पण आचार शूद्रासारखा, शूद्र स्त्रीपासून पुत्रसंतति झाली, पुढे कोळी भिल्लांच्या संगतीने चोर, वाटमाऱ्या बनलो, पण मुनींच्या संगतीने व तुमच्या विलोम-नामाच्या प्रभावाने आजच्या स्थितीत येऊन आपले दर्शन झाले इत्यादि सांगितले.

(क) कुठे ब्रह्मदेवाच्या दहामानस पुत्रांपैकी एक असल्याचा उल्लेख सापडतो, व. बाकीचे सर्व चरित्र सारखेच. कुठे प्रचेतापुत्र म्हटले आहे.

**'वेदः प्राचेतसादासीत्साक्षाद्रामायणात्मना'** (वा. रा. प्रस्तावना)

कल्पभेदाप्रमाणे जन्मस्थान निराळे असले तरी जन्माने कोळी असल्याचा उल्लेख कुठे नाही. कोळी लोकांच्या संगतीत त्याला 'वाल्हा' कोळी म्हणू लागले. वाल्मीकांतून-वारूळांतून बाहेर पडले म्हणून वाल्मीकी हे नाव मात्र प्रत्येक ठिकाणी आहे.

(२) **नारद** – दासीपुत्र होते. त्यांनी आपली कथा (भागवतात) व्यासांस सांगितली आहे. 'मी पूर्वजन्मात ब्राह्मणांच्या एका दासीचा मुलगा. जनकाचे - बापाचे नाव माहीत नाही. मी लहान असता, चातुर्मास एके ठिकाणी राहणाऱ्या योग्यांच्या सेवेत आईने मला ठेवला. त्यांनी एकदा प्रसन्न होऊन आपले उच्छिष्ट प्रसाद म्हणून मला दिले. ते भक्षण केल्याने मी पूर्ण निष्पाप झालो. चित्त शुद्ध झाले व भगवद्भक्तीची रुचि ('सुरुचि-सुवास' १/१) उत्पन्न झाली. माझा अधिकार जाणून, जाताना त्यांनी मला ज्ञानोपदेश केला इत्यादि. भाग (१/५/६) मध्ये विस्तार पाहावा.

(३) **घटज** – (घटजोनि) घटयोनि, घट म्हणजे मडके, योनि म्हणजे जन्मस्थान ज्याचे तो अगस्ति ऋषि. कुंभज, कुंभसंभव, ही नावे याच अर्थाने आहेत. मित्र व वरुण यांनी एका मडक्यात ठेवलेल्या त्यांच्या तेजापासून यांचा जन्म मडक्यात झाला. घटापासून जन्म घटज. मित्र व वरुण हे दोघेही उर्वशीवर आसक्त झाले होते; पण तिला मित्रशापाने स्त्री व्हावे लागल्याने व कर्मधर्म संयोगाने देवनिर्मित एकाच मडक्यात दोघांनी आपले तेज ठेवल्याने त्या तेजापासून त्या मडक्यातच अगस्तीचा जन्म झाला, त्यामुळे त्याना प्रथम तीन नावे पडली. घटापासून झाले म्हणून घटयोनि, घटज, कुंभज, कुंभयोनि, मित्र वरुण यांच्या तेजापासून झाले म्हणून मैत्रावरुणि व उर्वशीनिमित्ताने तेज ठेवले गेले म्हणून **और्वशेय**. पुढे अपार वाढलेल्या विंध्य पर्वताला आडवा पडावयास लावला म्हणून अगस्त्य, अगस्ति, हे नाव काशीतून दक्षिणेत जाताना मिळाले. पहिली तीन जन्माने व हे कृतीने मिळाले.

(क) जन्मल्यावर जेथे तपश्चर्येला गेले तेथे ज्या ब्राह्मणांच्या संगतीत तप केले त्यांच्या संगतीचा परिणाम म्हणजेच पुढील त्यांचे अलौकिक सामर्थ्य व प्रभाव. तीन चुळांत सर्व सागर सुकवून टाकला. (प.पु.सृ.खं)

(ख) अगस्तींनी आपल्या मुखाने हकीगत सांगितल्याचा पुरावा प्रकांड पंडित टीकाकारांससुद्धा मिळाला नाही. या लेखकाचे ग्रंथावलोकन - सरड्याची धाव कुंपणापर्यंत! तथापि ज्या अर्थी तुलसीदासांनी येथे स्पष्ट उल्लेख केला आहे त्याअर्थी त्यांच्या अवलोकनात तशी माहिती असलीच पाहिजे. तुलसीदास काळीं जे ग्रंथ होते ते सर्व अस्तित्वात असणे (निदान भारतात) शक्य नाही; कारण की औरंगजेबाच्या काळात पोथ्यांच्या होळ्या झाल्या. तुलसीदासांच्या हातची रामायणाची पोथी मिळणे अशक्य वाटू लागले आहे; यावरून अनुमान काढावे.

(४) पूर्वी काक व बक हे दोनच उल्लेख आहेत, म्हणून येथे घटजोनी म्हणजे अगस्ति समजू नये असे काही टीकाकार म्हणतात, त्यांचे खंडन दुसरे कोणी करतात व त्याचे खंडन आणखी कोणी केले आहे. (मा. पी. प) मानसात घटजोनी पुन्हा (२/२३२/२) मध्ये वापरला आहे. तेथे हे टीकाकार अगस्तिच मानतात. कुंभज, घटसंभव, वगैरे शब्द अगस्ति ऋषींनाच वापरले आहेत. येथे उपक्रमात नारद -अगस्तींचा उल्लेख आहे तसा उ. कां. ५९ मध्ये नारद आणि दो. ३२/७.८ मध्ये शेवटी अगस्तिचा उल्लेख आहे.

याशिवाय अनेक ठिकाणी यांचा उल्लेख आहे. बा. कां. ३२/६, ४८/१, ५१/७, २५६/७, अरण्य १२/१, उत्तर ३५/३ ल १२०/२; यात कुंभज आहे. ७/३२/७ घटसंभव; .

(क) आता या तीन उदाहरणात वैशिष्ट्य काय ते पाहू. वाल्मीकी - जन्म उत्तम पण नीच संगतीने अति दुर्जन झालेले, विश्वविख्यात् कवि भक्त बनले. नारद -अपवित्र, कुलहीन, गोत्रहीन, पापी जन्म पण सत्संगाने देवर्षि झाले. अगस्ति - धर्म कर्महीन, जड अचेतन अशा घटापासून झाले तरी संतसंगतीच्या प्रभावाने महा महर्षि झाले. सार हे की जन्माने पापी असो, कुसंगतीने महापापी बनलेला असो वा जड नीच योनीत जन्मलेला असो. सत्संगतीने पाप, स्वभावदोष इत्यादि नष्ट होऊ शकतात. पुढील चौपायांत या सिद्धांतातच विस्तार करतात.

हिं.- जलचर थलचर नभचर नाना । जे जड चेतन जीव जहाना ।।४।।
मति कीरति गति भूति भलाई । जब जेहिं जतन जहाँ जेहिं पाई ।।५।।
सो जानब सतसंग प्रभाऊ । लोकहु बेद न आन उपाऊ ।।६।।

म.- स्थलचर जलचर नभचर नाना । जीवां जगिं चेतनां जडानां ।।४।।
मति गति भूति भलेपण कीर्ती । जैं ज्या जेथें प्राप्त जशीं ती ।।५।।
तो सत्संगति - महिमा जाणा । लोकीं वेदिं उपाय दुजा ना ।।६।।

अर्थ — जगात नाना प्रकारचे जमिनीवर चालणारे, पाण्यात संचार करणारे, आकाशात उडणारे जड वा चेतन जीव आहेत - ॥४॥ (त्यांपैकी) ज्यांना, जिथे जेव्हा ज्या प्रकारे (उपायाने) सुमति, शुभगति, ऐश्वर्य, चांगुलपणा (मोठेपणा) या कीर्ति मिळाली ॥५॥ तो (केवळ) संत संगतीचाच प्रभाव आहे असे जाणावे. (या गोष्टी) प्राप्त होण्यास लोकांत किंवा वेदांमध्ये (सुद्धा) दुसरा उपाय नाहीं. ॥६॥

टीका - चौ. ४. (१) स्थलचर — जमिनीवर चालणारे. काही टीकाकारांनी यात वृक्ष, वन, पर्वत, तृण यांनासुद्धा स्थलचर गणले आहेत व हे सर्व जड आहेत असे म्हटले आहे. यांचे 'चर' शब्दाकडे किती लक्ष गेले? वृक्ष, वन, तृण, जड नाहीत, सचेतन आहेत. या शब्दाने मनुष्य व पशु, द्विपाद, चतुष्पाद, बहुपाद पक्षीतर प्राणी यांतच येतात.

(२) जलचर — पाण्यात संचार करणारे जीव, मासे, सर्प, कासव इत्यादि जलस्थ, जलवासी म्हटले असते तर जलज वनस्पति, जलांतील पर्वत पाषाण इत्यादींचे ग्रहण करता आले असते. मुख्यार्थ असंभव असेल तरच लक्षणार्थ योग्य.

(३) नभचर — आकाशांत संचार करणारे पक्षी आदि जीव. नभचरांत जडाचीं उदाहरणे मेघ व वायु ही टीकाकार देतात. वायु जड नाहीं त्यास 'सदागति' हे नाव आहे.

(४) चेतन — सजीव, वृक्ष, वनस्पति, लता, तृणादि या वर्गात घेणे जरूर आहे; कारण चेतन-सजीव असून चर नाहीत, म्हणून पूर्वील तिघांत व पाचव्या जडांत घेता येत नाहीत. पाण्यात वाढणारे वृक्ष वनस्पति व वृक्षावर वाढणारे यातच घेणे जरूर आहे. मागील तीन वर्ग चेतन असून जंगम आहेत; व वृक्षादिक स्थावर चेतन आहेत.

(५) जड — माती, पाषाण, पर्वत, काष्ठ, कोळसे घरें खनिज पदार्थ वगैरे शेष सर्व जडांत समाविष्ट होतात.

(क) एक टीकाकार हे पाच वर्ग मानतात पण चेतनाचे उदाहरण देतांना हनुमान, जांबवान इत्यादि वानरांचा उल्लेख करतात! मासे मनुष्यही चेतन आहेतच. हनुमंतादिक स्थलचरांत येतात. कोणी तीनच वर्ग मानून त्यात चेतन जड भेद पाडला आहे; पण असे करण्याने 'चर' शब्द निरर्थक ठरतो. सरळ अर्थ लागला नसता तर चर म्हणजे राहणारे हा अर्थ योग्य ठरता: शब्दाची व्यप्ति न कळण्याने हे होते.

(ख) जहान — जग, जहाना (-जगात) येथे प्रत्ययहीन सप्तमीच आहे.

चौ.५ — (१) यातील पहिल्या पाच शब्दांचा अर्थ चौपाईच्या अर्थात दिला आहे. काहींचे म्हणणे आहे की या पाच गोष्टी मागील पाच वर्गास क्रमशः मिळतात. याने यथासंख्य अलंकार साधतो. मूळांतील क्रमाची तुलना करावी. हे लेखक हनुमन्तादि वानरांस शेवटल्या चेतन वर्गात घेतात, म्हणजे 'भलाईच' त्यांच्या वाटयास येते व मति, कीर्ति, गति त्यास मिळाली नाही हे ठरते!

(क) कोणी म्हणतात या पाची गोष्टी जलचरादि सर्वांना मिळाल्या, पण या म्हणण्यातहि दोष आहेतच. युक्तार्थ हाच की यातील एक किंवा अनेक या सर्व गोष्टी ज्यास मिळाल्या त्या सत्संग प्रभावाने मिळाल्या.

(२) स्थलचर – विभीषणास ब्रह्मदेव, शंकर व हनुमान यांच्या संगतीने मतिपासून कीर्तीपर्यंतच्या पाची गोष्टी मिळाल्या. रावणकुंभकर्णांस नारदादि संतांची संगति लाभली पण सुमति व सुकीर्ति मिळाली नाही. सुगति सनकादि व नारदसंगतीने मिळाली. शबरी-ऐश्वर्य व मोठेपणा मिळाला नाही. गजेंद्राचे उदाहरण आहेच.

(३) जलचर – सुमति व सुगति मिळाली मकरीला. गजेंद्राच्या संगतीने ग्राहाला भगवद्दर्शन व सुगति मिळाली. क्षीरसागरातला राघव मत्स्य गंगाकिनारी 'केवट-नावाडी' होऊन लक्ष्मणाच्या संगतीने सुगति- भक्ति मिळाली. (टी.पा.)

(४) नभचर – जटायु, तो दशरथांचा मित्र होता व मुनींचे दर्शनादि संगती लाभली व पुढे सुमति, सुगति व सुकीर्ती मिळाली. संपातीला चंद्रमा मुनींच्या संगतीने व नंतर रामदूतांच्या स्पर्शादिकाने सुमति, ऐश्वर्य (पंख फुटणे) व सुगति मिळाली.

(५) चेतन – वृक्षादिक स्थावर. भरताच्या दर्शनाने सर्वांचा उद्धार झाला.

**"पथि जडचेतन जिव बहु नाना । ज्यां बघती प्रभु दिसले ज्यांना। ते सब परम पदा अधिकारी । भरत बघत गत भवरुज भारी"** (२/२१७/१.२)

(६) जड – 'अहल्या शिळा राघवें मुक्त केली;' फक्त गति मिळाली. सेतुबंधातील दगड रामदूतांचा स्पर्श, नलनीलांचा, हनुमंतादिकांचा - स्पर्श झाल्यामुळे मोठेपणा लाभला. अजून लोक दर्शनास जातात.

ल. ठे (१) जडात सुद्धा चैतन्य आहे, पण ते निरुद्ध आहे. सक्रिय नाही, कारण प्राणादि वायु नाहीत, त्यामुळे ते चैतन्य सहसा अनुभवास येत नाही. एकनाथांनी व गोस्वामींनी पाषाणाच्या नंदीकडून ओला चारा खावविला. नाथांच्या वेळच्या त्या नंदीला गति मिळाली. प्रेतात - शवात सुद्धा चैतन्य असते ते पाषाणांतल्या सारखेच. चैतन्य सर्वव्यापक आहे हे विसरून भागणार नाही, जड चेतन हा फक्त व्यावहारिक भेद आहे.

(२) मति – सुमति- मिळाली की बाकी चार हळूहळू सहज मिळतात; म्हणून मतीचा उल्लेख प्रथम केला. पुढील चौघांचा क्रमशः संबंध येथे दाखविलेला नाही. रावणास सुमति नव्हती असे वरवर पाहणारास वाटते. सुगति प्राप्त होण्यास लागणारी सुमति होती एवढेच नव्हे तर ती नारदापासूनच मिळाली होती इत्यादि टीकेत दाखविले आहे. या सुमतीच्या योगाने त्याने सर्व निशाचरांचा उद्धार आधी केला व मग स्वतः मुक्त झाला आहे.

वि. सू. सत्संगतीने सुमति आदि पाच गोष्टी मिळतात हे येथे जसें दाखविले तसे कुसंगतीने या पाच गोष्टींचा विनाश होतो हे अनेक ठिकाणी मिळून दाखविले आहे.

(क) मति – **'मतिबलशील सत्य सब मीन । नारी गळ वदति की प्रवीण'** (३/४४/८)

(ख) गति – 'परदारग कधिं पावे सुगति किं' (७/११२/४)

(ग) भूति - 'रावण विभीषणा जैं त्यागी। तैच होइ गत-विभव अभागी' 'साधुअवज्ञा त्वरित भवानी । करी अखिल कल्याणा हानी ॥' (५/४२/३.२)

(घ) भलेपण – 'तया भला कधिं म्हणे न कोणी । गुंजा घेइ परिस टाकोनी' (७/४४/३) यात विषयसंगतीचा परिणाम आहे.

(ङ) कीर्ति – 'कामी कधिं अकलंकित असती' (७/११२/२) 'अपयश लाभ किं जेथें पाप न' (७/११२/७)

चौ. ६ – (१) तो सत्संगति महिमा जाणा – भाव हा की मति वगैरे मिळविण्यासाठी कोणी कितीही प्रयत्न केलेले दिसले तरी त्या प्रत्येक यशस्वी होणाऱ्या प्रयत्नाच्या मुळाशी कुठेतरी सतसंगति - प्रभाव असतोच. मनुष्य अनुकरणशील प्राणी आहे. बालपणीं मातापिता- पालक संगति, त्यानंतर शिक्षक सवंगडी मित्र संगति, इत्यादि प्रकारे चांगली किंवा वाईट जशी असेल-मिळेल, मिळविली जाईल त्या प्रमाणे या पाच गोष्टी मिळतील किंवा यांच्या विरुद्ध कुमति इत्यादि मिळतील. अनुकूल प्रारब्ध अति बलवान असते त्यास बालपणापासूनच सुसंगति सहज मिळते व शेवटी परमार्थांत हि त्यास विशुद्धसंत संगति मिळते. म्हणूनच एक संत मागतात की 'ज्याचे वंशी कुळधर्म रामसेवा । त्याचे वंशी मज जन्म देगा देवा!"

संगति – सत्संगति केव्हां मिळते ते सांगतात -

हिं.- । बिनु सतसंग बिबेक न होई । रामकृपाँ बिनु सुलभ न सोई ॥७॥
सत-संगत मुद मंगल मूला । सोइ फल सिधि सब साधन फूला ॥८॥

म.- विण सत्संग विवेक न होतो । रामकृपेविण सुलभ न हो ! तो ॥७॥
सत्संगति मुद-मंगल-मूलहि । ती फल सिद्धि साधने फूल हि ॥८॥

अर्थ – सत्संगाशिवाय विवेक व ज्ञान प्राप्त होत नाही, पण अहो! तो (सत्संग) राम कृपेशिवाय मिळणे कठिण आहे (सुलभ नाही) ॥७॥ आनंदमंगलाचे मूळ सत्संगतिच आहे; कारण सत्संगतिलाभ हेच फळ व हीच सिद्धि व (इतर) सर्व साधने फुले आहेत ॥८॥

चौ-७ – टीका – (१) मागील संतवर्णनावरून असे वाटणे शक्य आहे की मति गति भूति वगैरे मिळविणे सोपे आहे, कारण 'सकल सुलभ सब दिन सब देशां' असा सत्संग आहे व त्याने मति, गति आदि सर्व मिळते, असे वाटू नये म्हणून २/१२ मधील सुलभ शब्दाचा अर्थच येथे स्पष्ट करतात.

(२) विवेक – नित्यानित्य विवेक आणि ज्ञान हे दोन्ही अर्थ अपेक्षित आहेत. नित्यानित्य विवेकाने वैराग्य होते व त्याने गुरुकृपेने ज्ञान मिळते. येथे कारणमाला अलंकार आहे.

(क) 'सत्संग' – दर्शन, स्पर्श, समागम उपदेश, हरिकथा श्रवण, सेवा इत्यादि सर्व गोष्टी गृहीत धरणे जरूर आहे. उदा. (१) दर्शन व स्पर्श-

'स्वर्गमोक्षसुख घालितां एका तुलांगि तात!

सर्व मिळुन ना तोलवे सुख लव सत् संगात' (५४/-)

लंकिनीला हनुमंताचे दर्शन व मुठीचा स्पर्शच झाला आहे. (२) केवळ दर्शन.

'आज धन्य मी पहा मुनीश्वर । अपले दर्शन अघराशी हर ॥

बहु भाग्ये सत्संग लाभतो । विना श्रमहि भव भंग पावतो ।

'संतसंग अपवर्गद -' (७/३३) यावेळी रघुनाथास सनकादिकांचे फक्त दर्शन झाले आहे.

(३) संत-गुरु-समीप राहून हरिकथा श्रवण करणे, 'तदासकल संदेहा भंग । जै बहुकाळ करिति सत्संग ॥ तिथे रुचिर हरिकथा ऐकणे ..१ ॥५॥

'श्रवणें जाति शीघ्र संदेह ॥८॥'

'विण सत्संग न हरिकथा त्यांविण मोह न जात । मोहनाशविण रामपदिं दृढ अनुराग न तात' (७/६१), हे शंकरानीं गरुडास सांगितले आहे.

'संत समागम राम दे जाणुनि निज जन दीन' (७/१२३).

या सर्व अवतरणांवरून सार हे की २ (क) (३) मध्ये दिलेला 'सत्संग' चा अर्थच मुख्य आहे.

'गरुड महाज्ञानी गुणराशी । हरिसेवक अति निकट निवासी' (७/५५/३) असून त्याला संत = गुरु, संगतीत राहून 'बहुकाळ' सत्संग म्हणजे हरिकथाश्रवण करावे लागले, मग इतर साधकांविषयी काय सांगावे! हनुमंताच्या नुसत्या दर्शन, स्पर्शानी लंकीनीला भय भयमुक्ति मिळाली नाही.

(३) रामकृपे विण तो सुलभ न – भाव हा की रामकृपेने सत्संगलाभ सुलभ होतो. सहज खरे संत-गुरु भेटतात, त्यांच्यावर विश्वास बसून तो दृढ होत जातो, त्यांच्या विषयी श्रद्धा उत्पन्न होते आणि मग पुढील कार्य हळूहळू सहज होते. सुचविले की ज्ञान भक्तिमंत सदाचार संपन्न संतांची संगति पुष्कळ काळ व्हावी असे ज्यांना वाटत असेल त्यांनी रामकृपा संपादन करण्याचा दृढ प्रयत्न केला पाहिजे. (७/१२३/-पहा). ही कृपा मिळविण्याचे पायाभूत साधन येथे पूर्वीच सांगितले आहे.

'वन्दे प्रथम महीसुरचरणां । मोहजनित सब संशय हरणां ॥ (१/२/३)

या चौपाईची टीका पाहावी. येथे उपक्रम केला आहे आणि 'संत समागम राम दे जाणुनि निज जन दीन' (७/१२३) ने उपसंहार केला आहे.

चौ. ८ (१) सत्संगति मुद-मंगल-मूल हि – मुद-आनंद, मंगल- कल्याण; रामप्रेमभक्ती शिवाय आनंद-परमानंद नाही. मंगल-कल्याण-कारक मुख्य वस्तु ज्ञान आहे. या दोहोंचे मूल-मूळ, सत्संगति - संतसमागम आहे. मूळ नसेल तर शाखा पत्र पुष्प फल रस इत्यादि काही नाही, म्हणून हे वटतरूचे किंवा अश्वत्थाचे मूळ मिळाले की बाकीच्या सर्व गोष्टी आपोआपच मिळतात. हरिभक्ति-रामप्रेम-नाही तिथे सुख

असणे शक्य नाही. 'सुख किं मिळे हरि भक्तिविण' (७.८९) 'सुख न अन्य सम संत-मीलना' (७/१२१/१३)

(२) ती फल सिद्धि साधने फूलंहि — एक चौपाई आधारास घेतली की निःसंदेह अर्थ मिळेल. '**शम यम नियम चि फुलें ज्ञान फल । हरिपदरति रस वेद बदे कल**' (१/३७/१४) शम, यम, नियम, तितिक्षा इत्यादि साधने फुले आहेत, ज्ञान हे फळ आहे व हरिभक्ति प्रेमभक्ति त्या फळांतला रस आहे.

(क) येथील चौपाईत नुसते फळ म्हटले आहे, रसाचा उल्लेख नाही म्हणून आणखी एक चौपाई -

'**तवपद पद्मी प्रीति निरंतर। सकल साधना हे फळ सुंदर**' (७/४९/४) हे वसिष्ठ वचन आहे. येथेहि फल आणि साधन हे दोन्ही शब्द आहेत; म्हणून ही फल रूपी सिद्धि म्हणजे प्रभुपदकमलीं निरंतर प्रीति; हे ठरले, सुंदर याचा शब्दार्थ चित्ताला द्रव फोडणारे, अर्थात भगवंताच्या चित्ताला द्रवविणारे.

'वेगें जिनें द्रवें मी भाई । ती 'मम भक्ति, भक्त सुखदाई (३/१६/२).

(ख) प्रेमभक्तिच जर फल आणि सिद्धि आहे तर सत्संगतीला 'ती फल सिध्दि' का म्हटले? याचे उत्तर काण्डातील एकच चौपाई देते.

'सकल फलहि हरिभक्ति सुशोभन । संतकृपेविण कुणा हि लाभ न' (७/१२०/१८) हे भुशुंडी गरुडास म्हणाला आहे. प्रभु स्वतः हेच सांगतात,

'भक्ति स्वतंत्र सब सुखदानी । विण सत्संग न पावे प्राणी' (७/४५/५)

(ग) भाव हा आहे की संतकृपा संपादन करणे हेच मुख्य साधन; ते साधले की शमयमनियमादि फुले उत्पन्न करण्याचे कष्ट करण्याची जरूर नाही. रामकृपेने सत्संगति मिळाली की संतसेवा, संत समागम हेच मुख्य साधन. विश्वास श्रद्धावंत अधिकारी शिष्यास अशा संताची संगति रूपी मूळ मिळाले की आज ना उद्या त्या सत्संग प्रभावाने हरिप्रेमभक्ति निरंतर मिळेल. म्हणूनच शंकरांनी व अगस्तींनी प्रभुदर्शन झाल्यावर सुद्धा सत्संग मागितला आहे. उ. दो. १४ व अरण्य १३/११ पाहा.

हिं.- **सठ सुधरहिं सतसंगति पाई । पारस परस कुधात सुहाई ॥९॥**
**बिधिबस सुजन कुसंगत परहीं । फनि मनि सम निज गुन अनुसरहीं ॥१०॥**

म.- **सुधारती शठ सुसंग पावुनि । लोहिं हेमता परीस लागुनि ॥९॥**
**विधिवश सुजन कुसंगी पडती । निजगुण फणिमणि सम अनुसरती ॥१०॥**

**अर्थ** - परीसाचा स्पर्श झाला म्हणजे लोखंड (कुधात, कुधातु) सोने बनते (शोभन-सुहाई, होते) तसेच संतसंगतीचा (सुसंग) लाभ झाला म्हणजे शठ - खल - सुधारतात. ॥९॥ (परंतु) दैववशात सज्जनांना संतानां - कुसंगतीत पडावे लागले तरि नागाच्या मण्यासारखे ते आपल्या (संत) गुणांचेच अनुकरण करतात.

(कुसंगतीचा, खलसंगतीचा त्यांच्यावर काही परिणाम होत नाही) ॥१०॥

**टीका – चौ-९ (१)** 'सत्संगाद्भवति हि साधुता खलानां । साधूनां नहि खलसंगमात् खलत्वं'

'आमोदं कुसुमभवं मृदेव धत्ते। मृद्गंधं नहि कुसुमानि धारयन्ति' (सु.र.)

हा श्लोक वरील दोन चौपायाशी समानार्थक आहे. पण दृष्टातात बदल करून गोस्वामींनी येथे गूढ भाव भरून ठेवले आहेत. स्कंद पु. ब्रह्मोत्तर खंडांत असेच सुन्दर दृष्टान्त व हाच सिद्धान्त आहे. (मा. पी. पृ १३०.प.).

(क) लोहपरिसाचा दृष्टान्त देऊन सुचवितात की शठ स्वतः कृतकृत्य होतील सत्संगाने पण ते इतरांस सुधारू शकणार नाहीत. परीसाने लोखंडाचे सोने बनविले तरि ते सोने लोखंडाला सोने करू शकत नाही.

(ख) सुधारती म्हणण्यात भाव आहे की ते ज्या प्रमाणात आणि ज्या भावनेने सत्संग करतील तितके सुधारतील.

(ग) आणखी गूढभाव हा आहे की संतांचा महिमा असा असला तरी लोहपरिसांची संगति - भेट होणे या जगात जितके सुलभ-शक्य तितकेच खलांनी श्रद्धेने सत्संगति करणे शक्य आहे. पण यदा कदाचित भगवदिच्छेने स्वभावविरुद्ध त्यांनी सत्संग केला तर ते ही सुधारतील.

(घ) वस्तुस्थिति निदर्शक हे गूढार्थ वरील सुभाषितात नाहीत !

**चौ. १० (१) विधिवश** – दैवाने, प्रारब्धाने, भाव हा की संत जरी झाले तरि देह-प्रारब्ध भोग त्यास सुद्धा भोगावे लागतात. 'प्रारब्ध कर्मणा भोगादेव क्षयः' प्रारब्ध कर्म भोगूनच संपयावे लागते.

**(क) कुसंगीं पडती** (कुसंगत परहीं) कुसंगत = कुसंगतीत (अप्रत्यय सप्तमी दो. २ पहा) ते स्वतःच्या इच्छेने कुसंगति करीत नाहीत हे सुचविले. प्रल्हाद व बिभीषण प्रारब्धवशात् कुसंगात पडले होते.

(२) '**निजगुण फणि मणि सम अनुसरती** – (क) निजगुण - स्वतःचे गुण, संतगुण, स्वभाव. निज = नित्य, चिरस्थायी असाही अर्थ आहे (गी. ल. को.) भाव हा की त्यांचे गुण, त्यांचा स्वभाव, नित्य एकरस राहतो तो बदलत नाही.

**(ख) फणिमणिसम** – नागाच्या मस्तकात मणिअसतो ही नुसती कविकल्पना नाही. मात्र फार मोठ्या भुजंगांच्या असतो. त्यांच्या अंगावर पुष्कळ लव असते. तो मणि त्यांच्या फडेत असतो व तो स्वेच्छेने ते बाहेर काढू शकतात. त्या मण्याचा प्रकाश दुरून दिसण्यासारखा पण हिरवट असतो. कै. वा. श्रीधर शंकर जोगळेकर, नेरळ, हे एकदा जंगलातुन येत असता तो दिसला. सुमारे १५ फूट त्रिज्येच्या वर्तुळाकार जागेत त्याचा चक्क प्रकाश पडला होता. अंधाऱ्या रात्री मणि बाहेर काढून ठेऊन नाग त्या प्रकाशाकडे बघत डोलत असतो. कोणी घेण्याचा प्रयत्न चुकून केल्यास वाटेल त्या यत्नानीं तो वारंवार दंश करतो - व ठार मारतो. असे त्यांच्या गाडीवाल्याने सांगितल्यावरून ते दोघे तो रस्ता सोडून अगदी आवाज न करता

निसटले. असा हा मणि अति दुर्लभ असतो. तसाच संतांसारखा स्वभाव प्राप्त होणे फार दुष्कर.

(ग) हा मणि सर्पदंशाच्या जागीं लावला की सर्वविष (सर्पाचे) आकर्षून घेतो; व नंतर तो गाईच्या दुधात ठेवला म्हणजे सर्व विष त्यात उतरते. सर्प दुष्ट, मारक, अतिविषारी, पण त्याच्या संगतीत सदा राहणारा मणि स्वतः दूषित नाहीच होत पण विषहरण करतो व दारिद्र्य दूर सारतो. 'अहि-अघ-अवगुण मणिना ग्रहतो। हरिविष, दुःख अधनता दहतो ॥' (२/१८४/८) तसे संत खल संगतींत पडले तरी स्वतः बिघडत तर नाहीतच पण आपले जे परहितनिरतता, परोपकार शीलता इत्यादि गुण त्यांचा तेथे हि उपयोग करतातच. अपमान सोसून सुद्धा बिभीषणाने रावणास हितोपदेश केलाच.

(घ) संगति – पुढील चौपायात संतवर्णनाचा उपसंहार आहे.

हिं.- **विधि हरि हर कबि कोबिद बानी । कहत साधु महिमा सकुचानी ॥११॥**
**सो मो सन कहिजात न कैसे । साक बनिक मनि गुन गन जैसें ॥१२॥**

म.- **विधि-हरि-हर कवि कोविद वाणी । लाजे साधू-महिमा गानीं ॥११॥**
**तो मजला वदवेल च कैसा । शाक-विक्या मणिगुणगण जैसा ॥१२॥**

अर्थ – ब्रह्मा, विष्णु, महेश, कवि, शास्त्रज्ञपंडित (कोविद) यांची वाणी आणि वाणी म्हणजे सरस्वती, शारदा, साधूंचा महिमा वर्णन करताना लाजते ॥११॥ (असा जो) तो महिमा मला कसा बरें वर्णन करता येईल? भाजीविक्या जसा रत्नाच्या अनेक गुणांचे वर्णन करू शकत नाही (तसेच माझे.) ॥१२॥

टीका. (१) विधि – ब्रह्मदेव, सर्वांच्या भाग्याचा विधि-लेख- लिहिणारा, त्यानेच उत्पन्न केलेल्या सृष्टींतले संत आणि त्यांचे गुण त्याला वर्णन करता येऊ नयेत हे महदाश्चर्य आहे. असेच हरि हर यांचे.

(क) उशना भार्गवः कविः (अमर) शुक्राचार्यांसारखे क्रांतदर्शी, अतींद्रिय शक्ति असलेले.

(ख) कोविद – बृहस्पति सारखे वक्ते व शास्त्रज्ञ.

(ग) वाणी हा शब्द दोन अर्थानींच घेणे योग्य. या सर्वांची वाणी व सरस्वती, वाग्देवता.

'श्रुणु मुनि साधूंचे गुण जितके । वंदु न शकति वाणी श्रुति तितके' ॥८॥ 'वदुं शकति ना श्रुति शारदा-' (३/४६/ छं) या वचनाधारे शेषाचा अंतर्भाव करणे योग्य होईल. हे श्रीराम वचन आहे. एक कथा आहे तिच्यामुळे, का लाजली याचा बोध होतो.

स्वर्गांत देवांची सभा भरली व साधूंचे गुण प्रथम गजाननाने वर्णन करावे असे ठरले. वर्णन करण्यात पुष्कळ काळ गेला तेव्हा सरस्वती म्हणाली की गजानन

दमले असतील, तरि आतां पंचमुख महादेवांची पाळी आली आहे असे वाटते. असे पुष्कळ दिवस लोटले तरी अंत होईना; तेव्हा षण्मुखाची पाळी आली. त्यांच्यानेहि पूर्ण होईना; तेव्हा पार्वती पुढे येऊन म्हणाली की माझ्या बाळाला किती त्रास देणार आता? सर्वानुमते शेषाकडे हे काम आले. शेषाने प्रारंभ केला, कित्येक कल्पे गेली तरी संपेना तेव्हा क्षीरसागरात जाऊन लज्जेने भगवंताच्या असनाखाली जाऊन लपला. वर्णन करतांना शेषाच्या हजार जिव्हा दुभंग झाल्या होत्या त्या तशाच राहिल्या.

'सहस्रास्यः शेषः प्रभूरपि हियाऽगान् क्षितितलम्' (स्कं.पु.)

चौ. १२ – (१) भाजीविक्या व रत्नांची परीक्षा हा दृष्टान्त देऊन कवि आपणांस या कार्यात अगदी हीन लेखतात, वर वर्णन केलेले ब्रह्मादि सर्व रत्नपारख्यांसारखे असून त्यांना साधुरूपी अलौकिक रत्नांची परीक्षा व अमित गुणांचे वर्णन करता येत नाही तेथे मी भाजीविक्या सारखाच अति असमर्थ, नालायक हे सुचविले. नालायक साधकांस एकच गोष्ट करता येण्यासारखी असते तीच दोह्यांत वर्णन, केली आहे.

हिं.दो. बंदउँ संत समान चित हित अनहित नहिं कोइ ।
अंजलि-गत सुभ सुमन जिमि सम सुगंध कर दोइ ॥३रा॥
म.दो. बंदे संत समान मन हित अनहित ना कोणि ।
अंजलिगत शुभ सुमन जशिं सम सुगंध कर दोनि ॥३रा॥
हिं.दो. संत सरल चित जगत हित जानि सुभाउ सनेहु ।
बाल विनय सुनि करि कृपा रामचरन रति देहु ॥३म॥
म.दो. संत! सरल-मन जगत-हित स्नेह शील जाणून ।
रामपदीं द्या रति कृपें बाल-बिनति - ऐकून ॥३म॥

अर्थ – ओंजळीतील (शुभ) सुगंधी फुले (सुमन) जशीं दोन्ही हातांस सारखेच सुगंधित करतात तसेंच संतांचे मन (चित-चित्त) समान असते व त्यांस मित्र (हित) वा शत्रू (अनहित) कोणी नसतात; अशा संतांना मी वंदन करतो. ॥३रा॥ संत हो! आपण सरळ मनाचे (चित्ताचे) असून जगाचे हित करणारे आहात, म्हणून माझी बालकाची विनवणी (बिनय-विनंति) ऐकून व आपला स्नेह व शील (सुभाउ, स्वभाव) जाणून माझ्यावर कृपा करून मला श्रीरामपदकमलांच्या ठिकाणी प्रेम द्या, (मला इतर काही नको.)

दो ३ रा. (१) स्तुति करणे हे कृतज्ञतेचे लक्षण आहे. प्रार्थना विनंति करणे हे कृपासंपादन करण्याचे साधन. ज्या संतांच्या कृपेशिवाय रामभक्ति मिळत नाही, त्यांना शरण कसे जावे व कशी प्रार्थना करावी, हे स्वतःच्या उदाहरणाने येथे

दाखविले आहे. दोन दोहे घालून एकात वंदन व दुसऱ्यात विनंति केली आहे. असे वारंवार दीन बनून करावे हे सुचविले आहे.

(क) समानार्थक श्लोक – 'अंजलिस्थानि पुष्पाणि वासयन्ति करद्वयम्।
अहो सुमनसांप्रीतिर्वाम् दक्षिणयोः समा' (सु.र.)

(ख) संत समान मन (चितचित्त) 'प्रिये हर्षना द्वेष न अप्रियिं आशा शोक करी ना जो' । पुण्यापुण्य विवर्जित झाला ...' 'शत्रु मित्र ज्या समान गमती। मान आणि अपमान तसे।'
'शीतोष्णी सुखदुःखी द्वंद्वीं सम जो संगविहीन असे ॥'
'निंदा स्तुति सम मानी ...' (भ.गी.सं.स. १२/१७-१९)
गीतेतील या अवतरणात समान मनसमचित्त म्हणजे काय हे अगदी स्पष्ट केले आहे.

(२) हित अनहित ना कोणी = हित=प्रिय, मित्र; हे दोन्ही अर्थ मानसात संदर्भानुसार आले आहेत. येथे हे समचित्ताचें एक उदाहरण दिले आहे. अनहित-अहित-शत्रु, अप्रिय, संत कोणाला शत्रु-मित्र, प्रिय-अप्रिय मानीत नाहीत; त्यांना शत्रु, मित्र, मानणारे जगात नसतात असे नाही.

(क) सुचविले की संत भगवंतापेक्षा सुद्धा श्रेष्ठ आहेत, आपल्या भक्ताशी वैर करणाराला भगवान शत्रु मानतात.
'भक्तांच्या अपराधा करती । रामरोष पावकिं ते जळती ॥' प्रल्हादासाठी हिरण्यकशिपूचा, बिभीषणासाठी रावणाचा वध केला. असे संतांचे नसते.

(३) अंजलिगत शुभ सुमन दोनि – एका हाताने खुडून दुसऱ्या हातावर ठेवलेली असा अर्थ कोणी करतात. फुलें डाव्या हाताने तोडणें - काढणें, किंवा डाव्या हातावर ठेवणे पूजेसाठी निषिद्ध आहे. अंजलिगत = ओंजळींतील. त्यांना असे वाटत नाही की डावा हात अपवित्र आहे त्याला सुगंध देऊ नये; उजवा पवित्र आहे म्हणून त्याला सुगंधित करावा. डावा उजवा वामदक्षिण - शत्रुमित्र दर्शक शब्द आहेत, संतांना सुद्धा असे नाही वाटत की हा वाम-दुष्ट आहे, याचा अनादर करावा व हा उजवा चांगला आहे म्हणून याला मान द्यावा, संस्कृत श्लोकांत असाच अर्थ आहे.

(क) तुलसीदास सांगतात संतांना की मी वाम, मूर्ख, अडाणी आहे यास्तवच माझा आपण अनादर तिरस्कार करणार नाही, हेच अधिक स्पष्ट करतात.

दो. ३ म – (१) या दोह्यांतील पूर्वार्धाची या वचनाशी तुलना करावी 'नाथ सुहृद अति सरलधी शीलस्नेह निधान । प्रीति सबिं बिश्वास, सब जाणां आत्मसमान' (२/२२७) भाव हा की आपले सर्वांवर सारखे प्रेम असते, सर्वांवर विश्वास असतो व आपणांस सर्वजीव आपल्या स्वतः सारखेच वाटतात.; हा आपला स्वभाव आहे. मी मात्र बाल-अज्ञान-मूढ आहे. तेव्हा माझ्या अवगुणांकडे न पाहता स्वतःच्या शीलाचा व प्रेमळ स्वभावाचाच विचार कराल.

(क) जगत-हित-सर्वजगाचे हित करणारा आपला स्वभाव आहे; माझे हित करा हे सुचविले.

(ख) स्नेहशील जाणून – एक अर्थ प्रथम दिलाच आहे. दुसरा भाव असा की आपले शील व आपला स्नेहाळू स्वभाव जाणून मी प्रार्थना करीत आहे (विनति) माझे शील व स्नेह जाणून असा अर्थ केल्यास तुलसीदास अहंकारी होते असे ठरविले जाईल. 'क्षमुनि दोष अघ, आदरति स्वतःकडे बघतील' (२/२३३) भरत वचन. हाच भाव येथे आहे. माझी विनंती मान्य कराल हे जाणून मी मागतो.

(३) रामपदीं द्या रति – रति - प्रगाढ प्रेम.

(क) यात हा भाव आहे की जीवाच्या हिताची एकच गोष्ट म्हणजे रामपदरति, संतांच्या जवळ इतकेच मागावे. हे प्रेम मिळवावयाचे असेल तर याचकाने संतांचे दीन बालक बनले पाहिजे. बालक बनायचे म्हणजे, कर्तृत्व, कुल, वय, विद्या, रूप, धन, सत्ता, इत्यादि सर्व अहंकार सोडले पाहिजेत. हे किंवा दुसरे कोणतेही अहंकार बालकाच्या ठिकाणी नसतात. ही माझी आई व मी मागितलेले मला देईल एवढा दृढविश्वास व अनन्यता असते. या दोन गोष्टी पाहिजेत.

(ख) विनति ऐकून – 'सज्जन मम उद्धटता क्षमतिल । मन लावुन शिशु शब्द ऐकतिल। बोल बोबडे बालक बोलति । माता‌पिता मुदितमन ऐकति' (१/८/८-९). 'प्रौढ तनयसम मजला ज्ञानी । बालकसुत सम दास अमानी' (३/४३/८) श्रीरामवचन आहे. या सर्व वचनांनी ठरले की भगवंतास जसे बालकदास आवडतात तसेच संतांस. बालके मोठ्यांपेक्षा सर्वांनाच प्रिय वाटतात.

(ग) संगति – सर्व जग राममय असल्याने आता संतांच्या विरुद्ध गुणधर्माचे जे खलगण - खल त्यांना वंदन करतात, त्यात खलस्वभावाचे ही वर्णन करतील. 'त्याग न संग्रह विना जाणले' त्याग करण्यासारखे काय हे दाखविणे हा हेतु दोष दाखविण्यात आहे.

हिं.- बहुरि बन्दि खल गन सति भाएँ । जे बिनु काज दाहिनेहु बाएँ ॥१॥
परहित हानि लाभ जिन्ह केरे । उजरें हरष बिषाद बसेरें ॥२॥

म.- अथ वन्दे सद्भावे खलगण । दक्षिणास जे वाम अकारण ॥१॥
परहित-हानि लाभ त्यां वाटत । हर्ष विनाशिं विषादहिं नांदत ॥२॥

अर्थ – (साधुसमाजाला व संतांनावंदन केल्यावर) आता मी शुद्ध भावनेने खलगणांना वंदन करतो जे कारण नसताही हितकर्त्यांशीं विरोध करतात ॥१॥ त्यांना परहित हानि वाटते व परहिताची हानि लाभ वाटतो; दुसऱ्यांचा विध्वंस (विनाश) झाला की त्यांना हर्ष वाटतो व दुसरे (सुखाने) नांदू लागले की त्यांस विषाद (खेद) होतो ॥२॥

टीका – चौ. १ (१) खलांना वंदन का केले हे वर सांगितलेच आहे. टीकाकारांनी अनेक तर्क केले आहेत, पण त्यात (मा. पी.) दिलेला एक श्लोक सुंदर आहे.

'विशिख व्यालयोरन्त्य वर्णाभ्यां यो विनिर्मितः।

परस्य हरति प्राणान्नैतच्चित्रं कुलोचितम्' (सु. र. भां-)

विशिख - बाण व व्याल - भुजंग यांच्या ख आणि ल या अंत्य वर्णांपासून ज्याची निर्मिति झाली आहे त्याने दुसऱ्यांचे प्राणहरण केले तर ते नवल नसून कुळाला उचितच आहे.

(२) सद्भावे – सप्रेम सुवाणीं. सुजन समाजाला जसा केला तसा, कारण खलहि रामरूपच आहेत. दोषवर्णन करणे हा वंदनातील हेतु नाही.

(३) दक्षिणास जे वाम अकारण - (क) अकारण – कारण नसतानांच; त्याचे कोणी अहित केलेले नसताच 'मृगमीन सज्जनांना तृणजलसंतोष विहितवृत्तीनां । लुब्धक धीवर पिशुना निष्कारण वैरिणो जगति' काही अपराध न केलेल्या हरिणांचे वैरी शिकारी-व्याध. माशांचे निष्कारण वैरी कोळी, मासे मारणारे, आणि सज्जन विचारे यदृच्छा लाभ संतुष्ट वृत्तीने राहतात त्यांचे निष्कारण वैरी पिशुन-खल, मृग तृण खाऊन राहतात व मासे जलावरच संतोष मानतात.

(ख) दक्षिण – उजवा, सरळ, पोषक, संरक्षक, हितकर्ता, उजव्या हातासारखा. अशांशी सुद्धा हे वाम-वाकडे, विरोधी, वैर करणारे असतात. संत 'वामदक्षिणयोः समाः' असतात.

'विना स्वार्थ खल पर-अपकारी' । अहि-मूषकसा श्रुणु उरगारी' (७/१२१/१८) हे असे करतात याचे कारण त्यांचा स्वभाव हे सोदाहरण पुढील चौपाईत सांगतात.

चौ. २ (१) परहित-हानि लाभ त्या वाटत – (क) परहित हानि वाटत – दुसऱ्यांचे हित झाले की आपली मोठी हार झाली असे वाटते म्हणून ते दुसऱ्यांचे हित न होऊ देण्याचा प्रयत्न करतात.

(ख) परहित-हानि लाभ वाटत – दुसऱ्यांचे अहित-अकल्याण झाले की खळांना वाटते की आपल्याला मोठा लाभ झाला. म्हणून खलसमाज दुसऱ्यांची हानि करण्याचा प्रयत्न करीत असतात. उ. कां. याचा अधिक विस्तार उपसंहार रूपाने केला आहे. (४०/२-३) इतरांची हानि आपोआप झाली तरी हे टाळ्या पिटतात. यांचा स्वभाव संतांच्या अगदी उलट असतो 'दुःखि दुःख बघतां सुखि सुख पर' (७/३८/१)

(२) हर्ष विनाशिं विषाद हि नांदत – लाभाने हर्ष होणे व हानीने विषाद वाटणे हा साधारण जीवस्वभाव आहे. मागील चरणाचे हे स्पष्टीकरण आहे. दुसऱ्यांचे वाटोळे झाले, विनाश झाला की हर्ष वाटणे हा खळस्वभाव आहे.

(क) विषाद हि नांदत – विषाद - हर्षाच्या उलट विरुद्ध विकार आहे. (विषाद वगैरे) कोणी सुखसमाधानाने, एकोप्याने, ऐश्वर्याने नांदू लागले की दुःख खेद होणे खळस्वभाव आहे. दुसऱ्यांची उन्नति यांस पाहवत नाही.

(ख) देशात, गावात कोणाची तरी उन्नति, सुस्थिति होणारच, व कोणाचीतरी हानि, विनाश कर्मानुसार व्हावयाचाच, व या गोष्टी खलसमाजाला कळावयाच्याच. यामुळे या खलसमाजाला निष्कारण सुख दुःखांच्या भोवऱ्यात सतत भ्रमावे लागते, चित्ताला कधी समाधान लाभत नाही. हे आपल्या ऐहिक सुखाचाहि विनाश आपल्या स्वभावामुळे आपल्या हातांनी करीत असतात; व यात प्रत्यक्ष ऐहिक लाभ यांना कोणताच होत नाही.

संगति – पारलौकिक व पारमार्थिक सुखनाश कसा करून घेतात हे आता सांगतात.

हिं. **हरि हर जस राकेस राहु से । पर अकाज भट सहस बाहु से ॥३॥**
**जे पर दोष लखहिं सह साखी । पर हित घृत जिन्हकें मन माखी ॥४॥**

म. **हरिहर-यश-राकेशा राहू । पर-अकाजिं भट सहस्त्र-बाहू ॥३॥**
**परदोषां लक्षिति सह साक्षी । पर-हित-घृतिं यांचे मन माशी ॥४॥**

अर्थ – हरिहर-यशरूपी पूर्णचंद्रास (राकेश) ग्रासणारे हे राहू (सारखे) आहेत; व दुसऱ्यांचे (शत्रूंचे) अहित करण्यात सहस्रार्जुनासारखे योद्धे (भट) आहेत. ॥३॥ हे साक्षीदार बरोबर घेऊन दुसऱ्यांचे दोष लक्षपूर्वक बघत असतात आणि दुसऱ्यांच्या हितरूपी घृतात-तुपात- यांचे मन माशी बनलेले असते ॥४॥

टीका – चौ. ३ (१) हरिहरयश राकेशा राहू - (क) हरिहरयश – हरिहर कथेतच असते. 'येणी हरिहर कथा' असे पूर्वी म्हटले, येथे राकेश म्हटले. राका-पौर्णिमा, तिचा ईश, पौर्णिमेच्या रात्रींतील पूर्णचंद्र. दिवसा पौर्णिमा पूर्ण होत असेल तर त्या चंद्राला - राकेश राकापति - म्हणत नाहीत. (ना.पु.) हरिहर यश-कथेला राकेश म्हणण्यात भाव हा की पूर्णचंद्र जसा आल्हाद-शान्तिदायक, तापनिवारक, अमृतस्त्रवणारा, औषधिरसांची वृद्धि करणारा तशीच हरिहरकथा प्रसाद- शान्ति-दायक, त्रितापहारक, मोक्ष-भक्तिरस प्रसवणारी नवविधा भक्ती व रामनाम रूपी भवौषधींत रुचि वाढविणारी असते.

(ख) राहू- मूळात राहुसे (राहुसारखे, उपमा आहे). राहु चंद्रास ग्रासतो पौर्णिमेलाच; इतर दिवशी नाही ग्रासीत. कारण पौर्णिमेला चंद्र वाटोळा गुळगुळित गरगरित असतो; गिळताना घशात अडकत नाही. हरिहरकथा सांगणारे संत त्रासदायक, सूड घेणारे नसतात, ते मृदु सरळ असतात; इतर कथा सांगणारे विषयीजन वक्रचंद्रासारखे अर्धचंद्रच देणारे असतात हे यांना माहीत असते. 'राहु न करि वक्रेंदु ग्रहणा' (१/२८१/६) कुठे हरिहरकथा चालत असेल तर ती बंद पाडण्याचा प्रयत्न हे करतात. कसा करीत असतील याची कल्पना वाचकांस सहज करता येईल म्हणून विस्तार नको.

वि. सू. मोठमोठ्या यज्ञ यागांबद्दल सुशिक्षित समजला जाणारा समाज असेच करू लागला आहे. म्हणजेच या समाजातही खलतेने प्रसार केला आहे, असे म्हणावे लागते.

(ग) हे खल राहू तमाशे, लावण्या, परनिंदा इत्यादि चालत असेल तेथे मात्र विरोधक होत नाहीत.

(२) पर-अकाजिं भट सहस्रबाहू – पर शब्द येथे दुहेरी अर्थाने वापरला आहे. कारण की सहस्रार्जुन-सहस्रबाहु-खल नव्हता. तो उत्तम धर्मनिष्ठ महाराजा, दत्तभक्त, महायोगी, ब्रह्मनिष्ठ होता. पर - दुसरे, पर-शत्रु; सहस्रबाहु कार्तवीर्याला शत्रूशी लढाई करतांनाच हजार बाहु होत असत. प्रजाकंटकांचे, अधर्माचे निर्दालन करण्यात, प्रजेच्या दुर्गुण शत्रूंचा संहार करण्यात त्यास अति वीर्य चढत असे. तसे खलांना दुसऱ्यांची हानि, विनाश करण्यास वीर्यशौर्य येते; जणू काय हजार हातांनी ते ती कार्ये साधित असतात.

राहु चंद्रसूर्य वैर कां? समुद्रमंथनाने अमृत निघाल्यावर ते आपणासच मिळावे असे देव व असुर म्हणू लागले. भगवंतांनी मोहिनीरूप घेऊन असुरांची समजूत घातली. तेव्हा मोहिनीने ते वाटावे असे ठरले. देवांनी व असुरांनी निरनिराळ्या पंक्तींत बसावे असे ठरले. त्याप्रमाणे पंक्ती बसल्या. असुरांनी मोहिनीवर मोहित होऊन तिच्या हाती अमृतकलश दिला. ती प्रथम देवांनाच अमृत पाजीत आहे व ते लवकरच संपेल असे वाटून राहु देवरूप घेऊन चटकन त्या पंक्तीत जाऊन बसला. मोहिनीने त्यास अमृत पाजले असे दिसताच सूर्यचंद्रांनी खुणावताच विष्णुचक्राने त्याचे शिर उडविले. अमृत कंठापर्यंतच गेल्याने धड मेले पण शिर राहिले. चंद्रसूर्यांनी हा घात केला हे पाहून राहु त्यांचा वैरी बनला.

'तेजस्वी अरि एक जरि क्षुद्र न गणणें त्यास । अझुन राहु शिरमात्र जरि छळतो रविचंद्रांस.' (१/१७०)

ब्रह्मदेवाने राहूला एक ग्रह बनविला. अमावास्येस सूर्याला व पौर्णिमेस चंद्राला तो ग्रासतो परंतु योग्य संधि मिळते तेव्हा. 'ग्रासि राहु निज संधी साधक.' (१/२३८/१). हिरण्यकशिपूची मुलगी सिंहिका व तिचा मुलगा राहु असुर. ही कथा भागवतात आहे.

सहस्रार्जुन - सहस्रबाहु - कथा — ही कथा महाभारत वनपर्व, शान्तिपर्व, हरिवंश, ब्रह्मवैवर्त, मार्कंडेय इत्यादि पुराणांत व श्री टेंब्येस्वामी विरचित दत्तपुराण व दत्तमाहात्म्यांत आहे. दत्तपुराण संस्कृत आहे. दत्तमाहात्म्य मराठी ओवीबद्ध आहे. (अ. ४था पाहा) यातील कथा मार्कंडेय पुराणाशीं बरीच जुळते. सहस्रार्जुन, सहस्रबाहु, अर्जुन, कार्तवीर्य हैहय इत्यादि अनेक नावे आहेत. हा कृतवीर्य राजाचा मुलगा. नर्मदातीरीं मण्डलेश्वर नगरी त्याची राजधानी होती. हिलाच आज मंडला असे म्हणतात. येथे नर्मदेला फारच सुंदर घाट आहेत. व कार्तवीर्याचे मंदिर आहे. कृतवीर्य मेल्यावर राज्यारूढ होण्याचा याला पुष्कळ आग्रह केला गेला. पण प्रजेचे

सर्व बाजूंनी संरक्षण करण्याचे सामर्थ्य असल्याशिवाय राजा बनणे सत्ताधीश होणे म्हणजे नर्काचा रस्ता धरणे असल्याने तो गर्गाचार्यांच्या आज्ञेने श्री दत्त प्रभूला शरण गेला. त्यांनी पुष्कळ कसाला लावला व नंतर उपदेश दिला. उत्तम महायोगी, जीवन्मुक्त ब्रह्मनिष्ठ बनवून त्यास पुष्कळ दुर्लभ वर दिले. श्री दत्ताज्ञेने तो घरी गेला व राज्य करू लागला. अश्वमेध यत्न करून चक्रवर्ती बनला. त्याला नेहमी दोनच बाहू असत. पण शत्रूशीं लढताना इच्छामात्रे ते हजार होत असत व त्यांचा भार त्यास वाटत नसे. त्याच्या राज्यात कुठेहि पाप होत नसे, कोणतीहि अनीति नव्हती. अश्वमेधयज्ञानंतर, ब्राह्मणांना सर्व पृथ्वी दान दिली. एकदा अग्निदेवाने त्याच्याजवळ भिक्षा मागितली. ती दिल्यावर दैववशात, कार्तवीर्याच्या बाणाच्या अग्रांतून अग्नि बाहेर पडला व त्याने वनोपवनें जाळण्यास प्रारंभ केला. त्यात वसिष्ठाश्रमाचा काही भाग जळल्याने त्यांनी शाप दिला की जो कोणी कारणीभूत असेल त्याचा वध परशुरामाकडून होईल.

हे सहस्रार्जुनास कळताच तो दत्तप्रभूंकडे गेला व विनंति केली की इतर कोणाच्या हातून मरण्यापेक्षा आपणच या देहाचा अंत करणे चांगले. दत्तप्रभु म्हणाले की प्रेमळ पित्यास हे कसे करवेल? तू तप करून विष्णु हस्ते मरण मागून घे; ते लवकर प्रसन्न होतील. त्याप्रमाणे तप करताच विष्णुने परशुरामात प्रवेश करून सहस्रार्जुनाचा वध केला.

अशा ब्रह्मनिष्ठ-भक्ताकडून पुढे ज्या गोष्टी घडल्या त्यास काहीतरी कारण पाहिजेच; त्याशिवाय वसिष्ठांचा शाप व सहस्रार्जुनास मिळालेला वर खरा कसा होणार? परशुरामात झालेल्या प्रवेशावताराची समाप्ति रामावतारात दोघांची भेट झाल्यावर झाली आहे. सहस्रार्जुन खल नव्हता ही खात्री व्हावी म्हणून थोडा विस्तार करावा लागला.

कार्तवीर्याची स्वतंत्र उपासनापद्धति व कार्तवीर्यदीपमहती मंत्रमहार्णवांत पहावी. कार्तवीर्य स्तोत्रादिकांचा सुद्धा प्रभाव अनुभवास येतो. ऐश्वर्य, ज्ञान, भक्ति, इत्यादि प्राप्त करून देणारे कार्तवीर्य मंत्र आहेत. दत्तपुराण व दत्तमाहात्म्य पहावे. हे ग्रंथ अवलोकन केल्यावर दीर्घकाळ गेला असल्याने वरील वर्णनांत किरकोळ दोष नसतील असे म्हणवत नाही. (इतर पुराणांतील कथा व थोडेथोडे भेद मा.पि. पहा).

चौ. ४ (१) परदोषां लखिति सह साखी — हिंदीत 'सहसाखी' 'सह- साखी' असे पाठभेद सापडले म्हणून येथे सह साखी हा त्याचा अनुवाद घेतला. साखी-साक्षी. सहसाखी म्हणजे सहस+आखी=सहस्राक्ष असा अर्थ होतो व 'सहस्राक्षिं परदोष निरखित्या' (चौ.११) असा उल्लेख याच प्रकरणात आहे; म्हणून द्विरुक्ति दोष टाळण्यासाठी स-हस-आखी इत्यादि लटपटी काहींनी केल्या आहेत. पण 'सह साखी' पाठाने अडचण राहातच नाही.

(क) लक्षिति — लक्षपूर्वक - शोधून - धुंडाळून - बघतात - व उंदारास मांजर साक्षी असे आपले साक्षीदार बरोबर घेऊन त्यास दाखवितात.

(२) **परहित घृतिं ज्यांचे मन माशी** — येथे खलांना माशी म्हटले नसून त्यांच्या मनाला म्हटले आहे. परहित हे घृत- तूप आहे 'घृतं आयुः' आयुर्वै घृतं भवति' आयुष्य जीवन म्हणजेच घृत. दुसऱ्यांचे हित करणे हे घृतासारखे कल्याणकारक वाटले पाहिजे. पण-

(क) माशी ज्या पदार्थावर बसते त्यात आपली शेंकडो अंडी घालते, विविध रोगजंतूंचा संसर्ग करून तो दूषित करते. कॉलरा, टाईफॉईड इत्यादि रोगांचा प्रसार माशाच प्रामुख्याने करतात. दुसऱ्याचे हित दूषित करण्याचे विचार यांचे मन नेहमी करीत असते. तुपात माशी पडली तरी तूप कोणी टाकीत नाहीत, पण माशीला मात्र उडता येत नाहीसे होते व तुपातून काढून तिला खाली फेकून देतात, हे दुसऱ्या माशा पाहतात तरी त्या पडतातच. यांच्या मनाची-लिंग देहाची ऊर्ध्वगति या त्यांच्या कृतीमुळे कुंठित होते व त्यांचा अधःपात होतो. 'क्षिपाम्यजस्रमशुभानासुरीष्वेव योनिषु' (भ.गी.) अशांना भगवान आसुरी योनीत घालतात - फेकतात. त्या माशी सारखे. 'मन एव मनुष्याणां कारणं बन्ध मोक्षयोः (श्रुति) 'मनःकृतं कृतंलोके न शरीरकृतं कृतम्' (यो. वा.)

हिं.- **तेज कृसानु रोष महिषेसा । अघ अवगुन धन धनी धनेसा ॥५॥**
**उदय केत सम हित सबही के । कुंभकरन सम सोवत नीके ॥६॥**

म.- **तेजिं कृशानु रोषिं महिषेश्वर । अघ-अवगुण-धन धनी धनेश्वर ॥५॥**
**सर्वां हितकर उदय केतु सम । कुंभकर्ण सम निजतां उत्तम ॥६॥**

**अर्थ** — हे खलगण तेजाने अग्नीच असून रोषाने महिषासुर आहेत; पाप व दुर्गुणरूपी धनाने धनी- श्रीमंत झालेले हे धनेश्वर- कुबेरच आहेत. ॥५॥ यांचा उदय धूमकेतूच्या उदयासारखा सर्वांचेच हित करणारा असतो! म्हणून हे जर कुंभकर्णासारखे निजून राहिले तर उत्तम ॥६॥

**टीका** — चौ-५ (१) येथे खलांच्या स्वभावाचे वर्णन चालले असल्याने व त्यांच्या स्वभावाला अनेक पैलू असल्याने निरनिराळ्या उपमादिकांनी वर्णन केले जात आहे. म्हणून या वर्णनात भिन्नधर्म - मालोपमा हा मुख्य अलंकार असून, रूपक दृष्टान्तादिकांचे स्वरूप मध्ये मध्ये आले आहे.

(क) **तेजिं कृशानु** — कृशानु - अग्नि, कृश करणारा म्हणून कृशानु. अग्नि हे प्रकाशाचे उपमान नसून ताप-दर्शक आहे. भाव हा की यांच्यात बल, बुद्धि, वैभव इत्यादि इंधन जसे पडत जाईल तसे हे अधिक तापदायक होत जातात. अग्निहोत्र्याचा हात चुकून त्याला लागला तरिसुद्धा तो त्यास भाजतोच. तसे हे उपकारकांना सुद्धा ताप देतात. सार हे की यांचा संग टाळणेच हिताचे.

'त्यांचा संग सदा दुखदाई' 'श्वानांसम जगिं खल-परिहरणें'

(ख) अग्नि – शत्रु मित्र उदासीन, इत्यादि विचार करीत नाही, जाळून भाजून कृश करण्यात तो समदृष्टि असतो तसेच हे. कृशानूच्या या नियमाला क्वचित् अपवाद आढळतो, पण खलांच्या या स्वभावाला अपवाद नाहीं.

(ग) कृशानूला शुभाशुभ, पवित्र-अपवित्र हा विचार नाही. जे संगतीत येईल त्याला आपले स्वरूप द्यावयाचे हा त्याचा स्वभाव! पण काही वस्तूंवर अग्नीच्या तापददाहक धर्माचा इष्टानिष्ट परिणाम होत नाही, तसे यांच्या संसर्गात संत असतात.

(घ) पुष्कळ वेळा अग्नि गुप्त असतो. स्वच्छ राखेने झाकलेला असतो; पण स्पर्श झाला, केला, की चटका देतोच. तसेच काही खल 'धुवट सोवळे' दिसतात.

(ङ) अग्नि जलाने शांत होतो पण जलसम शीतल वचनांनी खलांची दाहकता कमी न होता वाढते.

(च) कृशानु – कृश तनू करणे (अ. व्या. सु.) लहान करणे, झिजविणे, कमी करणे, हलके करणे, लोकांचे वैभव, कीर्ति, सुख, सत्ता, महत्ता, मति, गति इत्यादि कमी करण्याचा झटून प्रयत्न करतात. हे रूपक आणखी वाढेल पण इतका विस्तार पुरे.

(२) रोषिं महिषेश्वर – (महिषेसा) महिष+ईश्वर, याचा अर्थ कोणी यमराज व कोणी महिषासुर घेतात; पण यमाला महिषेश म्हटल्याचा दाखला कोणी दिला नाही. कोषांत यमाला 'महिषेश' शब्द सापडत नाही. पुढे मानसात हाच शब्द महिषासुर अर्थाने वापरला आहे. 'महामोह महिषेसु बिसाला । रामकथा कालिका कराला' (१/४७/६) 'कालिका कराला' पदानी महिषेश = महिषासुर हाच अर्थ सिद्ध होतो. 'महिषासुरमर्दिनी' म्हणजेच कालिका.

(क) भाव हा की, यांचे तेज महिषासुराप्रमाणे भराभर रोषाचे रूप घेऊन त्या अति विशाल, दुष्ट, अति बलवान, पराक्रमी दैत्याप्रमाणे लोकांना पीडा देत असते. नानाप्रकारे यांचा रोष इतरांचा नाश करतो.

(ख) महिषासुर जसा शेवटी देवीकडून मारला गेला, तसा यांचा विनाश शेवटी स्त्रियांमुळे होतो हे सुचविले.

(३) अघ-अवगुण-धन-धनी धनेश्वर – धनेश्वर- कुबेर. रावणाचा वडील सावत्र भाऊ, देवांचा कोषाधिपति - कितीहि खर्च केले व दिले तरी याचे धन कमी होत नाही.

(क) खलांचे धन म्हणजे पाप व दुर्गुण. हे त्यांचे धन कधी कमी होत नाहीच पण वाढत जाते. काम, क्रोध, द्वेष, लोभ, अनाचार, व्यभिचार, असत्य, दंभ, कपट, हिंसा, परधनापहार, परदारापहार इत्यादि सर्व यांचे धन आहे. या धनाने हे श्रीमंत, धनवंत झालेले असतात. या सर्व धनाचा ते कुबेरासारखे मुक्त हस्ताने उपयोग करतात.

**महिषासुर-कथा** – ही कथा सप्तशती ग्रंथात सविस्तर आहे. (अ.२-३) भागवतात ६/१८ मध्ये आहे. हा रंभ दैत्याचा मुलगा. (भागवतात - हिरण्यकशिपूच्या अनुल्हाद पुत्राचा मुलगा) हा स्वेच्छेने अति विशाल पर्वताकार रेड्याचे रूप धारण करीत असे. याच्या आईचे नाव महिषी होते. याने हिमालयात घोर तपश्चर्या करून ब्रह्मदेवापासून वर मिळविला की कोणाही पुरुषाच्या हातून मरण नसावे. स्त्रीहस्ते आले तरी चालेल. वर सामर्थ्याने इंद्रादि सर्व लोकपालांना जिंकून तो स्वतः इन्द्र बनला. त्याच्या रोषाची कल्पना अध्याय ३ मधील युद्ध वर्णनाने येईल. 'निःश्वास पवनेनान्यान्पातयामास भूतले' (श्लो.२१) देवीच्या गणांना नुसत्या आपल्या श्वासाने जमिनीवर लोळवले. त्याच्या वेगाने पृथ्वी दुभंग होत होती. (२६) त्याच्या शेपटीच्या तडाक्याने समुद्र क्षुब्ध होऊन पृथ्वी जलमय करू लागला (२६) इत्यादि पहा. त्या युद्धात केव्हा खड्गधारी महावीर पुरुष, तर क्षणात सिंह, पुन्हा क्षणात दैत्य, महागज अशी विविध रूपे घेत होता. शेवटी कालिकेने त्याचा वध केला. रोष रूपी महिषासुराला मारणारी कालिका देवी आहे, रामकथा; पण संतांचे जवळच ती राहते व या खलगणांना तर तिचा द्वेष करावासा वाटतो!

**चौ. ६ (१) सर्वां हितकर उदय केतु सम** – केतु - धुमकेतु. 'दुष्ट उदय जगदार्ती -हेतु) प्रथित अधम जैसा ग्रह केतु ।' (७/१२१/२०)

(क) सर्वां हितकर = सर्व अहितकर हा लक्ष्यार्थ आहे. वाच्यार्थ सर्वां हितकर असा असून धुमकेतूच्या साहचर्याने अहितकर हा व्यंग्यार्थ निघतोच. कारण धूमकेतु कोणाचेही हित न करता सर्वांचे अहितच करतो.

(ख) धुमकेतु – अनेक प्रकारचे असून त्यांची रूपें विविध आहेत. 'रत्नमाला' हा ज्योतिष ग्रंथ पहावा. यांच्या उदयाचा काळ भिन्न भिन्न आहे. व धूमकेतु सर्व जगाला दुःखद असतात असेही नाही. काही धूमकेतु काही भागांना दुःखद असतात तर काही दुसऱ्या भागांना. एका गावातले खलगण सर्व देशास दुःख देतात असे होत नाही.

(ग) असे असले तरी धूमकेतुचा उदय झाला की सर्वांनाच धास्ती पडते. तसाच खलाचा उदय झाला, तो भरभराटीस आला, ऐश्वर्य, सत्ता, संपत्ति, मोठेपणा इत्यादि लाभ झाला की लोकांस फारच तापदायक होतो. रावणाचे - कंसाचे उदाहरण आहेच.

(घ) धूमकेतु सर्व ग्रहांच्या कक्षेतून भ्रमण करीत फार मंदगतीने सूर्याभोवती प्रदक्षिणा करतात, सूर्याच्या जवळ जवळ येतील तशी गति वाढते, पृथ्वीच्या कक्षेत आले म्हणजे पृथ्वीवर त्यांचा उदय झाला असे म्हणतात.

(ङ) धूमकेतु उदित दशेत फार काळ राहत नाहीत तसेच खलांचे. संतांचे याच्या उलट आहे, 'संत उदय सतत सुखकारी । विश्वसुखद इव इंदु तमारी' (७/१२१/२१)

(२) **कुंभकर्ण सम निजतां उत्तम** = मागील चरणांत उदय सांगितला, येथे झोप सांगतात. येथे निजणें म्हणजे त्यांची शक्ती, बल, पराक्रम, सत्ता इत्यादि सर्व सुप्तावस्थेत राहणें. कुंभकर्णाच्या उदाहरणाने भाव स्पष्ट होतो. कुंभकर्णाचा अपार पराक्रम व आहार सहा महिने झोपलेला असे व जागा झाला की उदरभर आहार केला की पुन्हा सहा महिने सुप्त; त्यामुळे तो असून नसल्यासारखाच होता. **'नित्य करिल जर खल आहारा । सकल उजाडिल हा संसारा'** (१/१७७/७) असे जाणून ब्रह्मदेवाने त्याच्या बुद्धीत भेद करवून त्याची शक्ती निष्क्रिय करून टाकली. तसेच खलगणांचे झाले तर जगाला फार दुःख होणार नाहीं.

**हिं.-** **पर अकाजु लगि तनु परिहरहीं । जिमि हिम उपल कृषी दलि गरहीं ॥७॥**
**बंदउँ खल जस सेष सरोषा । सहस बदन बरनइ परदोषा ॥८॥**
**पुनि प्रनवउँ पृथुराज समाना । पर अघ सुनइ सहस दस काना ॥९॥**

**म.-** **परिहरती तनु परापकारा । पीक विनाशुनि वितळति गारा ॥७॥**
**वंदे खल-शेषास सरोषा । वर्णी सहस्रमुखिं परदोषां ॥८॥**
**पुन्हा प्रणति पृथुराज-समाना । पर अघ ऐके शतशत-कानां ॥९।.**

**अर्थ –** खलगण दुसऱ्यांना अपकार करण्यासाठी आपल्या देहाचा सुद्धा त्याग करतात; जशा गारा पिकांचा विनाश करून वितळून नष्ट होतात ॥७॥ रोषयुक्त होऊन हजार मुखांनी परदोष वर्णन करणाऱ्या खलाला शेषासारखा मानून मी वंदन करतो ॥८॥ पुन्हा त्याला पृथुराजासारखा मानून वंदन करतो, कारण की तो दहा हजार कानांनी पर अघ श्रवण करतो ॥९॥

**टीका –** **चौ. ७** (१) खलगण वंदनास प्रारंभ-उपक्रम 'वंदे सद्भावें खलगण' असा केला. या चौपाईत त्याचा उपसंहार करीत आहेत. 'पर अकाजिं भट सहस्र बाहू' असे (चौ.३) म्हटले, तेवढ्याने जर परहित विनाश झाला नाही तर मरण पत्करतील पण दुसऱ्यांना अपकार केल्याशिवाय राहणार नाहीत.

**'सण इव खल परबंधन करती । साल काढवुनि विपदीं मरती ॥'**

**'परसंपत्ति विनाशुनि नासति । पीक नासुनी गारा वितळति ॥'** (७/१२१/१७/१९) या खलांसारखे मारीच, कालनेमि मानसात वर्णिले आहेत.

(क) गारांच्या दृष्टान्ताने हे ही सुचविले की दुसऱ्याचा नाश करण्यासाठी अनेक खल एकत्र जमतील व दुसऱ्यांचा नाश करून आपण सगळे त्यात मरतील. हा त्यांचा स्वभाव आहे. एकदोन गारा पिकाचा नाश करू शकत नाहीत.

**चौ. ८.** येथून खल वंदन सुरू होते. (१) खल शेषासारखा असतो. शेष हजार मुखांनी वर्णन करतो. तसा खल एकमुख असून सहस्रमुख बनतो. भाव हा की रागारागाने एकेका दोषाचे हजार वेळा वर्णन करील पण कंटाळा येणार नाही.

शेष सरोष दिसतो मात्र, पण तो भगवंताचे गुण वर्णन करण्यास कधी कंटाळत नाहीं. त्याला रोषही येत नाही.
परदोष — दोषांच्या पलीकडे असलेला - परमात्मा हा अर्थ शेषाकडे घेता येतो.

शेषाची कथा — कश्यप ऋषींना कद्रू नावाच्या स्त्रीपासून हजार नाग पुत्र झाले. आपली सवत जी विनता तिला आपली दासी बनविण्यासाठी तिने (कद्रूने) आपल्या मुलांस आज्ञा दिली की तुम्ही केसासारखे (काळे) होऊन सूर्याच्या घोड्यांच्या अंगाला वेढून घ्या म्हणजे सूर्याचे घोडे श्वेत असून काळे दिसतील आणि विनता माझी दासी बनेल. जे असे करणार नाहीत ते पुढे जनमेजयाच्या सत्रांत जाळले जातील. शेषाने या कपट कारस्थानात भाग न घेण्याचे ठरवून एकटाच तपश्चर्येस निघून गेला. ब्रह्मदेव प्रसन्न झाल्यावर वर मागितला की मी सतत धर्मबुद्धि, तपस्या व शांति यात रममाण व्हावे. हा वर मिळाला व ब्रह्मदेवाच्या आज्ञेने पाताळात जाऊन पृथ्वीला धारण करू लागला. (म.भा.आ.प.) सहस्त्र मुखांनी गुणगान करण्याचा व भगवंताची शय्या बनण्याचा उल्लेख भागवतात आहे. (२/७)
चौ. ९ पृथुराजाने भगवंतापासून वर मागून घेतला की, भक्तांच्या मुखातून बाहेर पडणाऱ्या भगवत्कथा मला दहा हजार कानांनी ऐकण्यास मिळाव्या. दुर्जन सुद्धा जणू काय शतशत-दहा हजार कानानी दुसऱ्यांची पापे श्रवण करीत असतो; त्यात त्याला आनंद, उत्साह वाटतो. यात पर-अघ पद दुर्जनाशी संबंधित व अघ पर = भगवान, पापातीत हा अर्थ पृथुराजाशी संबंधित आहे.
पृथुराज — कथा — विवस्वानापासून सूर्यवंशाचा प्रारंभ झाला. मनु, इक्ष्वाकु, कुक्षि, विकुक्षि, बाण, अनरण्य आणि वेन एवढे राजे पृथुच्या पूर्वी झाले. (वा.रा. १/७०) वेन फार दुष्ट होता. आपल्यालाच ईश्वर मानून ईश्वराची निंदा करू लागला. ऋषिसमाजाने समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण तो निष्फळ ठरला. तेव्हा ऋषींच्या हुंकाराने तो मेला. (महाभारतानुसार अभिमंत्रित कुशजल शिंपडताच मेला) त्याच्या डाव्या मांडीचे मंथन केले तेव्हा एक निषाद प्रगट झाला. दोन्ही हातांचे मंथन केले तेव्हा उजव्या हातातून पृथु व डाव्या हातातून आर्चिकी उत्पन्न झाली. पृथूच्या उजव्या हातावर विष्णूच्या हातावरील चिन्हे होती व पायावर कमल चिन्ह होते. यावरून तो विष्णुचा अवतार व आर्चिकी लक्ष्मीचा अवतार होती हे ठरले, ब्रह्मा, इन्द्र, इत्यादि देवांनी येऊन त्यास राज्याभिषेक करविला. पुढे त्याने मोठमोठे यज्ञ केले. ग्रामे, नगरे इत्यादींची व्यवस्थित स्थापना केली. आपल्या बाण सामर्थ्याने पृथ्वी सपाट करून ती धान्योत्पादनक्षम केली. त्याने भगवंतास संतुष्ट करून वर मागितला, त्याचा उल्लेख चौ. ९ च्या टीकेत आहे. (भाग. ४/१४ पासून)

हिं.- बहुरि सक्र सम बिनवौं तेही । संतत सुरानीक हित जेही ॥१०॥
वचन बज्र जेहि सदा पिआरा । सहस नयन परदोष निहारा ॥११॥

पुन्हां शक्रसम बिनबि तयाते । संतत सुरानीक हित ज्याते ॥१०॥
म.- प्रीती संतत वचन वज्रिं ज्या । सहस्राक्षिं परदोष निरखि त्या ॥११॥

अर्थ – ज्याला सुरानीक सतत हितकर वाटते त्याला (खलाला) शक्रासमान मानून मी पुन्हा वंदन करतो. ॥१०॥

वचन वज्र त्याला सदा प्रिय असते व तो हजार डोळ्यांनी परदोष निरखीत असतो ॥११॥ (सुर+अनीक=देवांचे सैन्य इन्द्राला सदा हितकर वाटते व सुरा म्हणजे मायेचे, सैन्य खलाला संतत हितकर वाटते (माया कटक ७/७१ पहा).

टीका – चौ – १० (१) शक्रसम – इन्द्रासारखा. इन्द्राला शक्र म्हणतात, पण धात्वर्थ शक्तिमान (अ.व्या.सु.) असा आहे. म्हणून इन्द्राच्या सारखा शक्तिमान असा गूढार्थ आहे.

(क) सुरानीक – याचे दोन अर्थ होतात. सुरा + अनीक व सुर + अनीक = सुरानीक. सुरा + नीक आणि सु + अनीक असा पदच्छेद टीकाकार करतात व या लेखकाने केला, (१७/११/५३) पर्यंत. पण शंका आली की सर्वच खल काही मद्यप्रिय नसताल व शिवाय ज्यांना मद्य-सुरा हितकर वाटते त्यास सुद्धा सतत हितकर वाटणे शक्य नाहीं. अमर व्याख्यासुधा काढून पाहता सुसंगत अर्थ लागला तो -'सु राति इति सुरा, रा दाने. सु देणारी ती सुरा; सु = पीडा, कृच्छ्र, संकट. म्हणजेच पीडादायक - सुदा, पीडादायक सैन्य किंवा पीडा देणारीचे सैन्य; म्हणजे काम क्रोधादि समस्त मायाजनित विकार व माया. सु पूजायां भृशार्थेऽनुमति कृच्छ्र, समृद्धिषु' (मेदिनी) सु-पूजा, भृश, अनुमति, कृच्छ्र व समृद्धि इतक्या अर्थांनी वापरता येतो, त्यातील कृच्छ्र = पीडा, कष्ट हा अर्थ येथे अभिप्रेत आहे. 'स्यात् कष्टं कृच्छ्रम् आभीलम' (अमर) पीडादायक आहे, माया, अविद्या, म्हणून मायाकटक हा अर्थ सिद्ध झाला.

**'बिस्वा राही व्यापुनी माया कटक प्रचंड । सेनापति कामादि, भट दंभकपट पाखंड'** (७/७१)

खलाला मायेचं सैन्य सतत प्रिय व हितकर वाटते, यास अपवाद मिळणार नाही.

(ख) सुरा म्हणजे दारू ज्याला, नीक म्हणजे चांगली वाटते असा अर्थ टीकाकार घेतात, पण सुरा संस्कृत आणि नीक हिंदी यांचा बहुव्रीहि समास करावा लागतो आणि नीक- चांगली म्हणून पुन्हा हित म्हणजे हितकर किंवा प्रिय असा अर्थ घ्यावा लागतो. योग्य वाटेल तो वाचकांनी घ्यावा.

चौ. ११ – (१) प्रीति संतत वचन वज्रिं – वज्र हें इंद्राला अत्यंत प्रिय व त्याचे हित करणारे आयुध आहे. ते अतिकठोर व कराल आहे व त्याने पर्वतांचा सुद्धा चुराडा होतो. वृत्रासुराचा वध त्यानेच केला. वज्रासारखे कटु, कठोर, कर्कश व हृदयविदारण करणारे भाषण करणे खलाला आवडते. त्यावर त्याची फार प्रीती असते.

(क) संतत – सदा. इंद्र काही सदा सर्वदा वज्र धारण करीत नाहीं, पण वाग्वज्र खलाजवळ सतत असते, त्याला तो कधी दूर ठेवीत नाही; स्वप्नांत सुद्धा वापरतोच. झोपेत बाजूस राहील तेवढेच, पण ती जर लवकर आली नाही की तिच्यावर सुद्धा प्रहार केले जातात.

(२) सहस्राक्षिं परदोष निरखि – इन्द्राला हजार नेत्र आहेत, तसा हा द्विनेत्र असून सुद्धा सहस्राक्ष आहे, कारण दोन डोळ्यांनीच हा हजार नेत्रांचे कार्य करतो, पण ते दुसऱ्यांचे दोष अगदी निरखून पाहण्याचे! इन्द्र हजार नेत्रांनी दोषातीत प्रभूचे रूप पाहू शकतो. रामविवाह समयीं यामुळेच बहुतेक सुरांना हेवा वाटला. (१/३१७/७)

सार – या ११ चौपायात खलांना राहु, सहस्रबाहु, माशी, कृशानु, महिषासुर, धनेश, धूमकेतु, कुंभकर्ण, गारा, शेष, पृथुराज व शक्र, म्हटले यात त्यांच्या स्वभावाचे जे सर्वांगीण चित्र रेखाटले आहे ते एवढ्या थोड्या जागेत कोणता कुशल चितारी काढू शकेल! ते सहस्राक्ष, सहस्रवदन व दशसहस्रकर्ण आहेत. या तीन गोष्टी खलाशिवाय इतर कोणाही एका व्यक्तिजवळ नाहीत! आता मागील एका वचनाचा अर्थ अधिक स्पष्ट करतात.

हिं.दो.- उदासीन अरि मीत हित सुनत जरहिं खल रीति ।
जानि पानि जुग जोरि जन बिनती करइ सप्रीति ॥४॥

म.दो.- उदासीन-अरि-मित्र-हित श्रवणिं जळति खलरीति ।
जाणुनि करयुग जोडुनी दास विनवि सप्रीति ॥४॥

अर्थ – उदासीन असो, शत्रू असो की मित्र असो कोणाचे हि हित झालेले ऐकले की जळफळाट होणे ही खलांची रीत आहे, हे जाणून हा दास (जन) दोन्ही हात जोडून विनंती करीत - विनवीत - आहे ॥४॥

टीका – (१) उदासीन – जे शत्रू नाहीत किंवा मित्र नाहीत ते, (मीत- मित्र)

(क) श्रवणिं – कानीं पडताच, ऐकताच, हित झालेले नसतांहि झाल्याचे ऐकले की यांच्या अंगाचा दाह होतो. शत्रूचे हित झाल्याचे ऐकल्यावर खल नसलेल्यांचा सुद्धा जळफळाट होतो पुष्कळ वेळा, पण मित्र व उदासीन हित ऐकून जळणारे फक्त खलच. 'ताप विशेष फार खल चित्ती । सदा बघुनि पर संपद जळती ॥' (७/३९/३)

(ख) 'परहित हानि लाभ त्यां वाटत' चौ-२ यातील अर्थ येथे अधिक स्पष्ट केला. असा जळफळाट ज्याच्या चित्तांत होत असेल त्याने समजावे की आपण खल आहोत, हे सुचविण्यासाठी खलस्वभावसार सांगणारा हा दोहा आहे.

(ग) दास – 'सर्वां प्रिय सेवक ही नीति (७/१६/८). सेवक भावाने मी विनवीत आहे हे जाणून तुम्ही पण स्वामिभावाने माझ्यावर कृपा करावी म्हणजे माझे हित

होईल. दास = रामसेवक अर्थ घेणे तुलसीदासांच्या पुढील वचनांशी विरोधी आहे. (१२/३-५ पाहा.)

ल. टे. खलवंदनाचा उपक्रम वंदन व परहित यांनी केला. येथे उपसंहारात परहित व हात जोडून विनंती आहेच. तेथे 'सद्भावे' जे सुचविले तेच येथे 'सप्रीति' ने सांगितले. हिंदी दोह्यांतील सप्रीति शब्दांतील स चा उच्चार ऱ्हस्व करावयाचा आहे. खलांना वंदन करण्यातील आपला हेतु व त्यांचा स्वभाव पुढील दोन चौपायांत सांगून हे प्रकरण संपवितील.

हिं.- मैं अपनी दिसि कीन्ह निहोरा । तिन्ह निज ओर न लाउब भोरा ॥१॥
वायस पलिअहिं अति अनुरागा । होहिं निरामिष कबहुँ कि कागा ॥२॥
म.- मी अपल्यापरि केली विनंती । घेति चुकुन ते ध्यानि कधि न ती ॥१॥
प्रेमें वायस फार पाळले । काक निरामिष कधी जाहले ॥२॥

अर्थ – मी आपल्या परीने त्यांना विनती (विनंती = प्रार्थना - निहोरा) केली (पण मला माहीत आहे की) ते चुकून सुद्धा तिकडे लक्ष देणार नाहीत. ॥१॥ (कारण) वायसांना फार प्रेमाने जरी पाळले तरी कावळ्यांनी (कागा-काग = काक) मांसभक्षण करण्याचे कधी सोडले आहे काय? (कधी तरी सोडतील का? छे! कधीच नाही). ॥२॥

टीका – चौ. १ (१) या चौपाईत 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' (भ.गी.) हा सिद्धान्त तुलसीदासांनी स्वतःच्या कृतीने सांगितला आहे.

(क) मी आपल्या परीने म्हणजे माझे कर्तव्य जाणून ज्या प्रकारे त्यांना नमन करणे योग्य होते, त्या प्रमाणे सद्भावे, सुप्रीति दोन्ही कर जोडून, सत्याला न सोडता, त्यांना मोठेपणा देऊन, त्यांना अप्रिय वाटणार नाही अशा शब्दांनी प्रार्थना केली; यात मी आपले कर्तव्य केले, तेहि आपल्या स्वभावावर जाणारच.

चौ = २ – (१) तुलसीदासांनी जशी प्रार्थना केली, त्याप्रमाणे अगदी प्रेमाने, नानाप्रकारचे उत्तमोत्तम गोड, स्वादिष्ट, सात्विक, मृदु, रसाळ पदार्थ, फळें वायसास खायला घालून, त्याचे पालन पोषण करून माणसाळला, तरी तो स्वभावाने कावळाच असल्याने, मांस, किडे, जीव जंतु, कुजलेले पदार्थ खाणारच, कारण तो त्याचा स्वभावगुण आहे. 'स्वभाव मलिन ना भंगे' तसेंच खलांचे आहे. त्यामुळे मला किंवा कोणाला वाईट वाटण्याचे कारण नाहीं.

(क) वर दिलेल्या राहु आदि उपमादिकांनी त्यांना राग येणार नाही व जरी आला तरी तो न दाखविता लोकांस सांगत सुटतील की बघा तुलसीदासांनी सुद्धा आम्हास इंद्र, शेष, पृथुराज, सहस्त्रार्जुन, अग्नि म्हटलेच की नाही. अग्नि वगैरे देव देवता नसतील तर जग चालणार नाही, तसेच अस्मादिकांवाचून जग चालणारच नाही, असा त्यांच्या म्हणण्यातील भाव असता लोक आम्हाला वाईट म्हणतात, तेव्हा ते

म्हणणारेच दुर्जन, दुसरे काय? रावण-हनुमान संवाद व रावण-अंगद संवाद यात रावणाच्या वृत्तीत हेच दिसते.

ल. ठे. या चौपाईत वायस व काक हे दोन शब्द असले तरी द्विरुक्तिदोष नाही, तो आर्षप्रयोग आहे हे सिद्ध करण्यासाठी विविध कल्पनांचे जाळे विणले गेले आहे. (मा. पी. पृ. १५६) पण त्यातून कोणी बाहेर पडलेले नाही, ही पुनरुक्ति नाहीच नाही, पण पुनरुक्तिवदाभास अलंकार आहे व त्याने गूढ सिद्धांत ग्रथित केला आहे. वायस व काक यांचा धात्वर्थ पाहिला तेव्हा खूप आनंद झाला. वय गतौ, वायस शब्द गतिदर्शक आहे, व कै शब्दे, काक विशिष्ट आवाज, ध्वनि करणारा असा अर्थ आहे. याने दाखविले की त्याची गति, चालरीत, मानसिक ठेवण व त्याचा कर्कश कठोर आवाज यात बदल होणार नाही. हा विशेषार्थ उल्लेख न करता सुचविला. मांसादि खाणें हे कर्म, कर्कश आवाज याने वाणी आणि वायस-गती मानसिक ठेवण, म्हणजे मन या तिन्ही गोष्टींत बदल होणार नाही हे सुचविले. खलवंदन प्रकरण समाप्त झाले. आता ६/१२ पर्यंत संत व खल यांचे साम्य दाखवून थोडा भेद वर्णिला जाईल.

### संत-असंत साम्य-भेद

हिं.- बंदउँ संत असज्जन चरना । दुखप्रद उभय बीच कछु बरना ॥३॥
बिछुरत एक प्रान हरि लेहीं । मिलत एक दुख दारुन देहीं ॥४॥
म.- बन्दे संत असंत पदांही । दुःखद उभय भेद परि काहीं ॥३॥
हरुनि वियोगी प्राणां नेती-। एक मिळत दारुण दुख देती ॥४॥

अर्थ – (आता मी) संत व असंत (दुर्जन) या दोघांच्याही पायांना (एकदम) नमन करतो; कारण दोघेही दुःखदायक आहेत, पण (परि) दोघांत काही भेद आहे. ॥३॥ एक (संत) आपला वियोग होतांना (दुसऱ्यांचे) प्राण हरण करून नेतात व एक (असंत) मिळताच (भेटताच, गाठ पडली म्हणजे) दारुण दुःख देतात. ॥४॥

ल. ठे. येथून ६/१ पर्यंतचे वर्णन वाचले म्हणजे खलांना वाटेल की आमच्यात व संत संत म्हणतात त्यात फरक काही नाही. त्यातील व्याजोक्ति कळून न कळल्यासारखी दाखवून प्रतिकूल भाग काही तरी साठीची बुद्धि नाठी, यामुळे, लिहिला आहे असे ते म्हणतील. मानसात रावणाचे उदा.

'जळता पाहू यदा कपाळां । विधिने लिखित अंक मम भाळां ॥
नर हस्ते वध अपला वाचीं । तैं हसलो विधि-गिरा अ-साची ॥
भ्रमें जरठ विधि लिहि लेखातें (६/२९/१-३)

विधिलिखित वचनाची ही वासलात त्यांच्या पणतवाने लावली तेथे गोस्वामी सारखे महाकवि अपवाद कसे ठरतील? साम्यदर्शक, स्तुतिवाचक वचनें खरी व बाकीची

खोटी मानून त्यांस (खलांस) आनंद वाटेल, मूठभर मांस येईल आणि छाती जास्त पुढे काढून चालतील.

(क) सर्वांना सुख देणे हे संतांचे ध्येय असते, त्याचाच अवलंब येथे केला आहे, व वर्णनात असत्य, तोंडपुजेपणा मुळीच नाहीं.

चौ. ३-४ (१) दुःखद उभय – खल म्हणतील की संतही दुःख देतातच मग आम्ही दुःख दिले तर कुठे बिघडले. दुःख देण्यात भेद कोणता तो सांगतात.

(क) 'हरुनि बियोगी प्राणां नेती, एक' हरुनि नेती – बलात्काराने घेऊन जातात, असा मुख्य अर्थ आहे, व लक्षणेने घेतला जातो तो गौण आहे. मुख्यार्थ अशक्य असेल तरच लक्षणा योग्य. हिंदी टीकाकारांनी मुख्यार्थ सांगितलाच नाही!

(ख) कोणत्या संतांनी आपल्या वियोगाच्या वेळी प्राण हरण करून नेले?

'खळें जनकजा हरुनी नेली' 'तेहिं खल जनकसुता हरि लेही' (हिंदी, ३/३१/२). येथे तीच पदें आहेत भेद वर्तमान व भूत काळ, इतकाच, भ. गी. श्लोकाशी तुलना केली म्हणजे हे संत कोणते ते समजते।

''ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः । मनः षष्ठानींद्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति ।। ... गृहीत्वैतानि संयाति वायुर्गंधानिवाशयात्' (भ. गी. १५/७.८). भाव हा की संत म्हणजे जीव (संत-सनातन) तो सद्रूप नित्य आहे. 'जीवो नित्यः' जीव अनेक आहेत म्हणून अनेक वचन 'नेती' नेतात हे योग्यच आहे. सन्त हे सत् चे प्रथमेचे बहुवचन आहे. जीव शरीरांस सोडून जाताना प्राण, मन, इंद्रियादिकांना बलात्काराने ओढून घेऊन जातात हे सत्य आहे.

(ग) एक - असंत म्हणजे शरीर, शरीरें यांची प्राप्ति झाली, ही मिळाली (मिळत) की तत्काळ दारुण दुःख देण्यास प्रारंभ करीत नाहीत असे कोण म्हणेल? 'दुःसह दुःख जन्मतां मरतां' (७/१०९/७) असत्चे बहुवचन असंत, असत् म्हणजे नश्वर या अर्थाने अतिव्याप्ति किंवा अव्याप्ति दोष उत्पन्न होत नाहीं। शब्दशः व मानस वचनाशी सुसंगत अर्थ लागतो. असे न केल्यास विनाकारण लाक्षणिक अर्थ घ्यावा लागतो व हरुन नेतात 'हरि लेही' हे शब्द निरर्थक ठरतात. खलांच्या बाबतीत असंतांविषयीचे वचन जसे सर्वत्र लागू पडते तसे संतांविषयीचे पडत नाही. संतांच्या वियोगाने प्राण गेल्याचे फक्त एकच अप्रसिद्ध उदाहरण (पुराणादिकांतील नव्हे) टीकाकारांनी दिले आहे. असज्जन-खल सर्वांनाच, भेटताच, दारुण दुःख देतात हे खरे असले तरी हे वर्णन पूर्वी केले आहे. येथे हे दाखविले की शरीर दुर्जनांसारखे आहे व जीवात्मा संत आहे. या शरीराला गंगाजल पाजलें तर शरीर त्यालाच अपवित्र बनविते. उत्तम अन्न घातलें तरी त्याची घाण करते हें. 'नवद्वारमलस्त्रावी' मळच मळ उत्पन्न करीत असते. वरील मुख्यार्थ घेऊन मग लाक्षणिक गौणार्थ घेण्यास हरकत नाही. 'शौचात्स्वांग जुगुप्सा' शौच (नियमांपैकी एक) उत्तम बाणले की स्वतःच्या देहाचा सुद्धा किळस येतो (पा. यो.) नको याचा सहवास असे वाटते. तसेच दुर्जनांबद्दल वाटते.

(घ) संतांचा-साधूंचा वियोग होताना फार दुःख होते, प्राणांतिक वेदनांसारखे होते, पण ते सुद्धा कोटयावधी लोकांत एखाद्यालाच. विश्वामित्र अयोध्येतून गेले (राम विवाहानंतर) तेव्हा कोणालाही मुळीच दुःख झाले नाही. रामवियोगाने मात्र सर्वांना दारुण दुःख झाले; प्राण गेले फक्त दशरथाचे, पण त्यात कारण तापसशाप आहेच. भरतासारख्यांचेही प्राण रामवियोगाने गेले नाहीत! संत व असंत हे दोघेही दुःखद. आणखी साम्य व भेद पुढील चौपायात आहेत.

हिं.- उपजहिं एक संग जग माहीं । जलज जोंक जिमि गुन बिलगाहीं ॥५॥
सुधा सुरा सम साधु असाधु । जनक एक जग जलधि अगाधू ॥६॥

म.- उभय जगामधिं सवें उपजतां । जलज जळू जशि गुणीं विषमता ॥५॥
सुधासुरासम साधु-असाधू । जनक एक जग-जलधि अगाधू ॥६॥

अर्थ - (संत व दुर्जन) हे दोघेहि या जगात बरोबरच उत्पन्न होत असता त्यात कमल आणि जळू यांच्या प्रमाणे गुणभेद असतो ॥५॥

साधु व असाधु (खल) हे दोघे अमृत व दारूसारखे आहेत व दोघांचा जनक एकच म्हणजे जगरूपी अगाधसागर ॥६॥

**टीका -- चौ - ५** (१) दोघेहि बरोबर उपजतात हे दुसरे साम्य. दृष्टान्त देतात. जलज- जळांत जन्मलेले - कमळ, जळू - अशुद्ध, नासके रक्त, दूषित रक्त शोषून घेणारा, पाण्यातच जन्मलेला पण चिखलात राहणारा प्राणी. गळवे, वगैरेवर जळवा लावतात. दूषित रक्त पिऊन टरटरीत फुगल्या म्हणजे त्यांना पिळून ते रक्त बाहेर काढतात. त्यांच्या दंशाने व्रण पडतात. एका रोग्यास लावलेली जळू चांगली न धुता दुसऱ्यांस लावली तर बरे होण्याऐवजी नवे विघ्न मात्र उत्पन्न होते. हा धंदा बहुधा चांभार करतात. पाण्यात असलेल्या जळवाही पायांना पाण्यात बिलगतात. या दिसण्यात सुद्धा किळसवाण्या, असतात. कमळ व जळवा यांचे उत्पत्तिस्थान, निवासस्थान, एकच जलाशय, पण गुणांमध्ये अगदी मोठा फरक त्यामुळे एक (कमळें - साधु) लोकांना प्रिय वाटतात व एक (जळवा - असाधु) दृष्टीस पडले तरी दुःख होते.

(क) जलजांच्या ठिकाणचे कमीत कमी आठ सद्‌गुण पूर्वी दाखविले आहेत. पाण्यात जन्मून, त्यात राहून, त्यावरच जगून, चिखलात मूळ असून पाणी व चिखल यांपासून कमळे पूर्ण अलिप्त, तसेच संत. देहरूपी चिखलाशी सदा संबंध असून, विषयवारीचे ग्रहण शरीर करीत असता, जगरूपी अगाध सागरात राहत असता, त्यात बुडत नाहीत. अगदी अलिप्त. 'पद्मपत्रमिवाम्भसा' असतात. कमळ कोणालाही दुःख देत नाही. पाहिजे असेल त्याला विविध सुखच मिळते. कमळ स्थावर, संत जंगम.

उपदेश :- कमळ व जळू भिन्न स्वभावाची झाली याचे कारण जसे जल, चिखल नाहीत, त्याचप्रमाणे सहोदर भावंडांत सुद्धा संत-असंता एवढे अंतर असू शकेल. तो दोष आई-बापांचा असे म्हणणे योग्य नाही. 'जन्महेतु सकलां पितृमाता । कर्मशुभाशुभ देइ विधाता' । (२/२५५/६) कर्मानुसार शुभाशुभ स्वभाव बनतो.
चौ. ६ (१) सुधासुरासम साधु-असाधू - सुधा आणि सुरा यांची उत्पत्ति क्षीरसागरांतूनच. सुधा अमरत्व देते, पण मानसरोगांचे निवारण करू शकत नाही; सर्व दुःख परिहार करू शकत नाही. अमृतपान करणाऱ्या इन्द्रादि देवांना सुद्धा दुःख, भय, चिंता इ. आहेतच.
(क) सुधा स्वर्गात, मानव भूलोकात; पण साधुरूपीसुधा मात्र येथे पाहिजे त्यास मिळू शकते. साधुसुधा सर्व मानसरोग निवारण करून खरे अमरत्व, पूर्ण निर्भयता व पूर्ण विशुद्ध सुख देऊ शकते. कोणतीही एक उपमा साधूंना अपुरी पडते, तशी कोणतीही एक उपमा असाधूंना अपुरीच. हे तिसरे साम्य
(ख) सुधा शीतल, स्वादु, दुःखशामक तर सुरा तीक्ष्ण, अस्वादु व दुःखदायक असते.
(२) जनक एक जगजलधि अगाधू :- दोघांचा जनक क्षीरसागर, तसेच साधु-असाधु जगरूपी अगाध सागरांत झाले. दोघांचा जनक अगाध हे चौथे साम्य. दोघेही अगाध सागर आहेत हे पुढे सांगतील.

हिं.- भल अनभल निज निज करतूती । लहत सुजस अपलोक बिभूती ॥७॥
सुधा सुधाकर सुरसरि साधु । गरल अनल कलिमल सरि ब्याधू ॥८॥
म.- भले बुरे निज निज कर्तूती । घेती कीर्ति अकीर्ति विभूती ॥७॥
सुधा सुधाकर सुरसरि सज्जन । गरल अनल कलिमलसरि दुर्जन ॥८॥

अर्थ - भले (चांगले, सज्जन) व बुरे (वाईट, दुर्जन) आपापल्या कर्तूतीने (कृतीने) चांगले किंवा वाईट होतात व कीर्ति आणि अपकीर्तिरूपी वैभव मिळवितात. (हा एक अर्थ) चांगले व वाईट आपापल्या करणीने कीर्ति व अपकीर्ति रूपी वैभव मिळवितात. (हा दुसरा). ॥७॥ सुधा (अमृत) सुधाकर (चंद्र) सुरसरि गंगा व साधू, तसेच गरल (विष) अनल, कविनाशा-सुखविनाशा नदी (कलिमलसरि) आणि दुर्जन यांना आपापल्या कर्तुत्वामुळेच चांगले वाईट म्हटले जाते. (हा एक अर्थ – मागील चौपाईशी संबंध धरून) आणि सुधा, सुधाकर आणि सुरसरिता गंगा यांच्यासारखे साधु असतात; आणि विष (हालाहल), अग्नि आणि सुखविनाशा - कलिमल सरिता यांच्यासारखे व्याध म्हणजे खल होत. (हा दुसरा अर्थ)
टीका – चौ. ७ (१) भले बुरे निज निजकर्तूती - कोणाला या जगात भला असे म्हणतात ते त्याच्या भल्या- चांगल्या कृतीमुळे व वाईट म्हणतात त्याचे कारणही त्यांची करणीच, असा केवळ या चरणाचा स्वतंत्रपणे अर्थ होतो.

(क) जे चांगले आहेत ते चांगली कृती करून कीर्ति वैभव संपादितात, त्यांना मिळते, तसेच वाईट आहेत ते वाईट कृती करून अपकीर्ति, वैभव मिळवितात -मिळते. त्यांना- दोघांना (साधु असाधूंना) वैभव मिळते हे साम्य पाचवे. भाव हा की भेद होण्याचे कारण जग नसून ते स्वतःच असतात. भाव हा की जे वाईट म्हटले जातात ते चांगली कृती करतील तर त्यासही कीर्ति मिळेल. 'हे अवघें आपणांचि पाशीं' (दा. बो.)

चौ. ८ (१) सुधा-विष, सुधाकर-अग्नि, गंगा-कलिमलसरिता आणि साधू-व्याध या परस्पर विरुद्ध स्वभावाच्या चार जोड्या आहेत. पहिल्या चौघांना त्यांच्या चांगल्या लोकसुखकारक स्वभावामुळे व कृतीमुळे चांगलेपणा, कीर्ति मिळते; आणि दुसऱ्या चौघांना लोकदुःखदायक वाईट कृतीमुळे अपकीर्ति मिळते; म्हणजेच या अर्थाने ही चौपाई दृष्टान्तादाखल ठरते.

(क) सुधाकर :- सुधेनें - अमृताने - युक्त किरण असलेला, चंद्र हा आल्हाददायक, तापनाशक असतो. साधूंचे भाषण हेच अमृतमय किरण होत.

'परिसुनि तुमचे वच सम शशिकर । फिटे मोह शरदातप अतितर' (१/१२०/१). 'स्रवत नाथ आननशशी कथा-सुधा रघुवीर । श्रवणपुटीं पिउनियां मन तृप्त नसे मतिधीर ।' (७/५२).

या अवतरणांनी ठरले की भक्ति-कथा सुधारस साधूंच्याकडून मिळतो. चंद्रकिरणांतील सुधारस फक्त चकोरांस ग्रहण करता येतो; पण साधु- गुरु-वचनकिरणांतील अमृत 'सकल सुलभ सबदिन सब देशां' (१/२/१२). चंद्रामृत कमीजास्त होते परंतु हे सतत वहात असते, इच्छा व शक्ति असेल त्याप्रमाणात वाटेल त्याने प्यावे, त्रितापहरण, शांति, आनंद, शीतलता इत्यादि गुण सुचविले.

(ख) सुरसरि : गंगा, पाप विनाश करते पण उधारीचा. साधूंच्या दर्शनाने पाप नष्ट होते व त्याची प्रतिति शीघ्र येते. याने निर्मलता, मल (पाप) हरण शक्ति, परम पावनता, भगवत्संबंध, इत्यादि गुण व ते देण्याची असामान्य शक्ति सूचित केली. आता दुर्जनांची तीन विशेषणें घेऊं -

(२) (क) गरल ठार मारते, उग्र, दुःखदायक.

(ख) अनल - अनल मेलेल्यांस व जिवंत असणारांस सुद्धा जाळतो, कोणाला क्षमा करीत नाही, किती काष्ठादि संपत्ती मिळाली तरी अतृप्ति, अशांति आणि उलट अधिक भडकतो व बडबडू लागतो. कोणाबद्दलही प्रेम नाही; त्याचे पोषण करणारांचे सुद्धा जाळून भस्म करतो; शत्रु, मित्र, उदासीन या सर्वांनाच दुःखद दाहक; असे किंवा याहून अधिक दुर्जन असतातच.

(ग) कलिमलसरि - कलिमल नदी, क-विनाशा-कर्मनाशा असे हिला म्हणतात; या नदीचे स्नान केल्याने सर्वशुभकर्मांचा नाश होतो असे शास्त्र सांगते. दुर्जनांच्या संसर्गाने सुखाचा व शुभकर्मांचा नाश होतो. हिचा प्रभाव गंगेच्या उलट आहे. कविनाशा असे हिचे नाव आहे.

कं = सुख, त्याचा विनाश करणारी. क्रमनाशा = कर्मनाशा, असा दुसरा पाठ आहे.

(३) विषावाचून जगाचे कदाचित अडणार नाही, पण अनलाशिवाय जग चालणार नाही. दुर्जन - खल जगात नसले तर जग अति सुखी असते. 'असे मनुजखल अधम युगीं कृत नी त्रेती नाहिं । द्वापरिं होतिल काहिं, बहु वृन्दचि कलीयुगाहि' (७/४०) असे असले तरी कृत आणि त्रेता युगांत राक्षस, असुर, खल असतातच. म्हणजे जगात हे असतातच.

(क) विषाचा योग्य उपयोग केल्यास ते रोगहारक होऊ शकते; सोमल, गंधक, कुचला इत्यादि अनेक विषांचा उपयोग औषधात करतातच.

(ख) कर्मनाशा किंवा कविनाशा नदीचा मात्र पुण्य प्राप्तीच्या दृष्टीने उपयोग नाही, तरीपण शेती वगैरेस उपयोग होतो. तसाच खलांचा सुद्धा जगाला अगदीच उपयोग होत नाही असे नाही. ज्यांची निंदा ते करतात त्यांचे पाप घेतात; निंदा सहन करण्याची आपली शक्ति किती आहे याचा अंदाज संतास घेता येतो. दुर्जनरूपी अग्नीच्या भट्टीत तावून निघाल्याशिवाय जगाला संतांची किंमत कळत नाही. ज्यांची किंमत अशाप्रकारे जगाला अधिक समजली त्यांचा जगाला अधिक उपयोग झाला. 'अयोग्यः पुरुषो नास्ति योजकस्तत्र दुर्लभः'

सूचना - ही चौपाई पुढील चौपाईशी समन्वित घेतली म्हणजे पुढील चौपाईचे दोन अर्थ होतात.

हिं.- 'गुन अवगुन जानत सब कोई । जो जेहि भाव नीक तेहि सोई ॥९॥
दो.- भलो भलाइहि पै लहइ लहइ निचाई नीचु ।
सुधा सराहिअ अमरताँ गरल सराहिअ मीचु ॥५॥
म.- गुण अवगुण सगळेच जाणती । जो ज्या रुचे श्रेष्ठ तो गणती ॥९॥
दो.- भल्या भलेपण लाभतें नीचत्वहि नीचास ।
सुधा-प्रशंसा अमरतें मरणें स्तुति गरळास ॥५॥

अर्थ - (अर्थ १) मागील चौपाईत वर्णन केलेल्या सुधादिकांचे व गरलादिकांचे गुण व अवगुण सर्वांनाच माहीत आहेत; (म्हणून मी- कवीने-ते वर्णन केले नाहीत) यातील चांगले काय व वाईट काय हे जो तो आपापल्या रुची प्रमाणे ठरवितो. (अर्थ २रा) गुण व अवगुण सगळे (साधु, असाधु, इतर) जाणतातच पण ज्याला जो आवडतो तो त्याला उत्तम वाटतो - म्हणतो ॥९॥ परंतु चांगला-भला-असेल त्याला चांगुलपणाच मिळतो व नीचाला नीचत्व मिळते. अमृताची प्रशंसा होते ती त्याच्या अमरता (देण्याच्या) गुणामुळे व विषाची वाहवा होते ती (सुद्धा) मृत्युकारी गुणामुळेच - मृत्यूनेच ॥दो. ॥५॥

टीका – चौ - ९ (१) संतखलवर्णनात एका शंकेला जागा राहिली ती ही की खलांना हित अहित, चांगले वाईट, गुण अवगुण म्हणजे काय हे समजत नसेल म्हणून ते तसे वागतात. हिचे निरसन या चौपाईत करतात. असंत सुद्धा गुण अवगुणादि जाणतात पण जाणून सुद्धा त्यांना अवगुणच गोड वाटत असल्याने ते तेच घेतात व त्या अवगुणांनाच उत्तम गुण समजतात, व सद्गुणांना दुर्गुण मानतात. **'काक कथिति कलकंठ कठोर चि' 'हंसा बक चातकांस वाघुळ हसति'** (१)९/१-२) बगळा हंसाला हसतो. कारण तो, त्याच्या सारखे ध्यान धरून मासे खात नाही, थंड हवेत एकांतात राहतो. माणुसघाण्या म्हणतात तसा आहे; इत्यादि. वाघळें चातकांस हसतात व म्हणतात की 'काय निर्दय मेघांपुढे तोंड वेंगाडून पिऊऽ पिऊऽऽ करीत असतो! नद्या काय थोडया भरल्या आहेत! मूर्ख आहे झाले!'

**'हिताऽहिता पशुपक्षि जाणती । मनुजतनू गुण-बोध खाण ती'**

(क) अमृत दिलें व अमरत्व आले नाही तर त्यात त्याला जसा कमीपणा येतो तसेच विषाने मरण न आले तर त्याला कमीपणाच दिला जातो. भाव हा की दोघेही चांगल्या वाटणाऱ्या गुणाचे रक्षण करण्यास झटत असतात. लोकांत याचा परिणाम काय होतो ते दोह्यांत सांगतात.

दो. ५ (१) सज्जनांना जगात चांगुलपणा मिळतो व नीचाला नीचपणा - नीचता, अपकीर्ति, कुयश मिळते. कारण पुण्याचे फळ सुख व सुयश आणि पापाचे फळ दुःख व कुकीर्ति हे ठरलेलेच आहे.

**'पुण्याविण किं मिळे यश पावन। अपयश लाभ किं जेथे पाप न ।।'** (७)११२/७)

**'मही पुण्य पुरुषा सुखपूरित'** (१)२९४/१).

**'तशि न मागतां सुख संपत्ती सहज धर्मशीलासी जमती'** (१/२९४/३).

**'सुख वांछिति मूढ, न धर्मरती । मति थोडि कठोर, न कोमल ती'** (७/१०२/२)

(क) कसें जरि असले तरी मारण्यातच आपला मोठेपणा आहे असे जसे विषास वाटते तसेच खलांस वाटते.

(ख) सार हेच की जगात वाईटपणा किंवा चांगुलपणा गुणांनी व कृतीने मिळत असतो; व ज्याचा जो स्वभाव आहे तो तो सोडीत नाही. खलांना त्यांच्या अंगच्या स्वभावगुणांमुळे (दुर्गुणांमुळे) त्यांच्या वर्गात मोठेपणा मिळतोच. मारण्यासाठी केलेला विषाचा प्रयोग यशस्वी झाला की त्या विषाची तो स्तुती करणारच. आपापले गुण टिकविण्यात दोघांनाही मोठेपणा वाटतो. हे सहावे साम्य. पुढील चौपाईत. आणखी दोन गोष्टीत साम्य दाखवून या प्रकरणाचा उपसंहार करतील.

हिं.- **खल अघ, अगुन साधु गुन गाहा । उभय अपार उदधि अवगाहा ।।१।।**
**तेहि तें कछु गुन दोष बखाने । संग्रह त्याग न बिनु पहिचाने ।।२।।**

म.- **खल-अघ-अगुण साधु-गुण वर्णन । दोन अपार पयोधिच ठाव न ।।१।।**
**म्हणुन अल्प गुण दोष वानले । त्याग न संग्रह विना जाणले ।।२।।**

अर्थ - खलांच्या पापांचे व अवगुणांचे (अगुण) वर्णन (कथा-गाथा- गाहा) व साधूंच्या गुणांचे वर्णन हे दोन अपार अगाध (ठाव न) सागर आहेत. ॥१॥ म्हणून मी थोड्याशांचे (अल्प-कछु-काहीं) वर्णन केले; (हेतु हा कीं) अवगुणांचा-दोषांचा-पापांचा-त्याग व सद्गुणांचे ग्रहण जाणल्या शिवाय करता येत नाही। (जाणले विना-बिनु पहिचाने -जाणल्याशिवाय; तेहि ते = त्यामुळे म्हणून).

टीका -- चौ.१ (११) दोघे अपार व अगाध सागर आहेत हे दोन समान धर्म येथे सांगितले. आठ बाबतीत संत व खल यातील साम्य दाखविले. यांचा 'जनक जगजलधि अगाधू' आहे अपार नाहीं हे पूर्वी सांगितले आहे. दोघेही 'बापसे बेटा सवाई' व नव्हे दुप्पट मोठे आहेत हे सुचविले.

(क) या आठ ठिकाणी खलांच्या बाबतीत व्याज-निंदा अलंकार आहे. बाह्यतः स्तुति पण गूढार्थाने निंदा.

(ख) खलांची कथा पापमय व दुर्गुणांचा अपार सागर, कधी पार जाता येणे शक्य नाही; ठाव न लागणारी आहे. साधूंची कथा अपार अगाध सागरच पण पुण्याचा व सद्गुणांचा इतकाच भेद. सार हे की साधूंचे सद्गुण जसे अगणित, अनंत तसेच खलांचे दुर्गुण व दोष अनंत अगणित म्हणून म्हणतात,

चौ. २ (१) गुणदोष (सद्गुण दुर्गुण) वर्णन करण्यात हेतु कोणता तो सांगितला. परदोष वर्णन करणें हा खलस्वभाव असता गोसाईजींनी दोषवर्णन कसे केले याचे उत्तरचौपाइतच आहे. कोणाहि व्यक्तिविशेषाचे वर्णन केले नाही म्हणून हा दोष नाही. महाकाव्यात संत प्रशंसा व खलनिंदा असली पाहिजे म्हणून हे वर्णन केले आहे. का असली पाहिजे? याचे उत्तर येथेच आहे.

(क) त्याग न संग्रह विना जाणले - लोकशिक्षण, लोक कल्याण हा महाकाव्य व नाट्यकाव्य यातील एक हेतु असतो. त्याग कशाचा करावा, वाईट काय व चांगले काय, सुख, कीर्ति, समाधान कशाने मिळते वगैरे गोष्टी बहुजन समाजास कळत नाहीत. त्यांनी हे वर्णन ऐकून स्वतःच्या स्वभावगुणदोषांचे निरीक्षण करून दुर्गुणांचा त्याग करावा व सद्गुणांचा संग्रह करावा, हे करण्यास शिकावे या हेतूनेच सद्ग्रंथात गुणदोषांचे वर्णन केलेले असते तसेच येथे केले आहे. स्वतःच्या दोषांचा जसा त्याग आवश्यक तसाच दुसऱ्यांच्या दोषांचा त्याग करणे जरूर आहे व जेथे कुठे सद्गुण दिसेल तो घेणे जरूर आहे.

संगति - सर्व विश्व गुणदोषमय आहे हे पुढील ६ चौपायांत सांगतात.

हिं.- भलेउ पोच सब बिधि उपजाए । गनि गुन दोष बेद बिलगाए ॥३॥
कहहिं बेद इतिहास पुराना । बिधि प्रपंच गुन अवगुन साना ॥४॥

म.- बऱ्यां वाइटां विधिनें सृजिले । गणुनि दोष गुण वेदिं निवडिले ॥३॥
श्रुति इतिहास पुराणि निवेदित । विधीप्रपंच गुणागुण-मिश्रित ॥४॥

अर्थ - चांगल्यांना व वाईटांना विधिने (ईश्वराने)च निर्माण केले व गुणांचा व दोषांचा विचार करून वेदांनी व शास्त्रांनी चांगले व वाईट अशी विभागणी केली ॥३॥ वेद, इतिहास पुराणादिकांत सांगितले आहे की विधिनिर्मित प्रपंच (ईशकृत सृष्टि) गुणदोष मिश्रित आहे. ॥४॥

टीका – चौ - ३ (१) आतापर्यंत गुणदोषांचा विचार करून संत खल लक्षणें सांगितली ती स्वतःच्या कल्पनेने सांगितली नसून वेदशास्त्रांनी जे ठरविले आहे तेच थोडे स्पष्ट करून सांगितले, हा भाव येथे सूचित आहे.

(क) बऱ्यांवाइटां - या शब्दांनी विरुद्धधर्मी सर्व गोष्टींचे ग्रहण करता येते. पुढील चौपायांत उदाहरणे आहेत.

(ख) विधिने सृजिले - विधिचा अर्थ येथे ब्रह्मदेव घेणे पुढील वर्णनाशीं विसंगत आहे. विधि-धाता-ब्रह्मदेव असा अर्थ नाही असे नाही, पण तो येथे योग्य नाही. विधि- ईश्वर, राम, असा अर्थ येथे आहे.

'प्रिय मम सगळे म्यां उपजवले', 'मम माया संभव संसारी' (७/८६/४,३).
विधिनिर्मितीत येथे 'माया ब्रह्मजीव जगदीश्वर' आहेत. जगदीश्वराला ब्रह्मदेवाने निर्माण केला असे कसे म्हणता येईल?

'मम योनिर्महद् ब्रह्म तस्मिन् गर्भं दधाम्यहम् ।
संभवः सर्वभूतानां ततो भवति भारत' (भ. गी.)

चौ. ४ - (१) विधीप्रपंच गुणागुण-मिश्रित - विधीप्रपंच -विधिनिर्मित प्रपंच. प्रपंच -पंचविषयांचा, पंचभूतांचा पसारा, सर्व पाच भौतिक आहे; पंचमहाभूतांपासून झालेले सर्व जग. यालाच विरिंचि प्रपंच असे म्हटले आहे.

(क) गुण + अगुण (अवगुण दोष) = गुणागुण यांनी मिश्रित (साना- मिश्र) आहे. जग म्हणजे गुणदोषांची गल्लत. काही व्यक्तींतच नव्हे तर सर्वांच्यातच काही गुण व काही दोष आहेतच.

'न तदस्ति पृथिव्यां वा दिवि देवेषु वा पुनः.
सत्त्वं प्रकृति जैर्मुक्तं यदेभिः स्यात्त्रिभिर्गुणैः' (भ. गी. १८/४०) मायाजनित त्रिगुण, पंचभूतांपासूनच सर्व विश्व झाले असल्याने सत्व, रज, तम हे तीन गुण कमीजास्त प्रमाणात प्रत्येकात असावयाचेच. ज्या प्रमाणात रजोगुण व तमोगुण असतील त्या प्रमाणात दोष अवगुण असावयाचेच; व ज्या प्रमाणात सत्वगुण असेल त्या प्रमाणात सद्गुण असावयाचे. पूर्ण निर्दोष फक्त ब्रह्म आहे. 'निर्दोषंहिसमं ब्रह्म' म्हणूनच संत आपणास पापी, हीन इत्यादि म्हणत असतात. भ. गी. १४/२२ वरील ज्ञानेश्वरी व यथार्थ दीपिका (वामनी) मुद्दाम वाचून पहावी. पुढे दोष गुण मिश्रणात माया व ब्रह्म आहेतच. त्यांच्या पासूनच जग झाले असल्याने कारणगुण कार्यात कमीजास्त अंशाने असणारच. 'दुःखद उभय' पूर्वी म्हटले ते यामुळेच. पाणी पिण्यात, चालण्यात, हात हलविण्यात, श्वासाबरोबर हजारो लाखो जीवांची हिंसा संतांकडून सुद्धा होते, ती अनिवार्य आहे व ते अलिप्त असतात इतकाच विशेष.

अंधार व प्रकाश एकत्र राहत नाहीत असे म्हणतात पण ते तितके खरे नाही. निबिड अंधार सुद्धा दिसतोच. दिसण्यास थोडा तरी प्रकाश पाहिजे. जंगलात राहणाऱ्या लोकांना निबिड अंधारात सुद्धा रस्ता दिसतो. वाघ, मांजरे, उंदीर इत्यादि तर अंधकारात भराभर धावतात व भक्ष्य पाहून पकडतात. जे जड आहे ते तमोमय आहे व आत्मा प्रकाशमय आहे. देह जड व आत्मा प्रकाशमय एकत्र आहेतच. दिवसरात्र संधीत अंधार आहे म्हणणार का प्रकाश आहे म्हणणार? दोन्ही एकत्रच असतात. संतांच्या देहांतसुद्धा अत्यंत मलीन व अत्यंत पवित्र यांचा सहवास आहेच. 'अत्यंत मलिनो देहो देहीचात्यन्त निर्मलः' यांचे ऐक्य नसले तरी सहवास आहेच.

हिं.- दुख सुख पाप पुन्य दिन राती । साधु असाधु सुजाति कुजाती ॥५॥
दानव देव उँच अरु नीचू। अमिअ संजीवनु माहुर मीचू ॥६॥
माया ब्रह्म जीव जगदीसा । लच्छि अलच्छि रंक अवनीसा ॥७॥
कासी मग सुरसरि क्रनासा । मरु मारव महिदेव गवासा ॥८॥
सरग नरक अनुराग बिरागा । निगमागम गुन दोष बिभागा ॥९॥

म.- दु ख सुख पाप पुण्य दिन राती । साधु असाधु सुजाति कुजाती ॥५॥
दानव देव नि उच्च-नीचपण । विष पीयूष मरण संजीवन ॥६॥
माया ब्रह्म जीव जगदीश्वर । लक्ष्मि अलक्ष्मि रंक अवनीश्वर ॥७॥
काशि मगध सुरसरि क-विनाशी । मरु मालव महिदेव गवाशी ॥८॥
स्वर्ग नर्क अनुरक्ति विरक्ती । निगमागमिं गुण-दोष-विभक्ती ॥९॥

अर्थ - दुःख सुख, पाप पुण्य, दिवस रात्र, साधु दुर्जन, उत्तम जाती वाईट जाती, देव दानव, उच्चपणा नीचपणा, विष अमृत, मरण संजीवन (चांगले जीवन, किंवा जिवंत करणे), माया ब्रह्म, जीव जगदीश्वर, लक्ष्मी अलक्ष्मी, रंक व सम्राट, काशी व मगध देश, गंगा व कविनाशी नदी, मारवाड व माळवा देश, महीसुर (ब्राह्मण) व गोमांस खाणारे (गवाशी), स्वर्ग व नर्क, आसक्ति व वैराग्य इत्यादि प्रकारे वेद व शास्त्रे यांनी गुणदोषांची (गुणदोषांनुसार) विभागणी केली आहे ॥५-९॥
टीका – (१) चौ. ३ मध्ये विधि = ईश्वर, राम असा अर्थ केला आहे, तो घेतला म्हणजे चौपायात सहज उठणारी शंका घेण्यास जागाच राहत नाही.
शंका – माया, ब्रह्म व जगदीश्वर यांना ब्रह्मदेवाने निर्माण केले हे म्हणणे योग्य आहे काय? मागे सप्रमाण सिद्ध केले विधि = राम, परमेश्वर, हा अर्थ समजला तो ही शंका विचारणार नाही. पण तो अर्थ न लागल्याने काढलेल्या शंकेचे समाधान अमृताची तहान तांब्यांच्या दुकानांतील पीयूषाने (ताकाने) भागवावी त्याप्रमाणे करून समाधान मानावे लागते. (मा.पी.प.) त्यावर शंका घेतल्यास 'शेषं कोपेन पूरयेत्' ही नीति हात देतेच.

(२) विधि = राम = ब्रह्म अविनाशी सदा सर्वत्र समान व्याप्त आहेतच. तदंगभूत व तदभिन्न व भिन्न अशी जी माया तीहि तितकीच व्यापक आहे. तिचा प्रादुर्भाव रामापासूनच होतो. या दोघांच्या संबंधाने माया शबल ब्रह्म म्हणजेच जगदीश्वर झाला. त्याचे अंश ब्रह्माविष्णु महेश होत, याप्रमाणे राम=विधि हा अर्थ घेतला की सरळ निःसंदेह अर्थ लागतो. या अर्थास आधार मानसातलेच पूर्वी दिले आहेत. मानसात तसले आधार आणखी पुष्कळ आहेत, व मा.पी. मधील समाधानांचे खंडण करता येईल पण विस्तार करणे अनावश्यक आहे, जगदीश अंतर्यामी रूपाने सर्व जीयात आहेच.

'जगकारण तारणभव भंजन धरणीभार' रामचंद्र आहेत. (४/१/-)

या प्रकरणाचा उपसंहार 'कर्ता निर्मि जगास' असाच आहे. 'श्रुतिसेतुपालक राम तुम्हिं जगदीश माया जानकी'

'जगनिर्मि जी पाळी हरी करुणानिधी कल बघुन कीं' (२/१२६/छं.)

(३) ब्रह्मांशिवाय इतर सर्वांत गुण दोष मिश्रण कसे आहे हे पाहू = (१) सुख - संगाने बद्ध करते 'सुखसंगेन बध्नाति'असा सत्वगुण आहे आणि सत्वगुणानेच सुख होते. दुःखात ईश्वराचे स्मरण करण्याची इच्छा होते हा गुण (२) पापांत गुण हा की इंद्रियनिग्रह करण्याचे कष्ट नाहीत. पुण्यांत दोष अहंकारोत्पत्ति, दर्प व परनिंदेची शक्यता. (३) दिवसात दोष म्हणजे उन्हाचा ताप, पाय भाजणे इत्यादि अनेक. रात्रीत गुण म्हणजे बुद्धि व देह यांना विश्रांती मिळू शकते, चोरादिकांना सुखदायक, शांतता असते, उपाधि दूर राहतात, लेखन, भजन, ध्यान इत्यादि चांगले होते.

(४) साधूंचे दोष पूर्वीच दाखविले आहेत. दुसऱ्यांचे दुःख पाहिल्याने दुःख होतेच. दुर्जनांतील गुण पूर्वी दाखविले आहेत.

(५) सुजातीत दोष हा की आम्ही उच्च जातीचे हा अभिमान व कर्मांची जबाबदारी जास्त. कुजातीत गुण हा की आचारधर्माचे फार कष्ट नाहीत, अभिमानाला जागा कमी.

(६) दानवांचे ठिकाणी दान, शौर्य, धैर्य, तपस्या हे गुण आहेत. देवांच्या ठिकाणी इंद्रियनिग्रह नाहीं, स्वार्थपरायणता परमावधीची, आम्ही देव मोठे हा अभिमान!

(७) जीव 'ईश्वरअंश अविनाशी । चेतन अमल सहज सुखराशी ।'

असा असून मोहवश झाला, मायेने मलिन झाला व अनेक दोषांची दुःखांची शिकार बनला. जगदीश्वर-आपल्या भक्तांचा अपराध करणारांस वैरी समजतो. 'तदपि करिति सम विषम विहारा'

(८) लक्ष्मी - चंचल, मदाची जननी, अलक्ष्मींत गुण. 'शक्ति करोति संचारे शीतोष्णे मर्षयत्यपि । दीपयत्युदरे वन्हिं दारिद्यं परमौषधम्', 'लक्ष्मीमद मदान्धानां दारिद्य परमांजनं,' धनादि संरक्षणाची चिंता नाहीं.

(९) रंक - पापप्रवृत्ति दोष व चोरीचे भय नाही हा गुण. अवनीश्वर पृथ्वीच्या संरक्षणाची जबाबदारी, शत्रूचे भय, सत्तामद व राज्यान्ती नरक प्राप्तीची वेळ बहुधा यावयाची.

(१०) काशी - अवगुण हा की मोक्ष काही साधन न करता काशीत मेल्यानेच मिळतो, त्यामुळे तेथील जीवांना शास्त्र, ईश्वरभय, पापभय राहत नाही हा दोषच. मगध देशात गयाक्षेत्रात पिंडदान केले की पितरास मुक्ति देता येते हा गुण.

(११) गंगा - सर्व पाप हरण करणारी असल्याने तिच्याजवळ राहणारात पापप्रवृत्ति वाढण्याचा संभव. गंगेच्या काठच्या लोकांस पुष्कळ दिवसाचे शिळे पाणी प्यावे लागते. गंगाजलात फार सूक्ष्म रेती असते त्यामुळे ताजे पाणी रोगोत्पादक ठरते, मुतखडा, पित्तखडा वगैरे रोग त्या भागात जास्त होतात. कविनाशा- कर्मनाशा नदी. गंगेत स्नान केल्याने पाप विनाश करून घेतल्यावर हिच्यात स्नान केले की संचित पुण्याचा सुद्धा क्षय होईल व पाप पुण्य शून्य झाल्याने मोक्ष मिळविणे सोपे होईल! पुण्य राहिल्याने स्वर्गात जावे लागते. भोगलालसा, स्वार्थ इ. वाढतात ते सर्व वाचेल हा फायदाच आहे.

(१२) मारवाडांत जलाचे दुर्भिक्ष व उन्हाळा थंडी फार, पण दूध, तूप भरपूर, हवा पाणी आरोग्यवर्धक, हा गुण का याचे उत्तर सुं. कां. ६०/५-६ टी. प. माळवा फार सुपीक प्रदेश पण रोगराई फार हा दोष, कष्टाळूपणा कमी हा दोषच.

(१३) महिदेव- जीवित कष्टांत व तपश्चर्येत घालवावे लागते, देहसौख्याची आशा नाही हा एका प्रकारे अवगुणच. 'ब्राह्मणस्य हृदयंनवनीतं' हा गुण पण 'वाचिक्षरो निहितस्तीक्ष्णधारः' हा दोष. 'पौरोहित्यं विगर्हितं' करावे लागते (काहींना) हा दोषच. प्रतापभानुराजाचा विनाश हा ब्राह्मणांच्या अविचारी क्रोधाचाच परिणाम. श्रेष्ठतेचा अभिमान हाहि दोष बहुधा असतोच. गवाशी- कसाई, क्रूरता हा मोठा दुर्गुण खराच पण याचाही पुष्कळ वेळा राजेलोक सदुपयोग करून घेऊ शकतात.

(१४) स्वर्गात नवीन पुण्य करता येत नाही व असलेले भोगून संपते म्हणजे दिवाळेच वाजते म्हणावयाचे! 'स्वर्गही अल्प, अंति दुखदाई' मोक्षाचें-भक्तीचे साधन करता येत नाही. नर्कात गुण हा की पापांचे क्षालन होते.

(१५) आसक्ति-अनुरक्तीमध्ये मोठा गुण हा की ईश्वरचरणी लावली की कृतकृत्यता. वैराग्यात दोष हा की विरक्त पुरुषाच्या आप्तसंबंधी माणसांस काही काळ तरी दुःख चिंता! पार्वतीच्या आईने नारदाविषयी म्हटले आहे ते पाहावे, आपले मुलगे विरागी बनून निघून गेले म्हणजे ते मातापितरांस दुःखद होतातच. पुराणांत पुष्कळ उदाहरणें आहेत. मुनिवेषांत वनवासी सीतेला पाहिल्यावर सर्वांस दुःख झालेच. ज्यांचे गुण वा दोष प्रसिद्ध आहेत ते वर सांगितले नाहीत.

(१६) उच्चता- जबाबदारी मोठी, पतनाचे भय फार, द्वेष मत्सरांस प्रोत्साहक. हे अवगुण, नीचता- वरील भय नाही हा गुण, पण अपमानाला भ्यावे लागत नाही.

(१७) विष- योग्य प्रमाणात योग्य अनुपानात दिल्याने रोगहरण करते हा गुण, अमृत- मरणाने संपलेले वैर पुन्हा सुरू करण्यास मदत करते. मरणाची भीति न राहिल्याने अहंकार, उद्दामपणा वगैरे वाढतात.

(१८) मरण- रोग दुःख, जरा दुःख, वियोग दुःख, वार्धक्य दुःख, शोक इत्यादिंचा अंत करते व वैराचा अंत होतो हे गुण आहेत. संजीवन, हिंदीत सुजीवन आणि सँजीवन हे दोन पाठ जुन्या पोथ्यांत आहेत. अमृताचा धर्म संजीवन व विषाचा धर्म- परिणाम मरण असल्याने संजीवन-सँजीवन हा पाठ मूळचा असला पाहिजे. 'अमिअ अमरपद माहुर मीचू.' अमृताने अमरपद मिळते व विषाने मृत्यु- मरण येते. (२/२९८/६) असा संबंध मानसातच दाखविलेला आहे. म्हणून सँजीवन पाठ घेणे योग्य असंता सुजीवनचा अर्थ अमरपद घेतात! 'संजीवन' पाठाने सम्यक् जीवन व अमरत्व हे दोन्ही अर्थ साधले आहेत.

वि. सू. :- 'गणुनि दोष गुण वेदिं निवडिले' व 'श्रुति इतिहास पुराणि निवेदित' असा उपक्रम केला व येथे 'निगमागमिं गुण दोष विभक्ती' असा उपसंहार केला. गुणदोषमिश्रित कसे आहे हे मध्ये सांगितले. उपक्रमांतील वेद शब्दांची व्याप्ति 'निगमागमं' शब्दांनी दाखविली. म्हणूनच पूर्वी 'वेदशास्त्रादि' असा अर्थ केला.

पाठ चर्चा - कविनाशी = कर्मनाशा (क्रमनाशा, कर्मनाशा व कविनाशा पा. भे.) काही पोथ्यात क्रमनासा = कर्मनाशा असा पाठ आहे. यमकाच्या दृष्टीने दोन्ही पाठांची किंमत सारखीच, तथापि कर्मनाशा शब्दाने सुचविली जाणारी अतिव्याप्ति क-विनाशा शब्दाने तुलसीदासांनी काढून टाकली असावी. जुन्यात जुन्या पोथींत हरताळ लावून 'क्रमनासा' लिहिलेले आहे (मा.पी.पा.) कर्मनाशा शब्दाचा अर्थ पापपुण्यात्मक सर्व कर्मांचा नाश करणारी असा होतो; पण हा अतिव्याप्त आहे. खरा अर्थ पुण्यकर्मांचा नाश करणारी असा आहे व तोच क-विनाशा शब्दाने सुचविला जातो. क-सुख, त्याचा नाश करणारी. पुण्याचा नाश झाला तरच सुखाचा नाश होणार. सुख पुण्यकर्मांचे फळ असते. अतिव्याप्ति दूर करण्याची सावधगिरी पुढे अनेक ठिकाणी दिसते. १६/५ पाहा. हा योग्य पाठ (मा.पि.) मिळाल्यामुळे येथे घेतला.

क-विनाशा कर्मनाशा नदी :- ही उत्तर हिंदुस्थानांत शहाबाद जिल्ह्यात कैमोर पर्वतावर उगम पावून चौसा गावाजवळ गंगेला मिळते. त्रिशंकुला जेव्हा स्वर्गातून ढकलून दिले, आणि पृथ्वीवरही येता येईना तेव्हा त्यास अतिशय दुःख झाले. त्यावेळी त्याच्या अंगाचा घाम व तोंडातून जी लाळ गळली त्यापासून हिचा जन्म झाला. त्रिशंकु उभय भ्रष्ट झालेला, गुरुपुत्रांनी शापित व चांडाळ झाल्यामुळे ते जल व लाळ अति अपवित्र ठरली, म्हणून त्या नदीत स्नान करणाऱ्यांचे पुण्य, सुखाचे मूळच नष्ट होते. (मा.पी.)

हिं.- जड चेतन गुन दोषमय बिस्व कीन्ह करतार ।
संत हंस गुन गहहिं पय परिहरि बारि बिकार ॥६॥

म.- जड चेतन गुणदोषमय कर्ता निर्मि जगास ।
संत हंस गुण घेति पय त्यजुनि जला दोषास ॥६॥

अर्थ -- कर्त्याने हे जग जड व चैतन्य आणि गुण व दोष यांनी अगदी मिश्रित (असे) निर्माण केले आहे. संत हंसासारखे असल्याने गुणरूपी दूध घेतात व विकार (दोष) रूपी जलाचा त्याग करतात. (घेत नाहीत). ॥६॥

टीका -- (१) विधि- प्रपंच गुणदोषमय कसा आहे हे व्यावहारिक दृष्टांतांनी स्पष्ट केले. पाणी व दूध एकत्रित केलेले असावे तसे गुण व दोष एकत्र मिसळून जी वस्तु तयार झाली ते हे जग. पण त्यात जड व चेतन यांची व्याप्ति आहेच. वृक्षलतादिकांत चैतन्य आहे म्हणूनच झाड मेले असे म्हणतात. आधुनिक विज्ञान शास्त्राने हे सप्रयोग सिद्ध केले आहे.

(क) दगड मेला, सुकला असे कोणी म्हणत नाही. याचे कारण त्यातील चैतन्य प्राणांच्या अभावी क्रियाशील नाही. बंद ठेवलेल्या गिरणीतील चैतन्यासारखे किंवा बटण दाबून निरुद्ध केलेल्या विजेच्या दिव्याच्या प्रकाशासारखे, पाषाणादिकातील व मंत्रांतील चैतन्य निरुद्ध असते. मीरा, कान्हुपात्रा, तुलसीदास, समर्थ, एकनाथ, ज्ञानेश्वर यांच्यासारखे महातज्ज्ञ (इंजीनिअर) भेटले तर ते प्रगट होते. योग्य गुरू भेटला तर मंत्र चेतन होतो. मृतसंजीवनी मंत्र फक्त शुक्राचार्यांनाच चेतन होता. या लेखकास व इतर अनेकांस तो माहीत आहे, पण जड असल्याने निष्क्रिय आहे.

ल. ठे. जडांत चैतन्य १/३२, स्थावरांत १/१६, कीट-पतंगादि जंगमात १/४, पशुपक्षी इत्यादीत ३/८, मनुष्यांत १/२, देवतांत ५/८, पर्यंत असते. अष्टमहासिद्धिमंतांत १०-१२/१६ पर्यंत. १२ पासून पुढे विविध अवतारात असते, श्रीराम व श्रीकृष्ण हे परिपूर्णावतार असल्याने त्यांच्यात जडाचा अंश- मायेचा अंश मुळीच नाही. ते १६ कलांचे पूर्णावतार-महायोगविज्ञान (पृ.११-१२).

'चिदानंदमय अपली काया विगत विकार -' (२/१२७/५) श्रीराम व श्रीकृष्ण हा लेख प्रस्तावनेत पाहावा. साधार सिद्ध केले आहे पूर्णत्व.

(२) कर्ता - करणारा (करतार) विधि, विरंचि, इत्यादि म्हटले नाही.

'जगकारण तारण भव भंजन धरणीभार' (४/१)

असे श्रीरामाविषयींच म्हटले आहे. भ. गी. ९ मध्ये.

'मया ततमिदं सर्व जगदव्यक्त मूर्तिना'

असे भगवंतानीच म्हटले आहे. विधि असे उपक्रमात म्हटले तेथे विधि=राम हे सिद्ध केले आहे.

'तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्ये यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी' (भ.गी)

इत्यादि शतशः वचने परमात्म्यासच जगाचा कर्ता वर्णितात. म्हणून येथे कर्ता-राम, भगवान, परमात्मा - आदिकारण, 'अशेष कारणपरं' (१मं. श्लो. ६)

(३) संत हंस - दोषास, दुधाचे व पाण्याचे मिश्रण असेल तर त्याचे सहज पृथक्करण करून पाणी ग्रहण न करता दूधच घेण्याची सहज शक्ति हंसाच्या ठिकाणी असते. तसे संत दोषरूपी पाणी न घेता फक्त सद्‌गुणरूपी दूधच घेतात. यालाच नीरक्षीरविवेक म्हणतात. **'क्षीरनीर-विवरणगति-हंसी'** (२/३१४/८)

(क) **'भरत हंस रविवंश-तडागां। जन्मुनि कृत गुण-दोष विभागां।**

**पय गुण घे त्यजि अवगुण वारी ।।'** (२/२३२/६-७)

**'सुगुण दूध अवगुण जल ताता। मिळवुनि रची प्रपंच विधाता'** (२/२३२/५) परिणाम हा झाला की **'स्वयशें कृत जग भास्वर भारी'** (२/२३२/७). यांनी हे सूचविले की सद्‌गुणांचे ग्रहण करून अवगुणांचा, दोषांचा त्याग करणारे म्हणजेच संत व अशांना निर्मल यश, कीर्ति मिळते.

**संतपणा प्राप्त करण्याचे हे मुख्य- पहिले साधन आहे.** उपदेश - कोणी कितीहि मोठा, श्रेष्ठ, सद्‌गुणी झाला तरि त्याने असे समजू नये की मी निर्दोष आहे. कोणी किती दुर्गुणी असला तरी त्यांच्यांत सुद्धा काही सद्‌गुण असतातच. दोष न घेता सद्‌गुणच घेणे केव्हा शक्य होते हे पुढील चौपाईत सांगतात.

हिं.- **अस बिबेक जब देइ बिधाता । तब तजि दोष गुनहिं मनु राता ॥१॥**
**काल सुभाउ करम बरिआईं । भलेउ प्रकृति बस चुकइ भलाई ॥२॥**
**सो सुधारि हरिजन जिमि लेहीं । दलि दुख दोष बिमल जसु देहीं ॥३॥**
**खलउ करहिं भल पाइ सुसंगू । मिटइ न मलिन सुभाउ अभंगू ॥४॥**

म.- **देइ विधाता विवेक हा जैं । गुणिं हि रमे मन त्यजि दोषां तैं ॥१॥**
**काल कर्म नी स्वभाव दडपणि । भले प्रकृतिवश चुकति भलेपणिं ॥२॥**
**ती घे हरिजन-चूक सुधारुनि । देइ सुयश दुख दोष निवारुनि ॥३॥**
**करिती खलहि भलें सत्संगें । तरी स्वभाव मलिन ना भंगे ॥४॥**

**अर्थ** - हा (क्षीरनीर विवेक) विवेक विधाता जेव्हा देतो तेव्हा दोषांस सोडून मन गुणांतच रमते ॥१॥ काळ, कर्म व स्वभाव यांच्या दडपणाने (बरिआई-बलात्काराने) प्रकृतीला वश होऊन भले (संत) सुद्धा आपल्या भलेपणात चुकतात. ॥२॥ ती सेवकाची (जन) चूक हरि सुधारून घेतात व दुःखदायक दोषांचा नाश करून सुयश (विमल यश) देतात. ॥३॥ सुसंग प्राप्त झाला तर खल सुद्धा भले (सत्कर्म) करतात, परंतु त्यांचा मलीन स्वभाव जात नाही कारण तो अभंग असतो ॥४॥

**टीका — चौ. १** - (१) या प्रकरणात प्रथम विधि व मग कर्ता म्हटले व येथे विधाता म्हटले, विधाता = राम असाच अर्थ घेतला पाहिजे. कारण पुढे हरि शब्द यांच्याबद्दलच वापरला आहे. 'प्रभो! विधातः! सदनुग्रहाय' (भाग १०/१४/२०)

यात ब्रह्मदेवानेच भगवान गोपालकृष्णास विधाता म्हटले आहे. हा अर्थ पुढील विवरणात आणखी स्पष्ट होईल.

(क) विधात्याच्या कृपेनेच हा नीरक्षीरविवेक (गुणग्रहण दोषत्याग) मिळतो असे येथे सांगितले. **'बिण सत्संग विवेक न होतो'** (१/३/७) असे म्हटले आहे ते कसे? 'रामकृपेविण सुलभ न हो! तो' हे या शंकेचे उत्तर त्याच चौपाईत आहे. रामकृपेशिवाय सत्संग नाही व सत्संगाशिवाय विवेक नाही, म्हणून येथे म्हटले की रामच असा विवेक देतात, ब्रह्मदेवाच्या कृपेने सत्संगलाभ होतो असे मानसात कुठेच म्हटले नाही. उलट, रामकृपेनेच संत भेटतात हा सिद्धांत अनेक ठिकाणी सांगितला आहे.

**'तो (सत्संग) न मिळे हरिकृपेविण गाती वेद पुराण'** (७/१२५ म)

**'भेटति संत विशुद्ध तयाला । रामकृपे अवलोकिति ज्याला ॥'** (७/६९/७)

आणखी पुष्कळ आहेत.

**संगति** - रामकृपेने सत्संग मिळून विवेकसंपन्न झालेले सुद्धा क्वचित चुकतात. येथे गुणग्रहण दोष त्याग या विवेकाची चर्चा चालू आहे.

**चौ.** (२) **'कालकर्म - भलेपणि'** माया - प्रकृति- सगळ्यांच्या पाठीस लागलेली आहे. विवेकाच्या बळावर कोणी कोणी तिच्यातून सुटलेले दिसले तरी ती व तिचे सेनापति कामादि आणि 'भट दंभ कपट पाखंड' (२/७१रा) हे रिपु संधि शोधितच असतात. 'कामकोप हे रिपु उभयांना' (३/४३/९). काळाच्या, कर्माच्या व स्वभावाच्या जोराने एखादेवेळी या रिपूंना प्रवेश करण्यास सुसंधि मिळते. 'कालोऽहि दुरतिक्रमः' सती, नारद, गरुड इत्यादि मोठमोठे चुकलेत. 'देवा प्रबला अति तव माया' (४/२१/२) सुग्रीव वचन आहे. सुग्रीव रामकार्य विसरून विषयरत झाला याला कारण काल-कर्मादिकच.

(क) काळाच्या प्रेरणेने अनुकूल प्रतिकूलतेप्रमाणे कर्म घडते. नारदाला अहंकार उत्पन्न होण्याचे कारण काळाशिवाय दुसरे कोणते? भगवंताला व शिवगणांना शाप देऊन राम-रावणावताराची तयारी - त्यानेच करविली.

(ख) कैकयीची बुद्धि फिरविण्यास तिचे बालपणचे कर्म व स्त्रीस्वभाव यामुळे काळाच्या प्रेरणेने देवमाया समर्थ झाली.

(ग) भवानी सतीची चूक तिचा स्त्रीस्वभाव, काळ व माया यांनी घडविली त्यामुळे काळ हा आदी व माया ही अंती निमित्त होऊन कर्म किंवा स्वभाव वा उभय यांच्या बळाने चूक घडवितात.

(घ) प्रतापभानूची चूक कर्म व स्वभाव यांच्या जोरावर काळ व माया (अविद्या) यांनी घडविली; पण तो परमभगवद्भक्त नव्हता म्हणून सुधारली गेली नाही. सती, नारद व गरुड यांची चूक सुधारली गेली ती कशी हे पुढील चौपाईत सांगतात.

चौ. (३) स. टे. – या हिंदी चौपाईत असलेल्या 'जिमि' या शब्दाने 'हरिजन, या पदांचा संबंध मागील किंवा पुढील चौपाईशी नीट जुळत नाही हे टीकाकारांना मान्य आहे. (जिमि - जसा, जसे, जशी) त्यामुळे हरिजन हा पाठ काही जुन्या पोथ्यात सापडतो तो काहींनी घेतला आहे; परंतु त्यानेही समाधानकारक अर्थ लागत नाहीच.

(मा.पी.पा.) दोन्ही पाठांचा संग्रह जिमि गाळून व हरिजन शिल्लक ठेऊन या अनुवादात केला आहे. 'हरि' असा अर्थ करणे असेल तर जन चूक = सेवकाची चूक- भक्ताची चूक असा अर्थ होईल. 'हरिजन' असा एक शब्द घेतल्यास ती चूक असा अन्वय होईल. या मंद मतीस 'हरि' पाठच योग्य वाटतो. कारण विवेक देणारा जसा हरि-राम तसाच ती चूक सुधारून दुःख दोष दलन करून सुयश देणारा किंवा देवविणारा रामच. हे कार्य तो कित्येक वेळा स्वतः करील, जसा काकभुशुंडीचा मोह व चूक स्वतःच सुधारली. कौसल्येची चूक स्वतःच सुधारली विश्वरूप दाखवून, नारदाची चूक म्हणजे शंकर वचनाचा तिरस्कार केला ही, स्वतःच सगळे माया नाटक रचून शेवटी सांगितले की.

'जपा जाउनी शिवशतनामा । शीघ्रहृदयीं पावां विश्रामा' (१/१३८/५) गरुडाची चूक नारद-ब्रह्मदेव, शिव व काकभुशुंडींच्या कडून. सतीची - आधी स्वतः विश्वरूप दाखवून, नंतर तिची प्रार्थना (१/५९/६/७- दो.) ऐकून तिची इच्छा पूर्ण करविली. नारदाकडून तपश्चर्येस पाठविली, स्वतः आकाशवाणीने वर दिला, व स्वतः शिवास भेटून गळ घालून विवाह करविला व शेवटी परमोत्तम रामभक्त शंकरांकडूनच तिचा मोह घालविला. चूक होणे म्हणजे स्वभावविरुद्ध कर्म घडणे असा अर्थ येथे आहे.

(१) ती जनचूक हरि सुधारुनि घे' – सुधारून घेणे म्हणजे लक्ष न देणे.

'प्रभु-मनिं राहि न चूक कृतीची । स्मरती शतदां स्थिती हृदींची' (१/२९/५)

'भेटत भरता त्यां गौरविलें । रघुवीरे नृपसदसि वर्णिले (सुग्रीव व बिभीषण आणि वानरें) (१/२९/८).

'प्रभु जन-अवगुण मनी न आणति' (७/१/६)

'सर्व सुधारिल तो मम दोषू करत कृपा तत्कृपे न तोषू' (१/२८/३).

या सर्व उदाहरणांत दोष सुधारणारे रामच वर्णिले आहेत, आणि हरिजन = साधु दोष सुधारून घेऊन विमल यश देतात अशा अर्थाची वचने मानसात नाहीत.

उपदेश - (१) मागल्या व या चौपाईत उपदेश मिळतो की काळ, कर्म, स्वभाव व माया (प्रकृति) यांना जिंकले असे कोणी मानू नये.

'स्वभावजेन कौन्तेय निबद्धः स्वेन कर्मणा। कर्तुं नेच्छसि यन्मोहात्करिष्यस्यवशोऽपितत्) (भ.गी.)

या श्लोकाचाच विस्तार या चौपायांत नाही काय?

(२) जे रामसेवक असतील त्यांनी इतर कोणाची आशा करू नये म्हणजे कालकर्मस्वभाव माया यांपासून ते सोडवितील. ज्ञानानंतर सुद्धा भक्तीची आवश्यकता सुचविली. अरण्य काण्ड दो ४३, चौपाया पाहाव्या.

चौ. ४. (१) सत्संग लाभल्यास खल सुद्धा आपल्या स्वभावास न शोभणारे असे सत्कर्म करतील. परोपकारादि करणे त्यांच्या स्वभावाच्या विरुद्ध आहे. त्यांनी संत संगतीच्या प्रभावाने चुकून सत्कर्म केले तरि त्यांचा स्वभाव बदलला असे नाही. कारण की ते स्वभावानेच मलिन असतात व स्वभाव अभंग असतो, 'स्वभावो दुरतिक्रमः'

(क) संतांचा स्वभाव जसा बदलत नाही, व चुकून स्वभावविरुद्ध घडले तरि ती चूक सुधारली जाते व पुन्हा घडत नाही. तसेच खलांच्या स्वभावाचे. कुत्र्याला राजा केला तरि तो पादत्राणें खाणारच.

(ख) कुंभकर्णाला नारदाने उपदेश केला, रामावतार रहस्य सांगितले तरी तो रेडे आणि मदिराप्रिय राहिलाच व भगवत्प्रेम हृदयात असून भगवंताशी युद्ध केले, हजारो वानरे गिळली, मारीचाला सर्वत्र रामरूप दिसत असून व रामभक्तिमय हृदय असून सीताहरणाला मदत केलीच. रामहस्ते मरण्यासाठी 'हा लक्ष्मणा!' वगैरे रामाच्या आवाजाने ओरडण्याची जरूर नव्हती! स्वभाव बलवान ठरला.

शंका - सुधारती शठ सुसंग पावुनि । लोहिं हेमत्व परीस लागुनि (१/३/९) असे पूर्वी म्हटले व येथे 'स्वभाव मलिन ना भंगे' म्हटले या दोन वचनात विरोध का?

समाधान - (क) कोणी शठ व खल हा शब्दभेद दाखवून सुटका करून घेतात.

(ख) कोणी कमी खल व अस्सल खल असा भेद मानून पळवाट काढतात.

(ग) पण हे दोन्ही प्रकार यथार्थ नाहीत. चौ ३/९ च्या टीकेत या विषयी बरेच लिहिले आहेच. ते प्रथम पाहावे.

'मज्जन फल तत्काळ पाहावे । बकें हंस, पिक काके व्हावे' (३/१) यातील मज्जन फल हे शब्द विसरल्याने अशा शंका येतात; म्हणून या चौपाईची टीकासुद्धा पुन्हा पाहावी. हरिहर कथा त्रिवेणीत, अति अनुराग रूपी जलांत बुड्या मारणे हे खलांस तितके अशक्य आहे, जितके या जगात लोखंडाने परीसाला स्पर्श करणे. लोहपरीसांची संगति आज कवि कल्पनाच आहे! नियम ७/४ या चालू चौपाईत सांगितला. ३/१/३/९ यात अपवाद सुचविले आहेत. काकभुशुंडी हा अपवाद आहे. या प्रमाणे ठरले की विरोधाला जागाच नाही व शंकेला स्थान नाही; व शब्दांची कसरत करून पळवाट काढणे आवश्यक नाही. कावळ्याने मानससरोवरात बुडी मारली तर तो हंस होईल हे खरे पण तो जातोच कशाला तेथे? माणसाला स्वर्गातले अमृत पिण्यास मिळाले तर तो येथेच अमर होईल पण हे कोणीतरी पाहिले आहे काय घडताना?

संगति - पुढील तीन चौपायांत साधुवेषाविषयी सांगतात, व त्यात खल स्वभावाचे वर्णन आहेच.

हिं.- लखि सुबेष जग बंचक जेऊ । बेष प्रताप पूजिअहिं तेऊ ॥५॥
उघरहिं अंत न होइ निबाहू । कालनेमि जिमि रावन राहू ॥६॥
किएहुँ कुबेष साधु सनमानू । जिमि जग जामवंत हनुमानू ॥७॥
म.- बघुनि सुवेषहि जग-वंचक जे । वेष बलें पुजिले हि जाति ते ॥५॥
बेंड फुटे अंति न निर्वाहू । कालनेमि रावण इव राहू ॥६॥
सन्मानहि कृत-कुवेष संतां । जगिं सम जांबवता हनुमंता ॥७॥

अर्थ – जगाला ठकविणारे जे (भोंदू साधुवेषात) असतात त्यांचा साधुवेष (सुवेष) दिसल्यानेच (पाहून लखि) वेषाच्या बळावर - प्रतापाने तेसुद्धा पूजले जातात. (मान-सन्मान पूजा केली जाते). ॥५॥ पण त्याचे दंभ (बेंड) शेवटी केव्हा तरि बाहेर पडतेच, ते निभावू शकत नाही यास उदाहरणे कालनेमि रावण आणि राहू यांची आहेतच. ॥६॥ (याच्या उलट) कुवेष केलेल्या संतांना सुद्धा मान मिळतो जसा जांबवान आणि हनुमान यास मिळाला (व मिळत आहे). ॥७॥

टीका – ल. ठे. - या तीन ओळीत सिद्धान्त दाखविला की संतपणा व संतवेष यांचा काहीहि कार्य कारण संबंध नाही. साधुत्व वेषावर अवलंबून नसते. साधुत्व असेल तेथे साधुवेष असेलच असे नाही व साधुवेष असतो तेथे साधुत्व असतेच असे नाही.

(१) जगवंचक - जगाला फसविणारे, जगातील लोकांची वंचना करणारे. जगवंचक याचा अर्थ मानसात जगातील वंचक असा होऊ शकतो हे खरे, जग हे सप्तमीचे रूप घेता येईल, पण तो अर्थ घेण्यात स्वारस्य नाही, कारण वंचक या जगातच असणार! पण –

(क) जगवंचक ने सुचविले जाते की सर्वांनाच ठकविण्यासाठी साधुवेष धारण करतात, ते जगवंचक. साधूंची पूजा मान सम्मान इत्यादि करण्याकडे जी लोकांची प्रवृत्ती असते तिचा गैरफायदा हे घेतात.

(ख) यांचा निर्देश साधूंच्या पूर्वी करून सुचविले की यांना प्रसिध्दीस येण्यास वेळ लागत नाही.

(ग) संतांना प्रसिद्धीस येण्यास फार वेळ लागतो, कारण ते स्वतः प्रसिद्धी पराङ्मुख असतात; व त्यामुळे त्यांची माहिती होण्यास व लोकांचा विश्वास बसण्यास फार वेळ लागतो.

(घ) वंचकांचे साधुत्व सकाळच्या छायेसारखे असते तशीच त्यांची प्रसिद्धी. संतांची प्रसिद्धी मध्यान्हानंतरच्या छायेसारखी असते 'वंचकवेषें जगा ठकविती' (२)१६८/७) यानेही जगातील वंचक हा अर्थ त्याज्य ठरतो. ('साधु व भोंदू' ही कविता,

हस्तलिखित, पहावी म्हणजे वेष कोणता व कसे फसवितात याची कल्पना येईल).

**चौ. ६ - (१) बेंडफुटे - निर्बाहू** - बेंड-फुटणे म्हणजे दंभ कपट बाहेर चव्हाट्यावर येणे.

(क) कालनेमि कथा पुढे लंका-कां. ५६/२ पासून ५८/६ पर्यंत आहे. कपटमुनि बनून हनुमंताला सुद्धा ठकवू पाहात होता, पण शेवटी मर्म कळले व

'शिरिं लांगूल लपेटुनि अपटी । प्रगटी निज तनु मरतां कपटी' (६/५८/५)

(ख) रावण संन्यासी बनला व सीतेला वश करण्याचा प्रयत्न करू लागला, पण तो फसला, शेवटी प्रगट व्हावे लागले व 'रावण' हे आपले नाव सांगण्याची पाळी आली.

(ग) राहूने देवरूप घेतले पण चंद्रसूर्यांनी तत्काल ओळखला व त्याचा डाव फसला.

ल. ठे. दांभिकांच्या कपटास जास्त फसणारे म्हणजे लोभी, सकाम, आयतोबा लोक. धर्माचरण, व्रत, तपस्या इत्यादि श्रम न करता नुसत्या पैशांवर आपल्या कामना सिद्धीस जाव्या असे वाटणारे लोक जास्त फसतात. निष्काम, कष्टाळू, तपस्याप्रिय साधक फार करून फसत नाही व क्वचित फसला तरी नगण्यच.

(२) साधूंच्या संगतीने ज्यांच्याकडून चुकून एखादे सत्कर्म होते असे लोकच असे जगवंचक बनतात, कारण त्यास साधूंच्या राहणीची व लोकस्वभावाची चांगली माहिती झालेली असते.

(क) पुष्कळ वेळा खरे परमार्थ साधकच पथ्य पालन न केल्याने व 'जनकृपानैष्ठुर्य मुत्सृज्यताम्' (सा.पं) या श्रीमदाचार्याज्ञेचा भंग करू लागल्याने पुढे पुढे जगवंचक बनतात.

**चौ. ७ (१) सन्मानहि कृतकुवेष संता** - काही संत आपला संतपणा लपवून ठेवण्यासाठी साधुवेष धारण करित नाहीत. साधुत्व प्रगट होणे दुष्कर होईल अशा प्रकारचा वाईट वेष करतात, तथापि असे सुद्धा त्यांच्या सहज साधुतेने प्रसिद्धीस येतात. भगवान त्यांचे साधुत्व प्रगट करतात. कस्तुरी लपवून ठेवली तरि केव्हातरी सुगंध दरवळतोच. प्रतिष्ठा व उपाधि पाठीस लागू नये म्हणून काही संत अशा किंवा बाल, उन्मत्त, पिशाच वृत्तीने राहतात.

**'लोकमान्यता अनलसम जाळी तपविपिनास'** (१/१६१/-)

**'ते स्वरूप निज सतत लपविती । वसुनि कुवेषीं कुशल पावती'** (१/१६१/२).

**संगति** - कुसंगति व सुसंगति यांची तुलना दृष्टान्तासह आता करतात.

हिं. **हानि कुसंग सुसंगति लाहू । लोकहूँ बेद बिदित सब काहू ॥८॥**
**गगन चढइ रज पवन प्रसंगा । कीचहि मिलइ नीच जल संगा ॥९॥**
**साधु असाधु सदन सुक सारी । सुमिरहिं राम देहिं गनि गारीं ॥१०॥**
**धूम कुसंगति कारिख होइ । लिखिअ पुरान मंजु मसि सोई ॥११॥**
**सोइ जल अनल अनिल संघाता । होइ जलद जग जीवन दाता ॥१२॥**

म.- हानि कुसंगी लाभ सुसंगमि । लोकीं सकल विदित निगमागमिं ॥८॥
चढे पवनसंगति रज गगनीं । होइ चिखल नीचग-जल-मिलनीं ॥९॥
सज्जन-खल-गृहिं शु क सालुंक्या । राम वदति मुखिं शिव्या शेलक्या ॥१०॥
धूम कालिमा कुसंगिं बनतो । लिहिति पुराण शाइ जैं शुभ तो ॥११॥
तो जल-अनल-अनिल-संघातां । होइ जलद जग-जीवन -दाता ॥१२॥

अर्थ - कुसंगतीने हानि आणि सुसंगतीने लाभ होतो हे सर्व लोकांत व वेदपुराणात प्रसिद्ध आहे. ॥८॥ पवनाच्या संगतीने धूळ आकाशात चढते पण तीच नीचगामी पाण्यात पडली तर चिखल बनते.॥९॥ साधूंच्या व दुर्जनांच्या घरातील पोपट आणि सालुंक्या तोंडाने राम नामाचा उच्चार करतात व शेलक्या शिव्या देतात ॥१०॥ कुसंगतीने धूर घरोसा (कालिमा) बनतो, परंतु त्याची चांगली शाई झाली म्हणजे (त्यानेच) पुराण (शास्त्रे इत्यादि) लिहितात. ॥११॥ तोच धूर जल, अग्नि व वायूच्या संगतीत आला कि जगाला जीवन देणारा जलद (मेघ) बनतो ॥१२॥

**टीका — चौ - ८ (१) हानि कुसंगीं लाभ सुसंगमिं -**

**'कोण न नासे मिळुनि कुसंगति । नाहिं चतुरता उरत नीच मतिं'** (२/२४/८) मंथरेच्या कुसंगतीने कैकयीची केवढी हानि झाली - जन्मभर किती दुःख व पश्चात्ताप झाला!

(क) लाभ सुसंगति, सुसंगम - सुसंगति, **'कोण सुसंगिं न मोठा झाला।'** (१/१०/८) या दोन्ही गोष्टी सर्व लोकांना चांगल्या माहीत आहेत आणि वेदशास्त्र पुराणात पुष्कळ वर्णन आहे तरी लोकांना सत्संगतीची आवड कमी व संत थोडे. असंतच त्या मानाने पुष्कळ, म्हणून कुसंगाचा उल्लेख प्रथम केला आहे.

**'साधवो नहि सर्वत्र चन्दनं न वने वने)** (सु.२.)

**'ज्ञान जाइ उपजे जसे मिळत कुसंग सुसंग'** (४/१५/-)

यात सुद्धा कुसंगाला आसन आधी!

**चौ. ९ (१) 'चढे पवन संगति रज गगनी** - (क) रज-धूळ-जड असते, आकाशात वर उंच जाणे अशक्य असते, येणाऱ्या जाणाऱ्यांच्या-पशूंच्या सुद्धा लाथा सहन कराव्या लागतात. थुंकणे वगैरे प्रकारांनी अनादर अपमान केला जातो. अशा धुळीला, पावन करणाऱ्याची - वायूची - संगति लाभली म्हणजे तिला उर्ध्वगति मिळते व ती आकाशात चढते. खाली आलीच तर राजांच्या मुकुटांवर व देवांच्या मस्तकावर सुद्धा बसू शकते हा सुसंगतीचा परिणाम आहे. वाटमाऱ्या असलेला सुसंगतीने राजाधिराजवंद्य व सर्वदेवपूज्य झाला. नमन करताना राजांचे मुकुट पायांना स्पर्श करू लागले!

(क) त्याच धुळीला नीचगामी (नीचग, मुळात नीच) खाली खाली जाणाऱ्या पाण्याची संगति मिळाली म्हणजे तीच धूळ चिखल होते व पुन्हा वाऱ्याच्या संसर्गाने

उच्च गति मिळणे अशक्य होते. हा कुसंगतीचा परिणाम. शूर्पणखेसारख्या दुष्ट शीलभ्रष्ट स्त्रीची संगति झाल्याने, रावण महापापी बनला व सर्व राक्षसांचा संहार झाला व कल्प कल्प अपकीर्ति मागे राहिली.

(ख) जलाला नीच कसे म्हटले अशी शंका मानसातील वचनाने येते, म्हणून त्या शब्दाचा अर्थ अनुवादात 'नीचग' या पदाने स्पष्ट केला. नदीला 'निम्नगा' खाली खाली जाणारी - घसरणारी - असे नावच आहे. धबधब्याला 'प्रपात' म्हणतात. पूर्ण सद्गुणी पदार्थ जगात नाही. आता चेतन प्राणिसृष्टीतील अंडजांचा दृष्टान्त देतात.

चौ. १० (१) सज्जनांच्या घरातील पोपट (शुक) व साळुंक्या (सारिका - सारी) राम वगैरे देवाचे नाव घेतात. मुखाने, या बसा, बरं आहे का? जेवायचं आहे ना? पाणी प्या! अशी सज्जनांची भाषा बोलतात; हा केवळ सुसंगतीचा परिणाम असतो.

(क) साधूंच्या संगतीतील पशुपक्ष्यांना सुद्धा सद्गुणांची व सुस्वभावाची प्राप्ति होते व सद्गति मिळते. मग ज्ञान गुणनिधान मानव तनुधर जीवांना का मिळणार नाही. सत्संगति वा कुसंगति करणे शुक मैनांच्या इच्छेवर नसते, पण मनुष्य इच्छेने व प्रयत्नाने सुसंगति करू शकतो.

(ख) दुर्जनांच्या घरातील पोपट साळुंक्या अगदी अपवित्र, अर्वाच्च अशा मोजक्या शिव्या देतात. हा कुसंगतीचा दुष्परिणाम. आता सर्वांच्या परिचयाचा सहज उर्ध्वगति असणाऱ्या धुराचा दृष्टान्त देतात.

चौ. ११ (१) धूम कालिमा कुसंगि बनतो. सर्पण, शेण्या (गोवऱ्या) इत्यादीचा धूर घराला काळे करणारा, कालिमा आणणारा तिखट, झोंबणारा असतो. भाताच्या मुळ्या, सोमल, गंधक इत्यादींचा धूर अंधत्व, मरण देणारा असतो. तो तिरस्कार्य, त्याज्य व अधम वाटतो. चंदन, कस्तुरी, कापूर, गुग्गुळ इत्यादींचा धूर, अग्निहोत्राच्या पुरून ठेवलेल्या शेणाच्या गोळ्यांचा धूर सुसंगतीने मधुर, प्रिय, पूज्य वाटतो. हे रोगनिवारक असतात. कापराच्या धुराने देवी बऱ्या होतात, मनुका बेदाणा यांच्या विशिष्ट धुराने टायफाईड बरा होतो.

(क) तेलाचा, तुपाचा धूर धरून त्याची उत्तम शाई झाली की पुराणादि सद्ग्रंथ लिहिण्यास त्याचा उपयोग होतो.

ल. डे. वेद लिहिति असे का म्हटले नाही? अशी शंका येते, पण शास्त्रवचन पाहिले म्हणजे तुलसीदासांची मर्यादापालनाची सावधगिरी किती व्यापक, सूक्ष्म व सतत जागृत आहे हे पाहून आश्चर्य वाटते.

'वेदानां लेखकाश्चैव ते वै निरयगामिनः' (म. भा. अनु. प. २३/७२) मा. पी.) असा नियम आहे हे योग्यच आहे. याने वेदांचे 'श्रुति' हे नाव यथार्थ ठरते. मसि (शाई) हा संस्कृत शब्द आहे.

चौ. (१२) – 'तो जल अनल अनिल संघातां' मेघ बनतो, काहीं महाराष्ट्रीय कवीनीं 'धूर मेघ बनतो' असे लिहिले आहे. तुलसीदासांचा सिद्धान्त कधी अतिव्याप्त, अव्याप्त, नसतो; तसेच येथे आहे.

(क) पाण्याची अनलाने - सूर्याच्या तापाने वाफ बनते; व ती हवेत मिसळते. तो ओलावा म्हणजेच जल, बाष्प, योग्य प्रकारचा अनिल म्हणजे वारा लागला म्हणजे थंड होऊन ढग बनतो, जलद होतो तयार, आधुनिक विज्ञान शास्त्राचे मत असेच आहे. यात धुराचा संबंध कोठे आला? असे काही सुशिक्षतंमन्य, आपणास शाहणे समजणारे लोक विचारतात. धूर अति सूक्ष्म रजःकणांचा बनलेला असतो हे शंकेखोरास मान्य करावेच लागेल. अशांनी Children's Encyclopoedia हा आठ भागांचा ग्रंथ पहावा, कारण ते या बाबतीत बाल आहेत. पाऊस पडण्याचे आधी काही काळ डोंगर जांभळ्या रंगाचे का दिसतात याच्या उत्तरात लिहिले आहे की वाफेचे ढग बनताना. अतिसूक्ष्म अशा एकेक रजःकणाभोवती एकेक अगदी सूक्ष्म जलबिंदु बनत असतो. अशा रीतीने वातावरणातील अतिसूक्ष्म रजःकण जलद बनण्यात वापरले गेल्याने हवेत ते मुळीच राहात नाहीत, किंवा अत्यल्प राहतात; त्यामुळे हवेतील नैट्रोजन वायु जो निळ्या वर्णाचा असतो त्याचा रंग लांबून पाहणारास दिसतो व पाहणारास वाटते की डोंगर निळे झाले आहेत, पण जवळ गेल्यावर निळे दिसत नाहीत, कारण की ते अंतर नायट्रोजनचा रंग दिसण्यास पुरेसे नसते. आकाश निळे दिसते याचे कारण हि हेच दिले आहे. Why the sky looks blue? असा प्रश्न आहे. (ही पुस्तके के-डी-हायस्कूल चिंचणी, ठाणे, येथे होती, असतील अद्याप). ही वाचलीं म्हणजे सगळा सुशिक्षित समाज बहुधा बालतच गणावा लागेल. गोस्वामिंनी नवीन शोध लावला नसून व्यासोच्छिष्टच व्यवस्थित वाढले आहे.

'अतो धूमाग्निवातानां संयोगस्त्वभ्रमुच्यते' (लिं पु. पू. ५४/३९ मा. पी. पृ. १७९) ज्या प्रमाणात जलाचा साठा अभ्रांत होईल त्याप्रमाणात काळसर, काळा, काळाकुट्ट = जलद होतो.

'आपः पितास्तु सूर्येण क्रमन्ते शशिनः क्रमात ।
निशाकराग्निस्रवन्ते जीमूतान् प्रत्ययः क्रमात्'
'वृन्दंजलमुचांचैव श्वसनंनाभि ताडितम् ॥' (लिं. पु. पू. अ. ५४/३२)
आणखी वर्णन मा. पी. पाहावे.

(२) जग-जीवन-दाता - जगाचे मुख्य जीवन पाणी आहे; नंतर अन्न. अन्नावाचून बरेच दिवस जगता येईल पण साधारण मनुष्यास पाण्याशिवाय ८/१० दिवस सुद्धा जगता येणार नाही. म्हणूनच जीवन = पाणी हा शब्द रूढ झाला आहे. नियमाला अपवाद असतोच. कोणी पाणी मुळीच न पिता राहणारा दिसला तर निश्चिंत समजावे कि जलाचे सूक्ष्मरूप जो रस तो त्या व्यक्तीला काहीतरी विशिष्ट कारणांनी

शरीरातूनच मिळत असतो. त्याला तालुश्राव असे म्हणतात. यापेक्षा अधिक रहस्यस्फोट करणे योग्य नव्हे.

सार (१) रज हा पूर्ण जड-स्थावराचा दृष्टांत, शुकसारिका जंगम चेतन व धूम्र जड चेतन मिश्र. यांनी सुचविले की अशांवर सुद्धा संगतीचा चांगला वाईट परिणाम होतो. मनुष्य तर सर्व जीवात श्रेष्ठ आहे. त्याच्यावर संगतीचा परिणाम लवकर होईल.

(क) जीव सच्चिदानंद स्वरूप मूळचा आहेच; पण संगतीने उच्चता नीचता इत्यादि प्राप्त झाले आहे. संत संगतीने नरजीव आपले सहज शुद्ध स्वरूप प्राप्त करून घेऊ शकतात व कुसंगतीने भवपंकात पडतात.

(ख) पहिला दृष्टान्त भूतलावर अगदी नीच स्थिति दाखविणारा; दुसरा शुकमैना आकाशगामी पण पृथ्वीच्या आश्रयाने राहणारांचा व तिसरा अति उच्चस्थिति मिळवून जगाचे हित करणाऱ्यांचा. यांनी दाखविले की संत संगतीने क्रमशः मानवाची अशी उन्नतिं होऊ शकते. त्याने मनात मात्र आणले पाहिजे. 'नर करनी करे तो नारायण हो जाय', पर संतसंगतिसेही. आणखी दृष्टान्त देतात.

हिं.दो.- ग्रह भेषज जल पवन पट पाइ कुजोग सुजोग ।
होहिं कुबस्तु सुबस्तु जग लखहिं सुलच्छन लोग ॥७रा॥
सम प्रकास तम पाख दुहुँ नाम भेद बिधि कीन्ह ।
ससि सोषक पोषक समुझि
(ससि सोषक समुझि) जग जस अपजस दिन्ह ॥७म॥

म.दो.- ग्रह भेषज जल पवन पट मिळुनि कुयोग सुयोग ॥
होति कुवस्तु सुवस्तु जगिं बघति सुलक्षण लोक ॥७रा॥
नाम भेद विधि पक्षिं करि, सम तम जरी प्रकाश ।
शशि पोषक शोषक गणुनि दे जगिं यश-अयशास ॥७म॥

अर्थ - ग्रह, औषध, जल, पवन व पट (वस्त्र) यांना कुयोग वा सुयोग मिळाल्याने कुवस्तु - वाईट वस्तु किंवा सुवस्तु - चांगली वस्तु वश होतात हे जगात सुलक्षण लोक जाणतात. ॥७रा॥

दोन्ही पक्ष (पंध्रवडे) सारख्याच प्रकाशाचे व अंधाराचे असतात तरी विधीने त्यांच्या नावात (शुक्ल-शुद्ध पक्ष व कृष्ण पक्ष) भेद केला. एक चंद्राची वृद्धि करणारा व दुसरा क्षय-शोषण-करणारा असल्याने त्यास जगात यश व अपयश दिले ॥७म॥

टीका – दो. रा. (१) सूर्य, चंद्र, मंगळ, बुध, गुरु, शुक्र, शनि, राहु व केतु यांना नवग्रह म्हणतात. मानसात 'जणू नवग्रह-सेना महती' (७/२७/५) असा यांचा उल्लेख आहे.

(क) गुरु, शुक्र, चंद्र हे शुभ ग्रह आहेत;

रवि, मंगळ, शनि, राहू, केतु हे अशुभ आहेत. बुध शुभाच्या संगतीत शुभ व अशुभाच्या संगतीत अशुभ होतो. (कोणी रवि अशुभ मानीत नाहीत) प्रजापति व वरुण (हर्षल व नेपचून) हे दोन ग्रह फार मोठ्या दुर्बिणींच्यामुळे दृष्टिपथात आले आहेत, त्यांचीही फलज्योतिषात गणना केली जाते व करणे उपयुक्त आहे. आणखी एक प्ल्यूटो नाव दिलेला ग्रह उपलब्ध झाला असे म्हणतात. तो ग्रह नसून उपग्रह आहे असे आता ठरले आहे. हे नवीन उपलब्ध झालेले डोळ्यांनी दिसणारे नसल्याने ज्योतिष ग्रंथात त्यांचा उल्लेख नाही. राहू हा दृश्य ग्रह नसून त्याला स्थान का मिळाले हे ४/३ च्या टीकेत पाहावे. राहू पासून १८० अंशावरील जे स्थान त्यास केतु म्हणतात, ते राहूचे धड आहे.

(ख) कुंडलीत काही स्थाने शुभ व काही अशुभ गणली आहेत. ६,८,१२ ही अशुभ होत. यात शुभग्रह शुभ फल देत नाहीत. पापग्रह आपले फळ या स्थानांत देतात. शत्रूच्या स्थानात शुभ वा अशुभ ग्रह गेला की त्याची शक्ति कमी होते. ग्रह मित्रगृहीं चांगले फळ देतात. परस्परांच्या घरात शुभाशुभ ग्रह मित्र बनतात. या प्रमाणे व इतर नवपंचम, त्रिरेकादश, केंद्र, प्रतियोग, युति, इत्यादि कुयोग सुयोग आहेत. जसे योग असतील, होतील तसा चांगलेपणा किंवा वाईटपणा त्यास येतो, व तसे शुभाशुभ फल देतात.

(२) भेषज - रोगनिवारक वा प्रतिबंधक औषधे. अनुपान, पथ्य, काळ, वेळ, व्यायाम, प्रकृति व आहारादि यांच्या योगाने औषध गुणकारी किंवा अपायकारक ठरते. वात प्रकृतीला कडू औषध मानवत नाही. कफ प्रकृतीला कडुलिंब मानवतो, तर वात प्रकृतीला भरपूर जलाचा योग न मिळाला तर त्रास देतो. विशिष्ट दिवशी विशिष्ट नक्षत्रावर काढलेल्या वनस्पति, त्याची मुळे वगैरे गुणकारी ठरतात, इतर वेळी निरुपयोगी. आडवी साल कापून व उभी कापून घेण्याने एकच वनस्पति भिन्न फळ देते. स्थूल प्रमाणात घेण्याने व अतिसूक्ष्म प्रमाणात घेण्याने काही वनस्पति मिश्र, विरुद्ध फळ देतात. मात्रांचे हि असेच, अनुपानाप्रमाणे स्वभाव गुणधर्म बदलतात.

(३) जल - रोगजंतूच्या संगतीत आलेले पाणी तसेच पिण्याने रोग होतात. उन्हाळ्यात गरम पाणी दुःखदायक, तेच थंडीत सुखदायक. कडू, तिखट इत्यादि रसांच्या संगतीत ते त्या चवीचे बनते. विषारी पदार्थांच्या संयोगाने मारक ठरते. गंगेला मिळाले म्हणजे शुद्ध होते; पण गंगाजलाने दारु केली की ते जल अपवित्र, मादक बनते. शुभ सात्विक मंत्रांनी अभिमंत्रित जल सत्वगुण उत्पन्न करते. बॅप्टिस्माच्या जलाचे रक्तावर होणारे शुभ सात्विक परिणाम यंत्राने सिद्ध झाले आहेत. तमोगुणी मंत्रांनी अभिमंत्रित जल तमोगुणी कार्ये करते, माणसाच्या मुखातून शरीरात जाऊन खालून बाहेर पडणारे घाणेरडे होते. गाळवाच्या शरीरातून

असेच बाहेर पडणारे कधी बरी न होणारी व शरीरास कुजवून मारणारी जखम करण्यास उपयोगी पडते. घोड्याच्या त्वचेतून घामरूपाने बाहेर पडणारे, गळणारे थेंब मदिरेच्या व्यसनातून मुक्त करण्यास उपयोगी पडतात. असे अनंत प्रकार किती सांगावे!

(४) पवन - (वारा - वायु) पावन करणारा असला तरी, दुर्गंधि पदार्थांच्या- संगतीने- कुयोगाने दुर्गंधि, सुगंधि पदार्थाच्या सुयोगाने- संगतीने सुगंधि, पवित्रांच्या संगतीने पवित्र, सूर्याच्या संगतीने, अग्नीच्या संगतीने उष्ण, चंड होतो. चंद्राच्या व रात्रीच्या संगतीने शीतल, शीत, अतिशीत, कालमानाने होतो. जलाच्या संगतीत आर्द्र शीतल व रेताड मैदानाच्या संगतीत रुक्ष होतो, विस्तार जास्त नको.

(५) पट - वस्त्र - लसुण, कांदे, मांस वगैरे खाणारांच्या अंगाच्या संगतीने उग्र गंधी दुर्गंधि होते. योग्यांच्या अंगाच्या संगतीने वस्त्र सुगंधि होते. प्रेतवस्त्र अशुभ, देवता, गुरू, संत यांच्या संसर्गातले शुद्ध पूज्य होते. नवे पूज्य जुने त्याज्य हा काळसंगतीचा परिणाम; ज्या रंगाशी संबंध येईल त्या रंगाचे बनते. काळ्या वस्त्रावर कोणताच रंग बसत नाही व दिसत नाही. लोकरीचे उन्हाळ्यात दुःखद, थंडीत सुखद. सर्व संगतीवर अवलंबून आहे.

(ल. ठे.) येथे सुद्धा कुयोग व कुवस्तु यांचा उल्लेख प्रथम केला. बहुधा यांचाच प्रसार जास्त दिसतो हे सुचविले. ग्रहांत सुद्धा अशुभ ग्रहांची संख्या जास्ती.

संगति - समान गुणावगुण असूनसुद्धा इतरांना येणाऱ्या बऱ्या वाईट अनुभवांमुळे चांगली वाईट नावे कशी पडतात व त्या वस्तूंचा दोष नसून इतरांचा दोष त्यांच्या माथी मारून जगात् यश अपयश (कीर्ति, अपकीर्ति) कसे मिळते हे दृष्टान्ताने दाखवितात.

दो. म. (१) - चैत्रादि महिन्याचे १५/१५ तिथींचे दोन भाग असतात. यांना पक्ष म्हणतात. अमावास्येनंतरच्या १५ तिथींचा एक पक्ष व पौर्णिमेनंतरच्या १५ तिथींचा एक पक्ष, एकाला शुक्लपक्ष, शुद्ध पक्ष म्हणतात व दुसऱ्याला कृष्णपक्ष म्हणतात.

शुक्ल - शुभ्र, स्वच्छ, व कृष्ण म्हणजे काळा.

(क) मुळात प्रकाश शब्द आधी आहे, नंतर तम आहे. या युक्तीने कवीनी अमावास्यान्त मासाची पद्धत सुचविली; कारण की त्यात प्रथम शुक्ल पक्ष असतो व रात्री प्रथम चंद्र प्रकाश असतो. अनुवादात दोन्ही प्रकारच्या मासांची सूचना मिळते. पूर्वार्धात तम-प्रकाश या क्रमाने पौर्णिमांत मासगणना सुचविली व उत्तरार्धात शशिपोषक शोषक या शब्दांनी अमावास्यांत गणना सुचविली. शुक्ल पक्ष प्रथम असतो व त्यात शशी वाढत जातो. उत्तर हिंदुस्थानात पौर्णिमांत मासगणना आहे. त्यांची कृष्णजयंती व आपली कृष्णजयंती एकाच दिवशी नसून त्यांची भाद्रपद कृष्ण अष्टमी ठरते व आपली श्रावण कृष्ण अष्टमी, कृष्ण नावाने अवतार कृष्ण

पक्षात व आनंददायक चंद्र असतो त्या पक्षात रामचंद्राचा हेहि योग्यच. राम = 'आनंदा आनंदहि दाते'. हिंदी दोह्यांत उत्तरार्धात शोषक पोषकक्रम ठेवून पौर्णिमांत मास सुचविला आहेच. क्रमभंग करण्यात दोन्ही ठिकाणी उभयमतसंग्रह हे ध्येय आहे. हा भेद ध्यानी न आल्याने संवत १६६१ नंतरच्या काही पोथ्यात पाठ भेद 'पोषक शोषक' असा झालेला दिसतो (मा.पी.प.)

(२) वार-गणना पद्धती :- हल्लीची जी वारगणना पद्धती 'उदयादुदयंवारः' सूर्योदयापासून दुसऱ्या सूर्योदयापर्यंत वार. तिने दोन्ही पक्ष सम प्रकाशतम ठरत नाहीत. कारण पौर्णिमेला सर्व रात्रभर प्रकाश असतो व अमावास्येच्या रात्री मुळीच नसतो. हा विरोध मध्यरात्री वारगणना पद्धतीने उरत नाही. पुरातन काळी तशी वारगणना पद्धती होती हे येथील उल्लेखाने सुचविले आहे. पाश्चात्य देशात अद्याप तशीच आहे, मध्यरात्री वार बदलतो.

'वारप्रवृत्तिः प्राग्देशे क्षपार्धेऽभ्यधिके भवेत् । तद्देशांतरनाडीभिः पश्चादूने विनिर्दिशेत्' (सूर्यसिद्धान्त मध्यमाधिकार. मा-पी.)

'अतीताया रात्रेः पश्चार्धेन आगामिन्याः पूर्वार्द्धेन च सहितो दिवसोऽद्यतनः' मागल्या रात्रीचे उत्तरार्ध व येणाऱ्या रात्रीच्या पूर्वार्धसमाप्तिपर्यंतचा जो काळ तो आजचा दिवस. यावरून मध्यरात्र समाप्ति दिवसाची- वाराची गणना या देशात होती हे ठरते (सि. कौमुदी. १,२,७ या सूत्रावर हे लिहिलेले आहे मा. पी.) या गणनेप्रमाणे पौर्णिमेचे पूर्वार्ध पूर्वपक्षात गणले जाते व उत्तरार्ध दुसऱ्या पक्षात गणले जाते, आणि अमावास्येचे पूर्वार्ध कृष्ण पक्षात व उत्तरार्ध शुक्लपक्षात गणले जाते; आणि दोन्ही पक्षात प्रकाश व अंधार यांची समता ठरते.

(३) चंद्राच्या वृद्धिक्षयाचे कारण पक्ष नाहीत. त्याच्या दुर्वर्तनाने मिळालेला शाप याला कारण आहे; म्हणजे तो स्वतःच कारण आहे. समजले मात्र जाते की शुक्लपक्ष चंद्राची वृद्धि करणारा-पोषक आहे म्हणून तो शुभ-शुक्ल, शुद्ध ठरला; व कृष्णपक्षात चंद्राचा क्षय होत जातो म्हणून तो काळा - कृष्ण, अशुभ -

(क) चंद्राच्या संगतीने हा परिणाम झाला! एकाला चांगले नाव मिळाले, कीर्ति, यश, मिळाले, दुसरा वाईट ठरला, अपकीर्ति मिळाली!

सार हे की कित्येक वेळा व्यक्तिदोष नसून वाईटपणा येतो किंवा चांगुलपणा फुकटचा पदरात पडतो तो केवळ विधिमुळे, दैवाने. संगतीप्रमाणे चांगलेपणा किंवा वाईटपणा येतो. ताडीच्या दुकानाजवळ झाडाखाली बसून कोणी धारोष्ण दूध पीत असला तरी ताडी पीत होता असेच लोक म्हणणार! म्हणून कुसंगती टाळावी. (येथे कुसंग-सुसंग प्रकरण समाप्त झाले.)

# 'कार्पण्यभावाने वंदन' प्रकरण

हिं.दो.- जड चेतन जग जीव जत सकल राममय जानि ।
"बंदउँ सबके पद कमल सदा जोरि जुग पानि ।।७चं।।
'देव दनुज नर नाग खग प्रेत पितर गंधर्व ।
बंदउँ किंनर रजनिचर कृपा करहु अब सर्ब ।।७द्रा।।

म.दो.- जगीं जड चेतन जीव सब राममयचि जाणून ।
सर्व-पदाब्जां वंदितो सदा करां जोडून ।।७चं।।
देव दनुज नर नाग खग प्रेत पितर गंधर्व ।
नमतो निशिचर-किंनरां कृपा करा तरि सर्व ।।७द्रा।।

अर्थ - या जगात असलेले सर्व जड व चेतन जीव राममयच आहेत हे जाणून मी (त्या) सर्वांच्या पदकमलांना सदा हात जोडून वंदन करतो ।।चं।।
देव, दानव, मानव, नाग, पक्षी, प्रेत, पितर, गंधर्व, किन्नर व निशाचर या सर्वांना (च) मी नमन करतो, तरि (अब-आता) या सर्वांनी (माझ्यावर) कृपा करावी (कारण की मी प्रेमाने नम्रतेने राममय जाणून वंदन करीत आहे) ।।द्रा।।
टीका —(१) या दोन दोह्यांमध्ये केले आहे तसे वंदन करणे हे अनन्य नमन, भक्तीचें लक्षण आहे. नमनाने सेवकभाव, दास्यभाव व नम्रता वाढतात. 'नमने नम्रता जोडे' (दाबो.) दासबोधांतील नमनभक्ति प्रकरण (समास) पहावे. अशा राममय भावनेने वंदन करण्याने सर्वाभूती भगवद्भाव वाढतो.
(क) 'तो अनन्य ज्याची अशी मति न ढळे हनुमंत ! मी सेवक सचराचर रूपे प्रभु भगवंत' (४/३) - हे अनन्यभक्तीचे लक्षण आहे.
(ख) अनन्य नमनभक्तीचे लक्षण -
'खंवायुमग्निं सलिलं महीं च ज्योतींषि सत्वानि दिशोद्रुमादीन्।
सरित् समुद्रांश्च हरेः शरीरं यत्किंच भूतं प्रणमेदनन्यः' (भाग. ११/२/४१)
'प्रणमेद्दण्डवद्भूमौ-आश्वचाण्डालगोखरान्' (भाग.)
अशी दण्डवत नमनभक्ति दण्डवतेस्वामी पैठण, करीत असत. वाळवंटात एक गाढव पडलेले होते ते दुरून दिसताच दण्डवत घातले; त्याबरोबर मरून पडले होते ते गाढव जिवंत झाले. 'एक संत का अनुभव' गीता प्रेस गोरखपूर ही पुस्तिका वाचावी. ५/१० वर्षापूर्वीपर्यंत ते 'नारायणस्वामी' विद्यमान होते.
(२) जडचेतन हा उल्लेख न करता सकलजिवांना असे म्हटले असते तर इष्टार्थ वाचकांनी घेतला नसता. नमन करण्यास योग्य अशा सर्वजिवांना असा अर्थ घेतला असता. ही अव्याप्ति टाळण्यासाठी जडचेतन म्हटले.

(क) जडांत सुद्धा जीव असतो हे सुचविले व नमनभक्तीची पद्धति दाखविली.
(ख) पदाब्ज शब्द दास्यभाव व अत्यंत पूज्यबुद्धि निदर्शक आहे. आपण सर्व कमलासारखे कोमलहृदयी आहात असे मानून वंदन करीत आहे हे ही सुचविले.
(ग) हात जोडून बोलण्यास प्रारंभ करणे ही याचनामुद्रा आहे. असे कोणी केले की काही तरी याचना करणार असे निश्चित समजावे. कृपा करा असे मागणे मागितले आहे.

दो. द्रा - (१) दनुज - दनु ही कश्यपाची एक स्त्री होती, तिचे पुत्र ते दनुज, दानव. दितीचे पुत्र ते दैत्य, अदितीचे पुत्र ते आदित्य, कद्रूचे पुत्र ते काद्रवेय (नाग)

(२) प्रेत - प्र + इत = प्रेत. याचे अनेक अर्थ आहेत. भुतांची एक जात हा एक अर्थ आहे. दहा दिवसांची क्रिया झाल्यानंतर सपिंडी होईपर्यंत मध्यंतरीच्या काळात मिळणाऱ्या देहास आतिवाहिक देह असे म्हणतात. या देहांतील जिवास प्रेत म्हणतात. प्रेत म्हणजे मृत, मरून गेलेला असाहि अर्थ आहे. या सर्वांचा संग्रह येथे करणे योग्य.

(३) पितृलोकात राहणाऱ्यांस पितर म्हणतात.

(४) गंधर्व, किंनर, यक्ष, राक्षस पिशाच या सर्व देवयोनि आहेत.

(क) गंधर्व किंनर गायक आहेत.
'गाऊ लागले किंनर गुणगण' (६/१०/८) 'गाती गुण गंधर्व-वरूथहि'.
(ख) जे यज्ञयाग करण्यास तयार झाले त्यास ब्रह्मदेवाने यक्ष नाव ठेवले व रक्षण करण्याची जबाबदारी ज्यांनी स्वीकारली ते राक्षस म्हटले गेले. यांनाच रजनीचर, निशाचर इत्यादि म्हणतात.
(ग) यांच्या नमनात कमल शब्द नाही. हे व्यक्तिशः रामांश भावनेने वंदन आहे. मागले विराट स्वरूपाला वंदन आहे. या दोह्यांत कृमिकीटकादिकांना वगैरे वंदन नाही ते पुढील चौपायात करतात.

## बालकाण्ड अध्याय एक ची मानस गूढार्थ चंद्रिका टीका समाप्त.

# अध्याय २रा.

हिं.- आकर चारि लाख चौरासी । जाति जीव जल थल नभ बासी ॥१॥
सीय राममय सब जग जानी । करउँ प्रनाम जोरि जुग पानी ॥२॥
जानि कृपाकर किंकर मोहू । सब मिलि करहु छाडि छल छोहू ॥३॥

म.- आकरिं चारि लाख चवऱ्यांशी । विविध जीव भू-जल-नभ* वासी ॥१॥
सितराममय सब जग जाणुनि । करतो प्रणति पाणियुग जोडुनि ॥२॥
मजसि कृपाकर-किंकर समजुनि । कृपा करा सर्वहि छल विसरुनि ॥३॥

अर्थ - चारी खाणीत व चवऱ्यांशी लक्ष योनीत पृथ्वी, पाणी व आकाश यात राहणारे नाना प्रकारचे जीव (जगात) आहेत ॥१॥

ते सर्व म्हणजे जगच सीताराममय आहे असे जाणून मी हात जोडून प्रणति - प्रणाम - करतो ॥२॥ मला कृपाकराचा किंकर समजून व माझे छल कपट विसरून तुम्ही सर्व माझ्यावर कृपा करा, करावी ॥३॥

टीका – चौ - १ (१) आकरिचारि लाख चौऱ्यांशी' आकार=खाण. अण्डज, स्वेदज, उद्भिज व जरायुज या चार खाणी आहेत. अंड्यांतून जन्मणारे ते अंडज; पक्षी, सर्प, मुंग्या, पाली, इत्यादि. घाम व उष्णता यांच्यापासून जन्मणारे ते स्वेदज; लिखा, उवा, ढेकूण वगैरे, बीज, मूळ किंवा कांड इत्यादियांच्यापासून होणारे उद्भिज. वृक्ष, लता, तृण, ऊस वगैरे. मनुष्य, मृगादिक पशु इत्यादि जरायुज. यांच्या आंगाभोवती, गर्भात असताना, जरायु नावाचे एक वेष्टण असते. 'यथोल्बेनावृतो गर्भः' जरायु = खोळ.

(क) चौऱ्यांशी लक्ष योनि- यांच्या वाटणी विषयी मतभेद आहेत. दा. बो. २०/६ श्लोक व मा.पी.पहा. ८४ लक्ष प्रकारच्या जीवांच्या जाती आहेत.

(ख) येथे जडांचा उल्लेख नाही व जलचर; स्थलचर, नभचर न म्हणता जल थल (स्थल) नभवासी - राहणारे म्हटले, म्हणून जडचेतन म्हणण्याची आवश्यकता राहिली नाही.

चौ. २ (१) - सिता (सिया, सिय, सीय, सीया हे चार प्रयोग आढळतात). पूर्वी राममय जडचेतनादि सर्व विश्वाला वंदन केले. येथे सीताराममय मानून केले व दाखविले की सीता आणि राम यांस 'म्हणती भिन्न न भिन्न (१/१८/-) सीता- आदिशक्ति, मूळमाया मूळप्रकृति आहे. (मं. श्लो.५). येथे याप्रकारे वंदन करून आणखी हे दाखविले की जे काही जड वा चेतन, स्थावर जंगम दृश्य, रूपवान, आकारादिकानीयुक्त आहे ते सर्व प्रकृति पुरुषमय आहे. मागील वंदनात जगातील स्त्रीरूपाला नमन नाही असे वाटू नये म्हणूनहि सीतेचा उल्लेख येथे केला आहे.

(क) स्त्रीवर्ग सीतामय व पुरुषवर्ग राममय आहे असा भावहि निघतो.

'लोके स्त्रीवाचकं यद्यत् तत्सर्वं जानकी शुभा
पुन्नामवाचकं यावत् तत्सर्वंत्व हि राघव' (अ. रा. नारदवचन).

(ख) 'नारी माता जानकी पुरुष पिता श्रीराम । सर्वां करयुग जोडुनी ईश्वर दास प्रणाम'

हा दोहा पूर्वाश्रमात १/७/३७ ला लिहिलेला सापडला, व वरील अध्यात्म रामायण श्लोक २१/११/५३ ला टीका लिहिताना अ. रा. पाहून लिहिलेला आहे. समानार्थक उल्लेख सांपडले एवढ्याने असे ठरत नाही की एकाने तो पूर्वीच्या वचनाधारे लिहिला. जे नित्य सत्य सिद्धांत आहेत ते भिन्न काळी, भिन्न देशात व भिन्न भाषांत सहज स्फुरू शकतात. (प. पु. श्लो. मा. पी. पहा.)

चौ. ३ - (१) मजसि कृपाकर - किंकर समजुनिं - कृपा+आकर, कृपेची खाण किंवा कृपाकर-कृपाकरणारे दोन्ही अर्थ घेता येतील पण पहिला अधिक योग्य कारण कृपाकर याचा अर्थ कृपासागर (जसारत्नाकर - रत्नांचा सागर = सागर) असाही होतो. कृपाकर! असे संबोधन घेतल्यास तुम्ही कृपाळू आहात असा अर्थ होतो; पण पहिलाच योग्य.

(क) तुलसीदास आपल्याला रामकिंकर - रामसेवक मानीत आहेत! 'कृपा करा सुत-सेवक जाणुनि' (१/१६/७) अशी प्रार्थना वंदन प्रकरणातच कौसल्यादि राण्यांना वंदन करतांना केली आहे; म्हणून कृपाकर -किंकर हाच अर्थ सयुक्तिक व साधार.

२ 'छल विसरूनि' - याचा संबंध तुलसीदासांकडे घेणेच उचित आहे. ते स्वतःस कपटी, दांभिक, वंचक असा रामसेवक समजतात.

'मीहि म्हणवितो म्हणति जन, राम सहति उपहास । स्वामी सीतानाथ से सेवक तुलसीदास' (१/२८) 'वंचक, मिरविति रामभक्त वर कामकोप कनकांचे किंकर ।। अशांमध्ये जगीं गणा प्रथम मज' (१/१२/३४) -असा मी असून रामकिंकर म्हणवतो हे कपटच आहे हा भावार्थ 'छल विसरूनि' यात आहे.

(क) ज्यांना हात जोडून प्रार्थना करावयाची की माझ्यावर कृपा करा त्यांनाच सांगावयाचे की कृपा करताना माझ्याशी छल-कपट करू नका हे आजच्या काळात हि अव्यवहार्य ठरते व तुलसीदासांसारखे संत कपटाचा आरोप सर्व जगावर, ज्याला सीताराममय मानून वंदन केले त्याच्यावर कसा करतील?

संगति - असे सर्वांस विनविण्यात हेतू सांगतात,

हिं.- निज बुधि बल भरोस मोहि नाही । तातें बिनय करउँ सब पाहीं ।।४।।
करन चहउँ रघुपति गुण गाहा । लघु मति मोरि चरित अवगाहा ।।५।।

म.- मज निज मतिबल-निश्चिति नाहीं । म्हणून विनवितो सर्वांनाही ॥४॥
मज इच्छा रघुपति-गुण-गानी । चरित अगाध नि मम मति सानी ॥५॥

अर्थ - मला स्वतःच्या बुद्धीचा व बलाचा भरवसा (निश्चिति-भरोसा) वाटत नाही. म्हणूत मी सर्वांना विनवणी करीत आहे ॥४॥ रघुपतीच्या गुणांचे (गाहा-गाथा-कथा) वर्णन करावे अशी माझी इच्छा आहे; आणि चरित्र अगाध असून माझी बुद्धि -अगदी क्षुद्र (सानी-लहान) आहे. ॥५॥

टीका — चौ. ४ (१) साधे सुकाव्य लिहिण्यास सुद्धा, बल म्हणजे ईश, संत इत्यादींची कृपा, अभ्यास व निपुणता (बुद्धिबल) वगैरे गोष्टी लागतात. त्या मज जवळ आहेत की नाहीत याचा मला भरवसा वाटत नाही; माझी बुद्धि व शक्ति दगा देतील असे वाटते, म्हणून मी सर्वांना अगदी कळवळून विनवण्या करीत आहे.

चौ. ५ (१) रघुपति-गुणगानीं - रघुपतीचे गुण-चरित्र इत्यादि म्हणजे कथा रचना करण्याची मला इच्छा आहे. रामगुणगान म्हटले असते तर सगुणनिराकार राम असा अर्थ घेता आला असता; रघुपति शब्दाने सगुण साकार रघुवंशात अवतरलेले हा अर्थ सुचविला. असाच प्रयोग पदोपदी केलेला दिसतो. असे करण्यात हेतु त्यावेळी हिंदू समाजात पसरविलेला व रुढ होऊ पहात असलेला अधर्मी, असत्य, दुस्तर्क, कुविचार नष्ट करून सगुणोपासना प्रस्थापित करणे. दशरथ पुत्र राम परमात्मा नव्हते, नाहीत असा जोराचा प्रचार निर्गुणोपासकांनी तुलसी पूर्वकाळी केला होता व चालू होता.

(२) चरित अगाध - सानी - भाव हा की उद्दिष्ट कार्य आणि साधनसामग्री अगदी विषम आहेत. तरीसुद्धा इच्छा प्रबल आहे. माझी अपात्रता पाहून तुम्ही कृपा केलीत म्हणजे सर्व ठीक होईल. या चौपाईचा अर्थच पुढे स्पष्ट केला आहे.

म.- 'कोठे रघुपति - चरित अपारहि । मम मति कुठे निरत संसारहि ॥१०॥
जो मारुतगिरि मेरु उडवितो । वदा तूल किती तयांपुढति तो ॥११॥
राम-प्रभुता अमित, समजता । कथागानिं मनिं अति कातरता ॥१२॥
(१/१२)

कालिदास असेच म्हणाले आहेत.

क्वसूर्यप्रभवो वंशः क्वचाल्पविषयामतिः । तितीर्षुर्दुस्तरं मोहादुडुपेनास्मि सागरम् ॥

मंद कवियशःप्रार्थी, गमिष्याम्युपहास्यताम् । प्रांशुलभ्ये फलेर्मोहाद् उद्बाहुरिव वामनः ॥"

लहानशा होडग्याने महासागर तरून जाण्याचा प्रयत्न करणे किंवा फार उंच असलेले फळ घेण्यासाठी खुजा माणसाने हात वर करून उड्या मारण्यासारखे

हास्यास्पदच आहे. तुलसीदास म्हणतात - पोहता न येणाऱ्या माणसाने अगाध सागराचा ठाव घेण्याचा प्रयत्न करावा तसे माझे आहे, हे मला कळते, पण इच्छा अनावर आहे व ती स्वस्थ बसू देत नाही. म्हणून विनवण्या करीत आहे.

हिं.- सूझ न एकउ अंग उपाऊ । मन मतिं रंक मनोरथ राऊ ॥६॥
मति अति नीच उँचि रुचि आछी । चहिअ अमिअ जग जुरइ न छाछी ॥७॥
म.- नुमजें अंगां एक उपाया । मन मति रंक मनोरथ राया ॥६॥
मति अति नीच उच्च रुचि रुचिरहि ।
अमृत इच्छि जगीं मिळत तक्र नहिं ॥७॥

अर्थ - काव्याची अंगे व उपाय यातले एकसुद्धा मला माहीत नाही; मन व बुद्धि कंगाल आहेत आणि मनोरथ (इच्छा) मात्र राजा आहे ॥६॥ माझी मति अति नीच आहे - (निकृष्ट आहे), रुचि उच्च असून सुंदर (रुचिर, आछी - अच्छी) ही आहे; अमृत मिळावे अशी इच्छा आहे (पाहिजे आहे) पण जगात ताक सुद्धा मिळत नाही (अशी माझी स्थिति आहे, छाछी -छाछ -ताक, जुरना -मिळणे) ॥७॥

टीका - चौ. ६ (१) नुमजे अंगां एक उपाया - (क) अंगें - ध्वनि, रस, अलंकार रीति, गुण आणि दोष हीं काव्याची मुख्य अंगे आहेत. दोष हे अभावरूपाने काव्यांग आहे. काव्यदोषांचे ज्ञान असल्याशिवाय निर्दोष वा कमीदोषयुक्त काव्यनिर्मिति होऊ शकत नाही असे म्हणतात.

(ख) उपाय - साधन सामग्री; शक्ति, काव्यकला, निपुणता व काव्यशास्त्राचा अभ्यास हे मुख्य उपाय आहेत. तथापि अनेक शास्त्रें, पुराणें, श्रुति, स्मृति इत्यादि ग्रंथ, धर्म शास्त्र, शब्द शास्त्र, व्युत्पत्ति शास्त्र, इत्यादींचे ज्ञान सुविचारपूर्वक समन्वय पद्धतीने प्राप्त झालेले पाहिजे तरच कदाचित 'नाना पुराण निगमागम - संत - संमत काव्य निर्माण होऊ शकेल. अन्यथा प्रज्ञानानंदासारखे पद्य रचना करणारे लेखक कलियुगात घरोघर! 'कविवृंद'.

(२) मन मति रंक मनोरथ राया - (राया-राऊ, राजा) भाव हा की एकच मनीषा आहे व ती अति उच्च आहे; महाराजासारखी आहे. नरस्तुति, विषयकथा, पाखरे, पशु इत्यादींचे वर्णन करणे, आशुकामाधुकांच्या प्रेमकथा इत्यादि लिहिण्याची इच्छा मुळीच नाही. राजा प्रकाशमान, शक्तिसंपन्न, नीतिमान्, धर्मशील, भक्तिमान, ज्ञानी, प्रजावत्सल, दीनदयाळू, शत्रूंचा विनाशकर्ता, निःस्वार्थी, इत्यादि प्रकारचा असावा लागतो. पण ज्या राजाचे चरित्र वर्णन करावे अशी मोठी लालसा आहे तो सर्व सम्राटांचा सम्राट आहे. काव्य रघुपतीच्या सुंदर गुणांनी परिपूर्ण एकरस गोड व्हावे अशी आहे इच्छा. सिद्धान्त - हरिकथा काव्यनिर्मितीची इच्छा राजा आहे व इतर सर्व मनोरथ रंक आहेत. रंक जसा सदा दुःखीकष्टी, अपमानित असतो तसेच

इतर काव्य मनोरथांचे होणार. सज्जन-साधु त्यांच्याकडे पाहणार सुद्धा नाहीत, व ते निरुपयोगीच नव्हे तर दुरुपयोगी ठरेल.

चौ. ७ (१) - मति अति नीच - रुचिरहि :- (क) मति निकृष्ट प्रकारची म्हणजे संसारात गळलेली, अज्ञानात बुडालेली 'मम मति - निरत संसारहि' (१२/१०) (ख) रुचि उच्च व रुचिर - सुचविले की नुसती उच्च रुचि उपयोगी नाही. ती उच्च असून रुचिर-सुंदर (आदरणीय) प्रकाशमय पाहिजे. (रुचि दीप्तौ अभिप्रीतौ)

संगति - अशी आपल्या आवाक्याबाहेरची इच्छा धारण केल्याबद्दल आता सज्जनांजवळ क्षमा मागतात.

हिं.- छमिहहिं सज्जन मोरि ढिठाई । सुनिहहिं बाल बचन मन लाई ॥८॥
जौं बालक कह तोतरि बाता । सुनहिं मुदित मन पितु अरु माता ॥९॥
हँसिहहिं क्रूर कुटिल कुबिचारी । जे पर दूषन भूषन धारी ॥१०॥

म.- सज्जन मम उद्धटता क्षमतिल । मन लावुन शिशु-शब्द ऐकतिल ॥८॥
बोल बोबडे बालक बोलति । माता पिता मुदित-मन ऐकति ॥९॥
क्रूर कुटिल हसतिल कुविचारी । जे पर-दूषण-भूषण-धारी ॥१०॥

अर्थ - या माझ्या (मोरि-माझी) उद्धटपणा (ढिठाई) बद्दल सज्जन-संत- मला क्षमा करतील (छमिहहिं) व माझे बालकाचे (बाल-शिशु) बोल (शब्द) मनापासून (मन लाई-मन लाऊन) श्रवण करतील ॥८॥ जेव्हा बालके बोबडे बोल बोलू लागतात तेव्हा आईबाप ते (बाळबोल) मोठ्या आनंदाने श्रवण करतात ॥९॥ (पण) क्रूर कुटिल कुविचारी लोक हसतील कारण ते दुसऱ्यांच्या दोषांना आपली भूषणे म्हणून धारण करतात. (दुसऱ्यांचे दोष शोधून काढून ते इतरांस दाखविणे त्यास भूषणास्पद वाटते.) ॥१०॥

टीका — चौ-८ (१) उद्धटता क्षमतिल - उद्धटपणा हाच की पात्रता मुळीच नसता भलतीच आकांक्षा धरून कृपेची याचना करणे.

(क) सज्जनांचा स्वभावच क्षमाशील असतो त्यामुळे या उद्धटपणाबद्दल क्षमा करतील अशी खात्री आहे. क्षमा करा अशी प्रार्थना करणे सुद्धा चुकीचे ठरेल.
'संत हंस गुण घेति पय त्यजुनि जला दोषांस' (१/६/-)
'म्हणून भाव हा आहे की संतांशिवाय इतर देवादिक आहेत त्यांनी दोन गोष्टींचा विचार करून क्षमा करावी. एक गोष्ट ही की मी रामकिंकर आहे व रामकथागान करण्याची इच्छा उच्च व रुचिर आहे. दुसरी गोष्ट म्हणजे मी दीन आहे व तुम्ही रामरूप आहात.

(२) शिशु-शब्द (बालवचन) - यात फार गूढ अर्थ भरला आहे. बालकांचे शब्द-बोल बोबडे (तोतरे) म्हणजे अस्पष्ट वर्णोच्चार दोषयुक्त असतात, हे जितके खरे तितकेच हे पण सत्य आहे की त्यांचे बोल सहज सरल, चारपुरुषार्थ व स्वार्थ

यांचा संबंध नसलेले असे असतात. त्यात मानसरोगजनित दोष नसतात. सुचविले की रामचरित मानस असेच निःस्वार्थ सहज सरल बुद्धीने रचले जाईल.
(क) सहज सरल वाणी साधूंना व मुनींना फार आवडते.
'सहज सरल रघुबर वच परिसुनि । साधु साधु! वदले ज्ञानी मुनि' (२/१२६/७)
सहज सरलता हे भक्तीचे एक मुख्य लक्षण आहे.
'सहज सरलता मनिं न कुटिलता । यथालाभ-संतुष्ट-चित्तता' (७/४६/२)
(ख) बालकांचे रूप, जात, गोत कसेहि असो त्यांचे बोबडे बोल सज्जनांस व प्रभूस रुचतात. तसे माझे काव्य आवडेल हे सुचविले.
चौ. ९ (१) माता पिता मुदित-मन ऐकति - इतरांना त्या शब्दांनी काही आनंद होत नाही पण ते ऐकून मातापितरांचे मन प्रसन्न होते.
(क) मातापिता शब्दांनी शिवपार्वती व सीताराम हा अर्थ ध्वनित केला आहे. 'गुरुपितृमाय महेशभवानी' असे म्हणून तुलसीदासांनी त्यास वंदन केले आहे. त्यांच्या मातापितरांची जबाबदारी शिवपार्वतीनीच पार पाडली आहे.
'जाणा जिवि जगदंबा सीता' (१/२४६/२) 'जगत्पिता रघुपतीस - जाणुनि' (१/२४६/३).
(ख) सज्जन तर श्रवण करतीलच. पण इतर कोणी न केले तरी भवानीशंकर व सीताराम श्रवण करतील.
(ग) मातापिता बालांच्या बोलांनी प्रसन्न होतातच पण त्यास चांगले शुद्ध बोलण्यास शिकवितातही. तसेच शिवपार्वती व सीताराम करतील.
'सर्व सुधारिल तो मम दोषू । करत कृपातत्कृपे न तोषू ।' (१/२८/३).
हे श्रीरामाविषयीं तुलसीदासांनी म्हटले आहे. 'बालक सुत सम दास अमानी' (३/४३/८) प्रभूला आवडतात. तुलसीदासांच्या आतापर्यंतच्या, पुढील व विनय-पत्रिकेतील वचनांनी त्यांचे 'बालकत्त्व' कोणीही मान्य करील
'त्यांस सदा मी रक्षी ताता । जशी बालकां जपते माता' (३/४३/५)
हे रामवचन आहे. मानस काव्य निर्दोष, निर्दूषण, सरल स-रस, सालंकार, अगाध, अपार, ध्वनिपूर्ण, मृदु, मधुर आणि शब्द लाघवांत अर्थ गौरव असलेले असे म्हणजे अतिमानुष कृति आहे.
चौ. १० (१) क्रूर कुटिल - कुविचारी' ज्यांच्या काव्यात काही अर्थ नाही. ते हसतील.
'हंसा बक चातकास वाघुळ । विमल कथेला हसति मलिन खळ' (९/२) स्वभावाने क्रूर, बुद्धीने कुटिल व विचार पापमय असे लोक आपली प्रसिद्धि व्हावी व आपणास लोकांनी साहित्यिक, पंडित व मानस मर्मज्ञ म्हणावे म्हणून नसलेले दोष दाखवून, त्यांचे खंडन करून ते लोकांच्या निदर्शनास आणण्याचा प्रयत्न करतील. अशाच एका हिंदी तुलसीमानस समालोचकांची यथायोग्य पूजा प्रज्ञानानन्द स्वामीने

मानसमणि या हिंदी मासिकाच्या नोव्हेंबर १९५२ व नोव्हेंबर १९५३ च्या अंकात दोषनिराकरण शीर्षकाने केली आहे.

(२) परदूषण - भूषण - धारी :- यांच्या जवळ स्वतःची शोभा वाढविणारे सर्वात श्रेष्ठ भूषण जे शील ते नसतेच. 'शीलं परंभूषणम्' असा कोणताही सिद्ध सद्गुण नसतो की लोकांनी यांना मानसन्मानरूपी भूषण घालावे. गुणगणरूपी कनक रत्नमय भूषणे यांच्या जवळ नसतात; पण भूषणांची आवड तर असते. म्हणून सज्जनांचे दोष काढून मागे सांगितल्याप्रमाणे लोकांस दाखवित सुटतात. अशा निर्दोष काव्यात दोष दाखवून आपली सदोष पद्यरचना निर्दोष, उत्तम काव्य आहे. असे दाखविण्याचा प्रयत्न करणे हेहि परदूषण भूषण धारणच आहे, म्हणून आता सामान्य सिद्धान्त सांगतात.

हिं.- **निज कवित्त केहि लाग न नीका । सरस होउ अथवा अति फीका ॥११॥**
**जे पर भनिति सुनत हरषाहीं । ते बर पुरुष बहुत जग नाहीं ॥१२॥**

म.- **प्रिय निज काव्य न कोणा गमते । असो सुरस वा अति नीरस तें ॥११॥**
**हर्षति परिसुनि पर काव्या ही । ते वर पुरुष न बहु जगिं काहीं ॥१२॥**

अर्थ - (वाच्यार्थ) आपले स्वतःचे काव्य उत्तम रसाळ असो की अत्यंत नीरस असो ते कोणाला गोड (प्रिय, नीका, नीक-चांगले) वाटत नाही? (सगळ्यांनाच बहुधा वाटते) ॥११॥

दुसऱ्यांचे काव्य श्रवण करून सुद्धा (ही) ज्यांना हर्ष होतो असे श्रेष्ठ पुरुष जगात फार नसतात काही. (काही थोडे असतात) ॥१२॥ (गूढार्थ) - जो आपला प्रिय आहे त्याचे काव्य ॥११॥ परकाव्य = परमात्म्याचे वर्णन करणारे काव्य ॥१२॥

टीका – चौ - ११ (१) निज = स्वतःचे, आपले, आपल्या काव्यात रस, गुण, शोभा इत्यादि काही नसले तरी ते पुत्राप्रमाणे असल्याने ज्याचे त्याला ते प्रिय-गोड-वाटते यात काही विशेष नाही. स्वतः लिहिलेला सद्ग्रंथ हा एक पुत्र मानला आहे.

**'दौहित्रःपोषितः शिष्यः आरामश्च जलाशयः । सद्ग्रंथश्चैव पुत्रश्च त सप्त-पुत्राः प्रकीर्तिताः'**

मुलीचा मुलगा, पोसलेला, शिष्य, बगीचा (सर्वांसाठी) जलाशय, सद्ग्रंथ आणि पुत्र हे सात पुत्र होत. आपले शेमडे लेमडे, कोळशासारखे तेजस्वी मूल आई बापांना (लहानपणी तरी) प्रिय वाटणारच.

(क) निजकाव्य - आपल्याचे काव्य, आपल्या व्यक्तीने लिहिलेले काव्य. मानसात निज शब्द या अर्थाने पुष्कळ ठिकाणी वापरला आहे, निज म्हणजे ज्यास आपला मानला तो. ती 'किंकरी निज मानणे (१/३३६ छं) 'निजदाससम' (७/२छं)

(ख) तुलसीदासांनी संतांशी आईबापांचे नाते जोडले आहे व त्यांचे पुत्र झाले आहेतच. म्हणून त्यांना आणि भवानीशंकर व सीताराम यांना माझे काव्य आवडेल, प्रिय वाटेल हा गूढ भाव आहे.

(ग) आपल्या स्वतःच्या काव्यापेक्षा सुद्धा आपल्या बालकाने लिहिलेले मोडके तोडके काव्य फारच प्रिय वाटते व मातापिता ते इतरांस प्रेमाने दाखवीत सुटतात हा नित्याचा स्वाभाविक व्यवहार आहे. तसेच या काव्याचे होईल हा आणखी गूढार्थ आहे. 'सत्यं शिवं सुन्दरं' हा अभिप्राय काशी विश्वेश्वरांनी सही करून दिलाच पुढे.

चौ. १२ - (१) परिसुनि परकाव्याही हर्षति - 'सामान्य वाच्यार्थ प्रथम दिलाच आहे. पर-परमात्मा असा दुसरा अर्थ आहे. परमात्मविषयक काव्य म्हणजे परकाव्य. भगवंताच्या चरित्रात्मक काव्याचे श्रवण केल्याने हर्षित होणारे श्रेष्ठ पुरुष फार नसतात, ते विरळाच.

(क) पर- शत्रु, परकाव्य म्हणजे शत्रूने लिहिलेले काव्य श्रवण करून हर्ष पावणारेहि विरळाच.

'सहज वैर विसरुनि रिपु परिसुनि वानिति जीस' (१/१४ रा).

वरील भाव तुलसीदासांच्या मनात नव्हता असे आता म्हणवेल काय? अशाप्रकारचे काव्य निर्माण करण्याची इच्छा आहे की शत्रूंनी सुद्धा, ते श्रवण केल्यावर, त्याची वाहवा करावी.

(ख) वरील शेवटचा अर्थ घेण्याचे कारण हेच की तुलसीदासांच्या काळी काशीत प्राकृतात, मातृभाषेत भगवद्विषयक रामायणासारखे काव्य- ग्रंथ लिहिणे हा अधर्म मानला जात असे. एकनाथ महाराजांना काशीत हा अनुभव आलाच.

(ग) दुसऱ्यांचे, शत्रूने लिहिलेले वा परमात्मविषयक काव्याने ज्यांना हर्ष होतो ते पुरुष श्रेष्ठ. या विधानास पुढील चौपाईने दृष्टान्ताने पुष्ट करतात.

हिं.- जग बहु नर सर सरि सम भाई । जे निज बाढि बढहिं जल पाई ॥१३॥
सज्जन सकृत सिंधु सम कोई । देखि पूर बिधु बाढै जोई ॥१४॥

म.- बहु नर सर सरि सम जगिं राहति । जे निज जल-वृद्धिनेच वाढति ॥१३॥
सज्जन सकृत सिंधुसम कोणी । ज्यास वृद्धि विधु पूर्ण बघोनी ॥१४॥

अर्थ - आपल्या स्वतःमधील पाण्यात भर पडल्याने स्वतःच वाढणारे तलाव व नद्या जशा जगात पुष्कळ तसे (आपल्याच काव्यानेच आनंदाला पूर येणारे) लोक जगात पुष्कळ ॥१३॥ पण चंद्राची पूर्ण वृद्धि पाहून वाढणारा जसा एक सागरच तसा एखादाच सज्जन असतो (जो दुसऱ्याची भरभराट, काव्य, महती पाहून, ऐकून आनंदित होतो ॥१४॥

टीका – (१) सर सरि (नदी) या अर्थ लहान जलाशय व मोठा जलाशय असा काही टीकाकार करतात. पण तो विसंगत आहे, कूपमंडूक वृत्तीचा द्योतक आहे. मानस सुपीरिअर वगैरे मोठाले तलाव मोठमोठ्या सदाजल सरितांचे जनक आहेत. फार तर एवढे म्हणता येईल की पुष्कळशा तलावांचे पाणी सागरास मिळत नाही. तथापि काही नद्याही अशा आहेत की त्यांच्या जलाला समुद्रदर्शन होत नाही. हा भेद सुद्धा येथे आवश्यक नाही, कारणकी कवींना दोहोंमधील एकाच सामान्य धर्माचे विवेचन करावयाचे आहे व ते पुढील चरणांतच सांगितले आहे.

(२) पाऊस पडून किंवा अन्य कारणाने पाण्यात भर पडली म्हणजेच नद्यांना पूर येतात व तलाव भरतात व कदाचित वाहू लागतात. सागराचे तसे नाहीं, कितीही पाणी आत आले तरी त्याला पूर येत नाही किंवा भरती येत नाही, परंतु चंद्राची ज्या प्रमाणात वृद्धि होईल त्या प्रमाणात त्याला भरती येते, तो वाढतो, दूरवर पसरतो. चंद्राची पूर्ण वृद्धि झाली की त्याची पूर्ण वृद्धी होते. पण असा एकटा सागरच. दुसऱ्यांची वृद्धि, भरभराट, सुख, चांगले काव्य वा भगवत्कथा काव्यादि पाहून वा ऐकून अधिकाधिक आनंदित व सुखी होणारे फक्त संतच. हा बाह्यार्थ झाला.

(३) गूढार्थ - पूर्णचंद्राच्या दर्शनाने सज्जन-सागरास भरती पूर्णभरती येते हे येथे ठरले.

'राका रजनी भक्ति तव राम नाम तो सोम' (३/४२) म्हणून रामनाम हाच पूर्णचंद्र. भाव हा की ज्या काव्यात रामनामरूपी पूर्णचंद्र प्रकाशमय झाला आहे त्या काव्यास पाहून साधुसंतांना आनंदाची भरती येते. व ते रामचरित्ररूपी चंद्रकिरणांना जिकडे तिकडे पसरतात.

'रामचरित राकेश-कर सदृश सुखद सर्वास । सज्जन कुमुद चकोर मन हितकर अति लाभास' (१/३२).

संगति - हा येथे गूढ ठेवलेला भागच. पुढे (दो. ९-१०) प्रगट करतील. रामनामविरहित काव्याने संतांना आनंद होत नाही. मागील चौपायांत वर्णन केल्याप्रमाणे विचार केल्यावर आपल्या रंक मनास काय वाटले ते आता दोह्यांत सांगतात.

हिं.दो.- **भाग छोट अभिलाष बड करउँ एक बिस्वास ... ॥**
**पैहहिं सुख सुनि सुजन सब खल करिहहिं उपहास ॥८॥**

म.दो.- **भाग्य अल्प अभिलाष अति एक असे विश्वास ।**
**श्रवणे संत सुखावती खल करितिल उपहास ॥८॥**

अर्थ – माझे भाग्य अगदी अल्प असून अभिलाषा (अभिलाष-इच्छा) फार मोठी (अति) आहे, परंतु एक अति विश्वास वाटतो की (माझे काव्य) श्रवण

करून संत सुख पावतील सुखी होतील व खल मात्र त्याची थट्टा करतील, टर उडवितील. ॥८॥

टीका – (१) भाग्य अल्प अभिलाष अति - (क) भाग्य अल्प, थोडे आहे याचे प्रत्यक्ष प्रमाण मन मति रंक आहेत हे, काव्याची माहिती नाही व साधने नाहीत, बरे आपल्या कुवतीच्या प्रमाणात अभिलाष असावा तर तसेहि नाही, मनोरथ राजा आहे. अशी बुद्धि होणे, हेहि मंद भाग्याचेच लक्षण. तथापि एक पक्का भरवसा आहे संतांचा. त्याच भरवशावर हात घातला आहे दुष्कर कार्यास. (प्रज्ञानानंदाने मात्र ही टीका लिहिण्याची इच्छा कधी केली नाही. पण 'नट मर्कटा तसा प्रभु नाचवि;' व एक मोठा विश्वास बाबा गंगादासांच्या कृपाशीर्वादाचा).

(२) सज्जनांस सुख होईल असा विश्वास कशाने उत्पन्न झाला? रामनामरूप शरत्प्राकाशशीने, हेच त्याचे उत्तर. रामनाम हे कवितावधूचे वस्त्र आहे; त्या सुन्दर वस्त्राने माझी कविता कुमारी भूषित असणारच. कारण की माझे मुख्य भांडवल ते आहे. 'कलि केवल मलमूल मलीन' असल्यामुळे 'रामनाम अवलंबन, आन न' हाच भाव दो ९ व त्यापुढे सांगणार आहेत.

(क) खल करितिल उपहास - रामनाम विभूषित ही कविताकुमारी आहे, वियस्त्र नाही, किंवा त्यांना आवडणारे 'विषय कथारस नाना' येथे नाहीत. व न आवडणाऱ्या संत-हरि-गुणकथा यात असणार, तेव्हा त्यांनी उपहास केला तर त्यांचा दोष नाही, तो त्यांचा स्वभाव आहे. खल परिहासाने काय होईल ते पुढे सांगतात.

हिं.- खल परिहास होइ हित मोरा । काक कहहिं कलकंठ कठोरा ॥१॥
म.- खल परिहासे हित मम थोरचि । काक कथिति कलकंठ कठोर चि ॥१॥

अर्थ - खलांनी केलेल्या परिहासाने माझे हितच होईल, कावळे म्हणतात, सांगतात, की कल-कंठ (कोकिळेचा स्वर) कठोर आहेच. ॥१॥ (कलकंठ-कोकिळ)

टीका – पूर्वी सांगितले की सज्जनांना सुख होईल व खल उपहास करतील. बाकी राहिलेला जो बहुजनसमाज त्याचा स्वभाव असा असतो की चांगले लोक ज्या मार्गाने जातील तिकडे जावयाचे.

'यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरोजनः । स यत् प्रमाणं कुरुते लोकस्तदनु-वर्तते ॥ (भ.गी.) म्हणून बहुजन समाजही माझ्या काव्याचे ग्रहण करील व सुख पावेल.

(क) चांगल्याचा उपहास, थट्टा करण्यात खल सुख मानतात, त्यामुळे त्यांनाही सुख होणारच, याप्रमाणे उत्तम, मध्यम व नीच या सर्वांनाच माझे काव्य सुखद होईल. ज्यांची कृति सर्वांस सुखद असते, सर्वांचे हित करणारी असते त्यांचे कधी अहित होतच नाही.

'त्या कधिं दुःख कि साधि लोकहित । तो किं दरिद्रि परीस करी स्थित' (७/११२/१)

(२) काक ... कठोरचि - कावळ्यांनी जरी पुष्कळ म्हटले की कोकिळेचा स्वर-कंठ कठोर आहे, तरी कलकंठ शब्दाचा अर्थ कल म्हणजे सुंदर, मधुर आहे - आवाज ज्याचा तो, असा आहे, तो काही बदलू शकत नाही. कावळ्याचा आवाज कसा असतो हे सर्वच जाणतात, त्यामुळे लोक समजतात की ही त्याची व्यर्थ काव काव आहे. कावळ्याचे ओरडणे कोणासच आवडत नाही आणि नकोसे वाटते. यामुळे खलांच्या हसण्याचा खरा अर्थ लोक समजतील व त्यामुळे हे काव्य लोकांस प्रिय होईल. त्या ग्रंथाला हात लावू नका असा प्रचार खलांनी सुरू केला की उलट लोकांची जिज्ञासा वाढेल व ते मुद्दाम श्रवण करतील. येथे सुचविले की काव्य कर्णमधुर व कोकिळेच्या आलापासारखे होईल. आणखी दृष्टान्त देऊन काव्यगुण सुचवितात.

हिं.- हंसहि बक गादुर चातकही । हँसहि मलिन खल बिमल बतकही ॥२॥
म.- हंसा बक चातकास वाघुळ । विमल कथेला हसति मलिन खल ॥२॥

अर्थ - बगळे हंसांना आणि वाघळे चातकांस हसतात तसेच मलिन खल विमल कथेला हसतात (हसणार) ॥२॥

टीका – (१) पूर्वी कावळे कोकिळ दृष्टान्त घेतला त्या दोघांत रूपसाम्य पण वाणीत तमप्रकाशासारखा भेद. येथे बगळे हंस हा एक रूप-वर्णसाम्याचा दृष्टान्त असला तरी भेद वाणीचा दाखवावयाचा नसून मानसिक प्रवृत्तींचा दाखवावयाचा आहे. हंस नीरक्षीर विवेक संपन्न असतात, मोत्ये खातात व मानस सरोवरात असतात. बगळे दंभी, डबक्यात, डबक्याजवळ राहणारे व मासे खाणारे. या दृष्टान्ताने सुचविले की या काव्यात सर्वप्रकारचा विवेक असणार व दंभाला प्रोत्साहन मिळणार नाही व यात मोत्यांसारखे मूल्यवान, पवित्र मानसान्न पोटभर मिळेल.

'यश तुमचे मानस विमल हंसिनि जिव्हा ज्याचि । मुक्ताफळ गुणगण टिपी राम रहा हृदिं त्याचि' (२/१२८)

(क) बगळे- दंभी कपटी आणि हंस सरळ; हे काव्य सरलता गुणाने युक्त होईल हे सुचविले.

(२) चातकास वाघुळे हंसतात - वाघूळ - वटवाघुळ दोघांच्या वर्णसाम्याशिवाय इतर सर्वगुण विरुद्ध असतात. चातक पक्षी आहे व तो एकांगी अनन्यभक्तीचे उत्तम प्रतीक आहे. वाघळे कुविचारांची खाण, स्वतःचा मळ स्वतः भक्षण करणारी, उलटी टांगून लोंबकळत राहणारी, रात्री संचार करणारी, चोर, कर्कश आवाज,

आपापसात भांडणारी, इतर दुर्गुणांनी भरलेली, धड पशु नाहीत की धड पक्षी नाहीत. या दृष्टान्ताने सुचविले की अनन्य प्रेमभक्तीने हे काव्य भरलेले असेल. (३) विमल कथेला मलिन खल हंसतात. सुचविले की या कथेत मल- दोष मुळीच नसेल व ही विशेष निर्मल असेल. विषयकथामल व काममल असणार नाही. (क) विमलकथा म्हणजे रामकथा, 'विमल कथा हरिपददायिनी' जी हरिपद देण्यास समर्थ असेल अशी रामकथा तयार होईल.

'विमल कथेच्या कृत आरंभा । श्रवत विनाश काम मद दंभा ।' (१/३५/६). ज्या कथेने काममदादिकांचा नाश होतो, तिला कावळे, बगळे, वाघळे हसणारच. ल. ठे. प्रथमावृत्तीचे वेळी गादुर-चमगादुर-वटवाघुळ, हा पाठ मिळाला नव्हता. मा. पी. मध्ये तो दिसला; व तेथे दिलेल्या कारणांपेक्षा अधिक सबळ पुरावे मानसातच उपलब्ध झाले म्हणून हा पाठ सयुक्तिक व आवश्यक वाटल्याने येथे घेतला.

'हरिगुरुनिंदक दर्दुर होतो.' 'द्विज निंदक बहु नरकां भोगुनि । जगी जन्मतो वायस होउनि ॥'

'होति उलूक संत निंदारत ॥' निंदितात जे जड सर्वांनां । वटवाघुळ अवतार तयांना॥ (७॥१२१।२३-२७).

वटवाघुळ सर्वांची निंदा करणारे असते. त्यात बेडुक, कावळे, उलूक इत्यादि निंदकांचे सर्व अवगुण आहेत, म्हणून सर्वांची निंदा करणारास ही उपमा दिली आहे.

(क) चातक पक्षी नभचर, वाघुळ नभचर, चातकाची चोच वर तर याचे पाय वर तोंड खाली, चातक स्वाती जलबिंदु आपोआप चोचीत पडले तरच जल पिणार, याला डबक्यातले सुद्धा चालते; चातक एकनिष्ठ, हा व्यभिचारी, चातकाची कवि स्तुति करतात; या सर्व विरुद्ध धर्मांमुळे वटवाघुळे चातकास हसतात. हे स्वाभाविक आहे. बेडुक बहुधा जलचर, तो चातकाला कशाला हसतो! या व इतर सबळ पुराव्यांमुळे 'गादुर' (वाघुळ) पाठ ग्राह्य ठरला. हाच सर्वात जुन्या पोथ्यांत सापडतो असे मा. पी. त म्हटले आहे. आणखी कोण हसतील ते आता सांगतात,

हिं.- कबित रसिक न राम पद नेहू । तिन्ह कहँ सुखद हास रस एहू ॥३॥
भाषा भनिति भोरि मति मोरी । हँसिबे जोग हँसें नहिं खोरी ॥४॥

म.- रति न रामपदिं काव्य रसिक नहिं । कथा हास्यरस सुखद तयांसहि ॥३॥
मम मति भोळी प्राकृतिं रचना । हसण्या योग्य हसोत दोष ना ॥४॥

अर्थ - जे काव्यरसिक ही नाहीत व रामचरणी स्नेह (नेहू) नाही त्यांनाही हे काव्य हास्यरसमय वाटून सुखदायक होईल ॥३॥ (कारण) एकतर प्राकृत (मातृभाषा) भाषेत ग्रंथ व त्यातही माझी बुद्धी भोळी-भाबडी (चतुर नाहीं); म्हणून कोणी हसले तर हसू द्या, त्यात त्यांचा दोष मुळीच नाही; त्यांनी हसण्यायोग्यच हे आहे ॥४॥

सूचना - जगात संत, दुर्जन व इतर असे तीन वर्ग मुख्य असतात. या तिसऱ्या वर्गात अनेक प्रकार आहेत; त्यांना हे काव्य कसे वाटेल हे येथून चार चौपायात सांगून, सातवीत सज्जनांचा उल्लेख उपसंहाररूपाने करतील.

टीका – चौ - ३ (१) या हिंदी चौपाईतील व हे पद देहलीदीपकाने न घेता कोणी अर्थ करतात तो अनुचित असल्याने अनुवाद निःसंदिग्ध केला आहे.

(क) रति न रामपदिं काव्यरसिक नहि. यातील दोन्ही गोष्टी रामपदिं रति व काव्य रसिकता असतील व (पुढील संदर्भात) हरिहरभेदभावना नसेल, कुतर्क नसेल व कुशाग्र बुद्धी असेल त्याला हे काव्य सर्व प्रकारचे उत्तम सुख देईल.

(ख) रामपदीं रति नसून जे काव्यरसिक आहेत त्यांना काव्यातील विविध रस मिळतील व सुख मिळू शकेल.

(ग) या दोन्ही गोष्टी ज्यांच्या जवळ नाहीत त्यांना हास्यरस मिळू शकेलच, कारण की ते या काव्यास हसतील त्याने त्यास सुख होईल.

(घ) रामपदीं रति आहे पण काव्य रसज्ञ नाहीत त्यांना सुद्धा ही कथा सुखद होईल. (हे प्रत्यक्ष सिद्ध आहे. तुलसीमानस, ज्ञानदेवी, तुकारामांची गाथा वगैरे ग्रंथांच्या भक्तांत अशांचाच भरणा मोठा)

चौ. ४ - माझे काव्य (भाषा-हिंदी, प्राकृत) प्राकृतात असल्यामुळे व त्या भाषेत असे काव्य करण्याची फारशी पद्धती नसल्यामुळे संस्कृतज्ञ हसतील व म्हणतील की यांना संस्कृत येत नव्हते म्हणून पंडितात मानसन्मान मिळणे अशक्य झाल्याने भोळ्याभाबड्या लोकांत, मोठेपणा मिळवून प्रसिद्धीस येण्यासाठी लिहिले असे म्हणून निंदा करतील. तथापि यात त्यांचा काही दोष नाही, त्यांनी हसणे योग्यच आहे.

वि. सू. हे गोस्वामींचे म्हणणे त्यांच्या संतवृत्तीला साजेसेच आहे. कारण संत दुसऱ्यांना दोष न देता सर्व दोष आपणांकडेच घेतात; तथापि सद्ग्रंथांची व संतांची निंदा निंदकालाच हानिकारक होते.

हिं.- प्रभु पद प्रीति न सामुझि नीकी । तिन्हहि कथा सुनि लागिहि फीकी ॥५॥
हरिहरपदरति मति न कुतरकी । तिन्ह कहुँ मधुर कथा रघुबर की ॥६॥
रामभगति-भूषित जियँ जानी । सुनिहहिं सुजन सराहि सुबानी ॥७॥

म.- ग्राहक शक्ति हि ना प्रभुपदरति । कथा निरस ही श्रवणिं तयांप्रति ॥५॥
हरिहरपदरतिं मति न कुतर्की । त्यांही रघुबर कथा मधुर कीं ॥६॥
रामभक्तिभूषित मनिं जाणुनि । परिसति सुजन सुबाणी वानुनि ॥७॥

अर्थ - ज्यांच्या ठिकाणी प्रभुचरण प्रेम नाही व अर्थग्रहण शक्ती ही नाही त्यांनी ही कथा श्रवण केली तर त्यांना ही रघुवरकथा निरस वाटेल ॥५॥ ज्यांची बुद्धी तर्कटी नाही आणि जे शिवविष्णुभक्तिमान आहेत त्यांना ही रघुवर कथा मधुर

वाटेल ॥६॥ (ही कथा) रामभक्तिने विभूषित आहे. हे मनात जाणून संत श्रवण करतील (एवढेच नव्हे तर) ऐकताना प्रशंसा करतील की वाणी सुंदर आहे. ॥७॥

टीका — चौ-५ (१) ग्राहकशक्ति हि ना प्रभुपदरति - या दोन गुणांपैकी एक जरी असला तरी ही कथा सरस वाटेल हे सुचविले.

(क) आणखी सुचविले की यात रामप्रेमरस व नवरस भरपूर असतील.

'नवरस जपतप योग विरागा । ते सब जलचर चारु तडागा' (१/३७/१०)

(ख) 'अनुपम अर्थ सुभाव सुभाषा । गणु पराग मकरंद सुवासा ॥' (१/३७/६) अर्थ, भाव व भाषा समजण्याची शक्ती म्हणजेच ग्रहण शक्ती. ही असेल तर म्हणजेच श्रोते काव्यरसिक असतील तर त्यांस नीरस वाटणार नाही.

(ग) किंवा ज्याचे रामपदीं प्रेम आहे त्यास ग्रहणशक्ती नसली तरी त्यास रस मिळेल, नीरस वाटणार नाही. त्यास भक्तिरस मिळेल.

(घ) दोन्ही असतील त्यास ही कथा पूर्ण सरस वाटेल कारणकी ते भावमकरंद पानही करू शकतील. भगवत्प्रेम नसेल त्यासही गूढ भाव कळणार नाहीत व प्रेम असून पांडित्य-ग्रहणशक्ती नसेल तरीही अर्थ व भाव समजणार नाहीत. हेच पुढील चौपाईत स्पष्ट सांगतात.

चौ. ६ - (१) हरिहरपदरति मति न कुतर्की - (क) 'हरिहरपदरति ने'. सुचविले की जे हरि व हर यात भेद मानणारे असतील त्यास ही कथा मधुर- गोड- वाटणार नाही; कारण या कथेत दोघांचे अभिन्नत्व दाखविलेले असणारच. असा भेदभाव मानणारे कुतर्क करू लागतील. (असे कुतर्क व त्यामुळे वर्तमानपत्री वादविवाद अयोध्येतसुद्धा प्रत्यक्ष वावरताना दिसतात हल्ली.)

(ख) भाव हा की जे शिवोपासक किंवा रामोपासक असून रामद्रोह वा शिवद्रोह करीत नाहीत ते कुतर्क करणार नाहीत.

'शंकर भजन विना नर भक्ती न मम लभतात' (७/४९)

'शिवद्रोहि मम भक्त म्हणवतो स्वप्निंहि तो नर मज न पावतो'

'शंकरविमुख भक्ति मम वांछति । तोहि नारकी मूढ अल्पमति ॥' (६/२/७-८)

(ग) मति न कुतर्की - हरिहरपदरति असून सुद्धा हरचरित्र किंवा हरिचरित्र श्रवण करताना कुतर्क करण्याची सवय असेल तर रघुवरकथा मधुर वाटणार नाही. शास्त्रविरुद्ध तर्क म्हणजे कुतर्क-दुस्तर्क. 'दुस्तर्कात् सुविरम्यताम् श्रुतिमतस्तर्कोऽनु संधीयताम्' (सा. पं.) नानापुराणनिगमागम-संमत जे तर्क ते सुतर्क, त्याहून इतर ते कुतर्क.

(घ) मागल्या चौपाईत 'कथा' म्हटले म्हणून रघुवर शब्दाने अर्थ स्पष्ट केला. भरतादिक सुद्धा रघुवरच आहेत, म्हणून पुढे रघुनाथ, रघुपति हे शब्द हळुहळु येतील.

चौ. ७. (१) सज्जनानां संतानां - काव्यरसाची फारशी अपेक्षा नसते. ज्यात रामभक्ती भरपूर आहे. ते काव्य कसेही असले तरी त्यास आवडते; व ते त्याची वारंवार प्रशंसा करतात व ऐकतात, ऐकतात आणि वाहवा करतात.
(क) या ग्रंथाचे विविध अधिकारी कोण हे येथवर दाखविले. (१) खल व रामभक्तिहीन साहित्यिक-पंडित हे अधम अधिकारी.
(२) रामभक्तीयुक्त मूढ - अशिक्षित कनिष्ठ अधिकारी. (३) हरिहरपदरतिमति न कुतर्की मध्यम अधिकारी. (४) संत उत्तम अधिकारी.
'विशेषता ही त्यां सुखदायक प्राणप्रिय ज्यां श्री रघुनायक' (७/१२८/८) इत्यादि पुष्कळ अवतरणे आहेत.

हिं.- कवि न होउँ नहिं बचन प्रबीनू । सकल कला सब बिद्या हीनू ॥८॥
आखर अरथ अलंकृति नाना । छंद प्रबंध अनेक बिधाना ॥९॥
म.- कवि न, वचनिं मी नसे प्रवीणू । सकल कला सब विद्या, हीनू ॥८॥
नाना अर्थ अलंकृति अक्षर । विविधा छंद-प्रबंध सुंदर ॥९॥

अर्थ - मी कवि नाही व भाषाशास्त्रांत प्रवीण (पंडित कोविद) नाही व मी सकल कलाहीन व सर्व विद्याहीन आहे ॥८॥
अक्षरे, विविध अर्थ, नाना प्रकारचे अलंकार (अलंकृति) व नाना प्रकारच्या छंदांची - वृत्तांची सुंदर रचना (प्रबंध) (इत्यादि मला काहीच माहीत नाही). ॥९॥
टीका — चौ - ८ (१) 'कवि न, वचनि मी नसे प्रवीणू (प्रवीण) - (क) कवि न - कवि = काव्य लिहिणारा, करणारा. ज्या वाक्यरचनेने रस या मनोवेगाच्या योगाने कल्पना व अन्तःकरण द्रवित करून त्या त्या रसांचा व भावांचा रंग हृदयास- चित्तास दिला जातो ते काव्य.
(ख) वचनिं प्रवीणू - भाषाशास्त्रांत निपुण. शब्द, त्यांचा अर्थ, अर्थाची व्याप्ति, वाक्यरचना, व्याकरण, व्युत्पत्ति इत्यादि अनेक गोष्टींचा संबंध भाषाप्राविण्याशी येतो. हनुमन्ताचे भाषण ऐकून राम म्हणाले.
नानृग्वेदविनीतस्य नायजुर्वेदधारिणः । नासामवेदविदुषः शक्यमेवं प्रभाषितुम् ॥२८॥
नूनं व्याकरणं कृत्स्नमनेन बहुधाश्रुतम् । बहुव्याहरतानेन न किंचिदपशब्दितम् ॥२९॥
न मुखे नेत्रयोर्वाऽपि ललाटे च भ्रुवोस्तथा । अन्येष्वपिच गात्रेषु दोषः संविदितः क्वचित् ॥३०॥
अविस्तरमसंदिग्धं अविलम्बितमद्रुतम् । उरस्थं कण्ठगं वाक्यं वर्तते मध्यमे स्वरे ॥३१॥
संस्कार क्रमसंयुक्ता मद्रुतामविलंबिताम् । उच्चारयति कल्याणीं वाचं हृदयहारिणीम् ॥३२॥ (वा.रा. ४/३)
भाषण प्राविण्य प्राप्त होण्यास ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद यांचे उत्तम अध्ययन पाहिजे. व्याकरणशास्त्रपारंगत होऊन व्याकरण दोषवर्जित रचना साधली पाहिजे.

अश्लील शब्दांचा उपयोग करता नये. विस्तार किंवा संक्षेप फार नसावा व वाक्यरचना असंदिग्धार्थ झाली पाहिजे, अति घाई, अति सावकाश बोलणे, नाक, तोंड, डोळे व इतर अवयव यात, बोलताना दोष उत्पन्न न होणे, क्रमभंग न करणे वगैरे गुणांची आवश्यकता भाषा प्राविण्य मिळविण्यास आहे. म्हणूनच पुढील चरण.
(२) सकल कला सब बिद्या हीनू - (क) सकलकला - कला शब्दाचा अर्थ चौसष्ट कला असा पुष्कळ टीकाकार घेतात; पण तो येथे नाही. येथे कला शब्दाने काव्यनिर्माण कला हाच अर्थ घेणे जरूर आहे. अक्षरकला, शब्दकला, अर्थकला, ध्वनिकला, रसकला, अलंकारकला, माधुर्यादि गुणकला, रीतिकला इत्यादि अनेक कलांचा अंतर्भाव काव्यकलेत होतो. व यांचाच निर्देश पुढील चौपायात करतात.
(ख) सब विद्या - विद्या १४ आहेत. 'पुराणन्यायमीमांसा- धर्मशास्त्रांग मिश्रिताः) वेदाः स्थानानि विद्यानां धर्मस्यच चतुर्दश; पुराणे, न्यायशास्त्र, मीमांसा (पूर्व व उत्तर) धर्मशास्त्र. (मनुस्मृति प्रमुख स्मृतिग्रंथ) वेदांची शिक्षा कल्पव्याकरण निरुक्त छंद व ज्योतिष ही सहा अंगे व चारी वेद मिळून १४ विद्या आहेत. पुढल्या चौपाईत काव्यकलेच्या अंगांचाच विचार आहे.
चौ. ९ (१) नाना अर्थ - (क) वाच्यार्थ - जो शब्द वा वाक्य ऐकल्यावर शब्दांच्या रूढार्थाने कळतो.
(ख) लक्ष्यार्थ - मुख्यार्थाला सोडून लक्षणेने दुसरा घ्यावा लागतो.
(ग) व्यंजकार्थ - जो शब्दांच्या अर्थाहून अधिक अर्थ निघतो तो. यात पुन्हा भेद आहेत.
(२) अलंकृति - अलंकार; रमणीय रूपात अर्थ व्यक्त करणे म्हणजेच अलंकार वापरणे. शब्दालंकार व अर्थालंकार असे यात मुख्य दोन वर्ग आहेत. शब्दांचा विशिष्ट रचनेने वाक्यांचे, वृत्तांचे, सौंदर्य वाढवून ती मनोहर करणारा तो शब्दालंकार, हे थोडे आहेत. अर्थालंकार पुष्कळ आहेत. यांच्या संख्येबद्दल अलंकार शास्त्रज्ञात मतभेद आहेत. बावीस, एकतीस, अडतीस, ३९, ७९, ६७ व १०४ इत्यादि अनेक मते आहेत. एकाच वाक्यांतील अलंकाराबद्दल अनेकांची विविध मते होऊ शकतात; म्हणून 'नाना' शब्द अलंकृतिचेहि विशेषण घेणे जरूर आहे. अलंकार अपार नाहीत. अलंकारांचा प्राण उपमा आहे.
(क) तुलसीरामायणांतील मुख्य आणि पोटभेद मिळून शंभर अर्थालंकारांची उदाहरणे त्यांच्या व्याख्यासहित 'मानस प्रसंग' या हिंदी पुस्तकात दिली आहेत.
(३) छंद-प्रबंध - वृत्तांची रचना. मात्रावृत्ते व अक्षरगण वृत्ते असे मुख्य दोन प्रकार आहेत. एकाक्षरी चरणापासून ३२ अक्षरें किंवा मात्रांच्या चरणांच्या वृत्तांना छंद म्हणतात. व ३२ पेक्षा जास्त मात्रा किंवा अक्षरे असणारास प्रबंध, दंडक म्हणतात).
छंदांचे ९६ कोटी भेद आहेत असे नागसूत्रात म्हटले आहे. (मा. पी.) मराठी वृत्तदर्पण वगैरे पुस्तकात आठ अक्षरांहून कमी अक्षरांची वृत्ते दिलेली नाहीत.

प्रज्ञानानंदाने ४,६,७ व २३, २४, २५ अक्षरी चरणांची वृत्ते लिहिली आहेत, पण त्यास नावे द्यावयाची राहिली आहेत. म्हणून येथे ते नमुने नकोत. (हस्तलिखितांत आहेत.) पिंगलसूत्र हा छंदःशास्त्राचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. काही छंद (वृत्तें) काही विशिष्ट रसादिकांच्या वर्णनात विशेष उपयोगी पडतात, तर काही गतिनिदर्शनात.

हिं.- भाव भेद रस भेद अपारा । कबित दोष गुण बिबिध प्रकारा ॥१०॥
कबित बिबेक एक नहिं मोरें । सत्य कहउँ लिखि कागद कोरें ॥११॥

म.- अनु. भावभेद रसभेदां पार न । काव्य दोष-गुण बहु, अट्ठावन ॥१०॥
काव्य-विवेक न एकहि मातें । सत्य लिहीं नव-कागदिं न्हातें ॥११॥

अर्थ - भावांचे भेद व रसांचे भेद यांना तर पार नाही. (ते अगणित आहेत), तसेच काव्याचे दोष व गुण पुष्कळ आहेत, आठ्ठावन आहेत असे कोणी म्हणतात ॥१०॥ (असे जे अनेक प्रकारचे ज्ञान काव्यनिर्मितीस लागते-) यातील एकाही प्रकाराचे ज्ञान मला (माझे) नाही, हे मी कोऱ्या (नव्या) कागदावर सत्य (प्रतिज्ञापूर्वक) लिहून देतो. ॥११॥

टीका — चौ. १० (१) भावभेद - भावाचे मुख्य चार भेद आहेत. रसाचे जे उल्लसित स्वरूप त्यालाच भाव म्हणतात. स्थायीभाव, विभाव, अनुभाव व संचारी भाव हे मुख्य.

(क) स्थायीभाव - जो भाव कायमचा किंवा दीर्घकालपर्यंत चित्तांत टिकणारा असतो तो, उदा. विवाह झाल्यापासून स्त्रियांच्या चित्तांत स्थायीभाव असतो. रति, शोक, उत्साह, क्रोध, जुगुप्सा (किळस) आश्चर्य, भय, शान्ति, भक्ति, प्रेम हे स्थायीभाव आहेत. यातील बहुतेक भाव अहंता व ममता यांच्यामुळे, अज्ञानामुळे असतात व ते ज्ञान-विज्ञान व हरिभक्ति प्राप्तीशिवाय जात नाहीत.

(ख) यातील एखादा विशिष्टभाव ज्या कारणांनी क्रियाशील होतो ती कारणे. याचे आलंबन-विभाव व उद्दीपन विभाव असे दोन प्रकार आहेत. आलंबन म्हणजे आधार, आश्रय. उदा. नायक आणि नायिका, परस्परांचे आलंबन असतात. आलंबनाविषयीं चित्तांत असलेला भाव उद्दीपित होण्याचे जे कारण, तो उद्दीपन विभाव. लहान मुलाचे बोबडे बोल आईच्या ठिकाणचा वात्सल्यभाव उद्दीपित करण्याचे कारण होतात.

(ग) अनुभाव - विशिष्ट स्थायीभाव उद्दीपित, क्रियाशील, झाल्यावर त्या विकाराचा अनुभव गुण किंवा क्रियारूपाने बाहेर दिसतो तो अनुभाव. उदा, पुत्राचा प्रताप, कीर्ति इत्यादि ऐकताच मातेच्या डोळ्यांत आनंदाश्रु व शरीरावर रोमांच येणे. हे सात्विकभाव आठ गणले आहेत. स्तंभ, स्वेद, रोमांच, वैवर्ण्य, स्वरभंग, वेपथु (कंप) अश्रु व प्रलय (मूर्छा किंवा मरण). हे कसे उत्पन्न होतात याची चर्चा अरण्य दो. १६च्या टीकेत पहावी.

(घ) जे रसांना विशेष पुष्ट करून त्यात संचार करतात ते संचारी भाव. हे रसाच्या सिद्धीपर्यंत राहत नाहीत. हे ३३ समजले जातात. निर्वेद, ग्लानि, शंका, असूया वगैरे, या सर्वांविषयी सविस्तर माहिती काव्यशास्त्र ग्रंथात पाहावी. बहुजनसमाजास हा विषय कंटाळवाणा असल्याने येथे विस्तार नको. कोष्टक रूपाने मा. पी. पाहणे.

(२) रसभेदां पार न (अपार, अपारा) रसांच्या परस्पर संमिश्रणाने रसांचे व भावांचेहि अगणित भेद होऊ शकतात म्हणून अपार म्हटले.

(क) रसभेद-शृंगार, वीर करुणा, अद्भुत, हास्य, भयानक, बीभत्स, रौद्र व शांत हे नऊ रस (नवरस) गणले जातात. भक्ति हा कोणी स्वतंत्र दहावा रस मानतात. श्रीमधुसूदन सरस्वतींनी आपल्या भक्तिरसायन ग्रंथात याला स्वतंत्र मानला आहे. वात्सल्याचा अंतर्भाव भक्तिरसात करणे योग्य. कोणी भक्तीचा अन्तर्भाव शान्तरसात व वात्सल्याचा शृंगाररसांत करतात. प्रेमाचे, भक्तीचे-एकांगी, परस्परसापेक्ष व स्वार्थी म्हणजेच उत्तम, मध्यम व कनिष्ठ असे तीन प्रकार आहेत. मानसात भक्तिरस स्वतंत्र गणलेला आहे.

(३) काव्यदोषगुण - (क) काव्यदोष - कोणी ३६ कोणी ४८ असे भिन्न भिन्न गणले आहेत. कोणी पदगत, वाक्यगत व वाक्यार्थगत असे तीन मुख्य मानून प्रत्येकाचे १६/१६ प्रकार मानतात. कोणी शब्दगत, अर्थगत व रसगत असे तीन भेद मानून प्रत्येकाचे अनेक भेद सांगतात.

(ख) काव्यगुण - कोणी २४, कोणी १० व कोणी तीनच मानतात. माधुर्य, ओज व प्रसाद हे तीन मुख्य गुण होत. ज्या वाक्याच्या श्रवणाने चित्त चटकन द्रवते व ज्यात मधुर वर्णांचाच भरणा जास्त असतो तेथे माधुर्यगुण असतो. ज्या वाक्यातील शब्दांच्या उच्चारण्या बरोबर चित्तांत ओज वाढेल; उत्साह, वीर्य, शौर्य इत्यादि वाढतील, तेथे ओज गुण असतो. जेथे अर्थग्रहण अगदी सहज सुलभ असते, तेथे प्रसाद गुण असतो.

(ग) अठ्ठावन - दोष ४८ व गुण १० मिळून ५८ दोष गुण बरेच साहित्यिक मानतात.

चौ. ११ - (१) या चौपाईवर शंकासमाधानांची गर्दी झालेली दिसेल. मानसात 'मोरें'चा अर्थ माझे असा अनेक ठिकाणी आहे. 'मोरें मन प्रभु अस बिस्वासा। राम ते अधिक राम कर दासा' (७/१२०/१६) मोरें मन = माझ्या मनात. मोरें = माझे हा अर्थ घेतला म्हणजे शंकेला जागाच राहत नाही.

(क) तुलसीदासांसारखे भक्त अत्यंत लीन असले तरी आपली दीनता प्रगट करण्यासाठी कोऱ्या कागदावर सत्य-प्रतिज्ञा लेख लिहून देणार नाहीत. लीनतेमुळे असे म्हटले असे मानणे म्हणणारे असत्यभाषी आहेत असे ठरविणे आहे; व असे मानणाऱ्यास मानसातील भक्तिसिद्धांत रहस्य कळले नाही व ज्ञानरहस्य अवगत नाही असे ठरेल.

'गुण तुमचे समजे निज दोषां । ज्या तुमचा सर्वस्वि भरोसा ।' (२/१३१/३) हे भक्तलक्षण आहे. तुलसीदास सांगतात की तुम्हांस जे काव्यगुण मानसात दिसतील ते माझे नाहीत !
(दोषांचा अभाव हा गुणच ठरतो) ते सर्व प्रभु रघुनाथांचे आहेत; हे प्रतिज्ञेवर लिहून देण्याने असत्य दोष उत्पन्न होत नाही.
(२) अनुवादांत मातें = मला म्हटले आहे. मला हे ज्ञान नाही असे म्हणण्यात सुद्धा असत्य दोष नाही व शंकेला स्थान नाही. हे ज्ञान मला नाही = माझ्याजवळ नाही, माझे नाही, ज्ञान वा अज्ञान प्राप्त करून घेण्याचे काम बुद्धीचे आहे. बुद्धि म्हणजे तुलसीदास नव्हेत व बुद्धिदाता, बुद्धिचालक प्रभू रामच.
'प्रेरक हृदिं रघुवंश बिभूषण' भक्त व जीवन्मुक्त आपणांस कर्ता- भोक्ता मानीत नाहीत.
'प्रकृत्यैव च कर्माणि क्रियमाणानि सर्वशः । अहंकारविमूढात्मा कर्ताऽहम् इति मन्यते' (भ.गी.)
अज्ञानी, मूढ आपणास कर्ता मानतात. गुणदोष मायाकृत आहेत. 'मायाकृत गुण नी दोष अनेक,' (७/४१/-) व माया प्रभूची आहे. 'मममाया दुरत्यया' (भ.गी.) 'ते उमेश अनुकूलहि मजला । करिति कथा मुद मंगलमूला' (१/१५/७) कथेचे कर्ते शंकरच ठरले. समर्थादि संतसुद्धा असेच म्हणाले आहेत व म्हणतात. अशी वस्तुस्थिती असता शंका समाधानाचे रान कसे उगवते ते मा.पी. पहावे (पृ. २१०-११)
(क) हे विधान करण्यात हेतु हा आहे की सर्व काव्यगुण रस, अलंकारादि असून काव्य निर्दोषही असले तरी त्यात जर पुढे वर्णन केलेला एक गुण नसेल तर त्या काव्याकडे संत सज्जन ढुंकूनसुद्धा बघणार नाहीत. हा एक परमोत्तम गुण पुढील भागात सांगतात.

हिं.- दो. भनिति मोरि सब गुन रहित बिश्व बिदित गुन एक ।
सो बिचारि सुनिहहिं सुमति जिन्हकें बिमल बिबेक ॥९॥
चौपाई - एहि महँ रघुपति नाम उदारा । अति पावन पुरान श्रुति सारा ॥१॥
म.दो.- मम रचना सब गुण रहित विश्वविदित गुण एक ।
तो जाणुनि परिसति सुमति ज्यांमधि विमल विवेक ॥९॥
चौ.- या मधिं रघुपति-नाम उदार । श्रुति-पुराण-अति-पावन-सार ॥१॥

अर्थ - माझी (मोर) रचना-कविता-(भनिति) इतर सर्व गुणांनी रहित आहे; पण तिच्यात विश्वविदित (जगप्रसिद्ध) असा एकगुण आहे. तो जाणून ज्यांच्यात निर्मळ विवेक (ज्ञान) असेल ते शुभमतिमान लोक (कथेचे) श्रवण करतील ॥ दो. ॥ यात रघुपतीचे उदार नाम आहे. आणि ते सर्व वेद-पुराणादिकांचे अति पावन सार (अमृत) आहे.

टीका. दोहा -- (१) विश्वविदित हे पद कोणी देहली दीपक न्यायाने मागे व पुढे घेतात; पण तुलसीमानस इतर सर्व गुणांनी पूर्ण आहे असे परधर्मीसुद्धा म्हणतात. शिवाय हे वचन मानस ग्रंथारंभीचे असल्यामुळे या वेळी पुढे लिहिल्या जाणाऱ्या ग्रंथाचे गुणदोष जगप्रसिद्ध आहेत इत्यादि म्हणणे बापाच्या जन्माच्या आधी त्याचा पुत्र जन्मला असे म्हणण्यासारखे आहे. पूर्वीच जगप्रसिद्ध असलेला एक मोठा गुण यात आहे म्हणजे निर्माण होणार आहे हे कवीचे सांगणे आहे. हा जो महत्वाचा गुण तो नसलेल्या उत्तम काव्याची किंमत किती हे पुढे सांगणार आहेत.
(क) तो जाणूनि परिसति सुमति' - तो म्हणजे रामनाम हे पुढे सांगतील. भाव हा की जे श्रवण करणार नाहीत ते शुद्धबुद्धि नाहीत हे सुचविले.
(ख) ज्यांमधि विमल विवेक - सुंदर बुद्धि आहे पण विमलज्ञान नसेल तर त्या सुमतीचा उपयोग नाही व ते हे काव्य ऐकणार नाहीत. विमलज्ञान असून सुमति म्हणजे स्वहित जाणणारी बुद्धी नसेल तर तेहि श्रवण करणार नाहीत. रामनामाशिवाय रामभक्ति मिळणार नाही व प्रेमभक्तिस्थळावाचून विमलज्ञान जल टिकणार नाही हे ज्या बुद्धीला उमजले ती खरी सुमति. सार हे की ज्ञानाची व प्रेमभक्तीची लालसा ज्याना असेल ते ही कथा श्रवण करतील, कारण रामनामाने या दोन्ही गोष्टी क्रमशः मिळू शकतात हे त्यांना माहीत असते. हा सिद्धान्त पुढे सर्व ग्रंथात वारंवार पुढे येईलच.
चौ. १ - (१) रघुपति नाम उदार - यात रघुपतीचे उदार नाम आहे हाच तो विश्वविदित गुण.
(क) मानसात जिथे तिथे रघुपति, रघुराज, रघुराया, रघुनाथ, रघुवंश विभूषण, रघुवर इत्यादि रघुवंशाशी संबंध दाखविणारे शब्द मुद्दाम वापरण्यातील एक हेतु पूर्वी टीकेत दाखविला आहे. रामनाम म्हणजेच रघुपतीचे 'राम' नाम हे येथे स्पष्ट सुचविले व रघुनाथ परमात्मा आहेत हे या युक्तीने सुचविले.
(ख) उदार - (१) उत् उत्कृष्ट आ- समंतात् राति-ददाति म्हणजे उदार. उत्कृष्ट असलेले सर्व बाजूंनी, सर्व प्रकारांनी जे देते ते उदार हा एक अर्थ (२) उच्चैः आ -समंतात् ऋच्छति -गच्छति म्हणजे सर्व प्रकारानी उंच उंच उच्च उच्च जाते ते उदार. 'उदारो दातृ महतोः' (अमरे) दाता आणि महान म्हणजेहि उदार. या सर्व गोष्टी नाम देते म्हणून नाम उदार आहे. येथे नाम-नामी यात अभेद असतो. 'सुंदर अगम सुगमवरदायक' म्हणजे उदार.
'सहज उदार श्रुणु रघुनायक । सुंदर अगम सुगम वर दायक' (३/४२/१). यात जणू उदार शब्दाची व्याख्याच केली आहे.
(ग) रघुनायक राम जितके व जसे उदार आहेत तसे व तितके त्यांचे 'राम' नाम उदार आहे हे ठरले. ते किती उदार आहे हे १९/१ पासून २७ पर्यंत पहावे.
(घ) नाम उदार आहे म्हणण्याने सुचविले की, पात्रापात्र, देशकाल सुजाति कुजाति इत्यादि भेदभाव ते पाहत नाही.

ल. टे. तुलसीमानसातील सुमारे बारा हजार पाचशे ओळीत अशा सुमारे ३५/४०च ओळी आहेत की ज्यात रामनामाचे वर्णन किंवा 'म' नाहींत. सीता शब्दाचा अक्षरार्थ-वर्णार्थ-मंगलाचरण श्लोक ५च्या टीकेत दिला आहे. राम आणि सीता भिन्नाभिन्न आहेत. म्हणून सीता नामाचे मुख्य वर्ण स, त रामनामवर्णतुल्य मानणे भाग आहे. ज्यात र, म नाहीत व स किंवा त वर्णही नाहीत; अशा ओळी २/४च सापडतील व त्यात हे वर्ण नसणे सहेतुक आहे, कारण ज्यांचे ते वर्णन असेल 'त्यांच्यात काही राम नाही' हे त्यायोगे दाखविले जाते.

'खोटे खाणे खोटे घेणे । खोटे भोजन खोटे देणे' (७/३९७).

यात हिंदीत व मराठीत र, म, स, त यांपैकी एकही वर्ण नाही; कारण की हे खलांचे वर्णन आहे.

(क) मराठी अनुवादांत हे साधण्याचा प्रयत्न केलेला नाही; व किती ठिकाणी या नियमांचे पालन झालेले नाही याची रुजवात घेण्यास वेळ मिळाला नाही.

(२) श्रुति-पुराण-अति-पावन-सार - (क) सार - रस; रस त्या त्या रसयुक्त पदार्थाला व्यापून असतो. कंकणाचे सार सुवर्ण, मडक्याचे सार माती; वस्त्राचे सार तंतु, पाण्याचे सार रस, तसेच रामनाम हे सर्व श्रुति पुराणांचे सार आहे म्हणजेच कारण आहे. म्हणूनच

'राम चरित शतकोटितुनि गणि महेश घे प्राण' (१/२५)

हा सिद्धांत नाम-वंदनात १९/२ मध्ये सांगितला आहे. तेथे आधार पहावेत.

(ख) 'श्रुति' या अर्थ कान व त्याचे कर्म श्रवण करणे-असाहि आहे. 'श्रुति श्रोत्रेच तत्कर्मण्याम्नायवार्तयोः' (अमर) 'श्रुति श्रोत्रे तथाम्नाये वार्तायां श्रोत्रकर्मणि' (विश्वे). भाव हा की 'राम' नाम श्रवण पठण हे श्रुतिपुराणपठणाचे सार आहे-मूळ आहे. 'मा ऋचो मा यजुस्तात मा साम पठकिंचन । गोविन्देति हरेर्नाम गेयंगायस्व सर्वदा' (स्कं.पु.) 'ऋग्वेदोऽथ यजुर्वेदः सामवेदोह्यथर्वणः । अधीता स्तेन येनोक्तं हरिरित्यक्षरद्वयम्' (विष्णुधर्मोत्तरे) 'इष्टापूर्तादि कर्माणि सुबहूनि कृतान्यपि । जन्महेतुनि तान्येव हरेर्नाम तु मुक्तिदम्' (बौद्धायन संहिता) 'काहींच न करोनि प्राणी । 'रामनाम जपे वाणी । तेणें संतुष्ट चक्रपाणी । भक्तालागीं सांभाळी' (दा. बो.) यात सांगितल्याप्रमाणे रामनाम जप-उच्चार-याशिवाय इतर कोणतेही कर्म घडत नसेल तरच वेदाध्ययनादि स्व-स्व-कर्माचा त्याग दोषाई नाही. अन्यथा वचन आधारास घेऊन त्याने आपलाच गळा कापल्या सारखे होईल.

(ग) अतिपावन -'पावनानां च पावनम्' (ह.ना.) पावनांना सुद्धा पावन करणारे रामनाम आहे. हे कसे व किती ते पुढील चौ. सांगतात.

हिं.- मंगल-भवन अमंगलहारी । उमा सहित जेहि जपत पुरारी ॥२॥
भनिति बिचित्र सुकबिकृत जोऊ । राम नाम बिनु सोह न सोऊ ॥३॥
बिधुबदनी सब भाँति सँवारी । सोह न बसन बिना बर नारी ॥४॥

म.- मंगलभवन अमंगलहारी । उमे सहित जे जपति पुरारी ॥२॥
काव्य विचित्र सुकविकृत जेंही । रामनाम-विण शोभत नाही ॥३॥
सर्वपरी भूषित विधुवदना । वर नारि न शोभे विण वसना ॥४॥

अर्थ - (रामनाम) मंगलांचे भवन व अमंगलांच्या विनाश करणारे त्याचाच जप उमेसहित त्रिपुरारि (शंकर) करीत असतात ॥२॥

उत्तम कवीने केलेले काव्य विचित्र असले तरी ते सुद्धा रामनामा - शिवाय शोभा पावत नाही ॥३॥

(जशी) चंद्रमुखी उत्तम (वर, श्रेष्ठ) स्त्री सर्वप्रकारांनी विभूषित असलीतरी वस्त्राशिवाय तिची शोभा नाही. ॥४॥

टीका — चौ. २ - (१) मंगलभवन अमंगलहारी - रामचंद्रास सुद्धा हेच म्हटले आहे. 'मंगलभवन अमंगलहारी । तो प्रभु दशरथ - अजिर बिहारी' (१/११२/४). नामनामी अभेद पुन्हा दाखविला, पूर्वी उदार शब्दाने दाखविला आहे. 'मंगलायतनं हरिः' आयतन-भवन. 'रामाख्यमीशं हरीम्' (मं.श्लो-६) रामनाम म्हणजेच राम. रामनाम सर्वमंगलांचे भवन, निवासस्थान आहे व रामनाम म्हणजेच राम इतके येथे ठरले. राम-रघुनाथ ज्याज्या मंगलाचे माहेरघर आहेत त्या सर्व मंगलांचे माहेरघर राम नाम आहे. कोणकोणत्या मंगलाचे ते भवन आहे हे मानसाधारे पाहू -

रामनाम मंगलाचें निवासस्थान - (काण्डांचे अंक दिले नाहीत.)

बालकाण्डात (१) गुरुपदरज - 'मंगलां प्रसुती' (१/२): (२) हरिहरकथा - 'मुदमंगलदाजे' (२/१०), (३) सत्संगति - 'मंगलमूला;' (४) 'करिमंगला हरि कलिमला रघुनाथगाथा' (१० छं.) (५) 'जगमंगल रामाचे गुणगण' (३२/२) (६) अयोध्या - 'सुमंगलाकर' (३५/५); (७) 'शरयू नाम सुमंगलमूला' (३९/१२); (८) 'संतसभा - सुमंगलमूलि' (३९/-), (९) 'मुनिआशीर्ध्वनि मंगलमूल', (१०) 'रामसुयश - मंगलकारी' (३६/४) अयोध्याकांड (११) - 'सेवकसदनीं स्वामि आगमन । मंगलमूल अमंगल भंजन' (९/५); (१२) त्रिवेणी -'स्मरतां सकल सुमंगलदा अति' (१०६/५) (१३) 'गंगा-मंगल मूला' (१०४/१); (१४) 'विप्रपरितोष -मंगलमूल' (१२६/४); (१५) 'धन्यवाद नभिं मंगलमूल' (१९४/२) (१६) सकलसुमंगलमूल-प्रेम चि' रघुवर पायिं' (२०७/); (१७) 'प्रभु-आश्रम पावन... 'सकलसुमंगल सदन सुशोभन' (२३९/२), (१८) 'रघुपति-भक्ति - सुमंगलमूला' (२४३/७) (१९) 'रामजन्म जगमंगल हेतू' (२५४/३); (२०) 'रामअभिषेक मंगलमोदमूल पथ एकहि' (२५५/१); (२१) 'भरतचरणानुराग - सकलसुमंगलमूलजगिं' (२६५); (२२) रामदर्शन -'रामदृष्टि मुदमंगलमाला' (२८०/६); (२३) रामचरण दर्शन 'पाय सुमंगल मूल पाहिले' (३००/३) (२४) सीतेचा आशीर्वाद -'प्रेमळ आशिषा घेऊनि मंगलमूल' (३१८)

आणखीही बऱ्याच मंगलांचे दर्शन मानसात होते त्यात उत्सव, मंगल, वस्तु, लग्नदिन, रामविवाह दिन, लग्नवेळा, इत्यादि आहेत. वरील सर्वमंगलांचा निवास रामनामांत आहे. रामनाम ज्याच्या मुखांत सतत राहील त्याला वर दाखविलेल्या सर्व मंगलांची प्राप्ति सहज होईल.

(२) **अमंगलहारी** - अमंगलांचा संहार केल्याशिवाय मंगल होत नाहीं. अमंगलांचे मूल अविद्या, मोह, कलिमल, काम क्रोधादि विकार इत्यादि आहेत. या सर्वांचा नाश नाम करते. 'अघखगगणवधिक' (३/४२/८).

(३) उमेसहित पुरारी जपति - (क) उमा - उ - महेश, मा - लक्ष्मी, ऐश्वर्य, शक्ति, माया. महेश्वर्यसंपन्न महेश्वर असून हे 'संतत जपति शंभु अविनाशी'.

(ख) पुरारि - त्रिपुरासुरांचा व त्रिपुरांचा नाश करणारे. राम नामसुद्धा स्थूल - **सूक्ष्म व कारण देहांचा - तीन पुरांचा, निरास करणारे आहे.** 'पुरशरीरमित्याहुः' (धरणि)

(ग) विनाशक जो काळ व विनाशी जे विषय यांचा संहार करणारे 'महाकालकालं करालं' शंकर असून ते सुद्धा आपल्या पत्नीसह सतत रामनाम जपत असतात, **मग इतर पामर जीवांनी त्याचा आश्रय न केला तर त्यांचे रक्षण कोण करणार?**

**चौ. ३ - विचित्र** - 'विस्मयोद्भुतमाश्चर्य चित्रम्' चित्र -आश्चर्यकारक अद्भुत व विचित्र -विशेष आश्चर्य करण्यासारखे, विशेष अद्भुत, असे काव्य व त्याचा कर्ता सुकवि, म्हणजे कर्ता व कृति उत्तम असुन ते शोभत नाहीत; याचे कारण रामनामाचा अभाव.

**चौ. ४** - (१) विधुवदना - पूर्णचंद्रासारखे सुंदर मुख असलेली, चंद्र शीतलता व आल्हाद दायक आणि तापनिवारक असतो. या सर्व गुणांनी युक्त असून, सर्वांग सुंदर असून (वर-नारी) वस्त्र नसेल तर ती स्त्री शुभ नाही; शोभत नाही. तिच्याकडे सज्जन नेत्र उघडून बघणार सुद्धा नाहीत. ती आदरणीय नाही. कामी खलानांच ती रुचेल. 'न नग्नां स्त्रियमीक्षेत पुरुषं वा कदाचन' (कू.पु.) 'बसनहीन शोभे न सुरारी । सबभूषणभूषित वर नारी' (५/२३/४). तसेच काव्य बाकीच्या सर्वगुणांनी अलंकारांनी वगैरे भूषित असले आणि त्यात राम नाम भरलेले नसले तर ते दर्शनीय सुद्धा नाही. '**न तद्वचश्चित्रपदं हरेर्यशो जगत्पवित्रं प्रगृणीत कर्हिचित्) तद्वायसं तीर्थमुशन्ति मानसा न यत्र हंसा निरमन्त्युशिक्षयाः ॥ तद्वाग्विसर्गोजनतौघ विप्लवो यस्मिन्प्रतिश्लोकम बद्धवत्यपि ॥ नामन्यनन्तस्य** यशोंकितानि यच्छृण्वन्तिगायन्ति हि साधवोऽमलाः' (भाग १/५/१०-११). एखादी कविता, भाषा, कितीहि विचित्रपदपूर्ण असली आणि तिच्यात जगपावन हरियश नसेल तर ते काकतीर्थ आहे असे समजतात; व सुंदर मानसात निवास करणारे हंस (साधुसंत) त्यात कधी रमत नाहीत, उलट ज्या काव्यात, भाषेत, प्रत्येक श्लोक अबद्ध, अशुद्ध असून सुद्धा भगवान अनंताच्या सुयशाचे वर्णन करणारी

नामे आहेत. ते संपूर्ण पापांचे क्षालन करण्यास समर्थ होते; त्याचेच श्रवणगान संत करतात. वरच्या श्लोकाचे सारच आता दोन. चौ. सांगतील.

हिं.- **सब गुन रहित कुकबिकृत बानी । रामनाम जस अंकित जानी ॥५॥**
**सादर कहहिं सुनहिं बुध ताही । मधुकर सरिस संत गुन ग्राही ॥६॥**

म.- **सब गुण रहित कुकविकृत वाणी । राम नाम यश अंकित, गणुनी ॥५॥**
**श्रवण कथन बुध करती सादर । संत गुणग्राही सम मधुकर ॥६॥**

**अर्थ** - (उलट) सर्वगुणांनी रहित (गुणहीन) व वाईट कवीचे काव्य (वाणी-भाषा) जर राम नाम, रामयश यांनी अंकित असेल तर ते तसे आहे हे जाणून (गणून) बुध (ज्ञानीभक्त, संत) मोठ्या आदराने त्याचे श्रवण कथन करतात, कारण संत मधुकरां (मधमाशां) सारखे गुणग्रहण करणारे असतात. ॥५-६॥ (इतर गुणादिक त्यांना गुण वाटत नाहीत.)

**टीका – चौ. ५** - कर्ता व कृति ही दोन्ही वाईट पण कृति जिथे तिथे रामनाम व रामयश यांचे छाप असलेली असेल तर परिणाम काय होतो हे या चौ.त सांगितले. लाख रूपयांची नोट कोरी करकरीत, सुंदर असून तिच्यावर त्या सरकारचा शिक्कामोर्तब नसेल तर सुज्ञ माणसे ती एका रुपयाला सुद्धा घेत नाहीत. उलट जुनी झालेली, मलीन फाटलेली पण सरकारी शिक्का स्पष्ट असलेली नोट शाहणी माणसे घेतात. असेच काव्य व रामनामयश याचे आहे.

**चौ. ६** - (१) पहिल्या चरणात बुध शब्द वापरला आणि त्यांच्या विषयीच दुसऱ्या चरणात संत वापरला व दाखविले की बुध = संत.

(क) **मधुकर** - याने कवितेला - फुलांची उपमा दिली व रामनामयशाला त्या फुलांतील मकरंद-मध ही उपमा सुचविली. मधाचे ग्रहण करून संग्रह करणारे मधुकर असतात, संगृहित मध दुसऱ्यानांही देतात. (पाळलेल्या मधमाशा विरोध करीत नाहीत.) 'अनुपम अर्थ सुभाव सुभाषा । गणु पराग मकरंद सुवासा' (१/३७/६). मधुकर फुलांतील सुवासाने आकर्षिले जातात. ज्या काव्यात रामयशसुगंध आहे, त्याच्याकडे संतमधुकर उड्या मारीत येतात व रामनाममकरंद मधु रामनामामृतम् ग्रहण करतात. यांना अर्थ परागांची किंमत वाटत नाही. संग्रह केलेला रामनामामृत-मधु इतरांस देतात, रामकथा श्रवण करून इतरांस कथन करतात, हेच मनन. मधुकर फुलांचा रंग, त्यांचा आकार, त्यांची जात इत्यादींचा विचार करीत नाहीत. तसे संत बाकीच्या गुणावगुणांकडे बघत नाहीत. फूल राजाच्या उद्यानात असो की वनात असो की कुत्सित-वाईट-स्थानांत असो ते विचार करीत नाहीत. एका मधुकर शब्दाने किती अर्थ सुचविला!

(ख) पूर्वीच्या चौपायांत केवळ रामनामाचेच माहात्म्य सांगितले, कारण ते सर्वांचे मूळ, पाया आहे. येथे त्याच्या पंक्ती यश बसविले, पुढील चौ. प्रताप भरतीस

घालतील, कारण की प्रतापा शिवाय यश- कीर्ति नाहीं, नंतर रघुनाथकथा यांच्या भेटीस येईल.

(ग) या चौपाईवर शंका घेतात की सर्वगुणरहित काव्यातला कोणता गुण संत कसा घेतात? उत्तर 'विश्वविदित गुण एक' याने त्या (९) दोह्यातच दिलेले आहे. हा एक महान गुण यशप्रतापादि सर्व काही देणारा कसा आहे. हे चौ. २च्या टीकेत सविस्तर दाखविले आहे. ते सर्व लाभ रामनाम रहित सुंदर सर्वगुण संपन्न काव्याने होणार नाहीत.

हिं.- जदपि कबित रस एकउ नाहीं । राम प्रताप प्रगट एहि माहीं ॥७॥
सोइ भरोस मोरें मन आवा । केहिं न सुसंग बडप्पनु पावा ॥८॥
धूमउ तजइ सहज करुआई । अगरु प्रसंग सुगंध बसाई ॥९॥
भनिति भदेस बस्तु भलि बरनि । राम कथा जग मंगल करनी ॥१०॥

म.- यदपि काव्य रस यांत न एकहि । रामप्रताप आहे प्रगटहि ॥७॥
हाच भरवसा मम हृदयाला । कोण सुसंगिं न मोठा झाला ॥८॥
त्यजि धूम्रहि निज सहज कडूपण । अगरु-संगिं करि सुगंध अर्पण ॥९॥
भाषा ग्राम्य वस्तु भलि कथिता । राम कथा करि मंगल जगता ॥१०॥

अर्थ - जरि या काव्यात एकही (एकउ) काव्यरस नाही तरी यात रामाचा प्रताप अगदी प्रगट (उघडा) आहे ॥७॥ हाच माझ्या हृदयाला भरवसा वाटत आहे. कारण की सुसंगाने कोण मोठा नाही झाला ॥८॥ धूर सुद्धा आपला स्वाभाविक कडूपणा टाकून चंदनाच्या (अगरु) संगतीने सुगंध देतो. ॥९॥ (तशीच) भाषा गांवढळ (प्राकृत) आहे, पण जगाचे मंगल करणारी रामकथा ही वस्तु (ग्रंथविषय) वर्णिली आहे. ॥१०॥

टीका – चौ. ७ (१) काव्य.रस - या पदाने जणू काव्याची व्याख्याच केली आहे. 'वाक्यं रसात्मकं काव्यम्' येथील रस शब्दांत रसोत्पादक अंगोपांगांचा समावेश होतोच. 'शब्द' काव्याचे स्थूल शरीर, अर्थ सूक्ष्म शरीर, रसादि आत्मा, गुण शौर्यादि गुणांसारखे, दोष काणेपणा, अंधपणा, बहिरेपणा यां सारखे, रीति शरीराच्या बांध्या सारख्या, व अलंकार विविध अलंकारासारखे आहेत. (साहित्य दर्पण) कोणी ध्वनि आत्मा समजतात व रसांना प्राण मानतात. ध्वनि-आत्मा व रस-प्राण हे मत अधिक उचित (क) गूढार्थ - यांतहि काव्यरस आहेत. पण ते एक (मुख्य) नाहींत. हा अर्थ घेतल्याने शंकेला जागा नाही. भाव हा की काव्यरस निर्मिति हे या ग्रंथाचे ध्येय नसून श्रीरामप्रताप प्रगट दाखविण्यासाठी हा ग्रंथ आहे. (क) स्वान्तःसुख प्राप्ती हे पूर्वी सांगितलेले फळ काव्यरसाने मिळणारे नसून रामप्रतापाने मिळणारे आहे. 'जेव्हा रामप्रताप दिनपति । प्रबल परम उदया ये खगपति ॥१॥ तदा त्रिलोकी प्रकाश भरला। सुख बहुतानां शोक जाहला ॥२॥

ज्यांस शोक से करतो वर्णन । प्रथम अविद्या निशा विनाशन ॥३॥ इत्यादि दोहा ११ पर्यंत (उ. कां.) पहा. अविद्यादिकांना काव्यरसांनी शोक न होता ते पुष्ट होतात व नष्ट होत नाहीत. रामप्रतापच त्यांचा संहार करतो. तोच धर्म, विराग, ज्ञान, विज्ञान व हरिभक्ति यांचे पोषण करून स्वान्तःसुख देतो, म्हणून काव्यरसनिर्मिति हे ध्येय नाही.

(२) रामप्रताप – 'स प्रतापः प्रभावश्च यत्तेजः कोषदण्डजम्' (अमरे) 'कोष -खजिना व दण्ड देण्याची शक्ति यांपासून उत्पन्न होणारे जे तेज तो प्रताप. कोष = धनसंपत्ति, 'दण्डःदमः सैन्यंच' (अ.व्या.सु) दम = शत्रूचे दमन, शत्रू जिंकणे, याला सैन्य लागते. रामप्रताप सेवकांच्या अविद्या-कामादि शत्रूंचे दमन करून त्यास धर्म विरागादि भक्तिसुखा सर्व धन देतो (चार पुरुषार्थ व भक्ति हे धन). 'ज्याच्या यशा प्रतापा पुढती । शशि मलीन रवि शीतल गमती'. १/२९२/२ मध्ये 'लक्ष्मणतेजनिधान हि तैसे' याप्रमाणे प्रतापालाच तेज म्हटले. १/२९२/२ मध्ये यश प्रथम व त्याचे कारण प्रताप नंतर सांगितला, येथे सुद्धा मागल्या चौपाईत यशाचा आधी उल्लेख केला व येथे प्रताप हे त्याचे कारण सुचविले. 'राम-प्रतापाने जे जे मिळले ते बहुतेक सर्वच या काव्याच्या श्रवणादिकांनी मिळेल हे सुचविले. यात रामप्रताप भास्कर प्रगट आहे. म्हणजेच आपल्या प्रचंड, तेजाने सर्वत्र प्रकाशमान आहे, त्यामुळे स्थूल सूक्ष्म कारण शरीररूपी तिन्ही लोक ज्ञानविज्ञान प्रकाशाने भरून जातील व भक्तिसुधार्द्र रामचंद्राचा उदय हृदयात होईल.

**चौ. ८ - कोण सुसंगिं न मोठा झाला** - हे एक सुभाषित तयार झालेच व बाह्यार्थ सतसंग - सुसंगति आहे, पण येथे सु = अति, अतीव बलवत् असा अर्थही आहे. 'बलवत् सुष्टु किमुत स्वत्यतीव (सु+अति+अतीव) च निर्भरम्' (अमर). राम प्रताप सुसंग आहे, त्याच्या संगतीने काव्यरूपी धुराचा कडवटपणा जाऊन त्याला मोठेपणा आलाच पाहिजे. रामप्रतापाला 'प्रबल परम' (७/३१/१) मध्ये म्हटले आहे. मोठ्यांचा आधार घेणारा मोठा होतो याला दोहावलीत फारच सुंदर दृष्टांत दिला आहे. 'महदाश्रय दे महति इव वामन-कर-गत दंड । श्रीप्रभुसंगे वाढला व्यापि तदा ब्रह्मांड' (दोहा. ५३२) भगवान वामनाच्या हातातील पळसाचा दंड सर्व ब्रह्मांडाला व्यापण्या एवढा मोठा झाला.

**चौ. ९ - अगरुसंगिं करि सुगंध अर्पण** - अगरू - चंदन, 'चंदन तरु हरि संत समीर' कविता रूपी धुराला राम-प्रतापरूपी शुद्ध चंदनाची संगती झाली की तो धूर सुद्धा रामप्रतापा एवढाच सुखानंद कल्याणकारी जगाला होणार, राम प्रतापाने काव्य भाषारूपी सुगंध सर्वत्र पसरेल व भाषा आदर पावेल. 'अनुपम अर्थ सुभाव सुभाषा । गणुं पराग मकरंद सुबासा' (१/३७/६) -रामप्रतापाचा हा प्रभाव जाणूनच, हास्यास्पद वाटणारा काव्य रचनेचा प्रयत्न केला जात आहे.

**चौ. १० - भाषा ग्राम्य** - भाषा संस्कृत नाहीं, प्राकृत भाषा असून तीहि बरीचशी बोलभाषा आहे हा दोष आहे. ही भाषा संस्कृतज्ञ पंडितांस कडुलिंबाच्या लाकडाच्या

धुरासारखी कडू, दुर्गंधमय, तिखट, डोळ्यांत खुपणारी, नकोशी वाटणारी आहे. (या सर्व गोष्टी) घडल्या आहेत. तु.दासचरित्र पहावे.

(क) तो रामप्रताप, ते रामयश व ते रामनाम या सर्व गोष्टी ज्यात भरपूर आहेत अशा राम कथेची संगति या ग्राम्य भाषेला झाली असल्या कारणाने तिच्यात काय वैशिष्ट्य असणार ते या चौपाईत व पुढील छंदात सांगून नंतर दृष्टान्त देतील.

हिं.- छंद. ।मंगल करनि कलिमल हरनि तुलसी कथा रघुनाथ की ।
।।गति कूर कविता सरित की ज्यो सरित पावन पाथ की ।।
।प्रभु सुजस संगति भनिति भलि होइहि सुजन मन भावनी ।
।। भव अंग भूति मसान की सुमिरत सुहावनि पावनी ।।१।।

म.- करि मंगला हरि कलिमला रघुनाथ-गाथा परम ही ।
।।गति काव्य-सरिते कुटिल जेवीं पुण्यपाथांची मही ।
।प्रभु-सुयश-संगतिं होइ कृति भलि सुजनमन-सुखदायिनी ।
।।भव-अंगिं भूति मसाणिंची ती स्मरत शोभन पावनी ।।१।।

अर्थ - ही श्रेष्ठ रघुनाथगाथा (कथा) कलिमल हरण करणारी व मंगल करणारी आहे. पवित्रजला-नद्यांची (पुण्य-पावन-पवित्र, पाथ जल आहे ज्यांचे -त्या पुण्यपाथ) गति जशीकुटिल असते तशी या कविता सरितेची गति कुटिल (नागमोडी, वाकडी तिकडी) आहे. परंतु ही कवितासरिता प्रभूच्या निर्मळ यशरूपी पवित्रजलाच्या संगतीने भली (भलि, चांगली) होईल, ठरेल, व ही सज्जनांच्या मनाला सुख देणारी होईल (सज्जनांना आवडेल) जसे भवाच्या (शंकराच्या) शरीराला लागलेले स्मशानातील भस्म (भूति, चिता भस्म) शोभन होते व स्मरण केल्याने पावन करते, (तशी ही भाषा होईल) ।।छंद।।

टीका – (१) या छंदाला हरिगीतिका म्हणतात. लक्षणे प्रस्तावनेत दिली आहेत. येथील हिंदी छंदाच्या प्रथम चरणांत 'तुल'च्या नंतर यति येत असल्याने तेथे यतिभंग दोष आहेसे वाटते, पण गतीची कुटिलता प्रत्यक्ष दाखविण्यासाठी वाणीच्या ओघाला मध्येच अडथळा उत्पन्न केला आहे. मानस नाट्य काव्य आहे विसरता कामा नये.

(क) मागल्या चौपाईच्या उत्तरार्धातील बऱ्याच शब्दांची पुनरुक्ति छंदाच्या पहिल्या चरणात केलेली आहे. हा नियम सर्वत्र पाळलेला आहे, यास अपवाद नाहीत. १. या पुनरुक्तीने चौपाईच्या चरणांतील विषयाचे महत्त्व दाखविणे हा एक हेतु असतो. २. चौपाया कमललता आहेत आणि छंद सोरठे दोहे ही बहुरंगी कमळे आहेत. (१/३७/४.५) त्यात छंद मोठी लाल कमळे (राजीव -पुष्कर) आहेत. पहिला छंद त्याच्या मागल्या कमलिनीचे फूल आहे हे दाखविणे हा दुसरा हेतु आहे (प्रत्येक ठिकाणी). कमलिनीचेच परिणत रूप जसे कमल तसा पूर्व चौपाईतील अर्थ, रस व भाव यांचा विकास म्हणजेच छंद.

(२) चौपाईत 'रामकथा करि मंगल जगता' असे म्हटले. येथे राम- रघुनाथ हा अर्थ स्पष्ट केला; हरि कलिमला हे विशेष सांगितले. येथे मंगल भवन म्हटले नाही हे लक्षात असावे. रामनाम मंगलभवन आहे व रघुनाथ कथा मंगलकारक आहे. अमंगल हरण्यात नाम व कथा समान आहेत.

(क) भाव हा की प्राकृत भाषेतला जो अमंगलपणा असेल, तो नाहीसा करून या भाषेला देवभाषेपेक्षाही अधिक मंगल करील. कलिमल अमंगल करणारा आहे. ही कविता कलियुगात लिहिली जात असल्याने कलिमल, कलिकलुष, कलि इत्यादींचा उल्लेख वारंवार आढळेल. देशकाल परिस्थितीचा विचार मानसात सर्वत्र आहे. हा छंद ग्रंथांतील पहिला छंद आहे. यातच हा विचार आणला व ग्रंथाच्या शेवटच्या छंदात (दो. १३०च्या) रामचरित्राच्या उल्लेखा बरोबर कलिमलाला आणलाच आहे. मंगलाचरणांतील 'मंगलानांच कर्तारौ' ने येथील अर्थच सुचविला आहे. 'करिमंगला हरिकलिमला अशी रघुनाथ कथा' हा ग्रंथाचा विषय प्राकृतात येथे स्पष्ट केला. उत्तर १३० छंद मध्ये उपसंहार आहे. अभ्यास अपूर्वतादि पुढे आहेत. अधिकारी कोण हे मागल्या दोह्याच्या चौपायात सविस्तर सांगितले आहे.

चरण २रा - (१) कविता सरितेचीगति कुटिल आहे. यात कवितेचे नदीशी रूपक आहे. कुटिल हा वाईट अर्थाचा शब्द घालून काव्यसरिता वाईट असे भासविण्याचा प्रयत्न केला आहे. कुटिलगती हे सरितेचे भूषण आहे. नद्या बहुधा बाणासारख्या सरळ गतीने जात नाहीत; त्यांची दिशा वारंवार बदलते. कविता नदीचे कुटिलपण म्हणजे देश-कालानुक्रमाने वर्णन नसणे. उदा. दशरथ मरणानंतर जनकदूतांचे आगमन अयोध्येत भरत असता झाले, भरत चित्रकुटास गेल्या नंतर काही काळाने ते सांगणे, राम वनवास सीताहरण इ. गोष्टी पुढे घडणाऱ्या असलेल्या आधी बा-कां. सांगणे इत्यादि कालक्रम भंग आहे. एकाचवेळी घडलेल्या दोन गोष्टी एकाच वेळी सांगणे शक्यच नसते. एक आधी व दुसरी नंतरच सांगावी लागते. रामचित्रकूटला जाऊन राहिले व कथा प्रवाह पुन्हा अयोध्येकडे वळला इत्यादि दिशा व स्थळबदल आहेच म्हणून कुटिल म्हटले.

(२) पुण्यपाथ सरिता - गंगा, सरस्वती, यमुना, शरयू वगैरे गंगेला परम पावन म्हटले असल्याने केवळ गंगाच येथे घेता येत नाही. 'पावन गांगतरंगमालसे' (१/३२/१४); 'रामकथा मंदाकिनी' (१/३१/-); 'यमगणमुखिं मसि जगिं यमुनासी' (१/३१/११); 'शिवप्रिय मेकल शैलसुतासी' (१/३१/१३) नर्मदा; 'शरयु नाम सुमंगल, मूला; या प्रमाणे गंगा, यमुना, नर्मदा, शरयू इतरहि पवित्र नद्यांची उपमा रामकथेला दिली आहे.

(क) या नद्यांची गति कुटिल असून जल पावन असल्यामुळे त्या पवित्र मानल्या जातात, पूजा आरती, प्रदक्षिणा वगैरे केले जाते तसेच या कवितासरितेचे होईल. (प्रत्यक्ष होत आहे ३७५ वर्षे) रामविमल यशजलाने भरलेली आहे हे मुख्य कारण आहे हे सुचविले.

चरण. ३ रा - (१) भगवंताच्या चरणस्पर्शाने व शंकरांनी मस्तकावर धारण केल्यामुळे गंगा जशी इतर पावनसरिताहून श्रेष्ठ, परमपावन ठरली तशी ही कविता सरिता प्रभु-सुयश संगतीने भली होईल, इतर सर्व रामकथांपेक्षा श्रेष्ठ ठरेल, हे सुचविले. हेहि घडलेच आहे. भाषाग्राम्य, गति कुटिल हे दोष पूज्य, वंद्य ठरले. कुरुपता व अपावनता दोषांचा संहार व विरुद्धगुणप्राप्ति शेवटच्या चरणात सुचवितात.

चरण. ४ था - (१) मसाणिंची भूति - स्मशानांतील भस्म, चिताभस्म, हे इतके अपवित्र असते की स्पर्श झाल्यास सचैल (अंगावरील वस्त्रांसुद्धा) स्नान केले पाहिजे; पण तेच भस्म शंकराच्या शरीराला लागले म्हणजे सुंदर दिसते व परम पावन होते, त्याचे दोष तर जातातच पण त्याला विशेष शोभा येते. भवति, भवते वा सर्वम् भू प्राप्ती (अ. व्या. सु.) ज्याच्या पासून पाहिजे ते सर्व प्राप्त होते तो भव (शंकर).

(क) शिवांग-भवांग 'चिताभस्मालेपः' स्वत : पावन व शोभायमान होतेच पण त्याचे नुसते स्मरण करणारास सुद्धा ते पावन शोभन करते. अशीच ग्राम्य, अपवित्र भाषा रामयश संगतीने सुंदर व पावन होईल व तिचे श्रवण व कथन मनन (स्मरण) करणारास ती पावन शोभन करील. 'सुकृति शंभुतनु विमलविभूती। मंजुल मुदमंगला प्रसुती' (१/१/३). निंद्य भाषा वंद्य ठरेल हे दृष्टान्ताने सांगतात.

हिं.दो.- । प्रिय लागिहि अति सबहि मम भनिति राम जस संग ।
॥ दारु विचारु कि करइ कोउ बंदिअ मलय प्रसंग ॥१० रा॥
। स्याम सुरभि पय बिसद अति गुनद करहिं सब पान ।
॥ गिरा ग्राम्य सियरामजस गावहिं सुनहिं सुजान ॥१०म॥

म.दो.- । प्रिय सकलां अति होइ मम काव्य रामयशरंगिं ।
॥ दारु-विचार किं करी कुणि वंदिति मलय-सुसंगिं ॥१०रा॥
। श्याम सुरभि पय विशद अति गुणद करिति सब पान ।
॥ गिरा ग्राम्य सिय-राम यश ऐकति गाति सुजाण ॥१०म॥

अर्थ - रामयशाच्या रंगामुळे (संगतीने) माझे हे काव्य सर्वांना प्रिय होईल. (वाटेल-लागिहि) कारण की जशी मलयाच्या सुसंगतीने (प्रसंग) सर्व काष्ठे (दारु) वंदनीय होतात-ठरतात; कोणते काष्ठ - लाकूड-आहे याचा कोणी विचार (करीत नाही) करतात का? ॥ दो. रा. ॥ गाय (सुरभि) काळी असली तरि तिचे दूध अगदी शुभ्र व गुणकारी असते, म्हणून सर्व लोक ते पितात; (तसेच या काव्याचे). भाषा अगदी ग्राम्य, पण तीत सीताराम यश आहे. म्हणून शाहणे लोक तिचे श्रवण, कथन गान करतील ॥१०म॥

टीका – दो. रा - (१) सकलां अति प्रिय होइ - सकल शब्दाचा अर्थ पूर्वसंबंध लक्षात घेऊन केला म्हणजे पूर्वी जे अधिकारी ठरविले ते सर्व असा होतो व शंकासुर उठत नाही.

२ 'दारुविचार - मलयसुसंगिं'

(क) मलय - शुद्ध चंदन तरु. त्याच्या संगतीने मलय पर्वतावरील सर्वच झाडें चंदन बनतात, म्हणजे त्यांना चंदनाचा सुगंध येतो. त्यामुळे ती काष्ठे जरी बोरी बाभळी कडुलिंबांची असली तरी त्याचा कोणी विचारच करीत नाहीत; चंदन म्हणूनच त्याचा उपयोग गुरु- विप्र- देवादि पूजनात करतात; व आपल्या मस्तकावर, कपाळावर धारण करतात. भर्तृहरि म्हणतात 'किं तेन हेमगिरिणा रजताद्रिणां वा यत्र स्थिताश्च तरवस्तरवस्त एव ॥ मन्यामहे मलयमेव यदाश्रयेण कंकोल निंब कुटजा अपि चंदनाःस्युः॥ (नी.श.) सोन्याचांदीचे पर्वत काय कामाचे, त्यांच्यावरील तरु तरुच राहतात (सोन्याचे रुप्याचे बनत नाहीत) म्हणून त्यांच्यापेक्षा मलयगिरि श्रेष्ठ. कारण त्याच्यावरील, कंकोळ, लिंब, कुडा इत्यादि सर्व वृक्षच चंदन बनतात. ग्राम्यभाषा बोरी बाभळी लिंबांसारखी असली तरी रामसुयशमलयगिरीच्या आश्रयाने - संगतीने ती चंदनाप्रमाणे पूज्य सुगंधदायक, शान्तिदायक, त्रितापनिवारक होईल. (हे भाकीत अगदी खरे झाले आहे.)

दो. १०म - (१) श्यामसुरभि - काळी गाय एवढाच अर्थ येथे अपेक्षित आहे. श्याम म्हणजे कपिला असा अर्थ येथे करणे चुकीचे आहे; कारण कपिला गाईत काळ्या रंगाच्या गाईचा समावेश होत नाही. कपिलाचे दहा भेद ब्रह्मदेवाने वर्णिले आहेत. 'सुवर्णकपिला, गौरकपिला, आरक्तपिंगाक्षी, गलपिंगला, बभ्रुवर्णाभा, श्वेतपिंगला, रक्तपिंगाक्षी, रक्तपिंगला, पाटला व पुच्छपिंगला यात कृष्णवर्ण नाही. (म. भा. अ. मे. प. १०२/७-८ गोअंक कल्याण पृ.५३)

(क) कपिला अर्थ घेतल्याने अनर्थ होऊन गोस्वामींवर शास्त्र- अज्ञानाचा शिक्का शास्त्रज्ञ मारतील. 'वेदाक्षरविचारेण ब्राह्मणीगमनेन च कपिलाक्षीरपानेन शूद्रो याति विनाशताम्' (मा.पि.म.) हा श्लोक देणारांनी हा देऊन सुद्धा 'कपिला' अर्थच घेतला आहे. हे आश्चर्य! शूद्राने कपिला गाईचे दूध पिणे महापाप आहे; व तुलसीदास म्हणतात की 'करहिं सब पान' सर्व पितात. म्हणजेच इच्छा असणारास निषेध नाही असा निष्कर्ष निघतो. म्हणून श्याम म्हणजे कपिला असा अर्थ करणे शास्त्रविरुद्ध आहे. काळ्या गाईच्या दुधासारखेच मानसांतील रसाचे -भक्तिरसाचे, रामविमलयशजलाचे पान कोणीहि करावे.

(२) गुणद - गाईच्या दुधात १० गुण असतात, 'स्वादुशीतं मृदुस्निग्धं बहलं श्लक्ष्ण पिच्छलं गुरुमन्दं प्रसन्नं च गव्यं दशगुणं पयः' (च. सं. गोअंक) स्वादिष्ट, चिकट, थंड, कोमल, गार, सात्विक, लसदार, जड, बाह्यदोषांचा प्रभाव शीघ्र न पडणारे व चित्ताला प्रसन्नता देणारे असे दहा गुणांनी युक्त गाईचे दूध असते. 'क्षीरात्परं

नास्ति च जीवनीयम्' आयुष्य वृद्धि करणारे गाईच्या दुधासारखे दुसरे काही नाही. म्हणूनच अमेरिकेत (म्हशी कोणी पाळीत नाहीत व शेळीचे दूध औषधालाच घेतात.) तेथे गाईची जोपासना इतकी उत्तम करतात की हल्ली हिंदुस्थानात स्वतःच्या अपत्यांची जोपासना तशी चांगली होत नाही. शेतकरी सुद्धा गाईची हेळसांड करून (देशावर) बैलांची जोपासना करतात! (अधिक माहिती कल्याण गो - अंक पृ. १६१, ४०५ व ४१४ पहावीत.)

(क) कफवातपित्त शमन करून सुख देण्याचा विशेष गुण काळ्या गाईच्या दुधात असतो.

(३) सुजाण हा शब्द 'करिति पान'च्या बरोबर घेणे जरूर आहे. अन्यथा सर्व पान करतात असे म्हणण्यात अतिव्याप्ति दोष येतो. ज्यांना त्या दुधाच्या विशिष्ट गुणांची माहिती आहे व आपल्याला कफ वातपित्तांमुळे त्रास होतो हे कळले आहे व या दोषांचे शमन करून सुखी, निरोगी होण्याची ज्यांची इच्छा आहे आणि हे दोषहारक आहे असा ज्यांचा विश्वास आहे तेच सुजाण. हे लक्षण दोन्हीकडे लागते. 'काम वात कफ लोभ व क्रोधपित्त' आहेत. असे शाहणे जे नाहीत ते कोणत्या तरी गाईचे, म्हशीचे, शेळीचे वा भुकणीचे दूध पितील व रोग वाढवून घेतील. येथे जाति, धर्म, स्त्री-पुरुष, लहान मोठा इत्यादि विचार नाही म्हणून 'सकल' म्हटले. सीतारामयश रूपी शुद्ध निर्मळ, गुणकारी, भवरोगहारी, स्वादु, मधुर दूध आहे ते ग्राम्यभाषारूपी काळी गाय देणार असली तरी सुजाण तिचे श्रवणादि रूपाने मान करतील व भवरोग मुक्त होतील हा भाव आहे.

ल. टे. एकूण हे दाखविले की रामयशसंगतीमुळे हे काव्य मंगलकारक, कलिमलहारक सुजन-मनोहर, सुंदर, पावन करणारे, वंद्य, शान्तिदायक प्रसादजक, तापनिवारक, कामक्रोधादि मानसरोगहारक आहे. पूर्ण आरोग्य देऊन भवरोग निवारण करील. हे असे आहे हे विचारयुक्त श्रद्धेने, संत-गुरु-मुखाने श्रवण करून मनन करणाऱ्या प्रत्येकाला अनुभवाला येईल. उत्तर हिंदुस्थानात हजारोंना हा अनुभव आला आहे, येत आहे. महाराष्ट्रात हा अनुभव येऊ लागला आहे व पुढे अधिकांना येईल. हेच ग्रंथाच्या उपसंहारात उ. कां. दो. १२९-१३० मध्ये सविस्तर सांगितले आहे. मधे मधे अनेक ठिकाणी उल्लेख आहेत. काव्याची शोभा त्याने सज्जनांचा आश्रय केल्याने अधिक वाढते हे आता सांगतील.

हिं.- 'मनि मानिक मुकुता छबि जैसी । अहि गिरि गज सिर सोह न तैसी ॥१॥
नृप किरीट तरुनी तनु पाई । लहहिं सकल सोभा अधिकाई ॥२॥
तैसेहिं सुकबि कबित बुध कहहीं । उपजहिं अनत अनत छबि लहहीं ॥३॥

म.- मणि माणिक मुक्ता छबि जैसी । अहि गिरि गज शिरिं खुले न तैसी ॥१॥
नृपमुकुटीं तरुणीतनुं बसतां । लाभति कीं सौंदर्य - विपुलता ॥२॥
तशीं सुकवि - काव्ये बुध वदती । उपजुनि इथे तिथें छबि लभती ॥३॥

अर्थ - मणि माणके व मोती (मुक्ता) यांची जशी जी शोभा आहे ती सर्प, पर्वत व हत्ती यांच्या मस्तकावर तशी खुलत नाही ॥१॥ राजांच्या मुकुटांत किंवा तरुणीच्या शरीरावर बसल्याने-राहिल्याने- त्यांना शोभा प्राप्त होते व ती विपुल होते (वाढते) ॥२॥

तसेच बुध-संत-ज्ञानीभक्त-म्हणतात की चांगल्या कवींची काव्ये एके ठिकाणी (इथे) जन्माला येतात व अन्य ठिकाणी (अन्यत्र-अनत, तिथे) शोभा पावतात ॥३॥

टीका — चौ-१ - (१) मणि माणिक मुक्ता - रत्नं मणिद्वयोरश्मजातौ मुक्तादिकेऽपिच 'अश्मजातौ - मरकतादौ' (अमरे) म्हणून मोत्यांचा- मुक्तांचा. अंतर्भाव सुद्धा मण्यांत- रत्नांत होतो. रत्ने मुख्य नऊ आहेत 'मुक्ता माणिक्य वैडूर्य गोमेदा वज्रविद्रुमौ मरकतो नीलश्वेति' वज्र-हिरा. हे शुक्राचे रत्न आहे, माणिक रवीचे रत्न आहे. मणि म्हणजे कोणतेही रत्न असा अर्थ होऊ शकतो.

(क) येथे तीन रत्नांचा उल्लेख करून रत्नांच्या उत्पत्तींची तीन भिन्न स्थाने सुचविली आहेत. मणि सर्पाच्या मस्तकांत, माणिक पर्वतात, व मोती हत्तीच्या गंडस्थळांत सापडतात. सर्पमणि व गजमुक्ता फार दुर्मीळ म्हणून अति अमूल्य असतात. खाणींतून निघणारी रत्ने पुष्कळ मिळतात व पाण्यातून मिळणारी मोत्ये पुष्कळ म्हणून त्यांचा उल्लेख केला नाही. माणकें जरि पुष्कळ मिळत असली तरी ते सूर्याचे रत्न आहे म्हणून त्याचा उल्लेख केला, मरकत (पाचू) वगैरेंचा उल्लेख केला नाही; कारण की हे दृष्टान्त उत्तम कवीच्या काव्याला आहेत.

(ख) तीन दृष्टान्तानी उत्तम मध्यम कनिष्ठ प्रकारची काव्ये सुचविली हे म्हणणे चुकीचे, कारण की गजमुक्ता कनिष्ठ प्रकारचे रत्न नाही ते सर्पमण्याएवढेच दुर्लभ! मणीने रामभक्ति सुचविली असे म्हणणे सुद्धा विसंगत. कारण की 'श्रीगुरुपदनखमणिगण ज्योती' असे पूर्वीच म्हटले आहे व रामभक्तीला चिंतामणि म्हटले आहे. 'रामभक्ति चिंतामणि सुंदर.'

(ग) माणिकाने ज्ञान सुचविले हे म्हणणे असेच विसंगत, कारण ज्ञानाला पुष्कळ साधने लागतात व ती ज्ञान दीप प्रकरणांत दाखविली आहेत. माणिकाचा प्रकाश साधनसापेक्ष नसतो. दीप प्रकाश साधन सापेक्ष असतो.

(घ) तीन नावे मिळाल्याबरोबर भक्ती-ज्ञान व कर्म याची सांगड टीकाकारांनी घातली. याच्या पुढे चौ. ९ मध्ये काव्याला मुक्तामणि म्हटले आहे. मोत्यांच्या शिंपल्यांना पुढे (दो. ३७) मणिशिंपा म्हटले आहे.

(ङ.) छबि - शोभाकान्ति र्द्युतिच्छविः' (अमरे)

हे सांगावयाचे आहे की अमूल्य दुर्मिळ रत्नांची शोभा व तेज त्यांच्या जन्मस्थानी पडत नाही. हा दृष्टान्त तिसऱ्या चौपाईतील सिद्धान्तासाठी दिला आहे. गजमुक्ताहार हत्तीच्या कपाळावर, सर्पमणि सर्पाच्या डोक्यावर आणि माणके पर्वताच्या माथ्यावर ठेवल्याने त्या त्या ठिकाणी त्यांची विशेष शोभा दिसणार नाही व तितके तेजहि पडणार नाही. मोत्यांच्या उत्पत्तीची स्थाने हत्ती, मेघ, वराह, मत्स्य, वंश (कळक)

व शेष ही आणखी वर्णिली आहेत, पण मुख्यतः पाण्यात सापडणारीच (शिंपल्यात) विशेष सापडतात. आता तर बनावट- कृत्रिम- मोत्ये तर विपुल झाली व तशीच काव्येहि घरोघर निर्माण होऊ लागली.

चौ. २ - (१) नृपमुकुटीं तरुणीतनुं - कोणी नृप, किरीट व तरुणीतनु असा पदच्छेद करून तिघांचा संबंध मणि, माणिक, मोत्यांशी क्रमशः जोडतात; पण हे हास्यास्पद आहे. राजे मोत्यांचे हार घालतात, तरुणींच्या अलंकारात हिरेमाणके असतात, व मुकुटात तर पुष्कळच रत्ने असतात तथापि सर्पमणि कुठे मुकुटात दिसत नाही!

(क) येथे काव्यरूपी मुक्ताफळांना रामचरित्र सूत्रात ओवून त्यांचा हार सज्जनांच्या गळ्यात घालावयाचा आहे हे पुढे दिसेल. मणिमाणिकांना वेज पाडून सूत्रांत ओवीत नाहीत, मोत्यांना वेज पाडतात व त्यात सूत्र घालतात.

(२) एक सुंदर अर्थ आताच स्फुरला. भक्तीला सुखी म्हटले आहे व रामचंद्रास भूपशिरोमणि म्हटले आहे. 'भक्ति सुतिकल कर्णविभूषण' (१/२०/६) रामकथेला पार्वती व देवमाता अदितीची उपमा दिलेली आहे. (१/३१/१४) रमेची उपमा पण दिली आहे. (१/३१/१०). 'रमानाथ जिथ राजा' (उ. कां.) 'भूपमौलिमणि' हे रघुनाथासच म्हटले आहे. या अर्थाने हा भाव निघतो की उत्तम कवींची कविता राम, त्यांची भक्ति व रामकथा यांची आश्रित झाल्यानेच शोभा पावते. 'रामचरितमणि माणिक दिसती' (१.१/८) असे अगदी पहिल्यानेच म्हटले आहे. तरुणी भक्ति, नृपकिरीट रामचंद्र व मणिमाणिक मुक्ता रामचरित, हे ठरले. या अर्थाने ही चौपाई पुढील तिसऱ्या चौपाईशी संबंधित आहे, म्हणजेच श्लिष्ट, दोन अर्थांची आहे. ल. ठे. पहिल्या चौपाईत मणि शब्द प्रथमच आहे व मणि-रत्ने-नऊ प्रकारची आहेत. हे सुचविण्यासाठी या दोह्यांत नऊ चौपाया आहेत.

चौ. ३ - सुकवींच्या काव्यांचे रत्ने आणि मोती यांच्या सारखेच आहे. यांची पारख व किंमत चांगले रत्नपारखीच करू शकतात. त्यांना (रत्नांना) पैलू पाडणे, मोत्यांस विंधणे-छिद्रे पाडणे, त्यांची शोभा खुलून दिसेल अशा वस्त्रावर या कागदांवर त्यास ठेऊन दाखविणे ही कामें रत्नपारखी सराफ म्हणजे तज्ञ-बुध-जेव्हा करतील तेव्हाच त्यांची आवड उत्पन्न होऊन लोक त्यांच्यावर प्रेम करतात; घेतात व आपली आणि रत्नांची शोभा वाढवितात.

(क) उत्तम कवि काव्य लिहितात पण त्यातील सौंदर्य, रस, ध्वनि, कला कौशल्य ते दाखवीत नाहीत. ते कार्य बुधाचे - संतांचे - तज्ञांचे असते. फुलांतील मध मधुकर मुखातून आलेलाच पाहिजे. 'कविः करोति काव्यानि रस जानन्ति पंडिताः तरुःप्रसूते पुष्पाणी मरुद्वहति सौरभम्' (सु. र.) फुलांचा सुवास पसरविण्याचे काम वारा करतो. 'चंदनतरु हरि संत समीर' रामभक्तिमय उत्तम काव्य कसे निर्माण होते हे पुढील सहा चौपायात सांगतात; त्या रूपकात अशा काव्याला सर्पमणि किंवा माणिक म्हटलेले नाही.

हिं.- भगति हेतु बिधि भवन बिहाई । सुमिरत सारद आवत धाई ॥४॥
रामचरित सर बिनु अन्हवाएँ । सो श्रम जाइ न कोटि उपाएँ ॥५॥
कबि कोबिद अस हृदयँ बिचारी । गावहिं हरिजस कलि मल हारी ॥६॥

म.- भक्तीस्तव विधिभवना त्यागुनि । स्मरत शारदा येते धाउनि ॥४॥
रामचरित - सरिं घडे स्नान ना । ते श्रम जाति न कोटि-साधना ॥५॥
कवि कोविद मनिं अशा विचारीं । गाती हरियश कलिमलहारी ॥६॥

अर्थ - सुकवीने (शारदेचे) स्मरण केल्याबरोबर (स्मरत-सुमिरत) भक्तीसाठी विधि (ब्रह्मदेव) भवनाचा (सत्यलोकाचा) त्याग करून शारदा (सरस्वति) धावत येते ॥४॥. पण रामचरित्ररूपी तलावात (सरिं) स्नान करता आले नाहीं (न घडे, स्नान घातले गेले नाही) तर तिचे ते (धावत येण्याचे) श्रम दुसऱ्या कोटि उपायांनी (साधनांनी) जात नाहीत. ॥५॥

हा विचार मनात आणून कोविद कवि कलिमलहरण करणाऱ्या हरियशाचेच गान करतात ॥६॥

टीका – चौ. ४ (१) स्मरत - स्मरण करताच, ग्रंथारंभ करताना जेव्हा सुकवि गणेशसरस्वतीचे स्मरण वंदन करतो तेव्हा तत्काळ (क) शारदा - वाग्देवी, सरस्वती, तिला वाटते की आता हा कवि भगवंताचे चरित्र वर्णन करणार व आपल्याला भक्तिरसात न्हाऊ घालणार. या भावनेने भक्तीसाठी धावत येते. तिच्या साह्याशिवाय वाचेचा कोणताच व्यवहार होत नाही. शारदेची दोन रूपे आहेत. एक वाणी- वाचा रूप व एक देवतारूप ही देवतारूप शारदा या आशेने त्वरेने येते. (२) विधिभवन – ब्रह्मलोक, विधि व भवन असा अर्थ सुद्धा घेता येईल. ब्रह्मदेव व आपले भवन, निवासस्थान सोडून येते.

(क) 'विधिभवन'चा अर्थ शरीरातील ब्रह्मदेवाचे स्थान मूलाधार चक्र असा घेतात. हेच परावाणीचे स्थान- ब्रह्मदेवाचे स्थान असे म्हणता येत नाही; कारण उपनिषदातच दोन मते आहेत. योगशिखोपनिषदात मूलाधारास परावाणीचे स्थान व ब्रह्मा देवता असे म्हटले आहे. महामहोपाध्याय नागेश भट्टांचे, आधार न दिलेले मा.पी. मधील मत या उपनिषदांतले आहे. व काष्ठजिव्हा स्वामींचे मत 'नाभीस्थानीं' परा वाचा' या श्रीसमर्थमताशी जुळते आहे (मा.पी.प.) हे मत त्रिशिखा ब्राह्मणोपनिषदास धरून आहे. या मताप्रमाणे मूलाधार चक्राची देवता गणपति आहे, (पृथ्वीतत्वाची देवता). अजपाजप विधीत ब्रह्मदेवाचे स्थान स्वाधिष्ठान चक्र आहे ते तिसरे मत, या सर्वमतांचा सुंदर समन्वय करता येतो, पण ते करण्याचे हे स्थान नव्हे.

(ख) परावाणीचा उपयोग सर्वच सुकवींना रामभक्ति वर्णनात होईल असे नाही. कुंडलिनी जागृत होऊन ऋतंभरा प्रज्ञाप्राप्तीपर्यंत ज्यांची मजल गेली असेल त्या सर्वांस सुद्धा होईल असे नाही. राम ज्याच्यावर प्रसन्न असतील त्यालाच या

वाग्देवीचा उपयोग होऊ शकेल- शकतो. येथे सरस्वती वाग्देवी हा साधारण अर्थ आहे व रामवल्लभा सीता आदिशक्ती हा विशेष अर्थ शारदा शब्दाचा आहे. (मं. श्लोक १ टीका पहावी).

(३) धीट, पाठ व प्रासादिक असे काव्याचे तीन वर्ग समर्थांनी पाडले आहेत. धीट व पाठ काव्यास शारदेच्या धावत येण्याची जरूरी नसते. भगवद्भक्तिमय प्रासादिक काव्यात तिच्याशिवाय भागत नाही. ती येऊन हृदयात राहिली की काव्यसरितेचा अनावर ओघ सुरू होतो व मग शब्द, अलंकार, ध्वनि रस इत्यादींची निर्मिती तीच करते. कवि फक्त एक यंत्र बनतो. कोणीतरी टेलिफोनप्रमाणे आतून सांगत असतो ते कागदावर उतरण्याचेच काम त्याच्या मनमतिकर, नयनांस करावयाचे असते. 'निघे सुभग कविता सरिता ती। राम विमल यशजलभरिता ती' (१/३९/११) निघे शब्दाने वरील भावच सुचविला आहे. याचेच नाव शारदेच्या धावत येण्याचे सार्थक होणे. हेच पुढे सांगतात.

चौ. ५ (१) रामचरितसरि-स्नान ना - स्मरण केल्याबरोबर शारदा धावत आली व तो सुकवि जर भक्तिप्रधान काव्य लिहिणार नाही तर शारदेचे येण्याचे श्रम फुकट जातातच ती अप्रसन्न होते. दुरून धावत आल्यावर थोडी विश्रांती घेऊन शीतल निर्मल जलात स्नान केले की (प्रवासाचा) थकवा जातो व प्रसन्नता वाटू लागते. 'करता स्नान पथश्रम हरले। शुचि पय पिता मुदें मन भरलें' (२/८७/७) (प्रस्तावनेत 'स्नानपान श्रमपरिहार सुख' हे प्रकरण पहावे) तिला रामचरितमानसात नाहू घातली की प्रसन्न होते व सर्व काव्यसौंदर्य निर्माण करते भाषा कोणती हे ती पाहत नाही.

(३) श्रम जाति न कोटि-साधनां - काव्याच्या सर्व अंगांचे व उपायांचे प्रदर्शन केले तरी ती प्रसन्न होत नाही, म्हणून सुज्ञ कवि काय करतात ते सांगतात -

चौ. ६ कवि कोविद मनिं अशा विचारीं - कोविद - पंडित असा सामान्य अर्थ आहे. कौति धर्मादि धर्मादिकांविषयी बोलणारा तो कवि; 'वेदे विदा ज्ञानं यस्य' वेद जाणणारा, दूरदर्शी, दीर्घदर्शी हे पर्याय शब्द आहेत येथे दूरदर्शी, शाहणा असा अर्थ घेणे योग्य.

(क) गाती हरियश कलिमलहारी - यात हरि शब्दाची जणू व्याख्याच दिली. हरण करणारा तो हरी. काय हरतो ते सांगितले व हरी आणि हरियश यात अभेद सुचविला. ज्या काव्याने चित्ताचा मळ हरला जाणार नाही ते कवीला व इतरांना तरी काय उपयोगी? कलिमलहरणास अन्य साधने निरुपयोगी. त्यांच्याने श्रम परिहार होऊन विश्राम, स्वांतःसुख, मिळणार नाही हे लक्षात घेणारा तो कोविद. हरियश गातील ते कोविद कवि हा अर्थही सुचविलाच. हरियश न गाता इतर विषयच वर्णिले तर शारदेस काय वाटते ते पुढील चौ. सांगतात. वरील तीन चौपायाशीं समानार्थक श्लोक मा.पी. दिलेला - 'झगिति जगतीभागच्छन्त्याः पितामह

विष्टपान्महति पथि यो देव्या वाचः श्रमः समजायत ॥ अपि- कथमसीमुष्येदेनं न
थेदवगाहते । रघुपतिगुणग्रामश्लाघासुधामय दीर्घिकाम्' (प्र. रा.)

हिं.- कीन्हें प्राकृत जन गुन गाना । सिर धुनि गिरा लगत पछिताना ॥७॥
हृदय सिंधु मति सीप समाना । स्वाति सारदा कहहिं सुजाना ॥८॥
जौं बरषइ बर बारि बिचारू । होहि कबित मुकुतामनि चारू ॥९॥

म.- करता प्राकृत जन गुणगानें । गिरा शिरा पिटि अनुतापानें ॥७॥
हृदय सिंधु मति शुक्ति समाना । स्वाति शारदा गमे सुजाणां ॥८॥
जर वर्षी वर वारि विचारू । होति काव्य मुक्तामणि चारू ॥९॥

**अर्थ –** प्राकृत जनांचे गुणगान केल्याने सरस्वती आपले कपाळ बडवीत पश्चात्तापाने दुःखी होते (पश्चाताप करू लागते की या लेकाच्या, कर्मनष्टाच्याकडे मी आले तरी कशाला) ॥७॥ सुजाण लोकांना वाटते (ते म्हणतात, कहहिं) की हृदय सिंधु सारखे व बुद्धी मोत्यांच्या शिंपीसारखी आहे व शारदा स्वाति नक्षत्रासारखी आहे ॥८॥ उत्तम विचाररूपी पाण्याचा वर्षाव जर तिने केला तर सुंदर (चारु) काव्यरूपी मुक्तामणि (मोत्ये) तयार होतात ॥९॥

**टीका – चौ. ७ -** (१) प्राकृत - प्रकृतीपासून झालेले - ज्यांचे देह पंचभूतांचे आहेत असे. याच अर्थाने 'प्राकृत-नारि-अंगि अनुरागति' (१/२४७/२) यात प्राकृत शब्द वापरून सीतेचे अप्राकृतत्व चिदानंदमयत्व दर्शविले आहे.

(क) जे प्राकृत असते ते विनाशशील असते म्हणून त्याचे वर्णन करणे सरस्वतीला आवडत नाही. राम चिदानंदमय देहधारी असल्याने त्यांचे यशगान करण्यात तिला आनंद वाटतो. उलट (२) शिरापिटि अनुतापानें; शिरा- शिरास,. मस्तकाला; आपण अशाच्या हृदयात उगाच आलो, चूकच झाली असे वाटून कपाळावर हात मारून घेते. जिला नमन करून बोलावली तिची अशी दशा करण्याने कवीचे कल्याण कसे होणार? ती त्याला शापच देणार. आपल्या स्वामीचे गुणगान करण्यास आलेलीला परपुरुषाचे गान करणे कसे रुचेल? तिला ते मरणाहून दुःखदच वाटणार. **'स्त्री कुलीन जशि साध्वी ज्ञानी। पतिदेवता कर्ममन वाणीं। राहि कर्मवश सोडुनि नाहो।** तसा.... **हृदि दारुण दाहो'** (२/१४५/१-२)

(ख) **प्राकृत नरनारींचे वर्णन म्हणजे असत्याचा बाजार.** ज्या **मुखातून** लाळ, डोळ्यातून घाण, व नाकातून घाण वहात असते **त्याला चंद्र, कमल** इत्यादी उपमा म्हणजे चंद्राचा व कमलाचा उपहासच. भगवन्ताचे गुणगान करण्यात सगळेच सत्य. **'तुका म्हणे जे जे बोला। ते ते साजे या विठ्ठला.' 'मुखं श्लेष्मागारं तदपिच शशांकेन तुलितम्'** (वै. श.) रामयश वर्णन करण्यात शारदा कशी मदत करते ते सांगतील -

चौ. ८ (१) हृदय सिंधु :- कवीचे हृदय सागरासारखे - सिंधुसमान - असले पाहिजे हे प्रथम सुचविले. 'सज्जन सकृत सिंधु सम कोणी' (१/८/१४) 'संतहृदयसम निर्मलवारी'

(क) सिंधु अपार, अगाध, (व्यापक व खोल); तसे हृदय विशाल, खोल विचार, निर्मलता व समता एवढे सागराचे गुण स्पष्ट झाले. सागर हलके पदार्थ, वाईट पदार्थ बाहेर टाकतो व मूल्यवान पदार्थ खोल ठेवतो लपवून. तसे आपले अवगुण उघड करतात व सद्गुण लपवून ठेवतात. त्यांचे कान हरिकथा श्रवणाने तृप्त होत नाहीत. **'श्रवण जयांचे समान अर्णव । नाना सरिता सुभग कथा तव ।। पडति निरंतर तरी न भरती'** (२/१२८/४-५)

(ख) सिंधु = नदी नद, असाही अर्थ आहे व मोत्ये काही नदनद्यांत सुद्धा सापडतात म्हणून येथे सिंधु शब्दाने अव्याप्ती दोष टाळला गेला. सागरादी शब्दांनी हे साधले नसते. किती सावधानता!

(२) मतिशुक्ति :- प्रकरण संदर्भाने मोत्यांची शिंपी-शिंपा असा अर्थ घेणे जरूर आहे. सर्वच शिंपांत स्वाती जलाने मुक्ताफळे होत नाहीत. तशीच वाटेल ती मति विमल काव्याला व सरस्वतीच्या कृपेला पात्र नाही. शुक्ति शब्दाने गुण सुचविले ते -

(क) शिंपांचा आतला भाग तांबूस, संध्यारागासारखा असतो. रामपदानुराग पाहिजे.

(ख) सतेज असतो तो भाग ज्ञानरूपी तेज.

(ग) चिकट- प्रेम-स्नेहसूचक.

(घ) मऊ गुळगुळीत- कठोरपणा नसलेले मृदु भाषण हे अंतरीचे गुण आहेत.

(ङ) बाह्य पृष्ठभाग काळसर, खडबडीत, सौंदर्यहीन, तशी भाषा प्राकृत असली तरी चालेल.

(३) स्वाति शारदा :- स्वाती नक्षत्र दरवर्षी असतेच, पण त्याने पाऊस पडला व तो मोत्यांच्या शिंपात पडला तरच मोत्ये बनतात. शारदा प्रसन्न झाली पाहिजे. हा पाऊस फार थोडा व तुरळक पडतो. 'वृष्टिशारदी तुरळक थोडी.' (४/१६/१०)

(क) परंतु शारदा स्वतंत्र नाही; ती पतिव्रता आहे व मानसाप्रमाणे धनुर्धर राम तिचे पति आहेत. "दारुनारि सम वाणी, स्वामी । राम सूत्रधर अंतर्यामी ।। स्मरुनि गिरेशा प्रभुस धनुर्धर" "ज्या जनजाणुनि कृपाधार दे । नाचवि कवि-उर-अजिरि शारदे" (१/१४५/५-६) भाव हा की '।।रामकृपा जया करी । शारदेची तयावरी ।। रामकृपा नाही जेथे । गिराकृपा नाही तेथे ।।' (प्रज्ञा.) म्हणूनच 'नर' शब्द पुढील चौपाईत आहे. समानार्थक श्लोक मा.पी. पहा.

चौ. ९ - जर वर्षो वर वारि - जर रामचंद्रांनी तिला तसे करावयास लावले तर ती वर्षाव करते. मुक्ताशुक्तीत २/३ बिंदु पडले तरी पुरतात; पण येथे पूर्वी वर्णिलेल्यासारखा वर्षाव झाला पाहिजे हा विशेष आहे. मुक्ताशुक्तीत जलाची वृष्टि तर मतिशुक्तींत वरविचाररूपी वारीच्या सरीवर सरी पडल्या पाहिजेत. मग सुंदर

'वाक्यं रसात्मकं काव्यम्' रूपी सुंदर मोत्ये तयार होतील. पण ती रसात्मक वाक्ये एकत्र करून त्यात रामचरित्र ओवणे भरणे हे काम शिल्लक राहतेच, हेच आता दोह्यात सांगतात.

हिं.दो.- **जुगुति बेधि पुनि पोहिअहिं रामचरित बर ताग ।**
**पहिरहिं सज्जन बिमल उर सोभा अति अनुराग ॥११॥**

म.दो.- **ओविति वेधुनि युक्तिने रामचरित वर ताग ।**
**घालिति सज्जन विमल हृदिं शोभा अति अनुराग ॥११॥**

**अर्थ** — (ती काव्यरूपी सुंदर मुक्ताफळे) युक्तीने विंधून त्यात रामचरित्ररूपी उत्तम तागाचा धागा ओवतात, भरतात; तेव्हा तो हार सज्जन आपल्या निर्मळ हृदयावर (हृदयात) धारण करतात तेव्हा अति अनुरागरूपी अतिशोभा येते ॥११॥

**टीका** — (१) मोत्यांचा हार करावयाचा तर त्यांना बारीक छिद्रे पाडावी लागतात. ती पाडण्याचा सामता अगदी सूक्ष्म पाहिजे व फार कौशल्याने हे काम करावे लागते, नाही तर मोत्ये फुटतात. तसेच काव्यमुक्ताफळे काव्य कलाकौशल्य रूपी सामत्याने अशी बनवावी लागतात की त्यात रामचरित्ररूपी धागा, तंतु, शिरू शकेल. मोत्ये ओवल्यावर तंतु सहज दिसत नाही तसे ध्वनि, गूढभाव इत्यादि युक्तीने त्यात भरून ठेवणे म्हणजेच रामचरित्र तंतु त्यात ओवणे. दोन मोत्यांच्या मध्ये तंतु दिसतोच तसे प्रगट रामचरित्र व गूढ रामलीला यांचे वर्णन सुंदर काव्यात भरले म्हणजे तो काव्यमुक्ताहार तयार झाला. येथे हार गुप्त ठेवला आहे (दोह्यांत)

(क) हार हृदयावर, छातीवर रुळत राहतो तसा हा हार सज्जन मनननिदिध्यासनाने हृदयात धारण करतात. हाराने हृदयाची व हाराचीही शोभा वाढते. तशी अति अनुराग रूपी शोभा संत हृदयास येते व संतांनी धारण केल्याने हाराचीही शोभा वाढते.

(ख) संतांचे हृदय विमल असते म्हणून परस्पर शोभा वाढते. अशुद्ध हृदयाला या हाराने शोभा येणार नाही व हाराची शोभा वाढणार तर नाहीच पण कमी होईल 'उपजुनि इथे तिथे छबि लभती' याचा उपसंहार या दोह्यांत केला. 'शोभा अति अनुराग' पर्यंत सांगरूपक आहे.

**सांगरूपक** — १ हृदय- सिंधु, २ मति-शुक्ति मोत्यांची. ३ शारदा- स्वाती (नक्षत्रातील मेघ) ४. शारदाकृपा अनिश्चित- स्वातीचा पाऊस अनिश्चित. ५ रामकृपा- विशिष्ट परिस्थिति, हवामान. ६ वर विचार- वरवारी. (उत्तमजल) ७ काव्यमय वाक्ये- मुक्ताफळे, मोती, ८ काव्यकलाकौशल्य- युक्ति- सूक्ष्म सामता. ९ विशिष्ट रचना- वेध पाडणे मोत्यांना: १० रामचरित्र त्यात भरणे- तागाचा दोरा त्यात भरणे. ११ रामचरित्र युक्त कविता- मोत्यांचा हार. १२ हृदयात धारण करणे- गळ्यात घालून

छातीवर रुळणे. १३ सज्जन- धनवान. १४ विमलहृदयधन- पैसे. १५ अति अनुराग प्राप्ति- शोभाप्राप्ति, १६ कविता शोभा वाढते- हाराची शोभा वाढते. १७ उपक्रम, उपसंहार ऐक्य- हारांची दोन टोके सांधणे. १८ सावधान गाती धरिताते- चतुर सुरक्षक.

(२) तुलसीदासांच्या काव्यकला कौशल्याविषयी प्रस्तावनेत विस्तृत विवेचन केले आहे. इतकी अप्रतिम काव्यकला कुशलता कुठेच पहावयास मिळत नाही. हे मानसात पदोपदी दिसते. विषयांची संगति इतकी सुंदर आहे की इकडले मोती काढून तिकडे घालता येत नाही.

सूचना - अनर्घराघव नाटक व सीता शृंगारचंपू या ग्रंथांतील समानार्थक उतारे मा.पी. पृ. २३० वर पाहावे. विस्तार भयास्तव येथे देता येत नाहीत. हृदयसिंधु, मतिशुक्ति समान इत्यादि पात्रता माझी नाही हे कवि आता सांगतील.

**हिं.- जे जनमे कलिकाल कराला । करतब बायस बेष मराला ॥१॥**
**चलत कुपंथ बेद मग छाँडि । कपट कलेवर कलिमल भाँडि ॥२॥**
**बंचक भगत कहाइ राम के । किंकर कंचन कोह काम के ॥३॥**

**म.- जे जात कि कलिकालिं करालीं । कृति काकांची वेष मराली ॥१॥**
**गति कुपथी श्रुति पथा सांडिती । कपट काय कलिपंक भांडिं ती ॥२॥**
**वंचक, मिरविति रामभक्त वर । काम-कोप-कनकांचे किंकर ॥३॥**

अर्थ - जे या कराल कलिकालांत जन्माला आले (जात) व ज्यांची कृति (करतब) काकांची असून ज्यांचा वेष मरालांचा (हंसांचा) आहे - ॥११॥

जे वेदमार्गाचा (मग - पथ) त्याग करून कुमार्गाने गमन (गति) करतात; ज्यांचे शरीर (कलेवर काय,) कपटाचे आहे, ते कलियुगातील पापांची (मल-पंक) पात्रेच (भांडी) होत. ॥२॥

असे जे वंचक (दांभिक) असून वरवर रामभक्त म्हणून मिरवतात पण कामक्रोध व कनक (लोभ) यांचे जे किंकर (गुलाम, दास) आहेत -॥३॥ (वाक्य पुढील चौपाईत पुरे होईल).

**टीका — चौ. १. (१) कराल कलिकाल** - प्रत्येक युगानुसार जनसमाजाची प्रवृत्ति बदलत जाते. सत्ययुगापासून आरंभ होऊन नैतिक आचरण, सुखसमाधान, परस्पर प्रेम, भगवद्भक्ति इत्यादि गोष्टींचा व सत्वगुणांचा हळुहळु क्रमशः युगानुसार ऱ्हास होत जातो. दोन अडीच हजार वर्षांपूर्वी ज्या भारत देशातील घरांना दरवाजांची जरूरी नव्हती व नव्हते, व देण्याघेण्याच्या व्यवहारात पाळण्यावर काळे करावे लागत नव्हते, तेथेच आता दिवसा भर रस्त्यात लाखो रुपयांची लूट व भर दिवसा घरांची जाळपोळ होते; स्वतः केलेली सही माझी नाही म्हणण्यापर्यंत व खोट्या सह्या करण्यापर्यंत मजल गेली हा कलिकालाचा प्रभाव.

(क) राम व कृष्ण हे दोन्ही भगवंताचेच पूर्णावतार (प्र. पहा) त्रेता व द्वापर युगात झाले; पण रामावतारात रामराज्यात, बहुजनसमाजात जी नीति होती ती कृष्णावताराचे कार्य झाल्यावर सुद्धा नव्हती हा युगधर्माचा प्रभाव. 'कलि केवल मलमूल मलीनहि' पापपयोनिधि जनमन मीनहि'॥ कालनेमि कलि कपट निधान' (१/२७/४,८) 'वर्णधर्म ना आश्रम चारी। श्रुतिविरोध रत सब नर नारी' वगैरे कलिप्रतापांचे वर्णन (उ. कां. दोहा ९७-१०२ सुद्धा) पहावे.

(२) कृति काकांची वेष मराली - 'छलीमलीन, न कुठे प्रतीती' (२/३०२/२) 'सत्यवचनिं विश्वास न धरिशी । वायस इव सर्वां घाबरशी' (७/११२/१४) प्रस्तावनेत कलिस्वभाव व काकस्वभाव प्रकरणे पहावीत.

(क) वेष मरालांचा. 'वरिवरुनि धुवट सोवळे,' बाहेरून संत, पंडित, ज्ञानी, राष्ट्रसेवक, गोसेवक, समाजसेवक, पण हृदय काळेकुट्ट, स्वार्थी, दंभी, कुटिल, विषयलोभी इ.इ. आधीच कलीत जन्म आणि त्यात ही भर पडली! असे का होते हे पुढील चौ. सांगतात - .

चौ. २ (१) वेदमार्गाचा त्याग करतात त्याचे हे फळ आहे. जे कोणी कलीत जन्मून सुद्धा वेदमार्गाचा - वर्णाश्रमधर्म कसोशीने पालन करतील ते असे होणार नाहीत.

(क) सन्मार्ग सोडला म्हणजे कुमार्गच दिसावयाचा तो म्हणजे ज्याला जो रुचेल तो; अनाचार, दुराचार, अनीति, अन्याय, अधर्म घडविणारा मार्ग. मनास वाटेल तो मार्ग ही भावना बळावून वेदनिंदा वेद मार्गाचे उच्चाटन वगैरे गोष्टी पद्धतशीर रीतीने चाललेल्या दिसत आहेतच. सुखादिकांना ओहोटी व दुःख, दैन्य, द्वेष, भय, रोग, इत्यादिना प्रतिदिन भरती येतच आहे.

(२) कपटकाय - शरीर जणू कपटाचेच बनलेले व त्यात जणू कलिमल साठविलेला असतो. सार हे की कलियुगातील सर्व पापे त्यांच्यात निवास करतात. उ.कां. विस्तार करावयाचा असल्याने येथे संक्षेप केला.

चौ. ३ (१) असतात वंचक, ठक. पण बाहेरून भगवद्भक्त बनलेले असतात. कामिनी व कांचन यांचा लाभ श्रमावाचून, कमी श्रमात पुष्कळ व्हावा या हेतूने दांभिक बनलेले असतात. क्रोधाचे तर आगरच असतात. अशांच्या ठिकाणी भक्तीचा गंध सुद्धा नसतो. (१/७/५ पहा) 'उदरनिमित्तं बहुकृतवेषः' टिळे, माळा, जप, कफन्या, जटा, दाढी, संन्यास, देशभक्ति, समाजसेवा, लोकसेवा इत्यादि अनेक नांवानी ककाकी (कनक, कामिनी, कीर्ति) ची प्राप्ती करणे हे ध्येय असते.

(क) किंकर शब्दाने सुचविले की इतके करूनसुद्धा सुख समाधान मिळणे अशक्यच असते. सेवकाने, गुलामाने सुखाची आशा करणे हास्यास्पद. (३/१७/१५ टी.प.)

वि. सूचना - पहिल्याच चौपाईत 'जे' शब्द असून सुद्धा त्या चौपाईत वाक्य पुरे झाले असे मानून अनर्थ काढून शंका घेतात त्या निरर्थक आहेत. हे वाक्य पुढल्या चौपाईत पूर्ण करतात.

हिं.- तिन्हमहँ प्रथम रेख जग मोरी । धींग धरमध्वज धंधक धोरी ॥४॥
जौं अपने अवगुन सब कहऊँ । बाढइ कथा पार नहिं लहऊँ ॥५॥
तातें मैं अति अलप बखाने । थोरे महुँ जानिहहिं सयाने ॥६॥
म. अशांमधे जगि गणा प्रथम मज । वृष घाण्याचा धिग् धर्मध्वज ॥४॥
निज अवगुण वर्णिन जर सांगे । वाढे कथा पार ना लागे ॥५॥
अल्पचि वर्णन केले यास्तव । पारखि चतुर शितें भाता तंव ॥६॥

अर्थ - असे जे कोणी जगात असतील त्यात माझी गणना प्रथम करावी (करणे योग्य आहे) कारण मी घाण्याच्या बैलासारखा वृथा कष्ट करणारा व धिक्कारण्यास योग्य असा धर्मध्वजी आहे ॥४॥ जर मी आपले सर्व अवगुण सांगोपांग (स+अंगे-सांगे) सांगू लागलो तर कथा इतकी वाढेल की कधी संपणार नाही. (ते अपार आहेत.) ॥५॥ एवढ्यासाठी अगदी अल्प वर्णन केले; शिवाय चतुर पुरुष शितावरून भाताची पारख- परीक्षा करतात. (शब्दशःअनुवाद ॥ 'थोडक्यात उमजते सुजाणां ॥' असा होईल.)

चौ. ४ (१) मागल्या तीन चौपायात कलियुगातील ज्या लोकांचे वर्णन केले त्यात माझा पहिला नंबर आहे असे समजावे.

(क) दुसऱ्या चरणातील, धींग, धंधक व धोरी या - शब्दांचे अनेक अर्थ टीकाकारांनी केले आहेत; त्यात योग्य वाटला तो वर दिला आहे.

(ख) वृष घाण्यांचा - घाण्याचा बैल दिवसभर डोळे बांधलेल्या स्थितीत गरगर फिरत असतो पण १०/१२ पावलेच जातो. तसाच मी इतके दिवस रामभक्त म्हणून मिरवत असून स्नेहाचा (भक्तीचा- तेजाचा) थेंबसुद्धा मजपाशी नाही.

(ग) धर्मध्वज - धर्माच्या नावावर, विशिष्ट वेष करून पोट भरणारा.

ल. टे. तुलसीदासांसारखे आदर्श रामभक्त असे का म्हणतात याचे पुष्कळांस आश्चर्य वाटते. याविषयी पूर्वी थोडे दिग्दर्शन केले आहे. अशा भक्तांच्या हातून चुकून एक मुंगी किंवा डास मेला तर आपण पापाचा पर्वत केला असे त्यास वाटते. आपल्या जवळ भक्तीचा लवलेश नाही असा त्यांचा खराखुरा पक्का निश्चय असतो. दांभिकाप्रमाणे वरवर लीनता दाखविण्यासाठी ते बोलत नाहीत. भक्तिप्रेमाच्या बाबतीत ते सदा अतृप्त असतात. षड्विधा शरणागतीपैकी कार्पण्याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे. अयोध्याकांडात भरत, अरण्यात सुतीक्ष्ण व सुंदर काण्डात बिभीषण यांची भाषा कमी अधिक प्रमाणात अशीच आहे. यावरून आमच्यासारख्यांनी काय बोध घ्यावयाचा तो घ्यावा. अर्ध्या हाळकुंडात पिवळे बनून अहं- मोहादिकांच्या चक्रात सापडून आपली अधोगति करून घेऊ नये.

चौ. ५ – (१) यातील सार हेच की माझे अवगुण अनंत अपार आहेत. जन्मभर त्यांचे वर्णन करीत राहिलो तरी ते संपणार नाहीत. ही लीनतेची पराकाष्ठा आहे! तुलसीदास अन्यत्र म्हणाले आहेत की 'सत्य वचन नी लीनता परस्त्रि जननिसमान।

न मिळे हरि जर करूनि हे तुलसी जामिन जाण॥' ही लीनता कशी असते याचे उदाहरण येथे आहे. वि.प. याहीपेक्षा अधिक आहे; आणि तो ग्रंथ रामायणानंतरचा आहे.

(क) रामचरित्र लिहिणाऱ्या कवीचे अंतःकरण कसे असावे हे दोहा १०च्या चौपाईत सांगितल्यावर कवि आपल्या पात्रतेचा विचार करू लागले तो वर वर्णन केलेली स्थिती आपली आहे असे त्यास वाटले. आपल्या काव्यात दोष राहिले तर ते शोधून काढून त्यांचे प्रदर्शन करण्यातच वाचक आपला वेळ घालवितील व आपली हानि करून घेतील म्हणून त्यास कोणी दोष देत बसत नाही, तो त्याचा स्वभाव जाणून त्याच्याकडून थोड्या खर्चात पुष्कळ काम करून घेतात. त्याप्रमाणे या काव्यातील सर्व सुखाचे आगर व सर्वदुःखविनाशकर असे जे रामचरित त्याने हित साधावे. म्हणूनच पुढील चौ. सांगतात -

हिं.- **समुझि बिबिधि बिधि बिनती मोरी । कोउ न कथा सुनि देइहि खोरी ॥७॥**
**एतेहु पर करिहहिं जे असंका । मोहि ते अधिक ते जड़ मति रंका ॥८॥**
**कबि न होउँ नहिं चतुर कहावउँ । मति अनुरूप राम गुन गावउँ ॥९॥**

म.- **परिसुनि बहुविध माझी विनंती । श्रवुनि कथा कुणि दोष न देती ॥७॥**
**या ऊपर जे करिति अशंका । ते मजहुनि जड मति अति रंका ॥८॥**
**चतुर न म्हणवित मी कवि नाहीं । गात यथामति राम-गुणांही ॥९॥**

अर्थ - याप्रमाणे माझी बहुत प्रकारची विनंती ऐकून कथा ऐकल्यावर कोणी दोष देणार (ठेवणार) नाहीत. ॥७॥

इतके सांगूनसुद्धा जे कोणी अतिशंका (अशंका) घेतील ते माझ्याहूनसुद्धा अधिक मूर्ख आहेत व त्यांची मति रंक आहे (असे ठरेल). ॥८॥

मी कवि नाही व चतुरही म्हणवीत नाहीं; मी आपल्या बुद्धिप्रमाणे रामाचे गुण गात आहे; (हे विसरू नये). ॥९॥

**टीका – चौ.** ७ (१) **परिसुनि बहुविध विनती** - दो. ४; ८/३- ९/८-११ व १२/१-६ या सर्वात नाना प्रकारांनी आपली अपात्रता सांगून सर्वांस हात जोडून विनंती केली आहे.

(२) **श्रवुनि कथा** .... देती- काळ्या गाईच्या दुधाचा व मलयज काष्ठांचा दृष्टान्त याचसाठी दिला. 'बालादपि सुभाषितं ग्राह्यम् । अमेध्यादपि कांचनम्' अत्यंत घाणीतले सोने घेणे योग्य आहे. **'कुमुखिं दिसति शुभ वचने कैसी । मगधि गयादिक तीर्थे तैसी'** (२/४३/७). मगध देश अपवित्र असला तरी त्यातील गयादिक तीर्थे पावन असल्याने सज्जन त्यांचे आदराने सेवन करतात. मी पापी, वाईट असलो तरी रामचरित्र परमपावन व निर्दोष आहे.

**उपदेश :-** कवीच्या दोषांकडे न पाहता त्यातील हरिभक्तिमय कथेचा आदर करणेच हितावह आहे. कारले आमुलाग्र कडू, फळ कडू जरुर पण फुलांना येणारा सुगंध

मन मोहक असून, कारल्याचे फूल म्हणून त्याचा तिरस्कार करील त्याच्या घ्राणेंद्रियांतच काही दोष असला पाहिजे. हेच पुढे स्पष्ट सांगतात.

चौ. ८ (१) अशंका - अतिशंका अतिसंदेह. 'अचपळ मन माझे नावरे आवरीता' यात अचपळ म्हणजे अतिचपळ जसा अर्थ आहे तसाच येथे अशंका याचा आहे. (क) अशंका कशाला म्हणतात ते पहा. 'तरी अशंका कृता तुवां जी' असे म्हणून सांगतात की 'एक गोष्ट मज तुझी न रुचली। त्या कथिले जे राम दुजा कुणि। श्रुति गाती ज्या ध्याति महामुनि ॥ श्रवति वदति अस अधम ज्यां लागे मोहपिशाच । पाखंडी हरिपदविमुख जाणति मृषा न साच' (१/११४/-) 'ते जल्पति कल्पित वच नाना ॥ वदति वाणि ते वेद विसंगत' (१/११५/५/३). यात सर्व लक्षणे आहेत. 'हृदयिं आणितां संशय असले' ज्ञान विरति गुण पळती असले.' (१/१०९/६). वेदविरुद्ध, अतिशंका, दुःस्तर्क यांच्या योगाने, असलेले ज्ञानवैराग्य-भक्ति आदि गुण नष्ट होतील, म्हणून रामचरित्राविषयीं कुतर्क करतील ते माझ्याहून मूर्ख असून त्यांच्या बुद्धीचे दिवाळे वाजले आहे असे ठरेल; कारण ते आत्मघातकीच ठरतील. स्वतःहून अधिक का म्हणतात याचे कारण सांगतात -

चौ. ९ (१) माझी पात्रता नाही, मी कवी नाही, शाहणा नाही, अनंत अवगुणांचा अपार सागर आहे, म्हणूनच यथामति रामगुणगान करून, माझ्यात असलेल्या अवगुणांचा व कलि मलाच्या सागराचा विनाश करण्याचा प्रयत्न मी करीत आहे; व हे शंकेखोर असलेले ज्ञानवैराग्यादि परमधन गमावून बसणार म्हणून ते माझ्यापेक्षा हीन हे सूर्यप्रकाशवत् ठरले. तलवारीने स्वसंरक्षण करण्याऐवजी धार कशी आहे हे पाहण्यासाठी आपल्याच पायावर मारून घेणाऱ्यास शाहणा कोण म्हणेल? कवि म्हणतात 'करण्यास पावन निज गिरेला रामयश तुलसी(दास) वदे।' (१/३६१ छं) कारण 'करि मंगला हरि कलिमला' अशी रामकथा आहे.

ल. टे. 'वर्णिन रामचरित भवमोचन' - असे म्हटल्यावर पुढे विचार करू लागले ते ९व्या दोह्यात दिले आहेत. नंतर १०व्यात भरवसा वाटावा की राम प्रतापाच्या संगतीने करता येईल. तेच विचार पुढील ३ चौपायात व दो. १२ यात सांगतात.

हिं.- कहँ रघुपतिके चरित अपारा । कहँ मति मोरि निरत संसारा ॥१०॥
जेहि मारुत गिरि मेरु उड़ाही । कहहु तूल केहि लेखे माहीं ॥११॥
समुझत अमित राम प्रभुताई । करत कथा मन अति कदराई ॥१२॥

म.- कोठे रघुपति चरित अपारहि । मम मति कुठे निरत संसारहि ॥१०॥
जो मारुत गिरि मेरु उडवितो । वदा तूल किति तया पुढति तो ॥११॥
रामप्रभुता अमित, समजतां । कथागानि मनि अति कातरता ॥१२॥

अर्थ - श्री रघुपतिचे अपार चरित्र कुठे व संसारात गढलेली माझी मति कुठे? (जमीन अस्मानाचा फरक) ॥१०॥ जो मारुत (मोठा वारा) मेरु पर्वताला उडवून

देतो. (ज्या वाऱ्याने मेरु पर्वत उडविला जातो) त्याच्यापुढे कापसाचा पाड तो किती (लेखा-गणती, हिशोब) ॥११॥ रामचंद्रांचा प्रभाव असा अमित आहे हे समजताच (जाणून) रामकथा गान करण्यास मन कचरते (कातरता-भीति-कदराई-भ्याडपणा) ॥१२॥

टीका — चौ. १० कोठे - कुठे यांनी महदंतर दर्शविले जाते. 'कुठे शाम भटाची तट्टाणी नी कुठे इन्द्राचा ऐरावत' या म्हणीने तेच दाखविले जाते. कालिदासाने असेच म्हटले आहे. (१/८/५-७ टी.प.) पांगळ्याने गौरीशंकर शिखर गाठण्याचा प्रयत्न करण्यासारखे हे आहे.

(क) चरित शब्द संस्कृत आहे. 'निष्ठा च शीलं चारित्रं चरित्रं चरितं तथा (रत्नकोषे). 'शुची तु चरिते शीलम्' (अमर).

चौ. ११ (१) जो मारुत गिरिमेरु उडवतो - (क) मारुत- वारा हा सामान्यार्थ आहे. 'येन विना वा येन वृद्धेन म्रियन्ते' जो बाढला असता किंवा ज्याच्यावाचून मरतात तो मारुत, मरुत, मरुत्- मरणे- विनाश भाव हा की ज्या वाऱ्याने मेरु पर्वतासारखा सर्वांत मोठा सुवर्णगिरी छिन्नभिन्न होऊन विनाश. पावतो तेथे कापसाचा थांगपत्ता सुद्धा उरणार नाही. आपली बुद्धी कापसासारखी व रामप्रताप अशा मारुतासारखा आहे हे सुचविले.

(ख) मारुत शब्दाच्या विशेषार्थाने हे पण सुचविले की रामचरिताशिवाय जन्ममरण परंपरेला मरण येणार नाही. 'मारुत सुत मी आहे वानर' (७/२/८ टी.प.)

चौ. १२ (१) रामप्रभुता अमित - रामाची प्रभुता - प्रताप असा, म्हणजे मेरुगिरी उडविणाऱ्या मारुतासारखा आहे. (क) याचा विचार केला म्हणजे मन कचरते, घाबरते, व वाटते की हे असंभव कार्य आपल्याच्याने होणार नाही. अतिकातरता का म्हटले याचे उत्तर दोह्यात आहे.

ल. टे. - येथे राम शब्दाचा अर्थ रघुपती हा चौ-१० मध्ये आधीच सुचविला आहे. रघुपती रामाची प्रभुता अमित आहे. बालरूप रामचंद्राचा अमित प्रभाव उ.कां. दो. ७९/४ पासून भुशुंडी मोह कथेत पहा. 'बघुनि चरित हे ती प्रभुताही। स्मरता देहदशा ना राही' (७/८३/१) 'वेदान्तवेद्यं कविमीशितारं अनादिमध्यान्तम -चिन्त्यमाद्यम्। अगोचरं निर्मलमेक रुपं नमामि राममहतो तमसः परस्तात्' ॥६०॥ पासून 'परात्परंयत्परमं पवित्रं ... महान्तम्' पर्यंत रामस्तवराजांत पहा.

(क) 'प्रभुता समजतां मनिं अति कातरता' व 'प्रभुता स्मरतां देहदशा ना राही' (७/८३/१) यांची तुलना करून काय अर्थ निघतो तो पहावा. मानसातील वचनांचे अर्थ लावण्यास जिकडे तिकडे मानसातच भरपूर आधार भरलेले आहेत; हे आतापर्यंतच्या टीकेत दिसले असेलच.

हिं.दो.- सारद सेष महेस बिधि आगम निगम पुरान ।
नेति नेति कहि जासु गुन करहिं निरंतर गान ॥१२॥

म.दो.- शेष शारदा शिव विधि आगम निगम पुराण ।
नेति नेति वदुनी करिति संतत यद्गुण-गान ॥१२॥

अर्थ - शेष, शारदा (सरस्वती) शिव (महेश) ब ब्रह्मदेव, वेद शास्त्रे व पुराणे इति नाही, इति नाही असे म्हणून सुद्धा ज्यांचे गुणगान सतत करीत असतात॥ (वाक्य पुढील चौ. पूर्ण होईल) ॥१२॥

टीका — (१) शेष शारदा-पुराण -

(क) शेष हजार मुखांचा, प्रभूच्या समीप सदा राहणारा, अवतार घेतला तरी त्याच्याबरोबर कधी धाकटा भाऊ तर कधी मोठा भाऊ होऊन राहणारा.

(ख) शारदा- सरस्वती; ही तर वाग्वेदीच व फार बोलकी म्हणून प्रसिद्ध 'गिरा मुखर' (१/२४७/५).

(ग) शिव - महादेव, महेश्वर, रामायणे रचणारे, सर्व तंत्र शास्त्रे वगैरे पार्वतीस सांगणारे, त्रिभुवन गुरु व परमश्रेष्ठ रामभक्त.

(घ) निगम- वेद, हे पर्वताकार आहेत असे शास्त्रे सांगतात.

(ङ) वेद ज्यांच्याजवळ मूर्तिमंत असतात व जे सृष्टि उत्पन्न करणारे व सर्वांच्या भाग्याचा विधिलेख लिहिणारे असे विधि ब्रह्मदेव.

(च) पुराणांचा व्याप तर फारच मोठा आहे. 'वेदपुराणे पर्वत पावन' (७/१२०/१३).

(२) नेति नेति..... गान -

(क) नेति नेति - याचा अर्थ असा नाही हा होतो; पण हा अर्थ निर्गुणनिराकाराविषयीच योग्य आहे. येथे गुणगानाचा संबंध आहे, म्हणून सगुणाविषयीच हे वचन आहे. येथे इति-समाप्ती नाही, अंत पार, शेवट लागत नाही असाच अर्थ आहे.

(ख) ही सर्व परम समर्थ मंडळी अनंत काळपर्यंत वर्णन करीत राहिली तरी 'इति श्रीरामचरितं समाप्तम्' असे म्हणवत नाही; कारण ते अनंत आहे, गुण अनंत आहेत. यांच्या वर्णनशक्तीला हार खाण्यास लाऊन रामचरित्राने 'संपत नाही' असे म्हणावयास लावले. हे जाणवल्याने अति कातरता वाटते. शेष शारदादि सुद्धा भीत भीतच वर्णितात हा भाव आहे. रघुपति महिमा अपार अनंत असून हे शेषादि का गातात याचे कारण आता सांगतील -

हिं.- सब जानत प्रभु प्रभुता सोई । तदपि कहें बिनु रहा न कोई ॥१॥
तहाँ बेद अस कारन राखा । भजन प्रभाउ भाँति बहु भाषा ॥२॥
म.- ती प्रभुची प्रभुता सब जाणति । परि वदल्याविण कोणि न राहति ॥१॥
तिथें वेद हें कारण दावित । भजनीं विविधा प्रभाव भाषित ॥२॥

अर्थ - (शेषादिक सर्व) त्या प्रभूचा तो (तसला) प्रभाव जाणतात, तरी पण वर्णन केल्याशिवाय कोणी राहिले-रहात-नाहीत (राहणार नाहीत). ॥१॥ याचे कारण

वेदांनी असे दाखविले आहे व भजनाचा (भजनात) प्रभाव विविध प्रकारचा आहे, असे सांगितले आहे (भाषित भाषा-भारती) ॥२॥

**टीका – चौ.** १ (१) धावरलेले, अति भयभीत झालेले मन विचार करू लागले की चरित्र अपार अनंत आहे ही गोष्ट खरी, तेव्हा कोणीच वर्णन करणे शक्य नाही व बहुधा केले नसेलच. पण असे आढळले की प्रभाव अपार, अनंत आहे हे जाणून मुद्धा मोठमोठ्यांनी वर्णन केले आहे; सतत करीत आहेत, केल्याशिवाय त्यास राहवत नाही; म्हणून आपण सुद्धा 'वेडे याकुडे गाईन परि तुझा म्हणवीन' असे करण्यास काय हरकत आहे; पण अशक्य गोष्टीसाठी प्रयत्न करून काय उपयोग? 'अशक्यार्थस्य संकल्पो भ्रान्तस्य व्यसनं बहु' असे सुभाषित आहे. पण हे शेषादि काही भ्रमिष्ट नाहीत व संकटातही पडले नाहीत त्यामुळे असे कसे झाले? याचे उत्तर पुढील चौपाईत आहे.

**चौ.** २ - भजनाचे विविध प्रकार आहेत; त्यांनाच भक्ती म्हणतात. भक्तीलाच भगवान वश होतात व इतर कशानेही वश होत नाहीत; चरित्र, यश, गुणगान करणे ही एक भक्तीच आहे इत्यादी विविध प्रकारांनी भजनाचा महिमा वर्णन केलेल्या वेदामध्येच आढळला. उ. कां. ९१/३-९२ पहा. 'महिमा नाम रूप गुण गाथा । सकल अमित अनंत रघुनाथा 'तरी सुद्धा 'निज निज मति मुनि हरिगुण गाती । निगम शेष शिव पार न जाती ॥ आपणादि (गरुडादिक) खग बहु मशकान्त । गगनी उडती पावति नान्त ॥ भाव वश्य भगवान सुखनिधान - करुणायतन ॥ आहेत म्हणून 'विण ममता मद मान भजा सदा सीतारमण' (७/९२ रा) असे भुशुंडी गरुडास म्हणाला. बा. कां. शंकर पार्वतीस सांगतात - 'कोणि यदन्त न आदि समजले । मति-अनुमानि निगम अस वदले । (११८/४). इत्यादि अनेक वचने हेच सांगतात. वेदांनी जो भजनाचा प्रभाव सांगितला त्याचे सारच पुढल्या ५ चौपायात सांगतात -

हिं.- **एक अनीह अरूप अनामा । अज सच्चिदानंद पर धामा ॥३॥**
**व्यापक बिस्वरूप भगवाना । तेहिं धरि देह चरित कृत नाना ॥४॥**
**तो केवल भगतन हितलागी । परम कृपाल प्रनत अनुरागी ॥५॥**

म.- **एक अनीह अरूप अनाम । अज सच्चिदानंद परधाम ॥३॥**
**व्यापक विस्वरूप भगवंत । देह धरूनि कृत चरित अनन्त ॥४॥**
**करिति सकल हें भक्तालागीं । प्रणतिं कृपाल परम अनुरागी ॥५॥**

**अर्थ** - जो एक, इच्छारहित, रूपरहित, नामरहित, जन्मरहित, सत्- चित्-आनंद-स्वरूप, परम अधिष्ठान, सर्वव्यापक, विश्वरूप व भगवान आहे, त्यानेच देह धारण करून अनंत विविध चरित्र केले ॥३,४॥ (नाना देह धारण करणे व लीला

चरित्र करणे) ते सर्व केवळ भक्तांच्या हितासाठी- प्रेमासाठीच असते, ते परम कृपालु असून शरणागतावर त्यांचा परमस्नेह- अनुराग असतो ॥५॥

ल. टे. १ - पहिले तीन चरण - विशिष्टाद्वैतमतवाद्यांनी आपल्या सांप्रदायाप्रमाणें अर्थ करून लावले आहेत. तुलसीमानसात सर्व सांप्रदायिकांना, आपापले सिद्धान्त- दिसतात व तसे ते त्यांचा अर्थ लावतात. ब्रह्मसूत्र, दशोपनिषदे भ. गी. व भागवत हे ग्रंथ सुद्धा असेच सर्वसांप्रदायिकांनी आपल्या मताप्रमाणे लावले आहेत. 'जगी वादवेवाद तैसाच ठेला' विशिष्टाद्वैतमताप्रमाणे अर्थ पाहिजे असल्यास मा.पी.ची सहा पृष्ठें भरली आहेत (२३९-४४)

ल. टे. २ - तुलसीदास स्वतः केवलाद्वैती-अजातवादी आहेत हे मानसातील व त्यांच्या इतर ग्रंथांतील वचनांनी प्रस्तावनेत 'मानसातील दार्शनिक सिद्धान्त' या प्रकरणात यथामति सविस्तर दाखविले आहे; म्हणून येथे अवतरणे देऊन विस्तार नको.

पहिले तीन चरण (१) यात एकंदर दहा विशेषणे आहेत. त्यातील पहिलीं पाच निषेधरूपाने नकारात्मक वर्णन करणारी असून बाकी पाच विधिमुखाने वर्णन करणारी आहेत. सर्व विशेषणे निर्गुण व सगुण निराकार ब्रह्माकडेहि लावता येतात.

(१) एक :- एकम् एव अद्वितीयम् ब्रह्म । न इह नाना अस्ति किंचन' (श्रुति) जे आहे ते सर्व ब्रह्मच आहे. द्वैतादिकांचा निषेध करण्यासाठी एक म्हटले. सगुणनिराकार-ईश्वरही-एकच आहे. 'स एकः' (पा.यो.) 'सोधु कुठे सम मम मी जाऊनि' (१/१५०/२)

(२) अनीह :- निर्गुण-अगुण-ब्रह्माचे ठायीं कोणतीच इच्छा नाही, क्रिया, कर्म नाहीं. ईश्वराच्या ठिकाणी त्याच्या स्वतःसाठी कसलीच इच्छा नाही.

(३) अरूप - कोणतेही रूप नाही, आकार नाहीं, ईश्वराला सुद्धा रूप- आकारादि नाहीत. म्हणूनच कृष्ण, राम, शिव, शक्ती, गजानन इत्यादि रूपें उपासकाच्या इच्छेप्रमाणे तोच घेतो,

(४) अनाम - ब्रह्माला ब्रह्म हे नाव सुद्धा सापेक्षतेने दिले जाते. सगुणाला सुद्धा स्वतःचे नाव नाही. प्रथम रूप आकार दिसू लागला की त्याला काहीतरी नाव व्यवहारासाठी द्यावे लागते. परमेश्वराच्या सर्वनावांचा अर्थ सच्चिदानंद असाच आहे. ती सार्थ आहेत. नामांतूनच त्या त्या रूपाचे प्राकट्य होते हे नामवन्दनात सप्रमाण सिद्ध केले आहे.

(५) अज - ब्रह्म व ईश्वर हे दोन्ही अजच आहेत. माया (विद्या) व अविद्यासुद्धा अज आहेत. म्हणजे झालेल्याच नाहीत. नसलेली वस्तु सुद्धा दुःखादि देऊ शकते. मिथ्या वस्तूने सुद्धा व्यवहार घडतात. स्वप्न मिथ्या पण स्वप्नांतील रडण्याने ओली झालेली उशी सापेक्षतेने सत्य. ब्रह्म व ईश्वर जन्माला येत नाहीत. त्रिकालाबाधित,

पारमार्थिक सत्तावान आहेत, म्हणून अज. ज्याला जन्म आहे ते विकारी व विनाशी असते.

(६) सच्चिदानंद - हे ब्रह्माचे स्वरूप लक्षण आहे. पण ते सुद्धा सापेक्षतेनेच आहे. चौदा ब्रह्मांचा निरास (दा. बो.) व तेजोबिंदूपनिषद पहावे.

(क) सत् :- भूत भविष्य वर्तमान इत्यादि सर्वकाळी, सर्वदेशी सर्वत्र असणारे. आहे असे वा नाही असे जे म्हटले जाते ते त्या सत् मुळेच.

(ख) चित् :- जडविरुद्ध, ज्ञानमय, मी आहे. हा जो अनुभव तेच ज्ञान- चित् मुळें आहे. हे कुठे प्रगट असेल चैतन्यरूपाने तर कुठे निरुद्ध- अप्रकट-असेल.

(ग) आनंद - दुःखादिविकार विरुद्ध. केवल आनंद हेच स्वतःचे रूप असून ते अनुभवास न आल्यामुळे आनंद प्राप्तीसाठी बाहेर शोध व प्रयत्न सुरू होतात. जेथे सत् आहे तेथे चित् आहेच व चित् आहे तेथे आनंद आहेच आहे. कुठे न दिसेल. जसें कापूर, सुगंध (विशेष) व शुभ्रपणा ही तीन एकत्रच असतात, एकमेकांस सोडून नसतात.

(घ) सर्वभूतमात्रच जेथें सच्चिदानंदमय आहे तेथे ईश्वर सच्चिदानंदमय आहे हे सांगणेच अनावश्यक आहे.

(७) परधाम - 'परब्रह्म परंधाम पवित्रं परमं भवान्' (भ.गी.१०) परधाम-परम अधिष्ठान-अधिष्ठानभूत-चैतन्य. रज्जु हे त्यावर दिसणाऱ्या सर्पाचे अधिष्ठान होय. विशेषण सुद्धा सापेक्षच.

(क) येथपासून पुढील लक्षणें ब्रह्माची तटस्थ लक्षणे आहेत. 'कावळा बसला आहे ते घर देवदत्ताचे' यात कावळ्याचे बसणें हे त्या घराचे तटस्थ लक्षण आहे, कधी असेल कधी नसेल. जग आहे तोपर्यंतच आहे, पूर्वी व नंतर नाही.

(८) व्यापक :- आकाशात व इतर सर्व पदार्थांत ओतप्रोत आहे म्हणून व्यापक. व्याप्य आहे तोपर्यंतच व्यापकत्व! ईश्वर सुद्धा व्यापक आहेच. ईश्वर म्हणजे विद्योपाधिवान ब्रह्म.

(९) विश्वरूप - 'सर्वम् खलु इदं ब्रह्मन नाना अस्ति किंचन', सोन्याचे वाटेल ते आकार दिसले तरी सोन्याशिवाय इतर त्यात काहीच नाही. पाणी, तरंग व गारा म्हणजे पाणीच नाही काय? वस्त्र म्हणजे सूतच. 'एकः अहं बहु स्याम् प्रजायेय' (श्रुति) एकच विश्व सर्व-रूप झाला आहे. 'एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति' (श्रुति)

(१०) भगवान - ऐश्वर्य, धर्म, यश, श्री, ज्ञान व वैराग्य यांची परिपूर्णता जिथे आहे त्यास भगवान म्हणतात. सर्वव्यापक, देशकाल वस्तुपरिच्छेद शून्य, सर्व विकारहीन, भेद-अवस्थातीत, हेच ऐश्वर्य. सर्वांना धारण करणारे, सर्वाधिष्ठित म्हणून धर्म आहेच. 'धारणाद्धर्ममित्याहुः' नेति नेति असे निषेध रूपाने गातातच म्हणून हेच यश. त्याच्याच अधिष्ठानावर सर्वांची शोभा, रूप, लावण्य आहे म्हणून श्री. स्वतः त्रिपुटीरहित ज्ञप्तिमात्र-चित्-आहेच. हेच ज्ञान. वाईटात चांगल्यात असून सर्वदा अलिप्त. पाण्यात असून भिजत नाही, अग्नीत असून पोळत नाही, वायूत

असून वहात नाही, इत्यादि प्रकारें पूर्ण वैराग्य आहे. याप्रमाणे ब्रह्माच्या ठिकाणी ही सहा आहेतच. म्हणजे निर्गुण ब्रह्म सुद्धा भगवान आहेच. ईश्वराच्या ठिकाणचे षड्गुणैश्वर्यत्व किंवा अष्टविध ऐश्वर्य मूळचे ब्रह्मांतलेच असते. विद्येच्या योगाने व जगज्जीव संबंधाने ते विविध रूपांनी दिसते. 'महसि महीयसेऽष्टगुणितेऽपरिमेय भगः' (भाग. १०/८७/३८ वेद स्तुति). 'ऐश्वर्यस्य समग्रस्य धर्मस्य यशसःश्रियः ज्ञानवैराग्ययोश्चैव षण्णां भग इतीरणा'. यांचे विवरण वर झालेच. (क) 'उत्पत्ति प्रलयं चैव भूतानामगतिं गतिम् । वेत्ति विद्यामविद्यांच स वाच्यो भगवानिति'. ही लक्षणे केवळ ईश्वराच्याच ठिकाणी असतात. उत्पत्ति, प्रलय, भूतांची गति अगति, विद्या व अविद्या यांनी जाणणारा तो भगवान. 'पोषणं भरणाधारं, शरण्यं सर्वव्यापकम् । कारुण्यं षडभिःपूर्णो रामस्तु भगवान् स्वयम्' (महा. रामायणे) हा श्लोक मा. पी. मध्ये आहे. हा व्याकरण दोष व वृत्तदोषयुक्त आहे. असा जो परमात्मा त्याचे भजन करून काय मिळणार ते सांगतात पुढें - पुढील तीन चरण -(१) देह धरुनि कृत चरित अनंत- परमात्मा मागे वर्णिल्या प्रमाणे असला तरी भजन प्रभावाला वश होऊन भक्तांचे हित करण्यासाठीच अवतार देह धारण करीत असतो. देहरूप झालेला दिसतो. असतो चिदानंदमय, पण आपल्या योगमायेच्या प्रतापाने आपले अवतारीपण चटकन कोणास कळू देत नाही. 'नाहं-प्रकाशः सर्वस्य योगमायासमावृतः । मूढोयं नाभिजानाति लोको मामजमव्ययम्' (भ. गी. ७/२५) 'तो जाणें ज्या जाणूं देतां' चिदानंदमय अपुली काया विगत विकार कळे अधिकाऱ्या' (२/१२७/३/५)

(क) येथे मुख्य अवतार हेतु सुचविला. भक्तांसाठी अवतार घेतात. 'जगिं विस्तारिति विमल यश,' ते यश गाति भक्त भव तरती । भक्तहिता तनु कृपाब्धि धरती ॥ (१/१२१-१२२ प.) भक्तहित म्हणजे भव तरून जाणे. हेच येथे पुढील चौपाईत सांगतात.

चौ. ५ (१) करिति सकल हे भक्ता लागीं भक्तांनी भवसागर सुखाने तरून जावा एवढ्यासाठी अवतार घेतात. शंकर वचनात हे स्पष्ट झाले आहे. (१/१२१-१२२). 'भक्ति अवशा वश करी' (३/२६ छं.) 'संत समान तुम्हां प्रिय मातें। प्रार्थुनि इतरि न धरूं देहातें' (५/४८/८) असें बिभीषणास रघुनाथ म्हणाले आहेत. 'प्रल्हादास्तव प्रगटुनि स्तंभीं दानव निर्दळिला, दयाघन भक्तीं आकळिला' (म.संत.) येथे भजनाचा-भक्तीचा-प्रभाव दाखविला.

(क) श्रुतीचा आधार - ज्या-राम-पू-तापिनीचे आधार विशिष्टाद्वैती वारंवार देतात- तिच्यातीलच पहा - 'चिन्मयस्य अद्वितीयस्य निष्कलस्य अशरीरिणः । उपासकानां कार्यार्थं ब्रह्मणोरूपकल्पना' 'रूपकल्पना' पदाचा अर्थ ब्रह्मस्तुतीत 'स्वेच्छामयस्य नतु भूतमयस्य' (भाग. १०/१४/२). यजुर्वेदांतील अवतरणे मा. पी. पृ. २४६ पहा. (ख) वरील दहा बिशेषणांनी दशावतार सुचविले आहेत व हे सुचविण्यासाठीच या दोह्यांत दहा चौपाया आहेत. दहा ही संख्या अनंतवाची असल्याने अनंत गुण

सुचविले - 'तो जगदात्मा दशांगुळे उरला' 'अत्यतिष्ठत् दशांगुलम्' (ऋ.वे) यात १०=अनंत असाध अर्थ आहे.

(ग) परम शब्दाखालील बाणाची टोके सांगतात की 'परम' शब्द कृपाळ व अनुरागी या दोहोंकडे घ्यावा. पुढील चौपायात आणखी गुण सांगतील -

हिं.- **जेहि जन पर ममता अति छोहू । जेहिं करुना करि कीन्ह न कोहू ॥६॥**
**गई बहोर गरीब नेवाजू । सरल सबल साहिब रघुराजू ॥७॥**

म.- **कृपा सु-ममता दासांवरती । करुनि कृपा जे क्रोध न करती ॥६॥**
**गतप्रदायक दीन-दयाळहि । सरल सबल साहिब रघुराजहि ॥७॥**

**अर्थ** - जे आपल्या दासांवर अति (सु) ममता व कृपा करतात; व कृपा केल्यावर पुन्हा कधी क्रोध करीत नाहीत. ॥६॥ जे गेलेले पुन्हा मिळवून देतात, दीनांवर दया करतात सरळ स्वभावाचे, अतिबलवान, स्वामी रघुराजच आहेत. ॥७॥

**टीका – चौ.** ६ (१) मागील चौपाईत प्रणत कृपाल परम अनुरागी' असे जे म्हटले त्याचाच अर्थ येथे स्पष्ट केला आहे.

(क) प्रणत - शरण आलेला, अत्यंत नम्र झालेला म्हणजेच दास (जन). दासांवर अतिकृपा व अतिममता करतात हा विशेष भाव आहे. 'समदर्शी मज म्हणति सकलही । प्रिय मज अनन्यगति सेवक ही' (४/३/८) 'सर्वां प्रिय सेवक ही नीती । दासावरि मम अधिका प्रीती' (७/१६/८). प्रेम-प्रीती किती करतात हे श्रीमुखवचनानेच पहा - 'शरण सभीत असे जर आला । प्राणांसम रक्षीन तयाला॥' (५/४४/८).

(ख) कृपा करणारे स्वामी, धनी पुष्कळ असतात, पण त्या सेवकाने मनाविरुद्ध आचरण केले की रागावतात, शिक्षा करतात. शूद्राला शंकरांनी शाप दिलाच आहे. श्रीरघुनाथाने- रामाने कोणास (आपल्या सेवकाला) शाप दिल्याचे उदाहरण नाही. दासांच्या चुका, दोष अपराध राम प्रभूच्या मनात शिरूच शकत नाहीत. एकदा कृपा केली की मग क्रोध नाही त्याच्यावर. "प्रभु-मनिं राहि न चूक कृतीची । स्मरती शतदां स्थिती हृदींची" अघें व्याध इव ज्या हत वाली । करि सुकंठ मग तीच कुचाळी ॥ तीच कृती मग बिभीषणाची । स्वप्निंहि रामा स्मृति न तयाची ॥ भेटत भरता त्यां गौरविले । रघुवीरें नृपसदसि वर्णिले ।. (१/२९/५-८). वा. रा. सुद्धा असेच म्हटले आहे. २/१/११ व ६/१८/३ पहा. 'स्वामी होति सरोष सेवक - अपराधा बघुनि । आपण बघुनिहि दोष स्वप्निंहि राम न मनिं धरिति' (दोहा. ४७) हा अनुवाद आहे.

**चौ.** ७ - या चौपाईत रघुनाथास सहा विशेषणे आहेत. हे आणखी एक षड्गुणैश्वर्य म्हणता येईल. (१) **गतप्रदायक** - गई बहोर, गेलेले, नष्ट झालेले मिळवून देणारे, त्यागवीरता- दानवीरता सुचविली. (२) दीन दयाल- गरीब नेवाजू (गरीब नेवाज) जो दीन, अतिलीन असेल त्यावर दया करणारे. दयावीरता

सुचविली. (३) सरल सरळ स्वभावाचे. आत बाहेर, छलकपट, नसलेले. ऋजुतावीरता सुचविली. पुढील सबलता व साहेबी असल्यावर ऋजुता मिळणे जवळ जवळ अशक्य, पण रघुवीर रामाजवळ मात्र आहे. कृष्णावतार चरित्र इतके सरळ नाही. (४) सबल- बलवान युद्धवीरता सांगितली. (५) साहिब -'प्रभु सर्वज्ञ' विद्यावीरता सुचविली; कारण पूर्णज्ञान असल्याशिवाय प्रभुत्वाला काही किंमत नाही. 'साहिब सीतानाथसे' प्रभुत्वाचे काही आवश्यक गुण बाकीच्यात अंतर्भूत आहेत. (६) रघुराज -रघुवंश अत्यंत धर्मशील म्हणून प्रसिद्ध आहे व रघुनाथ, रघुवर -रघुवंशभूषण आहेत म्हणून रघुराज शब्दाने धर्म-वीरता सूचित केली आहे. रघुवंशाचे महत्त्व प्रस्तावनेत 'महाकाव्य लक्षणें' या प्रकरणात पहावेच रघुवीर-वीरता हे प्रकरण प्रस्तावनेत पहावे. काही ग्रंथांत दयावीर, विद्यावीर, त्यागवीर, युद्धवीर व धर्मवीर असे पाच प्रकारचे वीर वर्णिले असून हे पाची प्रकारचे वीरत्व फक्त रघुवीराच्या ठिकाणी आहे असे वर्णिले आहे. त्यात सरलता गणलेली नाही; ती आवश्यक असल्याने व रघुवीराच्याच ठिकाणी पाचांसह असल्याने तुलसीदासानीं येथे सुचवून ठेविली आहे.

(क) कोणी टीकाकार हे सहागुण बालकाण्डापासून पहिल्या सहा कांडात क्रमशः आहेत असे म्हणतात; पण हे म्हणणे वस्तुस्थितीला सोडून व अव्याप्ति दोष युक्त आहे. सहाही वीरतांचे भरपूर निदर्शन अवतार चरित्रापासून प्रत्येक काण्डात आहे. 'रघुवीर-वीरता.' (प्र.प.) काही उदाहरणें खाली दिली आहेत.

(ख) गतप्रदायक - विश्वामित्र यज्ञ रक्षण, सुग्रीवाचे गेलेले राज्य मिळवून दिले.

(ग) दीन दयाळू - ताटिकेला, वालीला, मारीचाला दीन झालेले पाहून गति दिली.

(घ) सबलता - एका बाणाने ताटकेचा व वालीचा वध केला. शिवधनुष्यभंग, खरदूषणादिकांचा वध.

(ङ) सरल - सीतेला पाहिल्यानंतर मनाची जी स्थिती झाली ती लक्ष्मणाला व विश्वामित्रांनाही सांगितली.

(च) साहिब - विद्यावीरता - विद्यावीरता-विद्या निधिला विद्या अर्पिति (१/२०९७).

(छ) रघुराज - धर्मवीरता- विश्वामित्राची सेवा शिष्य धर्माने केली. धर्मयुद्धाचे नियम पाळले, शरणागताला आश्रय दिला, प्रतिज्ञाभंग केला नाही. इत्यादि उदाहरणे अनेक आहेत. धर्मधुरंधर, श्रुतिसेतु पालक, धर्मनीति पालक इत्यादि विशेषणें सर्वत्र सापडतील. जास्त विस्तार रघुवीर शब्द असेल तेथे प्रत्येक ठिकाणी टीकेत पहावा १४४ वेळा रघुवीर शब्द मानसात आहे. हे सहा गुण प्रत्येक कांडांतील रामचरित्रात असलेले टीकेत पहावे.

अशा प्रभूचे चरित्र वर्णन करण्यात त्यांच्या दासाकडून चुका झाल्या तरी राम तिकडे बघत नाहीत व त्याला भवपार करतात; म्हणूनच संत काय करतात ते आता सांगतील -

हिं.- बुध बरनहिं हरि जस अस जानी । करहिं पुनीत सुफल निज बानी ॥८॥
तेहिं बल मैं रघुपति गुन गाथा । कहिहउँ नाइ राम पद माथा ॥९॥
मुनिन्ह प्रथम हरि कीरति गाई । तेहिं मग चलत सुगम मोहि भाई ॥१०॥

म.- हे जाणुनि बुध हरियश-वर्णन । करिति गिरा निज सुफल सुपावन ॥८॥
त्याच बळें रघुपति - गुण-गाथा । वदतो नमुनि रामपदिं माथा ॥९॥
मुनिहिं हरियश कथिलें प्रथम हि । तो पथ धरतां मजला सुगम हि ॥१०॥

अर्थ - हे जाणून संत (बुध) हरियशाचे वर्णन करतात व आपली वाणी सुफल व अति पावन करतात. ॥८॥ त्याच बळाने (बळावर) मी (सुद्धा) रामपदीं मस्तक नमवून रघुपति गुणकथा सांगेन, (सांगतो) ॥९॥ माझ्या पूर्वीच (प्रथम हि) पुष्कळ मुनींनी रामयश वर्णिले आहे. तो मार्ग मी धरला (त्याने गेलो) म्हणजे मला सुद्धा (हि) सोपे जाईल ॥१०॥

टीका — चौ. ८ (१) हें जाणुनि ... वर्णन करिति' या चौपाईतील करिति शब्द मागे व पुढे घेणे जरूर आहे.

(क) हे जाणुनि - गुणातीत निराकार भगवान दासांच्या हितासाठी अवतार घेतात व त्यांचे चरित्रगान करून भक्त भवभीतिमुक्त होतात हे जाणून.

(ख) बुध - संत - साधु हा अर्थ १०/६ मध्ये सिद्ध केला आहे.

(ग) वाणी सुफल होण्यास ती प्रथम पावन पवित्र झाली पाहिजे. भगवद्गुणकथा-गान करण्याने वाणी पवित्र होते व सुफल होते हे सुचविले. 'वाणी गुणान्स्तीति, कथा श्रृणोति श्रोत्रद्वयं, ते भवमुक्तरानी' भगवंताचे गुण गाऊन जीवाला भवसागरातून तारण्यासाठी मनुष्याला उत्तम वाणी दिली आहे. इतर जीवांची वाणी हे करू शकत नाही, म्हणून जीवाला भगवत्प्राप्ति करून देणे यात वाणीची सुफलता आहे. १. सुफल शब्दाचे विवरण करण्यात टीकाकार मौनी आहेत. 'सकल साधना हे फल सुंदर। तवपदपद्मी प्रीति निरंतर' (७/४९/४) सु.-सुष्टु - सुंदर फल = सुफल. 'हरिपदपद्मी प्रीति निरंतर' हेच सुफल आहे.

(ग) सुपावन - जीभ ज्या प्रकारची भाषा बोलेल तशी ती (वाणी) होते. अभद्रवाणी, शिवराळ, इत्यादि शब्द हेच सुचवितात 'रामयशगुणचरित्र परमपावन' आहेच. म्हणून ते गाण्याने वाचेला पवित्रता येते. 'करण्यास पावन निज गिरेला रामयश तुलसीवदे' (१/३६१ छं) 'सितारामयश मंगलदायक॥ जाणुनि मी अल्पचि वाखाणीं। पावन करावया निजवाणी'

चौ. ९ (१) त्याचबळें - मोठमोठे संत भगवच्चरित्र वर्णन करून आपले परम कल्याण करून घेतात, तेव्हा 'महाजनो येन गतःस पंथाः' या न्यायाने, संतांचे उदाहरण पाहून धीर आला, विश्वास उत्पन्न झाला. हरियशगान परंपरा अनादि

काळापासून चालत आहे; या विश्वासावर राहून मीहि वर्णन करीन. येथे वंदन प्रकरण चालले आहे. रामकथा पुढे सांगणार आहेत.
(२) रघुपति व राम हे दोन शब्द एकाच वाक्यात का? हा पुनरुक्ति दोष नाही. राम परमात्मा अवतरले व त्यांनी जे चरित्र केले ते रघुपतीचे चरित्र सांगेन हा भाव आहे.
(क) 'रमु क्रीडायाम' याने राम शब्दाने लीला चरित्र सुचविले व 'रामसकल आनंद निधानू' 'आनंदा आनंदहि दाते' असल्याने मला आनंद मिळेल हेही सुचविले. पुन्हा शंका आली की सकल विद्याहीन व कवि नसणाऱ्या मला हे कसे साधेल? 'बालमराल कि मंदर उचली?' विचार करता आधार मिळाला म्हणून सांगतील की हे सहज घडेल.
चौ. १ (१) नवीन रस्ता कठीण भूमीतून डोंगरपर्वतातून तयार करून त्या मार्गाने जाणे हे दीन दुबळ्या निर्धनाला जरी तो धट्टाकट्टा असला तरी शक्य नाही. पण मोटार भरधाव जाण्यासारखा रस्ता कोणी तयार केलेला असेल तर लंगडे पांगळे सुद्धा हळु हळु जातील. पुष्कळ मुनींनी अनेक रामचरित्रे लिहून ठेवली आहेत (सूची प्रस्तावनेत पहावी) त्या मार्गाने जाणे काही कठीण नाही. अगदी सुखाने गमन (सु-गम) करता येईल.
(क) मुनींनी लिहिलेली चरित्रे सर्व सारख्याच दर्जाची आहेत असे नाही; ज्यांनी त्यांनी आपल्या कुवतीप्रमाणे वर्णन केले आहे. तसेच मीही यथामति करण्यास अडचण नाही. सर्वांनी सर्वचरित्रविभाग विस्तारपूर्वक वर्णिले आहेत असेही नाही. ज्याचे मन ज्यात अधिक रमले ते त्याने विस्तारपूर्वक वर्णिले आहे व बाकीचे थोडक्यात, मलाही तसे करण्यास काय हरकत आहे?
(ख) हिंदीतील भाई शब्द जुन्या वाक्प्रचारातील आहे जसा मराठीत बा किंवा बाबा स्वतःशी बोलताना सुद्धा 'काय करावं बा, 'अरे बाप्पा', स्त्रियात 'बाई'. वेडे वाकडे वर्णन करता येईल पण ते पार कसे पडणार? पुरे होईल की नाही? या शंकेचे समाधान पुढील दोह्यामध्ये करतात.

हिं.दो.- अति अपार जे सरित बर जौ नृप सेतु कराहिं।
चढि पिपीलिकउ परम लघु बिनु श्रम पारहि जाहिं ॥१३॥
एहि प्रकार बल मनहि देखाई। करिहउँ रघुपति कथा सुहाई ॥१॥
म.दो.- भूप करविती सेतु जैं अति अपार सरितांस ।
अति लघु मुंगिहि जातसे अश्रम परतीरास ॥१३॥
यापरिं करुनि मना बल अर्पण। करिन हि रघुपति कथेस शोभन॥१॥

अर्थ - ज्या मोठ्या दुस्तर नद्या असतात त्यांना जेव्हा राजेलोक पूल (सेतु) बांधवितात (करविति, कराहि) तेव्हा (त्याच्यावर चढून) अति लहान मुंगी सुद्धा

श्रमाशिवाय (अश्रम) परतीराला (पार) जाते (जातात-जाहिं) ॥१३॥ याप्रमाणे (अति कातर) मनास बल (धीर) देऊन (अर्पण करून) मी सुद्धा (हि) सुंदर रघुपति कथा (लेखन) करीन ॥१॥

टीका – दो. १३ - (१) काही टीकाकारांनी हिंदीतील 'सरित बर'चा अर्थ सागर घेतला आहे व नाना क्लिष्ट कल्पना काढल्या आहेत. इतके करूनहि रामचंद्रांनी केलेले सेतुबंधन सुचविले' हा सहज निघण्यासारखा भाव काढला नाही! सागरावर सेतु इतर कोणत्याही भूपाने बांधविला नाही व हिंदीत कराहिं हें बहुवचन आहे म्हणून तो अर्थ अयोग्य.

(२) रामचरिताला अपार सागराची उपमन देण्यात कवीची काव्यकला कुशलता दिसून येते. सागराला पूल बांधणे जसे भूपांना अशक्य तसे महामहा प्रसिद्ध कवींना सुद्धा सागरासारखे अपार रामचरित्र वर्णन करता आले नाही; त्यांनीही अल्पमात्रच वर्णन केले म्हणून अल्पचरित्रसूचक सरिताच उपमेला योग्य आहे.

(क) मोठ्या पूर्व कवींनी रामचरित्रें लिहिली हे त्यांनी सेतु बांधले; तुलसीदास म्हणतात की मी मुंगीसारखा क्षुद्रप्राणी, पण त्या पुलांच्या आश्रयाने अल्पसे चरित्र वर्णन करण्याचे कार्य तडीस नेणे (पार पडणे) मला सोपे आहे, व परिश्रम मुळीच पडणार नाहीत. वाल्मीकि व्यासादिक कविराजे, तुळसीदास मुंगी; अल्पसे रामचरित्र ही दुस्तर नदी; रामयश हे तीच्यातील जल; रामचरित्र लिहून पुरे होणे म्हणजे नदीपार जाणे; (शरयू रूपक पहावे).

चौ. १ (१) यापरि - या प्रकारे, मागील दोह्यांत सांगितल्याप्रमाणे (क) दुसऱ्या चरणात 'हि' घालण्यात हेतु हा की इतर महाकवींनी चरित्रलेखन जसे समाप्तिपर्यंत नेले तसे मला सुद्धा करता येईल हा मूळातील अध्याहृत अर्थ स्पष्ट व्हावा.

(ख) १३/९ मध्ये कहिहउँ - वदतो आहे कारण ८वीत 'बुध बरनहिं' बुध वर्णन करतात असे आहे. वरील दोघांना भूपसेतु करवीति (कराहिं) आहे तदनुसार करीन - करतो, करिहउँ आहे. यांच्या साहचर्याने मानसपीयूषांत एक सुंदर भाव काढला आहे तो -"राजे जसा सेतु करवितात तसा रामचरित्र सेतु मी करीन" व त्याच्यावर चढून, त्यांच्या आश्रयाने अगदी क्षुद्र, मूढ जीवाला सुद्धा भवसरिता दुस्तर पार करणे अगदी सुलभ होईल. अवतरणाच्या पुढील महत्वाचा भाव मात्र मा.पी.मध्ये नाही. 'करीं कथा भवसरिता तरणी (१/३१/४) असे जे पुढे स्पष्ट म्हटले आहे ते येथे सूचित केले आहे.

(ग) शोभन - ती कथा फार सुंदर - मनोहर होईल.

ल. टे. - तुलसीदासांनी कथा सांगेन, कथा करीन, कथा करतो अशा वा या कार्याच्या प्रतिज्ञा वारंवार केल्या आहेत. मंगलाचरणाच्या श्लोकांपासून दो ४३ पर्यंत बावीस (२२) वेळा असे उल्लेख आहेत. भाषानिबन्धमतिमंजुल आतनोति'

(मं.श्लो.७) ही पहिली प्रतिज्ञा आहे व 'अतां वदूं द्वयमुनिवरीं मिलन सुभग संवाद' (१/४३ म) ही शेवटची बाविसावी प्रतिज्ञा आहे. या बावीस प्रतिज्ञा बावीस प्रश्नांच्या व त्यांच्या कथांच्या (उत्तरांच्या) निदर्शक आहेत. प्रश्न ४१/२च्या टीकेत व प्रतिज्ञा ४३रा च्या टीकेत पहाव्यात व प्रस्तावनेत 'ग्रंथप्रतिज्ञा, प्रश्न व उत्तरे' हे प्रकरण पहावे.

कार्पण्य भावानें वंदन प्रकरण समाप्त झाले.

# कवि-वंदन प्रकरण

ज्या महाकवींच्या हरिचरितगायनाच्या आधारे कवीने आपल्या मनास धीर दिला त्यास वंदन करणे ओघाने प्राप्त झाले.

हिं.- व्यास आदि कबि पुंगव नाना । जिन्ह सादर हरि सुजस बखाना ॥२॥
चरन कमल बंदउँ तिन्ह केरे । पुरवहुँ सकल मनोरथ मेरे ॥३॥
कलि के कबिन्ह करउँ परनामा । जिन्ह बरने रघुपति गुन ग्रामा ॥४॥
जे प्राकृत कबि परम सयाने । भाषाँ जिन्ह हरि चरित बखाने ॥५॥
भए जे अहहिं जे होइहहिं आगें । प्रनवउँ सबहि कपट सब त्यागें ॥६॥

म.- व्यासादिक कवि पुंगवि नाना । कृत सादर हरि.सुयश वर्णना ॥२॥
त्यांच्या मी नमितों पदकमलां । पुरवा मनोरथां मम सकलां ॥३॥
कलियुग - कविनां करतो वंदन । जिहिं वर्णित रघुपतिचे गुणगण ॥४॥
जे प्राकृत कवि सुज्ञ अति भले । निजभाषे जिहिं हरियश लिहलें ॥५॥
झाले जे होतिल जे असती । त्यजुनि कपट सकलां त्यां प्रणती ॥६॥

अर्थ - व्यासादिक ज्या मोठमोठ्या (श्रेष्ठ-पुंगव) अनेक कवींनी मोठ्या आदराने श्रीहरिच्या सुयशाचे वर्णन केले त्या सर्वांच्या चरण कमलांना मी वंदन करतो (व विनवितो की) त्यांनी माझे सकल मनोरथ पूर्ण करावे ॥२,३॥ ज्या कवींनी रघुपतीच्या गुणगणांचे वर्णन (संस्कृतभाषेत) केले त्या कलियुगातील कवींना मी वंदन करतो ॥४॥

ज्या अति चतुर व अति सुज्ञ (शाहण्या) प्राकृत कवींनी आपल्या मातृभाषेत श्रीहरीचे यशगान केले त्या, पूर्वी झालेल्या विद्यमान असलेल्या व पुढे होणाऱ्या सर्वांना मी निष्कपटाने नमन करतो ॥५- ६)॥

**टीका — चौ.** (२-३) (१) येथें कलियुगांतील कवींशिवाय इतर संस्कृत कवींना वंदन असून व वाल्मीकी आदि कवि द्वापरयुगापूर्वीचे असून त्यांचे नाव न घालता आंधी 'व्यास आदि' (हिंदीत) का म्हटले या शंकेने विविध अर्थ पदच्छेद निर्माण केले आहेत; पण असे करण्याचे मुळीच कारण नाही.

(क) आदि कवि वाल्मीकींना तुलसीदासांनी हनुमन्तापेक्षा अधिक मान देऊन मंगलाचरणाच्या चौथ्या श्लोकात 'वन्दे विशुद्ध विज्ञानौ कवीश्वर कपीश्वरौ' असे, देवतांच्या पंक्तीत बसवून सीता व राम यांच्या आधी नमन केले आहे.

(ख) १९व्या दोह्यांत शंकर व गणपति यांच्या नंतर पण पार्वतीच्या पूर्वी त्यांचा उल्लेख केला आहे.

(ग) याच दोह्यांतील सोरठ्यात वेदांच्या व ब्रह्मदेवाच्या आधी त्यांना पुन्हा वंदन आहे; म्हणून व्यास आदि कवि पुंगव नाना, असा पदच्छेद करण्याची जरुर नाही. असे करण्याने तुलसी मर्यादा दक्षतेचा भंग होतो. आदि कवि पूर्वयुगांतले असून त्यांचा उल्लेख व्यासानंतर करण्यात मर्यादाभंग होतो.

(घ) व्यासांचे नाव आदि कवीच्या पूर्वी घालण्यात हेतु ते अवतार होते, असा काही लोक सांगतात पण ते पुरेसे नाही. वाल्मीकि ब्रह्मदेवसुत व वरुणसुत (कल्पभेदाने) होते. ते ब्रह्मसमान होते असे मानसातच म्हटले आहे.

(ङ) वाल्मीकिशिवाय प्रसिद्ध अशा कविवर्यात व्यास श्रेष्ठ होते म्हणून त्यांचा उल्लेख केला. (२) सादर - भगवच्चरित्र नुसते वर्णन करून भागत नाही, तर ते आदराने, प्रेमाने व आनंदाने वर्णिले पाहिजे. 'रघुपति चरित महेश तैं हर्षे वर्णू चेति' (१/१११/-) 'सांगूं सादर सब उमे = १(७/५५/-) 'सादर काक सुजाण म्हणाले' (७/११५/१२) 'प्रेमानें करि सादरगाना' (७/५७/८). (३) हरिसुयश म्हटले कारण की व्यासांनी स्वतंत्रपणे रामचरित्र किंवा कृष्णचरित्र वर्णिलेले नाही. पद्मभागवतादि पुराणात व महाभारतात ते वर्णिले असून इतर महत्वाची अवतारचरित्रे पण त्यातच वर्णिली आहेत. हरि=राम, कृष्ण इत्यादि (४) सकल मनोरथ - रामभक्तिमय काव्य लेखन हा मुख्य मनोरथ व सुबुद्धि, निर्मलमन वगैरे त्यास आवश्यक म्हणून पुढील चौपायांत इतर कवींना वंदन आहे.

व्यास

वसिष्ठांचे पुत्र शक्ति; त्यांचे पुत्र पराशर ऋषि व त्यांचे पुत्र सत्यवतीसुत ते व्यास. यांचे पुत्र शुकाचार्य, व्यासांच्या इतके विपुल व सर्वव्यापी काव्य कोणत्याही कवीने त्या युगात व नंतर लिहिलेले नाही. ब्रह्मसूत्रे, अठरा पुराणे व महाभारत हे मुख्य ग्रंथ आहेत. भगवद्गीता महाभारतातच आहे. पातञ्जल योगसूत्रावर व्यासभाष्य नावाने भाष्य आहे. 'व्यासोच्छिष्ट जगत्सर्वम्' व्यासांच्या वाङ्मयात नाही ते जगात नाही. 'व्यासोनारायण साक्षात्' श्रीगजानन त्यांचे लेखक झाले होते. एक श्लोक लिहून होताच दुसरा न सांगितल्यास पुढे लिहिणार नाही असे गजाननाने सांगितले होते. पूर्ण अर्थ कळल्याशिवाय श्लोक लिहू नये असे व्यासांनी सांगितले. (क) प्रत्येक कल्पांत द्वापरयुगात व्यास होतात. पुढील द्वापरयुगात अगस्ति ऋषि व्यास होणार असे स्कंद पुराणात म्हटले आहे.

चौ. ४. या चौपाईत कलियुगातील संस्कृत कवींना वंदन आहे; कारण पुढे भाषा कवींचा उल्लेख निराळा आहे. येथे पद व कमल शब्द नाहीत. सुचविले की कलियुगात कोणी कितीही उत्तम कवि झाला तरी पूर्वयुगातील भक्त कवींची बरोबरी तो करू शकत नाही.

चौ. (५-६) (१) प्राकृत कवि - साधारण कवि; जे अलौकिक दैवी सामर्थ्यसंपन्न नाहीत ते.

(क) अति भले - परमचतुर म्हणण्याचे कारण हेच की त्यांनी आपल्या मातृभाषेत हरिचरित्र लिहिले. त्यामुळे संस्कृत न जाणणाऱ्या बहुजनसमाजास कल्याणाचा मार्ग सुकर झाला.

(ख) सूज्ञ अति - यामुळे की त्यांनी हरिचरित्र वर्णिले.

(ग) भाषा शब्दाचा अर्थ हिंदी भाषा असा टीकाकार करतात; पण त्यामुळे तुलसीदासांकडे संकुचित दृष्टीचा दोष येतो. तुलसीदासांनी सर्व हिंदुस्थानात १४ वर्षे पायी यात्रा केली; त्यामुळे इतर देशभाषा असून त्यात हरिचरित्र वर्णन केलेले आहे हे त्यास सहज कळलेले होते हे मानसातील अनेक भाषांतील शब्दांवरून स्पष्ट होते. म्हणून अनुवादात 'निजभाषा' शब्द घालून अर्थ व्यापक व स्पष्ट केला. जे भविष्य काळच्या संतकवीना सुद्धा वंदन करतात त्यांची दृष्टि इतकी आकुंचित होती असे ठरविणे योग्य नाही.

(२) त्यजुनि कपट - ही पदे व्यासादि कवींना किंवा कलियुगीन संस्कृत कवींना वंदन करताना वापरली नाहीत. ते भूतकालीन व संस्कृत कवि; तेव्हा नमस्कार करणारा कपटाने नमस्कार करतो आहे असे त्यास वाटण्याचा संभव नाही. जे प्राकृत भाषा कवि समकालीन असतील त्यासच असे वाटण्याचा संभव जास्त. भविष्यकालीनांना सुद्धा वाटणार नाही.

(क) कपट सोडून म्हणजे अंतःकरणपूर्वक, प्रेमाने, चित्तात मत्सर, द्वेष, हेवा पण बाहेरून नम्रतापूर्वक नमस्कार करणारे मानव कलियुग प्रभावानुसार तुलसीदासकालीहि होते असे यावरून ठरते. येथे फक्त हरिचरित्र गाणाऱ्या कवींनाच वंदन आहे. इतरांचा अधिकार यांच्या पंक्तीत बसण्याचा नाही हे कारण आहे. सर्व नरांच्या वंदनात त्यांना वंदन केलेच आहे. 'देवदनुज नर नाग खग' (दो-७) यांत केले आहे.

ल. टे. हिंदी भाषेतील आदि कवि 'चन्दकवि'. पृथ्वीराजरासो हा त्याचा प्रसिद्ध ग्रंथ आहे. गंगकवि वगैरे होऊन गेले. सूरदास समकालीन. यांनी बालकृष्ण चरित्र फारच सुंदर लिहिले आहे त्यास सुरसागर म्हणतात. विद्यमान हिंदी कवींत मैथिलीशरण गुप्त श्रेष्ठ समजले जातात. त्यांचे साकेत (रामायण) वगैरे ग्रंथ सुंदर आहेत.

हिं.- **होहु प्रसन्न देहु बरदानू । साधु समाज भनिति सनमानू ॥७॥**
**जो प्रबंध बुध नहिं आदरहीं । सो श्रम बादि बाल कबि करहीं ॥८॥**
**कीरति भनिति भूति भलि सोई । सुरसरि सम सब कहँ हित होई ॥९॥**

म.- व्हा प्रसन्न हे द्या वरदान । साधु - समाजिं काव्य-सन्मान ॥७॥
जो प्रबंध बुध ना आदरिती । वृथा बालकवि ते श्रम करिती ॥८॥
कीर्ति भूति कविता ती लायक । सुरसरि - सम सकलां हितकारक ॥९॥

अर्थ - (आपण सर्वजण) प्रसन्न व्हा व हे वरदान द्या की साधुसमाजात (माझ्या) कवितेचा (काव्याचा) सन्मान होईल. ॥७॥ (कारण) ज्या प्रबंधाचा बुध (साधु) समाजात आदर होत नाही ते काव्य (तो ग्रंथ) लिहिण्याचे परिश्रम त्या मूर्ख (बाल) कवीने व्यर्थ केले (असे ठरते) ॥९॥ कीर्ति, धनादि ऐश्वर्य (भुति) व काव्य ही तेव्हाच लायक- योग्य ठरतात की जेव्हा सुरनदी (गंगे) प्रमाणे ती सर्वांना हितकारक होऊ शकतात ॥९॥

टीका — चौ. (७-८) (१) मागील चौपायांत ज्यांना नमन केले त्यांच्याजवळ ही वर याधना केली आहे. आपली कविता रामभक्तिभूषित व्हावी व तिच्यामुळे स्वांतःसुख मिळावे ही एकच इच्छा तुलसीदासांस आहे; रामभक्तिभूषित कवितेचाच साधुसंत (ज्ञानी-भक्त) आदर करतात. आदर करणे म्हणजे ती प्रेमाने श्रवण करणे 'रामभक्ति-भूषित मनिजाणुनि । परिसति सुजन सुवाणी बानुनि' (१/९/७) असे ज्या काव्याचे होत नाही ती काव्यरचना करणे म्हणजे निरर्थक परिश्रम करणे होय; कारण तशा काव्य लेखनाने भवश्रम शोषण होऊन परमविश्राम मिळणार नाही. रामभक्तिभूषित आहे की नाही याचा 'तत्त्वनिकषग्रावा' -कसोटी म्हणजेच संतसमाजात मान्य होणे. एवढयासाठी हा वर मागितला. संताकडून आपल्या काव्यास मान मिळावा हा हेतु नसून काव्यपरीक्षेचे ते साधन आहे. स्वतःचे काव्य वाईट असले तरी ते चांगले वाटते म्हणून स्वतःच्या मताने काव्याची लायकी ठरत नाही. 'कोण साधु शुचि झाला स्वमतें' (२/२६१/२) 'बलवदपि शिक्षितानां आत्मन्यप्रत्ययं चेताः' यात तेच सांगितले. (क) जे संतांना आवडते ते भगवंतास आवडते; आणि भगवंतास आवडले की त्याने स्वान्तःसुखप्राप्ति होते. (ख) ज्याला कोणाहीकडून सम्मानाची आशा आहे तो साधु नव्हेच. 'मानद सकलां स्वयें अमानी। भरता! प्राणासम ते प्राणी' (७/३८/८) तुलसीदासाना सन्मानाची इच्छा होती असे म्हणणे म्हणजे सूर्य उगवल्याने काळोख पडतो व काजवे चमकू लागले म्हणजे रात्र पळते असे म्हणण्यासारखे आहे. संतांना मान्य होणाऱ्या काव्यात कोणते गुण लागतात ते पुढल्या चौपाईत सांगतात.

चौ. ९ - ल. टे. या चौपाईचे दोन अर्थ आहेत; एक सामान्य व एक विशेष अर्थ. सामान्य अर्थानें ही चौपाई एक सुभाषित आहे; व विशेष अर्थाने काव्याचे मुख्य गुण सांगितले आहेत. पहिला अर्थ (१) ज्याच्या योगाने सर्वांचे हित होऊ शकेल ते ती भूति म्हणजे संपत्ती, सत्ता, ऐश्वर्य. 'विभूतिर्भूतिरैश्वर्यम् अणिमादिकमष्टधा' (अमर) अष्टमहासिद्धी सारखे ऐश्वर्य असून सुद्धा त्याने सर्वांचे हित होत नसेल तर ते ऐश्वर्य चांगले नाही; अयोग्यच ते. स्वार्थासाठी,

दुसऱ्यास दुःख देण्यासाठी धन सत्ताऐश्वर्यादिकांचा उपयोग होणे हे अति वाईट, दुर्गति देणारे.

(क) कीर्ति - ज्या कार्याने कीर्ति मिळविल्याने सर्वांचे हित होणे अशक्य असेल तर ते कीर्तिदायक कार्य असत्कार्य व ती कीर्ति सुद्धा अपकीर्तिच.

(ख) ज्या कवितेने विषयी, मुमुक्षु, साधक व सिद्ध (ज्ञानी) यांचे हित होणे शक्य नसेल ती कविता, ते काव्य, तो ग्रंथ, मागल्या चौपाईत सांगितल्याप्रमाणे निरर्थक श्रमच.

(२) 'सुरसरि-सम-भगीरथाने गंगा आणली त्यामुळे त्याची कीर्ति झाली व गंगेला भागीरथी हे नाव पडले; आणि त्याबरोबर ज्याला इच्छा असेल त्यास गंगास्नान-पानादिकांनी आपल्या पापांचा विनाश करणे सोपे झाले. गंगा जात, गोत, स्त्रीपुरुष धर्मिष्ठ अधर्मी इत्यादि विचार न करता सर्वांना पावन करण्यास समर्थ आहे; निर्मळ, मधुर, विशाल आहे. तिचे जल ब्रह्मद्रव आहे. असेच ऐश्वर्य, कीर्ति व काव्य पाहिजे.

दुसरा अर्थ - मुख्यार्थ आहे तो - संतांना मान्य होणारे काव्य कसे असते : -

(१) कीर्ति - ज्या कवितेत वर्णन केलेल्या कीर्तिच्या गानाने, गंगेप्रमाणे सर्वांचे हित होऊ शकेल अशी कीर्ति वर्णिलेली पाहिजे. 'रामभक्ति जिथ धार भागिरथि' (१/२/८) त्या कीर्तित हरिभक्तीचा जोराचा प्रवाह (धार) पाहिजे, तरच ती कीर्ति सर्वांचे हित करण्यास - होण्यास उपयुक्त ठरेल. रामभक्तीत विविध प्रकारचे ऐश्वर्य देण्याची शक्ति आहे. हा अर्थच अभिप्रेत आहे हे पुढील चौपाईतील 'रामसुकीर्ती' शब्दाने सिद्ध होते

(२) भूति - कविता हे एक पद घेतले पाहिजे. भूतियुक्त कविता, भूतियुक्त भाषा असलेली कविता.

(क) काव्यातील भाषेचे ऐश्वर्य, प्रभाव, असा पाहिजे की ती भाषा ऐकल्याबरोबर वैऱ्यांनी सुद्धा वाहवा करावी. असे सामर्थ्य नसेल तर ती रिपूचे' हित कसे करील. शत्रूला सुद्धा वश करणारी भाषा पाहिजे. वशित्व ही एक भूति आहेच, अशा भाषेलाच (९/७ मध्ये) सुवाणी म्हटले आहेच, पुढील दोह्यात हा अर्थ स्पष्टच आहे. ल. ठे. हा दुसरा अर्थ मुख्य न मानल्यास पुढील दोन चौपाया व दो १४ रा, १४ म यांची व्यवस्थित संगति लागत नाही. आता आपल्या कवितेतील कीर्ति व भाषा या विषयी सांगतात.

हिं.- **राम सुकीरति भनिति भदेसा । असमंजस अस मोहि अँदेसा ॥१०॥**
**तुम्हरी कृपाँ सुलभ सोउ मोरें । सिअनि सुहावनि टाट पटोरे ॥११॥**

म.- **राम-सुकीर्ती भाषा बोजड । याच विषमते वाटे हो! जड ॥१०॥**
**कृपे आपुल्या मज हि सुलभ तें। रेशिम तरटावर हि शोभतें ॥११॥**

अर्थ - (मी लिहिणार असलेल्या कवितेत) रामचंद्रांची उत्तम, सुंदर कीर्ति (सु+कीर्ति) आहे (त्यामुळे एक अडचण दूर झाली.); पण माझी भाषा अगदी बोजड आहे; हीच मोठी विषमता आहे, त्यामुळे मला जड वाटते हो! (सुरसरिसम हितकर काव्य कसे होणार ही चिंता वाटते) ॥११। (पण आपण कृपा केलीत तर) आपल्या सर्वांच्या कृपेने ते सुद्धा(हि) मला सुलभ होईल कारण रेशीम तरटायर सुद्धा सुंदर दिसते (प्रभावी, मनोहर ठरते). (कोणी कलावंताने कसे शिवावे हे उत्तम शिकविले तर तरटावर गालिचे होतात रेशमाचे).

टीका – चौ. १० - (१) सूचना - ही टीका वाचण्यापूर्वी मागल्या चौपाईची टीका पुन्हा एकदा वाचून पाहावी.

(क) ऐश्वर्यसंपन्न सुभाषा व विमल कीर्ति या दोन गोष्टी पाहिजेत हे मागे सांगितले पैकी 'ज्यांच्या यशा प्रतापा पुढतीं। शशिमलीन रवि शीतल गमती' (१/२९२/२) अशी परमश्रेष्ठ रामकीर्ति आहे. पण माझी भाषा मात्र अशा कीर्तिचे वर्णन करण्यास पाहिजे तितकी लायक नाही. या विवेचनावरून खात्री होईल की मागल्या चौपाईचा दुसरा अर्थच मुख्य आहे. अन्यथा तीन गोष्टी पैकी दोनांचाच विचार येथे केला असे ठरते व तिसरी जी विभूति तिचा येथे संबंध रहात नाही. पुढील चौपाया व दोहे या १०व्या चौपाईतूनच निघाले आहेत हे पुढे दिसेल; म्हणून भूतियुक्त भाषा हाच अर्थ योग्य आहे.

चौ. ११ (१) यात दृष्टान्त दिला तो. तरट अगदी हीन व रेशीम अगदी उत्तम, श्रेष्ठ. यात फार विषमता आहे. तथापि रेशमाचे गालीचे तरटावर - तागाच्या ओबडधोबड कपड्यावर रेशीम शिवून तयार केलेले असतात; व ते सर्वांस नयन मनोहर, सुखद, हितकर, हवे हवेसे वाटणारे होतात. रेशीम तरटावर शिवण्याची कला जर कोणी कृपा करून शिकवली तरच तरटावरचा गालीचाही सर्व हितकर होऊ शकतो, एरव्ही हे होणे शक्य नाही गालिचा शिवण्याच्या कलेने चित्तचक्षुवशीकरणाची भूति- त्या तरटांत जशी येते, तशी भूति माझ्या भाषारूपी तरटावर रामकीर्तिरूपी रेशीम शिवण्याने त्या भाषेत उत्पन्न होईल. ही शक्ति नसेल तर माझ्या भाषेत रामचंद्रांचे सौंदर्य पाहिजे तेवढे आकर्षक होणार नाही. ती शक्ति आपणांसारखे कविश्रेष्ठ मला देऊ शकतील. आपण कृपा केलीत की ती शक्ती मला मिळेल.

(क) ही शक्ती भाषेत बुद्धीतून उतरत असते म्हणून बुद्धीच्या ठिकाणी ती काव्यशक्ती आपल्या कृपेने येईल हे सांगण्यासाठी पुढला दोहा आहे.

हिं.दो.- सरल कवित कीरति बिमल सोइ आदरहिं सुजान ।
सहज बयर बिसराइ रिपु जो सुनि करहिं बखान ॥१४ रा॥
सो न होइ बिनु बिमल मति मोहि मति बल अति थोर ।
करहु कृपा हरिजस कहउँ पुनिपुनि करउँ निहोर ॥१४म॥

म.दो. बिमल कीर्ति कविता सरल सुज्ञ आदरिति तीस ।
सहज वैर बिसरूनि रिपु परिसुनि वानिति जीस ॥१४ रा॥
तें न होइ विण विमल मति मम मतिबल लवभार ।
करा कृपां हरियश वदें, विनवित वारंवार ॥१४ म॥

अर्थ - जी कविता सरल असून जिच्यात विमल रामकीर्ति आहे व जिचे श्रवण केल्यावर स्वाभाविक वैर विसरून वैरी सुद्धा जिची वाखाणणी करतात त्याच कवितेला सूज्ञ (सुजाण) आदर देतात. ॥दो.रा.॥ पण ही गोष्ट बुद्धि विमल असल्याशिवाय होत नाही, (घडत नाही,) व माझ्या बुद्धिचे बल तर अगदी थोडे (लवभार) आहे; म्हणून मी वारंवार विनवीत आहे की, मी हरियश गात (सांगणार) आहे, तरी माझ्यावर कृपा करा ॥म॥

**टीका** - ल. डे. चौ. ९ मध्ये कवितेचे लक्षण गूढार्थाने सांगितले आहे तेच येथे उपसंहाररूपाने सांगत आहेत. उपपत्ति पण देत आहेत. यात अपूर्वता व फलहि आहे. अभ्यास पूर्वी 'द्या वरदान', कृपें आपल्या' यात आलाच आहे व पुढेही आहे. ९व्या चौपाईत उपक्रम केला आहे.

(१) या दोन दोह्यांचा अर्थ सरळ आहेच; पण जितका सरळ तितकाच तो तत्त्वान्वेषी बुद्धीस गूढ आहे. सरळ सोपा अर्थ वर दिला आहे. आता गूढार्थ पाहू. (दो. रा.) या दोह्याचा निःसंशय अविरोधी व निश्चित अर्थ कळण्यास पुढील वचनांशी त्याचा समन्वय केला पाहिजे; तेव्हा या दोह्यातील सरल, सुजाण (सूज्ञ) आदरिति व विमल कीर्ति या चौघांचा अर्थ बरोबर लागेल.

१ विमल कीर्ति कविता सरल तीस आदरिति सूज्ञ (सुजाण) (१४ रा)
२ ग्राम्य गिरा सियराम यश ऐकति गाति सुजाण (१०म)
३ सबगुणरहित कुकविकृत वाणी । रामनाम यश अंकित गणुनी' ॥५॥
श्रवण कथन बुध करिती सादर । संत गुणग्राही सम मधुकर' १०/६॥
४ रामभक्ति भूषित मनिं जाणुनि । परिसति सुजन सुवाणी वानुनि ॥९/७॥

(क) वरील चार वचनांचा अर्थ जवळ जवळ एकच आहे. ९/७ मध्ये उपक्रम केला व १४रा मध्ये उपसंहार आहे.

(१) सुजाण, सूज्ञ, बुध- संत व सुजन हे शब्द समानार्थक घेणे जरूर आहे. सुजाण (सूज्ञ) याचा सामान्य अर्थ पंडित घेतल्यास बाकीच्या दोन वचनांना काहीच किंमत राहत नाही व विरोध उत्पन्न होतो.

(२) सरल कविता, ग्राम्य गिरा, सबगुणरहित कुकविकृत वाणी व सुवाणी - पहिल्या दोहोत कर्ता सुजाण आहे. दुसऱ्या दोहोत कर्ता संतबुध व सुजन आहे - म्हणजे एकच आहे. मग ग्राम्य व सरळ कविता यांचा अर्थ एकच घ्यावयाचा

काय? उत्तरे नाही व होय ही दोन्ही आहेत. तसेच ज्यांना संत ऐकतात ती कुकविकृत वाणी आहे आणि सुवाणीही आहे. हे कोडें पुढे सोडवू.

(३) विमल कीर्ति, सियरामयश, रामनामयश व रामभक्ति हा विषय सर्वात एकच आहे म्हटले तरी चालेल. सीतारामाचे विमलयश व रामनामयश याने उत्पन्न होणारी रामभक्ति हा विषय (कर्म) सर्वत्र, चारी ठिकाणी घेणे जरूर आहे. कर्ता कर्म यांचा विचार झाला; आता क्रियापदांचा करू.

(४) आदरिति, ऐकति-गाति, श्रवणकथन सादर करिती, मनि जाणुनि वानुनि परिसति काय जाणून? रामभक्ति भूषित आहे हे जाणून, काय वानुनि 'सुवाणी' आहे असे वाखाणीत, वाहवा करीत.

यावरून आता सरल कविता म्हणजे काय हे ठरवावयाचे. भाषा ग्राम्य असली (तरट) सर्वगुणहीन कुकवीने लिहिलेली असली तरी जी वाणी- कविता रामभक्तीने भूषित झाली असेल ती सुवाणी आहे व तीच सरल कविता, सरल काव्य असे म्हणता येईल.

(क) कविता सरल - सहज समजण्यास सुलभ आहे, रामविमल यश युक्त आहे, पण तिच्या श्रवणाने रामभक्ती उत्पन्न होण्यासारखी नसेल तर संत तिचे आदराने पान करतील काय? कधीच करणार नाहीत. हे विधान अद्याप चटकन पटणार नाही; पण सरळ शब्दाचा अर्थ अद्याप निश्चित झाला नाही; कारण रामकीर्तिमय असून भक्तिउत्पादकता कवितेच्या ठिकाणी उत्पन्न होण्यास लागणारा जो आवश्यक गुण तो दोह्याच्या उत्तरार्धात सांगितला आहे. त्याचा विचार केला म्हणजे सरळ शब्दाचा अर्थ सरळ लागेल; व विमलमति (१४ म) पदाचा अर्थही सिद्ध होईल. सरल शब्द कपटी कुटिल या शब्दांच्या विरुद्धार्थी आहे. भगवंताला व संतांना छळ कपट मुळीच आवडत नाही. 'निर्मल मन जन तो मज पावे । मजसि कपट छल छिद्र न भावे॥ (५/४४/५) 'सहज सरलता मनि न कुटिलता । यथालाभ संतुष्ट चित्तता' (७/४६/२) हे भक्तीचे मुख्य लक्षण प्रभूनीच सांगितले आहे. अर्थ अगदी सहज कळण्यासारखा असला, रामकीर्ति त्यात वर्णन केलेली असली तरी जर लेखक स्वार्थ, धन, कीर्ति, सन्मान इत्यादि हेतूंनी लिहीत असला, या दुर्गुणांचे सुद्धा मंडन केले असले तरी ती कविता भक्तिरस देणारी, भगवंतास रुचणारी व संतास आवडणारी होऊ शकेल काय? हे वाचकांनीच आता ठरवावे. शुद्ध भक्तिमय हृदय नसता प्रतिष्ठेसाठी रामभक्तिमय काव्य दांभिक सुद्धा लिहू शकतात. हल्ली तर अशा संतचरित्रांचा सुकाळ झाला आहे, पण मर्मज्ञ संत अशांचा आदर करीत नाहीत.

कपट म्हणजे माया - अविद्या, अज्ञान, हिंसा इत्यादि. निष्कपट म्हणजे सरळ होण्यास विमलमति लागते. तिचीच याचना कवींजवळ, जानकीजवळ व इतरांपाशी केली आहे. जसे भागवतात व तुकारामादि संतांच्या ग्रंथांत कैवल्य मोक्षाला गौणत्व दिले आहे तसेच मानसात मोक्षाला अति गौणत्व आहे, 'भक्तिलुब्धते मुक्ति

अनाद्रिति' 'नको ब्रह्मज्ञान आत्मस्थिति भाव । मी भक्त तू देव ऐसे करि' (म. संत). मोक्षकामनेसहित इतर सर्व कामना हा मळ आहे. सरल म्हणजे निर्मल (मन) विमल (मति) असलेला हा अर्थ सिद्ध झाला. कुटिलता दंभादि विहीन असलेले जे काव्य ते सरल काव्य हा अर्थ सिद्ध झाला. याची परीक्षा-कसोटी दोह्याच्या उत्तरार्धात सांगतात.

'सहज वैर विसरूनि रिपु परिसुनि वानिति' -सहजवैर - स्वभाववैर, जसे मांजर, उंदीर, नकुल सर्प यांचे असते. हे असले वैर त्या देहाबरोबरच जन्मत असल्याने ते विसरणे ही अपवादात्मक गोष्ट आहे. मानसात सहजवैर विसरल्याचे वर्णन चार ठिकाणी आहे. १) उमेचा अवतार पार्वती जन्मास आल्यास हिमालयात 'सहजवैर सबजीवी त्यजिलें । प्रेम गिरीवर करती सगळें' (१/६६/२) २) वाल्मीकींच्या आश्रमात 'विरहित वैर मुदितमन चरती' (२/१२४/६). ३) रघुवीर चित्रकूटला राहू लागल्यावर तेथे, 'त्यजुनि वैर विचरतात संगें (२/२३६/४). ४) रामराज्यात - 'सहजवैर मृगविहंग विसरति' (७/२३/२). या चौघांत पार्वती व राम ईश्वरावतारच असल्यामुळे ती उदाहरणे सामान्य नाहीत. वाल्मीकीचे उदाहरण ग्राह्य आहे. सहज स्वभाव अभंग असून कसा बदलतो? 'अहिंसा प्रतिष्ठायां तत्सन्निधौ वैरत्यागः' (पा. यो.) ज्याच्या ठिकाणी अहिंसा परिपूर्ण असेल त्याच्या सांन्निध्यांत त्या वातावरणात सर्व जीव आपसांतील वैर विसरतात; हा नियम सर्व देशात सर्वधर्मीयांस लागू आहे. इमर्सनच्या खाटेखाली तो वनात राहण्यास जाई तेथे उंदीर मांजरे सर्प प्रेमाने वागडत असत. वाल्मीकींच्या ठिकाणी अहिंसा बाणली होती म्हणूनच 'सहज वैर विसरूनि रिपु परिसुनि वानिति' हे भाग्य, हे ऐश्वर्य वाल्मीकी रामायणास लाभले आहे. नव्वद संस्कृत रामायणे असून त्यांना इतका मान मिळाला नाही. 'परमधर्म वेदोक्त, अहिंसा' (७/१२१/२२). ज्याची बुद्धि अहिंसारूपी परमधर्माने अशी पावन झाली असेल त्यांच्या प्राकृत भाषेत, ग्राम्यगिरेंत, सुद्धा शत्रूंना मित्र बनविण्याची शक्ती येते. याने सुचविले की जो कवि असा परम धर्ममय असेल, ज्याच्या ठिकाणी कोणतेही छलकपट नसेल व ज्याने आपल्या काव्यात रामविमलयशासह या परमधर्माचे व या सरळपणाचे वर्णन केले असेल, ते काव्य, ग्राम्य-सदोष-भाषेत जरी असलें तरी ते संत आदराने, प्रेमाने व उत्साहाने श्रवण-कथन-कीर्तन करतील व त्या काव्याची भाषा फार सुंदर आहे असे वारंवार म्हणतील. मातृभाषेतील काव्य ज्यांना विषासारखे वाटते असे संस्कृताभिमानी पंडित सुद्धा तुलसीरामायण वाचतात.

या लेखकास १९५३ च्या चैत्रात आलेला अनुभव. उत्तर हिंदुस्थानात काही निमित्ताने जाणे घडले असता एक कर्मशील शास्त्रीबोवा (हिंदी) भेटले. जिथे रामायणाची पारायणे व प्रचारनित्य चालतो अशा संस्थेत संस्कृत पाठशाळेचे अध्यापक असून वयाच्या ४५ वर्षापर्यंत त्यांनी तुलसीरामायण उघडून सुद्धा पाहिले नव्हते. मोडक्या तोडक्या अशुद्ध हिंदी भाषेतून झालेली प्रज्ञानानंदाची काही प्रवचने

ऐकली व गोस्वामींचे गूढभाव ऐकून त्यांना तुलसीरामायण पठनाची इच्छा झाली असे त्यांनी स्वतः येऊन सांगितले. पूर्ण अहिंसा अंगी बाणल्याशिवाय पूर्णसरलता, कपटहीनता येणे शक्य नाही. (तुलसीदास वाल्मीकींचेच अवतार.) ही गोष्ट विमल मतिवाचून घडत नाही म्हणून पुढील दोह्यात विमलमति मागतात.

दो. १४ म. (१) मम मतिबल लवभार (फार थोडे) हे शब्द विमलमतीच्या विरुद्धार्थी घेतले पाहिजेत. विमलता हेच येथे बुद्धीचे बळ आहे. भाव हा की माझ्या बुद्धीत मलिनता फार आहे. निर्मळपणा फार थोडा आहे. १२/१-४ चौपाया सटीक पहाव्या म्हणजे मतिबल अति थोडे याचा यथार्थ पुन्हा स्पष्टपणे ठसेल. सर्व कवींना वारंवार प्रार्थना करून मागतात की तशी रामभक्तिभूषित कविता होण्याला लागणारी भूति ज्या विमलमतीच्या योगाने येते ती विमलमति मला लाभेल अशी कृपा करा.

(२) ११व्या चौपाईत कृपेची याचना सुचविली येथे याचना केली व पुढील दोह्यात पुन्हा करतात म्हणून वारंवार म्हटले.

(क) नवव्या चौपाईत उपक्रम केला व येथे उपसंहार केला. सहज वैर विसरून रिपु श्रवण करतील ही अपूर्वता सांगितली; संत आदराने श्रवण करतील हे फल सांगितले. दो. १४ रा चा जो विस्तार करावा लागला तो उपपत्ति-कार्यकारणभाव-स्पष्ट करण्यासाठीच. चौ-७, ८ व दो. १४ रा मध्ये फळाचा वारंवार उल्लेख केला तो अभ्यास. हे प्रकरण किती न्यायघटित आहे हे येथपर्यंत यथामति दाखविले. पुढील दोह्यात रामचरितमानस कवींना वंदन करून हे प्रकरण समाप्त होईल.

हिं.दो.- कबि कोबिद रघुबरचरित मानस मंजु मराल ।
“बाल बिनय सुनि सुरुचि लखि मोपर होहु कृपाल ॥१४चं॥

म.दो.- कवि कोविद रघुवर चरित-मानस मंजु मराल ।
बालविनति ऐकुनि सुरुचि लक्षुनि कृपा कराल ॥१४चं॥

अर्थ - कविश्रेष्ठ हो! आपण रघुवर चरित्ररूपी मानसातले (मानस सरोवरातले) सुंदर (मंजु) हंस (मराल) आहात, म्हणून माझी बालकाची विनंती ऐकून व माझी रुचि चांगली आहे हे लक्षात घेऊन आपण माझ्यावर कृपा कराल (अशी आशा आहे)

टीका – (१) रामचरित-मानस हे या ग्रंथाचे नाव येथे सुचविले आहे. नामकरण संस्कार पुढे व्हावयाचा आहे.

(क) पूर्वी 'कविपुंगव नाना' (१४/२) व 'कविकोविद मनिं अशा विचारीं । गाती हरियश कलिमल हारी' (११/६) असे म्हटले आहे म्हणून कवि व कोविद असा अर्थ करणे अयोग्य. ११/६ मध्ये ज्यांनी कविकोविद एक पद घेतले त्यांनीच येथे कवि व कोविद अशी दोन पदे मानली! ११/६ टी.प.

(ख) रामचरित मानसाचे आदिकवि महेश, नंतर लोमश ऋषि, भुशुंडी, याज्ञवल्क्य, भरद्वाज व तुलसीदासांचे गुरु नरहरि वगैरे जे झाले त्या सर्वास येथे नमन आहे.

(ग) रघुवर शब्दाने भरत शत्रुघ्न व लक्ष्मण यांचाही बोध होतो.

(घ) मानस - मानस सरोवर - मानसरूपक व मानस म्हणण्याचे कारण पुढे (३६-४३ व दो ३५) दिलेले आहे.

(ङ) मराल - हंस मानस सरोवरात राहणारे पक्षिविशेष. यांच्या काही जाती इतरत्रही रहात होत्या. हंस, कलहंस व राजहंस असे तीन प्रकार या मानसात वर्णिले आहेत. 'संतहंस गुण घेति -' (१/६१-) हा ज्ञान, विवेकसुचक आहे. 'कलहंस पिक शुक मधुर कलरव (१/८६ छं) मधुर स्वरात गायन सूचक आहे. 'चाले राजमराल' (१/१३४/-) गति, धर्मनय शीलता सूचक आहे.

(२) बालविनति - 'रामचरणरति द्या कृपें बालविनति ऐकून' असा उपसंहार संत नमनाचा केला आहे तसाच येथे 'बाल' शब्दाने अज्ञानीपणा, अजाणता, दीनता सुचविली, व मातापितरांचे नाते यांच्याशीपण जोडले. बालाची विनंती चांगल्या गोष्टीबद्दल असली तर समर्थ आईबाप वाटेल ते करून ती पुरवितात तशी आपण पुरवावी.

(क) सुरुचिलक्षुन - 'मति अति नीच उच्च रुचिरुचिरहि'॥ मज इच्छा रघुपति गुणगानीं' (१/८/७/६) 'हरियश वदे'

कविवंदन प्रकरण समाप्त झाले.

# समष्टि-वंदन प्रकरण

सो.हिं.- बंदउँ मुनिपद कंजु रामायन जेहिं निरमयउ ।
सखर सुकोमल मंजु दोष रहित दूषन सहित ॥१४द्रा॥
बंदउँ चारिउ बेद भवबारिधि बोहित सरिस ।
जिन्हहिं न सपनेउ खेद बरनत रघुबर बिसद जसु ॥१४य॥

म.सो.- वंदेमुनिपद-कंजु ज्यानीं रामायण रचित।
सखर सुकोमल मंजु दोषरहित दूषण सहित ॥१४द्रा॥
वंदे चारी वेद भववारिधिं जहाजा-सदृश ।
ज्या स्वप्निहि ना खेद वर्णित रघुवर-विशद यश ॥१४य॥

अर्थ - सखर असून अतिकोमल व सदूषण असून दोषरहित असे मंजु (सुंदर मनोहरी रामायण ज्यांनी निर्मिले (रचले) त्या वाल्मीकीमुनींच्या पदकमलांना मी वन्दन करतो. ॥द्रा॥ भवसागरांत जे जहाजा सारखे आहेत व रघुवराचे विशद (उज्ज्वल) यश वर्णन करण्यात (करीत असता) ज्यास स्वप्नात सुद्धा खेद (श्रम) होत नाही त्या चारी वेदांना मी वंदन करतो ॥य॥ (पुढे सोरठा वृत्तांतच ब्रह्मदेवाला वंदन आहे).

टीका — दो. १४ द्रा. (१) मागील सोरठ्यात रघुवरचरितमानस - कविकोविदांना वंदन केले तोच मुनिश्रेष्ठ आदि कवि वाल्मीकींची स्मृति झाली. येथे कवि म्हणून वंदन नसून मुनि या नात्याने आहे. ब्रह्मदेवाच्या पूर्वी यांना वंदन करण्याचे कारण सोरठ्यातच स्पष्ट आहे. वेदांचे या भूतलावरील साक्षातरूप जे रामायण त्याचे हे जनक आहेत. ब्रह्मदेवांचे समीप वेदांची साक्षात वसती असते. 'पायुनि अंतर्धान गत तेथे ब्रह्मागार' (७।१३/-) ब्रह्मदेव वेदांचे जनक नाहीत; पण रामायणरूपाने वेदांचे जनक वाल्मीकी आहेत. 'वेदः प्राचेतसादासीत् साक्षाद्रामायणात्मना' (वा.रा.मं.श्लो.) (क) वेदश्रवणाचा अधिकार द्विजांशिवाय इतर कोणास नाही; म्हणून रामायण व त्यांचे जनक यांचा एकत्र संबंध दाखवून वेदांच्या पूर्वी त्यांना वंदन केले. वाल्मीकीना आधी वंदन करण्यात मागील दोह्यातील चर्चेशी त्यांचा संबंध हा एक हेतु आहे. सहज वैर विसरून रिपूनी सुद्धा श्रवण करावे असे रामायण रचण्याचे सामर्थ्य वाल्मीकींना नारदांच्या कृपेनेच आले. तसेच वाल्मीकींच्या कृपेने तुलसीदासांस विमलमति मिळेल असे त्यांस वाटले म्हणून त्यांना येथे प्रथम नमन केले आहे. हे स्वरूपाभिनिवेशवंदन आहे. नमस्कार करताना स्वरूप प्रताप, ऐश्वर्यादिकांचे स्मरण करीत सेवाभावाने वंदन करण्यास स्वरूपाभिनिवेश वंदन म्हणतात, अशा वन्दनाने वंद्याच्या ठिकाणचे गुण वंदकास मिळू शकतात.

२ हा सोरठा 'नमस्तस्मै कृता येन रम्या रामायणी कथा। सदूषणापि निर्दोषा सखराऽपि सुकोमला' या श्लोकाचा अनुवाद दिसतो. (शेखर कवि).

(क) मंजु - रम्य, मनोरम; वा.रा.स मंजु म्हटले व 'भाषानिबन्धम् अति मंजुलम् आतनोति' असे मंगलाचरणात म्हटले. तुलसी मानस अतिमंजु- अतिमंजुल आहे. असे म्हणण्याचे कारण पुढील चरणात दिसते.

(ख) सखर सुकोमल दोषरहित दूषण सहित - याचा अर्थ अनेकांनी अनेक शंका काढून अनेक प्रकारानी केला आहे. पंडित रामकुमारदासांच्या अर्थाशिवाय (मा.पी.पृ. २६३) इतर अर्थ कपोलकल्पित, अंधारांत चाचपडणारांचे आहेत. सखर सुकोमल मंजु यांचा सख रसु, कोमल रसु, मंजु रसु असा अर्थ करण्यापर्यंत मजल गेली आहे.

(ग) सखर- खर राक्षसाने युक्त व ओजयुक्त; दूषणसहित - दूषणराक्षसाने युक्त व दूषणे असलेले असे अर्थ आहेत.

(घ) खरदूषण राक्षस प्रत्येक रामायणात असावयाचेच, तेवढ्याने वा. रा. वैशिष्ट्यच सिद्ध होत नाही. यथार्थ : - काव्यात मुख्य तीन वृत्ती असू शकतात. १) उपनागरिका किंवा वैदर्भी. ही रम्य कोमल असते. येथे मंजु शब्दाने वैदर्भी सूचविली आहे. २) परुषा -गौडी - सखर (परुषतायुक्त) शब्दाने सुचविली. ३) पांचाली -अति कोमल असते, ती सुकोमल शब्दाने सुचविली. सार हे की वा.रा.त.या तिन्ही वृत्ती; तीन प्रकारची भाषाशैली आवश्यकतेनुसार आहे. हनुमन्नाटक गौडी वृत्तिप्रधान आहे. रसानुकूल भाषाशैली वा. रा. आहे. येथे सखर सुकोमल याने विरोधाभास अलंकार साधला आहे. खर-परुष, कठोर, खडबडित आणि कोमल यात विरोध आहे असे वाटते पण विरोध नसून विरोधाचा आभास निर्माण केला आहे.

(३) दोषरहित दूषणसहित - असत्य भाषण हा दोष- पाप आहे; सत्य असून अप्रिय भाषण हे दूषण आहे. उदा. - वा.रा. सीता वनगमनप्रसंगी रघुनाथास टाकून बोलली आहे तसे बोलणे सकारण असले तरी पत्नीने बोलणे दूषणचआहे. लक्ष्मणाने दशरथांची निन्दाच केली आहे. त्याने वर्णन केलेल्या गोष्टी सत्य आहेत तथापि पुत्राने असे बोलणे हे दूषण आहे. अशी अनेक उदाहरणे वा.रा. आहेत. म्हणून ते सदूषण आहे. येथे सुद्धा विरोधाभास अलंकारच आहे. मानसात असे दूषणहि नाही म्हणूनच अति मंजुल म्हटले ते योग्य आहे. रामायणरूपाने वेदच वाल्मीकीच्या मुखांतून प्रगट झाले असल्याने पुढील सोरठ्यांत वेदांना 'स्वरूपाभिनिवेश वंदन करतात.

दो. १४ च. (१) वन्दे चारी वेद - येथे वेद म्हणजे अंगे व उपांगे यांसह ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्वणवेद हे मुख्य होत. धनुर्वेदादि उपवेद आहेत. शिक्षाकल्पव्याकरणादि अंगे आहेत आणि इतिहास पुराणादि उपांगे आहेत. उपनिषदे श्रुतिशिरें आहेत. प्रत्येक वेदाच्या प्रत्येक शाखेचे १/१ उपनिषद आहे व याप्रमाणे

सोळा हजारांच्यावर उपनिषदे असल्याचा उल्लेख मुक्तिकोपनिषदांत आहे! आज प्रकाशित ११२ आहेत व आणखी दीडशे अप्रकाशित उपलब्ध झाली आहेत असे म्हणतात. इतिहासपुराण सुद्धा प्रभूचे निःश्वास असल्याचा उल्लेख बृ. आ. उपनिषदांत (२/४/१०) आहे. या सर्वांना येथे वंदन केले आहे.

(क) वेदांचे कर्मकांड, उपासनाकांड व ज्ञानकांड असे तीन विभाग पडतात - उपलब्ध असलेले वेदभाष्य जरी कर्मपर अर्थ लावणारे असले तरी ज्ञानपर रावणभाष्य होते, हे भाष्ये टीका इत्यादीतील उतान्यांवरून ठरते. 'वेदोमें रामचरित्र' हा वे.भू.पं. रामकुमारदासजी यांनी लिहिलेला ग्रंथ प्रसिद्ध झाला आहे. उपनिषदांत भक्तिपर उपनिषदे पुष्कळच आहेत. नृसिंहतापिनी (२); रामतापिनी (२) रामरहस्य, गोपालतापिनी (२); लक्ष्मी, सावित्री, देवी, दत्त, त्रिपुरातापिनी इत्यादी अनेक आहेत.

(ख) प्रेमभक्तीला - कर्म, उपासना व ज्ञान यांची आवश्यकता असतेच. उपनिषदात विविध देवतांचे मंत्र, त्यांचे न्यास, त्या त्या मंत्रानुसार ध्यान; पूजायंत्र, आवरण देवता, तिलकधारणविधि, भस्मोत्पादन विधि इत्यादि उपासना मार्गास लागणारी पुष्कळ माहिती आहे. हरेराम हरेराम -हरे हरे' हा ३२ अक्षरांचा मंत्र कलिसंतारण उपनिषदातलाच आहे.

(२) भववारिधिं जहाजा सदृश - जहाजाचा उल्लेख करून तदंगभूत इतर गोष्टी सुचविल्या आहेत. दिशा जाणणारा सुकाणूदार व अनुकूल वारा नसेल तर जहाज सागरपार नेणार तर नाहीच पण बुडवील. किंवा दिशाभूल होऊन भ्रमण करीत रहावे लागेल. सद्‌गुरु कर्णधार पाहिजे. भगवत्कृपारूपी अनुकूल वारा पाहिजे. 'सन्मुख मरुत कृपा मम चारु' सद्गुरु कर्णधार दृढ नावे' (७/४४/७-८)

(क) या व पुढील सोरठ्यांतही या दोन गोष्टींचा उल्लेख नसेल तर ही उपमा यथार्थ मार्गदर्शक होऊ शकत नाही. वर वर पाहणारांस या दोन गोष्टींचा उल्लेख येथे दिसत नाही त्यामुळे या बाबतीत टीकाकारांनी मौन स्वीकारले आहे. तुलसीदासांनी दोन्ही गोष्टी ध्वनित करून या जहाजास दृढ बनविले आहे. भगवत्कृपा उत्तरार्धात व सद्‌गुरुकृपा पुढील सोरठ्यात ध्वनित आहे.

(ख) आधी वेद प्रगट झाले व त्यांनी भगवत्कृपा संपादनाचे साधन सांगितले. प्रत्येक चेतन प्राणी जन्माला येण्यापूर्वी त्याच्या उपजीविकेचे साधन जसे परमात्म्यानी निर्माण केले (उपनिषदे पहा) तसेच ब्रह्मदेव उत्पन्न होण्यापूर्वीच तो निर्माण करील त्या भवसागरातून तरून जाण्याचे मुख्य साधन वेद प्रगट झाले. त्यांनी भगवत्कृपेचे साधन दिले. प्रगट केले. ब्रह्मदेवाला प्रभूनी वेदज्ञान दिल्यानंतरच त्याने वेदाज्ञेनुसार सृष्टि निर्माण केली. या वरून वेदांना ब्रह्मदेवापूर्वी वंदन करण्यात कवीच्या दीर्घ दर्शित्वाची व तत्त्वान्वेषी प्रतिभेची चांगलीच साक्ष पटते.

(३) उत्तरार्धाचा सामान्यार्थ प्रथम दिलाच आहे. दुसरा अर्थ - रघुबराचे विमल यश वर्णन करण्यात - करताना- ज्यांना स्वप्नात सुद्धा खेद - कंटाळा - येत

नाही. त्यांना भवसागर तरुन जाण्यास वेदजहाज उपयोगी पडेल, इतरांस नाही. हा अर्थ न घेतल्यास अनर्थ कसा होतो पहा (क) वेदरूपी जहाजाचा आश्रय करूनच हिरण्यकशिपु, रावण इत्यादि राक्षस बलिष्ठ झाले. त्यांनी तपश्चर्या केली, यज्ञयाग केले आणि ब्रह्मदेव, शंकरांना सुद्धा प्रसन्न करून घेतले. लंकेतील राक्षस अग्निहोत्री होते व त्यांनी सांगवेदाध्ययन केलेले होते असे वा.रा. म्हटले आहे. परंतु या राक्षसांना वेदजहाज उपयोगी पडले नाही ते का? ते विष्णु-विश्व-विरोधी होते व हरियश गात नव्हते; म्हणजेच रामकृपारूपी वारा अनुकूल झाला नाही. राम-अवकृपारूपी प्रभंजनाने त्यांना ठार केले. हा अर्थ घेतला की वेद सदा सर्वकाळ हरियशच वर्णितात काय? या प्रश्नाला जागाच नाही रहात.

(४) जहाजात वाटेल तो बसू शकतो पण मोठ्या जहाजात बसण्यास तारवातून यावे लागते. नरशरीर रूपी तारवांत बसून या जहाजापर्यंत जो येऊ शकेल तोच या जहाजात बसू शकतो. 'नरतनु भववारिधीत तारू' (७/४४/७) असे जे म्हटले ते किती सुसंगत आहे! हे पाहिले म्हणजे ग्रंथारंभीच्या वचनाशी ग्रंथाच्या अंतींच्या वचनांचा समन्वय करण्याची इतकी सूक्ष्म सावधानता, जी मानसात परिपूर्ण आहे ती इतरत्र दिसणे अशक्यवत वाटते. रावणासारखे राक्षस याच जहाजात बसले पण हे जहाज तारक न होता संगतीच्या लोकांस सुद्धा मारक झाले, हिरण्यकशिपूचे तेंच; पण पुत्र प्रल्हादाला नारदाचा उपदेश मिळाला व त्याने हरिगुणगानाने हरिकृपारूपी मरुत अनुकूल करून घेतला म्हणून तो वाचला- तरला.

ल. टे. सागरांतून परतीराला वा फार दूर जाणारी जहाजे तीन तीन शिडांची असतात. त्यात बसण्याकरता तारवांतून, नावेतून जावे लागते. ती मोठी जहाजे सागरतीरापर्यंत येऊ शकत नाहीत. ही प्रत्यक्ष वस्तुस्थिति वेदजहाज व नरतनू तारु (नौका) या दोन वचनानी तंतोतंत दाखवून सुचविले की वेदजहाज मानवांनाच उपयोगी आहे; इतरांना नाही. इतरांना भगवत्कृपा वा संतकृपा यांनी कार्यभाग साधता येईल. गजेंद्र, जटायु वगैरे अनेक उदाहरणे आहेत.

(५) जहाजात बसून समुद्र प्रवास करणारांस फार त्रास होतो; ओकाऱ्या, चक्कर, डोके दुखणे, आजारीपणा वगैरे अनेक खेद होतात; पण 'रामभक्तिमणि ज्या उरि राही/दुःख लेश त्या स्वप्निही नाही' (७/१२०/९) म्हणून उत्तरार्धाचा असा अर्थ होतो की जे रघुवर यशवर्णन करीत या जहाजात बसतील त्यांना स्वप्नात सुद्धा खेद होणार नाही. अन्वय असा करावा - रघुवरयश वर्णित त्यात बसणारांना स्वप्निही खेद न. अर्थात असे न करणारांना खेद होईल (होतो, झाला आहे). हा तिसरा अर्थ सिद्ध झाला. सार हे :- वेदरूपी जहाजाचा नरतनु तारवाने आश्रय करून वेदात व तदुपजीवी शास्त्रपुराणात वर्णन केलेले हरियशगान करीत राहिले पाहिजे; म्हणजे त्या हरियशाच्या प्रभावाने त्याच जहाजात बसलेल्या संतांपैकी कोणी तरी सुकाणूदार बनतो व मग परतीराला जाता येते. 'कर्णधार विण (जस) जलयान' निरुपयोगी; म्हणून पुढील सोरठ्यात संतांचा उल्लेख करतात.

हि.सो.- बंदउँ बिधिपद रेनु भवसागर जेहि कीन्ह जहँ ॥
संत सुधा ससि धेनु प्रगटे खल बिष बारुनी ॥१४न॥

दो.- बिबुध बिप्र बुध ग्रह चरन बंदि कहउँ कर जोरि ।
होइ प्रसन्न पुरवहु सकल मंजु मनोरथ मोरि ॥१४ मः॥

म.सो.- वंदे विधिपदरेणु भवनिधि निर्मिति जेथुनिहि ।
संत सुधा शशि धेनु प्रगटति खल विष वारुणिहि ॥१४ न॥

म.दो.- विनति जुळुनि कर, नमुनि बुध ग्रह सुर विप्रपदांस ।
व्हा प्रसन्न पुरवा सकल शुभ मम मनोरथास ॥१४ मः॥

अर्थ - जेथून भवसागर निर्मिति झाली त्या ब्रह्मदेवाच्या पायांच्या रजाला (रेणु) मी वंदन करतो. त्याच भवसागरातून संत, अमृत, चंद्र व धेनु आणि खल, विष व वारुणी (मदिरा) ही सर्व प्रगट झाली. ॥न॥ बुध, ग्रह, देव आणि विप्र यांच्या पायास नमन करून, हात जोडून मी विनंती करतो की सर्वांनी प्रसन्न होऊन माझा शुभ (रुचिर, मंगल) मनोरथ पूर्ण करावा ॥१४ मः॥

टीका — दो. १४ न. (१) विधि - विशेष प्रकारची धारणा करणारा, वि-धत्ते इति विधिः किंवा विशेष प्रकारचे विधान करणारा, ब्रह्मदेव, संकल्पानेच सृष्टि उत्पन्न करणारा व उत्पन्न होणाऱ्या जीवाच्या दैवाचा लेख लिहून ठेवणारा, हे सर्व अर्थ आहेत. 'मुसशिल कीं तूं विधिचे अंकां,' 'विधिनें लिखित अंक मम भालां' (६/२९/१). जीवाच्या ऐहिक सुख दुःखाचाच लेख लिहिण्याचे ब्रह्मदेवाच्या हाती आहे. पारमार्थिक उन्नति किंवा अधःपात या दोन्हीची साधने विधिनिर्मित प्रपंचात आहेत. जे इष्ट वाटेल त्याचा उपयोग नरजीव करू शकतो. नर्क, स्वर्ग वा अपवर्ग यांकडे लावता येणारी शिडी नरदेह आहे. (७/१२१/१०).

(२) वेद भवसागरांतील जहाज आहेत; पण तो भवसागर कोणी केला? विधीने केला, कशासाठी व तो निर्माण करून जीवांना दुःखात टाकण्याची त्यास काय जरूर! त्याने वैषम्य का निर्माण केले? या प्रश्नांचे उत्तर हे आहे की जीवांच्या पूर्व-कर्मानुसार काळाच्या ओघाने त्यास निर्माण करणे हे ब्रह्मदेवाचे कर्तव्य आहे. न्यायाधीश एकाला फाशीची शिक्षा देतो व दुसऱ्याला अन्नुनुकसानीची भरपाई करून देतो; त्यात न्यायाधीशाकडे दोष किंवा गुण नाही, तो विषम ठरत नाही. सृष्टि अनादि आहे; प्रवाहरूपाने नित्य आहे. मुक्त होईपर्यंत प्रत्येक प्रलयानंतर उत्पत्तीचे वेळी पुन्हा निर्माण करण्यात हेतु हा आहे की जीवानी जन्ममरणपरंपरा चुकविण्याच्या मार्गास लागावे; एका प्रकारे हे उपकार आहेत.

(३) संत सुधा शशि धेनू प्रकटति - प्रगटति ने सुचविले की आधी ते गुप्त होते. 'सुधासुरासम साधु-असाधू । जनक एक जगजलधि अगाधू ॥ सुधा सुधाकर सुरसरि सज्जन, गरल अनल कलिमलसरि दुर्जन॥' 'विधीप्रपंच गुणागुण मिश्रित॥

भले बुरे निज निज कर्तुतीं । घेती कीर्ति अकीर्ति विभूती' (१/५/६-८) या पाचव्या दोह्यांतील अवतरणांची टीका पहावी. येथील चरणात सुरसरितेचा अध्याहार केला पाहिजे.

(क) खलविष वारूणी प्रगटति - यांत अनल व कलिमलसरि अध्याहृत घेणें जरूर आहे.

(४) प्रकरणानुसार गूढार्थ - सरळ बाह्यार्थ प्रथम दिला आहे तेवढाच सांगावयाचा असता तर पुनरुक्ति दोष झाला असता; कारण पाचव्या दोह्यांत तो अर्थ आहेच. मागल्या सोरठ्यात जो विषय चालू आहे त्याच्या अनुरोधाने येथे विशेष अर्थ आहे, म्हणून पुनरुक्ति दोष नाही.

(क) वेदजहाजात हरिभजन करीत बसेल त्याला संत सुकाणूदार मिळतील, कारण 'रामकृपेविण भेट न संता' मग 'सत्संगति करि संसृति. अंता' (७/४५/६) संसृति-भवसागर.

(ख) वेदपुराणांच्या योगें पुण्य वा पापमय मार्ग कोणता ते कळते.

(५) संत हे सुधा शशि धेनू व सुरसरिता यांच्या सारखे आहेत. सुधा - अमृत, मोक्ष, व सुधा म्हणजे रामकथा 'ब्रह्म (वेद) पयोनिधि, मंदर ज्ञान, जाण सुर संत। काढिति मथुनि कथा सुधा भक्तिमाधुरी मंत' (७/१२० रा). संतमुखाने रामकथा श्रवणाऱ्यास रामकथासुधेचें पान करण्यास सापडेल व भक्तिमाधुरी मिळेल हे सुचविले.

(क) शशी-चंद्र 'राका रजनीभक्ति तव रामनाम तो सोम' 'रामनामामृतम्' चंद्रातून सुधा स्रवते- तसें अमृतमय रामनाम संतांकडून, त्या वेद जहाजांत बसून हरिगुणवर्णन करणारास मिळेल.

(ख) वेदजहाजांत बसून हरियशगान करीत राहिल्याने पाप नाश होऊन संत भेटतात सुकाणूदार (गुरु). नंतर नवविधा भक्तीने त्यांच्याच कृपेने ज्ञान होते व नंतर प्रेमभक्ती त्यांच्याच कृपेने मिळते.

(६) धेनु - सुरधेनु, येथे सागरांतून निघालेल्या धेनूचा संबंध आहे. 'प्रणतकाम-सुरधेनु कल्पतरू' (७/३५/२) 'श्रुणु सेवक सुरतरु सुरधेनू' (१/१४६/१) हे प्रभूरामचंद्रांविषयी म्हटले आहे. सुरधेनू रामचंद्र, धावत येते व सर्व मनोरथ, मोक्ष, व अनपायिनी प्रेमभक्ति व मायामुक्तता यातील जे पाहिजे असेल ते देते. राम हृदयात येऊन राहतात व भवसागरपार जातो जीव.

विचार करावा की काव्यमुक्ताफळांना विंधून त्यात रामचरित तंतु ओऊन ठेवण्याची तुलसीची पावन काव्यकला अतुल-सी नाही काय?

(७) हरियशगान न करता वेदजहाजात बसलेल्यांची विधिनिर्मित भवसागरात काय व कशी दशा होते हे शेवटच्या चरणाने सुचविले.

(क) त्यांना खल- दुर्जन सुकाणदार भेटतो, त्याच्या संगतीने विष, वारुणी अनल व कलिमलसरिता यांची प्राप्ति व्हावयाची! विषय- विष, 'परधन विषाहुनी विष

भारी' 'मोह मदिरा' - 'करुनि पान निजसी दिनराती । शुद्धि न तिळ तव शिरीं आराती' (३/२१/७). 'मोहनिशे सर्वहि निजणारे'. मोहमदिरा पान करून मोहनिशेंत सतत घोरत पडतात व कामक्रोधादि व जन्म मरणादि शत्रु शिरावर आहेत याची शुद्धि रहात नाही. 'तेजिं कृशानु रोषिं महिषेश्वर' महिषासुरासारखे आपल्या तामसी तेजाने व क्रोधाने विश्वदुःखदायक होतात; पण शेवटी प्राप्ति कलिमलसरितेचीच करतात. 'अघ-अवगुण- धन-धनी-धनेश्वर' (१/४/५.टी.प.) अशांना भवसागर तरून जाता येत नाही व शेवटी त्यातच ते बुडतात व पुन्हा त्यातच ते जन्मतात.

(ख) याप्रमाणे हरिभजनाच्या अभावाचा परिणाम वेद जहाजात बसणाऱ्यांना या भवसागरातच भोगावा लागतो; ते कधी यातून बाहेर पडू शकत नाहीत, 'विण हरिभजन न भवतरण सिद्धांतचि, न टळेल;' (७/१२२) हा उपसंहार कांडांतील सिद्धांतच येथे उपक्रमांत अन्वय-व्यतिरेकाने गूढ रीतीने ध्वनित केला आहे. मानसाच्या बाहेरचा एकही आधार न घेता हा ध्वनि प्रगट झाला.

(ग) आपल्या काव्यात रामभक्तीप्रदान करण्याचे सामर्थ्य यावे म्हणून आता दोह्यांत प्रार्थना करतात.

दो. १४ म. (१) (विबुध) सुर- देव; बुध- संत, ज्ञानीभक्त (हा अर्थ अनेकवार पूर्वी आला आहे.); ग्रह, सूर्यादिक नऊ, अकरा किंवा आणखी जे अज्ञात असतील ते सर्व; शिवाय देवताग्रह, असुरग्रह, गंधर्वग्रह, यक्षग्रह, पितृग्रह, पिशाचग्रह, भूतग्रह, सर्पग्रह, व राक्षसग्रह हे नऊ आणि बालग्रह-पूतनादि, नऊच आहेत. माधवनिदानग्रहोत्थ उन्माद प्रकरण पहावे. (७/१२१/३३ टी. प.)

(क) सुर- विबुध, इंद्रादि देव यांना ज्ञान आवडत नाही; ज्ञान प्राप्तीच्या मार्गात अडथळे करतात 'करणसुरांनां ज्ञान नावडे । विषयभोग अति सदा आवडे।' (७/११८/१५ व ११- १२ टी.प.) त्यांनी विघ्ने करू नयेत म्हणून त्यास प्रार्थना.

(ख) बुध- संत साधू यांच्या कृपेशिवाय श्रद्धा विवेक यांची प्राप्ती व मोहनाश, ज्ञान, भक्ती वगैरे काहीच मिळत नाही. त्यांनी कृपा केली की सरल कवित्वास लागणारी विमलमति मिळेल म्हणून यांस कृपेची याचना केली.

(ग) ग्रह- सूर्यादी अनुकूल झाले तर शरीरारोग्य, सुबुद्धि, स्फूर्ती, प्रतिभा, संतकृपा इत्यादी मिळू शकतात; प्रतिकूल झाले तर उलट परिणाम होतो. म्हणून यानी प्रसन्न होऊन रामभक्तिमय काव्य निर्मितीस योग्य अशी विमलमति-भूति द्यावी अशी प्रार्थना केली. (१) इतर ग्रहांचे सुद्धा असेच आहे. तुलसीदासांना एक पिशाच प्रसन्न झाले म्हणूनच हनुमान दर्शन झाले. (चरित्र पहा.) पिशाचादिकांच्या कृपेने हरिदर्शनाचा मार्ग सुलभ झाल्याची उदाहरणे दत्तपुराण, दत्तमाहात्म्य व स्कंद पुराण यात आहेत.

(२) शुभ मनोरथ - हिंदीत मंजु मनोरथ मोरि, यांत मोरि हे स्त्रीलिंगी वापरले आहे. पूर्वी १४/३ मध्ये मेरे असे पुल्लिंग वापरले आहे, एकाच भाषेच्या

निरनिराळ्या भागात बोलभाषेत एकाच शब्दांत लिंग भेद आढळतात म्हणून कल्पनांच्या रानात शिरण्याची जरूरी नाही.

(क) तुलसीदासांची एकच इच्छा आहे व ती अनेक वेळा पूर्वी स्पष्ट सांगितली आहे म्हणून येथे विस्तार नको.

**संगति** - मागे शारदा म्हणजे सीता हा अर्थ साधार सिद्ध केला आहे. पण सरस्वती शारदा ही ब्रह्मदेवाची शक्ती म्हणून प्रसिद्ध आहेच. त्या मताचा संग्रह करून गंगेचा ब्रह्मदेवाशी असलेला संबंध सुचविण्यासाठी शारदा व गंगा यांच्या तुलनेने रामचरित्र महिमा आता सांगतील.

ल. टे. ब्रह्मदेवाला वंदन करणे निषिद्ध असता तुलसीदासांनी का केले अशी शंका घेतली जाते. समाधान - **ब्रह्मदेवाला वंदन निषिद्ध नाही हे निश्चयात्मक उत्तर** आहे. पूजासुद्धा निषिद्ध नाही याला आधार खाली दिले आहेत.

(१) 'ऊर्ध्वायै दिशे ब्रह्मणेनमः' असे संध्या वंदनांतच रोज द्विजांना म्हणावे लागते.

(२) 'नमो ब्रह्मादिभ्यो ब्रह्मविद्यासंप्रदाय कर्तृभ्यो...' असे नमन श्रीमदाचार्य परंपरेत चालू आहे

(३) नारायणं पद्मभवं वसिष्ठं - अस्मद् गुरून् संततमानतोस्मि' असें वंदन आचार्य सांप्रदायात पूर्वी पासून चालत आहे.

(४) 'नारायण विधि अत्रिनाथ ... असे दत्तसांप्रदायांत.

(५) नारायण विधिवसिष्ठ राम रामदास - ' असें समर्थ सांप्रदायांत.

(६) **कैवल्योपनिषद - उपदेष्टे गुरु ब्रह्मदेव आहेत व शिष्य आश्वलायन आहेत.** 'अथ आश्वलायनः भगवन्तम् परमेष्ठिनम् उपसमेत्य उवाच' इ. इ. असे असता त्याने वंदन केले नाही असे मानावयाचे?

(७) हयग्रीवोपनिषद-वरील प्रमाणेंच परमेष्ठी पितामह ब्रह्मदेव गुरु व शिष्य नारद असा संबंध आहे.

(८) वेदांमध्ये ब्रह्मदेवाच्या असलेल्या स्तुति, वेदपठन करतांना गाळावयाच्या काय?

(९) वेदमंत्रात उदा. 'नमो ब्रह्मणे नमोअस्तु अग्नये' वगैरेंत ब्रह्मदेवाला नमन आहे ते मंत्र गाळावयाचे की काय वेद पठन करतांना?

(१०) अगस्त्याश्रमात ब्रह्मदेवाचे स्थान होते व ब्रह्मदेवाची पूजा नियमितपणे होत असे. (वा. रा. अगस्त्याश्रमवर्णन प.)

(११) सर्वतोभद्रमंडलांत- पूजेत ब्रह्मदेव मुख्य आहेत. 'मध्ये-ब्रह्मणं' अद्याप व्रतादिकांत यांची पूजा होतेच.

या शंकेचे मूळ असे आहे. शंकरांनी ब्रह्मदेवाला शाप देऊन त्यांची प्रतिष्ठा-अर्चा-पूजा वर्ज केली आहे. 'तदस्यतु प्रतिष्ठया कचिन्न भूयतां विधेः' (स्कंद-पु. मा. खं. मा. पी. म.) ब्रह्मदेवाची पूजा इतर देवांप्रमाणे मंदिरात प्रतिष्ठा-अर्चा करून होऊ नये, असा वास्तविक शाप असल्याने त्याचा अर्थ शंकेखोर वंदन करू नये

असा घेतात! पुष्कर क्षेत्रांत ब्रह्मदेवाचे मंदिर आहे, पण ते त्यांचे स्वतःचे क्षेत्र आहे. शिवाय अपवादास कुठेतरि आधार असेलच.

हिं.- पुनि बंदउँ सारद सुरसरिता । युगल पुनीत मनोहर चारिता ॥१॥
मज्जन पान पाप हर एका । कहत सुनत एक हर अबिबेका ॥२॥

म.- नमूं शारदा नी सुरसरिता । युगल पुनीत मनोहर चरिता ॥२॥
मज्जन पानिं पाप हरि एका । श्रवणिं कथनि दुजि हरि अविवेका ॥२॥

अर्थ - आता मी शारदेला व सुरसरीतेला (गंगेला) नमन करतो, दोन्ही पवित्र असून दोघींचे चरित्र मनोहर आहे. ॥१॥

एक-गंगा-स्नान व पान यांच्या योगाने पापहरण करते व दुसरी - शारदा (एक, सरस्वती) श्रवणाने व कथनाने अविवेक हरते ॥२२॥

टीका – चौ. १ - (१) शारदा - येथे देहधारी देवतेला वंदन नसून काव्यरूपाने वाहणारी जी सरस्वती तिला वंदन आहे, कारण श्रवण व कथन या दोन गोष्टींची शक्यता तेथेच आहे.

(क) शारदा - ब्रह्मविद्या; ब्रह्मविचार प्रचार सरस्वती' असा जिचा पूर्वी उल्लेख केला ती.

(ख) पहिल्या चौपाईत प्रथम शारदेचा उल्लेख व नंतर गंगेचा आहे व दुसऱ्या चौपाईत प्रथम गंगेचे वर्णन (स्नान पान) करून तिला पहिला मान दिला. अशाप्रकारे दोघींची समानता सिद्ध केली व एवढ्यासाठी उलटा क्रम दुसऱ्या चौपाईत घेतला. १/२/८ ची. टीका पहावी.

चौ. २ (१) मज्जन पानिं - मज्जन - बुडीमारून स्नान. स्नान केल्याशिवाय जलपान करू नये हे प्रथम स्नानाचा उल्लेख करून सुचविले. हा नियम मानसात सर्वत्र पाळला आहे. जिकडून नदीचा प्रवाह येत असेल तिकडे मुख करून बुडी मारावी असा विधि आहे. या चौपाईची बहीण अर्थ अधिक स्पष्ट करील -'दर्शन मार्जन मज्जन पानें। अघ हरि वदती वेदपुराणें' (१/५/१) म्हणून येथे सुद्धा दर्शन व मार्जन (स्पर्श) ही दोन्ही घेतलीं पाहिजेत.

(क) गंगादि पवित्र सरितांचे दर्शन जेथून होईल तेथून प्रथम नमस्कार केला पाहिजे. 'उतरति राम देवसरि देखत । हर्षति अति करतात दंडवत' (२/८७/२) नंतर जवळ गेल्यावर मार्जन मग स्नान व मग पान (जळ पिणें) असा क्रम असावा.

(२) श्रवणि कथनिं - हरि अविवेका - हरिकथारूपी सरस्वतीचे श्रवण व कथन केल्याने अविवेक नष्ट होतो. 'विण सत्संग न हरि कथा त्यांविण मोह न जात' (७/६१) यावरून ठरले की हरि कथा श्रवण संत-गुरुमुखाने केले तरच अविवेक जातो. येथे श्रवण मार्जनासारखे आहे, कारण की मज्जनाचें मूळ अति अनुराग प्राप्ती हें आहे. (दो. २ टी.प.)

(क) कथन शब्दाने वक्ता सूचित केला व तो कसा असावा हे मज्जनपान या प्रथम चरणांतील शब्दांनी सुचविले. वक्ता हरिभक्ति रसात बुड्या मारलेला व त्याने हृदयात 'हरि कथामृतं तप्तजीवनं' हरि भक्तीरस हृदयात भरून ठेवलेला म्हणजेच कथासरस्वतीचे पान केलेला असावा. असा संबंध जुळला म्हणजे दोघांचे ही पाप नष्ट होते व अविवेक=मोह-भ्रम=संशय इत्यादि राहत नाहीत. 'वासुदेव कथाप्रश्नः पुरुषांस्त्रीन् पुनाति हि । वक्तारं पृच्छकं श्रोतॄन् तत्पादसलिलं यथा' (भाग. १०/१/१६) -तत्पादसलिल -वासुदेवपादसलिल म्हणजेच सुरसरिता. हीच तुलना येथे केली आहे.

(ख) ज्याने बुडी मारली नसेल तो त्यातील गांभीर्य, तळाशी असलेली गूढभावरत्ने वगैरे श्रोत्यास कशी दाखवू शकणार. व पान केले नसेल तर त्या कथासरितेच्या पाण्याची चव आणि ते आत गेल्याने हृदयात होणारा आनंद, तृप्ति इत्यादि परिणाम स्वानुभवाच्या बळासह ठासून सांगू शकणार नाही.

(ग) गंगेचा जन्म भगवच्चरणा पासून, नंतर निवास ब्रह्मदेवाच्या कमंडलूत व नंतर शंकरांच्या मस्तकावर, याच क्रमाने वर्णन चालले आहे. 'रामभक्ति जिथ धार भागिरथि' यात या कथाशारदेचा उगमस्थानाशी संबंध सुचविला आहे. कथासरितेत मज्जन सुद्धां उगमाकडे मुख करून तिकडे पहात म्हणजे हरिचरणांचे चिंतन ध्यान करीत केले पाहिजे. श्रवणहि असेच केले पाहिजे हे सुचविले. ब्रह्मदेवाचा संबंध म्हणून ब्रह्मदेवानंतर शारदा व सुरसरिता यांना वंदन केले. नंतर शंकरांच्या मस्तकाशी संबंध आला म्हणून त्यास, महेशास वंदन करतात. अशी ही तुलसीकथा विषय संगति व नमन करतांना सहजासहजीं मोठमोठे गूढसिद्धान्त ध्यानात करण्याची ही तुलसीकला आश्चर्यकारकच आहे!

हिं.- गुर पितु मातु महेस भवानी । प्रनवउँ दीनबंधु दिन दानी ॥३॥
सेवक स्वामी सखा सिय पीके । हित निरूपधि सब बिधि तुलसी के ॥४॥

म.- गुरु पितृमाय महेश-भवानी । प्रणमूं दीनबंधु दिन-दानी ॥३॥
स्वामि सखा सेवक सिय पतिचे । हित निरुपधि सबपरीं तुलसीचे ॥४॥

अर्थ : - मी महेशभवानी यांना प्रणाम करतो, (कारण) ते माझे गुरु पिता व माता असून दीनबंधु व प्रतिदिन दान देणारे आहेत. ॥३॥

ते (महेश) सीतापति (सिय-सीत, पी-पति, के. चे) रामचंद्रांचे सेवक, सखा व स्वामी असून तुलसीदासाचे सर्वप्रकारें निष्कपटी मित्र (हित) आहेत. (हितकर्ते आहेत असा अर्थ कोणी घेतात) ॥४॥

टीका – चौ. ३ (१) मंगलाचरण श्लोक ३ मध्ये 'गुरुं शंकर रूपिणम्' वंदन केले. मं. सो ५ मध्ये 'नररूप हर' म्हणून वंदन केले व येथे हे तिसऱ्या वेळी वंदन आहे. या वंदन प्रकरणात राम, शंकर व हनुमान यांना पुष्कळ वेळा नमन

केले आहे. या तिघांचे ते उपासक आहेत. गुरु व इष्टदेव यांना वारंवार वंदन करणे चूक नाहीं. मागील वेळापेक्षा येथे काही तरी विशेष सांगावयाचे आहे.
(क) गुरु - येथे गुरु पिता माता असा श्रेष्ठतेचा चढता क्रम असल्याने येथे गुरु म्हणजे विद्या गुरु -आचार्यगुरु हा मुख्य अर्थ आहे. तुलसीदासांना शोधून आणून त्यांची मुंज लावण्याची आज्ञा महेशानीच नरहरिगुरूंना दिली म्हणून अप्रत्यक्षपणे उपनयन करणारे गुरु महेशच ठरले.
(ख) पितामाय - पिता माता. मूलगोसाई चरितावरून सिद्ध आहे की भवानी स्वतः विप्रस्त्रीरूपाने येऊन बाळ तुलसीदासास मुंजीपूर्वी जेवण घालून जात असे म्हणून भवानी माता झाली. 'अन्नदाता भयत्राता यश्च विद्यांप्रयच्छति । जनिता चोपनेताच पंचैते पितरःस्मृता.॥' नरहरि गुरुंना आज्ञा देऊन तुलसीदासाचे गावात भिकाऱ्यासारखे हिंडणे, भयभीत अनाथ, निराश्रित राहणे बंद केले म्हणून भयत्राता, पिता महेश ठरले. नरहरि कडून उपनयन करून आश्रय देवविला म्हणून उपनेता पिता महेश ठरले. ही चौपाई तुलसीचरित्र सूचक आहे.
(ग) महेश-मह+ईश=महेश. 'मह उत्सव तेजसोः (अ. व्या. सु) 'उद्धर्षोसह उद्धव उत्सवः महातेजाचे उत्सवः (अमरे १/८/३८) तेजाचे ईश, सर्वप्रकारच्या तेजाचे-प्रतापाचे ईश. (प्रतापचा अर्थ १०/७ टी.प.)
(घ) भवाची शक्ति-पत्नी भवानी. ज्याच्या पासून सर्वप्राप्त होते त्याची शक्ती. असे ज्याचे गुरुपिता माता आहेत त्यास काव्यात लागणाऱ्या सामर्थ्यादिकांची प्राप्ती होणे कठिण ते किती?
(२) दीनबंधू दिनदानी - (क) दीनबंधू. 'बंधु बांधव मित्रयोः' (हैमः) दीनांचा मित्र. 'निज दुख गिरिसम रजचि भासते। मित्रदुःखरज मेरु वाटते ॥ कुपथ निवारुनि सुपथिं चालवी । प्रगटुनि गुण अवगुणांस लपवी ॥ देत घेत मनिं शंका न धरी। बल-अनुमाने सदाहित करी ॥ स्नेह विपतिं करि शत पट' ४/७/८-६) हे मित्राचे लक्षण. महेश दीनांच्या बाबतीत तंतोतंत पाळतात. तुलसीदास बालक मातापितृहीन, अनाथ, निराश्रित, अनिकेत असा खराच अति दीन होता. त्याचे दैन्य या दीनबंधूने सर्वप्रकारें दूर केले (मू. गो.च)
(ख) दिनदानी - यांतील दिनचा अर्थ दीन गरीब, निर्धन असा कोणी करितात पण 'देत घेत मनिं शंका न धरी' यात दातृत्व आहेच. प्रतिदिन दान देणारे, दिल्याशिवाय राहवत नाही अशा स्वभावाचे. 'दानी कुणि शंकर सम नाहीं ॥ दीन दयालु आवडे देणें याचक रूचति सदाहि ॥' (वि. प. प. ४ अनु.) 'भोळा तुमचा नाथ भवानी ॥ दानि महा, दिन देत दिल्याविण, श्रुति मर्यादे हाणी' (वि.प.प. ५ अनुवाद) ज्यांनी कधी दान धर्म मुळीच केला नाही अशांना ही तुमचे यजमान रोज दान देतात-' ही दोन्ही पदें मुद्दाम पहावी.
चौ. ४ (१) स्वामि सखा सेवक सियपतिचे - शंकरांचा सीता पतीशीं संबंध मानसात तिन्ही प्रकारांनी आला आहे. १. रामसेवक - 'ते रघुवीरचि इष्टदेव मम'

(१/५१/८) असें शंकर सतीभवानीला म्हणाले आहेत. 'पालन आज्ञा धरूनी माथा। परमधर्म हा अमचा नाथा ॥' (१/७७/२) असे भगवान रामास शंकर म्हणाले. 'रघुकुलमणि मत्स्वामि ते, वदुनि नमिति शिवमाथ' (१/११६/-) २. स्वामी - 'करुनी रघुकुलनाथ मज्जना । पार्थिव पूजुनि करिती नमना' (२/१०३/१). 'स्थापुनि लिंग सविधि कृत पूजा । प्रिय मज शिवसम नाही दूजा'(६/२/६) या चौपायांच्या टीकेत रामेश्वरस्थापनेची शिवपुराणांतील माहिती दिली आहे ती पहावी. ३. सखा 'श्रुणु मम विनति अतां शिव स्नेह मजमि जर साच । जाउनि गिरिजे उद्वहा हे मी मागत द्याच' (१/७६/-) ही सख्य भावाची विनंती रामावतार समाप्ती नंतर दिव्य परम तेजोमय राम रूपाने जाऊन दर्शन दिले तेव्हाची आहे. 'शंकर भजन विना नर भक्ति न मम लभतात' (७/४५/-)

वि. सु. हे तिन्ही भाव रामेश्वर स्थापनेच्या वेळी तिघांनी प्रगट केले आहेत. 'रामस्तत्पुरुषे वक्ति बहुव्रीहिर्महेश्वर : । उचुःप्राञ्जलयः सर्वे ब्रह्माद्या कर्मधारयम्' (स्कं.पु.) रामाचा ईश्वर (तत्पुरुष समास) असे राम म्हणाले. राम आहे ईश्वर ज्याचा तो मी. रामेश्वर (बहुव्रीहि समास) असे महेश्वर म्हणाले व ब्रह्मादि सर्व म्हणाले की रामः एव ईश्वरः जो राम तोच ईश्वर रामेश्वर दोघांत भेद नाही.

(क) कोणी अशी पळवाट काढतात की परमात्मा ब्रह्माचे अवतार जे राम ते महेशांचे स्वामी. पण यांनीच शिवपार्थिव पूजन केले आहे अनेक वेळा मानसातच ! म्हणून हे अयथार्थ. विष्णु अवतार रामाचे स्वामी शिव, आणि नारायणावतार रामाचे सखा शिव. पण हे म्हणणे निराधार आहे. ब्रह्माण्ड पुराणांत तर रामाने शिवस्तुति केली आहे, ते पुराण शैवपुराण नाही.

(२) निरुपधि हित - निरुपधि शब्द संस्कृत आहे. अर्थ निष्कपटी असा आहे. हितचा अर्थ हितकर्ता घेण्यापेक्षा निरूपधीच्या साहचर्याने मित्र घेणे योग्य. पूर्वी दीनबंधूने मित्रत्व सुचविले व हित शब्दाने स्पष्ट केले. मित्र कपटी असू शकतात म्हणून निरुपधि विशेषण.

(क) मानसात हित शब्द 'मित्र', हितकर्ताच्यासाठी व प्रेम इतक्या विविध अर्थांनीं भिन्न भिन्न प्रसंगी वापरला आहे. मित्र हितकर्ता असतोच 'बल-अनमाने सदा हित करी' हे मित्रलक्षणच आहे. मात्र हितकर्ता मित्र असतोच असे नाही. 'अहिता हित माना रिपु मित्रा' -हित अनहित मानहु रिपु प्रीते' (५/४०/८) मराठी व हिंदी (अनुक्रमें) उदाहरण आहे. 'सुहृदं सर्वभूतानां ज्ञात्वा माम्' (भ.गी.५) महेशभवानी यातील एक गुप्त भावच पुढील चौपायात सोदाहरण स्पष्ट करतात.

हिं .- **कलि बिलोकि जगहित हर-गिरिजा । साबर मंत्रजाल तिन्ह सिरिजा ॥५॥**
**अनमिल आखर अरथ न जापू । प्रगट प्रभाउ महेस प्रतापू ॥६॥**
**सो उमेस मोहि पर अनुकूला । करिहिं कथा मुद मंगलमूला. ॥७॥**

म.　　कलि पाहुनि जगहित गिरिजाहर । मंत्रजाल जिहिं सृजिले शाबर ॥५॥
अर्थ न वर्णमेळ, जप केवळ । महिमा प्रगट महेश-महाबळ ॥६॥
ते उमेश अनुकूल हि मजला । करिति कथा मुद मंगल-मूला. ॥७॥

अर्थ - कलियुग आले आहे असे पाहून ज्या गिरिजाहरांनीं जगाच्या कल्याणासाठी शाबर मंत्रांचे समूह (जाल-जाळे) उत्पन्न केले ॥५॥ त्यामध्ये अक्षरांचा व अर्थाचा मेळ नाही, फक्त जपच (करावा लागतो) तरीपण त्यांचा महिमा प्रभाव अगदी प्रगट आहे. याचे कारण महेशाचे महासामर्थ्य (प्रताप) ॥६॥ तेच उमेश माझ्यावर प्रसन्न आहेत म्हणून ते ही कथा-प्राकृत काव्य-मोद व मंगलांचे मूळ करतील. (आनंद मंगलांचे मूल अशी ही कथा ते करतील) ॥७॥

टीका – चौ. ५ (१) कलि पाहुनि जगहित गिरिजाहर - (क) कलि फार कराल आहे. 'पाप परायण नर नी नारी' होणार हे त्यांना कळत होते. तशा स्थितीत वेदादि मंत्रांचा प्रभाव सहज पडणार नाही हे गिरिजा हरानीं जाणले. कलीत लोकांच्या आपत्ति, संकटें, रोग कसे निवारण होणार ही चिंता त्यांना उत्पन्न झाली. तेव्हा लोकहितासाठी 'सुहृदः सर्व भूतांनां' मित्राचे जे कर्तव्य ते कोणी न सांगताच त्यांनी केले.

(ख) गिरिजाहर - गिरि जडता सूचक शब्द आहे. लोकांची विवेकशक्ति, तपशक्ति, मंद होईल व लोक जडबुद्धि, कठिण कठोर बुद्धि होतील. 'मति थोडि, कठोर, न कोमलता' 'सुखवांछिति मूढ, न धर्मरति' असे होणार हे गिरिजेने सुचविले. गिरिजा शब्द मानसात असे जडतादि पर्वताचे धर्म सुचविण्यासाठीच बहुधा वापरला आहे.

(ग) हर – या मतिमंदतादि दोषांमुळे श्रुतिपुराणोक्त मंत्रात चैतन्य जागृत करणे -. ते सिद्ध करणे बरेच अशक्य होईल. म्हणून ही अडचण हरण (दूर) करण्यासाठी त्यांनी नवे मंत्र तयार केले ते शाबर मंत्र.

(२) शाबर मंत्रजाल - (क) उमामहेश्वरांनी शबर शबरीचे- भिल्लभिल्लिणीचे रूप घेऊन हिमालयाच्या आसमंतात, भागात संचार सुरू केला, व तेथे राहणाऱ्या शबर, ठाकुर, वगैरे जातीत ही मंत्र परंपरा प्रचलित केली. वारली, भिल्ल, कोळी, कातकरी, मितनी इत्यादि वनात राहणाऱ्या जातीतच या मंत्रांची परंपरा अद्याप पुष्कळ आहे. सर्प विंचू बाधा, भूतपिशाच बाधा निवारण याच सत्कार्यांतले मंत्र प्रचलित दिसतात, पण जारण मारणादि अभिचार कर्मांच्या मंत्रांचा प्रसार मात्र या लोकांत बराच आहे, काही ब्राह्मण सुद्धा शाबरमंत्रांचा उपयोग करताना आढळले. काही मंत्र द. ना. कर्वे यांने एका ब्राह्मणाकडून चंद्रग्रहणात घेतले होते. यांचा जप करावा लागतो व काही नियम पाळावे लागतात. सर्पमंत्रात पडवळाची भाजी वर्ज्य. अस्पर्श स्त्रियांचा, बांगड्यांचा, पाण्याची घागर ओतण्याचा आवाज जेवताना ऐकला तरी जेवण टाकून उठावे लागते. असे काही नियम, आचार

पाळावे लागतातच. विधिपूर्वक घेऊन पाण्यात उभ्याने त्यांचा जप चालू केला होता; पण उपाधि वाढेल व मुख्य साधनात व्यत्यय येईल असे वाटून त्याने ते सोडून दिले. ते एका वहीत लिहिलेले होते पण सापडले नाहीत. प्रज्ञानानंदाला त्यामुळे येथे नमुने देता येत नाहीत. (मा. पी. पृ. ५७४ वर काही मंत्र दिले आहेत ते पहावे.)

चौ. ६ (१) अर्थ न वर्णमेळ -काही शब्दांचा अर्थ लागतो, काहींचा नाही. काही संस्कृत तर काही हिंदी, काही कोणत्या भाषेचे ते कळत नाही. असे असले तरी ज्या कार्यासाठी जो मंत्र असेल त्याची प्रतीती तत्काळ येते. त्यांचा प्रभाव अनुभवास येतो व तो त्या मंत्रात आहे. अक्षरे शब्द वाक्ये यांची रचना वेडी वाकडी, अर्थबोध न होणारी असली तरी त्या ओबड धोबड भाषेतील मंत्रात फार मोठा प्रभाव आहे तो महेशाचा प्रताप, त्यात उतरला आहे.

(२) महेश महाबळ - महेशाचे महासामर्थ्य, तेज, प्रताप, शक्तीचा तो प्रभाव आहे.

(क) शाबर मंत्रांच्या स्वरूपाचे वर्णन येथे अप्रस्तुत आहे असे वाटण्याचा संभव आहे, पण अप्रस्तुत मुळीच नाही. तुलसीदासांनी हे उदाहरण दिले आहे. सांगण्याचा हेतु आहे की माझी भाषा अशीच ओबड धोबड, अव्यवस्थित, ओंगळ, ग्राम्य आहे. तिच्यात जर महेशाने आपला प्रताप प्रभाव घातला तर ती सुद्धा अति प्रभावशाली होईल. व गंगेसारखी सर्व लोकहितकारी. शाबरमंत्रजाला सारखीच होईल; पुढील चौपाई हाच भाव स्पष्ट करते.

चौ. ७ (१) ते उमेश - वर ज्यांच्या प्रतापाचे उदाहरण दिले ते. या ते चा संबंध जिहिं सृजिलें या वाक्याशी आहे. महेशभवानी यांनी जो अर्थ सुचविला तो उमेश या एका शब्दांत आहे. उ-महेश, मा-लक्ष्मी, ऐश्वर्य+ईश. (अ. व्या. सु) उ चा अर्थ मंत्रपरिभाषेप्रमाणे सर्व बलप्रद सारतर' (अक्षमाला उप.) असा आहे. असे आहेत शंकर; ते आहेत तुरसीदासांचे मित्र गुरु, पिता, माता, दीनदयाल व रामसेवक स्वामी व रामसखा आहेत. मी रामचरित्र कथन करू इच्छितो, पण माझ्या भाषेत प्रतापभूती, ऐश्वर्य मुळीच नाही. उमेश माझ्यावर प्रसन्न आहेत. एवढे असल्यावर ते काय करतील हे सांगण्याची सुद्धा आवश्यकता नाही. मित्राला प्रार्थना विनवण्या कराव्या लागत नाहीत. न्यून असेल ते न बोलता केव्हाच परिपूर्ण करतो तसेच शंकर करतील व भाषा कविता कथा आनंदमंगलमय होईल यात काहीच नवल नाही. (२) करिति कथा मुदमंगलमूला याचे दोन्ही अर्थ प्रथम दिले आहेत. कंसात दिलेला अर्थ तुलसीदासांच्या हृदयातील भाव आहे. पहिला अर्थ लौकिक आहे.

(क) रामचरित्र वर्णन व श्रवण हा महेशांचा अति प्राणप्रिय विषय आहे; म्हणूनच हंस बनून कावळ्याजवळ श्रवण केले; अगस्तिमुनींकडे जाऊन श्रवण केले. आपल्याला प्राणप्रिय वाटणारे कार्य निर्दोष अति उत्तम व्हावे असे प्रत्येकासच वाटते; माझ्या भाषावैगुण्यामुळे ते तसे होणार नाही हे ते जाणतात. मित्राची

न्यूनता मित्र बरोबर जाणतो; तेव्हा तेच माझ्या हृदयात बसून कथा करीत राहतील व माझे काम फक्त हातानी लिहिण्याचे! अशाप्रकारे कथारचना करतील महेशच पण लौकिकात माझे नाव पुढे होईल आणि फुकटचा मोठेपणा मात्र मला. 'वधिलेम्यां, तू खिन्न न हो, वध युद्ध करी, जिंकिसि रिपुना' (भ.गी.सं.स ११/३४) भगवंताने आपल्या अर्जुन मित्राचे कार्य असेच केले आहे. (निमित्त मात्रं भव सव्यसाचिन्)

(२) ते उमेश अनुकूलहि मजला - या वाक्याने तुलसीदास प्रत्यक्ष घडलेली गोष्टच सांगत आहेत. (उमा महेश्वर दर्शन व आज्ञा हा तुलसीदास चरित्रातील भाग पाहावा मूळ गोसाई चरित्रांतील उतारा -'प्रगटे सिय संग भवानि लिये (घेऊन)। मुनि आठहु अंग प्रणाम किये । (केला) । शिव भाषेउ भाषामें काव्यरचो । सुरबानिके पीछे न तात पचो ॥ सबकर हित होइ सोइ करिये । ... मम पुन्य प्रसाद सो काव्य कला । होइहहि सम साम ऋचा सफला॥' खाली टिंब दिलेली अक्षरे ऱ्हस्व वाचावी व रेघ असलेली दीर्घ वाचावी.

(क) हा चरण तुलसीदास चरित्र सूचक आहे.

हिं.- सुमिरि सिवा सिव पाइ पसाऊ । बरनउँ रामचरित चित चाऊ ॥८॥
भनिति मोरि सिवकृपां बिभाती । ससि समाज मिलि मनहुं सुराती ॥९॥

म.- स्मरुनि शिवा शिव प्रसाद पावुनि । वदतो रामचरित मनिं हर्षुनि ॥८॥
कविता मम शिवकृपे बिराजे । जणुं सोडुप-उडु सुनिशा भ्राजे ॥९॥

अर्थ : शिवा व शिव यांचे स्मरण करून त्यांचा प्रसाद मिळाल्यावर (पाइ. पावुनि) मी आता मनात हर्षयुक्त होऊन रामचरित वर्णन करतो. ॥८॥ माझी कविता शिवकृपेने अशी विराजत आहे की जणुं सुंदर (शारदीय पौर्णिमेची) रात्रच चंद्र व नक्षत्रमंडळासह प्रकाशत आहे. ॥९॥

टीका – चौ. ८ (१) स्मरुनि शिवा शिव - 'शिवा भवानी रुद्राणी' श्वः श्रेयसं शिवं भद्रं कल्याणं मंगलं शुभम्' (अमर). कल्याण स्वरूप, सर्वमंगलस्वरूप, श्रेय-मोक्षस्वरूप हे सर्व अर्थ शिव व शिवा शब्दांनी सुचविले. (२) प्रसाद पावुनि - वर दिलेल्या मूल गोसाई चरितांतील अवतरणांत मम पुण्य प्रसादाने ती तुझी काव्य कला सामवेदाच्या ऋचांसारखी सफल होईल असा आशीर्वाद शिवाने दिलेला आहे. शंकरांच्या पुण्य रूपी प्रसादाची प्राप्ती झाल्याने कोणास परमानंद व उत्साह वाटणार नाही?

(३) मनिं हर्षुनि - हा प्रसाद मिळेपर्यंत मन साशंक होते, हे कार्य कसे साधेल, कसे पूर्णतेस जाईल इत्यादि विविध भय मनास वाटत होते ते सर्व गेले व आता आनंद व उत्साह वाटू लागला आहे. (चाऊ-उत्साह-हर्ष, पसाऊ-पसाय (ज्ञानेश्वरी), प्रसाद.

चौ. ९ (१) कविता मम शिव कृपें विराजे - यात ध्वनि हा आहे की ही कविता कविता नसून शिवकृपाच प्रकाशात आली आहे. तिचेच तेज विराजत आहे। (२) सोडुप-स+उडुप-चंद्र, नक्षत्रपति उडु-नक्षत्रें.

(क) सुनिशा (सु. राती. रात्र) अमावास्येची रात्र वाईट असते म्हणून तिच्या विरुद्ध असलेली म्हणजे शरद ऋतूतील पौर्णिमेची निरभ्र रात्र म्हणजे सुनिशा सुरात्र (सुरार्ता) 'उडु' शब्दानं हिंदीतील समाज शब्दाचा अर्थ स्पष्ट केला.

(ख) तुलसीदासांची भाषा ही ढगांनी व्याप्त अशी अंधारी रात्र होती; पण शिव कृपारूपी जोराचा वारा सुटताच तिच्यात 'राम नाम तो सोम = शशी दिसू लागला व अपर नाम उडुगण विमल, प्रकाशू लागले. मोहाम्भोधर पूगपाटनविधी स्वःसंभवं शंकरं वंदे (अर.मं.१) स्वःसंभव = वारा, मोह रूपी पटलांना घालविणारा वारा म्हणजेच शंकर, म्हणजेच शिव. जी कुरात होती ती सुरात - सुरजनी झाली. राका रजनी भक्ति तव' (३/४२).भाषा रामभक्ति भूषित झाली व जे प्रकाश किरण पडले तेच रामचरित. 'रामचरित राकेश-कर सदृश सुखद सर्वांस' (१/३२/-)

तुलना करून पहा - आता 'कीर्ति भूति कविता ती लायक । सुरसरि सम सकलांहितकारक' (१४/९) पासून 'प्रगटति खल विष वारुणी' (१४न) पर्यंत जे भाव या चंद्रिकेने प्रकाशित केले आहेत त्यांच्याशी तुलना करून पहावी.

(क) ज्या गोष्टीच्या प्राप्तीसाठी सर्वांना विनवण्या केल्या ती गोष्ट शिवशिवा प्रसादाने मिळाली व आता 'रामभक्तिभूषित मनिं जाणुनि । परिसति सुजन 'सुवाणी वानुनि' अशी खात्री झाली; व 'जो प्रबंध बुध ना आदरती । वृथा बालकवि ते श्रम करती' (१४/८) असे होणार नाही असा विश्वास आला.

(ख) मागे ज्यांना ज्यांना प्रार्थना करून जे जे मागितले ते देण्याची कृपा सर्वांनी केली. ती सर्वांची कृपाशक्ति शिवाच्या कृपेसह शिवमुखाने बाहेर पडली व तुझे काव्य सामवेदाच्या मंत्रगानासारखे सर्वांना प्रिय व सुखकारक होईल, तू स्वभाषेतच काव्य रचना कर, देववाणीच्या फंदात पडू नको कारण स्वभाषा हा सर्वांचे हित होण्याचा मार्ग आहे - इत्यादि आशीर्वादयुक्त आज्ञा मिळाली. (मू. गो. च. ७/ २ मध्ये उतारा प.)

वि. सू. वर दिलेला ९व्या चौपाईचा अर्थ ज्यांना समाधानकारक वाटत नसेल त्यांनी मा. पी. पृ. २७६ वरील अर्थ पहावेत. ते या अल्प मतीस सयुक्तिक व सुसंगत वाटत नाहीत. टीकाकारांनी संगति दाखविण्याचा प्रयत्न केला असल्यास तो प्रथम पहावा. पृ. २७५वर जो दोहावलींतला दो. १९० दिला आहे, त्याच्याच पुढला दो १९३ 'राम चरित राकेश कर -' हा आहे व हाच दोहा बालकांड दो ३२ वा आहे. या मानसांतील दोह्याचाच -आधार वर (१/३२/-) असा दिला आहे. 'यद्रोचते तद् ग्राह्यम् यन्न रोचते तत् त्याज्यम् । सुखेनैव भोक्तव्यम्'

(क) पुढील दोन चौपायांत ग्रंथाच्या श्रवणादिकांचे फळ सांगून दोह्यांत आशीर्वाद देऊन ठेवतात.

हिं .- जे एहि कथहि सनेह समेता । कहिहहिं सुनिहहिं समुझि सचेता ॥१०॥
होइहहिं रामचरन अनुरागी । कलिमलरहित सुमंगल भागी ॥११॥
दो .- सपनेहुँ साचेहुँ मोहि पर जौं हर गौरि पसाउ ।
तौ फुर होऊ जो कहेउँ सब भाषा भनिति प्रभाउ ॥१५॥
म .- जे स्नेहे ही कथा सांगतिल - । सावधान समजुनी ऐकतिल ॥१०॥
होतील रामचरण - अनुरागी । कलिमलरहित सुमंगलभागी ॥११॥
दोहा .- जर हरगौरि पसाय कीं मज हि खरा स्वप्नांत ।
"जो प्रभाव कथिला, खरा हो प्राकृत-काव्यात ॥१५॥

अर्थ : ही रामचरित कथा जे कोणी सावधानपणे व स्नेहाने सांगतील व जे कोणी सावधानपणे समजून ऐकतील - ॥१०॥ ते रामचरण- अनुरागी होतील. कलिमलरहित होतील व सुमंगलाचे भागीदार (वाटेकरी) होतील. (सुमंगल करणारे भाग्य उदयास येईल.) ॥११॥

दोह्याचा अर्थ पुढे दिला आहे.

टीका – चौ. १० (१) 'मज्जन पानि पाप हरि एका । श्रवणिं कथनिं दुजि हरि अविवेका' (चौ.२) असा उपक्रम केला आहे. त्याचाच उपसंहार येथे करीत आहेत. तेथे शारदा-सरस्वतीचा अर्थ रामकथा असा केला आहे तोच योग्य ठरला.

(क) या ग्रंथात पठनाचे फळ कोठेही सांगितले नाही, सर्वत्र श्रवण या गान, कथन, सांगितले आहे. श्रवण सापेक्ष असते. कोणीतरी वक्ता लागतो. वक्ता व श्रोता कसा असावा हे या चौपाईत संक्षेपाने सांगत आहेत. चौ-२ मध्ये जी लक्षणे सुचविली ती येथे थोडक्यात स्पष्ट सांगतात.

(२) स्नेहे कथा सांगतिल सावधान - (क) कथा, हिंदीतील कथहि = कथेला, 'हि' हा द्वितीया व चतुर्थीचा प्रत्यय आहे.

(ख) स्नेहे सावधान सांगतिल - हे वक्त्याचे लक्षण सांगितले. रामप्रेममय अंतःकरणाने, इंद्रियांत प्रेमाचे अनुभाव प्रगट होतील अशा प्रेमाने सांगता आले पाहिजे व सावधान राहून (सचेता-सचेत- जागृत) अर्थ, भाव, पूर्वापर संदर्भ, प्रकरणार्थ, ग्रंथार्थ यांचा समन्वय साधून, याच ग्रंथांतील अन्य वचनाशी विरोध उत्पन्न होऊ न देता सांगता आले पाहिजे. असा वक्ता असेल तरच अधिकारी श्रोत्यास रामचरणानुराग मिळू शकेल. 'सावधान गाती चरिताते । रक्षक चतुर तडागा या ते' (३८/१) या चौपाईच्या टीकेत विस्तार पहावा, व प्रस्तावनेत 'कथा श्रवण कसे करावे' वगैरे प्रकरणे पहावी.

(ग) स्नेहाने - येथे रामपदप्रेम अपेक्षित आहे. पैशाच्या, प्रतिष्ठेच्या कोणा व्यक्तीच्या प्रेमाने नव्हे. जेथे धनप्राप्ती, प्रतिष्ठेची आशा इत्यादि हेतु व विकार असतील तेथे रामस्नेह असणेच शक्य नाही. हे लक्षण श्रोताच्या ठिकाणीही पाहिजेच; पण प्रारंभी नसले तरी चालेल. वक्त्याच्या ठिकाणी हे अत्यंत आवश्यक आहे. चौ-२ व ३ ची टीका पहावी व दो १११ टी. पहावी.

(३) सावधान समजुनी ऐकतील - श्रोत्याची सावधानता फार थोडी आहे. श्रवणात सर्व इंद्रियें मन बुद्धि चित्त अहंकार एकत्रित करणे या एका लक्षणांत इतर सर्व लक्षणांचा समावेश होतो. 'मन लावुनि ताता श्रुणु सादर (१/४७/५) 'ऐका मतिमन चित्ता लावुनि' (३/१५/१) यावरील टीका मुद्दाम पहावी. भगवत्पद चिंतन करीत स्नेहाने श्रवण केले पाहिजे. जे ऐकलेले समजले नसेल तर श्रुतिसंमत तर्कांनी समजाऊन घेतले पाहिजे. वारंवार श्रवण केले पाहिजे. 'कशि उमजे मी जीव जड कलिमल ग्रसित विमूढ' (१/३०/-)' वारंवार परी गुरू सांगति । काहि समजली मला यथामति' - मला सर्व समजले असे वाटणे हा वक्ता व श्रोता यांच्या ठिकाणचा मोठा दोष आहे. दोघांचेही परस्पर निर्हेतुक प्रेम असले पाहिजे. मा. पी. संपादकांनी नोट - मध्ये जे लिहिले आहे ते शब्दार्थाविषयी योग्य आहे. नुसता शब्दार्थ समजणे म्हणजे कथा व त्यातील प्रतिपाद्य विषय समजला असे होत नाही.

चौ. ११ (१) श्रोत्याच्या अधिकारानुरूप तीन फलें सांगितली आहेत. 'विषयी साधकसिद्धज्ञानी । त्रिविध जीव जगिं वेदधि वानी' (क) विषयी जनांचे मंगल कारक भाग्य उदयाला येईल; त्यांच्या कामना सफळ होतील, ऐहिक कल्याण होईल. 'जे सकाम नर ऐकति गाती । पावती सुख विविधा संपत्ती' (७/१५/३) 'सुर दुर्लभ सुख भोगुनि जगतीं । अंतकाळिं रघुपति पुरिं जाती ॥४॥ मुक्त विरक्त किं विषयी ऐकति । भक्ति सुगति नव वैभव पावति ॥' ज्ञानी असतील त्यास रामचरणानुराग-रामप्रेम मिळेल; विरक्त (साधक) असतील तर त्यांच्या कलिमलाचा-पापांचा-नाश होऊन ते ज्ञानी होतील व विषयी जनांना (बद्ध) नवें वैभव मिळेल. विषयी विरक्त होऊन, विरक्त ज्ञानी होऊन नंतर त्यांनाही रामप्रेम मिळेलच पण त्यांना यथोक्त रीतीने फारच श्रवण करावे लागेल. ७/१२९/५-६, ७/१३०/छं २ मध्ये उपसंहारात फलश्रुति आहे ती पहावी.

ल. ठे. या दोह्याच्या अंगभूत ११चौपाया आहेत. या सर्वांत अथपासून इतिपर्यंत शंकरांशी संबंध आहे, (गंगेचा व रामचरिताचाही शंकरांशी संबंध आहेच). म्हणून एकादश रुद्र सूचक ही चौपायांची एकादशनीध आहे. या चौपायांत महेश, भवानी गिरिजा, हर, महेश, उमेश, शिवा, शिव, शिव (कृपें) व दोह्यांत हर, गौरि. मिळून ११च आहेत. प्रस्तावनेत 'श्रीतुलसीदासांचे काही विशिष्ट संकेत' हे प्रकरण पहावे.

दोह्याचा अर्थ - कारण (कीं) जर हर व गौरी यांचा माझ्यावर स्वप्नांत व खरा (जागृतीत) सुद्धा प्रसाद (पसाय-पसाउ) असेल तर पूर्वी (मागल्या चौपायांत) जो प्रभाव सांगितला तो या प्राकृत काव्यात खरा हो. (होवो-होईल).

टीका. - तुलसीदास चरित्रांतील पूर्वी सांगितलेल्या घटनेला या वचनाने पुष्टि येते. आधीं स्वप्नात आज्ञा व आशीर्वाद मिळाला; व मग प्रत्यक्ष-खरेपणीं-म्हणजेच जागृतीत. (चौ. ७ या टीकेत (२) पहा.) शिवाय 'अठवे दिन संभु दिये सपना। निज बोलिमें काव्य करो अपना ॥ उचटी निदिया (निद्रा) उठि बैठ मुनि । उर गूंजि रह्यो सपनेकि धुनी' (मू. गो. च.)

(क) येथे तुलसीदासांनीं शंकरांचा आशीर्वाद पणास लावून श्रोत्यावक्त्यांस व या ग्रंथास आशीर्वाद दिला आहे.

श्री मानस गूढार्थ चंद्रिका बालकांड अध्याय दुसरा समाप्त.

# अध्याय तिसरा

## श्रीसीताराम-धाम-परिवारादि वंदन - प्रकरण.

हि.- बंदउँ अवध पुरी अति पावनि । सरयू सरि कलि कलुष नसावनि ॥१॥
प्रनवउँ पुर नर नारि बहोरी । ममता जिन्ह पर प्रभुहि न थोरी ॥२॥
म.- वंदु अयोध्यापुरी सुपावनि । सरयू सरि कलि-कलुष-विनाशनि ॥१॥
पुन्हा प्रणमतो पुर नारी नर । प्रभुममता थोडी ना ज्यावर ॥२॥

**अर्थ** : आता मी अतिपावन अशा अयोध्यापुरीला व कलियुगातील सर्व पापांचा विनाश करणाऱ्या शरयू-सरयू-नदीला वंदन करतो ॥१।. मी पुन्हा अयोध्यापुरीला व तेथील नरनारींना वंदन करतो (कारण) त्यांच्यावर प्रभुरामचंद्रांची ममता (प्रीति) थोडी थोडकी नाही! (अपार आहे) ॥२॥

**टीका** – चौ. १ (१) रामचरित्र वर्णन करण्यास प्रारंभ करण्यापूर्वी रामधाम जी अयोध्यापुरी व जेथे रामचरित्राचा प्रत्यक्ष प्रारंभ व्हावयाचा तिला वंदन करतात. अयोध्येला नमन करून मग क्रमाने ज्यांच्या ज्यांच्यावर रामप्रेम होते व असते व ज्यांचा निकट संबंध होता अशा सर्वांस यथाधिकार वंदन करतील.

(क) शरयूला स्वतंत्रपणे नमस्कार आहे असे मानणे आवश्यक आहे; कारण रघुनाथाने स्वमुखाने तिचा महिमा वर्णिला आहे; व शिवाय शरयूचे प्रदीर्घ रूपक कथेशी केलेले आहे कवींनी.

(ख) अति पावन व कलुष विनाशन हे दोन्ही पर्याय आहेत; म्हणजेच अयोध्या शरयू कलिकलुष- विनाशन करून पावन करतात. सुपावन (सु. अति) म्हणण्याचे कारण 'दर्शन मार्जन मज्जन पाने । अघहरि वदती वेद पुराणे' (१/३५/१) 'नदी पुनीत अमित महिमा अति । वंदु न शके शारदा विमलमति ।. (१/३५/२). हे शरयूचे वर्णन आहे.

(ग) 'रामधामदा पुरी सुशोभन । लोकीं सकल विदित अति पावन ।. अमित जीव जगिं खाणी चारी । त्यजि तनु अवधिं, न ये संसारी ।. जाणुनि सबपरिं पुरी मनोहर । सकलसिद्धिदा सुमंगलाकर' (१/३५/३- ५)

(२) (क) वनवासाला जाताना मनात नमन केले व वनवासातून परत येताना त्रिवेणी वरून विमान पुढे नेववून, अयोध्या दिसेपर्यंत जाऊन रघुनाथाने प्रणाम केला आहे व विमान परत त्रिवेणीस येऊन उतरले आहे. 'निघति अयोध्येला मनिं नमुनी' (२/८३/२) 'पुरी अयोध्या बघ अति पावनि । त्रिविध ताप भवरोग विनाशनि ॥' 'करिति अयोध्ये कृपानिधि सह जानकी प्रणाम॥ सजलनयन तनु

पुलकिता घडिघडि हर्षित राम' (६/१२वा) धन्य अयोध्या रामहि वानी' (७/४/८) उ. कां. ४/१-४/५ चौ. पहाव्यात. अयोध्या विष्णूचे मस्तक आहे म्हणून ती अति पावन व इतर मोक्षपुरी पावन आहेत.

(ख) 'अयोध्या मथुरा माया काशी कांची अवंतिका पुरी द्वारावती चैव सप्तैता मोक्षदायिकाः' मायापुरी- हरिद्वारजवळचे कनखल क्षेत्र; अवंतिका- उज्जैनी, अवन्ती, द्वारावती द्वारका; कांचीचे विष्णुकांची व शिवकांची असे दोन भाग आहेत. 'विष्णोः पादमवन्तिकां गुणवती' मध्यंच कांची पुरी । नाभिं द्वारावतीं वदंति हृदयं मायापुरीं योगिनः । ग्रीवामूल मुदाहरन्ति मथुरां नासांच वाराणसीं । एत ब्रह्मपदं वदन्ति मुनयोऽयोध्यापुरीं मस्तकम्' (मा.पी.)

सूचना : मानसांतील सात कांडे - अयोध्या मथुरा माया काशी कांची अवंतिका व द्वारावती या सात मोक्षपुरी क्रमशः आहेत. 'विष्णोःपाद- या श्लोकांतील क्रम निराळा आहे.

(ग) रुद्रयामले अयोध्या महात्म्य - श्रूयतां महिमा तस्या मनो दत्वा च पार्वति । अकारो वासुदेवः स्यात् यकारस्तु प्रजापतिः ॥ उकारो रुद्ररूपस्तु तांध्यायन्ति मुनीश्वराः' अ+य+उ=अयो, तिचें ध्यान करतात म्हणून अयोध्या. 'सर्वोपपातकैयुक्तैर्ब्रह्महत्यादि पातकैः । न योध्या सर्वतो यस्मात्तामयोध्यां ततो विदुः' ब्रह्महत्यादि कोणती ही पातकें तिच्याशी युद्ध करू शकत नाहीत म्हणून अयोध्या हा दुसरा अर्थ. हाच अर्थ अवध (अ-वध) शब्दांत आहे. कोणतीही पातके जिचा व जिथे वध करू शकत नाहीत ती अवध. अयोध्या शब्द पाच मात्रांचा व उच्चारात कठोर म्हणून त्याचा उपयोग तुलसीमानसात फक्त एकदाच केला आहे. अवध शब्दच सर्व ठिकाणी आहे. मराठीत बहुतेक ठिकाणी, अडचण सोसून सुद्धा अयोध्या वापरला आहे; क्वचित अवध, वापरणे भाग पडले आहे. 'विष्णोराद्या पुरी चेयं क्षितिं न स्पृशति प्रिये । विष्णोः सुदर्शने चक्रे स्थिता पुण्य करा सदा'. ही विष्णूची आद्य पुरी, सुदर्शन चक्रावर आहे. (मा.पी.म.) स्कंद पुराण वैष्णव खंडात अयोध्या माहात्म्य आहे.पद्म पुराणांत अल्पसे माहात्म्य आहे.

(३) कलि कलुष विनाशनि - 'कलिकेवल मलमूल मलीन । पाप पयोनिधि-' अशा पापमहासागरांचा जी विनाश करते ती इतर युगांतील तलाव डबक्यांचा विनाश करील हे सांगण्याची आवश्यकताच नाही; म्हणून शंकेला जागा नाही.

चौ. २ (१) पुरीला पुन्हा नमन करण्याचे कारण ती श्रीरामाला वैकुंठपुरी पेक्षा प्रिय आहे. 'यदपि सकल वैकुंठा वानिति । वेदपुराणविदित जगिं जाणति ॥ प्रिय न अयोध्ये सम मज तेही' (७/४/३-४). (२) पुरनरनारींना प्रणाम - करण्याचे कारण उत्तरार्धात आहे. जे भगवंताला अतिप्रिय ते त्यांच्या दासाला वंद्य वाटलेच पाहिजेत हे येथे सुचविले.

(क) तुलसीदास ब्राह्मण असुन त्यांनी सर्वांना नमन कसे केले? ही शंका खुळेपणाची आहे. खगमृगादिकांना वंदन केले तेथे असली शंका नाही! 'प्रिय अति मज येथले

निवासी' हे श्रीराम म्हणाले आहेत. (७/४/७) 'पुण्यपुंज आम्हासम थोडे । ज्यांना राम म्हणति मम, कोडे' (२/२७४/८) असे अयोध्यानिवासी म्हणाले.

## शरयू-सरयू-ची उत्पत्ति -

'कैलास पर्वते राम मनसा निर्मित सरः । ब्रह्मणा नरशार्दुल तेनेदं मानसं सरः ॥८॥ तस्मात् सुस्राव सरसः साऽयोध्यामुपगूहते । सरः प्रवृत्ता सरयू पुण्या ब्रह्मरसश्च्युता ॥९॥

मानस सरोवरांतून, सरांतून निघाली म्हणून सरयू; तिथे पाणी ब्रह्मरसाचा प्रवाह आहे. शरयू नाव पडण्याचे कारण ती शराच्या योगाने सरांतून निघाली. मानस सरोवर वर्णनात विस्तार केला आहे व शंकांचे समाधानहि केले आहे. (दो. ३९/१२ च्या टीकेत पहा.) आता अयोध्या-शरयू प्रताप दाखवितात.

हिं.- सिय निंदक अघ ओघ नसाए । लोक बिसोक बनाइ बसाए ॥३॥
बंदउँ कौसल्या दिसि प्राची । कीरति जासु सकल जग माची ॥४॥
प्रगटेउ जहँ रघुपति ससिचारू । बिस्व सुखद खल कमल तुसारू ॥५॥

म.- सियनिंदक-अघ-ओघ नाशिले । शोक हरुनि निजलोकिं वसविले ॥३॥
वंदे कौसल्या दिक् पूर्वा । सकल जगीं यत्कीर्ति अपूर्वा ॥४॥
प्रगट जिथुनि रघुपति शशिचारू । विश्व-सुखद खलकमल-तुषारू ॥५॥

अर्थ : (शरयूसहित त्या पुरीने) सीतानिंदकांचे पापांचे प्रवाह नाहीसे केले व रामचंद्रांनी त्यांचा शोक हरण करून त्यांना आपल्या लोकांत वसविले ॥३॥ जिची अपूर्व कीर्ति सर्व जगात पसरली त्या कौसल्यारूपी पूर्व दिशेला मी वंदन करतो ॥४॥ कारण तेथून (च) रघुपति रूपी चारु (निर्दोष) चंद्र प्रगट झाला (उगवला) जो सर्व विश्वाला सुख देणारा व खल रूपी कमलांचा हिमा (तुषारा) प्रमाणे नाश करता झाला ॥५॥

टी — चौ ३ (१) या चौपाईचे टीकाकारांनी नाना प्रकारे अर्थ केले आहेत; पण मा.पी. पृ २८१ नोट २ मधील व पृ २८३ वरील विनायकी टीकाकारांचा दिलेला अर्थ अंशतः मान्य करण्यासारखा आहे.

(क) प्रकरण चालले आहे अयोध्या व शरयू यांची पापविनाशक शक्ति सांगणे, तदनुषंगाने रामप्रेमाचे वर्णन करणे. पहिल्या दोन चौपायांत सिद्धान्तच सांगितले दृष्टान्त दिले नाहीत. दृष्टान्ताशिवाय सिद्धान्त मान्य होत नाही - म्हणून दोन्हींना दृष्टान्त या एका चौपाईत आहेत.

(२) सीतानिंदक - याचा अर्थ केवळ एक धोबी घेणे योग्य नाही. सीतेसारख्या महापतिव्रतेची व सम्राट पत्नीची निंदा हेरांच्या कानांवर येईपर्यंत कुजबुजरूपाने जेव्हा पुष्कळ.काळ पसरते तेव्हा मगच कारणपरत्वे केव्हातरी तिला वैखरी - वाचा

फुटते. 'सिय निंदक मतिमंद प्रजारज निज नय नगर बसाई' (वि.प. १६५) 'चर्चा चरनिसों चरची जान मन रघुराई । दूतमुख सुनि लोकधुनि घर घरनि बुझी आइ' (गीतावली उ. २७) अयोध्येत होत असलेली सीतेविषयींची चर्चा चरांना समजली. त्या दूतांच्या मुखाने रघुरायाने तो लोकध्वनि ऐकला (लोकमत, लोकधुनि) व घरी येऊन गृहिणीला विचारले की तुझी काय इच्छा आहे वगैरे. गीतावली तुलसीदासांचाच ग्रंथ आहे. वा. रा. व अ. रामायणांवरून सुद्धा सिद्ध आहे की अनेक लोक ती चर्चा करीत होते. येथेहि क्रियापद 'बसाए' अनेकवचनीच आहे; म्हणून पुष्कळ लोक असाच अर्थ घेणे जरूर आहे.

(३) रावणाच्या लंकेत सीता १४ महिने तरी राहिली होती. रावण दुष्ट, कामी, राक्षस होता व त्याच्या ताब्यात ती होती. त्याने पळवून नेली त्यावेळी रावणाचा स्पर्श तिच्या अंगास झाला होता. वगैरे कारणांनी लोकांनी संशय घेण्यास जागा होती. सीतेने अग्निदिव्य केले हे जरी खरे असले तरी ते अयोध्येतील लोकांनी पाहिले नव्हते. लक्ष्मण भाऊ, सुग्रीव विभिषण शरणागत. आश्रित असल्याने त्यांचे सेवक सीतेविरुद्ध बोलतील हे शक्यच नव्हते. असे विचार मनात येणे हा मनुष्य स्वभाव आहे. राज्यारोहण झाल्यावर हा लोकप्रवाद पुष्कळ वर्षेपर्यंत धुसफुसत राहिला. असली गोष्ट हेर तरी कानावर कशी घालणार; पण एक दिवस योग आला इतकेच.

(क) खऱ्या सीतेला चोरून नेली नव्हती हे लक्ष्मणास सुद्धा माहीत नव्हते; म्हणून तो मुद्दा निरुपयोगी आहे.

(ख) सीतानिन्देसारखे पाप नाही असा टाहो टीकाकारांनी फोडला आहे.आणि म्हणून एका धोब्याने केलेल्या निन्देला अनेक अघ-ओघ म्हटले असे त्यांचे म्हणणे. 'संत शंभु मापति अपवादां । ऐकति तेथे अशि मर्यादा ॥ जीभ कापण्या शक्त असावे । ना तर कानां मिटुनि पळावे' जीभ कापल्याने हरिनिंदेच्या पापाची निष्कृति होते. (१/६४/४). अयोध्या व शरयू यांनी त्या सर्व लोकांच्या पापांच्या नद्या. केव्हाच शुष्क करून टाकल्या. आपल्या 'कलुष विनाशक' प्रभावाने हे दृष्टान्तासाठी सांगणे हा येथे हेतु आहे. दुसऱ्या चरणात राम प्रेमाचा नमुना - दृष्टान्त देतात.

(४) ही निंदा ऐकल्याबरोबर दुसरा एखादा सम्राट असता तर त्याने त्या धोबी वगैरे सर्व निंदकांना हालहाल करून मारले असते, हद्दपार केले असते; त्यांची मालमत्ता जप्त करून घरावरून नांगर फिरविले असते. रघुनाथाने हे काहीं केले नाही; ते सर्वज्ञ व अयोध्या शरयू प्रभाव जाणणारे असल्याने, ते त्यांच्या प्रभावाने निष्पाप झाले आहेत असे जाणून व ते माझे प्रजाजन आहेत या भावनेने त्यांना काहीच शिक्षा केली नाही. 'कृपा सुममता दासांवरती । करुनि कृपा जे क्रोध न करती' (टी.प.) 'प्रभुमनिं राहि न चूक कृतीची'

(क) नंतर सीतेचा त्याग केल्याने तर लोकांचा संशय बळावलाच असेल. हे शल्य राहिले असेल की पुष्कळ वर्षे राजाने अशा स्त्रीला जवळ बाळगली. राजा

परमधर्मात्मा असून स्त्रीममतेने त्याने अधर्म केला. हा शोक त्यांच्या- प्रजेच्या हृदयात होता. हा शोकहरण करण्यासाठी अश्वमेघ यज्ञाच्या सभेत सीतेला बोलावून आणवून सर्वांच्या देखत दिव्य करण्यास सांगितले. (अ.रा.उ. ७/१७-१८) सीता धरणीगर्भात गुप्त झालेली पाहून त्या निंदकांचा शोकशंकू समूळ उपटून काढला गेला; व राजाविषयींचे त्यांचे सर्व गैरसमज, संशय नष्ट झाले, म्हणून म्हटले 'शोक हरुनि',

(५) निज लोकिं वसविले - ज्यावेळी श्रीराम निजधामास गेले त्यावेळी त्या पूर्वीच्या निंदकांना सुद्धा आपल्या बरोबर नेले; त्यांचा त्याग केला नाही. अशा प्रकारचे प्रजाप्रेम कोणत्या राजाच्या ठिकाणी होते काय? व असेल का? रामराज्यासारखे रामराज्यच म्हणून तर रघूत्तम हे नाव! या विवेचनात राम परमात्मा, परमेश्वर, दीन दयाघन इत्यादि काहीही संबंध न आणता कवीच्या वचनांच्या व्यवहारास धरून, मनुष्यस्वभाव विचारात घेऊन, मानसातील वचनांधारे, प्रकरणास उचित असा, सरळ अर्थ सहज लागत असता; रामाने त्यांचे पापौघ नष्ट केले, नवीन सांतानिकपुर वसवून त्यात त्यांस स्थान दिले हे कल्पून मग कुठल्यातरी ग्रंथांतले आधार देणे हा अव्यापारेषु व्यापार करण्याची जरूरीच नाही; पण सावधानता नसली म्हणजे वक्ते असे वाहवतात!

ल. टे. - येथे तुलसीकाव्यकलेचा एक अतुलसा नमुना आहे. पार्वतीने पुढे विचारलेल्या बारा प्रश्नांपैकी एक प्रश्न हा आहे की -'रघुकुलमणि गत सप्रजे कैसे निज धामास' (१/११०/-) या प्रश्नाचे स्पष्ट उत्तर उत्तरकांडातहि दिलेले नाही. येथे 'निजलोकिं वसविले' यात ते जितके स्पष्ट आहे, तितके उ. कां. दो ५०मध्ये सुद्धा नाहीं. तेथे ते शब्दकौशल्याने ध्वनित केले आहे. हे येथले वचन नसते तर तो ध्वनि सापडणे शक्य नव्हते.

(क) लोकापवादामुळे सीतापरित्याग येथे सूचित केला आहे; उ. कां.त ही कथा (दो. २५) केवळ एका शब्दभेदाने एका चौपाईत ध्वनित केली आहे. तेथील ध्वनि प्रगट करण्यास ही चौपाई सबळ पुरावा आहे. सीतापरित्यागापासून निजधाम गमनापर्यंतचा कथाभाग येथे सूचवून ठेवला.

(ख) सीता परित्याग व निज धाम गमन या गोष्टी मानसात वर्णन केलेल्या नाहीतच कारण त्या घडल्या नाहीतच. या कथा वा. रा. उत्तर काण्डात वर्णिल्या असल्या तरी ते प्रक्षिप्त आहे असे म्हणणाऱ्या महामहापंडिताच्या म्हणण्याविरुद्ध सबळ पुरावा येथे भरून ठेवला आहे. सीतापरित्याग तिला विवाहापूर्वी मिळालेल्या शापाचा परिणाम आहे. कथा उ. कां परिशिष्टात पहावी.

चौ. ४ - येथे कौसल्यावंदनात सुद्धा रामचरित धागा ओवला आहे. (१) प्राची - पूर्वदिशा. पूर्वदिशा दिवसा रवि उदयाने ओळखतां येते. रविवंशाचा संबंध कौसल्येशी दाखविला.

(क) पूर्वेस चंद्रोदय पौर्णिमेपासुनच होतो; म्हणून पूर्व व चंद्रोदय यांनी पूर्णचंद्र सुचविला.

(ख) चारु पूर्णचंद्र व तुषार यांनी शरद किंवा हेमंत ऋतुतील पूर्णचंद्र निर्दोष असणारा ठरतो. 'तुषार स्तुहिनं हिमम्' (अमर) हिम शरद किंवा हेमंत ऋतूतच पडते 'शिशिर सुखद हरिजन्मोत्साहू' (१/४२/२) म्हणून शिशिरच घेणे भाग आहे. पण हा कीर्ति सरितेतील शिशिर ऋतु आहे. (१/४२/१ प.) हिम पडले म्हणजे कमले (सुर्यविकासी) गव्हाचे व द्राक्षांचे पीक वगैरे जळून नष्ट होतात.

(२) संध्येत दिशांना व त्यांच्या देवतांना वंदन करताना प्राच्यै दिशे म्हणूनच-प्रारंभ केला जातो. तिन्ही संध्येत प्रथम पूर्वदिशेलाच वंदन करावे लागते.

(क) पुत्रजन्माचे ज्ञान प्रथम आईला व नंतरच बापाला होते, म्हणून कौसल्येला आधी नमनच योग्य आहे. सुं. कां. हनुमन्ताला प्रथम सीतेनेच सुत! म्हटलें (१६/६) नंतर दो. ३२ मध्ये रघुनाथाने सुत! म्हटले आहे.

(ख) 'पितुर्दशगुणा माता गौरवेणातिरिच्यते' हे कारणही आहेच.

(ग) मनुशतरूपांचा संबंध ज्या अवताराशी आला त्याला लक्षून हे वंदन आहे. तेथे सुद्धा प्रभूनीं प्रथम शतरुपा (कौसल्ये) लाच माता म्हटले आहे (१/१५१/३) व नंतर दोहा १५१ मध्ये मनुराजा (दशरथ पुढे झाले)स 'तात' -पिता म्हटले आहे. शतरूपेला माता म्हणण्यापूर्वी मनूला नृप! च म्हटले आहे तीन वेळा. या कारणास्तव बाकीच्या मातांना येथे वंदन नाहीं.

(३) कौसल्येची अपूर्व कीर्ति जगात पसरली. पूर्ण चंद्र उगवला म्हणजे जो चंद्रप्रकाश सर्वत्र पसरतो तीच पूर्वदेशीची अपूर्व कीर्ति. इतर कोणत्याही दिशेला हा लाभ होत नाही. ज्यांच्या यशा प्रतापा पुढतीं। शशिमलीन -(१/२९२/२) हे पुढील रामचरित्र सुचवून ठेविलें

(क) पुण्यसंग्रहाशिवाय पावन निर्मल चारु यश मिळत नाही 'पुण्याविण कि जगी यश पावन?' (७/११२/७) 'तुम्हिं गुरु विप्र धेनु सुर सेवी । तशि पुनीत कौसल्यादेवी ।। जगीं तुम्हासम सुकृती काही। भूत न, नाहीं, होणें नाही' (१/२९४/४-५) म्हणून मूळांत नसलेला अपूर्व हा शब्द अनुवादात घालणे भाग पडले. गूढार्थ स्पष्ट केला.

चौ. ५ – (१) चंद्र प्रथम पौर्णिमेच्या दिवशीच पूर्वेस उगवतो. प्रगट होतो. तसे रघुपति प्रगट झाले. चंद्र अप्रगट असतो तोच प्रगट होतो. येथे अयोनिसंभवत्व सुचविलें व पुढील चरित्र सुचविलें 'ते प्रगट कृपालू दीन दयालू कौसल्याहितकारी' (१/१९२ छं. १) 'ईच्छामय नरवेषा घेइन। प्रगट निकेतीं तुमच्या होइन' (१/१५२/१) असे मनुशतरूपांस वचन दिले होते. अवतार काळी प्रथम कौसल्येपुढेच धनुर्बाणधारी भगवद्रुपानें प्रगट झाले आहेत; व नंतर कौसल्येच्या विनंती वरून बालरूप झाले आहेत. (१/१९३ छं. ४)

(२) शशिचारु – शशी शब्दच शशांक असलेला चंद्र या अर्थाचा आहे; म्हणजेच सदोष असतो. त्याच्या ठिकाणी सोळा दोष असतात. हे रघुपतिच्या ठिकाणी नाहीत म्हणून चारु-चांगला-म्हटले. रघुपति निर्दोष चंद्र आहेत. येथून पुढे मानसात रघुपति रामास जेथे कुठे चंद्र किंवा त्या अर्थाची उपमा दिली असेल तेथे चारु व पूर्ण हे विशेषण अध्याहृत घेण्याची जणू सूचनाच येथे देऊन ठेवली आहे.

(क) चंद्राचे दोष-अवगुण-डाग-कोणते ते मानसाधारे पहा:- १) जन्मसिंधुमाधि २) बंधु विष ३) दिन मलीन ४) सकलंक (१/२३७) ५) घटे चढे (क्षयी) ६) विरहीदुखदायक, ७) ग्रासिराहु निज संधी साधक ८) वारुणी बहीण ९) रविप्रकाशांत निस्तेज होतो. १०) अभ्राच्छादित स्थितीत प्रकाश नीट पडत नाही. इत्यादि १६ आहेत. (३/२८/६ टी.प.)

(ख) रघुपतिंचे पहा – १) जन्म नाहीं, २) भरत लक्ष्मणांसारखे सर्वलक्षणसंपन्न बंधु, ३) ज्यांच्या प्रतापापुढतीं । रवि शीतल वाटे. ४) चंद्राला गुरु-अपमान कलंक'- कोणाही गुरुजनांचा कधी अपमान केला नाही. ५) रामकीर्ति अक्षय आहे. ६) राम कोणाला दुःख देत नाहीत, ७) रावणरूपी कलंकित शशीला ग्रासण्यासाठी स्वतः राहू बनले. 'शिवधनुराहू' यास ग्रासू शकला नाही. ८) वारुणी मदिरा -हिच्याशी अहंकाररूपानें, सत्तारुपानें सुद्धा स्पर्शहि नाही झाला. ९) हंस वंश अवतंस झाले. राम प्रतापास निस्तेज करणारा कोणीच नाही. भृगुकुल कमल पतंग (सूर्य) अस्तास गेला. राज्यत्याग, वनवासादि मोठमोठ्या ढगांनीसुद्धा प्रसन्नता कमी झाली नाही." चंद्र मावळतो पण रघुपतियश चंद्रमा सदा उदित आहे. येथे केवळ दिग्दर्शन केले. वाचक ही तुलना आणखी वाढवूं शकतील मानसाधारेच!

(३) विश्वसुखद, खल कमल तुषारु – खल कमलांशिवाय बाकीच्या सर्व विश्वाला सुख देणारे आहेत. 'विश्वसुखद इव इंदु तमारी' विश्वाला सुख देण्यास एकटा चंद्र किंवा एकटा सूर्य असमर्थ आहेत. पण रघुपति चारुशशी एकटेच पुरेसे आहेत.

(क) खल-कमल – खल शब्दाचे दोन अर्थ आहेत; दुर्जन व समल कमलें चिखलातूनच जन्माला येतात; चिखल- मल नसेल तर ती मरून जातात; चिखलामुळेच जगतात; व चिखलाचा चिखलपणा जाऊन त्याला शुष्क मृत्तिकारूप येण्यापूर्वीच मरतात. खलः कल्के भुवि स्थाने (हैम, मेदि) 'कल्कोऽस्त्री समलै नसी.' (समल एनसोः (अमरे)) खल = कल्क - समल. खल - दुर्जन हा अर्थ प्रसिद्ध आहे.

(ख) पापरूपी पंकात उगवून त्याच्यावरच जगणारी, व जगरूपी जलांत वर येऊन अहंकार-सत्तामदाने फुलून गेलेली, सुर-संतरूपी भृंगांना बंदियासा ठेवणारी रावणासारखीं जी (खल) कमळें त्यांना रघुपति हिमपातासारखे आहेत. हिमपात शीतनिशेंत होतो; व रात्रीच चंद्र उगवतो. धर्मग्लानि, श्रुतिमर्यादाभंग, संतांचा छळ वगैरे अंधार पसरला आहे, अशा रात्रीच रघुपतिचंद्राचा उदय होईल. 'दुःखद तव कुल-कमलवनासी। आली सीता शीतनिशासी' (५/३६/९) अशी शीतनिशा प्रथम लंकेत

आली व मग रघुपतिचंद्र तेथे उगवले आणि रावणकुलांचा विध्वंस केलाच. मानसपीयूषांत 'खलकमल याविषयीं केलेलें समाधान पहावें म्हणजे सावधान रामकथा सांगणें म्हणजे काय हे थोडेसें कळेल.

(ग) ज्या अवतारात कश्यपअदिति दशरथ कौसल्या आहेत त्या अवतारासंबंधानें पुढील तीन चौपायात दशरथ व राण्या यांना वंदन करतात.

हिं.- दसरथ राउ सहित सब रानी । सुकृत सुमंगल मूरति मानी ॥६॥
करउँ प्रनाम करम मन बानी । करहु कृपा सुत सेवक जानी ॥७॥
जिन्हहि बिरचि बड भयउ बिधाता । महिमा अवधि राम पितु माता ॥८॥

म.- दशरथ नृपसह राण्या सकला । गणुनि मूर्ति शुभ पुण्यमंगला ॥६॥
नमन वाङ्मनें करांस जोडुनि । कृपा करा सुत-सेवक जाणुनि ॥७॥
ज्यांस निर्मुनी धन्य विधाता । महिमा-सीम राम-पितृमाता ॥८॥

अर्थ – दशरथ राजा व त्यांच्या सर्व राण्या यांना पुण्याच्या (सुकृत) व शुभ (सु) मंगलाच्या मूर्ती मानून मी मनाने वाणीनें व हात जोडून (कर्मानें) नमस्कार करतो. मी आपल्या पुत्राचा सेवक आहे हे जाणून (तुम्ही सर्व) माझ्यावर कृपा करा ॥६-७॥

मोठेपणाची परमावधि (सीम-सीमा) अशा राममातांना व पित्याला निर्माण करून ब्रह्मदेवाला सुद्धा धन्यता (महती) मिळाली ॥८॥

टीका – चौ. ६ (१) विष्णु, नारायण व ब्रह्म-राम-परमात्मा या तिघांच्या मिळून चार रामावतारांचे संबंध मानसात दाखविले आहेत. तीन कल्पांतील रामावतारात अदिति व कश्यप कौसल्या दशरथरूपाने राममातापिता होते. मनूला जेथे वर दिला तेथे त्या प्रकरणात दशरथ शब्द कोठेच नाही. ब्रह्मदेवांनी स्तुति केल्यावर जी आकाशवाणी झाली तींत दशरथ कौसल्या व कश्यप अदिति संबंध आहे. 'करता कश्यप अदिति तप महा। पूर्वी त्या मी दिला वर पहा॥ तीं दशरथ कौसल्या रूप कोसलपुरीं प्रगट नरभूप॥ जाउनि धरुं तद्गृहिं अवतारहि' (१/१८७/३-५) दशरथराउ शब्द येथे आहेत व दशरथ नरभूपा हे खुणेचे शब्द (१८७) तेथे आहेत. तसेंच मनूचा संबंध जेथे आला तेथे 'अवधभुआल' शब्द आहे (१/१५१) व पुढल्या दोह्यात अगदीं तोच अवधभुआल खुणेचा शब्द आहे. दोन्ही ठिकाणी दशरथ नाव नाही. असे खुणेचे शब्द घालून संबंध प्रदर्शिण्याची व भावप्रदर्शन करण्याची कला शेकडो ठिकाणी मानसात वापरलेली दिसते. अनुवादात मनुसंबंधाने 'अयोध्यापाल' शब्द दोन्ही ठिकाणी (१५१ व १६) वापरला आहे व नृप व नरभूप शब्द दोन्ही ठिकाणी वापरून मूळापेक्षा अधिक साम्य दाखविले आहे. यावरून अनुवादकाने किती सावधान राहिले पाहिजे याची काही कल्पना येईल.

(क) शतरूपा कौसल्येला वंदन केल्याबरोबर मनुदशरथाला का नाही याचे समाधान टीकाकारांनी केलेले नाही ते पुढील दोह्यांच्या टीकेत केले आहे.

(२) राण्या सकला – मानसात कौसल्या, कैकयी व सुमित्रा या तिघींचीच नावे आहेत पण तुलसीदासांनी गीतावलीत पद ११० मध्ये सातशे राण्या असल्याचा उल्लेख केला आहे. काही रामायणात ७५० तर काहीत ३५० असल्याचे उल्लेख आहेत. म्हणून ज्याला जे मत रुचत असेल ते मानण्यास मानसात संधि दिली आहे. सर्वमतसमन्वय -संग्रह -करून वादविवादास जागा न ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न केलेला दिसतो. सर्व रामायणांत या तीन आहेतच व यांच्याशिवाय रामायणाची पूर्ति व्हावयाची नाही. अध्यात्मदृष्टीने याचा विचार दो. ३२४छं. ४ च्या टीकेत पहावा. मनुष्य शरीरात सातशे मुख्य नाड्या आहेत, त्यात तीन अतिप्रमुख आहेत. तशाच बुद्धीच्या शतशः वृत्ति या जीवदशरथाच्या स्त्रिया आहेत; त्यात शुद्धसत्वप्रधान सात्विक वृत्ति कौसल्या आहे. सत्वप्रधानराजस सुमित्रा आहे व सत्वयुक्त तामस वृत्ति कैकयी आहे. इत्यादि तेथे टीकेत स्पष्ट केले आहे.

(३) शुभ पुण्य मंगल मूर्ति – दशरथराजा व सर्व राण्या म्हणजे मूर्तिमंत पुण्य व शुभ - मंगल च. 'तुम्हिं गुरुविप्रश्रेनु सुर सेवी । तशि पुनीत कौसल्यादेवी ॥ जगीं तुम्हासम सुकृती काहीं । भूत न, नाही, होणें नाहीं ॥ पुण्य तुम्हांधिक महान कुणाचे । राजन! रामसदृश सुत ज्यांचे ॥' १/२९४।४-६. १/१८८ व १/३१० पहा.

(क) सर्व राण्या राममाता होत्या व सर्वांचे रामावर सारखेच प्रेम होते. (२) २९५ मध्ये पहा) 'प्रियमज राम तसे सर्वांप्रत' असे दशरथ म्हणाले आहेत. रामचंद्राचे सर्वांवर प्रेम असले तरी ते सापत्न मातांना अधिक मान देतात हे पुढे अयोध्याकाण्डात दिसते.

चा. ७ – (१) नमन वाङ्मने जुळुनि करांना - हात जोडणे हे कर्माने नमन आहे. 'मूलांतील करम-कर्मचा अर्थ स्पष्ट केला. नमस्कार करतो वगैरे म्हणणे हा वाचेने नमस्कार व त्यांच्या पुण्यादिकांचे चिंतन केले हा मनाने नमस्कार.

(२) मुलाच्या सेवकांवर व मित्रांवर कौसल्यादि राण्यांचे पुत्रवत प्रेम होते. 'हर्षित आशिस देइ तुम्हिं प्रिय मम सम रघुनाथ' (७/८) दशरथ व राण्या यांची महती निराळ्या प्रकारे पुढील चौपाईत सांगतात.

चौ. ८ – (१) रामलक्ष्मणभरतादि ज्यांचे पुत्र त्यांचा महिमा कोण व किती सांगणार? अशांना ज्याने उत्पन्न केले तो ब्रह्मदेव सहजच मोठा धन्य ठरतो. ब्रह्मदेव, मरीचि कश्यप (विवस्वान व मनु) अशी ही परंपरा आहे. कश्यप ब्रह्मदेवाचा नातू. त्या अवताराचेच मुख्यतः हें वर्णन आहे. हें चारी कल्पांतील दशरथादिकांस लागू आहे. म्हणून हे शतरूपावतार कौसल्येनंतर व मनु अवतार दशरथादिकांच्यामध्ये घातले, तुलसीदास स्वतःच्या कल्पाची कथा सांगतात त्यात कश्यप अदिति दशरथ कौसल्या व विष्णुराम झाले आहेत. पुढील दोह्याचा संदर्भ पूर्वीच दाखविला आहे.

हिं.सो.- बंदउँ अवध भुआल सत्य प्रेम जेहि रामपद ।
बिछुरत दीन दयाल प्रिय तनु तृन इव परि हरेउ ॥१६॥
म.सो.- वंदुं अयोध्यापाल प्रेम सत्य ज्या रामपदि ।
विरहित दीन दयाल प्रियतनु तृण सम परिहरिलि ॥१६॥

अर्थ – रामचंद्रांच्या पदांच्या ठिकाणी ज्यांचे सत्य प्रेम होते त्या अयोध्यापति दशरथराजाला मी वंदन करतो. दीन दयाळू रामाचा विरह होताच त्यांनी आपल्या प्रिय देहाचा तृणाप्रमाणे त्याग केला. ॥१६॥ (सत्यप्रेमाची प्रतीति सांगितली आहे.)
टीका – ल.ठे. मानसात चार संवादांचे मिश्रण असले तरी बाल व अयोध्या या काण्डातील मुख्य कथा शिवपार्वती संवादातील आहे, आणि त्या कथेत मनुशतरूपा दशरथ कौसल्या आहेत; म्हणून त्या दशरथांना प्राधान्य देऊन येथे पुढील कथेशी संबंध जोडला जात आहे. कौसल्येला प्रथम नमन करून नृपराण्यावंदनाचा उपक्रम केला व येथे शेवटी त्या दशरथांना वंदन करून उपसंहार केला आहे.
(१) सत्यप्रेम ज्या रामपदिं – ज्याच्यावर प्रेम असेल त्याचा विरह झाल्यावर प्राण शरीरात न राहणे हे सत्य प्रेमाचे लक्षण येथे सुचविले आहे. रामवियोगाने पीडित सीतेला रावण दटावून गेल्यानंतर सीता त्रिजटेस सांगते की 'त्यजितें तनु कर यत्न शीघ्रता । दुःसह विरहन सह्य मज अता ॥ काष्ठ आण रच चिता सजवुनी । माते! मग दे अनल लावुनी ॥ प्रीति सत्य मम कर किं...' (५/१२/२-४) देह अग्नीत समर्पण केल्यानेच प्रेमाची सत्यता ठरेल असे सीतेस वाटले. 'हें समजुनि करतें न हट मिथ्या स्नेह धरून' राम वनवासात जात असता प्राण गेले नाहीत म्हणून कौसल्या आपला स्नेह मिथ्या समजत आहे.
(२) रामपदिं – दशरथ पुत्रभावनेने वात्सल्यभावाने रामावर प्रेम करीत होते; पूर्ण माधुर्यभावाचे उपासक होते म्हणून सेवाभाव सूचक पद शब्द येथे नको होता असे वाटते. परंतु पूर्वी मनुरूपाने असता (मनु राजा) त्यांनी जो वर मागितला त्यात 'सुतभावें रति असो तव पदीं' (१/१५१/५) असेच मागणे मागितले होते. हा आणखी एक खुणेचा फार महत्त्वाचा शब्द दोन्ही ठिकाणी घालून हे अयोध्यापाल म्हणजे मनुराजाच हे पुन्हा सुचवले.
(क) वात्सल्यभावानें प्रेम करणारे पायांचे चिंतन न करता सर्व रूपाचे विशेषतः मुखाचेच चिंतन, ध्यान करतात; यामुळे शंका येण्यास जागा करून ठेवली.
(ख) पद -पद गतौ, स्थैर्य, गतिवाचक व स्थिरतावाचक पद शब्द आहे. त्यांच्या प्रेमाला रामाशिवाय दुसरी गति नव्हती दुसरे स्थान नव्हते, स्थिरता नव्हती. पद-स्थान हा अर्थ प्रसिद्धच आहे. राजपद, अधिकारपद इत्यादीत हाच अर्थ आहे. 'पदं व्यवक्षित जाण स्थान' (अमरे)
(३) विरहित दीन दयाल – यावर शंका घेतात की विश्वामित्राबरोबर राम गेले त्या वेळी मरण कसे आले नाही? तो वियोग प्राण घेऊन जाण्याइतका प्रखर

नव्हता. रामांश भरतशत्रुघ्नजवळ होते. 'जाउनि धरुं तद्गृहिं अवतारहि। रघुकुलतिलक बंधु ते चारहि' (१/१८७/५) 'अंशांसहित धरुनि देहाते । करिन चरित भक्ता सुखदातें' (१/१५२/२) तथापि मनु-देहाने मागितलेला एक प्रकार या विरहाने घडलाच. 'मणिविण फणिसम जलविण मीना। मम जीवन मिति तव आधीना' (१/१७१/६)

(क) रामवनांत गेले त्यावेळी भरतशत्रुघ्न जवळ नव्हते मग प्राण कसे नाही गेले? सुमंत्रास सांगितले होते की वन दाखवून गंगेत स्नान घालून चार दिवसांनी सर्वांना घेऊन ये, ते नच आले तर जानकीला तरी आण, म्हणजे प्राणांना काही आधार राहील. 'ना तर शेवट मरण मला ही' (२/८२/७) सुमंत्र घेऊन येईल या आशातंतूवर 'मणिविण फणि सम' प्राण राहिले होते. सीताराम अभिन्न असल्याने ती आली असती तर प्राण गेले नसते. मानसात असंबद्धता कोठेच नाही.

(४) प्रियतनु – परिहरिलि - (क) देह सर्वांनाच प्रिय असतो 'सर्वांप्रिय तनु परमा' (५/२२/४) त्यातही ज्या देहाने रामप्राप्ति, रामप्रेमलाभ; रामदर्शन लाभ होतो तो तर अतिशयच प्रिय वाटणार. 'रामभक्ति या तनुनें मिळाली । यास्तव मम ममता अति जडली (७/९५/७) ७/९६/४ पहा. प्रिय न तनू प्राणांहुनि काहीं' (१/२०८/४)

(ख) तृण सम परिहरिलि – गवताची काडी मोडून फेकून देण्यात दुःख, कष्ट, हानि वाटत नाहीत तसा देहत्याग वाटला. खोलीत समोर पडलेली गवताची काडी घाण, त्रासदायक, फेकून देण्यासारखी, डोळ्यासमोर नकोशी वाटणारी असते; तसा त्या देहाचा कंटाळा, तिरस्कार वाटू लागला. 'ठेवूनि काय काय तो करणे । जेणें प्रेमपण न मम पुरणें' (२/१५५/६)

सिंहावलोकन – चौ. १ मध्ये अयोध्या रामावतार क्षेत्र सांगितलें. २ मध्ये रामाचे प्रजेवरील व अयोध्येवरील प्रेम हा चरित्रभाग, ३ मध्ये सीतापरित्यागापासून अवतार समाप्तिपर्यंतचा कथाभाग उ.कां. ४.५ मध्ये रामावतार व खलकमल तुषारूनें ताटकादि खरादि व रावणादि सर्व राक्षसांचा संहार, व सोरठ्यात राज्यत्यागापासून दशरथनिधनापर्यंतचा कथाभाग सुचविला म्हणजेच अयोध्याकाण्ड कथा; एकूण या दोह्यात साती काण्डाचे विषय सुचविले, वरवर पाहणारास असे वाटत मात्र नाही. काव्यमुक्ताहारात घट्ट ओवलेले रामचरित सूत्र सहज कसे दिसेल? ते सूक्ष्मरीतीने शोधावेच लागते.

(क) रामचंद्रास प्रिय बंध अशामध्ये आता जनकराजाचा क्रम येतो म्हणून पुढील चौ. त्यांस वंदन आहे.

हिं.- प्रनवउँ परिजन सहित बिदेहू । जाहि राम पद गूढ सनेहू ॥१॥
जोग भोगमहँ राखेउ गोई । राम बिलोकत प्रगटेउ सोई ॥२॥

म.- प्रणमन परिजन सहित विदेहा । गूढ रामपदि करि जो स्नेहा ॥१॥
योग ठेविला भोगी लपवुनि । प्रगट सपदिं तो रामा निरखुनि ॥२॥

अर्थ – ज्यांचे रामचरणी गुप्त प्रेम होते त्या विदेहराजांना त्यांच्या परिवारासहित, मी प्रणाम करतो ॥१॥ त्यानी आपला योग (ज्ञान) भोगांत लपवून ठेवला होता पण रामचंद्रांस पाहताच तो प्रगट झाला ॥२॥

टीका – चौ. १ – (१) विदेहराज जनकाचे भगवत्प्रेम गुप्त होते व दशरथांचे प्रगट होते. जनक ब्रह्मनिष्ठ, जीवन्मुक्त, विदेहमुक्त म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचे सर्व परिजन व प्रजासुद्धा ब्रह्मज्ञानी होती असा अर्थ कोणी काढतात पण तो मानसातील वस्तुस्थितीशी विरोधी आहे. 'गमले नगरजनां युगबंधू। नरभूषण लोचनसुख कंदू॥' स्त्रियांना देहधारी शृंगाररसच दिसला (१/२४१/-) जनकजाति अवलोकति कैसे। स्वजन सगेप्रिय वाटति जैसे' जनकजाति-परिजन-परिवार कुटुंबातील मंडळी. जीवन्मुक्त विदेह मुक्तांच्या ठिकाणी काय सगेसोयरे याची व शृंगार रसाची भावना उत्पन्न होते? (१/२४१/२४२).

(क) पुढे जानकीला व भरतलक्ष्मणादिकांना वंदन करावयाचे आहे; त्या सर्वांनाच हे वंद्य व दशरथांच्या बरोबरीचे म्हणून येथे त्यांना वंदन करणेच उचित आहे. मा.पी. मधील शंका व्यवहार शून्यतेच्या दिसतात. उपासना दृष्टीनेसुद्धा आधीं परिवारादि आवरण देवतांचे पूजन करून मग मुख्य देवतेचे पूजन हवनादिक करण्याची एक प्रथा आहे. (गा.पु.प.प.) मानसांकातील रामार्चन विधि पहावा. नंदी, गरुड, हनुमान इत्यादींचे पूजन आधी करून मगच मुख्य देवतेचे पूजन करतात. योगमार्गात सुद्धा आधारचक्रापासून त्या त्या देवतांचे पूजन (मानसिक) करीत शेवटी सहस्त्रारात व ब्रह्मरंध्रात जावयाचे असते. (हा संहार-लय क्रम आहे.) या व पुढल्या चौपाईत सीतास्वयंवर विवाहादि बालकाण्ड कथा सुचविली.

चौ.२ – जनकांची वृत्ति सदा ब्रह्मानंदात लीन असे. येथे 'योग'चा अर्थ ज्ञानयोग असा घेणे जरूर आहे. ते सदा भोगात लीन असल्यासारखे पाहणारास वाटते. शुक त्यागी व जनक भोगी हे प्रसिद्धच आहे. 'सहज विरागरूप मम चितहि । चंद्रि चकोरासम अतिथक्कहि ॥ यास विलोकत अति अनुरागी । ब्रह्मसुखहि मन जबरीं त्यागी ॥ श्याम गौर सुंदर हे भ्राते । आनंदा आनंद हि दाते (१/२१६ पासून २१७ पर्यंत सर्व पहा). त्या ब्रह्मानंदाचा बलात्काराने त्याग करून त्यांचे मन रामरूपासक्त झाले. माझे मन सदा ब्रह्मानंदात मग्न राहत असे इत्यादि सांगण्याची पाळी आली म्हणजेच त्यांचा ज्ञानयोग, चित्तचैतन्ययोग प्रगट झाला. ज्ञानात भक्ति लपली होती ती प्रगट झाली हा भावहि स्पष्ट होतो.

## विदेह जनक मिथिलापति

आसीद्राजा निमिर्नाम इश्वाकूणां महात्मनां । पुत्रो द्वादशमो वीर्ये धर्मेच परिनिष्ठितः ॥ (बा.कां. १७/२-४) ततः पितरमामंत्र्य इश्वाकुं हि मनोः सुतम्। मनूचा पुत्र इक्ष्वाकु त्याचा बारावा मुलगा निमि. तो बापाची आज्ञा घेऊन निघाला व हिमालयाच्या पायथ्याजवळचा भाग जिंकून तिथे राज्य स्थापले. एकदा एक हजार वर्षे चालणारा

यज्ञ करण्याचे ठरवून त्याने कुलगुरु वसिष्ठांस होता बनण्याची प्रार्थना केली. परंतु पांचशे वर्षे चालणाऱ्या यज्ञाचे कर्तृत्व त्यांनी आधी स्वीकारलेले असल्यामुळे वसिष्ठांनी निमिस सांगितले की तो यज्ञ पुरा करून मग तुमच्या यज्ञास प्रारंभ करू, त्यांना निमि काहीच बोलला नाही. मौनं सम्मतिलक्षणं समजून वसिष्ठ गेले. वसिष्ठ गेल्यावर गौतमादि दुसऱ्या मुनिवरांस बोलावून यज्ञ सुरू केला. ठरल्याप्रमाणे वसिष्ठ आले तो यज्ञ चालू असलेला दिसला, तेव्हा त्यांनी निमीस शाप दिला की तो विदेह (देहरहित) होईल. निमि यज्ञमंडपात नव्हता. तो झोपलेला होता. जागा झाल्यावर त्याला शाप कळताच त्यानेहि वसिष्ठांस शाप दिला की चौकशी न करता व माझा अपराध नसता शाप दिला त्या अर्थी वसिष्ठांचा देह पण राहणार नाही. यज्ञसमाप्तीपर्यंत त्या मुनिवरांनी निमीचा देह रक्षण केला. यज्ञसमाप्ति समयी देवता आपला हविर्भाग घेण्यास आल्यावर ऋत्विजांनी प्रार्थना केली की यजमानास वर द्यावा, तेव्हा ऋषींनी देहरहित - सूक्ष्मशरीरस्थ निमीला वर मागण्यास सांगितले असता 'सयोमास्तु वियोगान्ताः' असतात. म्हणून देहधारण करण्याची इच्छा नाही, पण सर्व लोकांच्या पापण्यात रहाण्यास मला स्थान मिळावे अशी इच्छा निमीने प्रदर्शित केली, तेव्हापासून माणसांच्या पापण्या मिटू लागल्या.

निमीला संतति नव्हती म्हणून ऋषींनी त्याच्या देहाचे मंथन केले तेव्हा एक पुत्र जन्मास आला. जनन झाले म्हणून जनक नाव ठेविले, विदेहाचा मुलगा म्हणून वैदेह नाव पडले व मंथनाने झाला म्हणून मिथि नाव पडले. या वंशांतील प्रत्येक राजा ब्रह्मनिष्ठ झाला. सीतेच्या पित्याचे नाव सीरध्वज व मांडवी श्रुतकीर्तिच्या पित्याचे नाव कुशध्वज होते, मिथीपासून सीरध्वजापर्यंत दोघांना मोजून बावीस राजे झाले. प्रत्येक राजाला जनक, विदेह किंवा वैदेह म्हणण्याची प्रथा द्वापरयुगापर्यंत चालू होती; म्हणून शुकाचार्यांचे गुरु जनकच होत. ही वंशावळी वा.रा. बालकाण्ड ७१ मध्ये आहे, वसिष्ठांना पुन्हा देह कसा मिळाला हे सांगण्याची आवश्यकता येथे नाही.

जीवन्मुक्त असून भक्ति कशी करता येत होती ही शंका पोरकट आहे. ही शंका घेणाऱ्यांना उत्तरकाण्ड दो ५३ पुढील व दो ५४ अखेरपर्यंतच्या सर्व ओळी समाधानासाठी समर्पण करणे जरूर आहे. तसेच 'जिवन्मुक्तही ब्रह्मपर श्रवती त्यजुनी ध्यान॥ जे न धरिति हरिकथारति ते हृदयें पाषाण' (७/४२) 'आत्मारामाश्च मुनयो निर्ग्रन्था अजुस्त्रने कुर्वन्त्यहैतुकी भक्ति मित्यंभूतगुणो हरिः' (भाग) याचा सुधारलेला अनुवादच उ.कां. ४२ आहे.

हिं.- प्रनवउँ प्रथम भरत के चरना । जासु नेम ब्रत जाइ न बरना ॥३॥
रामचरन पंकज मन जासू । लुबुध मधुप इव तजइ न पासू ॥४॥

म.- प्रणतीं प्रथम भरत चरणांनां । वर्णवे न यद्व्रत नेमांना ॥३॥
यन्मन रामपदांबुजि राही । लुब्ध मधुप से त्यजि न जराही ॥४॥

अर्थ – ज्यांच्या व्रतनेमादिकांचे वर्णन करता येत नाही त्या भरताच्या चरणांना प्रथम वंदन करतो ॥३॥ त्यांचे मन रामचंद्रांच्या पदकमलांत मधुपाप्रमाणे लुब्ध होऊन राहते व ते त्यांचे सान्निध्य कधीं जरा सुद्धा सोडीत नाही ॥४॥

टीका – चौ. ३ (१) मागे वंदन केले ती मंडळी रामचंद्रास वंद्य होती व त्यांच्यापेक्षा वडील होती, तो एक निराळा वर्ग झाला. रामचंद्रांची उपासना सेवकादि भावानें करणाऱ्यांस, येथून पुढे वंदन करतात त्यात भरत पहिले आहेत म्हणून प्रथम म्हटले. (२) 'वर्णवे न यद्व्रत नेमांनां-'

'नंदिगावीं कृत पर्ण-कुटीर । निवसति धर्मधुरंधर वीर ॥ जटाजूट शिरिं, मुनि पटधारी । खणुनि मही घालिती कुश-हतरीं ॥ 'भरत भाव राहणि कर्तूती । भक्ति विरति गुण विमल विभूती ॥ वर्णत सकल सुकवि संकोचति । कुंठित शेष गणेश गिरा मति' ॥ 'ऐकुनि नेमा साधु संकुचित । दशा बघुनि मुनिराज हि लज्जित ॥ (२/३२४/२ पासून ३२६/४ पहा.)

ल.ठे. – भरताच्या चरणांस कमल वगैरे शब्द लावला नाही; लक्ष्मण, शत्रुघ्न, जानकी, राम इत्यादींना नमन करताना तो वापरलेला दिसतो. भरताच्या वंदनात दोन चौपायाच.

चौ.४ (१) मधुप – फुलांत बसून मध पिणारे भृंग-भृंगे. ते तेथे स्वस्थ बसून रसपान करीत असतात. येथे रामप्रेमरस विवक्षित आहे. मधुकर मध घेऊन उडून जातात; तसे मधुप करीत नाहीत. जोपर्यंत फुलांत मध मिळतो तोपर्यंतच ते तेथे राहतात. त्यांचे प्रेम फुलावर नसून मधावर असते. एका फुलातला मध संपला की त्याला सोडून जातात दुसऱ्यात. असे भरताचे मन करीत नाही. म्हणून म्हटले की 'त्यजि न जरा ही'. राम आपल्यावर प्रेम करोत न करोत त्यांच्यावर प्रेम करणे व प्रेमाचा नेम टिकविणे हे भरताचे ब्रीद आहे.

'मला कुटिल जरि राम समजले । स्वामि गुरुद्रोही जग वदलें ॥ सीताराम चरणरति अनुपम । तुझ्या कृपें वाढो अनुदिन मम ॥ न करो स्मरणा जलद जन्मभर । जल याचत पवि वर्षो प्रस्तर ॥ चातक-घोष घटे तर दूषण । प्रेम वाढता सर्व भलेपण ॥' (२/२०५/१-५) 'त्यागिति जरि मन मलिन समजुनी । जरि सन्मानिति सेवक गणुनी ॥ राम-उपानह सुशरण मजला । स्वामि राम शुभ दोष जनाला ॥' (२/२३४/१-२) हा आहे भरताचा एकांगी प्रेमाचा नमुना। (जासु- ज्याचें, पासु- सामीप्य, सान्निध्य (मा.पी. २९३ प.)

वि.सू. भरतनमनापासून 'रघुपति चरण उपासक जितके' पर्यंत चरण- वंदना हे नाव या प्रकरणास देतात; पण ते अतिव्याप्तिदोष युक्त आहे; शुकसनकादिकांच्या वंदनात चरणवंदन नाही. चरणोपासक वंदन असे नाव देणे संयुक्तिक व साधार आहे; म्हणून या प्रकरणास चरणोपासक-वंदन' असे नाव येथे दिले आहे.

हिं- बंदउँ लछिमन पदजलजाता । सीतल सुभग भगत सुख दाता ॥५॥
रघुपति कीरति बिमल पताका । दंड समान भयउ जस जाका ॥६॥
सेष सहस्रसीस जग कारन । जो अवतरेउ भूमिभय टारन ॥७॥
सदा सो सानुकूल रह मो पर । कृपासिंधु सौमित्रि गुनाकर ॥८॥

म.- वंदे लक्ष्मण पदजलजां ते । शीतल सुभग भक्त-सुखदाते ॥५॥
रघुपति कीर्ति-पताके विमले । ज्यांचे यश दंडासम बनले ॥६॥
शेष सहस्रशीर्ष जग-कारण । जो अवतरला भू-भय-दारण ॥७॥
सदा प्रसन्न असो माझ्यावर । कृपासिंधु सौमित्रि गुणाकर ॥८॥

**अर्थ –** जे शीतल सुंदर व भक्तांना सुखदाते आहेत त्या लक्ष्मणाच्या पद कमलांना मी वंदन करतो ॥५॥ रघुपतीच्या कीर्तिरूपी विमल पताकेला ज्यांचे यश दंडासारखे झाले ॥६॥ जे हजार मस्तकांचा शेष किंवा जगाचे कारण असून भूमिभयहरण (दारण-विनाश) दारन - निवारण) करण्यासाठी अवतरले - ॥७॥ ते कृपासिंधु, गुणसागर (गुणखाण) सुमित्रातनय (सौमित्रि) माझ्यावर सदा प्रसन्न असोत ॥८॥

**टीका. चौ.५-(१) लक्ष्मण –** 'लक्षण धाम रामप्रिय सकल जगा आधार । त्या गुरु वसिष्ठ ठेविती लक्ष्मण नाम उदार' (१/१९७) सर्व शुभ लक्षण संपन्न म्हणजे लक्ष्मण.

(क) जलज शब्दाने सुचविले की प्रपंचरूपी पाण्यात राहून पूर्ण अलिप्त होते. जलांत जन्मलेले ते जलज, कमल.

(ख) शीतल – लक्ष्मणाचा स्वभाव शीतल आहे असे सकृद्दर्शनी त्यांचे चरित्रावरून वाटत नाही; म्हणून कवींनी येथे प्रारंभी सावध केले आहे सर्वांना. सीता वाटेल ते वर्मी लागणारे बोलली तरी क्रोध आला नाही. शुकसारणादि रावणाच्या हेरांवर सुद्धा दया केली आहे. लक्ष्मणाची स्वतंत्रपणे उपासना केली तर ते शीतलता देऊ शकतात. व सुखही देऊ शकतात. जेथे लक्ष्मणास क्रोध आला आहे तेथे तो त्यांच्या स्वतःसाठी नसून रामप्रेमामुळे आला आहे. अनन्य, पूर्णनिष्काम, साधनहीन सेवकाच्या स्वभावाचे ते एक मर्म आहे. आपल्या स्वामींचा जरासाही अपमान वा अपराध त्यास सहन होत नाही. रामस्वभावही असाच - त्यांना भक्तापराधामुळे रोष येतो- 'भक्तांच्या अपराधा करती । रामरोष पावकि ते जळती.'

**चौ. ६- (१) रघुपति कीर्ति – बनलें –** पताका कितीहि मोठी, कितीहि मूल्यवान सुंदर निर्मल, तेजस्वी असली तरी जोपर्यंत तिला उंच दंडाचा - ध्वजस्तंभाचा आश्रय मिळत नाही तोपर्यंत ती आकाशात उंच फडकून जगाच्या दृष्टीस पडत नाही. नुसता उंच दंड (काठी) सुद्धा चित्तवेधक, नयन मनो-हर व आदरणीय वाटत नाही. वर्षप्रतिपदेला ध्वजापूजन म्हणून करतात, पण पूजा करतात दंडाचीच! बघतात मात्र त्या ध्वजेकडे व नमस्कार हात जोडून ध्वजेलाच पण मस्तक लावून दंडालाच केला जातो. असेच रामकीर्ति लक्ष्मण यश यांचे आहे. याचा अन्योन्याश्रय

संबंध आहे. परशुरामाची रेवडी उडवून विश्ववीरांच्या भरसभेत त्यांची (परशुरामाची) शक्ति व क्रोध निष्क्रिय करणे हे या दंडाचे मूळ आहे, (मानसात) शूर्पणखेचे नाक कान कापून रावणास आव्हान देणे हा आहे मध्य व इंद्रजिताचा वध हे आहे अग्र या लक्ष्मणयश दंडाचे.

(क) यासाठीच रामार्चन चंद्रिकेत म्हटले आहे. 'आदौ वाप्यन्ततो थापि... लक्ष्मणस्तु सदा पूज्यः प्राधान्येनैव नित्यशः। साफल्यं रामपूजायां यदीच्छन्तियतव्रतः' 'अज हा लक्ष्मणमनुं (मनु-मंत्र) राममंत्राज्जपंति ये॥ तयापस्य फलं नैव प्रयान्ति कुशला अपि।' आधी किंवा नंतर लक्ष्मणाचें, स्वतंत्र उपासना म्हणून पूजन नित्य करावें, तरच रामपूजन सफल होण्याची इच्छा बाळगावी. लक्ष्मणाच्या मंत्राचा जप न करता जे राममंत्र जपतील त्यांना ते कुशल असले तरी फल प्राप्ती होणार नाही.

(ख) याच भावनेने येथे लक्ष्मणाच्या वंदनांत चार चौपाया खर्ची पडल्या आहेत. वेदान्त दृष्टीने लक्ष्मण मूर्तिमंत विराग आहे व राम केवल ज्ञानस्वरूप आहेत. विमल-ज्ञानपताका फडकण्यास विमलविरागरूपी दंड आधारास नसेल तर ती निष्फळ ठरते व विरागाला ज्ञानाची जोड नसेल तर तोहि निष्फळच.

ल.ठे. कीर्ति स्त्रीलिंगी पताका स्त्रीलिंगी, हिंदीत यश पुल्लिंगी व दंड पुल्लिंगी याप्रमाणे उपमादिकांत समानलिंगांचा उपयोग मानसात सर्वत्र केला आहे. अपवाद सहेतुक आहेत. हिंदीत दोनच लिंगे. मराठीत तीन असल्याने हा नियम पाळण्याचा प्रयत्न पुष्कळ ठिकाणी यशस्वी झाला नाही.

(क) या एका चौपाईत लक्ष्मण स्वभाव व चरित्र यांचे सार भरले आहे. वाचकांनी विस्तार करून तुलना करावी. विस्तार येथे नको.

चौ.७ (१) या चौपाईच्या अर्थाविषयी अनेक मतभेद आहेत व तसे होण्यास मानसातील विरोधाभासात्मक वचने आधार सापडतात; तथापि मानसातील मिश्र रचना लक्षात आली व विरोधाभासांतील मर्म समजलें म्हणजे मतभेदांस जागा नाही; म्हणूनच हजार मस्तकांचा शेष किंवा जगाचे कारण असा अर्थ केला आहे. असे केल्याशिवाय सांप्रदायाच्या कोंडवाड्यातून सुटून मानसातील वाक्यांचा समन्वय होऊ शकत नाही.

(क) मानसात चार कल्पांच्या कथांचे मिश्रण आहे हे पूर्वी सांगितलेच आहे. विष्णु, शेषशायी नारायण व परमात्मा (ब्रह्म, राम) यांचे रामावतार होतात. विष्णु व नारायणावतार राम असतात तेव्हा शेष लक्ष्मण होतात; व परमात्मा-रामावतारात नारायणच लक्ष्मण बनतात.

(ख) केवळ शेषावतार मानण्यास विरोधी वचनें आहेत ती दिक्कुंजर 'अहि कूर्मसूकरहि। नचळो धीरें धरा नीट महि' (१/२६०/१) यात लक्ष्मणाने शेष, कूर्म व वराह यांना आज्ञा दिली आहे. लक्ष्मण शेषावतार असता तो, शेष व त्याचा आधार कूर्म व त्याचा आधार वराह यांना आज्ञा कशी देऊ शकेल? आश्रित

आश्रयास आज्ञा देणे शक्य नाही. आश्रय स्वामी सेवकास आज्ञा देऊ शकतो. शेष नारायणाचा सेवक आहे. म्हणून येथे नारायणावतार लक्ष्मण ठरतो व नारायण जगाचे कारण आहेत. असभुजभूमा नारायणाने त्यांचे अंश कृष्ण व अर्जुन यांस आज्ञा दिली आहे व त्यांनी नारायणास वंदन केले आहे. (भाग २०/८९/५९) एक उदाहरण पुरेसे आहे.

(II) दुसरा प्रकार पाहू - 'त्या लीलेचे मर्म न कोणी । जाणति अनुज न पिता न जननी' (७/७९/५) ही कथा भुशुंडी सांगत आहे. तीत नारदशापाने शेषशायी नारायणाचा अवतार राम आहेत. रामलीला रहस्य न जाणणारांत सगळे अनुज आहेत, त्यात लक्ष्मण आहेतच. त्यास मर्म कळले नाही, कारण ते शेषावतार (जीवच) आहेत. शेषावतार लक्ष्मण जगाचा आधार आहेच. कारण शेष सहस्रशीर्ष जगाचा आधार आहे.

(२) दोन्ही प्रकारांत आणखी पुष्कळ उदाहरणे आहेत पण सिद्धान्त पटण्यास १/१ पुरेसे आहे. शेष जगाचे कारण होऊ शकत नाही. 'सर्वजगा आधार' (१/२९७) असे लक्ष्मणाविषयींच नामकरणात म्हटले आहे.(२/१२) व 'जो अमित शिर्ष अहीश महिधर लक्ष्मणहि अग जग धनी' असे त्याच छंदांत म्हटले आहे. या चौपाईत महिधर शब्द गुप्त ठेवले व 'जगकारण' स्पष्ट म्हटले. वरील छंदांत लक्ष्मण शेष महीधर हा येथल्या वचनाचा 'शेष सहस्रशीर्ष' याचा अर्थ स्पष्ट केला व जगकारणचा अर्थ स्थावर जंगमाचा स्वामी (धनी) म्हणजे जगकारण हा अर्थ सांगितला. शेष विश्वाचा स्वामी-मालक-शास्ता नाही, नारायण किंवा विष्णु अगजगधनी आहेतच.

(क) मानसाधारे सिद्ध होणारा हा अर्थ न घेतल्यास 'किंवा' अध्याहृत न मानल्यास एकाचवेळी शेष व जगकारण लक्ष्मण रूपाने अवतरले असे मानावे लागेल व असे एका टीकाकारांनी मानले आहे, पण मानसातील आधार दिलेला नाही; इतर आधार दिले आहेत (मा.पी.पृ. ९६-९७ प) 'किंवा' अध्याहृत घेण्यास मानसातीलच आधार दिलेले आहेत. हा विषय दो. १८६ व १९२ च्या छंदांच्या टीकेत अधिक स्पष्ट केला आहे. मा.पी. मुद्दाम पाहून काही निःसंदेह अर्थ सापडल्यास घ्यावा.

(३) भूभयदारण — भूमीवर सर्वत्र निशाचराचे भय पसरले होते. स्वतः भूमीच भयभीत झाली होती. 'सुरकाजि जाता नृपति तनुधर दलन खल निशिचर अनी' असे रामजानकी व लक्ष्मण यांच्याविषयी वाल्मीकींनी म्हटले आहे. (२) १२६ छं.) येथे अवतार हेतू सुचविला.

चौ.८. (१) कृपासिंधु — तुलसीदासांच्या परंपरेत लक्ष्मणास रामभक्तिमार्गाचे आचार्य मानतात. व मानसात कृपासिंधु शब्द गुरु, शिव व राम याशिवाय इतर कोणास वापरलेला नाही; अपवाद फक्त लक्ष्मण व याच चौपाईत फक्त पूर्वी दिलेले रामार्चन चंद्रिकेतील उतारे पहावे.

(क) सौमित्रि – सुमित्रापुत्र, हा शब्द घालण्यात भाव हा आहे की सुमित्रेने तुम्हांस राममक्त होण्याविषयी जसा उपदेश व आशीर्वाद दिला तसा तुम्ही मला द्या, म्हणजे सौमित्र नावाची सार्थकता होईल. (२/७६ प.) 'रति नित्य अविरल अमल सिय-रघुबीर पदिं नव हो महा' असा आशीर्वाद सुमित्रेने दिला आहे.

ल.ठे. हे चार चौपायातील वंदन ईश्वरभावनेनें, उपास्यभावनेने आहे. प्रस्तावनेत 'रामसेवामूर्तिलक्ष्मण' चरित्र पहावे. आता दुसरे सुमित्रातनय, लक्ष्मण लघुबंधु जे शत्रुघ्न त्यास एकाच चौपाईत नमन करून हनुमंतास चौपाईत व दोह्यात नमन करतील.

हिं.- रिपुसूदन पदकमल नमामी । सूर सुसील भरत-अनुगामी ॥९॥
महाबीर बिनवउँ हनुमाना । राम जासु जस आपु बखाना ॥१०॥

हिं.सो.- प्रनवउँ पवनकुमार खल बन पावक ग्यानघन ।
जासु हृदयँ आगार बसहिं राम सर चाप धर ॥१७॥

म.- रिपुसूदन पदकमल नमामी । शूर सुशील भरत-अनुगामी ॥९॥
महावीर विनवूं हनुमाना । स्वयें राम करि यद्यश-गाना ॥१०॥

म.सो.- प्रणमूं पवनकुमार खल-वन-पावक बोध-घन ।
ज्याचे हृदयिं अगार करिति राम शर-चाप-धर ॥१७॥

अर्थ – शूर सुशील व भरतसेवक (अनुचर-अनुगामी) अशा शत्रुघ्नाच्या (रिपू-सूदन शत्रुविनाश करणारा) पदकमलांना मी नमन करतो ॥९॥ रामचंद्रांनी स्वतः ज्यांचे यश बाखाणले (गाइले) त्या महावीर हनुमंताला मी विनवितो ॥१०॥ खलरूपी अरण्याला जे पावका (अग्नी) सारखे आहेत, जे ज्ञानघन आहेत व ज्यांच्या हृदयरूपी घरात धनुष्यबाण धारण करणारे रामचंद्र राहतात (ज्यांच्या हृदयांत धनुर्बाणधर रामचंद्रांनी आपले घर केले आहे.) त्या पवनकुमाराला मी प्रणाम करतो ॥सो.॥

टीका. – चौ.१० – (१) रिपुसूदन – रिपु+सूदन-शत्रुघ्न-शत्रूंचा संहार करणारा. शूर धीर असेल तोच शत्रुविनाश करू शकेल. शूर असणारे सुशील असतातच असे नाही; म्हणून सुशील शब्द घातला. अनु-गामी- आज्ञाकारी-सेवक, अनुचर.

(क) शत्रुघ्नाने शत्रूंचा नाश केल्याचे वर्णन मानसात नाही; पण इतर रामायणात आहे. अति दुर्जय अशा लवणासुराचा विनाश त्याने केला व रघुनाथाच्या आज्ञेने तेथे मथुरेत आपले राज्य स्थापले आहे. रामाश्वमेधात शत्रुघ्नच मुख्य सेनापति होते; तेव्हा त्यास शंकराबरोबर युद्ध करावे लागले आहे.

(ख) शत्रुघ्नाच्या स्मरणाने शत्रुनाश होतो. 'यत्स्मरणें रिपुनाश पावतो श्रुतिविश्रुत शत्रुघ्न नाम तो' (१/२९७/८) असे नामकरणाचेवेळी वसिष्ठ म्हणाले आहेत. त्यात भगवंताच्या चक्राचा अवतार सूचित केला आहे. (टी.प.)

(२) अध्यात्मपर अर्थ – भरत शमादिषट्संपत्ति आहे व शत्रुघ्न मुमुक्षुता आहे. मोक्ष प्राप्तीची इच्छा-मुमुक्षा झाली की कामक्रोधादि महा दुर्धर रिपूंच्या विनाशाच्या मार्गास जीव लागतो. लागले पाहिजे. शमदम तितिक्षा श्रद्धा उपाय समाधान रुपी भरताची सेवा सेवन केल्याशिवाय शत्रुनाश- कामादिरिपुनाश करता येत नाही, म्हणजेच भरतानुगामी बनावे लागते. विस्तार बा.कां. ३२६ छं. ४ च्या टीकेत पहावा. वैराग्य लक्ष्मण, शमादिषट्क भरत व शत्रुघ्न मुमुक्षता यांना विवेक हनुमंताचे साह्य असले तरच शान्ति सीता व ज्ञानराम वनवासातून परत देह अयोध्येत येऊन यांना भेटतात व हृदय सिंहासनावर आरूढ होतात. म्हणूनच आता पुढे हनुमंतास प्रार्थना व नमन करतात.

चौ. १० – (१) महावीर – या शब्दाने अतुलितबलधामं (५ मं. ३) सुचविले. हनुमंताची महावीरता मुख्यतः सुन्दरकाण्ड पूर्वार्धात (शिवकांचीत) व लंकाकाण्डात प्रगट आहे.

(क) हनुमान – हे मुख्य नाव आहे. 'मारुत सुत मी आहे वानर। हनुमान मम नाम कृपाकर ॥' (७१२/८)

(ख) माकडांना हनु- हनुवटी नसते; पण जन्मल्याबरोबर सूर्यबिंब गिळले म्हणून इंद्राने वज्रप्रहार केला त्यामुळे ओठाच्या खालच्या बाजूस हनुवटी तयार झाली म्हणून हनु-मान (हनु असलेला वानर) नाव पडले. हे नाव जन्मानंतर प्राप्त झालेल्या वरांच्या योगाने मिळालेले अतुलदेहबल व असामान्य बुद्धिबल सुचविणारे आहे.

ल.ठे. जेथे मानसात हनुमान शब्द वापरला असेल तेथे या दोन गोष्टी सुचविलेल्या आहेत असे समजावे व यातील एकतरी तेथे दिसेलच, (नाव सांगण्याचे प्रसंग सोडून).

(२) स्वयें राम – यशगाना – 'ऐक कपि तुजसम उपकारी। नहि कुणि सुर नर मुनि तनुधारी ॥ करुं तव केवीं प्रत्युपकारा। मम मन कुंठित करित विचारा ॥ श्रृणु सुत! अनृण तुझा मी नाही। करुनि विचारा बघत मनां ही। (५/३२/५-७) 'मजला तू प्रिय लक्ष्मण दूणें' (४/३/७) येथे या चौपाईनें हनुमंताचे सुंदरकाण्डातील चरित्र सुचविले. प्रार्थना कशासाठी केली ते येथे सांगितले नाही पण पुढील दोह्याच्या ६ व्या चौपाईत सर्वांनाच विनवितात की कृपा करा. मानसात हनुमान सीता वगैरेंच्या अवतारांची कथा स्पष्टपणे वर्णन केलेली नाही. हनुमान शब्दाने 'स्वर्णशैलाभ देहं' (५ मं. ३) सुचविले.

दो. १७ सो. (१) तुलसीदासांच्या चरित्रात हनुमन्तकृपेचे कार्य पुष्कळच आहे म्हणून त्यांनी आपली कृतज्ञता नाना प्रकारांनी अनेक ठिकाणी सुन्दर काव्यकलेने प्रदर्शित केली आहे. मागल्या चौपाईत विनंतीच्या निमित्ताने वर्णन केले; व येथे वंदनाच्या निमित्ताने करतात. पूर्वी मंगलाचरण श्लोक ४ मध्ये वंदन केलेच आहे. पवनकुमार शब्दातील कुमार शब्दाने नित्य कुमारदशा सुचविली जाते असे कोणी

म्हणतात; मग अक्षयकुमार, वालिकुमार इत्यादींना पण तसेच मानावे लागतील, म्हणून तो भाव चुकीचा आहे.

ल.ठे. जेथे पवनतनय, पवनसुत वगैरे शब्द वापरले असतील तेथे पावनतेचा प्रसार, पावनतेची उत्पत्ति यांचा संबंध पुढे किंवा मागे असलाच पाहिजे हे निश्चित समजावें, यास अपवाद नाही. पवन- पावन करणारा (वायु.)

(२) **खलवनपावक** – दाहक म्हटले नाही. आपल्या तेजाने, दाहकशक्तीने पावन करणारा म्हणून पावक. लंकेत शोध करीत असता व लंका दहनाच्यावेळी ज्या ज्या घरात किंवा घरावर हनुमान गेले त्या सर्वांना मंदिर म्हटले आहे. 'दनुजवनकृशानुं' (५ मं.श्लो.३)

(क) **बोधघन** – ज्ञानघन, विज्ञान धाम, विशुद्धविज्ञानी (बा.मं.श्लो.४) **'ज्ञानिनामग्रगण्यम्'** (सुं.मे.३) (१) येथे अशी शंका घेतली जाते की ज्ञानी सर्वत्र समबुद्धि असतात, मग हनुमान ज्ञानवान असून त्यांनी राक्षसांचा विनाश कसा केला? समबुद्धिविनाश झाला की नाही? ही शब्दज्ञानींची शंका आहे. उत्तर हेच की नाही, निश्चितपणे नाही. 'हत्वाऽपि स इमाँ लोकान् न हन्ति न निबध्यते' (भ.गी.) हे भगवंतानीच स्पष्ट सांगितले आहे. जनकविदेहीने सुद्धा युद्ध केले आहे. यापेक्षा जास्त चर्चेचे हे स्थान नव्हे. 'प्रणमूं पवनकुमार' शब्दांनी 'वातजातंनमामि' (सु.मं.३) सुचविले.

३. **ज्याचे हृदयिं अगार** – अगार- गृह-घर-वसतिस्थान हा शब्द संस्कृत आहे. हिन्दीत आगार आहे. अन्य रामायणात हनुमन्ताने आपले हृदय फाडून त्यात असलेले धनुर्धर राम बिभीषणास दाखविले आहेत; ती घटना येथे सुचविली आहे. तसेच रघुपति-प्रियभक्तं हे विशेषण (सु.मं.३) पहा.

(क) अतुलित बलधामं स्वर्णशैलाभदेहं दनुजवनकृशानुं ज्ञानिनामग्रगण्यम्। सकलगुणनिधानं वानराणामधीशं रघुपति प्रियभक्तं वातजातं नमामि' येथील सोरठयात प्रणमूं पवनकुमार (वातजातं नमामि) आरंभी आहेच श्लोकांत शेवटी आहे. बाकीच्या विशेषणांचा क्रम येथे सुद्धा अगदी श्लोकातील क्रमानुसारच आहे. फक्त दोन विशेषणे येथे स्पष्ट नाहीत. त्यातील सकलगुण निधानं-हनुमान शब्दाने सूचित होते. व बा.कां.मं.श्लो. ४ मध्ये कपीश्वर = वानराणामधीशं आहेच. याप्रमाणे त्या श्लोकातील सर्व विशेषणे येथे घालून हनुमंताचे सुंदर काण्डातील सर्व चरित्र सुचविले आहे. अशी कला कोणी कुठे पाहिली आहे काय? सु.कां.मं.श्लोक ३ ची टीका पहावी म्हणजे आणखी आश्चर्य वाटेल.

४. **शंका** – येथे दोनदा नमन का केले असे कोणी विचारतात; पण बिनवीं = विनवितो म्हणजे नमन होते काय? विनयपत्रिका नाव असलेल्या ग्रंथात स्तुतीच आहे. तशी येथे चौपाईत स्तुति प्रार्थना केली व नंतर नमस्कार केला. आधी स्तुति-प्रार्थना, मग नमस्कार व नंतर तीर्थप्रसाद ग्रहण असाच क्रम असतो व असला पाहिजे. पुढे ६ व्या चौपाईत 'कृपा प्रसाद मागतील 'कृपा करा' म्हणतील.

ल.ठे. येथील हनुमंताच्या स्तुती व नमनात चरण आणि कमल हे दोन्ही शब्द नाहीत. याने दासमारुती सुचविला. आणि ध्वनित केले की असे अष्टगुण संपन्न असून सदा रामरायापुढे हात जोडून विनयाने उभे असतात. दासमारुतीची पूजा आधी असली तरी त्या रूपाची उपासना करीत नाहीत, त्या मूर्तीच्या चरणांचे ध्यान करीत नाहीत. म्हणून चरण आणि कमल हे शब्द नमनात नाहीत. प्रार्थना मुखाकडे अवलोकन करीत करणेच श्रेयस्कर असते म्हणून चौपाईत चरण शब्द नाही. तेथे प्रतापमारुती व वीरमारुतीचे वर्णन दिसते. महावीर प्रथम आहे व नंतर हनुमान प्रताप सूचक आहेच.

(५) भरताच्या चरणांना कमल शब्द न लावता शत्रुघ्नांच्या नमनात पदकमल वापरून सुचविले की रामभक्तापेक्षा रामभक्ताचे भक्त-सेवक- अधिक श्रेष्ठ जसे रामदास रामाहुनि मोठे हे पुढे स्पष्टच सांगितले उपसंहारात. तसा हा सिद्धांत उपक्रमात सुचविला. 'भक्तदास भक्ताहुनि मोठे'। असे ठरले. 'साहेब ते सेवक बडो जो निज धरम सुजान' (दोहावली ६२८) भरत स्वामी व शत्रुघ्न अनुगामी सेवक असा संबंध आहेच.

ल.ठे. लक्ष्मणाला एवढे महत्त्व देण्याचे आणखी एक कारण आताच रामार्चन चंद्रिकेत पूजाविधीत सापडले. प्रथमावरणात रामचंद्राच्या उजव्या बाजूस सखा म्हणून लक्ष्मण व डाव्या बाजूस शक्ति म्हणून सीता यांचे पूजन आहे. व चतुर्थावरणात हनुमान, सुग्रीव, भरत, बिभीषण, लक्ष्मण, अंगद, शत्रुघ्न व जांबवान यांचे सेवक म्हणून पूजन आहे. यातील भरत लक्ष्मण शत्रुघ्न यांना नमन करून नंतर हनुमंताला केले. आता शेष चौघांना पुढील चौपाईत वंदन आहे. ते सेवक असले तरी हात जोडून सदा रामसेवातत्पर नाहीत. रामावतारातच नव्हे तर आजहि जेथे कुठे राममंदिर असेल तेथे समोर किंवा क्वचित बाजूस हात जोडून पवनकुमार सतत उभे आहेतच. लक्ष्मण उजव्या बाजूस असतातच; पण भरतशत्रुघ्न राममंदिरात फारच क्वचित दिसतात (पट्टाभिषिक्तराम-मंदिरातच).

हिं.- कपिपति रीछ निसाचर राजा । अंगदादि जे कीस समाजा ॥१॥
बंदउँ सबके चरन सुहाए । अधम सरीर राम जिन्ह पाए ॥२॥
रघुपति चरन उपासक जेते । खग मृग सुर नर असुर समेते ॥३॥
बंदउँ पद सरोज सब केरे । जे बिनु काम राम के चेरे ॥४॥

म.- कपिपति रीस-निशाचर-राजा । अंगदादि सब कीश समाजा ॥१॥
वंदे शुभचरणीं सर्वांना । प्राप्त राम ज्या अधम तनूनां ॥२॥
रघुपति चरण-उपासक नाना । खग मृग देव दनुज मनुजांना ॥३॥
नमितो पदसरसिजि सर्वांचे । जे अकाम किंकर रामाचे ॥४॥

अर्थ. – कपिपति-सुग्रीव, रीसराजा जांबवान, निशाचर राजा- बिभीषण, अंगद व सर्व वानरसमूह यांच्या शुभ पायांना मी वंदन करतो; (कारण) त्या सर्वांचे देह अधम असून सुद्धा त्यांना रामाची प्राप्ति झाली. ॥१,२॥ खग (पक्षी) पशु (मृग), देव दानव (असुर) व मानव जे कोणी (जेते-जितके) रघुपतीचे चरणोपासक झाले व जे कोणी रामाचे कामनारहित दास झाले. (असतील वा होतील) त्या सर्वांच्या चरण कमलाना मी वंदन करतो ॥३,४॥

टीका.- चौ. १.२ (१) – हनुमान कपिपतीचा सेवक असुन सुद्धा त्याचा महिमा सुग्रीवापेक्षा मोठा आहे हे मंगलाचरणात कपीश्वर (कपिरूपाने ईश्वर, शंकर) व सुं.कां. मंगलाचरणांत वानराणामधीशम् या उल्लेखानी मानसातच स्पष्ट सांगितलें आहे म्हणून शंकेला जागा नाही. रामपूजेत चतुर्थावरणास हनुमदादि आवरणम् असे म्हणून सेवकात श्रेष्ठच ठरविला आहे. तथापि तुलसीदासानी सुग्रीवादि चौघांचा मान चरण शब्दाने राखला आहे.

(क) यात तीन राजे व एक युवराजा (अंगद) आहे. हनुमंताला सीतारामांनी पुत्र ठरविल्यामुळे रामचमूपैकीं (कपिसैन्यापैकी) हनुमदादि पाचांचीच नांवे येथे सुचविली. प्रत्यक्ष नाव हनुमंताचेच आहे येथे. हे वानर राक्षस व ऋक्ष असुन प्रातः स्मरणीय आहेत. 'श्रीरामंचहनुमन्तं सुग्रीवंच विभिषणम्। अंगदं जाम्बवंतंच स्मृत्वा पापैः प्रमुच्यते' (ब्रह्मयामले) 'नाम आमचे घेति (मर्कटांचे) सकाळीं। त्यां त्यादिनि न अहार कपाळी' असे हे होते (५/७/८) 'कपिचंचल सब रीती हीनही।' अधम असा मी' हे हनुमंताचे वचन आहे. बिभीषण म्हणतो 'तामस तनु अणु साधन नाही.' (५/७/३) भजन घडेना तामस देहे'

(२) शुभचरण – सुंदर, मंगलमय; कारण ब्रह्मदेवाने सुद्धा म्हटले की, 'कृतकृत्य विभो सब वानर हे। निरखीति तवानना सादर हें! (६-११ छं.९) 'मम हितार्थ इहिं जन्म वेचला । भरता हुनि हे प्रिय अति मजला' (७/८/८) 'जीव भक्तिमान नीच जरि महा । प्राणप्रिय मज बाणा मम हा.' (७/८६/१०)

(क) अधम तनुनां – पंचभूतमय देह आधीच अधम, त्यात पशु, त्यात अति कामी, असे असता, योगयाग, जपतपादि नाना साधने करणाऱ्या मुनीनासुद्धा जी दुर्लभ ती भगवत्प्राप्ति यांस सुलभ झाली. 'जन्मजन्म मुनि झिजति साधनीं। अंती राम न येत आननीं' यानी आपल्या नीच देहांनी प्रत्यक्ष भगवत्सेवा केली. 'मत्कर्मकृत मत्परमः' 'कर्मयोगेन चा परे' (भ.गी.) सांख्य, योग, ध्यान इत्यादि काही साधन केले नाही. भाव हा की देह उच्च नीच. अधमाधम कोणता का असेना ज्यात भगवत्प्राप्ति व भगवद्भक्ति लाभ होईल तो वंद्य ठरतो. "मम सहित शुभ ही कीर्ति तुमची गाति जे प्रेमे अति । संसार सिंधु अपार पार कि अश्रमें नर पावती' (६/१०६/छं) ज्यांच्या कीर्तिगायनाचे हे शुभ, कल्याणमय फल मिळते ते स्वतः किती शुभ, मंगलमय, कल्याणमय असतील हे ठरवावे. ल.ठे. यांच्या नमनात सुद्धा

कमल शब्द नाही कारण हे भरताच्या पंक्तीत रामपूजेत येतात. भरताच्या चरणांना कमल शब्द लावला नाही.

चौ. ३-४ (१) मागील दोन चौपायात चरणसेवकांना वंदन केले; यात चरण उपासकांना केले आहे. जे प्रत्यक्ष रामसेवकात नाहीत अशांना हे वंदन आहे.

(क) रघुपति व राम हे शब्द वापरून दशरथनंदन राम म्हणजेच सगुणसाकार स्वरूप सुचविले.

(ख) खगमृगमनुज यांनी मृत्युलोक, देव (सुर) याने स्वर्गलोक व दनुज (असूर) याने पाताळ लोक सुचविला. भाव हा की त्रैलोक्यात जे कोणी चरणोपासक - सगुणभक्त झाले, असतील वा होतील त्या सर्वांच्या चरण कमलांना नमन केले आहे.

(ग) दोहा सातमध्ये 'देवदनुज नर नाग खग' इत्यादिकांना वंदन केले आहे. पण ते सर्वांनाच केले आहे. येथे त्यातीलच रघुपति उपासकांना केले; म्हणूनच त्या सर्वांत यांचे महत्व अधिक आहे हे दाखविण्यासाठी, पदसरसिज (सरोज) शब्द वापरला व हे सर्व आम्हास उपास्य आहेत हे सुचविले. प्रल्हाद दानव, त्याने केलेली नृसिंहस्तुति, गजेंद्र पशूने केलेली स्तुति, जटायु खगाने केलेली स्तुति आजसुद्धा कल्याणकारक ठरतात व ब्राह्मण सुद्धा त्यांना वंदन करतात. 'दासांवर मम अधिका प्रीती' असे रामच म्हणाले आहेत.

(२) हे खगमृगादि कोण याविषयी निष्कारण मतभेद आहेत म्हणून थोडा विस्तार करणे भाग आहे. येथे उपासक हा शब्द स्पष्ट असल्याने 'चित्रकूटचे विहग मृग वेलि विटप तृणजाति' घेता येत नाहीत. ते राम दर्शनानेच मुक्त कृतकृत्य झाले. चित्रकूटच्या मार्गावरील ज्या जीवजंतूंना रघुनाथाने पाहिले किंवा ज्यांनी रघुनाथांस पाहिले 'ते सब परमपदा अधिकारी' झाले असले आणि 'भरत बघत गत भवरुजभारी' असे घडले असले तरी ते उपासक म्हणजे चरणध्यानादि करणारे नव्हते म्हणून त्यांचा समावेश येथे होऊ शकत नाही.

(क) खग – जटायु, काकभुशुंडी व गरुड. जटायु - 'स्मरत रामपदि अंक असति ते' (३/३०/१८). काकभुशुंडी 'पिप्पलतलि तो ध्याना बसतो' इत्यादि (७/५७ मध्ये पहा.) गरुडाबद्दल सांगण्याची आवश्यकताच नाही.

(ख) मृग – पशु, मारीच कपटमृग बनून उपासनाच करीत होता. 'श्रीसहित अनुजासह कृपानिधि-चरणि मन लावेन मी' 'निर्वाणदायी क्रोध ज्यांचा भक्ति अवशा वश करी' (३/२६/छं) गजेंद्र प्रसिद्धच आहे.

(ग) देवामध्ये बृहस्पति देवगुरु. यांनी देवांना अनेकवेळा राम व भरतभक्तीचे धडे देऊन भरताचे स्मरण इत्यादि करण्यास सांगितले आहे.

(घ) दनुज, असुर – प्रल्हादाचे उदाहरण प्रसिद्ध आहे. खरादि चौदा हजार 'राम राम म्हणता मरती पावति पदनिर्वाण' (३/२०) तसेच लंकेतील युद्धात - 'त्यांचे रामाकार होइ मन मुक्त सकल तुटलें भवबंधन' (६/११४/७) 'उमे राम मृदुमन करुणाकर । 'मज रिपुभावे स्मरति निशाचर'। असे समजुनी देति

परमगति' (६/४५/४-५) बलि वगैरे झालेच. यात बिभीषणाला घेता येणार नाही; त्याला पूर्वीच वंदन केले आहे. कुंभकर्णसुद्धा रघुपति-चरण-उपासक होताच. 'जाउनि सुफल करिन नयनाला । श्यामगात्र सरसीरुह लोचन । जाउन बघतो त्रितापमोचन ॥ रामरूपगुण आठवित प्रेममग्न पळ एक' (६/६३/७- ८).

दो. – (ङ) नरांमध्ये- गूहक, त्याचा सेवक नावाडी, भरद्वाजांचे चार शिष्य मार्गदर्शक झाले ते; इत्यादि मानसातच आहेत. पुढील दोन चौपायात सनकादि ज्ञानीभक्तास वंदन करतात.

ल.ठे. कौसल्या दशरथ जनक क्रमाने खालच्या खालच्या व्यावहारिक मोठेपणानुसार वंदन करीत आले ते मागल्या (१.२) या चौपायांत समाप्त झाले. तेथून पुन्हा आरोहक्रमास प्रारंभ केला. मागल्या चौपायांतील खगमृगादिकापेक्षा सनकादिक मोठे आहेत, व्यावहारिक जगात, हे मान्य करावेच लागेल.

हिं.- सुक सनकादि भगत मुनि नारद । जे मुनिबर बिग्यान बिसारद ॥५॥
प्रनवउँ सबहि धरनि धरि सीसा । करहु कृपा जनजानि मुनीसा ॥६॥

म.- शुक सनकादि भक्त मुनि नारद । जे मुनिवर विज्ञान -विशारद ॥५॥
नमुं सकलां शिर ठेवुं धरणिवर । करा कृपा जन जाणुनि मुनिवर ॥६॥

अर्थ – मुनिश्रेष्ठ असुन विज्ञान विशारद असून जे भक्त आहेत त्या श्रीशुकाचार्य सनक, सनंदन, सनातन, सनत्कुमार व नारद (इत्यादि) सर्वांना मी मस्तक महीवर ठेवून (लाऊन) नमस्कार करतो. मुनिश्रेष्ठ हो! मला सेवक जाणून माझ्यावर कृपा करावी ॥५-६॥

टीका. – ब्रह्मनिष्ठ असून भगवद्भक्त असणाऱ्या अत्यंत प्रसिद्ध मुनींचा येथे स्पष्ट उल्लेख करून त्या कोटीतील सर्वांना वंदन केले आहे. यांना जमिनीवर डोके ठेऊन म्हणजे साष्टांग नमस्कार करण्याचे कारण हेच की हे सर्व भगवान रामकृष्ण राम व कृष्ण यांना सुद्धा पूज्य वंद्य होते. अरण्यकाण्डात नारद भेटीस आल्यावर लक्ष्मणाने त्यांचे पाय धुतले आहेत व प्रभूंनी स्वागत करून जवळ बसविले आहेत. उत्तरकाण्डात सनकादि चौघे दर्शनास आले असता 'करिति दण्डवत राम जैं मुनि येतां दिसतात' (७/३२) रामचंद्रांनी त्यास दंडवत नमस्कार केला आहे. शुकाचार्य द्वापर युगात झाल्याने रामचरित्रात त्यांचा संबंध आला नाही. अगस्ति, वाल्मीकी, मार्कंडेय, लोमश, वामदेव, जाबालि, कात्यायन, विश्वामित्र, वसिष्ठादि सर्व यांच्या पंक्तीत बसण्यासारखेच. सर्वांची नावे देणे अशक्य असल्याने ज्ञानीभक्तांचे तीन प्रकार येथे उदाहरणार्थ घेतले. ही नावे अशीच किंवा क्रम बदलून मानसात आली आहेत. 'नारदादि सनकादि मुनीश्वर' 'शिव अज शुक सनकादिक नारद' 'शुकसनकादि भक्त मुनि योगी' इ.इ. यात हे दिसते की यांच्या नावाचा शंकरासुद्धा सर्वत्र एकक्रम नाही; मात्र शुकसनकादि हा क्रम सर्वत्र आहे.

(क) शुकाचार्य द्वापरातले व सनकादि ब्रह्मदेवाचे पहिले मानस पुत्र असे असता शुकाचा उल्लेख प्रथम का? अशी शंका येणे स्वाभाविक आहे व तिचे उत्तरहि आहे; पण तो भेद दाखविणे म्हणजे सनकादिकांचा, ज्यांना शुकाचार्यांचे गुरु जनक वंदन करीत असत त्यांचा कमीपणा दाखविणे आहे. शिवाय मानसातील वचनाधारेच वरील शंकेचे समाधान होईल. 'शिवअजशुक सनकादिक नारद' असे शिव एकदा आधी आहेत व 'शुकसनकादि शंभुमनभावनि' यात शुकसनकादि शिव-शंभु-यांच्या आधी आहेत. तेव्हा शुकसनकादिकांचा उल्लेख शंकराच्या आधी का असे विचारले तर काही सयुक्तिक उत्तर देता येणार नाही. वृत्ताच्या सोईसाठी व अनुप्रास सौंदर्यासाठी कित्येक वेळा शब्दक्रम ठेवला जातो. शिवाय शुक सनकादि यात सनकादिकाकडून उलट क्रम घेतला म्हणजे ते श्रेष्ठ ठरतातच. असे उलट सुलट क्रम मानसातच आहेत. 'मायपितागुरु या शिर नमती' (१/२०५/७) 'गुरुपितु मातु महेसभवानी' पित्यापेक्षा माताश्रेष्ठ असल्याने पहिल्या उदाहणात मातेकडून उतरता व दुसऱ्यात गुरु-पिता माता असा चढता क्रम आहे. तसाच शुक सनकादि यात चढता क्रम आहे आणि नारद सनकादिकापेक्षा श्रेष्ठ असल्याचे प्रमाण मानसात आहे. 'बाखाणिति सनकादिनारदा। ब्रह्मनिरतमुनि जरी सर्वदा ॥' (७/४२/७) याचे कारण हरिभक्तीत नारद सनकादिकांपेक्षा श्रेष्ठ असल्याने सनकादि 'गुण परिसुनि विसरुनी समाधिहि श्रवति परम सादर अधिकारिहि' (७/४२/८) अशा प्रकारे नारदमुखाने हरिगुणश्रवण करतात; म्हणून नारद त्यांना वंद्य आहेत. म्हणून 'शुकसनकादि भक्त मुनिनारद' असा चढता क्रम आहे. शुक वैराग्य प्राधान्य, सनकादिक ज्ञान प्राधान्य आणि नारद भक्ति प्राधान्य असलेले असे हे ज्ञानी भक्तांत तीन वर्ग दाखविले. 'शुक त्यागी' म्हणून प्रसिद्ध आहेतच.

## श्री शुकाचार्य

शुक हे कृष्णद्वैपायन व्यासांचे पुत्र, पूर्व जन्मात ते शुक- पोपट होते. शंकरांनी पार्वतीस सांगितलेली गुह्यात गुह्यतम अशी अमरकथा त्यांनी पोपटाच्या जन्मात ऐकली होती. त्यामुळे अमर झाले. जन्म झाल्याबरोबर तत्काळ वनात निघून गेले. मुंज सुद्धा झाली नाही की आईबापांना विचारले सुद्धा नाही; इतके जन्मताच निर्मम होते. सदा आत्मसुख संतुष्ट दिगंबर अवधूत वेष; पण अत्यंत कोमल, तेजः पुंज व लावण्य संपन्न, आजानुबाहु, सोळा वर्षांच्या वयाचे, अत्यंत निरपेक्ष स्थितीत वनात विहार करीत राहिले. व्यासांना पाहिल्यावर विवस्त्र स्त्रियांनी वस्त्रे धारण केली पण आपल्याला पाहिल्यावर त्या स्त्रियांना काही वाटले नाही. याचे कारण व्यासांच्या ठिकाणी भेदभाव आहे व शुकाच्या ठिकाणी नाही असे त्यांनी सांगितल्यावर थोडा अहंकार उत्पन्न झाला. पुढे विदेह जनक त्यांचे गुरु झाले तेव्हा तो अहंकार गेला. एकदा अगस्तिशिष्य 'अहोबकीयं स्तनकालकूट जिघांसयाऽपाययदप्यसाध्वी । लेभे गतिं धात्र्युचितां ततोऽन्यं कंवा दयालु शरणं व्रजेम' हा भागवतांतील श्लोक

म्हणत असता शुकाने ऐकला तेव्हा तपास करून ते व्यासांकडे गेले. त्यांच्याजवळ श्रीमद्भागवत श्रवण केले व तेव्हापासून ते भक्त बनले. त्यांनीच परीक्षितीला भागवताचा उपदेश केला. यांच्या ज्ञानवैराग्याची कल्पना शुकरंभा संवाद-काव्यावरून येते. कामदेवाच्या भयाने यांनी बालरूप धारण केले नाही किंवा कोणास शाप दिला नाही. देवर्षि, ब्रह्मर्षि, राजर्षि वगैरे शुकाचार्यास उत्थान देत असत. 'येथे काही चाड नाही वयाची.' गुणा- पूजास्थानं गुणिषु नच लिंग नच वयः' (भाग.१/१९ पहा)

## श्रीसनकादि चौघे

हे भगवंताच्या चोवीस अवतारात गणले जातात. ब्रह्मदेवाने घोर तपश्चर्या केल्यावर सनक सनन्दन, सनातन व सनत्कुमार हे चौघे ब्रह्मदेवाचे मानसपुत्र म्हणून प्रगट झाले. पूर्वकल्पाच्या प्रलयकाळी नष्ट झालेल्या आत्मज्ञानाचा यांनी फारच सुंदर उपदेश केला. तो श्रवण करताच मुनींना आत्मसाक्षात्कार झाला. हे सनकादि मरीचि वगैरे अन्य मानसपुत्रांच्या पूर्वीचे होते. तरी ते नेहमी पाच सहा वर्षांच्या बालकरूपात रहात असत, (जणू काय कामविकार उत्पन्न होण्याच्या भीतीनेच).
'सनकादिक मुनिवर । तेजपुंज गुण शील शुभ अती ॥'
ब्रह्मानंदिं सदा लय लीन । बघतां बालक, बहुकालीन ॥ जणू रूप धर चारी वेदहि । समदर्शी मुनि विगत विभेदहि ॥ दिशा वसन; हे व्यसन तयांप्रति । रघु पतिचरित कथिति तिथं ऐकति ॥ होते हे सनकादि भवानी! । मुनिवर कुंभज जेथें ज्ञानी ॥ रामकथा मुनिवर बहुवर्णी' (७/३२/३-८) आकाशमार्गाने वाटेल त्या लोकांत जात असत. हे ब्रह्मलोकांत राहतात. यांनी प्रजोत्पत्ति केली नाही. यांनीच वैकुंठाच्या जयविजय या द्वारपालांना क्रोधाने शाप दिला. ते शापित जयविजयच एका जन्मात रावणकुंभकर्ण झाले आहेत, व त्या कल्पात त्यांच्यासाठी विष्णु अवतार राम झाले आहेत.

हिं. - **जनकसुता जग जननि जानकी । अतिसय प्रिय करुनानिधान की ॥७॥**
**ता के जुग पद कमल मनावउँ । जासु कृपाँ निरमल मति पावउँ ॥८॥**
म.- **जनकसुता जगजननि जानकी । कृपानिधाना-प्रिय अतिशय की ॥७॥**
**तिचे विनवितो युग-पद-कमलां । जिचे कृपे मति पावुं निर्मला ॥८॥**

अर्थ. — जनकाची मुलगी, जगताची जननी (जगत् - भूतल आहे जननी जिची) ती जानकी. जी कृपा (करुणा) निधान - रामचंद्रास अतिशय प्रिय आहे. (जिला कृपानिधान रामचंद्र अतिशय प्रिय आहेत) ॥७॥ तिच्या दोन्ही चरण कमलांना मी विनवितो; कारण की तिच्या (जिच्या) कृपेने मला निर्मल मति प्राप्त होईल. ॥८॥

टीका. चौ. ७ (१) जनकसुता जगजननि — (क) जनकसुता - जनकाला जानकी व उर्मिला या दोन मुली होत्या. जानकी जमिनीत सापडलेली मोठी मुलगी.

(ख) जगजननि — जगाला उत्पन्न करणारी, जगन्माता. जग म्हणजे भूतल आहे जननी जिची असा अर्थ घेतला की तिची अवतार कथा सूचित केली जाते व अयोनि संभवत्वही सुचविले जाते. 'जगती लोको भुवन विष्टपं जगम्' इति पंच भूतलस्य' (अ.व्या.सु.)

(ग) मंगलाचरणात 'उद्भवस्थिति संहार कारिणी-' इत्यादीने तिच्या अवतारी स्वरूपाचे कथन केले व येथे अवतार सुचविला. (मं.श्लो.५ टी.प.) एका कल्पात नारदाच्या शापाने महालक्ष्मी सीता- जानकी रूपाने अवतरली आहे. एका कल्पात लक्ष्मीचा अवतार जी वेदवती तिचा अवतार आहे. स्कंदपुराणात ब्रह्मविद्येचा अवतार वर्णिली आहे. कल्पभेदानुसार हे भेद असले तरी सीता- जनकसुता, भूकन्या यात भेद नाही. क्वचित महाळुंगातून उत्पन्न झाल्याचे वर्णन आहे. 'मातुलिंगोभ्दव' म्हटले आहे.

(घ) जननि शब्दाने क्लेशहारिणी आहे हेहि सुचविलेच. आपल्या प्रिय अपत्याचे क्लेश, रोग हरण करण्याचा प्रयत्न जननी - जन्मदा माता जितके करते तितके पिता करीत नाही. आपल्या अपत्याच्या हितासाठी जनक- पिता कठोर, विरोधकही होऊ शकतो; तितके वात्सल्यमूर्ति आईला होता येत नाही.

(२) जानकी — मंत्रशास्त्र दृष्टीने अर्थ होतो तो — जानकी = ज + आ, न अ क् ई. जकार - कृत्यादि नाशकर दुर्धर्ष, आकार - आकर्षणात्मक सर्वगत; नकार भुक्तिमुक्तिप्रद शान्त; अकार - मृत्युंजय सर्वव्यापक; ककार-सर्वविषहर कल्याणद; ईकार-वाक् प्रसादकर निर्मल. हे सगळे जिच्याजवळ आहे ती जानकी. कर्माचा नाश करणारी; अति दुर्धर्ष, जीवाला प्रभुचरणांकडे आकर्षित करणारी; भोग व मोक्षदायक, अगदी शान्त; सर्वव्यापक व मृत्यूला जिंकणारी- मृत्यूपासून सोडविणारी; सर्व विषयविषांचे हरण करणारी, व कामक्रोधांपासून सोडवून कल्याण करणारी, वाचेच्या ठिकाणी प्रसाद स्फूर्ति इ. सद्गुण निर्माण करणारी व मायामलविहीन निर्मल आहे. (अक्षमालोपनिषद). म्हणूनच तुलसीदास तिच्याजवळ निर्मलमति मागत आहेत व तेवढ्यासाठी विनवीत आहेत. याप्रमाणे मं.श्लोकांतील सर्व विशेषणे येथे आली; फक्त रामवल्लभा राहिलेने 'कृपानिधानाप्रिय अतिशय' याने स्पष्टच सांगितले आहे.

(३) जानकी शब्दाचा आणखी एक अर्थ — 'जायते इतिजनः, जनश्च असौ कः आनन्दःच जनकः म्हणजे जायमान-उत्पन्न होणारा-आनन्द. तस्य अपत्यं स्त्री, त्याची सुता = जानकी म्हणजे आनन्दाकार वृत्ति. हिलाच चिदानंदलहरी असे श्रीमदाचार्यांनी सौंदर्यलहरी ग्रंथात म्हटले आहे. 'जानकी'चा हा अर्थ जगद्गुरु भारतीकृष्णतीर्थ मठ पुरी यांनी केलेला आहे. आदिशक्तीलाच सौंदर्यलहरीग्रंथात चिदानंदलहरी म्हटले आहे. 'भजन्ति त्वां धन्याः कतिचन चिदानन्दलहरीम्' (श्लो.८)

(४) ही प्रार्थना करताना तुलसीदासांची भावना कशी होती हे त्यांच्या एका पदावरून कळेल. 'कबहुँक अंब अवसर पाइ ॥ मेरिऔ सुधि द्याइबी कछु करुन कथा चलाइ ॥१॥ दीन सब अंगहीन छीन मलीन अघीअघाइ। नाम लै भरै उदर एक प्रभुदासी-दास कहाइ ॥२॥ बूझिहैं 'सो है कौन' कहिबी नाम दसा जनाइ। सुनत राम कृपालु के मेरी बिगरिऔ बनि जाइ ॥३॥ जानकी जगजननि जनकी किये बचन सहाइ। तरै तुलसी दास भव तव नाथ गुन गन गाई ॥४॥

अर्थ – आई! केव्हातरि समय साधून एखाद्या करुणकथेच्या निमित्ताने माझी सुद्धा आठवण प्रभूंना करा हो! की एक दीन सर्वसाधनहीन मलीन दुर्बळ, पण पक्का पापी मनुष्य आपल्या दासी तुलसीचा दास म्हणवून आपले नाम घेत पोट भरतो आहे. मग प्रभु कृपेने विचारतील की तो कोण आहे? तेव्हा माझे नाव व माझी दशा त्यांच्या कानावर घालावी. कृपालूनी ती ऐकली की माझी बिघडलेली सर्व दशा सुधारेल. हे जगजननी जानकी! जर अशा प्रकारे या तुलसीदासाला केवळ वचनाने साह्य केलेत तर हा दास आपल्या पतीच्या अनेक गुणांचे गान करून भवसागर तरून जाईल. (वि.पत्रिका ४१) या पदांतही जगजननि जानकी शब्दच आहेत.

चौ. ८ (१) बिनविती – मनावउँ, मनाना म्हणजे स्तुती करणें, विनविणे, येथे नमस्कार नाही तो दोह्यांत दोघांना एकदम आहे. हनुमंतालाही आधी विनवून मग नमस्कार केला आहे. शिवाय पुढील चौपाईत रघुनायकास वंदन आहेच. दोघे अभिन्न आहेत हे दोह्यात सांगणार असल्याने रघुनायक वंदनात तो येतो असे मानावे किंवा नमस्कार अध्याहृत आहे असे मानावे. हा दुसरा पक्षच या लेखकास अधिक ग्राह्य वाटतो. कारण मंगलाचरणात रामवंदनाच्या आधी सीतेला वंदन केले आहे.

(२) निर्मलमति – दोहा १४ त 'तें न होइ बिण बिमल मति' असे जे व ज्या कारणासाठी म्हटले त्याच्यासाठीच येथे निर्मल म्हणजे विमल- मति च मागत आहेत. फरक एवढाच की द्या असे न म्हणता तुमच्या कृपेने मिळेल असे म्हटले. प्रिय बालकाला काय पाहिजे हे समजले म्हणजे प्रेमळ जननी न मागताच देते हा जननीस्वभाव कवीला माहीत आहे. कृपा कशी करावयाची हे मागील पदाने स्पष्ट होते.

हिं.- पुनि मन बचन कर्म रघुनायक । चरन कमल बंदउँ सब लायक ॥९॥
राजिव नयन धरें धनु सायक । भगत बिपति भंजन सुखदायक ॥१०॥

म.- तन मन वचनिं अतां रघुनायक । चरण-कमल वंदे सब लायक ॥९॥
राजिवलोचन धृत-धनुसायक । भक्तविपद भंजक सुखदायक ॥१०॥

अर्थ – आता, ज्यांचे नेत्र कमलासारखे आहेत, जे भक्तांच्या विपत्तींचा विनाश करून त्यांस सुख देतात, ज्यांनी धनुष्य बाण धारण केले आहेत व जे सर्वप्रकारे

समर्थ (लायक) आहेत त्या रघुनायकाच्या चरणकमलांना मी मनाने, वाणीने व शरीराने (कर्माने) वंदन करतो ॥९,१०॥ (अर्थ करताना क्रम नेत्रांपासून पायापर्यंत असा ठेवला आहे.)

टीका – (१) आता म्हणजे जानकीमातेला प्रार्थनापूर्वक नमस्कार केल्यावर. सुचविले की साधकाने असाच क्रम ठेवावा. अगदी घरचाच वशीला असला म्हणजे कार्य लवकर होते.

(क) मनाने नमस्कार म्हणजे चरणांचे किंवा ऐश्वर्याचे चिंतन करीत, येथे ऐश्वर्याचे वर्णनच जास्त आहे, म्हणून हे स्वरूपाभिनिवेश-वंदन आहे. (१४ प्रा.पहा) वाणीने वंदन म्हणजे ऐश्वर्यादिकांचे वर्णन करीत, नमस्कार करतो असे म्हणणे व शरीराने वंदन म्हणजे हात जोडून किंवा साष्टांग नमस्कार वगैरे करून.

(२) सर्व लायकभक्तांच्या सर्व इच्छादि पूर्ण करण्याचे सामर्थ्य असलेले म्हणजे सर्वसमर्थ. 'मत्स्वभाव मुनि तुम्हा ठाउका। काहिं कधीं भक्तासि लपवु का। प्रिय अशि वस्तु हि मला कोणती । मागु शका ना मुनि आपण ती ॥ जनां अदेय नसे मम काही' (३/४२/३-५) तथापि जोपर्यंत मोक्षाची किंवा इतर कोणतीही कामना असेल तोपर्यंत शुद्धभक्तिचिंतामणि मिळणार नाही. अयोध्याकाण्डात नाविक, अरण्यात सुतीक्ष्ण, किष्किंधेत तारा, सुंदरात हनुमान व बिभीषण, लंका-कांड-अंगदास त्याने न मागता; उत्तर-कां-वेद, शंकर, वसिष्ठ, भुशुंडी आणि बालकांडात अहल्या व जनकराजादि. यांनी जेव्हा प्राणांपासून मोक्षापर्यंत व मोक्षसुद्धा मागितला नाही तेव्हा प्रेमभक्ति मिळाली-दिली-आहे.

(३) राजिव लोचन – हे लावण्याचे लक्षण आहे. याचा व 'भक्तविपद् भंजन'चा संबंध जोडला म्हणजे अर्थ होतो की आपल्या कृपादृष्टीनेच भक्तविपत्तीचा विनाश करतात.

(क) धृत धनुसायक'शी संबंध जोडला की कृपाळूपणाने 'परित्राणाय साधूंनां विनाशाय च दुष्कृतां' धनुष्यबाण धारण केले आहेत असा अर्थ निघतो.

(४) भक्तविपद्भंजक – भक्तांची मोठी विपत्ति म्हणजे भजन न घडणें 'म्हणे हनु प्रभु तीच विपत्ती। स्मरण भजन तव यदा न घडती' (५/३२/३) आणि अविद्या व तिचे कार्य ही तर फारच मोठी विपत्ति आहे. ती भजन-स्मरणादिकाची अनुकूलता व सुमति देऊन भक्तिनेच निवारण करतात 'सत् हरिभजन, जगत् स्वप्नासम'.

(क) भक्तीवाचून सुख नाही 'ती मम भक्ति भक्त सुखदाई' (३/१६/२) 'रघुपति भक्ति विना सुख नाही' (७/१२२/१४) हे अत्यंत दुर्लभ सुखसुद्धा देतात मग इतर सुखे सुखाने देतील यात नवल काय? 'रामसदा सेवक रुचि रखिति'.

(ख) आता दोह्यांत सीतारामास वंदन करून हे वंदन प्रकरण समाप्त होईल. 'वर्णानामर्थ संघानां' यात अभिन्न रूपाने वंदन केले त्याचा उपसंहार या चार चौपायात केला.

हिं.दो.- गिरा अरथ जल बीचि सम कहिअत भिन्न न भिन्न ।
बंदउँ सीता रामपद जिन्हहिं परम प्रिय खिन्न ॥१८॥
म.दो.- गिरा अर्थ जलवीचि सम म्हणती भिन्न न भिन्न ।
वंदे सीता-राम पद परम जयां प्रिय खिन्न ॥१८॥

अर्थ – वाणी व तिचा अर्थ आणि पाणी व त्याच्या लाटा ही जशी बोलण्यातच भिन्न आहेत पण तत्वतः भिन्न नाहीत त्याप्रमाणेच असणाऱ्या सीतारामांच्या पदांना मी वंदन करतो; त्यांना दीन (खिन्न) परम प्रिय असतात. ॥१८॥

टीका. (१) गिरा अर्थ – गिरा-वाणी-भाषा; शब्द उच्चारला की त्याचा अर्थ त्या शब्दांतच असतो. त्यांच्या उच्चारातच असतो, त्याहून निराळा-भिन्न-असत नाही. पण कित्येक वेळा शब्द समजतो पण त्याचा अर्थ उच्चाराबरोबर समजत नाही असे घडते. यावरून शब्द व अर्थ एकरूपहि आहेत व भिन्नरूपहि वाटतात. ज्याला कळते त्याला एकरूप अनुभवास येतात. ज्याला असा अनुभव येत नाही तो भिन्न म्हणतो. असाच संबंध सीताराम यांचा आहे. जाणणारांना अभिन्न दिसतात. अज्ञानी भिन्न म्हणतात. 'वागर्थाइव संपृक्तौ वागर्थप्रतिपत्तये...' यातील अधोरेखांकित शब्दांनी पार्वतीपरमेश्वरी यांच्या विषयीं येथील सिद्धान्तच सुचविला आहे. (क) पूर्वी जानकीला जगजननी म्हटल्याने कदाचित वाटेल की एकटीच स्वतंत्रपणे जगनिर्मिती वगैरे करते. असे वाटू नये म्हणून येथे ही चर्चा केली. पदार्थाचे ज्ञान शब्द व अर्थ यांनी मिळून होते. शब्द कळला पण अर्थ कळला नाही तर कोणता पदार्थ हे कळणार नाही. 'मातुलिंग आण' हे शब्द ऐकल्यातर काय पाहिजे याचा बोध फारच थोड्यास होईल. 'माहळुंग आण' असे म्हणताच फारच थोड्यास अडचण भासेल. म्हणजेच शब्दार्थाशिवाय व्यवहार अशक्य! पण शब्द म्हणजे वाणीच नसेल तर अर्थ प्रगटच होणार नाही; म्हणजे येथे शब्द मुख्य आहे. वाणी-सीता मुख्य हे सुचविले. पण अर्थ माहीत असल्याशिवाय शब्दांची योजनाही योग्य रीतीने करता येणार नाही; म्हणून सीता मुख्य म्हणता येत नाही. हा जो या दृष्टांतातील दोष तो काढून टाकण्यासाठी व दोघांची समता दाखविण्यासाठी दुसरा दृष्टांत-

(२) जलवीचि सम – हिंदीत जल पुल्लिंगी आहे व वीचि स्त्रीलिंगी म्हणून येथे प्राधान्य रामाला दिले व सीतेला वीचि-लाट ठरविली. पूर्वी गिरा-सीता प्रथम व अर्थ-रामनंतर उल्लेख केला. दोन्ही मिळून सांगितले की कोणी मुख्य नाही कोणी गौण नाही. दोन्ही एकच आहेत. लाट म्हणजे पाणीच. दिसण्यात निराळी दिसते इतकेच; पण जलावरच लाट असू शकते तसेच सीतेचे भिन्न अस्तित्व रामावरच अवलंबून आहे. म्हणजे रामाच्या आधारानेच जानकी जगनिर्मिती करू शकते. (क) लाट भिन्न वाटली तरी पाणीच आहे. अभिन्न कळली तरी पाणीच आहे. तसे ब्रह्माच्या अधिष्ठानावर दिसणारे मायारूप सीतारुप जग-विश्व ब्रह्मच आहे. बालक लाटेला भितात त्यांना दुःख होते. जाणती माणसे लाटेत हात घालून पाणी ओंजळीत

घेऊन पितात व तृषा शमन करतात. असाच फरक जगाच्या संबंधात अज्ञानी व ज्ञानी यांच्यात आहे.

(ख) दोन दृष्टांतांनी प्रकृति पुरुष यांचे ऐक्य-अभिन्नता दाखविली; व जग म्हणजे ब्रह्मावरील आभास आहे; पण ते ब्रम्हच आहे जसे जल व लाट. 'वाचारम्भणं विकारो नामधेयं मृत्तिका इत्येव सत्यम्' या श्रुतीचाच हा विस्तार येथे आहे.

(ग) या दोह्यांत भिन्न न, भिन्न अशी पदें पाडली की द्वैत्यांचे सिद्धान्त प्रगट करता येतात. सर्वमत संग्रहाचे हे एक ठळक व महत्त्वाचे उदाहरण आहे. अमृतानुभवांतील पहिले प्रकरण पहावे व 'न घटत उद्भवः प्रकृतिपुरुषयोरजयोः' हा वेदस्तुतीतील (भाग. १०/८७/३१) श्लोकावरील श्रीधरी टीका किंवा वेदस्तुतिकीर्तनभास्कर' यात त्या श्लोकाचे सविस्तर निरुपण पहावे. दोन्ही भिन्न असून समान आहेत असे भेदवादी म्हणतात. "वदुं जाणुं दे त्यां काय करणें भेद मति असणारकी ॥ हे जाणुनी प्रज्ञा सदा भज सुखद रघुवरजानकी" जो संबंध जलवीचीने येथे सांगितला तोच सीतेने प्रभा-प्रभाकर, चंद्र-चंद्रिका या दृष्टान्तानीं सांगितला आहे.

मुख्य वंदन प्रकरण येथे समाप्त झाले.

# राम नाम-वंदन

मागील १८ दोह्यांच्या प्रकरणात गणेशसरस्वती-वंदनापासून सीतारामवंदना पर्यंतच्या वंदन प्रकरणांत कोणाला वंदन केले नाही असे नाही; तथापि या कविताकुमारीचे जे मुख्य विभूषण वस्त्र राम- नाम त्यालाच तेवढे वंदन करावयाचे हेतुपूर्वक ठेवले आहे. मागील वंदन प्रकरणात वंदनाच्या निमित्ताने ज्याप्रमाणे संत खल इत्यादींचा स्वभाव व प्रभाव वर्णन केला त्याप्रमाणेच या नामवंदनाच्या नऊ दोह्यांच्या प्रकरणात नामस्वभाव व प्रभाव यांचे सांगोपांग निरुपण केले आहे. तुलसीमानसातील नामनिरुपणासारखे सर्वांगपूर्ण नाम निरुपण कोणत्याही एका ग्रंथांत नाही. ब्रह्म व राम यापेक्षाही नाम श्रेष्ठ आहे व रामसुद्धा नामगुण वर्णन करू शकत नाहीत हे शेवटी सांगितले आहे. या प्रकरणात सुद्धा गूढ पुष्कळ आहे.

हिं.- वंदउँ नाम राम रघुबर के । हेतू कृसानु भानु हिमकर के ॥१॥
म.- वंदे नाम राम रघुवरचे । हेतु कृशानु भानु हिमकरचे ॥१॥

अर्थ -- रघुवराचे नाम जे राम त्याला मी वंदन करतो; ते कृशानु (अग्नि) भानु- सूर्य व हिमकर (चंद्र) याचे कारण (हेतू) बीज आहे.

टीका – (१) पहिल्या चरणातील प्रत्येक शब्द व त्याचे स्थान बदलता येणे शक्य नाही अशी रचना आहे. वन्दे कोणाला? नामाला; कोणते नाम, राम हे नाम, राम तीन आहेत व निर्गुणराम व सगुणनिराकार राम पण आहेत. हा अतिव्याप्ति दोष टाळण्यासाठी सांगितले की रघुवराचे नाम 'राम.'

(क) वंदे राम नाम-असा पाठभेद आहे; परंतु वंदे राम हे शब्द कानी पडताच रामाला वंदन करावयाचे आहे 'वंदे नाम' याने मुख्य प्रतिपाद्यविषय नामवंदन आहे हे समजते; म्हणून प्रचलित पाठच योग्य आहे.

(२) रघुवर शब्दांत दोन रकार आहेत. र हे अग्निबीज आहे. अग्निनाडी जी सुषुम्ना तिला शुद्ध करण्याचे कार्य दुप्पट करू शकेल. यात उकार आहे तो शत्रुघ्नबोधक आहे. अ लक्ष्मण सूचक आहे; व हे अमृतबीज आहे जसे म हें चंद्रबीज अमृतमय आहे, म्हणून म = व; 'म' बीजभरतप्रतिपादक आहे. घ वर्ण सौभाग्यप्रद आहे. 'अ- काराक्षरसंभूतः सौमित्रिर्विश्वभावनः। उकाराक्षर संभूतः शत्रुघ्नंस्तैजसात्मकः॥ प्राज्ञात्मकस्तु भरतो मकाराक्षरसंभवः॥' (रा.उ.ता.उ.) याप्रमाणे एक, एक अ उ व एक व् मिळून भरत लक्ष्मण शत्रुघ्न झाले. बाकी राहिले वर्ग र + आ = रा. हें रामबीज आहे. घकाराने सांगितले की हे चौघे सौभाग्यप्रद आहेत. या प्रमाणे प्रथम चरणच घेतला की चौघांच्या नावाना वंदन सिद्ध होते. रघुवर शब्दाने चारी बंधूपैकी कोणाचाही बोध होतो. 'मायामानुष रुपिणौ रघुवरौ'

असे रामलक्ष्मणांना म्हटले आहे. (४ मं. १) या विवेचनावरून ठरते की तु.दासाचे मंत्रशास्त्रपरिभाषेचे ज्ञान चांगलेच होते. गूढार्थ भरून ठेवणाऱ्या प्रतिभेची प्रतीति येथे मिळते.

(३) राम व रघुवर शब्द घालून हेहि दाखविले की या रामावताराच्या पूर्वी अनेक कल्पें ज्या राम नामाचा जप शंकर करीत असत ते राम- नाम व दशरथनंदन रघुवर यांचे राम हे नाम एकच आहेत; त्यात भेद नाही. परशुराम व बलराम यांचा अंतर्भाव होऊ नये म्हणून रघुवर शब्द पाहिजे होताच. 'राम' शब्दाने तिघांचा ही उल्लेख केलेला सापडतो- मत्स्यः=कूर्मो वराहश्च नारसिंहश्च वामनः। रामो रामश्च रामश्च कृष्णःकल्की चतेदश' यातील तीन राम शब्दानी परशुराम, रघुपतिराम व बलराम यांचा निर्देश क्रमशः केला आहे. (प.पु.उ.खं. २२९/४) यात दशावतारात बौद्धावतार गणलेला नाही. 'एक राम तों अयोध्येशसुत। संसारी तच्चरित्र विश्रुत' ॥ ... 'प्रभु तो राम कि अपर कुणि ज्या जपती त्रिपुरारि' (१/४६) या भरद्वाजांच्या शंकेनेच रामचरित्र मानस कथेचा प्रारंभ झाला आहे. अशी शंका येऊ नये म्हणून येथे 'वंदे नाम राम रघुवरचे' असे सांगून ठेवले.

(४) 'नाम राम' असे म्हणून रामाला प्राधान्य देण्याने दोघांहुनी (ब्रह्म व रघुनाथ राम) 'गुरु नाम मम मते' या दो.२३ मधील सिद्धान्ताचे बीज पेरून ठेवले.

(क) 'राम' शब्द महावाक्य आहे, 'आद्यो रा तत्पदार्थः स्यात् मकारः त्वंपदार्थवान्। तयोः संयोजनमसीत्यर्थे तत्त्वविदो विदुः' (रा.र.उ.) 'तत्त्वमस्यादि वाक्यंतु केवलं मुक्तिदं नृणाम्। भुक्तिमुक्ति प्रदंच्यतत्तस्मादधतिरिच्यतेः' (रा.र.उ. ५/१३) तत्त्वमस्यादि महावाक्ये केवळ मोक्ष देतात; पण राम महावाक्य असून भोग व मोक्ष दोन्ही देते म्हणून त्याहून हे श्रेष्ठ आहे. दो. २२-२५ चे बीज यांत आहे.

(ख) 'नाम राम' म्हणण्यात हा भाव आहे की रामनामानुगामी आहेत. दो. २१ मधील चौपायांचे बीज यात आहे.

(ग) रामसहस्रनामांत हजार नामे रकारादि व मकारादीच का याचे शास्त्रीय विवेचन पुढील चरणात आहे. पण आणखी आधार - 'जपतः सर्ववेदांश्च सर्वमंत्रांश्च पार्वति। तस्मात्कोटिगुणं पुण्यं रामनाम्नैव लभ्यते' (प.पु.) श्री राम नाम नमो होतत्तारकं ब्रह्म नामकम्। नाम्नां विष्णोःसहस्राणां तुल्यम् एष महामनुः - महामंत्रः - महावाक्य, (हारीत) 'रामरामेति रामेति रमे रामे मनोरमे। सहस्रनामतत्तुल्यं रामनाम वरानने' (प.पु.उ. २५४/२२).

(५) या नामालाच वंदन का? याचे उत्तर अगस्त्य संहितेतीलच देणे चांगले. 'सर्वेषु मंत्रवर्येषु श्रेष्ठं वैष्णवमुच्यते। गाणपत्येषु शैवेषु शाक्तसौरेष्वभीष्टदम्॥ वैष्णवेष्वपि सर्वेषु राममंत्राः फलाधिकाः। विनैव दीक्षां विप्रेन्द्र! पुरश्चर्यां विनैव हि। विनैव न्यासविधिना जपमात्रेण सिद्धिदाः॥' असा मंत्र फक्त 'हरे राम हरे राम... हरे हरे' हा बत्तीस अक्षरी मंत्र आहे; पण फार मोठा. येथे तर 'दोचि अक्षरांचे काम। उच्चारावे राम राम.'

(क) दीक्षेची जरूर नाही त्याचप्रमाणे राममंत्रांना प्रणवाची अपेक्षा नाही; राम शब्दच प्रणवस्वरूप आहे; (अग.सं.) हे पुढे चौपाईनेच स्पष्ट होईल.

(ख) मग मंत्रोपदेश व दीक्षाविधि रामार्चनचंद्रिकेत का सांगितला? अनधिकारी गुरूकडून म्हणजे ज्याने मंत्रचैतन्य जागृत केले नाही अशाकडून मंत्रोपदेश घेणे व न घेणे दोन्ही सारखेच. अधिकारी गुरूकडून मंत्र मिळाल्यास अनेक वर्षे रोज अनेक तास जप करून जे मिळत नाही ते मंत्र चैतन्य अगदी थोड्या काळात व अल्प श्रमाने मिळते; दीक्षासमयापासुनच अनुभव येऊ लागतात व त्यामुळे विश्वास वाढत जातो. तत्काळ काही अनुभव न आल्यास एका वर्षात तरी (यथोपदिष्ट पथ्यादि पाळल्यास) आलाच पाहिजे; अन्यथा गुरु किंवा शिष्य कोणीतरी एक अनधिकारी आहे असे निश्चित समजावे. अधिक विस्तार वेदांतसार - अभंगरामायणात पहावा. (प्रज्ञानानंदकृत)

चरण दुसरा - (१) हेतु — कारण किंवा बीज. 'हेतुर्वा कारणं बीजम्' (अमरे) येथे मंत्रपरिभाषा असल्याने बीज हा अर्थच घेणे जरूर आहे.

(क) कृशानु- अग्नि, अग्निबीज 'र' आहे. म्हणजेच 'र' या अक्षरांतून अग्नीची तेजाची उत्पत्ति होते. याची प्रतीति कोणीही स्त्रीपुरुष घेऊ शकतील, हे अनुभव घेण्याचे शास्त्र आहे. स्वस्तिकासन किंवा पद्मासन घालून ताठ सरळ बसावे; व बेंबीकडे लक्ष ठेऊन 'रं रं रं जोराने व दीर्घ उच्चार एका श्वासात करता येईल तेवढा करावा, याप्रमाणे सतत अर्धा तास करावे म्हणजे बेंबीच्या ठिकाणी आग आग होऊ लागेल. ५/१० मिनिटांपेक्षा जास्त वेळ कोणास करवले नाही इतकी आग होऊ लागली असा अनुभव आलेला आहे. या प्रयोगाने क्षुधा वाढते 'प्रतीतिवीण बोलणें । ते अवघे चि कंटाळवाणे । तोंड पसरून जैसें सुणें । भुंकून गेले ।' (दासो.) असे हे नाही.

(ख) जड शरीरात जशी ही उष्णता वाढते तसाच वैराग्यरूपी अनल याने सूक्ष्मदेहांत उत्पन्न होतो. 'तापयि अनल अकाम बनवुनी' अकामता म्हणजेच वैराग्याचे मूळ व पूर्ण निष्कामता म्हणजेच परम विराग. 'यन्नामहि पावक अधतूला' (२/२४४/२) 'रकारोऽनलबीजं स्याद ये सर्वे वाऽवादयः। कृत्यामनोमलं सर्वं भस्म कर्म शुभाशुभम्' (म.रा. ५२/६२ मा.पी.) प्रथम रकाराने पापदहन होते; नंतर निष्कामतेला प्रारंभ होऊन तिचेच रूपांतर पूर्णवैराग्यात होते. 'रश्च रामेऽनिलेवन्है भूमावपि धनेऽपिच' (ए.को.)

(ग) भानु बीज — आहे-भानुबीज येथे ग्रहण करणें योग्य कारण भानु शब्दात आ आहे म्हणूनच तो येथे घेतला आहे; नाहीतर रवि शब्दांत अ आहेच. अ, आणि आहीं दोन्हीं सूर्यबीजे असल्याचे उल्लेख आहेत. 'अकारो भानुबीजंस्याद वेदशास्त्रप्रकाशकम्' नाशयत्येव तद्दीध्या याऽविद्या हृदयेतमः' (म.रा. ५२/६३ मा.पी.) 'रुद्रोग्निरुच्यते रेफो, विष्णुः सोमोम उच्यते। तयोर्मध्ये गतो ब्रह्मा आकारो रविरुच्यते' (एकाक्षर कोष मा.पी.) रेफ र हे अग्निबीज किंवा र हें अग्निबीज;

असे दोन्ही पाठ उपलब्ध आहेत. र + अ. रा, र् + आ - रा. (I) सूर्य उदयास आला म्हणजे जसा सर्व अंधार पळतो तसा सूर्यबीजाने (अ, आ) विद्येचा प्रकाश पडून अज्ञान, अविद्या तम जातो. 'सर्वहिमोहानिशे निजणारे' महामोहतमपुंज', 'भ्रमतम-रविकर वचन मम.' रामनामांतील अ किंवा आ या सूर्यबीजाने हळूहळू आत्मज्ञान प्राप्ति होते, अग्नीच्या ठिकाणी तेज, दाहकत्व मुख्य आहे; सूर्याच्या ठिकाणी प्रकाश मुख्य आहे; तथापि दोहोंत दाहकत्व आहेच. त्याचे शमन करण्यास शीतलतेची आवश्यकता आहे, ती चंद्राकडून मिळते.

(घ) **हिमकर** — हिम करणारा - शीतल करणारा, किंवा शीतकिरण असणारा चंद्र 'निशिं शशि शरदातपा पिटाळी' मकार चंद्रबीज आहे. मः शिवश्चंद्रमा वेधाः (ए.को.) हे चंद्रबीज फक्त हिमकर शब्दांत स्पष्ट आहे. जसा आ भानुमध्ये व रेफ कृशानुमध्ये आहे. तिन्ही नामें सबीज आहेत म्हणून वापरली आहेत आणि यामुळेच हिमकर शब्द मराठीत वापरावा लागला व हिमकरचे असे म्हणावे लागले 'बीज म्हणजे कारण हा अर्थ विसरू नये म्हणजे कुशंका उत्पन्न होणार नाही. चंद्रशीतल, सुधामय, प्रसन्नतादायक, ताप निवारक आहे. हे सर्वगुण बीजातून उत्पन्न होतात. अशीच सुधामय भक्ति आहे. याप्रमाणे राम नामातील तीन बीजे वैराग्य, ज्ञान व भक्ति देतात.

२. (क) अग्नीच्या साह्याने शरीर पोषणादि, शरीररक्षणादि कार्यें होतात; म्हणजे ऐहिक सुख देण्याची शक्ति त्यांच्यात आहे. 'श्रियमिच्छेत् हुताशनात्' 'रश्व रामेऽनिले वन्हौ भूमौ. अपि धनेऽपिच' र म्हणजे भूमि आणि धन; म्हणून या गोष्टी सुद्धा मिळू शकतात. म्हणूनच पूर्वी दाखविले की रामनाम भोगमोक्षदायक आहे.

(क) सूर्य आत्मा जगतः तस्थुषश्च (सु.उ.) तसेच ज्ञान सर्वाधार आहे. सूर्यावाचून जीवन अशक्य. सूर्यामुळेच पर्जन्य, जल, अन्न इत्यादि ऐहिक लाभ होतात तसे सूर्यबीजही देऊ शकते. चंद्राने औषधींचे पोषण होते. 'पुष्णामि चौषधीः सर्वाः सोमो भूत्वा रसात्मकः' (भ.गी.) मकार सोमबीज रसमय-भक्तिरसमय भक्तिरसप्रदायक आहे पण चंद्राप्रमाणेच ऐहिक लाभ ही होऊ शकतात, म्हणूनच श्रुतिमाता म्हणते की राम नाम 'भुक्तिप्रदंनृणां' - आता योगदृष्टीने विचार करू.

(३) र अग्नि, आ-सूर्य व म चंद्र आहे. अग्निनाडी सुषुम्ना, सूर्यनाडी पिंगला व चंद्रनाडी इडा आहे. इडा आणि पिंगला यांनी म्हणजे डाव्या व उजव्या नाकपुडीतून क्रमशः प्रहरा प्रहराने पूर्ण निरोगी माणसाचा श्वास चालतो. इडा व पिंगला यांच्यामध्ये सुषुम्ना आहे. सुषुम्ना म्हणजे दोन्ही नासारंध्रांतून एकाचवेळी श्वास चालणे; हे सुषुम्ना नाडी जागृत व क्रियाशील होण्यावर अवलंबून आहे. सर्वनाड्या कंदातून निघतात. वरील तीन मुख्य नाड्या पाठीच्या कण्याच्या आत आहेत. या तिहींचा संगम आज्ञाचक्रात (भ्रूमध्यांत) होतो. हेच त्रिकूट स्थान (त्रिकूटपर्वत), हीच त्रिवेणी. राम नाम जपाने सुषुम्ना शीघ्र जागृत होते व मग पारमार्थिक प्रगति

सुकर होते. रामनाम जपाने (योगाभ्यास न करता) योगफल सहज मिळते. सहस्रारात अग्नि, सूर्य, अर्धचंद्र व पूर्णचंद्र यांचे स्पष्ट दर्शन होते. (प्रकाश दीपिका, नाथमहाराज व सोलीवसुख-समर्थ, पहा.) ज्याच्यासाठी खेचरी मुद्रेचा अति कष्टद अभ्यास करतात पण सहसा सिद्ध होत नाही तो तालुस्राव व अमृतस्राव सहज मिळू लागतो-रामनामाने. हा तुलसीदासांचा स्वतःचा अनुभव त्यांनी या एका चरणात सुचविला आहे. 'रति रुचि वदे प्रतीति मनाची' (२३/३) या वचनाने वरील विधानास पुष्टि मिळते.

(क) 'राम'चे रूप राँ हें रामबीज आहे. मोऽनुस्वारः अलोपश्च याने राँ सिद्ध होते. हा एकाक्षर राममंत्र आहे. वि.सू. याहून अधिक विस्तार शास्त्राधार पाहिजे असतील त्यांनी मा.पी. मध्ये पहावे. तेथे मोठी संपूर्ण आठ पृष्ठे भरली आहेत; तथापि कितीही विवेचन केले तरी ते अपुरेच. 'नामचिंतामणि' (कामतांचे) पुस्तक पहावे. जिथे स्वतः 'राम नामगुण गाउं न शकती' तिथे प्रज्ञानानंद पामराने किती सांगावे? पुढील चौपाईत आणखी थोडे तात्त्विक निरूपण करतात-

हिं.- **विधि हरिहरमय बेद प्रान सो । अगुन अनूपम गुननिधान सो ॥२॥**
म.- **विधिहरिहरमय वेद-प्राण तें । अगुण अनूपम गुणनिधान तें ॥२॥**

**अर्थ** — ते रामनाम ब्रह्मविष्णुमहेशमय जो वेदप्राण म्हणजे प्रणव-ओंकार तो आहे; व ते गुणरहित व अनुपम गुणांचे निधान आहे ॥२॥ (ओंकारासारखे आहे.)

**टीका** — (१) याचा आणखी एक अर्थ हिंदीत होतो. याचे कारण सो म्हणजे सारखा व तो असे दोन अर्थ हिंदीत आहेत. सारखा हा अर्थ घेतला म्हणजे प्रणवासारखे आहे. हा पहिल्या चरणाचा अर्थ होतो. दुसऱ्या चरणात सो = तो - तें असाच अर्थ आहे. मराठीत अशा दोन अर्थांचा एक शब्दच नाही. तो अर्थ घेतला म्हणजे रामनाम विधिहरि हरिमय वेद प्राण आहे असा अर्थ होतो. हा अर्थ रामनामांतून प्रणवाची उत्पत्ति झाली हे सिद्ध करण्यास उपयोगी पडतो. व प्रथम जो अर्थ दिला आहे त्याने रामनाम व प्रणव यांचे रामानत्व सिद्ध होते; हाच अर्थ घेणे उचित आहे.

(क) राममधून प्रणवाची उत्पत्ति व ओमधून 'राम'ची उत्पत्ति व्याकरणाधारे सिद्ध होऊ शकते. जिज्ञासूंनी मा.पी.मध्ये पाहणे योग्य (पृ. ३३४-४०)

(२) **विधिहरिहरमय** — मय हा प्रत्यय तद्रूप, तद्विकार व तत्प्राचुर्थ या तीन अर्थांचा आहे. सीताराममय जग, अमृतमुळीमय चूर्ण व मुदमंगलमय संतसमाज' ही क्रमशः तिघांची उदाहरणे आहेत. ब्रह्मा, विष्णु, महेश रूप जसा प्रणव आहे तसेच रामनाम आहे. राम नामात रेफ रकार रुद्र आहे, मकार विष्णु आहे आणि आकार ब्रह्मा आहे. 'रुद्रोऽग्निरुच्यते रेफो विष्णुः सोमो म उच्यते (तयोर्मध्ये गतो ब्रह्मा आकारो रविरुच्यते' (एकाक्षर कोष मा.पी.) 'अकारो वासुदेव. स्यात् आकारस्तु पितामहः॥

मः शिवश्चन्द्रमा वेधा.) (ए.को. काशी) र+अ+आ+ म राम असा छेद केला म्हणजे हे दुसरे वचन लागू पडते व र+आ+म असा छेद केला की मा.पी. मधील वचन लागू पडते. याप्रमाणे रामनाम विधि हरिहरमय आहे हे ठरले.

(क) या तिघांचे निर्माते रामच आहेत. 'विधिहरिशंभुस नाचविणारे'. उत्पत्ति स्थितिसंहार ही तिघांची कार्ये आहेत तशीच वैराग्याची व ज्ञानाची उत्पत्ति, अज्ञानाचा संहार व भक्तीच्या आधाराने वैराग्यज्ञानाची स्थितिपालन ही तीन कार्ये रामनाम करतेच.

(ख) प्रणवापासून जशी जगाची उत्पत्ति उपनिषदांत वर्णिली आहे तशी रामनामापासून ही जगाची उत्पत्ति उपनिषदांतच वर्णिली आहे. तो आधार पुढल्या चौपाईच्या टीकेत पहावा.

(ग) रामनामांतूनच जर रामाचे प्रकट्य होते तर विधिहरिहरांचे होईल यात नवल नाही.

(३) वेदप्राण – प्रणव – ओंकार 'ओमित्येकाक्षरं ब्रह्म.' तसेच रामनाम ब्रह्मस्वरूप आहे. ब्रह्माची अगुण व सगुण अशी दोन रूपे असू शकतात; म्हणून पुढील चरणात तेच रामनामाविषयी सांगतात.

(४) अगुण अनूपम गुणनिधान – अगुण शब्द निर्गुणापेक्षा अधिक स्पष्टार्थ बोधक आहे. भागवतात हा अनेकवेळा वापरला आहे, तसाच मानसात आहे. 'तथापि भूमन् महिमाऽगुणस्य ते' (भाग १०/१४/६). 'जो गुणरहित सगुण तो केवीं। जलजलगार अलग ना जेवीं' (१/११६/३). अगुण-गुणरहित ब्रह्म व अनुपम गुणनिधान म्हणजे सगुण निराकार किंवा सगुणसाकार, अवतार (ईश्वर व अवतार) भाव हा की रामनामाच्या प्रभावाने निर्गुण व सगुणसाक्षात्कार होऊ शकतात. निधान म्हणजे धनाचा वगैरे गुप्त ठेवा. ज्या पात्रात धन भरून ठेवलेले असते ते पात्र. तसेच रामनामात सर्व सद्गुण आहेत. रामनामातून जपाच्या प्रभावाने ते प्रगट होऊ लागतील. कबीराला निर्गुण साक्षात्कार राम नामानेच झाला. तुलसीदास व समर्थ यांना उभय साक्षात्कार नाम प्रभावानेच झाले.

(५) चारी वेदांचे पठण करण्यात मूळ हेतू हाच आहे की पंचम वेद जो प्रणव (श्री एकनाथी भागवतात पहा) त्याचा सतत चालू असलेला सहज जप (अजपा) श्रवण करावयास सापडावा. तो जप परावाणीत चालू असतो. रामनामाचा जप वैखरीने सतत करता करता तो आपोआप खालच्या खालच्या वाणीने होऊ लागतो व शेवटी परावाणीत तो चालू होतो -म्हणजे चाललेला ऐकू येऊ लागतो. मग त्या नादानुसंधानाने कोणताही सगुण अगुण साक्षात्कार होऊ शकतो; या कलियुगातहि उघड्या डोळ्यांनीसुद्धा सगुणसाक्षात्कार होतो. आचार्यांनी योगतारावलीत या नादानुसंधानाला नमस्कार करून त्याचे महत्त्व वर्णिले आहे. सोहममधील सकार व हकार गळले की, जसा ओंकार ऐकू येतो तसाच सतत दृढाभ्यासाने राम येतो. मुसलमानात सुद्धा याऽहु या मंत्राने तेच साधतात. सुफी पंथात. प्रथम दीर्घध्वनि व त्यास जोडून ऱ्हस्व ध्वनि, जसा ओम्, राम, द्राम् राँ.

(ल.टे.) दुसऱ्या घरणातून एक अर्थ निघतो की राम नाम अगुण आणि गुणनिधान ब्रह्माहून अनुपम श्रेष्ठ आहे. 'दोघांहुनि गुरु नाम मम मतें। जें उभयां निजबल-वश करते' (२३/२) याने हा सिद्धान्त स्पष्ट केला आहे. कारणाचे महत्व केव्हाही कार्यापेक्षा जास्त. शंभर नंबरी सोन्याच्या बांगड्या व शंभरी नंबरी सोन्याची तितक्याच वजनाची लगड सोनाराकडे विकण्यास नेल्यास, सोनार लगडीलाच जास्त किंमत देणार. आता या नामाचा महिमा सांगण्यास प्रारंभ होतो-

हिं.- **महामंत्र जोइ जपत महेसू । कासीं मुकुति हेतु उपदेसू ॥३॥**

म.- **महामंत्र जो महेश जपती । काशी मुक्ति-हेतु उपदिशती ॥३॥**

**अर्थ** – जो महामंत्र महेश (सदा) जपत असतात व काशीत मुक्ति देण्यासाठी ते ज्याचा उपदेश करतात तो 'राम' मंत्रच ॥३॥

**टीका.** (१) **महामंत्र** – महा + मंत्र, सर्वात श्रेष्ठ मंत्र. महावाक्यरूपमंत्र हा अर्थ येथे अभिप्रेत आहे. ज्या मंत्राच्या अर्थाच्या मनन निदिध्यासनाने आत्मज्ञान होते, त्या मंत्रास महावाक्य म्हणतात. सोहं हा मंत्र आहे व महावाक्यहि आहे. यतींच्या अनेक महावाक्यांत हे एक महावाक्य आहे. 'राम' हा मंत्र महावाक्य असल्याने त्यास महामंत्र म्हटले. हे महावाक्य कसे आहे ते १९/१ च्या टीकेत (क) पहा. (क) तत्पद शिववाचक व ब्रह्मलक्ष्यक आहे, व त्वंपद जीववाचक ब्रह्मलक्ष्यक आहे. भागत्याग (जहदजहत्) लक्षणेने दोहोंतील विद्या व अविद्या या उपाधिभेदाचा त्याग करून जे राहिले ते केवल ब्रम्ह, तेच असिपदाने सांगितले जाते. शुकरहस्योपनिषदात चार महावाक्यांचे स्पष्टीकरण केलेले आहे. इतर तिन्हींचे स्पष्टीकरण 'राम'ला लावावे म्हणजे समजेल. आदिकवि मुकुंदरायांच्या विवेकसिंधूत तत्वंपदशोधनादि प्रकरणे पहावी. येथे विस्तार अनावश्यक वाटतो.

(२) महामंत्र म्हणजे रामषडक्षर मंत्र- ज्यास उपनिषदात व अगत्ससंहितेत मंत्रराज म्हटले आहे तो येथे घेता येणार नाही; कारण त्या मंत्राचा अधिकार सर्वांस नाही. 'येषां प्रणवाधिकारः 'तेषामेव एकाक्षर-षडक्षर-मंत्राधिकारः नान्येषाम्' (रा.र.उ.) असे स्पष्ट वचन आहे.

(क) येथे प्रकरण 'राम' या दोन अक्षरी मंत्राचे चालू आहे. (ख) शिव ज्याचा जप करतात तोच येथे विवक्षित आहे. 'तुम्ही तर राम, राम, दिन राती। सादर जपा अनंगाराती' (१/१०८/७) असे पार्वती महेशास म्हणाली आहे. (ग) काशींत शंकर राममंत्राचा उपदेश सर्वांसच करतात त्या अर्थी तो सर्वांना अधिकार असलेला मंत्रच असला पाहिजे. पुढे आणखी आधार दिले आहेत.

(३) **महेश जपती** – एवढे मोठे सर्वैश्वर्यसंपन्न महादेव महा ईश असून सुद्धा ते जपतात, त्याअर्थी तो सर्व मंत्राहून श्रेष्ठ असला पाहिजे हा भाव आहे. 'शंकर जगद्वंद्य जगदीशा। सकल नमिति मुनि नर सुर शीर्षा । मृषा होइ परि शंभु गिरा ना' (१/५०/६३/५१/३) 'त्रिभुवन गुरु तुम्ही वेद वानिती' (१/१११/५). इत्यादि

ऐश्वर्याने संपन्न; हे महेश शब्दाने सुचविले. सार हे की मानव जीव जर जपणार नाहीत तर ते अभागी 'विधिवंचित तेही'.

(४) काशी मुक्तिहेतु उपदिशती – 'नामबळे ज्या शंकर काशी। दे सकलां सम मति अविनाशी (४/१२/४) 'काशीं मरत जंतु जैं बघतो नामबले ज्या विशोक करतो' (१/११९/१) असे शंकर स्वतः म्हणाले आहेत.

(क) शिव सर्वज्ञ सर्वमंत्रतंत्र शास्त्राचार्य असून या एकाच मंत्राचा उपदेश का करतात? ते आपल्या स्वतःच्या इच्छेने करीत नाहीत. काशीत मरणाऱ्या जीवांच्या मुक्तीसाठी त्या मंत्राचा उपदेश करण्याचा अधिकार त्यास रामचंद्रानी दिला आहे. 'मन्मत्रंर्दक्षिणे कर्णे यस्य कस्यापि वा स्वयं। उपदेक्ष्यसि मन्मंत्रं स मुक्तो भविता शिव' (रा.उ.ता.उ.) किडामुंगी जीवजंतुपासून अत्यंत शुद्ध आचारसंपन्न संन्याशापर्यंत काशीत मरणाऱ्या जीवाच्या उजव्या कानात काशीविश्वेश्वर स्वतः उपदेश करतात व अशा रीतीने काशीत मरणारांस मुक्ति मिळेल असा रामाचा वर आहे. स्वतः शंकरांच्या मुखाने या दोन अक्षरी महावाक्याचा उपदेश मिळाल्यावर अंतसमयी ज्ञानप्राप्ती होऊन मुक्त होतील यात नवल ते काय? म्हणूनच 'काश्यांमरणान्मुक्तिः हें सत्य आहे. कि.कां.मं.सो. टीका पहावी, व विनय पत्रिकेतील 'कामधेनु कलि काशी' या पदाचा अनुवाद पहावा.

(ख) रामोत्तरतापिनीत रामचंद्रांनी षडक्षर मंत्राचा उल्लेख केला आहे. हे खरे पण त्या वाक्याचा इतर वचनांशी समन्वय करूनच ते लावले पाहिजे. वि.प. 'काशीस्तुति' या पदात द्वक्षरी राममंत्राचाच उल्लेख आहे. मा.पी.पृ. ३४१ वर दिलेल्या सर्व वचनात 'राम'च स्पष्ट सांगितला आहे. 'श्रुतिर्ब्रह्माह षड्वर्णं श्रुतिर्वर्णद्वयात्मकम्। द्वयोर्विरोधः संप्राप्तो नश्यते तद्व्यवस्थया ॥ श्रुतिस्मृतिविरोधेषु श्रुतिरेव बलीयसी ॥ व्यवस्थाभावयाश्रित्व वाक्यमेतन्नियामकम् ॥' षड्वर्णं ब्राह्मणादीनां त्रयाणां, तु द्विवर्णकमन्येषां देशिकेन्द्रेण वक्तव्यं तारकं परम्॥ विना तु प्रणवं, मंत्रान् गायत्री श्रुतिवारणात्॥ सावित्रीं लक्ष्मीं यजुः प्रणवं यदिजानीयास्त्री शूद्रः समृतोऽधोगच्छति। तस्मात्सर्वदानाचष्टे। यद्याचष्टे स आचार्य स्तेनैव मृतो भवतिति तापनीय श्रुतिः' (रा.चं. अधिकारिनिर्णये). याचा भावार्थ असा की जेथे दोन वचनांचा विरोध येईल तेथे श्रुतिच्या इतर वचनांनी निर्णय करावा; म्हणून निर्णय हा की षडक्षर उपनीतांना द्यावा व दोन अक्षरी इतरांना द्यावा. दोन्ही तारक ब्रह्मच आहेत म्हणून षडक्षर, एकाक्षर, गायत्री, प्रणव इत्यादि मंत्र जो कोणी स्त्रीशुद्रादिकांस देईल तो देणारा गुरु व घेणारा शिष्य हे मेल्यावर अधोगतीला जातील. 'अत्र (काश्यां) हि जंतोः प्राणोत्क्रमणेषु रुद्रस्तारकं व्याचष्टे' (जाबा उ.) 'श्रीरामेति परंजाप्यं तारकं ब्रह्म संज्ञितम्' विप्रहत्यादिपापघ्नमिति वेदविदो विदुः (रामस्तवराज५) 'श्रीराम रामेति च जना ये जपन्ति सर्वदा तेषां भुक्तिश्च मुक्तिश्च भविष्यति न संशयः' ॥६॥ (रा.स्त.)

ल.ठे. – प्रथम हे सांगितले की शंकर स्वतः जप करतात; व नंतर सांगितले की उपदेश त्या मंत्राचा करतात. याने एक शास्त्रसिद्धांत सांगितला की उपदेश देणाराने

तो मंत्र चेतन केला असला तरी उपदेश देण्यापूर्वी त्याने उपदेशाधिकारासाठी स्वतः जप केला पाहिजे. ही संख्या साधारणपणे दहा हजार सांगितली आहे. (२) रामचंद्रानी अधिकार दिला म्हणून शिव त्याचा उपदेश करतात. याने ठरले की गुरुंनी मंत्रोपदेशाधिकार दिल्याशिवाय ते कार्य कोणी करू नये. शिष्य योग्य असल्यास 'अतःपरं तया दीक्षा व्याख्यानादि कर्तव्यम्' अशी आज्ञा गुरू देतात. अशी ही मंत्रशक्तिप्रदान करण्याची शक्ति परंपरेने चालत आलेली असली पाहिजे. शंकरांना नामप्रभाव अनुभवास आला तेव्हा त्यांनी रामाज्ञेने उपदेश करण्यास प्रारंभ केला इत्यादि अनेक गोष्टी या चौपाईत सुचवून रामनामाने प्रतिष्ठा पूज्यतादि मिळाल्याचे दृष्टांत देतात.

हिं. **महिमा जासु जान गनराऊ । प्रथम पूजिअत नाम प्रभाऊ ॥४॥**
म. **महिमा जाणति गणपति नामी । प्रथम पूज्य हा प्रताप नामीं ॥४॥**

अर्थ — नाम-नामाचा महिमा गणपति (गणराऊ-गणराज) चांगला (नामी) जाणतात (कारण) प्रथम पूज्य झाले हा नामाचाच प्रताप होय. ॥४॥
टीका — कोणत्याही कार्यारंभी प्रथम गणपतिपूजन, निदान गणपति स्मरण केले जाते याचे कारण पाहिले असता कळते की त्यांना अग्रपूजेचा मान राम नामाने मिळाला.

### गणेश प्रथम पूज्य का?

गजाननाच्या जन्माची व प्रथम पूज्य का झाले ही कथा पूर्वी दिली आहे; पण तीत रामनामाचा संबंध नाही.
(१) शंकरांच्या मनात आले की अग्रपूजेचा मान गणेशाला द्यावा; परंतु कार्तिकेयाने तक्रार केली की मी मोठा आहे म्हणून तो मान मला मिळाला पाहिजे. तेव्हा त्यांनी त्या दोघांना ब्रह्मदेवाकडे पाठविले व ते सांगतील ते मान्य करावे असे ठरले. ब्रह्मदेवाने सांगितले की त्रैलोक्याची प्रदक्षिणा करून जो प्रथम माझ्याकडे येईल त्याला तो मान मिळेल. स्वामी कार्तिक आपल्या मोरावर (काही ठिकाणी उल्लेख आहे की सर्व देव आपापल्या वाहनावर) बसून निघाले. गणपतीचे वाहन मूषक! तो किती चालणार! तेव्हा गजाननास चिंता उत्पन्न झाली. इतक्यात शंकराच्या संकल्पबलाने म्हणा की प्रभुकृपेने, नारदाची भेट वाटेत झाली. त्यांनी सांगितले की रामनामात सर्व ब्रम्हांड आहे; ते जमिनीवर लिहून त्याला प्रदक्षिणा घालून तुम्ही ब्रह्मदेवाकडे जा. त्यांनी तसे केले. दुसऱ्या देवांना उंदराच्या पायाची चिन्हें आपल्यापुढे दिसू लागली! गणेश सर्वांच्या आधी पोचल्याने व उंदराची पावले सर्व देवास पुढे पुढे लागलेली दिसल्याने, त्यांना अमान्य करता येईना. तेव्हापासून गणपति अग्रपूज्य - प्रथम पूज्य झाले; अशी एक कथा आहे.

(२) गणेशपुराणातहि सांगितले आहे की रामनाम कीर्तनानेच मला अग्रपूजेचा मान मिळाला, व नामाचा प्रभाव अद्याप माझ्या हृदयात विराजमान झालेला आहे. 'रामनाम परं ध्येयं गेयं प्रेयमहर्निशम् सदा सद्भिरिति प्रोक्तं पूर्वं मांजगदीश्वरैः ॥ अहं पूज्योऽ भवम् लोके श्रीमन्नामानुकीर्तनात् । तदादि सर्वदेवानां पूज्योऽस्मि मुनिसत्तम ॥ रामनामप्रभा दिव्या राजते मे हृदिस्थले ॥' (मा. पी. मधून)

**संगति** — शंकर व त्यांचे पुत्र गजानन यांची उदाहरणे दिली. त्यावर कोणी म्हणतील की ही देवकोटीतील अत्यंत पवित्र देह मनबुद्धि असलेली मंडळी, त्यांचे उदाहरण आम्हांस निरुपयोगी, स्त्रिया म्हणतील की सगळी उदाहरणे पुरुषांचीच! आम्हांस रामनाम जपाचा अधिकार नाही की काय? म्हणून एक पृथ्वीतलावरील अति पापी पुरुषाचे व एक स्त्रीचे अशी दोन उदाहरणे दोन चौपायांत देतात. वि. सू. चौ. ६ मध्ये 'जपि जेईं' व 'जपति सदा' असे दोन पाठ आहेत. पहिला जप करून जेवली असा प्रचलित पाठच घेतला आहे.

हिं.- **जान आदि कवि नाम प्रतापू । भयउ सुद्ध करि उलटा जापू ॥५॥**
**सहस नाम सम सुनि सिव बानी । जपि जेईं पिय संग भवानी ॥६॥**

म.- **आदि कविहि तत्प्रताप जाणे । उलटा जपुनी विशुद्धि बाणे ॥५॥**
**नामसहस्रासम शिव वाणी । जपुनि जेवि पतिसवे भवानी ॥६॥**

**अर्थ** — आदि कवि वाल्मीकी रामनामाचा (त्याचा) प्रताप चांगला जाणतात, (कारण) उलट्या राम नामाचा जप करून ते विशुद्ध झाले (विशुद्धि बाणली) ॥५॥ रामनाम विष्णुसहस्रनामाच्या तोडीचे आहे या शिव वचनाने (हे वचन ऐकून) भवानी त्याचा जप करून आपल्या पतीबरोबर जेवली ॥६॥

**टीका — चौ. ५ (१) वाल्मीकीचा थोडा इतिहास ३/३ च्या टीकेत** दिला आहे. एकदा सप्तर्षी त्या बाजूने जात असता त्यांस अडवून ठार करण्याच्या विचारांत वाल्हा होता. सप्तर्षी म्हणाले की तू हे पाप कोणासाठी करतोस? त्याने सांगितले की बायका मुले वडील माणसे यांचे पालन पोषण करण्यासाठी! ऋषि म्हणाले, 'तूं ज्याना पोसतोस ती मंडळी तुझ्या पापाची भागीदार आहेत काय?' तो म्हणाला, 'हो असलीच पाहिजेत!' त्यांनी सांगितले की विचार जाऊन त्यांना. शेवटी तो घरी गेला व विचारले पण कोणीही पापाला भागीदार होत नाही हे कळताच, त्याला संतदर्शन प्रभावाने पूर्ण पश्चात्ताप झाला; व केलेल्या कोट्यावधि ब्रह्महत्यादि पातकांतून सुटण्याचा मार्ग सांगा वगैरे म्हणून त्यास शरण गेला. रामनामाचा जप करीत इथे बस असे त्यांनी सांगितले पण ते त्यास जमेना, तेव्हा 'मरा' या विलोम राममंत्राचा जप करीत इथे बस असे सांगितले. त्याप्रमाणे तो जो बसला तो त्याच्या अंगावर वारूळ वाढले तरी त्याला दाद नाही. ते ऋषि हजारो वर्षांनी पुन्हा आले व त्याला हाक मारून बाहेर काढला. तेव्हापासून वाल्मीकी नांव पडले व पुढे ऋषि झाले. नंतर रामायणाची रचना केली.

(२) येथे हे दाखवावयाचे आहे की कुठे कोटीब्रह्महत्यापातकी व कुठे ब्रह्मर्षि होणे! व हे सुद्धा 'राम' 'राम' असा अनुलोम जप करून नव्हे तर 'मरा' 'मरा' असा उलटा विलोम जप करून! वाल्हाच्या इतका पातकी या कराल कलिकालांत सुद्धा कोणी नसेल. मग सतत रामनामजप केला तर किती लाभ होईल याचा विचार करावा.

(क) 'कोटिविप्रवध पाप जया ही। येतां शरण न त्यजू तयाहि ॥' 'सन्मुख होइ जीव मम जेव्हा। जन्म कोटि अघ नासे तेव्हा' ॥५/४४/१-२) हे रामप्रभूंचे वचन आहे येथे उलटया नामाचा प्रभाव तेवढाच दिसला. **रामापेक्षा नाम श्रेष्ठ हे सुचविले.**

ल. टे. गायत्री मंत्र उलटा करून व त्याला काही बीजे लाऊन जप करून सिद्ध झाला की ब्रह्मास्त्र सिद्ध होते व सर्व विश्व जाळून टाकता येते, म्हणजे परिणाम अगदी भलताच होतो, तसे राम नामाचे नाही हे सुचविले.

(३) **आदिकवी** — वेदादि सोडून या पृथ्वीतलावर संस्कृत भाषेत छंदोबद्ध रचना करणारे पहिले कवि. (क) मंगलाचरणांत कवीश्वर म्हणून नमन केले. संतवर्णनांत त्यांचा प्रथम उल्लेख केला; दो १४ मध्ये रामायण कर्ते म्हणून वेदांच्या पूर्वी त्यांस वंदन केले व येथे चौथ्यावेळी रामनामनिमित्ताने महिमा वर्णन केला. वा. रा. प्रत्येक सर्गाच्या अंती 'इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये -' असा उल्लेख आहे.

**चौ. ६** — शिव गणपति यांचा उल्लेख करून पार्वतीच्या पूर्वी वाल्मीकीचा उल्लेख मध्येच का केला याचे कारण पूर्वी यथामति दिले आहे. कोणी म्हणतात शिवाच्या परिवारांत मधेच त्यांना का बसवले? ही शंकाच निर्मूल आहे. शिवपरिवारच सांगावयाचा असता तर प्रथम पार्वती नंतर शिव, कार्तिकेय व नंतर गणेश असा क्रम झाला असता. गणपतीच्या पूर्वी त्याच्या मातेचा उल्लेख का नाही असे विचारणे कांही तरी शोभले असते. प्रथम सुलट्यानामाचा प्रताप सांगितला; नंतर उलट्या नामाचा प्रताप सांगितला व पार्वतीचे उदाहरण इतर हरिनामे व रामनाम यांची तुलना करण्यासाठी दिले आहे.

(१) **'सहस्रनामासम'** — या विषयींची कथा पद्म पु. उत्तर अ. २५४ मध्ये आहे. एकदा शंकरांनी पार्वतीस म्हटले की, तुझ्यासारखी विष्णुभक्तिप्रिय भार्या मला मिळाली याबद्दल मला धन्यता वाटते. आता तूं आपले गुरु वामदेव यांजकडे जाऊन पुराण पुरुषोत्तमांच्या पूजेचे विधान समजावून घे व त्यांच्या सांगण्याप्रमाणे अर्चन करीत जा. तेव्हा पार्वती वामदेवांकडे गेली व तिच्या प्रार्थनेप्रमाणे वामदेवांनी तिला विधिपूर्वक मंत्रदीक्षा दिली व अर्चनविधी सांगून विष्णुसहस्रनामाचा पाठ रोज करण्यास सांगितले. 'इत्युक्तस्तुतया देव्या वामदेवो महमुनिः। तस्मै मंत्रवरं श्रेष्ठं ददौ स विधिना गुरुः नाम्नां सहस्रं विष्णोश्च प्रोक्तवान्मुनिसत्तमः' **विष्णुसहस्रनामे अनेक, निरनिराळी आहेत.**

एकदा द्वादशीच्या दिवशी शंकर भोजनास बसत असता त्यांनी पार्वतीला आपल्या बरोबर भोजनास हाक मारली. ती विष्णुसहस्रनामाचा पाठ करीत होती म्हणून म्हणाली की माझा पाठ अजून व्हायचा आहे. शंकर म्हणाले तूं धन्य आहेस की तुझी विष्णूच्या ठिकाणी इतकी दृढ भक्ति आहे. 'रमन्ते योगिनोऽनन्ते सत्यानन्दे चिदात्मनि। तेनरामपदेनासौ परब्रम्हाभि धीयतंष ॥२१॥ राम रामेति रामेति रमे, रामे मनोरमे, सहस्रनामता तुल्यं रामनाम वरानने ॥२२॥ रामेत्युक्त्वा महादेवि भुङ्क्ष्य सार्धं मयाधुना' ॥२३॥ **भावार्थ** — योगीजन अनन्त सच्चिदानन्द परमात्म्यात रममाण होतात म्हणून राम शब्दाने परब्रम्हाचा बोध होतो. हे रामे (सुंदरि) मी राम राम राम असा जप करीत अति मनोरम अशा रामात रमतो कारण एक राम नाम विष्णुसहस्रनामाच्या तोडीचे आहे म्हणून सुद्धा राम नाम पसंत कर (वर) व आपल्या मुखाने घेत जा (आनने व - मुखाने घे) व महादेवि एक वेळ राम नामाचा उच्चार कर व माझ्या बरोबर जेवण्यास ये - जेव. ते ऐकून तिने तसे केले. यावरून कोणी अर्थ काढतात की तेव्हापासून तिने विष्णुसहस्रनामाचा पाठ करणे सोडले व ती फक्त रामनामाचाच जप करू लागली. परंतु या म्हणण्याने गुर्वाज्ञाभंगाचा महामहादोष पार्वतीच्या पदरात बांधला जातो हे नामाची महती दाखविताना हे लोक कसे विसरले? गुरुनी सांगितलेला पाठ त्यांच्या आज्ञेशिवाय मोडणे शक्य नाही कारण ती सत्‌शिष्या होती.

(क) सहस्रनामांचे काम एका रामनामात होते ते समजल्यावर ती मुखाने रामनाम घेऊ लागली असेल पतीच्या आज्ञेप्रमाणे पण तिने पाठ करणेच सोडले हे म्हणणे सांप्रदायदुरभिमानाचे द्योतक आहे. **गुरूची आज्ञा व पतीची आज्ञा यांच्या विरोधात दोन्हीचे पालन कसे केले इतकेच येथे दाखविले.**

(ख) **'जपि जेई'** या पाठाने रामनामाचे महत्व तेवढे रहात नाही असे कोणी म्हणतात. पण सर्वात जुन्या पोथींत हाच पाठ असल्याचा पुरावा मा. पी. मध्ये मिळाल्याने कल्याणचा मानसांकाचाच पाठ येथे ठेवला आहे.

**रामनाम जापकांना एक रामनाम विष्णुसहस्रनामासारखे वाटलेच पाहिजे. पण यामुळे विष्णु उपासकांनी विष्णुसहस्रनामाचा पाठ करणे सोडणे म्हणजे व्यभिचार ठरेल.**

(ग) 'मंगलभवन अमंगलहारी । उमे सहित जे जपति पुरारी' असे म्हटलेच आहे; पण पार्वती हे केव्हापासून करू लागली याचा शोध घेणे जरुरीचे आहे; पण हे कार्य शास्त्र पुराणालोचक पंडित वाचकांवरच सोपविणे भाग आहे. 'संतत जपति शंभु अविनाशी' असे पुढे सांगणार आहेत; म्हणून पार्वती सदा मुखाने रामनाम जपते हे निराळे सांगण्याची आवश्यकता नाही.

ल. टे. पद्मपुराणांतील वरील इतिहासावरून ठरले की (१) **सौभाग्यवती स्त्रियांनी गुरुजवळून मंत्रोपदेश घेण्यास हरकत नाही.** (२) **गुरुंनी सांगितल्यास** विष्णुसहस्र नामाचा पाठ करण्याचा त्यांस अधिकार आहे. (३) **गुरु करण्यास पतीची खुशीची**

आज्ञा पाहिजे. (मात्र त्यांनी पति सेवा पराङ्मुख होता नये.) (४) गुरु केल्यानंतर सुद्धा पतीची आज्ञा मानली पाहिजे (५) रामनाम विष्णुसहस्रनामाच्या तोडीचे आहे. (६) आणि हरिभक्तिची आवड असणारी भार्या मिळणे हे पतीचे भाग्य होय.
(क) पार्वती प्रेमाने राम नामोच्चार करू लागल्याचा परिणाम आता सांगतात.

हिं.- **हरषे हेतु हेरि हर ही को । किय भूषन तिय भूषन ती को ॥७॥**
**नाम प्रताप जान सिव नीको । कालकूट फलु दीन्ह अमी को ॥८॥**
म.- **प्रेम हृदयि हेरुनि हर हर्षति । स्त्री स्त्रीभूषण भूषण बनवति ॥७॥**
**शंभुस नामीं प्रताप सुविदित । काळकुटे फळ सुधा समर्पित ॥८॥**

**अर्थ** – पार्वतीच्या हृदयातील रामनाम प्रेम (हेतु) पाहून (हेरूनि हेरि) शंकरांना हर्ष झाला; व स्त्रीभूषण असलेली स्त्री (तिय-स्त्री) आपले भूषण बनविली. (मांडीवर घेतली) रामनामाचा प्रताप शंकरास उत्तम कळला आहे कारण (त्यांस) काळकूटविषाने अमृत फळ दिले ॥८॥ (ती=स्त्री=तिय, अमी-अमृत, किय-केली, केले; ही -हृदय).
**टीका – चौ. ७-(१) प्रेम हृदयि हेरुनि हर हर्षति** – इतका हर्ष होण्याची कारणे (क) ज्या सतीला पूर्वजन्मात अनेक प्रकारे सांगून सुद्धा राम परमात्मा आहेत हा विश्वास वाटला नाही, तीच आता विष्णुसहस्रनामाचा पाठ अपुरा टाकून प्रेमाने रामनामोच्चार करू लागली हे पाहून आनंद वाटला व उत्साह उत्पन्न झाला.
(ख) भगवंतांनी कृपा केली म्हणून हे घडले.
(ग) राम व राम नाम ज्यांना प्रिय आहे त्यांना रामनामावर प्रेम करणारी माणसे आवडतातच. प्रेमाने रामनामोच्चार करताना पाहून आनंद होतो किती आनंद व उत्साह वाटला ते दाखवितो पुढला चरण -
(२) स्त्री स्त्रीभूषण भूषण बनविती -
(क) **स्त्रीभूषण** – पतिव्रता शिरोमणि पार्वती होतीच.
(ख) भूषण बनवणे म्हणजे शरीरावर धारण करणे व आपली शोभा वाढवणे. एखाद्या अमूल्य भूषणाप्रमाणे तिला वामांकावर बसविली. रामनामजापक शंकरास असा प्रिय होतो म्हणूनच शिव मंदिरांत रामनामजप केल्याने शिव प्रसन्न होतात. 'शंकर भजन विना नर भक्ति न मम लभतात.' (७/४५/-)
(ग) **पुरुषांस उपदेश** – रामनामजपादि प्रेमाने करणारी पत्नी मिळाली तर त्यांनी आपले महद्भाग्य समजावे. तिला त्या कार्यात विरोध न करता प्रोत्साहन देण्यानेच भाग्याची वृद्धि होईल. **'रामनाम व्रता** नारी सुतं सौभाग्यममीतम् । भर्तुःप्रियत्वं **लभते न वैधव्य कदाचन'** (प. पु. मा.पी.)
**चौ. ८.** (१) नामप्रभाव वर्णन शंकरांच्या दृष्टान्ताने सुरू केले व या चौपाईत उपसंहार शंकराच्या वर्णनानेच केला आहे.

(क) **'शंभुस नामी प्रताप सुविदित'** स्वानुभवाने त्यांना जेवढा कळला तेवढा कोणासही कळला नाही हा भाव आहे. 'रामनाम परब्रह्म सर्वदेवप्रपूजितम्। **महेश एव जानाति** नान्योजानाति वै मुने' (जैमिनी पु. मा. पी.) 'रामनामप्रभावं यत् जानाति गिरिजापतिः तदर्धं गिरिजा वेत्ति तदर्धमितरे जनाः' (प.पु.)

(२) **कालकुटे फळ सुधा समर्पित** (क) कालकूट हालाहल विष जे समुद्रमंथनाच्या वेळी निघाले व सर्व लोकांना जाळून टाकण्यासारखे महाभयंकर होते ते घेण्यास देव, दानव, मुनि, ऋषि वगैरे कोणीच धजेनात. यावेळी रामनाम होते व त्या सर्वांना महिमा माहीत होता तरी मरणभय वाटले. अर्थ हाच की पूर्ण विश्वास व श्रद्धा यांचा अभाव होता. शंकरांनी एकट्यानीच ते सर्व घेतले. घेण्यापूर्वी ते उमेला म्हणाले 'श्रीरामनामाखिलमंत्रबीजं तज्जीवनं मे हृदये प्रविष्टम् । हालाहलं वा प्रलयानलंवा मृत्योर्मुखवा विशतो कुतो भयम्' मीरेने ही विषाचा पेला आनंदाने प्राशन केला; व काया लखलखीत झाली.

(३) **फळ सुधा समर्पित** – सर्पाच्या लेशमात्र विषाने मृत्यु येतो. कालियाच्या विषाच्या वाफानी आकाशगामी पक्षी मरून पडत होते. हे तर हालाहलच! त्याने शंकरांना मृत्यू तर नाहीच आला पण ते अमर झाले. अमृताचे फळ मिळते तेच कालकूटाने दिले. **'विषमप्यमृतं क्वचित् भवेत'**

**'गरल सुधासम अरिहित होती'** (७/१२०/७) हा रामनामचिंतामणीचा महिमा आहे. 'खात कालकूट होत देह मृत्युहीन जरा' (कवि प. १५८) 'विश्वास फलदायकः' हे येथे दाखविले. **ज्याचा जेवढा विश्वास व श्रद्धा असेल तेवढे फल रामनाम त्यास देईल.**

**सिंहावलोकन** – या आठ चौपायांत काय काय सांगितले ते पाहू –

(१) रामनामाला प्रत्यक्ष वंदन (२) भरतादिकांच्या नामाना अप्रत्यक्ष वंदन (३) रामनामांतील बीजे व मंत्रशास्त्रदृष्टीने त्यांच्या प्रतापाचे वर्णन. (४) रामनाम निर्गुण व सगुण यापेक्षा श्रेष्ठ (५) त्रिदेवांची उत्पत्ति त्यापासूनच (६) त्यातूनच विश्वाची उत्पत्ति. (७) भोगमोक्षदायक कीर्ति पूज्यता दायक, अनंत पापसंहारक आहे. (८) इतर नामांहून सहस्रपटीने श्रेष्ठ. (९) उलटे सुलटे कसे ही जपा, हितकारकच (१०) शंकरप्रसन्नकारक, (११) जीवमात्र अधिकारी. (१२) अमरत्वदायक (१३) रामनाम प्रदक्षिणेचे फळ. (१४) सर्वगुणनिधान (१५) काशीत विशेष महिमा (१६) शंकरानांच खरा प्रभाव ठाऊक आहे. रामनामचंद्राच्या जणू या सोळा कला वर्णन केल्या. शिवाय चंद्रकिरणांप्रमाणे अनेक प्रकारच्या कथा, उपदेश अंगभूत सुचविले. या सर्व गोष्टी सुंदर मनोवेधक, सुभाषितमय काव्यात सांगितल्या.

**संगति** – दो १९ पासून २० - ८ अखेर रामनामातील दोन अक्षरांचे वर्णन करतील.

पुढल्या दोह्यांत राम नाम व रघुपतिभक्ति याचा संबध सांगतात.

हिं.दो.- बरषा रितु रघुपति भगति तुलसी सालि सुदास ।
राम नाम बरबरन जुग सावन भादव मास ॥१९॥

म.दो.- वर्षाऋतु रघुपति भक्ति तुलसी शालि सुदास ।
रामनाम वर वर्ण युग श्रावण भादव मास ॥१९॥

अर्थ – तुलसीदास म्हणतात की रघुपतीची भक्ति हा वर्षाऋतु आहे, उत्तम रामभक्त (रामदास) भाताचे साळीचे पीक आहे व राम नामांतील श्रेष्ठ अशी दोन अक्षरे श्रावण भाद्रपद (भादव) हे दोन महिने आहेत. ॥१९॥ (हे दोन कोरडे गेले की साळीचे पीक निष्फल) ॥१९॥

टीक – (१) वर्षाचे ऋतु सहा हे सर्वमान्य आहे. मानसातच दोन ठिकाणी सहा ऋतूंचे वर्णन अगदी क्रमाने आहे. (कीर्ति शरयूतील षड्ऋतु व नारी षड्ऋतु वर्णन) कि. कां. 'वर्षाकाळि मेघिं नभ भरले' असा वर्षाऋतूचा उपक्रम केला व 'वर्षा विगत शरद ऋतु आला' असा उपसंहार केला आहे. म्हणून येथे श्रावणभाद्रपद वर्षाऋतु हाच अर्थ मानणे सयुक्तिक साधार आहे.

(क) येथील रूपकांत पाऊस (वर्षाजल) कोणता ते सांगितलेले नाही. रघुपतिभक्ति वर्षाऋतु आहे, सुदास - सुसाधक हे भाताचे - साळीचे पीक आहे; 'रा' हा श्रावण महिना, आणि 'म' हा भाद्रपद महिना आहे; कोणत्या जलाचा वर्षाव होतो हे मानसाधारेच ठरविले पाहिजे. मानसात जलाचे रूपक पुष्कळांशी केले आहे.

(ख) (१) 'वर्षति राम सुयश वर वारी' (२) 'सुकृत मेघ वर्षति सुखवारी' (३) 'पोषि राम सुप्रेमा पाणी' (४) 'शमयमनियमचि फुले ज्ञान फल । हरिपदरति रस वेद वदे कल' 'रस कि जलाविण कधी खगपते' इतकी वचने येथे लागू पडण्यासारखी दिसतात. परंतु २ मध्ये सुकृत शब्दाने कर्ममार्ग सुचविला म्हणून ते गळले, कारण येथे रघुपतिभक्ति हा विषय आहे. पण नक्की तेच वचन टीकाकारांनी घेतले आहे. याचेच नांव बेसावधपणा - सावधानता नाही!

(ग) सुदास रूपी साळीची वृद्धि चांगली होऊंन तिला रघुपतिभक्ति रूपी फळ आणणारे पाणी पाहिजे. 'निघे सुभग कविता सरिता ती । रामविमल यश जल भरिता ती ॥ पोषि रामसुप्रेमा पाणी' (१/४३/३) रामविमलयश रूपी पाणी जे रामसुप्रेमाचे पोषण करते तेच येथे योग्य हे आता मान्य होईल. 'वर्षति राम सुयश वरवारी' 'वर्षा घोर असुर रणभारी । सुरकुल शालि सुमंगलकारी' हे कीर्तिसरितेध्याच रूपकात आहे.

(घ) साळीच्या पिकाला श्रावण भाद्रपद महिन्यांत भरपूर पाऊस लागतो. हे दोन महिने म्हणजेच रा म. भाव हा की या दोघांच्यावरच रामविमल यश प्राप्ती होणे अवलंबून आहे. हे दोन महिने नसले तर 'रामसुयश वर वारी नाही' म्हणून रामभक्तिरूपी रसाचे पोषण व त्या साळीत भरण होणार नाही आणि मग स्वान्तः सुखरूपी उत्तम आंबेमोहोराचे तांदूळ मिळणार नाहीत. इतर पिके पूर्वीच्या व

नंतरच्या पावसाने मूग, उडीद, ज्वारी, हरभरे इत्यादि पिकतील पण ही हवनीय नाहीत. सारांश हा की 'राम' ही दोन अक्षरे एकापुढे एक नाहीत, तर रघुपति भक्तिरूपी वर्षाऋतु नाही, कोरडा वर्षाऋतु. हेच सार आणखी एका रूपकाने पुढे सांगितले आहे. (१/३२ व ३/४२) मानसातील गूढ भावरत्नांचा शोध मानसात लागणार व लायला पाहिजे. आधार मानसात भरपूर भरून ठेवलेले आहेत हे आतापर्यंतच्या गूढार्थ चंद्रिकेत स्पष्ट दिसले असेलच. आता या दोह्यावरील मा. पी. टीका वाचून पहाव्या व काही निष्कर्ष निघाला तर तो घ्यावा. या लेखकाचा आग्रह नाही.

**संगति** – प्रेमभक्तिरूपी पीक- भात चांगले पिकण्यास चित्रा नक्षत्राच्या तापी चांगल्या पडाव्या लागतात. हाच शरदातील कडक उन्हाळा. यात आकाशनिरभ्र पाहिजे व उष्णता आणि प्रकाश स्वच्छ भरपूर पाहिजे. हे दोन्ही 'राम' या अक्षरानीच संभवते हे आता सांगतात.

हिं.- **आखर मधुर मनोहर दोऊ । बरन बिलोचन जन जिय जोऊ ॥१॥**
**सुमिरत सुलभ सुखद सब काहू । लोक लाहु परलोक निबाहू ॥२॥**

म.- **दोन्हि अक्षरे मधुर मनोहर । वर्ण विलोचन दासजीव तर ॥१॥**
**स्मरत सुलभ सकलां सुखदायक । लाभ लोकि परलोक निभावक ॥२॥**

**अर्थ** – ही दोन्ही अक्षरे (आखर, राम) मधुर व मनोहर आहेत. वर्णादिकांत पाहण्यासाठी दोन डोळे असून दासांचे तर जीव (की प्राण) आहेत. ॥१॥ ते स्मरण करण्यात सुलभ (सोपे)असून सर्वांना सुख देणारे आहेतच. या लोकांतील (ऐहिक) लाभ देऊन परलोकाचा (मोक्षादिकांचा) निर्वाह करणारे आहेत. ॥२॥ (तुलसी शालि सुदास दो. प.)

**टीका** – चौ. १ - (१) दोन्हि अक्षरे मधुर मनोहर – रामनामाचा जप वैरवरीने व मानस पण केला जातो. ही दोन्हीं अक्षरे जिव्हेने उच्चार करण्यास मधुर व मनाचे हरण करणारी आहेत. ही दोन्हीं अक्षरे इतर विषयांतून मनाला सोडवितील. मनाला जे गोड वाटते तेच इंद्रिये करतात; पण इंद्रिये कोणतीही गोष्ट मनाविरूद्ध का होईना करीत राहिली की मनाला त्या गोष्टीची गोडी वाटू लागते, हे नव्यानेच शाळेत जाणाऱ्या बालकांत सहज दिसते, जे आवडत नव्हते ते सवयीने फार आवडू लागते; म्हणूनच 'लालयेत् ताडयेत, चित्त बालकम्' असे सुज्ञ म्हणतात. 'या मनाचे एक निकें। देखिल्या गोडीच्या ठाया सोकें'. म्हणूनच 'हे जिव्हे रससारज्ञे सर्वदा मधुरप्रिये । रामनामाख्यपीयूषं पिब शुद्धं निरंतरम्' असे जिभेला सांगावे लागते. 'कूजंतं राम रामेति मधुरं मधुराक्षरम्' (रा. रक्षा) मधुरस्तु प्रिये स्वादौ रसे च रसवत्यापि' (हैमः) मधुर – प्रिय, स्वादिष्ट व रसाळ; हे तिन्ही गुण रामनामात आहेत पण अनुभवाने कळतात. (२) वर्णविलोचन दास जीव तर – या

चरणाचे अंधगजन्यायाने अनेकांनी अनेक अर्थ केले आहेत, पण मागील दोह्याशी संबंध काय हें कोणी पाहिले नाही.

(क) वर्ण – 'वर्णानां अर्थसंघानां रसानां छंदसामपि' यांत सांगितलेल्या चार गोष्टींनी युक्त असलेले वेदपुराण आगमादि ग्रंथ. एका शब्दाने बाकीचे शब्द व इतका अर्थ कसा घेता येईल? जसा 'मान मात्र जहँ एकउ नाहीं' (३/१५/७) यातील मान नाही शब्दांनी 'अमानित्वमदंभित्वमहिंसाक्षान्तिरार्जवम्' पासून 'एतज्ज्ञानमिति प्रोक्तं' पर्यंत (भ. गी. १३/७-११) चे सर्वश्लोक मानसाबाहेरचे घेतले जातात व अर्थ केला जातो तसा नव्हे तर मानसातीलच व मंगलाचरणाच्या पहिल्याच श्लोकातील घेता येतो. भाताच्या पिकाचे धान्य- तांदूळ मिळवावयाचे आहेत. त्यास रामचरित्र कीर्तिरूपी जोराचा पाऊस पाहिजे तो मिळविण्याचे साधन येथे सांगतात. 'वेदपुराणे पर्वत पावन। रामकथा रुचिराकर पार न ॥ मर्मी सज्जन सुमति पहारी। ज्ञान विराग नयन उरगारी ॥ सोधिल जो प्राणी सद्भावे । सब सुखदानि भक्तिमणि पावे.' (७/१२०/१३-१५) ज्ञान विराग हे दोन डोळे आहेत तेच येथे राम हे वर्णांचे विलोचन आहेत. 'रा' ज्ञान व 'म' वैराग्य हे ठरले. मागील संगति पहा. (पृ २३१) ज्ञान वैराग्य या दोहोंत प्रकाश व तेज- उष्णता असतातच. यांच्या साह्यानेच भात साळी कापून झोडण्यास पक्व होतील. मग तांदूळ भक्ति व क्षुधा-शांति रूपी भवभय नाशाने मिळणारे स्वान्तः सुख मिळेल. 'तृप्तिहितास्तव करिति भोजना । पचवि जसे जठरानल अशना । भक्ति करत यत्नां विण कष्टां । संसृतिमूल अविद्या नष्टा' (७/११८/९-८) तसेच रा व म यांच्या साह्याने ज्ञान वैराग्य नेत्र मिळतात व ते परभारे अविद्येचा नाश करतात व मग भक्ति मिळते. 'ढाल विरति, असि बोध, रिपु मदमोहादि वधून जय मिळतो हरि भक्तिती' (७/१२० म) बोध= ज्ञान, यांनाच वर दोन विलोचन म्हटले.

(ल.टे) उपक्रमांतील बालकांडातले स्पष्ट या अस्पष्ट सिद्धान्त उपसंहारात उत्तरकांडात कसे स्पष्ट केले आहेत हे पाहिले म्हणजे आश्चर्य वाटते; व केलेल्या अर्थाला बळकटी येऊन कपोलकल्पित अर्थ करण्याची वेळ येत नाही. 'रिपुमद मोहादि वधून' हे पुढल्या चौपाईत स्पष्ट होईल.

(३) दासजीवतर – दासांना निष्काम भक्तांना रा व म जीव की प्राण वाटतात. 'मुनि धन, जन सर्वस्व शंभु-असु' (१/१९८/२) असु - प्राण. हे रामाविषयी म्हटले आहे. हे राम (लक्ष्मणासारखे) हरिभक्तांना फार प्रिय वाटतात व शंकरांना तर प्राणच. रा तत्पद व म त्वंपद म्हणजेच हृदिस्थ ईश्वर व जीव. (हा भाव चौथ्या चौपाईत स्पष्ट होईल).

चौ २ (१) स्मरत सुलभ – नाम स्मरण याचा अर्थ जिभेने उच्चार करणे असा मानसात काही ठिकाणी असला तरी तो येथे घेता येत नाही. कारण पुढल्याच चौपाईत 'कहत' शब्दाने हा अर्थ सांगितला आहे. येथे भाव हा आहे की मागील चरणांत सांगितलेले ज्ञान व वैराग्य नाम स्मरणाने सुलभ रीतीने इतर कांही प्रयास

न करता मिळते व त्यामुळे अविद्या विनाशासाठी कष्ट करावे लागत नाहीत. 'भक्ति करत यत्नां-विण-कष्टा । संसृति मूल अविद्या नष्टा।' (७/११९/९) नामस्मरण हे तर भक्तिवधूचे वस्त्रच आहे; व भक्ति वर्षाऋतूंतील श्रावण भाद्रपदमास आहेत. 'तेषामेवानुकम्पार्थमहमज्ञानजं तमः । नाशयाम्यात्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता' (भ. गी.)

(क) अशा रीतीने रा म सर्वांनांच सुख देण्यास सिद्ध आहेत. येथे जाति वर्ण आश्रम, धर्म, स्त्री, पुरुष, बाल, वृद्ध इत्यादि अधिकार भेद नाही.

(२) **लोकिं लाभ परलोक निभावक** – या लोकातील - या जगांतील, सुखासाठी लागणारी सर्वसाधने म्हणजेच भोग प्राप्त होतात.

(क) व परलोकाचा निर्वाह करतात म्हणजेच परलोक मोक्षभक्ति साधन शेवटपर्यंत निभावून नेण्यात अडचणी येऊ देत नाहीत. सार हे की ज्ञानवैराग्य प्राप्तीनंतर त्यांत कामक्रोधादि विकार उत्पन्न होऊ देत नाहीत; सर्व मानसरोगांचा संहार करतात.

(ख) मागील चरणांत सांगितले की सुखदायक आहेत; त्याचाच अर्थ या चरणात स्पष्ट केला. ऐहिक व पारमार्थिक सुख यांनी मिळेल, दोन्हीसुद्धा मिळतील. श्रुति माऊली हेच सांगते 'भुक्तिमुक्तिप्रदंचैतत्' (रा. र. उ. ५/१५) म्हणजेच आर्त जिज्ञासु, अर्थार्थी, ज्ञानी, सिद्ध, साधक, योगी इत्यादिकांच्या ज्या ज्या इच्छा असतील त्या पूर्ण होतील. हा सिद्धान्त बावीसाव्या चौपायांत विस्तारपूर्वक सांगितला आहे व दो. २६ मध्ये उदाहरणे दिली आहेत. या चौपाईत प्रथम चरणांत मंगलभवनत्व दाखविले व द्वितीय चरणांत अमंगलहारित्व कथिले. 'मंगलभवन अमंगलहारी' हा मागला सिद्धान्त (१०/२) स्पष्ट केला.

(ग) **संगति** – हे तुमचे नाम ऐकण्यास व उच्चारण्यास कठीण कठोर असेल वगैरे शंकानिरसनार्थ पुढील चौपाई आहे.

**हिं.- कहत सुनत सुमिरत सुठिनीके । राम लखन सम प्रिय तुलसी के ॥३॥**
**बरनत बरन प्रीति बिलगाती । ब्रह्मजीव इव सहज सँघाती ॥४॥**

**म.- स्मरत वदत परिसत अति शोभन । तुलसी प्रिय सम राम नि लक्ष्मण ॥३॥**
**वर्णत वर्णा प्रीति न टिकते । ब्रह्मजीव सम सखे सहज ते ॥४॥**

**अर्थ** – ती दोन अक्षरे उच्चारण्यास ऐकण्यास व स्मरण करण्यास अति चांगली आहेत. तुलसीदासाला तर राम आणि लक्ष्मण यांच्या इतकी प्रिय आहेत ॥३॥ या अक्षरांचे पृथक् पृथक् वर्णन करण्याने प्रीति टिकत नाही; कारण ते वर्ण ब्रह्म व जीव यांच्या सारखे सहज सखे (साथीदार) आहेत ॥४॥

**टीका – चौ - ३ (१)** – रा म ही अक्षरे उच्चार करण्यास अगदी सुलभ, सोपी, सर्व दात पडून गेलेल्या माणसास सुद्धा अडचण नाही. कारण यांत ल, लृ त वर्ग

किंवा स यांचा मुळींच संबंध नाही. दात नसले तर तथवधन इत्यादीच्या उच्चारास त्रास पडतो. यांत जोडाक्षर नाही, कठोर वर्ण नाहीत, छ, ग्र, ड, ढ. ण, ष, ल, क्ष, ख, ठ. फ. घ, ध, भ ज्ञ इत्यादि वर्णांचा व जोडाक्षरांचा उच्चार करण्यास अधिक कष्ट पडतात तसे यांत होत नाही. सोवळे ओवळे शुचि अशुचि वगैरे नियमांचे पालन केलेच पाहिजे असे नाही. जातिधर्मादि प्रत्यवाय नाही. हा तीन प्रकारचा चांगलेपणा झाला.

(२) अति शोभन – अति शुभ, मंगल कारक, 'नामहि शुभद जयाचे, श्रवणी' (१/१९३/५) 'घेता ज्याचे नाम हि जगती । सकल अमंगलमूल भंगती' (उच्चार) (१/३१५/२) 'यद्यमहिं पायक अधतूला। यत्स्मृति सकल सुमंगल मूला,' नामस्मरण सुमंगलाचे मूळ (२/३४८/२) 'पापिहि ज्यांच्या नामा स्मरती । अति अपार भवसागर तरती' (४/२९/३)

(३) प्रिय सम राम नि लक्ष्मण – 'हे प्रिय सर्वा जितके प्राणी' (१/२१६/७) हे राम लक्ष्मणाविषयी म्हटले आहे. सर्वांना प्रिय असतो आत्मा. 'सब से जीव प्यारा,' तशीच रा व म हीं अक्षरे तुलसीदासास प्रिय आहेत. म्हणजेच जेवढे प्रेम आपण आपल्यावर करतो तेवढे या रा म वर करावे हा उपदेश आहे. रामलक्ष्मण जितके व जसे कल्याण करणारे सुंदर, पवित्र, उदार, कृपाळू, सरळ, धीर, वीर व अनंत शुभगुणमंडित आहेत तसेच हे वर्ण आहेत. सुचविले की प्रत्येक अक्षर गुणनिधान आहे. जणू ही अक्षरे म्हणजेच राम व लक्ष्मण; रा–राम, व म-लक्ष्मण. ल. टे. – कि. कांड मंगलाचरण श्लोक पहिला दुहेरी अर्थाचा असून त्यांत लक्ष्मणराम यांच्या वर्णनाच्या निमित्ताने म व रा या अक्षरांचा प्रभाव समान आहे हे दाखवून म रा आणि लक्ष्मण राम यांचे पूर्ण समानत्व सिद्ध केले आहे. तेथे मुख्य आधार या चौपायांतलेच उपयोगी पडले आहेत.

चौ. ४ (१) – 'वर्णत वर्णा प्रीति न टिकते' – या दोन वर्णांचे निरनिराळे वर्णन करणे योग्य नाही; कारण त्यांच्यांत तशी समानता दिसत नाही. रा मूर्धन्य, म औष्ठ्य अन्तस्थ व म स्पर्श आहे; र यवर्गापैकी तर म पवर्गापैकी; असा भेद दिसतो; जसा राम व लक्ष्मण यांत वर वर नामरूप इत्यादिकांत दिसतो. अशारीतीने यांचे अलग अलग वर्णन करून भागणार नाही. रामलक्ष्मण दोन दिसत असले; त्यांची कार्ये निरनिराळी दिसत असली तरी ते एकमेकांस सोडून रहात नाहीत. दण्डपताका यांची व लक्ष्मण-राम यांची आठवण करावी म्हणजे यांचे परस्परावलंबित्व कळेल. दोघे मिळून सर्वास सुखदायक होतात. जनकपुरवधू, विश्वामित्र, परशुराम, जनकराजा, चित्रकूटच्या मार्गावरील ग्रामस्थ, खरदूषण, शूर्पणखा इत्यादिकांस दोघे मिळूनच सुखद झाले आहेत. परशुरामाने तर दोघांची एकत्रच स्तुति केली आहे. किष्किंधाकांड श्लोक 'कुन्देन्दीवरसुन्दरौ' यांत सर्व विशेषणे दोघांना आहेत. ती याचसाठी की उपाधिभेद जरी दिसत असला तरी दोघे एकच आहेत. असेच या दोन अक्षरांचे आहे. 'श्याम गौर सुन्दर हे भ्राते।

आनंदा आनंद हि दाते । यांची प्रीति परस्पर पावन । वदवेना, शोभन मनभावन' ।। 'मुदित विदेह बदे श्रुणु मुनिवर । ब्रह्मजीवसे स्नेहि सहज बर ।।' (१/२१७/२-४) असेच रा आणि म यांचे आहे. त्यास भिन्न म्हणावे तरी चूक, अभिन्न म्हणावे तरी चूक, भिन्नाभिन्न म्हणावे तरी चूक किंवा या तिहींहून निराळे म्हणणे चूक. यांचा संबंध अनिर्वचनीय, स्वसंवेद्य आहे. हा आहे निष्कर्ष, याचे कारण सांगतात.

(२) ब्रह्मजीव सम सखे सहज – येथे उपनिषदातील एक 'द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषश्व जाते' हे नेहमी एकत्र राहणारे दोन पक्षी- जीव व शिव जुळे आहेत, ते सखे आहेत, एकमेकांस सोडून रहात नाहीत. एकमेकांस परस्परावाचून चैन पडत नाही. हे देहरूपी एकाच वृक्षात राहतात व हृदयरूपी घरटे केले आहे.

ल. टे. लक्ष्मण मात्र जीवभावनष्ट झालेला विशुद्ध जीव आहे. लक्ष्मण हा विश्वाभिमानी स्थूलदेहाभिमानी चे प्रतीक आहे; तथापि लक्ष्मणाने तीन अवस्था तीन गुण यांचा त्याग केलेला आहे; त्यामुळे तो रामस्वरूपच झाला आहे. जाग्रदवस्था उर्मिला, स्वप्नावस्था श्रुतकीर्ति व निद्रावस्था मांडवी आहे. या तिघींना सोडून तो तुर्या सीता व प्रत्यगात्मा ब्रह्म राम यांच्या संगतीत वनात आला. (१/३२५/४) टी. प.) त्याने निद्रा व भोजनादि त्यागले होते. उपाधित्यागाने ईश्वर व जीव यांचे ब्रह्मैक्य आहेच, म्हणून 'प्रीति न टिकते' व 'यांची प्रीति परस्पर पावन' असल्याने दोघांचे निरनिराळे वर्णन करणे योग्य नव्हे. दोघांत (ब्रह्म जीव) अभेद आहे तो या रा आणि म च्या साह्याने अनुभवास येतो. स्वसंवेद्य होतो. मागे दुसऱ्या चौपाईत जे ध्वनित केले होते ते येथे स्पष्ट सांगितले.

विशेष ल. टे. – या दोन अक्षरांच्या वर्णनांत मागील चौपायांसुद्धा, तीन उपमा दिल्या. १ विलोचन उजवा-डावा (ज्ञान विराग चौ १) २. रामलक्ष्मण-स्वामी सेवक (चौ ३). ३. या चौपाईत ब्रह्म जीव (अंशी अंश). तिहींत मुख्यांचा उल्लेख, (म्हणजे वराचा उल्लेख) प्रथम केला.

(क) मधुर मनोहर – ने बालकांडातील विश्वामित्र गमनापर्यंतचे चरित्र सुचविले. रामलक्ष्मण बरोबर निघाले याने अयोध्याकांड सुचविले. सहजसखे अरण्यकांडांत दिसतात म्हणून अरण्यकांड सुचविले; लक्ष्मणाने मित्राप्रमाणे रघुनाथाचे सांत्वन केले आहे; शूर्पणखाविरूपीकरण लक्ष्मणानेच केले. रा=राम आणि म=लक्ष्मण' हे येथवर सिद्ध झाले.

(ख) हा क्रम पुढील चौपाईपासून बदलला आहे व ती पाचवी चौपाई आहे. दो. १९ मधील पाचवी चौपाई उलट्या क्रमाचा प्रभाव सांगणारी आहे. हे टीकेत स्पष्ट झाले आहे. 'उलटा जपुनी विशुद्धि बाणे' येथल्या पाचव्याच चौपाईत उलट्या नामांतील अक्षरांचा प्रभाव सांगतात. म=लक्ष्मण आणि रा=राम हे कथित आहेच. म्हणून गौणाचा उल्लेख प्रथम आणि मुख्याचा नंतर पाहिजे असे ठरले की ब्रह्म व जीव समान आहेत - अभेद आहे 'जीवो ब्रह्मैव न अपर:' हा सिद्धांत निश्चित

होईल हेच पुढील चौपाईत केले आहे. **सारांश – पहिल्या चार चौपायात राम या मंत्राचे महत्व सांगितले; पुढील चार चौपायांत मरा मंत्राचे महत्व दर्शवितात.** दोघांच्या वर्णनात चार चार चौपायाच घालून त्या रीतीनेही समानत्व दर्शविले आहे. **अशी ही काव्यकला अद्वितीय नाही काय?**

हिं.- **नर नारायन सरिस सुभ्राता । जग पालक विशेषिजन त्राता ॥५॥**
**भगति सुतिय कल करन बिभूषन । जग हित हेतु विमल विधु पूषन ॥६॥**

म.- **नरनारायण सम सुभ्राते । जगपालक दासा सुत्राते ॥५॥**
**भक्तिसुस्त्रि कल कर्ण विभूषण । विश्वहितार्थ विमल विधु पूषण ॥६॥**

**अर्थ** – (म आणि रा हे दोन वर्ण) नर-नारायणासारखे उत्तम भाऊ (बंधू) असून ते जगाचे पालक व हरिभक्तांचे विशेष (सु) संरक्षक (त्राते) आहेत ॥५॥ ते भक्ति रूपी सुंदर सौभाग्यवती स्त्रीच्या कानांतील कर्णभूषणे आहेत व जगाच्या कल्याणासाठी निर्मल निर्दोष' चंद्र व निर्दोष सुर्यासारखे आहेत॥६॥ (बिधु-विधु, सुतिय-सुस्त्री)
**टीका – चौ. ४ (१) नरनारायण** – यांत नारायण वडील भाऊ व नर धाकटा असे असता क्रम उलटा आहे. याविषयी वर लिहिले आहे.
(क) नरनारायण सनातन ऋषि आहेत. नारायण वडील बंधु असल्याने त्यांच्या आश्रमाला **नारायणाश्रम** नांव आहे. हा नारायणाश्रम म्हणजे आजचे बद्रीनारायण नव्हे. हा आश्रम हिमालयात आणखी पुष्कळ पुढे आहे असे म्हणतात. हे जगाचे पालन कसे करतात हे वेदस्तुति वरून स्पष्ट केले. एकदा नारद-'सनातनमृषि द्रष्टुं ययौ **नारायणाश्रमम्** ॥५॥ यो वै भारतवर्षेऽस्मिन् क्षेमाय स्वस्तये नृणां। धर्मज्ञान शमोपेतमाकल्पादास्थितस्तपः ॥६॥ सनातन ऋषि नारायणाचे दर्शनासाठी नारद एकदा नारायणाश्रमात गेले ॥५॥ ते नारायण ऋषि या भारतवर्षात मनुष्यांच्या (जीवांच्या) कल्याणासाठी व क्षेमासाठी कल्पाच्या आरंभापासून धर्म-शास्त्र-शमदमादियुक्त तपश्चर्या करीत असतात. (भाग १०/८७) महाराष्ट्रांत नरनारायणांची मंदिरे आहेत; कारण ते कधी कधी अवतार घेतात. म्हणूनच हनुमंताने रामलक्ष्मणांस ओळखण्यापूर्वी विचारले कीं 'नरनारायण की तुम्हि दोनी' (४/१/१०)
(ख) आपल्या तपश्चर्येच्या प्रभावाने ते भारत वर्षातील जीवांचे पालन करतातच पण हरिभक्तांच्या भक्तिसाधनांत येणारी विघ्ने, नरनारायण स्वतः विविध रूपाने जाऊन सूक्ष्मरूपाने अंतःकरणांत प्रेरणा देऊन निवारण करतात, म्हणून 'दास सुत्राते' (बिसेषि जन त्राता) असे म्हटले.
(२) **सुभ्राते** – (हिंदीत वाचताना 'सु' ऱ्हस्व वाचले पाहिजे) सु-सुंदर, बलवान व अति हे तिन्ही अर्थ येथे ग्राह्य आहेत. ते सुंदर, बलवान व सर्व भावनांत श्रेष्ठ आहेत म्हणनूच रामलक्ष्मणास पाहिल्यावर हनुमंताला वाटले कीं नारायण आणि नर असावेत.

(क) उलट्या राममंत्राच्या (मराच्या) जपाने जगाचे पालन करण्याची व भक्तांचे संरक्षण करण्याची शक्ति येईल. पण असा जप धर्मज्ञानशमदमादियुक्त तपश्चर्या करणारांनीच करावा. वाल्मीकि- रामायणाने जगाचे पालन व भक्तांचे रक्षण होऊ शकते हे अनुभवाने सिद्ध आहे.

(ख) ज्यावेळी काही अडचण येईल, विचार सुचणार नाही त्यावेळी श्रीराम श्रीराम असा सारखा भराभर उच्चार केला की ते कार्य होते हे प. पू. बाबा गंगादासांच्या बाबतीत शेकडो वेळां प्रत्यक्ष पाहिलेले आहे. अशावेळी बाबा म्हणत की, 'बाबू! देख, गोसाँईजीकी बानी कैसी अटल है!' इत्यादि. हे सरळ नामाने घडते मग उलट्या नामाचे काय सांगावे? हा जप कोणी करावा हे पुढील चौपाईत सुचवितात.

चौ ६. (१) या चौपाईत विधु- चंद्रव पूषण-पूषन्-सूर्य ही उपमाने आहेत. सूर्य आत्मा व मन चंद्र आहे. चंद्रापेक्षा सूर्य अधिक श्रेष्ठ असता चंद्राचा उल्लेख आधी करून म रा हा क्रम सुचविला. 'शीतल सुभग भक्त सुख दाते' (१/१७/५) असे लक्ष्मण आहेत.चंद्र शीतल, सुभग व त्याच्या भक्तांना (उपयोग करणाऱ्यांना) सुखद असतो. येथे तर म - लक्ष्मण - चंद्र हे स्पष्टच दिसले. सूर्याचा ताप दाहक असतो तसा रा मधे दाहकारक र व सूर्यप्रतापासारखा आ - सूर्यबीज आहेच. रामप्रताप असाच खलांना दाहक आहे. 'रघुनाथा निज उदयमिषे रवि । प्रभू प्रताप नृपांना दाखवि ॥'

(२) **विमल विधु पूषण** — यांत विमल विशेषण दोघांनाही लावले आहे. 'प्रगट जिथे रघुपति शशि चारू' (१६/५) च्या टीकेत चंद्राचे बरेच दोष दाखवून ते रघुपतीच्या ठिकाणी नाहीत हे दाखविले आहे.

(क) **येथे विमलविधु** — म लक्ष्मण आहे, म्हणून सुचविले की चंद्राचे दोष लक्ष्मणात नाहीत. विशुद्ध जीव व ब्रह्म एकच हे पुन्हा सुचविले आणि सुचविले की सूर्याच्या ठिकाणी दोष आहेत ते भानुकुलभानु रामाच्या ठिकाणी नाहीत.

(ख) **सूर्यात दोष कोणते ते पाहू** — १) सूर्यावरसुद्धा डाग आहेत हे आधुनिक विज्ञान शास्त्रानेसुद्धा सिद्ध आहे. रामप्रताप अकलंकित आहे. २) सूर्याला राहू ग्रासतो ३) त्याला उदयास्त आहेत. ४) त्याचा एकदा जन्म झाला आहे. सूर्य अदितिपुत्र, म्हणूनच त्यास आदित्य म्हणतात. ५) जसा जसा वर येईल तस तसा अधिक ताप देतो. इतकेच नव्हे तर मृगजल - जलाचा आभास उत्पन्न करतो. राम किंवा मरा विश्वमृग जलाचा लय करतात. ६) सर्व देशांत, सर्वकाळी सारखी उष्णता व प्रकाश देत नाही. 'नाम प्रभाव वेदिहि चहुंयुगि' रामनाम वाटेल त्याला वाटेल त्या देशांत सुखदच असते. ७) प्रलयकाळी सूर्याचा नाश होतो. राम आणि त्याचे नाम नित्य आहे. ८) सूर्य कमलांना फुलवितो हे जितके खरे तितकेच हेहि सत्य आहे. की पाणी आटवून टाकून त्यास मारतो. 'करुनि कृपा जे कोप न करती' असे राम आणि नाम आहे. 'भानु कमलकुल पोषणकर्ता। होई जलविण त्या संहर्ता' (२/१७/७). ९) सूर्य नीचांना उष्णता, ताप देऊन त्यांना सुद्धा

परपीडक तापद बनवितो. रेताड जमीन सूर्याने तापविली की इतरांचे पाय भाजते. भरताच्या पायांना सुद्धा फोड आणले आहेत! १०) सूर्याकडे पुष्कळ वेळ पाहणारांस तो अंध बनवतो. रामाकडे व नामाकडे जितके जास्त पहाल तितके सुख जास्त मिळते. नामाच्या व रामाच्या कृपेने ज्ञान विराग नयन मिळतात. ११) सूर्याने स्वतःच्या पत्नीलाच शाप दिला आहे. राम व नाम कोणालाही शाप तर देत नाहीतच. पण शापाची गति कुंठित करू शकतात 'हरिला स्मरत शापगति बाधित' (१/१२५/४) अंबरीषाला दुर्वासाचा शाप बाधला नाही. १२) सूर्य व त्याचा पुत्र शनैश्चर यांचे शत्रुत्व, वैर, राम व त्यांचे पिता किंवा पुत्र यांत शत्रुत्व नाही. नाम आणि नाम सेवक यांत वैर नाही. जसे द्वादश आदित्य आहेत तसे आदित्याच्या ठिकाणी हे द्वादश दोष आहेत. चंद्र सोळा कलांचा तसे त्याच्या ठिकाणी १६ दोष आहेत 'रावणशशिराहू' ३/२८/६) च्या टीकेत पहावेत.

(३) सूर्यचंद्रांची उत्पति व अस्तित्व जगाच्या कल्याणासाठी आहे तसे रामनामाचे अस्तित्व दासांच्या उभयविध कल्याणासाठी आहे. फार काय नामभक्त सुद्धा नामासारखेच बनतात म्हणून हाच दृष्टान्त संतांना दिला आहे. 'संत उदय संतत सुखकारी । विश्वसुखद इव इंदु तमारी' (७/१२१/२१) **'आपणासारिखे करीतसे नाम । सोडूनिया काम सदा घेतां'** ॥प्रज्ञा.॥

(४) चंद्र शीतलता व अमृत देतो. म च्या योगाने हरिपदरतिरस मिळतो. व स्वांतःसुखरूपी पूर्ण शान्ती मिळते. 'मिटे **मोहशरदातप** भारी' ज्ञान प्राप्त होतेच. अमृत म्हणजे जन्ममरणांतुन सुटणे — मोक्ष मिळतो.

(५) **भक्ति सुतिय** — भक्ति सौभाग्यवती सुंदर स्त्री आहे. कर्णफुले हे सौभाग्याचे विशेष भूषण आहे. ते नसेल तर त्या सौभाग्याला शोभा नाही. बुच्ची म्हणतात तिला. तसेच रामनामावाचून भक्ताचे सौभाग्य पूर्ण होत नाही कर्णभूषणे गळून पडणे हे वैधव्य सूचक आहे. 'मंदोदरी उरि चिंता बसली । कर्णफुले जैं महिवर पडली ॥' (६/१४/६)

(क) नथ वगैरे सौभाग्यसूचक असून हे दागिने स्त्रिया रात्री काढून ठेवतात पण कुडी कर्णफुले काढत नाहीत. याने सुचविले की—

(ख) **रामनामाचा ध्वनी कानांत संततं श्रवण करता येणे हे श्रेष्ठ भक्तीचे साधन लक्षण आहे.** हा ध्वनी ज्यावेळी सुरू होतो तेव्हा कोणास डाव्या व कोणास उजव्या कानाने ऐकू येऊ लागतो. तथापि शेवटी स्थिर होतो उजव्या कानातच. म्हणून येथे राम आणि मरा दोन्ही सुचित होतात असे म्हटले पाहिजे. दोन्हीपैकी कशाचा जप केला तरी शेवटी रामच ऐकू येईल. येथे **परावाणीचा जप ध्वनित केला. हा चरण अनुलोम व विलोम या दोन्ही मंत्रांना लागतो. पुढील चरण विलोमलाच लागतो.**

(ग) सुस्त्री शब्दाने सती पतिव्रता हा अर्थहि सुचविला जातोच. याने अनन्य, **अव्यभिचारिणी भक्ति सुचविली.**

(घ) उत्तम पतिव्रतेचे सामर्थ्य मोठमोठ्या ज्ञानी मुनीपेक्षाहि फार मोठे असते हे अनसूया, लोपामुद्रादि पतिव्रतांच्या चरित्रावरून सुप्रसिद्ध आहे. त्रिदेव (ब्रह्मा, विष्णु महेश) तर तिची बालके होतात. भक्तीच्या ठिकाणी परमात्म्याला वश करण्याची शक्ति या रामनामातेच येते. 'भक्ति अवशा वश करी' (३/२६छं)

हिं.- **स्वाद तोष सम सुगति सुधा के । कमठ सेष सम धर बसुधा के ॥७॥**
**जन मन कंज मंजु मधुकर से । जीह जसोमति हरि हलधरसे ॥८॥**

म.- **स्वाद-तोष सम सुगति सुधेचे । कमठ शेष सम धर वसुधेचे ॥७॥**
**जन मन कंज मंजु मधुकरसे । जीभ यशोदे हरि हलधर से ॥८॥**

**अर्थ** – सद्‌गति रूपी सुधेच्या स्वाद व तोषा सारखे हे दोन वर्ण आहेत; आणि कूर्मवशेष यांच्यासारखे वसुधेला धारण करणारे आहेत ॥७॥ दासाच्या मनरूपी सुंदर कमलांत हे दोन वर्ण सुंदर मधुकर आहेत; आणि जीभरूपी यशोदेला हरि (कृष्ण) व हल धरा (बलराम) सारखे आहेत॥८॥

**टीका** – चौ. ७ (१) कोणत्याहि रसाचे पान करताना प्रथम स्वादाचा अनुभव येतो; तथापि तृप्ति मिळविणे हे रसपानातील मुख्य ध्येय असते. म्हणून स्वाद गौण व तोष (तृप्ति) मुख्य आहे. म्हणून हा दृष्टांत मरा यांच्याबद्दल आहे असे ठरले म-लक्ष्मण व रा-राम, स्वाद रूचि जर प्रतिकूल असेल तर तो रस घेण्याला मन सहज तयार होत नाही; म्हणूनच वाल्हाला मरा ह्याचा जप शेवटी सांगावा लागला. त्याला मरा म्हणणे रूचत असे कारण ती त्याची सवय होती. उलटा मंत्र का दिला याचे एक कारण येथे सुचविलेले दिसते.

(क) **सुधा** – अमृत; याचे मोक्ष व प्रेमभक्ति हे दोन्ही अर्थ होऊ शकतात; पण मागील चौपाईत भक्ति सुखाचे विवेचन असल्याने व या ग्रंथाचा भक्ति हा विषय मुख्य असल्याने भक्तीने प्राप्त होणारे चार नित्य मोक्ष किंवा सगुणसायुज्य हा अर्थ घेणे योग्य आहे. रावणकुंभकर्णांना सगुण सायुज्य किंवा सालोक्य मोक्ष मिळाला; पण ते राम नाम घेत नव्हते त्यामुळे जिवंत असता स्वाद व तोष मिळाला नाही. ज्या सद्‌गतीत स्वाद व तोष येथेच मिळतील ती सद्‌गति श्रेष्ठ होय. अमृतपानाने देवत्व येते व स्वर्गगति मिळते पण ते अमृत येथे नाही हे इंद्रादि देवांच्या चरिताने स्पष्ट होते. रामनामामृत इहलोकी सुलभ आहे व येथेच स्वाद व तोष मिळतात.

(ख) रा. म. हे वर्ण मधुर आहेत असे पहिल्या चौपाईत सांगितले तर **मरा मधुर आहेत हे येथे स्वाद शब्दाने सांगितले.** पुढील चौपाईत मनोहरता दिसेल. स्वाद शब्दाने हे हि सांगितले की ज्याची जी रुचि असेल ती पुरविली जाते व त्याला पाहिजे असलेला संतोष मिळतो; कारण 'भिन्न रूचिर्हि लोकः'

(२) **तोष** – संतोष, या दोन वर्णांना संतोष मिळतो. सहज संतोषाशिवाय विश्राम मिळत नाही. 'कधि विश्रामा ठाव तात सहज संतोष विण' (७/८९) 'काम तिथे

स्वप्नी न सुख भासे' (७/९०/१) 'संतोषाविण काम न नासे' 'रामभक्तिविण काम न मरती' (७/९०/२) यांवरून ठरले की कामादि सर्वरिपूंचा नाश व रामभक्ति ही सर्व सहज संतोषाच्या अंतर्भूत आहेत. स्वातःसुख, विश्राम म्हणजेच सहज संतोष. 'लोकि लाभ परलोक निभावक' हे रा म चे महत्व सांगितले तेच मरा मधे आहे हे येथे दाखविले.

ल. टे. – चौथ्या चौपाईत सांगितलेली अभेदता मराच्या वर्णनांत कर्णफुले व स्वादतोष यांनीही दाखविली. कर्णफुलाला दोन भाग असले तरी खालचा व वरचा मिळून एक कर्णफूल होते. तसेच स्वाद व तोष एकाच अमृतांत एकरूपच असतात व ते निराळे करता येत नाहीत. पुढील कमठ शेष व हरिहलधर हे दृष्टांत असेच आहेत.

(क) 'स्थिर मन की कधि आत्मसुखाविण' 'विज्ञानाविण समता नाही' व समते शिवाय सहजसंतोष नाही. यावरून विज्ञान प्राप्त होते हे याने ठरले. राम नामाचा परावाणीचा जप श्रवण करू लागल्याने **विज्ञान व भक्ति यांची समस्थिति राहते** हे सुचविले.

**चरण दुसरा** – (१) 'कमठ शेषसम धर वसुधेचे' कमठ व शेष यांचा संबंध आधार व आधेय (आश्रित) असा ज्याप्रमाणे ब्रह्मांडात आहे; त्याप्रमाणे पिंडात म्हणजे शरीरांतहि आहे.

(क) समुद्रमंथनाच्या वेळी मंदराचलाला आधार म्हणून भगवंतांनी कूर्मावतार घेतला. देवांनी प्रभूची पूजा केल्यावर प्रसन्न झाले व वर मागा असे सांगितले. आपण कूर्मरूपाने पृथ्वी धारण करावी असे त्यांनी मागितले. तेव्हा पृथ्वीधारण करणाऱ्या शेषाला आधार म्हणून प्रभु कूर्मरूपाने राहिले. कूर्माच्या पृष्ठावर शेष व शेषाच्या शीर्षावर ब्रह्मांड असा आश्रय-आश्रित संबंध आहे. यांत आश्रय म्हणून कूर्म मुख्य ठरतो व शेषाच्या खाली कूर्म म्हणून शेष मुख्य ठरतो; म्हणून हा **चरण राम आणि मरा या दोघांहिकडे** लागतो.

देहामध्ये यांचा असाच संबंध आहे, वसुधा- देह, पृथ्वी - पृथ्वीतत्वाचे स्थान देहामध्ये मूलाधार चक्र. त्याच्या खाली गुदाच्या वर दोन अंगुळे व मेंढ्राच्या दोन अंगुळे खाली कन्द म्हणून स्थान आहे. हा कंद प्रत्येक जीवाच्या देहांत असतोच, पण याचा आकार अंडज स्वेदज व जरायुज यांच्यात भिन्न भिन्न असतो. हाच देहांतला कूर्म. यालाच कोणी देहमध्य, कोणी नाभिकंद व कोणी तुन्द म्हणतात. या कंदाच्यावरच देहांतील शेष असतो - आहे. तो एका कुण्डलाकार नाडीत आहे. या शक्तीलाच कोणी कुंडलिनी म्हणतात. हिलाच (Serpent Power) असे इंग्रजी ग्रंथात म्हणतात. (जाबाल दर्शन, योगशिखा व योगचूडामणि उपनिषदे पहावी) या शेषावरच सर्वांचे प्रापंचिक व पारमार्थिक जीवन अवलंबून आहे.

(क) शेष उच्छिष्ट ब्रह्म; उत्+शिष्ट+ब्रह्म, म्हणजे नंतर शिल्लक राहिलेले ब्रह्म, ब्रह्मांडाची रचना करून मायायुक्त जे शेष राहिले तो ब्रह्मांडातील शेष; आणि

पिण्डाची रचना करून जे शेष राहिले तो पिण्डातील शेष. (अथर्वण वेद ११/७/१-२७ पहा उच्छिष्ट ब्रह्मसूक्त).

(ख) शेष 'सकलधर्मधरणीधर शेषहि' संतत राम नाम जपत राहील व इतर कोणतीहि क्रियाकर्मादि करणार नाही. (जसे वाल्हाने केले) तर त्यास वर्णाश्रमादि सर्व धर्मपालन न केल्याचा दोष नाही. 'काहींच न करोनि प्राणी । रामनाम जपे वाणी। तेणे संतुष्ट चक्रपाणी। भक्तांलागी सांभाळी' (दा. बोध) पण खाणे-पिणे झोपणे इत्यादि **काहीच न करणे** साधारण माणसांस शक्य नाही. कूर्म व शेष दोघे मिळूनच ब्रह्मांड धारण करतात म्हणून येथेहि अविनाभाव **राम** यामध्ये दाखविला. धर **याचा अर्थ आधार, आश्रय,** असाहि होतो.

(३) **तोष** – संतोष - हृदयात होत असतो - म्हणून याने **पश्यंतीचा जप** सुचविला. **मानसजप** पश्यंती वाणीने होतो. याचे दोन प्रकार आहेत. रूपध्यानयुक्त किंवा अर्थमननयुक्त. पुढील चौपाईत मध्यमेचा उपांशु व वैखरीचा जप सुचवितील; व दोन्ही अक्षरे मधुर मनोहर या उपक्रमाचा उपसंहार करतील.

**चौ. ८ - (१) जनमन कंज मंजु मधुकर से** आणि 'जनमनमंजु कंज मधुकरसे' असे दोन पाठ आहेत. पहिल्यात मंजु विशेषण कंज व मधुकर या दोघांकडे घेता येते. कारण ते दोघांच्या मधे आहे. दुसऱ्या पाठांत ते फक्त कंज यालाच लागते, म्हणून पहिला पाठ या आवृतीत घेतला आहे.

(क) हरिभक्तांचे मन हे सुंदर कमल आहे. त्यांत येऊन वसणारे हे दोन सुंदर मधुकर - भृंग आहेत. सुंदर कमलाने सुचविले, की ते प्रसन्न व रसयुक्त इत्यादि पाहिजे असे असले तरच मधुसंग्रह करणारे भ्रमर (मधुकर) येतील. 'पदकमल परागां रस अनुरागा' (१/२११छं) प्रेमभक्ति रस हाच येथे मधु पाहिजे तरच मधुकर त्याच्या लोभाने आकर्षिले जातील. म्हणजेच रामनामाचा गुंजारव आपोआप होत राहील. 'गुंजति चंचरीक मधुलोभे'(३/३/६) मधुकर मुख भेरि बहु सणाया' (३/३८/९)

(ख) **येथे उपांशु जप सुचविला.** आपला आपल्याला ऐकू येईल असा गुणगुणत होणारा जप. येथे मुद्दाम केला जाणारा घेता येत नाही; **कारण येथे राम मरा** हे मधुकर स्वतः येतात व गुंजारव करतात असा संबंध आहे. हा जप **मध्यमा वाणीत** होतो. याचे स्थान कण्ठ आहे. हे राम (मरा) **मधुकर येतात कुठून?** हे परेतून मूलाधाराजवळून पश्यंतीत - हृदयात येतात; पश्यंतीतून मध्यमेत कंठस्थानात (विशुद्धिचक्र) येतात व पुढल्या चरणांत सांगतील की जिभेवर येतात म्हणजेच वैखरीत येतात.

ल. ठे. – दोन मधुकरांत लहान मोठा, श्रेष्ठ कनिष्ठ हे ठरविण्यास मार्ग नाही, म्हणून या चरणाने मरा आणि राम हे दोन्ही घेता येतात.

(२) **जीभ यशोदे हरिहलधरसे** – (क) जीभ ही नन्दपत्नी यशोदा आहे. हीच नन्दाला - अपुत्राला पुत्रप्राप्तीचे व जगात सर्व प्रकारचे यश देण्यास कारण झाली.

यशोदा कृष्ण किंवा बलराम यांची जननी नाही. दोघेहि देवकीसुत पण तेथून मधुरेतून गोकुळात आले. तसेच राम किं मरा मुखरूपी गोकुळांतील राणी जी जीभ तिच्याजवळ कंठरूपी मथुरेतून आपण स्वतःच येतात. म्हणजेच रामनामाचा उच्चार मुद्दाम प्रयत्न न करता जिभेने आपोआप होऊ लागतो; व यशोदेमुळे नन्दासमुद्धा सर्वसुख, कीर्ति ऐश्वर्य इत्यादींची प्राप्ती सहज झाली; तशीच स्वभावतः आनंदस्वरूप असणाऱ्या जीवरूपी नंदाला सर्वसुख कीर्ति, ऐश्वर्य इत्यादि सहज मिळते. तो कृतकृत्य होतो. यशोदा म्हणजे यश देणारी जीभ आहे. किती सुंदर उपमा आहे.

ल. ठे. — हा चरण सुद्धा उभयान्वयी आहे म्हणजे राम आणि मरा या दोन्हींना लागतो; कारण बलराम दादा कृष्णाला वंद्य हे सर्वांस माहित आहे; असे असता त्याचे नाव मग व कृष्णाचे नाव प्रथम म्हणून मरा सूचित केले.

(क) व कृष्ण परमात्मा म्हणून श्रेष्ठ, यामुळे राम सुचविले गेले, यांतहि अभेदच सिद्ध केला. या दोन वर्णामध्ये दोघांनी मिळूनच धरणीभारहरण केले आहे.

**सिंहावलोकन** — १) विलोचन, २) रामलक्ष्मण, ३) ब्रह्मजीव, ४) नरनारायण, ५) कर्णविभूषण, ६) विधुपूषण, ७) स्वादतोष, ८) कमठशेष ९) मधुकर १०) हरिहलधर या दहा उपमांचा उपयोग केला आहे. पैकी १,२,३ केवळ राम या मंत्राला लागू आहेत. ४,६, ७ केवळ मरा मंत्राला लागू आहेत व ५,८,९ व १० या दोघांना लागू आहेत. अशा रीतीने दोहोचे समत्व सिद्ध केले.

(क) पहिल्या तीन उपमांचा राम चरित्राशी संबंध पूर्वी टीकेत दाखविला आहे. चौथी उपमा नरनारायण मरा निदर्शक आहे; व याच मंत्राचा महिमा 'कुन्देन्दीवर सुन्दरौ' या कि. कांडातील मंगलाचरणाच्या पहिल्या श्लोकात लक्ष्मण रामचंद्राच्या वर्णनाने सांगितला आहे. चौथे काण्ड काशीपुरी किष्किंधा आहे. काशी रामनाम प्रभावाने मुक्तिपुरी झाली म्हणून त्या काण्डांत रामनामाचे पुष्कळ वर्णन आहे.

(ख) पाचवी उपमा **भक्ति सुश्रीचे** — पतिव्रतेचे वर्णन करणारी आहे तर पाचव्या सुंदरकांडांत सती शिरोमणि सीतेचे मुख्य चरित्र आहे. सुंदरकांडात भक्तीची याचना मंगलाचरणातच केली आहे व हनुमान बिभीषणांना प्रेमभक्तिप्राप्ती याच काण्डांत झाली आहे. जानकी म्हणजे रामवल्लभा भक्तीच.

(ग) साहवी व सातवी उपमा मिळून लंकाकांडाचा साहव्या काण्डाचा विषय सुचवितात. लक्ष्मण व राम या विमल चंद्रसूर्यांनी राक्षसांचा संहार करून त्यास मोक्ष दिला; व देव, मानव आणि मुनि यांस स्वाद व तोष दिलाच.

(घ) शेष तीन उपमा व पुढील दोहा यांनी उत्तररामचरित्र सुचविले जाते. रघुनाथाच्या मस्तकावर मुकुट व महाराज छत्र त्याच काण्डांत भ्राजमान झाले आहे. त्या आधी पृथ्वीभारहरण केल्याने तो हलका होऊन कमठशेष सहज वसुधा धारण करू लागले. नंतर रामलक्ष्मण मधुकरांप्रमाणेच (विमानातुन आकाशमार्गाने) जाऊन सर्वांस भेटले आहेत. रामलक्ष्मण घोर संकटातून निभावून सुखरूप परत आल्याने

कौसल्येला हरिहलधरासारखेच प्राप्त झाले आहेत. नंतर राज्याभिषेक झाला त्याचे निदर्शन पुढल्या दोह्यांत आहे.

(ड) दोहा १९ च्या चौपायांत तीन बीजांसह राम नामाचा महिमा बीजरूपाने सांगितला. विसाव्याच्या चौपायांत सर्वांना विसावा देणाऱ्या सहज साथीदाराचा, रा म या वर्णांचा, महिमा वर्णिला व आता यांतील आ व अ या स्वरांना बाजूस ठेऊन र् व म् हे शेष राहिलेले जे रेफ व अनुस्वार त्यांचे महत्व दोह्यांत सांगतील. वरील चौपायांत ब्रह्मजीव ही नित्यस्थिति, नरनारायणांनी कृतयुग, रामलक्ष्मणांनी हे त्रेतायुग व हरिहलधरांनी द्वापर युगाचा संबंध रामनामाशी दाखविला. कलि युगात अवतार व्हावयाचा नसून कलि व कृत यांच्या मधल्या संधिकाळांत व्हावयाचा आहे. 'कलियुगि केवल नामाधारहि' हे सुचित केले. चारी युगांत नाम प्रभाव आहे पण कलीत विशेष करून आहे हे पुढे स्पष्ट सांगणार आहेत.

हिं. - **'एकु छत्रु एक मुकटमनि सब बरनन्हि पर जोउ ।**
**तुलसी रघुबर नाम के बरन बिराजत दोउ ॥२०॥**

म. - **छत्र एक पर मुकुटमणि वर्णशिरी बसतात ।**
**रघुवर नाम-वर्णयुग तुलसी विराजतात ॥२०॥**

**अर्थ** — सर्व वर्णांच्या डोक्यावर जे छत्र व मुकुटासारखे बसतात ते, तुलसीदास म्हणतात की रघुवर नामाचेच दोन वर्ण (तसे) विराजतात ॥२०॥

**टीका** — रकार असा राजछत्रासारखा व म् अनुस्वार असा मुकुटा सारखा सर्व अक्षरांच्या शिरावर विराजमान होतो. छत्राच्या आत खाली असा मुकुट असतो, तसाच अनुस्वार रेफाच्या खाली आत लिहिला जातो हे सर्वांस माहित आहे. हे दोन्ही स्वरहीन झाले म्हणून खाली इतरांच्या पंक्तीत असलेले, सर्व अक्षरांच्या डोक्यावर झळकू लागले. तसेच जे कोणी राम नाम परायण होतील ते स्वरहीन झाले (प्राणोत्क्रमण झाले त्यांचे) म्हणजे इन्द्रादि देवांपेक्षा श्रेष्ठ भक्त शिरोमणि, भक्तराज होतील यांत नवल काय?

(क) इतर अक्षरे स्वरहीन झाली की पराधीन होतात, व मागले अक्षर मृदु असले उच्चारांत तरी त्यास कठोरपणा आणतात. उदा. विवर यांतील 'व' स्वर हीन झाला की विव्र असे होईल; व पराधीन झाला आणि त्याने वि दीर्घ उच्चारावे लागते.

(ख) समानार्थी एक श्लोक चांगला आहे. 'यन्नामसंसर्गवशाद्धिवर्णौ नष्ट स्वरौ मूर्ध्निगतौ स्वराणाम् । तन्नामपादौ हृदिसंनिधाय देही कथं नोर्ध्वगतिं प्रयाति" (मा. पी.) 'नामजपे प्रभु करी प्रसादा। भक्तमुकुटता ये प्रल्हादा' (१/२६/४) ज्यांच्या नामाच्या संगतीच्या प्रभावाने दोन वर्ण (र म) स्वरहीन झाल्याबरोबर स्वरांच्या डोक्यावर गेले त्या रामचंद्राचे पाय हृदयांत धारण केल्यावर ऊर्ध्वगति का मिळणार नाही? मिळणारच.

(ग) पुढील चौपायांत प्रभूचे नाम व रूप यांचा संबंध सांगतात. मधुकराप्रमाणे येऊन राहतात असे जे सांगितले ते कसे घडते याची उपपत्ति सांगतात.

हिं.- **समुझत सरिस नाम अरु नामी । प्रीति परसपर प्रभु अनुगामी ॥१॥**
**नाम रूप दुइ ईस उपाधी । अकथ अनादि सुसामुझि साधी ॥२॥**
**को बड छोट कहत अपराधू । सुनि गुन भेद समुझिहहि साधू ॥३॥**

म.- **समजत सदृश नाम नी नामी । प्रीति उभयतां प्रभु - अनुगामी ॥१॥**
**नाम रूप युग ईश - उपाधी । अकथ अनादि विवेकी साधी ॥२॥**
**गुरु लघु कोण वदत अपराधू । श्रवत भेद गुणिं समजति साधू ॥३॥**

**अर्थ** – नाम आणि (नी. अरू) नामी (ज्याचे नाम तो) हे दोन्ही सारखे वाटतात. (समजले जातात), (पण) दोघांमधे स्वामी व सेवक यांच्यासारखे परस्पर प्रेम आहे ॥१॥ नाम व रूप या दोन्ही ईशाच्या उपाधि आहेत व त्या अकथनीय (अनिर्वचनीय) व अनादि आहेत हे विवेकी मनुष्य समजतो. (त्याला कळलेले असते) या दोहोत श्रेष्ठ कोण व कनिष्ठ कोण (मोठे लहान) हे सांगणे हा अपराध आहे; पण गुणांतील भेद ऐकला म्हणजे साधूना कळेल ॥३॥

**टीका** – (१) या चौपायांत नाम आणि नामी यातील भेद व साधकाच्या सुलभतेच्या दृष्टीने श्रेष्ठ कोण हे दाखवावयाचे आहे.

(क) नामाला नामीची अपेक्षा असते व नामीला नामाची अपेक्षा असते. काय हो एवढे सर्व मी केले पण माझे नाव सुद्धा कोणी उच्चारले नाही असे पुष्कळांस वाटते. यावरून ठरले की नामीला नामाची अपेक्षा असते. पण व्यक्ति, पदार्थ असल्याशिवाय नाम अस्तित्वांत येत नाही असा अनुभव व्यवहारांत येतोच. व्यक्ति गेली तरी नाव मागे राहते. व्यक्तीच्या नावाने जेवढी कार्ये होतात तेवढी ती व्यक्ति अनोळखी ठिकाणी गेली तर होत नाहीत. व्यक्ति आपल्या नावाला जपत असते. नाम व्यक्तीच्या गुणधर्मांचे चित्र चटकन मनश्चक्षुपुढे उभे करते. पण नामी नाव न सांगता जाऊन समोर उभा राहिला तरी शरीराच्या रूपाशिवाय इतर गुणधर्मांचे ज्ञान होत नाही. कोणी दरवाजा ठोठावला कीं कोण आहे? असे विचारतात. मी आहे! असे उत्तर आले तर मी म्हणजे कोण ? इत्यादि प्रश्न नाव कळेपर्यंत केले जातात, तरीपण नाम आणि नामी परस्परावलंबी आहेत हे मान्य करावेच लागते. म्हणून म्हटले की नाम-नामी दोन्ही समान आहेत असे वाटते. यांत सर्वसाधारणांची समजूत सांगितली.

(२) दोघांच्यांत परस्पर प्रेम कसे असते हे पूर्वीच्या विवेचनावरून ध्यानी आले असेल, तेच दृष्टान्ताने सांगतात.

(क) त्यांच्यात स्वामिसेवकासारखे प्रेम असते. नाम-नामी व प्रभु अनुगामी शब्द क्रमशः घेतले की नाम स्वामी प्रभु व नामी अनुगामी सेवक आहे; हा तुलसीदासांचा

सिद्धान्त आहे. हे स्पष्ट होणार आहेच; पण ज्यांना हे मान्य नाही ते नामी स्वामी प्रभु व नाम अनुगामी - सेवक असा अर्थ घेतील. नाम ऐकल्याबरोबर - हाक ऐकल्याने जो येतो तो सेवक नामसेवक असे म्हणणे जरूर आहे. ती हाक म्हणजे नाम स्वामी नाही असे कसे म्हणता येईल? उदाहरण पाहू '-प्रभु सीता-लक्ष्मणास रक्षति । बुबुळांना पापण्या जशा अति । सेविति बंधु सिता रघुवीरा । अविवेकी नर जसा शरीरा ॥(२/१४२/२)' 'पाहि नाथ प्रभु पाहि बोलले । छडी समान महीवर पडले ॥' (भरत २/२४०/२) 'तैं प्रभु उठले प्रेमाधिरहि । तूण कुठेंपट कार्मुक तीरहि' (राम २/२४०/८) वरील दोन्ही उदाहरणांत स्वामी राम व सेवक लक्ष्मण व सीता; तसेच स्वामी राम व भरत सेवक यांत लहान मोठा कोण हे कसे म्हणावयाचे? असेच प्रेम नाम – नामी यांत आहे.

**चौ. २** –(१) वरील चौपाईत नाम व नामी यांचा संबंध सामान्यतः वर्णिला. आता येथे ईश्वराच्या नामरूपांचा विचार करतात.

(क) ईश्वर अनादि अनिर्वचनीय म्हणून त्याच्या उपाधि हि अनादि व अनिर्वचनीय आहेत.

(ख) ईश्वर – अगुण ब्रम्ह+विद्यामाया ही उपाधि. या एका उपाधीने कधी नुसते नाम तर कधी दोन्ही उपाधि (नामरूप) त्यांना ग्रहण कराव्या लागतात. ईश्वर म्हणजेच शुद्ध उपाधियुक्त ब्रह्म, ती उपाधि त्यांच्या ताब्यात असते. 'ईशा वश माया गुणखाणी । माया विवशजीव अभिमानी' एवढा ईश व जीव यांच्या उपाधींत फरक आहे. उपाधि शब्दाचे अनेक अर्थ आहेत. पण त्या सर्वांचा अंतर्भाव या व्याख्येत होईल असे वाटते –**जे आपले गुणधर्मादिक नाहीत त्यांना आपल्या जवळ करणे किंवा ते आपल्याजवळ येणे**; 'धर्मचिंता, कर्तव्य, उपद्रव, पदवी,' इत्यादि अनेक अर्थ उपाधि शब्दाचे आहेत.

(२) जग अनादि आहे म्हणून मायेकडून त्याची पुनःपुन्हा उत्पत्ति स्थिति लयादि करणारा ईश्वर अनादि, म्हणून त्याची उपाधि माया अनादि, 'अस्ति भाति प्रियं नाम रूपंचेत्यंशपंचकं । आद्यमयं ब्रह्मरूपं नामरूपंतु मायिकम् ॥' माया अनिर्वचनीय आहे म्हणून मायामय नामरूपही अनिर्वचनीयच. असे आहे असे नाही असे काहींच निश्चित सांगता येत नाही. अशा या दोन्ही उपाधि आहेत. 'कार्योपाधिरयं जीवः कारणोपाधिरीश्वरः' (श्रुति) ईश्वराच्या शुद्ध सात्विक, विद्यामय उपाधींचा आश्रय करण्याने, म्हणजे नामरूप चिंतनाने अविद्यामय त्रिगुणात्मक उपाधितून जीव मुक्त होऊ शकतो. हे विवेकवान पुरुषांनी जाणले आहे.

(क) ईश्वराची सर्व नावे सच्चिदानंद हाच अर्थ सांगतात. हाच अर्थ त्यातून निघतो; म्हणून ती सार्थ आहेत. जीवांची नावे त्यांच्या स्वरूपाचा अर्थ सांगणारी नसून त्यांच्या देहाला व्यवहाराच्या सोईसाठी ठेवलेली असल्याने ती नश्वर आहेत; कारण की देह नश्वर आहेत. देह मेल्यानंतर नाव शिल्लक राहिले तरी त्या देहाचे चित्रच

ते पुढे उभे करते; व देहाच्या आश्रयाने जे गुणधर्मादि दिसले त्यांचा बोध ते करते. जीव स्वतः अनाम असून उपाधि रहित असा आहे (तत्वतः)

(ख) नामरूप अनादि आहेत असे मान्य केले की धाम नित्यवैकुंठादि सुद्धा अनादि आहेत असे ठरते. **'ज्ञान मोक्ष वैकुण्ठ'** हे प्रकरण प्रस्तावनेत पहावे. सार हे की या दोन्ही उपाधि अनिर्वचनीय असल्याने त्यांचे वर्णन शब्दांनी कितीही केले तरी संपणार नाही. कोणी असा प्रश्न विचारतील यातील श्रेष्ठ उपाधि कोणती ती सांगा. हेच पुढील चौपाईत सांगतात.

**चौ. – ३** (१) नाम मोठे की रूप मोठे म्हणजेच नामी मोठे, हे सांगणे फार कठीण आहे; जो तो आपल्या अनुभवाने ठरवितो. दोहोंपैकी कोणाही एकाने कृतकृत्यता प्राप्त होऊ शकेल. म्हणून कोणालाही मोठे किंवा लहान कमी म्हणणे हा अपराध ठरेल. दोन्ही अनिर्वचनीय आहेत म्हणून तो दोष ठरेल. भक्ति व ज्ञान यांत भेद काय असे विचारल्यावर 'भक्ति ज्ञानामधिं नहिं भेद' असे सांगितले; कारण दोघांचे मुख्य फळ 'उभय हरिति भवसंभव खेद' (७/११५/१३) हे एकच, तसेच फळाच्या दृष्टीने नाम आणि रूप सारखेच असे सांगतात. 'यत्सांख्यैः प्राप्यते स्थानं तद्योगैरपि गम्यते' असे सांगून पुढे बुद्धियोगाचे महत्व गीतेने गाइलेच व १२ व्या अध्यायात 'क्लेशोऽधिकतरस्तेषाम्' वगैरे सांगून ज्ञानमार्ग व भक्तिमार्ग यातले अंतर सांगितले, तसेच येथे करीत आहेत.

(२) **श्रवत भेद गुणि, समजति साधू** – (क) साधकाला सुकर कोणते दुष्कर कोणते इत्यादि दृष्टींनी नाम व रूप यांतील गुणदायक, फलदायक, शक्तीतील भेद समजला म्हणजे साधकांनीच ठरवावे की यांतील आपणांस अधिक सोईचे, सोपे, शीघ्र गुणकारी, स्वतंत्र, इतर साधनांची अपेक्षा नसणारे कोणते.

(ख) **साधू** – याचा अर्थ चांगले, सज्जन असा करणे योग्य. जे सज्जन असतात ते पक्षाभिमानी, दुराभिमानी, द्वेषी नसतात म्हणून गुणभेद श्रवण केल्यावर त्यांना लवकर समजते. ते स्वतःच्या व जगातील साधकांच्या व पूर्वील संतांच्या अनुभवाशी ताडून पाहून समजतात की हे अधिक चांगले, म्हणजे अधिक सुलभ, सुखकर वगैरे.

(ग) नाम व रूप म्हणजे नाम व नामी यांचा संबंध कसा असतो हे पुढील चौपायांत फार मार्मिक पद्धतीने सांगतील.

हिं.- **देखिअहिं रूप नाम आधीना । रूप ग्यान नहिं नाम बिहीना ॥४॥**
**रूप बिसेष नाम बिनु जानें । करतल गत न परहिं पहिचानें ॥५॥**
**सुमिरिअ नाम रूप बिनु देखें । आवत हृदयँ सनेह बिसेषें ॥६॥**

मं.- **नामाधीन रूप परि राही । रूपसमज नामाविण नाही ॥४॥**
**रूप-विशेष, न नाम जाणतां । करतलगतहि, न ये ओळखता ॥५॥**
**रूप न दिसता स्मरण नाम करि । स्नेहे हृदयी रूप येत तरि ॥६॥**

अर्थ – पण रूप नामाच्या आधीन (वश) असते (असे दिसेल) कारण रूपाचे ज्ञान नामाशिवाय होत नाही ॥४॥ एखादे विशेष रूप (पदार्थ) हाताच्या तळव्यावर जरि असले तरि नाम माहित नसेल तर ते ओळखता येत नाही. (त्याचे ज्ञान होत नाही) ॥५॥ (उलट) रूप न पाहतासुद्धा जर स्नेहाने नाम स्मरण केले तर त्या स्नेहाच्या योगाने ते रूप हृदयात येते. प्रगट होते ॥६॥

**टीका – चौ. ४ – (१) रूप नामाधिन राही** – रूप नामाच्या अधीन असते यास मानसातील प्रमाण पहा.

(क) हनुमंता समोर रामलक्ष्मण उभे आहेत, पण ते कोण हे ज्ञान होईना, म्हणून विचारावे लागले की 'कोण तुम्ही तनु शाम गौर वर' इत्यादि. रावणाने आपले दशानन रूप सीतेच्या समोर प्रगट केले, तरी तिला भय वाटले नाही; पण '**होई सभय जें नाम ऐकवी**' (३/२८/१३) नाम ऐकले तेव्हा भ्याली, रूप पाहून भय वाटले नाही; म्हणजेच नुसत्या रूपाने त्याचे ज्ञान झाले नाही.'

(ख) माणसांच्या व्यवहारांत सुद्धा असेच दिसते. दहा बारा माणसे एका धर्मशाळेत झोपली आहेत व त्यांची परस्पर ओळख नाही; रात्री बाहेर कोणी तरी, 'नारायणराव! नारायणराव!' अशा हाका मारू लागला असता त्यातील इतर कोणी ओ ! न देतां फक्त नारायणरावच उठून ओ! देऊन, आले. यावरून हे ठरले की उठून आलेले दोघे नारायणराव त्या नामाच्या स्वाधीन होते.

(ग) भगवंताच्या नामांत व इतर नामांत बराच भेद आहे. भगवंताचे रूप नामाच्या अधीन असते याचा अर्थ हाच की त्या नामांतूनच ते विशिष्ट रूप प्रगट होते. निरनिराळ्या रूपांत रामाचेच दर्शन होण्यास भिन्नभिन्न मंत्र कारण होतात. 'राम' या मंत्रातुन केवळ सतत जपाने 'श्यामं वीरासनासीनं... वामोरू न्यस्त तद्धस्तं' हे रूप प्रगट होईल. केवळ जपाने म्हणजे कोणत्याही रूपाचे ध्यान न करताच प्रगटेल. (रा. र. उ. पहा) मंत्रातूनच रूप प्रगट होते ही गोष्ट एका हिंदुने पाश्चात्य देशात सप्रयोग सिद्ध करून दाखविली आहे. (मंत्रशास्त्र व मंत्र शक्तियोग मराठी पहा.) म्हणूनच मेरुतंत्रात म्हटले आहे की '**न स्वर्गेषु न तीर्थेषु नौषधीषु नगेषु च । ऋषयो देवताः सन्ति मंत्रा एव तु देवताः**' (प्रकाश ४) देव-देवता स्वर्गात तीर्थांतच नसून मंत्रच देवता आहेत. '**साधकानां फलं दातुं तत्तद्रूपं धृतं सुरैः। मुख्यं स्वरूपं तेषां तु मंत्रा एव न चेतरत्**' ॥ (प्रकाश ४) साधकांना फल देण्यासाठी तीं तीं रूपे त्यांनी धारण केली असली तरी' त्यांचे मुख्य रूप मंत्रच होत. काष्ठांत जसा अग्नि असतोच तसेच मंत्रांत देवांचे रूप असते पण ते दृश्य नसते. ते प्रगट होण्यासाठी साधकाने प्रेमरूपी दोरी घेऊन तो मंत्र वाणी बरोबर मंथन करावा लागतो. वाणी व प्रेम या गोष्टी जितक्या जास्त शुद्ध असतील तितक्या लवकर त्या मंत्रांतुन त्यांची देवता प्रगट होईल. शिवपंचाक्षर किंवा षडक्षर मंत्राने 'रामरूप' प्रगट होणार नाही म्हणूनच एका मंत्राच्या ठिकाणी अनन्य निष्ठा असावी.

(घ) रावण – मेघनाद चरित्रांत या विषयी भरपूर आधार आहे. रावणाने सर्व देवांना बंदीत ठेवले होते. तो आणि इंद्रजित देवशत्रू म्हणून प्रसिद्ध होते. तरी मंत्रसामर्थ्याने अग्नितून दिव्यरथ बाहेर येतच होता. मंत्रांत देवता व विशेष गोष्टी देण्याची शक्ति नसती व ती देवांच्याच हाती असती तर त्या दोघांच्या यज्ञाचा विध्वंस करण्याची जरूरच नव्हती. 'द्विज मख होम करिती पूजा स्तव' त्यांना देय सहज वश त्यास्तव' (१/१६९/२) 'देवाधीनं जगत्सर्वं मंत्राधीनंतु दैवतम् । ते मंत्रा ब्राह्मणाधीना ब्राह्मणो मम दैवतम् ॥' जनमेजयाचे सत्रांत मंत्र म्हटल्याबरोबर ते ते सर्प भराभर येऊन अग्नीत पडू लागले. 'इंद्रायतक्षकाय स्वाहा' म्हणण्याचा विचार सुरू होताच इन्द्राची गाळण उडाली. उपनिषदांत काय म्हटले आहे पहा (२) 'यथा नामी वाचकेन नाम्ना योऽभिमुखी भवेत् । तथा बीजात्मको मन्त्रो मन्त्रिणाऽभिमुखी भवेत्' (रा. पूर्वतापिनी ४/३) याचेच स्पष्टीकरण या तीन चौपायांत आहे.

(क)'ज्याच्यातील दोन्ही अक्षरे सार्थक आहेत तो राम मंत्र, ज्याच्यांत योगी रममाण होतात तो राम आहे. रकार अग्निवाचक असून प्रकाशात पर्यवसान पावतो याचा अर्थ सच्चिदानंदरूप परमात्मा असा आहे. त्यातील व्यंजन म्हणजे र निर्गुण ब्रह्म आहे. स्वर अ प्राण, मायारूप आहे. व्यंजनाशी स्वराचा संयोग करणे म्हणजे त्यांत प्राणाची योजना करणे आहे. जो शुद्ध ज्योतिर्मय आहे त्या रेफांत आ हा स्वर मिळविला तेव्हा रा हे अक्षर झाले. म्-कार अभ्युदय (ऐश्वर्य, भोग) वाचक असल्याने त्याला माया असे म्हणतात. तो रा व हा म् – राँ हे रामाचे स्वतःचे बीज असल्याने ते मायायुक्त ब्रह्म आहे. (म्हणजेच ईश्वर, परमात्मा राम व सगुणसाकार राम आहे) वडाच्या बीजांत जसे प्राकृत वडाचे मोठे झाड असते तसेच सर्वविश्व रामबीज जे राँ त्यांत आहे. 'यथैव वटबीजस्थः प्राकृतश्च महाद्रुमः॥ तथैव रामबीजस्थं जगदेतच्चराचरम्' (अ. ५/९-१०) (बीजांत तो वृक्ष असतो तसे राम रामबीजांत असतात हे सांगण्याची आवश्यकताच नाही) बीजाचे सांगितलेले दोन्ही अर्थ 'राम' नामात दिसतातच, म्हणून माया रहित 'राँ' बीजाला परब्रह्म म्हणतात व ते साधकांना मोक्ष देणारे आहे व म कार भोग देणारा आहे कारण तो म – माया रूप आहे. म्हणून राम हा मंत्र भोगमोक्ष देणारा आहे. (रामरहस्य उपनिषद अध्याय ५ वा ३ पासून १२ पर्यंतच्या मंत्रातील महत्वाच्या मंत्रांचा हा अर्थ आहे. कंसातील वचने स्पष्टीकरणार्थ या लेखकाची आहेत.) विस्तारभयास्तव सर्व श्लोक दिले नाहीत.

(ख) श्रीमदाचार्यहि म्हणतात की 'शब्दशक्तेरचिन्त्यत्वात् शब्दादेव अपरोक्षधीः । प्रसुप्तः पुरुषो यद्वत् शब्देनैव अवबोध्यते' राम हा सुद्धा शब्दच आहे; त्यांत रामरूप सुप्तावस्थेत आहे. त्याला त्याच्या नावाने प्रेमाने हाका मारीत राहिल्याने तो राम जणू जागृत होऊन हृदयात दृष्टीसमोर येतो. एवढा विस्तार करण्याचे कारण इतकेच की रूप नामाच्या आधीन असते हा पूज्यपाद गोस्वामींनी मांडलेला

सिद्धान्त केवलाद्वैतमतास धरून आहे व तो श्रुतिपुराण व संत यांस मान्य आहे हे ध्यानी ठसुन पुढला विषय कळणे सुलभ व्हावे.

ल.टे. वर दिलेले उपनिषदांचे मुख्य विस्तृत आधार एकाहि टीकाकाराने घेतले नाहीत. कारण की ते त्यांच्या विशिष्टाद्वैत मताच्या विरूद्ध जाणारे आहेत. रामनामातून राम प्रगट होतात हा सिद्धान्त त्यास मान्य नसून राम साकेतातून येतात व नामप्रेमाने येतात असे त्यांचे मत आहे. **याच उपनिषदांतील त्यांना अनुकूल असणारे आधार त्यांनी टीकांतून इतरत्र दिले आहेत.** त्यांचे मत त्यांस सुखद होवो!

(३) **आणखी थोडे तात्त्विक विवेचन** — नाम हा शब्द आहे. शब्द आकाशाचा गुण आहे. आकाशापासून वायु, वायुपासून तेज ज्याचा गुण रूप आहे ते प्रगट होते हे सर्व मान्य श्रुतिसंमत आहे. यावरून सुद्धा रूप नामाधीन आहे हे मान्य करावेच लागेल. म्हणूनच विशिष्ट नाममंत्रातून विशिष्ट रूपच प्रगट होते. लोमश ऋषींनी 'कावळा हो' असे म्हणताच विप्राच्या देहाला कावळ्याच्या देहाचे रूप प्राप्त झाले. शब्दांत श्रीमदाचार्यांनी म्हटल्याप्रमाणे अचिंत्य शक्ति असते, ती विजेच्या शक्तिसमान अदृश्य असते व ती तपश्चर्या, शुद्धाचार, इत्यादिकांनी प्राप्त होते. ती कार्यावरून कळते.

(क) हाच सिद्धान्त आता अन्वयव्यतिरेकाने पुढील दोन-चौपायांत सांगतात.

**चौ. ५ — येथे प्रथम व्यतिरेक सांगतात** - (१) रूपविशेष - गुणधर्म आकारवर्ण इत्यादींनी युक्त असलेला पदार्थ, जसे आंबे, काजू, रत्न गारगोटी, इत्यादि नाव ठाऊक नाही आणि हिरा हातावर किंवा कपाळावर मारला तर तो दगड समजून फेकून दिला जाईल व लागल्याचे दुःख व क्रोध उत्पन्न होईल. इतक्यात कोणी सांगितले की मूर्ख तो मोठा हिरा आहे! हे ऐकताच धावत जाऊन शोधून घेईल. 'कोलि किरात ... मधुशुचि सुंदर रुचिर सुधासी । कंद मूल फल अंकुर देती' पण कोणी घेईनात तेव्हा 'स्वाद नाम गुण भेद सांगुनी' (२/२५०/१-३ पहा) कंदमूळफळे अयोध्येतील लोकांना माहित नसलेली कोळी भिल्लांनी आणून पुढे ठेवली. पण नामे व गुण रुचि वगैरे सांगितल्याशिवाय कोण खाणार? याप्रमाणे वस्तु समोर जवळ असून नाम न कळले तर गुणधर्मादिकांचे ज्ञान होत नाही. 'गाय' हा शब्द उच्चारल्याबरोबर एका विशिष्ट प्रकारचा चतुष्पाद प्राणी चटकन त्याच्या रूपादिकासुद्धा मनात उभा राहतो. नाम हे नामीच्या विशिष्ट गुणधर्माचे ज्ञान करून देण्यास जेवढे समर्थ असते तेवढे रूपाचे विस्तृत वर्णन करून सुद्धा कळत नाही. आता याच्या उलटरीतीने सांगतात.

**चौ ६** - (१) ज्याचे नाम माहित आहे तो नामी जवळ नाही; पण नांवाने हाक मारल्यावर ती व्यक्ति चटकन जवळ येते. एखाद्या माणसाचे पत्र न आल्याने कोणी त्या व्यक्तीची वारंवार प्रेमाने आठवण त्याच्या नामाने करूं लागल्याने थोडक्याच

दिवसांत तिकडे प्रेरणा होते व दोघांची पत्रे एकमेकांस मिळतात हा अनुभव पुष्कळांस असेल. प्रेमाने केलेले नामस्मरणच यात प्रेरक होत असते. एक घडलेली गोष्ट – एक मनुष्य अहमदाबादला आपल्या मालकाच्या आज्ञेने तूप विकत आणण्यास बाजारपेठेत गेला. तूप आहे का ? विचारताच 'छे' हे उत्तर मिळाले; दुसऱ्या तिसऱ्या दुकानांत याप्रमाणे सर्व पेठेत हिंडला जिथे तिथे 'छे!' हे उत्तर मिळाले. घेणाऱ्यास माहीत असलेले 'छे!' व दुकानदाराचे 'छे!' ही एक नव्हती. दुकानदाराचा 'छे!' त्या मराठीच जाणणाऱ्या माणसाजवळ नव्हता. मालकास सांगितले की तूप सगळ्या पेठेत नाही. मालकाने हकीगत विचारली तेव्हा समजले की छे म्हणजे आहे असा गुजराथीत अर्थ आहे. मराठीत छे = नाही. छे हा शब्द जणू नाम त्याला माहीत नव्हते. ते मिळाल्याबरोबर पाहिजे तेवढे तूप मिळाले. अशा अनेक गमती भिन्न भाषीयांना पहावयास सापडतात. 'यथा नामीवाचकेन नाम्ना योऽभिमुखी भवेत्) तथा बीजात्मको मंत्रो मंत्रिणोऽभिमुखी भवेत्' (रा. पू. ता ४/३) यांत हेच सांगितले आहे. बीजमंत्रच जपणाऱ्या पुढे नामीरूपाने प्रगट होतो. हाक मारणाराच्या आवाजावरून जर ओळखले की हा आपला शत्रु आहे तर ती व्यक्ति हाक मारणारा जवळ येत नाही. तसेच नामस्मरणात जर प्रेम, स्नेहाचा ओलावा नसेल तर ती मंत्र रूपाला प्रगट करीत नाही; म्हणून 'स्नेहे' शब्द दोघांकडे घेणे जरूर आहे. त्या स्नेहाच्या सह जप करण्यानेच रूप प्रगट होते. 'हरि सर्वां व्यापुनि सम राहति । मी जाणे कीं प्रेमे प्रगटति' (१/१८५/५) 'प्रीती अति रघुवीर विलोकिति। भवभंयहारक हृदयी प्रगटति' (३/१०/१४) 'मंत्र परम लघु बश जया विधिहरिहर सुर सर्व' (१/२५६/) रूप न स्मरता नुसत्या नामाचा जप सतत केला की रूप हृदयात दिसते व नामावाचून रूप दिसले तरी त्याचे ज्ञान व त्याने होणारा आनंद इत्यादि परिणाम होत नाही. उदाहरणे मानसातच पुष्कळ आहेत. रामलक्ष्मणांना धनुर्यज्ञ मंडपात सर्व राजांनीच पाहिले पण त्यांचे खरे नाम किंवा राम या त्यांच्या नावाचा अर्थ माहित नसल्याने त्यांस काय लाभ झाला? पण जनकराजांना विश्वामित्राकडून त्यांच्या नामाचे खरे मर्म कळताच त्यांना किती लाभ झाला याचा विचार करावा. 'अवजानन्ति मां मूढा मानुषीं तनुमाश्रितम्' असेच पुष्कळांच्या बाबतीत झाले. प्रत्यक्ष परमात्मा रघुवीराचे रूप घेऊन समोर असता परमात्मा या नामाचा संबंध त्या रूपाशी न जोडला गेल्याने परीस दगड वाटला. ज्यांचा आप्त वाक्यावर विश्वामित्राच्या वचनावर विश्वास बसला त्यांनी आपल्या जन्माचे सार्थक करून घेतले. राम परमात्मा आहेत हे ज्ञान म्हणजे रघुनाथाचे खरे नाम दशरथांस माहित नव्हते म्हणून त्यांस शोकाने मरावे लागले. कौसल्येला खरे नाम माहित होते. म्हणजे राम = परमात्मा हे माहित होते म्हणून तिचे प्राण गेले नाहीत. **शंका** – ईश्वर सर्वांच्या हृदयांत असतोच, 'ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति' (भ. गी) मग हृदयात येतो असे कसे म्हटले. लाकडांत अग्नि असतोच पण त्यांच्या ढिगावर पाणी तापत नाही; भात शिजत नाही व क्षुधाशान्ती होत नाही. पण दोन

काष्ठे पेटविली की हे सर्व होते तसेच येथे आहे. पुढील चौपाया ऐकण्यासाठी आहेत.

हिं.- **नामरूप गति अकथ कहानी । समुझत सुखद न जाइ बरवानी ॥७॥**
**अगुन सगुन बिच नाम सुसाखी । उभय प्रबोधक चतुर दुभाषी ॥८॥**

म.- **नाम रूप गति अकथ, कहाणी । समजत सुखद, न वदवे वाणी ॥७॥**
**अगुणी सगुणी नाम सुसाक्षी । उभा प्रबोधक चतुर दुभाषी ॥८॥**

**अर्थ** – नाम व रूप यांची गति अकथनीय आहे; ती काहर्णाने समजते आणि समजल्याने (अनुभव आला म्हणजे) सुखद आहे; पण शब्दांनी वर्णन करता येणे शक्य नाही ॥७॥ अगुण ब्रह्म व सगुणब्रह्म (राम) यांच्यांत नाम सुंदर साक्षी आहे व दोघांचा प्रबोध करणारा चतुर दुभाषी आहे ॥८॥

**टीका – चौ.** ५ (१) विषय चालू आहे नामाच्या प्रभावाने रूपाचे हृदयात प्रगट होणे. त्या दृष्टीने नामरूपगति याचा अर्थ हा की नामाने रूपाची प्राप्ती कशी होते हे सांगणे. पण हे कितीही समजाऊन सांगितले तरी अपुरेच. जे मनोवाचातीत आहे ते समजाऊन देण्यासाठी काहणीचा उपयोग करावा लागतो. तसेच हृदयात येतो असे जे म्हटले ती काहणी आहे. कसा येतो कोठून येतो व कसा जातो (नामी) हे कळत सुद्धा नाही. येतो म्हणजे प्रगट होतो. अनुभवास येतो.

(क) **कहाणी** – काहणी, म्हणजे कल्पित कथा, जिच्या आधाराने समजते उमजते पण शब्दांनी सांगता येत नाही. मानसांत काहणी शब्द बहुधा ज्ञानविषयकच वापरला आहे. 'ममता निरता ज्ञान कहाणी॥ उप्त बीज उखरी फळ तथा ॥' (५/५८/३-४). 'ज्ञान कहाणी तात ऐकणे। शक्य समजणे शल्य न वदणे ॥' (७/११७/१) उत्तर कांडात ज्ञानदीपाच्या निमित्ताने ज्ञानकहाणीच सांगितली आहे. 'उद्भव पालन प्रलय कहाणी' (१/१६३/६) 'कपट कहाण्या किती किति वदे' (२/२०/३ येथे कल्पित कथा असा अर्थ आहे)

(२) नाम व रूप ही दोन्ही अनिर्वचनीय आहेत. म्हणून त्यांची गति - सामर्थ्य- प्रताप- सुद्धा अवर्णनीय, वर्णनातीत आहे. सुतीक्ष्णाच्या प्रेमामुळे राम त्याच्या हृदयात प्रगट झाले असे म्हटले आहे (३/१०/१४) ते कसे कोठून शिरले हे कोणासच सांगता येत नाही; पण जो अनुभव येतो तो सत्य असतो. त्या अनुभवाने मिळणारे सुख ज्याला झाले त्यालासुद्धा ते बोलून शब्दांनी दाखविता येत नाही. सार हे की हे कसे घडते याचा काथ्याकुट करीत न बसता नामस्मरण प्रेमाने केले म्हणजे स्वतःस प्रत्यक्ष कळेल. नामाच्या बळावर निर्गुण साक्षात्कार होईल का पण ? याचे उत्तर पुढील चौपाईत आहे.

**चौ. ८** (१) – ब्रह्माची दोन रूपे म्हणजे प्रकार मानले जातात. अगुण (निर्गुण) व सगुण दोघांची किंवा दोहोपैकी एकाची प्राप्ति नाम करून देते हे येथे मुख्यतः सांगावयाचे आहे.

(क) अगुण शब्द प्रथम घालून सुचविले की सगुणाची प्राप्ति होण्यापूर्वी निर्गुणाचे ज्ञान अनुभव असणे जरूर आहे. साधकाला दोहींचाहि अनुभव नाही; त्यांना पाहिलेले नाही. निर्गुण ब्रह्म मनवाणी बुद्धि या सर्वांच्या पलीकडे असल्याने ते त्यांत सापडत नाही. या दोहींचे ज्ञान राम नामाला आहे व उत्तम आहे, यथार्थ आहे, म्हणून त्यास सुसाक्षी म्हटले. दोन पक्षांत एखादी घटना घडते व ती विवाद्य असते, तेव्हा दोन्ही बाजूंची माहिती असणारा सत्य बोलणारा, निःस्वार्थी असा कोणी तरी तिसरा माणूस साक्षीदार लागतो. अशा साक्षीदारास सुसाक्षी म्हणता येईल. असा साक्षीदार मिळणे फारच कठीण, तथापि नाम सुसाक्षी आहे.

(ख) तो चतुर दुभाषी आहे, दोघांच्याही भाषा तो उत्तम जाणतो व दोघांबद्दल यथार्थ ज्ञान उत्तम प्रकारे मोठ्या चातुर्याने करून देतो. शब्दातीताचे ज्ञान शब्दांनी करून देण्यास असाधारण कौशल्य लागते, म्हणून चतुर म्हटले. सार हे की या नामाचे दोन्ही अर्थ आहेत. 'रमन्ते योगिनोऽनन्ते नित्यानन्दे चिदात्मनि। इति रामपदेनासौ परंब्रह्माभिधीयते' (रा. पू. ता. १/६) हे निर्गुणाचे प्रबोधन झाले. निर्गुण साक्षात्कार होण्यास म्हणजे जीव ब्रह्मैक्य अनुभवास येण्यास साधनचतुष्टय संपन्न होऊन सद्गुरुमुखाने व त्यांच्या कृपेने महावाक्याचा बोध करून घ्यावा लागतो, आणि त्याचे मनन निदिध्यासन करावे लागते व वृत्ति ब्रह्माकार व्हावी लागते. एक लवनिमेष सुद्धा ब्रह्माकार वृत्तीत खंड पडता नये. राम मंत्र महावाक्य आहे हे १९/३ च्या टीकेत विस्तारपूर्वक सप्रमाण दाखविले आहे, याप्रमाणे ते निर्गुणाचे - अगुणाचे ज्ञान करून देते.

(२) सगुण — 'चिन्मयेऽस्मिन् महाविष्णौ जाते दशरथे हरौ । रघोःकुलेऽखिलं राति राजते यो महीस्थितः। स राम इति लोकेषु विद्‌भ्दभिःप्रकटीकृतः। राक्षसा येन मरणं यान्ति स्वोद्रेकतोऽथवा ॥२॥ राम नाम भुविख्यातमभिरामेणवा पुनः। राक्षसान् मर्त्यरूपेण राहुर्मनसिजं यथा ॥३॥ प्रभाहीनाँस्तथा कृत्वा राज्यार्हाणां महीभृताम् धर्म मार्ग चरित्रेण ज्ञानमार्गंच नामतः॥४॥ तथा ध्यानेन वैराग्यमैश्वर्यं स्वस्य पूजनात् । तथा रात्यस्य रामाख्या भुविक्यादथ तत्वतः ॥५॥ चिन्मयस्याद्वितीयस्य निकलस्या शर्रारिणः ॥ उपासकानां कार्यार्थं ब्रह्मणो रूप कल्पना ॥६॥' (रा. पू. ता. १/१-७) हे सगुण ब्रह्मप्रबोधन आहे.

**अर्थ** — सच्चिदानंदमय महाविष्णूंनी रघुवंशांत दशरथाच्या घरी अवतीर्ण होऊन जे अनंत शोभायमान गुणांनी राति देयात किंवा राजतात (विराजमान झाले) त्यांना विद्वानांनी राम या नामाने प्रगट केले. उदा. 'यांची नांवे अनेक अनुपम...। जे आनंद सिंधुसुखराशी । त्रिजगी पावे लवे' सुखासी ॥ शोभाधाम राम तन्नाम। दायक सबलोकां विश्राम' (१/१९७/४-५) राक्षसांना ज्यांच्यायोगे मरण आले तो राम. जी सर्व शक्ति सर्वांना सुखदायक (राति) श्रेष्ठ व महान आहे तिने युक्त म्हणून राम; किंवा ज्यांचे रूप पाहून सर्वांना आनंद होतो सर्व त्यांत रमतात म्हणून राम;

सर्व राक्षसांना प्रभाहीन करून (जसा राहु मनसिजास चंद्रास त्याप्रमाणे) राज्य करण्यास अधिकारी अशा महीपतीना आपल्या चरित्राने धर्ममार्ग, नामाने ज्ञान, ध्यानाने वैराग्य व आपल्या पूजनाने ऐश्वर्यादि (राति) देतात म्हणून राम अशा नांवाने जे प्रसिद्ध झाले ते (सगुणब्रह्म)

सार हे की सगुणाची प्राप्ति दर्शन आणि निर्गुणाचा अपरोक्ष साक्षात्कार 'राम' हे नाम करून देऊ शकते. ज्या अर्थाने व भावनेने राम नामाचा उपयोग कराल ते ते देईल. या दोहींच्या प्राप्तिसाठी लागणारा अधिकार पण ते देऊ शकते हे १९/१ टीकेत स्पष्ट केले आहे. नामाच्या आश्रयाशिवाय यांची प्राप्ती होणे अशक्य. एकूण नाम हे साधन आहे व साध्य आहे म्हणून तर तुकोबा म्हणतात 'संतचरणरज लागतां सहज **वासनेचे बीज जळुनी जाई ॥ मग रामनामी उपजे आवडी । सुख घडोघडी वाढो लागे** ॥' वासनाक्षयानंतर म्हणजे ज्ञानोत्तर रामनामाची आवड उत्पन्न होते असे यात म्हटले आहे. **म्हणजेच रामनाम साध्य आहे हे सांगितले.** ज्ञान प्राप्तिपर्यंत ते साधन आहे; म्हणूनच अरण्यकाण्ड-मायापुरीत मायानाश व ज्ञान प्राप्ति सांगितल्यानंतर किष्किंधाकांडात उलट्या व सुलट्या रामनामाला मंगलाचरणात वंदन आहे व 'रामनामामृतम्' हा उल्लेख त्यातच आहे.

अशा प्रकारे नामप्रसाद झाला म्हणजे तेणेकरून सगुण निर्गुण हा भेद हा वादच नष्ट होतो. 'तुज सगुण म्हणू की निर्गुण रे । सगुण निर्गुण एक गोविंदुरे' (ज्ञाने.) 'सगुणीं अगुणीं कांही न भेदहि । गाती मुनि पुराण बुध वेदहि । जो अलक्ष अज अरूप अगुणी । भक्तप्रेमे होतो सगुणी ॥२॥' (१/११६/१-३) रामपूर्वतापिनीतील दिलेल्या श्लोकांचाच विस्तार नाही काय? म्हणून पुढील दोह्यांत तुलसीदास सांगतात तेवढे करावे.

हिं.दो.- **राम नाम मनि दीप धरू जीह देहरी द्वार ।**
**तुलसी भीतर बाहेरहु जौं चाहसि उजिआर ॥२१॥**

म.दो.- **राम नाम मणिदीप धर जीभ देहली द्वार ।**
**तुलसी अंतर्बाह्य जर इच्छा प्रकाश फार ॥२१॥**

**अर्थ** – तुलसीदास म्हणतात (हे मना!) आत व बाहेर पुष्कळ प्रकाश पडावा अशी तुला इच्छा असेल तर जीभरूपी द्वारदेहलींत (दाराच्या उंबरठ्यात) रामनामरूपी मणिदीप धर (ठेव) ॥२१॥

**टीका** - (१) देहली शब्दाच्या अर्थाविषयी टीकाकारांत मतभेद आहेत. 'गृहावग्रहणी देहली' (अमरे) 'उदुम्बरस्य' (अ. व्या. सु) उदुम्बर = उंबरठा. घराच्या दाराच्या चौकटीचा खालचा भाग. ज्यात जीभ देहली आहे ते द्वार म्हणजे मुख. देहाच्या मुख्य नऊ द्वारांपैकी हे सर्वात मोठे आहे. उंबरठ्यावर दिवा ठेवला म्हणजे घरात व घराच्या बाहेर अंगणात वगैरे प्रकाश पडतो.

(क) तेलवात इत्यादींवर अवलंबून असणारे दिवे वाऱ्याने सहज विझतात; विजेचे दिवे वाऱ्याने विझत नसले तरी परावलंबी असतात; काच (बल्ब) बिघडली, प्रवाह बंद झाला, वगैरे अनेक कारणांनी घटकन काळोख होतो. तसेच **केवळ ज्ञानमार्ग व योगादि मार्ग हे तेलातुपाचे व विजेचे दिवे होत.** (ज्ञानदीप प्रकरण उ. कां. पहा) असे ज्यांत होत नाहीं तो स्वयंप्रकाशमान दीप पाहिजे, म्हणूनच रामनामाला मणिदीप -रत्नदीप म्हटले. त्याला तेलतूप, दिवा, वात, यंत्र, काच तारा इत्यादि काही लागत नाही. वाऱ्याने विझण्याची भीती नाही. ज्ञानरूपी प्रकाश मिळवावयाचा आहे.

(ख) भक्तीला चिंतामणि म्हटले आहे व तो मिळविणे हे मुख्य श्रेय आहे. त्याची प्राप्ति होण्यास 'ज्ञानविराग' नयन पाहिजेतच (१/२०/१टीका व ७/१२०/१४ पहा) 'ज्ञान विमल जलिं करी स्नान जैं रामभक्ति उरिं करी स्थान तैं' (७/१२२/११)

(ग) 'रामचरित चिंतामणि म्हटले आहे. **'रामचरित चिंतामणि चारू'** (१/३०/१) **'राम नाम तो सोम'** (१/४२) **'रामचरित राकेश कर'** चंद्र नसेल तर चंद्रकिरण राकेश कर मिळणे अशक्य; यावरून रामनाम कारण व रामचरित कार्य हे ठरले. रामचरिताला चिंतामणि म्हटले; म्हणून राम नाममणि त्याच्यापेक्षा श्रेष्ठ असा कोणतातरी पाहिजे म्हणून **कौस्तुभमणि = राम नाम** म्हणणे जरूर आहे. चिंतामणि जसे स्वर्गात पुष्कळ आहेत तसेच रामचरितचिंतामणि वेद पुराणादि पर्वतात पुष्कळ आहेत. **'वेदपुराणे पर्वत पावन' रामकथा रुचिराकर पार न'** (७/१२०/१३) पण कौस्तुभ मणि एकच आहे व तो भगवंताच्या गळ्यांत असतो. तसा **भक्तांच्या मुखात हा एकच कौस्तुभमणि असावा.**

(२) **अंतर्बाह्य प्रकाश** – (क) आत प्रकाश म्हणजे 'अहं ब्रह्मास्मि,' 'ब्रह्म अहम् अस्मि' ही अशी अखंड ब्रह्माकार वृत्ति- 'सोऽहमस्मि ही वृत्ति अखंडा' पण ही दीपज्योतीपासून उत्पन्न झालेली नव्हे तर रामनाम कौस्तुभमण्याचा प्रकाश. **म्हणजेच दृढ अपरोक्षानुभुति, व्यतिरेक ज्ञान.**

(ख) **बाह्य प्रकाश** – बाहेर प्रकाश म्हणजे 'विश्व ब्रह्मचि झाले' सर्वं खलु इदं ब्रह्म' हे दृढ अन्वय ज्ञान. याला‍च रामगीतेत मानसात ज्ञान म्हटले आहे. **'ज्ञान, जिथे मानादिक नाहीं। ब्रह्म समान सकल जगि पाही'** (३/१५/७) **'म्हणति तात तो परम विरागी । तृणसम सिद्धी त्रिगुणां त्यागी** (३/१४८) त्रिगुणातीत दशा म्हणजे **व्यतिरेक** ज्ञान व त्याचा अंतर्भाव परमविरागांत केला आहे **इतकेच.**

(ग) 'जीवहृदयीं तम विशेष मोहो। ग्रंथि सुटे कशि शके न पाहो' (७/११७/७) हा नाम मणिदीप स्वयंप्रकाश असल्याने हा जिभेवर सतत राहिला की हृदयात (आत) सतत प्रकाश राहील व त्या प्रकाशाने हृदयातील अज्ञान मोह तम नाहीसा होईल व मग 'तै बुद्धी (तो) हा प्रकाश मिळुनी । सोडी ग्रंथि हृदयगृहिं बसुनी'

जडचेतन ग्रंथि सहज सुटेल. हा प्रकाश कोणत्याही विघ्नाने विझणारा नाही. 'आत्म अनुभव - सुख प्रकाश' हा प्रकाश हृदयात पडला की आत्मानुभव सुख सतत मिळेल. मात्र नाम जिभेवर सतत राहिले पाहिजे.

(३) हृदयात सगुणाचे दर्शन होण्यास हृदय प्रकाशमय झालेलं पाहिजेच. हा प्रकाश नसेल तर अंधारांत प्रभु दर्शन हृदयात कसे होणार? 'निज प्रभुमय जग पाहती करिति कुणाशि विरोध' (७/११२म) हा भक्तिमार्गांतील बाह्य प्रकाश या रामनाममणिदीपानेच मिळतो. किंवा **'मी सेवक सचराचर रूपे प्रभु भगवन्त'** (४/३१) हा बाह्यप्रकाश. जो ज्याच्या प्रकृतीला सोसण्यासारखा असेल तो रामनामानेच बाहेरही पडतो. 'हृदिं निर्गुण नयनीं सगुण रसना राम सुनाम । जणूं कनक संपुटिं लसत तुलसी ललित ललाम' (दोहा. ७) 'सगुण ध्यान रूचि स-रस नहिं, निर्गुण मनास दूर । स्मर संजीवन मुळि तुलसी राम नाम मन चूर' (दोहा ८) सगुणध्यानांत रस उत्पन्न होत नाही व निर्गुण मनाला फार दूर आहे, म्हणून रामनामरूपी संजीवनमुळी स्मरत रहा म्हणजे मन चूर होईल. ज्ञान प्राप्तिचे साधन अति कठिण, सगुणरूप तितकेच दुर्लभ, पण जिभेने सतत नामोच्चार चालू ठेवला की सर्व कार्य काही कष्ट प्रयास न पडता सहज सुलभ होते. (क) आठव्या चौपाईत 'अगुणी सगुणी' नाम सुसाक्षी यात अगुणाचा प्रथम उल्लेख आहे. तेच आता प्रथम सांगतात.

हिं.- **नाम जीह जपि जागहिं जोगी । बिरति बिरंचि प्रपंच बियोगी ॥१॥**
**ब्रह्मसुखहि अनुभवहि अनूपा । अकथ अनामय नाम न रूपा ॥२॥**

म.- **नाम जपुनि मुखि जागे योगी । विरत विरंचि प्रपंच वियोगी ॥१॥**
**ब्रह्मसुखा अनुभवि अनुपम जे । अकथ अदोष, न नाम रूप जे ॥२॥**

**अर्थ** — मुखाने (जिभेने) नाम जप करून योगी (जपयोगी) जागा होतो आणि विरक्त (विरतियुक्त) व विरंचीच्या प्रपंचापासून वियोगी होतो. ॥१॥ तो अनिर्वचनीय मायादि दोष रहित (अदोष), व नामरूपरहित अशा अनुपम ब्रह्मसुखास अनुभवतो ॥२॥

**टीका — चौ १ (१) — योगी जागे —** (क) प्रकरण नामजपाचे चालले आहे म्हणून येथे योगी म्हणजे नामजपयोगाने ज्ञान प्राप्तिचा प्रयत्न करणारा असा अर्थ घेणे जरूर आहे. 'विरतिंस धर्म योग दे ज्ञाना । ज्ञान मोक्ष दे ' (३/१६/१) योगाभ्यास करणारास योगी म्हणतात. नामजप हा सुद्धा एक मोठा योग आहे, यास जपयोग म्हणतात. कल्याणच्या योगांकात जप योगाचे विवरण पहावे किंवा नामचिंतामणि हे मराठी पुस्तक पहावे. जपयोगाची सुद्धा राजयोगाप्रमाणे सोळा अंगे आहेत. केवळ नामजपाने अष्टांग योगाचे सर्व अनुभव प्रयत्न न करता येतात. या कलिकालात विसाव्या शतकात येतात ! येथे इतके पुरे. (ख) जागे — जागा होतो. 'सर्वहि मोह निशे निजणारे। बघतां स्वप्ने किती प्रकारे ॥ या जगयामिनी जागति योगी।

परमार्थि जे **प्रपंचवियोगी** ।। जाणा तैंचि जीव जगि जागा । **पावे विषयविलासी विरागा'** (२/९३/२-४) **विरंचिप्रपंच वियोगी** – (क) दोन्ही ठिकाणी जागा होणे व प्रपंच वियोगी हे शब्द समान आहेत. येथे विरत (विरति) व प्रपंचवियोगी या शब्दांत द्विरुक्ति आहे असे वाटून नानाविध अर्थ केले गेले आहेत. तथापि **द्विरुक्ति नसून पुनरुक्तिवदाभास हा अलंकार आहे.** (ख) विरंचि प्रपंच कसा आहे? **'विधीप्रपंच गुणागुण मिश्रित'** (१/६/४) ब्रह्म देवाने केलेली सृष्टि गुण व दोष (अवगुण) यांचे मिश्रण आहे; व 'मायाकृत गुणदोष अनेकहि' मायेतून सुटण्याचा प्रयत्न करावयाचा आहे. विधीप्रपंच म्हणजे गुणदोषांचे मिश्रण. जागा झाला, विषयवैराग्य प्राप्त झाले तरी जोपर्यंत दुसऱ्यांचे गुणदोष पाहतो आहे तोपर्यंत तो विरंचि – विधिप्रपंचापासून वियोगी झाला असे म्हणता येत नाही. म्हणून विरंचिप्रपंच वियोगी म्हणजे कोणाच्याही गुणदोषांचा विचार सुद्धा न करणारा; गुणदोष न पाहणारा झाला म्हणजे खरा विरागी झाला. 'म्हणति तात तो परमविरागी । तृणसम सिद्धी त्रिगुणां त्यागी.' गुणदोष त्रिगुणांतच असतात व गुणदोष मायाकृत आहेत. **विरत शब्दाने अपरवैराग्य** सांगितले व विरंचिप्रपंच वियोगी ने **परवैराग्य सांगितले.** (१/१५/८ टी. प.) 'गुण हा उभय न पाहणे **त्या बघणे अविवेक'** (७/४१) **'गुणदोष दृशि र्दोषो गुणस्तूभय वर्जितम्'** (भाग.) ब्रह्म निर्गुण, निर्दोष आहे. त्याचा साक्षात्कार करावयाचा आहे म्हणून हा दोष सुटला पाहिजे. श्री नाथमहाराज हेच सांगतात - 'तत्काळ पावावया ब्रह्म पूर्ण। सर्वांभूती भगवद्भजन । सांडोनियां दोष गुण । हेचि साधन मुख्यत्वे (ए. भाग.) **चौ. २ – (१) अकथ अदोष न नाम रूप** – (क) **'ब्रह्म नेतिजे निगमि गाइले'** असे नाही असे नाही असे निषेधात्मक वर्णन ब्रह्माचे केलेले असते; म्हणून अकथ आदि चार विशेषणे ब्रह्माकडेच लागतात. (ख) **ब्रह्मसुख – ब्रह्म हेच** सुख असाच अर्थ तत्त्वतः योग्य आहे; अन्यथा ब्रह्म आणि सुख या दोन गोष्टी ठरतील व विषय व त्यापासून मिळणारे सुख असाच तो संबंध ठरेल. विषय सुखरूप नाहीत म्हणून तो अर्थ येथे बरोबर आहे. 'ब्रह्म सत्‌चित् सुख घन' - (आनंदघन) आहे. **'चेतन अमल सहज सुखराशी'** (७/११७/२) हे जीवाचेहि शुद्धस्वरूप आहे. **'सच्चिदघन आनंद सुराशी'** (१/२३/६) हे ब्रह्माचे लक्षण आहे. 'अकल अनीह अनाम अरूप। अनुभवगम्य अखंड अनूप ॥ मनगोतीत अमल अविनाशी । निर्विकार निरवधि सुखराशी' (७/१११/३५ पहा) हे ब्रह्माचेच वर्णन आहे. ते अनुपम (अनूप) आहे त्याला दुसरी उपमा नाही कारण तशी दुसरी वस्तूच नाही. **'एकम् एव अद्वितियम् न इह नाना अस्ति किंचन'** (श्रुति) हे **सुचविले.**

(२) **ब्रह्मसुखा अनुभवि** – येथे अनुभव अनुभवणारा व अनुभवण्याची वस्तु अशी त्रिपुटी नाही. **'आनंदाचा अनुभव हाहि वृत्तीचाच भाव'** (दा. बो.) असे येथे नाही. जीवब्रह्मैक्य होणे म्हणजेच ब्रह्मसुख अनुभवणे. यालाच ब्रह्मानंद म्हणतात. दशरथ - **'ब्रह्मानंद मगन जणुं झाला'** (१/१९३/३) हा आनंद दुजेपणाने अनुभवता येत

नाही; म्हणून उत्तर कांडात म्हटले की 'तसे मोक्षसुख बघ खगराया। टिकु न शके हरिभक्ति विना या' (७/११९/६) वरील ब्रह्मानुभव सुखाला परमार्थ म्हटले आहे. **'ब्रह्म राम परमार्थ रूपही'** व्यक्त न अनुपम, नादि अलक्ष्यहि ।। हाच **परम परमार्थ** सखे हो! **रामपदी** मन तनु वाक् स्नेहो।' (२/९३/७,६) **सगुण - रामप्रेमभक्ति हा परमपरमार्थ हा मानस सिद्धान्त आहे.** प्रभु माझे पुत्र झाले हे स्मरण होताच 'परमानंदपूर्णमन राजा' दशरथ झाले. (१/१८३/६) शिवभुशुंडी 'परमानंद परमसुख फुलले । फिरतो मार्गि मग्न मन भुलले' (१/१९६/५)

**ल. ठे.** सुख परमसुख, आनंद, परमानंद, परमार्थ, परम परमार्थ, हा भेद मानसात सर्वत्र पाळला आहे. (मा. पी. मुद्दाम पहा) रामनामाच्या साधनाने पूर्णज्ञानी होता येते हे या दोन चौपायांत सांगितले. राजयोगाचे साध्य नामजपयोगाने साधते. पुढील चौपाईत नामजपाचे जिज्ञासूविषयी वर्णन आहे.

हिं.- **जाना चहहि गूढ गति जेऊ । नाम जीहँ जपि जानहिं तेऊ ।।३।।**
**साधक नाम जपहि लय लाएँ। होहि सिद्ध अनिमानिक पाएँ ।।४।।**
**जपहि नामु जन आरत भारी । मिटहिं कुसंकट होहिं सुखारी ।।५।।**

म.- **गूढ गती जे जाणूं पाहति । नाम जिभेने जपतां जाणति ।।३।।**
**नाम जपति साधक लय लावुनि । होती सिद्ध अणिमादिक लाहुनि ।।४।।**
**भक्त आर्त अति नामा जपती । होती सुखी सुसंकट टळती ।।५।।**

**अर्थ** – गूढ गतीना जाणण्याची ज्यांची इच्छा असेल ते जर जिभेने नाम जप करतील तर त्या गतीस जाणू शकतील. ।।३।। साधक जर लय लावून नामजप करतील तर अणिमादिक अष्टमहासिद्धी मिळून ते सिद्ध होतील. ।।४।। अति आर्त झालेले भक्त जर अति नामजप करतील तर अति (सु) संकटे टळून ते सुखी होतील ।।५।।

**टीका – चौ. ३ (१) गूढ गती जे जाणू इच्छिति – (क) गूढगति** – येथे गति म्हणजे आत्मज्ञानाशिवाय **इतर विविध ज्ञान** असा अर्थ आहे. आत्मज्ञानाचा विचार मागील दोन चौपायांत केला. पुढील चौपाईत अष्टमहासिद्धीचा उल्लेख असल्याने त्यांचा समावेश येथे करता येत नाही. **(ख) गूढ** – साधारण मनुष्याच्या मनासहित कर्म ज्ञानेंद्रियांस - ज्या गोष्टीचे ज्ञान होणे अशक्य असते ते म्हणजे अतींद्रिय, म्हणजेच गूढ हा अर्थ पुढे दिलेल्या उदाहरणांनी स्पष्ट होईल. (ग) टीकाकारांनी आत्मापरमात्मागति, कालकर्मगति, ज्ञानवैराग्यगति, तत्व, माया, गुण, गति इत्यादि असे म्हणून मानसांतील आधार वडाची साल पिंपळाला लावण्यासारखे दिले आहेत. पण ते तरी बिचारे काय करणार ! **(घ) जाणू पाहति** – आत्मजिज्ञासूंशिवाय, इतर जाणण्याची इच्छा असणारे जिज्ञासु. जो आत्मज्ञान जिज्ञासु असेल तो पहिल्या दोन चौपायांतच समाविष्ट होतो. सूर्य, ग्रह इत्यादीचे ज्ञान. भूत, भविष्य, वर्तमान

ज्ञान, शरीरांतील नाड्या, आंतील अवयव, स्नायू, अस्थि, ग्रंथी, चक्रे इत्यादींचे सहज ज्ञान, व त्यांचे परस्पर संबंध व कार्ये, तारानक्षत्र विज्ञान, पशुपक्षी इत्यादींच्या भाषांचे ज्ञान, परचित्तविज्ञान, इत्यादि पातांजल योगांतील विभूतिपादांत वर्णिलेले; संयमांच्या योगाने प्राप्त होणाऱ्या विविध विज्ञानाचे ग्रहण, येथे गुरुगति जाणणे यांने करावयाचे आहे. मनुष्यजीवन सुखकर करण्यास या ज्ञानांचा सुद्धा उपयोग आहे. सर्व भारतीय शास्त्रे अशा अतींद्रिय ज्ञानाच्या बळानेच झाली आहेत. वरील प्रकारची मानसांतील कांही उदाहरणे पाहू -

(क) **पूर्वजन्मज्ञान** – 'वाल्मिकि नारद कुंभज यांनां स्वमुखे कथिलीं आत्मकहाणी' संस्कारांचा साक्षात्कार करण्याने हे होते (ख) **त्रिकालज्ञान** – 'तुम्हिंत्रिकाल दर्शी मुनिनाथा। विश्व बदर सम तुमचे हातां' (२/१२५/७) हे सूर्याचे ठिकाणी संयम रूपाने होते. (ग) **शरीर रचना – ज्ञान** – बेंबीच्या ठिकाणी संयम केल्याने होते. 'नरतनु सम नहि देह दुजा वर' (७/१२१/९) (घ) **इच्छामरण** – उदानजयाने इच्छामरणी होता येते. 'त्यजी' न तनु निज इच्छामरणी' (७/९६/५) (ङ) **परचित्तविज्ञान** – हे चित्तवृत्तीच्या ठिकाणी संयम केल्याने प्राप्त होते. जे 'पद जनकसुता हृदिं धरते । कपट कुरंगा - संगि धावते' (५/४२/७ टी. प.) (च) **विशिष्ट विषयाचे ज्ञान** – प्रज्ञालोकाचा ज्या विषयावर उपयोग करावा त्याचे ज्ञान होते. 'ध्यान धरुनि तैं शंकर पाहति। सर्व सतीकृत चरिता जाणति' (१/५६/४) (छ) **ताराव्यूहज्ञान** – चंद्राच्या ठिकाणी संयम केल्याने येते. 'अगणित उडुगण रविरजनीश' (ज) **परभाषा ज्ञान** – पशुपक्षी इत्यादींची भाषा. शब्द अर्थ इत्यादींच्या ठिकाण संयम केल्याने होते. वानरे व संपाति, चंद्रमा मुनि व संपाति, जटायु रावण, इत्यादिकांना परस्परांच्या भाषा कळल्या आहेत.

हे थोडेसे नमुने दिले. संयमप्राप्त तीस प्रकारच्या ज्ञानाची उदाहरणे मानसांत आहेत. ध्यान धारणा व समाधि या तिघांच्या एकत्र कार्याला संयम म्हणतात. दृढ व अष्टांग योगसाधन न करता **केवळ जिभेने केलेल्या नाम जपाने या इतर प्रकारच्या ज्ञानांची प्राप्ति होते.** इतर कोणतेहि प्रयास करावे लागत नाहीत. म्हणूनच योगी म्हणजे नाम जपयोगी असा अर्थ पहिल्या चौपाईत केला आहे. ल. ठे. येथील सिद्धांताशी तुलसीदासांचा स्वानुभव निगडित दिसतो. आजसुद्धा यांतील गोष्टींचे अनुभव एकनिष्ठ सतत जप करणाऱ्या जप योग्यांस येतात; आलेले पाहिले आहेत. व जे कोणी करतील त्यांस येतील. पण दृढ विश्वास, श्रद्धा, एकांत, कुसंगत्याग यांसह १५/१५ तास २०/२० तास जप केला पाहिजे. रोज बावीस तास जप करणारे श्री नारायण स्वामी अगदी अलीकडे होते व कदाचित अजून असतील. 'एक संत का अनुभव' हे २०/२५ पृष्ठांचे पुस्तक (गी. प्रेस गोरखपूर) पहावे.

**चौ. ४ (१) – साधक** – साधणारा असा अर्थ येथे आहे. **अष्टमहासिद्धि प्राप्त करण्याची इच्छा असलेला म्हणजे अर्थार्थी** हा अर्थ आहे. धन, दारा ऐश्वर्यादि व कीर्ती प्राप्त करण्याचे श्रेष्ठ साधन अष्टमहासिद्धि आहेत. (२) लय लावुनि

लयः साम्यम् (अमरे) साम्य, समतावस्था विविध प्रकारची असू शकते. येथे मनन, इंद्रिये यांचे एकाग्रतारूपी साम्य म्हणजे लय असा अर्थ आहे. 'समंकायशिरोग्रीवं धारयन् अचलंस्थिरः' (भ. गी.) ही शरीराची समतावस्था आहे. येथे असंज्ञात निर्बीज समाधिरूपी लय अग्राह्य आहे. त्यांत जप अशक्य आहे. **शब्दानुविध्द समाधि हा अर्थ येथे घेता येईल व हाच इष्ट आहे.**

ल. ठे. हठ. मंत्र, लय व राजयोग असे योगाचे चार प्रकार आहेत. त्यांत येथे लययोग सूचित केला आहे. मागील चौपाईत हठ- अष्टांगयोगाचे कार्य दाखविले आहे व पहिल्या दोन चौपायांत राजयोगाचे कार्य दाखविले आहे. म्हणजेच एका मंत्रयोगानेच बाकीच्या सर्व योगांची कार्ये सहज होतात हे येथे दाखविले. येथे लय लावुनि म्हणजे एकाग्रचित्ताने, एकनिष्ठेने व तळमळीने. प्रेम सर्वात पाहिजेच.

(२) अणिमादि आठ सिद्धींची नांवे व लक्षणे खालील आर्यांत आहेत; त्या २८/२९/७/५२ रोजी लिहिल्या गेलेल्या आढळल्या.

'**अणिमा** — म्हणजे अणुहुनि होवोनी सान (लहान) विश्विंवर्तावे । **महिमा** मोठे (आकाराने) होउनि, लघु असता जगिं महत्व पावावे' ॥१॥ "**लघिमा** कार्यी लाघव हलकेपण अति तनूस जे येणे । **गरिमा** अति जड (वजनाने) वाटे तेवीं देहा जडत्व जे देणे ॥२॥ **प्राप्ती** संकल्पाने दुर्लभ वस्तूस सहज देते ती (सिद्धी) । **प्राकाम्य** कामनेने इच्छित रूपे अनेक धरणे ती" ॥३॥.

'**ईशित्व** सर्व लोकीं शासन जन मानिती तिला म्हणणे ॥ **वशिता** जीवा वश करि सिद्धि महा आठवी तिला म्हणणे' ॥४॥ यांची मानसांतील उदाहरणे अरण्य १५/८ च्या टीकेत पहा. 'वंदुं बालरूपा, त्या रामा । सिद्धि सुलभ जपता यन्नामा' (क) **सिद्धि हे स्वान्तःसुख प्राप्तीच्या मार्गातील फार मोठे विघ्न आहे,** उ. कां. ११८/७-९ चौ. व टी. पहा.

चौ. ५ (१) **अति आर्त** — (आरत भारी) आर्त दुःखी, कष्टी, पीडित, संकटग्रस्त, भयभीत इत्यादि होऊन त्यांतून सुटण्यासाठी तळमळणारा. स्वतःच्या किंवा मानवी प्रयत्नांनी सुटका होत नाही अशी खात्री झाल्यावरच जीव खरा आर्त होतो. व ईश्वराशिवाय कोणी सोडविणार नाही अशी पक्की खात्री झाली म्हणजे अति आर्त होतो. तोपर्यंतच्या आर्तपणांत खरी तळमळ नसते व कर्तृत्वाहंकार गलित झालेला नसतो. द्रौपदी गजेंद्र, ध्रुव यांची उदाहरणे हेच सांगतात. जितका जास्त आर्त तितकी तळमळ जास्त. त्याने तितक्याच तळमळीने विश्वासाने व प्रेमाने नाम जप मात्र केला पाहिजे.

(२) भरताला 'शोक समाज राज्य का गणना' असे वाटत होते. 'रामराम रघुपति जपत कमलनयनि जलजाय।' (७/१ म) 'जीभ नाम जपि लोचनि नीरहि' (२/३२६/१) हे आर्तजपाचे लक्षण आहे. 'जाणुनि आर्त जन दर्शन दिले' (उ. ५ छं) ही तिन्ही उदाहरणे अति आर्त झालेल्या भरताची आहेत. तथापि **भरत अर्थ, धर्म, काम, मोक्ष इत्यादिसाठी** आर्त नव्हता. येथे आर्तजपाचे लक्षण दाखविण्यासाठी

हे उदाहरण दिले आहे. ध्रुव आर्त होता व ध्रुवाचे उदाहरण या चौपाईतील आर्ताचे आहे. तो अर्थार्थी आर्त होता. गजेंद्र मृत्युसंकट आर्त होता. 'आर्ता विषण्णा शिथिलाश्च भीता घोरेशुच व्यापि वर्तमाना' संकीर्त्यनारायण नाममात्रं ते मुक्तदुःखाः सुखिनो भवन्ति' (पांडव गीता) यांत आर्त कोण हे दिसते. (३) दुःख नाहीसे होते हे सांगितल्यावर सुखी होतात असे सांगण्यात भाव हा आहे की त्यांना भगवंताचे दर्शनसुद्धा होते; ध्रुव व गजेंद्र यांना झालेच. स्वयंपाकासाठी विस्तव पेटविला तरी थंडीचे निवारण तो सहज करतो तसेच सकाम नामजपयोगाचे आहे. (४) मुमुक्षु, जिज्ञासु, अर्थार्थि व आर्त हे चारी येथे भक्तच आहेत, कारण सर्वांनी भगवन्नामाचाच आधार घेतला आहे व अनन्य झाले आहेत. (क) ज्ञानमार्गातसुद्धा या चार भूमिका असु शकतात. 'जो संसारदुःखे दुखवला। त्रिविधतापे पोळला तोच अधिकारी झाला। परमार्थासी ॥' (दा. बो) ही **आर्त भूमिका** आहे. हे दुःखताप निवारण करण्याचे साधन शोधू लागला. हे कशाने मिळेल याचा विचार करू लागला तो **अर्थार्थी** । आत्मज्ञानाची इच्छा उत्पन्न झाली तो **जिज्ञासु** (मुमुक्षु) व ते प्राप्त झाले तो **ज्ञानी** – परंतु हे अर्थ येथील विवेचनात मुख्य नाहीत. (ख) **पुढील चौपायांत सांगतील की यांतले तीन सकाम असले तरी भक्तच आहेत व मुमुक्षु जपयोगी हि भक्तच आहे.**

हिं.- **राम भगत जग चारिप्रकारा । सुकृती चारिउ अनघ उदारा ॥६॥**
**चहूँ चतुर कहुँ नाम अधारा । ग्यानी प्रभुहि बिसेषि पिआरा ॥७॥**
**चहुँ जुग चहुँ श्रुति नाम प्रभाऊ । कलि बिसेषि नहिं आन उपाऊ ॥८॥**

म.- **राम भक्त जगिं चतुःप्रकारी । सुकृती अनघ उदार हि चारी ॥६॥**
**नामाधार चहूँ चतुरांप्रति । ज्ञानी प्रभुस विशेषें प्रिय अति ॥७॥**
**नाम प्रभाव वेदि हि चहुंयुगी । आन उपाय न विशेष कलियुगि ॥८॥**

**अर्थ** – (मागे सांगितल्याप्रमाणे) जगांत चार प्रकारचे राम भक्त असतात. व ते चौघेहि पुण्यवान (सुकृती) निष्पाप व उदार होत. (आहेत) ॥६॥ (कारण). या चतुरांना नामाचाच आधार असतो; तथापि या चौघांत ज्ञानीभक्त प्रभूला विशेषकरून अति प्रिय असतो. ॥७॥ चारी वेदांमध्ये चारी युगांत नामाचा प्रभाव आहेच; तरीपण कलियुगात दुसरा विशेष उपाय नाही. ॥८॥

**टीका** – **चौ.** (६-७) (१) या दोन चौपायांत चार भक्तांचा उल्लेख आहे व चार विशेषणांचा उल्लेख आहे; ती सुकृती, अनघ, उदार व चतुर ही होत, म्हणून एकेक विशेषण एकेकांकडे लावण्याचा मोह होतो. पण असे करण्यास हिंदीत किंवा मराठीत मुळीच जागा नाही. (क) चारी चारिउ = चौघेही. 'उ' हा अवधारणार्थक निश्चयार्थक सुद्धा या अर्थाचा प्रत्यय आहे. चहूँ चतुर कहुँ = चहू चतुरांप्रति = चौघाही चतुरांना इतका स्पष्ट उल्लेख असता चतुर शब्द फक्त एकालाच लावणे

म्हणजे अर्थाचा व व्याकरणाचा खून पाडणे होय. यातील दोन विशेषणे भ. गीतेत चौघानांहि लाविली आहेत. भ. गी. श्लोकांचाच थोडक्यात सुधारलेला हा अनुवादच आहे. 'न मां दुष्कृतिनो मूढा प्रपद्यन्ते नराधमाः । माययापहृतज्ञाना आसुरी भावमाश्रिताः ॥१५॥ चतुर्विधा भजंते मां जना सुकृतिनोर्जुन ॥ आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानीच भरतर्षभ ॥१६॥ तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते । प्रियो हिज्ञानिनोऽत्यर्थं अहं स च मम प्रियः ॥१७॥ उदाराः सर्व एवैते ज्ञानीत्वात्मैव मे मतम्' ॥१८॥ (भ. गी.७) या चार श्लोकांत प्रथम अभक्त व भक्त असा भेद केला; त्यांत अभक्त - हरिविमुखाना दिलेल्या मूढ व आसुरी नराधम यांच्या विरोधी अर्थाची दोन विशेषणे वरील चौपायांतील भक्तलक्षणांत आहेत. मूढ विरूद्ध चतुर आणि आसुरी विरूद्ध अनघ - निष्पाप. सुकृती व उदार ही दोन्ही विशेषणे गीताश्लोकांत व चौपायांत चौघानांही लाविली आहेत. (क) भगवद्भजन करीत नाहीत ते मूढ असे म्हटल्यानंतर जे भजन करतात ते चतुर, शाहणे हे ओघानेच ठरले. दुर्जन दुष्कृती तर भक्त सुकृती ते आसुरी तर भक्त दैवी अनघ. ते नराधम नीच तर हे उदार श्रेष्ठ; उदारो दातृ महतोः (अमरे) भगवद्गीतेच्या श्लोकांचा अर्थ गोस्वामींनी अधिक स्पष्ट पण थोडक्यांत केला. (२) त्यांच्यात मूढता व भक्तांत चतुरपणा कशाने आला? 'सहज शील की हे पाप्यांचे। सदा वावडे मम भजनाचे' (५/४४/३) ते पापी आहेत म्हणून मूढ झाले म्हणजे भजन करीत नाहीत व भक्त सुकृती पुण्यवान आहेत म्हणून शाहणे झाले म्हणून भजन करतात. 'वेद पुराण संत मत हे हो। सकल सुकृतफलरामी स्नेहो' (१/२७/२) भजन करण्यातच खरे हित आहे हे ज्यांना पटले व त्याप्रमाणे करू लागले म्हणून शाहणे चतुर ठरले. भगवंताच्या उदारनामाचीच कास धरली म्हणून चौघेही उदार झाले 'यामधि रघुपति नाम उदार' (१/१२/१) ज्यांची संगति करावी तसा संगति करणारा बनतो. नाम रामाहून मोठे उदार आहे म्हणून हे नामभक्त सुद्धा हळुहळु 'रामाहुनि मोठे' व्हावयाचेच 'रामदास रामाहुनि मोठे' (७/१२०/१६) वरील कार्यकारण - परंपरेचे मूळ मानसात आहे. 'भक्ती स्वतंत्र सब सुखदानी । विण सत्संग न पावे प्राणी' 'विण सत्संग विवेक न होतो, 'पुण्यपुंजविण भेट न संतां' असे उपक्रमात व ग्रंथोपसंहारात सांगितले आहे. हे सुकृती पुण्यवान असतात म्हणून रामकृपेने संतांची भेट होते; त्यामुळे स्वहिताचा विवेक प्राप्त होतो म्हणजे शाहणे होतात व भजन करू लागतात म्हणून उदार - मोठे होतात. म्हणूनच सुकृती प्रथम व उदार शब्द शेवटी आहे. उदार शब्दाचा सरल असा हि अर्थ आहे व सरलता हे भक्तिचे एक मुख्य लक्षण आहे. 'दक्षिणे सरलोदारौ' (अमरे) 'सहज सरलता मनिं न कुटिलता' (७/४६/२)

(३) **ज्ञानी प्रभुस विशेषें प्रिय अति** — मुळात अति शब्द नाही भ.गी. श्लोकांत 'अत्यर्थं' प्रिय असल्याने चौपाईत तो अध्याहृत आहे; म्हणून अनुवादात स्पष्ट घातला. (क) 'मम मायासंभव संसारी । जीव चराचर किती प्रकारी' प्रिय मम

सगळे म्यां उपजवले।' (७/८६/३-१० प) सर्व चराचर जीव रामाला प्रिय आहेत; त्यांत खल दुर्जन अभक्त यांचा अंतर्भाव होतोच. म्हणून ते प्रिय आहेत; आर्त, जिज्ञासु, व अर्थार्थी अतिप्रिय आहेत व ज्ञानी विशेषे अति प्रिय आहेत. असा मानसांतील पूर्वापर वचनांचा 'अति' मुळे उत्तम समन्वय होतो. अन्यथा आर्तादि तीन प्रिय व ज्ञानी विशेष प्रिय असा अर्थ (मा. पी.) घेतल्यास मूढ दुष्कृति अप्रिय असे ठरते व ते उ. कां. ८६/३-४ शी विरोधी ठरेल. (ख) सकाम भक्तांचा अन्तर्भाव भ. गी. सुद्धा भक्तामधेच केला आहे. कोणत्या भावनेने असले तरी अनन्य भावाने भजतात हे याचे कारण आहे. 'चतुर्विधा भजंते माम्' यात ज्ञानी आहेच; म्हणून जो ज्ञानी असून भगवंतास भजतो तो इतर सर्वांपेक्षा अधिक आवडतो. १. टीकाकारांनी मानसवचनांत व गीतावचनांत दाखविलेला भेद म्हणजे जाणून बुजून डोळ्यांत धूळफेक करून बुद्धिभेद केलेला आहे. भगवद्गीतेचे अवतरण त्याच परिच्छेदांत दिलेले असून 'प्रियोहिज्ञानिनोत्यर्थ अहं स च मम प्रियः।। ज्ञानी तु आत्मा एव मे मतम्' मानसांत येथे आत्मा शब्द नाही याचे कारण टीकाकार सांगतात की आत्मा शब्दाने अद्वैत प्रतिपादिले जाते म्हणून तो घातला नाही व 'बिसेषि पिआरा' (प्रिय) शब्दाने ते प्रतिपादन होत नाही म्हणून हे शब्दच घातले. पण ते शब्द गीतेत आहेतच. आत्मा शब्द न घालता मानसांतील शब्दांनी अद्वैतमत निघू शकत नाही हा अजब शोध आहे. गीतेतील 'प्रियोहिज्ञानिनोऽत्यर्थम अहम्, स च मम प्रियः' हे वचन मानसापेक्षा अधिक सरस व अन्योन्य समान प्रेम निदर्शक आहे. भक्तांच्या प्रेमाचा उल्लेख मानसात या चौपायांत नाही. 'प्रभुहि' हे चतुर्थीचे रूप असल्याने दोन्ही अर्थ घेण्यास जागा नाही. २. नामाचे महत्व पुराणांनी व संतांनी अगदी अलीकडे माजविले असे कोणी म्हणतील म्हणून पुढल्या चौपाईत सांगतात.

**चौ. ८ (१) चारी युगांत हरिनामाने तरल्याचे आधार** — **कृतयुगांत** वाल्मीकीचे उदाहरण पूर्वीच आले आहे. १९/५ 'नाम जपे प्रभु करी प्रसादा । भक्तमुकुटता ये प्रल्हादा' (१/२६/४) **त्रेतायुग** — 'ध्रुव सग्लानि जपुनि हरि नाम । पावे निश्चल अनुपम धामा' **द्वापरांत** — विप्रपत्नी गोपी वगैरे अनेक. कलियुगांतील सर्वसंतानी नाममहिमा अनुभवून गाइला आहे.

**(२) वेदांतील आधार** — **(क)** 'मर्ता अमर्तस्यते भूरि नाम मनामहे । विप्रासः जात वेदसः' (ऋ. ५/८/३५) 'न तस्य प्रतिमा (समान, तुल्य) अस्ति यस्य नाम महद्यशः' (यजुर्वेद ३२/३) किमित्ते विष्णो परिचक्षि नाम प्रयद वक्षे शिपिविष्टो अस्मि' (सामवेद १७/१) 'बृहन्तो नाम ते देवा येऽसतः परिजज्ञिरे' (अथर्व १०/७/२५) 'नाम नाम्ना जोहवीति पुदा सूर्यात्पुरोषसः' (१०/७/३१) ही प्रत्यक्ष वेदांतील, संहितांतील वचने नमुने म्हणून दिली. 'नाम वा ऋग्वेदो यजुर्वेदः... नामैवेतद् नामोपास्वेति' (छां. उ. ७/१/४) चारी वेदांच्या उपनिषदांतून भरपूर वचने आहेत. नाम वंदन टीकेत पूर्वी पुष्कळ अवतरणे दिली आहेत. शिवाय

नृसिंहतापिनी, गोपालतापिनी, दत्तोपनिषद, हयग्रीव, गणेश, लक्ष्मी, सरस्वती, सूर्य, नारायण, देवी, रुद्रहृदय, त्रिपुरातापिनी, अन्नपूर्णा इत्यादि अनेक उपनिषदांत नाममंत्र व त्यांचा महिमा पहावा. **सूचना** – पहिली तीन वचने मा.पी.मधून घेतली आहेत.

(३) **आन उपाय न विशेष कलियुगिं** – मूळांतील विसेषि पद उपाय व कलियुग या दोहोकडे घेता येते व दोन अर्थ होतात. (क) विशेषें करून कलियुगांत दुसरा उपाय नाही. **(ख) कलियुगांत दुसरा विशेष उपाय नाही. हा दुसरा अर्थ तुलसीदासांना अभिप्रेत आहे.** कारण रामकथा श्रवणाने व भक्तीने जीव कृतकृत्य होतो असे अनेक ठिकाणी त्यांनी म्हटले आहे. भक्तीची याचना पण केली आहे. भक्तीची इतर साधने त्यांस मान्य आहेत. राम नाम मुख्य साधन आहे, ते असेल तर बाकीची उपयोगी पडतील. नाम नसेल तर बाकी सर्व साधने निरुपयोगी असे त्यांचे मत आहे. मानसातील अनेक उदाहरणे देण्यापेक्षा त्यांच्याच दोहावलीतील एकच दोहा पुरे होईल. 'नाम राम को (चे) अंक है सब साधन है सून' (शून्य) अंक गएँ कछु हाथ नहिं अंक रहे दसगून (दसपट). रामाचे नाम हा अंक (१, २, ३ इत्यादि) आहे व बाकीची साधने शून्य (पुज्य ०) आहेत. अंक नसेल तर सर्वसाधनाची किंमत शून्य, अंक असून जेवढी शून्ये वर घाल तितकी दसपट किंमत वाढेल. १०, एकावर दोन शून्ये दिली की १००, पण १ हा आकडा गेला की बाकी ०. हा दोहा पाहिल्यावर तुलसीदासांचे इतर साधनांविषयी मत काय हे सांगण्यास आणखी पुरावे नकोत, पण **नेमका हा दोहा टीकाकारांनी घेतला नाही!** (ग) **संगति** – ज्ञानीभक्त भगवंताला विशेष प्रिय का हे आता दोह्यांत सांगतात.

हिं.दो.- **सकल कामना हीन जे रामभगति रस लीन ।**
**नाम सुप्रेम पियूष ह्रद तिन्हहुँ किए मन मीन ॥२२॥**
म.दो.- **सकल कामना हीन जे रामभक्ति - रस लीन ।**
**नामप्रेम-सुधा-ह्रदीं त्यांनिंहि कृत मन मीन ॥२२॥**

**अर्थ** – जे सर्वकामनांपासून मुक्त झाले असून रामभक्तिरसात लीन असतात, त्यांनीही नामाच्या प्रेमाच्या अमृता डोहांत आपले मन मीन (मासा) बनविलेले असते. (मग इतरांनी नाम न घेतले तर त्यांस सुख कसे होणार?) ॥२२॥

**टीका** – दोहा २१ मध्ये 'तुलसी अंतर्बाह्य जर इच्छा प्रकाश फार' इत्यादींने ज्याचा उपक्रम केला त्याचा येथे उपसंहार आहे. (क) ज्ञानीभक्त प्रभूला प्रिय होण्याचे कारण त्यांच्या ठिकाणी कोणतीच कामना नसते; ते जीवन्मुक्त झालेले असतात. त्यांस कांही मिळवावयाचे नसते तरी ते भक्तिरसात सदामग्न असतात. जसे अगस्ति. 'जरिही ब्रह्म अखंड अनंतहि । अनुभवगम्य भजंति जे संतहि ॥ असे

*रूप तव जाणुं वानुं जरि । सगुणरूपि पळपळ मनि रति तरि' (३/१३/१२-१३).*
हनुमंताच्या ऋणातून सुटता येत नाही असे जे रघुनाथाने सुं. कांडांत सांगितले *त्याचे कारण हेच म्हणूनच शंकर, नारद अत्यंत प्रिय.*

(२) ज्ञानी - जीवन्मुक्त - होऊन असे कां करतात याचे उत्तर श्रीरघुवीरानेच दिले आहे. 'प्रौढतनय सम मजला ज्ञानी । बालक सुत सम दास अमानी।। ममबल भक्तां स्वबल तयांनां । काम कोप हे रिपु उभयांना। हे जाणुनि पंडित मज भजति । ज्ञानलाभिं हि न भक्ती त्यजती ॥' (३/४३/८-१०) ज्या भक्तीच्या प्रभावाने सहज ज्ञान झाले तिचा त्याग करण्याचे कारण काय? तसे करणे कृतघ्नता ठरेल. 'यावज्जीव त्रयोवंद्या वेदान्तो गुरुरीश्वरः' (श्रुति)

(३) **नामप्रेम-सुधा ह्रद** — तुकोबांचा अभंग हेच सांगतो - 'संत चरणरज लागतां सहज । वासनेचे बीज जळुनी जाय।। मग रामनामी उपजे आवडी । सुख घडोघडी वाढो लागे ॥' मग भजन कसे होते? 'पडले वळण इंद्रियां सकळां । भाव तो निराळा नाही दूजा' असे होते.

(४) **त्यानिंहि कृत मन मीन** — माशाला पाणी कधीं पुरेसे वाटत नाही आणि एक क्षण सुद्धा पाण्याच्या बाहेर जगता येत नाही. अशीच या भक्तांची स्थिती असते. 'धन्यास्ते कृतिनः पिबंति सततं श्रीरामनामामृतम्' (कि. मं. २) 'तुम्हिंही राम राम दिनरातीं । सादर जपा अनंगाराती' (१/१०८/७) शंकर सतत हेच करतात. (क) मन शब्दाने सुचविले की त्यांचे मन परावाणीच्या राम नादानुसंधानांत संतत रत असते. त्यांना कांही प्रयत्न करावा लागत नाही. जसा मीनाला जलांत राहण्यास प्रयत्न लागत नाही. '**भक्तिमार्गाचा, राम नामाचा आश्रय घेऊन जे वासना कामना विहिन झाले त्यांचे असेच होते, व केवळ ज्ञान मार्गाने, जे वासनाहीन झाले ते ही वादाचा अवलंब करीत नाहीत,** पण जे मुक्त, मानी, पुस्तकी ज्ञानाने मुक्त झालो असे वाटणारेच भक्ति, नाम इत्यादि विषयी वाद घालतात. '**वादो नाऽवलम्ब्यः**' (ना. भ. सू.) 'तुटे वाद, संवाद तो हीतकारी' (समर्थ)

ल. ठे. — येथे भक्तीला रस म्हटले व पूर्वी वर्षाऋतु म्हटले (दोन १९) येथे राम नाम प्रेमाला अमृताचा डोह म्हटले. पूर्वी राम नामाला श्रावणभाद्रपद मास म्हटले व नामावाचून भक्ति अशक्य हे पूर्वी दाखविले. येथे उपसंहार रूपाने हेच दाखविले की **नामप्रेमावाचून भक्तिरस मिळणे शक्यच नाही.** डोहांत जलरूपी रस असतो तसा **नामामृताच्या डोहांतच प्रेमरूपी भक्तिरस असू शकेल. नामप्रेम म्हणजेच रामप्रेम-भक्ति** हे पण येथे सुचविले. (क) नदी न म्हणता डोह - ह्रद म्हणण्याने सुचविले की या डोहांत भक्तमीन सदा सर्वकाळ सुखी असतात. नद्यांचे पाणी आटले तरी डोहांचे पाणी आटत नाही. पावसाळ्यात नवीन पाणी आले की नदीतील मासे मरणोन्मुख होतात; पण डोहांत नवे पाणी आले तरी ते जड असल्याने खाली जाते व जुने हलके स्वच्छपाणी वर येते त्यांत ते सुखी असतात. 'सुखी मीन

जे अगाध नीरांत । जशि हरिशरणां बाधा न जरा' 'सुखीमीन सब एकरस फार अगाध जळांत'

**संगति** — २२/२ मध्ये ब्रह्मसुखाचा उल्लेख केला, व त्या ब्रह्माचा व नामाचा संबंध २१/८ मधे सांगितला होता; तोच पुढील चौपायांत अधिक स्पष्ट करतील -

हिं.- **अगुन सगुन दुइ ब्रह्म सरूपा । अकथ अगाध अनादि अनूपा ॥१॥**
**मोरे मत बड नाम दुहूँते । किए जेहिं जुग निजबस निज बूते ॥२॥**

म.- **ब्रह्मरूप दो निर्गुण सगुणहि । अनुपम अकथ अनादि अगाधहि ॥१॥**
**दोघांहुनि गुरु नाम मम मते । जे उभयां निज बल-वश करते ॥२॥**

**अर्थ** — ब्रह्माची निर्गुण व सगुण अशी दोन स्वरूपे आहेत. दोन्ही अनुपम, अनिर्वचनीय, अनादि व अगाध आहेत ॥१॥ त्या दोघांहून माझ्या मताने नाम मोठे आहे, कारण ते आपल्या बळाने दोघानांही वश करते ॥२॥

**टीका — चौ. १ (१) ब्रह्मरूप — ब्रह्मस्वरूप** (सरूप, सरूपा) ब्रह्माचे रूप असा अर्थ नसून ब्रह्म हेच रूप - स्वरूप. निर्गुण म्हणजे अगुण, निर्गुण निराकार हा एक प्रकार व सगुण म्हणजे सगुणनिराकार (व सगुण साकार) म्हणजेच ईश्वर, परमेश्वर, परमात्मा, एकाला शुद्ध ब्रह्म व दुसऱ्याला मायाशबल ब्रह्म (मायोपाधिवान ब्रह्म) म्हणतात.

(२) **अनुपम - अगाधहि** — (क) अनुपम - उपमा रहित. निर्गुणब्रह्म एकच आहे. सगुण ब्रह्महि एकच आहे व दुसरे यांच्यासारखे नाही म्हणून अनुपम, म्हणजेच 'एकम् एव अद्वितीयम् न इहनाना अस्ति किंचन' (श्रुति) हे सुचविले. उपमा देण्यास समानधर्मी दुसरी वस्तु लागते. दिसणाऱ्या व भासणाऱ्या सर्व वस्तूंत आकाशात थोडे साधर्म्य असल्याने कधीं कधीं दृष्टान्त म्हणून 'खंब्रह्म' आकाशाची उपमा देतात. 'एक अनीह अरूप अनाम। अज सच्चिदानंद परधाम' 'व्यापी ब्रह्म एक अविनाशी । सत् चेतन घन जे सुखराशी' व्यापी-व्यापक वगैरे यांचेच वर्णन आहे. (१/१३/४ टी.प्र.) (ख) अज, स्वयंसिद्ध आहे, नित्यनिरंतर अस्तित्वांत असणारे आहे म्हणून अनादि आरंभरहित, आदि नसलेले. (ग) त्याचा अंत. पार, ठाव लागत नाही म्हणून अगाध. (घ) येथील चारी विशेषणे निर्गुण व सगुण या दोघांना लागतात. एक सगुण आहे इतकाच व्यावहारिक फरक. भाव हा की ही दोन्ही स्वरूपे अशी असल्याने दोघांपैकी कोणाचाहि अनुभव येणे फार दुष्कर आहे. ज्ञानाची साधने मनमति व ज्ञानेंद्रिये यांची गति तेथपर्यंत नाही. ही व असली इतर विशेषणे मानसांत वरचेवर दिसतात म्हणून विस्तार नको. बा. कां. १३, ११४, ११६, १८६, १९२, १९३, ३४१; अयो. कां. ९३, १२६, २२७ इत्यादि अरण्य ४,११,१३,३२; किष्किंधा - २६, सुंदर ३९, लंका १११, ११३, ११५;

उत्तर १३,३४,९१,९२ या दोह्यांतील चौपायांत वगैरे दोन्ही प्रकारचे वर्णन आहे. इतर ठिकाणीही आहेच. (ङ) दोन्ही अव्यक्त आहेत, निराकार आहेत; ब्रह्म जसे व्यापक तसाच ईश्वर, व त्याचाच अंशजीव. महदाकाशासारखे ब्रह्म, जलात व्याप्त असलेल्या आकाशासारखा ईश्वर व जलांत प्रतिबिंबित आकाशासारखा जीव आहे. 'आकाशस्य यथा भेद स्त्रिविधो दृश्यते महान् । जलाशये महाकाशस्तदर्वाच्छिन्न एव हिं ॥ प्रतिबिंबाख्यमपरं त्रिविधं दृश्यते नभः । बुध्द्‌यवच्छिन्न चैतन्यम् एकम्, पूर्णम् अथापरम् । आभासस्त्वपरं बिंबभुतमेवं त्रिधामितिः' (रामहृदय ४५/४६) (च) हा सगुण निराकार ईश्वरच 'हृदयस्थोजनार्दनः' आहे. तोच त्या त्या उपासकांस त्या त्या मंत्रस्थ रूपाने प्रगट होतो. असे न मानल्यास ईश्वर परमेश्वर अनेक आहेत असे मानावे लागेल. 'स एकः' (पा. यो.) गणेशोपासक त्यालाच कारण ब्रह्म -ईश्वर म्हणतो व बाकीच्या देवांस तदंश म्हणतो. प्रत्येक देवतेचे सहस्रनाम पाहिले तर बरीचशी विशेषणे प्रत्येकांत तीच तीच दिसतील. रूपवर्णन व तत्संबंधी कर्मादि यात भेद असतात इतकेच. एकाच देवाची भिन्नभिन्न रूपे असतात. उदा. बालराम, वरवेषांतराम, वनवासी राम, सुवेल पर्वतावरील राम, विरही राम, सिंहासनासीन राम इत्यादि. या प्रत्येकाचे निराळे वैकुंठादि स्थान मानावे लागेल. देवांच्या हस्तपादादिकांची संख्या दोनपासून हजारपर्यंत वर्णिली आहे. (रा. पू. ता. ८-१०) 'रुचीनां वैचित्र्या दृजु कुटिल नाना पथजुषां । नृणामेको गम्यस्त्वमसि पयसामर्णव इव' (शि. म.) हा विस्तार ब्रह्म आणि सगुण ईश्वर सर्वांत सर्वत्र सदा आहेत हे ठसविण्यासाठी करावा लागला.

चौ. २ (१) **दोघांहुनि गुरु नाम मम मते** – (क) माझ्या मताने म्हणण्यात भाव हा आहे की, इतर कोणी मानोत किंवा न मानोत, माझा आग्रह नाही. शास्त्रवाक्यातून जो निष्कर्ष अनुभवाने निघाला तो सांगितला. अद्वैती सुद्धा सद्‌गुरूला ईश्वरापेक्षा श्रेष्ठ मानतात. 'न गुरोरधिकं न गुरोरधिकं न गुरोरधिकं' (गु. गी.) शिव पार्वतीस म्हणाले आहेत. स्पर्शमणि तुम्हांस देईल तो मोठा की स्पर्शमणि मोठा? ज्या नामाच्या सहज प्रतापाने एवंगुणविशिष्ट उभय ब्रह्माची प्राप्ति होते ते या दृष्टीनेच दोघांपेक्षा मोठे म्हटले आहे. 'नामैव तव गोविन्द नामत्त्वत्तः शताधिकम् । ददात्त्युचारणान्मुक्तिर्भवानष्टांग योगतः' (पां. गी.) 'नाम भूरि मनामहे' या वेदवाक्याचा हाच अर्थ आहे.

(२) वशकरणारा वश होणाऱ्यापेक्षा अधिक बलवान, सामर्थ्यसंपन्न, प्रभावी, असलाच पाहिजे हे कोणीहि कबूल करील. नामाला दोन्ही वश होतात. त्याअर्थी नाम दोघांहून गुरु (बड-बडा) श्रेष्ठ प्रभावी आहे हे सिद्ध झाले; कोणी कबूल करा न करा. 'स्मरुनि पवनसुत पावन नामा । ठेवी करुनी निजवश रामा' (१/२६/६) हे मत बनण्याचे कारण पुढे सांगतात. प्रथम शास्त्रप्रचीति सांगितली व आता आत्मप्रचीति सांगतात. गुरुप्रचीति आसल्याशिवाय कोणीही सुविचारी साधक मंत्र ग्रहण करीत नाही. त्रिविध प्रचीतीने जे सिद्ध होते ते सत्य असतेच.

हिं.- प्रौढ़ि सुजन जनि जानहिं जनकी । कहउँ प्रतीति प्रीति रुचि मन की ॥३॥
एकु दारुगत देखिअ एकू । पावक सम जुग ब्रह्म बिबेकू ॥४॥
उभय अगम जुग सुगम नामते । कहेउँ नामु बड ब्रह्म राम ते ॥५॥

म.- प्रौढि सुजन माना न जनाची । रति रुचि वदे प्रतीति मनाची ॥३॥
एक दारुगत दिसतो एक । पावक युगसा ब्रह्म विवेक ॥४॥
उभय अगम युग नामे सुगमचि । ब्रह्म राम यांहुनि गुरु नामचि ॥५॥

**अर्थ** – सज्जन हो! (माझे मत असे जे मी म्हटले ते) मी ही प्रौढी मिरवितो (माझा मोठेपणा सांगतो) असे वाटून घेऊ नका; (कारण) मी आपल्या मनाची रुचि, प्रीति व प्रतीति सांगितली. (एवढेच) ॥३॥ एक अग्नि (पावक) काष्ठांत असतो व एक दिसू शकतो हे जसे तसाच निर्गुण ब्रह्म व सगुणब्रह्म यांचा विवेक (ज्ञान) आहे. ॥४॥ दोन्ही ब्रह्म अगम्यच आहेत; पण नामाने दोन्ही सुगम होतात; म्हणून म्हटले की राम नाम, ब्रह्म (निर्गुण) व राम (सगुण) या दोहोहून मोठे आहे ॥५॥

**टीका – चौ. ३** (१) जनि – नका, नको; जन -हरिदास, हरिसेवक (क) मागे म्हटले की माझे असे मत आहे यात अहंकारयुक्त भाषा आहे असे शुष्क पंडितास वगैरे वाटण्याचा संभव होता. हे अहंमन्यतेने सांगितले नसून माझ्या मनाला जे वाटले ते सांगितले. (२) शास्त्र किंवा गुरु यांच्या मुखाने जेव्हा जाणावे तेव्हा तेथे रुचि उत्पन्न होण्याची शक्यता असते. तसे करण्याची आवड उत्पन्न होते. त्या रुचीच्या प्रेरणेने करू लागले की प्रतीति (अनुभव) येते की त्यांनी जसे सांगितले तसेच आहे, कारण तसे प्रत्यक्ष अनुभवास आले; अशी शास्त्रगुरुवचनाची प्रतीति आली की त्याविषयी प्रेम, प्रीति, रति उत्पन्न होते व ते सतत करावेसेच वाटते. 'न जाणतां परि न ये प्रतीती । विना प्रतीति न उपजे प्रीती। प्रीती विना नहिं भक्ति सुदृढता। खगनाथा! जशी जलचिक्कणता' (७/८९/७-८) यांत जाणणे व प्रतीति यांतील एक पायरी रुचि गाळली आहे, ती वरील चौपाईत आधीच घालून ठेवली आहे, एक उदाहरण घेऊ - एकाने कागदी हापूस आंबा पाहिला सुद्धा नाही. त्याच्या विश्वासू मित्राने हापूसच्या आंब्याचे यथार्थ वर्णन केले की रुचि उत्पन्न होईल की एकदा पाहू तर खरा कसा असतो तो. मग प्रयत्न करून आणला, त्याचा सुवास व रंग पाहूनच वाटले की दिसतो तर सुंदर खरा; तेव्हा खाऊन पाहिला. जे ऐकले होते त्याची प्रतीति आली. तेव्हा सांगतो की गेल्याबरोबर एक पेटी पाठवून द्या हं । विसरू नका. ही प्रीति उत्पन्न झाली. मग दर साल मुंबई कोल्हापूराहून मागवतो ती भक्ति उत्पन्न झाली. तुळसीदास म्हणतात की माझे असेच झाले म्हणून माझे मत निःसंशय ठरले. (क) ज्या गोष्टीने कांही कष्ट न पडता अरिष्ट निवारण होऊन आपल्याला सुख झाले तसे सर्वास व्हावे, हा असे मत सांगण्यांत हेतु असतो. **'न वेचे कदा ग्रंथिचे'** (गाठचे) अर्थ (द्रव्य) काही । मुखे

नाम उच्चारितां कष्ट नाहीं ॥ महाघोर संसार शत्रू जिणावा । प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥७२॥ न ये राम वाणी तया थोर हानी । जनी व्यर्थ प्राणी तया नाम काणी ॥ हरीनाम हे वेदशास्त्री पुराणी । बहू आगळे (फार श्रेष्ठ) बोलिली व्यासवाणी ॥९०॥ मुखी 'राम' त्या काम बाधू शके ना ॥८७॥ 'न वेंचे मुखी सापडे रे फुकाचा ॥९१॥ मुखी नाम नाही तया मुक्ति कैंची । अहंता गुणे यातना ते फुकाची ॥९७॥ जया नावडे नाम त्या येम जाचि ॥१०१॥ मनाचे श्लोक ८१-१०१ पहावे व तुलसीदास आणि रामदास समर्थ यांच्या मतांत काही फरक असल्यास शोधावा. **सर्व अनुभवी संताचे बोल सारखे.** दोघांची प्राप्ति फार कठीण आहे हे दृष्टान्ताने सांगतात.

**चौ. ४-५ (१) काष्ठांत** – लाकडांत अग्नि (पावक) असतो हे सुद्धा पुष्कळास माहीत नसते; तसेच निर्गुण ब्रह्म सर्वत्र भरलेले आहे हे शब्दांनी सुद्धा फारच थोड्यास माहिती असते. प्रेतात, मळयात ब्रह्म आहे का असे विचारल्यास बहुधा, नाही हेच उत्तर मिळते असा अनुभव आहे. (क) काष्ठांत असलेला अग्नि स्वयंपाक, शीतनिवारण इत्यादि करण्यास उपयोगी पडत नाही; तो दिसत नाही, अव्यक्त आहे, सर्पणाच्या ढिगावर बसले कोणी तरी अग्निचा अनुभव येत नाही; कारण तो निष्क्रिय निर्गुण इत्यादि आहे. तसेच ब्रह्म आहे. (ख) सर्व जातीच्या लाकडांत अग्नि असला व घर्षणाने तो प्रगट करण्यासारखा असला, तरी चंदनाची काष्ठे घर्षण करून त्यातून तो काढणे जवळ जवळ अशक्यच; पण पिंपळाच्या काष्ठांतून तो थोड्या कष्टांनी लवकर प्रगट होतो; पण त्यातही सामग्री, शक्ति, कौशल्य, इत्यादि लागतातच. अग्नि निर्माण करण्यास पिंपळाची काष्ठे जशी सर्वात श्रेष्ठ व कार्यसुकर त्याप्रमाणे सर्व साधनांत व नामांत रामनाम श्रेष्ठ हे दाखविले. (ग) सगुण ब्रह्म ईश्वर सुद्धा हृदयात अव्यक्त स्वरूपानेच आहे. त्याला प्रगट करण्यास राम नाम रूपी दोन अरणी आहेत. काष्ठाच्या अरणीना काथ्याचा भुसा, सावरीचा कापूस, दोरी, दोन माणसे इत्यादि साधन सामुग्री लागते. खटपट पुष्कळ; असे रामनाम अरणीना काही लागत नाही. 'आत्मानमरणिं कृत्वा प्रणवं चोत्तरारणिम्। ज्ञान निर्मथनाभ्यासात् पापं दहति पंडितः' (कै. उ.१/११) राम नाम व प्रणव समान आहेत. (१९/२ पहा) ॥ **रसनामरणि कृत्वा रामनामोत्तरारणिम्** ॥ **जपनिर्मथनाभ्यासात्पापं दहति जापकः** ॥ असे निर्विवाद म्हणता येईल. पाप दग्ध झाल्याने काय होते पहा -'येषांत्वंतगतं पापं जनानां पुण्य कर्मणां। ते **द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजतेमां दृढव्रताः**' (भ. गी. ७/२८) द्वंद्व मोह यांचा नाश त्या नामानेच होतो व दृढभक्तिरस मिळतो. (२) वरील दृष्टान्ताने हे दाखविले की निर्गुण सगुण यांत - भेद अंतर - काष्ठांतला अग्नि आणि प्रगट दिसणारा अग्नि यांच्या इतकाच. (क) अरणीतून अग्निची एक ठिणगी उडाली की तो अग्नी अरणीत होता हे अनुभवास येते; तसाच येथे प्रथम निर्गुण साक्षात्कार होतो. (ख) मंथनांत उडणाऱ्या सूक्ष्म ठिणग्यात शीघ्र ज्वालाग्राही शुद्ध पदार्थ ठेवले की व्यवहारोपयोगी पवित्र

अग्नि - पावक प्रगट होतो व शीत निवारण, क्षुधाशान्ति इत्यादि सहज घडते तसेच **रामनामजपाने निर्गुणसाक्षात्कार झाल्यावर त्याला स्नेहरूपी गोघृत व अति आर्तता रूपी ज्वालाग्राही पदार्थाची जोड मिळाली की सगुण साकार रूप प्रगट होते. त्या रामनाम या उत्तरारणीतूनच.** 'ज्ञान विमलजलि करी स्नान जैं । राम भक्ति उरि करी स्थान तैं॥' येथेहि अग्निप्रमाणेच ज्ञान आधी व भक्तिप्रेम मग व मग सगुणसाकार प्रत्यक्षदर्शन व हृदयात निवास. रामनामाने निर्गुण व सगुणसाक्षात्कार सुलभ इतकेच येथे सांगावयाचे आहे. ही दोन्ही स्वरूपे रामनामाला वश होतात म्हणून रामनाम, ब्रह्म निर्गुण व राम सगुण यांच्यापेक्षा श्रेष्ठ आहे हे ठरले. इतर **साधनांनी दोघांची प्राप्ति होणार नाही हे सुचविले.** (ख) निर्गुणाहून राम नाम श्रेष्ठ कसे आणखी स्पष्ट करतात.

हिं.- **व्यापकु एकु ब्रह्म अबिनाशी । सत चेतन घन आनंद रासी ॥६॥**
**अस प्रभु हृदयँ अछत अबिकारी । सकलजीव जग दीन दुखारी॥७॥**
म.- **व्यापी ब्रह्म एक अविनाशी । सच्चिद्घन आनंदसुराशी ॥६॥**
**असुनि असा प्रभु हृदिं अविकारी । दुःख दैन्य जग जीवां भारी ॥७॥**

अर्थ — ब्रह्म एक व्यापक अविनाशी सच्चिद्घन व आनंदाची श्रेष्ठ रास (आनंद घन) आहे ॥६॥ असा अविकारी प्रभु सर्वांच्या हृदयात असता (अछत) जगातील सर्व जीव फार दीन व दुःखी आहेत ॥७॥

टीका - चौ. ६ (१) या चौपाईतील बहुतेक विशेषणांचे विवेचन १३/४ मध्ये केले आहे. येथे अन्तरात्मा स्वरूपाचे वर्णन आहे. 'एकोदेवःसर्वभूतेषु गूढः सर्व व्यापी सर्वभूतान्तरात्मा ॥ कर्माध्यक्षः सर्वभूताधिवासः साक्षीचेता केवलो निर्गुणश्च' ॥ श्वेता. उ. ६/११) सार हेच की एकच देव सर्वभूतांचा अन्तरात्मा असून तो सर्वव्यापक, कर्माध्यक्ष साक्षी चैतन्यस्वरूप केवल निर्गुण आहे. (क) सर्व व्यापक- तिळांत तेल, दुधांत लोणी, उसांत रस वा काष्ठांत अग्नि जसा आहे तसाच तो व्यापी म्हणजे सर्वांना व्यापून आहे. जीव सर्व व्यापक नाहीं, सर्वज्ञ सर्वसाक्षी नाही. 'रिता ठाव त्या राघवेविण नाही' असा प्रभु आहे.

**चौ.** ७ - (१) सदा सर्वदा अस्तित्वांत असणारा, ज्ञानाचा व आनंदाचा महासागर, अविनाशी जन्ममरणादि विकारहीन, असा हरि-प्रभु सर्वांच्या हृदयातच आहे. तो जीवाचा सहज सखा साथीदार सतत जवळ आहे; तरी जीवाला मरणाचे भय, व्याधीचे भय, जरा भय, इत्यादि दुःखेच दुःखे! 'जगीं सर्वसुखी असा कोण आहे' 'सुखपाहतां जवापाडें । दुःख पर्वता एवढे' (समर्थ) सर्वदा सुखी कोण याचे उत्तर हेच ॥ **'जगीं सर्व सूखी असा तोचि आहे॥ जयाचे मुखी सर्वदा नाम राहे'॥** (प्रज्ञा) जीव, सुखासाठी, आनंदासाठी या लोकांतरात धावत येरझारा करीत असतो. प्रभु अविकारी जवळ असून जीवांना वाटते मी लहान, मोठा, रोडका, लठ्ठ,

मरणारा, जन्मणारा इ. व कामक्रोधादि अनेक विकारांनी ग्रस्त होऊन दीन दुःखी असतात. 'चक्रवर्ती पुत्र खापरा घे हाती । भीक मागे दाती तृण धरी ॥ दिवा लावावया नाही तेलवाती । अंधारी तो राती ठेचा खाई' (प्रज्ञा) असे का व्हावे ? असा जगत्पिता जवळ असुन जीव-पुत्रांची अशी दुर्दशा आहे.

**चारी खाणी** – चौऱ्यांशी लक्ष योनींतील स्वर्गातील देवांची सुद्धा सर्व जीवांची अशी दुर्दशा आहे. सार हे की अशा प्रभूच्या जीवाला सुखी करण्यास कांही उपयोग होत नाही. तो स्वतः जीवाना सुखी करीत नाही. घरातील जमिनीत, भिंतीत तुळयांत खाली वर अपार धन ठेवलेले असता जीव भीक मागून शिळेभाकरीचे तुकडे डोळयातील अश्रूंची अन्नशुद्धि घालून खात असतो. त्या बिचाऱ्याला त्या धनाचा काय उपयोग? असे अनंत जन्म चालले आहे. (क) अशा एका, जीवाला एका साधूने एक गिरमिट आणून दिले व सांगितले की या खांबाला भोके पाडीत बस, अगदी जवळ जवळ वीत दोन वीत भागांत भोके पाड, तसे करतांच त्या खांबातले धन लागले खणखण बाहेर सांडायला! आता सांगा की त्याने त्या साधूवर जास्त प्रेम करावे की त्या धनावर करावे? तो साधु मोठा उपकार कर्ता वाटेल की ते धन मोठे उदार वाटेल? असेच रामनामाचे आहे हे पुढे सांगतात -चौ ३ च्या टीकेत सुचविलेले मनाचे श्लोक अवश्य वाचावे.

हिं.- **नाम निरूपन नाम जतन ते । सोउ प्रगटत जिमि मोल रतन तें ॥८॥**

दो.- **निरगुन ते एहि भाँती वड नाम प्रभाउ अपार ।**
**कहउँ नामु बड राम ते निज बिचार अनुसार ॥२३॥**

म.- **नाम निरूपण सुयत्न घडतो । होई मणि मूल्यसा प्रगट तो ॥८॥**

दो.- **अगुणाहुनि नामी असा महा प्रभाव अपार ।**
**नाम थोर रामाहुनी वदूं स्वमति - अनुसार ॥२३॥**

**अर्थ** – तो हृदयात असणारा प्रभु नाम निरूपण व उचित यत्न केला (घडला) म्हणजे प्रगट होतो, जसे मण्याचे मूल्य (रतन-रत्न-जतन- यत्न) प्रगट होते (मिळते) ॥८॥ याप्रमाणे नामाचा प्रभाव निर्गुण ब्रह्माहून मोठा अपार आहे. (हे दाखविले) आता, अवतारापेक्षा रामापेक्षा सुद्धां नाम मोठे आहे हे माझ्या बुद्धिप्रमाणे सांगतो ॥२३॥

**टीका** – चौ. ८ (१) २१ व्या दोहांत रामनामाला मणिदीप म्हटले हे लक्षात असेलच. येथे हिंदीत मणि शब्द नसला तरी समानार्थक रत्न शब्द आहे. मणिरत्न प्राप्त झाल्यावर गारगोटी आहे असे वाटून टाकून देण्याचा संभव असतो, पण शहाणा मनुष्य रत्नपारख्याकडे जाऊन दाखवितो. हे रत्न आहे पण याला पैलू पाडले पाहिजेत म्हणजे त्याची बाजारात चांगली किंमत येईल, असे जे सांगणे व ऐकणे त्याचे नांव निरूपण, हे जर केले नाही तर ते रत्न असून दगड, धोंडा,

गारगोटी समजून फेकून देतील किंवा पेपरवेट (कागदावर ठेवण्याचे वजन) किंवा पासंग म्हणून वापरले जाईल. (क) **नामनिरूपण** – नामाचे हि असेच आहे. ते सहज सुलभ असल्याने यांत काय आहे? याने काय होणार आहे? वगैरे प्रकारे तुच्छता वाटते, यास्तव मागे नाम वन्दनारंभापासून (१९/१) नामाच्या बीजांचा अर्थ व त्यांचा प्रभाव नंतर रा व म यांचा महिमा व संबंध रकार (रेफ) व म कार यांचे महत्व (२०) नामरूप यांचा संबंध आणि 'नामाधीन रूप राही' हा सिद्धान्त, नामानेच निर्गुण सगुणांची प्राप्ति, गूढगतिविज्ञान, अष्टमहासिद्धि संकटादि आर्ति विनाश; इत्यादि पाहिजे असेल ते नाम जपाने मिळते, निर्गुण सगुणाहून नाम मोठे कसे; या आतापर्यंत सांगितलेल्या सर्व गोष्टी व पुढे दो,२७ पर्यंत सांगितले जाणारे सिद्धांत, तसेच नामाने पापी, पुण्यवान, स्त्री पुरुष, उच्च नीच कसे तरले याची ऐतिहासिक उदाहरणे वगैरे **विश्वसनीय, अधिकारी, नाम प्रेमी व अनुभवी माणसाच्या मुखाने मन लाऊन श्रवण करणे याचे नांव नामनिरूपण.**

(२) **सुयत्न** – रत्नाला पैलू पाडून घेणे, 'चतुर शिरोमणि तेच किं जगती । मण्यासाठी जे सुयत्न करिती ॥ सुगम उपाय जरी पावाया । नर हत भागी उडविति पायां' (७/१२०/१०,१२) ही वचने भक्ति चिंतामणीला जितकी यथार्थ आहेत, तितकीच नाम कौस्तुभमण्याला यथार्थ आहेत. पैलू पाडणारा कारागीर कुशल असावा लागतो व तज्ञ असला पाहिजे. पैलू चांगले पडले नाहींत तर योग्य किंमत, मूल्य मिळणार नाही. त्याचप्रमाणे योग्य गुरुकडून मंत्रमण्याला उत्तम पैलू पाडून तो घेतला पाहिजे. मुख्य किंमत चळते, व मिळते ती उत्तम पैलू पडण्यानेच. मंत्रजप करणाराच्या प्रकृतीला, ग्रहानुकूलते प्रमाणे अनुकूल मंत्र कोणता, कोणता मंत्र लवकर सिद्ध होईल हे मंत्र व ज्योतिष शास्त्रांच्या आधाराने जाणता आले पाहिजे. (क) **चेतन** – जिवंत मनुष्य सुद्धा झोपला म्हणजे त्यास काही कार्य करता येत नाही; असून नसून सारखाच. तो मंत्र गुरुने चेतन केलेला, सिद्ध केलेला असला पाहिजे. चेतन मंत्राची सुद्धा सुप्त व जागृत अवस्था असते म्हणून मंत्रांचा सुप्त प्रबोध काळ जाणणारा; व सुप्तमंत्रास, जागृत करण्याचा विधि चांगला सक्रिय जाणणारा; आणि कोणत्या देवाचा मंत्र कोणत्या लग्नावर उपदेश करण्यास योग्य इत्यादि जाणणारा मंत्र चैतन्य शिष्यांत संक्रमित करू शकणारा गुरु पाहिजे. अशा गुरूकडून मंत्र घेणे म्हणजे मंत्र रत्नाला पैलू पाडून घेणे. (ख) असा मंत्र मिळाला तर त्याचे मोल – मूल्य मंत्रोपदेश काळीच मिळते. म्हणजेच उपदेशकाळीच त्या देवतेचे दर्शन हृदयात किंवा मिटलेल्या डोळ्यांनी होते. शिष्य चांगला अधिकारी असेल तरच हे घडेल. तथापि अधिकारानुसार प्रकाश दर्शन, अलौकिक आनंद, स्थिरता, निर्विचार मनःस्थिती, शरिरकंप, रोमांच अश्रु इत्यादि कांहीतरी अनुभव येतोच येतो. न आल्यास शिष्य अनधिकारी ठरेल. पण एक वर्षपर्यंत नियमाने, सांगितलेले पथ्यपालन करून सांगितलेल्या पद्धतीने जप करून सुद्धा काही अनुभव

न आला तर गुरु अनधिकारी ठरेल; म्हणजेच मंत्र रत्नाला पैलू मुळींच पडले नाहीत असे सिद्ध होईल. (ग) मिळालेले दुर्लभमूल्य टिकविण्यास व वाढविण्यास सतत जपरूपी सुयत्न पाहिजेच. म्हणजे योग्यकाळी (प्रयत्नाच्या प्रमाणांत) सगुण निर्गुण साक्षात्कार हृदयात भगवत्प्रेम रूपी अमूल्य मूल्य मिळेलच त्या प्रेमाला वश होऊन भगवान निरंतर हृदयात राहिलेले दिसतील.

ल. टे. – तुलसीदासमहाराज उत्तम मंत्रशास्त्रज्ञ व ज्योतिषशास्त्रज्ञ असून ते मंत्राला पैलू पाडण्यात फार प्रवीण होते हे सर्वसाधारण वाचकांस न पटले तरी अशाप्रकारे मंत्रोपदेश ज्यांस मिळाला ते लोक तरी निःसंशयपणे म्हणतील की मानसगूढार्थचंद्रिकेत या चौपायांचा जो अर्थ केला गेला आहे व तुलसीदासांविषयी या बाबतीत जे म्हटले आहे ते त्रिसत्य आहे; पण असे वाचक थोडेच असणार. येथे केलेले विवेचन ज्यांस मान्य नसेल त्यांनी मा. पीयूषमधील अनेक मतांपैकी मानेल ते घ्यावे.

**आणखी थोडे लक्षात ठेवावे** – नील प्रकाश, नीलबिंदुदर्शन हे वैष्णव देवतेचे प्रकाशरूप दर्शन होय; श्वेतशीतल प्रकाश वा बिंदु शैवदेवतांचे, पीतवर्ण वा रक्तवर्ण शक्ति देवतांचे, श्वेतप्रखर तेज सूर्याचे समजावे. गणेशाच्या प्रकाशरूपाचे मंत्रोपदेशकालीन अनुभव घेण्यास न सापडल्याने येथे न देणे चांगले. हे प्रकाशानुभव मंत्रोपदेश कालीन समजावे. पुढे हेच दिसतील किंवा बंदहि होतील वा इतरहि दिसतील.

**दोहा** – असा (एहिभाँति - या प्रकारे) म्हणजे साधनसाध्य परिणामाच्या दृष्टीने पूर्वी भेद दाखविला त्याप्रमाणे, तत्वतः नाम नामी अभेद आहे. सुलभता-दुर्लभता, स्वाधीनता-पराधीनता इत्यादि प्रकारे रामनाम निर्गुण ब्रह्मापेक्षा फार मोठे आहे म्हणजेच त्याचा प्रभाव अपार आहे. चिंतामणि किंवा परीस (स्पर्शमणि) यांची किंमत कोण व किती करणार? ज्याच्या जवळ जेवढे द्रव्य असेल तेवढी तो त्यांची किंमत करील. सर्व राज्य देऊन सुद्धा रामनाम कौस्तुभ रत्नाची किंमत होणार नाही. ज्याला जेवढा अनुभव आला तेवढा त्याचा प्रभाव तो सांगणार. 'नामाचा महिमा जाणे शंकर' 'परी वर्णू न शके अंतवर।' म्हणून अपार अगाध आहे. जे ब्रह्मापेक्षा थोर ठरले त्याचा प्रभाव कोण सांगणार! अति अपार, अती अगाध, अनिर्वचनीय याशिवाय दुसरे शब्दच कुठले! म्हणून म्हणतात की रामचंद्रांपेक्षा, सगुणसाकार ब्रह्मापेक्षा रामनाम कसे श्रेष्ठ आहे ते यथामति यथाशक्ति पुढील चौपाईपासून सांगतो. सांगण्यास शब्द पाहिजेतच, पण विचार सुद्धा शब्दांवाचून करता येत नाही. विचार म्हणजे एक प्रकारे स्वगत मूक भाषण असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. शब्द मनांत न उच्चारतांच विचार करता येतो का पहावा.

**संगति** – रामावतारांतील चरित्राशी तुलना करूनच आता विचारतील की बोला राम मोठे की नाम मोठे? पुढील चौपाईपासुन दोहा २५ पर्यंत संपूर्णरामचरित्रसूत्र काव्य मुक्ताफळांत कौशल्याने ओवून ठेवले आहे फक्त भरतचरित्र त्यांत नाही.

हिं.- राम भगतहित नरतनु धारी । सहि संकट किए साधु सुखारी ॥१॥
नामु सप्रेम जपत अनयासा । भगत होहिं मुद मंगलबासा ॥२॥
राम एक तापस तिय तारी । नाम कोटि खल कुमति सुधारी ॥३॥

राम भक्तहित मानवतनुधर । सहुनि संकटे भक्तां सुखकर ॥१॥
म.- प्रेमे जपतां नाम, विनाश्रम । भक्त बनति मुद मंगल आश्रम ॥२॥
राम एक मुनि नारी तारी । नाम कोटि खल कुमति सुधारी ॥३॥

**अर्थ** – रामांनी भक्तांच्या हितासाठी नरशरीर धारण केले व अनेक संकटे सोसून भक्तांना संताना सुखी केले. ॥१॥ पण नामाचा जप प्रेमाने (सप्रेम प्रेमे) केल्यास काही श्रम न पडता जापक (नामभक्त) आनंदमंगलांचे निवासस्थान बनतात. ॥२॥ रामांनी एका मुनीच्या स्त्रीचा (तापसतिय -तपस्व्याची स्त्री) उद्धार केला (तारली) तर नामाने कोट्यावधि खलांच्या कुमति रूपी स्त्रिया सुधारल्या (उद्धार केला). ॥३॥

**टीका** – **चौ १** (१) भगवंताने मनुष्य बनणे म्हणजे आपले महत्व कमी करणे आहे; म्हणूनच नारदांनी शाप दिला की **'धरुनि फसविला मज जे देहा । तोच धरा मम शाप असे हा'** (१/१३७/६) **'नरतनुसम नहिं देह दुजा वर'** (७/१२१/९) हे वचन जीवांच्या संबंधी आहे, म्हणून विरोध नाही. भगवत्स्वरूपापेक्षा नरतनु हीन नसती तर शाप कशाला दिला असता? (क) भगवान नरतनूच काय 'मीन कमठ सूकर नरहरि' असे देह सुद्धा भक्तांच्यासाठी घेतात. इतके ते कृपाल आहेत. 'अवजानंति मां मानुषी तनुमाश्रितम्' (भ. गी.) अपमान सुद्धा सहन करावा लागतो. परशुरामाने व रावणाने सर्वांच्या देखत अपमान केला आहे. पण सर्व सहन केला. (२) भक्तहित -भक्तांसाठी, भक्तांच्या हितासाठी 'करिति सकल हे भक्तालागी' 'प्रणति कृपाल परम अनुरागी' (१।१३/५) अवतार घेऊन चरित्र मागे ठेऊन त्या योगे हित करतात वगैरे (१/१३/४-६ टी. प) येथे **अवतार हेतु सुचविला व अवतार घेतात हे सुचविले.**

(३) **सहुनि संकटे भक्ता सुखकर** – स्वतः नाना संकटे सोसली तेव्हा भक्तांना सुखी करता आले. परंतु नामाला अवतरावे लागत नाही संकटे सोसावी लागत नाहीत व अपमानादि सहन करावे लागत नाही.

**चौ. २** (१) **प्रेमे जपतां नाम विनाश्रम'** – नामाचा जप प्रेमाने केला जातो. करणाराला श्रम नाहीत व नामाला ही श्रम नाहीत. काहींना सुख देण्यासाठी इतरांना नाम दुःख देत नाही. पण भक्तांना सुख देण्यासाठी राम भक्तशत्रूंना दुःख देतात; विनाश करतात. देवांना, वनवासी मुनीना वगैरे सुख देण्यासाठी अयोध्येतील लोकांना १४ वर्षे असह्य दुःख द्यावे लागले. दशरथ तर मरण पावले. नामाला असे करावे लागत नाही. (क) **भक्त होति मुदमंगल आश्रम.** परमानंदमय व

परममंगलांचे निवासस्थान नामभक्त बनतात. या दोन चौपायांत विषयाचा उपक्रम केला. मुदमंगलनिवास कसे बनवते नाम ते क्रमशः पुढे सांगतात.

चौ – ३ (१) रामावतार कार्यास प्रारंभ ताटकावधाने झाला असला तरी नाम ज्याक्रमाने भक्त बनविते, मुदमंगलनिवास करते तो क्रम येथे मुख्य आहे. म्हणून रामचरित्रक्रम यात सापडेलच असे नाही. नाम मोठे आहे म्हणून नाम चरित्रानुसार क्रमच योग्य आहे. (क) एकट्याच तापसस्त्रीचा मुनिनारीचा, अहल्येचा उद्धार केला श्रीरघुवीराने. पण नामाने खलांच्या स्त्रियांचा म्हणजे त्यांच्या कुमतींचा, दुर्बुद्धीचा उद्धार केला. एकाच नव्हे कोट्यावधि. रामाने एकाच खलस्त्रीचा उद्धार केला नाही. शूर्पणखेचे नाक कान कापले. **कुबुद्धीला सुबुद्धि बनविते नाम.** 'सुमति तिथे संपत्ती नाना। कुमति तिथे किं विपत्ति निदाना' (५/४०/६) रावणाची कुमति भगवंतानी सुधारली नाही. दैवी संपत्ती मिळवून द्यावयाची असते म्हणून नाम प्रथम कुमतिला सुमति बनविते. अमंगलहारी व मंगल भवन दोन्ही कार्ये नामाने केली. **सद्वासना ही पहिली भूमिका नामाने येथे दिली.** वाल्मीकि, अजामिल, गणिका, व्याध व 'आभीर, यवन किरात, खस, चांडाल अति अघरूपजे । प्रभु नाम सकृदपि वदत पावन होति' (७/१३०/छं) 'यन्नामा नर विवशहि वदती । बहुजन्मार्जित अघगिरी जळती' (१/११९/३) कुमति सुधारल्यावर पुढली पायरी कोणती ते आता पुढील चौपाईत दाखवितील. **नामाचा प्रभाव रामाच्या कोट्यावधिपट आहे की नाही हे आता सांगा असे तुलसीदास सुचवितात. कुमति सुधारू लागली की नामाचा प्रभाव पडू लागला असे समजावे.** अहल्योद्धार सांगितला.

हिं.- **रिषि हित राम सुकेत सुता की । सहित सेन सुत कीन्हि बिबाकी ॥४॥**
**सहित दोष दुख दास दुरासा । दलइ नाम जिमि रवि निसिनासा ॥५॥**
**भंजेउ राम आपु भव चापू । भव भय भंजन नाम प्रतापू ॥६॥**

म.- **ऋषिहित रामें सुकेतु तनया । सहित सैन्य सुत नेली विलया ॥४॥**
**दास दुराशा सदुःख दोषां । ध्वंसी नाम जसा रवि दोषा ॥५॥**
**रामें स्वतां भग्न भव चापहि । भव भय भंजन नाम प्रतापहि ॥६॥**

**अर्थ** – विश्वामित्र ऋषीच्या हितासाठी रामाने सुकेतूची मुलगी जी ताडका तिला तिच्या सैन्यासह व मुलांसह विलयाला नेली. ॥४॥ (पण) सूर्य जसा रात्रीचा (दोषा-रात्र) विध्वंस करतो त्याप्रमाणे रामनाम दासांच्या दुराशेचा दोष व दुःखांसह नाश करते ॥५॥ रामाने स्वतः भवाचे (शिवाचे) चापच मोडले (पण) नामाचा प्रताप भवभयाचा विनाश करतो. ॥६॥

**टीका – चौ. ४ (१) सुकेतु सुता** – ताडका .येथे.बापाचे नांव देऊन इतके सुचविले की तिचा पति तिथे नव्हता; ती विधवा होती हे एवढ्याचवरून ठरत नाही. विधवा होती ही गोष्ट खरी. (क) सुकेतु नांवाचा एक महावीर यक्ष होता.

त्याने अपत्य प्राप्तीसाठी घोर तपश्चर्या केली. ब्रह्मदेव प्रसन्न झाले. सुकेतूला मुलगी झाली ती ताडका. तिला दहा हजार हत्तींचे बळ होते. तिचा विवाह सुंदाबरोबर झाला. तिला मारीच व सुबाहु हे दोन मुलगे होते. सुंद अगस्तीच्या शापाने मेला. सुंद मेल्यावर अगस्तीला खाण्यासाठी ताडका धावली, तेव्हा अगस्तींच्या शापाने ती पुत्रादिकासह राक्षसी बनली. तेथून निघून ती विश्वामित्राश्रम वनात जाऊन राहिली व त्यांच्या यज्ञांत विघ्ने करू लागली. विस्तार १/२०९ टीकेत पहावा

(२) मारीचाला ठार मारला नाही, त्याची राक्षसीवृत्ती मारून त्याला शंभर योजने दूर उडवला व बाकी सर्वांना मारले; यामुळे बिबाकी- बेबाकी बाकी न ठेवलेली या शब्दाबद्दल शंका काढून विविध अर्थ केले गेले आहेत; म्हणूनच मराठीत विलया नेली असे शब्द घातले आहेत. अध्यात्मदृष्टीने अर्थ १/२१० च्या टीकेत दिला आहे. ताडका स्त्रीलिंगी, सैन्य नपुंसकलिंगी व मुलगे पुल्लिंगी; असेच शब्द पुढील चौपाईत आहेत.

**चौ ५ – (१) – दुराशा – ताडका, दोष पुत्र व दुःखे सैन्य.** येथे दुराशा म्हणजे स्थूल देहाच्या सुखाची आशा. स्थूल देह हे दृश्य शरीर, मी आहे अशी बुद्धी जोपर्यंत असेल तोपर्यंतच त्याच्या सुख दुःखांविषयी आसक्ति व द्वेषादि असणार (रागद्वेष). ही आशाच अतिदुष्ट आहे; **म्हणूनच** ती दुराशा दुष्ट आशा आहे. **'सेवित‍ि - अविवेकी नर जसे शरीरा'** (२/१४२/२) **देहबुद्धि आधीं मारावी लागते.** 'आशा समूळ खांडोनि काढावी । तरीच परमार्थाची आस धरावी' तिला मारली तरच तिचे पुत्र लिंग देहाभिमान व कारण देहाभिमान विलयास नेता येतात. ती मेली (दुराशा) तरी स्वर्गप्राप्तीची, कीर्तीची वगैरे इच्छा शिल्लक राहतातच. याचे कारण लिंगदेह आहे. 'तो मी नाही' असा ठाम अनुभव घेऊन त्याला परमार्थानुकूल करून ठेवला म्हणजे झाले. तेच मारीचाचे केले. **'कीट भृंग सम मग गति माते। जिथे तिथे दिसति दो भ्राते'** (३/२५/७) असे मारीचाने रावणास सांगितले आहे. विषयांचे चिंतन सुटून भगवच्चिंतन करीत राहण्याचे व्यसन बुद्धिवृत्तीला लागले की एक मोठा दोष गेला. ब्रह्माकार - रामाकार वृत्ति सतत राहू लागली म्हणजे मगच अज्ञान रूपी कारणदेहाचा विनाश करता येतो. रामाने याच अनुक्रमाने केले. (३) **दुसरा दोष** सर्वदोषांचे मूळ **सुबाहु कारण देह;** त्याचा नाश साध्या बाणाने होत नाही. त्याला **'पावक बाणाने'**च मारावा लागतो. 'नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते' (भ.गी.) **'ज्ञानाग्निः सर्व कर्माणि भस्मसात्कुरुते'** (भ.गी.) ज्ञानरूपी पवित्र (पावक) बाणानेच अज्ञान सुबाहुला जाळून टाकावा लागतो. ज्ञान हा अग्नि आहे. अज्ञान सुबाहुला मारला की संचित क्रियमाण कर्मांचे भस्म होते व ते खाली पडते. 'ज्ञानेन तु तदज्ञानं येषां नाशितमात्मनः । तेषामादित्यवत् ज्ञानं प्रकाशयति तत्परम् (भ. गी.) ज्यांचे अज्ञान ज्ञानाने नष्ट झाले त्याना ते आदित्यासारखे परप्रकाशक स्वयंप्रकाशरूप ज्ञान लाभते. या चौपाईत पण आदित्य रवि हाच दृष्टान्त जणू काय वरील भाव स्पष्ट करण्यासाठीच दिला आहे. ज्ञानासारखे पवित्र काही नाही

म्हणूनच 'पावक शरें सुबाहुस मारी। निशिचर कटक अनुज संहारि' (क) सुबाहु-सु-अति बाहू आहेत ज्याचे. बाधृ - पीडा देणे, छळणे, विरोध करणे; या धातूपासून बाधृ शब्द झाला आहे. तसाच बाहु प्रयत्ने; म्हणजेच छळण्याचा, बाधा देण्याचा अति प्रयत्न करणारा तो सुबाहुः असाच कारण देह आहे. जीवाला सर्व पीडा अज्ञान रूपी कारणदेहामुळेच होते. तेच कारण आहे क्लेशांचे.

(४) कर्तृत्व भोक्तृत्व – अहंकार व अज्ञान हे सर्व दोषांचे स्वामी, संरक्षक, प्रेरक, पोषक आहेत म्हणून प्रधान मल्लनिर्बहण न्यायाने यांचाच उल्लेख केला. यांचा नाश झाला की 'मायेचा नाश, 'मदादिदोषमोचनं,' कामादिखलदलगंजनं' सहजच करता येतो. आपोआपच होतो. अश्वत्थ - वट वृक्षाची मुळे तोडली की शाखा तोडाव्या लागत नाहीत. पण शाखाच तोडल्याने वृक्ष मरत नाही. लक्ष्मणाने शेष राहिलेल्यांचा विनाश केला. लक्ष्मण म्हणजे विराग आणि रामचंद्र ज्ञान आहेत. कामादि शेष दुःखांचा विनाश ज्ञान प्राप्तीनंतर प्रखर वैराग्यानेच होतो. दुःखाची कारणे दुराशा व दोष आहेत. ती नष्ट झाली की कार्यरूपी दुःखाचा विनाश करण्यास फार प्रयास पडत नाहीत. **या प्रमाणे रामनामाने सुमति देऊन ज्ञान वैराग्यांची प्राप्ति करून दिली जाते हे येथे सांगितले.**

(ख) रामाने एकच ताडका, मारीच व सुबाहु यांची वासलात लाविली व लक्ष्मणाने या दोघांचेच सैन्य मारले. राम नामांत रा-राम व म - लक्ष्मण आहे हे पूर्वीच सांगितले आहे. तथापि रामनाम हजारो ताडका, मारीच सुबाहु व त्यांचे सैन्य (दुःखे) यांचा सहज लीलेने नाश करते. रवि दोषा - रात्री - चा नाश करतो तेव्हा त्यास काही श्रम वेळ, कष्ट लागत नाहीत. उगवला रवि की रात्र पळूनच जाते. असेच राम नामाचे आहे.

(ग) विश्वामित्र यज्ञरक्षणासाठी जाताना रामास आपल्या मातापितरांस दुःखी, शोकाकुल करावे लागले; स्वतः सम्राटकुमार असून पायी, अनवाणी चालत तपस्वी बनावे लागले. ५/६ दिवस अहोरात्र पाहरा देत उभे रहावे लागले इत्यादि विविध कष्ट स्वतः सोसले पण नाम, दुराशा दोष दुःखांचा संहार करताना कोणाहि इतरांस दुःख शोक देत नाही. किंवा स्वतः त्यास काही कष्ट दुःख होत नाहीत. तेव्हा आता सांगा पाहू राम नाम मोठे की राम मोठे? याचे फळ नाम काय देते ते आता पुढल्या चौपाईत सांगतात.

**चौ ६ (१) –** रामचंद्रानी स्वतः आपल्या हातांनी भव चाप तोडले त्यास स्वतः थोडेतरी परिश्रम निदान धनुष्याजवळ जाऊन उचलून दोरी लावण्याचे करावे लागले. शिवाचे धनुष्य मोडले तरी त्याचा शूल वगैरे विश्वसंहारकारी आयुधे शिल्लक राहिलीच. 'इंद्र कुलिश मम शूल विशाल' (उ. कां. १०९/१३) रुद्र - शंकर त्रिशूलाने संहार करू शकतात.

(२) नामाला स्वतः काहीच कष्ट न पडता त्याचा प्रताप भव म्हणजे जे संसृतिचक्र त्याचाच नाश करतो. जो दास नामभक्त झाला त्याची जन्ममरण परंपरा संपते. याचेच नाव भवभयभंजन. त्या भक्तास या जगांत राहून सुद्धा सर्वप्रकारे निर्भयता व देहांतानंतर जन्मनिर्भयता मिळते. जगातील बाकीच्या जीवांना परस्परांचे भय वाटत असले व बाकीचे जग पूर्वीसारखेच असले तरी याला कुठे कसलेच भय नामाच्या प्रभावामुळे उरत नाही. दुसऱ्या चरणाचे दोन अर्थ निघतात. (क) भव-रूद्र-हर; त्याच्यापासून उत्पन्न होणारे भय - मरणभय, उरत नाही. हराचे कार्य संहार करणे आहे. हर स्वतः नामप्रताप जाणणारे असल्याने 'संस्मृतिरूजं द्रावयति, इति रुद्रः' भवरोगाला पळवून लावणारे बनतात. (ख) भवरुद्र नामप्रताप जाणणारे असल्याने त्यांच्या भयाचा (भवाच्या भयाचा) विनाश झाला. 'शंभुस नामीप्रताप सुविदित। काळकुटे फळ सुधा समर्पित' म्हणूनच त्यांनी हालाहल निर्भयपणे घेतले; (१९८ टि. प.) (ग) ज्ञान वैराग्यामुळे भवनाश - भवभयनाश होतो हे प्रसिद्ध आहे. नामाने हजारो दासांची भवभयरूपी भयंकर धनुष्ये केवळ आपल्या प्रतापाने मोडली. प्रताप शब्दाचा विशेष अर्थ १/११/७ टी. पहावा. यावरून सुद्धा ठरले की रामापेक्षा नाम फार मोठे आहे.

ल. टे. — येथे विश्वामित्र यज्ञरक्षणापासून धनुर्भंग सीतास्वयंवरापर्यंत रामचरित्र सांगितले. पुढील चौपाईत दण्डकारण्याचा उल्लेख करून वनवासादि अयोध्याकांडपूर्वार्ध चरित्र सुचविले जाईल.

हिं.- **प्रभु दंडकबन कीन्ह सुहावन । 'जन मन अमित नाम किए पावन ॥७॥**
**निशिचर निकर दले रघुनंदन । नाम सकल कलि कलुष निकंदन ॥८॥**

म.- **प्रभु दंडकवन करिती सुशोभन । जनमन अमित नाम करि पावन ॥७॥**
**निशिचर निकर दलिति रघुनंदन। नाम सकल कलि कलुष निकंदन ॥८॥**

**अर्थ** — प्रभु रघुवीराने (एक) दंडकारण्य सुशोभित केले; पण रामनामाने अगणित दासांची मनरूपी दंडकारण्ये पावन केली; (करते व करील) ॥७॥ दंडकारण्यात रामाने निशाचर समूहाचा विनाश केला; पण नाम सर्वच कलिमलांचा निःशेष नाश करणारे आहे ॥८॥

**टीका — चौ. ७** (१) प्रभु — वाटेल ते करण्यास, किंवा उलट करण्यास समर्थ, (कर्तुम्, अकर्तुम्, अन्यथा कर्तुं समर्थ) (क) दंडकवन — सूर्यवंशातील इक्ष्वाकु राजाचा दंड नावाचा मुलगा होता; त्याच्या संबंधाने विंध्याद्रीपासून निलगिरीपर्यंतच्या शंभर योजने लांबीच्या भागास दंडकारण्य असे नांव आहे. (विशेष माहिती ३/१३/१६ टी. प.) (२) **सुशोभन केले** — मुनीच्या उग्र शापामुळे ते उजाड झाले होते. वृक्षलतादिक फलपुष्पहीन, भूमिकंदमूलादि विहीन झाली होती व ते वन घोरनिशाचरांचे वसतिस्थान झाले होते. (३/१३/१६ टी. प.) रामचंद्रानी त्या वनात पंचवटीस जाताच ते वन कसे झाले पाहा. 'प्रभु दंडकवन पावन करणें। मुनिवर

शापा सुघोर हरणें' (३/१३/१६) या अगस्ती वचनाने राम तेथे गेले व ते 'छविपूरित गिरि सर सरिता वन । होती प्रतिदिन अतिशय शोभन ॥ खगमृगगण आनंदे नांदति। मधुप मधुर गुंजत छवि पावति ॥वर्णु न शकति वना अहिराजे । जिथे प्रगट रघुराज विराजे' ॥३/१४-२४) ऐसे सुशोभन झाले. (क) चालू चौपाईत व वर दिलेल्या 'प्रभुदंडकवन पावन करणे' (३/१३/१६) या चौपाईतील शब्दांत पावन व सुशोभन एवढाच फरक आहे. परंतु पावन शब्द दुसऱ्या चरणाच्या शेवटी येथे आहेच याने हे सुचविले की सुशोभन व पावन हे दोन्ही शब्द दण्डकवन व जनमन (वन) या दोहीकडे घ्यावे. पावन असल्याशिवाय नुसत्या शोभेला किंमत नाही. 'परम मनोहर ठिकाण ठावें। पावन पंचवटी, प्रभु नांवे' पंचवटीतच रघुवीर राहिले. सुशोभन = परम मनोहर, रघुवीराने फक्त एकच दंडकवन पावन व परममनोहर केले, नाम काय करते पाहा.

(३) **जनमन अमित** – अमित, जनांची मने, दंडकारण्यासारखीच शुष्क सौंदर्यहीन, मलीन प्रसन्नताविहीन झाली होती. विषयमनोरथांनी त्यांची पावनता व प्रसन्नता नष्ट झाली होती. तेथे 'श्रद्धा वसंत ऋतु' मुळीच येत नव्हता. (१/३७/१२) 'संत सभा चौंदिशी आम्रवन' (१/३७/१३) यांत त्यांचे मन कधीं गेले नाही. 'क्षमा दया द्रुमलता विताने' या मनवनांत नव्हती; 'शम यम नियम चि फुले ज्ञान फल' तेथे नव्हते' मग त्या फळांत उत्पन्न होणारा 'हरिपदरति रस' (१/३७/१३-१४ प.) तेथे कसा असणार? फूल फळ जेथे नाही तेथे 'अपर कथा ज्या विविध मनोरम। ते पिक शुक बहुवर्ण विहंगम' (१/३७/१५) तेथे कसे येणार? याचे कारण 'सुमति भूमि थळ (स्थळ) हृदय अगाधू' नव्हते. व याच्या उलट कुमतिभूमि हृदयात होती. त्यामुळे 'वेदपुराण उदधी' चे जल वर्षणारे 'घन साधू' तेथे येतच नव्हते. मग 'वर्षति राम सुयश वर वारी' (१/३६/३) हे कसे घडणार? पाणीच नाही तिथं जनमन वनातील मळ धुतला जाऊन ती निर्मळ स्वच्छ कशी होणार? 'विस्तृत लीला सगुण वानिती॥ करी स्वच्छता कलुष हानि ती' (१/३७/५) हे घडत नव्हते. पाणी पाऊस नाही तिथे 'सुकृतशालिहित' कसे होणार! हे मनरूपी वन अगदी सरसपाट, त्यातुन पाऊस मुळीच नाही मग तलाव कोठले? व. 'छंद सोरठा दोहा मंजुल। बहुरंगी अंबुज कुल', कुठले अनुपम अर्थ सुभाव सुभाषा। गणुं पराग मकरंद सुवासा' पण नाहीच. सुंदर बहुरंगी कमळे नाहीत तेथे 'सुकृतपुंज मंजुल अलिमाल' व 'ज्ञानविराग विचार मराल' हे भृंग व हंस तिथे कसे असणार? तलाव नाहीत सीतारामसुयशवारी वाहणारी नदी नाही तेथे नवरस जपतप योग विराग' हे जलचर असणे अशक्य. तेथे 'सुकृति साधु नामगुणगान' रूपी 'विविध रुचिर जलविहंग नाना' कशाला येतात? उलट त्या मनवनात 'संशय विपिन' माजलेले असते; 'भ्रमतम' भरलेला असतो, 'मोहमहाघनघटा' पसरलेल्या असतात. व 'काम कोप मदगज' निर्भयपणे विहार करीत असतात 'कलिमल सरितेत व वनांत (६/११५/प.)

सूचना – या परिच्छेदांत दिलेले सर्व उतारे बा. कां. दो. ३६/३७ मधील पहिल्या चार चौपाया व वरील विवेचन यांची तुलना करावी; म्हणजे जनमनवन पावन व सुशोभन करण्यास काय काय घडले पाहिजे ते समजेल; आणि मागिल चौपाईत सांगितलेला भवभयनाश, दंडकारण्यातील मुनिभयविनाश इत्यादि नाम कसे करते ते कळेल. यावरून हेहि कळेल की हीच पुढली चौपाई मागल्या चौपायांचे स्पष्टीकरण करण्यासाठी आहे. मानसातील गूढार्थ भावार्थ त्यातीलच वचनांनी किती सुलभपणे सरळ मार्गाने पदरचे काही न घालता कसे स्पष्ट होऊ शकतात याचा हा एक सुंदर नमुना आहे.

(४) संगति – वर सांगितल्याप्रमाणे जनमनरूपी अमितवने पावन व परम मनोहर झाली खरीं, पण त्या पंचवटीच्या आसपास पुष्कळ निशाचरांची वस्ती आहे ते या हृदय पंचवटीवनांत शिरून त्याचा केव्हा विध्वंस करतील याचा नेम नाही. कारण ज्ञानवैराग्य प्राप्त होऊन जरी भय गेले तरी ज्ञान्यांनासुद्धा 'काम कोप रिपु' आहेतच असे प्रभूंनी नारदाला सांगितले आहे. (३/४३/९) बिभिषणाने रामचंद्रासच सांगितले आहे की 'हृदयि वसति खल नाना तोवर। लोभ मोह मद मान नि मत्सर' 'जो हृदयिं न वसती रघुनायक। तूणकटीं धृत कार्मुकसायक' 'तो वर जीवांचे हृदिं राही । प्रभुचा प्रताप रवि जो नाही।' (५) ४७ चौ. प.) नामाचा प्रताप रामप्रतापापेक्षा मोठा आहे हे 'भवभय भंजन नाम प्रतापहिं' या चौपाईत नुकतेच सांगितले आहे. तेच आता पुढील चौपाईत स्पष्ट करतात.

चौ. ८ – खरदूषणादि सर्वराक्षसांचा रामाने अल्प काळांत विनाश केला; पण शूर्पणखा व अकंपनादि काही राक्षस (वा. रा. प्रमाणे) पळून गेल्याने शिल्लक राहिले होतेच. पण नामाच्या प्रतापातून कोणीच पळू शकत नाही 'सकल कलि कलुष निकंदन' करणारे नाम आहे. 'काम कोप कलि कलुष करिगणां। ... दासमनवनां' (१/३२/७) यावरून तसेच वरील पूर्वीच्या परिच्छेदांत दिलेले बिभिषण व रामवचन यांनी हे ठरले की कामक्रोध लोभादि; अविवेक दंभ, कपट, पाखंड, तृष्णा, ममता इत्यादि सर्व विकार कलिकलुषे आहेत. नाम आपल्या प्रभावाने रामाला हृदयात प्रगट करून व धुनर्बाणधर बनवून तेथेच ठेवते व मग या निशाचरांना हृदयात प्रवेश करता येत नाही. तेव्हा मग भक्तिरस सहज मिळतो.

ल. ठे. या दोन चौपायांत मारीचवधापर्यंतचे अरण्य कांडातील चरित्र ओवून ठेवले आहे. अरण्यकांडातील मुनि 'मंत्रराज तव नित्यचि जपती (१/१२९/६) हे अरण्यांतील मुनीविषयीच आहे (२/१२९/६-८ व दो १२९ ची टीका पाहावी) असे होते त्यामुळेच 'सकल मुनीना आश्रमी दे सुख जा जाऊन' असे रामास करावे लागले हा नामाचाच प्रताप (३/९) त्या सर्व मुनींना रामचंद्रांनी साष्टांग वंदन केले हा नामाचा प्रताप नव्हे तर कशाचा? राम मोठे की नाम मोठे हे सुज्ञानी आपल्या मनाशीच ठरवावे. (क) संगति – जे अधम नीच खल नाहीत त्यांचा उद्धार नाम करते हे येथवर दाखविले. आता खलांचा उद्धार सांगतात.

हिं.दो. **सबरी गीध सुसेवकन्हि सुगति दीन्हि रघुनाथ ।**
**नाम उधारे अमित खल बेद बिदित गुन गाथ ॥२४॥**

म.दो. **'शबरी ग्रध्र सुसेवकां, सुगति देति रघुनाथ ।**
**नाम अमित खल उध्दरी, वेद वदिती गुणगाथ ॥२४॥**

**अर्थ** – रघुनाथाने गृध्र जटायू व भिल्लिण शबरी या चांगल्या सेवकांना सद्‌गति दिली. पण नामाने अगणित खलांचा उद्धार केला अशा गुणकथा वेदांमध्येसुद्धा वर्णिल्या आहेत ॥२४॥

**टीका** – जटायूला सद्‌गति आधी दिली असून येथे शबरीचा उल्लेख प्रथम कां? वृत्ताच्या सोईसाठी केला असे वाटते परंतु मा. पी. मध्ये दिलेला साधार हेतु मान्य करणे योग्य आहे. 'खग सबरी पितुमातु ज्यो माने' (वि. प. १९१/६) प्रभु शबरीला मातेसमान व जटायूला पित्यासारखा (ज्यो) मानीत; आणि मातेचा मान पित्यापेक्षा मोठा म्हणून उल्लेख प्रथम केला. (२) **गृध्र** – जटायू पक्षी याची माहिती अरण्य दो. १३ टीकेत पाहावी. 'त्याची क्रिया यथोचित स्वकरे करिती राम ' (३/३२) हा उल्लेख जटायूचा आहे. सीतेला सोडविण्यासाठी त्याने आपले प्राण अर्पण केले. तो सीतेला मुलीप्रमाणे मानीत असे 'सीते पुत्री, न मनी भया धर' (३/२९/९) असे त्यानेच म्हटले आहे. असा तो सुसेवक होता. त्याला हरिसारूप्य मुक्ति दिली. (३/३२/१-२ पहा) यांत रघुनाथाने जटायूवर मोठे उपकार केले असे म्हणता येईल काय?

(३) **शबरी** – ही भिल्लीण, अधम जातीची, त्यांत स्त्री 'जातिहीन अघजन्ममहि कृता मुक्त अशि नारि' (३/३६) हिला सायुज्य मुक्ति दिली. तिने सीतेविषयी माहिती सांगितली व सुग्रीवाशी सख्य करावे असे सांगितले, ही तिने रघुनाथ सेवा केली; पाय धुतले. ती परमभक्त व संतगुरु सेवारत होती. योगाग्नीने देहत्याग करण्याचा तिचा स्वतःचा अधिकार होता; तेव्हा तिला मुक्ति दिली यांत काही विशेष नाही. (४) **रामनामाने मात्र अनेक खलांचा उद्धार केला.** यांची कुमति सुधारून क्रमशः केला नाही. हे खल महापापी रामनामविमुख, पण चुकून मुखांत नाम आले त्यानेच उद्धार केला. 'नाम कोटिखल कुमति सुधारी, यांच्यासारखे खल येथे विवादित नाहीत. 'अजामेळ पापी वदे पुत्रकामे । तया मुक्ति नारायणाचेनि नामे' 'शुका कारणे कुंटणी राम वाणी । मुखे बोलतां ख्याति झाली पुराणी' (मनाचे श्लोक) 'आभीर यवन किरात खस चांडाल अति अघरूप जे । हरिनाम सकृदपि वदत पावन होति' (७/१३० छं) मारीचवधापासून अरण्यकांड समाप्तीपर्यंतचे चरित्र सुचविले आहे. आता शरणागत वत्सलता सांगतात.

हिं.- **राम सुकंठ बिभीषन दोऊ । राखे सरन जान सब कोऊ ॥१॥**
**नाम अनेक गरीब नेवाजे । लोक बेद बर बिरद बिराजे ॥२॥**

म.- **राम सुकंठा बिभीषणासी । राखिती शरण विदित सर्वांसी ॥१॥**
**करि गरिबी बहुनामकृपा, जे । ब्रीद लोकी वर वेदिं विराजे ॥२॥**

**अर्थ** -- रामचंद्रांनी सुग्रीव आणि बिभीषण या दोन शरणागतांचे रक्षण केले; हे सर्वांस माहित आहे. ॥१॥ पण नामाने कितीतरी गरीबांवर दया कृपा केली आहे; (करीत आहे व करील) हे नामाचे उत्तम (वर) ब्रीद लोकांत व वेदांमध्ये सुद्धा विराजत आहे ॥२॥

**टीका - चौ १ (१) ल. टे.** सुग्रीवाचा संबंध किष्किंधा काण्डारंभी आला व बिभीषणाचा सुंदरकांडाच्या शेवटी याप्रमाणे येथे या दोन कांडातील चरित्र सुचविले आहे. (क) सुग्रीवाचे रक्षण केले हे खरे; पण त्यामुळेच हनुमान व वानरसेना यांची मदत मिळाली व सीताशोध लावणे शक्य झाले. सुग्रीव सीताशोधाचे कार्य विसरल्यामुळेच त्याच्यावर व्यावहारिक क्रोध बाह्यतः करावा व दाखवावा लागला. 'सुग्रीवहि मम न करी स्मरणा पावे राज्य कोष पुर ललना । मी वाली वधिला ज्या बाणे । मारूं मूढ ही उद्यां तयाने ॥(४/१८३/४५)

'भय दावुनि या घेउनी' (४/१८१) अशी आज्ञा दिली. रघुनाथानें सुग्रीवावर उपकार केले तर सुग्रीवानें ही रामावर इतके उपकार केले की सुग्रीवसेवक हनुमंताच्या ऋणांतून मुक्त होणे त्यांस अशक्य झाले

(७) **बिभीषण** -- ज्या रावणाने सीता चोरून नेली त्याचा सावत्र भाऊ! त्याने सीताशोधाच्या कार्यात हनुमंतास गुप्त बातम्या पुरविल्या म्हणून सीतेची भेट होऊ शकली. याशिवाय पुष्कळ रामकार्य त्याने आधीच केले होते. नंतर तो शरण आला. त्यानंतरसुद्धा त्याने लंकेतील गुप्त महत्वाच्या बातम्या रघुनाथास पुरविल्या; रावणमरणाचे रहस्यही सांगितले, शत्रूचा सावत्र भाऊ, शत्रूने हाकलून दिलेला, शरण आल्यावर कोणता राजनीतीपटु राजा त्याचा त्याग करील ? भेद उत्पन्न करण्याचे कार्य सहज साधले.

**चौ -- २ -- (१) नामाला -- शरण जाणाऱ्याकडून कोणतीही सेवा किंवा मोबदला, मदत घ्यावी लागत नाही** -- घेत नाही. वाटेल त्या दीन, अनाथ, पंगु इत्यादि कोणाचेहि रक्षण नाम करते; धर्मविरोधी कार्य त्यांच्याकडून घडू देत नाही. (**क**) **गरीब** -- दीन, ज्यांना इतर साधनांचा आधार, बळ वाटत नाही ते. तप, यज्ञ, पाठ, पूजा, तीर्थयात्रा, वैराग्य योग, ज्ञान, स्वतःचे कर्तृत्व, कुलाभिमान, जात्याभिमान, धनाभिमान इत्यादि कोणतेही धन ज्यांच्या जवळ नाही तेच खरे दीन, गरीब. (**ख**) दीनदयाळू दीनसंरक्षक हे नामाचे ब्रीद वेदामध्ये तर वर्णिले आहेच; पण लोकांना सुद्धा माहीत आहे. म्हणून उदाहरणे देण्याची जरूर नाही. **माहीत असून नाम शरण का जात नाहीत? दीन झालेले नाहीत म्हणून.** पुढील तीन चौपायात लंकाकांड चरित्र सुचवितील.

हिं.- राम भालु कपि कटकु बटोरा । सेतु हेतु श्रम कीन्ही न थोरा ॥३॥
नाम लेत भवसिंधु सुखाही । सुजन बिचार करहु मन माही ॥४॥
राम सकुल रन रावन मारा । सीय सहित निज पुर पगु धारा ॥५॥

म.- राम भल्लकपि-कटक जमवती । श्रम सेतूत्तव अल्प न करती ॥३॥
नाम घेत सुकती भवसागर । सुजन विचार करा मनि नागर ॥४॥
रामे निहत सकुल रणि रावण । कृत सह सीते स्वपुरि पदार्पण ॥५॥

**अर्थ –** रामानी रीस, वानरांचे सैन्य गोळा केले. (जमवले-बटोरा); आणि सेतु बांधण्यासाठी थोडे थोडके श्रम नाही पडले! (फार श्रम झाले) ॥३॥ पण नाम घेतल्याने भवसागरच सुकून जातात; तेव्हा सुजन हो! तुम्ही आपल्या मनाशीच चांगला (नागर) विचार करा; (की नामाचा प्रताप मोठा आहे की नाही) ॥४॥ रामचंद्रानी रावणाचा त्याच्या सर्व कुळासह लढाईत नाश केला व मग सीतेसहित आपल्या नगरीत प्रवेश केला ॥५॥

**टीका – चौ.-३-४** (१) एकट्या श्रीरामाला किंवा अनुजासह, सागरावर सेतु बांधता आला नाही. आणि तीन अहोरात्र सागर तीरावर, अन्नपाण्यावाचून पडून राहून प्रार्थना करीत बसावे लागले! हे काय थोडे श्रम झाले? 'प्रथम नमन केले शिर नमुनी । मग बसले तटि दर्भ पसरुनी (५।५१।७) 'विनति जलधि जड मानिना । जरी गेले दिन तीन । वदले राम सकोप तै प्रीति न भीतीवीण' (५।५७) शेवटी क्रोध आला, धनुष्यावर अग्निबाण लावला तेव्हा फक्त युक्ति कळली. मग अठरा पद्मे यूथप वांदर' असलेल्या त्या महाकाय कटकाने अहोरात्र चारपाच दिवस श्रम केले तेव्हा कुठे सेतु बांधला गेला. आधी चारी दिशातील ऋक्ष वानरांना धाकदपटशा घालून सुग्रीवाकडून एकत्र आणावे लागले. शेवटी परत आल्यावर तो सेतुही मोडून टाकला. (मानसात नाही).

(२) नामाला सर्व भवसागर सुकवून टाकण्यास जरासुद्धा श्रम पडत नाही; साधन नको, इतरांची मदत उपकार नको, क्रोधाची आवश्यकता नाही, उपास नकोत व सागर पुन्हा भरत नाहीत. (क) **सुकती –** सुखाही-असे अनेक वचन एवढ्याचसाठी की एकदा जन्म घेणे म्हणजे या सागरांत पडणे. जितकेजन्म तितके भवसागर एकापुढे एक अनंत पसरलेलेच असतात. जन्म चुकला म्हणजे विद्यमान व पुढले सर्वच सुकतात. **'पुन्हा जन्मणे दुःख भोगणे । नानाचिंता व्यथा सोसणे । मी माझे या फशी पडणे । नाही त्यालागी'** ॥प्रज्ञा॥ याचे नाव भवसागर सुकणे, मीरा म्हणते 'भवसागर सब सूख गया है फिकर नही मुझे तरनन की.' सुकला म्हणजे नाहीसा झाला. तुलसीदास म्हणतात की विचार करून पहा की तुलसीदास म्हणतो ते खरे की खोटे? नागर- चांगला, विवेकयुक्त. भाव हा की आता एवढे कळल्यावर तरी अन्य साधनांच्या मृगजळाच्या पाठीशी न धावता राम-नामाला अनन्य शरण जा. (७।१२९।६ टी.पहा.)

चौ.५. (१) आपली पत्नी सीता सोडवून आणण्यासाठी अनेक वेळा युद्ध करून शेवटी अठरा अहोरात्र रावणाशी युद्ध करावे लागले. एकंदर ८७ दिवसांच्या युद्धाच्या काळात ८२ दिवस लढाया झाल्या. रावणाचा निर्वंश करावा लागला. स्वतः लक्ष्मण मूर्च्छित झाले होते; गरुड व हनुमंतांमुळे उठले. बिभीषणाने विमान दिले म्हणून वेळेवर अयोध्येत येता आले; नाहीतर भरत जिवंत राहिला नसता (क) शान्ति सीता व भक्तिजानकी मिळविण्यास-मिळवून देण्यास असे काही श्रम पडत नाहीत. येथे नगर प्रवेशापर्यंतचे चरित्र सुचविले. आता राज्यारोहण व कीर्ती पुढील चौपायांत.

हिं.- राजा रामु अवध रजधानी । गावत गुन सुर मुनिबर बानी ॥६॥
सेवक सुमिरत नामु सप्रीती । बिनु श्रम प्रबल मोहदल जीती ॥७॥
फिरत सनेह मगन सुख अपने । नाम प्रसाद सोच नहिं सपने ॥८॥

म.- राजा राम अवध नृप-धानी । गुण गाती सुर मुनिवर वाणी ॥६॥
प्रेमे सेवक नामा स्मरती । प्रबल मोहदल अश्रम जितती ॥७॥
प्रेममग्न फिरती स्वेच्छेने । स्वप्निहि शोक न नामकृपेने ॥८॥

अर्थ — रामचंद्र राज्यावर बसले व अयोध्या त्यांची राजधानी (नृपधानी) झाली; व सुर व मुनिवर त्यांचे उत्तम गुण सुंदर (वर) वाणीने गाऊ लागले ॥६॥ परंतु रामसेवक जर प्रेमाने नाम-स्मरण जप-करतील तर कोणत्याही प्रकारचे श्रम न-पडता, प्रबल मोह मद कामादिक राक्षस त्यांच्या सैन्यासह सहज जिंकले जातात. (ते जिंकतात) ॥७॥ व ते सेवक प्रेममग्न होऊन स्वेच्छेने वाटेल तेथे विहार करू लागतात; त्यास नामकृपेने स्वप्नात सुद्धा शोक होत नाही ॥८॥

टीका — चौ.६ — वर-उत्तम, श्रेष्ठ, सुंदर; वर हा शब्द मुनि, गुण व वाणी या तिघांकडे घेणे योग्य. (क) रामचंद्राना कीर्ति मिळविण्यास किती तरी श्रम करावे लागले हे मागे दाखविले आहे. (ख) गोस्वामीनी मोहाला रावण मानला आहे. वेदांतसार अभंग रामायणात त्यास अहंकार, ज्ञानाहंकार, कुंभकर्णास मोह व इंद्रजीतास काम मानला आहे. नंतर आढळले 'की' श्री टेंबे स्वामींनी रावण अहंकारच ठरविला आहे.

(चौ.७) रावण शब्दाच्या पूर्वी प्रबल शब्द नाही; तो मोहदलच्या पूर्वी घालून सुचविले की तो रावण जिंकणे एवढे कठीण नाही; कारण की तो दृश्य, देहधारी होता; पण मोह- अज्ञान. हा रावण दिसत नाही, साकार नाही, हृदयात असतो, बुद्धीत वगैरे खोल लपून राहतो; तसेच कामक्रोधादि त्याचे सैन्य! म्हणून याना जिंकणे फार कठीण

(क) प्रेमाने नामस्मरण करणारास यांना जिंकण्याचे श्रम स्वतः करावे लागत नाहीत; नामच ते कार्य परभारे करते; म्हणून म्हटले की श्रमावाचून जिंकतात (जितती).

चौ. ८ (१) या सगळ्या राक्षसांना जिंकल्यावर जो विजयानंद मिळतो ती हरिभक्ति 'ढाल विरति. असि-बोध रिपु मद मोहादि वधून । जय मिळतो हरिभक्ति ती, गरुड पहा चिंतून (७।१२० म) या स्नेहात- हरिभक्तिरसात ते सदा मग्न असतात;
(क) श्रीरामचंद्रास अयोध्येतच रहावे लागले, प्रजापालनाची जबाबदारी पत्करावी लागली; प्रजेचे तंटे सोडवून न्यायदानाचे कार्य पाठीशी लागलेच; रावणादि ब्राह्मणांच्या वधामुळे अश्वमेध केल्याशिवाय राहवले नाही; त्यात स्वतःच्या पुत्रांशीच युद्ध करण्याचा प्रसंग आला; नामभक्तांना स्थानबद्ध व्हावे लागत नाही. ते भक्तिरसात नामप्रेम-ह्रदांत मीनासारखे मग्न होऊन वाटेल तेथे आपल्या इच्छेप्रमाणे संचार, विहार करू शकतात. कोणतेही कर्तव्य त्यास उरत नाही.
(ख) रघुनाथास पुन्हा सीताविरह शोकात पडावे लागले. आपल्याच प्रजेने केलेल्या निंदेमुळे निरपराधी सीतेचा परित्याग करावा लागला. या नामभक्तांस शान्ति सीता विरहाचा किंवा कसलाच शोक स्वप्नात सुद्धा करावा लागत नाही मग जागृतीत कुठला? याचे एकमात्र कारण नामकृपा! **नामभक्त परमानंद साम्राज्याचे अधिपति असतात; मोक्ष महालक्ष्मी त्यांची चरणदासी बनलेली असते.** लक्ष्मी चंचल पण यांची ही मोक्षमहालक्ष्मी, यानी अनादर केला तरि सुद्धा दूरजात नाही. रामचंद्रासारखे सम्राट सुद्धा यांना वंदन करतात. भरद्वाज, वाल्मिकी, अत्रि, अगस्ति भेट प्रसंग पहा.
ल.ठे. – 'प्रेमे सेवक नामा स्मरती' हा उपसंहार आहे. 'प्रेमे जपता नाम विनाश्रम' (२४/२) हा उपक्रम केलेला आहे. 'भक्त बनति मुद मंगल आश्रम' (२४/२) हा उपक्रम केला व 'प्रेममग्न फिरती स्वेच्छेने' हा उपसंहार केला. 'ब्रह्मराम याहुनि गुरु नामचि' (२३।५) व मध्ये अनेकदा अभ्यास आहे. श्रमाशिवाय प्रबल मोहदल नाश इत्यादि अपूर्वता आहे. ब्रह्म व ईश्वर (सगुण) हृदयात असता सर्व जग दुःखी व रामनाम मुखात आले की अंतर्बाह्य प्रकाश, सुमति प्राप्ति वगैरे अनेक प्रकारांनी उपपत्ति परमानंदात मग्न असतात वगैरे फल सांगितले; शोक नाही वगैरे सांगितले तो अर्थवाद प्रशंसा, महती आहे. मुख्य सिद्धान्ताचा उपसंहार आता दोह्यात करतात.

हिं.दो.- **ब्रह्म राम ते नाम बड बरदायक बरदानि ।**
**रामचरित सतकोटि महँ लिय महेस जियँ जानि ॥२५॥**

म.दो.- **ब्रह्म रामगुरुनाम दे वरदात्या वरदान ।**
**रामचरितशत-कोटितुनि गणि महेश घे प्राण ॥२५॥**

**अर्थ** – (उपक्रमोपसंहारादि सर्व लक्षणांनी वर दर्शविल्याप्रमाणे) ब्रह्म (निर्गुण) व राम (सगुण व अवतार) या दोघांहून नाम गुरु- मोठे (श्रेष्ठ) आहे. ते वरदात्यांना सुद्धा वरदान देणारे आहे; म्हणून महेशानी शतकोटि रामायणातून, आपला जीव की प्राण जाणून (गणि- गणले जाणले) फक्त (एक) राम हे नाम घेतले. ॥२५॥

**टीका – वरदात्या वरदान दे** – ज्या कोणाला वर देण्याचे सामर्थ्य प्राप्त झाले ते रामनाम प्रतापानेच झाले. सर्वात जास्त समर्थ वरदाते ब्रह्मा महेश व विष्णु यांच्या बद्दल प्रमाण मिळाले म्हणजे इतरांची उदाहरणे नकोत; यथा 'अहंच शंकरो विष्णुस्तथा सर्वे दिवौकसः। रामनाम प्रभावेण सम्प्राप्ताः सिद्धिमुत्तमाम्' (वि.पु.) 'सावित्री ब्रह्मणा सार्धं लक्ष्मीर्नारायणेनच । शम्भुना राम रामेति सदा जपति पार्वती' (पुलह संहिता. मा.पी) 'यत्प्रसादेन कर्ताभूद् देवो ब्रह्मा प्रजापतिः । यत्प्रभावेण हर्ताहं त्राता विष्णू रमापतिः ॥ लोके नराधमा येतु रामभक्तिपराङ्मुखा । जपंतपो दयां शौचं शास्त्राणामवगाहनम् ॥ सर्वं वृथा विना यत्र श्रुणु त्वं पार्वति प्रिये ॥ (रुद्रयामल.मा.पी.) सार हे की विधिहरिहर रामनाम प्रभावानेच वरदाते झाले; उत्पत्ति स्थिति प्रलयकर्ते बनले; व ते आपापल्या शक्तीसह रामनाम जपत असतात. मग जे कोणी जप तप शास्त्राध्यायन दया शौच इत्यादि साधने करतील व रामनाम विरहित राहतील तर ते त्यांचे सर्वसाधन निष्फल होणार असे शंकर पार्वतीस म्हणाले.

## रामचरित शतकोटीतून घेतले

**कोणी हे म्हणणे दंतकथा समजतात; कोणी चिकित्सक शतप्रकाराचे म्हणतात; कोणी** अतिशयोक्ति गणतात; महाराष्ट्रात या मतांचा प्रसार जोरात आहे. रामायणे, रामायण-टीका, पुराणे व उपपुराणे वगैरेतून भरपूर आधार आहेत; पैकी महाराष्ट्रात प्रचलित असलेल्या व या नेत्रांनी अवलोकन केलेल्या आनंद रामायणातील आधारच देऊ; कारण श्री एकनाथ, श्रीसमर्थ इत्यादि थोरमहाविभूतींनी असेच म्हटले असले तरी त्यांच्या कपाळावर गतानुगतिक, पाल्हाळिक, पुराणिक इत्यादि विविध शिक्के मोठमोठ्या विद्वान, साहित्यिक, समजल्या जाणाऱ्या लोकांनी मारले आहेत. पण असल्या पंडितमन्यांचे ग्रंथ व नावे काळाच्या ओघात केव्हाच गडप होतात व श्रीज्ञानेश, श्रीएकनाथ, श्रीसमर्थ इत्यादि महाविभूतींचे ग्रंथ आणि नावे अमर आहेत. हे असले लोक स्वतः परप्रत्ययनेय बुद्धि असतात; व भारतीय संस्कृतीला निष्प्राण करू पाहणाऱ्या पाश्चात्य संस्कृतिमतांचे गतानुगतिक झालेले असतात! 'कालाय तस्मै नमः!' **प्रस्तावना प्रकरण ४।१,२,३ पहा. तेथे शतकोटिरामायणाविषयी सविस्तर लिहिले आहे.**

**आनन्द रामायण मनोहर काण्ड** – वाल्मीकीने शतकोटि श्लोकात्मक रामायण लिहिले त्यात नऊ लक्ष कांडे व नव्वद लक्ष सर्ग होते, 'नवलक्षाणि काण्डानि शतकोटि-मितेद्विज ॥१४॥ सर्गानवति लक्षाश्च ज्ञातव्या भुवि कीर्तिताः॥ कोटीनांच शतश्लोकमानं ज्ञेयं विचक्षणैः' ॥१५॥ सर्ग १७.

(क) शतकोटि रामायणाचे उल्लेख व वर्णन प.पु. पाताळ खंड, पाराशर उपपुराण, व शिवसंहिता या ग्रंथात आहेत. (मा.पी.पहा)

(ख) 'चरितं रघुनाथस्य शतकोटि प्रविस्तरम' (राम रक्षा)

(२) **शंकरांनी कसे घेतले** — आनंद रामायणात यात्राकांडात आधार आहे (सर्ग २) वाल्मीकींनी शतकोटि श्लोकमिती रामायणाची रचना केली. अनेक मुनींनी त्यांच्या जवळ ते श्रवण केले. तेथे आश्रमात नित्य रामकथा चाले. तिन्ही लोकांतील श्रोते देव, दैत्य यक्ष वगैरे श्रवणास येत; त्यात शंकरहि असत. सर्व श्रवण केल्यावर प्रत्येक लोकांतील मंडळी ते मागू लागली; निर्णय होईना. हा तंटा महेश क्षीरसागर निवासी हरिकडे घेऊन गेले. त्यांनी तीन समसमान विभाग करून शतकोटी श्लोक वाटून दिले. शेष एकश्लोक राहिला त्याची बत्तीस अक्षरे तिघांत कशी वाटणार? १०१० अक्षरे तिघांना दिली. शेष दोन अक्षरे उरली ती 'राम' ही होत. ती श्रीहरिने शंकरास दिली. 'द्वेऽक्षरे याचमानाय महां शेषे ददौ हरिः। उपदिशाम्यहं काश्यां तेऽन्तकाले नृणां श्रुतौ ॥२५॥ रामेपी तारक मंत्रं तमेव विद्धि पार्वति' ॥२६॥ शंकर सांगतात की शेष राहिलेली दोन अक्षरे 'राम' मी मागितली व मला दिली गेली. त्यांचाच उपदेश मी काशीत मरणाऱ्या जीवांच्या कानांत करीत असतो. राम हा तारक मंत्र आहे असे समज पार्वति!

(क) सप्त द्वीपवती पृथ्वीवर त्या एक तृतीयांश भागाची वाटणी कोणी कशी केली व या जंबुद्वीपातील नवखंडात २/३ २/७ २/५ अशी वाटणी कोणी केली व एक उरलेले अक्षर जे श्री त्याचा उपयोग कसा केला वगैरे सविस्तर माहिती मा.पी. पृ. ४३५-४३७ मध्ये पहावी. येथील संदर्भ स्पष्ट होण्यास वर दिलेले आधार पुरेसे आहेत.

**शंका** — रामायणातून 'राम' काढून घेतल्यावर रामायणात काय राहिले? ही शंकाच बिनबुडाची आहे. ३३३३३३३३३ श्लोक व दहा अक्षरे यात राम शब्द कुठेच नसेल असे शंकेखोरांस वाटते काय? ल.ठे. सुमारे १२६०८ ओळींच्या तुलसीरामायणात राम शब्द कमीत कमी १४४० वेळा आहे. कांडानुक्रमे बाल-३५०; अयो.५६; अरण्य ७५; कि. ४२; सुं. ६२; लं. १४५ व उत्तर २०४ वेळा आहे. मोजताना दृष्टिआड झाले असतील ते निराळे.

(३) **गणि महेश घे प्राण** — महेश प्राण गणि आणि (मागून) घे; आपला प्राण समजून मागून घेतले. हालाहल विषापासुन ज्याने संरक्षण केले, ज्याने त्यांना वरदायक बनविले, ते प्राणाहून सुद्धा प्रिय न वाटले तर आश्चर्य!

(क) संगति - पुढील चौपायात, रामनाम प्रतापाने महान झालेल्यांची व नंतर पापी जीवांची उदाहरणे देतात.

येथे मानस गूढार्थ चंद्रिका बालकांड अध्याय तिसरा समाप्त.

# अध्याय ४था

हिं. - नाम प्रसाद संभु अविनासी । साज अमंगल मंगल रासी ॥१॥
सुक सनकादि सिद्ध मुनिजोगी । नाम प्रसाद ब्रह्म सुख भोगी ॥२॥
म. - नाम कृपेच शंभु अविनाशी । साज अमंगल मंगल-राशी ॥१॥
शुक सनकादि सिद्ध मुनि योगी । नाम-कृपेच आत्म-सुख-भोगी ॥२॥

**अर्थ** – शंभु नामाच्या प्रसादाने (कृपेने) च अविनाशी झाले व त्यांचा वेष (साज) आचार, अमंगल असून सुद्धा सर्वमंगलाचे निधान (रास) झाले ॥१॥ शुक, सनकादि, मुनि नामकृपेनेच आत्मानंद (ब्रह्मानंद) भोक्ते बनले; कोणी योगी बनले व कोणी सिद्ध बनले व सुख भोगू लागले ॥२॥

**टीका** – ल.ठे. दुसऱ्या चौपाईचा वर दिलेला अर्थ कोणीही टीकाकारांनी केला नाही, असे असता येथे करण्याचे कारण : दोहा २२च्या चौपायात चार प्रकारच्या भक्तांचे वर्णन केले; ज्ञानी, जिज्ञासु (गूढगति जाणू पाहणारे) अर्थार्थी (साधक) व आर्त. या चौघांचीही उदाहरणे देणे जरूर आहे. तोच उल्लेख येथे वृत्तासाठी किंचित क्रम बदलून केला आहे. दो. २२/१-२; ३; ४; व ५; याची टीका पहावी म्हणजे वर केलेला अर्थच योग्य वाटेल. या दोन चौपायात अर्थार्थीचा उल्लेख नाही तो ध्रुवाच्या उदाहरणाने पुढे देतील.

(क) या दोन चौपायात ज्यांचा उल्लेख आहे त्या सर्वांना गूढगतींचे ज्ञान व अष्टमहासिद्धी प्राप्त होत्याच हे त्यांच्या व नारद प्रल्हाद यांच्या चरित्रावरून सुप्रसिद्ध आहे.

चौ.१ (१) **शंभु** – शं सुखं भवति इति (अ.व्या.सु.पहा) – शिव, शंभु–सुखरूप, कशाने झाले हेच येथे सांगितले आहे. ते सुखरूप होण्याचे कारण नामाचा प्रसाद, कृपाच.

(क) **अविनाशी** – विनाशरहित, अमर, नित्यमुक्त. 'काळकुटे फळ सुधा समर्पित' (१९/८) 'यन्नाम सततं ध्यात्वाऽविनाशित्व परं मुने । प्राप्तं नाम्नैव सत्यं ते सुगोप्यं कथितं मया' (शिव.पु.) 'महामंत्र जो महेश जपती' 'उमेसहित जे जपति पुरारी'

## साज अमंगल मंगलराशी

(१) महादेवाचा वेष अमंगल, चिताभस्म अंगाला फासलेले, नरमुंडाची माळा गळ्यात, अंगावर भुजंग, हत्तीचे चर्म परिधान, नाहीतर नग्न, माणसाची कवटी भिक्षापात्र, स्मशानात राहणे इत्यादि सर्व गोष्टी अमंगळ, वेदशास्त्रबाह्य आहेत. 'श्मशाने ष्वाक्रीडा स्मरहर पिशाचः सहचराः' हा शिवमहिम्न श्लोक २४ पहावा. (२) स्वतः महेश्वर आहेत व इतरांनी धर्ममर्यादा भंग केलेला त्यांना खपत नाही. 'देतो तदपि शाप शठ तुजला। नीति-विरोध न रुचतो मजला ॥ खल तुज मी जर

करीन दंड न । श्रुतिमार्गा मम होईल खंडन' (७/१०७/४) असे असता ते श्रुतिमार्गाचे उल्लंघन का करतात? 'यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरोजनः' हे त्यास विदित असून असे का? हा प्रश्न सहज उत्पन्न होतो. याचे कारण पद्म पु. उत्तर खंड अध्याय २३५ त आहे ते-

(क) अशिव वेष का? — वर जी चर्चा केली तसलाच प्रश्न एकदा पार्वतीने शंभूस विचारला. 'कपालभस्म चर्मास्थि-धारणं श्रुतिगर्हितम् । तत्त्वया धार्यते देव गर्हितं केन हेतुना' 'हे देवा! श्रुतीनी निंद्य ठरविलेले, कपाल, चिताभस्म इत्यादि आपण का धारण करता?' शंकर म्हणाले -नमुचि आदि दैत्य वेदोक्त आचरण करून व भक्तीने निष्पाप झाले; पण इंद्रादि देवांचे लोक जिंकून ते स्वतःच तेथे राज्य करू लागले. देव भगवंतास शरण गेले; पण दैत्य सदाचारी व भक्त असल्याने त्यास मारणे योग्य वाटेना. तथापि भगवंताने घालून दिलेल्या मर्यादेचा भंग करून सज्जनास पीडा देतात म्हणून त्यास मारणे तर आवश्यक होते, त्यांचा पुण्यक्षय होऊन ते सदाचारविमुख झाले म्हणजे त्यांचा वध करण्यास हरकत नाही अशी युक्ति मनाशी ठरवून प्रभु मजकडे आले व मला आज्ञा दिली की दैत्यांचा बुद्धिभेद करून त्यास सदाचारभ्रष्ट करण्यासाठी तुम्ही स्वतः पाखंड धर्माचे आचरण करू लागा. 'त्वं हि रुद्र महाबाहो मोहनार्थे सुरद्विषां । पाखंडाचरणं धर्मं कुरुष्व सुरसत्तम' (२८). आपले श्रेष्ठत्व दैत्य जाणतात ते तुमचे अनुसरण करतील व माझे वैरी बनतील. मी जेव्हा जेव्हा अवतार घेईन तेव्हा तेव्हा मी सुद्धा तुमचेच पूजन भजन करीत जाईन म्हणजे त्यांचा तुमच्यावर विश्वास बसेल. ते पाखंडाचरण करू लागले म्हणजे स्वकर्मानेच नष्ट झाल्यासारखे होतील. हे ऐकून मला फार वाईट वाटले, व मी साष्टांग नमस्कार करून म्हणालो की प्रभो, आपली आज्ञा शिरोधार्य आहे, पण मला भीती वाटते की तशा आचरणाने माझा सुद्धा नाश होईल. यामुळे मी धर्मसंकटात पडलो आहे; आपणच मला यातून सोडवावा.

(ख) माझी केविलवाणी दशा पाहून प्रभूंनी रामसहस्रनाम व रामषडक्षर तारक मंत्र मला दिला व सांगितले की या मंत्राचा जप करीत माझे ध्यान करीत जा म्हणजे सर्व दोष नष्ट होऊन तुमचे मंगल होईल; म्हणून प्रभूच्या आज्ञेमुळे देवांच्या हितासाठी मी अमंगल वेष करू लागलो. सूचना — शिवाच्या अशिव वेषाचा अध्यात्मपर अर्थ शिवविवाह प्रकरणात व प्रस्तावनेत पहावा. मा.मणि मासिकात हिंदीत प्रसिद्ध झाला आहे.

ल.ठे. — ज्ञानी, भक्त आणि अनाचारपाखंड यांचा संयोग झाला तर काय दुष्परिणाम होतो; व थोर विभूतींच्या बाह्य आचरणाचे अनुकरण केल्याने विनाश कसा होतो हे या कथेवरून जाणून घ्यावे. 'न देवचरितं चरेत्' म्हणतात ते एवढ्यासाठीच. थोर विभूति शास्त्रबाह्य आचरण का करतात याचा थांगपत्ता पार्वतीस सुद्धा लागला नव्हता; तेथे इतरांचा पाड काय?

(३) शंकर – सदा ब्रह्मानंदमग्न असतातच; व योगाने ज्ञात होणाऱ्या सर्व गूढ गति ते जाणतात; अष्टमहासिद्धी त्यांच्या दासी आहेत; ते वरदाते आहेत. म्हणजेच ज्ञानी ब्रह्मनिष्ठ, सिद्ध व योगी ते आहेत. (२/१-५ पहा) प्रभूच्या आज्ञेमुळे ते धर्म संकटात पडून अति दीन झाले होते. दीन बनलेले होते व ती त्यांची आर्ति रामनामानेच नष्ट झाली हेही ठरले.

चौ – २ – (१) शुकाचार्यांचा पूर्वेतिहास – १८/५ च्या टीकेत यांच्याविषयी थोडे लिहिले आहे.

(क) पार्वतीने एकदा अमरकथा (अमर होण्याची माहिती) शंकरास विचारली. ते परमगुह्य ज्ञान असल्याने षट्कर्णी होऊ नये म्हणून इतर सर्वास तेथून घालवून देण्यासाठी त्यांनी आपले डमरु वाजविले; त्याबरोबर तेथील सर्व जीव पळून गेले - पूर्ण एकांत आहे असे पाहून ते पार्वतीस सांगू लागले. पार्वती 'हुं'कार देत ऐकत होती. काही वेळाने तिला डुलकी लागली; पण त्याच समयास पोपटाच्या अंड्यातून एक शुक (पोपट) बाहेर पडला व तो कथा ऐकत 'हुं'कार देऊ लागला. पार्वतीच 'हुं'कार देत आहे असे वाटून शंभु सांगत राहिले. काही वेळाने पार्वती जागी झाली व म्हणाली की अमुक गोष्टीच्या पुढला भाग मला सांगावा; मला जरा डुलकी आली होती. हे ऐकताच शंकरांनी आपला त्रिशूल त्या 'हुं'कार देणारावर फेकला; पण त्या शुकाने अमरकथा ऐकल्यामुळे त्रिशूलाचा काही परिणाम झाला नाही. तो शुकशावक तेथून उडत उडत निघाला तो व्यासांकडे आला. एवढ्यात व्यासपत्नीने जांभई दिली. त्याबरोबर तो तिच्या मुखातून पोटात शिरला; व पुढे पुष्कळ वर्षांनी व्यासपुत्र म्हणून जन्मला तेव्हा त्यास शुक नावच पडले. 'यन्नामवैभवं श्रुत्वा शंकरात् शुकजन्मना । साक्षादीश्वरतां प्राप्तः पुजितोहं मुनीश्वरै ॥ नाऽतः परतरं वस्तु श्रुतिसिद्धान्त गोचरम् । दृष्टं-श्रुतं मयाकल्पि सत्यं सत्यं वचो मम' (शुक संहिता मा.पी.)

(क) हे ब्रह्मानंद योगी, सर्वज्ञ सर्वदर्शी महायोगी, महासिद्धिप्रदा झालेले होतेच; व शुकजन्मात त्रिशूलभयापासून व मरण संकटापासून रामनाम प्रभावानेच सुटले. (२) सनकादि – यांची माहिती १८/३ च्या टीकेत पहावी. यांच्या ठिकाणी ब्रह्मलीनता, गूढगतिज्ञान व महासिद्धी होत्याच. ब्रह्मविज्ञानी, योगी, सिद्ध मुनि होते व वरदाते व शापदाते होते; म्हणजेच निग्रहानुग्रह समर्थ होते. १८/३ मध्ये वर्णन केल्यापैकी नारदांचा उल्लेख पुढील चौपाईत आहे.

हिं.- नारद जानेउ नाम प्रतापू । जग प्रिय हरि, हरि हर प्रिय आपू ॥३॥
नाम जपत प्रभु कीन्ह प्रसादू । भगत सिरोमनि भे प्रहलादू ॥४॥

म.- नारद जाणति नाम बलाते । जग प्रिय हरि हर हरिसी हराते ॥३॥
नामजपे प्रभु करी प्रसादा । भक्तमुकुटता ये प्रल्हादा ॥४॥

**चौ-१ अन्वय** – नारद नाम बलाते जाणति, जग प्रिय हरि (आहे), हर हरिसि (प्रिय आहेत) व हरिसि हरा ते (नारद प्रिय आहेत).

**अर्थ** – नारदाला नामाचे बळ-सामर्थ्य (प्रताप) कळले, उमगले, हरि सर्व जगाला प्रिय आहेत; हरीला हर प्रिय आहेत; पण हरि आणि हर या दोघांनाही नारद प्रिय झाले (ते नाम सामर्थ्यानेच) ॥३॥ प्रल्हादाने नामजप केला म्हणून प्रभु प्रसन्न झाले व प्रल्हाद भक्तमुकुट (भक्तशिरोमणि) बनले. ॥४॥)

**टीका – चौ. ३ (१)** – नारदाला दक्षप्रजापतीचा शाप होता की, तू सर्व विश्वात भ्रमण करीत राहशील व कुठल्याहि एका ठिकाणी जास्त वेळ स्थिर राहणार नाहीस. तथापि या शापाचा परिणाम एकदा नारदावर झाला नाही. नामस्मरण करीत गंगेच्या काठच्या राम गुहेत बसले. 'हरिला स्मरत शापगति बाधित। सहज विमलमन मग्न समाधित (१/१२५/४-५) पुष्कळ काळपर्यंत समाधिमग्न राहिले; हे यावरून पुढे इन्द्राने त्या समाधित विघ्न करण्यासाठी मदनास ससैन्य पाठविला पण या मोहिमेत मदनाचा पराभव झाला. हा नामाचा प्रताप नारदास त्यावेळी कळला नाही. पुढे काय झाले ते बा.कां. दो १२५/१-१३८ पर्यंत सविस्तर आहे. मायामुक्त झाल्यावर मग त्यास नाम प्रभाव उमगला म्हणूनच अरण्य दो. ४२ मध्ये वर मागितला की 'राम सकल नामाहुनि अधिक हि। असो नाथ! अघखगगणवधिकहि' (१/४२/८ व दो.टी.प.)

(२) **जग प्रिय हरि** – हरि सर्व जगाला प्रिय आहे; या म्हणण्यात अतिव्याप्ति दोष आहे असे वाटते. कारण 'वैरा कृत मी स्वभुज बळावर' असे रावणच म्हणाला आहे. हे झाले सगुणसाकार हरिरूपाविषयी; पण जो हरि सर्वांना व्यापून सर्वांच्या हृदयात आहे तो कधी कोणाला वैरी वाटतो का? तो प्रियच वाटतो सर्वांना. 'आत्मनस्तु कामाय सर्वम् प्रियं भवति' (श्रुति) **'हे प्रिय सर्वां जितके प्राणी'** (१/२१६/७) 'प्रेष्ठ तमः आत्मा' (श्रुति). हरि-अंश असणारा जीव व हृदयस्थ हरि अंतरात्मा हे दोघे प्रिय नसणारा जगात कोणी नाही;

(क) मग आत्महत्या का करतात? आत्म्याची म्हणजे ब्रह्माची हत्या कोणी करूच शकत नाही. आत्मा शब्दाचा अर्थ देह असाहि आहे; तोच आत्महत्या शब्दात अर्थ आहे. **'जीवजंतुजगि कोण असाही । प्राणप्रिय रघुनाथ न ज्या ही'** (२१ ६२/६) यात रघुनाथचा अर्थ आत्मा-अंतरात्मा असाच आहे.

(३) **हर हरिला प्रिय** – 'प्रिय शिव सम मजला नहि कोणी' (१/१३८/६) 'प्रिय मज शिवसम नाही दूजा' (६/२/६) ही दोन्ही वचने प्रभु रामचंद्राचीच आहेत.

(४) **हरिसि हराते** – ते नारद, 'मार चरित शंकरास सांगति । प्रिय अति जाणुन महेश शिकविति ' (१/१२७/६) शंकरास नारद अतिप्रिय आहेत हे ठरले. 'प्रिय अशी वस्तुहि मला कोणती । मागु शकां ना मुनि आपण ती' । (३/४२/४) 'त्यास सदा मी रक्षी' जशी बालका जपते माता.' (३/४३/५). भगवंतास नारद स्वतःच्या बालका इतके प्रिय आहेत. मातेला आपले लहान मूल जितके प्रिय असते तितके

नारद हरिला प्रिय आहेत. नारद हरिहरांना प्रिय होतेच पण रावणासारख्या, कंसा सारख्या हरिशत्रूंना सुद्धा प्रिय होते. याचे कारण त्यांचे नामप्रेमच.

(क) येथे हे दाखवावयाचे आहे की **नामभक्तांचे ठिकाणी हरिहरभेद नसतो. तो मानणे हा एक नामापराध आहे.**

## प्रल्हाद

**चौ.४** – (१) प्रभूंनी प्रल्हादावर कृपा केली; ते त्याच्या नामप्रेमादिकांनी प्रसन्न झाले, व पाषाणाच्या खांबातून नरहरि नृसिंह रूपाने प्रगट झाले. प्रल्हादाला ठार मारण्यासाठी हिरण्यकशिपूने केलेले सर्व प्रयत्न निष्फळ होण्याचे कारण त्यांचे नाम प्रेमच. "घ्या हरिच्या नामा कशाला लिहिता ओनामा" असे तो बरोबरीच्या बालकास सुद्धा शिकवीत असे. त्या भयंकर व परमक्रुद्ध रूपास पाहून लक्ष्मीसुद्धा जवळ जाण्यास घाबरली; पण प्रल्हाद बालक असून न घाबरता जवळ गेला तो नामाच्या बळावरच. प्रल्हादकथा भागवत स्कंध ७/७-१० या अध्यायात आहे.

(क) तो मातृगर्भात असताच महाभागवत होता – यथा – 'अयं निष्किल्बिषः साक्षात् महाभागवतो महान् ॥ त्वया न प्राप्यते संस्थाम् अनन्तानुचरोबली' (भाग ७/७/१०) असे नारदानी इंद्रास प्रल्हादजन्माच्या पूर्वीच सांगितले आहे. या मुलाचा नाश तुला करता येणार नाही कारण हा महा महाभागवत म्हणजेच महा भागवतोत्तम आहे.

(२) **भक्तमुकुट** – भक्तशिरोमणि - सर्वभक्तांत श्रेष्ठ. बारा परम भागवतात प्रल्हादाचे नाव सर्वांच्या व गुरू नारदांच्याही आधी आहे. 'प्रल्हाद नारदपराशर पुण्डरीक व्यासाम्बरीष शुक शौनक भीष्म दाल्भ्यान् । रुक्मांगदार्जुन वसिष्ठ बिभीषणादीन् पुण्यानिमान् परम- भागवतान् स्मरामि" (पां.गी.) जशी नवप्रसूता धेनु आपल्या वासरास चाटते त्याप्रमाणे प्रल्हादास मांडीवर घेऊन भगवान नृसिंह आपल्या जिभेने चाटित होते. ही भक्तवात्सल्य रसाची परमावधि इतर कोणत्याही भक्तचरित्रात पहावयास मिळत नाही. कवितावलीत (उ.कां.-पद १२७ पहा) एका फार गोड पदात गोस्वामीनी हेच सांगितले आहे.

(क) भक्तशिरोमणि म्हणून नारदाच्या पूर्वी उल्लेख करणे योग्य असले तरी नारद प्रल्हादाचे गुरू असल्याने त्यात गुरु-अपमान झाला असे प्रल्हादास वाटले असते; म्हणून तुलसीदासानी नारदाचा उल्लेख प्रथम केला. प्रल्हादाचा उल्लेख प्रथम केला असता तर नारदांस आनंदच झाला असता; कारण खऱ्या गुरुची पित्याप्रमाणे अशी भावना असते की शिष्याने आपल्यापेक्षा मोठे व्हावे. 'शिष्यादिच्छेत पराजयम्' हे भाग्य लाभणारे गुरु व शिष्य परम दुर्लभ!

(३) मागील दोन चौपायात शंकरादि सनकान्त उदाहरणे ज्ञानप्रधान भक्तियुक्तांची दिली. या दोन चौपायात भक्तिप्रधान ज्ञानयुक्तांची दिली. पुढील चौपाईत अर्थार्थी आर्तभक्ताचे उदाहरण देतात :-

हिं.- ध्रुव सगलानि जपउ हरिनाउँ । पायउँ अचल अनूपम ठाउँ ॥५॥
सुमिरि पवनसुत पावन नामू । अपने बस करि राखे रामू ॥६॥
म.- ध्रुव सगलानि जपुनि हरिनामा । पावे निश्चल अनुपम धामा ॥५॥
स्मरुनि पवनसुत पावन नामा । ठेवी करुनी निजवश रामा ॥६॥

अर्थ – दीन दुःखी झालेल्या ध्रुवाने हरिनामाचा जप केला व निश्चल अनुपम धाम (ठाव, ठाऊँ, स्थान) प्राप्त करून घेतले ॥५॥ पवनसुत हनुमंताने पावन राम नामाचे स्मरण करुन रामचंद्रास आपल्या मुठीत ठेवले (वश करून ठेवले) ॥६॥
टीका – चौ. ५ (१) 'ध्रुवं लेकरूं बापुडें दैन्यवाणें । कृपा भाकिता दीधली भेटि जेणे' ॥म.श्लो.)

## ध्रुव

'स्वायंभू मनु नी शतरूपा । ज्यां पासुनि नर सृष्टि अनूपा ॥ नृप उत्तानपाद सुतत्यांचा । ध्रुव हरिभक्त होइ सुत ज्याचा' (१/१४२/१.३) ध्रुवाची माता सुमति व त्याच्या सावत्र मातेचे नाव सुरुचि होते. सुरुचीचा मुलगा उत्तम. उत्तानपादराजाचे सुरुचीवर फार प्रेम होते. सुमतीवर नव्हते. सुरुचीने एक दिवस पाच वर्षाच्या ध्रुव बालकाचा अपमान केला व त्याच्या आईची व त्याची निंदा केली. हे त्या क्षात्र बालकाला फार झोंबले. आई तिच्या नावाप्रमाणे सुमती असल्याने, ममत्व बाजूस सारून तिने सावत्र आईला दोष देऊ नकोस वगैरे सदुपदेश करून भगवंताची आराधना करण्याविषयी त्याला सांगितले. नारदांनी परीक्षा पाहून त्याला मंत्रोपदेश करूम ध्यानादिकाचा विधि सांगितला. सहा महिन्यात भगवान प्रसन्न होऊन प्रगट झाले पण त्याने काही मागितले नाही. भगवंतानी आपल्या शंखाचा स्पर्श त्याच्या गालास करून त्यास ज्ञानभक्तिसंपन्न केला व ध्रुवपद, अढळ (निश्चल) पद दिले. त्या ध्रुवाच्या सभोवती सर्व तारांगण व ग्रहादिक नित्य प्रदक्षिणा करतात, तो स्वयंप्रकाश आहे, त्याच्या प्रकाशाने इतर प्रकाशित होतात. ज्याला ध्रुवाची चांदणी म्हणतात तोच ध्रुवतारा. सप्तर्षी त्याच्या भोवती प्रदक्षिणा करिताना प्रत्यक्ष दिसतात. हा तारा पृथ्वीच्या उत्तर ध्रुवाच्या अगदी डोक्यावर स्वस्तिकांत आहे. (क) ध्रुवाचा अपमान झाला होता व दुःखी दैन्यवाणा झाला होता म्हणून तो आर्त होता. ज्या सिंहासनावर सावत्र मातेने बसू दिले नाही त्याच्यापेक्षा अतिश्रेष्ठ, परमोच्च स्थान मिळविण्याची इच्छा होती म्हणून अर्थार्थी होता. हे सकामभक्तांचे उदाहरण दिले. सकामातून निष्कामतत जाता येते. सकामता भक्तीने तृप्त करण्याची इच्छा असली तर ती बाधक होत नाही. ध्रुव सकाम खरा पण अनन्य भक्त, म्हणूनच सर्व संत, निष्काम मुक्त भगवद्भक्त असून सुद्धा त्याची कीर्ती गातात. शुकाचार्यांसारखे ईशस्वरूप महाज्ञानीभक्त त्याची कीर्ती गातात. आजकालच्या शब्दज्ञानी लोकांना निष्काम निष्काम म्हणून तोंडाने बोलाच्या कढीभाताने तृप्त झाल्याचे

प्रदर्शन करण्यात मोठेपणा वाटतो हे 'प्रतिबिंबित शाखाग्र फलास्वादन मोदवत्' (श्रुति) 'ब्रह्मसर्वे वदिष्यत्ति संप्राप्तेतु कलौ युगे नाचरिष्यन्ति मैत्रेय शिस्नोदर परायणा' (श्रुति) "ब्रह्म सर्वे वदिष्यन्ति फाल्गुने बालका इव' (सु.र.)

**चौ.६ (१) पवनसुत** – पवनाचा पुत्र 'पवनतनय-बल पवन समानहि' (४/३०/४) पावन करणारा तो पवन, त्याचाच मुलगा तो स्वतः पावन; व त्याने पावन रामनामाचे अखंड स्मरण केले

**(क)** ध्रुवाच्या वर्णनात पावन शब्द वापरला नाही हे खरे; पण त्यावरूनच सकाम नामस्मरण 'अपावन' असा शेरा ठोकून देणे अपावन चित्ताचे लक्षण ठरेल. कारण 'सुकृती अनघ उदारहि चारी चतुर' (२२/६-७) व 'यामधि' रघुपति नाम उदार। श्रुतिपुराण-अति पावन सार' (१/१०/१) या व इतर मानस वचनांना अगदीच किंमत राहणार नाही. **असा भलताच अर्थ करणे म्हणजेच 'असावधानता.'**

(२) **ठेवी करुनी निजवश रामा** – "ऐक कपे तुजसा उपकारी। नहि कुणि सुरनर मुनि तनुधारी। करू तव केवी प्रत्युपकारा। मम मन कुंठित करित विचारा॥ श्रुणु सुत! अनृण तुझा मी नाही" (५/३२/५- ७) याचे कारण त्याला कशाचीहि कामना नव्हती; म्हणूनच हनुमंताची कृपा झाली की राम तेव्हाच प्रसन्न होतात.

(३) **ध्रुवादि सकाम भक्त व हनुमंतासारखे निष्काम भक्त यात हा भेद दाखविला की सकाम भक्त देवाचे ऋणी असतात व निष्काम भक्तांचा देव ऋणी असतो. 'भक्तिऋण घेतले माझे। चरण गहाण आहेत तुझे।'** असे संत म्हणतात ते याच मुळे. मंत्रांचे व उपास्य देवतांचे ऋणी धनी संबंध पहावे असे मंत्रशास्त्र सांगते ते एवढ्याचसाठी.

(क) येथे हे सुचविले की उत्तम भक्ताची सर्व लक्षणे हनुमंताच्या ठिकाणी होती. 'संतचरणपंकजि' सुप्रेमा। मन तन वचन भजन दृढ नेमा॥ माय बाप गुरु बंधु देव पति। सकल मला जाणुनि दृढ सेवति॥ मम गुण गाता तनू पुलकते। गद्‌गदगिरा नयन जल गळते॥ काम आदि मद दंभ न ज्याला। तात निरंतर वश मी त्याला॥' वश असतात म्हणजे त्याच्या हृदयमंदिरात निरंतर राहतात; 'वचन कर्म मन मम गति भजन करिति निष्काम॥ **हृदय कमलि त्यांचे सदा करतो मी विश्राम'** (३/१६/९-१२ व दो पहा) असे जे श्रीरघुनाथाने सांगितले तेच येथे सुचविले आहे.

(ख) २३/८/ मध्ये जे भाव दाखविले त्याचाच हनुमंताच्या निमित्ताने उपसंहार केला. २४/७ चौपाईची टीकाही पहावी. अती पापी तरले त्यांची उदाहरणे आता देतील -

हिं.- **अपितु अजामिलु गज गनिकाऊ। भए मुकुत हरि नाम प्रभाऊ॥७॥**
**कहउँ कहाँ लगि नाम बड़ाई। रामु न सकइ नाम गुन गाई॥८॥**

म.- गज गणिका अति पतित अजामिल। मुक्त होति हरिनामबले किल ॥७॥
किति वानू नामाची महती । राम नाम-गुण गावु न शकती ॥८॥

अर्थ — गज आणि अति पापी गणिका (वेश्या) व अजामिळ सुद्धा हरिनामाच्या प्रभावाने सहज मुक्त झाले ॥७॥ तेव्हा नामाचा महिमा किती व कोठवर सांगू! राम सुद्धा नामगुणाचे वर्णन करू शकणार नाहीत ॥८॥

**टीका - चौ.७** — गज, गणिका व अजामिळ यांची चरित्रे - कथा आता क्रमशः घेऊ.

## गज (गजेंद्र)

याने केलेली स्तुति गजेंद्रमोक्ष नावाने प्रसिद्ध आहे. क्षीरसागराच्या मध्यभागी त्रिकूटाचल आहे. तेथे वरुणाचे ऋतुमान नावाचे उद्यान असून त्यात एक मोठे सरोवर आहे. एकदा त्या पर्वतावर राहणारा गजयूथपति हत्तिणीसह त्या सरोवरात क्रीडा करीत असता, एका मगराने (ग्राह) त्याचा पाय धरला. गजेंद्राने आपली सर्वशक्ती एकवटून सुटण्याचा प्रयत्न चालू केला. हा प्रयत्न एक हजार वर्षे चालू होता. हत्तिणी वगैरेनीहि त्या ग्राहास पाण्यातून बाहेर ओढण्यासाठी मदत केली; पण निष्फळ ठरली. शेवटी गजेंद्राची शक्ती संपुष्टात येत चालली. त्यास पूर्वजन्माची स्मृति होऊन, त्या जन्मातील स्तोत्राने भगवंताचा धावा करण्यास प्रारंभ केला. भगवंताची गडबड धांदल-उडाली, गरुडाची गति सुद्धा अपुरी वाटू लागली. प्रभूस येताना पाहून 'नारायणाऽखिल गुरो भगवन्नमस्ते' म्हणून त्या क्षीणशक्ति, गजेंद्राने त्याच सरोवरातील एक कमल (पुष्कर) सोंडेने घेऊन भगवंताच्या चरणीवर वाहिले. भगवंतानी आपल्या चक्राने त्या ग्राहास विदारण करून गजेंद्रास सोडविला व त्याला सारूप्य मुक्ती दिली.

पूर्वजन्मात हा गज पांड्य देशाचा इंद्रद्युम्न नावाचा राजा होता. तो भगवद्भक्त होता पण दुर्दैवाने अगस्ति ऋषींनी शाप दिल्यामुळे तो गजराज झाला होता. पूर्वजन्मातील भक्तिसाधन त्यास गजयोनीत अंतसमयी मदतीस धावले. तो ग्राह पूर्वी हूहू नावाचा गंधर्व होता; त्याने एकदा देवर्षींचा पाय पकडला तेव्हा शापाने तो मकर झाला होता. गजेंद्राच्या संगतीने त्यालाही भगवंताचे दर्शन व चक्राचा स्पर्श झाला व तो मकर योनीतून मुक्त होऊन आपले पूर्वरूप पावला, ही कथा भागवत स्कंध ८।२-४ अध्यायात आहे.

## गणिका-जीवन्ती

पिंगला नावाच्या वेश्येची कथा श्रीमद्भागवत ११/८ मध्ये आहे; पण येथे तिचे ग्रहण करणे योग्य नव्हे. 'शुकाकारणे कुंटणी राम वाणी। मुखे बोलता ख्याति झाली पुराणि' (म.श्लो. ९). असे समर्थानी जिव्हाविषयी म्हटले तिची कथा शोधीत

असता पद्म पु. क्रियायोगसार खंड अ. १५ मध्ये सापडली; तीच घेणे जरूर आहे.
(क) रघु नावाच्या वैश्याची **जीवन्ती** नावाची फार लावण्यसंपन्न मुलगी होती. तिचा विवाह परशु नांवाच्या वैश्याशी झाला. ऐन तारुण्यातच वैधव्य आले व ती व्यभिचारिणी झाली. सासरच्यानी माहेरी पोचविली. तेथे तिचे दुष्कर्म दृष्टोत्पत्तीस येताच त्यांनी हाकलून दिली; तेव्हा ती उघड उघड वेश्याव्यवसाय करू लागली. तिने एक सुंदर राघू (पोपट) विकत घेऊन पाळला होता; व त्याला ती मोठ्या प्रेमाने मधुर आवाजात रामराम म्हणावयास शिकवीत असे. ती व तो पुढे जवळ जवळ बसून पुष्कळ राम-नामोच्चार करीत असत; त्यामुळे राम-नाम दोघांचेही 'सकल पातक भस्म करीतसे.' 'रामेति सततं नाम पाठयते सुन्दराक्षरैः ॥२७॥ रामनाम परंब्रह्म सर्वदेवाधिकं महत् । समस्त पातकध्वंसि स शुकस्तु सदाऽपठन् ॥२८॥ रामोच्चारणमात्रेण तयोस्तु शुकवेश्ययोः । विनष्टमभवत्पापं सर्वमेव सुदारुणम्' ॥२९॥ पुढे ती वेश्या व तो शुक एकाच वेळी मरण पावली. यमदूत तिला पाशात बांधून घेऊन चालले असता भगवत्पार्षद आले. दोघात युद्ध झाले व यमदूतांचा पराभव झाला इत्यादि. तो पोपट व जीवन्ती पण मुक्त झाली. 'रामनाम प्रभावेण तौ गतौ धाम्नि सत्वरम्'. पोपटाला शिकविण्याच्या निमित्तानेच रामनामाचा उच्चार करू लागली व त्यामुळे एवढा अलभ्य लाभ झाला. मग महिमा जाणून कामधंदा करताना जे मुखाने नाम उच्चारतील त्याना घरदार न सोडता भवरोगातून सुटता येईल यात नवल काय? गणिका-वेश्या अती पापी होती हे सांगण्याची आवश्यकताच नाही!

## अजामिल

'अजामिल पापी वदे पुत्र-कामे । तया मुक्ती नारायणाचेनि नामें' अजामिळाची कथा भागवत स्कंध ६/१-२ या अध्यायात आहे. हा एक कनोजी ब्राह्मण शास्त्रज्ञ सुस्वभावी, सदाचार संपन्न, क्षमादयादि गुण विभूषित होता. बापाची आज्ञा पालन करणारा तो ब्राह्मण एकदिवस समिधा वगैरे आणण्यासाठी वनात जाऊन परत येत होता. वाटेत एक वेश्या व कामीशूद्र यांचा संबंध चाललेला त्याला दिसला; व त्याचे ठिकाणी अनावर कामविकार उत्पन्न झाला. तेथून अधःपतनास प्रारंभ झाला. बापाच्या पश्चात् सर्वसंपत्ती घालविली; पतिव्रता स्त्रीचा त्याग केला व एका कुलटेबरोबर राहू लागला. उदरनिर्वाहासाठी जुगार चोऱ्या यांचे व्यसन लागले. त्यास त्या बाईपासून दहा मुलगे झाले. हा वृद्ध झाला असता गावातील दुर्जनांनी एका साधूची थट्टा करण्यासाठी अजमिळाकडे पाठविला व सांगितले की साधु सेवा प्रिय आहे वगैरे.
(क) त्या बाईने व अजामिळाने त्याची चांगली सेवा केली. त्या वेळी ती बाई गरोदर होती. साधूनी सांगितले की जो मुलगा होईल त्याचे नाव नारायण ठेवा,

व त्याच नावाने त्यास हाका मारीत जा. तसे पुढे घडले. अजामिळाचे त्या मुलावर फार प्रेम होते. अंतकाळी अजामिळास महाभयंकर यमदूत दिसू लागले. घाबरून त्याने मुलाच्या नावाचा 'नारायण! नारायण' असा उच्चार केला. तोच नारायणाच्या पार्षदांनी त्यास यमदूतांच्या पाशातून सोडविला. नारायणपार्षद व यमदूत यांच्या संवादात त्याने भक्ती व हरिनाम याचा महिमा श्रवण केला. नंतर त्यास पश्चात्ताप होऊन तो भजन (भक्ती) करू लागला व मुक्त झाला. शुकाचार्य म्हणतात 'म्रियमाणो हरेर्नाम गृणन्पुत्रोपचारितम्' अजामिलोप्यगाद्धाम किं.पुनः श्रद्धया गृणन्!'

ल.ठे. गज पूर्वजन्मांतील भक्त पण विप्रशापदग्ध होता; अजामिळ पूर्ववयात पुण्यशील होता व अति पापी बनल्यावर त्यास संतदर्शन, सेवा व उपदेश यांचा लाभ मिळाला; पण जीवन्ती वेश्येजवळ यातील काहीच नव्हते; तरी केवळ रामनाम प्रभावाने शुकाच्या निमित्ताने ती मुक्त झाली. असा भेद या तीन दृष्टांतात आहे.

चौ.-८ (१) या चौपाईचे सार हेच की नामाचा प्रताप, महिमा अनंत अगाध आहे. ज्या नामाच्या प्रभावाने साधक संत बनतात व त्या संतांचा महिमा वर्णन करता येत नाही असे रामच म्हणतात, त्या नामाचा महिमा राम कसे वर्णू शकतील?

'श्रुणुमुनि साधूंचे गुण जितके । वंदु न शकति वाणी श्रुति तितके' (३/४६/८)

'विधिहरिहर कविकोविदवाणी । लाजे साधू-महिमा गानी' (१/३/११)

(क) "महिमा नाम रूप गुण गाथा । सकल अमित अनंत रघुनाथा' (७/९१/३) जे अमित अनंत आहे त्याचा अंत भगवंतास जरी लागला तरी अनंत म्हणणे चुकीचे ठरेल; म्हणून म्हटले की त्याचे संपूर्ण वर्णन राम सुद्धा करू शकणार नाहीत, 'राम एवाभिजानाति रामनाम्नः फलं हृदि । नैव शक्नोति ब्रह्मादीनां तु का कथा' (वसिष्ठ तंत्र मा.पी) 'द्युपतय एव ते न ययुरन्तमनन्ततया! त्वमपि' (भाग. १४/८७/४ पहा.)

(ख) या म्हणण्याने श्रीरामास कमीपणा येत नसून मोठेपणाच येतो. ज्यांचा नामाचा असा प्रभाव आहे त्यांचा प्रभाव किती असेल?

**शंका** — रामनामाचे वर्णन करीत असता इतर नामानी उद्धरलेल्याची उदाहरणे का? याचे कारण इतकेच की गोस्वामीनी सांप्रदाय द्वेषाच्या कुंपणात आपणास कोंडून घेतले नव्हते. रामावतार, विष्णु नारायण आणि परमात्मा परमेश्वर या तिघांचे होतात तेव्हा त्यास राम नामच असते. रामनाम घेणाऱ्या जटायूस चतुर्भुज सारुप्य मिळाले आहे. ज्याप्रमाणे या तिघात भेद नाही त्याप्रमाणे त्यांच्या नारायण, हरि, कृष्ण, या नामात भेद नाही हे मूळ कारण आहे. शिव, हरि, गोविन्द, विष्णू इत्यादि नामाचे असेच आहे.

(क) रामभक्तास विष्णुसहस्त्रनामासम रामनाम आहे. या नारायणादि नामानी सुद्धा जर सहज उद्धार होतो तर त्यांच्या सहस्त्रपट महिमा असलेल्या रामनामाने फारच सुलभ होईल असे रामनाम भक्तास वाटले पाहिजे म्हणून ही उदाहरणे दिली हा दुसरा हेतु आहे.

(ख) रामनामाशिवाय इतर नामांची हेटाळणी करून नरकाचा मार्ग धरू नये म्हणून सांगितले.

**संगति** — या चौपाईची भाषा उपसंहाराची आहे. मी किती वर्णन करणार! वगैरे वाक्ये उपसंहाराची तयारी दर्शवितात. तरीपण तुलसीच्या मनाची रति रुचि प्रतिती येथे जरा अनावर झाली. वर्णनरूपी गाडी चालविणारी वाफ बंद केल्यानंतर सुद्धा त्या प्रेमरूपी वाफेने जी गती दिलेली आहे ती या गाडीला थोडा वेळ चालू ठेऊन पुढील स्टेशनावर थांबणार आहे. स्वानुभवाने ज्या वस्तूचे महत्व पटले त्यांचे प्रेमाने वर्णन करीत असता असेच होते. उपसंहार करून सुद्धा पुन्हा थोडे सांगावेसे वाटते. असेच येथे घडत आहे. आता तुलसीदास स्वतःची गोष्ट सांगतात.

हिं.दो.- । **नाम राम को कलपतरु कलि कल्यान निवासु** ।
॥ **जो सुमिरत भयो भाग तें तुलसी तुलसीदासु** ॥२६॥
म.दो.- । **रामनाम हा कल्पतरु कलिं कल्याण-निवास** ।
॥**स्मरुनि, भांग जो तो बने तुलसी तुलसीदास** ॥२६॥

**अर्थ** — रामनाम (रामाचे नाम 'राम') हा कल्पतरु असून कलियुगात कल्याणाचे निवास स्थान आहे; जो भांग होता तो तुलसीदास त्याच्या स्मरणाने तुळस (तुलसी) झाला ॥२६॥

**टीका** — (७) — **कल्पतरु** — जी जी कामना करावी ती ती पूर्ण करतो. कल्पतरु या पृथ्वी-तलावर अलभ्य आहे. पण राम-नाम हा कल्पतरु सहज सुलभ आहे. याने धर्म, अर्थ, काम व मोक्ष तर मिळतातच पण अति दुर्लभ अशी जी मोक्षानंतरची भक्ती ती पण हा देतो.

(क) **कल्पवृक्ष** — याचकाचे स्वतःचे किंवा याचकाच्या इच्छेने इतरांचे अकल्याणही करू शकतो. असा दोष रामनामात नाही म्हणून म्हटले की 'कल्याणनिवास' आहे. रामनामाने कधी कोणाचेही अकल्याण होत नाही. स्वर्गातील कल्पवृक्ष मोक्ष व भक्ति देऊ शकत नाही; रावणासारख्या शत्रूपासून देवांचे सुद्धा संरक्षण करू शकत नाही. रामनाम कल्पतरु हे सर्व करतो हे मागील आठ दोह्यांत दाखविले आहे. 'कल्याणानां निधानं कलिमलमथनं' (ह.ना)

(ख) हा पूर्वार्ध उपसंहार रूपाने मागील सर्व वर्णनाचे सार सांगतो; म्हणून जास्त विस्तार नको.

(२) **कलिं** — कलियुगात, रामनामविहीन इतर साधनानी कल्याण होत नाही हे पूर्वी सांगितलेच आहे. (दोहावली १० पहा) हा कल्पवृक्ष असला की याच्या छायेखाली कलियुगात इतर साधने सुखद होऊ शकतात. इतर साधनांशिवाय या एकानेच सर्व काही प्राप्त होते (२२।८ टीका)

(३) तुलसीदास म्हणतात की मी प्रथम भांगेसारखा जन्माला आलो; पण रामनामानेच तुलसी (वृक्ष-तुळस) झालो. ही ओळ तुलसीदासांच्या चरित्रावर प्रकाश पाडणारी आहे.

(क) भांग अपवित्र, मादक, अपूज्य, सज्जनगर्हित, दुर्जन संगतियुक्त, दारिद्र्यदायक, दुर्व्यसन लावणारी, दुर्बुद्धि देणारी, तमोगुणी, बुद्धिभ्रंश करणारी, भ्रमण करविणारी, देवद्रोह्यांनाप्रिय, देवांना अप्रिय इत्यादि प्रकारची असते.

(ख) तुळस परम पवित्र, पूज्य, रोगनिवारक, सज्जनमान्य, सज्जनसंगतियुक्त, श्रीहरिला प्राणप्रिय, इत्यादि भांगेच्या सर्व विरुद्ध गुणांनी संपन्न आहे. 'या दृष्टा निखिलाघसंघशमनी स्पृष्टा वपु:पावनी । रोगाणामभिवंदिता निरसिनी सिक्तान्तकत्रासिनी ॥ प्रत्यासत्ति विधायिनी भगवतः कृष्णस्य संरोपिता । न्यस्ता तच्चरणे विमुक्तिफलदा तस्यै तुलस्यै नमः' (रा. चंद्रिका) तिचे दर्शन सर्व पापांचा नाश करते, स्पर्श शरीरास पावन करतो, नमस्कार केल्याने जी रोगांचे निरसन करते, जिला पाणी घातले असता मृत्यूला दूर पळविते, जी लावली असता श्रीकृष्णाचे सान्निध्य निर्माण करते व त्याच्या चरणांवर वाहिली तर मोक्ष देते त्या तुलसीला मी नमस्कार करतो."

(ग) तुलसीदास सदेह असता या सर्व गोष्टी घडल्याच हे त्यांच्या चरित्रावरून स्पष्ट दिसते. पण त्या तुलसीची रामप्रेमरभूषित मंजरी 'श्रीरामचरितमानस' सुद्धा आज ३८० वर्षे हा प्रताप दाखवीत आहे. या मंजरीचा सुगंध दिव्य असल्याने दिवसेंदिवस देश-परदेश, स्वभाषा, परभाषा, हिंदुधर्मी व अन्यधर्मी यात सतत पसरत आहे, दूरदूर पसरत अहे व पसरेल. ही टीका हा एक याचा मोठाच पुरावा आहे.

(घ) भांगेच्या व तुलसीच्या रूपकाचा विस्तार केला, तर सर्व तुलसीदास चरित्र लिहिता येईल पण थोडासा नमुना पाहणेच योग्य. १. जन्मताच भांगेप्रमाणे अपवित्र समजून पितामाता यांनी त्याग केला. २. कोणी जवळ करण्यास तयार नसे व जो तो मादक भांगेसारखा तिरस्कार करीत असे. ३. जिकडे तिकडे अपमान, उपहास अपूज्य भांगेसारखा होत असे. ४. खाण्याला मिळणेसुद्धा कठीण इतके दारिद्र्य होते. ५. गावात वेड्यासारखा मलीन, भ्रमण करीत, भटकत असे. तुलसी दशेतील उदाहरणे देण्याची आवश्यकता नाही.

(ङ) मुसलमान, पारशी, ख्रिश्चन यांच्या दाराशीं, घराजवळ तुळस दिसणे अशक्य आहे पण अशा परधर्मी काही सज्जनांच्या घरात तुलसी रामायण दिसते. रशियात तर तीन लक्ष प्रति छापल्या पहिल्या आवृत्तीच्या! 'जननी जनक तज्यो जनमि' 'फिर्यो ललात बिनु नाम उदर लगि दुखउ दुखित मोहि हेरे.' नाम घेत नव्हतो तेव्हा पोटाची खळगी भरण्यासाठी दारोदार लालचीने भटकत होतोच माझे दुःख पाहून दुःखाला सुद्धा त्यावेळी दुःख झाले असेल. (२२७, २७५ पहा -कविता

कवितावळीतही असे पुष्कळ उल्लेख आहेत. १९५७ त मॉस्कोत तुलसीजयन्ती साजरी झाली. (मा.मणि. पहा)

'॥ कल्याणानां निधानं कलिमलमथनं पावनं पावनानां । पाथेयं यन्मुमुक्षोः सपदि परपदं प्राप्तये प्रस्थितस्य ॥ विश्रामस्थानमेकं कविवरवचसां जीवनं सज्जनानां । बीजं धर्मद्रुमस्य प्रभवतु भवता भूतले रामनाम' ॥ हा प्रसिद्ध श्लोक हनुमन्नाटकातील मंगलाचरणातला आहे हे मा.पी. वरून समजले.

(क) मानसातील 'नामवन्दन' या चालू प्रकरणात या श्लोकातील सर्व वर्णनाचे साम्य आढळले ते -

१. कल्याणानां निधानम् - कल्याणनिवास (२६). २. कलिमल मथनं - नाम सकल कलि कलुष निकंदन; (२४/८). ३. पावनं पावनानां - वरदात्यांवर वर दान दे (२५). स्मरुनि पवनसुत पावन नामा' (२६।६। टी.प.) ४. पाथेयं यन्मुमुक्षोः प्रस्थितस्य' शुक सनकादि सिद्ध मुनियोगी । नामकृपेच आत्मसुख भोगी । (२६/२) २२/१.२ पहा; ५. विश्राम स्थान कविवरवचसां काव्य विचित्र सुकवि कृत जेही । रामनामविण शोभत नाही' (१०/३) ६. जीवनं सज्जनानां -रामचरित शतकोटितुनि गणि महेश घे प्राण' (२५) 'काळकुटे फळ' सुधा समर्पित' (१९/८) 'सकल कामनाहीन जे रामभक्तिरस लीन । नामप्रेमसुधा हृदी त्यानि ही कृत मन मीन' (२२ टी.प.) ७. बीजं धर्म द्रुमस्य -नामकोटि खलकुमति सुधारि' सुमति हेच धर्मद्रुम बीज आहे. ८. भूतले प्रभवतु- 'राम नाम हा कल्पतरु; 'होतिसिद्ध अणिमादिक पावुनि. रामनामाने मुख्य साध्य रामस्नेह आहे हे आता सांगतील -

हिं.- **चहु जुग तीनि काल तिहुँ लोका । भए नाम जपि जीव बिसोका ॥१॥**
**वेद पुरान संत मत एहू । सकल सुकृत फल राम सनेहू ॥२॥**
म.- **त्रयकाळी चहु युगी त्रिलोकी । नाम जपुनि बहु जीव विशोकी ॥१॥**
**वेद पुराण संत-मत हें हो! । सकल सुकृत फल रामी स्नेहो ॥२॥**

**अर्थ** – चारी युगांत तिन्ही लोकात व तिन्ही काळात नामाचा जप करून पुष्कळ जीव शोकरहित झाले (मुक्त झाले) ॥१॥ अहो! वेद पुराणे व संत यांचे हेच मत आहे. की सर्व सुकृताचे फळ म्हणजे रामावर स्नेह हेच आहे. ॥२॥

**टीका – चौ १ (१) चारयुगे –** कृत (सत्य) त्रेता, द्वापर व कलि; तीन काळ भूत, वर्तमान व भविष्य; तीनलोक. स्वर्ग, मृत्यू व पाताळ.

(क) काळाची कल्पना अगदी सापेक्ष असते. २।४ पळांच्या स्वप्नात कितीक वर्षे गेल्याचा अनुभव येतो. एक अक्षर उच्चारून दुसरे उच्चारीपर्यंत पहिले भूत काळात जाते. भविष्य काळाला सुद्धा झाले (भए) हे क्रियापद वापरण्यात हेतु निश्चय दाखविण्याचा आहे. उदा. त्या अमुक डॉक्टरचे औषध घेता ना? मग झालातच की बरे. यासारखेच निश्चयात्मक मत सांगितले.

(ख) जोपर्यंत अज्ञान-मोह आहे वा होण्याची शक्यता आहे तोपर्यंत शोकरहित झाला असे म्हणता येणार नाही; म्हणून पुढील चौपाईत सांगतात.

**चा.२ - (१) रामस्नेह — रामचरणरति** - रामप्रेम प्राप्त होणे, हे सर्व सुकृतांचे शेवटचे फल आहे, म्हणजेच ज्ञानरुपी फळांतील रस आहे. '**शम यम नियम चि फुले ज्ञान फल। हरिपदरति -रस वेद वदे कल**' (१/३७/१४) शम यम नियमादि फुले असून त्यांचे फळ ज्ञान आहे. पण ज्ञानरूपी फळात जर रस नसेल तर ते निरुपयोगी, त्याज्यच. ते कडवट, तुरट, आंबट लागणारच म्हणजे शोकानुभव येणार.

(क) **सुकृत** — धर्माचरण, पुण्य; 'जपतप नियम योग निज धर्महि । **श्रुतिसंभव नाना शुभ कर्महि ॥ ज्ञान** दया दमतीर्थी मज्जन । वदति धर्म जितके श्रुति सज्जन ॥ आगम निगम पुराण अनेकहि । श्रवुनि पकुनि **फल तो प्रभु एकहि ॥ तवपदपद्मीं प्रीति** निरंतर । **सकल साधना हे फलसुंदर**' (७/४९/१-४) (७/१२०/१८व ७/१२६/४-७ पहा) उपक्रमोपसंहारातील या अवतरणात ज्ञानाचा अंतर्भाव सुकृतात, साधनातच केला आहे. **प्र.प्र. ११/६ 'सकल सुकृत फल'** पहा.

(उ) **वेद पुराण संत मत** — 'इतिहास पुराणाभ्यां वेदार्थम् उपबृंहयेत् ।' वेदांचा अर्थ इतिहास व पुराणाने स्पष्ट विस्तृत करावयाचा असतो. इतिहास पुराणात सुद्धा देशकालपरिस्थिती भेद, अधिकारी भेद, अपवाद, योग्यायोग्य विरोधवचने, परोक्षवाद, इत्यादि भेदांनी विविध वर्णन असल्यामुळे व मायापाशबद्धांची मति मलिन असून निर्भ्रम झालेली नसल्याने, त्यास समन्वय व ग्राह्याग्राह्य विचार करता येणे शक्य नाही; म्हणूनच तुकोबा म्हणतात की **'वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा' आम्हास-संतांस.** म्हणून संतांचे मत असे येथे शेवटी म्हटले 'धर्मस्यतत्वं निहितं गुहायाम्. महाजनो (संत) येन गतः स पंथाः' एहू-हेंच.

**संगति** — 'आन उपाय न विशेष कलियुगि' (२२/८) असे पूर्वी म्हटले त्याचा उपसंहार इतर युगातील विशेष धर्म सांगून पुढील तीन चौपायात करतात -

हिं. - **ध्यान प्रथम जुग मखविधि दूजे । द्वापर परितोषत प्रभु पूजे ॥३॥**
**कलि केवल मल मूल मलीना । पाप पयोनिधि जन मन मीना ॥४॥**
**नाम कामतरु, काल कराला । सुमिरत समन सकल जग जाला ॥५॥**

म. - **ध्याने कृतयुगि मखविधि दूजें । द्वापरिं परितोषे प्रभु पूजें ॥३॥**
**कलि केवल मल मूल मलीन हि । पाप पयोनिधिं जनमन मीनहि ॥४॥**
**नाम कामतरु कराळ काळा । स्मरतां शमवि सकल जग-जाळा ॥५॥**

**अर्थ** — (पहिल्या) कृतयुगात ध्यानाने (योगानें) दुसऱ्यात (त्रेतायुगात) यज्ञयागादि कर्मांने व द्वापरयुगांत पूजा (व्रतादि) केल्याने प्रभु प्रसन्न होतात. ॥३॥ कलियुग केवळ पापांचे मूळ आहे व मलीन आहे. पापसागरात लोकांची मनें तर मासेच

बनलेली असतात. ॥४॥ कराल कलिकालांत रामनाम हा कल्पतरु आहे व त्याचे स्मरण केले असता या जगरूपी जाळाला तो शमवितो ॥५॥

**टीका – चौ - ३** (१) 'कृतयुगिं सब योगी विज्ञानी । ध्यात हरिस भवतरती प्राणी' म्हणूनच वर ध्यानाने-योगाने असा अर्थ केला आहे. ध्यानें कृतयुगिं याचा उपसंहारात अर्थ स्पष्ट केला गेला आहे.

(क) **मखविधि दूजें** – दुसऱ्या म्हणजे त्रेतायुगात - 'त्रेतीं यज्ञ विविध नर करती । प्रभुस कर्म अर्पुनि भवतरती' असा अर्थ स्पष्ट केला आहे.

(ख) द्वापरिं करुनी रघुपति पूजा । नर भवतरति उपाय न दूजा ॥ (७/१०३/१-३) 'कृते यद् - ध्यायतो विष्णुं त्रेतायां यजतो मखैः । द्वापरे परिचर्यायां कलौ केशव कीर्तनात् ॥ (भाग १२/३/५२)

(२) पहिल्या तीन युगांत ध्यानयोग, यज्ञ व पूजाव्रते ही रामस्नेहप्राप्तीची मुख्य साधने होती. असा बदल होण्याचे कारण म्हणजे कालमानाने सर्वसाधारण लोकांच्या चित्ताच्या शुद्धतेत व बाह्य परिस्थितीत कालानुसार उत्पन्न होणारी सत्वगुणाची अवनति व रजतमोगुणांची वृद्धि हे आहे. 'शुद्ध सत्व समता विज्ञान कृतमहिमा प्रसन्न मन जाण ॥' निर्गुण किंवा सगुणाच्या ध्यानास शुद्ध सत्वगुण व मनाची प्रसन्नता यांची आवश्यकता असते. कृतयुगात या गोष्टी सहज प्राप्त झालेल्या असतात. हल्ली **'सुप्रसन्न मन सदा' ही स्थिती शक्य आहे काय?** लाखात एकाला तरी ही स्थिती सहज सिद्ध आहे काय? मुळीच नाही.

(क) **त्रेतायुगात** 'सत्व बहुत, रज जरा कर्मरति । त्रेता धर्म सर्वपरि सुख अति' शुद्धसत्व गुण गेला व सत्वगुण आला पण त्यात थोडे रजोगुणाचे मिश्रण असते. 'सत्वात् संजायते ज्ञानं रजसो लोभ एवच' (भ.गी. १४/७) यज्ञयागादि करून स्वर्गादि सुखप्राप्तीची आशा बळावली. येथे मिळणाऱ्या सर्वप्रकारच्या सुखाने संतोष होईनासा झाला; कारण रजोगुणामुळे ध्यानसुख मिळेनासे झाले. 'काम एष क्रोध एष रजोगुण समुद्भवः' (भ.गी.) म्हणून ध्यानयोग मुख्य साधन राहिले नाही.

(ख) **द्वापरयुगांत** 'बहु रज सत्व अल्प ही तामस । द्वापर धर्म हर्ष भय मानस.' सत्वगुणाला दुय्यम स्थान मिळाले, कारण रजोगुण फार वाढला व तमोगुणाचा प्रवेश थोडा झालाच. यज्ञयागादिकात लागणारी मंत्रांची शक्ति रजोगुण प्राबल्याने व सत्वगुण क्षीण झाल्याने तेवढी राहिली नाही. त्यामुळे देवतांनी प्रगट होऊन हविर्भाग घेणे अपवादात्मक झाले. व अधिक स्थूलकर्मात पूजाव्रतादिकात मनुष्याचे मन विभागले जाऊन सर्व इंद्रियांना भगवत्पर-कार्यात लाऊन चित्तशुद्धीचे साधन उपयुक्त होऊ लागले.

(ग) पण कलियुगात सत्वगुण पळाला, तमोगुणाचे साम्राज्य वाढले रजोगुण थोडा राहिला त्यामुळे यज्ञयागादिकांत पावित्र्याच्या अभावी तसेच पूजाव्रतादिकात चित्त एकाग्र होणे अशक्यवत झाले व तमोगुणाचे कार्य प्रमाद, मोह, आळस अज्ञान यांचे

साम्राज्य पसरले व त्यामुळे द्वेष, वैर, विरोध यांचे बळ वाढले. एकाच घरात सहोदर भावात, पतिपत्नींत, मातापितरांत, द्वेष विरोध वैर इत्यादींचा प्रसार बहुधा झाला आहे व वाढत आहे हें प्रत्यक्ष अनुभवानेच दिसत आहे. अशा स्थितीत स्थानशुद्धि नाही, द्रव्यशुद्धि नाही, मंत्रशक्ति जवळजवळ नष्ट झालेली, पूजा द्रव्यांची स्थिती अशीच, वस्त्रशुद्धि, पात्रशुद्धि गेली; पाणी, तूप, तेल, दूध, फुले, तुळसी, बेल यांची शुद्धि गेली. कोणाकडून तरी विकत घ्यावयाची, कसल्यातरी पात्रात ठेवावयाची असेच बहुधा सर्व पदार्थांचे झाले आहे. शास्त्रज्ञान, संस्कृत भाषा, यांचा लोप होत चाललेला दिसत आहे. ब्राह्मणाचें मुख्य यज्ञोपवीत ते तर अति अशास्त्रीय केलेले; शुद्ध गोमय, गोमूत्र मिळणे कठीण. कुश म्हणजे काय, व गोत्र कोणते हे सुद्धा माहीत नाही असे होत आहे. भक्ष्य पेय तर विचारूच नये; अशा स्थितीत वैदिकादि मंत्रांची सिद्धि कशी व्हावी?

चौ – ४ – (१) कलियुगाची सहज प्रवृत्तीच पापाकडे; मासे जसे पाण्याशिवाय राहू शकत नाहीत व पाण्यावरच त्यांचे प्राण अवलंबून असतात; त्याप्रमाणेच कलियुगात माणसांना पापच गोड वाटते, पापाचे, दोषांचेच चिंतन व पाप केल्याशिवाय राहवत नाही; तेथे पूजा मख ध्यान यांचा कितीसा प्रभाव पडणार? या प्रमाणे ही तिन्हीं साधने पापवृद्धीमुळे व अंतःकरणाच्या व धनादिकांच्या मलीनतेमुळे प्रभावी राहिली नाहीत व यामुळे यापेक्षा सोप्या साधनाची जरुरी उत्पन्न झाली. ते साधन पूर्वीच्या युगात होतेच ते कलियुगीन जीवांच्या पापनाशासाठी मुख्य झाले. म्हणूनच ज्ञानेश्वरापासून सिद्धारूढमहाराजांपर्यंतच्या संतांनी मुख्यतः हेच सांगितले की 'हरिमुखे म्हणा हरि मुखें म्हणा । पुण्याची गणना कोण करी ॥ योग याग-विधि । येणे नोहे सिद्धी । वायाचि उपाधि दंभधर्म ॥ ज्ञाने. (हरिपाठ) 'नको कंठ शोषू बहू वेद पाठीं । नको तूं पडूं साधनांचे कपाटीं ॥ घडे कर्म खोटें बहू तो दगा रे। हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ (समर्थ) 'पापिहि ज्यांच्या नामां स्मरती । अति अपार भवसागर तरती' (४/२९/३) 'सत्यी त्रेतीं द्वापरीं पूजा मख नी योग ॥ देती गति ती कलिं हरि नामे पावति लोक' (७/१०२) 'सहज सांडोनि सायास करणे' (श्रीसमर्थ) हे काही कल्याणेच्छूचे लक्षण नाही; म्हणून पुढील चौपाईत नामसाधनच मुख्य हे सांगतात.

चौ.५ – (१) कलि कराल काल – याचे करालत्व पूर्वीच दाखविले आहे - 'जे जात किं कलिकालिं करालीं । कृति काकांची वेष मराली ॥ गति कुपथीं श्रुतिपथा सांडिती । कपटकाय कलिपंक भांडि तीं ॥ वंचक मिरविति रामभक्तवर । काम कोप कनकाचे किंकर' (१/१२/१-३) 'तो कलिकाल कठीण उरगारी । पापपरायण सब नरनारी' (७/९७/८) प्रस्तावनेत. 'कलिस्वभाव' वर्णन पहा.

(२) कामतरु – कामना, इच्छा पूर्ण करणारा तरु कल्पवृक्ष. 'रामनाम हा कल्पतरु कलिं कल्याण निवास' (दो. २६ टी.प.) 'जाइ निकट तरु ओळखुनि छाया शुच शमवी च ॥ मागत अभिमत लभे जगीं राव रंक शुचि नीच' (२/२६७)

(३) जगजाळ — या जगात प्राप्त होणारे त्रिताप, चिंता, शोक, वियोग, रोगादि दाह, असा अर्थ घेणेच उचित आहे. वरील २/२६७ मध्ये शुच-शोक शब्द आहेच व 'नामजपुनि बहुजीव विशोकी' (चौ.१) मध्ये जें म्हटले त्याचेच येथे कल्पतरु रुपकाने स्पष्टीकरण केले आहे. म्हणजेच 'आनंद रस हा प्याला । भवताप शांतचि झाला.' भवताप म्हणजेच जगजाळ, तो रामनामाने शान्त होतो कारण नामप्रेम-रामप्रेम सुधाऱ्हदीं मन मीन करता येते. डोहांत बुडी मारल्यावर जगाच्या वणव्याचा दाह ताप कसा लागेल? हा रामस्नेहरस नको असेल त्यांना काय लाभ ते पुढील चौपाईत सांगतात.

हिं.- रामनाम कलि अभिमत दाता । हित परलोक लोक पितु माता ॥६॥
कलिजुग करम न भगति बिबेकू । राम नाम अवलंबन एकू ॥७॥

म.- रामनाम कलिं अभिमत दाता । हित परलोक लोकिं पितृ माता ॥६॥
कलियुगि कर्म न .भक्ति विवेकू । रामनाम अवलंबन एकू ॥७॥

अर्थ — कलियुगात इच्छित फळ देणारे रामनाम आहे. ते परलोकसाधनात हित-मित्र आहे व या लोकी आईबापांसारखे आहे ॥६॥ कलियुगांत एक (एकू-मुख्य) - मुख्य आधार (अवलंबन) रामनाम आहे; कर्म, भक्ति व ज्ञान हे आधार नाहीत ॥७॥

टीका — चौ ६ (१) अभिमत दाता — कल्पवृक्षाजवळ 'मागत अभिमत लभे जगिं राव रंक शुचिनीच' (२/२६७) जें पाहिजे असेल ते मिळते. पण स्वतःचा किंवा दुसऱ्यांचा विनाश करणारे अकल्याण करणारे मागितले तर कल्पवृक्ष देतो पण नाम तसे देत नाही हे सांगण्यासाठी पुढील चरण आहे.

(२) हित परलोक — सद्गति, मोक्ष, हरिभक्ति या गोष्टी कल्पवृक्ष देत नाही आणि या गोष्टींचा विनाश करणारे मागितले तर देतो म्हणून येथें हित परलोक - परलोकसाधनात-परमार्थ साधनांत मित्राप्रमाणे साह्य करणारे-रा हे शब्द घातले. 'स्मरत सुलभ सकलां सुखदायक । लाभ लोकिं, परलोक निभावक' (१/२०/२) यातील 'परलोक निभावक' ने जें सांगितलें त्याचाच उपसंहार येथे 'हित परलोक' शब्दांनी केला १/२०/२ टीका पहावी. मित्रलक्षणे कि.कां.दो. ७/१ 'मित्र दुःख ज्या न दुःखकारी' पासून 'विपदी' स्नेहाशतपट करती" ॥ चौ-६ पर्यंत पाहणे. मोबदल्याची इच्छा न ठेवता परमहित -परमार्थ-परमलोक सहज साधून देणारा मित्र राम नाम आहे. हे देहधारी उत्तम मित्राला सुद्धा करता येत नाही.

(क) व हे कार्य आई-बाप सुद्धा करू शकत नाहीत. उलट आईबाप मी आणि माझे यांचेच धडे अगदी लहानपणापासून शिकवीत असतात.

(३) लोकिं पितृमाता — दोघांचा उल्लेख करण्यात हेतु हा आहे कि आईचे प्रेम बापापेक्षा अधिक निस्वार्थ असते; तथापि ते आंधळे असते व बापाचे डोळस असते. आई केवळ त्याच्या तत्कालीन सुखाचा व समाधानाचा विचार करते पण

बापाच्या प्रेमात मुलाच्या पुढील आयुष्यातील सुखाचा विचार मुख्य असतो. रामनाम ही दोन्ही कामे करते व आईपेक्षा सुद्धा अत्यंत पूर्ण स्वार्थहीन प्रेम करते. रोगी मुलाने मागितलेली रोग वाढविणारी वस्तु आई कदाचित देईल पण बाप देणार नाही तसे नाम आईप्रमाणे मन न दुखविता पण बापाप्रमाणे अहित न होऊ देता ऐहिक सुखादि देते, इच्छा पुऱ्या करते. या दोन्ही गोष्टी कल्पवृक्ष, एकटी आई किंवा बाप करू शकत नाहीत. विष मागितले तर कल्पवृक्ष, देईल. पण रामनाम ऐहिक कल्याण पाहिजे असणाराचे ऐहिक अकल्याण करणार नाही. **रामनाम, कल्पवृक्ष, मित्र, आई व बाप या सर्वांहून अलौकिक आहे.** (मा.पी.टी. जरूर पहावी)

**चौ. ७ (१) कर्म न** — कर्म हा मुख्य आधार त्रेतायुगात होता. यज्ञयागादि कर्मेच आहेत. 'मखविधि पूजे' (टी.प.) येथे कर्म शब्दाने ऐकणे पाहणे इत्यादि पशुपक्षी साधारण कर्मे घ्यावयाचीं नसून 'चित्तस्य शुद्धये कर्म' -ज्या कर्मानी चित्त शुद्धि होते ती ग्राह्य आहेत. (२७/२ च्या टीकेत सुकृत -टीका पहा) ही फलदायी का होत नाहीत याचे विवेचन पूर्वी केले आहे. त्रैवर्णिकांना वेदपठण हे आवश्यक कर्म आहे. ते न झाल्याने वाचाशुद्धि व शरीरशुद्धि होत नाही. प्रत्येक वेदाच्या पठनाचा शरीरावर भिन्न भिन्न परिणाम होतो. दशग्रंथी ऋग्वेदी, ब्रह्मचर्याचे पालन करून शिकलेला असेल तर बहुधा शरीराने स्थूल होतो. हिरण्यकेशी-आपस्तंब सहसा तसे होत नाहीत हे ३५/४० वर्षांच्या अवलोकनाने सिद्ध झाले आहे. या वेदांच्या स्वरूपाचे जसे वर्णन आहे तसेच विशुद्धपठन करणारे होतात. सामगायनाने नाडी शुद्धि होते, चक्रे जागृत होतात. हे परिणाम त्या त्या वेदांच्या वर्णशब्द स्वरोच्चार पद्धतीतील भेदाने न कळत सहज होतातच त्यामुळे आचार शुद्ध असेल तर मंत्रांच्या ठिकाणी सामर्थ्य उत्पन्न होते. सर्व शक्तीचे व तेजाचे मूळ वीर्य आहे. त्याचे संरक्षण, कलियुगात होत नसल्याने शरीर व मन तेजोहीन, ओजहीन होते. सर्वकर्मांचा आधार जे शरीर तेच शुद्ध नाही

**(क) आहार** — अन्न शुद्ध नाही. न्यायार्जित धनाने मिळविलेला, शास्त्र संस्कारयुक्त व सात्विक परिमित नाही. मन हे अन्नाच्या अतिसूक्ष्म-तम रसमय असते 'अन्नमय हि सोम्य मनः' 'आहार शुद्धौ सत्वशुद्धिः' आहार शब्दाचा अर्थ कर्मेंद्रियांनी व ज्ञानेंद्रियांनी ग्रहण केले जाणारे विषय असा आहे. या प्रमाणे स्थूल देह (शरीर) अशुद्ध व सूक्ष्म देह अशुद्ध म्हणून यज्ञयागादि कर्मांनीच या युगात चित्त शुद्धि होणे शक्य नाही, **म्हणून कर्म मुख्य आधार-अवलंबन, नाही.**

**शंका** — भाव असला म्हणजे झाले मग कर्मात वैगुण्य आले तरी चित्तशुद्धि का होऊ नये? माझे पोट भरले आहे अशी भावना केल्याने क्षुधाशांति; मी लक्षाधीश आहे या भावनेने लक्ष रूपयांची प्राप्ति, मी डॉक्टर आहे या भावनेनेच ते सर्वज्ञान इत्यादि गोष्टी घडत असतील तर कर्मात भावनेने भागेल. **कर्मे मुख्यतः तीन प्रकारची आहेत - क्रियात्मक, भावात्मक, व वस्तुस्वभावात्मक.**

(१) जमीन नांगरण्यापासून बी पेरणे-लावणे यापासून पीक फळे येऊन ते अन्न फलादिक पोटात जाईपर्यंतची ही **सर्व कर्मे क्रियात्मक आहेत**. त्यात भावनेने कार्य साधेल काय? साधणार नाही तसेच कर्ममार्गातील स्नानसंध्यादि सर्व कर्माचे आहे. तेथे क्रियाच मुख्य आहे. 'क्रियाशीलस्य सिद्धिःस्यात्' हे येथे अक्षरशः लागू आहे.

(२) **भावात्मक कर्मे** — भावांची उत्पत्ति श्रद्धेपासून होते. श्रद्धा म्हणजे अनेक जन्मांतील व या जन्मातील संस्कार समूहांचा विशिष्ट मानसिक परिणाम जो क्रिया कर्मप्रेरक होतो तो. श्रद्धा शुद्ध सात्विक, सात्विक, राजस, तामस व यांच्या परस्पर संमिश्रणाने अनंत प्रकारांची होत असते. मंत्र, श्रवण, कथन, क्रिया, दर्शन, स्पर्श, संगति इत्यादिकांवर संस्कार अवलंबून असतात. पण जेथे मलमूल मलीन पापपयोनिधि'च वाढत आहे तेथे संस्कार, श्रद्धा, भाव तरी सात्विक व शुद्ध कसे असणार?

(३) **वस्तु स्वभावात्मक कर्मे** — अग्नी स्वभाव भाजणे, तापविणे, कुत्र्याचा स्वभाव भुंकणे व वाकडे शेपूट, कावळ्यांचा स्वभाव कर्म कर्कश आवाज इत्यादि वस्तु स्वभाव कर्मे होत; येथेहि भावना निरुपयोगी.

(२) **न भक्ति** — येथे भक्ति म्हणजे द्वापर युगाचा जो मुख्य आधार सांगितला तो 'द्वापरिं करुनी रघुपति पूजा । नर भव तरति उपाय न दूजा' (७/१०३।३) पूजाव्रतें इत्यादि. नवविधाभक्तीत नामस्मरणाचा अंतर्भाव होत असल्याने तिचे ग्रहण येथे करता येत नाही. प्रेमभक्ती नामाने प्राप्त होणारे सर्वोत्तम फळ असल्याने तिचेहि ग्रहण येथे करता येत नाही.

(क) **व्रतपूजादिभक्ती** हे भावात्मक व क्रियात्मक असे संमिश्र कर्मच आहे. म्हणून व्रतपूजादिभक्तीने चित्तशुद्धि कलियुगात होणार नाही ही **भक्ति कलियुगात आधारभूत नाही.**

(३) **विवेक - ज्ञानमार्ग** — हा कृतयुगात मुख्य मार्ग होता. हा मार्ग केवळ भावनेवर अवलंबून असतो; पण याला कर्माने चित्तशुद्धि आधी व्हावीच लागते. साधन चतुष्टय संपन्न असेल तोच या मार्गाचा अधिकारी होऊ शकतो. साधनचतुष्टय संपन्नता म्हणजेच चित्तशुद्धि ती कर्माने, क्रियात्मक व भावात्मक कर्मानेच होते. 'चित्तस्य शुद्धये कर्म' 'स्वकर्मणातमभ्यर्च्य' । चित्तशुद्धि होते. पण हे नामाशिवाय कलियुगात अशक्यवत आहे; म्हणून **केवल ज्ञानमार्ग कलियुगात आधारभूत नाही.** 'अज्ञस्याल्प प्रबुद्धस्य अहं ब्रह्मेति यो वदेत् महा नरक जालेषु रातेन विनियोजितः' (शिव.मी.-गरुड पु.)

**शंका** — आमची चित्तशुद्धि झाली आहे म्हणूनच आम्हाला केवळ ज्ञानमार्गाने जाण्याची इच्छा झाली. मागील जन्मात कर्म उपासनादि सर्व केले म्हणून तर या मार्गाची आवड उत्पन्न झाली; असे कारण कोणी कोणी पुढे करतात त्याचे काय? पूर्वी भावनेविषयी जे लिहिले तेच येथे लागू आहे. ज्याच्या खिशात पैसा सुद्धा नाही व मिळविण्याचा प्रयत्न करीत नाही त्यास मुंबईहून मद्रासला एअर

कंडिशन्ड डब्यातून जाण्याची इच्छा झाली व तो डब्यात जाऊन बसला डोळा चुकवून, तर परिणाम काय होईल? **इच्छा होणे हे पात्रतेचे लक्षण नाही.** पाच वर्षांचा कलियुगांतील मुलगा जरंड्यास जाण्यास निघालेल्या बापाला म्हणतो की मी तुमच्या बरोबर येतो, मी चालेन, दमणार नाही. एवढ्याने त्याची पात्रता ठरेल काय? **ज्ञानमार्गाची पात्रता स्वतः ठरवावयाची नसून सद्गुरुने ठरवावयाची असते.** **'स्वमते शुद्ध कोण कधि झाला'** असे भरत म्हणाले आहेत.

(४) **'रामनाम अवलंबन एकू'** – रामनामाच्या आधाराने हे तिन्ही मार्ग सहज प्रयत्न न करता क्रमाक्रमाने साध्य होतात. 'आन उपाय न विशेष कलियुगि' (२२/८) च्या टीकेत या विषयी विस्तार केला आहे. तेथे पहावा. त्या वचनांचाच येथे उपसंहार केला आहे.

ल.ठे. हिंदी टीकाकार म्हणतात त्याप्रमाणे कलियुगात फक्त नाम हेच साधन आहे. इतर सर्व साधने साफ निरुपयोगी आहेत असेच जर तुळसीदासांस सांगावयाचे असते तर रामकथा, रामचरित श्रवण यांचा महिमा 'स्वस्वकर्मि निरती श्रुतिरीती' (३/१६/६)'श्रवणादिक नवभक्ति दृढावति' (३/१६/८) 'ज्ञान होई मोहभ्रम भंगहि' (२/९३/५) इत्यादि अर्थाची शतशः वचने कशाला लिहिते! रामचरितमानस न लिहिता 'नामचरितमानस'च लिहिले असते. पण मग २२/८ च्या टीकेत दिलेला दोहावलीतील दोहा १० निरर्थक ठरेल!

**संगति** – पुढील चौपाई व दोहा यात दाखवितील की नामाच्या पायावर कर्म उपासना, वैराग्य, योग, ज्ञान, विज्ञान व प्रेमभक्ति ही सात मजली भव्य दिव्य इमारत बांधून तीवर स्वान्तःसुखाचा कळस या कराल कलिकाळात सहज घडविता येतो. इतर युगांएवढे प्रयास पडत नाहीत

हिं.दो.- **कालनेमि कलि कपट निधानू । नाम सुमति समरथ हनुमानू ॥८॥**
**राम नाम नर केसरी कनक कसिपु कलिकाल ।**
**जापक जन प्रहलाद जिमि पालिहि दलि सुरसाल ॥२७॥**

म.दो.- **कालनेमि कलि कपट निधानू । नाम समर्थ सुमति हनुमानू ॥८॥**
**रामनाम नर-केसरी कनककशिपु कलिकाल ।**
**जापक ते प्रल्हादसे सुररिपु वधि जनपाल ॥२७॥**

**अर्थ** – कलियुग सर्वकपटांचा सागर (निधान, ठेवा) कालनेमी (राक्षस) आहे; पण रामनाम समर्थ व सुबुद्धिमंत हनुमान आहे ॥८॥ कलिकाल हा हिरण्य (कनक) कशिपु असून रामनाम नरकेसरी (नृसिंहावतार) आहे; रामनाम जपतत्पर असणारे (नामयोगी नामभक्त) हे प्रल्हाद आहेत; देवांच्या त्या शत्रूचा वध करून आपल्या दासांचे पालन करणारा तो (रामनाम) नृसिंह भगवान) आहे ॥२७॥

**टीका – चौ.८ –** (१) कालनेमि कलि कपटनिधानू – हनुमानू' हे रूपक फार गूढ व उद्‌बोधक आहे. वाचकांनी एकाग्रचित्ताने मननपूर्वक वाचावे.

**(क)** लक्ष्मणाला इंद्रजिताची शक्ति लागून तो मूर्च्छित पडला आहे. रघुवीराने हनुमंतास द्रोणगिरीवरील दिव्य औषधी आणण्यास पाठविला आहे. हे कळताच रावणाने कालनेमीकडे जाऊन त्यास हनुमन्ताच्या मार्गात विघ्न करण्यास सांगितले आहे. लं.कां.दो. ५६/१-६२/३ पर्यंतचा भाग वाचून दृष्टि पुढे ठेवावा म्हणजे या चौपाईतील पुढे स्पष्ट केलेले रूपक समजेल व पटेल.

**(ख)** राम ज्ञान; सीता शक्ति, जानकी भक्ति, अहंकार रावणाने चोरून नेली आहे. त्यामुळे प्रत्यगात्मा रघुनाथ विरहव्याकुळ झाले आहेत; शान्तिसीतेला मिळविण्यास अहंकार रावणाचा वध करावयाचा आहे. काम-इंद्रजिताचा वध केल्याशिवाय अहंकार रावणाचा वध करता येत नाही. काममेघनादाचा विनाश वैराग्यलक्ष्मणच करू शकतो. वैराग्य लक्ष्मणाला शमादि षट्‌कसंपत्तिरूपी भरताची व मुमुक्षुतारूपी शत्रुघ्नाची मदत नसल्यामुळे, लक्ष्मणवैराग्य काम-इंद्रजिताच्या वीरघातिनि शक्तीने मूर्च्छित पडला आहे. शमादि षट्‌कसंपत्ति व मुमुक्षारूपी दिव्य वनस्पती फार दूर व दुर्लभ आहेत. त्याना आणण्याचे काम करण्यास महावीर व बुद्धिमतांवरिष्ठ विवेकरूपी (सदसद्‌विवेक, नित्यनित्य विवेक, सारासार विवेक) हनुमानच तेवढा समर्थ आहे. पण अहंकार रावण काही स्वस्थ बसत नाही; तो सर्व कपटांचे भांडारगृह जो कलिरूपी कालनेमी राक्षस त्याला विघ्न करण्यास सांगतो. त्या औषधी वेळेवर मिळू नयेत व लक्ष्मण वैराग्य ठार मेल्यावर मग शमादि व मुमुक्षावनस्पति आणल्या तरी वैराग्यहीन ज्ञानाला अहंकार रावण व मोहकुंभकर्ण यांचा वध करून भक्तिजानकी मिळविणे अशक्य. कारण की काम-मेघनादाचा वध लक्ष्मण वैराग्याशिवाय कोणी करू शकणार नाही. विवेक हनुमंताचे सामर्थ्य कलि-कालनेमीला माहीत असल्याने तो अहंकार रावणास समजावतो की 'देखत तुम्हा, नगर जो जाळी । तत्पथ कोण अडवि कधिं काळीं' (इत्यादि ६/५६/३ - दो ५६ पहा) म्हणून उघडउघड विरोध करण्याचे धाडस कलि कालनेमीला करवत नाही. तो कपटी, दांभिक मुनि बनतो व विवेक रूपी हनुमंताला सांगतो कीं - 'मी तुला ज्ञान दीक्षा (उपदेश) देतो; तत्काळ सर्वप्रकारचे ज्ञान तुला होईल.' वैराग्यमूर्च्छित झाल्याने वैराग्याचा पाठिंबा नसलेल्या विवेकाला इकडे तहान-तृष्णा-लागली, व तिकडे वैराग्य पाठिंबा नसलेले ज्ञान रडत बसले. मोह सागर उल्लंघन करून सीताशान्तीची भेट होईपर्यंत दोन दिवसांत ज्याला तहान लागली नाही; 'रामकार्य केल्या विना कुठला मज विश्राम' ही ज्याची प्रतिज्ञा त्यावेळी सफल करता आली त्याच विवेक हनुमंताला रामकार्यच करीत असता विश्राम घेण्याची इच्छा व तृषा (तृष्णा) उत्पन्न झाली. याचे कारण त्यावेळी वैराग्य लक्ष्मण मूर्च्छित पडला नव्हता; जागृत होता. आता विवेक हनुमंताला तृष्णा उत्पन्न होताच सुमति-

सामर्थ्य कमी झाले. दुर्बळ झाले. आणि कली-दांभिक ज्ञान्याच्या कपटजालात सापडून सर्वस्व विनाश करून घेण्याच्या बेतात होता तोच रामनामाने '(स्मरुनि पवनसुत पावननामा । ठेवी करुनी निजवशरामा)' त्यास अशी परिस्थिती निर्माण केली की 'बेंड फुटे अंति न निर्वाहू' असे त्या कलिकालनेमीचे झाले. म्हणजेच विवेक हनुमंताला नामरूपी परमबुद्धिमान समर्थ हनुमंताचा आधार, आश्रय होता म्हणून या महासंकटातून विवेक हनुमान बचावला. मागील चौ. ५/६ ची टीका वाचून पहा व तेथे वर्णन केलेले कार्य नामाने कसे न कळत केले हे येथे ताडून पहा. नामप्रभावानेच तेथे त्या तलावात मकरी प्रगट झाली व विवेक हनुमन्तास झालेला भ्रम, लागलेली तृष्णा नष्ट झाली, जणू तिनेच गिळून टाकली; म्हणूनच तो कलिकालनेमीचा वध करू शकला. त्या नाममंत्रप्रभावानेच पुढील सर्व कार्ये साधली. शमदमादिमुमुक्षा औषधींचा पर्वतच न्यावा लागला. कारण औषधी ओळखता येईनात. वैराग्य-लक्ष्मण सजीव झाले म्हणून पुढे शान्तिसीता मिळाली. पण भक्तिजानकी मिळेपर्यंत व मिळाल्यावर सुद्धा नामाचा आधार पाहिजेच; हे आता आणखी एका रूपकाने पुढील दोह्यात दाखवून नामवंदन प्रकरणाचा उपसंहार होईल. या **चौपाईतील मा.पी. मधील टीका मुद्दाम वाचून पहाव्यात व पृ. ४६५ वरील रूपकपूर्ति पहावी;** रुचल्यास त्यातील तेथील अर्थ ग्रहण करावा.

दो.२७ – 'महाभक्त प्रल्हाद तो दैत्यकूळीं । जपे रामनामावळी नित्यकाळी ॥ पिता पाप रूपी तया देखवेना । जनीं **दैत्य तो नाम मूखें म्हणेना'** (म.श्लो. ९६)

**(१)** यावरून हे ठरले की प्रल्हाद नित्य सर्वकाळ तोंडाने रामराम म्हणत असे. सनकसनंदनादिकांच्या शापाने जे दितिचे पुत्र झाले ते जयविजय म्हणजेच हिरण्याक्ष हिरण्यकशिपु. हिरण्याक्षाचा वध वराहावतार घेऊन प्रभूंनी केला. भावाच्या वधानंतर सूड घेण्यासाठीं हिरण्यकशिपूने घोर तपश्चर्या करून दुर्लभ वर मिळविला. त्याची बायको कयाधू. तिचा पुत्र प्रल्हाद. तो स्वतः राम नामोच्चार करीत असे एवढेच नव्हे तर दैत्यांच्या मुलांना सुद्धा तेच करण्यास शिकवी. हे बापाला न आवडून त्याने प्रल्हादास ठार मारण्याचे शक्य तितके सर्व प्रयत्न केले; पण तो मरेना; तेव्हा ते कार्य स्वतः करण्याचे ठरवून प्रल्हादास दरबारात बोलावला. पिता त्यास म्हणाला की तुला मी आता ठार मारणार आहे, आता तुझा देव तुझे कसे रक्षण करतो व कोठून येतो ते पाहूया. कुठे आहे तुझा देव?' 'सर्वत्र आहे, या सभेतील अणुरेणूत आहे.' 'या दगडाच्या खांबात सुद्धा आहे?' 'आहे म्हणजे आहेच.' यात शंका कशाला! असे म्हणताच बाप प्रल्हादाला मारण्यास धावला; तोच त्या पाषाणाच्या खांबातून भगवान नरहरि-नृसिंह प्रगट झाले व आपल्या नखांनी हिरण्यकशिपूला मारला व त्याच्या सिंहासनावर जाऊन बसले. सर्व देवमुनींनी स्तुति केली.

**(२)** प्रल्हादाने नामस्मरण, नामोच्चार करताना दिवसरात्र घरात बाहेर वगैरे काही पाहिले नाही; शास्त्र विद्या वगैरे काही शिकला नाही; प्रस्थान त्रयी, अद्वैतसिद्धि,

पंचदशी वगैरे सारख्या वेदांत शास्त्र ग्रंथांचे श्रवण मनन निदिध्यासन केले नाही. तरी केवळ नामाने इतके सक्रीय ज्ञान झाले की प्रत्यक्ष मरण पुढे असता, संरक्षणाचे काही साधन नसता अणुरेणूत तुमच्यात माझ्यात, खांबात परमात्मा आहे हे ज्ञान निर्भयपणे टिकले. 'द्वितीयाद्वै भयं भवति' (श्रुति) 'भयं द्वितीयाभिनिवेशः स्यात्' (भागवत) द्वैत आहे तोपर्यंत निर्भयता नाही; हा अद्वैत-सिद्धान्त श्रुतिसार आहे. त्या अर्थी **प्रल्हादाच्या ठिकाणी अद्वैत पूर्ण दृढ बाणले होते हे ठरले. हे केवळ नामप्रभावानेच झाले.** प्रल्हादास राज्यहि मिळाले. भक्तशिरोमणि झाला हे पूर्वी (२६/४) सांगितले आहे. त्याचाच उपसंहार येथे केला.

**(क)** जे कोणी एकनिष्ठेने रात्रंदिवस मुखाने नामजप करतील त्यांना कलिकाल रूपी हिरण्यकशिपू काहीही इजा करू शकत नाही; रामनामरूपी नरहरि त्याचे सर्वत्र रक्षण करतो. सर्व विद्या, ज्ञान, वैराग्य इत्यादि सर्व काही देतो. असेच रामनामाने हनुमंताचे रक्षण कालनेमी कलि कपटनिधानापासून केले.

**(३) नरकेसरी** – रामलक्ष्मण आहेत. 'अतुलबली नरकेसरि उभयहि' (३/३७/१) प्रल्हादाच्या निमित्ताने जसा हिरण्यकशिपूचा वध झाला तसा विभीषणाच्या निमित्ताने रावणाचा वध व्हावयाचा आहे; व मगच शान्ति सीता व जानकी भक्ति हिची प्राप्ति होणार. पण या कार्यात विवेक हनुमान सर्वांना आधार आहे. तथापि त्याला सुद्धा नामाचाच आधार पाहिजे तरच कलिकालरूपी रावण, त्याची 'कपटी माया मोहकुंभकर्ण, काम इंद्रजीत या सर्वांचा (कलिराजा व त्याचे साह्यकर्ते यांचा) विनाश ज्ञानवैराग्य रूपी रामलक्ष्मणाना करता येईल, भक्तिरूपी जानकीची प्राप्ति होईल व जीव परमानंदात मग्न होऊन अयोध्येच्या राज्याची सुद्धा पर्वा न करता स्वेच्छेने संचार करीत राहील व त्याची कीर्ति सुरनरमुनि गातील. याप्रमाणे येथे 'प्रेममग्न फिरती स्वेच्छेने । स्वप्निहि शोक न नामकृपेने' याचा (३५/८) उपसंहार व नाम रामाहून मोठे' याचा उपसंहार केला.

**ल.ठे.** – १९/१ पासुन २७ अखेर नऊ दोह्यांनी नामाचे निरूपण केले. नऊ हा अंक आदि अंति एकरूप निर्विकार असतो, एकरूप असतो. त्यास कितीनीही गुणा व त्या अंकांची बेरीज करा शेवटी ९ हा अंकच राहतो. **'श्रीतुलसी-संकेत अद्भुतहि'** या प्रस्तावनेतील प्रकरणात **'नऊ (९) या अंकाचे महत्व व उपयोग'** हे प्रकरण वाचून पहावे.

**संगति** – कलियुगात भावनाच शुद्ध नाही असे तुम्ही म्हणता तर मग नामाचा तरी काय उपयोग? या शंकेचे उत्तर पुढील एका चौपाईत देऊन नामवंदन प्रकरण समाप्त होईल.

हिं .- **भायँ कुभायँ अनख आलसहूँ । नाम जपत मंगल दिसि दसहूँ ॥१॥**

म .- **भाव-कुभावि चिडुनि अळसाने । दशदिशि मंगल नाम-जपाने ॥१॥**

**अर्थ** – सद्भावनेने, दुर्भावनेने, चिडून (रागाने-अनख) किंवा आळसाने, कसेही नामजपा. दशदिशांस मंगल प्राप्ति होणारच ॥१॥

**टीका – (१) भाव** – भावना, सद्भावना. विशिष्ट नात्याने असलेला प्रेमाचा संबंध, जसे इष्ट देवतेशी कोणते तरी नाते जोडून संबंध ठेवला म्हणजे त्या नात्याच्या प्रेमभावनेप्रमाणे भक्ति-आराधना करण्याची सवय लागते. उदा. श्रीरामास माता पिता बंधू, मित्र पुत्र स्वामी, गुरु वगैरे मानणे. श्रीगुलाबराव महाराज आपणास ज्ञानेश कन्यका मानून श्रीकृष्णास पति मानीत असत. गळ्यात मंगळसूत्र असे, कुंकू लावीत; क्वचित लुगडे, चोळी सुद्धा धारण करीत असत. अर्जुन सख्य भाव, हनुमान दास्यभाव मानीत हा लेखक स्वतःस तुलसीतनय समजतो; तुलसीमानसास आपली भगिनी मानतो व तिचा विवाह रामप्रतापार्काशी झाला आहे, अशा रीतीने साधकाने कोणते तरी नाते नामाशी जोडून त्या भावनेने, प्रेमाने उच्चार करणे याचे नाव भावाने जप करणे, 'तावद्रागादयः स्तेनाः तावत् कारागृहं गृहम्! तावन्मोहोऽङ्घ्रिनिगडो यावत् कृष्ण! न ते जन्मः' (भाग १०/१४/३६) यावरील मराठी टीका ब्रह्मस्तुतीत पहावी (प्रज्ञानानंदकृत हस्तलिखित).

**(२) कुभावँ** – दुर्भावनेने. भय, द्वेष, वैर, उपहास, तिरस्कार, अपमान इत्यादि भावनेने युक्त होऊन नामोच्चार करणे. उदा. बालकांडात कपटीमुनि - यास राज्यवैभव मिळाले. कालनेमी कपटबुद्धीने म्हणाला की रामाचा जय होईल वगैरे तर हनुमंताच्या हातून मरण येऊन मरताना मुखाने राम राम म्हणाला. रावणाच्या तोडलेल्या मुखानी 'कुठे राम राणि मारु पुकारुनि' वगैरे वैराने म्हटले तर रामाच्या हातून मरण येऊन मुक्ति मिळाली. खरदूषणादि एकमेकांस भ्रमाने राम समजून 'राम राम म्हणतां मरति पावति पद निर्वाण' (३/२)॥ चिडून, रागाने, वैरभावनेने उच्चार केला.

**(३) आळसाने** – कुंभकर्ण भावाला रावणाला समजावीत असता रावणावरील व बिभीषणावरील प्रेमाने राम शब्द बोलताना निघाले. तसेच झोपेतून उठल्यावर आळेपिळे देत एक क्षणभर राम राम मुखांतून आले तरी ते कल्याणच करणार. जांभई देताना, दुसऱ्यास वेडावण्यासाठी; नामाची थट्टा करण्यासाठी, ठेच लागली असता वगैरे बुद्धिपुरःसर असो की न जाणता असो नामोच्चार कल्याण करणारच.

**(४) यात कलियुग कसे आड येत नाही?** हे नामोच्चार कर्म क्रियात्मक, भावात्मक किंवा उभयात्मक नसून वस्तुस्वभावात्मक आहे. अग्नीला कोणत्याही भावनेने कोणी केव्हाही स्पर्श करो तो भाजणार, जाळणारच. 'न कळता पद अग्निवरी पडे । न करि दाह असे कधि ना घडे । अजितनाम वदो भलत्या मिसे, सकल पातक भस्म करीतसे' (मोरोपंत) परीस लोखंडाच्या पत्र्यावर ठेऊन पूजा करा किंवा त्याला फोडण्यासाठी त्याच्यावर लोखंडाचा घण मारा लोखंडाचे सोने होणारच. हा त्याचा स्वभाव धर्मआहे. तसाच रामनामाचा स्वभावधर्म आहे पापविनाश

करून कल्याण करणे; यामुळे कलि रामनामाला तेवढा भितो. 'श्रद्धया हेलया नाम वदंति मनुजाभुवि' तेषां नास्ति भयं पार्थ रामनामप्रसादत:' 'तदेव पुण्यं परमं पवित्रं गोविन्दगेहे गमनाय पत्रम् (नौका) । तदेव लोके सुकृतैकपात्रं यदुच्यते केशव नाममात्रम्' 'सांकेत्यं पारिहास्यं वा स्तोत्रं हेलनमेव वा वैकुंठनामग्रहणं अशेषाघहरं विदु:) (भाग ६/२/१४) '**नामचिन्तामणि: कृष्ण:** चैतन्यरसविग्रह: । नित्य: शुद्धो मुक्तपूर्णोऽ**भिन्नत्वात् नामनामिनो:**' (वि.पु.) अशी अवतरणे किती दिली तरी संपणार नाहीत. मूळलेखनात आणखी एक पृष्ठ भरले आहे. प्रत्येक पुराणात आहेत.-

येथे नामवंदन प्रकरण समाप्त झाले. श्री तुलसीदासांनी कोणाच्याही वंदनात इतका विस्तार केला नाही. त्यांचे नामप्रेम अपार होते. विनय पत्रिकेतील पद ४६ चा अनुवाद यथामति खाली देऊन नामवंदन टीका समाप्त करणे चांगले. या पदावरून श्री गोस्वामींच्या नामप्रेमाची थोडीशी कल्पना येईल.

## विनय पत्रिका पद ४६ (राग - रामकली)

सदा :**रामजप रामजप, रामजप रामजप, रामजप मूढमन वारवारं ।।**
**सकल सौभाग्य सुख-खाण मनिं जाण शठ, मान विश्वास वद वेदसारं ।।१।।**
**कोशलेंद्र नव - नीलकंजाभतनु - मदनरिपु - कंज - हृदिं चंचरीकं ।।**
**जानकी-रमण-सुख-भवन भुवनैक प्रभु समर-भंजन परं कारुणीकं ।।२।।**
**दनुजवनधूम - ध्वज, पीन आजानुभुज, दंड - कोदंडवर चंडबाणं ।।**
**अरुण कर चरण मुख नयन राजीव गुण-अयन बहु मदन शोभानिधानं ।।३।।**
**वासनावृंद-कैरव-दिवाकर काम - क्रोध-मद-कंज-कानन तुषारं ।।**
**लोभ अति मत्त-नागेन्द्र पंचाननं भक्तहित हरण संसार-भारं ।।४।।**
**केशवं क्लेशहं केशे वंदित-पद द्वन्द्व-मंदाकिनी-मूल-भूतं ।**
**सर्वदानंद संदोह मोहापदं घोरसंसार - पाथोधि पोतं ।।५।।**
**शोक-संदेह-पाथोद-पटलानिलं पापपर्वत कठिण कुलिशरूपं ।।**
**संतजनकामधुग् धेनु विश्राम - प्रद नाम कलि-कलुष भंजन अनुपं ।।६।।**
**धर्म-कल्पद्रुमाराम हरिधाम-पथि संबलं मूलमिदमेव एकं ।**
**भक्ति-वैराग्य विज्ञान शम दान दम नाम-आधीन साधन अनेकं ।।७।।**
**तेन तप्तं हुतं दत्तमेवाखिलं तेन सर्व कृतं कर्मजालं ।**
**येन श्री रामनामामृतं पान कृत-मनिश-मनवद्यमलोक्य कालं ।।८।।**
**स्वपच खस भिल्ल यवनादि हरिलोक गत नामबल विपुल मति मल न परसी ।।**
**त्यागी सब आस संत्रास भवपाश-असि निशित हरिनाम जप दास तुलसी ।।९।।**

सूचना : खाली - अर्धरेघ दिलेले अक्षर दीर्घ वाचावे व असे टिंब दिलेले अक्षर व्यंजनासारखे वाचावे. जोडाक्षरामागील अक्षराखाली असे चिन्ह असेल तेथे ते अक्षर दीर्घ वाचू नये.

(क) १. केश = क+ईश=ब्रह्माशिव, २. अनुपम, ३. पाथेय, प्रवासातील सामग्री, ४. परसी-स्पर्शली. कवितावली उत्तर काण्ड ६५, १७८ व विनय पत्रिका ६८ १२६ व २८२ ही पदें समग्र पहावीत.

**येथे श्रीरामनाम-वंदन प्रकरणाची मानस गूढार्थ चंद्रिका टीका समाप्त झाली.**
पुढील दोन चौपायात नाम व नामी यातील अभेद ध्वनित करून आत्मकार्पण्य व नामगुणवर्णन प्रकरणाचा प्रारंभ होईल.

श्रीराम - नामार्पितमस्तु.

# आत्म कार्पण्य व रामगुण वर्णन प्रकरण.

हिं.- सुमिरि सो नाम राम-गुन गाथा । करउँ नाइ रघुनाथहि माथा ॥२॥
मोरि सुधारिहि सो सबभाँति । जासु कृपा नहि कृपाँ अघाती ॥३॥
म.- स्मरुनि नाम ते राम-गुण कथा । वदें नमुनि रघुनाथा माथा ॥२॥
सर्व सुधारिल तो मम दोषू । करत कृपा तत्कृपे न तोषू ॥३॥

**अर्थ** — त्या नामाचे स्मरण करून व रघुनाथाला मस्तक नमवून (पायांवर डोके ठेऊन) मी रामगुणकथा करतो ॥२॥ माझे सर्व दोष रघुनाथ सुधारील. (तो माझे सर्व दोष सुधारील) कारण त्याच्या कृपेला कृपा करण्यात कधी तृप्ति वाटत नाही (त्याची नामाची कृपा झाली की, कृपा करण्यात रामचंद्राला कधी तृप्ति वाटत नाही.) ॥३॥ कंसांत दिलेला अर्थ या अल्प मतीला अधिक ग्राह्य वाटतो पण तो तितका प्रगट नसल्याने कंसांत दिला आहे.

**टीका — चौ - २ (१) स्मरुनि नाम ते** - ज्याला १९/१ मध्ये वंदन केले व ज्या नामाचे निरूपण २८/१ पर्यंत केले ते रघुवराचे नाम **राम.**

(क) आधी नामस्मरण करून मग रघुनाथाला वंदन करण्याने नामाचाच मोठेपण दाखविला. कारण हे की स्वतःची 'मन मति रंक मनोरथ राया' 'नुमजे अंगा एक उपाया' अशी पात्रता आहे; आणि 'वंचक, मिरविति रामभक्त वर । कामकोप कनकांचे किंकर ॥ अशांमध्ये जगिं गणा प्रथम मज' (१/१२/१-४ पहा) अशी माझी दशा आहे, पण 'स्वप्निहि शोक न नामकृपेने' (२५/८) असे नामाचे सामर्थ्य असल्याने त्याचे स्मरण आधीं केले. 'चतुर न म्हणवित मी कवि नाही । गात यथामति रामगुणां ही' (१२/९) 'त्याच बळें रघुपति गुणगाथा । कथितो नमुनि रामपदिं माथा ॥ (१३/९) येथे 'रामगुणकथा वदें नमुनि रघुनाथा माथा' म्हटले व राम-रघुपति-रघुनाथ हे दाखविले. १३/९ मध्ये त्याचबळे याचा संबंध रघुनाथाकडे आहे तर येथे नामस्वभावाकडे आहे हे दोन्ही चौपायांतील बाकीच्या साम्याने दाखविले. (नाइ-नमुनि) अधिकार नसता का लिहितो याचे कारण पुढील चौपाईत सांगतात.

**चौ - ३ (१) ल. टे.** या चौपाईची रचना अशी कौशल्याने केली आहे की मागील समाप्त झालेल्या प्रकरणाचा व 'स्मरुनि नाम ते' याचा संदर्भ लक्षात घेतला म्हणजे ही चौपाई नामपर लागते, व पुढील संदर्भ व 'रघुनाथा माथा नमुनि' हा निकट संबंध घेतला म्हणजे रामपर लागते. यात हेतु नाम आणि नामी यात पुन्हा अभेद प्रस्थापित करणे हा आहे. व दोन प्रकरणांची सांधे जुळणी केली आहे. प्रथम नामपर लावूं -

**(२) सर्व सुधारिल तो मम दोषू** - आठव्या दोह्यापासून तेराव्या दोह्यापर्यंत कलिकाल कराल जनित व इतर जे दोष वर्णन केले ते सर्व नाम सुधारील, म्हणजेच तो कलिदोष नाम काढून टाकील व आवश्यक सद्गुण देईल. 'नाम कोटि खल-कुमति सुधारी' (२४/३) 'नामसकल कलि कलुषनिकंदन॥' (२४/८) 'जनमन अमित नाम करि पावन' (२४/७) मनमति कंगाल आहेत त्यांना नाम पावन व श्रीमंत करील. अंतःकरणात कपट दंभ काम कोपादि पुष्कळ मळ आहे. (१२/१-४ पहा), पण तो सर्व निःशेष करण्याचे सामर्थ्य नामात आहे हे वरील अवतरणांनी सिद्ध झाले आहे. जसे भगवान गजेन्द्राचे रक्षण करण्यास धावले, तसे नामाचे स्मरण करताच ते अमित गतीने, वेगाने आपला प्रभाव पाडण्यास धावत येईल. आणि नामाधीन राम असल्याने त्यास आणून सर्वसुधारणा करील. 'राम! अशी हाक भगवंतास आली तरी प्रथम राम या नामाचाच उच्चार होत नाही का? 'नामाधीन रूप परि राही' पूर्वीच (२१/४) सांगितले आहे. नामनामी यांचा प्रभु-अनुगामी असा संबंध' आहे. (१टी.प)

**करत कृपा तत्कृपे न तोषू** - एकदा नामाने कृपा केली की रामचंद्रांना इतकी कृपा करावी वाटते की किती कृपा केली तरि अपुरीच वाटते; त्यांचे समाधान होत नाही. हा अर्थ मागील प्रकरणात अविरोधीच नव्हे तर सुव्यवस्थित लागतो; व पुढील संदर्भाशीहि समन्वय होतो.

**(४) आता रामपर अर्थास आधार** - 'करिति सकल हे भक्तांलागी । प्रणति कृपाल परम अनुरागी'॥ कृपा सुममता दासांवरती । करुनि कृपा जे क्रोध न करती ॥ गतप्रदायक दीनदयालहि । सरल, सबल साहिब रघुराज हि ॥ हे जाणुनि बुध हरियश वर्णन । करिति गिरा निज सुफल सुपावन ॥ त्याच बळे रघुपति गुणगाथा । कथितो नमुनि रामपदिं माथा ॥' (१३/५-९ टी.प.) चालू दोह्याच्या चौथ्या चौपाईपासूनच्या पंक्ती वरील अवतरणाशी समानार्थी आहेत.

(क) तथापि नुकत्याच समाप्त झालेल्या प्रकरणाशी सुसंगत अर्थ सोडून मागे दूर जाणे- मागील प्रकरणातील आधार घेणे दूरान्वय करणे ठरते. शिवाय पहिला अर्थ घेतल्याने आठव्या दोह्यापासून जो सुसंगत अखंडित प्रवाह चालू आहे तो खंडित होत नाही. नामकृपेनेच रामकृपा होते हा मागील प्रकरणातील सिद्धांतच आता चरितार्थ करून दाखवीत आहेत, व याने दोन कृपा शब्दहि व्यवस्थित लागतात; म्हणून टीकेत प्रथम दिलेला अर्थच अधिक ग्राह्य आहे. प्रल्हादाच्या नामप्रभावानेच नरहरि प्रगटले, त्यांनी त्याचे रक्षण केले व त्याने त्यांची स्तुति केली. तसेच येथे घडत आहे. अर्थ देताना सूचना दिलीच आहे. येथे अध्यारोपापवाद प्रक्रिया वापरली.

संगति – ज्यांचे गुणगान करावयाचे ते स्वामी व गुणगान करणारा सेवक यातील अंतर व स्वामींच्या स्वभावाचे तुलनात्मक वर्णन आपली असमर्थता, अपात्रता पुन्हा सांगतात.

हिं.- राम सुस्वामि कुसेवक मोसो । निज दिसि देखि दयानिधि पोसो ॥४॥
लोकहुँ बेद सुसाहिब रीती । बिनय सुनत पहिचानत प्रीती ॥५॥
म.- सुधनी राम कुसेवक मी तों । राखि दयानिधि निजशीलें तो ॥४॥
लोकीं वेदिं सुसाहिब रीती । परिसुनि विनति जाणती प्रीती ॥५॥

अर्थ – मी तर कुसेवक आहे पण राम सुस्वामी (चांगले, उत्तम धनी) आहेत; व ते दयानिधि आहेत म्हणून त्यांनी आपल्या स्वतःच्या शीलाने-शीलामुळे- माझे रक्षण केले ॥४॥

वेदांमध्ये व लोकांत सुद्धा सुस्वामीची (सु. साहिब) ही रीत (प्रसिद्ध) आहे की (सेवकाची) विनंती-प्रार्थना (विनय) ऐकून ते प्रीती जाणतात-ओळखतात.

टीका. चौ - ४ - (१) सुधनी राम कुसेवक मी - माझे धनी-स्वामी राम उत्तम, बलवान व सुंदर आहेत; मी सेवक मात्र वाईट पापी हलका आहे. 'बलवत् सुष्ठु किमुत सु अति, अतीवच निर्भरे' (अमरे) हे 'सु' चे अर्थ आहेत. पापी, कुत्सित व ईषत् हे कु शब्दाचे अर्थ आहेत. अति-अतिशय=श्रेष्ठ, सुष्ठु-सुंदर व बलवान हे तीन अर्थ रामाकडे लागतात व त्या विरुद्ध तीन अर्थ तुलसीदास आपल्याकडे लावतात. हिंदीतील सुस्वामी शब्दात 'सु' ऱ्हस्व वाचावयाचे आहेत. सुस्वामी व कुसेवक असा संबंध जडला आहे हे दाखविले. भाव हा की 'कोठे रघुपति-चरित अपारहि । मम मति कुठे निरत संसारहि (१२/१०) 'मन मति रंक मनोरथ राया' (८/६/) याने हलकेपणा दाखविला आहे. १२/१-४ या चौपायात आपला पापीपणा दाखविला आहे. असे असून काव्य करण्याची धृष्टता करतो आहे हा कुत्सित-वाईटपणा दाखविला.

(२) असे महदंतर असले तरी ज्याला एकदा सेवक मानला त्याच्या दोषांकडे न बघता प्रभु आपल्या शीलाकडे बघतात. 'कृपा सुममता दासांवरती । करुनि कृपा जे क्रोध न करती । गतप्रदायक दीन दयालहि । सरल सबल साहिब रघुराज हि' (१३/६-७ टी.प.) तेथे कृपा करतील असा भरवसा वाटत होता त्याप्रमाणे आता घडले हे दाखविले. ते दयानिधि-दयासागर असल्याने त्यांनी आपल्या शीलाकडे पाहून माझे रक्षण, पोषण केले; माझ्या दोषांकडे पाहिले नाही.

(क) ज्याला सेवक मानला त्याचे पालन पोषण रक्षण करणे हे दयालु सुस्वामींचे शील असते; ते त्यांनी पाळले, म्हणजे माझ्यात जी काही न्यूनता होती ती त्यांनी पूर्ण केली हा अर्थ गर्भित आहे. 'क्षमुनि दोष अघ आदरतील स्वताकडे बघतील' (२/२३३/-) असे भरताने म्हटले आहे.

चौ - ५. येथे सुचविले की चांगले स्वामी सेवकाच्या गुणदोषांकडे बघत नाहीत; त्याचे आपल्यावर प्रेम आहे की नाही इतकेच ते पाहतात. ते त्यांना सेवकाने केलेल्या विनंती प्रार्थनानी कळते. खरे प्रेम, दिखाऊ प्रेम, स्वार्थी प्रेम इत्यादि ते

ओळखतात. 'प्रेम चि केवळ रामा प्यारे । जाणणार घ्या जाणुनि सारे' (२/१३७/१) इतर सुस्वामी प्रेम कसे जाणतात हे प्रथम पुढील चार चौपायात सांगतात.

हिं.- गनी गरीब ग्राम नर नागर । पंडित मूढ मलीन उजागर ॥६॥
सुकबि कुकबि निज मति अनुहारी । नृपहि सराहत सब नर नारी ॥७॥
साधु सुजान सुसील नृपाला । ईस अंस भव परम कृपाला ॥८॥
सुनि सनमानहिं सबहि सुबानी । भनिति भगति नति गति पहिचानी ॥९॥

म.- निर्धन धनी ग्राम नर नागर । पंडित मूढ मलीन सुभास्वर ॥६॥
सुकवि कुकवि निज मति-अनुसारें । स्तविति नृपा नारी नर सारे ॥७॥
साधु सुजाण सुशीलहि नृपती । ईश-अंश-भव कृपाकर अती ॥८॥
श्रवुनि सुवचिं सकलां सन्मानी । जाणुनि भक्ती नति-गति-वाणी ॥९॥

अर्थ :— गरीब-श्रीमंत, गांवठळ-चतुर, पंडित-मूर्ख, मलीन-अति तेजस्वी, चांगले कवि, वाईट कवि, स्त्रिया व पुरुष इत्यादि सर्वच आपापल्या बुद्धीप्रमाणे राजाची स्तुती करतात ॥६॥ साधु, सुजाण व सुशील राजा ईश्वरांश-संभूत असल्याने अति कृपालु असतो ॥८॥ त्यामुळे तो सर्वांनी केलेली स्तुति ऐकतो आणि त्यांच्या नतीने (नम्रतेने) गतीने व भाषणाने त्यांची (आपल्यातील) भक्ती (प्रीति) जाणतो व चांगल्या शब्दांनी सर्वांचाच सन्मान करतो ॥९॥

टीका. चौ. ६ - ७ (१) राजाच्या प्रजाजनांत किती निरनिराळ्या स्वभावाची व भिन्न परिस्थितीतील माणसे असतात हे दाखविण्यासाठी या दोन चौपायात पाच जोड्यांचा उल्लेख केला गेला आहे. अशी द्वंद्वे प्रजेत आणखी पुष्कळ असतात; सशक्त-अशक्त, आळशी-उद्योगी, रोगी-निरोगी, उच्च-नीच इत्यादि.

(क) ही पाचच उदाहरणे देण्यात हेतु हा आहे की तुलसीदासांना आपल्या ठिकाणी असलेल्या दोषांचे निदर्शन करून आपण कुसेवक कसे आहोत व रघुनायक किती दयाळू व श्रेष्ठ स्वामी आहेत ते कशाने प्रसन्न होतात हे दाखवून आपणावर कृपा का केली हे शेवटी दाखवावयाचे आहे. पण हे लक्षात न आल्याने टीकाकारांची दिशाभूल होऊन त्यास भयाण शब्दारण्यात भ्रमण करावे लागले आहे. मा.पी. वाचून पाहणे.

(ख) असे होण्याचे कारण या चार ओळीत तीन पंचके आहेत. तिसरे पंचक पूर्ण नाही ते मागील चौपाईतील प्रीति शब्दाची भर घालून पुरे केले गेले. या दोन चौपायात एक पंचक आहे. राजाचे पाच गुण वर्णिले आहेत साधु, सुजाण, सुशील, ईशांशभव व कृपालु. नवव्या चौपाईत भाषा, भक्ति, नति, गति हे चार शब्द आहेत; प्रीति पाचवा घेऊन हे पंचक पुरे केले गेले. मग पहिल्या पंचकाची सांगड या तिसऱ्या पंचकाशी घालून कोणता गुण आपल्या कोणत्या गुणाने ओळखतो हे ठरविण्याचा प्रयत्न केला गेला! 'ज्ञान नयनिं निरखता मानि मन' (१/३७/१) हे तुलसी वचन अगदीं यथार्थ आहे.

(ग) मानस पीयूष प्रथम वाचल्याने या बुद्धीला सुद्धा निश्चितार्थ सापडेना पण 'नाम समर्थ सुमति हनमानू' सोडविण्यास धायला व त्यामुळे आरंभी लिहिलेला अर्थ लिहिता आला. (चौ. ८ टी-१ (क) पहा).

(२) अशा सर्वगुणसंपन्न परमकृपालु राजाची कृपा आपल्यावर असली तर आपले जीवन सुखाचे होईल, आपल्या आशा आकांक्षा पुऱ्या होतील, इत्यादि विविध हेतूनी सर्वच लोक राजाची स्तुती करून त्यास प्रसन्न करण्याचा प्रयत्न करीत असतात. अशा अलौकिक नरोत्तमाचे वर्णन कितीहि केले तरी ते थोडेच हे सर्वांनाच माहीत असते; तथापि सर्व लोक स्तुती करण्याचा प्रयत्न करतातच. आपली पात्रता नाही हे जाणून सुद्धा स्तुती केल्यावाचून राहवत नाही. 'परि वदल्याविण कोणि न राहति' (दो-१२ व १३/१ पासून पुढे पहा.)

(क) स्तुती करण्यात प्रत्येकासच भाषेचा उपयोग, वाणीचा उपयोग, करावा लागणारच म्हणून भनिति-भाषा हा शब्द सुकवि किंवा कुकवि यांच्याकडेच घेऊन कसे चालेल? प्रत्येकाचे प्रेम किती आहे इतकेच राजाला पहावयाचे असते हा सिद्धांत मागल्या (पाचव्या) चौपाईत आधीच सांगितला आहे. श्रीमंत, गरीब, गांवढळ, नागर हा विचार राजा करीत नाही. मनुष्याचे इतर गुण अवगुण कसे का असेनात तो राजनिष्ठ आहे की नाही हे राजा प्रथम पाहतो. राजनिष्ठ असला म्हणजे राजा प्रसन्न होतो. नुसत्या भाषेवरून अंतःकरणातील प्रेम ओळखता येणार नाही. अंतरातील भाव कसे ओळखले जातात हे पुढील दोन चौपायात पाहू.

(३) निर्धन मनुष्याला श्रीमंतांचा असा अनुभव आलेला असतो की त्यांच्यापुढे जाण्यास त्यास मरणापेक्षा अधिक भीति वाटते. त्यामुळे तो राजाची स्तुती करण्यास भीत असतो, 'धन्योऽन्धस्त्वं धनमदवतां नेक्षसे यन्मुखानि' 'हे अंधा! तू धन्य आहेस. कारण तुला धनमदोन्मत्त लोकांचे तोंड पहावे लागत नाही!' पण राजा सुशील साधु, कृपाळु असल्याने व गरीबांचा स्वभाव त्यास माहीत असल्याने (सुजाण आहे म्हणून) याने आपला अपमान केला असे त्यास वाटत नाही. (२९/२-३ पहा). **तुलसीदास गरीब आहेत व फार सभय झाले आहेत.**

(क) श्रीमंताला भीति वाटत असते की राजा आपले धन घेईल की काय! असे हे दोघे सभीत असतात. 'शरण सभीत असे जर आला । प्राणांसम रक्षीन तयाला' (५/४४१/८) हे भगवंताचे ब्रीद वाक्य आहे व उत्तमराजा 'ना बिष्णुः पृथिवीपतिः' असतो; व धर्मशील असल्याने शरणागतास अभय देणे हा त्याचा धर्म तो पालन करतो. तो त्यांच्या भीतीकडे बघतो. गरीब श्रीमंत भेद बघत नाही.

(४) **ग्राम-नर नागर** : खेडवळ लोकांची भाषा सभ्यतामय नसते व मधुर फार क्वचितच असते असे म्हटले तरी चालेल. उद्धटपणा, अरेतुरे, नम्रतेचा भाषेत अभाव वगैरे अनेक दोष असले तरी खेडवळ माणसे नागरी-सुशिक्षित-लोकांपेक्षा सरळ व प्रेमळ असतात. शिवी हें त्यांचे पालुपद असते. त्यांना वाटते राजाने आमच्याकडे पहावे, दोन शब्द बोलावे म्हणजे आम्ही धन्य होऊ.

(क) नागर- चतुर सुशिक्षित लोक आपल्या सभ्यतेने, बाह्य नम्रतेने, मधुर भाषणाने वगैरे प्रेम दाखविण्याचा प्रयत्न करतात. राजा या दोघांच्या बाह्य दोषगुणांकडे बघत नाही, प्रेम ओळखतो - **तुलसीदास आपणास असभ्य, उद्धट, खेडवळ मानतात.** 'खोडि धिटाई अति मम उघडी' 'ग्राम्य गिरा' 'सज्जन मम उद्धटता क्षमतिल'

(५) **पंडित-मूढ** - पंडित - विद्वान, शास्त्रांदि विद्या पारंगत हा सामान्य अर्थच येथे आहे. मूढाच्या उलट तो पंडित. पंडितास वाटते राजाने आपल्या पांडित्याचे चीज करावे, पदवी, मानपत्र, महावस्त्र वगैरे द्यावे. मूर्खास वाटते की राजा आपलाच आहे त्याच्याकडे जाण्यास परवानगी कशाला? विचारल्याशिवायच बोलू लागतो; नम्रता नमस्कार करणे सुद्धा माहीत नसते; शुद्ध स्पष्ट बोलता पण येत नाही, बावळटपणा करतो. राजा दोघांतील या भेदाकडे किंवा त्यांच्या अपेक्षांकडे पहात नाही; प्रेम पाहतो; व दोघांच्याहि इच्छा पूर्ण करतो. **श्री गोस्वामी आपणास मूढ समजतात.** 'मज सम जगिं कुणि मंद' (२८/११) असे पुढे म्हणणारच आहेत.

(६) **मलीन सुभास्वर** - मलीन - पापी, अमंगळ, घाणेरडा, सुभास्वर पुण्यवान पवित्र, निर्मल, तेजस्वी, धर्मशील. मलीनाला राजाची भीति वाटते, पुण्यवंताला अभिमान असतो. दोघांनाही वाटते की राजाने आपणास मान द्यावा. पाप्याला वाटते की राजाने मोठेपणा दिला की आपण पापी नाही असे जगात दिसेल व ठरेल. पुण्यवंताला वाटेल की मी खराच पुण्यवान आहे. त्याचा अभिमान वाढेल. पुण्यवान असून प्रेम नसेल व पापी असून प्रेम असेल तर त्या पाप्यावर राजा प्रसन्न होईल. धर्मशील, साधु, कृपालु असल्यामुळे अपमान कोणाचाच करणार नाही. **तुलसीदास आपल्याला मलीन, अमंगळ समजतात. 'मज सम जगिं कुणि ... अमंगल'** (२८/ ११). ऐकुनि नर्कहि नाका मुरडी'(२९/१).

(७) **सुकवि** - यांना यश, सन्मान व धन यांची अपेक्षा राजाकडून असते. कुकवींना वाटते की आपले काव्य राजाने नुसते शांतपणे ऐकले तरी पुरे. यातच ते धन्यता मानतात; पण म्हणून दाखविण्यास भितात. राजाला सुकाव्य कुकाव्य पहावयाचे नसते; प्रेम पाहतो. ते ज्यांच्यात असेल त्यांच्या आकांक्षा पुऱ्या करतो, नसले तरी अपमान, शिक्षा करीत नाही. दोघांचाहि सन्मान करतो. **तुलसीदास आपल्याला कुकवि समजत आहेत.** 'कवि न, वचनि' मी नसे प्रवीणू । सकल कला सब विद्याहीनू'' **काव्य-विवेक न एकहि माते । सत्य लिही नव कागदिं हाते** (९/८११ पहा).

ल.ठे. याप्रमाणे तुलसीदास स्वतःस गरीब, असभ्य, मूर्ख, पापी अमंगळ, व कुकवि समजतात. या पाचांच्याहि ठिकाणच्या हीनतेने, दोषांनी, व अवगुणांनी युक्त मानतात. यातील कोणा एकालाही जगात किंमत नाही; मग पाची प्रकारची हीनता ज्याच्या जवळ असेल त्याने त्या राजाची स्तुति काव्यात करण्याचा प्रयत्न करणे किती योग्य आहे व तसे करतांना त्यास किती लज्जा व भय वाटत असेल याचा विचार करावा. पण रुचि उच्च व रुचिर असून ती स्वस्थ बसू देत नाही व

रामराजाचा स्वभाव माहीत आहे म्हणून हें धाष्टर्य केल्याशिवाय राहवत नाही, वगैरे जे भाव मागे प्रगट केले आहेत त्यांचा उपसंहार येथे करावयाचा आहे.

**संगति व शंका** - पण अशा महामूर्खाचे राजा ऐकून तरी घेईल का? तो तर त्याला डोळ्यांसमोर उभा सुद्धा राहू देणार नाही, आणि राजाला प्रेम ओळखता येते कसे? या दोन्हीचे समाधान पुढील दोन चौपायात आहे.

**चौ. ८ - (१) ईश-अंशभव** - ईश्वरांश असा साधारण अर्थ दिसतो; पण 'ईश्वर-अंश जीव अविनाशी' (७/११७/२) या मानसाधारे सगळेच कृमिकीटकांपासून ब्रह्मदेवापर्यंतचे जीव ईश-अंश-भवच ठरतात.

(क) टीकाकार 'नराणाच नराधिपम्' हे गीतावचन आधारास देतात, पण ते गैर लागू आहे. ते उदाहरण ईश्वरांशाचे नसून ईश्वराच्या दिव्य विभूतीचे आहे. 'नान्तोस्ति मम दिव्यानां विभूतीनां परंतप' (भ.गी. १०/४०) दिव्यविभूति म्हणजे नुसता ईश्वरांश नव्हे. 'मम तेजोंऽश संभवम्' (भ.गी. १०/४१) असे पुढल्याच श्लोकात सांगितले आहे. येथे 'ईशतेजोंऽशसंभव' असे असते तर दिव्य विभूति हा अर्थ घेता आला असता.

(ख) राजाला लोकांच्या अंतरींच्या भावना जाणावयाच्या आहेत. बाह्य कृतीवरून व गुणावगुणांवरून त्या निश्चित होत नाहीत. अंतःकरणाचे वृत्त-वर्तन जाणणारे कोण आहेत हे पाहिले पाहिजे. 'आदित्य चंद्रावनिलोऽनलश्च । द्यौर्भूमिरापो हृदयं यमश्च ॥ अहश्च रात्रिश्च उभे च संध्ये । धर्मोऽपि जानाति नरस्य वृत्तम्' (भांडार-करांच्या पुस्तकांतील हा श्लोक काल एकाएकी १८ वर्षांनी मदतीस धावला. चौ-६.१ (ग/पहा.) सूर्य. चंद्र, वायू, अग्नि, द्यौः भूमि, आप, हृदय, यम दिवस, रात्र, दोन्ही संध्या व धर्म हे सर्व माणसांचे गुप्त वर्तन जाणतात. यांच्यातील बऱ्याच जणांच्या अंशाने राजा (साधु, सुशील वगैरे असलेला) निर्माण होतो; यथा सोमाग्न्यर्कोऽनिलेंद्राणां वित्ताप्पत्योर्यमस्य च । अष्टानां लोक पालानां वपुर्धारयते नृपः'(मनु. ५।१६) चंद्र (सोम), अग्नी, सूर्य (अर्क), अनिल (वायू), इन्द्र (द्युपति), वित्तपति (कुबेर), अप्पति (वरुण) आणि यम या आठ लोकपालांचे संयुक्त शरीर धारण करणारा तो नृपाल राजा. वरील १४ पैकी अधोरेखांकित पाच या आठांत स्पष्ट आहेत. द्यौ, भूमि, आप हे तीन त्याच क्रमाने या आठांत आहेत, द्यु+पति=स्वर्गपति इन्द्र (द्योःहे द्युचे प्रथमेचे एकवचन आहे); आप-जल, पाण्याची देवता वरुण, व भूमि=वसुधा=वित्त, वित्तपति कुबेर; म्हणून ईश-अंश-भव=अष्टदिक्पालांच्या अंशानी युक्त असलेला. चंद्रसूर्यादिहि ईश अंश आहेतच; हे परमेश्वराचे अंश आहेत व उत्तम राजा या सर्वांचे रूप आहे. हे सर्व आठ स्तुति प्रिय आहेत, पृथ्वीवर यांची सत्ता चालते म्हणून यास ईश, देव, म्हणतात. हे सर्व एकेकटे सुद्धा माणसांचे अंतरंग जाणतात; व स्तुती करणारांवर कृपा करतात, या आठांचे एकत्रितरूप तोच 'साधु सुशील सुजाण व अति कृपाल' असा राजा होतो. म्हणूनच त्याला त्याची स्तुती करणारांची प्रीति ओळखता येते. प्रीति हा

अंतःकरणाचा एक विकार आहे. बाह्य आचरणाने तो दिसेलच किंवा खरा खोटा, श्रेष्ठ कनिष्ठ दर्जाचा वगैरे ओळखता येईल असे नाही.

(ग) या आठांतील प्रत्येकजण कृपालु आहे; राजात हे आठहि असतात म्हणून राजा अति कृपाल, परम कृपाल असतो.

(घ) साधु, सुजाण सुशील व परम कृपालु असणारा राजाच, राजा या पदवीला योग्य व तोच ईशांशभव आहे असे समजावे; असा नसेल तर ईशांशभव नाही असे नक्की समजावे हे येथे सुचविले. तुलसीदास कालीन प्रसिद्ध राजे असे नव्हते हे सूचित केले; तसे असते तर त्यांची स्तुति तुलसीदासांनी केली असती. **तुलसी दासांच्या कोणत्याही ग्रंथात तत्कालीन राजाची स्तुती नाही.** उलट कवितावलीत व कलिवर्णनांत -त्या वेळच्या राजांच्या अत्याचारांचे प्रतिबिंब पडले आहे. 'नृप पाप परायण धर्म नही । जन दंड विडंबित संततही' (७/१०१/६) 'भूपप्रजाशन' (७/९८/२) कवितावली उत्तरकांड पद १७५ पहा.

(२) या चौपाईत राजाच्या ठिकाणच्या चार मोठ्या गुणांचा उल्लेख आहे व पुढील चौपाईत त्याच्याकडून घडणाऱ्या चार क्रियांचा उल्लेख आहे. कोणत्या गुणाने कोणती क्रिया करतो हे पाहू.

**चौ - ९ -** ऐकणे, प्रेम ओळखणे, गोड बोलणे व सन्मान करणे या चार गोष्टी राजा करतो.

(१) अतिकृपाल असल्याने तो सर्वांचे म्हणणे शांतपणे ऐकून प्रजेचे अनुरंजन करतो. 'प्रजानुरंजनाद्राजा'- 'सपिता, पितरस्तासां केवलं जन्महेतवः' प्रजेचे अनुरंजन करतो म्हणून असा राजा प्रजेचा पिता असतो; प्रजेचे आईबाप (पितरः) केवळ जन्मदाते असतात. 'बोल बोबडे बालक बोलति । मातापिता मुदित मन ऐकति' (१/८/९) आईबापांएवढे कृपालु जगातील प्राकृत व्यक्तींत दुसरे कोण असणार? का ऐकून घेतो याचे साधार समाधानकारक उत्तर हे आहे.

(२) प्रेम ओळखणे ही दुसरी क्रिया श्रवणानंतरची आहे. भक्ति-प्रेम-प्रीति (चौ.५). कोणत्या गुणामुळे ओळखतो? ईशांशभव सुजाण आहे म्हणून त्यास ओळखता येते (प्रेम)

(क) कशाच्या आधारावर ओळखतो? नति, गति व वाणी यांच्यावरून ओळखतो. स्तुति करणाराच्या ठिकाणची नति - नम्रता, लीनता, हे स्वामी विषयींच्या प्रेमाचे एक मुख्य लक्षण आहे.

(ख) गति – 'आकारैरिंगितै र्गत्या चेष्टया (भाषितेन)च नेत्रवक्र विकारैश्च गृह्यतेन्तर्गतं मनः' 'आकारे रंगचेष्टा' हा वाक्प्रचार या श्लोकाचे सारच आहे. येथे गति शब्दाने भाषणाशिवाय इतर सर्व लक्षणांचा अंतर्भाव उपलक्षणेने 'ता म्हणता ताकभात' प्रमाणे करावयाचा आहे. गति शब्दाच्या उप म्हणजे समीप असणारी लक्षणे ग्रहण करावयाची. डोळ्यात व मुखावर उमटणारे विकार, (**मुखहा अंतःकरणांतील विकारांची अनुक्रमणिका दाखविणारा स्वच्छ आरसा आहे.**) शरीराच्या

इत्तर अवयवांच्या चेष्टा - हालचाली, बोलण्याची ढय उच्चारताना शब्दांवर जोर देणे न देणे, त्या शब्दांच्या स्वराचा रोख व भाषण या सर्व गोष्टींवरून अंतःकरणांतील प्रेमाची ओळख अशा राजास पटते. ('आकारैरिंगितै' हा श्लोक ३०/३५ वर्षापूर्वी केव्हातरी, कोठल्या ग्रंथात लक्षात नाही, वाचलेला काल या ओळींचे चिंतन मंथन करताना त्या मगरीसारखा एकदम प्रगट झाला. 'नाम समर्थ सुमति हनुमानू'!

(३) **सुवच** - तो कसे बोलू शकतो! सुशील असतो म्हणून; 'वदे खरें प्रिय वचन विचारीं' हे सुशील असल्या शिवाय शक्य नाही.

(४) **सकलां सन्मानी** - सन्मान करण्यास मुख्य साधुत्व हा आहे. 'सावधान मानद मद नाही' (३/४६/९) हें रामचंद्रानी नारदास सांगितलेले एक साधुत्वाचे-साधूचे लक्षण आहे. 'मानद सर्वां स्वयें अमानी' (७/३८/४) हे प्रभूनी भरतास सांगितलेल्या साधु लक्षणात आहे; अमानी मानदो मान्यः', हे भागवतात सांगितले आहे.

(५) या प्रमाणे केवळ चार चौपायांचा गूढार्थ स्पष्ट करण्यास इतकी पृष्ठे खर्चावी लागली; व हे सुद्धा नाम-गुरु-राम कृपेनेच घडले, अन्यथा या चक्रव्यूहातून बाहेर पडणे अशक्य होते. **बालकांडातील पहिले ४३ दोहे पुरे होईपर्यंत वारंवार असे प्रसंग आहेत.** येथे स्वताची अपात्रता व ईशांशभव राजाचा स्वभाव व रुचि वर्णन करून यातूनच कोसलेश रामाच्या स्वभावाचे वर्णन अर्थापत्तीने करावयाचे आहे, म्हणून पुढील चौपाई आहे.

**वि. सूचना - या चार चौपायांवरील मानस पीयूष टीका वाचून पहावीच.**

हिं.- **यह प्राकृत महिपाल सुभाऊ । जान-सिरोमनि कोसलराऊ ॥१०॥**
**रीझत राम सनेह निसोते । को जग मंद मलिन मति मोते ॥११॥**

म.- **असे स्वभावे प्राकृत महिपति । ज्ञानी-शिरोमणी कोसलपति ॥१०॥**
**रामतोषती प्रेमें निर्मल । मज सम जगिं कुणि मंद अमंगल ॥११॥**

**अर्थ** – प्राकृत राजे सुद्धा स्वभावताच असे (सुस्वामी) असतात. कोसलपति (रघुनाथ अयोध्यापति) तर सर्व ज्ञान्यांचे शिरोमणीच आहेत. ॥१०॥ ते राम निर्मळ स्नेहानेच प्रसन्न होतात; पण माझ्या सारखा मंद (मूढ) व अमंगल (मलीन मनाचा) सर्व जगात दुसरा कोण आहे! (अर्थात कोणी नाही).

**टीका. चौ - १० - (१) प्राकृत** – प्रकृतिजन्य; अष्टधा प्रकृतीपासून ज्यांची उत्पत्ति झाली आहे ते. याने हे सुचविले की कोसलपति राम अप्राकृत आहेत. त्यांचा देह पंच भूते व त्रिगुणांचा नाही. 'चिदानंदमय अपली काया- । विगत विकार-' (२/ १२७/५)

(क) प्राकृत शब्दाने आणखी हे सुचविले की त्यांची देहरूपी उपाधि जड, विकारी, असल्याने प्रेम ओळखण्यासाठी त्यास गति व वाणी इत्यादि प्राकृत उपाधींचा आश्रय

करावा लागतो. हे प्राकृत राजे ज्या सूर्यचंद्रादिकांचे अंश आहेत त्यांची उपाधि दिव्य असल्याने, अंतरंग जाणण्यास बाह्य उपाधींची जरूरी त्यास नसते. विद्युत् शक्ति एकच असली तरी काचेचा गोल जितका जास्त शक्तिचा व स्वच्छ असेल तितकाच व तसा प्रकाश ती शक्ती देऊ शकते. पण रामचंद्र उपाधिविहीन असल्यामुळे त्यास काहीच साधन लागत नाही. चिदानंदमयाची नामरूप उपाधि चिदानंदमयच आहे म्हणून केवळ भासमान उपाधि आहे.

(२) **ज्ञानी शिरोमणी कोसलपति** – 'विधिहरि शंभुस नाचविणारे ॥' 'मर्म न तुमचे त्यासहि कळतें' (२/१२७/१-२) असे वाल्मिकींनी श्री रघुनाथास म्हटले आहे. ब्रह्माविष्णुमहेशांपेक्षा कोणी मोठे ज्ञानी नाहीत; पण त्यांना सुद्धा नाचविणारे कोसलपति आहेत; व कोसलपतीचे मर्म त्या त्रिदेवांना सुद्धा कळत नाही; म्हणून ज्ञानीशिरोमणि, सर्वज्ञानीपुरुषांचे मुख्य, श्रेष्ठ, त्यांना इतर साधनांची अपेक्षा कशाला असणार ?

(क) प्राकृत महीपति सुद्धा गुणदोषांकडे बघत नाहीत तर कोसलपति स्वप्नात सुद्धा पाहात नाहीत हे ओघानेच ठरले. 'नीति प्रीति परमार्था स्वार्था । कुणि न रामसम जाणि यथार्था ॥' (२/२५४/५) 'सकल हृदंतरिं वसतसां । जाणांभाव कुभाव' (२/२५७/-) पुढील चौपाईत राम आणि तुलसीदास यांतील महदंतर दाखवितात.

**चौ - ११ - (१) निर्मळ प्रेम** – याचा अर्थ निष्काम प्रेम असा करण्याकडे सर्वांची प्रवृति होईल; पण ती असावधानता ठरेल; कारण हा अर्थ पूर्व संदर्भाशी विरोधी ठरतो.

(मा. पी. टी. येथे मौन आहे.) 'आर्त, अर्थार्थी व जिज्ञासु हे सुद्धा 'सुकृति, अनघ, उदार व चतुर आहेत असे भ. गी. व मानसांतहि म्हटले आहे (१/२२/६-७प.) कपट, कुटिलता, दंभ इत्यादि मळ ज्यात नाही व जे प्रेम इतरांची आशा करीत नाही असे अनन्य निष्कपट प्रेम म्हणजे निर्मळ प्रेम. सकाम प्रेम मळ नाही. **'सकामभक्ति व भक्तीत निषिद्ध' हें प्रकरण** प्रस्तावनेत पहावे. 'अनन्यगतिकांजनां निरखितां चि सोपद्रवां । तुझेंचि करुणार्णवा मन धरी उमोपद्रवा' (केका.) 'प्रिय मज अनन्य गति-सेवक ही' (४/३/८) 'एकचि बाणा कृपानिधाना । प्रियज्याते गति न आना' (३/१०/८) 'मजसि कपट छल छिद्र न भावें' (३/४४/५) निष्काम प्रेमात कपट असू शकते. हनुमन्ताचे प्रेम निष्काम होते; पण जोपर्यंत त्याने कपट वेषाचा त्याग केला नाही, तोपर्यंत त्यास, जवळ केला नाही. सकामप्रेम निष्कपट असू शकते; जसे ध्रुव, गजेंद्र, द्रौपदी इत्यादींचे,

(२) तुलसीदास म्हणतात की मी मूळ-मंदमति तर आहेच, पण मलिनमन - अमंगळ, आहे. 'निर्मल मन जन तो मज पावे । मजसि कपट छल छिद्र न भावे' (३/४४/५) यात निर्मळ मनाची व्याख्याच आहे. माझा तर कपटी. कुटिल लोकांत पहिला क्रमांक आहे. 'गतिकुपथीं श्रुतिपंथा सांडिती । कपट काय कलिपंक - भांडितीं ॥ ... अशामधे जगीं गणा प्रथम मज' (१/१२/१-४ पहा.) भाव हा की

मी शठ आहे. (संगति) शठांवरसुद्धा कोसलपति कृपा करतात की? याचा विचार करता दोन उदाहरणें रामचरितातच आहेत; त्यामुळे भरवसा -धीर -आला; तोच सांगतात -

हिं.- **सठ सेवक की प्रीति रुचि रखिहहिं राम कृपालु ।**
**उपलकिए जलजान जेहि सचिव सुमति कपि भालु ॥२८॥**

म.- **शठ दासाच्या कृपानिधि राखिल प्रीति-रुचीस ।**
**करि उपलां जलयान जो सुमति सचिव कपि रीस ॥२८॥** (श)

**अर्थ** — मी जरी शठ सेवक असलो तरी कोसलपति (राम) माझी प्रीति रुचि राखतील; (अशी मला खात्री वाटते कारण) ते इतके कृपानिधि आहेत की त्यांनी पाषणांस जलयान (नौका) बनविले व माकडांना आणि खलांना आपले सचिव बनवून सुमति केले ॥२८॥

**टीका** — तुलसीदासांना **आवड** (**प्रीति**) आहे की रामचरित वर्णन करून, निष्पाप होऊन स्वान्तःसुख प्राप्ती व्हावी, पण त्यास लागणारी निर्मलमति, विद्या, कला, इत्यादि काही नाही. ती लायकी श्रीरामानी या मंद मलिन मतीस व मनाला द्यावी ही आहे **रुचि-इच्छा**. 'रामगुणगाथा । वदें नमुनि रघुनाथा माथा' ही आवड या पूर्वीच आठ वेळा प्रदर्शित केली आहे. 'ते न होई, विण विमल मति मम मतिबल लवभार' (१/१४/म), अशा विमल मतीची याचना कवि, महेश, जानकी, इत्यादि पुष्कळांजवळ केली आहे.

(२) **ज्यांनी उपलानां जलयान केले** - यात उपल-पाषाण, हे शब्दांचे द्योतक आहेत. **'आपण बुडुनी दुजां बुडविती** । उपल जहाजां सम ते बनती' (६/३/८) **'आपण पडुनि दुजांना पाडिति'** (७/४०/५) हे खललक्षण आहे. पाषाणजहाज बनले -'महिमा हा न **जलधिचा म्हणती** । कवि कृति ना, न **उपलगुण** गणती ॥ **श्रीरघुवीर** प्रताप हा तरले जलिं पाषाण॥' (६/३/९), याप्रमाणे पाषाण व तुलसी दासांच्या मते ते स्वतः खल ठरले. पाषाणरूपी खलांना नुसते तारले नाहीत तर त्यांना प्रचंड-कपि-सैन्य-तारक बनवले, त्या पाषाणांच्या पुलाच्या आश्रयानेच कपिसैन्य सागराच्या परतीराला गेले;

(**क**) पाषाण खल, कुटिल जड, असाच तुलसीदास म्हणतात मी खल, कुटिल हृदयाचा व जडबुद्धि आहे, मग माझ्याच खलत्वाकडे प्रभु का बघतील? **'भ्रमसंदेहमोह निज हरणी । करीं कथा भवसरीता तरणी'** (१/३१/४) ही माझी प्रीति, आवड ते पूर्ण करतीलच,

(३) **तसें होण्यास सुमति** — विमलमति पाहिजे - ती सुद्धा रामचंद्रानी मूढांस दिली आहे; याला पुरावा - माकडांची अस्वलांची बुद्धी ती किती! 'मी पामर पशु कपि अति कामी' (४/२१/३) 'अधम असा मी श्रुणु सखे! मजवरही रघुवीर ।

करिति कृपा' - (५/७/०) अशा हीन, चंचलबुद्धि, कामी, पामर, अति अपवित्र-अमंगल पशूंना सुद्धा आपले सुमतिमंत सचिव केले, ते काय मला त्यांच्या चरित्राचा सुकवि नाही बनवणार? मी सेवक, ते सेवक, मी कुसेवक, ते कुसेवक; ते पशु मी मानव; मग भीति कसली! ते सर्व काही पूर्ण करतील, कारण की मी त्यांचा सेवक आहे हे पुढील दोह्यांत सांगतात.

(क) या दोह्यांत शरणागतीची काही लक्षणे आहेत. 'अनुकूलस्य संकल्पः' -रामगुण वर्णन करणे ही गोष्ट रामास आवडणारी आहे. (१) 'मम गुण गाता तनु पुलकते' ...'तात निरंतर मी वश त्याला.' (३/१६/१२). (२) प्रतिकूलस्य वर्जनम् -रामाला 'कपट छल छिद्र' आवडत नाही, ते टाकण्याची तळमळ आहे व तेवढ्यासाठी चराचरांना विनवण्या करीत आले आहेत. (३) रक्षिष्यतीति विश्वास : 'राखिल प्रीति रुचीस', यात प्रबल आहे. (४) गोप्तृत्व वरणं – शरण जाणे – भगवंताशिवाय आपला कोणी रक्षक नाही ही भावना दृढ करणें; हे पुढील दोह्यांत दिसेल. (५) आत्मनिक्षेप -आत्म-समर्पण व (६) कार्पण्यम् -आपली सर्व बाजूनी अपात्रता -हीनता, पामरता मानणे, हे सर्वत्र परिपूर्ण आहे. आपल्याला दास म्हणून घेणे यांत आत्मनिक्षेप आहे. 'अनुकूलस्य संकल्पः प्रतिकूलस्य वर्जनम् । रक्षिष्यतीति विश्वासो गोतृप्व-वरणं तथा । आत्मनिक्षेप कार्पण्ये षड्विधा शरणागति.'

हिं.दो. **होंहु कहावत सबु कहत राम सहत उपहास ।**
**।।साहिब सीतानाथ सो सेवक तुलसीदास ।।२८म।।**

म.दो. **मीहि म्हणवितो म्हणति जन राम सहति उपहास!**
**"स्वामी सीता-नाथसे सेवक तुलसीदास" ।।२८म।।**

**अर्थ** - (कोणी विचारले तर) मी सांगतो की मी सीतापति रामचंद्रांचा सेवक आहे; लोकही उपहासाने असे म्हणतात की कुठे सीतापती-सारखे स्वामी व कुठे तुलसीचा दास! पण हा सर्व उपहास राम सहन करतात. ।।२८म।।

**टीका** — येथे गोप्तृत्ववरण दाखविले. उपहास हा की तुलसीदासाची रामसेवक होण्याची लायकी नसता, तो सेवक म्हणवितो व सीतापति त्याला काहीच दंड शिक्षा कसे करीत नाहीत? त्यांनाही हे कसे सहन होते? जी उद्भवस्थिती संहारकारिणी क्लेशहारिणी सर्वश्रेयस्करी तिचे पति जे 'ब्रह्मादिशंकरसेव्य' त्यांचा दास म्हणण्याची लायकी आहे कुठे? 'रामदास' सीतापति-दास' म्हणवावयाचे सोडून तुलसीचा दास म्हणवतो व रामसेवक आहे असेहि म्हणतो यात रामाला - सीतापतीला - कमीपणा नाही का वाटत? तुलसी म्हणजे पूर्वजन्मात जी जलंधर राक्षसाची स्त्री होती व जिचे पातिव्रत्य परपुरुष स्पर्शाने नष्ट झाले होते ती. तिचा हा दास म्हणवतो. अशा राक्षस पत्नीचा दास व सीतापति यांचा सेवक-सेव्य संबंध शक्य आहे काय?

**वि. सू.** – सहसनाम मुनिभनित सुनि तुलसीवल्लभ नाम सकुचत हियँ हँसि निरखि सिय धरमधुरंधर राम' (दोहावली १८८) मुनिकथित रामसहस्रनामात 'तुलसीवल्लभ.' हे आपले नाम ऐकून धर्मधुरंधर भगवान श्रीरामांनी हसून सीतेकडे पाहिले आणि मनातल्या मनात संकोच वाटला. 'रामवल्लभा सीता' असून राम 'तुलसीवल्लभ' होणे यात एकपत्नी व्रताचा लोप झाला असे सीतेला वाटेल म्हणून मनात संकोच वाटला व हसले एवढ्यासाठीच की तुलसीचा वल्लभ असा अर्थ नसून तुलसीदासाचा वल्लभ आहे हा राम! **(मा.पी.पहा)**

(२) **एवढें का सहन करतात?** जो शरण आला त्याच्या दोषांकडे प्रभूची दृष्टी जातच नाही. असे ते कृपानिधि आहेत; सुशील आहेत; **'कृपा सुममता दासांवरती! कृपा करुनि जे क्रोध न करती'** (१/१३/६) असा त्यांचा स्वभाव आहे. **'सकृदेव प्रपन्नाय तवास्मीति च याचते/ आयं सर्वभूतेभ्यो ददाम्येतद्व्रतं मम'** (वा. रा. यु. १८/३३,३४) **'मित्रभावेन संप्राप्त न त्यजेयं कदाचन। दोषोयद्यपि तस्य स्यात्** सतामेतद् हि गर्हितम्' (वा. रा. यु. १८/३).

**(क)** आपल्या स्वामींचा उपहास होण्यासारखे सेवकाने करणे, वागणे हे किती वाईट आहे हे पुढें दाखवितात

हिं.- **अति बडि मोरि ढिठाई खोरी । सुनि अघ नरकहुँ नाक सकोरी ॥१॥**
**समुझि सहम मोहि अपडर अपने । सो सुधि राम कीन्हि नहिं सपनें ॥२॥**
म.- **अघ धिटाइ अतिशय मम खोडी । ऐकुनि नरकहि नाका मुरडी ॥१॥**
**जाणुनि मन निजभयें भीतसे । स्वप्नि राम मम अघ न बघतसे ॥२॥**

**अर्थ** – माझे पाप, माझा दोष (खोडी) व उद्धटपणा (धिटाई, धृष्टता) इतका मोठा आहे की ऐकून नरक सुद्धा नाक मुरडू लागतो, ॥१॥ हे जाणून माझे मनच भिऊन स्वतः घाबरते; पण हे माझे पाप किंवा दोष वगैरे रामचंद्रांच्या स्वप्नांत सुद्धा लक्षात येत नाहीत. ॥२॥

**टीका चौ. १** – आपला कार्पण्यभाव व प्रभूची दासवत्सलता व अक्रोधता येथे व्यक्त करतात.

**(क)** दोष व धृष्टता हीच की तुलसीदास म्हणवूनच पुन्हा सीतापतिसेवक म्हणविणे, व अशा रीतीने सीतापतीला कमीपणा आणणे; या पातकासारखे आणखी पातक तरी कोठले?

**(ख)** हे पाप इतके मोठे आहे की नर्कालासुद्धा वाटते की याचे नाव सुद्धा ऐकू नये. याला जर माझ्यात रहावयास पाठविला तर मला किळस वाटेल. कुठेतरी नवीन नर्कच त्याच्यासाठी निर्माण करण्याची विनंति यमराजाला करावी लागणार. **विनय पत्रिका पद १५८.१५९.२५८** पहा. **'महा स्वामीद्रोहि मजसा विश्विं नाही कोणि'** हा एका चरणाचा अनुवाद नमुना म्हणून दिला आहे. सुरदास म्हणतात

की 'नर्क पळे ऐकुनी नाम मम । पाठ दाखवीतो मजला यम' काय कार्पण्य हे ! किती लीनता! आणि आमच्या जवळ किती? अगदी मोठ्ठे शून्य!

**चौ – २ – जाणुनि ... हे जाणले** - हा विचार केला की माझे मलाच, माझ्या मनालाच भय वाटते; रामचंद्राचे भय नाही वाटत. त्यांना याबद्दल दाद सुद्धा नाही. तुलसीदास पापी, उद्धट आहे इत्यादि गोष्टी त्यांच्या ध्यानी मनीं स्वप्नींही येत नाहीत. हें जरी खरें असले तरी असल्या दयाळू, दासवत्सल, परम कारुणिक स्वामीला कमीपणा आपण देतो हा विचार करताच स्वतःचे स्वतःलाच भय वाटते. सार हे की अशा स्वामीचा सेवक होण्याची माझी पात्रता मुळीच नाही. राम माझ्या दोषांकडे पाहते तर त्यांचे चरित्र वर्णन करण्याची अति उच्च इच्छा मला झालीच नसती, पण ज्या अर्थी काव्यस्फूर्ति वाढतच आहे असे दिसते त्या अर्थी त्यांना माझ्या वेड्या वाकड्या प्रयत्नांबद्दल आनंदच होत असला पाहिजे असे वाटते. हेच पुढील चौपाईत सांगतात.

**हिं.- सुनि अवलोकि सुचित चखु चाही । भगति मोरि मति स्वामि सराही ॥३॥**
**कहत नसाइ होइ हियँ नीकी । रीझत राम जानि जन जी की ॥४॥**
**रहति न प्रभु चित चूक किए की । करत सुरति सय बार हिए की ॥५॥**

**म.- परिसुनि, बघुनि विचारुनि चित्तें । प्रभु वानिति मम बुद्धि भक्तितें ॥३॥**
**वदति अवद्ध हृदयिं रस-भरती । जन-मन जाणुनि राम रीझती ॥४॥**
**प्रभु मनिं राहि न चूक कृतीची । स्मरती शतदां स्थिती हृदींची ॥५॥**

**अर्थ** – दुसऱ्यांकडून ऐकून, व स्वतः आपल्या मनाशी विचार करून पाहून, प्रभु (उलट) माझ्या बुद्धीची व भक्तीची वाहवाच करतात. ॥३॥ भाषा वेडीवाकडी असली आणि हृदयात जर प्रीतीला भरती (रस- भक्ति-प्रीति) येत असेल (हृदय जर प्रेमळ, चांगले असेल) तर दासांचे मन ओळखून राम प्रसन्न होतात ॥४॥ (कारण) प्रभूंच्या मनात आपल्या सेवकांच्या कृतीची चूक राहण्यास जागाच नाही; परंतु ते आपल्या सेवकांच्या अंतःकरणाच्या स्थितीची त्यातील प्रेमभावनांची शंभर वेळा आठवण करीत असतात. ॥५॥

**टीका – चौ. ३ (१)** चित्तें विचारुनि बघुनि असा अन्वय करावा.

**(क)** परिसुनि – ऐकून; लक्ष्मण, हनुमान, जानकी, शिवजी यांच्याकडून ऐकून की असा एक आपला सेवक व तुलसीदास म्हणविणारा आपले चरित्र वर्णन करू पहात आहे व सर्वांना भगवद्भावनेने विनवणी करीत आहे इत्यादि. दो. १८/७-८ च्या टीकेत तुलसीदासांचे, विनय पत्रिकेतील, सीता प्रार्थना पद दिले आहे ते पहावे.

**(ख)** तेव्हा मग विचार केला की कसा का असेना, अंतःकरणपूर्वक माझा म्हणवीत आहे ना! त्याच्या दोषांकडे पाहणे व त्याच्या संबंधामुळे आपल्याला कमीपणा येईल की काय असा विचार करणें, माझ्या कार्याची हानि होईल या भीतीने त्यास दूर

लोटणे शक्यच नाही. 'शरणागतास जे त्यजिति निज अनहित मानून ॥ ते नर पामर पापमय हानि त्यास देखून' (५/४३/-) 'सहज शील की हे पाप्यांचे । सदा वावडे मम भजनाचें ॥ दुष्टहृदय सत्यच असता जर । मज सन्मुख येता तो का तर? ॥ शरण सभीत असे जर आला । प्राणांसम रक्षीन तयाला' (५/४४/३,४,८).

(२) **भक्ति** – ही की तो अनन्यगति आहे. मला अनन्य भावाने शरण आला आहे, मी रक्षण करीन अशी दृढ निष्ठा आहे. माझे चरित्र कथन करून स्वतःचे कल्याण करण्याची त्याची इच्छा आहे, हे काय थोडे झाले? अशी इच्छा, जिच्या योगाने बहुजन समाजाचे उभयविध हित होईल, मोठमोठ्या पंडितांस व पूजा, अभिषेक करणारांस तरी कुठे होते, इ. इ. प्रकारें वाहवा केली. 'बोल बोबडे बालक बोलति । मातापिता मुदित मन ऐकति' (१/८/९)

**चौ. ४** – (१) मी असभ्य खेडवळासारखा बोलतो, मूर्खासारखा स्वामींची बेअदबी करतो, स्वामींना भिण्याचे कारण नसता गरीबाप्रमाणे भीतभीत बोलतो व कुकवी प्रमाणे नीरस काव्य लिहितो व गातो. असे जरी असलें तरी मी श्रीरघुनाथ-सीतापतीचा आहे असा जो माझा दृढ विश्वास, निष्ठा, प्रेम आहे त्यामुळे राम माझ्यावर कृपा करतील अशी खात्री वाटते; कारणकीं प्रभु सेवकाच्या निष्ठेकडे-अंतःकरणांतील भावनांकडे पाहून प्रसन्न होतात.

(क) यावरून भाव हा निघतो की भाषा सुंदर, मोहक आहे; शब्दांनी भगवंताची स्तुति खूप करतो, पण एकनिष्ठा अनन्यगतिकत्व नाही तर राम प्रसन्न होत नाहीत 'म्हणवि दास मम नर आशा करि । वदा कुठें विश्वास खरा तरि' (७/४६/३) (कल्याण मासिकात प्रसिद्ध झालेलें रामदास चांभाराचे किंवा हीराचे चरित्र पहावे). **'वाणीच्या दोषांकडे प्रभू बघत नाहीत पण मनातील भावाकडे बघतात, 'भावेन देवं'** हे येथे सांगितले.

**चौ – ५** – दासानीं केलेली कृती जरी अयोग्य दिसत असली, अनुचित घडली, तरी प्रभू तिकडे पहात नाहीत. दासांचे हृदय प्रभूविषयीं शुद्ध आहे की नाही, कपट, दंभ, लपवालपव प्रभूपाशी करतो की काय हेच पाहिले जाते. **येथे भगवंताची भक्तवत्सलता दाखविली.** 'पुत्राचे सहस्र अपराध । माता न मानी तयाचा खेद ॥' 'जनगुण अल्प गणिति मेरुसम । अवगुण कोटि पाहुनी विसरति' (वि. प. २०६ अनु.) 'अपराध अगाध करी जरि दास, न ठेविति चित्तिं कधींहि जराही ॥ **गणिका – गज** – गृध्र अजामिल पातकपुंज अनंत दिली गति त्यांही॥' (कवि. उ. कां. ७ पहा.) पुढील चौपायात उदाहरणे देतात.

**हिं.- जेहि अघ बधेउ ब्याध जिमि बाली । फिरि सुकंठ सोइ कीन्हि कुचाली ॥६॥**
**सोइ करतूति बिभिषन केरी । सपने हुँ सो न राम हियँ हेरी ॥७॥**
**ते भरतहिं भेंटत सनमाने । राजसभाँ रघुबीर बखाने ॥८॥**

म.- अघें व्याध इव ज्या हत वाली । करि सुकंठ मग तीच कुचाली ॥६॥
तीच कृती मग बिभीषणाची । स्वप्निंहि रामा स्मृति न तयाची ॥७॥
भेटत भरता त्यां गौरविले । रघुवीरें नृपसदसिं वर्णिले ॥८॥

**अर्थ** – ज्या पापास्तव - ज्या अपराधामुळे रघुवीराने एखाद्या व्याधाप्रमाणे वालीचा वध केला ती कुचाली पुढे सुग्रीवाने केली ॥६॥ मग बिभीषणाने सुद्धा तेच कर्म केले; पण रामचंद्रानीं त्यांचे दोष स्वप्नांतही स्मरण केले नाहीत ॥७॥ (उलट) भरतभेटीच्या वेळीं त्यांचा गौरव केला व राजदरबारात (सदसिं-सभाँ-सभेत) रघुवीराने त्यांची प्रशंसा केली ॥८॥

**टीका. चौ - ६ (१) ज्या अघें व्याध इव वाली हत** -

(क) वालीने सुग्रीवाची पत्नी रुमा बलात्काराने घेतली; सुग्रीवाला हाकलून दिला व रूमेला आपली बायको म्हणून ठेवली. 'हरुनि घेइ सर्वस्व नि नारी' (४/६/११. टी. प.) असे सुग्रीवाने रघुवीरास कळवळून सांगितले आहे. वालीचा वध करण्याचे मुख्य कारण रघुवीराने वालीलाच सांगितले आहे की 'अनुजवधू भगिनी सुतनारी । श्रुणु शठ कन्या सम या चारी ॥ कुदृष्टिने जो यानां पाही । वधतां त्यास जरा अघ नाहीं॥' (४/९/७-८) भावाच्या बायकोवर बलात्कार करून बायको म्हणून ठेवली या अपराधा-पापाबद्दल त्याला देहदंड-वध ही शिक्षा दिली. पुढे सुग्रीव राज्यावर बसल्यावर वालीची विधवा स्त्री तारा हिला बायको केलीच.

(ख) येथे अघ न म्हणता कुचाळी-खोडी-शब्द वापरण्यात हेतु आहे. सुग्रीवाने बलात्कार करून ठेवली नाही म्हणून राजनीति दृष्टीने अपराध नाही. पण तो रामभक्त असल्याने रघुनाथाचें एकपत्नीव्रत अनुसरणें योग्य होते, ते त्याने केले नाही म्हणून ही चूक, खोडी, कुचाळी ठरली.

(ग) अघ कुचाळी व करतूति हे तिन्ही शब्द समानार्थी वापरले आहेत असे टीकाकार म्हणतात ते किती सत्य हे वाचकांनी वरील विवेचनावरून ठरवावे. मनुष्यात सुद्धा धर्मदृष्टीनेही द्विजांशिवाय इतरांच्या विधवानीं पुनर्विवाह करणे, आणि विधवेशी विवाह करणे पाप समजले जात नाही. अशा विवाहास त्या जातीत पाट, म्होतुर लावणे म्हणतात.

(घ) करतूति (करतूती) शब्द तुलसीमानसात एकंदर चौदा ठिकाणी (बा- कां. ३ वेळा व अयोध्या ११ वेळां) वापरला आहे, पण कोठेहि पाप, अघ हा अर्थ नाही व इतर १३ ठिकाणी टीकाकारांनी पाप, अघ असा अर्थ केलेला नाही. उलट काहीं टीकाकारांनीं तारेविषयीं काय लिहिलें आहे ते कि-कां-११/६च्या टीकांत मा.पी.मध्ये पहावे.

**चौ. ७** (१) रावणाची पट्टराणी मंदोदरी, तिला बिभीषणाने आपली बायको म्हणून ठेवली. (मानसात येथील उल्लेखाशिवाय या म्हणण्यास दुसरा पुरावा नाहीं) रामचंद्रांच्या ब्रीदानुसार त्यांच्या एका भक्ताने ही चूकच केली. कवीनी येथे करतूति-कृति-करणी हा अधिक सौम्य शब्द वापरला आहे. कारण लंका दशरथांच्या राज्यात

नव्हती, ती यक्षराक्षसांची नगरी आहे. तो व ती राक्षस जातीतील. त्यांच्यात असे करणे पाप नाही.

(क) पाळलेला विश्वासू कुत्रा घरच्याच मुलाला चावला तर त्यास कोणी दंड, शिक्षा करीत नाहीत त्याच्या एकनिष्ठेकडे, विश्वासू वृत्तीकडे पाहतात, 'काल कर्म स्वभाव, गुणांच्या प्रेरणेने जीवांकडून चुका व्हावयाच्याच. जीवांकडून हे दोष माझ्या मायेच्या बलाने घडत असतात; आणि भक्तांकडून चूक, दोष झाल्यास त्याचा अर्थ हाच होतो की मीच त्या भक्तावर पाहिजे तेवढी कृपा केली नाहीं', असे प्रभू सांगतात व त्यांच्या चुकांकडे बघत नाहीत. चौ -५ च्या टीकेतील विनयपत्रिका वचन पहावे.

**चौ. ८ - (१) भरत भेटीच्या वेळी सन्मान केला** - 'मुनि हे पहा सखे मम सगळे। समर सागरीं जहाज बनले ॥ मम हितार्थ इहिं जन्म वेचला। भरताहुनि हे प्रिय बहु मजला॥' (७/८/७-८)- यामुळे कौसल्येकडून त्यांना किती मोठेपणा मिळाला पहा. कौसल्या 'हर्षित आशिस दे तुम्ही' **प्रिय मम सम रघुनाथ** ॥' भरताहून प्रिय म्हणजे कोणासारखे हे कौसल्येच्या आशीर्वादाने स्पष्ट कळते. (२) 'नृप-सदसिं वर्णिले - '**बोलाविति तैं सख्यां रघुपती** । ते येउन सादर शिर नमती ॥ पराप्रीतिने निकट बसविले । भक्तसुखद मृदुवचन बोलले ॥ सेवा केली तुम्ही मम अती । कशी मुखावर वर्णू महती ॥ त्यक्त मदर्थ सदन-सौख्याला । - प्रिय तुम्हीं यास्तव मज अति झालां ॥५॥ अनुज राज्य वैभव वैदेही । परिजन सदनें काया स्नेही ॥६॥ सगळें प्रिय न, तुम्हांसम जाणां । मृषा न वदतो हा मम बाणा ॥ सर्वां प्रिय सेवक ही नीती । **दासांवर मम अधिका प्रीती** ॥८॥' (७/१६/१-८). ज्यांची यात स्तुती केली त्यात सुग्रीव व बिभीषण मुख्य आहेत, व इतर हनुमान, अंगद, नल, नीलादि व सर्वबलवान यूथपति हि होते. हे सर्व इतर वानर सुद्धा दोषीच होते. पण त्यांच्या दोषांकडे पाहिले नाही हे पुढील दोह्यांत सांगतात.

हिं.दो.- **प्रभु तरु तर कपि डार पर ते किए आपु समान ।**
**तुलसी कहू न राम से । साहिब सील-निधान ॥२९रा॥**
**राम निकाई रावरी है सबही को नीक ।**
**जैं यह साँची है सदा तौ नीको तुलसीक ॥२९म॥**
**एहि बिधि निज गुन दोष कहि सबहि बहुरि सिरु नाइ ।**
**बरनउँ रघुबर बिसद जसु सुनि कलि कलुष नसाइ ॥२९चं.॥**

म.दो.- **प्रभु तरुतळिं विटपीं कपी केले त्यां स्वसमान ।**
**तुलसी कुठे न रामसे स्वामी शील निधान ॥२९रा॥**
**राम भलेपण आपले असें भलें सकलांस ।**
**सदा सत्य जर वाक्य हें भलें तुलसिदासास ॥२९म॥**
**कथुनि दोष गुण निज असे पुन्हा नमुनि सर्वांस ।**
**वर्णी रघुवर-विशद-यश श्रवणें कलिमलनास ॥२९चं॥**

अर्थ — तर- तळ, खाली, डार- डहाळी, शाखा, निकाइ- चांगुलपणा, भलेपणा, नीक/नीक- चांगला, बहुरि- पुन्हा, मग; नाइ- नमून, रावरी- आपली, नसाइ- नाश होतो.

अर्थ — प्रभू रामचंद्र झाडाखाली (बसलेले असत) व वानरें त्याच झाडाच्या फांद्यांवर बसत, असे असता त्यास आपल्या समान केले. हे तुलसीदासा! रामचंद्रांसारखे शीलाचे निधान स्वामी जगात कोठेहि नाहीत. ।।रा।. हे प्रभो! रामा! आपले चांगुलपण सर्वांनाच चांगले असते हे वाक्य जर सदा खरें असेल तर ते आपले चांगुलपण तुलसीदासाचे सुद्धा भले-चांगले करीलच (यात संशय नाही).।।म।।

या प्रमाणे मी आपले दोष गुण वर्णन करून व पुन्हा एकदा सर्वांना नमन करून श्रीरघुवरांचे उज्ज्वल यश वर्णन करतो; (वर्णी-बरनउँ) त्याच्या श्रवणाने सकल कलि कलुष यांचा (मल, पाप) नाश होईल. ।।चं।।

टीका — दो. रा. (१) या दोह्यांत दाखवावयाचे आहे की माझ्या ठिकाणी जी पाच प्रकारची हीनता आहे तीच त्या कपींच्या ठिकाणी होती. तरी त्यांच्या त्या हीनतेकडे न बघता प्रभूंनीं त्यांना आपल्यासारखे केले. तसेच ते मलाही करतील.

(क) कपि निर्धन, ना वस्त्र ना अन्न, वनांतील पालेखाईर पशु, तसाच मीहि धनहीन, भिकारी, जडबुद्धि 'पशु पामर कपि अति कामी' तसाच मी.

(ख) स्वामी झाडाखाली, जमिनीवर व सेवकानीं त्या प्रभूच्या डोक्यावरील फांद्यावर बसण्यात स्वामीचा अपमान उपमर्द उघड उघड होतो. त्यात स्वामीला कमीपणा येतो. तसेच मी केले व करीत आहे.

(ग) ते वनचर तर मी खेडवळ, 'कुग्रामवस्ती कुलहीन सेवा!'

(घ) कपी शरीराने, कृतीने, वाणीने अमंगळ तसाच मी.

(ङ) ते मंदमति, पामर, मूढ तसाच मी. दो. २८ ची टीका पहावी. त्यांचे माझे दोष सारखेच. गुण एकच व तो माझ्यातहि आहेच. 'रामसेवक म्हणून घेण्यात महाभाग्य, आनंद वाटणे.' 'अम्हिं सब सेवक अति बड़ु भागी।" (४/२६/१३) असे जांबवान सर्व रामदूत कपींना म्हणाला आहे. सर्व कपी आपणास रामसेवक मानण्यात भूषण समजतात या एका गोष्टीकडेच प्रभूनीं पाहिले.

(२) सेवकाच्या कोणत्याहि अपराधाकडे न पाहता अंतःकरणांतील प्रेमाची सतत आठवण ठेऊन आपल्या बरोबरीचा मान सन्मान देणारे दुसरे स्वामी जगात कोठेही व कोणीही नाहीत. येथे पूर्ण अनन्य शरणागति दिसून येते.

(३) केले स्वसमान - 'नृपसदसिं वर्णिले' ह्या टीकेतील अवतरणें पहावी. सुग्रीव बिभीषणादिकांची पूजा अद्यापही रामार्चनांत होते. 'मम सहित शुभ ही कीर्ति तुमची गाति जे प्रेमें अती। संसार सिंधु अपार पार किं नर विनाश्रम पावती' (६/१०६छं) यापेक्षा आणखी समानता कोठली पाहिजे? ते कपि जिवंत असता राममातेने व राममित्रानीं त्यांस रामासारखे मानले. त्यांच्या कीर्तीने भवसागर तरून जाण्याची

सोय केली; या गोष्टी कोणता स्वामी करू शकतो? कोणी केल्या? 'हीनैर्दीनैर्मलीनैश्च बीभत्सैर्कुत्सितैरपि ।
महतोऽच्छिद्रसंश्लेषः सौशील्यं विदुरीश्वराः' (भगवद्गुणदर्पण मा.पी.) हीन दीन मलीन बीभत्स, कुत्सि इत्यादींच्या सुद्धा छिद्रांना-दोषांना-न पाहतां त्यांचा आदर करणें म्हणजे सुशीलता, राम असल्या सुशीलतेचे निधान आहेत हे ठरलेच,

**उपदेश** : येथे साधकांस उपदेश ग्रहण करण्यासारखा आहे व कृतीत उतरविण्या सारखा आहे की एकाच देवावर पूर्ण निष्ठा ठेवा. कितीहि संकटे आली तरी आपल्या उपास्य देवाशिवाय इतर कोणाजवळ तोंड वेंगाडू नका. आपला देव सर्व समर्थ, परमकृपालु, दीनवत्सल आहे हे वारंवार आठवा. साधनात मनोनिग्रह, इंद्रियजय करण्यास आपण स्वतः असमर्थ आहात. पण तोच आपल्या कृपेने सर्व पुरे करील, न जाणता किंवा जाणून होणाऱ्या आपल्या चुकांकडे तो बघणार नाही. पण त्याच्यावर अंतःकरणात निष्कपट प्रेम पाहिजे व हृदयात व वाणीत परम लीनता पाहिजे (परम दीनता, कार्पण्य, हृदयात पाहिजे. बाह्यावडंबराची किंमत प्रभूला नाही. तो अंतःकरणाकडे बघतो).

**दो. ३ -** (१) - मागील दोह्यांत विशिष्ट सेवकांचीच उदाहरणे दिली. **यात सार्वत्रिक नियम सांगतात.** कोणी कितीही दुष्ट अनाचारी असला तरी तो जर रामप्रभूस अनन्य शरण जाईल तर त्याला प्रभू आपल्यासारखा करतात. त्यांच्या या सुशीलतेला - चांगुलपणाला - मर्यादा नाही. 'कोटि विप्रवध पाप जयासी । त्यजीं न येता शरण तयासी ॥ शरण सभीत असे जर आला । प्राणांसम रक्षीन तयाला॥' (५/४४/ १,८) 'प्रभु जन अवगुण मनीं न आणति । स्वभावेंचि मृदु दीन बंधु अति।' (७/ १/६) (२) **'सदा सत्य जर वाक्य हें'** - वर केले ते आपल्या स्वभावाचे वर्णन, जे वानरादिकांच्या उदाहरणांवरून सत्य आहे असे दिसले, तो आपला सहज स्वभाव असून सुद्धा एकरस आहे असे संत वर्णन करतात, ते जर खरें असेल तर.

(क) येथे तुलसीदासांस संशय नसून ते संतांचे व भगवंतांचे स्वतःचे वाक्य व ब्रीद पणाला लावीत नसून आपला स्वतःचा एकच सद्गुण अनन्य शरणागति हा पणास लावीत आहेत.

(३) तुलसीदासांची ही दृढ विश्वासयुक्त प्रतिज्ञा फलीभूत झाली. ते रामसमान झाले एवढेच नव्हे तर रामाहून ही मोठे झाले. कारण इंग्लंड, फ्रान्स वगैरे देशात रामाला परमात्मा मानीत नाहीत, पण तुलसीदासांचे रामायण भाषांतरित करून वाचणारे अनेक लोक आहेत. तुलसीदासांचा स्वताचा अनुभव पहा - 'मिळे न फुटकी कौडिही कोण पुसे की काज । जो महाग केला तुलसी राम दीन सखराज। घर घर तुकडे मागतां अतां पुजिति नृप पाय । कीं तुलसी तैं रामविण आता राम सहाय ॥' (दोहावली १०८, १०९) विनय पत्रिका पद ७२, ७५ पहावीत. १९५७ मध्ये मास्कोत तुलसी जयन्ती साजरी केली गेली. रामनवमी साजरी केली जात नाही.

**दोहा (चं) -** (१) कथुनि दोषगुण-असे- 'मज निज मतिबल निश्चिति नाहीं' (१/

८/४) पासून या दोह्यांपर्यंत अनेकांना नाना प्रकारे वर्णन करून सांगितलेले अपार दोष व गुण फक्त एक की अनन्य शरणागत रामसेवक असणे हा. त्यामुळे राम पूर्ण कृपा करतील. ही दृढनिष्ठा व अनन्यगतिक दीनता. उदाहरणे देण्याची आवश्यकता नाही. (२) पुन्हा-नमुनि सर्वांस - बालकांड मंगलाचरणापासून नामवन्दना पर्यंत ज्यांना ज्यांना नमन केले त्या सर्वांना पुन्हा नमस्कार करून, त्या सर्वांनी मागे विनविल्याप्रमाणे कृपा करावी; कारण रघुपति कथा वर्णन करावयाची आहे.
(क) येथे नमन प्रकरणाचा उपसंहार झाला.
(ख) येथे सुद्धा या ग्रंथाची फलश्रुति पुन्हा थोडक्यात सांगितली व सुचविले की रघुनाथाने कृपा केली आहे व त्या कृपेमुळे कलिकलुष विनाशन शक्ति या ग्रंथात निर्माण होईल अशी खात्री वाटते. दोहा १५ व पूर्वीच्या ३/४ चौपायात फलश्रुति सांगितली ती शिवकृपा झाल्याची खात्री वाटल्यावरच सांगितली आहे. तसेच रामकृपानुभव आल्यावर येथे केले. प्रथम रामकृपेने सद्गुरु संतकृपा, नंतर नामकृपा व नामकृपेने शेवटी पूर्ण रामकृपा अशा या वास्तविक क्रमानेच येथपर्यंत वर्णन केले आहे.
(३) रघुवर विशद यश वर्णन करतो असे येथे म्हटले. जी कथा वर्णन करणार ती कशाच्या आधारावर हे प्रथम मंगलाचरणात 'नानापुराण ... आतनोति' या श्लोकात सांगितले आहे; तथापि ती रामायण कथा कशी प्राप्त झाली वगैरे शंका व प्रश्न सज्जन विचारणार, हे जाणून पुढील चौपायात श्रीरामचरित मानसाची श्रवणपरंपरा -गुरुपरंपरा - सांगतात. कारण की गुरुपरंपरेने चालत आलेल्या सिद्धांतानाच संत मान देतात व ते शाश्वत असतात. 'जंव नेणिजे गुरु-संतति । तंव न पालटे अज्ञान राति । न प्रगटे स्वयंज्योति । ज्ञान सूर्यो ॥३०॥ वेदशास्त्र पुराण । तयां बोले अधःपतन । जो नाही परम ज्ञान । गुरुपरंपरेचे' ॥३१॥ (विवेक सिंधु प्र. १८) म्हणून गुरुपरंपरेचे ज्ञान आवश्यक जाणून सांगतात.

श्री मानस गूढार्थ चंद्रिका बालकांड अध्याय ४ था टीका समाप्त.

# अध्याय पाचवा

हि.- जागबलिक जो कथा सुहाई । भरद्वाज मुनिवरहि सुनाई ॥१॥
कहिहौं सोइ संबाद बखानी । सुनहु सकल सज्जन सुख मानी ॥२॥
म.- याज्ञवल्क्य जी वदले मुनिवर । कथा भरद्वाजाला सुंदर ॥१॥
त्या संवादा वदुं विस्तारुनि । ऐका सुजन सर्व सुख मानुनि ॥२॥

अर्थ – मुनिश्रेष्ठ याज्ञवल्क्यानी जी सुंदर कथा मुनिवर भरद्वाजाला सांगितली - ॥१॥ ती संवादरूप कथा मी विस्तार करून (बखानी) सांगणार आहे; तरी आपण सर्व सज्जन सर्व सुख मानून ती श्रवण करा (अशी माझी विनंती आहे.) ॥२॥

टीका - चौ. १ - २; या मानसात चार संवाद आहेत व ते मिश्रित आहेत. (१) तुलसीदासजी कथा सांगणार आहेत ती स्वतंत्र, कपोल कल्पित नाही.

(क) तिला आधार याज्ञवल्क्य-भरद्वाज संवाद आहे. हे सांगून त्या संवादाचे बीज येथे पेरून ठेवले. त्या संवादास प्रारंभ (दो. ४३) 'अता वदूं द्वय मुनिवरीं मिलन सुभग संवाद' याने होईल (२) उमामहेशांचा जो संवाद याज्ञवल्क्यांनीं श्रवण केला तो ते सांगतील. 'अतां यथामति सांगु तो उमाशंभुसंवाद' (१/४७) (३) काकभुशुंडी गरुड संवाद महेशानीं श्रवण केला, तो ते उमेस सांगतात -'श्रुणु शुभ कथा भवानि -जी भुशुंडि वाखाणि ऐके खगनायक गरुड' (१/१२०म) (४) तीच कथा विस्तारपूर्वक सांगणार आहे इतकेच.

(क) सर्वसुख मानुनि - सज्जनांना ज्या प्रकारचे सुख आवडते ते ते सर्व या कथेत मिळेल अशा भावनेने श्रवण करावे. सज्जनाना कर्म, उपासना, ज्ञान व प्रेमभक्ति यांचीच मुख्य रुचि असते; शिवाय उपांग म्हणून धर्म, नीति, मर्यादा, आचार यांची आवड असते. याने सुचविले की या सर्व प्रकारचे सुख या कथेपासून मिळेल. (ख) सुजन-सज्जन-शब्दाने सुचविले की इतरांस सर्व सुख मिळेलच असे सांगता येत नाही. कारण यात 'नाना विषयकथारस' असणार नाही. अर्थापत्तीने ठरले की ज्यांना ही कथा श्रवण करून सुख होईल ते सज्जन आहेत. ही एक परीक्षाच आहे असे समजण्यास हरकत नाही.

## याज्ञवल्क्य-ऋषि

याज्ञवल्क्य शुक्ल यजुर्वेदाचे द्रष्टे-ऋषि-होत. यांची कथा स्कंदपुराण- हाटकेश्वर माहात्म्यात आहे. हे ब्रह्मदेवाचे अवतार. यांनी शाकल्य ऋषींजवळ वेदाध्ययन केले. पुढे गुरुशिष्यात मतभेद झाल्याने, शिकलेली विद्या ओकून टाक असे गुरुंनी सांगितले. त्याप्रमाणे केल्यावर ते मूढवत बनले. पुढे हाटकेश्वर क्षेत्रात सूर्याची

उपासना व तपश्चर्या केली. सूर्याने प्रसन्न होऊन वर मागण्यास सांगितले. चारी वेद मला सांगोपांग यावे असे मागितले. सूर्याने त्यास एक मंत्र देऊन सूक्ष्मरूप धारण करण्याची शक्ती दिली. ते सूर्याच्या घोड्याच्या कानात बसून ऐकत व सूर्य शिकवीत असत. याप्रमाणे सर्वविद्या संपन्न होऊन आल्यावर पूर्वगुरुला भेटून पूर्वीच्या विद्येची दक्षिणा मागण्यास सांगितले. त्यांनी सूर्याजवळून शिकलेली विद्या मागितली तेव्हा ती दिली. यांना दोन स्त्रिया होत्या मैत्रेयी व कात्यायनी. जनकराजाच्या सभेत या ऋषींनी सर्वांना वादविवादात जिंकले. हे महायोगी होते. अधिक माहिती दो - ४५ मध्ये पहावी.

हिं.- **संभु कीन्ह यह चरित सुहावा । बहुरि कृपा करि उमहि सुनावा ॥३॥**
**सोइ सिव कागभुसुंडिहि दीन्हा । राम भगत अधिकारी चीन्हा ॥४॥**
**तेहि सन जाग बलिक पुनि पावा । तिन्ह पुनि भरद्वाज प्रति गावा ॥५॥**

म.- **शंभु चरित हे सुंदर रचिती । पुढे कृपेने उमेसि कथिती ॥३॥**
**ते शिव काकभुशुंडिस अर्पिति । रामभक्त अधिकारी परीक्षिति ॥४॥**
**तेथुनि लाभ याज्ञवल्क्याला । त्यानी कथित भरद्वाजाला ॥५॥**

**अर्थ** — प्रथम शंभूनी हे सुंदर चरित्र रचिले; (केले - कीन्हा) नंतर त्यांनीं ते कृपेने उमेला सांगितले. ॥३। तेच शिवाने काकभुशुंडीस दिले पण रामभक्त आहे अशी परीक्षा केली तेव्हा ॥४॥ त्या चरित्राचा लाभ काकभुशुंडीकडून याज्ञवल्क्याला झाला; व त्यानी ते भरद्वाजाला सांगितले ॥५॥

**टीका - चौ. ३ (१) शंभुचरित हे सुंदर रचिती -**

(क) याज्ञवल्क्यभरद्वाज संवाद मी सांगतो असे पूर्वी म्हटले, त्यावर प्रश्न येणार की त्यांनी कोणाजवळ श्रवण केले? म्हणून श्रीरामचरित मानसाची परंपरा मूळापासूनच सांगतात.

(ख) शंभु - भाव हा की शं - सुखं भवति इति शंभु. शंकरांनी स्वतःच्या सुखासाठी त्याची रचना प्रथम केली.

'स्वान्तःसुखाय' तुलसीदासही करीत आहे.

(ग) पहिल्या चौपाईत कथा शब्द आहे व येथे चरित शब्द आहे. प्रथम कथा सांगतील व मग चरित सांगतील. दोन्हीचे बीज पेरून ठेवले. (२) **कृपेने उमेस सांगति -सुचविले की जो कोणी हे चरित्र सांगेल तो त्या श्रोत्यावर मोठी कृपा करतो असे समजावे.**

(क) उमा-पार्वती परमअधिकारी आहे असे जाणून काही काळाने तिला सांगितले. **हा काही काळ म्हणजे कित्येक कल्पे आहेत हे पुढे** दिसेल. शंकरांच्या दृष्टीने काही काळ समजावयाचा आहे. **या चौपाईत 'कथिती' शब्द आहे हे नीट लक्षात असावे.**

**चौ - ४ - (१) या चौपाईत सांगितले, ऐकले वगैरे शब्द नाहीत.** दिलें (दीन्हा) **अर्पिले** म्हणण्यात गूढ भाव आहे. शंकरांनी ते स्वतःच्या मुखाने काकभुशुंडीस सांगितले नाही म्हणून कथिले म्हटले असते तर ते असत्य कथन झाले असते. **काकभुशुंडीस** ते सांगितले लोमश ऋषींनी, 'मेरुशिखरिं वट छाये मुनिलोमश आसीन। ... 'कांही काळ मुनि मजसि ठेवती। रामचरितमानस तैं वदती' (७/११९; ११३/९) तेथे सांगितले या अर्थाचा शब्द आहे. या दोन ठिकाणच्या भिन्न अर्थाचा भिन्न पंडितांस सुद्धा उलगडा होत नाही; तथापि मर्म ध्यानी येण्याचे खुणेचे शब्द 'दीन्हा व धीन्हा' अर्पिति -परीक्षिति' हे घालून ठेवले आहेत. व तेथे ज्या मुनीस कधी क्रोध यावयाचा नाही त्यांना क्रोध आणवून **परीक्षा घेतली गेली आहे.** परीक्षेत उत्तीर्ण झाला असे ठरल्यानंतर लोमशांची बुद्धि पुन्हा फिरवून त्यांचे मुखाने चरित्र सांगितले आहे. 'रामचरित सर गुप्त मनोहर । मज लाभले कृपेने शंकर' असे तेथे लोमशमुनि म्हणाले आहेत. **शंकरांनी** मला जे **सांगतले ते तुला सांगतो असे म्हटले नाही.** 'शंकर कृपेने मिळाले व मी तुला सांगितले असे मुनि म्हणाले. मिळाले होते असेहि म्हणाले नाहीत. भाव हा की आताच मला मिळाले व मी तुला सांगितले. लोमशानी फक्त माध्यमाचे काम केले, असे म्हणावे लागते. **शंकरानीं लोमशाना माध्यम करून काकभुशुंडीला ते सांगितले म्हणून दिले अर्पिले असे येथे म्हटले.** अर्थाचे असे धागेदोरे मानसात पुष्कळ ठिकाणी विणलेले आहेत. ते त्या त्या योग्य ठिकाणांच्या - वचनांचा मेळ घालून उलगडावे लागतात. मूळांतील 'धीन्हा' शब्दाने 'परीक्षा घेतली' हा अर्थ चटकन ध्यानात येत नाही म्हणून अनुवादात तो -स्पष्ट घालून कोडे उलगडण्याची किल्ली अगदी वर ठेविली आहे. उत्तर काण्डात **'लीन्ही प्रेमपरीच्छा मोरी'** 'माझी प्रेम **परीक्षा घेती**' (११३/२) असे स्पष्ट आहे. परीक्षा कशी घेतली हे १११/१-११३/६ उत्तर काण्डात पहा.

(२) **रामभक्त अधिकारी परीक्षिति** - याने सुचविले की ज्याला हे सांगावयाचे तो रामभक्त - रामभक्तिप्रिय - आहे की नाही हे पाहून किंवा होण्याला अधिकारी आहे हे पारखून मगच सांगावे. 'रामभक्ति मनिं ज्यांचे नाही । वदणें त्यास न तात! कदा ही' (७/-११३/१३) असे लोमशानीच सांगितले आहे. या वचनाने पहिला भाव सिद्ध होतो. 'रामकथेचे ते अधिकारी । सत्संगति ज्यांना प्रिय भारी ॥ प्रीति गुरुपदीं नीति निरत जे । अधिकारी -द्विजसेवा रत जे' ॥ याने दुसरा भावार्थ सिद्ध होतो. हे शंकरांनी उमेला सांगितले आहे. अनाधिकारी कोण हे उ.कां -१२८/३-५ पहा. (मा. पी. मुद्दाम पहा!)

**चौ. ५ — (१) तेधुनि — तेहि सन** - **त्यापासून** - मागील **चौपाईत** ज्याचा उल्लेख **केला** त्या काकभुशुंडीपासून असा अर्थच योग्य - एक चौपाई सोडून दूरान्वय **करून शंकरांचा संबंध** जोडणे योग्य नाही. तेहि हे एकवचन आहे. पुढल्या चरणात **याज्ञवल्क्यांबद्दल** 'तिन्ह' हे **बहुवचन** वापरले आहे. असे असता एक वचनानेच **शंकरांचा बोध** करणे अशक्य आहे. काकाबद्दल एकवचन वापरणे चूक नाही.

**भलताच अर्थ घेतला जाऊ नये म्हणून हा भेद निर्माण करून ठेवला असता काही टीकाकार शंकर असा अर्थ करतात. योग्य वाटल्यास घ्यावा.**

(२) ज्यांना चौथ्या चौपाईतले कोडे सोडवता आले नाही ते म्हणतात की काकभुशुंडीने शंकरांकडे जाऊन पुन्हा श्रवण केले. पण असे काही तरी काल्पनिक उत्तर दिल्याशिवाय दोन ठिकाणच्या वचनांचा समन्वय करणे अशक्य होते.

(क) पहिल्या-चौपाईत केलेल्या उपक्रमाचा या दुसऱ्या चरणात उपसंहार केला. शंभु - काकभुशुंडी - याज्ञवल्क्य व भरद्वाज अशीही परंपरा सांगितली. पुढील सर्व परंपरा ग्रंथात देणे अनावश्यक व अप्रस्तुत, म्हणून या श्रोत्या वक्त्यांचे वैशिष्ट्य गुरुपरंपरास्तुतिरूपाने सांगून मग स्वतः कोणापासून कधी, कोठे श्रवण केले ते सांगतील.

**हिं.- ते श्रोता बकता समसीला । सबँदरसी जानहिं हरिलीला ॥६॥**
**जानहिं तीनि काल निज ग्याना । करतल गत आमलक समाना ॥७॥**
**औरउ जे हरिभगत सुजाना । कहहिं सुनहिं समुझहिं बिधि नाना ॥८॥**
**म.- ते श्रोते वक्ते सम शीले । सर्वदर्शि जाणति हरि-लीले ॥६॥**
**त्रिकालज्ञ ते, आत्मज्ञाना । जाणति करिं आमलक समाना ॥७॥**
**इतर सुज्ञ हरिभक्तहि किती तरि । सांगति ऐकति समजति बहुपरिं ॥८॥**

**अर्थ** — ते सर्व श्रोते वक्ते शीलाने सारखे असुन सर्वदर्शी (सर्वज्ञ) व हरिलीलांना जाणणारे आहेत. ॥६॥ ते त्रिकालज्ञानी असुन त्यांना आत्मज्ञान (निज-ग्याना) करतलावरील, हाताच्या तळव्यावरील आवळ्या सारखे (साक्षात) आहे ॥७॥ इतर बरेच श्रोते वक्ते सुजाण (सुज्ञ) हरिभक्त होते ते अनेक प्रकारे सांगत ऐकत व समजत असत. (असतात) ॥८॥

**टीका — चौ. ६ - (१) ते श्रोते वक्ते** - शिव, काकभुशुंडी, याज्ञवल्क्य, भरद्वाज.

**(क) सम शीलें** - शीलाने सारखे असल्याने श्रोत्या वक्त्यांना परस्परांविषयीं समान आदर वाटतो. जेथे श्रेष्ठ कनिष्ठ भाव असेल, तेथे श्रेष्ठतेच्या जोरावर काहीहि दडपून दिले तरी चालण्यासारखे असते. जेथे श्रोता नि.शंकपणे शंका विचारतो, घाबरत किंवा लाजत नाही तेथे समाधान कपोलकल्पित किंवा तोंड बंद करण्यापुरते किंवा 'शेषं कोपेन पूरयेत्' यापद्धतीने करून भागत नाही.

(२) **सर्वदर्शि जाणति हरिलीले** - (क) सर्वदर्शी — सर्वज्ञ, सर्वशास्त्रज्ञ असे असल्याने कथासंदर्भ, गूढार्थ, ध्वनि, अलंकार, शब्दार्थ, वाक्यार्थ, इत्यादीबद्दल खल करावा लागत नाही. अशास्त्रीय शंका, कुतर्क काढीत नाहीत. ते केवळ 'तच्चिन्तनं तत्कथनं अन्योन्यैस्त प्रबोधनम्' यासाठी श्रोते वक्ते बनत असतात. अशा प्रकारच्या सर्वज्ञ समानशील श्रोत्या वक्त्यामधील श्रवणमननाला ब्रह्मसत्र म्हटले आहे. (वेदस्तुति) 'तुल्यश्रुत तपःशीलाः स्तुल्यस्वीयारि मध्यमाः अपि चक्रुः प्रवचनम् एकं

शुश्रुषवोऽपरे ॥११॥ (भाग १०/८७/११) असे वेदस्तुतीच्या उपक्रमात म्हटले आहे. अशांमध्ये वादविवादाची प्रवृत्ति किंवा जयापजयाची भावना कोणालाच शिवत नाही. **या चौपाईत तुल्यशीलत्व व तुल्यश्रुतत्व सांगितले.** तुल्यतप -तुल्यज्ञान पुढल्या चौपाईत सांगतील. असे असल्याने त्यांच्या संवादातील कथेत असत्य, अशास्त्रीयता, श्रोतृमनोरंजनासाठी वाटेल ते सांगणे, अश्लीलता, धर्मविरोध, पाखंड मत, **माझे मत म्हणून मानलेच पाहिजे, इत्यादि दोष नसतात. म्हणजेच त्यांचा संवाद सर्व प्रकारे निर्दोष, निष्कलंक व सर्वहितकर्ता परम विश्वसनीय व श्रद्धेय असतो.**

(३) हे सर्व वर्णन करण्यात एक हेतु हा आहे की मी सांगणार आहे ती कथा, ते चरित्रे अशा महाविभूतींच्या शुद्धतम परंपरेतून चालत आल्याने त्यात वर सांगितलेले सर्व गुण आहेत.

**चौ - ७ - (१)** त्रिकालज्ञता व आत्मज्ञान या दोन गोष्टी अगदी भिन्न व परस्परांवर अवलंबून नसणाऱ्या असल्याने त्यांचा स्वतंत्रपणे भिन्न भिन्न उल्लेख केला आहे.

(क) त्रिकालज्ञता नसेल तर वक्त्याने पूर्व काळांतील सांगितलेली हकीगत खरी की खोटी, व पुढे अमुक होईल म्हणून जे सांगितले ते किती खरे, व वर्तमान काळच्या गोष्टींचे वर्णन यथार्थ आहे की नाही हे श्रोत्यांस समजणे शक्य नाही. अशा स्थितीत तो काही गोष्टी खऱ्या, काही खोट्या - अशक्य, सर्वच खऱ्या किंवा सर्वच बनावट मानील, पण जेथे श्रोते वक्ते त्रिकालज्ञ आहेत, तेथे तिन्ही काळांतील केलेले उल्लेख सत्यच असणार, 'जाणे भूत भविष्य वर्तमान । यासही म्हणती ज्ञान । परि जेणे होय समाधान । ते ज्ञान नव्हे' (दा. बो)

(ख) **मग आत्मज्ञानाची आवश्यकता काय?** - दृढ अपरोक्ष साक्षात्कार नसेल तर अध्यात्माचे केलेले विवरण यथार्थ आहे की नाही हे समजणार नाहीं, तसेंच ज्या गोष्टी गुरुगम्य म्हणून, स्वानुभवगम्य म्हणून उघड उघड सांगितलेल्या नसतात त्यातील गूढार्थ लक्षात येणार नाही. उदा. 'लहान होडीत हत्ती चढत असता ती जशी डोलते तशी रावण चालू लागला की पृथ्वी डोलते' याचा अर्थ समजण्यास लहान होडींत वजनदार शरीर चढताना होडी कशी डोलते याचा अनुभवच पाहिजे. सूर्य कसा असतो याचे वर्णन जन्मांधापुढे कितीहि केले तरी त्यास यथार्थ कल्पना येणार नाही, व जे वर्णन केले ते खरे की खोटे हेहि कळणार नाही. 'अनुभवाच्या खुणा अनुभवीच जाणती॥'

(ग) **मानस पीयूषांत निजज्ञान म्हणजे आत्मज्ञान हा अर्थ एकाहि टीकाकाराने केलेला नाही** हे आश्चर्य वाटते. "आपल्या ज्ञानाने त्यांना तिन्ही काळांचे ज्ञान तळहातावरील आवळ्यासारखे असते." असा अर्थ केला आहे! आणि भागवतातील समानार्थक श्लोक देऊनहि 'विज्ञानावसितं तव' याचा अर्थ 'आपल्या ज्ञानाचा विषय आहे' असा केला आहे! **अवसित ज्ञात, समाप्त, अंत,** अवगत, एवढेच अर्थ आहेत. 'सर्वं ह्येतद्भवान्वेद भूतभव्यभवत्प्रभुः ।. करामलकवद् विश्वं विज्ञानावसितं

तव' (भाग-२/५/३) आपण भूतभविष्यवर्तमान यांचे प्रभु असल्याने हे सर्व आपण जाणता कारण विज्ञानापर्यंत सर्व विश्व आपल्या हातावर आवळ्यासारखे आहे. यात **विश्वज्ञान व आत्मज्ञान या दोहोंना करामलक उपमा दिली आहे.** दुसरे एक टीकाकार म्हणतात की **आत्मज्ञान आवळ्यासारखे पथ्य (हितकारक)** आहे म्हणून आवळा म्हटले व बोर कुपथ्य आहे, म्हणून अयोध्या कांडात विश्वाच्या ज्ञानाला बदर (बोर) म्हटले. वरील श्लोकांत विश्वज्ञानाला आवळाच म्हटले आहे. त्यांच्या म्हणण्याचा अर्थ हाच की, **तुलसीदासांनी त्रिकालज्ञानाला आवळा म्हटले नसून, आत्मज्ञानाला म्हटले आहे,** त्रिकालज्ञान हे विश्वाविषयी असू शकते व सगुणसाकार अवताराविषयीं हि असू शकते. **अयोध्या कांडात दोन ठिकाणी विश्वाच्या - जगाच्या ज्ञानास तुलसीदासांनी बदर-बोर म्हटले आहे.** २/१२५/७. व २/१८२/१.
(घ) बोर व आवळा ही उपमाने क्रमशः विश्व व आत्मज्ञान यांना कां वापरली हे अयोध्या १२५/७च्या टीकेत स्पष्ट केले आहे व स्वतंत्र विस्तृत लेख लिहिलेला असून मा.मणि मासिकात फेब्रु-१९५५ प्रसिद्ध झाला आहे. ते विवरण पाहिले म्हणजे तुलसीदासांच्या तत्वग्राही सूक्ष्मतमप्रतिभेने श्रीव्यासांच्यावर ताण केली आहे हे पटेल. येथे एवढेच सांगणे पुरे की **आत्मज्ञान एकरस असते तसा आवळा आहे. व विश्वात विषमता असते तशी बोरांत असते.**
(ङ) **एकाने अमलक = जल अर्थ घेतला आहे, एकाने दर्पण- आरसा अर्थ केला आहे.** पसंत पडेल तो घ्यावा! येथे तळहातावरील आवळा याने साक्षात्, अपरोक्ष, पूर्ण निःसंशय ज्ञान.
(च) **त्रिकालज्ञता ही एक योगसिद्धि आहे.** मणि, मंत्र, औषधि, तप व योग (समाधि) यांनी सिद्धि मिळू शकतात, पण **आत्मज्ञान असेल तेथे त्रिकालज्ञान असेलच असे नाही; आणि त्रिकालज्ञान असेल तेथे आत्मज्ञान असते असेहि नाही. 'या दोघांचा अल्पहि नाही संबंध कि जाणा'** ॥प्रज्ञा॥. 'म्हणति तात तो **परम विरागी । तृणसम सिद्धी त्रिगुणां त्यागी'** (३/१५/८) ही परमवैराग्याची व्याख्या आहे, हे श्रीमुखवचन आहे.
येथे उत्तम श्रोत्यावक्त्यांचे वर्णन केले. आता उत्तम किंवा मध्यम वक्ते मध्यम श्रोते याविषयी सांगतात.
**चौ. ८ —** (१) यात इतकेच सांगावयाचे आहे की मध्यम श्रोत्यांना नुसत्या श्रवणाने समजण्यासारखे ते संवाद नाहीत. त्यांना बहुपरीं- नाना प्रकारे सांगावे लागेल. व्याख्यान प्रवचन पद्धतीने समजाऊन सांगावे लागेल. पदच्छेद, पदार्थ, समासांचा विग्रह, अन्वय, संभाव्य शंका व त्यांचे समाधान हे सहा प्रकार व्याख्येत करावे लागतात. (२) समजण्यात नुसता शब्दार्थ व वाक्यार्थ समजून भागत नाही. त्या अर्थाचा पूर्वापर संदर्भ संगति ग्रंथविषयसंगति, व प्रकरणविषयसंगति यांचा समन्वय करणे जरूर असते. ध्वनि, भाव, व्यंग्य, लक्षणा, उपलक्षणा, इत्यादि अनेक गोष्टी लक्षात घेण्याची जरूरी असते म्हणून 'बहुपरिं' हे शब्द घालावे लागले.

याज्ञवल्क्य-भरद्वाजांसारखे वक्ते श्रोते असतील तेथे हे नाना प्रकार जरूर नसतात, म्हणून तेथे बहुविधि, बहुपरि शब्द नाहीत. या ग्रंथाचे मूळ महेशनिर्मित अतिगूढ होते हे मुख्यतः येथे सांगावयाचे आहे. आता स्वतः विषयी सांगतात -

हिं.- **मैं पुनि निज गुर सन सुनी कथा सो सूकरखेत ।।**
**समुझी नहिं तसि बालपन तब अति रहेउ अचेत ।।३०रा.।।**

म.- **गुरुवदले मज ती कथा सूकरखेति सुजाण ।**
**बालपणे नुमजे तशी तैं मी फार अजाण ।।३०रा।।**

**अर्थ** – (अशाप्रकारे गुरुशिष्य परंपरेने चालत आलेली) ती कथा माझ्या सुजाण गुरुंनी सूकरखेत या गावी मला सांगितली; पण त्यावेळी माझे बालपण असल्याने व मी फार अज्ञानी (अजाण) असल्याने ती जशी समजावयास पाहिजे होती तशी समजली नाही ।।३०रा।।

**टीका** – तुलसीदास येथे दाखवितात की ते मध्यम अधिकारीहि नव्हते.
(क) बालपणाचा उल्लेख असून 'अति अजाण' हा उल्लेख असल्यामुळे बाल–अज्ञानी हा काही टीकारानी घेतलेला अर्थ येथे घेता येत नाही. हे लोक सांप्रदायांतील पक्षाभिमानाने मूळगोसाईचरित्र मान्य करीत नाहीत व सोरों म्हणून असलेला गाव म्हणजेच सूकरखेत हे ठसविण्यासाठी असला उपद्व्याप करतात. या विषयी विस्तृत विवेचन प्रस्तावनेत पहावे. यावेळी तुलसीदासांचे वय ९ ते १० पर्यंतचे होते. या अवस्थेलाच येथे बालपण म्हटले आहे. या श्रवणापूर्वी त्यांनी नरहरि आनंदांजवळ पाणिनीसूत्रांचे म्हणजेच अष्टाध्यायीचे अध्ययन केले होते. असामान्य मेधा असलेल्या व्यक्तींच्या बाबतीत हे सहज घडते. धारणा, पठनशक्ति असामान्य असली तरी व्यावहारिक ज्ञान, तर्कशक्ति इत्यादि कमी असल्याने दृष्टान्तादि न समजणे हा बालबुद्धीचा सहजदोष असतो. कोणते हि नवीन ज्ञान पूर्वीच्या ज्ञानाच्या साह्यानेच मिळत व वाढत असते. (२) **त्यावेळी फार अजाण** (अचेत) **होतो** यात हा भाव आहे की हल्ली जितका अज्ञानी आहे त्यापेक्षा फारच अज्ञानी होतो.
(३) **सूकरखेत** – हे एका गांवाचे नाव आहे. हे संयुक्त प्रांतातील गोंडा जिल्ह्यात आहे. अयोध्येपासून तीस मैल आहे. येथेच अनंतानंदाचे शिष्य नरहरिआनंद रहात असत. मूलगोसाई चरित्राचे लेखक या गावचेच राहणारे होते असा ऐतिहासिक लेखीपुरावा उपलब्ध आहे; आणि हा पुरावा सूकरखेत विषयीं वादविवाद निर्माण होण्याच्या पूर्वीचा व गोंडा जिल्हा गॅझेटमध्ये एका इंग्लिश अधिकाऱ्याने लिहिलेला आहे, तो प्रस्तावनेत दिला आहे. अनंतानंदांची शिष्यपरंपरा येथे अद्याप असून त्यावेळच्या पसका संस्थानच्या राजाने त्यांस इनाम दिलेली जमीन अद्याप त्या मठाकडेच आहे; व त्यावर त्या राजाचे वंशज अद्यापहि शेतसारा (पट्टी) घेत नाहीत. **विस्तार प्रस्तावनेत तुलसीदास चरित्रात पहावा.**

(क) हिंदी दोह्यांत सुजाण शब्द नाही; पण पुढील दोह्यांतील शब्दांनी तो सूचित केला असल्याने येथे अनुवादात तो स्पष्ट घातला.

(४) गुरुंचे नाव येथे दिलेले नाही ते त्यांच्या अन्यग्रंथात नरहरि आढळते. परम गुरूंचे नाव दिले नाही कारण नरहरिगुरूंनी ती कथा त्यांच्या जवळ श्रवण केलेली नव्हती. स्वतः शंकरांनी ती स्वप्नात सांगितली. (तु, दा. च. प्रस्तावनेत पहावे) पुढील दोह्यांत गुरुंचे ज्ञाननिधित्व सुचवून स्वतः विषयी सांगतात.

हिं.- **श्रोता बकता ग्याननिधि कथा राम कै गूढ**
**किमि समुझौं मैं जीव जड कलिमल ग्रसित बिमूढ ॥३०म॥**

म.- **।श्रोता वक्ता ज्ञाननिधि राम कथा की गूढ।**
**कशि समजे मी जीव जड कलिमल ग्रसित विमूढ ॥३०म॥**

**अर्थ** — रामकथा गूढ असल्याने वक्ता व श्रोता हे दोघेही ज्ञाननिधि पाहिजेत, पण मी कलिमलाने ग्रस्त झालेला व विमूढ असल्याने मला ती (एकदा श्रवण करून) कशी समजणार? ॥३०म॥

**टीका** — (१) दोघेही ज्ञाननिधी असले तर समजणे शक्य हे सांगून स्वतःची श्रोत्याचीच पूर्ण अपात्रता वर्णन करून वक्त्याचे ज्ञाननिधित्व सुचविले व पुढील चौपाईने हि ते दृढ केले आहे. हा गूढार्थ स्पष्ट करण्यासाठीच मागल्या दोह्यांत 'सुजाण' शब्द मराठीत घातला आहे.

(क) यावरून हे सिद्ध होते की रामचरित कथा लिहिलेली नव्हती. मुखपरंपरा, श्रवणाची परंपरा, भरद्वाजांपर्यंत तुलसीदासांस कळली. पुन्हा शंकर नरहरि, तुलसीदास अशी परंपरा सुरू झाली. 'मम भाषित रघुपति कथा ताहि (त्यास) सुनावहु जाय। जब उघरहिं अंतर दृगन्हि तब सो कहिहि बनाय पुनि पुनि ताहि सुनावत भे। अति गूढ कथा समुझावत भे'(मू. गो. च.)

(२) की रामकथा गूढ - 'उमे रामगुण गूढ पंडित मुनि पावति विरति । पावति मोह विमूढ जे हरिविमुख, न धर्मरति' (३ मं. सो.) 'निर्गुणरूप सुलभ अति सगुण न जाणे कोणि । सुगम अगम चरितां श्रवुनि जाती मुनिहि भुलोनि' (७.७३/-) 'रामचरित तव ऐकुनि पाहुनि । सुख बुधांस जड जाती मोहुनि' (२/१२७/७) - यावरून रामकथा म्हणजे रामाचे सगुण चरित्र, अवतार लीला. त्या समजण्यास परिपक्व दृढ ज्ञान व दृढ प्रेमभक्ती यांचा समतोलपणा रहावा लागतो, हे अरण्यकांड मंगलाचरणाच्या टीकेत साधार स्पष्ट केले आहे, तुलसीदास म्हणतात माझ्याजवळ ना भक्ति ना ज्ञान अशी स्थिति होती - (३) विमूढ -२ ज्ञानभक्तिविहीन. अरण्य मंग. सोरठा व हा दोहा यात विमूढ शब्दच आहे. ती दोन्ही ११/१२ वर्षांच्या बालकात कलियुगात कुठून असणारी? ही दोन्ही नव्हतीच पण अंतःकरण निर्मल व बुद्धि कुशाग्र असती तर एकदा ऐकून काही थोडे समजले असते, पण

(क) माझी बुद्धि जड व मन कलिमलांनी ग्रासलेले-कलिमल ग्रसित २८/६ मध्ये व मलीन या शब्दांनी सांगितलेला अर्थच येथे जड व कलिमलग्रसित या शब्दांनीं सांगितला. (२८/६ टी. पहा.)

(ख) चौपाई ६-७ मध्ये आत्मज्ञानी व हरिलीलाना जाणणारे या शब्दांनी जे सुचविले त्याचा अभाव विमूढ शब्दाने सांगितला. मा. पी. टीका मुद्दाम वाचून पहावी.

(ग) **संगति** - 'एकदा' श्रवण करून हे वाक्य अर्थामध्ये जे सांगितले ज्यामुळे घातले तोच अर्थ पुढील चौपायात स्पष्ट केला जात आहे.

(घ) या दोह्यांत हेहि सुचविले की **ज्ञानभक्तिसंपन्न सद्गुरूच्या मुखाने अनेकवेळा श्रवण केल्याशिवाय ही कथा निःसंदेहपणे समजणार नाही,** सर्वग्रंथाचा समन्वय समजणार नाही. अनेक शंका उठतील, विरोध दिसतील, असंभावना नाना विपरीत भावना हृदयात उत्पन्न होतील. म्हणूनच **'श्रद्धा पथधन ना जयां नहिं संतांची साथ ॥ त्यांना मानस अगम अति ज्यां प्रिय ना रघुनाथ'**? (१/३८/-) असे स्पष्टच सांगणार आहेत. 'विण सत्संग न हरिकथा त्यांविण मोह न जात' (७/६१/-)

हिं.- **तदपि कही गुर बारहिं बारा । समुझि परी कछु मति अनुसारा ॥१॥**
**भाषाबद्ध करबि मैं सोई । मोरे मन प्रबोध जेहि होई ॥२॥**
**जस कछु बुधि बिबेक बल मेरें । तस कहिहौं हियँ हरि के प्रेरे ॥३॥**

म.- **वारंवार परी गुरु सांगति । कांहि समजली मला यथामति ॥१॥**
**ती करीन मी भाषा बद्धहि । जिने होइ मम मनीं प्रबोध हि ॥२॥**
**ज्ञान बुद्धि बल अंतरि जेवी । प्रेरी हरि मज वदेन तेवीं ॥३॥**

**अर्थ** - तरीपण (परी, परंतु) गुरुजीनीं ती कथा मला वारंवार सांगितली म्हणून मला ती यथामती थोडी समजली ॥१॥ तीच आता मी स्वभाषेत काव्यरूपाने लिहिणार आहे. हेतु हा की त्यामुळे त्या कथेचे पूर्णज्ञान मला होईल ॥२॥ माझ्या ठिकाणी जे कांही ज्ञान, बुद्धिबळ आहे त्याच्या आधाराने श्रीहरिची जशी प्रेरणा अंतरात होईल तसे लिहीन (रचना करीन) ॥३॥

**टीका - चौ - १ (१) परी गुरु वारंवार सांगति** - एकदा सांगून समजली नाही असे पाहून अनेक वेळा सांगितली. मला समजली असे त्यास वाटेपर्यंत पुनः पुन्हा सांगितली. कितीवेळा ही संख्या ठरविण्याची जरूर नाही, तरीपण काही टीकाकारानीं पाच वेळा व काहींनी बारा = १२ + बारा -१२ = २४ असा विचित्र अर्थ केला आहे!

(क) गुरूंचा कृपाळू शांत स्वभाव व शिष्यवात्सल्य सुचविले. (२) **कांहिं समजली** - असे म्हणण्याचे कारण हेच की पूर्ण समजण्यास लागणारी नाम, रामकृपा प्रेरणा त्यावेळी मिळाली नाही. त्यावेळी ज्ञान विरागनयन उघडले नव्हते; अंतर्दृष्टि प्राप्त झाली नव्हती. तत्कृतविमल विवेक विलोचन । वर्णिन रामचरित भवमोचन' (१/२/२)

असे आता झाले आहे. 'जब उघरहिं -अंतर दृगनि तब सो कहिहि बनाय' (मू.गो.च.) असे शंकरांनी तुलसींच्या गुरूंना सांगितले होते. (दृगनि- डोळे, कहिहि- सांगेल, उघरहिं- उघडतील, बनाय- रचून) वरील दोन्ही वचनात किती सुंदर समन्वय आहे!

**चौ - २ - (१) ती** - नरहरिगुरुंनी अनेकवेळा संस्कृतात सांगितल्यावर थोडीशी समजलेली कथा (रामचरित), ती कथा संक्षिप्तरूपाने होती हे मागील 'वदुं विस्तारुनि' (३०/२) शब्दानी सिद्ध होते

(क) मातृभाषेत लिहिण्याचे कारण शंकरांची आज्ञा हे पूर्वी दाखविले आहे. 'सिव भाषेउ भाषामें काव्य रचो । सुरबानि के पीछे न तात पचो । सबकर हित होइ सोई करिये अरू पूर्व प्रथा मत आचरिये' (मू. गो. च.) (२) पूर्वी श्रवण करून जी पूर्ण समजली नव्हती ती पूर्ण समजावी हा हेतु आहे. प्रबोध होण्यासाठी लिहीत आहेत. मनाला प्रबोध व्हावा ही इच्छा यामुळे पूर्ण होणार आहे. 'स्वान्तःसुखाय तुलसी रघुनाथगाथा -आतनोति' असा उपक्रम केला आहे 'स्वान्तस्तमः शान्तये भाषाबद्धं चकार' असा उपसंहार केला आहे. (७/१३० श्लो. २) -त्याचाच हा निराळ्या शब्दांत उपपत्तीसह अभ्यास आहे. **मनाला आत्मप्रबोध व रामप्रेमप्रबोध झाल्याशिवाय स्वान्तःसुख नाही अशी ही उपपत्ति आहे.**

(३) जें श्रवण केले ते दुसऱ्यास सांगण्यासाठी वीसपट तयारी - अवलोकन, विचार करावा लागतो असा आधुनिक शिक्षण शास्त्राचा सुद्धा सिद्धांत आहे; मग श्रवण केल्यावर निबंध ग्रंथ लिहावयाचा व तोहि सज्जन सुखद, निर्दोष, निगमागम पुराण संमत, लिहावयाचा म्हणजे किती मनन, चिंतन, निदिध्यासन करावे लागत असेल याची कल्पना सर्वांस येणे शक्य नाही. ही टीका लिहितांना जो अनुभव येतो आहे तो वरील तुलसी-वचनाची प्रतीति देणारच आहे. परंतु नुसत्या बौद्धिक मेहनतीने व ग्रंथावलोकनाने गूढरहस्ये उलगडत नाहीत; त्यास काय लागते तेच पुढील चौपाईत सांगतात -

**चौ - ३ (१) ती** गोष्ट म्हणजे हरिकृपेने हृदयात उत्पन्न होणारी स्फूर्ती. तिलाच येथे हरिप्रेरणा असे म्हटले आहे. ती कृपा होण्यास लागणारी संत-गुरु-कृपा, नामकृपा, शिवकृपा व हरिकृपा तुलसीदासांवर झाली आहे म्हणून ते लिहिण्यास प्रवृत्त होत आहेत.

**(क) मग प्रथम चरणांतील पुस्ती का जोडली?** विजेचा प्रवाह जोराचा आहे, तारा वगैरे सर्व व्यवस्थित आहे तरीपण जेवढ्या शक्तीची जितकी पातळ, निर्मळ काच (बल्ब) असेल त्याप्रमाणात व त्या रंगाचाच प्रकाश पडणार. रामचरित अनंत अपार असल्याने शंकरास सुद्धा अंत लागत नाही तेथे तुलसीदास किंवा कोणीहि सुविचारी लेखक कसे म्हणू शकेल की मी सर्व, पूर्ण सांगतो? (२) या टीकेतहि मानसांतील गूढभाव निघून चित्तप्रबोध होत आहे पण **सर्वगूढार्थ बाहेर पडले असे वाटणे वा म्हणणे मूर्खशिरोमणीचे लक्षण ठरेल.** मानवाच्या अतिप्रगल्भ मतीस सुद्धा मर्यादा आहे, शिवाय देश, काल, परिस्थिति, स्थान, संगति, इत्यादिकांनी सुद्धा

स्फूर्तिग्रहण करण्याची बुद्धिशक्ति कमी अधिक होते; पण हे अनुभवीच जाणू शकतात.

(३) ज्ञान व बुद्धिबल - (क) ज्ञान शब्दाने येथे नानापुराणनिगमागमादि विविध शास्त्रांचे ज्ञान व व्यवहारज्ञान, सृष्टिज्ञान, इत्यादि विविध प्रकारच्या ज्ञानाचे ग्रहण करणे जरूर आहे. त्याशिवाय नाना पुराणनिगमागमसंमत व संतसंमत निबंध लिहिता येणार नाही व तो निबंध 'सब ग्रंथन को (चा) रस' होऊ शकणार नाही. (ख) बुद्धिबल शब्दाने काव्यरचना कुशलता समजणे जरूर आहे. (४) प्रेरी हरि - येथे हरि शब्दाचा अर्थ हनुमान असा घेतात व प्रारंभाचे दिवशी हनुमंताने तुलसीदासांस अभिषेक वगैरे केला व तो संदर्भ मू. गो. चरित्रावरून घेतात. पण येथे बाह्यप्रेरणेचा संबंध नसून 'अंतरिं' 'हियँ' शब्दाने अन्तःकरणांतील प्रेरणेचा संबंध स्पष्ट आहे. 'प्रेरक हृदिं रघुवंशविभूषण' (७/११३/१) 'दारूनारि सम वाणी, स्वामी । राम सूत्रधर अंतर्यामी (१/१०५/५) 'रामाख्यमीशं हरिम्' (मं. श्लो.६).

उपदेश - (१) रामचरित्र दिसण्यास सरळ, सोपे असले तरी ते फार गूढ आहे म्हणून ते संत-गुरु-मुखाने वारंवार श्रवण करावे (२) पुष्कळ काळ मनन निदिध्यासन करावे. (३) मग ते इतरांस सांगावे म्हणजे स्वतःस अधिक चांगले कळेल. (४) हे सर्व स्वतःच्या कल्याणासाठीच करतो अशी दृढनिष्ठा ह्यात असावी. (५) लोककल्याण, लोकसंग्रह, लोकोद्धार, देशसेवा, धर्मोद्धार इत्यादिसाठी करतो असे क्षणभर एकदा जरी मनात आले, तरी घोररावणाने कारागृहात कोंडलेंच आपणास म्हणून समजावे. ही एक भावना नसून बाकी सर्व व्यवस्थित निष्काम, निःस्वार्थ, बुद्धीने घडले तर प्रबोध होऊन परम विश्राम या मानसानेच मिळेल. रावणाच्या बंदिशाळेत आपण होऊन जाऊन पडल्यावर मग विश्राम कोठला? क्लेशांचे डोंगर वाढून रागद्वेषांच्या ज्वालामुखीत पडावे लागेल.

संगति - रामचरित्र रचनेने प्रबोध होऊन परमविश्राम - स्वान्तःसुख कसे मिळेल याचे वर्णन रामकथामाहात्म्यरूपाने करतात. रामकथारूपी वस्तूची स्वभावशक्ति वर्णन करतात.

**हिं.- निज संदेह मोह भ्रम हरनी । करउँ कथा भव सरिता तरनी ॥४॥**
**बुध बिश्राम सकलजन रंजनि । रामकथा कलि कलुष बिभंजनि ॥५॥**
**रामकथा कलि पन्नग भरनी । पुनि बिबेक पावक कहुँ अरनी ॥६॥**

**म.- भ्रम-संदेह-मोह निज हरणी । करूं कथा भवसरिता-तरणी ॥४॥**
**बुध विश्राम सकल जन-रंजनि । रामकथा कलि कलुष विभंजनि ॥५॥**
**रामकथा कलिपन्नग भरणी । ज्ञानपावकाला कीं अरणी ॥६॥**

अर्थ – स्वतःचे (माझे) संदेह मोह व भ्रम हरण करणारी आणि भवनदीला नौके सारखी असणारी कथा (भाषाबद्ध) करतो ॥४॥

रामकथा बुधांना विश्राम देणारी, सर्वजणांचे चित्त रंजन करणारी व कलिकलुषांचा विध्वंस करणारी आहे. ॥५॥ कलिरूपी भुजंगाला (पन्नग) रामकथा भरणीपक्षासारखी आहे व ज्ञानपावकाला उत्पन्न करणारी अरणी आहे. ॥६॥

**टीका** - चौ - ४ - ५ - (१) स्वान्तःसुख होण्यासाठी पापनाश, वैराग्य, ज्ञान व प्रेमभक्ति पाहिजेत हे प्रारंभापासूनचे सूत्र विसरून चालणार नाही. हे पहिल्या तीन चरणांत 'बुधविश्राम' पर्यंत प्रतिपाद्य विषयाच्या उपक्रमरूपाने सुचविले आहे. पुढील चौपायानीं साधनाचा क्रम कार्यकारण संबंध पूर्वक वर्णिला आहे.

(क) भवनदीपार जाणे म्हणजे जन्ममरण परंपरा चुकविणे यास ज्ञानाची आवश्यकता आहे. '**ज्ञानादेव तु कैवल्यम्**' (श्रुति). भवनदींत गटंगळ्या खात सतत वहात राहण्याचे कारण आत्मस्वरूपाचे अज्ञान व त्या अज्ञानाचे कार्य हे आहे. रामकथेने अज्ञान व त्याचे कार्य यांचा नाश होतो हे पहिल्या चरणात सांगितले आहे.

(२) **भ्रम, संदेह मोह हरणी** — मानसात मोह व भ्रम हे शब्द अनेक ठिकाणी समानार्थक, अज्ञान या अर्थाने वापरले असले तरी येथे तिन्ही एकत्र असल्याने त्यात भेद आहे.

(क) मोह = ज्ञानाचा पूर्ण अभाव, जशी झोपेतील स्थिति. '**सर्वहि मोहनिशें निजणारे**' दिसती स्वप्ने किती प्रकारे ॥ **ज्ञान होइ मोह भ्रम भंगहि । तै रघुनाथ चरणिं अनुरागहि**' (२/९३/२,५). या अज्ञानरूपी गाढनिद्रेतच जीव सतत राहिला असता, मी कोण हे मुळीच कळले नसते तर एवढे दुःख, भय, क्लेश वगैरे झाले नसते जसे गाढ झोपेत होत नाहीत. पण तशी गाढ झोपही लागत नाही व सारी रात्र विविध स्वप्नेच दिसत असतात तेव्हा वैताग येतो. बहुतेक सर्व जीवांचेच व मानवांचे विशेषतः अनेक जन्म असेच चाललेले आहे. आपण खरे कोण व जगाचे खरे स्वरूप काय हे मुळीच कळत नाही, हाच मोह, हेच मूळ अज्ञान. मी देह, पुरुष लहान मोठा, माझा पुत्र, इत्यादि मी व माझे आणि जगातील वस्तु-विषय सत्य वाटणे हीच विविध स्वप्ने म्हणजे भ्रम. यालाच विपरीत भावना, विपरीतज्ञान म्हणतात. दोरी दोरी आहे असे न जाणणे हे अज्ञान हाच येथे मोह; व दोरीच्या ऐवजी सर्प दिसणे हा भ्रम, हे विपरीत -भलतेच काहीतरी-ज्ञान.

(ख) मी देह नाही आत्मा आहे, ब्रह्म आहे एवढे गुरुमुखाने कळले, पण मी आत्मा कसा असू शकेन? ज्ञान झाल्यावर कर्मे कशी घडतील? ईश्वर अवतार कसा घेऊ शकेल? राम जर ब्रह्म असतील तर सीतेसाठी रडत का बसले? कृष्णाने मामाचा वध कसा केला? इत्यादि प्रकारचे जे संशय, त्यांना येथे संदेह म्हटले; ही संदेहात्मक दशा तर फारच दुःखदायक असते; हिच्यापेक्षा भ्रमाला सत्य मानणे कमी दुःखदायक असते उदा. 'बघत सती त्या शंभुदशेसी । उपजति हृदिं संदेह विशेषी । ते करिती नृपसुता प्रणामा ॥ विष्णु सुरहिता नरतनुधारी । तो किं अज्ञसा शोधिल नारी ॥ असे संशयी अमित भरे मन । तिळहि संचरे हृदी प्रबोध न' (१/५०-५१ पहा) यालाच असंभावना म्हणतात. 'हृदयिं-आणितां संशय असले ।

ज्ञानबिरति, गुण पळती असले ॥' 'श्रुत्वा भ्रमभंजक शिववचना । सकल विलयिं गत कुतर्क रचना । रघुपति पदिं ये प्रतिती प्रीती । दारुण असंभावना गत ती" फिटे मोहशरदातप अतितर' (१/११९,१२० पहा). निष्कर्ष - मोह म्हणजे स्वस्वरूप व ईश्वर स्वरूप व जगत्स्वरूप यांविषयींचे अज्ञान. भ्रम म्हणजे आपण देहादिक आहोत व विश्वसत्य आहे, मी व माझे, आणि अवतार-रामकृष्णादि मनुष्य आहेत असे वाटणे, म्हणजेच विपरीतभावना. मी आत्मा ब्रह्म कसा असेन, रामकृष्णादि अवतार ब्रह्म कसे असतील, व दिसणारे जग मिथ्या कसे असेल इत्यादि संशय- संदेह म्हणजेच असंभावना - यासर्वांचा नाश रामकथा करते. 'ज्ञान होइ मोहभ्रम भंगहि' ज्ञानानेंच मोहभ्रम संशयादिकांचा विनाश होतो. म्हणून येथे या पहिल्या चरणाने ज्ञानप्राप्ति सांगितली. रामकथेने ज्ञान-आत्मज्ञान होते. 'विरतिस धर्म योग दे ज्ञाना । ज्ञान मोक्ष दे श्रुति करि गाना' (३/१६/१) हे फळ दुसऱ्या चरणात सांगितले आहे.

चरण तिसरा - (१) बुध-विश्राम - मागील चौपाईत दाखविल्याप्रमाणे ज्ञान झाले, कोणी जीवन्मुक्त झाला, तरी तेवढ्याने भागत नाही; कारण की 'काम कोप हे रिपु उभयानां' (३/४३/९) 'हे जाणुनि पंडित मज भजती । ज्ञानलाभिंहि न भक्ती त्यजती' (३/४३/१०) ज्ञान झाल्यानंतर आरूढपतित होण्याची भीति - शक्यता - असतेच. 'भवभयनाश न हरिभजना विण' (७/९०/८) 'ज्ञान विमल जलि करी स्नान जैं । रामभक्ति उरिं करी स्थान तैं॥' (७/१२२/११) "संजीवनिमुळि भवरोगा ती । रामकथा, श्रुति सुरी गाती' (७/१२९/२) असा उपसंहार उत्तर कांडांत केला आहे. येथे हे सुचविले की ज्ञान झाल्यावर रामप्रेमभक्ति रामकथेनेच मिळते आणि जीवन्मुक्त बुध, म्हणजे साधु, (ज्ञानीभक्त) होतात व त्यांना विश्राम मिळतो. स्वान्तः सुखप्राप्ती होते. ल.ठे. येथला अर्थ निश्चित करण्यास मानसाच्या बाहेर जावे लागले नाही; पांडित्याची जरूर पडली नाही. अरण्य ४३, व उत्तरकांड ९०,१२२ व १२९ या दोह्यांतील वचनांचे धागे एकत्र जुळवल्याने कार्यभाग साधला. मागील संदर्भ, ग्रंथाचे मुख्यप्रयोजन, व प्रकरणार्थ व बुधविश्राम याचा अर्थ या चार गोष्टींचा मधुर समन्वय सहज साधला व संदेहास स्थान राहिले नाही असे या अल्पमतीस वाटते. ही पद्धती व हा अर्थ, ज्यास मान्य नसेल त्यांनी शब्दारण्यात भ्रमण करण्यासाठी या तीन चौपायांची टीका मानस पीयूषांत पहावी.

संगति — मोहनाश, ज्ञानलाभ व प्रेमभक्ति प्राप्ति कशा क्रमाने होतात हे आता पुढील चरणापासून सांगतील. इतकी न्यायघटित व शास्त्रशुद्ध मांडणी असून टीकाकार स्वतः शब्दारण्यात भ्रमून इतरांस भ्रमवितात.

(२) सकल जन रंजनि - आपले चित्त सदा प्रसन्न रहावे असे ज्या कोणास मनापासून वाटत असेल अशा व्यक्तीला ही कथा चित्तप्रसाद देऊ शकते. स्त्री शूद्रादि कोणीहि मनुष्य जो विश्वास श्रद्धावान असेल त्याला प्रतिबंध नाही. विश्वास व श्रद्धा हा मुख्य अधिकार मंगलाचरणात आधीच सांगितला असल्याने त्याचे ग्रहण

करणे भाग आहे. येथे पुन्हा अधिकारी निवेदन केले. श्रोता वक्ता हा संबंध मागील दोह्याच्या चौपायात सांगितला आहे. विषय रामकथा येथे सांगितला आहेच व प्रयोजन मागील तीन चरणांत सांगितले. याप्रमाणे अधिकारी, संबंध, विषय व प्रयोजन या अनुबंध- चतुष्टयाचा उल्लेख येथे आहे. येथून पुढे उपपत्ति सांगतात. हा विचार कोणीहि टीकाकारांनीं केला नाही त्यामुळे कपोलकल्पित अर्थ करावे लागले. 'प्रसादस्तु प्रसन्नता' 'प्रेममग्न फिरती स्वेच्छेने । स्वप्निंहिं शोक न नामकृपेने' (१/२५/८) अशी जी स्थिति तिचेंच नाव मनरंजन. हा त्या प्रयोजन रूपी फळांतील मधुर रस मिळतो.

**चौ - ५ - (२) रामकथा कलिकलुष विभंजनि** - पाप दोषादिकांचा मल गेल्या शिवाय ज्ञानाची व रामभक्तीची रुचि उत्पन्न होत नाही; सात्विक श्रद्धा उत्पन्न होत नाही. रामकथेचा स्वभावगुण हा आहे की तिच्या श्रवणाने पापांचा संहार होतो. नामाचे जे सामर्थ्य तेच रामकथेचे सांगितले, या प्रकरणाच्या शेवटी दोघांची तुलना केली आहे. कामक्रोधादि सर्व कलिमल - कलिकलुषें आहेत हे पूर्वी स्पष्ट केले आहे. 'येषांत्वन्तगतं पापं जनानां पुण्य कर्मणां ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजन्ते मां दृढव्रताः' (भ.गी.) यातसुद्धा प्रथम पापनाशच सांगितला आहे व नंतर द्वंद्वमोहनाश; तोच क्रम येथे सांगत आहेत. ज्ञानप्राप्तिचा पूर्वाधिकार येथे बहुतेक सांगितला पण एक राहिला आहे तो पुढील चरणात सांगतात.

**चौ - ६ (१)** कलि-पन्नग-भरणी - **(क) भरणी** - हा एक बेडकाच्या आकाराचा पक्षी आहे. पन्नग-सर्प-दिसला की हा आपले पंख व चोच यांचा अगदी संकोच करून आजुबाजूला बसतो; सापाला वाटते बेडूकच आहे. तो त्यास गिळतो. गिळल्याबरोबर आपल्या चोचीने व काटेदार पंखानी तो सापाचे शरीर फाडून बाहेर पडतो व त्याला खातो. किती सुंदर रूपक आहे! पापक्षय झाला की साधन चतुष्टयांतील मुख्य जो विवेक हनुमान तो प्राप्त होतो, तोच भरणीपक्षी येथे आहे. तो कलिरूपी भुजंगाच्या पोटात शिरून त्याला फाडून त्यालाच खातो. 'कालनेमि **कलि कपटनिधानू** -कलि म्हणजे कपटांचे निधान

**(ख)** सर्वकपटांचे निधान आहे, माया - 'मी माझे तूं तुमचे माया.' 'कूटस्थोऽक्षर उच्यते' (भ. गी. १५) याच्या भाष्यात व श्री शंकरानंदी टीकेत आणि ज्ञानेश्वरीत कपट म्हणजे माया असाच अर्थ केला आहे.

**(ग)** माया कशी कोठून येते घरात सर्पासारखी ते कळत नाही. मायामोहित जीवांनी रामकथेचे श्रवण केले म्हणजे (रामकथा) त्यांच्या हृदयात शिरते व भरणी पाखराप्रमाणे त्या मायेला खाऊन टाकते. सार हे की कथाश्रवणाने प्राप्त झालेल्या विवेकरूपी भरणी विहंगमामुळे वैराग्य प्राप्त होते. कालनेमी कलीला मारून विवेक हनुमंताने वैराग्य लक्ष्मणाला जिवंत केला. शमदमादि मुमुक्षारूपी दिव्य वनस्पतीनीं; तसाच योग येथे जुळतो. असा साधन चतुष्टयसंपन्न झाला की ज्ञानाचा अधिकारी होतो. रामकथेनेच ते होते.

(२) **ज्ञानपावकाला कीं अरणी** - नामवंदनात २३/४-५ मध्ये अरणी सूचित केल्या आहेत टी. पहावी.

(क) अरणी - हे दोन काष्ठांचे तुकडे असतात, त्यात एका तुकड्याला मधे एक खळगा असतो त्यात ताकाच्या रवीसारखा दुसरा तुकडा उभा करून, ताक घुसळतात त्याप्रमाणे, पण दोन माणसे मंथन करतात. खालच्या तुकड्याला अधरारणी व वरच्या तुकड्याला उत्तरारणी म्हणतात. यांच्या मंथनात जसा अग्नि निर्माण होतो तशीच ही कथा श्रवण व कथन रूपी मंथनाने ज्ञानपावक उत्पन्न करते. **संत-गुरु मुखाने रामकथा श्रवण व श्रोत्यांच्या मनाने रामकथा चिंतन या अरणी आहेत.** 'विण सत्संग न हरिकथा त्यांविण मोह (अज्ञान) न जात (७६१-) याप्रमाणे **मोहनाश करणारा ज्ञानपावक रामकथेनेच निर्माण केला जातो.** पण मंथन केले पाहिजे जोराने. पहिल्या चौपाईतील भ्रमसंदेह मोहनिज हरणी'ची उपपत्ति ज्ञानरूपी प्रयोजन प्राप्तीपर्यंत सांगितली. रामकथा संत-सद्गुरु-संगतीत त्यांच्या मुखाने श्रवण केल्याने जीव ज्ञानी होतो जीवन्मुक्त होतो हे क्रमशः सांगितले. आता अर्थार्थी: आर्त व जिज्ञासू यांना फलप्राप्ति सांगतील व मग प्रेमभक्ति प्राप्त होण्याचे सांगतील. - **मा. पी. टीका वाचून पहावी!**

हिं.- **रामकथा कलि कामद गाई । सुजन सजीवनि मूरि सुहाई ॥७॥**
**सोइ बसुधातल सुधातरंगिनि । भयभंजनि भ्रम भेक भुअंगिनि ॥८॥**
**असुरसेन सम नरक निकंदिनि । साधु बिबुध कुल हित गिरिनंदिनि ॥९॥**

म.- **रामकथा कलिं कामधेनु वर । मुळी सुजन संजिवनि सुंदर ॥७॥**
**ती वसुधातळिं सुधा तरंगिणि । भय भंगा भ्रम-भेक-भुजंगिनि ॥८॥**
**असुरसैन्य सम नरक निकंदिनि । साधु विबुधकुल हित गिरिनंदिनि ॥९॥**

**अर्थ** – रामकथा कलियुगांतील चांगली (सुंदर) कामधेनु आहे व ती दासांचे संजीवन करणारी सुंदर मुळी आहे; ॥७॥ ती (रामकथा) या पृथ्वीतलावरील सुधामय तरंगिणि (नदी) आहे; व ती भवभयाचा भंग करणारी असून (ईश्वरावतारविषयक) भ्रमरूपी बेडकांना (भेक) खाणारी सापीण आहे. ॥८॥ असुरसैन्यासारख्या असलेल्या नर्कांचा विनाश करणारी गिरितनया पार्वती आहे व साधुरूपी देवसमाजाचे हित करणारी ती गंगा (गिरिनंदिनी) आहे. ॥९॥

**टीका.** – चौ. ७ 'सकलजनरंजनि असे पाचव्या चौपाईत सांगितले; सकल सुखदायक आहे असे सांगितले, पण सर्वांनाच मोक्षाची इच्छा असते असे नाहीं, आर्त, जिज्ञासु व अर्थार्थी भक्तही असू शकतात, त्यांचे साध्य रामकथेने साधते हे जर दाखविले नाही तर सकल सुखदायक म्हणणे खोटे ठरेल. म्हणून पहिल्या चरणात अर्थार्थी भक्तांची सोय लावली आहे. (१) **कामधेनु** (कामद गाई) - कामधेनु व काम तरु यांचे कार्य एकच. नामाचे वर्णन करताना कामतरु म्हटले. कारण नाम हिंदीत

पुल्लिंगी व तरु पुल्लिंगी. कथा स्त्रीलिंगी म्हणून कामधेनु म्हटले. दो २६ व २७/५ टीका पहावी 'कामधेनु जशी ऐहिक कामनांची पूर्ति करते तशी रामकथा ऐहिक कामना पूर्ण करू शकते.' 'रामकथा सुरधेनुसम सेवत सब सुखदानि' (१/११३) कामतरु व कामधेनु यात फरक इतकाच की कल्पतरूची सेवा करावी लागत नाही, पण कामधेनु -सुरधेनूची -सेवा करावी लागते. तरच ती प्रसन्न होऊन ऐहिक सर्व सुख देते.

(२) सुजन — चांगले सेवक ध्रुव, मार्कंडेयांसारखे, जे मरणप्राय दुःख, चिंता, तिरस्कार इत्यादिकांनी त्रस्त झालेले असतात अशांचे संजीवन करणारी म्हणजे त्यास सम्यक जीवन, चांगले जीवन, प्राप्त करून देणारी मुळी आहे. या अशा आर्त भक्तांना सुकृती अनघ उदार व चतुर म्हटलेच आहे. (२२/६-७प.) म्हणून सुजन शब्दाने येथे आर्त, समजणे जरूर आहे. सज्जनांचे जीवन हा वरवरचा अर्थ घेतला तर कसा अनर्थ ओढवतो पहा. महेशांनी शतकोटि रामायण का मागितले नाही? ते सुजन-सज्जन होतेच. (दो. २५ प.) राम नाम फक्त मागितले कारण ते महेशांचे जीवन आहे. प्राण आहे.

(क) सुंदर म्हणण्याचे कारण हेच की रामकथामुळी सेवन करण्यास मधुर आहे. जेवढी सेवन करावी तेवढी हवीशीच वाटते. 'संजीवनि मुळि - रामकथा' (७/१२९/१) 'श्रवण जयांचे समान अर्णव । नाना सरिता सुभग कथा तव ॥ भरति निरंतर पूर्ण न होती ।' (२/१२८/४.५) 'स्रवत नाथ आनन शशी कथासुधा रघुवीर । श्रवणपुटी मन पिउनिया तृप्त नसे मतिधीर ॥' (७/५२/म)

(ख) संजीवनमुळी मिळण्यास हनुमंतास त्रेतायुगात किती कष्ट पडले! या कलियुगात तिचे नुसते नाव ऐकावयाचे; पण रामकथा संजीवनमुळी सर्वसुलभ आहे. हे वैशिष्टच आहे.

(ग) कामधेनू व कामतरु यांतील आणखी एक सूक्ष्म भेद लक्षात घेतला म्हणजे दो ३२ म समजणे सोपे जाईल. कल्पवृक्षाच्या नुसत्या छायेत जाऊन बसल्याने तापनिवारण जितके सहज होईल तेवढे व तसे कामधेनूच्या छायेत बसल्याने होणार नाही. ऋषींच्या जवळ या पृथ्वीतलावर कामधेनु होत्या, पण कल्पतरु नव्हते. म्हणजेच ते अधिक दुर्लभ व अधिक कार्यकारी. याने एवढेच दाखवावयाचे आहे की रामकथेपेक्षा रामनाम अधिक श्रेष्ठ आहे, जे रामाहून मोठे आहे, रामाचे बीज आहे, ते रामकथेचे बीजकारण आहे हे सहज लक्षात येईल. 'श्रीरामचरित पारायणाच्यावेळी श्रीरामनाम बीजं, सीता शक्तिः । श्रीरामचंद्रो देवता' असे म्हणतातच. येथे इतके पुरे.

**चौ. ८ — (१) सुधातरंगिनि** — सुधेचे तरंग जिच्यावर जिच्यात असतात ती. तरंग लाटा-वीचि, सुधा किंवा अमृत शब्द मानसात रामनामामृतम्, छबिसुधा, कथा सुधा, रूपसुधा, सुगति सुधा इत्यादीत वापरला आहे. वर ७/५२म हे **'कथासुधा'** याचे उदाहरण आहे. **'स्वाद तोष सम सुगती सुधेचे'** (१/२०/७) येथे रामकथेलाच

• सुधातरंगिणी म्हटले असल्याने सुधा - रामकथा हा अर्थ घेता येत नाही. नामसुधा व सुगतिसुधा हे अर्थ घेता येतात.

(क) **राम नामरूपीसुधेचेच तरंग जिच्यात** पसरत आहेत, अशी नदी, अमृताची नदी हा अर्थ तितका यथार्थ नाही. तरंग पाण्यातूनच उठतात, पाण्यावरच विहार करतात व पाण्याचेच असतात. **'यामधिं' रघुपति नाम उदार । श्रुतिपुराण अतिपावन सार ।'** (१/१०/१) तरंग असलेल्या नदीच्या प्रवाहाकडे पाहणे अधिक सुखकर असते. 'चामर यामुन गांग तरंग । बघत दुःख दारिद्य्रा भंग ।' (२/२२/३) निर्गुणि ब्रह्म सगुण साकार झाले म्हणजे सुंदर सहज सुखदायक नयनाल्हादक होते, तशी तरंगयुक्त नदी. हा अर्थ ध्वनि रूपाने आहे.

(ख) **सुगति हीच सुधा होय** – सुगति कोणत्या हे **'गूढगती जे जाणू इच्छिति । नाम जिभेने जपता जाणति'** (१/२२/३) च्या टीकेत पहावे. गूढविद्यांचे ज्ञान मिळविण्याची इच्छा असलेले जे जिज्ञासू भक्त त्यांना सुद्धा त्रिकालज्ञानादि विविध 'सु-गति'चे ज्ञान प्राप्त होईल व त्यांची जिज्ञासाहि तृप्त होईल; पण तरंग शब्दाने सुचविले की त्या ज्ञानाने मिळणारे सुख तरंगांसारखे चंचल व नश्वरच असणार. त्याने परम विश्राम मिळणार नाही. याप्रमाणे या तीन चरणांत तीन सकाम भक्तांची सोय सांगितली. **येथपर्यंत सकल जनरंजनी' हे वचन यथार्थ करून दाखविले.** आता पुढल्या चरणात ज्ञानी भक्तांचे वर्णन रूपी सूत्र पुन्हा हाती घेतात.

(२) **भय-भंगा** (भयभंजनि) चौपाई पांच मधील **'बुधविश्राम'ची टीका पहावी** तेथे दाखविले आहे की आत्मज्ञान झाले तरी भवभय राहते; तेथे आधार दिले आहेत. कामक्रोधादि रिपु ज्ञानी पुरुषांना सुद्धा असतातच. होडी मिळाली तरी ती कामरूपी खडकावर फुटण्याची, क्रोधरूपी भोवऱ्यात सापडण्याची, प्रतिष्ठाकीर्तिलोभ मगरीच्या मुखांत पडण्याची व विषयप्रभंजनाने वहात जाण्याची भीति असतेच; पण ही भीति या रामकथातरणीला नाही. याची उपपत्ति पुढील चौपाईत सांगतील. तरणी शब्दाने सुचयिला जाणारा अतिव्याप्ति दोष येथे दूर केला.

(३) **भ्रम भेक भुजंगिनि** (भुअंगिनि) 'निज भ्रमसंदेहमोह हरणी असे एकदां (चौ.४) म्हटल्यावर पुन्हा भ्रमनाशाचा उल्लेख कां? मोह - अज्ञान नाशाने अज्ञान कार्य जो भ्रम तो सहज नष्ट होतो. या शंकेचे मानस पीयूषमधील समाधान पहावे. ते अयथार्थ आहे. सती गरुड व काकभुशुंडी पूर्णज्ञानी होते पण त्यास सगुणचरित्राविषयी संदेह भ्रम उत्पन्न झाले आहेत. 'गरुड महाज्ञानी गुणराशी' हरिसेवक अति निकट निवासी' त्याला झाले आहेत; व त्यांचा भंग भुशुंडीजवळ रामकथा श्रवण केल्यानेच झाला आहे. पूर्वी भ्रमसंदेह मोहनाश सांगितला तो निज स्वरूपाविषयी सांगितला. भ्रममोह नाश झाल्यावर गरुड भुशुंडीस म्हणतो 'मज कृत कृत्य करी तव भाषण । जे रघुवीर भक्ति रसमिश्रण । रामचरणिं नव रति उपजली । माया जनित विपद नासली ॥ मोहजलधिं तारुं जाहलां' (७/१२५/१३) 'प्रभो प्रसादें तव, हृदयी मम । संशय शोक न मोह नसे भ्रम ॥ पावन

रामगुणग्रामांश्रुत । चित्त तवकृपें विश्रामें युत॥' (७/११५/६-७) हीं दोन्ही वचने महाज्ञानी हरिभक्त गरुडाला रामचरित्र पाहून मोह-भ्रम झाल्यानंतर त्याने काकाजवळ रामकथा श्रवण करून रामभक्ति मिळाल्यानंतरचीं आहेत. पार्वतीची जबानी अशीच आहे. उत्तर १२९/८ व दोहा पहावा. या प्रकरणात ही बुधानां विश्राम कसा मिळतो याची उपपत्ती सांगण्याचे काम क्रमशः चालू आहे. म्हणून येथे सांगितले की रामचरित्राविषयीं उत्पन्न होणारा मोह, भ्रम रामकथेनेच नष्ट होतो.

(क) भेक — बेडूक नदींत असतातच कुठे कुठे. तसेच रामकथा श्रवण करताना त्या कथेत व काही भ्रमरूपी बेडूक श्रवणाच्या प्रवाहा बरोबरच हृदयात शिरतात. 'सुगम अगम चरिता श्रवुनि जाती मुनिहि भुलोनि (भ्रमोनि)' (७/७३). 'बघ बघुनी तुमचे आचरणा । होइ मोह ममदयिं पार ना' (७/४८/४) हे तर वसिष्ठ श्रीरघुनाथासच म्हणाले आहेत! या महात्म्य चरित्र, कथा, श्रवण करीत असताच भ्रम, संशय, मोह उत्पन्न होतातच; पण

(ख) माझ्या रामकथेत, जीतून भ्रमबेडूक उड्या मारू लागतात, त्या बेडकांना खाणारी नागीण तयारच असते. "भ्रमकृत भ्रमनाशिनी पणा तिच्यातच आहे. भ्रम/भेकानां खाऊन टाकण्याची शक्ति या रामकथेत आहे. 'महामोह महिषेश विशालहि । रामकथा कालिका करालहि ॥' (१/४७/६) 'रामकथा सुंदर करटाळी । संशय विहगां दूर पिटाळी' (१/११४/१) हे सामर्थ्य या रामकथेत इतर रामायणापेक्षा फार मोठे आहे.

सूचना — वर सविस्तर साधार जो गूढार्थ प्रगट केला तोच तुलसीदासांचा भाव आहे अशी खात्री वाटते; तथापि ज्यास वरील भावार्थ मान्य नसेल त्यांनी १/३ मा. पी. टीका पहावी. या टीकाकाराला स्फुरलेले भाव कोणाच्या घशात कोंबण्याची याला इच्छा नाही, कारण मनुष्याची बुद्धि बोलून चालून मर्यादित!

चौपाई — ९ (१) या चौपाईतील गिरिनंदिनीचे दोन अर्थ दोन चरणांत घ्यावे लागतात. 'असुरसेन' चा अर्थ गयासुर असा करतात. (मा. पी. पहा) परंतु आतापर्यंत सर्व उपमा (१/४०/१) स्त्रीलिंगी दिल्या आहेत व पुढे दोहा ३१ मध्ये मंदाकिनीपर्यंत सर्व उपमा स्त्रीलिंगीच. 'कथा' स्त्रीलिंगी आहे. या औचित्याला व काव्यकला सौंदर्याला, एक कलंक कां लावावा? शिवाय गिरिनन्दिनीचे दोन अर्थ घेतल्यानेच पूर्वापर संदर्भांचा उत्तम समन्वय होतो व जे सिद्ध करावयाचे आहे ते उत्तम प्रकारे मानसाधारेच सिद्ध होते. तशी अर्थसिद्धी गयासुर व पार्वती हे अर्थ घेऊन होत नाही.

(क) शिवाय शंकरांना प्रिय असणाऱ्या त्यांच्या शरीरावर वास करणाऱ्या सर्व गोष्टींचा उल्लेख येथे सापडत असून -गंगा किंवा पार्वती यांना गाळणे उचित नाही. शंकरांचे अर्धांग पार्वती व मस्तकावर गंगा पाहिजेच. भुजंगिनी येऊन गेल्याच आहेत. 'महामोह महिषेश विशालहि । रामकथा -कालिका करालहि' (१/४७/६)

(२) पहिल्या चरणात गिरिनन्दिनी म्हणजे गिरिजा, काली, हैमवती, उमा,

कात्यायनी, गौरी, मृडानी, चंडिका, दुर्गा, हा अर्थ अभिप्रेत आहे. ज्ञान्यांचे क्रोध जनित भय व भक्तींतील मोठी विघ्ने म्हणजे सगुण चरित्राविषयीचे भ्रम, संदेह मोह हेच शुंभ निशुंभ महिषासुर चंडमुंड, धूम्रलोचन, रक्तबीज वगैरे असुर समूह व त्याचे सैन्य यांचा नाश करणारी रामकथा ही कालिका, दुर्गा काली आहे. रामकथा यांचे भय राहू देत नाही. कामक्रोध लोभादि सर्व नरकात लोटणारे, नरकाची द्वारे, नरकाचे पंथ आहेत. 'त्रिविधं नरकस्येदं द्वारम्' '-काम क्रोधस्तथालोभः" (भ.गी.१६/२१) 'काम कोप मद लोभ सब नाथा ! नरका पंथ । सोडुनि सब रघुवीरहि भजा भजति ज्यां संत'। (५/३८/-) बिभीषण रावणास म्हणाला आहे. रक्तबीज-लोभ, शुंभ-काम, महिषासुर-क्रोध, रोष, रोष महिषेश्वर' (१/४/५). (सप्तशती अध्याय ५/८४-११२ पहा)

(क) भ. गीता या नरकांचा त्याग करावयास सांगते पण रामकथा भक्तीस काही श्रम करावे लागत नाहीत. देवगणसैन्य सुद्धा या असुरांचा नाश करण्यास असमर्थ ठरले; तेव्हा पार्वतीनेच विविधरूपे घेऊन त्यांचा विनाश केला. तसेच **रामकथा हे एक चंडिकेचेच रूप आहे. ती परभारे त्यांचा नाश करते.** इन्द्रिय देवगणांना हे कामक्रोधलोभादि राक्षस जुमानीत नाहीत. 'महा मोह महिशेष विशालहि । रामकथा कालिका करालहि' (१/४५/६)

(३) **'साधु विबुधकुलहित गिरिनंदिनि** – कामक्रोधांचे भय गेले, सगुणचरित्र लीलांविषयींचे संशय भ्रमादि गेले की पुढील मुख्य पायरी जी रामप्रेमभक्ति, तिची प्राप्ती येथे सांगतात.

(क) विबुधकुल म्हणजे देवांचे समुदाय त्यांचे हित करणारी जशी गंगा 'त्रिपथगा' नदी, तशीच रामभक्ति गंगा साधूंना प्राप्त होऊन त्यांचे हित-कल्याण होते; ती करते.

(ख) 'क्षितौ तारयते मर्त्यान् । नागाँ स्तारयतेप्यधः । दिवि तारयते देवान् । तेन त्रिपथगा स्मृता' (म. भारते) गंगा स्वर्गात देवांचा उद्धार करते, हित करते हा अर्थ सिद्ध झाला.

(ग) आता ती हिमालय कन्या असल्याचा आधार पाहिजे. 'नाम्ना मेना मनोज्ञा वै पत्नी हिमवतःप्रिया ॥१४॥ तस्यां गंगेयमभवत् ज्येष्टा हिमवतःसुता ॥ उमा नाम द्वितीयाऽभूत कन्या तस्यैव राघव" (वा. रा. १/३५/१४-१५). **हिमवंताची वडील मुलगी गंगा व धाकटी पार्वती हे सिद्ध झाले.** आता गंगा भागीरथी म्हणजे रामभक्ति हे मानसांतूनच सिद्ध होते. 'रामभक्ति जिथ धार भागिरथि' (१/२/८) या वचनाचा संबंध साधुसमाज प्रयागाशींच आहे. येथेहि **'साधु-विबुध-कुल'** साधुकुल म्हणजे साधु समाजाचाच उल्लेख आहे. 'जाउनि **रामभक्ति-सुरसरिते**। शरयु सुकीर्ति मनोहर मिळते' (१/४०/१) - बुधांना विश्राम कसा मिळतो याची उपपत्ती याप्रमाणे येथवर सांगितली.

(घ) वक्ता-श्रोते मिळून साधुकुल-तयार झाले (साधुसमाज प्रयाग झाला.) व त्यास विश्राम मिळाला. ब्रह्मनिरूपणरूपी सरस्वती प्रयागात गुप्त असल्याने तिचा उल्लेख

येथे नाही. परंतु तिचे ज्ञानप्राप्तीपर्यंतचे कार्य येथे दाखविले आहेच. आता प्रयागला वेणीमाधव, यमुना, अक्षयवट, सर्वदेव, असून नानासुखसंपत्तीचे निधान प्रयाग आहे. या सर्वांचे वर्णन पुढील चौ. १४ पर्यंत आहे, पण सूचित केलेले आहे.

हिं.- संत समाज पयोधि रमा सी । बिस्व भार भर अचल छमा सी ॥१०॥
जम गन मुहँ मसि जग जमुना सी । जीवन मुकुति हेतु जनु कासी ॥११॥
रामहि प्रिय पावनि तुलसी सी । तुलसीदास हित हियँ हुलसी सी ॥१२॥

म.- संत-समाज-पयोधि रमासी । विश्वभार भर अचला क्ष्मासी ॥१०॥
यमगणमुखिं मसि जगि यमुनाशी । जीवन्मुक्ति हेतु जणुं काशी ॥११॥
रामप्रिय पावन तुलसीसी । तुलसीदास हित हर्दि हुलसीसी ॥१२॥

अर्थ — रामकथा ही संतसमाजरूपी क्षीरसागरांतल्या लक्ष्मी (रमे) सारखी आहे; व विश्वाच्या भरणाचा भार वाहणारी पृथ्वीसारखी (क्ष्मा, क्षमा, छमा.) अचल आहे. ॥१०॥ यमदूतांच्या तोंडास काजळ फासणारी (त्यांची तोंडे काळी करणारी) या जगात यमुने सारखी आहे. व जीवन्मुक्तीचा हेतु -कारण, जणू काशी आहे. ॥११॥ ही रामकथा पवित्र-पावन तुलसी-सारखी रामचंद्रास प्रिय आहे; व तुलसीदासांच्या हितासाठी त्यांच्या हृदयांत राहणारी हुलसीमाते सारखी (तुलसीदासांच्या जननीचें नाव हुलसी होते) आहे. ॥१२॥

टीका — चौ-१० (१) संतसमाजपयोधिं रमासी — संतसमाज हा जंगम तीर्थराज आहे.

(क) रमा — लक्ष्मी ही क्षीरसागर कन्या आहे व भगवान तिच्यामुळे - तिच्यासाठी क्षीरसागरात जाऊन राहिले. ही रमाच जणू रामकथारूपाने संतसमाजक्षीरसागरात प्रगट झाली. भाव हा की जसे लक्ष्मीसाठी भगवान क्षीरसागरात राहिले तसे रामकथालक्ष्मीमुळे ते या संत समाजात येऊन राहतात. सीता रामचंद्राची वस्ती या संतांच्या हृदयात होते व ती रामकथेनेच होते हे ध्वनित केले. प्रयागला वेणीमाधव (माधव) आहेत तसे संतसमाजात सीताराम वेणीमाधव आहेत. 'जय राम रमारमणं' (७/१४/१) 'सिंधुसुताप्रिय कान्ता!' (१/१८६/१) (२) 'विश्व भार भर अचला क्ष्मासी - 'जगाचा भार धारण करण्यास पृथ्वी सारखी अचल' असा याचा अर्थ करतात. जग म्हणजेच पृथ्वी, मग हा अर्थ कसा काय केला कोणास ठाऊक! व 'भर' याचा अर्थ धारण करणारी असा अर्थ करणे या मंद मतीस योग्य वाटत नाहीं. या चरणात निदान दोन अर्थ तरी आहेत.

(क) बिश्व — सर्व, 'विश्व कृत्स्नेच भुवने' कृत्स-सर्व. या संतसमाजाच्या भरणपोषणाची जबाबदारी ती सांभाळते. त्यांना आपल्या भरणपोषणासाठी उद्योग करावा लागत नाही. 'तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्' (भ.गी.) 'निर्योगक्षेम

आत्मवान्' (भ.गी.) संतसमाज उदरभरणासाठी प्रयत्न करीत नाही. 'विश्वंभर' हे नारायण, विष्णु यांचे एक नाव आहे. 'भृ भरणे, भरतिवा' 'जोही विश्वभरण पोषण करि। नाम तयाचे भरत जाणतरि'। विश्वाचे भरणपोषण करणारा विश्वंभर राम-नारायण-सीतालक्ष्मीसह जेथे निवास करतो, त्यांना भरणपोषणाचा उद्योग व चिंता करणे अनावश्यक हे ओघानेच ठरले. पृथ्वी सर्वांचे भरणपोषण करते म्हणून तिला विश्वंभरा म्हणतात व विष्णुपत्नी म्हणतात ते योग्यच आहे.
(ख) 'बट बिस्वास अचल निजधर्मा' – हा प्रयाग राजात अक्षयवट आहे. तशी या प्रयाग राजात अचला - श्रद्धा आहे. हिंदीत अचल शब्द असला तरी तो रामकथेचे विशेषण असल्यामुळे विश्वास म्हणता येत नाही. शिवाय रामकथारूपी संजीवनिमुळी हे औषध घेताना सात्विक श्रद्धा हे अनुमान लागतेच. 'रघुपति भक्ति (रामकथा) मुळी संजीवनि । अनुपाना श्रद्धा अतिपावनि' (७/१२२/७) म्हणून अचल श्रद्धारूपी पृथ्वी रामकथेतच आहे. रामकथाच आपला सर्व भार वाहील अशी अचल-श्रद्धा या संतसमाजात असते. 'स्वप्निंहि शोक न नामकृपेने' तसाच रामकथेने. सूचना -तुलसीदासांनी रामकथेला प्रयागरूपकाने वर्णिलेले वाचल्याचे स्मरते पण यावेळी आठवत नाही व शोधून सापडत नाही !
चौ – ११ – (१) 'यमगणमुखी मसि जगिं यमुनासी '– मसि – काजळ, शाई. 'यमुना कलिमल हरणि सुशोभित' (६/१२०/५) 'विधिनिषेधमय कलिमलहरणी' 'कर्मकथा ती भानुनंदनी' (१/२/९) सुचविले की रामकथेत विधिनिषेधमय कर्ममार्गाचा विचार पण आहे.
(क) संतसमाज असा ज्ञान-भक्तिप्रेमयुक्त झाला तरी तो 'स्वकर्मधर्माचाराचा त्याग करीत नाही. 'वर्णाश्रम निज निज धर्म -निरत, वेदपथिं लोक । वर्तति, पावति सदा सुख, नहिं भय रोग न शोक' (७/२०).
(ख) रामकथा कलिमलहरणी असल्याने, त्या संतसमाजात कोणी पाप करीत नाहीत; चुकून झालेच तर रामकथारूपी यमुना त्याचा नाश करते. या जगात जशी समाजाकडे येण्यास, तोंड दाखविण्यास लाज वाटते, ते आपले तोंड काळे करून जातात कुठे तरी..
(ग) भाव हा की मरणसमयीं जरी कोणाच्या मुखात वा हृदयात ही रामकथा किंचित मात्र येईल तर, विष्णुदूत येऊन यमदूतांना पळवून लावतात. प्रयागाला त्रिवेणी संगम आहे त्याप्रमाणे संत समाजात, रामकथेत भक्ति ज्ञान व कर्म यांचा संगम आहे हे येथवर दाखविले.
(२) जीवन्मुक्ति-हेतु जणु काशी – काशी-वाराणशी केवळ मुक्तिहेतु, मुक्तिजन्मभूमि आहे, पण जिवंतपणी मुक्ति काशीत, काशीमुळेच मिळत नाही; मेल्यावर मिळते - पण रामकथा जिवंत असताच मुक्ति देते म्हणून जणुं असे म्हटले. रामकथा संतसद्गुरुमुखाने सतत श्रवण केल्यास श्रोते सुद्धा जीवन्मुक्त होऊ शकतात. भवसरितातरणीने सुचविलेल्या मोक्षप्राप्तीचा येथे उपसंहार केला.

(क) स्थावर तीर्थराजात काशी नाही, संतसमाजातील तीर्थराजात रामकथा काशी आहे, नव्हे काशीहून फार श्रेष्ठ आहे.

(ख) काशीत मुक्ती मिळण्याचे कारण महेश अंतकाळी उपदेश करतात. ही रामकथा शंकरांच्या मानसातूनच निघालेली आहे. ती कोठेही जीवन्मुक्ति देऊ शकते. शंकराना यावे लागत नाही, संतसमाजरूपी शंकरच ते कार्य करतात व जिवंतपणीच जीव सर्वकर्मबंधातून मुक्त होतो. संचित कर्म रामकथेने झालेल्या ज्ञानाने जळते, क्रियमाण रामकथेने जळते व प्रारब्ध भोगून जळते. येथून पुढे उपसंहार व माहात्म्य वर्णन आहे.

(३) **जीवन्मुक्तलक्षणे — महोपनिषद** अध्याय २/४२-६२ पर्यंत आहेत. **'तपःप्रभृतिना** यस्मै हेतुनैव विना पुनः । **भोगा इह न रोचन्ते** सजीवन्मुक्त उच्यते ॥४२॥ आपतत्सु यथाकालं सुखदुःखे स्वनारतः । न हृष्यति ग्लयतिच । ॥४३॥ **हर्षामर्षभयक्रोध काम कार्पण्य दृष्टिभिः** । न परामृशते योऽनाः' ॥४४॥ सजीवन्मुक्त उच्यते हा प्रत्येक श्लोकाचा चौथा चरण आहे म्हणून तो लिहिला नाही। 'अहंकारमयी त्यक्त्वा वासनां लीलयैव यः। तिष्ठतिध्येय-संत्यागी ॥४५॥ ईप्सितानीप्सिते न स्तः । यस्यान्तर्वृत्ति दृष्टिषु । सुषुप्तिवद्यश्चरति ॥४६॥ अध्यात्मरतिरासीनः पूर्णः पावन मानसः । **प्राप्तानुत्तम विश्रान्तिर्नकिंचिदिह वांछति** ॥४७॥

**योजीवति गतस्नेहः** । संवेद्येन हृदाकाशे न मनागपि लिप्यते (४८) **रागद्वेषौ सुखं दुःखं - धर्माधर्मो फलाफले** । यःकरोत्यनपेक्ष्यैव ॥४९॥ मौनवान्निरहंभावो निर्मानो मुक्तमत्सरः। **यःकरोति गतोद्वेगः** ॥५०॥ सर्वत्र विगत स्नेहो यःसाक्षिवदवस्थितः । **निरिच्छो वर्तते कार्ये** ॥५१॥ **कट्वम्ललवणं तिक्तं अमृष्टंमृष्टमेवच । सममेवच योभुंक्ते ॥५४॥ जरामरणमापच्च राज्यं दारिद्र्यमेवच रम्यमित्येव यो भुंक्ते'** ॥५५॥ या श्लोकांत सर्व सार आल्याने विस्तार नको व श्लोक सोपे असल्याने अर्थ देण्याची आवश्यकता नाही. **बाह्यलक्षणांवरून साधकांस जीवन्मुक्त ओळखता येणार नाहीत. आत्मनिरीक्षणासाठी असली लक्षणे दिलेली असतात.**

**चौ — १२ — (१) रामप्रिय पावन तुलसीसी** — तुळसीचे पान, मंजरी इत्यादि प्रत्येक भाग एवढेच नव्हे तर तुळशीच्या खालची माती सुद्धा पवित्र आहे. तुलसी रोगनाश करणारी आहे. 'पत्रं पुष्पं फलं मूलं शाखात्वक् स्कंध संज्ञितम् । तुलसी संभवं सर्वं पावनं मृत्तिकादिकम्' (प. पु. उ. २४/२) मेलेल्या माणसाला जाळताना त्या काष्ठांत जर एखादे तुळसीकाष्ट असेल तर तो मरणारा अनेक पापयुक्त असला तरी त्यास मुक्ति मिळते' (प. पु. उ. २४/७). 'तुलस्यमृतजन्मासि सदात्वं **केशवप्रिया** ।' (क) रामकथा तुलसीसारखी रामाला प्रिय आहे असे म्हणण्यात भाव हा आहे की रामपूजेत बाकी सर्व उपचार, राजोपचारासुद्धा असले आणि तुलसीपत्र नसले तर ती पूजा जशी निष्फळ त्याप्रमाणेच इतर सर्व परमार्थसाधने असून जर रामकथा श्रवण नसेल तर ती सर्वसाधने निष्फळ ठरतील; म्हणूनच श्रीरामसीता व लक्ष्मण यास निवास करण्यास जी चौदा स्थाने सांगितली त्यात **सतत रामकथा**

श्रवण करणारांचे हृदय हे पहिले स्थान सांगितले आहे. (२/१२८/४-५) जे नामाविषयीं सांगितले तेंच रामकथेविषयी सुचविले. 'मनि ममलीलारति अति पावति' (३/१६/८) हे भक्तीचे एक लक्षण ज्ञान झाल्यानंतरचे श्रीरामाने सांगितले आहे.
(२) तुलसी दास हित हर्दि हुलसीसी — हुलसी हें तुलसीदासांच्या जननीचे नाव होते. 'हित परलोक लोकि पितुमाता' (२७/६) असे नामवर्णनात सांगितले. रामकथा आईप्रमाणे हित करणारी आहे. आई बाहेर जगात असते; पण ही रामकथारूपी तुलसीदासांची हुलसीमाता यांच्या हृदयात राहून त्यांचे सर्वप्रकारे हित करीत आहे.
(क) तुलसींच्या हुलसीने एवढे हित केले तीं त्या नवजात शिशूचा त्याग त्याचा पिता अरण्यात करणार होता तो केला जाऊ नये म्हणून तिने आपल्या चुनिया नावाच्या दासीच्या पदरात त्याला घातला व तिला जाण्यास सांगितले. **रामकथा मातेने हे हित केले की जे 'भवारण्ये भीमे' भ्रमण करीत होते त्यास भवारण्यात भटकणारांचे चिरंतन उद्धारक करून ठेवले.** या मातेचा व त्यांचा विरह कधी झाला नाही. जन्मदा माता तिसऱ्या दिवशीच परलोकास गेली; पण तीच जणू रामकथारूपाने तुलसीदासांच्या हृदयात निरंतर राहिली व ज्यांची इच्छा असेल त्यांच्या हृदयात राहण्यास तयार आहे व त्या त्या व्यक्तींना परमविश्राम देण्यास ती सदा समर्थ आहे; पण परम मातृभक्त बनल्यानेच हे होऊ शकते.
ल. टे : रामचंद्रांना ही रामकथा इतकी प्रिय आहे की ते तिच्यावर लुब्ध झाले आहेत. **'कविता मंजरी यस्य रामभ्रमरभूषिता'**. याचे कारण ती भक्तिमय आहे. **'प्रिय रघुबीरा भक्तिच भारी'** रामास जे प्रिय ते शंकरास अतिप्रिय व शिवाला प्रिय ते रामाला प्रिय, म्हणून हेच आता सांगतात

हिं.- **सिव प्रिय मेकल सैल सुतासी । सकल सिद्धि सुख संपति रासी ॥१३॥**
**सदगुन सुरगन अंब अदितिसी । रघुपतिभक्ति प्रेम परमितिसी ॥१४॥**
म.- **शिवप्रिय मेकल शैल सुतासी । सकल सिद्धि सुखसंपति रासी ॥१३॥**
**सद्गुण सुरगण अंब अदितिसी । रघुपति भक्ति-प्रेम परमितिसी ॥१४॥**

**अर्थ** — ही रामकथा शंकरांस मेकल (अमरकंटक) पर्वत-कन्या जी नर्मदा तिच्या सारखी प्रिय आहे. ही सर्वसिद्धि, सर्व सुखे व सर्व संपत्तीची रास आहे. ॥१३॥ सद्गुणरूप देवगणांना जन्मदेणाऱ्या अंबा अदिति सारखी आहे; व रघुपतिप्रेमभक्तीच्या परमसीमेसारखी आहे ॥१४॥
**टीका — चौ. १३ — (१) मेकल-शैल-सुता** — मैकल-अमरकंटक- पर्वतावरून उगम पावलेली नर्मदा नदी. **'रेवा तु नर्मदा सोमोद्भवा मेकलकन्यका'** (अमरे) सोमात् रुद्रात उद्भवःयस्याः सा सोमोद्भवा. रुद्रा-शंकरा-पासून तिचा उद्भव झाला आहे म्हणून सोमोद्भवा म्हणतात. स्कंद पुराणात नर्मदावतरण प्रकरण आहे. **कल्याण स्कंदपुराणांक पृ.७ ५०-५१ पहा.**

(क) 'हर गंगे!' 'गंगे हर!' हा ध्वनि जसा गंगातीरीं जोराने ऐकू येतो, त्याहून अधिक 'हर नर्मदा हर!' हा ध्वनि नर्मदातीरी सारखा ऐकू येतो. पण 'हर गोदे! हर कृष्णे!' असे ध्वनि ऐकू येत नाहीत त्या त्या नदीतीरावर! या गोष्टी वरूनहि गंगा व हर आणि नर्मदा व हर यांचा निकट संबंध दिसून येतो. गोदावरी शंकरांच्या जटेतूनच उत्पन्न झाली असली व शंकरास प्रिय असली तरि तिच्या नावाबरोबर शंकराच्या नावाचा घोष केला जात नाही. 'रेवातटे तपः कुर्यात् स्नानंस्याज्जान्हवीतटे' खरोखर नर्मदा किनारा अद्यापहि शुद्ध तपोभूमी आहे. बलिराजा व सहस्रार्जुन हे नर्मदातीरींच रहात होते. कोणत्याहीं शहराचे सांडपाणी जिच्यात पडत नाही अशी महानदी फक्त नर्मदाच सोवळी राहिली आहे. 'नर्मदा के कंकर (गोटे) सब शंकर' अशी तिकडे म्हण आहे.

(ख) श्री ओंकारेश्वराच्या वरच्या बाजूस काही मैलांवर एका धबधब्याच्या डोहांत फारच सुंदर व सुलक्षण बाण सापडतात. त्यात काही चंद्रशेखर असतात व त्यातील चंद्रकोर उत्तरायणात स्वच्छ दिसू लागते व दक्षिणायनात धूसर होत जाते; हे या नयनांनी पाहिले आहे. आणखी विस्तार-मा.पी.प.

(ग) शिव स्वतः कल्याणस्वरूप असून सुद्धा त्यांना रामकथा इतकी प्रिय आहे की आपलाच गुप्त शिष्य जो काकभुशुंडी त्याच्याजवळ हंसरूपाने ती श्रवण केली; अगस्ति ऋषींच्या आश्रमात जाऊन श्रवण करीत असत. 'रामकथा मुनिवर वाखाणति। श्रवति महेश परमसुख पावति' (१) ४८/३) म्हणूनच महेश उमेस म्हणाले की। 'जिहिं हरिकथा श्रुता नहिं कानां। श्रवणरंध्र अहिभवनहि माना' (१/११३/२) ज्या कानांनी हरिकथा श्रवण केली नाही ते कान नसून सर्पाची बिळें होत.

(२) सकल सिद्धि – रासी.' यात सकाम भक्तांच्या प्राप्तव्याचा उपसंहार केला. 'सकल सिद्धि' पदानी जिज्ञासूभक्त (२२/३ व या दोह्याची चौ. ८ पूर्वार्ध पहा.) सुख शब्दाने आर्तिविनाशाने होणारे सुख सुचविले, म्हणून आर्त (२२/५ व ३१/७ उत्तरार्ध) व संपति-संपत्ती याने अर्थार्थी (२२/४ व ३१/७ पूर्वार्ध पहा) यांच्या प्राप्तव्यांचा येथे उपसंहार केला. ३१/५ मध्ये 'सकल जनरंजनि' ने उपक्रम केला आहे.

(क) संत समाजात असणाऱ्या या रामकथेनें ही नानाविध सुखे, संपत्ति व सिद्धीनी प्राप्त होणारे ऐश्वर्य मिळते. (२२/३,४,५ टी. पहा.) पुढील चौपाईत रामप्रेमभक्तीचा उपसंहार करतात -

**चौ - १४ - (१) सद्गुण - अंब अदिति सी –**

(क) अदिति ही कश्यप पत्नी. सर्व आदित्य हिचे पुत्र. विष्णु, वामन, इंद्र इत्यादि देव हिचे पुत्र, म्हणून दितिपुत्र जे दैत्य व दनुपुत्र जे दनुज, दानव ते देवांचे सापत्न बंधू, म्हणून ते देवशत्रू बनले. कश्यप व अदिति यांनी अनेकवेळा दशरथ कौसल्यावतार घेतले आहेत. 'करतां कश्यप-अदिति तप महा। पूर्वी त्या मी दिला

वर पहा ॥ ते दशरथ कौसल्या तनुधर । कौसलपुरी प्रगट नरपति वर॥ जाऊनि धरु तद्गृहिं अवतारहि । रघुकुलतिलक बंधु ते चारहि" (१/१ ८७/३-५)

(ख) देवांची अंबा जशी अदिति तशी सद्गुणांची अंबा रामकथा आहे; म्हणून रामकथा श्रवण करणारात हळुहळू, सद्गुण आपोआप उत्पन्न होतील. सारखी म्हणण्याचे कारण की सद्गुण अनंत आहेत व अदितिपुत्रांची संख्या परिमित आहे. हे सद्गुण कोणते ते अरण्य ४५- ४६ मधील संतलक्षणे व उत्तर ३७-३८ मधील लक्षणांत दिसतील. 'श्रुणुमुनि संतांचे गुण जितके वदुं न शकति वाणी श्रुति तितके' (३/४६/८).

(२) रघुपतिभक्ति-प्रेम परमिति सी – रामप्रेमभक्तीची परमावधि रामकथेने गाठता येते. भाव हा की या रामकथेत परमावधीचे रामभक्तिप्रेम साठविलेले आहे. तसे व तितके इतर रामायणात नाही हे अगदी सत्य आहे. म्हणून 'जिवन्मुक्तही ब्रह्मपर श्रवती त्यजुनी ध्यान । जे न धरिति हरिकथारति ते हृदयें पाषाण' (७/४२). येथे प्रेमभक्तीचा उपसंहार केला.

(क) परम प्रेमभक्ति प्राप्त झाली की सीताराम हृदयात सतत विहार करतील, हे पुढच्या दोह्यांत सांगून या रामकथा प्रकरणाची समाप्ति होईल. ल.ठे... चौ.५ मध्ये रामकथा शब्दाने उपक्रम केला व येथे रघुपति शब्दाने सुचविले की ते राम म्हणजेच रघुकुल भूषण रामचंद्र.

हिं.दो.- रामकथा मंदाकिनी चित्रकूट चित चारु ।
तुलसी सुभग सनेह बन सियरघुबीर बिहारु ॥३१॥
म.दो.- रामकथा मंदाकिनी चित्त चित्रकुट चारु ।
तुलसी स्नेह सुभग वनिं सिय रघुवीर-विहारु ॥३१॥

अर्थ – रामकथा (चित्रकुटाजवळील-) मंदाकिनी नदी आहे; शुद्ध निर्मल (चारु) चित्त हाच चित्रकूट पर्वत आहे; हे तुलसी दासा! (किंवा तुलसीदासांचा स्नेह) शुद्ध स्नेह हेंच रमणीय वन असून त्यांत सीता (सिय) रघुवीर (रामलक्ष्मण) विहार करीत असतात. ॥३१॥

टीका. (१) रामकथा – जी रामकथा त्यांनी आपल्या गुरुजवळ अनेकवेळा श्रवण केली तेव्हा काही समजली व जिचा विस्तार करून ते प्रबोध प्राप्तीसाठी रामचरित लिहिणार आहेत ती. (२) मंदाकिनी नदी – ही चित्रकूट पर्वताच्या जवळून वाहते. चित्रकूटपासुन ५/६ कोसांवर असलेल्या अनसूया पर्वतावर ही उगम पावते. 'सुरसरिं-धार नाव मंदाकिनि । जी सब पातक-पोतक-डाकिनि ॥ नदी पुनीत पुराणी वानित । अत्रीप्रिया तपें निज आणित.' (२/१३२/५-६) यांच्या टीकेत विस्तार पहावा. (३) चित्रकुट – चित्रकूट पर्वत. चौदा वर्षांच्या वनवासांतील प्रारंभीचा काही वेळ रामचंद्र येथे राहिले होते.

(क) श्रीतुलसीदास — बराच काळ येथे राहिले होते. त्यांस श्रीराम दर्शन येथेच झाले. जेथे स्वतः श्रीराम-सीता लक्ष्मणानीं विहार केला, त्या निसर्गतःच परम पवित्र तपोभूमि असलेल्या स्थानाचा प्रभाव कोण वर्णन करणार? तथापि कलिकालाचा प्रभाव या स्थानावरहि काही कमी पडलेला नाहीं। (विनय पत्रिका पदें २३,२४ पहा)

(४) चारु चित्त — निर्मळ, निर्दोष हृदय; कपट, दंभ, पाखंड हे चित्ताचे मळ भगवंतास प्रिय नाहीत. कामक्रोध इतके अप्रिय नसले प्रभूला तरी ते मळच आहेत. चित्रकूटपर्वत असुनहि रमणीय,चारु आहे. पर्वताचे सौंदर्य मुख्यतः त्यावरील वनउपवनांवर अवलंबून असते. सुंदर नागमोडी सरिता पायथ्याशी वहात असली आणि पर्वतावर वन नसेल तर पर्वत मुळीच चांगला दिसणार नाही. तसेच चित्तचित्रकूटाचे मनोहरत्व मुख्यतः त्यांतील वनावरच अवलंबून असणार. रामचंद्राविषयीं शुद्ध, निष्कपट निर्मळ प्रेम, स्नेह हेच येथे वन आहे. वनाची वाढ पायथ्याजवळून वाहणाऱ्या नदीच्या आश्रयाने होते; तशी रामकथा-मंदाकिनी सतत चित्तांत वहात राहिली की सुभग-सुंदर-मनोहर-स्नेहरूपी वन त्या चित्तांत उगवून वाढते. 'वन' शब्दाचा अर्थ जल असाही आहे; पण रामसीता चित्रकूटला जलविहार करीत असल्याचा पुरावा नाही; व वनात-काननात-विहार करीत यास पुष्कळ आधार आहेत म्हणून वन-कानन-अर्थच घेणे भाग आहे. दोहा ३ मध्ये स्नेहाला जल म्हटले आहे पण तेथे चित्रकूट विहाराचा संबंध नाही. ज्या चित्तात सुंदर स्नेहवन असेल त्यात मग-

(५) सिय रघुबीर बिहारू — सीता व दोघे रघुवीर विहार करीत राहतील. सीताराम-लक्ष्मण त्या हृदयात प्रेमाने येऊन राहतील हा भाव आहे. सीताराम व लक्ष्मण एकाचवेळी मंदाकिनी स्नानाला जात असत, कथा श्रवण करीत असत. कधीं रामसीता एका भागात विहार करीत तर लक्ष्मण कंदमूलांदिकांसाठी त्याच वनात विहार करीत म्हणून तिघांचाहि विहार समजणे भाग आहे. सर्व मुनींनी राम लक्ष्मण सीता यांचा निवासच हृदयात मागितला आहे. तुलसीदासांनी म्हटले आहे, 'चित्रकूट कानन छबि, को कबि बरनै पार । जहँ सियलखन सहित नित रघुबर करहिं बिहार' (गीतावली २/४७/२१) -गीतावली ग्रंथाची रचना चित्रकूटलाच झाली आहे. त्यात अयो. कां पदें ४४ पासून ५० मुद्दाम पहावीत. गीतावली हे सप्तकांडयुक्त रामायणच आहे. विनयपत्रिका पदें २३, २४ पहा.

(क) विहार शब्दाचा अर्थ मं.श्लो ४ 'सीताराम गुणग्रामपुण्यारण्य विहारिणौ' च्या टीकेत पहावा,

(ख) रघुवर शब्द न घालता रघुवीर शब्दाने निर्भयता, शौर्य वीर्य इत्यादि वीरगुण सुचविले आणि रघुवीराची सहा प्रकारची वीरता (१/१३/७ टी.प.) सुचविली. ज्या हृदयातील स्नेहवनात दयावीर, दानवीर, युद्धवीर, धर्मवीर, विद्यावीर व ऋजुतावीर राम राहतात व प्रेमाने विहार करतात. त्याला सुखाला काय कमी व भय कशाचे. असे झाले म्हणजेच भवभयविनाश पूर्ण होतो.

ल.ठे. — तुलसीदासांच्या चित्रकूटावरील अनुभवांचे प्रतिबिंब या दोह्यांत स्पष्ट दिसते. मूळगोसाई चरितात जे वर्णन केले आहे की तुलसीदासांच्या चर्मचक्षूंसमोर सर्व रामचरित्रलीला तुलसीदासांस दिसत असत, त्याचा हा अप्रत्यक्ष पुरावा आहे. (क) तुलसीदास येथे सुचवित आहेत की गुरुमुखाने श्रवण केलेल्या कथेच्या प्रभावाने सीतारामलक्ष्मण माझ्या हृदयात विहार करीत आहेत. 'सीतालखन समेत प्रभु सोहत तुलसी दास । हर्षत सुर बरषतसुमन सगुण सुमंगल बास (दोहावली २) 'प्रभूसीतालक्ष्मणा सह शोभति तुलसीदास । हर्षित सुर, वर्षति सुमन सगुण सुमंगलवास' (त्याचाच अनुवाद)

संगति — सद्‌गुरुमुखाने जी कथा श्रवण केली तिचा महिमा येथपर्यंत वर्णिला. कथेत याज्ञवल्क्य-भरद्वाज-संवादाची भर घालून विस्तार करून जे श्रीरामचरित लिहिले जाणार आहे त्याचा प्रभाव वगैरे आता पुढील चौपाईपासून सांगतात. चरित शब्द हिंदीत पुल्लिंगी असल्याने हिंदीत सर्व उपमाने पुल्लिंगी वापरली आहेत. हे पुढे दिसेल. परंतु मराठीत सर्व ठिकाणी हे साधणे अशक्यच आहे.

सूचना — पुढील चौपायांच्या इतक्या गूढार्थांनी भरलेल्या अनेक एकत्र असलेल्या १४ चौपाया रामायणात नाहीत. अत्यंत आश्चर्यकारक व मतीस स्तंभित करणारी रचना असल्याने टीकेचा विस्तार फार करावा लागला आहे. म्हणून दुसऱ्या चौपाईपासूनची टीका वारंवार वाचावी अशी विनंती करावी लागत आहे.

हिं.- रामचरित चिंतामनि चारू । संत सुमति तिय सुभग सिंगारू ॥१॥
जग मंगल गुन ग्राम राम के । दानि मुकुति धन धरम धाम के ॥२॥
सद्‌गुरु ग्यान बिराग जोग के । बिबुध बैद भव भीम रोग के ॥३॥

म.- रामचरित चिंतामणि चारू । संत-सुधी-स्त्री-शुभ-शृंगारू ॥१॥
जगमंगल रामाचे गुणगण । दायक मुक्ती धाम धर्म धन ॥२॥
सद्‌गुरु बोध विरागा योगा । विबुधवैद्य भवभीषण - रोगा ॥३॥

अर्थ — रामचरित हा चारु चिंतामणि आहे, व संतांच्या सुबुद्धिरूपी स्त्रीचा शुभ शृंगार आहे ॥१॥ (त्यात) रामचंद्रांच्या गुणांचा समूह (ग्राम) जगाचे मंगल करणारा आहे व तो मुक्ति, धाम, (वैकुंठादि) धर्म व धन देणारा आहे ॥२॥ तो ज्ञान वैराग्य व योग (याना देणारा) यांचा सद्‌गुरु असून भयंकर भवरोगाचा (बरा करणारा) देववैद्य आहे. ॥३॥

टीका — ल. ठे. — रामनामाची जी महती तीच रामकथेची हे मागील प्रकरणाच्या टीकेवरून ध्यानी आलेच असेल. रामकथेचाच विस्तार रामचरित असल्याने यात सुद्धा ते गुण कसे आहेत हे अधिक विस्ताराने सांगणे क्रमप्राप्त आहे. रामकथावर्णनात चौदा चौपाया व एक दोहा व २५ उपमा आहेत; यात - चौदा चौपायात तीस उपमा व दोन दोहे शिवाय आहेत; हा बहिरंग विस्तार झाला. मागील प्रकरणात

शमादिषटक संपत्ति, वैराग्य मुमुक्षा, इत्यादींचे स्पष्ट किंवा अस्पष्ट वर्णन नाही. (ध्वनित आहे); कारण की ती कथा श्रोता वक्ता ज्ञाननिधि वगैरे असामान्य पुरुषांतील संवाद होता. हे चरित्र कलियुगातील सर्व समाजासाठी आहे; म्हणून त्या विषयांचा उल्लेख अस्पष्टपणेच पण केला आहे. वर्णन पूर्वीच्यासारखे वरवर अगदी सोपे पण आत अति-अति गूढ पण पूर्ण तर्कशुद्ध व सुसंगत आहे. दुसऱ्या चौपाईपासूनचा पुढील भाग म्हणजे मानवी बुद्धीला अगदी अशक्य अशा, अति अद्भूत, अतिमानुष काव्यकला प्रतिभेचा एकमेवाद्वितीय नमुना आहे हे पुढे दिसेलच.

चौ - १ - (१) रामचरित चारु चिंतामणी आहे – 'चिंतामणिं ददौ दिव्यंमणिभद्रो महामतिः ॥१५॥ स मणिः कौस्तुभ इव द्योतमानोर्कसन्निभः । दृष्टःश्रुतो वा ध्यातो वा नृणां यच्छति चिंतितम् ॥१६॥ तस्य कान्तिलव स्पृष्टं कांस्यं ताम्रममत्रपु । पाषाणादिकमन्यद्वा सद्यो भवति काञ्चनम् ॥१७॥ (स्कंद पु. ब्र. खं. ५ मा.पी.) काञ्चनम् हा कौस्तुभासारखा मणि असून सूर्याइतका तेजस्वी असतो; त्याच्या दर्शन, श्रवण व ध्यानाने चिंतिलेली वस्तू मिळते. त्याच्या प्रकाशाचा थोडासा स्पर्श झाला तरीसुद्धा कासे, तांबे, लोखंड, जस्त व पाषाणादिसुद्धा तत्काळ सोने बनतात. म्हणजे हा परीसापेक्षांहि प्रभावी आहे.

(क) याने हे सुचविले की पापी, शठ, कामी, दुष्ट, निर्बुद्ध, जडबुद्धि लोकांचे सुद्धा या रामचरित चिंतामणीने सोने होईल. कल्याण होईल. 'सुधारती शठ सुसंग पावुनि । लोहिं हेमता परीस लागुनि' (१/३/९) श्रवणामननाने शठादिकसुद्धा सुधारतील.

(ख) चिंतामणि – प्रभाव मानसात वर्णिला आहे. 'रामभक्ति चिंतामणि सुंदर वसे गरुड ज्याचे हृदयांतर ॥ परम प्रकाशरूप दिनराती। कांहिच नको दिवा धृत वाती ॥ निकट मोह दरिद्र येत ना । त्याला विझवी लोभ वात ना ॥ प्रबल अविद्या तिमिर नासतो । सकल शलभसमुदाय हारतो॥ खल कामादि निकट ना वळती । ज्याचे हृदयिं भक्ति करि वसती ॥' 'या मणिविण सुख कुणि न पावति ।' व्यापिति मानसरोग न भारी । ज्यांवश जीवां दुःखे सारी ॥ रामभक्तिमणि ज्या उरिं राही । दुःखलेश त्या स्वप्निं नाही ॥ (७/१२०/२-९) यातील रामभक्ति शब्दांच्या जागी रामचरित शब्द घातले की अर्थ स्पष्ट होतो, कारण दोही ना चिंतामणी म्हटले आहे.

(ग) रामचरित – चारुचिंतामणि - सुंदर, निर्दोष चिंतामणि; म्हणजेच रामचरित. पण हा चिंतामणि हृदयगृहात सतत राहिला पाहिजे, म्हणजेच रामकथेचे सतत श्रवणमनननिदिध्यासन घडले पाहिजे चित्तात. स्वर्गातील चिंतामणि ज्ञान व रामभक्ति देऊ शकत नाही; कामक्रोधादिकांपासून, भयापासून देवांना सुद्धा सोडवित नाही. पण रामचरित चिंतामणी हे सर्व करतो, व भवभयापासूनसुद्धा सोडवितो. म्हणून हा त्याच्यापेक्षा आदरणीय आहे.

(घ) या एका उपमानाने रामचरित्रापासून होणारे सर्व लाभ सुचवून ठेवले. येथे फलाचा निर्देश सुचविला- हाच पुढे स्पष्ट करून उपपत्ति दाखवितील.

(२) संत सुधीस्त्री शुभ शृंगारू – शुभ - सुभग - हे विशेषण दोन्हीकडे घेणे जरूर आहे. सौभाग्यवती स्त्रीचा सौभाग्य शृंगार. संतांची सुमति भगवद्भक्तीरूपी सौभाग्ययुक्त असते. सुवासिनीचे नित्य शृंगार व नैमित्तिक शृंगार असे दोन प्रकारचे शृंगार असतात. येथे नित्य शृंगार, सुवासिनी शब्दानेच तिचा मुख्य शृंगार म्हणजे सौभाग्यसूचक वस्त्र सांगितला जातो. (सु. वास - वस्त्रे धारण करणारी)

(क) 'सर्वपरीं भूषित विधुवदना । वरनारि न शोभे विण वसना' 'काव्य विचित्र सुकबिकृत जेंही । रामनामविण शोभत नाहीं' (१/१०/४,३) 'यामधिं रघुपतिनाम उदार' (१/१०/१) हे रामचरित कवितेचे सुंदर वस्त्र आहे.

(ख) त्याची अक्षरे कानांतून ऐकू येणारी श्रवण करणे. (अजपाजप) 'भक्तिसुस्त्रि कल कर्णविभूषण' ही कर्णभूषणे आहेत (१/२०/६) रामप्रेम हा कुंकुमतिलक, ज्ञान हे काजळ-अंजन 'ज्ञानांजन' अनुपम अर्थ ही हळद. 'अनुपम अर्थ सुभाव सुभाषा । गणुं पराग मकरंद सुवासा' कमळांतील पराग पिवळे असतात. शुकाप्रमाणे रामचरितगान करणे ही नथ (शुकनासा) नाकाचा अलंकार. लीनता हा केशकलाप. परोक्ष - अपरोक्षानुभूति ही उंचमोलाची चोळी. चोळीशिवाय असलेली सौभाग्यवती स्त्री दृष्टीस पडल्यास पाहणाराने डोळे मिटावे असे शास्त्र सांगते. 'विधवां कंचुकोपेतां सधवां कंचुकं विना । यतिं च कंचुकोपेतं दृष्ट्वा चक्षुर्निमीलयेत् । प्रभूची स्तुती करणे ही केशकलापांतील फुलांची वेणी. अपर व पर वैराग्य या काचेच्या बांगड्या आहेत. कर्म, उपासना व संतसंग ही तीन पेडांची वेणी घालणे होय. यात संतसंगति हा मधला पेड आहे. हे सगळे नित्य शृंगारात पाहिजेतच. सगळे सौभाग्य शृंगार एका रामचरितरूपी मंगळसूत्राच्या आश्रयानेच असतात. हे मंगलमोदनिधान मंगलसूत्र नसले की ते वैधव्यच. याप्रमाणे या रूपकाचा विस्तार केला गेला. मतभेद होणे शक्य आहे.

चौ.२ (१) या चौपाईपासून दो. ३२ रा, पर्यंत रामगुणगणांचे (गुणग्रामांचे) वर्णन २८ प्रकारे केले आहे. ब्रह्मदेवाने बालकांडांत (दो-१८६) मध्ये केलेल्या स्तुतीपासून उत्तर कांडांत नारदानी (दो.५१) केलेल्या स्तुतीपर्यंत ज्या २८वीस स्तुती आहेत त्यांची फलश्रुति या २८ प्रकारांत क्रमशः सांगितली आहे, त्या त्या स्तुतींत येथे दिलेल्या फलश्रुतीचा उल्लेख क्रमाने सापडतो. त्या २८ स्तुती म्हणजे अश्विनी नक्षत्रापासून अभिजितसह रेवती नक्षत्रापर्यंतची २८ नक्षत्रे आहेत.

(क) 'राका रजनी भक्ति तव राम नाम तो सोम ॥ अपर नाम उडुगण विमल वसो भक्त हृद्व्योम' (३/४२/-) स्तुतींत मुख्यतः प्रभूच्या गुणवर्णनपर नामांचाच उल्लेख असतो. 'जयजय सुरनायक जनसुखदायक प्रणतपाल भगवंता' (१/१८६). यात बहुतेक सगळे शब्द नामेंच आहेत. त्या त्या नामांनी भगवंताच्या गुणांचे वर्णन करणे म्हणजेच स्तुति. 'स्तुति करिती गद्गद्गिरे' (७/१३म) असे शंकर स्तुति करतात त्याच्या उपक्रमात म्हटले व उपसंहारात म्हटले की 'शिव गत वर्णुनि रामगुण' (७/१४म). 'गावु लागले राम कल कीर्ति' (७/५०) असे नारदस्तुतीच्या

उपक्रमात म्हटले व उपसंहारात म्हटले की 'प्रेमें नारद **वर्णुनी रामगुणग्रामास... गेले'** (७/५१/-) मानसाधारे ठरले की **स्तुति म्हणजे गुणगणांचे वर्णन** असे हे २८ गुणगण विमल - उडुगण आहेत. उडुगण म्हणजे नक्षत्रे. या २८ नक्षत्रांतून चंद्राचे भ्रमण होत असते; व यास **नक्षत्रमंडल** म्हणतात मंडल म्हणजे चक्र; जेथून प्रारंभ झाला तेथे ती रेषा पुन्हा येऊन मिळाली पाहिजे, म्हणजे मंडलाकार तयार होतो. आता येथे या स्तुतिनक्षत्रमंडलाचे पहा.

(१) **'जगमंगल गुणगण रामाचे** येथून प्रारंभ झाला, व **'दहन रामगुणगण'** (३२रा) येथे समाप्ति झाली. पहिली स्तुती ब्रह्मदेवाने केली आहे ती जगाचे मंगल करण्यासाठी प्रभूने अवतार घ्यावी अशी प्रार्थना करण्यासाठी. शेवटची स्तुति नारदाने अवतारसमाप्तीच्या वेळी केली आहे व तिच्यातसुद्धा मंडलपूर्ति सूचक 'प्रेमें नारद वर्णुनी **रामगुण-ग्रामास'** (७/५१) **गेले विधि धामास'** असे शब्द आहेत. पहिल्या स्तुतीचे वक्ते ब्रह्मदेवविधि आहेत; त्यांच्याकडे नारद गेले असे शेवटच्या स्तुतीत सांगून मंडल पूर्ण केल्याचे सुचविले आहे. आता शेवटच्या स्तुतीत येथील शेवटच्या गुणगणांचे वर्णन कसे अचूक घातले आहे पहा. 'कुपथ कुतर्क कुचालि कलि कपट दंभ पाखंड -दहन रामगुणगण' (३२रा). शेवटी पहा -कलिमलमथन, मिथ्यामदखंडन, अघगंजन, शोक विमोचन कामअरि.'

(२) याप्रमाणेच पहिल्या स्तुतीची फलश्रुति -'जगमंगल रामाचे गुणगण' ही स्तुतीत कशी आहे पहा--'गुणमंदिर सुखपुंजा, गंजन विपद वरूथा' विपत्ति-अमंगल व सुख-मंगल, 'मंगल भवन अमंगल हारी' दशरथ अजिरविहारीनीं या स्तुतीमुळेच अवतार घेतला व 'राम जन्म जग मंगलमूल' असल्याने ही स्तुती, हा गुणगण, जगमंगल करणारा झाला आहे. स्तुतीत सुद्धा विपत्ति नाश करून सुखपुंज उत्पन्न करण्याची प्रार्थना आहे. प्रत्येक स्तुतीत हे साम्य आहे व ते त्या-त्या टीकेत स्पष्ट करून दाखविले आहे. याविषयी प्रस्तावनेत 'नक्षत्रमंडळा पहा मानसी' कोतुक या प्रकरणात विस्तार केला आहे तो पहावा.

**चौ. २ चरण पहिला** – रामचंद्राचे गुण जगाचे मंगल करणारे आहेत. मंगलकल्याण; जग-जगत्, जगत् चा अर्थ देह असाही आहे. भागवतात ब्रह्मदेवकृत स्तुतीतच 'जगदेवत्तवार्पितम्'. हा देह तुम्हाला अर्पण केला आहे असे ब्रह्मदेवाने श्री गोपालकृष्णास म्हटले आहे. (भाग. १०/१४/४० श्रीधरी टीका) - या चरणाचा संबंध ब्रह्मदेवाने केलेल्या स्तुतीशीच आहे हे वर दाखविले आहे. भाव हा की मनुष्य देहाचे सार्थक करून जीवांचे कल्याण करण्यास रामचंद्राचे गुणसमूह समर्थ आहेत.

(क) मागील चौपाईत रामचरित म्हटले व येथे रामगुणगण का? रामचरित म्हणजे काय हे 'रामगुणगण' ने सुचविले. **ही पहिल्या स्तुतीची फलश्रुती आहे,** अश्विनी **नक्षत्र, ब्रह्मदेवाने केलेली स्तुति, बा. कां. दोहा १८६ छंद.** मंगल कशा कशाने होते हे दुसऱ्या चरणात सांगतात.

चरण दुसरा – 'मुक्ती, धाम, धर्म धनदायक' येथे फलाचा स्पष्ट उल्लेख केला. (क) मुक्ति- कैवल्य, सायुज्य मोक्ष, धाम- वैकुण्ठादि परलोक निवास, सलोकता, समीपता व सरूपता या मुक्ति व स्वर्गादि लोक प्राप्ति. 'विधिधाम,' हा शब्द हेच सुचवितो. 'देव सकल गत निज निज धामा' (१/१८८/१).

(ख) **धर्म** – धर्माचरण व तज्जनित पुण्य.

(ग) धन नाना प्रकारचे वित्त, गोधन, विद्याधन, तपोधन, गृह क्षेत्र, पैसा, कीर्ति, आरोग्य, संतति, सत्ता, ऐश्वर्य इत्यादि सर्व. येथे अर्थ(धन) धर्म व मोक्ष या तीन पुरुषार्थांचा उल्लेख स्पष्ट आहे. काम हा चौथा राहिलेला पुरुषार्थ धनाश्रित असतो म्हणून त्याचा स्वतंत्र उल्लेख केला नाही; त्याचा अंतर्भाव धनात होतो. याप्रमाणे **सर्वप्रकारचे फळ रामगुणांनी, रामचरिताने सहज मिळते हे येथे दाखविले.**

(घ) **या चरणाने दुसऱ्या स्तुतीची, भरणीनक्षत्र, कौसल्याकृत स्तुतीची फलश्रुति सांगितली आहे.** (१/१९२ टीकेच्या शेवटी तुलना केली आहे.)

(ङ) स्तुतींचा व येथील वचनांचा मेळ घालता न आल्याने **धाम-काम, धर्माचें धाम (स्थान) इत्यादि अर्थ टीकाकाराना कल्पावे लागले आहेत. संगति** – मोक्षादि प्राप्तीला सद्गुरूची व ज्ञानवैराग्याची आवश्यकता असते म्हणून पुढील चौपाई.

**चौ.३. चरण पहिला** – रामगुणगण–गुणग्राम विराग योग व ज्ञान प्राप्त करून देणारे सद्गुरू आहेत. (१) विरतिस धर्म योग दे ज्ञाना। ज्ञान मोक्ष दे श्रुति करि गाना' (३/१६/१) धर्माचरणाने वैराग्य प्राप्त होते, वैराग्याने योग साधतो. योगाने ज्ञान मिळते व ज्ञानाने मुक्ती- मोक्ष प्राप्ती होते असा कारण-कार्य संबंध आहे. **मोक्ष कसा मिळतो याची उपपत्ति येथे सांगितली.** धर्माचा उल्लेख मागल्या चरणात आधीच केला आहे.

(क) पण वैराग्याची पूर्वपायरी आणि शमदमादिसंपत्ति व मुमुक्षा येथे सांगितली नाहीत. मागील धन शब्दाने शमादिसहा संपत्ति व मुमुक्षा घेता येतात व वैराग्याचा उल्लेख असल्याने त्याचे कारण अध्याहृत आहेच. ज्ञान प्राप्तीसाठी लागणारी साधन चतुष्टय **संपन्नता,** साधन चतुष्टय धन व ज्ञान रामचरित-रामगुणग्राम-याने मिळते. येथे हे सुचविले की वैराग्य योग व ज्ञान यांची प्राप्ती सद्गुरुकृपेनेच होऊ शकते. **ज्ञान ही मोक्षदायक वस्तू सद्गुरुंनी दिल्यानेच मिळणारी आहे हे पुढे** मानसात अनेकवेळा दाखविले आहे. 'ज्ञान दिले दृढ पित्या विलोकुनि' (६/११२/५) 'गुरुविण नोहे ज्ञान, ज्ञान कि होइ विरागविण' (७/८९म) 'योगः चित्तवृत्तिनिरोध.' 'योगः समाधिः' (पा. यो.) तो 'ईश्वरप्रणिधानाद्वा' (पा. यो. सू.) ईश्वराला शरण गेल्यानेसुद्धा योग साध्य होतो, भक्ती, नाम यांनी हि साधतो. तसाच रामचरित श्रवण संतसद्गुरूमुखाने यथाविधि केल्याने हे सर्व मिळते. ल. ठे. **'सद्गुरु बोध (ज्ञान) विरागा योगा' ही अहल्याकृत स्तुतीची तिसऱ्या नक्षत्राची फलश्रुति आहे.** (१/२११ छंद-) **तिसरे नक्षत्र कृतिका.**

(क) या चरणाने ज्ञानप्राप्तीपर्यंत पोचविले, पण एवढ्याने भव भय गेले असे होत नाही. ३१/८ भयभंगा'ची टीका पहावी. म्हणून पुढल्या चरणात सांगतात.

**चरण दुसरा — विबुध वैद्य भवभीषण रोगा** - (१) **विबुधवैद्य** — देवांचे वैद्य अश्विनीकुमार - हा रोग व त्याचे भय साधे नाही, फार भयंकर आहे. भीषण रोग आहे. ज्ञान झाल्यावर बरा झाला असे वाटते; पण असे वाटणे म्हणजे बरा न होणे, उदा. एकनाथ महाराज म्हणतात 'मुक्तपणे मोला चढले । ते वनिता अधरीं फासां पडले, कुश्चिळ रसे लिडबिडले' हा पुन्हा उलटलेला रोग ॥ तर फारच भयानक असतो. एकच रामगुणग्राम-रामचरित्र-रूपी अश्विनीसुत यालासुद्धा बरा करतात.

(क) भवरोग हा मानसरोग आहे. तो केव्हा कसा बरा होतो याचे वर्णन उत्तरकांडात सविस्तर आहे. 'रामकृपे सब रोग विनाशति । असा सुयोग कधी जर लाभति ॥५॥ सद्गुरु वैद्यवचनिं विश्वासहि । संयम हा कीं विषयाशा नहि ॥ **रघुपतिभक्ति (राम चरित्र कथा) मुळीसंजीवनि** । अनुपाना **श्रद्धा** अति पावनि ॥७॥ सुखे यापरिं रोग नाशती । ना तर कोटि उपायिं न जाती ॥८॥ जाणां तैं गोस्वामि ! विरुज मन जैं हृदिं बल वैराग्य विवर्धन ॥९॥ क्षुधा सुमति दिनदिन वाढता । विषयाशा दुर्बलता गता ॥१०॥ ज्ञान विमलजलिं करीं स्नान जैं। रामभक्ति उरिं करीं स्थान तैं' ॥११॥ (७/१२२).

(ख) येथे रामगुणगण हेच उत्तम वैद्य आहेत. (सद्गुरु वैद्य आधीच सांगितले) श्री रामचरित ही अमृतमुळी आहे, औषध आहे. पथ्य व अनुपान यांचे विवरण पुढे येणार आहे. **विमलज्ञान जलांत त्या वैद्याने स्नान घातले.** राहिलेले महत्त्वाचे कार्य रामगुण ग्रामच पुढील चरणात करतील. (ग) याच्या पूर्वी **'धर्म'** शब्दाने **'श्रद्धा'** **ध्वनित केलेली** आहे. **'श्रद्धेवीण धर्म कधिं न घडे'** (७/९०/४) व विश्वासाशिवाय श्रद्धा असू शकत नाही. म्हणून याच्यापुढेच श्रद्धेचा स्पष्ट उल्लेख केलेला नाही ते पुढल्या चौपाईच्या दुसऱ्या चरणापासून करतील.

ल.टे. — टीकाकारांनी बहुधा पूर्वापर चौपायादिकांची संगति व उपक्रमादि अर्थनिर्णायक सहा लक्षणे यांकडे अत्यंत दुर्लक्ष केल्यामुळे त्या त्या वचनांची आवश्यकता व त्या वचनाचे स्थान तेथेच का हे बहुधा कोणीच दाखविले नाही. जेथे संगति दाखविण्याची खरोखर आवश्यकता नाहीं तेथे कोणी कोणी दाखविली आहे. यामुळे टीका नीरस, उथळ, तात्पुरत्या भाराभर माहितीने भरलेली अशी महत्वांच्या ठिकाणी तरी झालीच आहे; पण **'प्रेरक हृदिं रघुवंश विभूषण' म्हणूनच येथे दाखविता येत आहे.**

(क) ही चौथी फलश्रुति; चौथे नक्षत्र रोहिणी, चौथी स्तुति परशुरामाने केलेली आहे. (बा. कां. २८५/१-७).

## विबुध-वैद्य-अश्विनी कुमार

प्रभा नावाची त्वष्ट्याची मुलगी, सूर्यपत्नी तिचे हे दोघेपुत्र. एकदा सूर्याचे तेज सहन न झाल्याने आपला मुलगा यम व कन्या यमुना यास सोडून व आपले छायारूप तेथे ठेवून प्रभा तपश्चर्येसाठी पसार झाली. छायेपासून सूर्याला शनैश्चर व तापी ही दोन अपत्ये झाली. शनीने एकदा यमाला लाथ मारली; तेव्हा त्याने सूर्याजवळ तक्रार केली की हा माझा सहोदर असणे शक्य नाही. सूर्याने विचार करून पाहिला तेव्हा सर्व मर्म कळले. अश्विनी-घोडी-चे रूप घेऊन तपश्चर्या करीत असलेल्या प्रभेकडे सूर्य अश्वरूपाने गेला. तेव्हा तिला त्याच्यापासून जे **दोन पुत्र** झाले ते **अश्विनी कुमार**. वैद्यांचा धंदा करणारे म्हणून यास यज्ञात हविर्भाग मिळत नसे. च्यवनऋषीला यांनी औषधाने दृष्टी देऊन, सौंदर्यतारुण्य संपन्न केला, म्हणून त्यांने यांस यज्ञात हविर्भाग देवविला. हे दोघे फार सुंदर आहेत.

हिं.- **जननि जनक सिय राम प्रेम के । बीज सकल व्रत धर्म नेम के ॥४॥**
**समन पाप संताप सोक के । प्रिय पालक परलोक लोक के ॥५॥**

म.- **जननि जनक सियराम-प्रेमा । बीज सकल धर्मा व्रत नेमां ॥४॥**
**शमन पाप-संतापां शोका । प्रिय पालक परलोका लोका ॥५॥**

**अर्थ** – रामगुणग्राम सीता (सिय) राम–प्रेमाची जननी आहे, आणि सीताराम प्रेमाचा जनक आहे. सर्व धर्म व्रत इत्यादींचे बीज रामगुणग्राम (रामचरित) आहे ॥४॥ रामगुणग्राम पाप संताप व शोक यांना ठार मारणारा शमन-यमराज-आहे; व इहलोकाचा व परलोकाचा प्रिय पालक आहे.

**टीका – चौ – ४ चरण पहिला** – या चरणात जननी व जनक ही दोन उपमाने आहेत. पहिले उपमान जननी बालकांडांतील पाचव्या स्तुतीची फलश्रुति आहे; पाचवी स्तुती सीतेच्या जननीने सुनयनेनेच केलेली आहे. साहवी स्तुती सीतेच्या जनकाने जनकराजानेच केलेली आहे. या दोघांत सीताराम प्रेमाची उत्पत्ती त्याच्या स्तुतीनेच व या दोघांच्यामुळेच झाली आहे.

(क) 'वदुनि राणि पद धरुनी राही । **प्रेमपंकि** जणु **मग्न** गिरा ही ॥ रामाची स्तुती करताना सीता जननीने शेवटी रामाचे पाय धरले व तटस्थ राहिली ! सासूने जावयाचे पाय प्रत्यक्ष धरणे! जावई सासू संबंध विसरली इतके प्रेम वाढले इतकेच नव्हे तर प्रेमरूपी पंकात तिची वाणी रुतली, आडकली. (बा. कां. ३३७/१)

(ख) आता जनकांचे प्रेम पहा - 'जुळुनि रुचिर पंकेरुह पाणी । **प्रेमजनित** जणुं वदले **वाणी** ॥' दोघांच्या प्रेमाची पूर्णसमता कवीनी कशी दाखविली आहे हे पहाता आश्चर्याने स्तंभित राहण्याची वेळ येते. **जननीकृत स्तुती ही पाचवी, मृग नक्षत्र आहे.** (बा. कां. ३३६ छंद ३३७/१) व **जनककृत स्तुती आर्द्रानक्षत्र, साहवी स्तुती आहे.** (बा. कां ३४१/३ -३४२/७)

(२) जनक विदेही व त्यांची पत्नी सुनयना यांना जसे ज्ञानोत्तर सीतारामप्रेम मिळाले तसे संत व त्याची सुमतीरूपी सुस्त्रीला रामगुणग्रामांच्या (रामचरित्राच्या) योगाने रामप्रेम मिळते तसेच दशरथजीवाला व त्याच्या सुमतिरूपी कौसल्येला सीताराम प्रेमाची प्राप्ति बालकांडाच्या शेवटीच झाली आहे. या दोन स्तुतीनंतर बालकांडांत- स्तुति नाही. चिंतामणि चारु व संत सुधीरूनी शुभ शृंगारूने उपक्रम केलेल्या फळाच्या प्राप्तीपर्यंत या चरणात पोचविले. आता पुढील दोन चरणांत अयोध्या कांडाचा विषय व रामप्रेम प्राप्ती आणखी स्पष्टीकरण आहे. इतर जीवानांही सीता-रामप्रेमप्राप्ति कशी होते हे आता कांड क्रमाने सांगतात रामगुणांचा प्रभाव वर्णिला जात आहेच.

**अयोध्याकांड** — शमदमादि साधन संपन्नतेने **वैराग्य प्राप्ति-**

**चौपाई ४ चरण २रा** — (१) बीज सकल धर्मा व्रतनेमां - '**श्रद्धेवीण धर्म कधिं न घडे**' (७/९०/४) म्हणून सकल धर्मव्रतनेमांचे बीज म्हणजेच श्रद्धा. ही सात्विक श्रद्धा समजणे जरूर आहे. जडचेतन ग्रंथी पडून जीव बद्ध होऊन दुःखी दीन झाला आहे; 'ईश्वर-अंश जीव अविनाशी। चेतन अमल सहज सुखराशी' हा असून मोहाने 'तो प्रभु मायेला वश झाला । शुकमर्कट सम बंधनिं पडला.' कारण 'जडचेतनिं पडली ग्रंथि जी । जरी मृषा सुटणे कठिण ती । तैंहुनि जीव बनला संसारी । ग्रंथि सुटे न सुख न लवभारीं ॥ श्रुतिपुराण बहु उपाय वदती । न सुटे अधिकाधिक च घट्ट ती' ॥ 'ईश असा संयोग आणि जैं । शकें कदाचित सुटूं ग्रंथि तैं ॥' '**श्रद्धा सात्विक** धेनु शोभना । करि **हरिकृपें हृदयिं** जर सदना' (७/११७/२-९) हरिकृपेने सात्विक श्रद्धा लाभ होतो असे यात सांगितले तसेच या चरणात सांगतात. की रामगुणग्राम संत सद्गुरु मुखाने श्रवण केल्याने सात्विक श्रद्धा मिळते. **गांधींचेसुद्धा मत आहे की ज्याला सात्विक श्रद्धा हवी असेल त्यास ती श्रीरामचरितमानसात मिळेल.** याच्या श्रवणाने सात्विक श्रद्धा मिळाली नाही तर श्रवण नीट झाले नाही असे समजावे.

(क) श्रद्धा मिळाली की नाही याचे लक्षण पुढे सांगतात. ही श्रद्धा एक नवीन व्यालेली धेनू आहे. हिला ओला चारा फार आवडतो. व्रतनेमादिकच हिरवे-ओले-गवत (कडबा) आहे. 'व्रत **जपतप यम नियम अपार** । वेदविहित शुभ धर्माचार ॥ **हे तृण हिरवें**' (७/११७) हे सर्व हिरवे तृण आधाशीपणाने प्रेमाने खावेसे वाटू लागले की सात्विक श्रद्धा मिळाली असे समजावे. (७/११७/१०-१६ पहा) या सर्व व्रतादिकांचे फळ '**विमल विराग सुभग सुपुनीत**' मिळविणे हे आहे. '**विरतिस धर्म दे**' (३/१६/१)

(२) हा अयोध्याकांडाचा विषयोपक्रम आहे असे जे म्हटले ते पहा - 'यस्यांके च विभाति भूधरसुता देवापगामस्तके' असे अयोध्या मंगलाचरण श्लोक १ यांत म्हटले आहे. हे शंकराचे वर्णन आहे. भूधरसुता भवानी पार्वती '**भवानी शंकरौ वंदे श्रद्धाविश्वास रूपिणौ**' (बा. मं.२). सात्विकाश्रद्धा हे बीज आहे. योग्यभूमि,

पाणी मिळाले की बीजालाच मुळे फुटतात व वृक्ष तयार होतो. श्रद्धा हे धर्माचे मूळ- बीज आहे. धर्माचरणातच व्रत जपतप यम नियम इत्यादि सर्व गोष्टींचा अंतर्भाव होतो; पण हे वेदशास्त्रपुराणोक्त विधीने घडले पाहिजे; म्हणजे विमल वैराग्य हे फळ मिळते. **धर्माचरण योग्य रीतीने झाले की नाही याची कसोटी म्हणजे अपरवैराग्य प्राप्ति.** अयोध्याकाण्ड वैशिष्ट्य पहावे. धर्माचरण कसे करावे याचा उत्तमोत्तम आदर्श मानसांतील अयोध्या कांडातच दाखविला आहे, **अयोध्या काण्डांचे बीज सात्विक श्रद्धा आहे व 'होइ नब्रिकं भवरस बिरति'** हे फळ - अयोध्याकांड उपसंहारात शेवटच्या वाक्याने सांगितले आहे (दो. ३२६)

(३) **धर्मव्रतनेम** यांचा उल्लेख अयोध्या कांडांत पहा. **'राम दर्शना व्रतादिक करु लागति नरनारि'** (२/८६/-) 'पय अहार फल अशन कुणि नक्ताशन करतात - **'व्रत नेमां** रामास्तव **भोगादीक-त्यजतात'** (२/१८८) इत्यादि पुष्कळ वचनें आहेत. ३२६ छंद पहावा, व्रतनेमादि धर्माचरण आहे व भोगत्याग म्हणजे वैराग्य हे फळ आहे. राम स्वतःच अयोध्या काण्डांत 'धर्ममार्ग चरित्रेण' (रा. पु. ता.) आपल्या चरित्राने धर्ममार्ग दाखवितात. अशाप्रकारे धर्माचरण करण्याची प्रवृत्ति रामगुणग्राम श्रवणाने होते. असे धर्माचरण केले म्हणजे पुढे काय होते हे पुढील चरणात दाखवितील.

ल. टे. ही सातवी फलश्रुति आहे. सातवे नक्षत्र पुनर्वसु, भरद्वाज मुनीनी केलेली स्तुति आहे. (२/१०७/४-दो. १०७)

चौ. ५ चरण पहिला - (१) शमन पाप-संतापा शोका - शमनो यमराड् यमः' (अमरे)

(क) मागे सांगितल्याप्रमाणे धर्माचरण केले की पापांचा नाश होतो, रामचरित पापांचा संहार करते. 'धर्मेण पापमपनुदति' 'सुखवांछिति मूढ न धर्म रती' (७/१०२/२) पापांचे फळ दुःख असते. पापविनाशाने दुःखविनाश होतो व नंतर रामचरित श्रवणाने सुख होते. सुखाचे साधन धन-द्रव्य आहे असे वाटते पण वैराग्य नसेल तर धन संतापाचे कारण होते.

**(ख) शमन संतापा शोका** – संताप - त्रिविधताप, आधि भौतिक, आध्यात्मिक व आधिदैविक. यांच्यापासुन दुःख भय शोकादि उत्पन्न होतात. पूर्णवैराग्य व ज्ञान याशिवाय यांचा पूर्णविनाश होत नाही. या सर्वांचा पूर्ण विनाश पुढे सुचवितील. येथे अपर वैराग्यापर्यंत पोचविले. अयोध्याकाण्ड समाप्तिपर्यंत आणले. अयोध्या कांडात पाप संताप वियोग शोक पसरले होते हे सांगण्याची, पुरावे देण्याची, आवश्यकता नाही.

ल. ठे. ही आठवी फलश्रुति आहे; आठवे नक्षत्र पुष्य, आठवी स्तुती वाल्मीकीनी केलेली आहे. (२) १२६-१३२) या स्तुतीत भगवंताचे अध्यात्म, दैवी, व भौतिक दृष्टीनी वर्णन आहे.

(क) श्रुतिस्मृति पुराणोक्त धर्मांचरणाने वैराग्य प्राप्त होण्यास वेळ लागतोच व या दोन्ही गोष्टी निर्विघ्नपणे टिकाव्या लागतात. हे कार्य रामगुणगणानेच घडते हे पुढल्या चरणात दाखवितात.

**चौ. ५ चरण दुसरा – प्रिय पालक परलोका लोका** – (१) प्रेमाने या लोकात पालन करणारे रामगुणगण आहेत. समर्थ आईबापांप्रमाणे या जगातील सुखे देतात व परलोकप्राप्ति-साधनात येणारी विघ्ने, संकटे यांचा विनाश करतात. (क) रामनाम व रामकथासुद्धा हे करतात हे पूर्वी दाखविले आहे. (१/२७/५ टी. प.) 'रामनाम कलिं अभिमत दाता । हित् परलोक, लोकिं पितृमाता' यांतील पूर्वार्धाशी समानार्थी उल्लेख पुढे आहेच. (चौ.११) 'भयभंगा भ्रमभेक भुजंगिनि' (३१/८) 'लाभ लोकिं परलोक निभावक' (२०/२) यांची टीका पहावी. सार एकच आहे.

(२) हेच कार्य करण्यासाठी रघुवीर चित्रकूटविहार सोडून दंडकारण्यात गेले. तेथील मुनींचे ऐहिक व पारमार्थिक जीवन क्लेशमय, व राक्षसांच्यामुळे विघ्नबहुल झाले होते. ते सर्व तपोमूर्ति, धर्माचरणी होते व वैराग्यसंपन्न होते. ज्ञान व भक्तीसाठी प्रयत्न करीत होते; पण कामक्रोधादि अंतःशत्रू व खरदूषणादि शूर्पणखादि मायावी क्रूर राक्षसांचा फार त्रास होत होता. 'रघुकुलराया तेथ वसावे । दया छत्र मुनि निकरि धरावे' (३/१३/१७) असे अगस्तीनीं सांगितले आणि राम जाऊन राहिल्या बरोबर 'सुखी होति मुनि भया विसरती' (३/१४/१) असे घडले आहे.

(२) **अरण्यकाण्ड मायापुरी आहे**. मायानिरास झाल्यानेच ज्ञान प्राप्ती होते; म्हणून हे काण्ड माया विनाशाने ज्ञानप्राप्ती करून देणारे आहे. अरण्यकांड वैशिष्ट्य पहा. मा. पीयूषांत प्रकाशित झाले आहे. वैराग्य प्राप्त झाल्या नंतरच ज्ञान प्राप्ति होते. ल. ठे. ही नववी फल श्रुति आहे; **नववे नक्षत्र आश्लेषा अत्रिकृत स्तुती आहे**. (३/४/छंद. प.) वैराग्याला ज्ञानाची जोड पाहिजे. म्हणून पुढील चरणात सुचवितात.

हिं.- **सचिव सुभट भूपति विचार के । कुंभज लोभ उदधि अपार के ॥६॥**
म.- **सचिव सुभट विवेक भूपतिचे । कुंभज अपार लोभोदधिचे ॥६॥**

**अर्थ** – रामगुणग्राम ज्ञान (विवेक) भूपतीचे सचिव आहेत व त्याचे सुभट आहेत; आणि अपार लोभ सागराचे अगस्ति (कुंभज, कुंभोद्भव) मुनि आहेत. ॥६॥

**टीका – चरण पहिला** – यात सचिव आणि सुभट ही दोन उपमाने आहेत. यात दोन स्तुतींच्या फलश्रुति आहेत (१) राजाला मंत्री (सचिव) व उत्तम योद्धे यांची जोड असली तरच त्याचे राज्य टिकेल, किंवा गेलेले मिळविता येईल. सचिव, सुभट, राजा व राज्य येथे कोण हे ठरविले पाहिजे.

(क) **सचिब विराग विवेक नरेश** (२/२३/६) **विवेक = ज्ञान**, म्हणूनच विचार शब्दाबद्दल विवेक शब्द मराठीत घालून अर्थ अधिक स्पष्ट केला.

(ख) **भट यमनियम...**' (२/२३५/७) याने ठरले की सचिव वैराग्य व सुभट-यमनियम व ज्ञान हा राजा. येथे ज्ञान राजा अद्याप तयार झाला नाही.

वैराग्यसचिव व यमनियम सुभटांच्या साह्याने तो तयार होणार आहे. येथे हे सांगितले की वैराग्य प्राप्त झाल्यावर सुद्धा यमनियमांचे पालन करीत राहिले पाहिजे. पण रामगुणग्राम श्रवण करीत राहिल्याने हे सहज घडते.

(ग) **यम — अहिंसा सत्यमस्तेय ब्रह्मचर्यापरिग्रहाः यमाः** (पा-यो.सू) अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, व अपरिग्रह हे पाच यम आहेत. उपनिषदात दहा वर्णिले आहेत व भागवतात बारा सांगितले आहेत. दहा अंतर्बाह्य यमांची (स्थूल व सूक्ष्म) लक्षणे अभंग रामायणात (प्रज्ञानानंद) पहावीत, पुढे योग्य स्थानी दिली आहेत.

(घ) **नियम — 'शौच संतोष तपःस्वाध्यायेश्वरप्रणिधानानि नियमाः'** (पा. यो.सू. २१३२) शौच, संतोष, तप, स्वाध्याय व ईश्वर प्रणिधान हे पाच नियम आहेत. यांचेही यमांप्रमाणेच १०-१२ प्रकार वर्णिले आहेत. अभंग रामायण पहा.

(२) **विवेक भूपाल सचिव - ही फलश्रुति दहावी आहे; मघानक्षत्र, शरभंग मुनिकृत स्तुति** आहे (३/७-९/३) **विवेक भूपाल सुभट -विवेक भूपतीचे सुभट ही अकरावी फलश्रुति आहे;** पूर्वाफाल्गुनी नक्षत्र, सुतीक्ष्णकृत स्तुती आहे. (अरण्य दो. ११-)

(क) वैराग्य व यमनियमांमुळे काय कार्य होते ते पुढील चरणात सांगतात.

**चौ — ६ चरण दुसरा - कुंभज अपार लोभोदधिचे.** कुंभापासून ज्यांची उत्पत्ति झाली ते अगस्ति मुनि. हे अगदी ठेंगणे होते पण प्रताप फार मोठा होता. यांनी तीन आचमनात समुद्र शुष्क केला. मूर्ति लहान पण कीर्ति मोठी! तसेच रामगुणग्राम वैराग्य सचिवाला व यमनियम सुभटांना प्रेरणा व शक्ती देऊन लोभरूपी अपार सागराला शुष्क करतात. लोभ व वैराग्य यांचे वैर आहे. 'काम वात कफ लोभ अमित तो' (७/१२१/३०) 'अति लोभ्यासि विरति वारवाणी' हें 'उप्तबीज उखरीं, फळ तथा' (५/५८/४).

(क) लोभाची उत्पत्ती कामापासूनच होत असली तरी हा काम क्रोधांपेक्षांहि फार भयंकर आहे. 'लोभा इच्छा दंभ बल' (३/३८म) यामुळे हा चटकन ओळखता येत नाही. वैराग्य व यमनियम चांगले पाळता येऊ लागले म्हणजे प्रतिष्ठा -कीर्ति-यांचा लोभ वाढण्याचा संभव असतो; व मग कुंभमेळ्यात 'वैराग्यमहानिधि -अमुक अमुक महाराज' अशी अगदीं मोठ्या अक्षरांत लिहिलेली पाटी हे सचिव सुभटच लावतात! व आपणच राजे (मुक्त, ज्ञानी, ब्रह्मनिष्ठ) आहोत असे दंभ करू लागतात. पण या सचिव सुभटांना रामगुणग्रामांचा आश्रय असला म्हणजे ते गुणगण हा लोभ उत्पन्न होऊ देत नाहीत; व अशा रीतीने परलोक पालक बनतात हे मागल्या चौपाईच्या उत्तरार्धाचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी सांगितले.

(ख) यावर कोणी शंका काढतात की अगस्तीनी शुष्क केलेला सागर पुन्हा भरला, तसे होणार नाही कशावरून? पण सद्गुण आणि अश्विनीकुमार वैद्य सुद्धा हे रामचरित गुणग्रामं आहेत व परलोक पालक आहे म्हणून रामगुणग्राम हे होऊ देत नाहीत. शंका व्यर्थ आहे; पण पूर्वापार संदर्भाकडे व उपक्रमोपसंहारादींकडे

लक्ष दिले नाही की असे भ्रमबेडूक बाहेर पडणारच! लोभाचा प्रताप ७/१२१/३०च्या टीकेत दाखविला आहे.

ल.ठे. - ही बारावी फलश्रुति आहे; उत्तराफाल्गुनी नक्षत्र, ही स्तुति कुंभजानींच केलेली आहे. (अरण्य १३) कामक्रोधांपासून रक्षण केले जाते हे आता सांगतात.

हिं.- **काम कोह कलिमल करिगन के । के हरि सावक जन मन बन के ॥७॥**
**अतिथि पूज्य प्रियतम पुरारि के । कामद घन दारिद दवारि के ॥८॥**
म.- **काम-कोप-कलि-कलुष करिगणां । केसरि शावक दास मन वना ॥७॥**
**प्रियतम पूज्य पुरारि-अतिथि हे । कामदघन दारिद्र्य-दावि हे ॥८॥**

**अर्थ** – दासांच्या मनरूपी वनात राहणाऱ्या कामक्रोधादि- कलिमलरूपी हत्तींच्या कळपाचा विनाश करणारे त्या वनात राहणारे सिंहाचे छावे म्हणजेच श्री रामगुणगण ॥७॥ रामगुणग्राम त्रिपुरारींचे सर्वात प्रिय व पूज्य अतिथि आहेत. आणि दारिद्र्यरूपी दावानलाला शान्त करणारे, इच्छित देणारे मेघ (घन) आहेत. ॥८॥

टीका. चौ-७ - (१) **केसरि-शावक** – सिंहाचे बच्चे जरी लहान असले तरी मोठ-मोठ्या मस्त हत्तींचा तेव्हाच फडशा उडवितात; त्याप्रमाणेच रामगुणरूपी सिंहशावक दासांच्या मनरूपी वनात शिरले की तेथून त्यांच्या भयाने कामक्रोधादि हत्ती पळून जातात; नाहीतर मारले जातात व या सिंह बालकांची गर्जना जोपर्यंत ऐकू येत असते तोपर्यंत ते पुन्हा त्या मन-वनांत प्रवेश करण्यास धजतच नाहीत. म्हणजेच रामचरिताचे सतत श्रवण व चिंतन करीत राहिल्याने कामक्रोध मदमत्सरादि विकार शत्रू. मानस रोगनष्ट होतात व पुन्हा उत्पन्न होण्यास जागा रहात नाही. याप्रमाणे सर्व शत्रूंपासुन संरक्षण करून परलोक पालकाचे काम रामचरित सिंह बालकच करतात.

(क) येथे तुलसीदासांची शब्द-योजनेतील सावधगिरी ल. ठेवण्यासारखी आहे. लं. कांडांत 'कामकोपमदगज पंचानन । वसा निरंतर जनमन कानन' (६/११५) असे रामचंद्रांविषयी शंकरांनी म्हटले आहे. शिवाय अनेक ठिकाणी रामलक्ष्मणांस केसरी (सिंह) म्हटले आहे. 'रामनामनरकेसरी-नृसिंहभगवान' आहे; यामुळे रामगुणांना केसरीशावक म्हणण्याने औचित्य भंग झाला नाही. रामकथा हे रामनामामृताचे तरंग असल्यानेहि रामचरिताला केसरी म्हणणे शोभले नसते. केसरी शावकाचीच वाढ होत होत तो पुढे केसरी बनतोच; म्हणजेच रामगुणगण, रामचरित - श्रवण मननादिकाने रामकेसरी हृदयात येऊन राहतात. हे पुढे लंकाकांडाच्या शेवटी होणार आहे.

(२) क्रोधनाश शमाने होत असतो; म्हणूनच **'क्रोध्या शम काम्या हरिकथा** । उप्त बीज उरवरीं फल यथा' असे प्रभू म्हणाले आहेत. रामचरिताच्या योगें शम

प्राप्त होतो व क्रोध उद्भवू शकत नाही. रामगुणगण-हरिकथा-रामचरित कामाला उद्भवू देत नाही. कामनाश - इंद्रिय निग्रह - दम सुचविला. इतर कलिकलुषांचा विनाश करण्यात तितिक्षा व उपरम लागतात म्हणून येथे तितिक्षा व उपरम सुचविले गेले. श्रद्धा पूर्वीच सुचविली आहे. लोभनाश सांगून समाधान सुचविले गेले आहे. जिथे लोभ नसेल तेथेच संतोष-समाधान नांदू शकते; संतोषच लोभाचा नाश करतो. 'जसा लोभ शोषे संतोषें' (४/१६/३) या प्रमाणे येथवर शमादि षट्क-संपत्ति सुचविली.

(३) **ही तेरावी फलश्रुति हस्तनक्षत्राची-जटायूने केलेल्या स्तुतीची आहे.** (अरण्य. ३२) त्यात **'कामादिखलदलगंजनं'** आहेच व रामचंद्रांनी आपला कमल हस्त त्याच्या मस्तकावर ठेवला आहे व आपल्या हाताने त्याची उत्तरक्रिया केली आहे.

(क) अरण्य कांडात पाच स्तुती आहेत. शरभंगाला सालोक्य, जटायूला सारुप्य व शबरीला सायुज्य मुक्ति दिली आहे. येथे अरण्य कांडाचा संबंध संपला.

## किष्किंधा काण्ड

**चौ. ८. चरण पहिला.प्रियतम पूज्य पुरारि अतिथि हे** – (१) **अतिथि** – न कळविता, अनपेक्षित येणारा जो असतो व ओळखीचा नसून भोजनसमयी येतो तो अतिथि. अतिथि कोणत्या धर्मांचा, जातीचा आहे याचा विचार न करता त्याचा सत्कार करणे हा गृहस्थधर्म आहे; म्हणून अतिथि पूज्य आहे, वंदनीय आहे. **'अतिथिर्नमस्यः'** (क.उ)

(क) **पुरारि** – त्रिपुरारि, त्रिपुरांचा व त्रिपुरासुरांचा विनाश करणारे शंकर -शिव -रुद्र -पुरारि -अतिथि -पुरारींचे अतिथि.

(ख) **प्रियतम** – सर्वांहून अधिक प्रिय, ज्याच्या एवढे प्रिय दुसरे काही नाही असा. 'प्रिय न तनू प्राणांहुनि काही' (१/२०८/४). शंकरांना प्राणासम प्रिय आहे रामनाम' 'रामचरित शतकोटिंतुनि गणि महेश घे **प्राण**' (१/२५ टी. प.) शंकरांना 'राम' हा शब्द पूर्वी कांही कल्पना नसताच मिळाला आहे. दो. २५ ची टी. पहावी. सार हे की रामचरित श्रवणाने रामनाम प्राणांसारखे ही प्रिय वाटू लागते; व जिने समाधान मिळाले ती रामचरित कथा अतिशय प्रिय वाटू लागते.

(२) येथे किष्किंधा कांडारंभ झाला. किष्किंधा कांडांत 'मरा' व राम या दोन्ही नामाना मंगलाचरणात गुप्त व प्रगट रित्या पहिल्या दोन श्लोकांत क्रमशः नमन आहे. दुसऱ्या श्लोकांत 'श्रीमच्छंभुमुखेंदु सुंदरवरे संशोभितं सर्वदा' -श्रीराम नामामृतम्' असे म्हटले आहे. किष्किंधा कांड नामपर आहे; इत्यादि किष्किंधा कांड वैशिष्ट्यांत पहावे. वासनाहीन म्हणजे ज्ञानसंपन्न झाल्यावरच खरे नामप्रेम उत्पन्न होते. 'संतचरणरज लागता सहज । **वासनेचे बीज जळुनी जाय ।. मग रामनामी उपजे आवडी** । **सुख घडो घडी वाढो लागे**।' (तुकोबा.) हाच क्रम येथे आतापर्यंत रामचरिताच्या वर्णनात सांगितला.

(३) **ही चौदावी फलश्रुति आहे; हनुमंताने केलेल्या स्तुतीची ही फलश्रुति आहे. ती स्तुति चित्रा नक्षत्र** आहे. रामलक्ष्मण अतिथि सारखेच द्विजरुपधारी हनुमंतास भेटले आहेत; पण ओळख पटली नाहींच. हनुमान पुरारींचे अवतार व त्यांनाही रामनामप्राणप्रिय. त्याच्या बळानेच त्यांनी रामास वश करून ठेवले. ते 'सीतारामगुणग्राम पुण्यारण्य विहारी (मं. श्लो. ४) आहेत. व **हनुमान स्वतःच लंकापुरीचे अरि पुरारी होणारे आहेत.** हे साम्य आश्चर्यकारक नाही काय? ही स्तुति कि. कां दो. २-३ मध्ये आहे.

## सुन्दर काण्ड

**चौ.८ चरण दुसरा - कामदघन दारिद्रदावि हे** — दारिद्र दावानलाला विझविणारे. व पाहिजे ते देणारे मेघ आहेत. (१) याचे दोन अर्थ तरी होतातच. रामचरित चिंतामणीच्या गुणांचे वर्णन चालले आहे; हे लक्षात आणले म्हणजे येथील मुख्यार्थ सहज लागतो. चिंतामणि असेल तेथे -'निकट मोह दारिद्र येत ना' (भक्तिचिंतामणि वर्णन चौ-१च्या टीकेत पहा.) म्हणून **येथे मोहदारिद्र हा एक अर्थ घेणे जरूर आहे.** भाव हा की रामचरितच भवदावानल विझविण्यास लागणाऱ्या सर्व आवश्यक गोष्टी रूपी जलाची वृष्टि करते. स्वतःच्या प्रयत्नांनी पाणी ओतून भव-दावानल-वणवा-विझत नाहीं. मेघ ज्या वेळी जोराची वृष्टी करतील त्यावेळी विझतो. अज्ञानदारिद्र रूपी वणवा विझवून त्यात राहणाऱ्या जीव-मृगाला रामचरितच सुखी करते.

(क) **दुसरा अर्थ** — ज्यांना धनाचे दारिद्र दुःखदायक वाटत असेल त्यास धनप्राप्ति होऊन, त्यांना सुख होईल, म्हणजेच **अर्थार्थी भक्तांची सोय लावली.**

(ख) **तिसरा अर्थ** — चौथ्या चौपाईत सीतारामप्रेमाची उत्पत्ति फलरूपाने सांगितली; पण नुसती उत्पत्ती होऊन भागत नाही. प्रेमाचा मुसळधार पाऊस पडल्याशिवाय भवदावानल पूर्ण विझत नाही. जसें हल्ली शंभर रुपये पगार मिळविणारास वाटते की आपण दरिद्री आहोत. ७/८ शें झाला तरच सुख मिळेल; तसेच काही भक्तांस वाटते की आपण सीताराम प्रेमाच्या बाबतीत अगदी दरिद्री आहोत; हे सुखावह नाही, प्रेमाचे प्रवाह वाहिले पाहिजेत. **अशा भक्तांचे प्रेमदारिद्र सुद्धा नष्ट होते.**

(२) ही **पंधरावी फलश्रुति** सुंदरकांडांत **बिभीषणाने केलेल्या स्तुतीची स्वाति नक्षत्राची आहे.** वर दिलेला तिसरा अर्थ तेथे अक्षरशः लागू पडतो. 'पूर्वि' अल्प, इच्छा राहिली । प्रभूपद प्रीति सरित् वाहली' (४९/६). हे बिभीषणाचे शब्द आहेत. (टीकेत विस्तार पहावा). शिवाय प्रभूनी त्याची इच्छा नसताही त्यास लंकाराज्याभिषेक करून त्याचे ऐहिक दारिद्रही नष्ट केले आहे. (५/४९, दोहे पहा.)

(३) सुंदर काण्ड भक्ति प्रतिपादन करणारे आहे. मंगलाचरणांतच भक्तीची याचना केली आहे. हनुमान व बिभीषण यांना प्रेमभक्ति अनपायिनी सुंदर कांडांतच मिळाली आहे. या चौपायांचा मानसांतील स्तुतींशी संबंध सापडला नसता तर येथे केलेले अर्थ सापडलेच नसते; आणि जशा हिंदी टीकाकारांच्या टीका आहेत तशीच **नीरस विसंगत व वेळ मारून नेणारी टीका लिहावी लागली असती!** पण ज्याच्या कृपेने मूक होति वाचाळ, पंगु चढति गिरिवरिं गहन' त्याने कृपा केली म्हणून सर्व आपोआप उलगडत गेले. सुंदरकांडांत ही एकच स्तुति आहे. **संगति** – अशा रीतीने विमलज्ञान व प्रेमभक्ति मिळाल्यानंतरची जी जीवन्मुक्ता-सारखी स्थिति तिचे वर्णन पुढील चौपाईत आहे.

## लंका - कांड

हिं.- **मंत्र महामनि विषय ब्याल के । मेटत कठिन कुअंक भाल के ॥१॥**
म.- **मंत्र महामणि विषयां व्यालां । पुसति कठिण जे कुअंक भालां ॥१॥**

**अर्थ** – रामगुणगण विषयरूपी नागांना महामणि आहेत व रामगुणगण प्रारब्धाचे भालांवर लिहून ठेवलेले दुःखद लेख पुसून टाकतात. ॥१॥

**टीका. चौ-१ चरण पहिला – महामणि विषयां** व्यालां व्याल-नाग, भुजंग, विषयरूपी नागांचे विष चढले की ते एकाच देहाचा विनाश करते. एकदांच मारते-असे नाहीं, पुन्हा जन्मणे पुन्हाहि मरणे पुन्हाहि जननी जठरीं पचणे, अशी अनेक वेळा मरण्याची पाळी येते. सापाचे विष महामण्याने उतरते, हा मणि ज्यांच्याजवळ असेल त्यांना साप धावत नाहीत. महामण्याने सापाला ठार मारता येत नाहीं, त्याच प्रमाणे ज्ञानभक्तिसंपन्न झाल्यावर पंचविषयरूपी पाच फणांचे नाग बाह्य जगात असतातच. ज्याला ज्ञान व भक्ति प्राप्त झाली त्यांचा देह सुद्धा या विषयव्यालांचे ग्रहण करीत असतो. यदृच्छा लाभसंतुष्ट वृत्तीने हे विषय व्याल त्यांच्या अंगावर खेळत असतात, त्याला दंश करीत नाहीत. मात्र हा रामचरित रूपी महामणि त्याच्याजवळ, त्याच्या हृदयात सदा पाहिजे; म्हणजे क्रियमाण कर्मफल भोगावे लागत नाही. **बँकेतील पैसे देणाऱ्या नोकराप्रमाणे प्रारब्धकर्माच्या बँकेचे काम करणारा याचा देह असतो.** पैसे कमी आले वा जास्त गेले तरी त्या नगदी कारकुनाला त्या कर्मांचे सुद्धा दुःख भोगावे लागत नाही. ही जीवन्मुक्तदशा नाही असे कोण म्हणेल. 'जीवन्मुक्ति-हेतु जणुं काशी' (३१/११)च्या टीकेत जीवन्मुक्त लक्षणे दिली आहेत. ती येथे ताडून पहावी.

(२) या चरणांत मंत्र व महामणि अशी दोन उपमाने आहेत. त्यांची व्यवस्था वरच्या प्रमाणे का लावली? सर्पाचे विष उतरणारे मंत्र आहेत त्यांनी भयंकर नागाचे

विष उतरतेच असे नाही. शिवाय मांत्रिकास मर्मस्थानी नाग चावला तर मंत्राचा उपयोग मुळीच होत नाही; व मरण येते. तसे महामण्याचे नाही ते वर दाखविलेच आहे, व या एका कार्याला महामणि हे उपमान पुरेसे असल्याने दुसरे घेण्याची आवश्यकता नाही; व मंत्र शब्द पुढील चरणात घेतल्याने अर्थ संयुक्तिक सुसंगत लागतो; व तो चरण उपमान जवळ असून उपमान रहित रहात नाही. (मा. पी. प!) **ही व्यवस्था एकाही टीकाकाराने न लावल्याने मतामतांचा गल्बला अंधगजन्यायाप्रमाणे झाला आहे.**

(३) **ही सोळावी फलश्रुति आहे;** रावण वधानंतर सर्व देवांची मुक्तता झाल्यावर त्या सर्व देवांनी **केलेल्या स्तुती, विशाखा नक्षत्राची ही फलश्रुति आहे.**

**संगति –** ज्ञानभक्ति संपन्न झालेल्यांना संचित व प्रारब्ध कर्मबंध नाहीत हे पुढील चरणात सांगतात –

**चौ – ९ चरण दुसरा (१) मंत्र पुसति जे कु-अंक भालां –** येथे नुसते अंक- लेख न म्हणतां कु-वाईट-दुष्ट-दुःखद लेख ब्रह्मदेवाने लिहिलेले म्हणजे कुअंक होत. प्रारब्धभोग कोण-कोणते भोगावयाचे हे मातृगर्भात जन्मास येण्याच्या वेळेलाच ठरलेले - ठरविलेले - असते. त्यात काही सुखभोग व काही दुःखभोग असतात. ते भोगण्यासाठी भोगण्याचे ठिकाण म्हणून स्थूल देह असतो. भोगाचे साधन म्हणून रजोगुणांश सूक्ष्मदेह असतो व सत्वगुणांश भोक्ता असतो. ठरलेले बरे वाईट भोग भोगण्यासाठीच जन्म घ्यावा लागतो. त्यास कारण पूर्वकृत कर्मे वासना. 'जन्म घेणे लागे वासनेच्या संगें' 'भोक्ता सत्वगुणः शुद्धो भोगानां साधनं रजः । भोग्यं तमोगुण त्राहुः आत्मा त्येषां प्रकाशकः' (आ. बो.) 'शरीरं सुखदुःखानां भोगायतनमुच्यते.' (क) सु-अंकांचे फळ सुखभोग व कु-अंकांचे फळ दुःखभोग. हे दुःखभोग जीवास नकोसे वाटतात; ते त्यामुळे त्रस्त, दुःखी, कष्टी, आर्त बनतात. दुःखभोग चुकविण्यास मंत्र जपानुष्ठान उपयोगी पडते. कोणत्या मंत्रांनी कोणते दुःख टळू शकते हे मंत्रशास्त्राने विस्तार पूर्वक सांगितले आहे. सप्तशतीतील काही मंत्र, गीतेतील व रामचरितमानसातील काही चौपाया दोहे यांचे प्रयोग आहेत. (कल्याणचा मानसांक व मा-पी-चा परिशिष्टांक यात अनेकांनी अनुभव घेतलेले दिले आहेत. मराठी अनुवादाचेहि अनुभव आले आहेत). ही अनुष्ठाने करणे हे एक कर्मच आहे. आपण बांधलेल्या घराचा पाया कुठे खचला आहे हे कळल्यास तो आपणांसच सुधारता येणे शक्य असते. तसेच दुःख भोगांचे समजावे, रोगाचे निदान, प्रकृतिमान, साध्यासाध्य अवस्था, पथ्यपालन, वैद्यावर व औषधावर विश्वास निश्चित, बिनचूक प्रभावी औषधयोजना, त्यांचे योग्य प्रमाण, देशकालादि परिस्थिति, इत्यादि सर्व गोष्टी व्यवस्थित जुळल्या तर या मंत्ररूपी औषधाने प्रारब्ध कर्माचे दुःखभोग-कुभोग-दूर करता येतात. येथे **आर्तांची सोय लागली.**

(ख) ज्ञानीभक्तांचे संचित कर्म ज्ञानाने दग्ध झालेले असते. राहिले प्रारब्ध. त्याचे दोन्ही प्रकारचे (सुखदुःख) भोग भोगणारे आपण नाही असा दृढबोध ज्ञानीभक्तांना झालेला असतो व तो रामचरितांच्या श्रवणादिकांनी सतत टिकतो. त्यांचा जड देह प्रारब्धरूपी गाडीत बसून ड्रायव्हर, गार्ड, सांधेवाले, सिग्नल देणारे वगैरे जिकडे जेव्हा जसा नेतील तसा जात असतो. सुखभोगांचासुद्धा अंतर्भाव यातच करण्याचे कारण की सुखभोगासक्ती ही सुवर्णाची बेडी आहे हे ज्ञानीभक्तांना माहीत असते. पुण्यकर्मांनी सुखभोग येथे किंवा स्वर्गात मिळतात पण 'स्वर्गहि अल्प अंति दुखदाई' (७/४४/१) 'क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति' (भ.गी.) म्हणून ज्ञानीभक्तांचे सर्वच भालांक-प्रारब्धभोगलेख-पुसलेले असतात. या अर्थाने हा चरण-ज्ञानीभक्तांकडे निर्भय जीवन्मुक्तांकडे लागतो. 'तप जर करी कठोर कुमारी । भाविहि फिरवू शके त्रिपुरारी' (१/७०/५) मंत्रानुष्ठान एक तपच आहे. या नारद वचनाने ठरते की मंत्रादि-तपश्चर्येने प्रारब्धभोग बदलता, चुकविता येतात. हे कार्य रामचरित्ताने तपाचे कठोर कष्ट करावे न लागता सहज साधते.

(२) ही सतरावी फलश्रुति, चतुराननाने केलेल्या स्तुतीची, अनुराधानक्षत्राची आहे. (६/११०-१११). ज्ञानी व भक्त यानाहि क्वचित् होणाऱ्या मोहाचे निवारण आता सांगतील.

हिं.- **हरन मोह तम दिनकर कर से । सेवक सालि पाल जलधर से ॥१०॥**

म.- **हरण मोहतम दिनकर-करसे । सेवक-शालि-पाल जलधरसे ॥१०॥**

**अर्थ** — रामगुणगण दिनकर (सूर्य) किरणांप्रमाणे मोहतमाचे हरण करणारे आहेत; व जलधरां (मेघा) प्रमाणे सेवकरूपी साळींचे पालन करणारे आहेत. ॥१०॥

**टीका — चौ-१० चरण पहिला** — (१) मागील चरणापर्यंत ज्ञान व प्रेम भक्तीची प्राप्ती होऊन सर्वप्रकारच्या कर्म बंधातून मुक्त झाल्याचे दाखविले व चौ. ३ व चौथीचा पूर्वार्ध यात ज्या फलरूपी विषयाचा उपक्रम केला होता, त्याची उपपत्ती क्रमशः दाखवीत, उपसंहार केला. तथापि मी भक्त, मी जीवन्मुक्त हा अहंकार व राम मनुष्य आहेत असा मोह होण्याचा संभव असतो; त्याचे निराकरण या चरणात केले आहे. असे न मानल्यास एकदा ज्ञान झाल्याचे सांगितल्यावर पुन्हा मोहतमाचा नाश सांगण्यास द्विरुक्ति दोष भेडसावतो व त्याचे थातुर मातुर कपोल-कल्पित समाधान करण्याचा द्राविडीप्रयत्न करावा लागतो. हिंदी टीका पहाव्या.

(२) **मोहतम** — मोहापासून उत्पन्न होणारा तम- अभिमान, '**मोहमूल अति सोड हा शुलंद तम अभिमान**' (५/२३/-) अज्ञान-मोह असल्याशिवाय अभिमान, अहंकार, उत्पन्न होऊ शकत नाही, पुष्कळ ज्ञान्यांना ज्ञानाहंकाररूपी मोह उत्पन्न होत असतो;

म्हणूनच वेदस्तुतीत वेद म्हणाले की 'जे ज्ञान-मान-विमत्त तव भवहरणि भक्ति न आद्रिती । ते प्राप्त सुरदुर्लभपदादपि पडत आम्हा अढळती' (७/१३/छं-६) 'होता मला स्वभिमान । नहिं कोणि मज किं समान' (६/११३/६) हे इन्द्रवचन आहे' (क) ज्ञानीभक्तांना भगवंताच्या अवतारलीला पाहून मोह होतो जसा 'गरुड महाज्ञानी गुणरासी। हरिसेवक अतिनिकट नियासी' गरुडाला झाला. सती, काक भुशुंडी यांना झाला; वसिष्ठाना वारंवार झाला आहे. (७/४८/४), हनुमन्ताला एकक्षण का होईना अभिमान झालाच आहे. 'तै कपिमनिं उद्भव अभिमाना । मम भारे जावबे किं बाणा' (६/६०/७ पहा) अशी अनेक उदाहरणे अभिमानाची किंवा हरिविषयक मोहाची मानसात आहेत. 'भ्रम भेक भुजंगिनि' (३१/८)ने रामकथेविषयीं सांगितले तेच येथे या चरणाने सांगितले. रामगुणगण, रामचरित या अशा अभिमान मोहादिकांचा विनाश करण्यास समर्थ आहे.

(३) ही अठरावी फलश्रुति, अठराव्या स्तुतीची, 'इंद्राने केलेल्या स्तुतींची आहे; हे ज्येष्ठा नक्षत्र आहे. इंद्राचा अभिमान गेल्याचे (६/११३/६) वर दाखविले आहे, व इंद्राने भक्तीची याचना केली आहे. (६/१२३ छं-मोठा) 'दे भक्ति रमानिवास' (क) चौथ्या चौपाईच्या पूर्वार्धात केलेल्या उपक्रमाची उपपत्ती व अपूर्वता दाखवीत या चरणात उपसंहार केला. संगति — ज्ञानीप्रेमभक्तिसंपन्न, व मोहाभिमान भय न राहिलेल्या साधूंच्या सेवकांच्या निमित्ताने रामगुणग्राम जगाचे कल्याण कसे करतात हे माहात्म्यरूपाने पुढील चरणा पासून सांगतात. रामगुणगण साधुंसारखे सर्वत्र उपकार करीत असतात हे पुढील चरणात ध्वनित करतील.

चौ — १० चरण दुसरा — 'सेवक-शालिपाल जलधरसे' — 'वर्षाऋतु रघुपतिभक्ति तुलसी शालि सुदास । रामनाम वर वर्णयुग श्रावण भादव मास,' (१/१९) याची टीका पहावी, या दोह्यांत मेघांचा व जलाचा उल्लेख नाही, तसेच या चरणात जल कोणते ते अध्याहृत आहे व जलधर कोण हे सांगितले पाहिजे तरच यथार्थ अर्थबोध होईल. (मा. पी. पहा) 'वेदपुराण उदधि घन साधू' 'रामसिंधु घन सज्जन धीर' (१/३६/३, व ७/१२०/२७) 'वर्षति रामसुयश वर वारी' मधुर मनोहर मंगलकारी' (१/३६/४) 'ते जल सुकृत शालिहितकर्ते! रामभक्त सेवक जीवन ते' (१/३६/७)

(क) मागल्या चरणात दिनकर-कर शब्द आहेत. सूर्याच्या किरणांनीच सागराच्या जलाचे जलधर बनतात, रामचरित्ररूपी सूर्यकिरणांनी वेदपुराण सागरातील रामसुयशवारी काढून घेऊन, संग्रह करू लागतात. सज्जन-साधु-घन. जे पूर्वी रामचरितानेच निर्मोह निर्भय ज्ञानीभक्त झाले ते जलधर बनले. हे संत-साधुजलधर देह प्रारब्धरूपी पवन जिकडे नेईल तिकडे जातात; व मधुर मनोहर मंगलकारी

रामसुयश वरवारीचा वर्षाव करू लागतात. 'सुपीक, नापीक, डोंगर, नदी, सागर, इत्यादि काही विचार करीत नाहीत व आपल्या जवळचे रामसुयश जीवन वाटीत सुटतात. सार हे की **श्रीरामचरिताचे सद्‌गुरु - संतमुखाने विधिपूर्वक श्रवण करणारे संत होऊन रामचरिताचा प्रसार करू लागतात.** लागतील, ते वक्ते तयार होतात; असा हा संत समाजरूपी जलधरांचा समूहच बनतो. (३१/१० पहा.) 'संत समाज पयोधि' तेथे तयार झाला आहे.

(२) **ही एकोणिसावी फलश्रुति, लंका कांडात शंकरांनी केलेल्या स्तुतीची आहे. ती स्तुति मूळनक्षत्र** आहे. या रामचरिताचे मूळ शंकरच आहेत. तेच रामसुयश वृष्टिकरणारे महामेघ, त्यांनी निरनिराळ्या वेळी रामसुयश जीवनवृष्टि केली त्यामुळे नवीन जलधर भुशुंडी, लोमश, याज्ञवल्क्य, नरहरि असे तयार झाले- नरहरीनीं वृष्टि केली व तुलसीदास जलधर कसा तयार झाला हे पुढे याच दोह्यांत सुचवून ३६ व्या दोह्यांत स्पष्ट सांगतील. या शिवस्तुतीत **'मामभिरक्षय'** हेच पहिले वाक्य आहे. **'सेवकपाल'** आहे. शंकर आपणांस रामसेवक समजतात. 'ते रघुवीरचि इष्ट देव मम' (१/५१/८) असे शंकर सतीला म्हणाले आहेत. 'पालन आज्ञा धरूनी माथा । परमधर्म हा अमचा नाथा !॥ (१/७६/२). **'रामं कामारिसेव्यम'** हे लंकाकांड मंगलाचरणांतच म्हटले आहे. किती आश्चर्यकारक रचना ही! (मा. पी. पहा बरे एकदां!)

ल. ठे. येथे लंका कांडाचा संबंध संपला. सीता-जानकी रूपी भक्तीची प्राप्ति होऊन तिच्या सतीत्वाची अग्निपरीक्षा पण या चौपाईच्या प्रथम चरणात ध्वनित केली. आता नऊ स्तुति राहिल्या त्या उत्तररामचरित्राशी संबंधित आहेत. यांतील चारी स्तुतींत भक्तीच मागितली आहे. पुढील काण्डात स्वान्तःसुखप्राप्ति हे मुख्य प्राप्तव्य सर्वांना मिळाले आहे हे लक्षात घेतले म्हणजे पुढील चौपायांची सुंदर संगति लागून गूढार्थ प्रगट होतील.

## उत्तर-कांड

हिं.- **अभिमत दानि देवतरुवर से । सेवत सुलभ सुखद हरि हर से ॥११॥**
म.- **अभिमत-दानि देवतरुवरसे । सेवत सुलभ सुखद हरि हरसे ॥११॥**

अर्थ – रामचरित देवतरुवरा सारखे वांछित फल देणारे आहे. व त्याच्या सेवनाने सर्व सुख देणारे हरि हरासारखे सुलभ होतात. ॥११॥

**टीका – चौ-११ चरण पहिला – अभिमत-दानि देवतरुवरसे** – (१) अभिमत दानि चा अर्थ करताना मागील 'कामद घन दारिद्र्यदावि हे' (चौ-८) याकडे दुर्लक्ष केल्याने

कवीच्या माथी अप्रत्यक्षरित्या पुनरुक्तिदोष चिकटवला जातो. त्या चरणांत ज्ञानं व ऐहिक सुखाचीं साधने सुचविली आहेत. नंतर निर्मोह प्रेमभक्ति अनपायिनी प्राप्त झाल्यावर जें वांछित शिल्लक राहते तेच येथे घेणे योग्य आहे. मागील चरणात साधुरूपी जलधर या रामगुणग्रामानी तयार केले आहेत. जलधरांकडून अभिमत असते वृष्टि. या मेघांकडून रामसुयशवारि वृष्टी अभिमत असतेच ती ते यथेष्ट करतात. (क) देवतरुवर — देवतरु - म्हणजे कल्पवृक्ष असा वरवरचा अर्थ अगदी उघडा आहे. वर - श्रेष्ठ, उत्तम, देवतरुमध्ये श्रेष्ठ उत्तम, निर्दोष असा अर्थ घेता येणार नाही असे नाही, पण तो अर्थ कामद घन यात येऊन गेला आहे. येथे देवतरुवर म्हणजे राम असा अर्थ आहे व हा मानसातील वचनानी सिद्ध होतो. (१) 'देवतरुसा स्वभाव देवा । संमुख विमुख न कधिं कोणा वा । निकट जाति जाणूनि तरु छाया शुच शमवीच ॥ मागत अभिमत लभे जगीं राव रंक 'शुचि नीच' ॥ (२/२६७/८ व दो.) उत्तरकाण्ड दो. १३ मध्ये वेदानीं स्तुती करताना प्रभु रामचंद्रांना देव म्हटले आहे व 'अव्यक्तमूलमनादितरु' संसारविटप म्हटले आहे. वरील भरताचे वचन व हे वेदवचन यांच्या समन्वयाने देवतरुवर - रामचंद्र हाच अर्थ सिद्ध होतो. रामविमलयश पान करून श्री रामप्राप्ती व्हावी, अशी इच्छा ज्ञानी प्रेमभक्ति संपन्नांची असतेच. कारण सीतारामलक्ष्मण ह्रदयसिंहासनावर सतत विराजमान झाल्याशिवाय पूर्ण विश्राम मिळत नाही; म्हणून पुढील चरणात हरिप्राप्तीच सांगणार आहेत. येथे हे दाखवावयाचें आहे की कल्पतरु ज्याप्रमाणे सज्जनांच्या त्याप्रमाणेच दुर्जनांच्या इच्छा पूर्ण करतो. भगवंतांनी रावण, कुंभकर्ण, सहस्त्रार्जुन यांची प्रभूंच्या हातून मरण्याची इच्छा पूर्ण केलीच आहे. तशी ज्यांची इच्छा असेल ती रामगुणग्राम रूपी रामचंद्रच पुरी करू शकतात. कुंभकर्णाने रामगुणांचे स्मरण केले व रामचंद्राच्या हातून मरण्याची इच्छा धारण केली ती त्याची पुरी झाली आहे. 'रामरूपगुण आठवित प्रेममग्न फळ एक' (६/६३/-) 'जाउनि सुफल करिन नयनांला' 'श्यामगात्र सरसीरुह लोचन । जाऊन बघतो त्रितापमोचन' (६/६३/७-८) रावणाला पण 'प्रभुशरिं प्राण त्यजुनि भव तरतो' (३/२३/४) अशी इच्छा होतीच. 'सुररंजन भंजन महिभारा । जर भगवंते धृत अवतारा' (३/२३/-) इत्यादि रामगुणस्मरण रावणाने केले होते. श्रीमद्‌भागवत वेदस्तुतीत सुद्धा हेच म्हटले आहे. 'प्राणेंद्रिय मन रोधुनि दृढ जे योगाभ्यासा करुनि मुनी । ह्रदयिं उपासिति ते तव पद हरि । पावति अरिहि तुझे स्मरुनी' (भाग. १०/८७/२३ ची समश्लोकी) मानसांतील वेदस्तुतीत सुद्धा 'दशकंठ निशिचर चंड खलतम भुजबलें हत दिनमणे.' (भुज-कर) असा उल्लेख पहिल्याच छंदात आहे. विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे वेदानीं केलेल्या स्तुतीचीच ही फलश्रुति आहे. या पाच पुराव्यांनी वरील अर्थ सिद्ध झाला. मान्य करणे न करणे वाचकांकडे आहे.

(ख) ही पूर्वाषाढानक्षत्र – स्तुतीची फलश्रुति विसावी आहे. श्रीरामसीता अयोध्येतील सिंहासनावर अभिषिक्त होऊन विश्वातील सर्व जीवांना ज्या वेळी विसावा मिळाला त्या वेळची ही आहे. हे वैशिष्ट्य आणखी लक्षात ठेवण्यासारखे आहे.

(ग) देहरूपी अयोध्येत हृदयरूपीसिंहासनावर आरूढ झालेल्या श्रीसीतारामास लक्ष्मणसहित अवलोकन केल्याशिवाय परम विश्राम, अत्यंत विसावा ज्ञानीभक्तांस मिळत नाही. वैरभावाने असा विसावा मिळण्यास रावणकुंभकर्णासारखे कष्ट करून अकीर्ति मिळवावी लागते, पण तसे काहीच करावे न लागता सेवकांना-ज्ञानी भक्तांना हरिप्राप्ति रामगुणग्रामाने सहज सुलभ होते हे पुढील चरणात सांगतात.

चौ-११ चरण दुसरा - सेवत सुलभ सुखद हरि हरसे – (१) रावणादि राक्षस रामगुणांचे स्मरणादि सेवक भावाने करीत नव्हते म्हणून प्रभूची प्राप्ती करून घेण्यास त्यास फार कष्ट पडले. सर्वस्वाचा, कुळाचा व कीर्तीचा नायनाट करून घ्यावा लागला. पण सेवकभावाने, रामगुण श्रवण कथनादि करणारांच्या हृदयात हरि येऊन राहण्यास, कष्ट पडत नाहीत, त्यांना हरि सुलभ आहेत. कसे सुलभ आहेत याचे उत्तर हरसे 'हरा सारखे' हे आहे. शंकरांच्या हृदयात राम येऊन राहण्यास जसे त्यास कष्ट पडले नाहीत तसे सेवकांस पडत नाहीत. एकोणिसावी स्तुती शंकरानी केली तिच्यात 'सेवक शालिपाल जलधरसे' शब्द आहेतच. (२) रामचरित रामासारखे आहे हे मागील चरणात सांगितले व येथे हरा सारखे आहे हे सांगत आहेत. म्हणून 'हरसे' याचे दोन अर्थ घ्यावे लागतात. हर जसे 'आशुतोष तुम्हीं लहरी दाते' (२/४४/८). तसेच रामचरित आहे हा गौण भाव आहे. हा बाह्यार्थ आहे, वर दिलेला गूढार्थ मुख्य आहे.

ल.ठे. ही एकविसावी फलश्रुति शंकरांनी राज्याभिषेकाच्या वेळी दरबारात येऊन सेवकभावाने स्तुती केली तिची, उत्तराषाढा नक्षत्राची आहे. (७/१४) सीताराम सिंहासनावर बसल्यावर सर्व देवांपैकी समोर येऊन स्तुति करणारे सेवकोत्तम एकटे शंकरच कारण त्यांच्या हृदयाला राम हा एकच विसावा वाटत होता इतर देवांचे तसे नव्हते.

(क) भाव तिसरा : शंकररूपी जलधरांच्या मानसांतील रामसुयश वारी नरहरि-आनंदाच्या हृदयात खूप वर्षले व ते जलधर (जल धारण करणारे) झाले. शंकरांच्या आज्ञेने रामगुण रूपी रामचंद्र तुलसी दासांच्या हृदयात येऊन ते स्वतः आता कलियुगांतील जीवांना रामविमल यशवारि वर्षणारे मेघ कसे बनत आहेत हे पुढील चरणात ध्वनित करीत आहेत, या सर्वच चौपायांवरील मा-पी-टीका पहावी व पसंत पडल्यास तेथील अर्थ घ्यावे; मात्र पूर्वापर संगति पाहून घ्यावे.

हिं.- सुकबि सरद नभ मन उडगन से । राम भगत जन जीवन धन से ॥१२॥

म.- **सुकबि शरद मन-नभिं उडुगणसे । रामभक्तजन-जीवन-धनसे ॥१२॥**

**अर्थ** – रामगुणगण सुकवीरूपी शरद ऋतूतील मनरूपी आकाशात तारांगणांसारखे आहेत. व रामभक्त सेवकांच्या जीवनधनासारखे रामगुणगण आहेत.

**टीका चौ. १२ चरण पहिला** – (१) त्या जलधरानी वर्षिलेले रामगुणयशरूपी निर्मल वारी चांगल्या कवींच्या हृदयात तारागणांप्रमाणे शोभायमान होते.

(क) **उडुगण** – नक्षत्रे रात्रींच दिसतात व ती अनंत असतात. शरद ऋतूतील आकाश अगदी निर्मळ असते. रामगुणग्रामांच्या प्रभावाने राम हृदयात राहिले की भक्तीची पूर्णता झाली, म्हणजेच शरदांतील पौर्णिमेच्या रात्रीसारखे त्याचे हृदयाकाश निर्मळ होते. 'राकारजनी भक्तितव रामनाम तो सोम ॥' त्या आकाशात रामनामरूपी पूर्णचंद्र आधीच उगवला आहे, त्यामुळे पौर्णिमेच्या रात्री बारीक सारीक नक्षत्रे दिसत नाहीत. पण 'अपरनाम **उडुगण बिमल**' (३/४२/-) मोठाली तेजस्वी नक्षत्रेच उदयास येतात, दिसु लागतात. ही विमल नक्षत्रे कोणती?

(ख) 'हृदयसिंधु, मति, शुक्ति समाना । स्वाति शारदा गमे सुजाणा ॥ जर **वर्षी** वर बारि विचारू । होति काव्यमुक्तामणि चारू ॥' (१/११/८- ९) यात **बारिवर्षा** आहे, स्वातीचे **जलधर** आहेत, **हृदयसिंधु** आहे, **मति शुक्ति** आहे, व **काव्यमुक्तामणि तयार होतात.** चालू विषयांत **रामयशबारिवर्षा** आहे, साधु जलधर आहेत, सुकवि शरद आहे, हृदय आकाश आहे व विमल नक्षत्रे उदयास आली आहेत. यावरून ठरले की **उडुगण म्हणजे काव्यमुक्तामणी** (१) आणखी आधार पहा - वर्णन पौर्णिमेच्या रात्रीचेच आहे - 'नभीं विखुरली **मोती तारा । रजनि** सुंदरी करि शृंगारा' (६/१२/३) मूळात मुक्ताफल-मुकुताहल शब्द मोतीं च्या जागीं आहे. यात तारा-उडुगण-मोती. स्पष्टच आहे. यावरून उडुगण म्हणजे काव्यमुक्ताफळे, काव्यरूपी तेजस्वी तारे उदयास येतात हे ठरले. रामगुणयशरूपी जल बिंदूंची काव्यमुक्ताफळे रामभक्तिरूपी शारदी पौर्णिमेच्या रात्री, कवीच्या निर्मळ हृदय आकाशात नामचंद्र व रामचंद्र प्रकाशित झाल्यावर उदयास येतात. म्हणजेच त्याची इच्छा नसता आपोआप सुंदर मनोहर काव्यरचना रामगुण यशवर्णनपर होऊ लागते. तो प्रभूची स्तुती करू लागतो; अशा रीतीने तो सुकवि होऊन रामचरित काव्य निर्माण करतो हे सुचविले. पूर्वी दोहा ११मध्ये विचारांची आवश्यकता होती, येथे तीहि नसल्याने त्या मुक्ताफळांना विंधणे वगैरे आवश्यकता नसल्याने येथे वर्णन केले नाही. कारण की ही काव्यमोत्ये रामविमलयश वारीची बनतात व तेथील विचारवारीची बनतात. त्यामुळे तेथे नसलेला सुकवि शब्द येथे आहे.

(ख) येथे सुकवि शब्दाची जणू व्याख्याच दिली आहे. 'निर्मोह, अमानी, ज्ञानभक्तिसंपन्न, रामनामप्रेमी, रामचरित्र प्रेमी व सगुणसाक्षात्कारी संत असून ज्याच्याकडून, विनाप्रयत्न, सहजच भगवद् गुणवर्णनपर काव्य रचना होते तो सुकवि -ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, समर्थ, टेंब्ये स्वामी वगैरे संत हे सुकवीच होते.

(२) ही बावीसावी फलश्रुति, अभिजित नक्षत्राची - सर्वकपिगणांनी मनातल्या मनात केलेल्या स्तुतीची आहे. प्रेमभराने त्यांना बोलता येणे अशक्य झाले होते.

(क) अभिजित नक्षत्र आकाशात स्वतंत्र असले तरि बाराराशींच्या नक्षत्रात त्याची गणना स्वतंत्र नाही. ते त्यात गुप्त आहे, तशी ही स्तुती पण गुप्त, मूकस्तुती आहे. (उ. कां. १५-१७प.).

(ख) 'संतसुधीन्ही शुभ शृंगारू' व 'रजनी सुंदरी करि शृंगारा' यांची नीट तुलना करावी; व स्तुतीरूपी पुष्पांची वेणी (गजरा) हा त्या स्त्रीच्या केशकलापांतील एक शृंगार आहे असे जे तेथे म्हटले आहे ते पटते का पहावे. असले काव्य कोणाला किती प्रिय होते हे पुढील चरणांत सांगतात.

चौ - १२ चरण दुसरा - रामभक्त जन जीवन धनसे (१) ते त्या कवीने तयार केलेले रामचरित्र काव्य रामाला, रामभक्त-सेवकांना व सेवक- भक्तांना जीवन धनासारखे प्रिय होते. राम, भक्तजन व जन (सेवक) भक्त असे तीन घेणे चांगले. भक्तांचे जे सेवक शत्रुघ्नासारखे, दास्यभावाने रामभक्तांची सेवा करणारे ते जनभक्त,

(क) रामभक्त असणारे लोकांना जीवन धनासारखे (रामभक्त, जनजीवन धनसे) वाटतात हा अर्थहि आहेच. नुसते धन न म्हणता जीवनधन- सर्वस्व म्हटले. म्हणूनच सुग्रीव सर्वस्वाची इच्छा न करता रामसेवेची इच्छा करीत होता. अंगद युवराज्यादि सर्वस्वाचा त्याग करून हलकी सेवा करून पण रामसेवेत राहू इच्छित होता. 'मुनि धन, जन-सर्वस्व, शंभु असु' (१/१९८/२) असे रामचंद्र आहेत. जनसर्वस्व भक्तांचे-सेवकांचे सर्वस्व, म्हणजेच जीवनधन.

(२) ही तेविसावी फलश्रुति आहे. तेविसावे नक्षत्र श्रवण, अंगदाने केलेली स्तुती आहे. (उ. कां. १७ स - १८ दो.) १७ रा मध्ये अभिजित स्तुती संपते व १७म मध्ये श्रवण स्तुती सुरू होते. उत्तराषाढांचा शेवटचा भाग व श्रवणाचा आरंभीचा काही भाग मिळून अभिजित नक्षत्र गणतात.

हिं.- सकल सुकृत फल भूरि भोगसे । जगहित निरुपधि साधु लोग से ॥१३॥
सेवक मन मानस मराल से । पावन गंग तरंग माल से ॥१४॥

म.- **सकल सुकृत फल भूरि-भोगसे । जगहित निरूपधि साधुलोकसे ॥१३॥**
**सेवक मन मानस - मराल से । पावन गांग-तरंग-माल से ॥१४॥**

**अर्थ** – ते काव्य (रामभक्तजनाना) सर्वसुकृताच्या फळांच्या पुष्कळ- विपुल (भूरि)भोगांसारखे आहे (वाटते) व जगाच्या हितासाठी (अवतरलेल्या) सर्वोपाधिरहित- सर्वकपटादि रहित साधुलोकांसारखे आहे (असे वाटते) ॥१३॥ सेवकांच्या मनरूपी मानसात ते हंसासारखे वास करते व गंगेच्या (गांग, गंग) तरंगमालांप्रमाणे पावन करणारे ते रामचरित होते ॥१४॥

**टीका - चौ. १३ चरण पहिला – सकल सुकृत फल भूरि भोगसे –** भूरि - विपुल, पुष्कळ सुकृताचे फळ अनुकूल भोगप्राप्ती हे असते. सुकृत - पुण्य, सत्कर्म, धर्माचरण. '**महीपुण्य पुरुषा सुखपूरित** ॥' 'सागरि सरिता जाति जशा ही । जरी कामना तयास नाहीं' ॥२॥ 'तशि न मागता सुख - संपत्ती । **सहज धर्मशीलासी** जमती ॥३॥ तुम्हिं **गुरुविप्रधेनुसुरसेवी** । तशि पुनीत कौसल्या देवी ॥४।. जगीं तुम्हासम सुकृती काहीं । भूत न, नाही, होणे नाही' ॥५॥ (१/२८४) हे दशरथांस वसिष्ठ म्हणाले आहेत. दशरथ राजांना जे सुख मिळाले ते सकल सुकृताचे फळ होते. ते सम्राट होते व सर्व गोष्टी सुखकारकच घडत होत्या. या लोकांतील उत्तमोत्तम सुख मिळण्यास जे सगळे सुकृत लागते ते दशरथ कौसल्या यांनी केले होते. म्हणून त्यास सर्वसुख भोग सहज पाहिजे तेवढे मिळत होते. त्या सुखासारखे सुखभोग देणारे रामचरित आहे, असे रामभक्तांना वाटते. 'वेदपुराण संतमत हे हो!' सकल सुकृतफल रामीं स्नेहो' (१/७/२) हे रामचरित शब्द-वाक्ये नसून रामस्नेहाचा भरपूर स्वाद घेण्याला, रामस्नेहाने भरलेला सागरच आहे असे त्यास वाटते. दशरथाच्या असामान्य सुकृताचे फळ म्हणजे भगवंताचे त्यांच्यावरील प्रेम, त्यामुळेच ते दशरथनंदन झाले. 'जनक सुकृत मूर्तिच वैदेही । दशरथ-सुकृत चि राम सदेही' (१/३१०/१). सार हे की सकल सुकृताचे फळ या रामचरिताच्या आश्रयाने मिळेल, भगवान प्रगट होतील.

(२) ही **चोवीसावी फलश्रुति आहे. चोवीसावे नक्षत्र धनिष्ठा, अयोध्यावासी लोकांनी परोक्ष केलेली रामचंद्राची स्तुती आहे.** अयोध्यापुरी त्यावेळी इंद्रपुरीपेक्षा व इतर सर्व पुरीत **धनिष्ठा** होतीच. अत्यंत धनसंपन्न होती. सर्व पुरीत श्रीमंत होती. जेथे रामभगवान प्रत्यक्ष राजा होते त्या नगरीतील लोकांना भूरिभोग मिळाले नसतील काय? 'पुरी अयोध्यावासिजन सुख-संपदा समाज । कोटिशेष वदुं शकति ना जिथे राम नृपराज' (७/२६) ज्यांना चोही बाजूंनी चारीबाजूनी (धर्मार्थ काममोक्ष) विसावा पूर्ण मिळत होता त्या लोकांनी केलेली जी स्तुती तिची ही फलश्रुति । अनुक्रमांक सुद्धा किती सार्थ !

**चौ - १३ चरण दुसरा — 'जगहित निरुपधि साधुलोकसे** — 'संतविटप सरिता गिरि धरणी । सर्वांची परहितार्थ करणी' (७/१२५/६). (१) **निरुपधि** उपाधिरहित, निष्कपट, निःस्वार्थ. स्वार्थ हे सर्वात मोठे कपटाचे, मायेचे रूप आहे. हे रामचरित पूर्ण निस्वार्थी साधुलोकांप्रमाणे जगाचे हित करणारे आहे. 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति । देहकष्टवीती उपकारे' 'हेतुरहित जगीं जुग उपकारी । तुम्हिं (प्रभु) तुमचे सेवक असुरारी' (७/४७/५) 'संत उदय संतत हितकारी । विश्वसुखद, इव इंदु तमारी' (७/१२१/२१).

(२) **ही सनकादिमुनीनी केलेल्या स्तुतीची फलश्रुति आहे. ती स्तुती शततारका नक्षत्र आहे. ती पंचविसावी स्तुती आहे.** राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न व हनुमान या पंचायतनास - पाचजणाना या साधूंच्या दर्शनाने **विसावा** मिळाला आहे. 'आज धन्य मी पहा मुनीश्वर । अपले दर्शन अघराशी हर । **बहुभाग्ये** सत्संग लाभतो । विना श्रमहि भव भंग पावतो." (७/३३/७-८) हे रामचंद्र सनकादिकांस म्हणाले आहेत. **'निरुपधि साधु लोक'** कसे असतात याचे उदाहरण सनकादिकच आहेत; (क) हे रामचरित सनकादिकांसारखे जगाचे हित करणारे आहे, व याच्या प्रभावाने सनकादिकांसारखे निष्कपट साधू तयार होतील.

**चौ - १४ चरण पहिला — सेवक मन मानस मरालसे** — (१) मराल — हंस, हंस मानस सरोवरांत राहतात. **हा सरळ बाह्यार्थ झाला.**

(क) 'मुनिमनमानस-हंस निरंतर' (७/३५/७) - 'जयमहेशमन मानसहंसा' (१/२८५/५) 'मुनिमहेशमन-मानस-हंसा' 'शंकरमानस राज मराला'. मनरूपी मानसातील हंस हे फक्त रामचंद्रानाच तुलसी मानसात म्हटले आहे. त्या अर्थी भाव हा की या रामचरितानेसुद्धा त्याच्या, श्रोत्यांच्या हृदयात रामचंद्र विहार करतील व ध्वनित केले की तुलसीदासांच्या मनमानसात व रामचरितमानसात राम राहिले आहेत. **'कवितामंजरी - यस्य रामभ्रमर भूषिता'** झाली आहेच. (चरित्र पहा.)

(२) **ही सव्विसाव्या स्तुतीची फलश्रुति आहे. ही अयोध्यावासी गुरु मुनिद्विज सज्जन यांनी दरबारांत केलेली स्तुति पूर्वाभाद्रपदा नक्षत्र आहे;** व रामचंद्रांनी केलेला उपदेश ह्या सर्वांच्या मनमानसात विहार करीत राहिला आहे; व त्या उपदेशाची प्रशंसा कलहंसाप्रमाणे करीत सर्व राजहंसासारखे चालत घरोघर गेले आहेत.

**चौ. १४ चरण दुसरा — पावन गांग तरंगमाल से** — (१) गांग — गंगेचे, गंगेवरील. हे रामचरित सुद्धा गंगेच्या तरंगांच्या मालांसारखे पावन करणारे आहे. 'विमल तरंग लसति रघुवर चरित्र से' (वि. प. १९) 'तुजविण जगदंब गंग! कलिजुग का करत' घोर भव अपार सिंधु तुलसी किमि तरत' ॥३॥ 'हे जगदंबे गंगे! तुझ्या शिवाय मी या कलियुगात काय केले असते?' व हा अपार घोर भव सिंधु तुलसीदास कसा तरला असता? येथे हा भाव आहे की हे रामचरित नसेल तर

कलियुगांतील पामर जीवांना आपल्या पापांचे क्षालन करून उद्धार करून घेण्यास काही सोपा मार्ग नव्हता, 'नमूं शारदा नी सुरसरिता । युगल पुनीत मनोहर चरिता ॥ मज्जन पानिं पाप हरि एका । श्रवणि कथनि दुजि हरि अविवेका' (१/१५/१-२) यात गंगा व हरिकथा यांचे जे साम्य दाखविले तेच येथे दाखविले; पण रामचरित रूपी गंगा 'सकल सुलभ सबदिन सब देशां' आहे. पाचव्या चौपाईत 'शमन पाप' म्हणून जे सांगितले त्याचा येथे उपसंहार केला, व यामागील १२व्या चौ. पासून या चौपाईत अभ्यास, अपूर्वता व फल यांचा उपसंहार उलट क्रमाने केला व पापविनाश ही जी प्रथम भूमिका तिचा उपसंहार या चरणाने केला.

(२) ही फलश्रुति वसिष्ठानी केलेल्या स्तुतीची आहे. ती सत्ताविसावी स्तुती उत्तराभाद्रपदा नक्षत्र आहे, या स्तुतींतच म्हटले आहे की 'प्रेमभक्ति जलविण रघुवर तो अभ्यंतर मल कधीं न जातो' (७/४९/६) मागील चौपाईतच सांगितले आहे की ही रामगुणमालिका रामस्नेह सागरच आहे. त्याने मार्जन, त्याच्यात मज्जन, व त्याचे स्नान केल्याशिवाय, चित्तमल जाणार नाही. रघुनाथाची अवतार सत्ता बिसावा घेण्याची तयारी करते त्यावेळची ती स्तुती आहे.

संगति — 'जगमंगल रामाचे गुणगण' याने दुसऱ्या चौपाईत केलेल्या उपक्रमाचा उपसंहार पुढील दोह्यांत करतील, व त्या नारदकृत स्तुतीबरोबर रघुनाथावताराची समाप्ति होते व पुढे ५२व्या च्या चौपायात मुख्य रामचरिताचा उपसंहार शंकर करतात.

हिं.दो.- कुपथ कुतर्क कुचालि कलि कपट दंभ पाखंड ।
दहन रामगुन ग्राम जिमि इंधन अनल प्रचंड ॥३२रा.॥

म.दो.- कुपथ कुतर्क कुचालि कलि कपट दंभ पाखंड ।
दहन रामगुण गण जसा अनल इंधना चंड ॥३२रा.॥

अर्थ — जसा प्रचंड अग्नि (अनल) इंधनाला (सर्पणाविकास) जाळून टाकतो, त्या प्रमाणे कुपथ (कुमार्ग, वेदविहित नसलेला), कुतर्क, कुचाली (वाईट आचार, व्यवहार) व कलियुगाचे प्रबल दुर्गुण कपट, दंभ व पाखंड यांचे दहन रामगुणगण करतात. ॥३२रा.॥

टीका — दोहा, रा — (१) कुपथ — कुमार्ग, वेदांनी व स्मृतिपुराणादि शास्त्रांनी सांगितलेल्या मार्गाहून निराळा मार्ग तो कुपथ; 'गति कुपथी श्रुति पथा सांडिती' (१/१२/२)

(२) कुतर्क — दुस्तर्क, शास्त्रसंमत नसलेले तर्क, अनुमाने, जसे - रावणाला रामाने क्रोधाने ठार मारला; कारणा शिवायच सीतेचा त्याग केला; बिभीषण बंधुद्रोही

होता; सर्व माणसे ईश्वराचीच लेकरे मग जाति भेद, पंक्तिभेद इत्यादि कशाला? शेंडीतच हिंदुधर्म आहे काय? चमत्कार वगैरे सर्व थोतांड आहे, इत्यादि सर्व कुतर्क आहेत, व यांचा प्रभाव जास्त शाहण्या व सुशिक्षित समजल्या जाणाऱ्या लोकांत फारच पडला आहे. याचे कारण श्रुतिमार्गाचा त्याग हेच आहे. 'दुस्तर्कात् सुविरम्यतां श्रुतिमतस्तर्कोऽनुसंधीयताम्' (सा. पं.) (३) कुचालि – कुचाली -वाईट चाली रीती. कुलधर्म, कुलाचार, देशाचार यांच्या विरुद्ध वर्तनादि-कपटाचे व कलीचे वर्णन पूर्वी आले आहे. (४) दंभ – 'दंभ म्हणजे योडंबरी । आंत नसोनि दावी वरिवरी ॥ आत करोनि शौचकूप । बाहेर यज्ञशाळेचे रूप' (हरिवरदा) -आपल्या जवळ जे सद्गुण इत्यादि नाही ते आहे असे दाखविण्याचा बाह्य प्रयत्न म्हणजे दंभ. आपण केलेले पुण्य, धर्म, इत्यादि लोकांना सांगणे, त्याची प्रसिद्धि करणे यास ज्ञानेश्वरांनी दंभ म्हटले आहे.

(५) पाखंड – वेदमार्ग विरोधी मार्ग -चांगला, कारण असा नवा मार्गच नव्या काळाला योग्य, लोक कल्याणकारक, हितकर्ता, इत्यादि प्रकारे बोलणे, लिहिणे, करणे हे पाखंड मत. नवीन पंथ, नवीन समाज, बहुतेक पाखंड मत प्रचारकच आहेत. दंभपाखंडांनी परमार्थमार्गापासून पोटासाठी भीक मागणाऱ्यापर्यंत व संन्याशांपासून ब्रह्मचर्याश्रमापर्यंत, सर्व धंद्यात, सर्व व्यवहारात आपले हातपाय पसरले आहेत, हा कलिप्रभाव प्रगट आहे.

(क) कपट असेल तेथे दंभ असेलच असे नाही. पण दंभ असेल तेथे कपट असतेच. कपट मानसिक असते, व दंभ शारीरिक व वाचिक असते. पाखंडांत दंभ कपट असतातच असे नाही.

(ख) प्रचंड (चंड) अग्नीला इंधनाचे ढीग जाळणे म्हणजे खेळ आहे त्याचा. त्याप्रमाणे कुपथ कुतर्कादि कितीहि प्रचंड असोत, लोक रामगुणगण श्रवणादि करतील तर त्यांचा सहज विनाश होतो.

(६) ही अठ्ठाविसावी फलश्रुति रेवतीनक्षत्र स्तुतीची आहे. ती स्तुति उ. कां. दो ५१ मध्ये नारदांनी केली आहे. रघुनाथाच्या महाप्रस्थान काळीच ही केलेली आहे. 'जगमंगल रामाचे गुणगण' याने या स्तुति नक्षत्रमंडळाच्या फलश्रुति कथनास प्रारंभ (उपक्रम) केला. व 'रामगुणगण' शब्दांनी ते मंडल पूर्ण झाल्याचे दाखविले, मध्ये कोठेहि रामगुणगण हे शब्द आलेले नाहीत. दुसऱ्या चौपाईत केलेल्या उपक्रमाचा उपसंहार येथे केला. मंगलकारीने उपक्रम केला व अमंगलहारीपणा दाखवून उपसंहार केला व सुचविले की 'मंगलकारि अमंगलहारी' रामचरित आहे. 'करिमंगला हरि कलिमला' १०छं. पहा. पहिल्या चौपाईत केलेल्या उपक्रमाचा उपसंहार पुढल्या दोह्यांत करतील.

हिं.- रामचरित राकेस कर सरिस सुखद सब काहु ।
सज्जन कुमुद चकोर चित हित बिसेष बड लाहु ॥३२म.॥

म.- रामचरित राकेशकर सदृश सुखद सर्वांस ।
सज्जन कुमुद चकोर मन हितकर अति लाभास ॥३२म.॥

अर्थ – रामचरित पौर्णिमेच्या चंद्राच्या किरणां सारखे असून सर्वांसच सारखे सुखदायक आहे, (तरीपण) सज्जनरूपी कुमुदांनां (रात्रिविकासी कमले)व सज्जनांच्या मन (चित्त) रूपी चकोरांनां ते अधिक हितकर व अतिशय लाभदायक वाटते. ॥३२म.॥

टीका – दो. ३२ म. (१) राकेश – कर – राका-पौर्णिमेची रात्र, कर -किरण, राकेश. पौर्णिमेचा चंद्र. रामचरित्र हे 'पौर्णिमेच्या चंद्राचे किरण' असे म्हटले, चंद्र म्हटले नाही. बाराव्या चौपाईत शरद ऋतूचा उल्लेख आहे, म्हणून शरद ऋतूतील पौर्णिमेच्या चंद्राचे किरण असा अर्थ घेतला पाहिजे. त्या (१२व्या) चौपाईत सुद्धा चंद्र म्हटलेले नाही, का ते पुढे पाहू. शरदांतील उन्हाळयाने-तापाने-पशुपक्षीमनुष्य, सर्वच अगदी तप्त झालेले असतात. त्यामुळे सर्वांनाच शरच्चंद्र किरण सुखद वाटतात. 'निशिशशि शरदातपा पिटाळी.' (४/१७/६) याने हा भाव निघतो की जे त्रिताप संतप्त झाले असतील त्या सर्वांस सुखद आहे. हा अर्थ न घेतल्यास अतिव्याप्ति-दोष उत्पन्न हातो, कारण की पौर्णिमेच्या चंद्राचे किरण चोर, चक्रवाक, वाघ, इत्यादि निशाचरांस सुखद वाटत नाहीत; दुःखद वाटतात. 'परिसुनि तुमचे वच सम शशिकर । फिटे मोहशरदातप अतितर' (१/१२०/१) हे रामचरित्राविषयीच पार्वतीचे वचन आहे. पौर्णिमेच्या चंद्र किरणांत अमृतस्राव होत असतो व ह्यामुळे ते विशेष शीतल असतात. सुखद असतात. शरच्चंद्र किरणांत हा गुण विशेष असतो.

(२) रामचंद्रांस चारु चंद्र म्हटले आहे, रामनाम रामापेक्षा मोठे हे मागे दाखविले आहे; तेव्हा रामचरिताला चंद्र म्हणणे कसे शोभले असते? 'राका रजनी भक्ति तव राम नाम तो सोम. (३/४२). रामनाम पौर्णिमेचा चंद्र आहे. 'श्रीरामनामामृतम्' रामनाम अमृत आहे. शरत्पूर्णचंद्र नुसत्या अमृताचा नाही. त्याच्यात, त्याच्या किरणांत अमृत असते, म्हणून रामचरिताला किरण उपमा देणेच सयुक्तिक आहे. (दो. १९ पहा) रामचरितात रामनाम चंद्र आहे म्हणूनच ते अमृतप्रचुर झाले आहे. यावरून हे ठरले की रामनामामृतशरच्चंद्राचे किरण म्हणजेच रामचरित. येथे हे सुचविले आहे की रामनाम कारण आहे व रामचरित कार्य आहे. 'यामधि रघुपति नाम उदार' हे पूर्वीच सांगितले आहे. शिवाय रामनामांतूनच सर्व विश्वाची उत्पत्ति होते हे नाम वंदन प्रकरणात आधीच सांगितले आहे, त्याच्याशीही उत्तम समन्वय होतो.

(३) सज्जन कुमुद चकोर मन (चित्त) - चकोरांच्या चित्ताला-मनाला- शरच्चंद्रकिरण फारच लाभदायक वाटतात. इतरांना तितके वाटत नाहीत.

(क) कुमुद - चंद्रविकासी कमळे - चंद्रकिरणांचा स्पर्श झाला की यांची मिटलेली मुखे प्रफुल्ल होतात, पाकळ्या उमलतात, कमलांतील पराग पाण्यात पसरू लागतात व त्याबरोबर मकरंदही पसरतोच. म्हणजेच सज्जनांचे शरीर, इंद्रिये इत्यादि पुलकित, प्रसन्न होतात. त्यांच्या चित्त रूपी चकोरांनी रामचरितरूपी किरणांतील रामप्रेमामृताचे पान, आस्वादन केले की त्यांच्या नयनांतून अनुराग मकरंद गळू लागतो.

'पदकमल परागां रस अनुरागा' मम मन मधुप करी पाना' (१/२११/३) चकोर जसा एकतानतेने चंद्रामृतपान करीत असतो तसेच संतांचे मन एकाग्र होऊन श्रवण करीत असते, व त्यास इतर कशाचीही स्मृति होत नाहीं. 'रामकथा शशिकिरण समाना । संतचकोर करिति तत्पाना' (१/४७/७) 'रामभक्तिरस' 'प्रेम अमृत' - रामचरित चंद्रकिरणांतून संतांचे मन रूपी चकोर रामप्रेमामृतरसाचे पान करतात. 'सुकृत फल रामीं स्नेहो' हे सुंदर फल मिळते. इतर पक्षी चंद्रकिरणांतून अमृतपान करू शकत नाहीत, हा स्वभाव भेद. कमळांना चंद्रकिरण स्पर्श जसा सुखद, हितकर, वाटत नाही तसेच रामचरित इतरांस हित वाटत नाही, हा त्यांच्या स्वभावाचा धर्म आहे, इतर जे तप्त झाले असतील त्यांचा ताप शांत होईल, चित्ताची तळमळ कमी होईल, समाधान वाढेल इत्यादि फायदे सर्वांना होतीलच. 'स्रवत नाथ आनन शशी कथासुधा रघुवीर ॥ श्रवणपुटीं मन पिउनियां तृप्त नसे मतिधीर' (७/५२) यांतील अर्थच वर अभिप्रेत आहे. या हिंदी दोह्यांतहि मन शब्दच आहे. ल. ठे. चालू दोह्यांत टीकाकारांनी मन, मति व चित्त असे भेद केले आहेत ते अनुचित आहेत हे उ.कां. दो. ५२ मधील मन शब्दाने स्पष्ट होते. 'चित्तं तु चेतो हृदयं स्वान्तं हृन्मानसं मनः' (अमरे) हे समानार्थी आहेत. बुद्धि मात्र निराळी आहे. मन व बुद्धि या दोन शब्दांनीच अंतःकरण चतुष्टयाचा उल्लेख केलेला काही दार्शनिक ग्रंथांतही आहे, येथे दार्शनिक सिद्धान्ताची चर्चा नसल्याने या शब्दांच्या अर्थाच्यासूक्ष्म भेदात शिरण्याचे कारण नाही. अरण्य काण्ड १५/१ मध्ये टीकेत मन मति चित्त यांतील सूक्ष्मभेद स्पष्ट केले आहेत.

(४) येथे या दोह्याची लांबलेली टीका श्रीरामकृपेनेच पूर्ण झाली. प्रत्येक चरणा चरणाची संगति पाहता आली म्हणून शेवटापर्यंत व्यवस्थितपणे पोचता आले. विस्तारभय सतत पुढे ठेऊन सुद्धा इतका विस्तार करावा लागला! तरी सुद्धा लिहिण्याच्या ओघात व पुढील विचारांच्या ओढीने कितीक गूढ भाव चुकून राहिले असतील ते वाचकांनी पूर्ण करून घ्यावे.

पूर्वी हवाला दिल्याप्रमाणे श्रीरामचरित्र व रामनाम यांची तुलना खाली केली आहे. ती उपमा सादृश्याने वाच्यार्थापुरतीच आहे.

| रामचरित | राम नाम |
|---|---|
| दोहा ३१ | |
| भ्रम संदेह - मोह निज हरणी ॥४॥ | प्रबल मोहदल अश्रम जितती ॥२५/७॥ |
| रामकथा कलि कलुष विभंजनि | नाम सकल कलि कलुष निकंदन ॥२४/ |
| ८॥बुधविश्राम सकल जन रंजनि ॥५॥ | भक्त बनति मुद-मंगल-आश्रम ॥२४/२॥ |
| रामकथा कलि-पन्नग भरणी ॥६॥ | कालनेमि कलि कपटनिधानू<br>नाम समर्थ सुमति हनुमानू ॥२७/८॥ |
| ज्ञान पावकाला की अरणी ॥६॥ | नाम निरूपण सुयत्न घडतो<br>होई मणि-मूल्य सा प्रगट तो ॥२३/८॥ |
| रामकथा कलिं कामधेनु वर ॥७॥ | रामनामकलिं अभिमत दाता ॥२७/६॥ |
| मुळी सुजन संजीवनि सुंदर ॥७॥ | काळकुटें फळ सुधा समर्पित ॥१९/८॥ |
| ती वसुधा तळिं सुधा तरंगिणि ॥८॥ | स्वाद तोष सम सुगति सुधेचे ॥२०/७॥ |
| भवभंगा भ्रमभेक भुजंगिनि ॥८॥ | भवभय भंजन नाम प्रतापहि ॥२४/६॥ |
| साधु-विबुध-कुल हित गिरिनंदिनि ॥९॥ | शुकसनकादिसिद्ध ...<br>सुखभोगी ॥२६/२॥ |
| विश्वभार भर अचला क्ष्मासी ॥१०॥ | कमठ शेष सम धर वसुधेचे ॥२०/७॥ |
| जीवन्मुक्ति - हेतु जणुं काशी ॥११॥ | काशीं मुक्तिहेतु उपदिशती ॥१९॥ |
| तुलसिदास-हित हृदिं तुलसीसी ॥१२॥ | तुलसीप्रिय सम राम नि लक्ष्मण ॥ |
| शिवप्रिय मेकल-शैल-सुतासी ॥१३॥ | रामचरित शतकोटितुनि ... गणि<br>महेश घे प्राण |
| सकल सिद्धि सुख संपति रासी ॥१३॥ | होति सिद्ध अणिमादिक लाहुनि ॥ |
| रघुपति भक्ति प्रेम परमिति सी ॥१४॥ | सकल कामनाहीन जे रामभक्तिरसलीन<br>नामप्रेम-सुधा हृदीं त्यानिंहि कृत मन मीन ॥ |
| दो. ३२ | |
| रामचरित चिंतामणि चारु ॥१॥ | रामनाममणि-दीप. ॥२१॥ |
| संत-सुधी-स्त्री-शुभ-शृंगारू ॥१॥ | भक्ति-सुत्रि-कल-कर्ण-विभूषण ॥२०॥ |
| जग-मंगल रामाचे गुणगण ॥२॥ | मंगलभवन अमंगलहारी ॥१०॥ |
| दायक मुक्ती धाम धर्म धन ॥२॥ | मुक्त होति हरिनाम बलें, ॥२६/९<br>नाम अमित खल उद्धरी ॥२४॥ |
| विबुध वैद्य भव-भीषण-रोगा ॥३॥ | भवभेषज यन्नाम ७/१२४/- |
| जननि-जनक सिय-रामप्रेमा ॥४॥ | स्नेहे हृदयीं रूप येत तरि २१/६॥ |
| बीज सकल धर्मा व्रत नेमां ॥४॥ | सकल सुकृत फल. |

| | |
|---|---|
| शमन पाप-संतापां शोका ॥५॥ | नाम अखिल अघ पूग विनाशन |
| प्रिय पालक परलोका लोका ॥५॥ | लाभ लोकिं परलोक निभावक ॥ (२०/२)<br>हित परलोक लोकि पितु<br>माता ॥ (१/२७/६) |
| काम कोपकलि... केसरि शावक ॥७॥ | राम नाम नर केसरी ॥ (दो. ७) श्रेष्ठता |
| प्रियतम पूज्य पुरारि अतिथि हे ॥ | नाम सहस्रासम शिव वाणी ॥ (१९/६) |
| कामद घन दारिद्य दावि हे ॥८॥ | राम नाम हा कल्पतरु ॥ (दो. २६) |
| मंत्र महामणि विषयां व्यालां ॥९॥ | महामंत्र जो महेश जपती ॥ (१/१९३) |
| पुसति कठिण जे कुअंक भाला ॥९॥ | नाम घेत सुकतो भवसागर ॥ (१/२५/४) |
| हरण मोहतम दिनकर-करसे ॥१०॥ | नाम जयाचे भ्रमतम भानु ॥ (१/११६/४) |
| सेवक शालि-पाल जलधरसे ॥१०॥ | सेवक शालि सुदास - रामनाम<br>श्रावण - भादव<br>(वर्षाऋतु) ॥१०॥ (१/१९ दोहा) |
| सेवत सुलभ सुखद ॥११॥ | स्मरत सुलभ सकलां<br>सुखदायक ॥ (१/२०/२) |
| सुकवि शरद मन नभिं उडुगणसे ॥१२॥ | अपर नाम उडुगण विमल ॥ (३/४२म) |
| रामभक्त जन जीवन धनसे ॥१२॥ | रामचरित शतकोटिंतुनि गणि महेश घे<br>प्राण ॥ (१/२५) |
| सकल सुकृत फल भूरि-भोगसे ॥१३॥ | सकल सुकृत फल रामीं स्नेहो ॥२७/ |
| जगहित निरुपधि साधु लोकसे ॥१३॥ | जगहित हेतु विमल विधु<br>पूषण ॥ (१/२०/६) |
| सेवक - मन - मानस मरालसे. ॥१४॥ | संतत जपति शंभु अविनाशी ॥ ( /४) |
| पावन गांग-तरंग मालसे ॥१४॥ | जनमन अमित नाम करि पावन (१२४७)<br>अमित कोटि तीर्थांसम पावन ।<br>नाम (७/९२/२) |
| कुपथ कुतर्क कुचालि कलि कपट<br>दंभ पाखंड | दास दुराशा दुखां दोषां । ध्वंसी नाम<br>जसा रवि दोषा ॥(१/२४/५) |
| दहन रामगुणगण जसा अनल इंधना चंड | नाम कोटि खल कुमतिसुधारी(१/२४/३) |
| रामचरित राकेशकर | राम नाम तो सोम (श्रेष्ठता) (३/४२रा) |
| सदृश सुखद सर्वांस ॥दो. ३२ म॥ | सुलभ सकलां सुखदायक ॥२०/२॥ |
| रामचरित अति अमित<br>मुनीशा ॥ (१/१०५/३) | रामनाम ... श्रुति वदती<br>पार न' (१११४/३) |
| वर्णवे न शतकोटि अहीशा (१/१०५/३) | राम नाम गुण वदूं न शकती ॥ (२६८) |

| | |
|---|---|
| कलियुगीं केवल हरिगुणगाथा (७/१०३/४) | नहिं कलिं कर्म न भक्ति विवेकू । रामनाम अवलंबन एकू ॥ (१/२७/७) |
| भव ठावा नर पावति गाता (७/१०३/४) | नाम घेत सुकतो भवसागर ॥ (२५४॥) |
| करूं कथा भवसरिता तरणी" (१/३१/४) | नाथ नाम तव सेतु चढुनि भवाब्धी तरती नर ॥ (लं. कां मं. सोरठा२) |
| भवसागर... दृढ नौका ही ॥ (७/५३/३) | (श्रेष्ठता) |
| श्रवण कथन अनुमोदन करती/ते भवनिधि गोपद इव तरती ॥ (७/१२९/६) | जे स्मरणा नर सादर करती । भववारिधि गोपद इव तरती ॥ (१/११९/४) ॥ |

याप्रमाणे यथामति साम्य व वैशिष्ट्य दाखविले. ही तुलना मा. पी. मधील तुलनेपेक्षा मोठी झाली आहे, तरी सुद्धा काही साम्य सुटले असण्याचा संभव आहे. वाचकांनी न्यून पूर्ण करावे. येथे हे रामकथा माहात्म्य वर्णन समाप्त.

- - -

# आमची इतर प्रकाशने

श्री परमपूज्य प्रज्ञानानंद सरस्वती स्वामी यांचे अप्रकाशित वाङ्मय प्रसिध्द करावे हा प्रधान हेतू मनात ठेवून १९८८ साली 'श्रीरामचरितमानसप्रेमी मंडळ' डोंबिवली या नावाने सार्वजनिक विश्वस्तसंस्था (रजि.नं.ए - ९२९, ठाणे विभाग) नोंदविण्यात आली असून या ट्रस्टतर्फे खालील पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

सर्व पुस्तके एकदम मागविणाऱ्यास टपालखर्च माफ केला जाईल.

| पुस्तके | किंमत |
|---|---|
| श्रीरामचरितमानस (मराठी समवृत्त समच्छंद अनुवाद) | १२०/- रु. |
| श्री पू.स्वामी प्रज्ञानानंद सरस्वतीकृत | |
| मानस गूढार्थ चंद्रिका (अरण्यकांड मराठी) | १००/- रु. |
| मानस गूढार्थ चंद्रिका (अरण्यकांड हिंदी) | १००/- रु. |
| मानस गूढार्थ चंद्रिका (किष्किंधाकांड मराठी) | ६०/- रु. |
| मानस गूढार्थ चंद्रिका (किष्किंधाकांड हिंदी) | ५०/- रु. |
| मानस गूढार्थ चंद्रिका (सुंदरकांड हिंदी) | ८०/- रु. |
| मानस गूढार्थ चंद्रिका (बालकांड मराठी खंड -१) | २५०/- रु. |
| मानस गूढार्थ चंद्रिका (बालकांड मराठी खंड -२) | २००/- रु. |
| मानस गूढार्थ चंद्रिका (बालकांड हिंदी) | ३००/- रु. |
| श्रीरामनामवंदना (हिंदी) | ३६/- रु. |
| श्रीगोस्वामी तुलसीदासकृत (भाष्यकार : पू. प्रज्ञानानंद सरस्वती) | |
| संगीत गीता समश्लोकी | १२/- रु. |
| आवृती दुसरी (मराठी) | |
| स्वामी प्रज्ञानानंद सरस्वती | १५/- रु. |
| लेखिका : डॉ. श्रीमती कमल वैद्य | |
| चूडालाख्यान (हंसराज स्वामीकृत) | २५/- रु. |
| हनुमान चालिसा (मराठी) व इतर स्तोत्रें | ५/- रु. |
| प्रज्ञानांजली (नित्यभजन संग्रह) | ५/- रु. |
| मानवतापूर्ती साधन व संध्योपासना | १२५/- रु. |

**श्रीरामचरितमानसप्रेमी मंडळ**

४,श्रीगणेश,अनंतराज सोसायटी, जलाराम मंदिरजवळ, नेहरु रोड,
डोंबिवली (पूर्व) ४२१ २०१